# मराठी प्रादेशिक कादंबरी

## स्वरूप आणि विश्लेषण

प्रा.डॉ.भास्कर शेळके



अगस्ति कॉलेज ग्रंथालय
*DN2891*

पुस्तक जपून वापरावे.

DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE, AGASTI ARTS, COMMERCE & LIBRARY AKOLE 422601 DIST. AHMEDNAGAR

# मराठी प्रादेशिक कादंबरी : स्वरूप आणि विश्लेषण

(निवडक कादंबऱ्यांच्या आधारे चिकित्सक अभ्यास)

891.46309
SHE
DN 2891

**प्रा. डॉ. : भास्कर शेळके**
मराठी विभाग प्रमुख
श्री. शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, पुणे

Agasti Arts Commerce & Dadasaheb Rupwate Science College, Akole, Dist. Ahmednagar
LIBRARY DONATION
Acc.No. DN 2891
Price 450/- Dt. 6/12/17

शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

अगस्ति कॉलेज ग्रंथालय
*DN2891*

- *Marathi Pradeshika Kadambari :*
  *Swarup Ani Vishleshan*

- ***मराठी प्रादेशिक कादंबरी :***
  ***स्वरूप आणि विश्लेषण***
  निवडक कादंबऱ्यांच्या आधारे
  चिकित्सक अभ्यास


- **प्रा. डॉ. : भास्कर शेळके**
  मराठी विभाग प्रमुख
  श्री. शिव छत्रपती महाविद्यालय,
  जुन्नर, पुणे- ४१० ५०२



© **डॉ. अविनाश भास्कर शेळके**



- प्रकाशक
  सुमती लांडे
  शब्दालय प्रकाशन,
  पोस्ट बॉक्स नं. ९०, वॉर्ड ७,
  श्रीरामपूर - ४१३ ७०९
  फोन : ०२४२२-२१०४२५
  मोबा. : ९८२२२१५०९९

- प्रकाशन क्रमांक २३१

- पहिली आवृत्ती
  २५ एप्रिल २०१२

- मुखपृष्ठ :
  धनंजय गोवर्धने

- अक्षरजुळणी
  क्रांती एजन्सीज, पुणे

- मुद्रक
  स्मिता प्रिंटर्स, पुणे

- मूल्य : ४५०/- रुपये

- ISBN : 978-93-80617-31-2

DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE ... ARTS, COMMERCE & ... LIBRARY AKOLE

अर्पण पत्रिका

डॉ. आनंद यादव
डॉ. नागनाथ कोतापल्ले
डॉ. द. ता. भोसले
डॉ. वासुदेव मुलाटे
डॉ. रावसाहेब कसबे
आणि
प्रा. मा. रा. लामखडे
श्री. का. म. चौरे

या गुरूजनांस.......

# मनोगत

'मराठी कादंबरीतील प्रादेशिकता' या माझ्या पहिल्या पुस्तकाचे अभ्यासक, संशोधक वाचकांनी उत्स्फुर्त स्वागत केले. पहिली आवृत्ती हातोहात संपली. दुसरी आवृत्ती आली. पद्मश्री विखे पाटील पुरस्कार प्रवरानगर आणि कै. के. बी. रोहमारे पुरस्कार, कोपरगाव यांनी या पुस्तकाचा सन्मान केला याचा आनंद आहेच ।

मराठी प्रादेशिक कादंबरीचे स्वरूप विश्लेषण करावे, पुस्तक रूपात सादर करावे, असे सतत वाटत होते, या संबंधी शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूरच्या संचालिका सुमती लांडे यांच्याशी चर्चा केली त्यांनी हे महत्त्वाचे काम पुस्तक रूपाने आणण्याचे मान्य केले. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केलीच पाहिजे. अक्षरजुळणीचे काम क्रांती एजन्सीजचे श्री. तानाजी जाधव यांनी आणि मुद्रणाचे काम स्मिता प्रिंटर्स यांनी आकर्षक व मन:पूर्वक केले त्यांचेही आभार ।

माझ्या लेखनास संशोधनास प्रोत्साहन देणारे मा. ॲड. संजय शिवाजीराव काळे आणि श्री. शिव छत्रपती महाविद्यालयातील सर्वजण यांची प्रेरणा आहेच, त्यांच्या ऋणात रहाणे मी पसंत करतो.

माझे कुटुंबीय आई वडिल (दुर्गाबाई, त्रिंबकराव) भाऊ-भावजयी प्रा. सयराम आणि मीना, पत्नी सौ. तारादेवी आणि चि. डॉ. अविनाश, चि. सुनित यांनी माझ्या लेखन प्रपंचास हातभार लावला, त्याचे प्रेमळ सहकार्य विसरता येत नाही.

**– डॉ. भास्कर शेळके**

# प्रस्तावना

"मराठी प्रादेशिक कादंबरी : स्वरूप आणि विश्लेषण" हे माझे पुस्तक आपल्या हाती देतांना विशेष आनंद होत आहे. यामध्ये प. महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भ अशा महाराष्ट्राच्या चारही स्वाभाषिक विभागातील निवडक ४३ प्रादेशिक कादंबऱ्यांचे स्वरूप केले आहे. प्रादेशिक कादंबरीचे स्वरूप विश्लेषण करण्यासाठी १) भूप्रदेश २) निसर्ग ३) भाषाविशेष ४) समाजजीवन ५) आर्थिक चित्रण ६) सांस्कृतिक जीवन ७) राजकीय पार्श्वभूमी या प्रमुख घटकांच्या आधारे विवेचन केले आहे 'समूहमनाचा गरज' प्रादेशिक कादंबरीत ऐकू येतो का? हे अभ्यास करून मांडले आहे. प्रदेशाचा, निसर्गाचा खोलवर संस्कार मानवी जीवनावर होत असतो ते अनुभवाचा अविभाज्य घटक म्हणून कलाकृतीत अभिव्यक्त होत असते. स्वरूप विश्लेषणासाठी निवडलेल्या कादंबऱ्या या प्रमुख मैलावरील कादंबऱ्या आहेत त्या प्रातिनिधीकही आहेत, यामुळे विविध प्रदेशातील समस्या, लोक जीवन आणि संस्कृती त्यामध्ये कशाप्रकारे आली आहे, ते साधार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

प.महाराष्ट्रातील २२, मराठवाड्यातील ११, विदर्भ ५, मराठवाड्यातील ५ अशा या संख्येने कमी अधिक कादंबऱ्या आहेत. या निर्मिती संख्येतही प्रादेशिकता आहे. प. महाराष्ट्राचा विकास झपाट्याने झाल्यामुळे तेथे शिक्षण प्रसार झाला. कादंबरी लेखनही अधिक झाले. कोकण मुंबईच्या निकट असल्यामुळे साक्षरतेमुळे लेखन झाले. विदर्भ मराठवाड्याचा अनुशेष अपूर्ण असल्यामुळे लेखनास देखील मर्यादा पडल्या. स्वाभाविकच कादंबऱ्याची संख्याही मर्यादित आहे, परंतु एकूण त्यातील निवडक, महत्त्वाच्या वळणावरच्या या सर्व कादंबऱ्या आहेत, त्यामधील प्रादेशिकतेचे, स्वरूप विश्लेषण आपणास भावण्याची खात्री वाटते !

**– डॉ. भास्कर शेळके.**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप | ११ |
| | अ) स्वातंत्र्य पूर्वकाळ | १२ |
| | ब) स्वातंत्र्योत्तर काळ | १४९ |
| २. | कोकणी (गोव्यासह) जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप | २०८ |
| ३. | मराठवाड्याच्या जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप | ३३२ |
| ४. | वैदर्भीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप | ३९२ |

DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE LIBRARY AKOLE

# १. पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप विश्लेषण

**प्रस्तावना**

पश्चिम महाराष्ट्रीय जीवनचित्रण करणाऱ्या खालील प्रादेशिक कादंबऱ्यांच्या आधारे समाजवास्तवाचे विश्लेषण करता येईल.

| | | |
|---|---|---|
| | अ) | |
| १) | कसे दिवस जातील | ना. वि. कुलकर्णी |
| २) | शिपाई | ना. वि. कुलकर्णी |
| ३) | पाणकळा | र. वा. दिघे |
| ४) | गावगुंड | ग. ल. ठोकळ |
| ५) | उघड्या जगात | म. भा. भोसले |
| ६) | बळी | विभावरी शिरुरकर |
| ७) | पवनाकाठचा धोंडी | गो. नी. दांडेकर |
| ८) | माचीवरला बुधा | गो. नी. दांडेकर |
| ९) | बनगरवाडी | व्यंकटेश माडगूळकर |
| १०) | फकिरा | आण्णाभाऊ साठे |
| ११) | माकडीचा माळ | आण्णाभाऊ साठे |
| १२) | वारणेचा वाघ | आण्णाभाऊ साठे |
| १३) | बारी | रणजित देसाई |
| १४) | माझा गाव | रणजित देसाई |
| १५) | टारफुला | शंकर पाटील |
| १६) | देव चालले | दि. बा. मोकाशी |
| | ब) | |
| १७) | गोतावळा | आनंद यादव |
| १८) | इजाळं | उत्तम बंडू तुपे |
| १९) | कुणाच्या खांद्यावर | बा. ग. केसकर |

| | |
|---|---|
| २०) चौंडक | राजन गवस |
| २१) कागूद आणि सावली | आनंद पाटील |
| २२) पाचर | रामचंद्र पठारे |

घाटमाथ्यावरील मावळ आणि माणदेशासह प. महाराष्ट्रीय जीवनाचे स्वरुप कादंबऱ्यामधील घटनाप्रसंग आणि व्यक्तीच्या कृतीउक्तीतून दिसते. उपरोल्लेखित कादंबऱ्यांचे विगमनात्मक पद्धतीने विश्लेषन केले आहे.

## भाग 'अ'

## 'स्वातंत्र्यपूर्व काळातील पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप'

### १. ना. वि. कुलकर्णी : *नवी दिशा*

ना. वि. कुलकर्णी यांचा 'खेडूत सृष्टीचे कादंबरीकार' म्हणून गौरव झाला. त्यांनी 'महाराष्ट्र कुटुंबमाला' मधून लेखन केले. त्यांची 'मजूर' (१९२५) ही कामगार जीवनाचा वेध घेणारी कादंबरी आहे. 'कसे दिवस जातील' (१९२५), 'शिपाई' (१९२५), 'पैसा' (१९३६), 'माणिक' (१९३१) या ग्रामीण-प्रादेशिक जीवनाचा वेध घेणाऱ्या कादंबऱ्या आहेत. 'न्याय' (१९२६) व संसारात (कष्टी वडील)' (१९३०) या कादंबऱ्याही त्यांनी लिहिल्या आहेत. 'पैसा' व 'माणिक' या दोन कादंबऱ्यामधून अनुक्रमे 'शेती हा मुर्तिमंत पैसा आहे' व 'ग्रामसुधारणा' हे विषय आलेले आहेत.

#### *१) 'कसे दिवस जातील'*

दुष्काळात मुंबईमध्ये पोट भरण्यासाठी आलेल्या माणसांच्या संसाराची कशी परवड होते हा प्रस्तुत कादंबरीचा विषय आहे. लेखकाने या कादंबरीत सामान्य शेतमजूर आबा-रखमाच्या संसाराची परवड चित्रित केली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामजीवन आबा-रखमाच्या नाचार संसाराच्या निमित्ताने साकार केले आहे. ही केवळ आबा-रखमाची शोकांतिका नाही. ती देशावरील लोकांचे समूहजीवन चित्रण आहे. प्रदेशाचे वैशिष्ट्यपूर्ण रंग, निसर्ग आणि समाजवास्तव एकजीव झाल्याने केवळ प्रादेशिक म्हणून नव्हे तर कादंबरी म्हणून ती श्रेष्ठ वाटते.

शिवधडीच्या आबा-रखमाची जमीन सावकार कर्जापोटी घेतो व गावकरी घर घेतात. रावजी पाटील फुकटात जनावरे घेतो. गावात स्वतःचे काहीच न राहिल्यामुळे दुष्काळी परिस्थितीत देशांतराची पाळी त्यांच्यावर येते. विष खाऊन प्राण द्यावा असे त्यांना वाटू लागते. गाव सोडून पोटासाठी ते मुंबईला येतात. संकटामागून संकटे येतात. विविध मार्गांनी त्यांचे शोषण होते. रेल्वेस्टेशनवर पोलीस, तिकीट मास्तर,

पोर्टर यांनी विनाकारण त्यांना तीन दिवस अडकवून ठेवले. दोघेही निरक्षर असल्यामुळे साबाजी मोहित्याचा पत्ता शोधणे हमालांच्या सहकार्याशिवाय केवळ अशक्य होते. त्यांच्याप्रमाणेच देशावरचे अनेक लोक पोटासाठी मुंबईत येत असल्याचे दिसते. देशावरच्या मोकळ्या हवेतील माणसांची शहरातील हवा आणि निकस अन्नामुळे वाट लागते. मुले रोगट बनली. हमाली करताना ते देशावरील गतजीवन आठवू लागतात. दु:खी होतात. व्यसनी-जुगारी-कंगाल बनले. पठाणांचा मार खाऊ लागले. सुदैवाने पुरुषोत्तमसारखा पदवीधर त्यांच्या या नरक यातना संपविण्यासाठी धडपड करतो. त्यांना देशावर घेऊन येतो. अनेक देशस्थांबरोबर कंगाल आबा-रखमा देशावर येतात. पण नऊ-दहा वर्षाच्या काळात मुंबई त्यांनी मरणप्राय दु:ख भोगले. आबा व्यसनी झाला. बहकला. रखमाला खाणावळ चालवावी लागली. गुंडांनी मुलाना पळविले. देशावर आल्यावर ते सुखी होतात.

माणसांच्या कृती-उक्तीतून प्रदेशाची वैशिष्ट्ये व्यक्त होतात. येथे आबा हा तीस-पस्तीस वर्षाचा गरीब, निरक्षर, कष्टाळू, भाबडा, परिस्थितीच्या भोवऱ्यात भोवंडत गेलेला तरुण आहे. शेतीवर-घरावर, घरातील माणसांवर एवढेच नव्हे तर गुरा-ढोरांवरही त्याचे अकृत्रिम असे प्रेम आहे. नैसर्गिक अवकृपा व अपार दारिद्र्यामुळे सावकाराचे, गावकऱ्यांचे कर्ज फेडू न शकल्याने शेती, घर, गुरुढोरे असे सर्वस्व गमवावे लागल्याने पोटभरण्यासाठी मुला-बाळांसह मुंबईला आलेला आणि परिस्थितीने अधिकच दरिद्री बनलेला. कुसंगतीने जुगारी व व्यसनी बनलेला आबा आपल्या मुलावर चांगले संस्कार करु शकत नाही. परिणामत: मुलगाही बहकल्याचे दु:ख भोगणे, कर्जफेड न झाल्याने पठाणाचा मार खाणे, फ्ल्युमुळे आणि विविध मानसिक ताणांमुळे विकलांग झालेला आबा विष खाऊन आत्महत्या करावी असा विचार करु लागतो. यावरुन तो मनाने किती हळवा आहे हेही सिद्ध होते. पुरुषोत्तम सारख्या सामाजिक कार्यात रस असणाऱ्या तरुणाच्या मदतीने त्याचे गावी देशावर परतणे त्याच्या अपयशी व वैफल्यग्रस्त मनोवस्थेतून बाहेर पडण्याची धडपड व्यक्त करते.

'रखमा' रुपवान-गुणवान आणि कष्टाळू आहे. आपल्या फुटक्या नशिबामुळे नवऱ्याला देशांतर करावे लागले असे तिला वाटते. प्राप्त परिस्थितीला सामोरे जाण्याचा ती प्रयत्न करते. संकटमालिकांमुळे ती नशीब आजमावण्यासाठी मुंबईला येते. नवरा व्यसनी बनतो. तेव्हा ती खानावळ सुरु करते. मुलींवर चांगले संस्कार करते. पण मुलगा वाया जातो. उनाड बनतो. देवावरील श्रद्धेमुळे सर्व संकटातून बाहेर पडू असे तिला वाटते. माहेरच्या साबाजीच्या आधाराने संकटावर मात करते. अर्धांगवायू झालेल्या आबाची सेवा करते. तानी-पुंड्या फरार झाल्याने दु:खी होते. शेवटी सर्वांच्या सोबत देशावर येते. ती संवेदनाक्षम, श्रद्धाळू आणि कष्टाळू स्त्री आहे.

साबाजी मोहिते हा रखमाच्या माहेरचा पाटील खानदानीतील प्रेमळ गृहस्थ आहे. रखमाशी लग्न होऊ शकले नाही म्हणून तो गाव सोडतो. मुंबईत येऊन हमाली करुन उदरनिर्वाह करतो. आबा-रखमाला मदत करतो. आबाचा विश्वासघात न करता, रखमा आनंदात असावी म्हणून धडपडतो. आबाला कामाला लावतो. रखमाने खाणावळ काढताच हळहळतो. आबाने पुरुषोत्तम बरोबर देशावर जावे म्हणून प्रयत्न करतो. गतजीवन विसरुन रखमावर भावाप्रमाणे प्रेम करतो. साबाजी हा प्रेमळ, दुसऱ्यांना मदत करणारा, प्रेमाला तडा गेलेला, विश्वासू तरुण आहे. गोदीत हमाली करणारा केऱ्या देशावरचा तरुण आहे. त्याच्या चिकाटीमुळेच आबाला गोदीत काम मिळते.

पुरुषोत्तम हा टिळक महाविद्यालयाचा पदवीधर, वडिलांच्या इच्छेखातर तो शेती करण्याचा निर्णय घेतो. मुंबईला गेलेल्या गावाकडील लोकांना तो प्रयत्नपूर्वक परत घेऊन येतो. म. गांधींच्या विचाराचा प्रभाव असलेला ग्रामसुधारणेचा पुरस्कार करणारा तो ध्येयवादी तरुण आहे. फ्ल्यूच्या साथीत तो गरिबांची सेवा करतो. आबा-रखमाच्या मुलांना शोधून आणतो. तो हुशार, धूर्त आहे. समाजविकास घडविण्याचे स्वप्न तो उराशी बाळगतो.

या चार प्रमुख पात्रांप्रमाणेच पुरुषोत्तमची पत्नी, आई-वडील कादंबरीत अदृश्यच ठेवले आहेत. हे कुटुंब गांधीविचाराने झपाटलेले आहे. पुंड्या, तानी, तुळशी ही बालके आणि अन्य गौण व्यक्तिरेखा रेखाटून देशावरचे जीवन आणि मुंबईतील बकालपणाचा परिणाम स्पष्ट केला आहे.

कराड तालुक्यातील सातारा जिल्ह्यातील कृष्णा-कोयना संगमाजवळील देशावरच्या प्रदेशाची पार्श्वभूमी या कादंबरीला लाभली आहे. शिवधडी, नेर्ले या देशावरील दुष्काळी गावातील आणि प्रदेशातील पीकपाणी, घाट-माळरान इ. चा उल्लेख येथे येतो. ऊस, हळद, शाळू ही पिके त्याकाळात इतरत्र दिसत नव्हती. कृष्णा-कोयना संगमावरील श्रावणी सोमवारच्या जत्रेवर त्या परिसरातील लोकांची श्रद्धा आहे, हे लोक अवर्षणामुळे शरीराने मुंबईत गेले असले तरी मनाने ते देशावरील भू-प्रदेशाशी नाते ठेवून असलेले दिसतात. आबा मुंबईतील हमालीची आणि देशावरील शेतीतील कष्टाची तुलना करतो, त्याला हमालीत राम वाटत नाही. गायी, म्हशी, मेंढरे माळाला चरताना दिसतात. कादंबरीच्या पार्श्वभागी असलेला हा प्रदेश दुष्काळी माळरानाचा आहे.

लोकजीवनावर परिणाम करणाऱ्या निसर्गाचे चित्रण येथे झाले आहे. दुष्काळामुळे लोकांना देशांतर करावे लागते. त्याचप्रमाणे मानवी जीवनाशी एकरुप झालेल्या निसर्गाचे चित्रही रेखाटले आहे. श्रावण महिन्यातील हे निसर्गचित्रण प्रदेशविशिष्ट आहे. शेतकऱ्यांच्या मानसिकतेवर परिणाम करणारे आहे.

'पाऊसपाणी नीटनेटका होऊन शेतांची मेहेनत मशागत व्यवस्थित होऊन पेरणी

कोळपणी अगदी वेळच्या वेळेला होऊन - श्रावण अखेरीला पिके अगदी ऐन रंगाला आलेली असल्यामुळे शेतांची शोभा नितांत मनोहर दिसत असणार यात नवल काय सजगुऱ्यांच्या पोटऱ्या पडत असलेल्या, भुईमुगांचे वेल पिवळ्या फुलांनी गजबजलेले, नदीच्या काठच्या मळ्यातून मकेच्या कणसांच्या ताटांना कणसे आणि तुरे, श्रीकृष्णा कोयनेच्या संगमास येणारांचे हलून डोलून स्वागत करण्यास तत्पर राहिलेले पाहून सृष्टीसतीचा लाडका शेतकरीबाल हर्षाने बेहोष झाल्याखेरीज, आनंदाने वेडा बनल्याखेरीज कसा राहणार? (पृ.१०८) सजगुऱ्यांच्या पोटऱ्या, भुईमुगाची पिवळी फुले, मकेची कणसे आणि तुरे यातून या प्रदेशात येणाऱ्या पिकांची कल्पना येते.

'श्रावण झडीचा जोर कमी झाला होता, तरी आकाशात ढगांची गर्दी कमी झाली नव्हती. घटकेत अंधेरुन यावयाचे, तर घटकेनं स्वच्छ उन्हं पडावयाचे, असा प्रकार चाललेलाच!...

आकाशातून उडणाऱ्या निरनिराळ्या पक्ष्यांचा चिवचिवाट-किलकिलाट वाटेने जाणाऱ्या जत्रेकऱ्यांच्या आनंदाच्या गजबजाटीत मिसळून एक प्रकारचे नादमाधुर्य उत्पन्न होत होते. वाटेने गाड्या-घोड्यांची, पायी चालणारांची धावपळ, तर आकाश मार्गातून त्या चित्रविचित्र रंगांच्या पक्ष्यांची गडबड- जणू काय ते पक्षीही प्रीती-संगमात स्नान करुन पुनीत होण्यासाठीच म्हणून निघाले आहेत असे साहजिकच वाटे. (पृ. १०९-११०) यावरुन संगमाच्या जत्रेला निघालेल्या शेतकरी कुटुंबाची आनंदीवृत्ती अधिक खुलविणारे निसर्गचित्र लेखकाने काढले आहे. निसर्गाने साथ दिली, चांगला पाऊस झाला, पिके चांगली आली तर शेतकरी आनंदाने जत्रेला जातात. त्याचप्रमपाणे नैसर्गिक आपत्तीने आबा कायमचा आधू झाला. मृत्यूच्या तडाख्यातून सर्व सावरले. आनंदले, पण या सुखाच्या पार्श्वभूमीवरच आबाचे दुःख अधिक बोलके करते, 'जगलो कशाला' हा प्रश्न त्याला भेडसावू लागला.

नेहमीच्या दुष्काळी परिस्थितीमुळे प. महाराष्ट्रातील लोकांना उदरनिर्वाहासाठी मुंबईसारख्या शहरांकडे धावण्याशिवाय पर्याय शिल्लक उरत नाही. अनिच्छेने हे लोक देशांतर करताना दिसतात. आबा-रखमाप्रमाणे इतरही अनेक लोक पोटासाठी मुंबईकडे धावत असल्याचे वर्णन येते. खेड्यातल्या जीवनाला सरावलेली ही माणसं शहरात गेल्यानंतर व्यसनी, जुगारी बनतात. संसाराकडे त्यांचे दुर्लक्ष होऊन त्यांच्या संसाराची परवड होते, हे जीवनसत्य येथे चित्रित झाले आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचेही प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत येते. 'पावली'साठी तिकीटमास्तर आबा-रखमाला तीन दिवस रेल्वेस्टेशनवर अडकवतो. गोदीतील मास्तर एक पगार रोख घेतल्याशिवाय आबाला नोकरीवर ठेवत घेत नाही. पुंड्या तानीच्या शोधासाठी पुरुषोत्तम पोलिसांना भरपूर खाऊ घालतो. तेव्हाच ते तपासकार्याला लागतात. भ्रष्टाचाराप्रमाणेच विषमताही मोठ्या प्रमाणावर बोकाळलेली होती. एकीकडे

अमाप संपत्ती तर दुसरीकडे भुके-कंगाल लोक असे चित्र या ठिकाणी येते. साबाजी ज्या कारखान्यात काम करतो, त्या कारखानदाराला मुलगा झाला म्हणून कामगारांना बत्तासे, खारका वाटल्याचे साबाजी रखमाला सांगतो, तेव्हा ती म्हणते,

''श्रीमंतांची काम अशीच असतात। त्यांनी नाही असे करायचे तर काय आम्ही गरिबांनी? मला मस्त तीन पोरं झाली। गरिबाला खंडीभर पोरे होऊन काय करायचे? सुख ना दु:ख ।' (पृ. ५५) पुरुषोत्तमचे वडील अनंतराव त्याला शेती करण्याचा सल्ला देतात. तेव्हा पत्रात लिहितात, 'उत्तम शेती - मध्यम व्यापार कनिष्ठ नोकरी'... जातिवंत शेतकऱ्यानो शेतकी करण्यात गैर काय आहे? तो शिकला, शहाणा झाला तरी त्याने शेतकी सोडली पाहिले असे कुठे आहे? त्यात कमीपणा का वाटावा?...' (पृ.६७) नोकरी कोणतीही असो ती शेतीपेक्षा कनिष्ठच हेच त्यांना सांगावयाचे आहे. गोरगरीब कुणब्यांच्या जमिनी सावकार हस्तगत करीत. आबाची दोन एकर जमीन सावकाराने घेतली तसेच पाटलाने फुकटात जनावरे घेतली. कुणब्यांवर देशांतराची वेळ केवळ दुष्काळामुळे येते असे नाही तर सावकार-पाटील या धनिकांमुळेही येते, याचा अर्थ की निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित कारणांमुळे देशावरील लोकांना देशांतर करावे लागते.

ग्रामजीवनात सण, उत्सव, रुढी परंपरा, समजुती, प्रथा रीतीरिवाज, खेळ, श्रद्धा आणि अंधश्रद्धा इत्यादींना अधिक महत्त्व असते. त्यांच्या संस्कारातून लोकजीवन घडते. फोटो काढल्याने आयुष्य कमी होते. नवसाने मुले होतात, भूतबाधा होऊ नये म्हणून मुलांना काजळ घालणे या समजुती आहेत, तर श्रावणी सोमवारची कृष्णा-कोयना संगमावरील यात्रा, भादवी पोळा, देव कुलस्वामी मल्हारीवर आणि काशीयात्रेवर त्यांची श्रद्धा आहे. मातीचे गाव-देवदेवतांचे संस्कार लोकजीवनावर होत असतात. म्हणूनच गाव सोडताना अबाला वाईट वाटते, म्हणून लेखक वर्णन करतो,

''आबा शिकलेला नव्हता, अडाणी होता, तरी आज आपला गाव सोडावयाचा, ज्या आपल्या गावात आपले कित्येक पिढ्यापासून वाडवडील रहात आले, ज्या खेड्यात आपला जन्म, बालपण, मोठेपण, लग्नकार्य झाले, आतापर्यंत गरिबीचा कसातरी वेडावाकडा संसारही करत आलो, ते खेडे सोडण्याचा प्रसंग आबाला मृत्यूहूनही दु:सह झाला तर त्यात आश्चर्य काय? (पृ.१४)

जनावरांची विक्री करणे त्यांना पाप वाटते. दानधर्म करणे, शेतावर आलेल्याला दान करणे, जेवण घालणे, गाईगुरांचा सांभाळ करणे, जातकुळीला बट्टा लावण्यासारखे हातून काही घडू नये म्हणून नीट वागणे, नशिबाला दोष देणे, मुलांना आशीर्वाद देणे, लहानांनी थोरांचे दर्शन घेणे, देवावर व दैवावर विश्वास ठेवणे, मुलांना खाऊसाठी पैसे देणे, स्त्रियांना चोळीसाठी पैसे देणे, यासारख्या गोष्टीमधून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. कृष्णा कायेना संगमावरील जत्रा, त्यातील विविध खेळ, तमाशे कुस्त्या

या सर्वांहून प्रदेशाचे आणि तेथील लोकजीवनाचे दर्शन घडते. धनगरांचे गजांचे खेळ आणि चक्रे अंबेकरी खेळ खास प्रादेशिक आहे. त्यांचे वर्णन लेखकाने केले आहे. "...चक्रे अंबेकरी नावा खेळवीत होते. ते तांबड्या-पांढऱ्या रंगांनी नावा रंगविल्या होत्या. नावांचे घोडे शेंदूराने रंगवून त्यांच्या गळ्यातले दागिने बेगडेने लखलखीत केले होते. त्यांच्या डोकीवर पिसांचे झकास तुरे खोवले होते. नावातून माणसांची गर्दी आंबेकऱ्याने नावा चतुराईने चालविलेल्या, शर्यती खेळताना, आनंदाने ठोकल्या जाणाऱ्या आरोळ्या आणि गीते, गावागावच्या कुशल शिंगाड्यांनी आपापली शिंगे वाजवून संगप्रांत निनादीत करण्याची चालविलेली अहमीका वगैरे पाहून आणि ऐकून रखमा गारीगार झाली." (पृ. ११३) नावांच्या शर्यती, नावा सजविणे, गीत गाणे हे खास प्रदेश संस्कृतीचे विशेष आहेत, महाराष्ट्रात अन्यत्र आंबेकरी नावाचा खेळ आढळत नाही.

दुष्काळी परिस्थतीमुळे आलेले दारिद्र्य लेखकाने दाखविले आहे. आबा रखमाच्या नाचार संसार परिस्थतीला देशावरील दुष्काळी पार्श्वभूमी प्रदेश जबाबदार आहे. त्याच्या तीनखनी घराचा उल्लेख सुरुवातीस येतो. 'डोईचं फाटकं मुंडास' आबाच्या आर्थिक जीवनाची-दारिद्र्याची साक्ष देते. सावकाराच्या कर्जामुळे त्याची दोन एकर जमीन गेली. जनावरं विकण्याची वेळ आली. त्याने देशांतराचा निर्णय घेतला.

"सामानाची बांधाबांध केली! सामान ते काय असणार? सारा गाडग्यामडक्यातील संसार! घरातील चिंध्यानचिंध्या घ्यावयाची म्हटली तरी देखील एकदोन पोत्यापेक्षा सामानसुमान जास्त नव्हते! (पृ. १२) हे देशावरील माणसाचे दारिद्र्याचे वर्णन आहे. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींमुळे देशावरील लोकांची आर्थिक परिस्थिती खालावते म्हणून "फाटक्याला शिवून काय अन् दुबळ्याला देऊन काय? असे म्हणण्याची वेळ येते. संकटाच्या मालीकेमुळे ते 'दुष्काळात तेरावा महिना' असे व्यवहारी शहाणपणातून म्हणण्याची वेळ येते. दुष्काळामुळे देशावरील गरीब-अडाणी कुटुंबाची वाताहात कशी होते याचे प्रातिनिधिक दर्शन लेखकाने आबा रखमाच्या चित्रणाने घडविले आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील सामान्य माणसाला आपल्या मुलांना शिक्षण देणे प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे अशक्य वाटत होते. अज्ञानही होते. शिक्षणाचे महत्त्व पटलेले नसले तरी धनिकांची मुले शिकत होती. त्यांना शिक्षणासाठी पुण्या-मुंबईसारख्या शहरात जावे लागत होते. ग्रामीण भागात उच्चशिक्षणाची सोय नव्हती. धनिक आनंदरावाचा मुलगा पुरुषोत्तम पुण्यातील टिळक महाविद्यालयाचा पदवीधर आहे. त्याची पत्नी कर्व्यांच्या संस्थेतील पदवीधर आहे. एकूण शिक्षणाची सोय नव्हती, शिक्षणाबद्दल गरिबांची उदासिनता होती तर धनिकांचे मुलं-मुली शिक्षण घेऊ लागले होते, यातून प. महाराष्ट्रातील सामाजिक जागृतीचे दर्शन घडते.

कादंबरीच्या निवेदनाची भाषा-प्रमाण भाषा आहे ते निवेदन ना. वि. कुलकर्णींच्या 'मजूर' कादंबरीची नायिका सुगंधी करते, अशा पद्धतीने हे निवेदनल आहे. अर्थात 'मजूर' ही ना. वि कुलकर्णी यांची पहिली कादंबरी असून ती मधील नायिका सुगंधा ही 'कसे दिवस जातील'चे कथानक सांगते आहे अशी रचना आहे. तरीही संवादाची भाषा खास कराड साताऱ्याकडची देशावरील प्रदेशातील बोली आहे. अनेक सुभाषिते, म्हणी, वाक्प्रचार, निवेदन-संवादाच्या ओघात येतात. कराडकडील खेड्यातील लोकांची बोली रखमा किंवा केऱ्या हमालाच्या संवादातून अनुभवता येते. रखमा पुरुषोत्तमला म्हणते,

"लैदीस झालं म्हणून का आपल्या माणसाची वळख बुजती व्हय दाजिबा!... परसूदाजी आम्ही काय माणसं नव्हं व्हय? आमचे गावशिव आम्हास्नी विसरले, पर आम्ही त्येला कसे विसरावे? रोज की तिकडच्या आठवणीनं डोळ्यामधनं पसाभर पाणी जाते. केव्हा देवाला आमचा कणवा येईल, तेव्हा घेऊन जाईल आम्हाला देशाला" (पृ.८७) रखमाची गावाबद्दलची ओढ तिच्या संवादातून जशी व्यक्त होते, त्याप्रमाणे लैदीस, वळख, बुजती, व्हय, दाजिबा, नव्ह, आम्हास्नी, त्येला, पसाभर, कणवा या सारखे कराडी बोलीतील प्रदेशविशिष्ट शब्दात तिचे संवाद आहेत. केऱ्याच्या संवादात इनंती, पै, कायबी, ठाव, व्हईल यासारखे खास कराडी बोलीतील शब्द येतात. काही म्हणी समाजवास्तवाचे चित्रण करणाऱ्या आहेत. 'असून अडचण नसून खोळंबा', 'मुलांना काय आई गोड की खाई गोड'', 'फाटक्याला शिवून काय अन् दुबळ्याला देऊन काय?'' देशावरील दरिद्री जीवनानुभवामुळेच अशा म्हणी रुढ झालेल्या दिसतात.

कराडी बोलीतील अर्थघन शब्द समाजवास्तवाचे दर्शन घडवितात, हशिल, पावली, पोरगा, ठरीव, हवा, लटके, नोकरी, सजगुऱ्या, पाहुणेर, पैका, पर, इनंती, राह्यलो, काय बी, ठाव, औरव, नव्हका, खण, सर्त्या, तंवर, हाडाडली, कुडते, मुभा, आम्हास्नी, म्होरच्या, बूट, कोरड्यास, पोंचट, नवशी, पावशी इ. शब्दातून प्रदेश जिवंत होतो. प्रस्तुत कादंबरी पूर्ण प्रादेशिक नसली तरी प्रदेशविशिष्ट जीवनचित्रणाला प्रारंभ करणारी ही कादंबरी आहे.

### *२) शिपाई*

सत्ताशक्ती विरुद्ध सत्य यातील संघर्ष हा या कादंबरीचा विषय आहे. कृष्णाकाका हे स्वातंत्र्यपूर्व काळातील एका खेडेगावातील शक्ती आहे. ते धनिक आहे. स्वार्थी, मतलबी, धूर्त, कावेबाज कारस्थानी, कृष्णकृत्यात तरबेज आणि ढोंगी आहेत. तर मल्हारी हा त्याच गावातील सरळमार्गी, कष्टाळू, अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारा, साधा, निष्कपट स्वभावाचा, परोपकारी बुद्धीचा, लोकहितासाठी संकटात उडी घेणारा

तरुण आहे. खलप्रवृत्तीच्या कृष्णाकाकाचा पराजय आणि सत्याची बाजू घेणाऱ्या मल्हारीचा विजय येथे चित्रित केला आहे.

यशवंत व मंजुळाची आई निराबाई ही या खेड्यातील निराधार बाणेदार स्त्री. त्यांची जमीन हस्तमत करण्याचा प्रयत्न कृष्णाकाका करतो. मल्हारी हा तरुण त्यांच्या पाठीशी उभा राहतो. कृष्णकाकाच्या कारस्थानाला विरोध करतो. म्हणून कृष्णकाका स्वत:ची मुलगी गजरा मल्हारीला देऊन जावई करण्याचा तर निराबाईची मंजुळा आनंदरावाला करुन घेण्याचा विचार करतो. यामुळे मल्हारीचा विरोध संपेल आणि निराबाईची मुलगी सून केल्याने तिची जमीन आपल्याला मिळेल असे त्याला वाटते. मल्हारी-गजराचे लग्न ठरल्यानंतर शहरात उच्च शिक्षण घेणारा मल्हारीचा भाऊ शंभू आणि मंजुळेचे लग्न कृष्णाकाकच्या परवानगीशिवाय ठरविले जाते. त्यांचा डाव उधळला जातो. म्हणून कृष्णाकाका शंभूला सैन्यात शिपाई म्हणून भरती करतो. हे भावावर उत्कट प्रेम करणाऱ्या मल्हारीला समजते. गावकरी व सरकारी अधिकाऱ्यांसमोर भर चौकात तो कृष्णाकाकाचे मनगट पकडून जाब विचारतो. अपमानामुळे मल्हारीचा काटा काढण्याचा निर्णय कृष्णकाका घेतो. रानडुकराशी झुंज देतो, तेव्हा आनंदराव मल्हारी ठार झाल्याचे घरात सांगतो. त्याच्या मृत्यूच्या बातमीने गजरा गळ्यात धोंडा बांधून विहिरीत जीव देतो. परंतु जीवन नावाच समाजसेवकाने मल्हारीला वाचविलेले असते. हा डाव कृष्णाकाकावरच उलटतो. मुलीचा मृत्यु होतो.

सूडाने पेटलेला कृष्णकाका शेवटचा डाव टाकतो. स्वत:च्या जमिनीत होऊ घातलेले रेल्वेस्टेशन निराबाईच्या जमिनीत व्हावे म्हणून धडपडतो. पैसा, प्रतिष्ठा खर्च करतो. खोटे कागदपत्र रंगवितो. या सरकारी कामाला निराबाईची बाजू घेऊन मल्हारी मध्ये पडला तर सरकारी रोषास तो कारण होईल. परस्पर त्याच्या हातात बेड्या पडतील. डाव साधला जाईल आणि निराबाईची जमीन आपल्याला मिळविता येईल. पण कृष्णकाकाच्या इच्छेप्रमाणे घडत नाही. मल्हारीचा येथेही विजय होतो. आनंतरावला अटक होते. रेल्वेस्टेशनचे भूमिपूजन कृष्णाकाकाच्या शेतात नियोजित ठिकाणी होते. सत्याचा विजय होतो.

'मल्हारी' हा निष्कपट स्वभावाचा, परापेकारी बुद्धीचा, लोकहितासाठी संकटात उडी घेण्यास सज्ज असलेला आणि अन्यायाची चीड असलेला मराठमोळा तरुण आहे. त्याचा भाऊ 'शंभू' हा शिकलेला, मल्हारीच्या खेडूत भावविश्वापासून दुरावलेला तरुण आहे. कृष्णकाका कारस्थानाचा तो शिकार होतो. सक्तीने सैन्यात भरती केला गेल्याने मंजुळेच्या आठवणीने दु:खी होतो. मल्हारीच्या आईच्या आईने आजीने या दोघा भावांना सांभाळले असून ती एक खंबीर वृत्तीची विधवा बाई आहे. कृष्णाकाका हा खेड्यातील धनिक्र आहे. सरकारी अधिकाऱ्यांची हुजरेगिरी करुन गावामध्ये स्वत:चा दरारा निर्माण करतो. गोरगरीब आणि विधवांच्या जमिनी हडप करण्यासाठी

कोणत्याही थराला जाऊ शकणारा खलप्रवृत्तीचा नमुना आहे. खलप्रवृत्तीचा पराजय येथे दिसतो. अनंतराव हा त्याचा उधळ्या, बिनडोक मुलगा तर 'गजरा' ही प्रेमळ, निष्पाप, सद्वर्तनी, मुलगी आहे. निराबाई एक विधवा आहे. ती बाणेदार, सोशीक, परिस्थितीला सामोरी जाणारी, आपला भार इतरांवर न टाकणारी अशी रेखाटली असून मुलगा 'यशवंत' मोठा झाल्यावर सर्व ठिक होईल असा तिचा आशावाद आहे. 'मंजुळा' ही तिची देखणी, सालस मुलगी आहे. कृष्णाकाकाने शंभूला सैन्यात भरती केल्यामुळे ती दुःखी होते.

'जीवन' हा एक समाजसुधारक आहे. समाजात अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची रग नाही त्याची खंत असून अन्यायाची समाजाला चीड यावी म्हणून तो समाजजागृती करतो. सत्याची बाजू घेतो. संकटात मल्हारीच्या पाठीशी उभा राहतो. ग्रामसुधारणावादी असे हे पात्र रेखाटले आहे. तीन कुटुंबातील या सर्वच व्यक्तिरेखाच्या कृतीउक्तीतून समकालीन वास्तवाचे दर्शन घडविले आहे. या कुटुंबातील संघर्षाबरोबर खेड्यातील समूहमनाचे दर्शनही लेखकाने घडविले आहे.

कराड-सातारा परिसरातील एका खेडेगावातील जीवनचित्रण लेखकाने येथे केले आहे. ऊस-हळदीचे मळे, डोंगर दऱ्याखोऱ्यांचा प्रदेश, रानडुक्कर इत्यादी उल्लेखातून हा प्रदेश जिवंत केला आहे. ज्येष्ठ-आषाढात या भागात भरपूर पाऊस पडतो. (पृ. ७) या वर्णनावरुन हा प्रदेश सह्याद्री पर्वताच्या पायथ्याचा घनदाट जंगलाचा प्रदेश आहे, कादंबरीच्या कथानकास या प्रदेशाची पार्श्वभूमी लाभली आहे.

कादंबरीतील निसर्गवर्णन हे प्रदेशाचे जिवंत रुप साकार करणारे आहे. '...पावसाळ्या दिवसातले सकाळचे फसवे ऊन क्षणभर पडून लोकांची फसवणूक करते, जरा पडते, दृष्टीला मनाला आल्हाद देते, आता असेच सुखदायी उन्ह पडणार अशी समजूत करते आणि लगेच ते कोठच्या कोठे हांहां म्हणता नाहीसे होऊन मुसळधार पाऊस सुरु होतो. तो कित्येक दिवस सूर्यदर्शनही होण्याची आशा राहात नाही!...' (पृ. ११७) हे वर्णन जसे प्रदेशातील मुसळधार पावसाचे आहे तसेच मल्हारीच्या भावविश्वाशी एकजीव होऊन अवतरले आहे. कारण शंभू-मंजूळेचे लग्न ठरले. सर्वांना आनंद झाला, पण कृष्णाकाकाने कारस्थान करुन शंभूला सैन्यात भरती केले. दोघा भावांची ताटातूट झाली. पावसाळ्यात सूर्यदर्शन होत नाही, त्याप्रमाणेच मल्हारी शंभूची भेट होऊ शकणार नाही हे लेखकाने सूचित केले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात या प्रदेशातील तरुणांना त्यांच्या इच्छेविरुद्ध भ्रष्टाचारी मार्गाने सैन्यात भरती केली केले जात होते. त्यापोटी दलालांना पैसा मिळत होता. आनंतरावांला सोडविण्याच्या बदल्यात कृष्णकाका शंभूला सैन्यात भरती करतो, त्याच्याप्रमाणे अनेक तरुणांना सक्तीने सैन्यात भरती केल्याचा उल्लेख सामाजिक सत्यावर प्रकाश टाकणारा आहे. रामोशी किंवा मागांना हाताशी धरुन धनदांडगे लोक विरोधकाचा

खून करीत असत. असाच प्रयत्न मल्हारीचा जीव घेण्यासाठी कृष्णाकाका मांगाकडून करतो, परंतु सुदैवाने तो वाचतो. सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरुन त्यांची सरबराई करुन प्रसंगी लाचार होऊन गावात दरारा निर्माण करण्याचा प्रयत्न धनिक करीत असतात. जसे कृष्णाकाका निराबाईची जमीन हडप करण्यासाठी आपल्याला सरकार दरबारी असलेल्या वजनाचा फायदा घेतो. रेल्वेस्टेशनची जागा बदलविणे, अम्मलदारांकडून गावकऱ्यांना दम भरणे इ. उद्योग कृष्णाकाका करतो. तसेच धनिक पुत्र गावात खोंडासारखे उधळत, पुंडाई करीत हैदास घालतात, चैन करतात. आनंतरावाचा मूर्खपणा, चैनीवृत्ती, हैदोस हेच स्पष्ट करते. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही हे सामाजिक सत्य आहे. धनिकांना विरोध करण्याचे सामर्थ्य गरीब जनतेमध्ये नव्हते. अन्यायाची चीड नव्हती. एखाद्याने धनिकाला विरोध केला तर त्याचा संसार उद्ध्वस्त केला जातो. सत्तांध कृष्णाकाका निराबाईची जमीन हडप करण्यासाठी डाव टाकत असताना मल्हारी विरोध करतो, म्हणून त्याच्या गळ्यास फास लावण्यासाठी काका धडपडतात. एखाद्या घरात मुलगी देऊन जमीन मुलीच्या मालकीची करुन घ्यायची किंवा एखाद्या विधवेच्या मुलीशी आपल्या मुलाचे लग्न लावून तिची जमीन आपली करुन घ्यायची असे उद्योग धनिक करतात. जसे मल्हारीला गजरा देण्याचा किंवा अनंतरावाला मंजुळा करुन घेण्याचा डाव कृष्णाकाका टाकतो.

शिक्षण घेणे आपले काम नव्हेच अशीच खेडुतांची समजूत होती. शिक्षणाबद्दल उदासीनता दिसत असली तरी प. महाराष्ट्रात तत्कालीन परिस्थिती जागृत होऊ लागली होती. काही धनिकांची मुले शिक्षण घेत होती. शिक्षणामुळे मुलांची प्रकृती खालावते. वेगळी केशभूषा-वेशभूषा केलेल्या शंभूला मल्हारी ओळखू शकत नाही. शिकलेल्या मुलांशी आपल्या मुलींचे लग्न लावण्यास लोक तयार होत नव्हते. कारण त्यांच्या अंगात रग नसते, ते शेळपट असतात असा खेडू धनिकांचा समज असावा. शंभूपेक्षा मल्हारीच जावई करणे कृष्णाकाकांना आवडते, ते म्हणतात,

"शिकलेली पोरे शेळपट असतात. माझ्यासारख्याचा जावई असाच गुंड पाहिजे, शिवाय तो वडिल आहे. शिकलेल्या पाप्याचे आईबाप सरकारी अधिकारी येतात ते आपण नाही का पहात? रावसाहेब-दादासाहेब नुसते त्यांच्याकडून काम करुन घेण्याकरीता म्हणायचे असते. नाहीतर तसली शेळपट माणसे आपल्याला मुळीच पसंत नसतात. त्यालाच तो मल्हारीचा शंभू व्हावयाचा! मल्हारीचे तसे नाही. त्याच्या अंगात रग आहे, करील तर चांगलीच गुंडगिरी करील." (पृ.२४) यावरुन खेडूतांची शिक्षण आणि शिक्षण घेतलेल्यांबद्दलची तिरस्काराची भावना स्पष्ट होते.

"धनिक गुंडांचा खेड्यात दरारा असतो. गावकरी कृष्णाकाकांना वाकून रामराम करीत किंवा शक्य असेल तर जुलमांचा रामराम टाळीत. गरीबलोक आपापसात धनिकांबद्दल बोलत, पण त्यांच्यासमोर मात्र गप्प बसत. कृष्णाकाकाच्या भानगडीविषयी

मागे गावकरी बोलतात. आनंदराव विषयी बोलतात. पण त्यांच्यासमोर बोलायचे टाळतात. यातून सामाजिकता स्पष्ट होते. पराचा कावळा करण्याची समाजाची रीतच होती असे या कादंबरीतील 'कंड्या' या प्रकरणाधारे म्हणता येईल. गावातील लहानमोठ्या घटनासंबंधी गावामध्ये उलटसुलट चर्चा होते. अफवा कशा पसरतात, याचे वर्णन लेखकाने केले आहे. या कादंबरीमधून येणारा सामान्य माणूस हा अज्ञानी, दुबळा, अन्यायाची चीड नसलेला, शासनाला घाबरणारा आहे. कृष्णाकाकाच्या कारस्थानामुळे निराबाईच्या जमिनीत रेल्वेस्टेशनचे भूमिपूजन ठरते, तेव्हा सरकारी अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी मल्हारीबरोबर एकही खेडूत येत नाही. यातून ग्रामस्थांचा दुबळेपणा, अज्ञान आणि अन्यायाविरुद्ध आवाज न उठविण्याची वृत्ती दिसते. तरीही लोक जागृतीला सुरुवात झाली होती, जीवन, मल्हारी कृष्णकाकांच्या कारस्थानाला विरोध करताना दिसतात, सत्याचा विजय होतो. पण त्याला उशीर लागतो. अज्ञान, अडाणीपण, दुष्काळ, मुंबईची ओढ इ. गोष्टींमुळे खेडूतांचा रगेलपणा नष्ट होऊ लागला होता. धनिकांच्या इच्छेविरुद्ध एखादी घटना घडली तर ते सैतान बनत. कुठल्याही प्रकारे आपण म्हणतो  तेच खरे करण्यासाठी धडपड करताना दिसतात.  या दृष्टीने 'लग्नात विघ्न' हे प्रकरण अभ्यासण्यासारखे आहे.

शेती करणारे कष्टकरी आणि सुशिक्षितांमध्ये नेहमीच विसंवाद असतो. शेतकरी परंपरा जपतात. जनावरांवर प्रेम करतात. उलट सुशिक्षित तरुण परंपरा मोडू लागतात. जनावरांबद्दल त्यांना आस्था वाटत नाही. मल्हारी-शंभूची रेल्वेस्टेशनवर भेट होते, शंभूमधील बदल मल्हारीला आवडत नाही, तर बैलांबद्दल मल्हारी बोलतो, त्याकडे शंभू दुर्लक्ष करतो, अशाप्रकारे दोघांमध्ये विसंवाद होत असल्याचे स्पष्ट होते.

गुन्हेगाराला शिक्षा करायचे सोडून सन्याशाला फाशी देण्याचा पोलिसी खाक्या दिसतो. उन्हातून आलेली भिकारीण एका दुकानासमोर मुलाला पाजण्यासाठी सावलीला थांबली. तिला दुकानदार ढकलून देतो. जीवनने मध्यस्थी केली असता बघ्यांची गर्दी जमते. परंतु एवढा वेळ पोलीस तिकडे फिरकत नाही, नंतर सावकाश येऊन दुकानदाराला म्हणतो, "...या माणसाने तुमच्या दुकानात येऊन दंगामस्ती केली आहे, तर तुम्ही त्याच्यावर फिर्याद करता काय? आमच्याकडे फिर्याद द्या, मग आम्ही पाहून घेऊ?" (पृ.७३) या ठिकाणी पोलीस आपले खरे कर्तव्य विसरुन न्यायी व सत् प्रवृत्त माणसाला कसे गोत्यात आणीत याचे चित्रण येते. भ्रष्ट प्रशासनाची कल्पना यावरुन येते.

स्वातंत्र्यपूर्व काळात 'बळी तो कान पिळी' अशी परिस्थती होती. सरकारी अम्मलदारांची हुजरेगिरी, सरबराई करुन किंवा त्यांच्यासमोर लाचार होऊन त्यांना धनिक आपल्या मुठीत ठेवत असत. त्यांच्या मदतीने गावात वर्चस्व प्रस्थापित करुन स्वार्थ साधत होते. मनमानी कारभार करीत होते. इंग्रज सरकार देखील या धनदांडग्यांना

दुखवित नव्हते. लेखक कृष्णाकाकाचे वर्णन करतो, "नुसत्या तोंड पाटीलकीवर त्यांच्या कारकिर्दीची करामत अवलंबून असे! आपल्या गावी येणाऱ्या एखाद्या डगलेवाल्या पोलीस शिपायापासून चिटणीस, फडणीस, तटणीस, हवालदार, जमादार, फौजदार, मामलदार, इन्स्पेक्टर यापैकी कोणीही खुद्द व त्याबरोबर त्यांचे गणगोत यांना कृष्णरावकाकांचा वाडा म्हणजे अगदी आपल्या श्वशुरांचा वाडा वाटण्याइतक्या सवलती व त्यांची खऱ्याखुऱ्या जावयाला लाजवील अशी वाटेल तेव्हा चाहील ती सरबराई ठेवण्यावर कृष्णरावकाकांनी आपल्याला हवे तसे महत्त्व प्राप्त करुन घेतले होते..." (पृ. १२) श्रीमंत माणसांचे शिक्षणावाचून काहीही न अडता चांगली आणि वाईट कामे कशी होतात हेच येथे स्पष्ट होते. श्रीमंत मंडळीचे त्या काळात चांगलेच प्रस्त होते. त्यांच्या कृष्णकृत्यात आडकाठी करायला कोणी पुढे येत नव्हते आणि मल्हारी सारख्याने विरोध केलाच तर कधी प्रेमाने, कधी बेरकीपणाने तर कधी गुंडगिरी करुन ते विरोध मोडून काढण्यात तरबेज होते. म्हणूनच कृष्णरावकाका शंभू-मंजूळाच्या लग्नात विघ्न आणतात. काकाच्या परवानगीशिवाय लग्न जमते म्हणजे काय? हा प्रश्न काकाला सतावतो. प्रश्न लग्नाचा नाही, प्रतिष्ठेचा आहे, त्यापेक्षा निराबाईच्या जमिनीचा आहे. आनंदरावाशी मंजुळाचे लग्न जमते तर राजकारण साधते म्हणून त्यांना, 'आनंदरावाऐवजी निराबाईच्या इस्टेटीवर शंभूसारखा बोका सरळ जाऊन राजरोस बसणार व आपण ते मुकाट्याने पाहणार? ही कल्पनाच कृष्णाकाकांना सहन होईना।' (पृ.९७) यावरुन असे स्पष्ट होते की, मनात आणलेले साध्य झालेच पाहिजे, त्यासाठी काहीही करायचे असेच धोरण कृष्णकाकांचे दिसते. म्हणूनच सैन्यात भरती झालेल्या आनंदरावाला सोडविण्याचा आणि शंभूस सैन्यात भरती करण्याचा यशस्वी डाव ते टाकतात.

महायुद्धाच्या काळात या प्रदेशातील तरुणांची ब्रिटीश सरकार जबरदस्तीने सैन्यात भरती करीत होते. विदर्भ-मराठवाड्यात निजामांची राजवट होती, त्यामुळे तेथील तरुणांची सैन्यात भरती होत नव्हती. यामुळेही हे जीवनचित्रण प. महाराष्ट्र प्रदेशातील आहे. या प्रदेशातील सामान्य माणसाचे शोषण विविध मार्गांनी होत होते. शंभूला सैन्यभरती कृष्णाकाकानेच केल्याचे जीवनच्या पत्रावरुन मल्हारीला समजते. तेव्हा चारचौघांदेखत त्यांचे मनगट तो धरतो, डोळे वटारुन विचारतो.

"काका माझ्याशी हलकटपणा का केलास हा?...बोला..." त्यावर काका म्हणतात, "तू कोणापुढे उभा आहेस? कोणाच्या मनगटाला धरून कोणाचा, उपमर्द करतो आहेस? आणि कोणाला असे बेजबाबदार जबाब विचारण्याचा उर्मटपणा करतो आहेस..."

"मल्हारी, पुराव्याशिवाय आणि आधाराशिवाय बोललास तर..." यावर मल्हारी संतापाने म्हणतो, "अरे होय! पुरावा-पुरावा कशाला पाहिजे? किती पाहिजे? तुझ्यासारखे

धूर्त कोल्हे, लांडगे पुराव्याच्या जोरावरच शहाजोग ठरवायचे! गरीबगुरीब, अनाथ-बायाबापड्या तुझ्यासारख्या सैतानाविरुद्ध काय पुरावा गोळा करुन पुढे आणावयाचे धारिष्ट करणार? हीच तुझी खात्री! तुझी एक हकनाक तोंडात बसली, तर दुसरा गाल पुढे करण्याखेरीज त्या अनाथ निर्जीव जीवांना तरणोपाच नाही! म्हणूनच तुझी ही जुलूम जबरदस्ती चाललेली!...'' (पृ. १२७)

मल्हारी-कृष्णाकाकाचा संघर्ष पाहण्यासाठी गावकरी जमतात. अशा वेळी संताप आवरुन, गंभीरपणाचा आव आणून थोडी दहशत, थोडे प्रेम, थोडे गोड बोलून कावेबाजपणाने ते मल्हारीचा विश्वासात घेण्याचा प्रयत्न करतात, विविध मार्गांचा अवलंब करुन आपले सत्तास्थान टिकवून ठेवण्याचा प्रयत्न तत्कालीन परिस्थितीत धनिक करीत होते. विरोध मोडून काढीत होते.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील निराधार जीवांची आर्थिक परिस्थिती कशी होती याची कल्पना या कादंबरीतून येते. निराबाईच्या दारिद्र्याची कल्पना जीव की प्राण असलेल्या यशवंतला ती औषधपाणी करु शकत नाही यातून येते. तरीही आपला इतरांना त्रास होऊ नये म्हणून निराबाई दक्ष असते. ती स्वावलंबी आहे. तिला रोजच्या खाण्याची पंचाईत पडते, वर्षाच्या वर्षाला वेढाही न येण्याइतके निराबाईच्या नशिबी दारिद्र्य होते.

म्हादबा आणि जोतिबा हे कृष्णाकाकांचे दोन कुळ आहेत, ते तत्कालीन परिस्थितीत कुळांचेच प्रतिनिधी आहेत. स्वत:ची जमीन कृष्णाकाकाकडे गुंतली म्हणून ती सोडविण्याच्या विचाराने एका मुलाला जोतिबाने मुंबईला पाठविले. एक मुलगा कृष्णाकाकांच्या गुराढोरांकडेच असतो. अर्थात ही जमीन सोडविणे त्याला आयुष्यभर जमत नाही. मुलांचे लग्न करणेही कुळांना अशक्य असते. ते म्हणतात, ''लगीन करायला पैका कुठला आणायचा? मस्त म्हटले आम्ही सगळी सोंग करायला येतील तर पैशा आडक्याचे सोंग कसे येतंय!'' म्हातारा म्हणाला,

''बरे जमीन जुमीन ठेवावी म्हटल, तर ती आगुदरच तुमच्याकडे सारी गुंतली आहे. पोटभरुन तुमचे व्याजच भरता भरता जीव बेजार होतोच मुद्दलालाला ठिकाणा नाही तर आमास्नी पैका कुठला मिळतोय न् आम्ही पोरांची हाडे कुठली भाजतोय!'' (पृ.८०)

कुळांचे शोषण तत्कालीन परिस्थितीत होत होते, स्त:च्या स्वार्थासाठी सावकार-श्रीमंत हे कुळांना राबवत होते. त्याचबरोबर भ्रष्टाचारही वाढीला लागला होता. कृष्णाकाका रेल्वे अधिकाऱ्यांना पैसे देऊन नियोजित रेल्वेस्टेशनची जागा बदलवितो.

स्थानिक देवदेवतांवरील विश्वास, श्रद्धा, समजुती यांचे चित्रण करुन 'प्रदेश' जिवंत केला आहे. अन्यायाची चीड येत नसली, अज्ञान, दारिद्र्य, मागासलेपण दिसत असले तरी खानदानीपणा, सुसंस्कृतपणा नष्ट झालेला नव्हता. पाव्हण्याला

तांब्याभर पाणी, शेंगा आणि गुळ देण्याची परंपरा असलेली दिसते. यशवंतने तिन्ही सांजेला निजणे तिला अशुभ वाटते. कारण ही वेळ लक्ष्मी येण्याची असते अशी तिची श्रद्धा आहे. देवादिकांवर निराबाईची जशी श्रद्धा आहे, त्याप्रमाणे शक्तीदेवता मारुतीवर मल्हारीची श्रद्धा आहे. तो मारूतीला पाणी घालतो. कृष्णरावकाका निराबाईच्या घरी येताच  ती मर्यादेने उठून उभी राहते, मंजुळा आईच्या पाठमोरी होते. यातून ग्रामसंस्कृतीतील स्त्रियांची मर्यादाशीलवृत्ती दिसते. प्रतिष्ठितांसमोर न बसता आदर म्हणून डोक्यावर पदर घेऊन नम्रपणे उभे राण्याची परंपरा दिसते. निराबाई प्रमाणे मल्हारीच्या आजीच्या संवादातूनही तिची देवावरची श्रद्धाच दिसते. मल्हारी-गजराचे लग्न ठरते, तेव्हा ती म्हणते,

''माझ्या घराला पहिली येईल तीच साधीभोळी माझी लक्ष्मी! तिच्याच पायगुणाने तुझे कल्याण होईल''! (पृ. ८७) किंवा 'मल्हारी' व 'गजरा' यांची लग्नगाठ ब्रहमानेच बांधली' असे आजी आणि निराबाई मानतात. विधिलिखित होतच असते, माणूस ते बदलू शकत नाही.' लग्नविधीच्या निमित्ताने 'केळवण' आणि अन्य प्रथाचे चित्रणही येते.

सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड तालुक्यातील एका खेडेगावची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. कादंबरीचे निवेदन प्रमाणभाषेत आहे. संवाद बोली आहेत. श्रीमंत कृष्णाकाका सरकारी अधिकाऱ्यांशी स्थानिक बोली बोलतात. बाकी शेतकरी, कुळ व स्त्रियांची भाषा अस्सल सातारी ढंगाची आहे. शिकलेल्या शंभूची किंवा सुधारक जीवनचे संवाद प्रमाणभाषेतीलच आहेत. स्थानिक म्हणी, वाक्प्रचारातून आणि लोकोक्तीमुळे समाजवास्वत वस्तुनिष्ठ रुपात साकार झाले आहे.

''मान सांगावा जनाला आणि आपमान सांगावा मनाला', 'दाम करी काम', 'चिंती परा ते येई घरा', 'सगळी सोंगं करायला येतील तर पैशा अडक्याचं सोंग कसे येतय', 'आपलेच दात आणि आपलेच ओठ', 'सुंठी वाचून खोकला गेला', 'चुकलेला घाव ऐरणीच्या माथी', 'पराचा कावळा करणे' इ. याचप्रमाणे स्थानिक बोलीतील अर्थघन शब्दांनी 'प्रदेशविशिष्ट' लोकजीवन स्पष्ट दिसते. उदा. भांगलणी, पांग, लुंगारुन, झुपका, रामरामी, टेशणावर, कागदात, परभारा, खणं, पच्छान, उजविली, पोऱ्याला, धाडलेस इ. बोलण्याची एक विशिष्ट लकबही 'अमक्याकडे, तमक्याला, फलाण्याला' अशा मोघम उल्लेखातून दिसतात. येथे खेड्यातील जीवनक्रम व तेथील व्यक्तिचित्रण स्वाभाविक झाले आहे. परंतु अ. ना. देशपांडे यांनी ना. वि. कुलकर्णी यांच्या कादंबऱ्यासंदर्भात असमाधान व्यक्त केले आहे. ''त्याकाळी कुलकर्ण्यांचा खेडूत सृष्टीचे कादंबरीकार म्हणून जो गौरव झाला. त्याच्या मर्यादा आजच्या माडगूळकर बंधूंच्या खेडूत जीवनावरील कथा कादंबऱ्या वाचल्या असता सुस्पष्ट झाल्याशिवाय राहात नाहीत.'' १. अ. ना. देशपांडे यांचा अभिप्राय महत्त्वाचा आहे. परंतु ग्रामीण-

प्रादेशिक संज्ञाचा विचार सुरु होण्यापूर्वीचे कुलकर्णी यांचे लेखन आहे हेही येथे विचारात घेतले पाहिजे. कुलकर्ण्यांच्या कादंबरीचे ऐतिहासिक मोल वि. स. खांडेकरांनी मान्य केले आहे. ते म्हणतात, "जे धाडस कोल्हटकर, गडकरी, वा.म. जोशी, फडके यांनी केले नाही ते ना. वि. कुलकर्णी यांनी करुन 'नवी दिशा' दाखविण्याचा प्रयत्न केला आणि त्यामुळे त्यांनी निर्माण केलेल्या नव्या वाटेवर आपणास दिघे, शिरुरकर, पेंडसे यांच्यासारखे अव्वल दर्जाची साहित्यनिर्मिती करणारे भेटू शकले, हे विसरता येण्यासारखे नाही."२. खांडेकरांनी दिलेला अभिप्राय यथोचित वाटतो. कारण नवी दिशा देऊन मराठी प्रादेशिक वाङमय समृद्ध करण्याचे श्रेय ना. वि. कुलकर्ण्यांकडेच जाते. डॉ. आनंद यादवांनाही ना. वि. कुलकर्णी यांचे ऐतिहासिक कार्य महत्त्वाचे वाटते. ३. एकूण वि. स. सुखटणकरांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' (१९३१) या कथांनी गोमंतकीय प्रादेशिक जीवनाचा समृद्ध आविष्कार घडविला. 'प्रादेशिक' ही संज्ञा रुढ होण्यापूर्वी या काळात ना. वि. कुलकर्णी यांनी ग्रामसुधारणेच्या प्रेरणेतून समकालीन समाजवास्तवाचे दर्शन घडविले. धनुर्धारी यांच्या नंतर ग्रामजीवनदर्शन घडविणारा कादंबरीकार म्हणूनच त्यांचे वाङमय इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे.

## २) र. वा. दिघे

र. वा. दिघे यांनी 'पाणकळा' 'सराई' (१९७३), 'निसर्गकन्या रानजाई' (१९४६), 'गानलुब्धा मृगनयना' (१९५६), 'आई आहे शेतात' (१९५६), 'पड रे पाण्या' (१९५८), 'कार्तिकी' (१९६६) या ग्रामीण प्रादेशिक जीवनचित्रण करणाऱ्या आणि अन्य विषयावरील कादंबऱ्या लिहिल्या आहेत. काहीसे स्वप्नरंजकनात्मक आणि कल्पनाविलासात्मक, अद्‌भूत असे कादंबऱ्यांचे कथानक असूनही प्रादेशिक-सामाजिक पार्श्वभूमी मात्र वास्तव आहे. 'लेखकाच्या पहिल्याच 'पाणकळा' कादंबरीचा विचार केला तर विस्तृत, गुंतागुंतीचे व उत्कंठावर्धक विस्कळीत कथानक असलेली दख्खनच्या पूर्व प्रदेशावरील पावसावलंबी जीवनाचे सुंदर चित्र नजरेसमोर उभे राहते. कादंबरी कल्पनारम्य रहस्यमय उत्कंठावर्धक असून ग्रामसुधारणावादी विचारांनी ती बोधवादी झालेली आहे. अनेक घटना योगायोगाने घडतात, त्यामुळे वास्तवजीवनदर्शनाबद्दल शंका येतात. ग्रामीण जीवनाचे फुटकळ तपशील विखुरलेल्या स्वरुपात लेखक चित्रित करतो. 'अनोळखी जीवनाची अनोळखी कहाणी"४. असा डॉ. मदन कुलकर्णी तिचा गौरव करतात. पहिली प्रादेशिक कादंबरी म्हणतात.

इंग्रज अमदानीतील सजलपूर हे एक सुजलाम सुफलाम गाव असून माने आणि जाधव यांच्यामध्ये पिढीजात हाडवैर असल्यामुळे मोडकळीस येते. जाधवाकडील पाटीलकी माने घराण्याकडे गेली. समकालीन परिस्थतीतील रंभाजी हा सजलपूरचा पाटील तर वारकरी भुजाबा जाधव हा या गावातील सज्जन आहे. रंगेल रंभाजीला

देखील भुजाबाची भीती वाटते, तरीही त्याचे कृष्णकृत्य थांबलेले दिसत नाही. गहिनाजी आणि त्याची सुंदर पत्नी पारु भुजाबाच्या आश्रयाने, त्यांच्याच जागेत घर बांधून राहतात. रंभाजीचा पारुवर डोळा असतो. ती मिळावी म्हणून तो रात्रीच्या वेळी तिच्या घरात घुसतो. भुजाबाला हे समजताच त्याला पकडून गाडीच्या चाकाला बांधून मार देतो. रंभाजी सूड घेण्याचा निश्चय करतो. त्याची चांडाळचौकडी त्याला मदत करते. गहिणाजीच्या बैलावर विषप्रयोग, सावकाराकडून तगादा खोटा खटला आणि शेवटी भुजाबाच्या घराला सकऱ्या भिल्लाकडून आग लावणे इ. प्रकार होतात. क्षमाशील भुजाबा गहिणाजी-पारुसह शेतावरील पडळीवर राहायला जातात. परंतु निसर्गनिर्मित आपत्तीमुळे सर्वांना गाव सोडून पारुच्या भावाकडे (आनंदराव) मुंबईला जावे लागते. सकऱ्या भिल्ल दुष्काळात रंभाजीकडे मदत मागतो. तेव्हा तो पोलीसांची धमकी देतो, तर भुजाबा मात्र भिल्लांना सर्व धान्य वाटून देतो. पश्चाताप झालेला सकऱ्या भुजाबाला 'देव' मानतो आणि रंभाजीचा काटा काढण्याचा निश्चय करतो.

चांगला पाऊस झाल्यानंतर सर्वजण सजलपूरला येतात. आनंदरावही ग्रामसुधारणेच्या ध्येयाने प्रेरित होऊन आणि सोनीवरील प्रेमाखातर खेड्यात येतो. अल्पकाळात रंभाजीचा मुलगा राया आणि सोनीचे प्रेम असल्याचे त्यांच्या लक्षात येते. तो ग्रामसुधारणेचे कार्य जोमाने करु लागताच गावचे चित्र पालटते. रंभाजी ऐवजी आनंदराव भुजाबालाच लोक मानू लागतात. तो संतापतो. राया-सोनीच्या सोयरीकीसाठी भुजाबा-रंभाजीच्या वाड्याची पायरी चढतो. उलट रंभाजी त्याला अपमानित करुन घालवून देतो. राया बापाच्या वर्तनामुळे घर सोडतो. रामजल मारवाड्याच्या खून प्रकरणात आनंदराव, भुजाबा आणि गहिणाजीला शिवराम फौजदाराच्या मदतीने अडकविले जाते. याच काळात शिवराम सोनीचा छळ करतो. संतापलेला राया त्याला मार देतो. सोनीला घेऊन आकाशगडाला जातो. खोट्या खून खटल्यातून भुजाबा आणि सहकाऱ्यांची निर्दोश सुटका होते. परंतु शिवराम फौजदाराचा रायाच्या मारामुळे मृत्यू झाला म्हणून त्याला पकडण्यासाठी पोलीस तपास सुरु होतो. सकऱ्या रंभाजीच्या घराला आग लावतो. जाळून ठार मारण्याचा निर्णय घेतो. अशावेळी भुजाबा त्याला वाचवितो. भिल्ल भुजाबाच्या सांगण्याप्रमाणे पोलीसांना शरण जातात. रैना-पहाडंजी, सोनी-राया वेशांतर करुन मुंबईला निघून जातात. परंतु रंगेल राया व्यसनी-जुगारी बनतो. सोनीला मारु लागतो. तिची आबाळ करतो. एकत्र राहणारे रंभाजी-भुजाबा काळजी करु लागतात. आनंदरावाला यम्या भिल्लाबरोबर मुंबईला पाठवितात. सोनीला घेऊन ते माघारी येतात. पण राया दरोडेखोर बनतो. तो माघारी येत नाही. पोलीस तपास चालूच असतो. अचानक एक दिवस राया येतो. सोनी त्याच्याबरोबर जखणीच्या गुहेत जाऊन राहते. पोलिसांनी वेढताच राया सोनीला आणि स्ववत:ला गोळी घालून आत्महत्या करतो.

कथानकात कल्पनारम्य घटनांना प्राधान्य दिल्याने वास्तवता शबलित होत असली तरी व्यक्तिरेखा मात्र अस्सल ग्रामीण आहेत. आपले जन्मजात स्वभाव, गुणदोष आणि अंगभूत वैशिष्ट्ये घेऊन समकालीन समाजव्यवस्थेतून आकाराला आल्या आहेत. राया-सोनी, रैना-पहाडजी यांची प्रेमकथा असूनही ते नायक नाहीत, तसेच भुजाबा-आनंदराव भागवतधर्मीय ग्रामसुधारक असूनही लेखकाने त्यांना नायक केले नाही. रंभाजी मात्र खलनायक आहे. एकूण सजलपूर हे गावच कादंबरीचा नायक आहे आणि प्रादेशिकतेचा समाजजीवनावर परिणाम झाला हेच व्यक्तिरेखाटनातून सतत जाणवते. रंभाजी माने हा सरंजामशाहीचा प्रतिनिधी आहे. उंचापुरा, भरदार, रुबाबदार चेहरा, उग्रमुद्रा, शरीर भव्य आणि मान बैलाच्या वशिंडाप्रमाणे भक्कम आहे. रंगेल, शूर, धाडसी, मर्दानी, क्रूर खूनशी आणि विषयासक्त आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी सरबराई करुन, त्यांची मर्जी संपादन करुन गावात तो सार्वभौम सत्ता उपभोगतो. त्याच्या विरोधात 'ब्र' काढण्याची शक्ती गावकऱ्यांमध्ये नाही. दुसऱ्याच्या घराला आग लावणारा, दरोडेखोरांकडील लूट पचविणारा, डव्हारा करणारा, खंडणी वसूल करणारा, तमासगीर स्त्रियांसाठी दौलतजादा करणारा दुष्ट खलनायक आहे. तो स्त्रीलंपट असला तरी त्यालाही बेअब्रूची भीती वाटते. म्हणून भुजाबाचा मार खाताना तोंडातून आवाज निघू देत नाही. पण राजमल खून खटल्यात त्याला अडकवितो. असे असले तरी त्याला शेवटी रायाची काळजी वाटते. गावची पाटीलकी त्याने सांभाळावी ही त्याची इच्छा अपूर्णच राहाते.

भुजाबा जाधव हा शिशासारखे भरीव शरीराचा, भागवतधर्मीय, रंभाजीपेक्षा ताकदवान आहे. रंगेल रंभाजीला भुजाबाची भीती वाटते. पारुच्या घरात प्रवेश केल्यामुळेच भुजाबा त्याला शिक्षा करतो. एरवी तो नेमधर्मी, ईश्वरभक्त, शांतताप्रिय, जबरदस्त आत्मविश्वास असलेला, लव्हाळीसारख्या बाभळी तोडणारा, नेकीचा खानदानी सज्जन आहे. प्राणिमात्रांवर आणि शेतावर त्याचे प्रेम असते. दैत्याप्रमाणे भव्य शरीर असलेल्या भुजाबाचे अंतःकरण अर्भकापेक्षा कोवळे आहे. मोठ्या मनाचा, क्षमाशील आणि वैऱ्यावरही माया करणारा. घर जाळणाऱ्या संकऱ्याला धान्य देणे, मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त होत असताना रंभाजीला पडळीवर ठेवून घेणे, सांभाळणे, विविध घटनाप्रसंगातून लेखकाने रंभाजीच्या विरुद्ध असा भुजाबा रेखाटला आहे. सुष्ट-दुष्टांचा संघर्ष ग्रामीणवास्तवाचे दर्शन घडवितो.

आनंदराव हा पारुचा भाऊ आहे. ग्रामसुधारणेच्या विचाराने तो झपाटलेला दिसतो. म. गांधींच्या 'खेड्याकडे चला' या विचारांच्या प्रभावातून लेखकाने आनंदराव साकार केला आहे. आधुनिक पद्धतीने शेती करण्याचा, पाणी आडवा पाणी जिरवा याप्रमाणे विविध रोगजंतू आणि त्यापासून होणारे प्रसार यांची माहिती देणारा, जत्रा उत्सवाचा लोकशिक्षणासाठी उपयोग करु पाहणारा तरुण आहे. गांधींजींची सत्य, अहिंसा

त्याच्या अंत:करणात खोलवर रुजलेली आहे. मानव समाज निर्मित आणि निसर्गनिर्मित संकटावर मात करण्याचे सामर्थ्य त्याच्याजवळ असल्याने तो रंभाजीच्या रोषास पात्र होतो. गहिणाजीची व्यक्तिरेखा सामान्य कष्टाळू शेतकरी अशी रेखाटली असली तरी त्याची बायको पारुवर लेखकाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. भुजाबाची बायको जानकीप्रमाणेच ती खानदानी, मर्यादाशील आणि कष्टाळू स्त्री आहे. सोनी ही सुकुमार पण देहभान हरपून गेलेली लावण्यलतिका आहे. पिंगा, फुगड्या, फेर, कोंबडा खेळणारी अल्लड सोनी तरुणपणात रायावर उत्कट प्रेम करते. तर आनंदावर भक्ती असल्यामुळे त्यांच्या समाजकार्यात मदत करते. राया हा रंभाजीचा रंगेल व रगेल मुलगा आहे. रैनेच्या नृत्यावर खूष होऊन दौलतजादा करतो. रैना त्याच्या प्रेमात पडते. बापाचे रुप आणि गुण घेऊन जन्माला असला तरी तो आनंदरावाच्या सहवासाने बदलतो. अन्यायाविरोधात आवाज उठवितो. बापाचे घर सोडतो, शिवराम फौजदाराला मारतो. राजमल मारवाडी हा ग्रामीणांचे शोषण करणारा, तर गोपाळराव पाबळकर, महादू माळी, नारायण सोनार हे गावातील धनिकांचे हस्तक आहेत. शिवराम फौजदार हा बदफैली, कामांध, लंपट, रांगडा आणि दारुड्या आहे. गरिबांचे शोषण करतो. सकऱ्याला पकडण्याच्या स्पेशल कामगिरीवर असलेला शिवराम रायाच्या माराने मरतो, सत्तांध अधिकाऱ्यांचा तो प्रतिनिधी आहे.

रैना, सकऱ्या, मल्या, पहाडजीच्या रुपाने उपेक्षित अशिक्षित पण इमानी तितकीच खुनशी भिल्ल जातीचे जिवंत चित्रण लेखकाने केले आहे. पहाडजी सकऱ्याचा विश्वासू साथीदार, यम्या रैनेचा मावसभाऊ आहे. सकऱ्या रैनेचा बाप, अट्टल दरोडेखोर, रंभाजीच्या सांगण्यावरुन भुजाबाच्या घराला आग लावतो. तसेच भुजाबाच्या सांगण्यावरुन रंभाजीला जीवदान देऊन पोलिसांना शरण जातो. या व्यक्तिरेखांबरोबरच अन्य भिल्ल, शेतकरी आणि कोर्टातील साक्षीदार, पोलीस व समूहाचे चित्रण करुन लेखकाने समकालीन वास्तवाचे स्वप्नरंजनात्मक चित्र रेखाटले आहे.

कादंबरीमध्ये लेखकाने रेखाटलेले जीवन दख्खन पठाराच्या पूर्वभागाचे आहे. 'पाणकळा' मध्ये चित्रित झालेले जीवन १९२१ साली आपण नगर जिल्ह्यात राहुरीला अनुभवले.' ५. असे स्वत: लेखकाने म्हटले आहे. त्यामुळे 'राहुरीत अनुभवले अनुभव त्यांनी खोपोलीच्या पार्श्वभूमीवर 'कलम' केले.'६. हे प्रा. व बा. बोधे यांचे विधान विसंगत आणि एकांगी वाटते. कारण कादंबरीत रेखाटलेला प्रदेश खोपोली जवळचा नाही, तर अहमदनगर जिल्ह्यातील आहे. लेखकाने 'कर्परा' हे नदीला काल्पनिक नाव दिले असले तरी तो 'प्रवरा' आहे आणि 'आकाशगड' म्हणजे सह्याद्रीपर्वतावरील सर्वांत उंच शिखर कळसूबाई आहे. तर 'चंद्रनगर' हे शहर अहमदनगर आहे असे भू-प्रदेश वैशिष्ट्याच्या वर्णनाधारे आणि पिकापाण्याच्या दुष्काळाच्या वर्णनावरुन म्हणता येईल. दुष्काळात भुजबासारखे लोक देशावरुन तळेगाव-खोपोली

मार्गे मुंबईला जातात. लेखक सुरवातीलाच वर्णन करतो, 'महाराष्ट्राच्या उत्तर विभागात 'कर्परा' नदीच्या काठी एक गाव आहे. त्याचे नाव 'सजलपूर' रामायणकाळी या प्रदेशाला 'दइंडकारण्य' किंवा 'दक्षिणापथ' असे म्हणत... हिवाळ्यात काळ्या वावरातून व नदीकाठच्या गाळपेरातून तजेलदार शाळूची ताटे डोलतात.'... (पृ.१) काळी जमीन, नदीकाठची चुनखडी, पावसावर अवलंबून असलेली शेती, विहिरीवरील मोटेचा उल्लेख, संत्री-मोसंबी, बोर ही फळझाडे, गहुबाजरी शाळू, तिळ कौकणात पिकत नाही, देशावर पिकतात. कांद्याचे पांगाऱ्या आणि गाजरांच्या तुऱ्यांची शेते ही देशावरील वैशिष्ट्यपूर्ण पीक आहे. कोकणात पाऊस पडतो तेव्हा देशावरुन वांझ पांढरे ढग पळताना दिसतात. कोरड्या ठणठणीत, दुष्काळी देशावरील नद्यांना गढूळ पाण्याचे पूर येतात. देशावरील दुष्काळाचे वर्णन पहा,' ... मळे वढले, शेतकऱ्यांना व त्यांच्या गुराढोरांना प्यावयास पुरेसे पाणी मिळेना. वैरण काडी पार संपली. गुराखी रानात नुसती नावाला गुरे फिरवून आणीत व मग गोठणीवर उभी करीत. तेथे गुरे अनुशापोटी रवंथ करीत. त्यांची पोटे वीतवीत भकाळी गेली. बरगड्या उघड्या पडल्या, कातड्यावरचे केस झडून जाऊन त्यांच्या अंगावर काळी चकतरे पडू लागली. गावात घराआड घराला टाळे लागले. काही लोकांनी तशीच घरे रिकामी टाकून गाव सोडला... पोटाची आग शमविण्याकरिता लोकांनी बोंडे व झाडाचा पाला खाल्ला. गवताचे बी भरडून त्याच्या भाकऱ्या केल्या. (पृ.५२) किंवा

'...दख्खनच्या पूर्व भागात पावसाचा काही नेम नसतो. आदल्या दिशी जेथे धुरळा दिग्गजाच्या सोंडेप्रमाणे वातचक्राबरोबर आकाशात गरागरा वर जाताना दिसतो, तेथे दुसऱ्या दिवशी गुडघा गुडघा चिखल होतो.' (पृ.५) प्रादेशिकतेचा मानवीजीवनावर कसा परिणाम होतो. देशावरील लोकांचे जीवन पावसावलंबी आहे आणि हा पाऊस बेभवरशाचा असतो. पडला तर खूप नाही तर स्थलांतराशिवाय पर्याय उरत नाही. माणसांपेक्षा जनावरांचे अधिक हाल होतात. आणि आकशगड परिसरातील सायली कळंब, मोह, पळस, पांगारा, सारी यासारख्या वेलीवृक्षाप्रमाणे सायाळ, सांबर आणि भेकर या प्राण्यांचा व नाचणीच्या पिकाचा उल्लेखही येतो.

निसर्गाचा जनजीवनावर परिणाम होतो. तो आनंदाने सण उत्सव साजरे करतो. दुष्काळात मात्र याउलट अनुभव येतो. श्रावणातील हे निसर्गचित्र पहा.

'...पावसाने जिकडेतिकडे हिरवेगार करुन सोडले होते. श्रावणाच्या सरी अधूनमधून पडत होत्या. बाजरीच्या लिंबुराने माळराने काळीशार दिसत होती, शेते वाऱ्यावर डुलत होती. हिरव्या शोभेवर संध्याकाळचे पिवळे ऊन पडले की, भूवर स्वर्ग उतरला आहे असे वाटे. जिकडे तिकडे नागपंचमीला सण साजरा होत होता...' (पृ.६८)

याप्रमाणेच व्यक्तीच्या मानसिकतेनुरूप लेखक निसर्गचित्र रेखाटतो. '...रात्रीच्या अंधारात मोसंबीची फुले झाडांच्यावर तारकांच्या जाळीप्रमाणे दिसत होती. मधुबन

मोहराने फुलले होते. फुलांच्या सुगंधाने काळा काळा अंधार कस्तुरी वाळत घातल्याप्रमाणे जिकडेतिकडे पसरल्यासारखा दिसत होता व मधून मधून वायूच्या लहरी आल्या म्हणजे वाऱ्याने कस्तुरी उडत आहे असे वाटे.'' (पृ.९०-९१) पहिल्या चुंबनाने सुखावलेल्या सोनीची मानसिकतेनुरुप हे निसर्गचित्र आहे. सोनी-राया आणि आकाशगडच्या भिल्लांच्या आनंदी मानसिकतेनुरुप रेखाटलजेले निसर्गचित्र (पृ. २१९-२२०) वैशिष्ट्यपूर्ण आहे. निसर्गाचा व्यक्तिजीवन व समाजाच्या जीवनावर परिणाम होतो, त्याचे सुखदु:ख रंग बदलत्या निसर्गावरहुकूम लेखकाने रेखाटले आहे. कुसुमावती देशपांडे म्हणतात, ''त्यांची निसर्गवर्णने मराठीमध्ये नवलाईची ठरली आहेत. त्यांची निसर्गवर्णने काहीशी लांब असली तरी रेखीव दृकप्रत्यय देणारी आहेत. कारण त्यांच्या मागे अनुभवाइतकाच शब्दकलेविषयी चोखंदळपणा आहे.'७. याप्रमाणेच डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, 'ग्रामीण निसर्ग दिघे यांनी जितक्या उत्कटतेने व जिव्हाळ्याने पाहिला तितका व तसा कुणीच पाहिला नाही. भव्य व सुंदर निसर्गचित्रे पूर्वी कुणीही काढली नाहीत पण त्यांनी चित्रित केलेल्या मानवी समुदायांच्या जीवनचित्रणाबद्दल समाधान व्यक्त करणे कठीण आहे. त्यांचा संघर्ष ढोबळ, त्यांचा प्रणय उक्मादपूर्ण, रसरशीत पण केवळ शारीर व अतिरंजित कल्पनारम्यतेची अनिवार आवड व शृंगाराचा मोह खेड्यातील दाहक वास्तवाचे व त्यातील अंतर्विरोधाचे चित्रण करु देत नाही.' ८. या दोन्हीही अभिप्रायाधारे एक गोष्ट स्पष्ट होते की, मानवी जीवनाचा अपरिहार्य भाग म्हणून निसर्गचित्र रेखाटले गेले आहे. परंतु मानवी जीवनचित्रण काहीसे अवास्तव झाले आहे, हे मान्य करुनही समकालीन समाजजीवनाचे कादंबरीतून दिसणारे स्वरुप पाहू.

कादंबरीच्या कथानकास संजलपूर भोवतीच्या रम्य निसर्ग-भू-प्रदेशातील जीवनाची पार्श्वभूमी लाभली आहे. शेतकऱ्यांचे निसर्गाधीन जीवन, त्यांचे दैन्य, सावकारीपाश, मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित संकटे, पिढीजात हाडवैर आणि भिल्लांच्या टोळीचे समूहजीवन लेखकाने चित्रिण केले आहे. माने जाधवांचे हाडवैर, दुष्काळ आणि सकऱ्या भिल्लाच्या टोळीचे समूहजीवन यांचे दर्शन लेखक घडवितो. इंग्रज सरकारने पाटलांना दिलेल्या अधिकारामुळे ग्रामस्थांचे विविध मार्गांनी शोषण होऊ लागले. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होत होते. याची जाणीव असूनही सत्ताधांना विरोध करण्याचे साहस समकालीन परिस्थितीत लोक करु शकत नव्हते. भागवत धर्माच्या विचारांची छाप असलेली जनता सत्ताधाऱ्यांच्या दुर्वर्तनाखाली भरडून निघत होती. लेखकानेच प्रस्तुत कादंबरीचे 'स्वतंत्र सामाजिक कादंबरी' असे वर्णन कादंबरीच्या प्रथमपृष्ठावर केले आहे. म्हणजेच लेखकाला देखील तत्कालीन समाजजीवनाचे दर्शन घडवायचे होते हे निर्विवाद आहे. कादंबरी वाचनीय करण्याच्या दृष्टिकोनामुळे अवास्तवता येते. र. वा. दिघे म्हणतात, 'माझ्या लिखाणात पण रंजनाकरता, नाद येण्याकरता, थोडे खोटे मिसळले.''९. अशा प्रकारे कादंबरी रंजनप्रधान करण्यासाठी

लेखकाने तडजोड केली आहे.

पारंपरिक गावगाड्याची पडझड झाली, "....जुने गाव जमीनदोस्त झाले त्याला गावकूस होते. त्याचे अवशेष अद्याप दिसतात. गावठाणात परड्यांची कुंपणे, घरांची जोती, जुने ओटे व कट्टे वैराण पडले आहेत. गावाच्या बाहेर पूर्वेला गावापासून थोड्या अंतरावर जरा चढावर मारूतीचे देऊळ आहे. देवळाची पोकळी पडून गेली आहे व त्याच्याखालील जमिनीत भुयारे आहेत. हाल्ली त्या चंद्रमौळी देवळात उन्हाळी पावसाळी मारुतीराय उघडेबंब असतात...' (पृ.७) पिढीजात वैरागमुळे गावामध्ये दोन गट पडले आणि एकमेकाशी सोइरसंबंध न करण्याच्या शपथा घेतल्या गेल्याने वैर वाढतच गेले. मान्यांनी जाधवाचे इनाम खाल्ल्यापासून दोन्ही घराण्यांचे हाडवैर. दरवर्षी खून, मारामाऱ्या तंटे होऊ लागले. सुष्ट आणि दुष्टांचे दोन गट निर्माण झाले. सत्तास्पर्धा वाढली असली तरीही समाजात अप्रतिष्ठा - बेअब्रू होऊ नये म्हणून दिसतो. जसे कामांध रंभाजी पारुच्या घरात घुसतो, त्याला भुजाबा शिवळेने मारतो, परंतु मार खाताना तो हुं की चुं करीत नाही. गावात समजले तर अब्रू जाईल अशी त्याला भीती वाटते. भुजाबादेखील आवाज न करता नेम धरून मार देतो. कारण गाव जमा झाला तर पारुचे नाव पुढे येईल व निष्कारण तिच्याबद्दल गावात गैरसमज उत्पन्न होईल. गहिणाजी-भुजाबाचे घर जाळतो. खोटा खटला भरतो. मारवाड्याला तगादा लावायला भाग पाडतो, जप्ती आणतो, बैलाला विषप्रयोग करतो. सोनी-रायाच्या सोयरीकीसाठी वाड्यावर गेलेल्या भुजाबाला अपमानित करतो. या सर्व घटनाप्रसंगामधून लेखक गावगाड्याचे बदलते स्वरूप रेखाटतो. इंग्रज सरकारने पोलीस पाटलांना काही अधिकर दिल्यामुळेही ते गावात दहशत निर्माण करु लागले. वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी खोटे खटले भरू लागले. त्यामुळे सामान्य माणसाचे शोषण होऊ लागले. दहशतीमुळे ते पोलीसपाटलाच्या तंत्रानुसार वागू लागले. जसे लेखक वर्णन करतो, "रंभाजीला व्हिलेज पोलीस ॲक्टखाली काही गुन्ह्यांचा इन्साफ करण्याचा अधिकार सरकारने दिला होता. त्याला दोन दिवसांची शिक्षा व पाच रूपये दंड करता येत असे. पाटलाच्या निकालावर प्रिव्ही कौन्सिलशिवाय अपील नसते. त्यामुळे पोलीस पाटलाने एखाद्याला खोट्या खटल्यात भाजून काढला की, त्याचा निर्णय वज्रलेप होई." (पृ.३९) भुजाबावर खोटा खटला भरुन रंभाजीने तीन रुपये दंड केला, अपमानित करण्याची संधी घेतली. जास्तीत जास्त बेअब्रू करण्याचा प्रयत्न केला. गहिणाजीच्या घरावर जप्ती आणली, परंतु जानकी-भुजाबाने पदरमोड करुन जप्ती टाळली आणि रंभाजीला अपमानीत केले. एकूण प्रत्येकजण दुसऱ्यावर कुरघोडी करण्याच्या पवित्र्यात असलेला दिसतो, परंतु कोर्टकचेऱ्यांमधील दाव्यांमुळे शेतीकडे दुर्लक्ष होऊ लागले. त्यामुळे आर्थिक फटका बसला. धनिकांच्या विरोधात आवाज उठविण्याचे सामर्थ्य माणसामध्ये नव्हते. जसे भुजाबाच्या घराला रंभाजीच्या

सांगण्यावरुन सकऱ्या भिल्लाने आग लावली, तेव्हा लोकांनी आग विझविण्यचा प्रयत्न केला, परंतु रंभाजी तेथे असल्यामुळे त्याचेचे हे कृत्य आहे हे कोणी बोलून दाखविले नाही.

सरकारी कायद्यामुळे कोर्टकचेऱ्या करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली. दानत व शील यांची किंमत गेली. लेखक निवेदन करतो, "हिंदुस्थानात नव्याण्णव टक्के लोकसंख्या शेतकऱ्यांची आहे. हे शेतकरी, दीन, दुबळे, भ्याड स्वत्व विसरलेले, गैरवर्तनी व असभ्य बनले तर देशाचे काय होईल? एक दोन देशभक्त पुढाऱ्यांना जगात मान मिळाला म्हणजे देशाचे कल्याण होणार नाही. या पुढाऱ्यांनी हा शेतकरीवर्ग उमदा करण्याची कधी इच्छा दर्शविली होती काय? बहुजनसमाज शरीराने, मनाने, सुबत्तेने, नीतीने व सभ्यतेने मगरुर झाला पाहिजे. त्याशिवाय देशाचा उद्धार नाही." (पृ.१०९) ग्रामसुधारणेचा पुरस्कार अशा रीतीने लेखकाने केला आहे. म. गांधींच्या 'खेड्याकडे चला' या मंत्राचा दिघ्यांवरील प्रभाव यातून जाणवतो. गावगाड्यातील पडझड कोणीही थांबवू शकले नाही. भागवतधर्माला, माणुसकीला मोल राहिले नाही. इंग्रजांनी शेतकऱ्यांची हिम्मत, धैर्य, हुशारी, सहनशक्ती व माणुसकी नष्ट केली. दया आणि क्षमा शांतीचा भागवतधर्म राहिला नाही. सत्ता संपत्तीची गुर्मी वाढली. तरीही योग्य मार्गदर्शन करणारा मिळाला तर शेतकरी त्याचे अनुकरण करतात. जसे आनंदरावाच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळावा म्हणून सर्व शेतकरी भुजाबाच्या पडळीवर जमू लागले. रंभाजीचे महत्त्व कमी झाले. राजमल सावकार खाते मिटवू लागला. चांडाळ चौकडीची कमाई बुडू लागली. शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती होऊ लागली. यातून लेखकाने ग्रामसुधारणेचा पुरस्कार केला आहे. लोकाचारासाठी होणारा खर्च टाळला, उत्पन्न वाढविले आणि सावकाराचे उंबरे झिजविण्याचे बंद केले तर शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती सुधारेल असा आशावाद व्यक्त होतो. तसेच शिकलेल्या तरुणांना मातीत हात घालण्याची लाज वाटते, त्यांचे शेतीकडे दुर्लक्ष होते. त्याचप्रमाणे शिक्षणाबद्दल समकालीन परिस्थितीत उदासीनता होती, जसे रंभाजी रायाला गुरुमंत्र देतो, "राया, तू आपल्या डोक्याला फारसा त्रास करुन घेऊ नकोस... आपली सोळा आण्याची पाटीलकी आहे." (पृ.७१) यातून शेतात कष्ट न करण्याची प्रवृत्ती कशी वाढली हेच दिसते. शिकलेल्या तरुणांनी अद्ययावत पद्धतीने शेती केली तर परिस्थिती बदलेल असा विश्वास लेखकाला वाटतो.

गावगाड्यातील सूत्रधार पाटील सरकारी अधिकाऱ्यांची सरबराई करुन त्यांना आपल्या मुठीत ठेवीत, त्यांच्याशी असलेल्या संबंधांच्या जोरावर शेतकऱ्यांची पिळवणूक करीत असत. व्यसनी, रंगेल, बदफैली शिवराम, फौजदारासाठी रंभाजी डंवरा करतो. त्याला दारु पाजतो आणि भुजाबाच्या विरोधात भडकवितो. भिल्ल आणि रामोशांना विनाकारण चावडीवर बोलवून तो शिवीगाळ करतो. आपली महती दाखवतो. सज्जनांना



DN 2891

बदमाश म्हणून संबोधतो. अपमानीत करतो. खोट्या साक्षीपुराव्याने आनंदराव-भुजाबावर खटला भरतो. त्यांचे गुण विसरुन राजमलला शिव्या देणारे शेतकरी माळकरी भुजाबाची टिंगल-टवाळी करु लागतात. आनंदरावाला शिव्या देऊ लागतात. याचप्रमाणे सोनीला मुंबईहून परत आणल्यानंतर आनंदराव सोनी संबंधात अफवा पसरु लागल्या. उलटसुलट चर्चा होऊ लागल्या. 'जिकडे घुगऱ्या तिकडे उदोउदो' करण्याची समकालीन समाजाच्या प्रवृत्तीवर यातून प्रकाश टाकला आहे.

समकालीन परिस्थितीतील भिल्लांच्या अस्थिर जीवनाचे आणि इमानी, खाल्ल्यामिठाला जागणाऱ्या, विश्वासघात न करणाऱ्या वृत्तीचे चित्रण येते. भिल्लाच्या किंवा कोल्हाट्यांच्या मुलींचे तमाशाच्या रुपाने शोषण होते. शोषक वरच्या वर्गातील, दौलतजादा करण्यासारखी त्यांची परिस्थिती आहे. रंभाजी किंवा राया कोल्हाटणी-भिल्लीणींचे शोषण करतात. उलट रंभाजीच्या सांगण्यावरुन भुजाबाचे घर जाळणारा सकऱ्या भिल्ल व त्याचे साथीदार दुष्काळातील उपकारामुळे भुजाबाला 'देव' मानतात. त्याची मुलगी सोनी राया-रैनेच्या प्रेमाच्या आड येते, तरी ती शक्य असूनही सोनीला ठार मारत नाही. उलट बहिणीची माया करते. तसेच भुजाबाच्या सांगण्यावरुन सकऱ्या रंभाजीला जीवनदान देतो. पोलीसांच्या स्वाधीन होतो. त्याचप्रमाणे भिल्ल अट्टल दरोडेखोर होते, त्यामुळे त्यांना उचलेगिरी, खिसे कापणे, भामटेगिरी किंवा बारक्या चोऱ्या माहित नव्हत्या. त्यामुळे राया-सोनी-पहाडजी-रैनाची अपरिचित मुंबईत उपासमार होते. त्याला भुरट्या चोऱ्या जमत नाहीत. या पार्श्वभमीवर कुसुमावती देशपांडे म्हणतात, "...तिची सृष्टी व वातावरण खेडेगावातील आहे. एवढेच नव्हे तर त्यात वन्य जातींच्या स्वच्छंद जीवनाचा, प्राकृतिक भावनांचा व रसरशित सौंदर्याचा समावेश झाला आहे. यातील प्राकृतिक रसरशीतपणा व उन्माद इतका प्रबळ आहे की लेखकाचे बोधवादाचे प्रयत्न व ग्रामजीवनाच्या सुधारणेच्या मात्रेसे वळसे फिके पडतात."१०. खेडूतांच्या जीवनातील बदल, भिल्लांचे जीवन आणि ग्रामसुधारणा सहजपणे हातातहात घालून लेखकाने रेखाटले आहेत.

देशावरील शेती पावसावलंबी आहे. त्यावर शेतकऱ्यांचे जीवन अवलंबून आहे. पावसाचा चांगला वाईट परिणाम शेतकऱ्याच्या आर्थिक परिस्थितीवर होतो. पाऊस पडला पिके चांगली आली तर शेतकरी आनंदात असतो. तो जत्रा-उत्सवात रमतो. अतिवृष्टीचाही विपरीत परिणाम त्याच्या जीवनावर होतो. दुष्काळात तो आभाळाकडे डोळे लावून बसतो. दख्खनच्या पूर्वेकडील नेहमीच्या दुष्काळी अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जीवनावरही त्याचा परिणाम होतो. कोकणात पाऊस पडत असताना देशावर रिकामे पांढरे ढग दिसतात. शेतकरी आतुरतेने पावसाची वाट पाहतो. लेखक वर्णन करतो, "सजापूरची दुनिया देखील याच पाणकळ्याबरोबर हेलकावे खात कालचक्राचे फेरे पुरे करते. शेकऱ्यांच्या स्वभावविशेष, त्यांची आर्थिक परिस्थिती,

राग, लोभ, द्वेष, प्रणय, राजकारण, लगीनवऱ्हाड, सणसुगी, गुंडगिरी, आशा महत्त्वाकांक्षा सर्व काही या पाणकळ्यावर अवलंबून असते. त्या पाणकळ्याचे परिणाम त्यांना वर्षभर, नव्हे जन्मभर पुरतात.'' (पृ.६) याच गावातील रंभाजी सरंजामशाहीच्या मस्तीत जगतो. गोरगरिबांच्यावर अन्याय करतो. त्याचे कामांध मन ग्रामजीवनातील सत्तांध वृत्तीचे प्रतीक आहे, त्याची चांडाळचौकडी हा शोषितांचा एक नवीन वर्गच आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने बैल अत्यंत महत्त्वाचे असतात, त्यावर त्यांची शेती अवलंबून असते. रंभाजीच्या कारस्थानामुळे गहिणाजीच्या बैलावर विषप्रयोग होतो. बैलाशिवाय शेतीची मशागत अशक्य झाल्यावर गहिणाजी सोनाराकडे जाऊन बायकोचे दागिणे आटवतो. ऐंशी रुपयाच्या दागिन्यांचे चाळीस रुपये घेऊन मरका बैल विकत घेतो. यातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे होणारे शोषणाचे स्वरुप स्पष्ट होते. त्याचप्रमाणे राजमल दोनशे रूपये कर्जाची चारशे रूपयाची प्रॉमिसरी नोट तयार करतो. अफाट व्याजदर घेतो. या मानवनिर्मित संकटाप्रमाणे निसर्गनिर्मित संकटाची भर पडते. दुष्काळात माणसा-जनावरांचे हाल होतात. ''पोटाची आग शमविण्याकरिता लोकांनी निवडुंगाची बोंडे व झाडाचा पाला खाल्ला. गवताचे बी भरडून त्याच्या भाकरी केल्या.'' असे दुष्काळाचे भीषण चित्र रेखाटले आहे आणि मानवी जीवनावरील परिणाम दाखवून दिला आहे. महागाईमुळे लोकांनी धान्याच्या गाड्या लुटल्या, दरोडे घातले उपासमार व रोगाच्या साथी पसरल्या. कपड्याचे भाव वाढले. अब्रूकरिता बायकांनी आत्महत्या केल्या. पोटासाठी मिशनऱ्याला मुले विकली. सरकारने दुष्काळी खाती उघडली, पण शेतकऱ्यांना त्याचा फारसा उपयोग झाला नाही. कंत्राटदारांनी बाजरीच्या पोत्यात वाळू भेसळ केली. खडी फोडणाऱ्या गरीब रयतेच्या मजुरीत भ्रष्टाचार झाला. ठेकेदार गबर झाले. पैसे जास्त झाले म्हणून त्यांची अब्रू वाढली व सरकारने त्यांना रावसाहेब, रावबहादूर असे किताब दिले. भ्रष्टाचार करणाऱ्याला मानसन्मान मिळू लागला. तर कष्ट करणाऱ्याला उपासमारीला सामोरे जावे लागले. चोऱ्या करण्याची वेळ आली. तसेच अब्रूदारांनी धैर्याने उपासमार काढली. मुंबईसारख्या उद्योगनगरीचा आश्रय घेतला.

मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित आपत्तींना तोंड देणाऱ्या लोकांना समाजनिर्मित आपत्तीला तोंड द्यावे लागले. जमिनदार-शेट-सावकारांच्या कारभारामुळे लोकांना आर्थिकदृष्ट्या दारिद्र्यरेषेखालील जीवन जगावे लागले. आनंदराव सजलपूरला आल्यानंतर त्याने शेतकऱ्यांची पाहणी केली, तेव्हा त्याला दिसले की, ''... कोणाचे 'खंड' थकले आहेत, तर कोणाच्या जमिनीचे मालक पिकांसुद्धा जमिनीचा ताबा घेण्याच्या तयारीत आहेत. ज्यांच्या स्वत:च्या जमिनी उत्पन्न सहा टक्के तर सावकाराने व्याज अठरा टक्के. पण वडिलार्जित जमिनी सावकाराच्या घशात जाऊ द्यावयाच्या नाहीत या ईर्षेने शेतकरी सावकाराची भर करीत आहेत. कोणाच्या जनावरांना खुरकत आले

आहे, तर कोणी स्वत: व्याधींनी जर्जर झाले आहेत. संबंध घरदार आजारी पडले आहे...''(पृ.१०६-१०७) अशाही परिस्थितीत शेतकरी काळाशी झडा देत होता. तो धर्म, सत्य, प्रामाणिकपणा विसरला नव्हता. आदर्शवत जीवन जगत होता. बादशाही अमलात देखील शेतकऱ्याकडे सुबत्ता होती. परंतु ब्रिटिश सरकारचे राज्य आल्यावर शेतकऱ्यांची स्थिती खालावली. दानत व शील यांची किंमत गेली. कायदेबाजी वाढल्याने जंगलातील लाकूडफाटा तोडता येईना, म्हणून गरजेपोटी शेतकरी जंगलातील लाकडांची चोरी करु लागले. त्यांना पकडून सरकारने सक्तमजुरीची शिक्षा दिली. पुराव्याच्या कायद्याबाहेर न्याय राहिला नाही. तलाठ्याने रेघ ओढली की, ती गव्हर्नरपर्यंत कायम राहू लागली. न्यायासाठी लोक कोर्टकचेऱ्यांच्या पायऱ्या झिजवू लागले. त्यात त्यांचा वेळ आणि पैसा जाऊ लागल्याने शेतीकडे दुर्लक्ष होऊ लागले. सरकारी कायद्यांचा शेतकऱ्याच्या आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम झाला. त्यांचे शोषण वाढले.

ग्रामीण जीवनामध्ये सामाजिक आणि आर्थिक बदल होत असतात. त्यांच्या सांस्कृतिक जीवनामध्ये मात्र अजिबात बदल झाल्याचे दिसत नाही. श्रद्धा-समजूती परंपरा, आणि लोककथांवर त्याचा अढळ विश्वास असलेला दिसतो. 'पाणकळा' मध्येही र. वा. दिघ्यांनी सजलपूरच्या परिसरातील काही श्रद्धा-समजुतीवर लोककथांवर प्रकाशझोत टाकला आहे. खेडूतांचे तमाशाचे वेड, त्यासाठी त्याचे रात्ररात्र जागणे लेखक अचूक नोंदवतो. गाय न विकण्याची त्यांची परंपरा लेखक नोंदविण्यास विसरत नाही. परुतु दुष्काळात कसाई आणि दलाल यांनी शेतकऱ्याचे खोटे गिऱ्हाईक तयार केले. गायी खरेदी केल्या. यातून संस्कृतीचा ऱ्हासही दिसतो. नशिबावर विश्वास ठेवण्याची ग्रामीणांची परंपरा प्रादेशिकतेमुळे निर्माण झालेली दिसते. पान खाण्याने रक्त वाढते. शंभर पाने व शेरभर तूप बरोबर असा समज आहे. प्रेमाने कानावर बोटे मोडली जातात. आकाशात तारा तुटला तर पुण्यप्राणी जन्मास येतो असा समज असलेला दिसतो. ग्रामीण समाजाच्या अंधविश्वासाचे चित्रण लेखकाने केले आहे. जसे शुभ मुहूर्तावर सापडलेला ताईत हातात बांधायला तिची आई सांगते. कुलस्वामिनीची आण वांहणे, सितळादेवीवरील श्रद्धा, पदमाक्षी देवी नवसाला पावते, म्हणून परिस्थितीप्रमाणे सोन्याचांदीची पद्मे देवीला वाहतात. माघी पौर्णिमेला ही यात्रा भरते. राया-सोनी 'आमची जोडी कमळाप्रमाणे फुलव' असे मागणे मागतात. करुणेश्वर-शंभुदेवाला उलटी प्रदक्षिणा घालणे, शंकर देव भिल्लांचा घरजावई आहे, त्यांची गिरजा भिल्लीण त्याला दिलेली आहे. जखणीच्या गुहेतून स्त्रीच्या रडण्याचा आवाज आला की गावावर संकट येते असा अंधविश्वास आहे. परंतु डोंगरावर हवा जोरात आदळल्याने स्त्रीच्या रडण्याप्रमाणे आवाज येतात. रैनेच्या कोर्टातील अद्‌भूत अतिशयोक्त साक्षीतून एक लोककथा लेखक सहज सांगून जातो. मारुतीच्या देवळाजवळील

बळदातून लग्न कार्याला जेवणासाठी भांडी मिळत. काम झाल्यावर भांडी बळदात नेऊन ठेवायची म्हणजे ती जशी आली तशी आपोआप नाहीशी होत. पुढे एका लबाड माणसाने भांडी बळदात नेऊन ठेवायची म्हणजे ती जशी आली तशी आपोआप नाहीशी होत. पुढे एका लबाड माणसाने भांडी परत केली नाही, विकून टाकली व त्या वेळेपासून भांडी मिळण्याचे बंद झाले. लोकांचा असा समज आहे की, त्या बळदाची राखण करणारा भुजंग त्या दिवसापासून कोणाला तिकडं येऊ देत नाही व कोणी भीतीमुळे तिकडे फिरकत नाही. (पृ. १९५) समाजाच्या सांस्कृतिक जीवनावर लोक समजूतीचा परिणाम झालेला दिसतो. यातून स्वतंत्र संस्कृती घडलेली दिसते.

नागर वाचकांवर डोळा ठेवून प्रमाण मराठी आणि बोलीतील शब्दांच्या मिश्रणातून ग्रामीण वास्तव रेखाटण्याचा हा पहिला यशस्वी प्रयत्न आहे. संस्कृतप्रचुर आणि इंग्रजी शब्दांचाही प्रसंगानुरूप लेखकाने वापर केला आहे. नागरी बोलीतील नाविण्यपूर्ण शब्द कथानकाशी एकजीव झाले आहेत. जसे, पाणकळा, भिरकं, कुरंदी डोळे, वानगी, साजिंदे, धिरडं, रट्टा, कुणगा, पऱ्हेर, पडंळ, धुळपेरे, अस्मानी, सुलतानी, तव्हारी, धडगुड इ. शब्दांप्रमाणे बोलीतील अनेक शब्द उदाहरणादाखल घेता येतील. त्याचप्रमाणे म्हणी आणि वाक्प्रचार प्रदेशविशिष्ट समाजजीवनातून आल्या आहेत. 'पुसा थंडी वाजे दिसा', 'नदीला जीभ फुटणे(कर्ज) छप्पन्नाव्या पानावर जमा करणे इ. उपमा-प्रतिमा समर्पक आहेत. जसे 'पळसांना, पागाऱ्यांना व सांवरींना तांबडी फुले इतकी आली होती की त्यामुळे रान पेटल्यासारखे दिसत होते, प्रेमाने रंगलेले शेतकरी कणसासारखे डोलत होते.' 'जितराबास सोकावलेल्या जनावरांप्रमाणे पारुला पाहण्याकरिता भुजाबाच्या मळ्याकडे (रंभाजी) फेरफटका करी', तापलेला होन व राया यात काहीच फरक नव्हता', "...भिल्लांची येणारी काळीकुट्ट धिप्पाड शरीरे पाहिली म्हणजे रानात काळ्या सावल्याच जमा होत आहेत असे वाटे, (रैना) काळ्या दगडाळीत हिरकणी चमकावी, तशी ती काळ्या भिल्लांत दिसत होती." 'त्यांचे जबाब कात्रीने कापलेल्या दशावतारी गंजिफाप्रमाणे एकसारखे एक झाले.' 'तिचे (सोनी) सौंदर्य उन्हाळ्यात वाळूच्या गर्भातून वाहणाऱ्या प्रवाहाप्रमाणे आटून गेले होते. ग्रामीण जीवनानुभव साक्षात करण्याचे सामर्थ्य या भाषेत आहे. डॉ. चंद्रकांत बांदिवडेकरांनी पाणकळाचा गौरव करताना म्हटले आहे. "र. वा. दिघे यांची पाणकळा (१९३९) प्रसिद्ध झाली आणि मराठी कादंबरीच्या सृष्टित एक चांगल्या कलाकृतीची भर पडली. एवढेच नव्हे तर काही महत्त्वाच्या वैशिष्ट्यांमुळे ग्रामीण कादंबरीसंबंधी दृष्टी काहीशी बदलण्याचे श्रेय 'पाणकळा'ला मिळेल. ग्रामीण निसर्ग आणि ग्रामीण जीवन केवळ दृक-प्रत्ययाने चित्रित करण्याऐवजी आंतरिक अनुभवातून उत्कटपणे आविष्कृत झाल्यामुळे एक वेगळीच नवी वाट फुटल्यासारखी झाली."११. या अभिनयाप्रमाणेच डॉ. भालचंद्र फडके यांनी म्हटले आहे की, र. वा. दिघे यांच्या

पाणकळा' या कादंबरीमुळे मराठी कादंबरीच्या विकासाला एक नवी दिशा लाभली. विशिष्ट प्रदेशाचे गडद रंगात काढलेले चित्र, संत माणूस भुजाबा, आडदांड रंभाजी पाटील, रंगेल व बेछुट राया, लावण्यलतिका सोनी, निसर्गकन्या रैना इ. मराठी कादंबरीत न आढळणारी व्यक्तिचित्रे 'पाणकळा' कादंबरीचे विशेष होत. पाणकळा (म्हणजे पावसाळा) या कादंबरीतील निसर्गवर्णने इतकी रेखीव आणि दृकप्रत्यय देणारी होती, की वाचक त्यातच गुंग होऊन गेला. निसर्ग आणि माणूस यांच्या नात्यातील अर्थपूर्णतेचा प्रत्यय नव्यानेच आल्यामुळे फडके-खांडेकर प्रणीत 'कादंबरीपेक्षा' 'पाणकळा' वेगळ्या वळणाची आहे.''१२. अशाच प्रकारचे अभिनय न. चिं केळकर१३. आणि डॉ. अ. रा. तोरो १४. यांनी नोंदविले आहेत. तर डॉ. स. गं. मालशे यांनी कादंबरीच्या कलात्मक वैगुण्यविषयी लिहिले आहे. ''पाणकळा ही ग्रामीणतेचे कातडे पांघरलेली एक पाश्चिमात्य धरतीची प्रणयकथा आहे.१६. असा दावा उषा हस्तकांनी केला आहे.

ग्रामीण-प्रादेशिक वास्तवाचे चित्रण करुन मराठी कादंबरीला नवी दिशा देण्याचे ऐतिहासिक कार्य 'पाणकळा'ने केले. 'सराई', 'आई आहे शेतात', आणि 'पड रे पाण्या' या त्यांच्या कादंबऱ्या श्रेष्ठ दर्जाच्या ठरल्या याचे कारण पहिल्या कादंबरीतील अनेक दोष त्यांनी घालविले. 'सराई' आणि 'आई आहे शेतात' या दोन कादंबऱ्यांमधून त्यांनी स्वानुभवाचा उत्तर कोकण प्रदेश अधिक वास्तव पातळीवर रेखाटला आहे.

### ३) ग. ल. ठोकळ

***(४) ''बेचाळीसच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी - गावगुंड'' (१९४६)***

ग. ल. ठोकळांनी 'गावगुंड' (१९४६), 'ठिणगी' (२९६२) आणि 'टेंभा' (१९८२) या तीन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. बेचाळीसच्या पार्श्वभूमीवरील राजकीय सदरात मोडणारी कादंबरी म्हणून तिचा विचार प्रामुख्याने झाला आहे. स्वत: लेखकाने 'ही कादंबरी ग्रामीण जीवनावर आधारलेली आहे' असे कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. त्याचप्रमाणे 'गावगुंड'चे कथानक संपूर्ण काल्पनिक आहे. १७. असेही म्हटले आहे. काल्पनिक घटनाप्रसंगातून ग्रामीण जीवन रेखाटण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

सातारा जिल्ह्यातील विटा-खानापूर-तासगाव या प्रदेशातील वातावरणात घडलेली चव्हाण आणि पिसाळ कुटुंबातील संघर्षाची ही कथा आहे. मुसळगावच्या कुशाबा चव्हाणाचा मोठा मुलगा - गुणाजी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतो. घरदार सोडून राणूसारखे जीवाला जीव देणारे साथीदार जमवितो. दरोडे घालू लागतो. कुशाबाचा धाकटा मुलगा जयवंत पुण्याच्या शेतकी कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतो. भावाने शेतीकडे दुर्लक्ष केल्याचे, स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्याचे वडिलांच्या पत्रातून

त्याला समजते. पुण्याहून तो नाताळाच्या सुट्टीत शिरपतीच्या गाडीने गावाकडे निघतो. साताऱ्यात पिसाळ फौजदाराची मुलगी-लीला गाडीत बसते. रस्त्यात गाडीवर दरोडेखोर धाड टाकतात. लुटतात, तेव्हा थंडीमुळे कुडकुडणाऱ्या लीलाला जयंवत स्वत:ची धाबळी देतो. तासगावला गेल्यानंतर लीला घडलेला प्रकार वडिलांना सांगते. जयवंतने मदत केल्याचे सांगते. त्याची धाबळी देण्यासाठी दुसऱ्या दिवशी ते मुसळगावला जयवंतच्या घरी येतात. दरोडेखोरांचा शोध घेण्याचा निश्चय फौजदार पिसाळ करतो. गुणाजीच दरोडेखोर असल्याचे जयवंतच्या हातून खाली पडलेल्या लीलाच्या अंगठीवरुन त्यांच्या लक्षात येते. ते जयवंतला कैद करुन चावडीवर घेऊन जातात. जयवंतला सोडविण्यासाठी चावडीवर आलेल्या कुशाबाला काळू हवालदाराला सांगून बेशुद्ध पडेपर्यंत मार दिल्याने त्यांचा मृत्यू होतो. बापाच्या खुनाचा बदला घेण्याची गुणाजी शपथ घेतो. काळूला ठार करुन चावडीवर आणून टाकतो. जीव की प्राण असलेल्या काळूच्या मृत्यूने पिसाळ फौजदार भडकतो. गुणाजीची पत्नी पारुला बंदीवान बनवितो. तिचे वडील बाळाजी पाटील तिला मुक्त करतात. त्याचवेळी गुणाजी चावडीवर येतो. राणूला सांगून पिसाळ फौजदाराला खांबाला बांधले जाते. पिसाळ फौजदाराला काय शिक्षा करायची या विचारात असताना बाळा पाटील आणि गुणाजी लीला - जयवंतचे लग्न लावण्याचा निर्णय घेतात. सर्व व्यवस्था करुन विधिपूर्वक लग्न लावतात. फौजदार अपमानित होतो. सूडाची भावना तीव्र होते. दरम्यान दरेवाडीजवळील डोंगराच्या गुहेत पारुचे बाळंतपण होते, तिला भेटायला गेलेल्या गुणाजीला फौजदार पिसाळ पकडतो. पिसाळांचे वडील बंधू भाऊसाहेब पिसाळ यांना रोख पाच हजार रूपये देऊन जयवंत, गुणाजीचे वकीलपत्र घेण्यास भाऊसाहेबांना भाग पाडतो. कोर्टात गुणाजीला तीन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा होते. लीलास जयवंतबरोबर पाठविण्यास पिसाळ फौजदार तयार नसतात. त्यांना हे लग्न मान्य नसते, खानदानाचा प्रश्न असतो. पिसाळ वकिलांच्या मध्यस्तीने तो प्रश्न सुटतो. लीला चव्हाणांच्या घरी नांदायला जाते, असे हे सात महिन्याच्या काळातील अद्‌भूत घटना प्रसंगातून घडवले रंजक कथानक आहे. डिसेंबर १९४२ ते जून १९४३ या सात महिन्यातील घटना-प्रसंग व्यक्तिचित्रणातून लेखकाने समाज वास्तवाचे दर्शन घडविले आहे. अर्थात फडके तंत्राच्या प्रभावामुळे हे जीवनदर्शन विश्वसनीय वाटत नाही.

कादंबरीतील व्यक्तिरेखाटन स्वाभाविक आणि जिवंत आहे. कुशाबा, गुणाजी, जयवंत, पारु ही चव्हाणांच्या घरातील माणसं किंवा दरेवाडीचे बाळाजीपाटील, मुसळगावाचे आवळोजी पाटील, पिसाळ बंधू, लीला, काळू, राणू, तान्ही, शिरपती, माणकू जागल्या यांच्या चित्रणातून सामाजिकता स्पष्ट होते. या व्यक्ती तत्कालीन समाजपरिस्थतीत खेडू माणसांचे प्रतिनिधी वाटतात, वास्तव वाटतात, डॉ. आनंद यादवानी घेतलेल्या मुलाखतीत एका प्रश्नाला उत्तर देताना ग. ल. ठोकळ म्हणतात,

''गुणाचा वडील कुशाबा हा नेहमी कोणत्याही खेड्यात भेटणारा माणूस आहे. खेड्यात वारकरी असलेली, अशी सरळ स्वभावाची माणसं अनेक दिसतात. आवळोजी पाटील सारखा आवळू असलेला माणूस, मी प्रत्यक्षात पाहिला होता. पण कादंबरीतील त्यांच्या ह्या घटना संपूर्ण काल्पनिक आहेत. त्या त्या माणसाच्या जीवनातील नाहीत. खेडेगावात आवळोजी सारखं असं एखादं 'बोलकं वर्तमानपत्र' आपणांस नेहमी भेटतं, पारु ही तरुण मराठमोळ्या स्वभावाची स्त्री आहे. तीपण कुठंही भेटू शकेल. पारुच्या विरोधात म्हणून मी 'लीला' ही स्त्री उभी केली आहे. 'पिसाळ बंधू'मधील फौजदार हा त्या काळच्या फौजदाराचा एक टाईप आहे. तो त्या काळात कुठंही भेटू शकला असता. सारांश काय तर ही जी पात्रं मी निर्माण केली आहेत, ती खेड्यातील 'टाईप' आहेत असं तुमच्या लक्षात येईल. म्हणून तुम्हालना ती जिवंत वाटतात.''१९. सर्व व्यक्तिरेखा पूर्णपणे काल्पनिक नाहीत तर त्यांना वास्तवाचा आधार आहे. त्या विशिष्ट प्रदेशाचे, जातीचे संस्कार सर्वांवर झालेले दिसतात.

'कुशाबा चव्हाणाला ओळखणारे त्यांना 'ऊसाची गंडेरी' म्हणतात, यावरुन त्यांचा प्रेमळपणा, प्रामाणिकपणा दिसतो, ते वारकरी आहेत. कष्टाळू नम्र, सोशिक आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षा, पीकपाण्यावर प्रेम, विठ्ठलाची भक्ती, मायाळू, कणखर आणि सोशिक वृत्ती इ. गुण कुशाबांच्या ठायी आहेत. दैववादी वृत्तीचा मानी स्वभावाचा शेतकरी म्हणजे कुशाबा.

'गुणाजी' हा कुशाबाचा थोरला मुलगा. शाळा सोडून शेतीत रमलेला. ग्रामीण कृषिजीवनातला आडदांडपणा, रगेलपणा त्याच्या व्यक्तिमत्वात दिसतो. अंगपिंडाने दांडगा असलेला गुणाजी स्वातंत्र्याच्या चळवळीकडे ओढला जातो. त्यातून त्याच्या देशभक्तीचे दर्शन घडते. तो करारी आहे, म्हणूनच बापाच्या खुनाचा बदला म्हणून त्याची माणुसकी, संवेदनशील वृत्ती जयवंतला छातीशी कवटाळण्यातून, पारुच्या मांडीवर डोकं ठेवून झोपी जाण्यातून किंवा माणूसकीचे जग असेल तिकडे बाळाला घेऊन जाण्याच्या विचारातून दिसते. जयवंत हा कुशाबाचा धाकटा मुलगा. लीला थंडीने कुडकुडत असताना तिला मदत करणारा, अंगापिंडाने मजबूत, धूर्त, हुशार, व्यवहाराचे ज्ञान असलेला, स्वाभिमानी तरुण आहे. भावावरील प्रेमामुळे शेत विकून भाऊसाहेब वकिलांना पैसे देऊन गुणाजीला सोडविण्यासाठी प्रयत्न करणारा धडपड्या-प्रयत्नवादी, जिद्दी असा रेखाटला आहे. 'पारु' गुणाजीची बायको-ग्रामीण मराठी स्त्रिचा अस्सल नमुना आहे. ग्रामीण संस्कृती-परंपरा यांचे मिश्रण तिच्या व्यक्तिमत्वात आढळते. माहेर सासरबद्दल अभिमान बाळगणारी ती खानदानी स्त्री आहे. तिचे वडील बाळाजी पाटील हे एका करारी, दृढनिश्चयी स्वाभिमानी तर आवळोजी पाटील हे साधेभोळे, भित्रे, अब्रूचे रक्षण करु पाहणारे रेखाटले आहेत.

पिसाळ फौजदार अंधराशी स्पर्धा करणाऱ्या काळ्या रंगाचे, कठोर, तत्कालीन

जुलमी अधिकाऱ्याचे प्रतिनिधी आहेत. खानदानीबद्दल त्यांना विशेष अभिमान वाटतो. 'लीला' ही त्यांची लाडकी मुलगी, तिच्या रक्तातही खानदानी ताठा बापाइतकाच आहे. भाऊसाहेब पिसाळ वकील हे पुरोगामी विचाराचे, व्यवहारी रेखाटले. तर काळू हा रामोशी जातीचा बेडर पोलीस, तान्हीवर प्रेम करणारा, व्यसनी आहे, तर काळूच्या मृत्यूनंतर 'राणू'चा हात धरुन जाणारी 'तान्ही' मांगीण ही एक इंग्रज शिपायापासून तिच्या आईला झालेली मुलगी आहे.

मुसळगाव-दरेवाडी या तासगाव-विटा-खानापूर परिसरातील गावांची पार्श्वभूमी कथानकास लाभली आहे. 'गावगुंड'चे कथानक केवळ सातारा जिल्ह्यातच घडू शकते. कारण पश्चिमेस सह्याद्री पर्वताच्या डोंगर रांगा, दऱ्या, घनदाट जंगल, दरोडेखोरांना दडून बसण्यायोग्य गुहा आहेत. सातारा जिल्ह्यात नाना पाटलांनी प्रतिसरकार निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्या वास्तवाचा आधारही या कादंबरीच्या कथानकाला लाभला आहे. चढउताराचे रस्ते, काळीभोर माती, डोंगराचा एक काळा कभिन्न सुळका, डोंगराळ प्रदेशातील गुहा, करवंदीच्या जाळ्या, कांडीसाबर, जांभळ, शेरताटी, तरवड, डोंगरवाट इ. च्या वर्णनाबरोबर ऊन, धुरळा, गाडीवाट, पांदी, ज्वारी हरभरा, गहू, भुईमुग, निमोणीचा मळा इ. पिकांचे प्रदेशविशिष्ट वर्णन लेखकाने केले आहे. वाघ-रानडुकरांचा उपद्रव असलेला हा डोंगराळ प्रदेश आहे.

निसर्गवर्णन कथानुभवाशी एकरुप झालेले आहे, व्यक्तीच्या मानसिकतेनुरुप केले आहे. लीलाच्या शब्दाखातर फौजदारासाठी औषध-वाघाची चरबी आणायला निघालेल्या जयवंतला उन्हाचा चटका जाणवत नाही. त्यानिमित्ताने उन्हाळ्याचे केलेले वर्णन पहा.

"सूर्याचा गोळा आकाशाची निसरडी चढण मोठ्या कष्टाने चढून तोंडातून वाफोरे सोडू लागला. रस्ता निर्जन ओसाडीचा होता. आजूबाजूला पसरलेली काळी करडी जमीन भाजून करपून जात होती. अगोदरच दमलेली माणिक व मोती उन्हाच्या तलखीने घामेजून फुसफुस करीत धावत होते. त्यांच्या गळ्यातल्या घुंगरमाळांचा कर्णमधुर आवाज उन्हाच्या झळयामधून ओघळत भोवतालच्या ओसाडीवर पसरत होता. जयवंत घामाघूम झाला होता. पण त्याला कसलीच दखल नव्हती. माथ्यावर चढणारा सूर्य त्याच्या हिशोबी सुखकर थंडावा देणारा पुनवेचा चांदोबा होता." (पृ.१५५) अशा प्रकारे भावानुकूल निसर्गवर्णन लेखकाने केले आहे. उन्हाळ्याप्रमाणे पावसाळ्याचे वर्णन प्रदेश विशिष्ट असेच केले आहे.

"मोटार कऱ्हाडला पोचण्याच्या सुमारास सोसाट्याचा वारा धुळीचे लोट घेऊन उठला. काळेकबरे ढग कोपऱ्याकोपऱ्यातून पुढे सरकत आकाशात गोळा होऊ लागले. धुळीने दाही दिशा धुंद झाल्या. डोळ्यात माती शिरु नये म्हणून मोटारीतल्या उतारुंनी पापण्यांची झाकणे गच्च मिटून घेतली. थोड्याच वेळात काळ्या कुळकुळीत ढगांच्या

पाठीवर विजेने आपला चमकदार चाबूक ओढला. आभाळाच्या वाटोळ्या अंगणात ते ढग गडबडा लोळण घेऊन जीवन खाऊन ओरडू लागले. शेतकऱ्यांचे मायपोट असे मृग नक्षत्र नुकतेच आले होते.' (पृ. १६५) विजांचा कडकडाट, काळे ढग, सोसाट्याचा वारा यातून 'प्रदेश' जिवंत होतो. ऋतुचक्रांप्रमाणे रंग बदलणाऱ्या निसर्गाचे हे वर्णन आशयानुरुपच आले आहे. चव्हाण-पिसाळ कुटुंबातील संघर्ष संपला, अंतर कमी झाले, लीला चव्हाणाच्या घरी नांदायला निघाली. या प्रसंगास अनुरुप असेलच वरील पावसाळ्याचे वर्णन आहे. कादंबरीच्या प्रारंभीचे हिवाळ्याचे वर्णन, त्यानंतर उन्हाळा आणि शेवटी पावसाळ्याचे वर्णन प्रदेशविशिष्ट आणि कथानकास गती देणारे असेच आहे.

सरकारी अधिकाऱ्यांच्या समाजावरील अन्यायाचे, जुलूम जबरदस्तीचे चित्र लेखकाने रेखाटले आहे. उदा. मुसळगावात मानाने जगणाऱ्या अब्रूचे रक्षण करणाऱ्या आवळोजी पाटलांना पिसाळ फौजदार इरसाल शिव्या देतो किंवा माणकू जागल्याला दरेवाडीला पाठवून गरोदर पारुला चावडीवर आणून बंदीवान केले जाते. जयवंतला सोडविण्यासाठी आलेल्या कुशाबा चव्हाणला बेदम मार दिल्याने त्याचा मृत्यू होतो. गुन्ह्याचा किंवा गुन्हेगाराचा तपास करण्यासाठी आलेल्या अम्मलदाराची जेवण आणि निवास व्यवस्था गावकामगार पाटलांना बघावी लागते. गुणाजीला पकडण्यासाठी निघालेल्या फौजदाराला बोलवून साक्षीपुराव्याने पंचनामा करण्याची जबाबदारी पाटलावर होती. म्हणूनच काळूच्या खुनानंतर माणकू जागल्याला आवळोजी पाटील पिसाळ फौजदाराकडे तासगावला वर्दी देण्यासाठी पाठवितात. फौजदार आल्यानंतर पंचनामा केला जातो, काळूला अग्नी देतात.

पैशापेक्षा इमान महत्त्वाचे मानणारे लोक येथे अवतरतात. मुसळगावच्या बाजारात 'माणकू' जागल्या दवंडी देतो. गुणाजीला पकडून देणाऱ्याला पाचशे रुपयांचा इनाम जाहीर केला जातो. पण पैशासाठी गुणाजीला लोक पकडून देत नाहीत, उलट त्याला मदत करतात. जेवायला घालतात. तान्हीच्या आईने तिच्या तरुणपणात इंग्रज सोजीराशी अनैतिक संबंध ठेवल्याने, त्या सोजीराचे रुप घेऊन मांगवाड्यात गोरीपान तान्ही जन्माला आली. तान्हीचे काळू रामोशाबरोबर प्रेमसंबंध असल्याचे वर्णन केले आहे. पण त्याच्या खुनानंतर लवकरच ती 'राणू'बरोबर नवा संसार थाटते. दरोड्यातील चोरीचा लुटीचा किंवा हरामाचा पैसा नको, कष्टाला बरकत असावी असे समाज मानत होता, म्हणूनच गुणाजीकडील लुटीचा पैसा घेण्याचे जयवंत नाकारतो. तो पैसा गावाच्या विकासासाठी वापरु असे तो भावाला संगतो. टोळीतील साथीदारांवर टोळीप्रमुखावर साथीदारांचे खरेखुरे प्रेम असे. एकमेकांबद्दल अपार आदराची भावना असे. तासगावच्या तुरुंगात असलेल्या गुणाजीला बघण्यासाठी राणू जीव धोक्यात घालून जातो. गुणाजी देखील राणूच्या नव्यासंसाराची विचारपूस करतो.

पूर्वी मराठा खानदानी घराण्यामध्ये पदर जुळल्याशिवाय लग्न होत नसे. मुलामुलींच्या लग्नप्रसंगी खानदान किंवा घराणे पाहण्याची पद्धत असे. बरोबरीच्या घराण्यातील मुला-मुलीचे लग्न होत असे. जातकुळी पाहिली जात असे. जयंवत लीलाच्या लग्नाला पिसाळ फौजदार मान्यता देत नाहीत. स्वत:ला ते खानदानी मराठी समजतात. स्वत:च्या घराण्याबद्दल त्यांना अभिमान वाटतो. लीला देखील पारुला कुणबट म्हणते, आमचे रक्त निळे आहे असेही म्हणते. मुलींचे दुसरे लग्न लावणे किंवा म्होतूर लावणे म्हणजे कुळाला बट्टा लावणे. लीलाचे विधिपूर्वक झालेले लग्न अमान्य करुन दुसरे स्थळ पाहणे पिसाळ वकिलांना कुळाला बट्टा लावण्यासारखे वाटते, म्हणून विसाव्या शतकात जातपात मानू नये. जुने विचार टाकले पाहिजे असे भावाला ते सुनावतात. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठा घराण्यामध्येही श्रेष्ठ कनिष्ठपणाची कल्पना रुढ होती. पदर जुळल्याशिवाय लग्न जमत नव्हते. द्वितीय विहास परवानगी नव्हती.

पारंपरिक जीवन जगणारे लोक आणि नव पदवीधर साक्षरांमध्ये विसंवाद तत्कालीन समाज परिस्थितीत निर्माण झाला. गुणाजी आणि बाळाजी पाटील यांच्या भावविश्वाशी जयवंत समरस होऊ शकत नाही. गुणाजीने चळवळीचा नाद सोडावा, घरसंसार बघावा असे शिकलेल्या जयवंतला वाटते, तसेच गुणाजीने पिसाळ, फौजदाराला खांबाला बांधले, त्यांना शिक्षा देण्याचा विचार करु लागले, तेव्हा पिसाळांना सोडून देण्याची विनंती जयवंत भावाला करतो. यावेळी बाळाजी पाटील म्हणतात, "गुणा हा तुझा भाऊ लई शिळपट निघाला बघ." शिक्षणाने कोमलवृत्ती धारण केलेले तरुण आणि निरक्षर-रगेल खेडूत यांच्यात विसंवाद निर्माण झाला.

१९४२ मध्ये म. गांधींनी 'चले जाव' चळवळ सुरु केली. त्याचबरोबर खेड्याकडे चला, ग्रामोद्धार, खेडी देशाचा आत्मा, खेड्यांचा विकास झाला पाहिजे याची जाणीव खेड्यापाड्यातून झाली. जनजागृती बरोबर ग्रामीण भागात 'गावगुंड' उभे राहिले. सरकारी अमलदारांची अरेरावी, धाक दडपशाहीचा कारभार कसा सुरु केला होता याचे दर्शन पिसाळ फौजदाराच्या वर्तनातून होते. आवळोजी पाटलाला होणारी दमबाजी, डॉ. कणसे यांना तीन दिवस कुशाबासाठी औषधपाणी करण्याचा हुकूम करणे. ग्रामीण भागात ब्रिटीश सत्तेने कोणती दडपशाही सुरु केली होती याचे दर्शन घडते. १९४२ साली सातारा जिल्हा राजकीय धामधुमीने व्यापला गेला. प्रतिसरकार निर्माण करण्याच्या पद्धतशीर प्रयत्नापूर्वी काही रगेल तरुण स्वतंत्रपणे सरकारविरोधी चळवळ करीत होते. या चळवळीत दहशतवाद असला तरी चळवळीत भाग घेणाऱ्या लोकांच्या राजकीय ध्येयाच्या कल्पना स्पष्ट नव्हत्या. अशाच एका दहशतवादी गटाचा नायक गुणाजी व त्याचा भाऊ जयवत यांच्या आयुष्याभोवती लेखकाने कथाभाग गुंफलेला आहे. तत्कालीन ग्रामीण जीवनाच्या धुमसणाऱ्या अंतरंगांची त्यातून ओळख पटते.

'जयवंत शेतकी कॉलेजात शेवटच्या वर्षाला असताना ऑगस्ट महिन्याच्या नऊ तारखेला झालेल्या काँग्रेसच्या घोषणेने पुण्यातील तरुणांच्या विचारसरणीत व आयुष्यक्रमात कमालीची खळबळ उडाली होती. ठिकठिकाणी होणाऱ्या सभा, त्या उधळून लावण्याचे पोलिसांचे प्रयत्न, मुलालेकरांवर व बायाबापड्यांवर होणारा लाठीमार, होणारी निरोधने, वर्तमानपत्रातून येणाऱ्या ठिकठिकाणच्या दडपशाहीच्या बातम्या काय काय म्हणून सांगावे...'' (पृ.११) तरुणामध्ये सरकारविरोधी आवाज उठविण्याचे सामर्थ्य निर्माण झाले. सरकारविरोधी आवाज उठविण्यासाठी सभा घेतल्या जाऊ लागल्याआणि त्या सभांना सरकारने विरोध केला. सर्वस्वाचा त्याग करण्याची मानसिक तयारी झाली. हे जसे शहरात घडले, त्याचप्रमाणे खेड्यातील तरुणही जागृत झाले. घरदाराचा त्याग करुन ते चळवळीत उतरले.

''सरत्या पाणकळ्यानं काँग्रसने 'चले जाव' हा मंत्र उच्चारला. सरकारने छोट्यामोठ्या पुढाऱ्यांना सरसकट तुरुंगाच्या कोठड्यातून कोंबले, जनतेत तीव्र असंतोष, निर्माण झाला. जादूची कांडी पेटवल्याप्रमाणे गावागावातून आगीचे लोळ उठले. या आगीत चावड्यांची पाखे, सावकाराचे कर्जरोखे, तलाठ्यांची दप्तरे आणि टपालाच्या पेट्या जळून खाक होऊ लागल्या. सदर्न मराठा रेल्वेचे डबे चाकाखाली रुळ न गवसल्यामुळे धडाधड कोसळू लागले. छोट्यामोठ्या स्टेशनांना दिवसाढवळ्या आगी लागू लागल्या. मोटारी अडवून गुंडांनी वाटमारी करायला सुरुवात केली. चळवळीच्या नावाखाली गुंडांच्या पुंडाईत ऊत आला.'' (पृ. ३०)

ग्राम आणि शहरी भागात जाणीव जागृती झाली. सरकारविरोधी आवाज उठविला. गेला. गुंडांची पुंडाई मोडून काढण्यासाठी अम्मलदार कामाला लागले. अशाच प्रकारचा गुणाजी व पिसाळ फौजदार यांच्यातील संघर्ष रेखाटला आहे. जंगलात राहून वाटमारी करणाऱ्या गुणाजीपुढेही निश्चित ध्येय नव्हते. पण शेवटी 'लोकराज्य' यावे म्हणून प्रयत्न केल्याबद्दल त्याला तीन वर्षांची सक्तमजुरी झाली. बाळाजी पाटलासारख्या करारी माणसांची भीती सरकारी अंमलदारांनाही वाटत होती. हिंदूस्थानातील अनेक लोक सरकारच्या नोकरीमुळे लाचार झाले होते. उदा. काळू रामोशी, पिसाळ फौजदार हे देशाविरोधी वर्तन करीत होते, तर राणू गुणाजी सारखे असंख्य तरुण त्यांना विरोध करुन 'लोकराज्य' स्थापन करण्याच्या उद्देशाने लढत होते. क्रांतिवीर नाना पाटलांच्या राजकीय विचाराचा प्रभाव या तरुणांवर होता.

शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सामान्यच होती. मजुरांना रोजगार मिळत नव्हता. सरकारी नोकरी करणाऱ्यांना पगार मिळत होता, म्हणूनच त्यांची आर्थिक परिस्थिती उत्तम होती. त्यांच्या मुलीजवळ भरपूर दागिने होते. परंतु साताऱ्याच्या बस थांब्यावरील हमाल आणि भिकारी यांची आर्थिक परिस्थिती वाईट होती. म्हणूनच बस थांबताच आपल्या धंद्याचे परवल ते घसा खरवडून उच्चारीत होते. कुशाबा चव्हाणाची चाळीसएकर

जमीन, लेंडीचे शेत, ज्वारी, गहू, हरभरा, भुईमुगाचे पीक व निमोणीचा मळा असूनदेखील आर्थिक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. जयवंतला महिन्याच्या महिन्याला पैसा पाठविणे जड जात होते. "कुशाबाने वेळप्रसंगी पोट मारुन दिवस काढले, पण सावकाराचा उंबरा कधी ओलांडला नाही. सावकाराचे दार आणि कोर्टाची पायरी या चिजा त्याच्या हिशोबी पाय न टेकवण्यासारख्या" (पृ. ३०) या वर्णनावरुन जुन्यापिढीचे स्वावलंबी विचार, सावकार आणि कोर्टकचेऱ्यांच्या भानगडीत न पडण्याची वृत्ती दिसते. उलट नवी पिढी जमिनीची विक्री करुन कोर्टकचेरीच्या भानगडी वाढवीत होते. गुणाजीला सोडविण्यासाठी लेंडीजच्या शेताची विक्री करुन जयवंत वकिलाला पाच हजार रुपये फी देतो. गुणाजीच्या लुटीचे पैसे खर्च करण्यास नकार देतो. घासातला घास दुसऱ्याला देण्याची गरिबांची परंपरा खेडूतामध्ये होती, तर धनिकांच्या घरात ही परंपरा नव्हती. कुशाबाच्या पडाळीवर सर्वांचा पाहुणचार होतो. उलट भाऊसाहेब पिसाळ वकिलांच्याकडे जयवंतला पिण्यासाठी पाणी मागावे लागते. शेतकऱ्याचे मनाचे मोठेपण तर धनिकांचे कोतेपण, पैशाचे प्रेम यातून स्पष्ट होते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात शिक्षणाचे महत्त्व खेड्यापाड्यात फारसे समजले नव्हते, धनिक शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेऊ लागली होती. जयवंत पुण्याच्या शेतकी कॉलेजात शिक्षण घेतो. शिक्षणामुळे तो सुसंस्कृत होतो. लीला मॅट्रिक पास झाल्याचा उल्लेख येतो. यावरुन धनिकांच्या मुली फॅशन म्हणून शिक्षण घेऊ लागल्या होत्या. कर्मवीर भाऊराव पाटलांनी याच काळात 'रयत शिक्षण संस्थेची' स्थापना केली. जयवंत साताऱ्याच्या बोर्डींगमध्ये शिकत होता. त्यामुळे कर्मवीराबद्दल त्याच्या मनात मनस्वी आदर होता, "जिवापाड कष्ट करुन सातारा जिल्ह्यातल्या काना-कोपऱ्यातून शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या आणि सर्व जातीच्या विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेचे द्वार मुक्त ठेवणाऱ्या स्वार्थत्यागी व तपस्वी भाऊ पाटलांविषयी जयवंतच्या मनात मनस्वी आदर होता. त्यांच्या या संस्थेबद्दल जयवंतला जिव्हाळ्याची आपुलकी वाटत होती. संस्थेच्या शिक्षकांशी, व्यवस्थापकांशी व नव्याजुन्या विद्यार्थ्यांशी त्याचा चांगलाच घरोबा होता." (पृ. १२९) कर्मवीरांनी रयतेच्या मुलांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली, त्यांच्या कार्यामुळे शिक्षणप्रसार सुरु झाला.

दैववादी वृत्तीचे असे लोकजीवन येथे लेखकाने उभे केले आहे. कुशाबा विठ्ठलभक्त-दैववादी रेखाटला आहे. यातून देशावरील माणसांची विठ्ठलभक्ती दिसते. त्यांनी टाळमृदंगांच्या साथीने गुरुवारी केलेल्या भजनाचा उल्लेख येतो. तुकारामावर त्यांची श्रद्धा-निष्ठा असलेली दिसते. पायाळू माणसाने पाय लावला की कळ/चमक थांबते किंवा कंबरदुखीवरील रामबाण उपाय म्हणजे वाघाची चरणी होय असा लोकसमज असलेला दिसतो. बेशुद्ध झालेल्या माणसाला शुद्धीवर आणण्यासाठी कांदा हुंगवण्यासाठी

देणे दातखिळ बसली असता उलथण्याने ती काढणे या गोष्टींवरही लोकांचा विश्वास दिसतो. लग्नविधी, सण, उत्सव यात्रा यांच्यातूनही 'प्रदेश' जिवंत होतो. मामाच्या मुलीशी विवाह करण्याची प्रथा असेलेली दिसते. दरेवाडीचे बाळाजी पाटील गुणाजीचे मामा, त्यांची मुलगी पारुचे गुणाजीशी लग्न होते. लग्नात गीतगाण्याच प्रथा असलेली दिसते. वऱ्हाड येणे, मांडव सजवणे, केळीचे खुंट आणि आंब्याच्या डहाळ्या बांधणे, पुरणपोळीच्या पंगती उठविणे, तासे वाजविणे, सनईचे सूर, वधूवरांना हळद लावणे, अक्षदा टाकणे, झालझेंडा, सप्तपदी इ. गोष्टीचे पारुच्या गीतातून सांस्कृतिक वेगळेपण दिसते. वैदिक पद्धतीने लग्न लावण्याची सांस्कृतिक परंपरा होती. मंगलाष्टक्के, लाजाहोम, सप्तपदी इत्यादींना विवाहपद्धतीत महत्त्व दिले जात होते. त्याचप्रमाणे नवविवाहित मुलीला अपत्य होईपर्यंत खानदानी घराण्यातील लोक मुलीच्या घरी जेवत नसत. लीला चव्हाणांच्या घरी नांदायला तयार होते. जयवंत पिसाळ फौजदाराला एक दिवस मुक्कामाचा आग्रह करतो, ते नकार देतात, त्यांच्या नकाराचा अर्थ पारुला समजतो, तो असा की मुलीला मुल झाल्याशिवाय मुलीकडे मुक्काम करायचा कसा? जेवण घ्यायचे कसे?

लग्न विधीप्रमाणे दसऱ्याला घट बसविणे, दिवाळीचा सण आनंदाने साजरा करणे, बैलगाडीने अरडगावला जत्रेला जाणे इ. वर्णनातून पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडते. अंत्यविधी समयी भजन म्हणणे, तिरडी बांधणे, सरण रचणे, माघारी आल्यानंतर स्नान करणे, अस्थिविसर्जन करणे, दशक्रिया इ. प्रथा आहेत, कुणाचे फुकट श्रम न घेण्याची परंपरा दिसते. उदा. डॉ. फणसे किंवा पिसाळ वकील यांची जयवंत फी देतो. त्याचप्रमाणे प्रेमाने तोंडावरुन हात फिरविणे, आशीर्वाद देणे, जेवलेल्या जागेवर शेणाने सारवणे यासारख्या संस्कृतिविशेषांचे दर्शन घडवून 'प्रदेश' जिवंत केला आहे.

'गावगुंड'चे निवेदन आणि संवाद प्रमाण भाषेत असले तरी आशय ग्रामीणच आहे. निसर्गवर्णनाच्या वेळी ठोकळांची भाषा अधिक प्रत्ययकारी होताना दिसते. काव्यात्मवृत्तीमुळे पारुच्या व्यक्तिमत्त्वाचा अपरिहार्य भाग म्हणून गीत येते. त्यांची भाषा सहज, सुंदर, रेखीव आहे. डॉ. आनंद यादव यांनी ठोकळांना 'ग्रामीण कथेचे फडके' असे महटले आहे. हे यथार्थ वाटते. कारण त्यांची भाषा नाट्यमय आहे. फडक्यांच्या रचनातंत्राचा प्रभाव त्यांचया 'गावगुंड' वरही पडला. मागासवर्गीय तान्ही, काळू, राणू यांचे संवाद ग्रामीण भागातील खालच्या वर्गाच्या बोलीतील आहेत. तसेच अनेक अर्थघन शब्द प्रदेशविशिष्टच आहेत. अधेली. मार्गेसर, इस्पेशल, पुसता, झाडला, फसले, नायठाव, बंडी, औक्ष, जल्माचं, न्हाई, ठाव, पोरगा, होऊंदे, पाचूंदाभर, पोरी, पोटुशी, बाईल, दादला, हरखून सातवड्यात, पघितला, कधीमंधी, केरसुणी, धाडळं, वक्ताला, ऊसाची गंडेरी, तोडा, परवड इ. शब्द प्रदेश विशिष्ट

बोलीतील आहेत, परंतु यातील बहुतेक शब्द अहमदनगर जिल्ह्यातील 'नगरी बोली'तील आहे. कथानकाची पार्श्वभूमी लेखकाने सातार परिसराची निवडली असली तरी बोलीतील शब्द त्या प्रदेशातील नसून लेखकावर संस्कार झालेल्या दुष्काळी नगर जिल्ह्यातील आहेत.

ग. रा. प्रधान, यांना 'गावगुंड' कादंबरी 'मराठी वाङ्मयात ही मोलाची भर आहे.'१९. असे वाटते. कारण ग्रामीण जीवनाच्या अंतरंगाची ओळख असल्यामुळे ठोकळांनी जितीजागती माणसे रेखाटली. करुण, वीर, अदभूत रसांचा परिपोषही केला. तर कुसुमावती देशपांडे यांना ''ठोकळांच्या शैलीमध्ये दृकप्रत्यय देण्याचे सामर्थ दिसते.२०. डॉ. चंद्रकांत बांदिवाडेकरांना ''ठोकळांच्या कादंबरीतील वास्तव रोमँटिक वृत्तींनीच निस्तेज झाल्यासारखे वाटते.२१. हे विधान यथार्थ वाटते. कारण १९४२ च्या पार्श्वभूमीवर 'गावगुंड' लक्षात न येता लीला-जयवंतचे प्रेमच अधिक लक्षात राहते हे मान्यच करावे लागते. या पार्श्वभूमीवर अविनाश सप्रे यांचा अभिप्रय अधिक बोलका वाटतो, ते लिहितात, ''...पेंडसेच्या अगोदर ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या 'गावगुंड'सारख्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या, लोकप्रियही झाल्या, पण त्यामध्ये ग्रामीण-प्रादेशिक जीवनातील अनुभव जिवंत करण्यापेक्षा तो अनुभव हेतुत: 'नाट्यमय' करण्याकडे कल होता आणि त्यासाठी जवळजवळ फडके तंत्राचा वापरही करण्याचात आला. २२. म्हणजेच 'गावगुंड'ची ग्रामीणता नाट्यमयतेच्या आहारी गेल्यामुळे शबलीत झाली. तरीही डॉ. भालचंद्र फडके यांचा अभिप्राय सर्वसामावेशक वाटतो, ''श्री. ग. ल. ठोकळ यांची 'गावगुंड' ही कादंबरी प्रसिद्ध झाली आणि या जातीच्या कादंबऱ्याची विविध रुपे अवतरु लागली. नागर वातावरणातील भकासपणापासून, कंटाळवाणेपणापासून वाचकांना सुटका झाल्याचे सुख देणारी दिघे, कवठेकर, ठोकळ यांची कादंबरी होती.'' २३. यावरुन मराठी कादंबरीला नवा आशय, नवी दिशा देण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य 'गावगुंड'ने केले आहे.

### ४) म. भा. भोसले

### *(५) ''उघड्या जगात'' (१९४७) ''सावकार आणि शेतकऱ्यातील सनातन संघर्षाचे चित्रण''*

श्री. म. भा. भोसले यांनी 'समरांगण' (१९४१), 'उघड्या जगात' (१९४७), 'एका आईची लेकरं' (१९५१), 'घसरगुंडी' (१९६३), 'कायापालट' (१९६६) या पाच ग्रामीण-प्रादेशिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांचा ग्रामीण जीवनाशी प्रत्यक्ष परिचय आहे. त्यांच्यासमोर प्रत्यक्ष ग्रामजीवनाचा आदर्श असतो. अत्यंत जिव्हाळ्याने व समरसतेने खेड्यापाड्यातील समाजवास्तवाचे जिवंत दर्शन त्यांनी घडविले आहे. परंतु फडके तंत्राच्या आहारी गेल्याने हे वास्तव शबलीत झाले आहे.

सावकार व शेतकरी यातील सनातन संघर्षाचे चित्रण करुन खेडेगावातील स्वातंत्र्यपूर्वकाळातील सावकारी पद्धतीच्या उग्र व भेसूर स्वरुपाची जळजळीत जाणीव करुन दिली आहे. स्वत: लेखकाने 'उघड्या जगात' ग्रामीण जीवनावरील स्वतंत्र कादंबरी' असे प्रथम पृष्ठावरच म्हटलजे आहे. ग्रामीण जीवनातील अनुभव त्यांनी या कादंबरीतून चित्रित केला आहे. 'शेतकऱ्यांचे अज्ञानाने आणि दारिद्र्याने भरलेले, सावकारीच्या चारकात पिळे जाणारे, श्रीमंतीपोटी, जन्माला येणाऱ्या उन्मत्तपणाच्या पायदळी तुडविले जाणारे जीवन भोसले यांनी जवळून पाहिले. 'समरांगण' आणि 'उघड्या जगात' या कादंबऱ्यांचे विषय याच अनुभवातून निर्माण झाले.''२४. अशा शब्दात भाऊसाहेब खांडेकरांनी फेब्रुवारी १९४९ च्या 'मनोहर' अंकात त्याचा गौरव केला, तो. प्रा. व. बा. बोध यांना सार्थ वाटतो.

कादंबरीचे कथानक दुपदरी आहे,'अमणापूर' गावातील काकासाहेब सावकार व त्याच्या शेतावर कष्ट करणारा जोती पवार आणि त्याचा मुलगा सखाराम यांचरूा आयुष्याभोवती कादंबरीचा एक पदर रुंजी घालतो, तर दुसरा पदर सखाराम आणि काकासाहेब सावकाराची मुलगी चंद्रा यांच्या प्रेमाने गुंफलेला आहे. सखारामवर चंद्राचे उत्कट प्रेम आहे. परंतु, अप्राप्य गोष्ट कधीच प्राप्त होतच नाही, म्हणून तिच्यापासून पवित्र मनाने तो दूर राहतो, तर ती आपले मुके प्रेम त्याला अर्पण करते. शेवटी त्याच्याबरोबर उघड्या जगात निघून जाते. उत्कट प्रितीची जशी ही कथा आहे, त्याचप्रमाणे जमिनदार/सावकार कुळांवर कसे अन्याय करतात, त्यांना संघटीत होऊ देत नाही. कष्टाविना धान्याची काठोरे भरतात, तर कूळ मात्र अन्नाला महाग होतात, तरी इमानीपणा सोडत नाहीत. कूळांची सोशिक वृत्ती आणि धनिकांची अरेरावी यांचे चित्र लेखकाने रेखाटले आहे.

अमणापूरचे काकासाहेब सावकार, त्यांच्या निष्ठावान कुळाच्या-जोती पवाराच्या मुलीवर म्हणजे 'हौशा'वर बलात्कार करतो. अब्रूच्या काळजीने तिची आईसारजा घडलेला प्रकार नवऱ्याला सांगत नाही. कॉलऱ्याच्या साथीत जोती आजारी पडतो, तेव्हा हौशाचे लग्न करण्याची आणि सखारामाला सांभाळण्याची जबाबदारी सावकारावर सोपवितो, सखारामाला 'धन्याची चाकरी हीच आपली भाकरी' हा कानमंत्र देऊन प्राण सोडतो. हौशाला दिवस गेल्याचे समजताच विधवा सारजा बेचैन होते. गावात गुप्त घटनेवर चर्चा होऊ लागते. तेव्हा हौशा सावकाराची भेट घेऊन लग्न लावण्यचा आग्रह करते, ते लग्नास नकार देऊन रखेली म्हणून ठेवण्यास तयार होतात. नकार मिळताच ती गाव सोडते. मुंबईला जाते. मुलीच्या वियोगाने दु:खाने आजारी पडलेल्या सारजाचा मृत्यू होतो. सखाराम एकटा राहतो. तो काकासाहेबांच्याकडे काम करु लागतो.

पंधरा वर्षे सावकाराची इमानेदइतबारे चाकरी करतो. काका आपले लग्न करुन

देईल अशी त्याला आशा असते. काका त्याचे लग्न करुन देत नाही, त्याचा तिरस्कारच करतो, तर सावकारकन्या चंद्रा आणि तिची आई सावित्रीबाई सखारामला घरातल्याप्रमाणे जीव लावतात. दूध,सांजा देतात. त्याला सर्पदंश होताच हळहळतात. सखाची देखील सावकारावर आंधळी भक्ती-विश्वास असतो. हळुहळू या विश्वासाला तडा जातो. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यास तो सिद्ध होतो. परंतु चंद्राला दिलेल्या वचनाखातर काका सावकाराचा खून करीत नाही. उघड्या जगात निघून जाणे पसंत करतो, चंद्राही त्याच्या मागे उघड्या जगात निधून जाते, असे या कादंबरीचे रंजक कथानक आहे.

द. सातारा जिल्ह्यातील अमणापूर खेड्याची पार्श्वभूमी कथानकास लाभली आहे. हरळी-कुंद्याप्रमाणे तण, हरभरा, शाळू, मका, कापूस इ. पिके, शेवटी पावट्याचे तसेच नदीकाठावरील कंजाळ, लिंबाच्या झाडाचाही उल्लेखातून 'प्रदेश' साकार होतो.

'सखाराम' हा या कादंबरीचा नायक आहे. 'धन्याची चाकरी हीच आपली भाकरी' मानणारा एकनिष्ठ शेतमजूर आहे. उदात्ततेच्या, पवित्रतेच्या आणि सात्त्विकतेच्या भावनांना थारा देऊन तो मनाचा कोंडमारा करतो. तो आशावादी आहे, म्हणूनच काका आपले लग्न करतील असे समजतो. मुळातला तो निष्पाप, निरागस, सोशीक असून चंद्रत्याचा स्वाभिमान जागा करते. तो अन्यायाविरुद्ध लढायला तयार होतो. तो व्यवहारी आहे. चंद्राशी आपला विवाह होऊ शकत नाही याची विषमसमाजरचनेमुळेच खात्री वाटते. धनिकांना विरोध करणे सामान्यांचे काम नाही हे ओळखून तो प्रतिकाराच्या फंदात न पडता उघड्या जगाची वाट धरतो. चंद्रा ही सावकाराची मुलगी लहरी, स्वतंत्र बाण्याची, हेकेखोर, अन्यायकर्त्याला शासन करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे मानणारी रेखाटली आहे. काकासाहेब सावकार हे स्वातंत्र्यपूर्व काळातील एक बडी आसामी आहे. कुळांवर अन्याय करणारे, त्यांचे शोषण करणारे उनमत्त, स्वार्थी, ढोंगी, मतलबी, भ्रष्टाचारी, निर्दय, क्रूर आणि दुष्ट प्रवृत्तीचे आहेत. ते विश्वासघातकी-कामांध असल्यामुळेच जोती पवाराच्या तरुण मुलीवर 'हौशा'वर बलात्कार करतात. सखाच्या मालकीची जमीन त्याला देत नाहीत. सावित्रीबाई ही सखारामवर पुत्रप्रेमाचा वर्षाव करणारी खानदान, सोशीक स्त्री आहे. जोती पवार, सारजा, हौसा, हिरा, बंडू, बाळूगडी, बापूराव, दत्तू न्हावी, शिवराम खोत, पिराखोत या गौण व्यक्तिरेखांच्या चित्रणामुळे कादंबरी अधिक वस्तुनिष्ठ झाली नाही.

निसर्गवर्णने पात्रांच्या मानसिकतेनुरुप रेखाटलेले दिसतात. सखारामवर उत्कट प्रेम करणाऱ्या चंद्राची निराशा पुढील वर्णनातून व्यक्त होते.

"मृगजळामागं धावणाऱ्या हरिणाला वाटेतल्या काट्याकुट्याची नी त्रासाची पर्वा वाटत नाही. ती पुढं धावतात आपणाला गोड पाणी प्यायला मिळणार या आशेनं,

पण ती त्याची आशा सफल होते का?" (पृ.६३) सावकाराच्या चंद्राचा स्पर्श झाल्यावर सखारामला सूर्यास्त वेगळा वाटतो. "सगळ्या आकाशभागाचा प्रवास करुन थकल्यामुळं सूर्यनारायण विसाव्यासाठी संध्या देवीच्या सोनेरी मंदिरात प्रवेश करण्याच्या बेतात होता. आपला परमेश्वर घरी येत आहे म्हणून संध्यादेवी अधिक आरक्त होऊन आनंदान गुलाल उधळू लागली होती. सृष्टिसतीनं मळीकाठच्या अनेक हिरव्यागार वनस्पतींचा मधुर सुवास मंदमंद वाऱ्याबरोबर सोडला होता, तो जणू त्या श्रानत झालेल्या सूर्याला आल्हाद देण्यासाठीच। पण तो त्याच्यापर्यंत पोचत होता की नाही हे एक तोच जाणे!" (पृ. १०९) सखारामच्या आनंदीवृत्तीनुरूपच लेखकाने हे निसर्गवर्णन केले आहे.

विवाहीत पुरुषाला समाजाच्या दडपणामुळे दुसरे लग्न करणे अशक्य असते. जननिंदेची भीती धनिकांनाही वाटते. काकासाहेब हौशावर बलात्कार करतो. तिच्याशी विवाह करण्यास नकार देताना म्हणतो, "लग्न? ते कसं शक्य आहे? एक लग्न झालेलं असताना मी दुसरं केलं तर लोक तोंडात शेण घालतील की माझ्या!" (पृ.४०) तिला रखेली म्हणून ठेवण्याचा विचार तो करतो. म्हणजेच तो जनरीत पाळतो. धनिकांनी परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवणे समाजमान्य होते.

अब्रूचे रक्षण करणारी माणसे जशी आहेत तसेच धनिक गरिबांवर अन्याय, अत्याचार करताना दिसतात. समाजाच्या भीतीने सामान्य माणूस 'झाकली मूठ सव्वा लाखाची' असेच वागताना दिसतो. सावकाराने मुलीवर बलात्कार केल्याचे नवऱ्याला सांगण्याचे सारजा टाळते. कारण नवरा सावकाराचा गळा दाबून खून करील, गावभर चर्चा होऊन बदनामी होईल असा ती विचार करते. तरुणीला विवाहापूर्वी दिवस जाणे म्हणजे कुळाला बट्टा लावणे गरोदर हौशाला जीव देण्यास किंवा तोंड काळे करण्यास तिची आई सांगते. खेड्यात घडलेली एखादी घटना गावभर चर्चिली जाते. बदनामी केली जाते. मदतीचा हात कोणीच पुढे करीत नाही, "...फकत क्षतं दिसली की ज्याला क्ष्रतं पडली त्याचा डोळा चुकवूनत्यात चोंच मारायची काकवृत्तीच सगळ्या माणसात भिनलेली असते!" (पृ. ३७) हौशावर झालेल्या बलात्कारासंबंधी, तिच्या गरोदरपणासंबंधी गावभर चर्चा होते, गावचे पोलीस पाटील सारजाच्या समाचाराला येतात. गावातील चर्चेविषयी बोलतात, भृणहत्त्या करणे कायद्याने गुन्हा ठरत होता. तसे केल्यास तुरुंगवास होऊ शकत होता. तसेच पतीत स्त्रियांना समाजाच्या कोल्हेकुईमुळे, जीव देण्याशिवाय तत्कालीन समाजपरिस्थितीत दुसरा पर्याय नव्हता.

माणसापेक्षा धनिकांना पैसा महत्त्वाचा वाटतो. सखारामला सर्पदंश झालेला असताना पाडव्याचा सण-स्वयंपाक करण्याचा आदेश सावित्रीबाईंना काकासाहेब देतात. चंद्रा काकांना विरोध करते, तेव्हा 'माणसाला चाटून पोट भरत नाही, पैशाने भरते' असे ते म्हणतात. पापाची आणि देवाची भीती गरिबाला वाटते. श्रीमंतांना नाही, तरीही

सत्याचा विजय होतो असे गरीब जनता मानताना दिसते. काका पाप-पुण्याचा विचार करीत नाही, तेव्हा सखाला हिरा म्हणते,

"कशाला करील? काय कमी आहे त्याला? अन्यायाचा व्याज बट्टा खाऊन अन् लोकांच्या जमिनी दाबून तो सावकार झाला आणि आता सावकारीच्या जोरावर आणखी अन्याय करु लागला, पण हे सगळं कधी तरी ओकावं लागेल त्याला!" (पृ.११५) सत्याचा विजय होतो, हेच सामाजिक सत्य यातून स्पष्ट होते.

गावातील धनिकांवरील राग व्यक्त करण्यासाठी, त्यांच्या कडब्यांच्या गंज्यांना आग लावली जाते. पिराखोताला काका सखारामकडून मार देतो. कर्जाच्या रक्कमेइतके व्याज भरुनही कर्ज फिटले नाही, उलट अपमान केला, मार दिला म्हणून पिराखोताने चिडून काकाच्या कडब्याच्या गंजीला आग लावली. गरीब कुळांच्या भावनेची कदर करण्याची धनिकांना गरज वाटत नसावी. आपल्या शेतावर राबणाऱ्या त्यागी जोती पवाराच्या आजाराची बातमी समजून काका समाचाराला येत नाही. जनरीत म्हणून उशिरा येऊन कोडगेपणाने वागतो. मजुरांना खराब धान्य घालतो. शब्दाला जागणारी गरीब माणसं तर शब्द मोडणारे धनदांडगे तत्कालीन समाजव्यवस्थेत होते, जसे चंद्राला दिलेल्या वचनामुळे सखाराम काका सावकाराचा खून करीत नाही. उलट 'वचन देता येत तसं मोडताही येतं!" (पृ. १५६) असे सावित्रीबाईला काका म्हणतात. जोती पवाराला वचन दिले असतानाही काका सखाराम जमीन देत नाही, त्याचे लग्न करीत नाही.

सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. हिराला बाजारबसवी ठरवून पंचायतीचा ठराव करुन नोकरीतून काढून टाकले जाते. पंचांना विरोध करणाऱ्याला वाळीत टाकले जात असावे, शिवराम खोत उघडपणे देवळात काकांच्या भ्रष्टाचाराविषयी बोलतो म्हणूनच त्याच्या वडिलांना धक्काबुक्की केली जाते. त्याच्या सर्वस्वाची होळी करण्याचा निर्णय घेतला जातो. येथे स्त्री स्वतंत्र नाही. पुरुषप्रधान संसकृती तिची गळचेपी करते. तिचे समाजात नगण्य स्थान आहे. पूर्वी आप्तातील मुलगा पाहून मुलीचे लग्न लावून दिले जात होते. वडीलधाऱ्यांच्या आज्ञेनुसार लग्ने होत होती. आपले स्थान नगण्य आहे. आपण स्वतंत्र नाही याची जाणीव तरुणींना नव्हती. चंद्राच्या पसंतीचा विचार न करता तिचे बापूरावबरोबर लग्न ठरते, ती काकांना म्हणते, "...जगातल्या बापाप्रमाणं तिच्या गळ्यात दावं घाला अन् ते वाटेवरच्या भिकाऱ्याच्या हातात द्या. ती हूं की चू करणार नाही। ज्याच्या हातात दावं त्याच्यामागून डोळे झाकून चालणं हेच आता ती आपलं पवित्र कर्तव्य मानील। काका, आता तरी तुमच्या मनासारखं वागण्याचं समाधान मला मिळेल का?" (पृ. १७७) याप्रमाणे श्रीमंताच्या घरातील स्त्रियांही हुकमाच्या गुलाम असलेल्या होत्या. जे सांगितले आणि जसे सांगितले तसेच त्यांना वागावे लागत होते. तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करीत होत्या. म्हणूनच उघड्या

जगात निघालेली चंद्रा आईला म्हणते.

"सगळा जन्म तूं मुक्या जनावराप्रमाणं वागून या घरात काढलास, पण माला ते शक्य नाही!" (पृ. १९७) धनिकांच्या घरातील स्त्री स्वतंत्र नव्हती. पतीच्या कामांधतेकडे, अनैतिक संबंधाकडे त्या डोळेझाक करीत होत्या. धनिकांना सुखी करणारी त्यागी गरीब जनता विरुद्ध गरिबाच्या जीवनात विष कालवणारे धनिक दुसऱ्या बाजूला असे समाजाचे चित्र लेखकाने जोती पवार आणि काका सावकाराच्या वर्तनाद्वारे रेखाटले आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील राजकीय जीवनाचे चित्रण केल्याने कादंबरी अधिक वस्तुनिष्ठ झाली आहे. येथे गावकारभार पंचमंडळी बघत होती. आपल्या मर्जीप्रमाणे ठराव घेतले जात होते. सामान्य माणाच्या भावनेची कदर केली जात नव्हती. हिरासारख्या विधवेला बाजारबसवी ठरविले जाते. दुर्वर्तनी असल्याचा ठराव करुन बोर्डाकडे पाठविला जातो आणि काकासारख्या वजनदार माणसावर विश्वास ठेवून तिला तडकाफडकी शाळेच्या नोकरीतून कमी केल्याचा हुकूम होतो. सत्तेच्या जोरावर प्रशासन व्यवस्थेला आपल्या म्हणण्याप्रमाणे वागण्यास भाग पाडण्याचे सामर्थ्य धनिकांमध्ये होते. "रक्तात भिनलेलं विष्णू जसं सगळ्या शरीरात पसरत तसंच आहे या धनीपणाच्या उन्मादाच। तो वंशपरापंरा चालायचाच! तो चालायला नको असेल तर जगातला धनीपणा मालकीहक्क अजिबात नाहीसा व्हायला पाहिजे! पण तो कसा नाहीसा होणार? जे मालक आहेत ते आपला मालकी हक्क सोडायला कधीही तयार होणार नाहीत आणि जे मालक आहेत, चाकर आहेत ते इतके पिळले जातात, की तो नाहीसां करण्याची ताकदच त्यांच्यात उरत नाही." (पृ. १४७)

स्वातंत्र्यपूर्व काळातील पं. नेहरुंच्या लोकप्रियतेचे वर्णन लेखकाने केले आहे. जनता पं. नेहरुंवर प्रेमाचा वर्षाव करीत होती, त्यांच्या दर्शनासाठी लोक तासनतास ताटकळत थांबत होते. जत्रेपेक्षा अधिक जनसमुदाय त्यांच्या सभेसाठी उन्हाची तमा न बाळगता जमत होता. दर्शनासाठी जमणारे लोक, प्रत्यक्ष त्यांच्या कार्यात फार कमी सहभागी होत होते. पं. नेहरुंचे (पृ. १५१) भाषण म्हणजेच तत्कालीन समाजवास्तव आणि राजकीय परिस्थितीवरील भाष्यच आहे. धनिक काम न करता बांडगुळाप्रमाणे सुखाने जगत होते. बेकारी, दारिद्र्य वाढत होते. शेतकरी व मजूर यांनी संघटित होऊन ही परिस्थिती नष्ट केली पाहिजे तरच भारत स्वतंत्र होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. लेखकाने पं. नेहरुंच्या भाषणाद्वारे तत्कालीन राजकीय जीवनाचे यथार्थ दर्शन घडविले.

बेकारी, दारिद्र्य त्याचप्रमाणे श्रीमंताचे बांडगुळाप्रमाणे जगणे आणि शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांचे कष्ट यावरही लेखकाने प्रकाश टाकला आहे. कष्ट न करणाऱ्या काकांची माडी आहे. आर्थिक सुबत्ता आहे. स्वतःची आणि दुसऱ्याची

लुबाडलेली शेती आहे. शेतावर मजूर राबतात. घरात सखा आणि बाळू काम करतात. धान्याच्या पोत्यांची थप्पी घरात लागलेली असताना मजूरांना कणगीत साठवलेले खराब धान्य ते देतात. काका धनिकांचे तर जोती पवार हा मजुरांचा प्रतिनिधी आहे. जोतीला स्वत:चे गहाण पडलेले शेत सोडविता येत नाही. चारशे रुपये कर्ज त्याला फेडता येत नाही. मुलीचे लग्न आर्थिक विवंचनेमुळे करणे अशक्य होते. हुंड्याची प्रथा होती. तो हुंडा देऊ शकत नाही, म्हणून नाठाळ लोकांकडून हुंडा घेऊन मुलीचे लग्न करुन देण्याचा विचार तो करतो, तेव्हा सारजाला म्हणतो, ‘‘खरचं घेऊ या हौशाचं चारशे रुपये, मजी करज तरी फिटल, आनी चार एकर जमीन तरी मोकळी हुईल!’’ (पृ.१७) शेतकऱ्याला पोटाचा प्रश्न सोडविणे अवघड होते. मुलीच्या लग्नात हुंडा देणेही अशक्य झाल्याने नाठाळाला मुलगी देऊन हुंडा घेण्याची आणि सावकाराकडून जमीन मोकळी करण्याचा विचार शेतकरी करीत असावेत. मुलांच्या शिक्षणासाठी - कपड्यांसाठी ते खर्च करु शकत नाही असे सारजा-सखारामच्या संवादाधारे (पृ.३४) स्पष्ट होते.

काकासारख्याची रक्कम शेतकरी-कुळ देत नाहीत. मात्र देवावरील श्रद्धेमुळे लोक वर्गणी देतात. सावकार पैशाबद्दल तगादा लावतो, म्हणून लोकांना तो राक्षस वाटतो. कुळांची परिस्थिती नसताना सावकार तगादा लावून पैसे वसूल करीत होते, दामदुप्पट पैसे वसूल करीत होते असेच चित्रण लेखकाने केले आहे. मारुतीचे पैसे ताबडतोब जमा होतात. गरीब कुळ देवाचे पैसे देतात, पण धनिक देवाच्या वर्गणीचा भ्रष्टाचार करतात. तसा त्यांच्यावर आरोप केला जातो. जनता देवाच्या पैशाचा जमा खर्च विचारीत नाही, त्यामुळे पंचधनिकांचे फावते, यावरुन जनतेची देवावरील श्रद्धा आणि धनदांडग्यांच्या अफरातफरीचे, सावकारीचे स्वरुप स्पष्ट होते.

सावकार मजुरांना फुकटात राबवत. गरीब पोटार्थी जनता भाकरीसाठी ढोरमेहनत करीत असले तरी, सावकाराविरुद्ध असंतोष निर्माण होऊ लागला. पिराखोत या गरीब कुळाने सावकाराची कर्जफेड केली असूनही सावकार मात्र बाकी असल्याचे सांगतो, त्याला धक्के देऊन घराबाहेर घालवितो, तेव्हा पिरा म्हणतो, ‘‘मरणापुढं कसली लाज वाटणार?... पण म्या दोनशे रूपयंच काढलं हुतं येचं. आन येजासकट चारशे भरलं तरी अजून करज फिटत न्हाई. आन् की त्ये कागूदबी द्याला तयार न्हाईती, हे कसं दिसणार तुला?... सखाराम, तू आमचा हाईस, जोतीचा पोरगा हाईस, फुकट आन् मिळतय म्हणून जोती असा सावकाराला कधी भाळला नव्हता. तू बी भाळू नगस, कुराडीचा दांडा गोताला काळ हू नगस. आरं तुझी चार एकर जमीन त्यांनी दाबलिया, आन् तू गुरागत राबुयास म्हणून ते तुझी माया करत्याती!...’’ (पृ.६७) कुळांच्या अज्ञानाचा फायदा सावकार घेत होते.

भावनेपेक्षा पैसा श्रेष्ठ अशी सावकारांची वृत्ती दिसते. फायदा असेपर्यंत माणूस

आणि जनावराला जवळ ठेवायचे, त्यांना काम होत नाही असे दिसले की विकायचे किंवा वाऱ्यावर सोडून द्यायचे अशी धनिकांची मतलबी वृत्ती येथे चित्रित होते. भरडा, शेवरी, हुरड्याची कोवळी कणसं खाणाऱ्या पठाण नावाच्या बैलाला बाजारात नेऊन विकण्याचा निर्णय (पृ. ७०) काका घेतात, तेव्हा सखाराम विचार करु लागतो, 'असंच आपलं होणार काय?'' धनिकांची मुलगी आणि मजूर यांचा विवाह होण शक्यच नाही, त्यांच्या उत्कट प्रेमाला किंमत नाही. सखाराम-चंद्राला समजावतो. अप्राप्याचा हवास धरु नको. (पृ. १३८) यावरुन धनिक आणि गरीब अशी विषमतेची दरी निर्माण झाली होती.

शिक्षणाबद्दल उदासीनता असलेली दिसते. बापूरावाने पुण्यात जाऊन बी. ए. पर्यंतचे शिक्षण घेतले होते, परंतु इतरांची फक्त अक्षर ओळखीवरच भागते. धनिकांच्या मुली शिकत होत्या, जसे चंद्रा शिक्षण घेते, परंतु तिला इंग्रजी शिक्षणाची आवश्यकता वाटत नाही. तरीही शेतकऱ्यांना शिक्षणाचे महत्त्व समजले होते, हे जोती पवाराने शेवटी क्षणी "सखा शाळेत गेला का?" म्हणून विचारण्यातून स्पष्ट होते. पं. नेहरुंच्या भाषणातूनही देशाच्या मागासलेपणाचे, बेकारीचे कारण शिक्षणाचा अभाव हेच सांगितले आहे.

स्थानिक देवदेवतांवरील श्रद्धा-समजुती-परंपरा यातून 'प्रदेश'विशिष्ट लोकजीवन घडते. कादंबरीत असे वर्णन आल्याने कथानक अधिक वस्तुनिष्ठ झाले आहे. कॉलऱ्याची साथ येणे म्हणजे देवीचा कोप झाला अशी समजूत असल्याने, औषध खाण्यापेक्षा देवीवर श्रद्धा ठेवली जाते. देवी अंगात येते, तिला नैवेद्य देऊन, चरख शिंपडला जातो. (पृ. २४) त्यांची देवीवरील श्रद्धाच दिसते. देवाला नारळ फोडणे, कौल लावणे या श्रद्धा तर घरातील जनावर चुकले आणि ते सापडले नाही तर अशुभ समजले जाते. मुलीचा हुंडा घेणे, मांजर मारणे पाप, त्याचप्रमाणे मांजर मारणाऱ्याला काशीला जावे लागते, अशा पापपुण्याच्या कल्पना येथे दिसतात. सर्पदंश झाला असता त्या व्यक्तीला ग्रामदेवतेच्या देवळात ठेवणे, मंत्र टाकणे, लिंबाचा पाला खायला देणे, काळा ताईत, काळादोरा, जवळ असल्यास दृष्ट लागत नाही अशी समजूत आहे. आशीर्वाद देणे, प्रतिष्ठितांना बसायला टाकणे, वंशाचा दिवा लागावा म्हणून देवाला नवस करणे या गोष्टींना त्यांच्या सांस्कृतिक जीवनात स्थान असलेले दिसते. पाडव्याचा सण आनंदाने साजरा करणारे, भूतावर विश्वास ठेवणारे, पिराची पुण्याई मानणारे लोक होते. तमाशाचे विशेष आकर्षण असलेले दिसते. तमाशातील गाणे बंद करणे, चवली पावली लावणे, नर्तकीला मांडीवर बसविणे, फेटे वर फेकणे इ. संस्कृती विशेषांचे चित्रण लेखकाने केले आहे. अज्ञान, दारिद्र्य आणि स्थानिक देवदेवतांवरील श्रद्धा असे या लोकजीवनाचे स्वरुप आहे.

कादंबरीचे निवेदन प्रमाण भाषेत असून संवादाची भाषा व्यक्तिनुरूप प्रमाणभाषा

आणि बोली अशी मिश्र वापरली आहे. कादंबरीचा आशय मात्र पूर्णपणे ग्रामीण, प्रादेशिक आहे. समाज वास्तवाचे दर्शन काही म्हणींच्या वापरामुळे घडविले आहे. जसे, "धोंड्यावर कपाळ आपटून धोंडा काही फुटत नाही', 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ', 'कशात काय न् फाटक्यात काय', वाईटापुढंच भीतीचा ब्रह्मराक्षस उभा राहतो." ग्रामीण बोलीतील काही अर्थघन शब्द आशयाशी एकरुप होऊन आले आहेत, कुरी, साळला, हुत्याती, त्यास्नी, कडुस, तितवर, नगासा, हेला, जिमीन, त्वांड, पेरुनशानी, बिनसुदी, सांजा, सवड कोड्यास, अडशिरी इ.

'सावकार आणि शेतकरी यांच्यातील संघर्षाचे आणि सखा-चंद्रा प्रेमाचे चित्रण करणारी ही स्वप्नरंचनात्मक, रचनातंत्रात अडकून पडलेली कादंबरी असून ग्रामीण प्रदेश वास्तवाचे धूसर चित्रण केले आहे.

## ५) विभावरी शिरुरकर उर्फ मालतीबाई बेडेकर

### *६) जातीजमातीच्या जीवनावरील कादंबरी - "बळी" (१९५०)*

विभावरी शिरुरकरांची १९५० मध्ये प्रकाशित झालेली 'बळी' मांगगारुडीच्या जमातीच्या जीवनावरील प्रादेशिक कादंबरी आहे. शतकानुशतके पददलित, दैन्यपीडित असंस्कृत, अज्ञानी किंवा निरक्षर समाज कसा जगत होता याचे वास्तव चित्र त्यांनी रेखाटले आहे. य. दि. पेंढारकर, नाना जोग, ल. ग. जोग, डॉ. द. भि. कुलकर्णी, बापट-गोडबोले, नरहर कुरुंदकर, कुसुमावती देशपांडे, डॉ. आनंद यादव, डॉ. रवींद्र ठाकूर या अभ्यासक समीक्षकांनी 'बळी'चे असामान्यत्व मान्य केले असून मराठी कादंबरीला नवी दिशा देण्याचे सामर्थ्य तिच्यात असल्याचे मान्य केले आहे. प्रादेशिक कादंबरी म्हटल्याबरोबर विशिष्ट भू-प्रदेश-निसर्गाच्या संस्कारांचा आपण विचार करु लागतो, परंतु प्रस्तुत कादंबरीतील प्रादेशिकता ही मांग-गारुडी जमातीच्या जीवनाशी आणि समूहमनाच्या गरजाशी निगडित आहे.

कादंबरीचे कथानक बारा वर्षे बोर्डींगमध्ये शिक्षण घेतलेल्या मांग-गारुडी जातीतील आबाच्या आयुष्याभोवती रुंजी घालते. पानवडच्या खोऱ्यातील चोरवस्ती एका बाजूला तर स्पृश्यांची 'गगनवाडी' दुसऱ्या बाजूला आहे. काटेरी तारेच्या कुंपणात राहणाऱ्या वाहिमी लोकांना शाळेची सक्ती होती. कारण चोरांच्या राहणीमानात, विचारात बदल व्हावा ही इंग्रज सरकारची इच्छा होती. मिशनऱ्यांच्या शाळेत न शिकता गांधी बोर्डींगमध्ये शिक्षण घेतलेला आबा चोर वस्तीत येतो. त्याचे विशेष कौतुक होत नाही. त्याला नोकरी मिळेल अशी त्याच्या आई-चांगुणा, बाप गेन्याला आशा असते, परंतु तसे होत नाही. ख्रिस्ती धर्म स्वीकारणाऱ्यालाच नोकरी दिली जाते. गांधी बोर्डींगमधील समतेचे शिक्षण व्यवहारी जगात जगायला अपुरे असल्याचा अनुभव आबाला येतो. नोकरी न मिळालेला आबा आईबापाच्या दृष्टीने उनाड व आयतोबा

ठरतो. ख्रिस्ती होण्याचा विचार त्याच्या मनात येऊन जातो. हळुहळू चोरवस्तीतील वातावरणात रमतो. हमाली करतो. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याच्या प्रयत्नात आठ दिवस तुरुंगात जातो. ज्वारीच्या कणसांची चोरी करतो. आईचे सोजीराशी अनैतिक संबंध पाहून भडकतो. तिचा तिरस्कार करतो. भावंडाचे पोट भरण्यासाठी आई अनैतिक संबंध ठेवते हे समजल्यावर शांत होऊन तिच्या कुशीत शिरतो.

आबाने चार मित्रांबरोबर गांधी टोपी घातली म्हणून रिपनसाहेब भडकतो. आणि आबाला मार खावा लागतो. साम्यवादी विचाराच्या बारणे याच्याशी आबाचा परिचय होतो. सहानुभूतीने-प्रेमाने बारणे त्यांना जवळ घेतात. सन्मानाने वागवितात. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे काम ते संघटितपणे करतात. रिपन-डगन या अधिकाऱ्यांची त्यामुळे बदली होते. काँग्रेस सरकार याचे श्रेय स्वत:कडे घेऊ पाहते. नवा मॅनेजर वंगडी काँग्रेसच्या तालावर नाचू लागतो. परंतु त्याचे खरे प्रेम गोऱ्या सत्तेवरच असते. विठाबाईच्या उदारपणामुळे आबाला विणकामाच्या कारखान्यात नोकरी मिळते. हिरणगावच्या धरणावर चोरवस्तीतील लोक पाठविले जातात. त्यांच्याबरोबर चांगुणा गेन्याला पाठविले जाते. राईच्या सहवासात आबा रमतो. वंगडी मॅनेजर स्वत: सतरंजी चोरतो आणि आबावर आरोप ठेऊन त्याला तडकाफडकी नोकरीतून कमी केले जाते. सावजातीच्या राईशी चोर जातीच्या आबाचे लग्न होऊ शकत नाही.

जातीचा कोडगेपणा स्वीकारुन आबा ग्रहणानंतर भिक्षा मागताना चोरी करतो, गांधी बोर्डींगमधील भागवत गुरूजी त्याला पकडतात. त्यांना आबा गतजीवनातील कटु अनुभव सांगतो. चोरी, खून, बलात्कार केल्याचे कबूल करतो. तुम्ही समता-बंधुतेचे शिक्षण दिले परंतु समाजात जातिभेद-विषमता, अन्याय अत्याचाराचे राज्य आहे हे शिकविले नाही महणून गुरूजींवर संतापतो. भागवत गुरुजींच्या सांगण्यावरुन तो स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतो. फंदफितुरीमुळे अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांना अटक होतो, आबालाही छापखाना चालविला म्हणून पकडले जाते. पंधरा ऑगस्टला देश स्वतंत्र होतो. सर्व कैद्यांची सुटका होते, परंतु आबा चोर जातीचा 'क' वर्ग कैदी असल्यामुळे त्याची उशिरा सुटका होते. स्वातंत्र्यानंतर बेकारी, महागाई, भ्रष्टाचार, उपासमार वाढते. चोर जमातीची हजेरी, काटेरी तुरुंग नष्ट केले गेले. माया सहानुभूतीचे स्वराज्य आले असे काही काळ वाटले. आबाला परत नोकरी मिळाली, पण ते भांडवलदारांचे राज्य होते. गरिबांची निराशा झाली. उपासमार होऊ लागली. दरोडे घालण्याचा विचार लोक करु लागले, परंतु चोरी केली तर आबा आपणांस पकडून देईल म्हणून जातीतील लोकांनी झोपेतच आबाच्या डोक्यात दगड टाकून त्याचा खून केला. अठरा वर्षांचा आबा चोरवस्तीत आल्यापासून ते त्याच्या खुनापर्यंतच्या काळातील घटनाप्रसंगांच्या आधारे चोर-मांग गारुडी समाजाचे वास्तवानुभव लेखिकेने प्रस्तुत कादंबरीत रेखाटले आहे. "माझे लेखन हे माझ्या मातीत निर्माण झालं आहे.२५.

असे लेखिकेने म्हटले आहे. वास्तवाच्या आणि जीवनानुभवाचा प्रत्यक्ष संबंध असल्यामुळेच 'बळी'चे लेखन झाले.

'आबा' हा या कादंबरीचा नायक. स्पृश्यांच्या जगाचे संस्कार झालेला गांधी बोर्डींगमध्ये सहावीपर्यंत शिक्षण घेऊन बारावर्षानंतर चोरवस्तीत परत आलेला हा आशावादी तरुण आहे. समता-बंधुभावाचे शिक्षण मिळाल्यामुळे तो खादीचे कपडे वापरतो. चोर जातीचा कोडगेपणा तो विसरलेला असतो. स्वाभिमानाने जगावे, जातीतील लोकांना सुधारावे असे वाटत असतानाच नोकरी न मिळाल्याने तो निराश होतो. चोरी करतो. लाचार होतो. देशाला स्वातंत्र्य मिळाले तरी त्याचा फायदा त्याला मिळत नाही. उलट त्याचे जातभाई त्याचा खून करतात. 'चांगुणा' ही आबाची आई, अकरा मुलांची पोटं भरण्यासाठी सोजिराशी अनैतिक संबंध ठेवते. 'येशी' ही तिची इंग्रज शिपायापासून झालेली मुलगी. तर गेन्या हा चोरजमातीचा कोडगेपणा असेला, लाचार, सोशिक, श्रद्धाळू आहे. कल्या आणि जाईबाई हे चोरवस्तीबाहेरील आबाचे हितचिंतक आहेत. तर संतू-नलामी हे आबाच्या पैशावर डोळा ठेऊन असलेल्याचे प्रतिनिधी आहेत. सोमदत्त हा आबाचा बोर्डींगमधील मित्र, 'राई' ही मॅट्रिक झालेली मांग जमातीतील मुलगी, ती साव जातीतील असल्यामुळे आबाबरोबर समाजाच्या भीतीने लग्न करु शकत नाही. रिपन, मिस डगन, वंगडी मॅनेजर, विठाबाई, शिंदे फौजदार हे निष्ठूर मिशनरी अधिकारी आहेत. शिवनप्पा भागवतगुरुजी हे काँग्रेसवादी तर बारणे हे साम्यवादी विचारसरणीचे आहेत. चोर जमातीतील इतर असंख्य गौण पात्र, त्या काळातील सर्वसामान्य माणसांशी साम्य असणारे आहेत. कादंबरी ही केवळ आबाचे जीवनचित्रण करणारी नाही, तर मांगगारुडी समाजाच्या समूहजीवनाचे चित्रण करणारी आहे. भू प्रदेशानुवर्ती न ठरता सामुहिकता आणि वैयक्तिकता याच्या सीमारेषेवर घोटाळते. सोलापूर जवळील गगनवाडीची पार्श्वभूमी या कादंबरीच्या कथानकाला लाभली आहे. भूप्रदेश किंवा निसर्ग चित्रण करणे कादंबरीचा मुख्य हेतू नाही.

ब्रिटिश सरकारने 'क्रिमिनल ट्राईब्ज सेटलमेंटस् अ‍ॅक्ट' केला होता. चोरी करणाऱ्या वन्य व भटक्या जातींना या कायद्याने 'गुन्हेगार जाती' ठरविले जाते. वहिमी किंवा प्रत्यक्ष गुन्हा करणाऱ्या समाजाला सरकारने निरनिराळ्या ठिकाणी वस्तीला आणले होते. त्यांना काटेरी तारेच्या तुरुंगात ठेवले होते. त्यांच्या मुलांना शाळेची सक्ती केली जात होती. प्रौढांना नागरी राहणीचे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जात होता. त्यांचे हृदयपरिवर्तन करण्याच्या चांगल्या भावनेने हा कायदा केला होता, परंतु मिशनरी लोक कायदा फायद्याप्रमाणे वापरु लागले.

चोर-गुन्हेगार अस्पृश्य समाजाचे आणि साव स्पृश्य समाजाचे जीवन पूर्णपणे वेगळे होते. सत्ता श्रीमंती स्पृश्य समाजामध्ये होती, तर प्रचंड दारिद्र्य, गरिबी

अस्पृश्य चोर जमातीमध्ये होते. गगनवाडीचे स्पृश्याचे वैभव, कारखानदारांचे वैभव एका बाजूला तर पानवडच्या खोऱ्यातील चोर जातीचे दैन्य दारिद्र्य, अज्ञान दुसऱ्या बाजूला होते. अतुल मिलचे मालक मथुरादास यांच्या मुलाच्या बारशाच्या निमित्ताने जेवणाच्या पंक्ती उठत होत्या. लोक ढेकर देत होते. त्यांच्या पत्रावळी उकिरड्यावर फेकल्या जात होत्या, कुत्रे-कावळे आणि पानवडच्या खोऱ्यातील चोर जातीतील माणसं उष्टे खरकटे मिळावे म्हणून धडपडत होते. त्याच उकिरड्यावर आई आणि बहीण आबाला भेटली. चोरवस्तीत शिळ्या तुकड्याशिवाय दुसरे अन्न नव्हते. गाडग्या-मडक्यांचा संसार झोपड्याझोपड्यातून मांडलेला आबाने पाहिला. सत्ता-श्रीमंती एका बाजूने तर प्रचंड दारिद्र्य दुसऱ्या बाजूने असे विषमतेचे चित्र आहे.

चोरजातीतील शिकलेल्या मुलांना नोकऱ्या मिळत नव्हत्या तर ख्रिस्ती धर्म स्वीकारणाऱ्यांनाच शिपाईपट्टेवाल्याच्या हलक्या नोकऱ्या मिशनरी देत होते म्हणून मिशनऱ्यांच्या विरुद्ध गांधी बोर्डींगमध्ये शिकलेल्या आबाला रिपन-डगन झाडू मारण्यास, खडी फोडण्यास, सांगतात. त्याला नोकरी देत नाहीत. स्वातंत्र्यपूर्व काळात जातिभेद-विषमता, अज्ञानाचे साम्राज्य होते. अस्पृश्य चोर जातीतील लोकांशी स्पृश्य जातीतील लोक दुरान्वयानेही संबंध ठेवत नव्हते. अस्पृश्यांना हॉटेलमध्ये प्रवेशास बंदी होती. आबा आणि गेन्याला हॉटेलच्या बाहेरच चहा घ्यावा लागतो. साद्या आणि आबा या मांग-गारुड्यांनी हॉटेलमध्ये जाऊन चहा घेणे स्पृश्यांना आवडत नाही. हा अन्याय आहे असे वाटल्यावरुन आबा स्पृश्यांना विरोध करतो, तेव्हा दवाखान्यात भरती करण्याइतपत त्याला मारहाण होते, यातून जातिभेदाची कल्पना येते. चोर वस्तीतील लोकांमध्ये अज्ञान होते. अन्यायाविरूद्ध आवाज उठविण्याचे सामर्थ्य नव्हते. मिशनरी लोक त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत होते. धर्मांतर करण्यास प्रवृत्त करीत होते. ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते. गुन्हेगार चोर जमातीच्या लोकांमध्ये चांगल्या प्रवृत्ती रुजविणे, त्यांच्या दृष्टीने गौण काम होते. प्रामाणिक कष्ट करायची सवय लाऊन माणसांचा हृदयपालट करण्यापेक्षा त्यांना लाचार बनविण्याचे कार्य मिशनऱ्यांनी आरंभिले होते. उदा. गेन्या चांगुणाच्या दरिद्री संसाराकडे पाहून रिपन-डगनला त्यांची कीव येत होती. त्यांनी ख्रिस्ती व्हावे म्हणून त्यांच्याकडे ते विशेष लक्ष देत होते. त्यांना नोकऱ्या दिल्या होत्या, परंतु आबा गांधी बोर्डींगमध्ये शिक्षणासाठी निघून गेला. हेतू साध्य होत नाही असे दिसताच त्यांना नोकरीवरुन काढून टाकले जाते, धर्मप्रसार हेच मिशनऱ्यांचा मुख्य उद्देश होता, शिक्षण देऊन गुन्हेगारांचे हृदयपरिवर्तन हा उद्देश गौण होता.

ब्रिटीश सरकार किंवा मिशनरी अधिकारी लोकांना उदरनिर्वाहासाठी संधी उपलब्ध करुन देत नव्हते, म्हणून लोक चोऱ्या करीत होते. मुलांना जगविण्यासाठी महिला सोजीरांशी अनैतिक संबंध ठेवत होत्या. वासनेपेक्षा सोजीरांकडून मिळणारा पैसा

त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. पुरुष देखील बायकांच्या वर्तनाकडे लाचार होऊन दुर्लक्ष करीत होते. अकरा भावंडाच्या पोटाची खळगी भरण्यासाठी चांगुणा सोजीरापुढे आपली भावनाशून्य हाडं टाकते आणि त्याच्याकडून दोन रुपये घेते. आबाला आईची किळस येते. पण लाचार गेन्या तिच्याकडे दुर्लक्ष करतो.

चोर जातीतील लोकही कारस्थानी, बेरकी होते. स्वार्थापोटी दुसऱ्याची अब्रू घेण्यासही ते मागेपुढे पाहत नव्हते. नामीचे आबाबरोबर लग्न व्हावे असे संतुला वाटते. त्याला नोकरी लागेल, नामी सुखी होईल, म्हणून तो नामीच्या वर्तनाला मूक सम्मती देतो. नामी आबाला धोका देते. त्याच्यातील पुरुषत्वाला आवाहन करते. स्वत:च्या शरीराची भूक भागविते. त्यावेळी संतू बाहेरुन येतो. आरडाओरड करुन वस्तीतील लोक जमवितो. पंचांना बोलवितो. आबा-नामीचे लग्न जमविले जाते. त्याचप्रमाणे नामी इतर तरुणांबरोबरही संबंध ठेवते. यातून खालच्या जातीतील स्त्रियांना परपरुषाशी अनैतिक संबंध ठेवणे कमीपणाचे वाटत नव्हते. उलट 'राई' आणि आबा यांचे लग्न होऊ शकत नाही. कारण ती साव मांगजातीतील असते. तर आबा साव जातीतील नसून चोर जातीतील आहे. मागासलेल्या जातींमध्येही श्रेष्ठ कनिष्ठ भाव होता.

मिशनऱ्यांचे राज्य गेले. स्वराज्य आले. बेकारी आणि महागाई वाढली. उपासमार होऊ लागली. स्वराज्याबद्दलची उदासिनता वाढली. निराशा झाली. म्हणून चोरजातीची माणसे पुन्हा चोऱ्या करु लागली. आबावर प्रेम करणाऱ्या चोर जातीच्या लोकांनी आबाच्या डोक्यात धोंडा घालून त्याचा खून केला कारण तो आपली नावे सरकारी अधिकाऱ्यांना सांगेल अशी भीती त्यांना वाटत होती. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये गुन्हेगार जातीच्या लोकांची आर्थिक परिस्थिती बदलली नाही. त्यांना उदरनिर्वाहासाठी चोरीचा मार्ग पत्करावा लागतो.

धर्मप्रसाराचे कार्य करणाऱ्या मिशनऱ्यांबद्दल आणि इंग्रज अधिकाऱ्यांबद्दल गुन्हेगार जातीच्या लोकांना विश्वास वाटत नाही. त्यांच्यातील संघर्षाचे चित्रण लेखिकेने केले.

"चोर वस्ती आणि तेथील अधिकारी हे जणू दोन शत्रूंचे तळ होते. त्यांना एकमेकांबद्दल आस्था नव्हती, प्रेम नव्हते, हिताची बुद्धी नव्हती, चोरवस्तीने आपल्या भोवती जणू कोट रचले होते. अविश्वास, अडाणीपण, दारिद्र्य, हेकटपणा, निरक्षरता, निराशावाद, नावडीचे उद्योग, अर्धपोटी राहणी या सगळ्या सगळ्या गोष्टींनी अजूनही त्यांना चोरी हाच मुक्तीचा मार्ग वाटत होता." (पृ.७१) सरकारी अधिकारी गुन्हेगार जातीना उपजीविकेचे साधन उपलब्ध करुन देण्यापेक्षा कठोरपणे वागत होते, त्यामुळे एकमेकांबद्दल विश्वास वाटण्याऐवजी संशय वाटत होता. गुन्हेगार जमातीतील लोक व अधिकारी यांच्यात दुरावा निर्माण झाला.

अधिकाऱ्यांच्या वर्तनाच्या निषेधार्थ बारण्यांच्या मदतीने जाणीव जागृतीचे कार्य

सुरु केले जाते. बारणे कॉम्रेड लालबावटेवाला असल्याने गुन्हेगारांना-कामगारांना भडकावतो असा रिपनचा समज असतो. बारणे रिपनची भेट घेतो. तेव्हा उद्धटपणा करुन रिपन बारणेला मार देतो. पोलीसांच्या मदतीने त्याला हुसकावतो. कलेक्टरच्या मदतीने पोलीस फौज बोलावून संप मोडतो. तरीही बारणेचे कार्य शांतपणे चालू असते. गुन्हेगार जमातीवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी 'प्रजा' अंकातून सरकारी अधिकाऱ्याविरुद्ध तो लिहितो. रिपन डगनची बदली होते. लोक संघटीत होऊ लागले. सत्ता टिकविण्यासाठी मिशनरी जसा प्रयत्न असल्यामुळे लालबावटावाले आणि कॉंग्रेसवालेही प्रयत्न करताना दिसतात. शिवनप्पा कॉंग्रेसवाले असल्यामुळे लालबावट्याचा द्वेष करतात, त्यांच्यातही संघर्ष असल्याचे जाणवते. वंगडी मॅनेजर कॉंग्रेसचे कार्यकर्ते आणि सरकारी अधिकारी यांच्याशी जुळते घेण्याचा प्रयत्न करतो, कारण 'स्वातंत्र्य' आले तर नोकरी टिकली पाहिजे असा तो विचार करतो. दारुबंदीचा कायदा होऊनही फौजदार 'कल्या'ला दारु पाडायला सांगतो. कायदा जनतेसाठी आहे, स्वत:साठी नाही असे अधिकाऱ्यांना वाटते. शाळेतील सतरंजी वंगडी मॅनेजर स्वत:च्या घरी नेतो, परंतु विठाबाई आबालाच नोकरीवरुन काढते कारण तिला स्वत:ची नोकरी महत्त्वाची वाटते. आबा महत्त्वाचा वाटण्याचे कारण काय? कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ आल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांच्या चौकशीला सुरुवात होते. आबा स्टेशनवर उभा राहून मोडके तोडके भाषण देतो. (पृ.१४७) कॉंग्रेसचे पुढारी अधिकाऱ्यांच्या गैरवर्तनाच्या चौकशीचे आश्वासन देतात, परंतु त्यातून काहीच निष्पन्न होत नाही.

इंग्रज सत्ता नाहीशी करण्याचा प्रयत्न गांधी विचारानुसार खऱ्या अर्थाने सुरु होतो. भागवत गुरूजीच्या सूचनेप्रमाणे आबा स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतो. देशाला स्वातंत्र्य मिळते. तुरुंगातील अनेक कार्यकर्ते सुटतात. परंतु 'क' वर्गातील म्हणजे चोरजातीतील कैद्यांची लवकर सुटका होत नाही, सुटका झाल्यानंतरही गुन्हेगार जातीला स्वातत्र्यांचा फारसा फायदा मिळत नाही. ते परत चोरी करण्याचा मार्ग स्वीकारतात. सुरवातीचा त्यांचा आशावाद (पृ.१७३) नष्ट होतो. स्वातंत्र्यानंतरही गुन्हेगार जातीचा प्रश्न सुटत नाही, इंग्रज किंवा कॉंग्रेसचे सरकारही गुन्हेगारांचे हृदयपरिवर्तन करण्यास असमर्थ ठरतात.

स्वातंत्र्यपूर्वकाळ आणि स्वातंत्र्यानंतर गुन्हेगार जमातीच्या लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारली नाही. सेटलमेंट मध्ये असतानाही कावळ्या-कुत्र्याच्या मालकीचे उष्टेखरकटे खाण्याची वेळ या जमातीवर येते. (पृ.७) शिक्षणानंतर नोकऱ्या मिळत नाहीत. त्यामुळेही उपासमारीला कंटाळून चोरी करण्याची, भीक मागण्याची वेळ येते. स्त्रियांना पोटासाठी सोजिरांशी अनैतिक संबंध ठेवावे लागतात. झाडाचा पाला खाऊन उदरनिर्वाह करावा लागतो. हे जसे गुन्हेगारांचे जीवन लेखिकेने चित्रित केले आहे, त्याचप्रमाणे नोकरी टिकविण्याचा प्रयत्न करणारा वंगडी मॅनेजर प्रतिकूल आर्थिक परिस्थिती,

अल्प पगार यामुळेच नोकरी करतो. विठाबाई स्वत:ची नोकरी टिकविण्यासाठी आबाला नोकरीतून काढते. चंद्र ग्रहणानंतर 'दे दान सुटे गिरान'(पृ.१६४) म्हणत पैसे, कपडेलत्ते मागत मांगगारुडी फिरतात. एखादी धार्मिक बाई पैसा द्यायला बाहेर आली की पंचवीस माणसे 'बाई मला' 'बाई मला' करीत धावत आणि फेकल्या तुकड्यांना पंचवीस कुत्री झोंबावी, तशी टाकलेल्या दानाला झोंबत.'' (पृ.१६५) यावरुन मांगगारुड्यांचे प्रतिकूल आर्थिक जीवन होते.

स्वातंत्र्यानंतरही भांडवलदारांचे राज्य आले. काँग्रेसवाले भांडवलदारांच्या हातचे बाहुले बनले. महागाई वाढली. बेकारी-महागाईला कंटाळलेल्या गरिबांनी आबासारख्याचा खून केला. गोरी सत्ता आणि काँग्रेसची सत्ता गुन्हेगारांचे दारिद्र्य घालवू शकली नाही.

जो ख्रिस्ती धर्म स्वीकारील, त्याला शिक्षण आणि नोकरी देण्याचे धोरण अधिकाऱ्यांनी ठेवले. ख्रिस्ती धर्म न स्वीकारणाऱ्या किंवा गांधी बोर्डींगमध्ये शिक्षण घेणाऱ्यांना उच्चशिक्षणाची, शिष्यवृत्तीची सवलत अधिकाऱ्यांनी मिळू दिली नाही. त्यामुळे शिकलेल्या मुलांबद्दल समाजाला कौतुक वाटत नाही, जसे आबाला नोकरी न मिळाल्यामुळे गेन्या-चांगुणा त्याला कामधंदा करायला सांगतात. घोर निराशा झाल्यामुळे शिकून काय करायचे? शिक्षणाचा उपयोग काय? सर्वच मजुरी करीत असल्यामुळे घरातील लहान मुले सांभाळण्यासाठी कोणीतरी हवे म्हणून ते मुलांना शाळेत पाठवित नाहीत. मुलांना शाळा बुडवायला लावतात. मुलांना घरात लपवून ठेवतात. आबाची आई मुलांना शाळेत पाठविण्याऐवजी घरात लपवून ठेवते, तर आपल्या भावंडांनी शिकले पाहिजे असे आबाला वाटते. आपली मुलं शिकवा असे तो सांगतो.

''बाबांनो, अशी संधी मिळायची नाही. आपली मुलं शिकवा. पुष्कळ शिकवा. ती मोठी झाली तर तुमचाच फायदा आहे. (पृ.१७) यावर लोक म्हणतात, ''लई शनपन सांगाया लागला. तूं काय शिकूनशानी क्येलस?'' (पृ.१७) गुन्हेगार जमातीमध्ये शिक्षणाबद्दल उदासीनताच होती. शिक्षणामुळे परंपरागत चोरीच्या व्यवसायाला मुले पारखी होतात असा त्यांचा समज असलेला दिसतो,

''अर काय र ग्येलास जेलांत तर येकादा डाका तरी घालायचा व्हतास। ह्यो रं कसलं भांडान अन् मारामारी? बुकं लिवाया वाचाया शिकलात तर असं बी पोट जळंना अन् तसं बी जाळता येईना तुला.'' (पृ. ७२) शिक्षणामुळे आबा परंपरागत व्यवसाय करायला नालायक ठरला असे लोकांना वाटते. चोर वस्तीतील मुलांना शिक्षण देण्याबद्दल मिशनरी अधिकारी कसे उदासिन होते हे विठाबाईच्या संवादातून (पृ.१२५) स्पष्ट होते. आबाप्रमाणे सोमदत्तची बहीण 'राई' ही एक मांग समाजातील शिकलेली मुलगी, तिला नोकरी मिळते, मिशनऱ्यांच्या सूचनेप्रमाणे वागल्यामुळे तिला स्कॉलरशीप मिळते. एकूणच ख्रिस्ती अधिकाऱ्यांची आणि गुन्हेगार जातीची शिक्षणाबद्दल उदासीनताच दिसते.

उपेक्षित दरिद्री-अज्ञानी मांगगारुडी समाजामध्ये अनेक समजुती, अंधश्रद्धा, आपल्या जातीबद्दल, देवदेवतांबद्दल श्रद्धा, सण, उत्सव आणि देवाला बळी देण्यातून त्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडते. ख्रिस्ती झाल्यावर पोराला खायला मिळेल, परंतु जात सोडायची म्हणजे बाटायचे त्यांच्या जीवावर येते. मिशनरी अधिकाऱ्यांना विनंती करुनही आबाला नोकरी मिळत नाही, तेव्हा गेन्या संतापाने म्हणतो,

"किरिस्तावांची दुनिया झालीया, आमची मरीआई बी बघूनशानी घील. मुलाला किरीस्ती काय म्हून करीन? तुझ्या पोटातून तर न्हाई आला? माझा ल्योक हाए."(पृ.३१) गेन्याच्या या उद्‌गारातून त्याची मरीआईवरील श्रद्धा आणि जातीबद्दल अभिमान स्पष्ट होतो. चोर जमात अज्ञानी आहे. दवाखान्यातील औषधावर त्यांचा विश्वास नाही. मूलं देवाच्या पाहऱ्यानंच वाढतात. मुलांना दवाखान्यातील औषध देण्यापेक्षा "जाखाई-जोखाईच्या, म्हाळसेच्या अंगाऱ्यानेच पोरे बरी होत होती. हिवं, कांजण्या, गोवर, देवी आणखी कितीक रोगांतून तिची सगळी पोरं अंगाऱ्यानेच बरी झाली होती. कुठला प्रभू नि काय"(पृ.४०) अशी चांगुणा श्रद्धाळू आहे. मांगगारुडी जमातीचे अज्ञान आणि स्वतःच्या देवतांवरील विश्वास येथे जसा दिसतो, त्याचप्रमाणे प्रभूवर (ख्रिस्त) त्यांचा अजिबात विश्वास नाही. गेन्याला सरकारी अधिकाऱ्यांचा राग येतो. तो म्हणतो, मरीआई, वाघोरीआई त्यांना नकोत, माझी पोरं लाल देवळात न्याची आहेत त्यांना. म्हणून तो देवाला नवस करतो, "ही तार, ही हाजरी अन सायब जाईल तवा बकरा कापीन मरीआईला."(पृ.४१) नवस करण्याची परंपरा जशी दिसते, त्याचप्रमाणे ताडी पिणे, देवाला रेडा मारणे, बळी देणे, चोरी करणे हा त्यांना आपला धर्म वाटतो. चांगल्या प्रकारे हुशारीने चोरी करणाऱ्यालाच मुलगी देणे, चोरी करणे हा त्यांना आपला धर्म वाटतो. मुलाकडून हुंडा घेण्याची प्रथा दिसते. धनिकांनी प्रेतावर उधळलेले त्यांना पाप वाटत नाही, किंवा पोटाची खळगी भरण्यासाठी स्त्रियांनी देहविक्री करणे त्यांना पाप वाटत नाही. स्वातंत्र्योत्तर काळातही जातिभेद नष्ट व्हावा असे वाटत असताना जुनी पिढी जातिभेद मोडायला तयार होत नाही, "आरं, काँग्रसनं जाती काढल्या तरी आपली भीड है ना, ती कुटं जातीया? आपली रीत सोडाया ग्येलो तर मरीआई भलं न्हाई करनार."(पृ.१७४) मरीआईवरील श्रद्धेने हे लोकजीवन घडले आहे. स्पृश्यांच्या दृष्टीने उपेक्षित मानल्या गेलेल्या स्वतःच्या जातीबद्दल त्यांना अभिमान आहे. सेटलमेंटमध्ये सरकारी पाहुण्याच्या कारमणुकीसाठी विविध खेळ केले जात, त्यातूनही लेखिकेने सांस्कृतिक जीवनदर्शन घडविले आहे.

"पारध्यांचा फासे टाकण्याचा खेळ, कैकाड्यांच्या दरोड्यांची तयारी, ताडी पिऊन बेभानपणे हाणमार करणाऱ्या चोर वस्तीतील माणसाची व स्त्रीची नक्कल भाटांच्या पोरींचे नाच..." (पृ.१४५) ग्रहण सुटल्यानंतर 'दे दान सुटे गिरान' असे म्हणत रस्त्याने भिक मागत फिरणे, मरीआईची शपथ घेणे, खोटं ठरल्यास पटकी होण्याची

भीती बाळगणे, कैकाडी-भामटे, तरुण आणि म्हातारे जमून बेसूर आवाजात भक्तिभावाने भजन करण्याची परंपरा या लोकजीवनात आहे. देवावरील श्रद्धाच त्यातून दृष्टीस पडते, टाळ-चिपळ्या वाजवत भक्तिभावाने भजन म्हटले जाते.(पृ.७८), जातिभेद केवळ उच्चवर्गीय स्पृश्य आणि मागासवर्गीय अस्पृश्य एवढ्यापुरताच मर्यादित नाही, तर अस्पृश्यांमध्येही उच्चनीचता होती. शिकलेल्या 'राई'चे लग्न 'आबा' बरोबर न होण्याचे कारण म्हणजे दोघांची अनुक्रमे साव आणि चोर जातच होय.

कादंबरीचे निवेदन प्रमाण भाषेत केले आहे. त्याचप्रमाणे संवादासाठी ग्रामीण बोलीचा वापर केला आहे. या अनुषंगाने विभावरी शिरुरकर म्हणतात, "...प्रत्यक्षात या वसाहतीतील लोकांची भाषा तमीळ, तेलगू, कानडी, अशी सरभेसळ असे. त्यांची भाषा कादंबरीत वापरता येणं अशक्य होतं..त्यामुळं मला जी मराठी ग्रामीण भाषा परिचयाची आहे तीच मी वापरली आहे."२६. यावरुन प्रस्तुत कादंबरीतील भाषा चोर जमातीची नसून लेखिकेने आत्मसात केलेली ग्रामीण बोली संवादासाठी वापरली आहे. ल. ग. जोग म्हणतात, "...लेखिकेच्या भाषेत मोकळेपणा आढळतो. वर्णनाच्या सूक्ष्मपणात शैली मात्र अडखळत जाणारी अल्पाक्षरी वाटते. भाषेत मुद्दाल 'जानपद' पणा आणण्याचा प्रयत्न नाही. प्रत्यक्ष आलेला दृक अनुभव, बुद्धीची सामाजिक झेप व मनाचा हळुवारपणा यांचा मनोहर त्रिवेणसंगम या कादंबरीत आढळतो."२७. म्हणजेच वास्तवजीवन दर्शन घडविण्याचे सामर्थ्य लेखिकेच्या भाषेत असल्याचे यातून स्पष्ट होते. भालचंद्र नेमाडे म्हणतात, "बळी मध्ये भाषा, तपशील, तंत्रे काबूत ठेवून नीट वाट काढली आहे. नैतिक तटस्थ निरीक्षकाची दृष्टी टाळून जातीच्या चौकटीच्याही खालच्या पायरीवरचे 'बळी'तले जग संबंध हिंदुसमाजाची उतरंड अत्यंत सूचकतेने हादरवून टाकते. ह्यात कुठलाही आक्रस्ताळेपणा येऊ दिलेला नाही. लैंगिकता हा नित्याचा भाग असलेल्या जीवनावर झोत टाकूनही आशय रंजक होऊ दिला नाही. हे शास्त्रीय वस्तुनिष्ठ शिस्तीच्या सर्जकतेनेच शक्य होते..."२८. डॉ. नेमाडे यांच्यावरील अभिप्रायचा अर्थ असा की 'बळी'ची भाषा आशयानुकूल आहे. तर बळीची भाषा अनलंकृत, काटेकोर, सूक्ष्म पण ती उपरोध असल्याचे सांगून कुसुमावती देशपांडे यांनी, "...कथेचा शेवट फार परिणामकारक, प्रत्ययकारी व तितकाच प्रक्षोभक वठला आहे."२९ असे म्हटले आहे.

प्रस्तुत कादंबरीचा डॉ. चंद्रकांत बांदिवाडेकरांनी केलेला गौरव अधिक यथार्थ वाटतो. ते लिहितात, "बळी'मध्ये विभावरी शिरुरकराची ताकद अनपेक्षितपणे वाढलेली दिसते. 'बळी' ही बाईच्या लेखन कर्तृत्वातली अतिशय महत्त्वाची कादंबरी हे तर खरेच पण मराठी वास्तववादी कादंबरीत अतिशय वरच्या दर्जाची कादंबरी मानावी लागेल. येथे त्यांची स्वकेंद्रितता गेली. भाषेचा वरकरणी हळवा नाजुकपणा गेला,

प्रसंग व व्यक्तित्वे यांना मूर्त आकार देण्याचे कसब भरपूर प्रमाणात वाढलेले दिसते. वास्तववादी जाणीव अनुभवाच्या धगधगत्यासाकार रुपातून समर्थपणे व्यक्त करण्याचे सामर्थ्य आले. मध्यमवर्गीय मर्यादा ओलांडून व सदाशिवपेठी संस्कृतीकडे पूर्णपणे पाठ फिरवून, त्या शेजवळकरांनी सांगण्याच्या आधीच, दमदारपणे तळागाळाच्या जीवनात उतरल्या. 'मराठीचा मानबिंदू' ठरावा अशी ही कादंबरी 'बळी'।३०. यावरुन असे म्हणता येईल की, जाती जमातीच्या जीवनावरील 'बळी' ही श्रेष्ठ वास्तववादी कादंबरी आहे. सामाजिकता आणि जाती-जमातीच्या जीवनातील प्रादेशिकता यामुळे मराठी कादंबरी वाङमयात नवनिर्मितीच्या अनेक शक्यता तिने निर्माण केल्या.

### ६) गो. नी. दांडेकर -

#### (७) *'पवनाकाठचा धोंडी'*

बदलत्या परिस्थितीच्या पुराबरोबर वाहत जावयाचे नाकारणाऱ्या एका झुंजार माणसाची-धोंडीची ही कथा आहे. स्वत:चया अंगातील हवालदाराच्या रक्ताबद्दल धोंडीला रास्त अभिमान आहे. परंतु त्याचा लहान भाऊ कोंडी परंपरा नाकारणारा निघतो. पोळ्याच्या दिवशी किशा न्हाव्याने मानाचा नारळ पळविला म्हणून कोंडी त्याच्या कानामागे देतो. वाघोबाच्या जत्रेच्या दिवशी दोघांची कुस्ती ठरते. कुस्ती खेळ आहे या दृष्टीकोनातून धोंडी विचार करतो. किश्या आणि कोंडी स्वतंत्रपणे तालीम करु लागतात. सारजा आणि कोंडीच्या आग्रहाखातर अनिच्छेने धोंडी वडगावच्या बाजारातून एक म्हैस आणतो. तयारी करुनही कोंडी कुस्ती हरतो. किश्या जिंकतो. त्याला गावचा हवालदार या नात्याने धोंडी उचलून घेतो. शाबासकी देतो. यामुळे भावाभावामध्ये संघर्ष सुरु होतो.

धोंडीच्या वर्तनामुळे 'हवालदार' घराण्याची प्रतिष्ठा वाढली. परंतु कोंडीच्या दृष्टीने गावामध्ये अप्रतिष्ठा झाली म्हणून तो उपाशीपोटी घरात पडून राहतो. नंतर वाडीतल्या भिम्याबरोबर लोणावळ्याला जातो. दुधाचा धंदा करण्याचा निर्णय घेतो. अर्थातच गोरसविक्रीचा धंदा परंपरागत जीवन जगणाऱ्या तुंगीच्या धोंडीला पसंत पडत नाही. तरीही कोंडीवरील प्रेमाखातर त्याने म्हशी खरेदी केल्या. पण दुधाचा एकही पैसा न वापरण्याचा आणि दुधाला स्पर्श न करण्याचा निर्णय घेतो. त्यामुळे दोघांमध्ये विसंवाद निर्माण होतो.

धोंडी हवालदाराची आजी ज्या दिवशी स्वप्नात आली त्याच दिवशी सरुचे वडील घारेदादा तुंगीला येतात. सोयरीकीची गोष्ट काढतात, तेव्हा भावाचे सर्व दोष धोंडी त्यांना सांगतो. त्यानंतर लोणावळ्याला जाऊन मुलगी पाहून सोयरीक पक्की केली जाते. कर्ज काढून धोंडी सरु-कोंडीचे लग्न लावतो. लग्नासाठी कोंडीकडील पैसा घेत नाही. सारजा-सरुसाठी पुतळ्या करण्यासही विरोध करतो. सारजाला गोरसविक्रीच्या

पैशाचे इंजेक्षण टोचू देत नाही. तिचा मृत्यू होतो. तेव्हा दोघांमधील संघर्ष अधिक तीव्र होतो.

घटसर्पाच्या साथीत कोंडीच्या चार म्हशी मेल्या. तेव्हा नवीन म्हशी घेण्यासाठी दादाकडे तो पैसे मागतो. पैसे मिळत नाही, म्हणून भीम्याच्या सांगण्यावरुन जमिनीची वाटणी मागतो. नकारानंतर कोंडी भावावर हल्ला करतो. त्यानंतर मात्र धोंडी घर जमीन सर्वकाही कोंडीच्या नावावर करुन देतो. शिवाय नवीन म्हशी घेण्यासाठी पाचशे रूपये देतो. पुढे विरक्त होऊन शेतात कष्ट करतो. दुष्काळात रोगराईने जनावरे दगावतात. धोंडीकडेही फक्त एक बैल शिल्लक राहतो. सरु काकांच्याकडून बैल आणून नांगरणी करण्याचा निर्णय घेते. तो धोंडीला मानवत नाही. म्हणून तो जमिनीची खोदाई करु लागतो. शेतात इर्जिक घालण्यास त्याचा विरोध असतो. स्वत:ला एका बैलाबरोबर नांगराला जुंपतो आणि रक्ताच्या उलट्या होऊन त्या मातीतच धोंडी प्राण सोडतो.

धोंडी हवालदार ही या कादंबरीतील महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. कोंडी, सारजा आणि सरु या त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींचे चित्रण करुन लेखकाने धोंडीची व्यक्तिरेखा जिवंत केली आहे. भिम्या या सामान्य व्यक्तीला खलपात्र बनविले तर किशा न्हावी, किसन्या, हुसन्या शिकलगार आणि त्याची आई, देवसिंग, तोपच्याची खेळणी विकणारी पत्नी, लका ढमाल्या, सका येसकर आरज्यामांग, गबा, गुरव, गणू ढमाला, घारेदादा, भुजा माळी, केरबा हाटकर, परशा लोहार, लक्ष्या न्हावी, जोशी बाबा, विठ्ठलशेठ आणि तुंगी गावातील अन्य स्त्रीपुरुषांचे चित्रण करुन लेखकाने समकालीन वास्तव चित्र रेखाटले आहे.

धोंडी हवालदार (गराडे) गावकऱ्यांच्या उपयोगी पडणारा सज्जन आहे. पूर्वजांवर, तुंगीगडावरील महादेव, गराडे घराण्यातील वीरावर आणि दहा एकर शेतावर त्याची श्रद्धा आणि भक्ती आहे. परिवर्तनाला विरोध करणाऱ्या कष्टाळू धोंडीची पीळदार व्यक्तिरेखा विलक्षण सामर्थ्याने रेखाटली आहे. गावकऱ्यांनी हवालदार म्हणावे म्हणून लोकांच्या कामी येणारा, बलुतेदारांना बलुतं घालणारा, प्राणिमात्रांवर प्रेम करणारा, कोंडीला प्रेमाने वाढविणारा, गावातील तंटे मिटविणारा, काळीत मृत्यू यावा ही इच्छा ठेवणारा, सरकारी नजराण्यावर खुश असलेल्या भोळाभाबडा, प्रेमळ, स्पष्टोक्ता, संवेदनाक्षम आहे. ''बाभळाच्या खुटासारखा उभा राहील. मोडेल पण वाकायचा नाही! त्याच्या मनात जुना पीक आहे हवालदारीचा, याची सारजाला खात्री असते.'' (पृ. ६३) सारजा धोंडीला ओळखून असते. ती देखील परंपरा जतन करु पाहणारी, कोंडीला आईचे प्रेम देणारी, त्याचे हट्ट पुरविणारी सोशीक समजदार स्त्री आहे.

कोंडी हा अंगापिंडानं पिकल्या निंबासारखा भरलेला, सारजाच्या प्रेमाने उंडगा झालेला, गरममाथ्याचा, परंपरा मोडणारा तरुण आहे. वाघोबाच्या जत्रेत कुस्ती

हरल्यानंतर स्वतंत्रपणे दुधधंदा करुन धोंडीच्या रोषास कारण होतो. पैशाशिवाय प्रतिष्ठा नाही. हवालदारकीच्या खोट्या प्रतिष्ठेला गावकरी हसतात याची जाणीव त्याला आहे. धोंडी विरुद्ध कोंडीच्या व्यक्तिरेखटनातून लेखक "जनरेशन गॅप" स्पष्ट करतो. कोंडी मुळात वाईट नाही तो परिवर्तनाला सामोरा जातो. धोंडी विरोध करतो म्हणून दोघांमध्ये संघर्ष होतो.

सरस्वती ही कोंडीची हुशार, धूर्त, समंजस, धोंडीचा मोठेपणा समजू शकणारी पत्नी आहे. भोळ्याबाबड्या धोंडीवर तिची भक्ती असते. नवऱ्याबद्दल थोडीशी अढी असते. ती शिकलेली असल्यामुळे कोंडीही तिचा तिरस्कार करतो. सारजेनंतर धोंडी आणि कोंडी यांना सांभाळण्याचे काम ती करते.

पडझड झालेला तुंगी किल्ला आणि झुंजारमाची या मावळ प्रदेशाची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. वडगाव मावळ, लोणावळा, चाकण असा गावांचा उल्लेख प्रदेशविशिष्ट आहे. पवनानदीच्या खोऱ्यातील लोकजीवन चित्रण आलेले आहे. भात, नाचणी, ज्वारी, बाजरी, हरभरा, खुरासणी, कांदा, लसूण, मेथी, शेपू, वांगी, मुळा, मिरच्या या पठारीप्रदेशातील पिकांचा, सायाळ, कोल्ही, डुक्कर इ. जंगली प्राण्याचा आणि आईन, बाभूळ, हिवर, पिंपरी, आंबा-जांभळ आणि करवंदाच्या जाळ्या इत्यादीच्या उल्लेखातून घाटावरील मावळ पठारी प्रदेशाला स्वतंत्र व्यक्तित्व लाभले आहे.

निसर्गवर्णनदेखील व्यक्तिंच्या मानसिकतेनुरूप केलेले दिसते. काही ठिकाणी निसर्ग एक पात्र म्हणून सजीव झाला आहे. त्याचप्रमाणे ऋतुचक्रांप्रमाणे बदलणाऱ्या निसर्गाचे जिवंत चित्रण लेखकाने केले आहे. आशावादी सारजाच्या मानसिकतेनुरूप आलेले निसर्गवर्णन पहा, "बाभळीच्या फांदीवर एक कावळा मोठ्या आशेनं ताटातल्या नागलीच्या भाकरीकडे पाहात होता..."(पृ.२३) शेतकऱ्याच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या निसर्गाचे वर्णन "ज्येष्ठ सारायला आला होता. आषाढ सुरु होणार होता. सारं रान उन्हाळाभर तापून निघालं होतं. लाहालाहा करीत होतं. चालताना पोटऱ्यांना त्याची धाप जाणवायची. धरतीला भेगा पडल्या होत्या. जणू तिनं तोंडचं वासलं होतं!

पण झाडझुडपं मात्र उतली मातली होती. काहींच्या अंगावर कोवळी पालवी झुलत होती. तांबूस, सोनेरी, कोवळी, लुसलुशीत. काहींचा तांबूसपणा, संपून गरगरीत हिरवा साज अंगावर साजत होता..." (पृ.६३ते६५) या दीर्घ निसर्गवर्णनातून घाटावरील लोकजीवनावरील प्रभाव स्पष्ट केला आहे. तर तुंगी गड पाहून हरखलेल्या सरुची मानसिकता या निसर्गवर्णनातून व्यक्त होते..." उन्हं पार कल्ली होती. उतरत्या उन्हात तुंगीगड, पलीकडे डोंगर, पवना, झाडझाडोरा, एकंदर सगळं दृश्य कसं सोनेरी रंगानं न्हात बसलं होतं. सरुला वाटलं, पटकन या दृश्याचं चित्र काढावं! ती हरपल्यासारखी ते सगळं पाहात उभी राहिली." (पृ.११२) मानवी जीवनावर

परिणाम करणारा निसर्ग येथे एक पात्र होऊन अवतरला आहे. तो आशयाशी एकजीव झाला आहे.

बैलपोळा, इर्जिक, जत्रेतील कुस्त्या इत्यादीमधून तुंगी गावच्या लोकांचे समूहजीवन चित्रण येते. धोंडीच्या विलक्षण वागण्यात परंपरागत पीळ आहे. प्राचीन काळापासून चालत आलेला गावगाडा मोडकळीस येतो, याचे दु:ख धोंडीसारख्याला होते. बलुतेदार आणि शेतकरी यांचे जिव्हाळ्याचे संबंध नष्ट होऊ लागले. शेतकऱ्यांकडून बलुत घेण्यासाठी बलुतेदार येत नाही. धोंडी मात्र बलुतेदारांचे बलुते स्वत: पोहच करतो. इर्जिकीच्या निमित्ताने समूह जीवनाचे चित्रण लेखक करतो. इर्जिक घालण्यापूर्वी विचार करावा असे भुजाबाला धोंडी सांगतो. अगदीच निरुपाय झाला, तरच इर्जिक घालावी असे सांगतो. स्वत:चे मशागतीचे काम सोडून भुजाबाच्या शेतावर लोक नांगर घेऊन येतात. हवालदाराच्या शब्दाला मान देतात.

समकालीन परिस्थितीमध्ये जातिभेद पाळला जात होता. मागासवर्गीय लोक प्रतिष्ठितांना जव्हार घालत. सका यसकर हवालदाराकडे जावयाविरूद्ध फिर्याद घेऊन येतो. पोळ्याच्या दिवशी बैलाच्या शिंगातील मानाचा नारळ किशा काढतो. कोंडी त्याच्या कानामागे देतो. परंतु रगेल किशा न्हावी कोंडीला मारत नाही. हवालदार घराण्याची अब्रू सांभाळतो. कोंडी-किशाची कुस्ती होऊ नये, हवालदार घराण्याचे आपण अन्न खाल्ले आहे म्हणून लक्ष्या प्रयत्न करतो. कोंड कुस्ती हरल्यानंतर वाद टाळण्यासाठी किशाला मुंबईला पाठवितो. त्याउलट कुस्ती खेळ आहे या दृष्टिकोनातून भावाचा पराजय मान्य करुन धोंडीतील हवालदार जागा होतो. किशाला उचलून घेऊन त्याला तो शाबासकी देतो. हवालदाराची अब्रू मनाचा मोठेपणामुळे उजळून निघते. सारजाचा आजार बळावला असता तुंगी गावातील सर्व आयाबाया आणि पुरुष हवालदाराच्या घरी जमतात. यातून गावगाड्यातील आपुलकीच्या भावनेचे दर्शन घडते. ग्रामस्थांच्या माणुसकीची कल्पना येते. यातून समूहभावनेचे-सामाजिकतेचे दर्शन घडते.

परिवर्तन काळामध्ये माणसंमधील माणुसकी नष्ट होऊ लागली. स्वार्थ वाढला. एकमेकांचे ऐकण्याची प्रवृत्ती नष्ट झाली. यावर धोंडीचा विश्वास नसला तरी कोंडीला मात्र याची जाणीव होते. तो म्हणतो, "रामराज्ये करावे म्हणावं। हवालदारीच्याच डौलात ऱ्हा। कुनी न का इच्यारीना। समदा गाव हसतो त्या हवालदारीला. पडक्या गडाचा हवालदार म्हंत्यात समदं।" (पृ.७) याचप्रमाणे शेवटी धोंडीवर कोंडी आणि साथीदारांनी हल्ला केला, त्यांना ओळखून धोंडी गावात बभ्रा होऊ नये म्हणून गप्प बसतो. कोंडीला गोरसविक्रीच्या धंद्याला विरोध करतो. उलट कोणताही धंदा वाईट नाही. चहाडी, चोरी, शिंदळकी लोक वाईट समजतात. घारे दादा सारख्या नगरपालिकेत पट्टेवाल्याची नोकरी करतो. उद्योग काय कंचाबी करावा असे ते कोंडीला सांगतात. पूर्वी मात्र धंद्याबद्दल प्रतिष्ठेच्या कल्पना ठरलेल्या होत्या. शिवाजीच्या काळात पराक्रम

करणाऱ्या घराण्यातील वारसदाराने दूध विकणे धोंडीला मान्य नसले तरी नव्या पिढीला त्यात काही विशेष वाटत नाही. दुधात पाणी घालून विक्री करताना त्यांना पाप वाटत नाही. शिक्षणाबद्दल जुन्या पिढीत तिरस्काराची भावना होती. जसे, मुलीचे लग्न करुन ओझे हलके करण्याची समाज परंपरा होती. घारेदादांना सरस्वतीला शिक्षण देणे मान्य नाही. तिचे लग्न उरकून टाकण्याचा निर्णय ते घेतात.

लोकजीवनावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक म्हणजे निसर्ग होय. दुष्काळ आणि रोगराईचा विपरीत परिणाम लोकजीवनावर होतो. कादंबरीच्या अखेरीस दुष्काळाचे वर्णन लेखक करतो. देशावरील शेती ही पावसावरील जुगार आहे याचे दर्शनही यातून घडते.

देशावरील लोकांच्या दारिद्र्यास प्राकृतिक रचनाच कारणीभूत असते. अवेळी पडणाऱ्या पावसामुळे आर्थिकदृष्ट्या हे लोक नेहमीच डबघाईला आलेले असतात. दहा एकर शेती असलेल्या धोंडी हवालदाराजवळ कोंडीचे लग्न करण्यासाठी पैसा नसतो. घर दुरुस्तीसाठीही त्यांच्याकडे पैसे नसतात. कर्ज काढून कोंडीचे लग्न करावे लागते. नव्याने म्हशी घेण्यासाठी सावकाराकडून कर्ज काढावे लागते. एका हवालदार घराण्याची आर्थिक परिस्थिती अशाप्रकारे डबघाईला आलेली दिसते. त्याप्रमाणे अन्य सामान्य ग्रामस्थांची आर्थिक परिस्थिती यापेक्षाही वाईट असलेली दिसते. भुजाबा माळ्याला इर्जिक घालावी लागते. एकूण या दुष्काळामुळेच देशावरील माणसांना मुंबईसारख्या उद्योगनगरीत जाऊन उदरनिर्वाह करणे सोयीचे वाटते.

पारंपरिक समाजजीवनाचे परिवर्तन आले असले तरी सांस्कृतिक जीवनामध्ये फारसा बदल झालेला दिसत नाही. गोरस विक्रीला धोंडीसारखा एखादा विरोध करीत असला तरी समाजाने त्याकडे दुर्लक्ष केले. परंतु स्थानिक देवदेवतांवरील श्रद्धा, काही अंधश्रद्ध, लोकसमज यांना या लोकजीवनात स्थान आहे. तुंगी गडावरील महादेवावर ग्रामस्थांची श्रद्धा आहे. तर वाघोबा हे तुंगीच्या लोकांचे कुलदैवत आहे. वाघोबा म्हणजे भैरव. ते जागतं दैवत आहे. सर्पदंश झालेल्या व्यक्तीला निंबाच्या पाल्यात देवळात ठेवले की पान उतरते असा लोकसमजातून संस्कृती घडलेली दिसते. धोंडीच्या शेतातील वीराबद्दल सर्वांची श्रद्धा असलेली दिसते. प्रत्येक सणाच्या वेळी तेथे निवद ठेवला जातो. पंढरीचा विठोबा आणि जेजुरीचा खंडोबा यांच्यावरही त्यांची श्रद्धा असलेली दिसते.

पोळ्याच्या वेळी बैलाच्या कपाळावरील नारळ सोडविण्याची प्रदेशविशिष्ट परंपरा आहे. नवसासायासाने मुले होतात अशी त्यांची समजूत आहे. विवाहविषयक पारंपरिक कल्पनाही आहेत. मीठ मिरच्यांनी दृष्ट काढणे, जनावरांना दृष्ट लागू म्हणून गंडेतोडे करण्याच्या परंपरेतून (पृ.७६) लोकसमजांचे दर्शन घडते. अतृप्त माणसांच्या पिंडाला कावळा शिवत नाही अशी अंधश्रद्धा आहे. आजाऱ्याच्या अंगाला वाघाची चरबी

चोळणे, मुरुडशिंगी, चिंचचा पाला आणि सादड्याची मुळीचे मिश्रण करुन औषध करणे. उलट्या पराची कोमडी उतरविणे आणि चव्हाट्यावर नेऊन आपटणे. लिंबू, शेंदूर यासारख्या जारणमारणाच्या गोष्टींवर त्याचा अंधविश्वास असल्याचे लेखक सांगतो.

नवऱ्याने मधूनमधून मारणे येथील स्त्रियांनी गृहीत धरलेले असते. यातून स्त्रियांच्या संस्कृतीची कल्पना येते. तर इर्जिकच्या निमित्ताने श्रम हलके करण्यासाठी लोकगीत म्हटले जाते, जेवणाचा बेत केला जातो, त्यातूनही संस्कृतीदर्शन घडते. उदा.

"गाईच्या नंदेना, उभा का ऱ्हायेना, तुजवरी झूल

चांदी रे सोन्याची, चवरी डुलते। चंदनी वाऱ्याची । (पृ.२६)

परंपरेबद्दल अभिमान (पृ.६९), स्वागतशील वृत्ती (पृ.९२), स्वप्नातील दृष्टांत (९९), या सर्वांमधून घाटमाथ्यावरील मावळ - पठारी प्रदेशातील लोकांच्या संस्कृतीचे चित्रण करुन लेखकाने सामूहिक जीवनदर्शन घडविले आहे.

देशावरील मावळी बोली भाषेतच लेखकाने कादंबरीचे निवेदन केले असून संवादही पात्रानुरुप वेगळेपणाने लिहिले असून, त्यातून व्यक्तिचित्रणही केले आहे. संवादामुळे कथानकाला गती मिळाली आहे. बोली भाषेतील काही नावीन्यपूर्ण शब्द, सरधा, औंदा, गमावली, दावला, वाईच, आकेती, इकत, येरवी, फावडं, पघतो, गागती, व्हाना, बिट्या याप्रमाणे विष्टेक, पेशल इ. इंग्रजी शब्दांचा वापर केलेला आहे. मेल्या, मुडदा, बायलीला सारख्या शिव्या आणि 'अंगापिंडानं पिकल्या निबासारखा गरगरीत भरलेला कोंडी' (पृ.७) किंवा... असा अडल्या गोऱ्ह्यावानी नगं करुस... यासारख्या उपमा प्रतिमा आणि समकालीन वास्तवाचे दर्शन घडविणाऱ्या म्हणी आणि वाक्प्रचारही लोकजीवनातून आलेल्या आहेत. उदा.

'फाटा फुटणे', 'येकाला उनं आन् दुसऱ्याला दुनं', 'हासतील त्याचे दात दिसतील', 'जळात ऱ्हायचं अनृ मगरीशी वैर धरायचं', 'वळचणीचं पाणी आढ्याला', 'मातीचा कुल्ला त्या का चिटकून का चिकटनार हाय?', 'हातच्या काकनाला आरसा कशापाई', 'बोलाचीच कढी, बोलाचाच भात', 'जीभ दाताखाली घावली, तर कुनी दात पाडाया का निघतं?' इ. मधून समाजवास्तवाचे दर्शनही घडते.

### ८) *'माचीवरला बुधा'*

गोनीदांची ही कादंबरी १९५८ मध्ये प्रसिद्ध झाली. मुंबईत हमाली करुन आयुष्य घालविलेला बुधा चऱ्हाटे अखेरीच्या पाचसात वर्षांच्या काळात वाडवडिलांच्या जन्मकर्मभूमी म्हणजे राजमाचीला येतो. प्राणी, पशू, पक्षी, वृक्षवेलीवर प्रेम करुन असमान्य जीवन जगतो. या संवेदनक्षम, सहृदय आणि मातृभूमीवर प्रेम करणाऱ्या निसर्गवेड्या माणसाची ही कथा आहे. कादंबरीला कथानक असे नाही. निसर्गवेडा बुधा काही प्रसंगातून

जिवंत केला आहे.

राजमाची किल्ला आणि त्याचे बालकिल्ले श्रीवर्धन व मनरंजन नांदते असताना चऱ्हाटे मंडळीकडे गडाचे पाणी राखण्याचे काम होते. पोटासाठी सर्वांनी गाव सोडले. बुधाच्या वडिलांनी उद्योगनगरी मुंबई जवळ केली. तरीही बालवयातील अनेक आठवणी बुधाच्या ठायी होत्या. सेवानिवृत्तीचा काळ मात्र त्याला मुंबईत असह्य झाला आणि चाळीतील सर्वांचा निरोप घेऊन राजमाचीला टेमराईलच्या पठारावर येऊन झोपडी बांधून राहिला. बापजाद्यांच्या जमिनीत श्रीवर्धनाच्या साक्षीने प्राण ठेवण्याचा निश्चय करतो. मुंबईला परत न जाण्याचा निर्णय घेतो. जमीन कसण्याचा, डोंगरदऱ्यांवरुन वाहणारा वारा प्यायचा, पावसाने भिजण्याचा निश्चय करतो. शेतीच्या मशागतीचे काम पूर्ण होताच एक दिवस ढगांना बरोबर घेऊन येणाऱ्या विमानांबद्दल जवळीक निर्माण होते. विजांचा गडगडाट होऊन पाऊस आल्याने बुधा संतुष्ट होतो. इरल विणण्याच्या उद्योगाला लागतो. विमानाच्या येण्याजाण्यावर बुधाचा दिनक्रम अवलंबून असतो.

खारुताईचा चिमुकला संसार सांभाळतो. सोबत म्हणून कुत्र्याचे पिल्लू पाळतो. बोंबल्याच्या मुलांच्या खोड्या, खेळ पाहात वेळ घालवतो. अभंग, गौळणी, वासुदेव, भूपाळ्या म्हणत बसतो. बिनमोल सुख देणाऱ्या निसर्गाचे बुधाला कौतुक वाटू लागते. एक आवळीचे रोपटे लावतो.. त्याची काळजी वाहणे हे एक नवीन काम करु लागतो. जखमी सरड्याशी, नांदुर्खीच्या झाडाशी बोलतो. रमतो. पावसाळा संपून हिवाळा सुरु होतो. तेव्हा बुधाचा मुलगा भिव्या त्याला भेटण्यासाठी येतो. त्याच्या गोतावळ्याबद्दल नाराजी दाखवून मुंबईला येण्याचा आग्रह करतो. बुधा नकार देतो. उलट पक्षांचा गोतावळा जमवितो. त्यांना सावा घालू लागतो. खारुताईसाठी नाचणीची भाकरी थापू लागतो. विरंगुळ्यासाठी बुधा एक बकरी पाळतो. तिचा संसार पाहण्यात सुख मानतो. भिव्याला अपत्य नसल्याचे आणि एकलेपणाचे दुःख या निसर्गाशी एकरुप झाल्यामुळे विसरतो. वणवा विझवताना त्याच्या अंगात शक्ती संचारते.

कोकणात जवानाचा कॅम्प आला. बुधाने त्यांना सोयरे मानले. सात दिवस त्यांचा दुरुन सहवास लाभला. त्यांची तो विचारपूस करु लागला. वावटळींनी धुमाकूळ घातला. जनावरांची राहूटी उडाली. तेव्हा बुधा हसतो आणि म्हणतो, "बरं का सोयरे। ह्ये आसंच असतंय आमच्या रहाळाचं काम।" (पृ. १०३) यातून कोकणघाटामाथ्यावरील उन्हाळ्यातील प्रदेशवैशिष्ट्येच बुधा ओरडून सांगतो. हा कॅम्प परतल्याने बुधाला एकाकीपण जाणवते. भावविश्व उद्ध्वस्त होते. त्यादिवसापासून विमान यायचे बंद होते हा मोठा धक्का त्याला बसतो. पाचसहा वर्षे साथ दिलेल्या कुत्र्यावर आणि स्वतःवरच तो चिडतो. कुत्र्याला रट्टा देतो. मानी कुत्रा दूर जाऊन बसतो. बुधाला जेवण्याची इच्छा होत नाही. मानी कुत्रा मालक न जेवल्यामुळे भाताला तोंड लावत

नाही. प्रथमच तो झोपडीबाहेर राहिला. बुधाने बकऱ्यांचेही दुर्लक्ष केले. तो हळूहळू विरक्त होऊ लागला. जवानांचे परतणे, विमान न येणे या गोष्टींमुळे तो जखमी झाला. त्याच्या जीवनक्रमात खंड पडला. कुत्रा, घार, खार, बकरी आणि स्वत:वर तो संतापला कारण त्यांच्या नैसर्गिक जीवनात काहीच बदल झाला नव्हता. पण बुधाच्याजीवनात बदल झाला होता. अशावेळी त्याच्या कुत्र्याला वाघाने ठार मारले. त्याच्या भावविश्वाला भगदाड पडले. बकरीच्या गळ्यात पडून तो म्हणतो, ''बाये, आपला कुत्रा ग्येला - म्यां चांडाळानं त्याला मारला।''(पृ.११३) यानंतर तो खचला. मुंबईला जाण्याचा विचार त्याच्या मनात येऊन गेला.

पावसाळा सुरू झाला. मुरदाड मनाने त्याने शेतातील काम पूर्ण केले. मालकाच्या दृष्टीने निरुपयोगी ठरलेली म्हैस बुधाच्या आश्रयाला आली. तिला त्याने औषधपाणी केले. तिने बुधाच्या पायावर पाय देऊन त्याला जखमी केले. त्याला रात्री ताप भरला. कनकन आली. दरडीवरुन खाली दरीत कोसळलेल्या म्हशीला वर काढण्यासाठी उतरत असताना शेवाळलेल्या दगडाहून घसरुन बुधा चांगलाच जखमी झाला. वनचर सोयऱ्याचे स्वागत करु शकलो नाही याचे दु:ख त्याला झाले. पाचदिवस पाऊस उघडला नाही. पाचव्या दिवशी सर्व गोतावळा मागे ठेऊन बुधा स्वर्गवासी झाला. असे बुधाच्या जीवनातील आशानिराशांचे-फुलणे-कोमेजण्याच्या प्रसंगातून कादंबरी आकाराला आली आहे. कहाणीमागची कहाणी लिहताना गो. नी. दा. म्हणतात, ''तर असे हे बुधाचे सुखान्त जीवन. ते बुधाचे नव्हे, माझे स्वत:चे आहे. माझ्या जीवनाच्या सायंकाळाचे ते स्वप्न आहे. ते मी भरभरुन चितारले आहे. किंबहुना बुधा हा एक स्वप्न साक्षात्कार आहे. तो शब्दांकित करता येणे हे भाग्याचे लक्षण आहे.''३१. कादंबरीच्या शेवटाला तशीच दादही मिळाली. गोनीदा म्हणतात, ''शिरीष पैंच एक पत्र आलं-''बुधा मला फार आवडला... आणि मुख्यत: आवडले बुधाचे मरण. माझे मरण बुधासारखे असावे...'' असा काहीसा त्या पत्राचा आशय होता.''३२. यावरुन बुधाच्या परिणामकारतेची कल्पना येते. ही कादंबरी कलात्मकतेची 'माची' गाठते असा गौरव विद्याधर पुंडलिकांनी केला आहे. ''बुधा नावाचा एकसामान्य पण तरीही एक ध्यास घेतलेला वनवासी आपल्या भोवतालच्या सृष्टीशी एकरुप होऊन तिच्यात कसा विलीन झाला. इतकी साधी अन् एकमार्गी अशी ही कहाणी नाही. या कहाणीत एक मोठा ताण आहे. एका बाजूला सृष्टीशी तदाकार होण्याची माणसाची अनिवार ओढ, अन् दुसऱ्या बाजूला त्यामुळे निर्माण होणारा, माणसाचा एकाकीपणा ह्यामध्ये अंगभूत असा हा ताण आहे. आणि या ताणामुळे ह्या कादंबरीला एक विलक्षण वजन प्राप्त झाले आहे.''३३. हा विद्याधर पुंडलिकांचा अभिप्राय सार्थ आहे. कारण आयुष्यभर जमविलला गोतावळा सोडून आयुष्याच्या अखेरीस नव्या गोतावळ्याशी बुधा समरस होतो. एकाकी जीवन जगतो. विरक्त होऊन मृत्यूला कवटाळतो.

कादंबरीत बुधा चऱ्हाटे ही एकच प्रधान व्यक्तिरेखा आहे. भिव्या हा मुलगा, मुंबईतील हितचिंतक, पठारावरील बोंबल्या आणि त्यांचे कुटुंबीय, मिलिटरी जवान, ही मानवी सृष्टी, विमान, बिबट्या, आवळी, सरडा, चिमण्या, सातबत्या, मैना, न्हावी, बुलबुल, भोरड्या, घार हे पशूपक्षी; कुत्रे, बकरी, म्हैस ही बुधाची अलौकिक प्राणीसृष्टी आहे. या सर्वांवरील बुधाचे प्रेम चित्रित करुन एक विलक्षण जिवंत व्यक्तिरेखा दांडेकरांनी रेखाटली आहे. येथील पशुपक्षांना व्यक्तित्व लाभले. आहे. या सर्वांच्या समूहजीवनाचे ती चित्र आहे. निसर्गप्रदेश आणि व्यक्तीमधील परस्पर सुसंवादाचे-एकरुपतेचे हे चित्र आहे.

बुधा चऱ्हाटे शांत, सत्त्वशील, साधाभोळा, अध्यात्माशी नाते असलेला, निरक्षर म्हातारा गोनीदांनी रेखाटला आहे. मुंबईच्या धकधकीच्या जीवनाला कंटाळलेला, डोळ्यात फूल पडलेला, दुसऱ्या डोळ्याला कमी दिसू लागलेला, बुधा किल्ले राजमाचीला येतो. निसर्गदर्शनाने खुलतो. लेखक त्याच्या सामान्यत्वाचे वर्णन करतो, "...बुधाच्या पागोट्याचं, लांबसर नाकाचं, गालावरच्या मसाचं, आठ्या रेखाटलेल्या कपाळाचं, लांब लांब मिशांचं, त्याच्या लालसर स्वच्छ धोतराचं..." (पृ.१०) या पार्श्वभूमीर त्याचे असामान्यत्व साकार केले आहे. भाविक, अबोल, मितभाषा, निसर्गवेडा, प्राणिमात्रांवर प्रेम करणरा संवेदनशील, सहृदय, स्वत:शी, प्राणीपशूपक्षी आणि झाडाझुडपांशी बोलणारा, कोळ्याच्या जाळ्याचे कौतुकाने पाहणारा, वणवा विझविणारा, माणसांच्या कोलाहलाचा उबग आलला तरीही माणूस म्हणून अलिप्तपणे जवानांची गंमत पाहणारा, वनचर सोयऱ्याचे स्वागत करता न आल्याने दु:खी झालेला विरक्त बुधा झोपडीत मरुन पडतो.

बोंबल्या हा बुधाच्या गावचा, स्वत:ला किल्लेदार समजणारा, सामान्य माणूस आहे. भिव्या घड्याळाच्या काट्यावर लक्ष ठेवून जगणारा, बुधाच्या गोतावळ्याबद्दल अनादर असलेला स्वार्थी, मतलबी आहे. तुकदा हा बुधाच्या शेजारी आहे. जुन्नरची म्हातारी ही तुकदाची बहीण आहे. झोपडी बांधण्यास आणि शेती करण्यास मदत करणारा, बुधाच्या डोळ्यावर झाडपाल्याचे औषधोपचार करणारा ठाकर हे मानवीसृष्टीतील आहे.

विमानाशी बुधाचे ऋणानुबंध निर्माण करुन, त्यालाही लेखकाने व्यक्तित्व बहाल केले आहे. ढगांना बरोबर घेऊन आल्यामुळे विमानाबद्दल जवळीक निर्माण झाली. त्याच्या जीवनाचे विमान अविभाज्य अंग बनले. ते यायचे बंद झाल्याने बुधाचे भावविश्व उद्ध्वस्त होऊ लागले.

बिबट्यालाही येथे व्यक्तित्व लाभले आहे. "...भारी द्वाड जात. लुकत छिपत येईल. पाऊल वाजू द्यायचा नाही. चाहूल लागू द्यायचा नाही. येईल, अन् हळूच गाईच्या शेजारी डोळे मिटून बसलेलं वासरु उचलून घेऊन जाईल. निघताना, जातो

असं सांगायचासुद्धा नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी पाहावं तेव्हा वासरु गेल्याचं लक्षात यायचं.'' (पृ.३३) वाघरु लबाड माणसाचे प्रतीक म्हणून येते. तर वृक्ष-वेली, पशुपक्षी, प्राणी हे बुधाच्या गोतावळ्यातील नि:स्वार्थी मित्र आहेत. त्यात आवळीबाईसारखी लेक आहे. कुत्रा, सरडा, खार, चिमण्या इत्यादी आहेत. प्रत्येकाचे स्वतंत्र व्यक्तित्व आहे.

राजमाची किल्ला, किल्ल्यावरचे टेमलाईचे पठार आणि भोवतालचे जंगल, त्याच्या समोरचे श्रीवर्धन व मनरंजन किल्ल्याचे तट, एक बाजूला तळकोकणची दरी आणि दुसऱ्या बाजूला खंडाळा, लोणावळ्याचा रेल्वेमार्ग. हा प्रदेश 'माचीवरला बुधा' मध्ये लेखकाने कादंबरीच्या पार्श्वभागी रेखाटला आहे. या प्रदेशाला व्यक्तित्व लाभले आहे. डोंगर-किल्ले, पर्वतकडे, दऱ्या, खाचरं तळ्याचे जिवंत चित्र रेखाटले आहे. खैर, सौंदड, अडुळसा, मोह, हिरडा, आईन, पिंपळ, पिंपरी, जांभूळ, उंबर, पांगारा, निगडी, आवळी, आंबे, करंजी, किजळ, येकली, टेंभुर्णी, नादुर्खी, पळस, हिरणबेट, बांबूचे बेट इ. वृक्ष तर वाघ्याची कवढाळं, जांभुळकी, रानजुई, रोमट्याची पिवळी, घाणेरीची, कारवीची, सोनकीची, तेरडा, चवेणी, नागपुष्पी इ. लतावेली तर वटवाघूळं, घार, खार, चिमण्या, कोल्ही इ. पशूपक्षी आणि भात, नागली, साव, खुरासनी, वाल इत्यादींच्या उल्लेखातून घाटमाथ्यावरील आणि तळकोकणातील प्रदेश जिवंत केला आहे.

ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणाऱ्या निसर्गाचे चित्रण प्रस्तुत कादंबरीमध्ये लेखकाने केले आहे. निसर्ग आणि माणूस यांचे अन्योन्य संबंध त्यातून स्पष्ट होतो. पर्वतकडे, दऱ्या, तळी, भातखाचरं यांनाही व्यक्तित्व लाभले आहे. दांडेकरांच्या स्पर्शाने उंबरालाही व्यक्तिव लाभले आहे.

''पठाराच्या मध्यावर एक भलं थोरलं उंबराचं झाड आहे... उंबराच्या तळाशी एक दगडी रांजण आहे. आता तो पार मातीत बुजून गेला आहे. त्याच्यवर शेवाळही उगवलं आहे. त्याच्या काठाचा तुकडा पडला आहे...'' (पृ.११-१२)

बुधाच्या मानसिकतेनुरूप पावसाळ्याचे काढलेले चित्र,

''सूं ऽऽ आवाज करीत थेंब आले. ते बुधाच्या डुईवर उतरले. खांद्यावर, कपाळावर, नाकावर, मिशांवर... एके दिवशी पाऊस थोडा उबाला आहेसं पाहून तो रानात शिरला. रान सगळं ओलचिंब झालं होतं... पण पहिला पाऊस पिताच त्या ठोंबातून लवलवीत कोंब बाहेर पडले होते. होता होता प्रत्येक ठोंब गरगरीत दिसू लागला होता. पानी एकात एक मिसळून गात होती.'' (पृ.३०-३१) पावसामुळे पीक चांगले आले. त्याकडे पाहून सुखावलेला बुधा निसर्गदृश्याधारे रेखाटला आहे. तर तळकोकणातील हिवाळ्यातील निसर्गाचे चित्र,

''काल संध्याकाळी त्यानं कड्याखाली पाहिलं हों, तेव्हा त्याला खाचरं दिसली

होती. घरं दिसली होती. झाडं दिसली होती. पाण्याचे ओहोळ दिसले होते. खाचरांतून पेरलेले वाल दिसले होते. भाताच्या उडवयाही दिसल्या होत्या. सगळं ठिकच्या ठिकाणी होतं. काही सुद्धा जागा सोडून हललं नव्हतं.

अन् आता त्यातलं काहीच दिसत नाही। एक पलीकडला डोंगर, की एक अलीकडला. मध्ये सगळा धुईचा समुद्र आहे... बघ लेका। देवाचं कवतिक।''(पृ.६६) निसर्गाच्या सुंदर देखण्या रुपाप्रमाणे उन्हाळ्यातील भीषण-रौद्र निसर्गाचे चित्रण गोनीदांनी केले आहे.

''उन्हाळ्याचे वारे सुरु झाले. दिवसभर ते घुमत. भुतासारखे घुमत... हिवाळा सरता सरता पतझड सुरु झाली होती. सगळी झाडं उघडीबोडकी दिसू लागली होती. बारक्या झुडपांचं काही तेवढसं जाणवंत नव्हतं. पण मोठाली झाड पार भुतासारखी दिसायची, नुसमं सें हातपाय.''(पृ.८३)

''अवचित कुठं तरी वावधूळ उठायची. अगोदर तिथं काहीच नसायचं... वावधूळ पुढंच धावायची. निरनिराळ्या झाडांना शिवत एखाद्या नाचऱ्या पोरीसारखी. बरोबर घेतलेलं काहीबाही मागं टाकायची. आपण पुढं निघायची. कुणासाठी थांबून राहायला तिच्याजवळ वेळ नसायचा.'' (पृ.८६)

मानवी जीवनावर बरेवाईट परिणाम करणाऱ्या निसर्गाचे वर्णन लेखकाने केले आहे. दांडेकरांचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बुधावर आरोपीत केला आहे असे सतत वाटत राहते. दांडेकरांना भावलेल्या निसर्गाचे हे चित्र आहे. लेखकाच्या आत्मानुभूतीतून ते साकार झाले आहे.

निसर्गासक्त बुधाचे अलौकिक जीवनचित्रण करताना लेखकाने समाजवास्तवाचे काही घटना-प्रसंगातून चित्रण केले आहे. प्राणी-पशू-पक्षी वृक्षवेलींच्या गोतावळ्याप्रमाणे बोंबले, ठाकूर, बुधा आणि भिव्या यांच्या निमित्ताने मानवी जीवनाचे दर्शन लेखक घडवितो. जसे, मुंबईहून आलेल्या बुधाला ठाकरांचा खेळकरपणा, त्यांच्या जीवनातील सहजता जाणवते. ठाकरणी मणामणाच्या लाकडाच्या मोळ्या, दहाबारा मैल डोक्यावर वाहून नेऊन अल्पदरात विकून तेलमिठाची सोय करतात. हसतात, खिदळतात, दारिद्र्याची लाज नाही, श्रमाचे दुःख नाही, अशा प्रकारे मावळ पठारावरील ठाकरांच्या वास्तवजीवनाचे चित्र दांडेकर रेखाटतात. त्याचप्रमाणे देशावरील लोकांना प्रतिकूल निसर्गामुळे उद्योगनगरीकडे धाव घ्यावी लागते. जसे, शिवकाळमध्ये किल्ल्याचे राखण करणाऱ्या किल्लेदार किंवा अन्य रोजगार करणाऱ्यांच्या पुढील पिढ्यांना मुंबईला जावे लागले जसे बुधा चऱ्हाटांच्या वडिलांना चाकण, जुन्नर, मंचर आणि शेवटी मुंबई या ठिकाणी पोट भरण्यासाठी जावे लागते या प्रसंगातून सूचित केले आहे.

शहरीजीवन आणि ग्रामीण जीवन यांची बुधा तुलना करतो. यातून समाजवास्तवाचे

दर्शन घडविले आहे. खेड्यातील कष्टमय जीवन आनंददायक आहे असे बुधाला वाटते. त्याचा मुंबईची माणसं कापडाच्या बाहुल्यासारखी वाटतात. त्यात कृत्रिमता आहे. तर खेड्यातील जीवन अधिक नैसर्गिक स्वाभाविक आहे. हसत खिदळत कष्ट करुन पोटभर खाणाऱ्यांचे ते जग आहे, ते नि:स्वार्थी आहे. भिव्याला बुधा म्हणतो,

"भिव्या, आर तू मघा म्हंगालास, का बिराऱ्या गावाचा गोतावळा गोळा क्येला। ल्येकरा, हाये तर खरंच। पर आसं पघ, का घागरताई आन उंबरबाबा, दोघंबी कधी धडूत मागाया येत न्हाईत, का ज्यावाय। धिलं न्हाई, म्हनून रुसत न्हाईत। उंबरबाबा आपली शितळ सावली मातर रातदीस झोपडीवर धरुन हुबा हाये। असा बंदुराजा कुटं मिळलं का? आ?...

मुंबईच्या मानसांना काय करीतोस। आर, कुनीबी कामाला यायचा न्हाई। पैका हाये, तंवर समदे बुधादा बुधादा करीतील। त्यो सपल्यावर कुनी वळखबी दावायचा न्हाई।"(पृ.६२) याप्रमाणे शहरी माणसाची स्वार्थीवृत्ती तर निसर्गाच्या नि:स्वार्थी वृत्तीवर लेखकाने प्रकाश टाकला आहे. शहरातील महिला जागृती, अधिकऱ्यांचा भ्रष्टाचार, स्वार्थीवृत्ती याबद्दल लेखकाने मधूनमधून भाष्य केले आहे, त्याचप्रमाणे ग्रामीण जीवनातही व्यवहारी-हिशोबी माणसं वाढत आहेत हे एका घटनेच्या निमित्ताने रेखाटले आहे. जसे, म्हाताऱ्या डोबडाची मालकाला काळजी वाटत नाही. फुकट चारा घालावा लागतो. खाटकाला विकता येत नाही. यातून लेखक खेडूतांच्या परिवर्तनकाळातील हिशोबीवृत्तीवर भाष्य करतो.

मावळ पठारावरील लोकांच्या श्रद्धासमजुती लोकविश्वासाचे वास्तव चित्रण लेखकाने केले आहे. तुकोबा ज्ञानोबांचे अभंग या निरक्षरांचे मुखोद्गत आहेत. भजन, गौळणी, ओव्यांचा नित्यपाठ ते करतात. श्रीवर्धन मनरंजनच्या मधोमध बहिरोबाचं देवस्थान आहे. या जत्रेसाठी मुंबईतील लोक दरवर्षी येतात. बकरे कापतात. गोंधळ घालतात. गावचा राखणदार मानतात. भुताखेतावर त्यांचा विश्वास आहे. परंतु बहिरोबा असेपर्यंत ते काही करु शकत नाही असा लोकसमज आहे. बुधाची झोपडी तयार झाल्यावर बहिरोबाला निवदबोण केले जाते, "दोन्ही बालेकिल्ल्यातल्या बहिरोबापुढं त्याचा घोडा आहे. बुधानं ऐकलं की तो घोडा तीळतीळ पुढं सरत होत. दर वर्षाला तिळभर. तो देवळाला जाऊन भिडला, अन् त्यानं देवळात पाऊल घातलं की मग साती समुद्र उसळणार होते."(पृ.६४) अशा प्रकारे लोकसमज आहे. टेमलाईच्या पठारावर एक मोठ्ठ जनावर आहे, त्याच्या अंगावर बोट बोट केस आहेत. त्याच्या कपाळावर एक मणी आहे. तो मणी रात्रीचा झगमगतो. त्याच्या प्रकाशानं सगळं रानं उजळतं."(पृ.१०५) अशा प्रकारची लोकसमजूत आहे. पिंपळावरील मुंजाबा बुधाला वश आहे. यासारख्या लोककथा-लोकविश्विासातून तेथील लोकजीवनास आकार आला आहे. आयुर्वेदावर लेखकाचा विश्वास आहे. तो काही घटनांमधून व्यक्त होतो. जसे ठाकराने केलेले

झाडपाल्याच्या औषधाने बुधाला दिसायला लागणे, वणवा विणवताना भाजलेल्या ठिकाणी बुधा दगडीच्या पाल्याचा लेप लावतो किंवा म्हशीच्या जखमेवर बुधा हळद लावतो इत्यादी.

कादंबरीचे निवेदन संवाद मावळी बोलीत आहे. अनेक नावीन्यपूर्ण शब्द प्रदेशविशिष्ट मावळी बोलीतील आहे. जसे वले, पावटी, झांप, तुपल्या, कंचं, आउशीद, उचाटल्यावानी,उमगा, खळगुट, घुई, भगुलं, हरीख, णाड्याला, गागत, आवंतरणं, रहाळं, येड्यावानी, गदळ, बुकणी, डोबड ईळभर, इ. सुकाळीच्या, बायलीला या शिव्या तर जीव भांड्यात पडणे, सोय जाणेल तो सोयरा इ. म्हणी वाक्प्रचार आणि उपमा प्रतिमातून प्रदेशविशिष्ट लोकजीवनाचे वास्तवदर्शन घडते. उदा. "(ढग) एका अंगात ते आभाळांत पुढं घुसले. नांगराच्या फाळासारखे पहारीच्या टोकासारखे. करकोच्यांची झुंज आकाशात घुसत पुढं झेपावते तसे." (ढग) जसं गिरणीच दार उघडून माणसांचा लोंढा बाहेर धावतो. नजर ठरत नाही, तसे ते एकमेकांच्या अंगावर कोसळत पुढं धावत होते." "काळवंडलं असूनही या चमचमाटानं ते आता देखणं दिसू लागलं. काळ्या तोंडाच्या वानरानं दात विचकावेत तसं." (वावटळी) मथणीत रवी गरगरा फिरते, तशा त्या एकाच बाजूला भोवंडत." "(पळसपाने) जणू काय काय विठुब्बाचे वारकरी खांद्यावर भगव्या पताका घेऊन पंढरीस निघाले आहे।" '(कुत्रा) नरड्यात मुसाळ घातल्यावानी वरडतो." "गर्भवतीसारखा तो रोपा पिवळसर दिसत होता...

'पडघवलीत' उत्तर रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळपट्टा, तर 'पवनाकाठचा धोंडी' आणि 'माचीवरला बुधा' मध्ये मावळ पठारप्रदेश जिवंत केला. त्याचप्रमाणे 'पूर्णामायाची लेकरं' मध्ये विदर्भातील पूर्णामायच्या खोऱ्यातील लोकजीवन साकार केले.

### ७) व्यंकटेश माडगूळकर

#### *(१) "बनगरवाडी" - 'माणदेशातील मेंढपाळांचे जीवनदर्शन'*

व्यंकटेश माडगूळकरांनी 'पुढचं पाऊल' (१९५०), 'बनगरवाडी' (१९५५), 'वावटळ' (१९६४), 'कोवळे दिवस' (१९७९), 'करुणाष्टक' (१९८२) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'बनगरवाडी'तून माणदेशातील मेंढपाळाचे निसर्गाश्रित जीवनदर्शन घडविले आहे. प. महाराष्ट्रातील विटे-आटपाडी या अवर्षणग्रस्त डोंगराळ प्रदेशातील कोणत्याही खेड्यातील 'धनगरवाडी' डोळ्यापुढे साक्षात करण्याचे सामर्थ्य 'बनगरवाडी'त आहे. माणदेशातील या वाडीचे सामूहिक जीवनदर्शन लेखकाने घडविले आहे. 'बनगरवाडी'ला कथानक असे नाहीच. धनगरांच्या पोरांना 'गभमन' शिकविण्याचा प्रयत्न करतो. वाडीतील धनगरांच्या जीवनाशी समरस होतो. दुष्काळामुळे जगण्यासाठी मेंढराबरोबर धनगर परगावी जातात. मास्तरही वाडी सोडून परत जातो, एवढेच खरे

तर कथानक आहे.

'बनगरवाडी'त संपूर्ण गाव आणि प्रदेशच प्रमुख पात्र असल्यामुळे कुणाही एका पात्राला प्रमुखपात्र मानता येणार नाही. ती धनगरांच्या समूहमनाचा गजर आहे. त्यांच्या सुखदु:खाचा, दैनंदिन घटनाप्रसंगातून, ऋतुचक्रानुक्रमे पुढे सरकते. हिवाळा-पावसाळा त्यांच्या दृष्टीने आनंददायक तर उन्हाळा-दुष्काळ तापदायक आहे. कथानकात विस्कळीतपणा जाणवतो. याचे कारण धनगरांच्या जीवनातच शोधावे लागते. काही व्यक्तिचित्रे ठसठसीत रंगविली असली तरी अरविंद मंगरुळकर म्हणतात त्याप्रमाणे, "कोणत्याच व्यक्तीचा 'विकास' झालेला आढळत नाही... ज्या मातीत ती जन्मली तिचे रंग-रुप कस-हीण ती घेते, पण ती व्यक्ती प्रथम भेटते, जवळजवळ तशीच ती कादंबरीच्या अखेरीसही दिसते."३४. हे विधान यथार्थ वाटते. कारण ही वस्तुस्थितीच आहे. मात्र एखाददुसऱ्या व्यक्तीचा विकास येथे अभिप्रेत नाही, तर समूहजीवन दर्शनाची प्रेरणा महत्त्वाची आहे. प्राप्त परिस्थितीत जगावे कसे याचाच विचार करणारे शहरापासून दूर असणारे धनगरांचे प्रतिनिधित्व दादू बालट्या, कारभारी, रामा बनगर, काकुबा, शेकू, शेकूची बायको, कारभाऱ्याची तरुण मुलगी अंजी, बाळा बनगर करतात.

दादू बालट्या खलप्रवृत्तीचा, बेरकी माणसाचा नमूना आहे. वाडीवर आपले वजन असावे असे त्याला वाटते. माडगूळकर त्याचे वर्णन करतात, "त्याच्या डोक्याला तांबड्या रंगाचा पटका होता. अंगात गोल सदरा. धोतराच्या टोकाबरोबरच एक उंच भालाही त्याने हातात धरला होता. त्याचा चेहरा मोठा आणि लांबोडका होता. गालाची हाडे वर आली होती. नाक सरळ होते. मिशांतले केस काळे करडे होवून धुरकटल्यासारखे दिसत होते."(पृ.४) असा हा दादू टिवल्या-बावल्या करणारा, थोडा शिकलेला व तालुक्याच्या अधिकाऱ्याशी उठबस असलेला चित्रित केला आहे. पण तोही सामान्य माणूसच आहे. मास्तर त्याला 'अंडीवाला' वाटतो. पोरांना शिकवायचे सोडून गावात उद्योग न करण्याचा सल्ला तो मास्तरला देतो. त्याच्या व्यक्तिरेखेतून धनगराचा तांबडा पटका, गोल, सदरा, धोतर असा पोशाख असल्याचे सूचित केले आहे. धनगराच्या हातात भाला किंवा कुऱ्हाडकाठी असते हे प्रदेशवैशिष्ट्ये सांगितले आहे. उन्हात मेंढरामागे फिरल्यामुळे त्यांचे केस काळेकरडे धुरकटल्यासारखे असतात.

म्हातारा कारभारी त्या मातीतला. अंगकाठी सडसडीत, काळाभोर, पांढऱ्या भुवया, लांब मिशाचा दाढी वाढलेला उघडाबंब फिरणारा म्हातातरा आहे. वाढलेली दाढी, पायावरील फरकाटे धनगरांचे गबाळेपण स्पष्ट करतात. मास्तरांना 'बाळा' म्हणण्यातून त्याचा प्रेमळपणा दिसतो, तर शाळा सुरु व्हावी, तालीम बांधली जावी म्हणून तो पुढाकार घेतो. यातून त्याची ग्रामविकासाची दृष्टी स्पष्ट होते. तो सामान्य माणूस

असल्यामुळे राग-द्वेषांनी तो युक्त आहे, पण सत्यासत्याची तो पारख करु शकतो. औंधच्या राजाने पाठीवर हात ठेवताच 'कृतार्थ' होतो. 'मरण'जवळ आल्याचे समजताच, तो ग्रामस्थांची क्षमायाचना करत सर्वांचा निरोप घेतो.

'काकुबा'ला कुत्र्याप्रमाणे लांडग्याचा वास येतो. मेंढराची पैदास तो बरोबर ओळखतो. बसल्याबसल्याच झोप घेणारा, मेंढरामागे फिरण्यात हयात गेलेला काकुबा तर गावपंढरीशी वैर मांडणारा बाळा बनगर त्याच खेड्यातला आहे. आयबू, रामा बनगर, अंजी यांच्याप्रमाणे शेकूची बायको नानी एक सामान्य स्त्री. तिच्या सुखदु:ख आशानिराशासह लेखकाने ती साकार केली आहे. ती पठाणी, कुरुप, उंचधंडग, पुरुषाच्या बरोबरीने काम करणारी नव्हे बैलाबरोबर टिपण ओढणारी, ती कष्टाळू, भोळी तितकीच हळव्या मनोवृत्तीची आहे. समाजाच्या भीतीपोटी तिला नवऱ्याचे अंजीशी चालले चाळे आवडत नाहीत. देवाच्या मनात असेल तर म्हातारपणी मूल होईल अशी ती आशावादी, तर नवऱ्याला दटविण्याची जबाबदारी मास्तरवर टाकणारी भोळीभाबडी आहे. अंजी दुसऱ्या मेंडक्याचा हात धरुन निघून जाते. तिचा नवरा माघारी येतो तेव्हा 'आलं आमचं खूळं परत' अशा शब्दात आपला आनंद व्यक्त करते. प्रस्तुत कादंबरीतील स्त्रीपुरुषांच्या जीवनातील प्रदेशविशिष्ट रोखठोकपणाच लेखकाने वर्णन केला आहे. हळुवारपणाला येथे जागाच नाही.

'मास्तर'च्या व्यक्तिरेखेशी प्रत्यक्ष सर्वच व्यक्तिरेखांचा धागा लेखकाने जोडला असून मास्तरच्याद्वारे माडगूळकरच वाचकांशी हितगुज करताना दिसतात. मास्तर स्व-कर्तव्याबरोबर धनगरांच्या जीवनातील सुखदु:खाशी समरस झालेले दिसतात. वांगीच्या लोकांना परत पाठविणे, गावात तालीम बांधणे, लोकांचे पत्र टाकणे, अंजीची चोळी शिऊन आणणे यासारखी कामे गावकऱ्यांसाठी मास्तर करतात. सामान्य बुद्धीमत्तेचा, परोपकारी, सज्जन आणि प्रेमळ असे मास्तर येथे भेटतात.

विटे-आटपाडी ह्या औंध संस्थानातील डोंगराळ प्रदेशाची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. रणरणते ऊन, रखरखणारे वाळवंट, कशीबशी उभी असलेली खोपटवजा घरे, खाली मान घालून रस्त्याची धूळ उडवित निमूटपणे चालणाऱ्या मेंढ्या, कोंबड्या, कुत्री, जनावरे व त्यांच्या पाठीमागून घुंगरु बांधलेल्या काठ्या खांद्यावर घेवून चालणारे धनगर या सर्वगोष्टींतून भू-प्रदेश जिवंत होतो. बनगरवाडीतील धनगरांच्या जीवनालाच त्या ओसाड, भयाण माळरानावरील विशिष्ट भू-प्रदेशाने व तेथील निसर्गाने एक विलक्षण आकार दिला आहे. ऋतुचक्राचा 'माणदेशा'तील धनगरांच्या लोकजीवनावर परिणाम होतो, बाभळीची झाडे, तरवड, नेपती, बोराटीची झुडपे, मुरमुट्यावरील हिरवे भुंगे, गाडीवाट उललेली जमीन या खास माणदेशातीलच आहे. कादंबरीच्या प्रारंभीचे वर्णन (पृ.१ते३) प्रदेशविशिष्ट आहे. किड्यामुंग्या, टोळ, गुंडी किडे, घोरपडीचे जग लेखकाने जिवंत केले. उजाड माळरान, बाजरीची तांबडी राने,

मोकळा माळ आणि तेथील छप्परांची, धाब्यची घरे, पाण्याची वरड, उन्हाळ्यातील रखरखीतपण आणि पावसाळा (पृ.२९) तसेच तेथील पीक-पाण्याचे वर्णन 'प्रदेश'जिवंत करते. भू-वैशिष्ट्यांनी आणि निसर्गानेच धनगरांचे लोकजीवन नियत केले आहे. बापट-गोडबोले यांनी 'बनगरवाडी'च्या पार्श्वभूमीविषयी म्हटले आहे,

"...हेतुपुरस्सर एक विशिष्ट प्रदेश आपल्या कादंबरीसाठी निवडला. या प्रदेशाबद्दल त्यांना विशेष आत्मीयता वाटत होती. या भू-प्रदेशाशी त्यांचा चांगला परिचय होता. तेथील मातीत ते खेळले-हिंडले-फिरले होते व त्या भूमीचे वैशिष्ट्य त्यांच्या मनात बिंबले होते. आपल्या कादंबऱ्यासाठी काल्पनिक सृष्टी निर्माण करीत असता विशिष्ट भू-प्रदेशाचे चित्र या सृष्टीत कसा रंग भरील याविषयी त्यांना विशेष आस्था होती. कादंबरीत भौगोलिक वातावरणात आगळे महत्त्व आहे.३५. स्वानुभवातून कादंबरीची पार्श्वभूमी आकाराला आली हा बापट-गोडबोले यांचा अभिप्राय विशेष महत्त्वाचा वाटतो. विशिष्ट भू-प्रदेशाच्या आस्थमुळे माडगूळकरांनी या कादंबरीसाठी माणनदीच्या काठावरील आटपाडी, विटे तालुक्यातील प्रदेश निवडला आहे. तो रंग-रुप-गंधासह स्वाभाविकपणे चित्रित केले आहे. स्वानुभवातून 'बनगरवाडी' कशी आकाराला आली हे स्वत: लेखकाने सांगितले आहे. अनेक व्यक्तिरेखा विशेषत: आयबू, कारभारी, शेकू ह्या तर माडगूळकरांच्या गावच्याच आहेत. तसेच माडगूळकर लिहितात, "वाटेपासून माणसापर्यंत मी सगळे शोधीतच गेलो. अगोदर विचार करुन मी काही केलेच नाही. याचे काय होणार आहे, शेवट कसा लागणार आहे, याचा नीट विचार करुन मी पाऊल टाकले नाही. पण मला सगळे सापडत गेले. गर्भात मूल तयार होत गेले. ३६. थोडक्यात मेंढपाळाचे जीवन लेखकाने जवळून पाहिले. तेथेच वाढले आणि मेंढपाळांचे जीवनदर्शन ओसाड, रखरखीत भू-प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर घडविले.

धनगरांच्या जीवनातील सुखदु:ख निसर्गावर अवलंबून आहे. "निसर्गाचे फुलारलेपण, सुगी आणि धनगरी जीवनातील आनंद अन्योन्य आहे. पिकांचा पिकलेपणा धनगरांना, जनावरांना, पक्ष्यांना गोल गरगरीत करतो. सुगी संपते तेव्हा पाखरे पांगतात आणि धनगरही निवांत बसू लागतात. धनगरगडी नाचतात तेव्हा सारी बनगरवाडी नाचू लागते. अशी ही निसर्गाची लय कादंबरीभर भरुन राहिली आहे."३७. असे प्रा. कागणे म्हणतात. यावरुन असे स्पष्ट होते की, दुष्काळाची भयानकता आणि त्यांचे दारिद्र्य तसेच सुखदु:खावर निसर्गाचा प्रभाव आहे. दुष्काळाचे भकासपण निसर्गवर्णनातून प्रतिबिंबित झाले आहे.

"...पण नक्षत्रांमागून नक्षत्रे गेली आणि बनगरवाडीवार पाण्याचा टिपूस पडला नाही. तापलेल्या जमिनी निवल्या नाहीत. झाडेझुडपे वाळून कोळ झाली. भुकेल्या मेंढरांनी चगळ न चगळ वेचले. फुफाटा फार झाल. चक्रीवादळे होउु लागली. विहिरीचे पाणी आटले. वाडीचा हेळ आटला... जनावरे रोड झाली. त्यांच्या भकाळ्या

दिसू लागल्या आणि अंगावर अस्वलासारखे केस वाढून ती मळकट दिसू लागली... छपराचे जुने, कुजके काड उपसून लोक जनावरांपुढे टाकू लागले... चिमण्या, कावळे, होले दिसेनासे झाले. भुकेने वखवखलेले रानातले उंदीर गावात आले आणि त्यांनी धूमाकूळ घातला. धनगरांच्या घोंगड्या त्यांनी कातरल्या; पिठाच्या वासाने तुपे कातरली. कुरड्या कातरल्या.'' (पृ.९३)

पाऊस न पडल्यामुळे धनगरांच्या जीवनावर कसा विपरीत परिणाम झाला. निसर्ग तेथील लोकजीवनाच्या केंद्रस्थानी आहे. म्हणूनच पाऊस पडताच वेळेवर पेरणी व्हावी असे शेकूला वाटते, त्यासाठी त्याची बायकोदेखील बैलाबरोबर टिपण ओढते. म्हणूनच निसर्ग आणि धनगरांचे जीवन वेगळे काढताच येत नाही. नव्हे निसर्गाश्रित मानवसमूहाचे जीवनदर्शन हा तिचा विषय आहे.

लेखकाने धनगरांच्या दैनंदिन उद्योगातून समाज जीवनाचा आविष्कार घडविला आहे. मेंढर राखणे, भाकरी खाणे, मेंढरं कोंडणे, देवळासमोर गप्पाटप्पा करणे आणि रात्री वाडग्याचे राखण करणे हा त्यांच्या दिनक्रम आहे. स्त्रियांना भाकरी थापणे, राहाटावर किंवा टवळीकर लोकरीचे सूत काढण्याचा उद्योग करावा लागतो. उदरनिर्वाळासाठी प्रत्येकाला काम करण्याशिवाय पर्यायनच नाही, म्हणूनच मुलांना ते शाळेत न पाठविता शेरडामागे पाठवितात. ''पोरे शिकली म्हणजे त्यांचे शेतीतले लक्ष उडते. पांढरी कापडे घालून हिंडायचा नाद लागतो.'' (पृ.२१) असे त्यांना वाटते. अगदी प्राथमिक पातळीवरचे जीवन धनगर जगतात. त्यांचा शहरी जीवनाशी दुरान्वयानेही संबंध येत नाही. समाज संकेताबरहुकूम ते जगतात. बनगरवाडीतील समूहजीवनाचे, त्यांच्या एकजूटीचे दर्शन औंध संस्थानाचे राजे तालमीच्या उद्घाटनासाठी येणार असतात. परंतु तालमीवर पेंड टाकायचे काम अपूर्ण असते. तेव्हा एका रात्रीत ते काम पूर्ण केले जाते. धनगरांची राजनिष्ठा आणि समूहभावना यांचे दर्शन घडते. उच्च-नीच्चता, जातिभेदांनाही धनगरांच्या जीवनात विशेष स्थान आहे. जगण्या रामोशाने वरच्या जातीतील स्त्री पळवून आणणे, त्यांना मान्य नाही. म्हणूनच जगण्याला आणि त्या विधवा बाईला ते वांगीच्या लोकांच्या स्वाधीन करतात. वांगीचे लोक त्या विधवेचे नाक कापतात. या घटनेतून समाजात दरारा निर्माण करण्याची, समाजाचे नीतीनियम पाळलेच पाहिजे अशी परंपरा दिसते. समाज प्रवाहाच्या विरूद्ध न जाण्याची धनगरांची परंपरा असताना काही लोक चुका करतात. मृत्युपूर्वी म्हाताऱ्या कारभाऱ्याने अंजी शेकूकडे सांभाळण्यासाठी दिली, पण तो तिच्याशीच प्रेमाचे चाळे करु लागतो. शेकूच्या बायकोची व्यथा 'गाव काय म्हणेल' या शब्दात व्यक्त होते. ती मास्तरला म्हणते,

''...पर ह्येनी का तिच्या नादी लागावं? जनाची न्हाई, मनाची तरी लाज पायजे. तुमासारखी काय म्हणतील? पोरगी त्या म्हाताऱ्यानं सांबाळायला दिली. चांगला

बघून तिचं लगीन करायचं, भलेपणा घ्याचा. ते सोडलं आन् चांगलं नादावून बसल्यात तिला. कामधाम काय न्हाई, लुगडी आना, चोळी आना, तुम्ही सांगा, आता हे बर कां?"(पृ.८६)

एखादी व्यक्ती गावपांढरीच्या म्हणजे सामाज्याविरुद्ध गेली तर गावकरी त्या व्यक्तीला वाळीत टाकत. तालमीसाठी गावकऱ्यांनी यथाशक्ती मदत करण्याचा निर्णय घेतल्यानंतर बाळा धनगर झाड देत नाही, शेवटी मावल्या आईच्या जत्रेत देवापाशी आला, पाया पडला आणि प्रसादाचा गुलाल लावण्यासाठी त्याने आपले कपाळ पुजाऱ्यापुढे केले, तेव्हा पुजारी त्याला लावत नाही. तेव्हा बाळा धनगर विनंती करतो, "माज्या पांडीरीपुढं मी पदर पसरतो, माजी चुकी माफ करा. मला तुमच्यात घ्या. मला तुमच्यात घ्या. मला गुलाल लावा. तुम्ही माझं झाड घ्या, घर घ्या, माजा जीव सुदीक घ्या पर मला असं लांब ढकलू नका।" ... यावर रामाचा म्हातारा काकूला म्हणाल, "अरे पोर मांडीवर मुतलं, मांडी कापायची का? लावा त्याला गुलाल।"(पृ.९१) सारांश. गाव पंढरीला शरण आलेल्याला माफ करण्याची त्याला समाजात सामावून घेण्याची धनगर समाजाची उदारवृत्ती यातून स्पष्ट होते. समाजप्रवाहाबरोबर प्राथमिक पातळीवरचे जीवन धनगर जगतात.

धनगरांच्या जीवनात अंधश्रद्धा, परंपरा रीतीरिवाज यांना विशेष स्थान आहे. धर्माच्या नावावरील पारंपरिक कल्पना वाडीत स्थिरावलेल्या आहेत. म्हणूनच देवाच्या मनात आलं तर म्हातारपणीसुद्धा आपल्याला मूल होईल अशी शेकूच्या बायकोची समजूत आहे. जगण्या रामोशी वांगीची स्त्री पळवून आणतो. आपली सामाजिक पातळी, जात, स्थान आणि इंभ्रत सोडून स्वैर वर्तन करणे धनगरांना आणि रामोशांना पाप वाटते. अविवाहित मुलीने परपुरुषांशी संबंध ठेवणे त्यांना पाप वाटते. कारण त्यांचा निरवंश झालेला असतो. पण मास्तर विद्यार्थीसेना घेऊन घराची जागा साफ करु लागताच सर्व गावकरी मदतीला येतात. कारण त्यांच्यादृष्टीने मास्तरला पाप लागले असा ते अर्थ घेतात. राजावरील निष्ठा-श्रद्धा आणि प्रेम यातून सांस्कृतिक जीवनवैशिष्ट्ये दिसतात. कारभारी ग्रामस्थांच्या वतीने राजाचे स्वागत नारळ-रुपया देऊन करतो. राजाने कारभाऱ्याला 'पाटील' म्हणतात तो सुखावतो.

बनगरवाडीतील भांडण वाडीबाहेर सहसा जात नाही. सारा निकाल चावडीपुढे दहा माणसे-पंच जमून दिला जातो. वृद्ध मंडळी न्यायदान करतात. दहाजणांनी सांगितलेल्या गोष्टींच्या पुढे अपराधी जात नाही. न्याय मान्य करुन दंड भरला जातो. जर पंचांनी केलेले न्यायदान अमान्य असेल तर अपील करण्याची मुभा त्याला असे. हे अपील म्हणजे धनगरांचे महादैवत बोलवावे. धनगरांचा बराच मोठा समाज एकत्र येऊन न्यायदान केले जाई. पण महादैवत बोलवायचे तर सर्वांना जेवण द्यावे लागत-असल्यामुळे ह्या खर्चिक गोष्टी लोक टाळत. (पृ.३०) यातून पंचांचा निर्णय मानण्याची

धनगरांची परंपरा दिसते. किंवा पंचाचा निर्णय मान्य नसेल तर धनगरांचे महादैवत बोलविण्याची पद्धती 'प्रदेश' आणि 'समाज' विशिष्टच आहे.

वाडीतील विवाह सामुदायिक पद्धतीने, एकाच मुहूर्तावर आणि आर्थिकदृष्ट्या कंगाल असलेल्याला मदत करुन उरकले जात. यातून धनगरांच्या समूहभावनेची आणि चालीरीतीची कल्पना येते. एखाद्याला मेंडका व्हायचे असेल तर असा माणूस खोबऱ्याची वाटी आणि भंडार घेऊन चांगल्या मेंडक्याकडे जातो आणि 'मी बेण करतोय' असे म्हणतो. जुन्या मेंडक्याने मोफत दिलेले मेंढरु न विकण्याचे, न कापण्याचे नियम पाहले जातात. (पृ.२७) यातून धनगरांची संकेतपरंपरा स्पष्ट होते. मारुतीप्रमाणेच मावली आईवरील श्रद्धा दिसते. देवीला नवस करण्याची, बकरु कापण्याची परंपरा आहे. दिवे लावणीच्या सुमाराला झोपणे करंटेपणाचे समजले जाते. कारण ती वेळ लक्ष्मी येण्याची असते. खांडातले मेंढरु लांडग्याने धरले म्हणजे मेंढरांना साथीचा रोग होत नाही. देव, भूत, भानामती आणि देवऋणी यांच्यावर धनगरांची श्रद्धा-अंधश्रद्धा असेली दिसते. दादू बालटयाला त्याची बायको आणि आई देवऋषींकडून गंडे, ताईत करते. (पृ.६८) मावल्या आईच्या जत्रेच्या निमित्ताने गावकऱ्यांची देवावरील श्रद्धा आणि उत्सवप्रियताच दिसते. धनगरांच्या नवसाला पावणाऱ्या या देवीचे देऊळ नाही. गावकऱ्यांनी देऊळ बांधण्याचा प्रयत्न केला तेव्हा देवी पुजाऱ्याच्या स्वप्नात येऊन म्हणते.

"देऊळ बांधू नका, मी आहे तीच आनंदात आहे." (पृ.९०) यातून स्वप्नावरील विश्वास स्पष्ट होतो. देवीच्या सांगण्यानुसार धनगर देऊळ बांधत नाही. भाविकांनी जत्रेला येणे, मावल्याईचं चांगभलं म्हणणे, गुलाल लावणे आणि रताळी, गाजरे उधळणे, प्रसादासाठी रेटारेटी, आरडाओरड करणे, जत्रेत चालते. अंगात देवी येण्यावर लोकांचा विश्वास असलेला दिसतो. धुळा धनगरांच्या अंगात आल्यावर, 'आई आली आई आली'असे म्हणत सर्व धनगर त्याच्या भोवती जमतात. प्रश्न विचारतात. यातून पाप वाढल्याने पाऊसपाणी गेला. रामलक्ष्मण हे देव वनवासास या दंडकारण्यात आले अशी धनगरांची श्रद्धा दिसते. रामा बनगर मास्तरला माणदेशातील दुष्काळाचे कारण म्हणून एक लोककथा सांगतो. (पृ.९४) यातून लोककथा आणि त्यातून निर्माण झालेले लोकसमज यावर धनगरांचा विश्वास असल्याने लेखकाने वर्णन केले आहे.

धनगरांच्या जीवनात सणवारांनाही विशेष स्थान आहे. देवाच्या कृपेने पाऊस पडला. 'बाजरी चांगली तयार झाली. पोरेढोरे लिंबूर खाऊन तयारी करु लागली. दसरा आला. शिलंगणाच्यासोन्याबरोबर बाजरीची नवी कणसेही लोकांनी वाटली आणि मग काढणीची गडबड सुरू झाली." (पृ.४५) दसरा सणाला त्यांच्या जीवनात विशेष महत्त्व आहे. सोन्याबरोबर बाजरीची कणसे वाटण्याची त्यांची प्रदेशविशिष्ट

परंपरा दिसते. सुगीच्या वेळेत अस्वलांचा खेळ करणारा दरवेशी, हातचलाखी करणारा गारुडी यांचे खेळ पाहणे हा त्यांचा फावल्यावेळचा उद्योग, सुगी संपून वर्षाचे धान्य घरी आल्यवर आनंदाने तालावर ढोल झांझीपटीत हातातील रंगीबेरंगी रुमाल उडवीत धुंद होऊन ढोलाच्या तालावर नाचू लागत. एक लय निर्माण होई. यातून सण-उत्सवप्रियता दिसते.

मावली आई गावची आश्रयदाती, स्फूर्तिस्थान व उत्सवस्थान आहे. धनगरांची श्रद्धामूल्ये मध्ययुगीन काळातील संस्कृतीशी जवळीक दर्शवितात म्हणून शेजवळकरांनी म्हटले आहे की, ''बनगरवाडी' वैशिष्ट्यपूर्ण वाटण्याचे कारण असे की तीच्यातील विषय सर्वस्वी अगदी मागासलेल्या धनगरी संस्कृतीच्या लोकांबद्दल आहे. मानवेइतिहासात पशुपालन व शिकार ही शेतीच्या आधींची, त्यामुळे संस्कृतीच्या प्राथमिक स्वरुपाचे ज्ञान या कथेवरुन चांगले होते. आज मनुष्य कितीही सुधारलेला असला तरी त्याच्या रक्तातील आठवणीत आपल्या पूवर्जांच्या मानवेतिहासातल या अगदी जुन्या आयुष्याबद्दल सुप्त आपुलकी असतेच व अशी गोष्ट वाचली म्हणजे काहीतरी विसरलेले पुन: आठवल्याचा आनंद त्याला होतो. महाराष्ट्राला महाराष्ट्र हे नाव मिळण्यापूर्वी येथे दंडकारण्य होते, तेव्हा येथील लोक प्रामुख्याने असल्या धनगर संस्कृतीचे असावे. अजूनही हा पट्टा महाराष्ट्राच्या मध्यभागी उभा पसरलेला असून त्याच्या दक्षिणेकडील कर्नाटकात तो आजही प्रामुख्याने जिवंत आहे. काळाच्या ओघात मागे पडलेला हा मेंढपाळ वर्ग महाराष्ट्र संस्कृतीचे एक मूळ अंग आहे.''३८. हे विवेचन दंडकारण्यातील धनगर संस्कृतीचे वैशिष्ट्यदर्शक आहे. देव-दैवत यांना धनगरांच्या पारंपरिक लोकजीवनात स्वाभाविक स्थान आहे. राखणीच्या दिवसात धनगर लोकगीत म्हणतात,

''कांड्या करकाच्या बारा, बैलांचा नागर धर, नांगर धर।'' (पृ.४७) हे लोकगीत प. महाराष्ट्रात सर्वश्रुत आहे. या सर्वांमधून लेखकाने धनगर शेतकऱ्यांच्या सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडविले आहे. ते स्वाभाविक आहे. त्यामुळे जीवनानुभवाला जिवंतपणा लाभला आहे.

'बनगरवाडी'तल्या धनगरांचा प्रमुख प्रश्न आहे,'मेंढरांनी खावं काय? आमी जगावं कसं?'' ते प्राथमिक अवस्थेत जगतात. गरिबी, ज्ञान आणि दुष्काळ त्यांच्या पाचवीला पूजलेली आहे. यामुळे भाकरी खाणे किंवा मेंढरं सांभाळणे यापालीकडे त्यांचे जग नाही. बायकांनाही दिवसभर राबण्याशिवाय आणि भाकऱ्या बडविण्याशिवाय पर्याय नाही. त्यांचे सर्वस्व मेंढ्या आहेत. म्हणूनच त्यांना वरील प्रश्न सतावतो. मेंढरांची उपासमार म्हणजे धनगरांची उपासमार. यातून धनगरांचे आर्थिक प्रश्न स्पष्ट होतात. पंत सरकारने गावाला शाळा दिली. मास्तर दिला. परंतु मुलांना शाळेत पाठविण्यास धनगर तयार होत नाही. मास्तर नाना परींनी समजावतात. तेव्हा ''आन् त्याला पोटाला गा?''(पृ.११) असा प्रश्न ते विचारतात.

धनगरांचे अज्ञान, प्रामाणिकपणा आणि विश्वासूवृत्ती काही घटनाप्रसंगातून दिसते. जसे रामा बनगराजवळ राणी छाप रुपया असल्याचे तो मास्तरला सांगतो. राणीछाप रुपया बंद पडल्यामुळे 'मला गरिबाला उगीच खोट आलीया बघ।''(पृ. २४) असे तो मास्तरला म्हणतो. रुपया चालतो किंवा नाही हे मास्तरने पहावे असे त्याला वाटते. राणीछाप रुपयाचे अठरा आणे येतील याची त्याला कल्पना नसते. मास्तर त्याला चांदीच्या रुपयाचे(सोळा आणे) अठरा आणे देतो. जाऊन तो मोजून बघतो. दोन आणे त्याच्या हिशोबाप्रमाणे जास्त भरतात. मास्तरचे दोन आणे जास्त आले असे समजून तो परत येऊन मास्तरला वस्तुस्थिती सांगतो. सोळा आण्याचे अठरा आणे मिळतात असा खुलासा झाल्यानंतर मास्तरला पानतुबाखूसाठी एक आणा देऊ करतो. नंतर मास्तरकडे तो तीनशेचाळीस राणीछाप रुपये मोडण्यासाठी देतो. यातून असे दिसते की, कष्ट करणाऱ्या धनगरांजवळ काटकसर करुन साठविलेले पैसे आहेत. परंतु आधुनिक संस्कृतीपासून दूर असल्यामुळे ते चालतात का? हे सुद्धा त्याला माहीत नाही. पैशाचा तो उपभोग घेऊ शकत नाही. धनगरांचे अज्ञान आणि दारिद्र्याचे चित्रण लेखकाने केले आहे. पेरणी वेळेवर व्हावी म्हणून शेतकरी धडपडतात. पेरणीला त्यांच्या जीवनात विशेष स्थान आहे. पेर मागास होऊ नये म्हणून शेकू मास्तरकडे बैल बघून देण्याच हट्ट धरतो आणि म्हणतो,

"...तू मागितलास म्हंजे मिळेल, माझ्यापाशी एकच हाय. एक मेला. दुसरा मिळाला तर पेरीन, न्हाईतर वरीसभर उपाशी मरन्याची पाळी पाहा." (पृ.३१) शेवटी त्याची बायको बैलाबरोबर टिपण ओढते, यातून शेकूच्या दारिद्र्याची जाणीव होते. पेरणीच्या दिवसात बैल विकत घेणे त्याला शक्य नाही. पेरणी झाली नाही तर वर्षभर काय खवे? कसे जगावे? हा त्याचा प्रश्न आहे.

अर्थव्यवस्थेवर सावकारांचे वर्चस्व होते. 'पैशा' पेक्षा 'अब्रू' विश्वास महत्त्वाचा होता. रामाबनगराचे राणीछाप रुपये असलेले मास्तरकडील गोठोडे आनंदा रामोशी भाकरीच्या आशेने पळवितो, पैसे परत न केल्यास अब्रू जाईल, अविश्वासाचे होईल म्हणून मास्तर सावकाराचे कर्ज घेण्याचा विचार करतो. पैशाची सोय लागत नाही, परंतु आनंदा रामोशी सर्व पैसे परत करतो. भाकरीसाठी चोरी केली, पैशासाठी नाही असे सांगतो. यातून धनगर आणि रामोशांचा प्रामाणिकपणा स्पष्ट दिसतो.

धनगरांचा काटकसरी स्वभाव असणे ही स्वाभाविकता आहे. ही परिस्थितीतून व्यक्त होते. मास्तरने गावामध्ये तालीम बांधण्याचा प्रस्ताव ठेवला, त्याला धनगर विरोध करताना म्हणतात,

"पर तालीम बांधायची म्हंजे बक्कळ पैसा लागल, तो कुनी द्यायचा."

'गावानं वर्गणी करावी, घरटी दहावीस रुपये द्यावेत।'

'हं, हायेत कुणापाशी?"(पृ.६०)

सुगीनंतर मेंढरं कातरण्याचा काळ धनगरांच्या दृष्टीने आर्थिकदृष्ट्या आनंदाचा असतो. लोहकर पिंजून कातली जाते सुताचे चोबे बाजारात विकून त्याचे पैसे केले जातात, वर्षाची लुगडी घेतली जातात. मेंढक्यांना पटके, धोतरे, अंगरखी घेतली जातात. सणगरांडून घोंगड्या विणून घेतल्या जातात. एवढ्यात पैसे संपतात. एवढाच काळ धनगरांच्या दृष्टीने आनंदाचा असतो. (पृ.६७) इतर वेळेस त्याला पैशाची गरज वाटत नाही, नव्हे त्यांच्याजवळ पैसे नसतातच. शेकूची बायको म्हणते, त्याप्रमाणे 'कशाल? दोघांची पोटं भरायची मारामार। बघताय नव्हं तुमी कसं चाललंय ते ?"(पृ.८७) दुष्काळ माणदेशाच्या पाचवीला पूजलेला असल्यामुळे जीवनाश्यक गरजाच धनगरांचा पूर्ण करता येत नाहीत, म्हणूनच त्यांचा स्वत:पेक्षा मेंढरांवर अधिक जीवन असलेला दिसतो. धनगर निसर्गावलंबी जगतात.

बनगरवाडीतील लोकांना मुलांना शिक्षण देणं रिकामा फाजीलपणा वाटतो. शिक्षणाचे महत्त्व धनगरांना समजणे त्या काळ-परिस्थितीत केवळ अशक्य होते. गावात मास्तर आला. शाळा सुरु झाली. धनगरांच्या मर्जीप्रमाणे सुगीचे दिवस वगळून शाळा चालू लागली. शिक्षण घेत बसले तर खायचे काय? हा त्यांचा व्यवहारी प्रश्न आहे. गावात मास्तर येईल ही कल्पनाच धनगरांना नसल्यामुळे दादू बालट्याला मास्तर 'अंडीवाला' वाटतो, एक जण तर म्हणतो,

"हं. हतं काय करायचा गा मास्तर? साळा चालतीय कुटं हतं? पोरं हायती कुटं वाडीत? सरकारला काय ठावं न्हाई व्हय? रिक्कामा फाजीलपणा."(पृ.५)

शिक्षणामुळे मुले आईवडिलांपासून दूर जातात. कामावरील लक्ष उडते असे त्यांना वाटते. तरुण मुलांनी पोटापाण्याच्या उद्योगाला लागावे. शाळा शिकण्याच्या भानगडीत त्यांनी पडू नये. बिराचा हुशार मुलगा सत्ता एकाएकी शाळेत यायचा बंद झाला, म्हणून मास्तर त्याच्या घराकडे जातात. सत्ताला शाळेत पाठविण्याबद्दल विनंती करतात, तेव्हा बिरा म्हणतो,

'का करायचं हाय? अवं त्याचा आता चांगाल मेटका गडी झाला. एकट्यानं लांडगा तोडला त्येनं, पोरढोर न्हाई राह्यला त्यो, मग आता शाळा कशाला अन् पाटी कशाला? लागू द्या आपल्या उद्देगाला" (पृ.५२), म्हणजेच शिक्षण घेणे बनगरवाडीतील लोकांना निरर्थक वाटते. मुलांनी उद्योगाला लागले पाहिजे हेच त्यांना पटते. एकूण शिक्षणाबद्दल येथे उदासीनताच दिसते.

भू-वैशिष्ट्ये, निसर्ग आणि एकूणच जीवनदर्शन अधिक स्वाभाविकपणे रेखाटण्याचे सामर्थ्य माडगूळकरांच्या शैलीत आहे. निवेदनाची भाषा आशयाशी एकजीव झालेली प्रमाणभाषा आहे, तर संवादातून माणदेशी बोलीचा जिवंतपणा प्रत्ययाला येतो. 'शब्दचित्रे पराकाष्ठेच्या रसरशीत भाषेने फुललेली आहेत३९. असे अरविंद मंगरुळकर म्हणतात, तर "माडगूळकरांची संवेदनशीलता अस्सल ग्रामीण होती."४०. असे र.

बा. मंचरकर म्हणतात. हे दोन्ही अभिप्राय यथार्थ वाटतात, कारण बनगरवाडीची भाषा धनगरांच्या जीवनपद्धतीनुसार सरळ आहे. घटना-प्रसंग आणि व्यक्तिरेखा जिवंत करण्याचे सामर्थ्य या भाषेत आहे. त्याचप्रामाणे धनगरांच्या दैनंदिन बोलीतील अनेक शब्द सहजतेने आले आहेत. संवादातून धनगरांच्या बोलण्यतील लकबीही माडगूळकरांनी शब्दबद्ध केल्या आहेत. वाडगा, घावला, तरास व्हायाचाच, मोगली, वगळ, दटावा इ. बोलीभाषेतील शब्दातून माणदेशातील बोलीचे वेगळेपण दिसते. म्हणून ''देशावरच्या मातीने व मातीच्या अनुभवाने त्यांची भाषा त्या मातीची एकता पावली आहे.' ४१ हे ल. ग. जोगांचे विधान सार्थ वाटते.

डॉ. द. ता. भोसले यांनी प्रादेशिकता आणि सामाजिकता यांचे घनिष्ठ संबंध असतात हे बनगरवाडीच्या संदर्भात स्पष्ट करताना म्हटले आहे, बनगरवाडी कादंबरीत धनगराच्या मेंढरांचे कळप, त्यांचे मेंढरामागील दिवसभराचे भटकणे, सायंकाळी जेवणापूर्वी मेंढवाड्यात ठेवलेल्या पिल्लांना आईशी मिळवणे, त्या वाड्यातून बाहेर पसरलेला मूताचा वास, सणासुदीच्या वेळी ढोलाच्या तालावर त्यांचा चालणारा नाच इ. अनेक सामाजिक चालीरिती, आचार विचार यातूनच त्या कादंबरीत प्रादेशिकता सजीव झालेली आहे यात शंका नाही. साहित्यकृतीमधील पात्रांच्या वृत्ती-प्रवृत्तीवर संस्कार झालेले असतात. अन् हे संस्कार सामाजिकतेतून साधलेले असल्याने प्रादेशिकता आणि सामाजिकता यांचे घनिष्ठ संबंध असतात असेच म्हटले पाहिजे. किंबहुना, सामाजिकतेशिवाय प्रादेशिकता सजीव आणि परिणामकारक प्रादेशिकता निर्माणच होऊ शकत नाही असे म्हटले तर ते अतिशयोक्त ठरु नये.''४२. डॉ. द. ता.भोसले म्हणतात त्याप्रमाणे 'बनगरवाडी'तील सामाजिकतेने प्रादेशिकता सजीव आणि परिणामकारक झाली हे मान्यच करावे लागेल. कारण नैसर्गिक परिसर सामाजिक जीवनाला आकार देतो. सामाजिक जीवन माणसाला घडविते. त्यातून त्याचे स्वभावविशेष आकाराला येतात. त्यावर निसर्ग, रीतीरिवाज, संकेत, व्यवसाय, संस्कृती यांचे संस्कार होतात. हे सारे परस्परात गुंफलेले असते. एकजीव होते. माडगूळकरांनी येथे त्यांचे उत्तम दर्शन घडविले आहे. माणदेश संपूर्णपणे अज्ञात असलेल्या व्यक्तीस तो परिचित होतो. ग्रामीणपरिसरात माणसाला तीन प्राकरच्या दुःखांना सामोरे जावे लागते. निसर्गनिर्मित, समाजनिर्मित आणि मानवनिर्मित. ही तीनही दुःखे येथे चित्रित केलेली आहेत. केवळ 'प्रादेशिक' म्हणून नव्हे तर मानवी भावभावनांचे दर्शन घडविणारी कलाकृती म्हणून 'बनगरवाडी' श्रेष्ठ कादंबरी आहे.

### ८) आण्णाभाऊ साठे

***वारणेच्या खोऱ्यातील मानवसमूहाचे जीवनदर्शन***

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये कादंबरीतून समाजवास्तवाचे दर्शन घडू लागले. उपेक्षितांचे

जीवनचित्रणाच्या प्रेरणेतून आण्णाभाऊ साठे यांनीही लेखन केले. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांनी स्वत:चे असे खास स्थानही निर्माण केले. ग्रामीण माणसाच्या जीवनातील संघर्ष आण्णाभाऊंच्या लेखनाचा विषय झाला. ग्रामजीवनातील नाट्य त्यांनी टिपले. दुर्लक्षित, अव्हेरलेले जीवन आणि माणसे साहित्यविषय झाले. विभावरी शिरुरकर यांची 'बळी' किंवा माडगूळकरांच्या 'बनगरवाडी'तील जीवनदर्शनाप्रमाणे अण्णाभाऊ साठे यांनी हातावर पोट भरणाऱ्या श्रमजीवी वर्गाचे जीवनचित्रण केले. त्यांच्या 'फकिरा' (१९५९), 'माकडीचा माळ'(१९६३), 'वारणेचा वाघ' (१९६८) या कादंबऱ्यांचा अभ्यास येथे केला आहे. त्यांनी वारणेच्या खोऱ्यातील मानवसमूहाचे जीवनदर्शन घडविले. एका विशिष्ट खालच्या स्तरात जन्माला आल्यामुळे त्यांना उपेक्षितांच्या जीवनातील अनुभव अधिक उत्कटतेने घेता आले. या लोकजीवनाशी समरस झाल्यामुळे त्यांना ते अनुभव घेणे शक्य झाले.

आण्णाभाऊ साठ्यांनी 'चित्रा' (१९५१), 'फकिरा' (१९५९), 'वैजयंता' (१९५९), 'माकडीचा माळ' (१९६३), 'आवडी' (१९६३), 'वैर' (१९६३), 'रानगंगा' (१९६५), 'मास्तर' (१९६६), 'वारणेचा वाघ' (१९६८), 'चंदन' (१९६२), 'अलगूज' (१९६२), 'केवड्याचं कणीस' (१९६९), 'चिखलातील कमळ' (१९७४), 'वारणेच्या खोऱ्यात' (१९५१), 'गुलाम' (१९६४), 'धुंद' (१९६६), 'तारा' (१९६७), 'अहंकार' (१९६७), 'मयूरा' (१९६८), 'अग्निदिव्य' (१९६९), 'रानबोका' (१९६९), आघात (१९६९), 'आग', (१९६९), 'संघर्ष' (१९६९), 'रुपा' (१९६९), 'मूर्ती' (१९७०), 'मंगला' (१९७१), 'डोळे मोडील राधा चाले' (१९७१), 'रत्ना' (१९७५), 'फुलपाखरु' (१९७७) या विविध विषयावरील बत्तीस कादंबऱ्या लिहिल्या असून यातील काही कादंबऱ्यातून ग्रामजीवनातील संघर्ष चित्रित केला आहे. शहरी जीवनातल दु:खही काही कादंबऱ्यांचा विषय आहे.''अण्णाभाऊंनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्यात दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी आहे.''४३. असे डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, हे विधान सार्थ वाटते. कारण अण्णाभाऊ दलित समाजातील असूनही ते स्वत:ला ग्रामीण लेखक म्हणवितात. 'चंदन' कादंबरीच्या निमित्ताने 'दोन शब्द' लिहिताना ते म्हणतात, ''ग्रामीण लिहिणारा मी एकदम मुंबईच्या उपनगरात शिरल्यामुळे माझे वाचक किंचित चमकतील. त्यांना चंदन नवखी वाटेल.''४४. थोडक्यात विविध विषयांवर अण्णाभाऊ साठ्यांनी लेखन केले असले तरी ते स्वत:ला ग्रामीण साहित्यिक म्हणतात. तेव्हा वारणेच्या खोऱ्यातील दलित, मागासवर्गीय आणि शेतकऱ्यांचे जीवनदर्शन घडविणारा कादंबरीकार म्हणूनच त्यांच्या कादंबरीचा परामर्श घेणे योग्य वाटते.

१०) *'फकिरा'*

कादंबरीचा विषय 'जोगणी' विषयीच्या लोकसमजातून घडला आहे. वाटेगाव आणि शिगावच्या लोकातील संघर्षाची ही कथा आहे. वाटेगावचे शंकरराव पाटील राणू मांगाजवळ गावामध्ये 'जोगणी'ची जत्रा भरत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करतात. त्यामुळे राणोजी शिगावच्या जोगणी पळवितो. शिगावच्या लोकांकडून त्यावेळी अन्यायाने मारला जातो व त्याला हौतात्म्य प्राप्त होते. गावामध्ये जोगणीची जत्रा सुरु होते. शिगावचे लोक जोगणी पळविण्यासाठी धडपडतात. परंतु राणोजीचा मुलगा फकिरा जत्रेच्यावेळी जोगणीचे रक्षण करतो. शंकर पाटलांनतर रावसाहेब गावचा पाटील होतो. इंग्रज सरकारने मांगांना वहिमी ठरविल्यानंतर त्यांची गावचा पाटील रोज हजेरी घेतो. अन्याय अत्याचार करतो. जुलमी राजवटीला कंटालेला फकिरा गावकामगार पाटलाला शासन करतो. गावकरी संघटित होऊन फकिराविरुद्ध आवाज उठवितात. तेव्हा विष्णुपंत कुलकर्ण्याच्या सांगण्यावरुन फरार होतो. इंग्रज सरकारविरुद्ध संघर्ष पुकारतो. परंतु पाठबळाअभावी इंग्रजांना शरण जातो. 'फकिरा'च्या पराक्रमाची ही कथा आहे.

महाराष्ट्राच्या ग्रामीणजीवनातील अत्यंत खालच्या समाजस्तराचे वास्तव दर्शन 'फकिरा'तून घडते. एवढेच नव्हे तर संस्कृती विनाशाचे दु:खही 'फकिरा'तून व्यक्त होते. सनदशीर शिपाई असणारी मांग जमात वहिमी ठरविली जाते. हजेरी किंवा हद्दपारी त्यांच्यावर लादली जाते. त्याचे हे चित्रण आहे. डॉ. वसंतराव डोळस म्हणतात, ''आण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनामागे जगलेल्या जीवनाचे चित्रण करणे ही भूमिका दिसते.''४५. हे विधान 'फकिरा' संदर्भात अधिक सार्थ वाटते. कारण जे जीवन जगले, अनुभवले, तेच 'फकिरा'तून चित्रित झाले आहे. नाट्यात्मकतेचा सोसामुळे घटनाप्रसंग भडक आणि अतिशयोक्त झाले असून व्यक्तिचित्रण मात्र स्वाभाविक जिवंत झाले आहे. व्यक्तींच्या कृती-उक्तीतून 'प्रदेश' जिवंत होतो. राणू मांग हा साहसी, पराक्रमी, गावावर उत्कट प्रेम असलेला श्रद्धाळू, सनदशीर शिपाई आहे. गावात जोगणींची जत्रा भरावी म्हणून तो बालदान करतो. शंकरराव पाटील हे श्रद्धाळू, न्यायप्रिय, सद्वर्तनी, प्रेमळ, जातिभेद न मानणारे आहेत. राणूच्या बलिदानामुळे गावात जत्रा भरु लागल्याने दानशूरपणे त्याच्या कुटुंबियांना मदत करतात. पारंपरिक गावगड्याचे दुसरे चाक विष्णुपंत कुलकर्णी हे जातिभेद न पाळणारे, न्यायप्रिय आहेत. राणूच्या पराक्रमाचे, बलिदानाचे स्मरण करुन त्याच्या बायकामुलांनी दर्शन घ्यावे म्हणून ते 'जोगणी' थाबवितात. 'रावसाहेब पाटील' हा जुलमी आणि अन्याय, अत्याचार करणारा स्वार्थी रेखाटला आहे.

'फकिरा' हा कादंबरीचा नायक गावावर प्रेम करणारा, इमानी, अन्यायची चीड असणारा, आज्ञाधारक, मांगांना जगविण्याची धडपड करणारा, इंग्रज सरकारला

विरोध करणारा, आप्तेष्टांवरील प्रेमाखातर आणि पाठबळाअभावी इंग्रजांना शरण जातो. दौलत, राधा, राहीबाई, सावळा हे मांग जमातीतील प्रातिनिधिक पात्र आहेत. त्याबरोबर अन्य गौण पात्रांचे चित्रण 'फकिरा' मध्ये संपूर्ण एक गावच्या गाव उभे राहते.''४६. असे म्हटले आहे ते या सामूहिकतेमुळेच. 'जोगणी' प्रकरण केवळ वाटेगाव-शिगावातच घडू शकते. महाराष्ट्राच्या अन्य प्रदेशात 'जोगणी'वरुन संघर्ष होऊ शकत नाही. हा संघर्ष 'जोगणीविषयीच्या' स्थानिक-प्रादेशिक लोकसमजातून झाला आहे.

सांगली जिल्ह्यातील वारणा नदी काठच्या 'वाटेगाव' - शिगाव या प्रदेशाची भौगोलिक पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. 'फकिरा'ची कथा म्हणजे अन्यायाविरुद्ध दिलेल्या टकरीची कथा आहे. 'फकिरा' हे उत्कट जीवनदर्शन आहे.''४७. असे ल. रा. नसिराबादकर म्हणतात. त्यांचा हा अभिप्राय अधिक संयुक्तिक वाटतो. कारण येथे इंग्रज सत्तेविरुद्ध आणि त्यांच्या नव्या कायद्यामुळे होणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरुद्धचा संघर्ष चित्रित झाला आहे. रामभट म्हणतात की, ''...हिरवट रांगडेपणामुळे ती कादंबरी मराठी साहित्यात एकदम उठून दिसली. त्यात अस्सल रांगड्या ग्रामीण मातीचे चित्रण होते. त्यामुळे प्रामुख्याने मध्यमवर्गीय लेखकांनी निर्माण केलेल्या मराठी साहित्यात एकदम नवीन प्रवाह आल्यासारखे झाले.''४८. रामभटांना विषयातील नावीन्य महत्त्वाचे वाटते. हेही एका अर्थाने बरोबर आहे. कारण यापूर्वी उपेक्षितांचे जीवन चित्रण इतक्या जिव्हाळ्याने अपवादानेच होत होते. ग्रामीण मातीची भू-प्रदेश निसर्गाची पार्श्वभूमी या जीवनदर्शनाला लाभली आहे.

वारणेपासून कृष्णापर्यंतचा सुपीक प्रदेश, वाटेगाव जवळचा माळ, आणि पश्चिमेला सह्याद्रीचा प्रचंड डोंगर, तांब खडी, सातदरे, वेडीवाकडी वळणं घेणारी गाडीवाट यातून सह्याद्रीच्या कड्यालगतचा प्रदेश जिवंत केला आहे. वाटेगावच्या काळीकसदार जमीनीचा (पृ.२०) उल्लेख भू-वैशिष्ट्य सूचकच आहे. वाटेगावच्या पश्चिमेला सह्याद्रीपर्वत तर पूर्वेस देश आहे. उंच डोंगर, घनदाट जंगल आणि कुरणं हे खास प्रदेश वैशिष्ट्य आहे. सह्याद्रीचे कडे, दऱ्या या प्रदेशात असल्यामुळे फरार झालेल्या, इंग्रजांविरुद्ध लढणाऱ्या 'फकिरा'ला त्यांच्या आश्रयाने लपता येते. स्वसंरक्षण करणे शक्य होते. म्हणून 'फकिरा' येथे वाढतो, तळ ठोकून राहू शकतो.

''एका उंच कड्यानं आपली मुंडी ढगात घातली होती. मंद गतीनं तरंगणारे प्रचंड ढग त्या कठिण सह्याद्रीच्या मस्तकावर आदळून दिशा बदलून घेत होते. उंच डोंगरातील रानटी वारे बेबंद पळत होते. त्यांच्या धसमुसळीपणानं घनदाट वनश्री नम्र होऊन त्यांना वाट देत होती. जे वृक्ष ताठ राहण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांना वारा सहस्त्र करांनी वाकवीत पुढं रेटीत होता. करवंदी, बोरी, बाभळी, पिंपरण, जांबुळ, सागवान, पांगीरा, या वृक्षांची वाऱ्यानं दाणादाण हात होती. पालापाचोळा त्याच्यापुढं

लोटांगण घेत होता.'' (१४०) थोडक्यात सुपीक सखल मैदानी प्रदेश आणि सह्याद्रीच्या डोंगर दऱ्याची पार्श्वभूमी अण्णाभाऊ साठ्यांनी 'फकिरा'त चित्रित केली आहे. विशिष्ट डोंगराळ प्रदेशामुळेच येथे फकिरा अनेक दिवस इंग्रज सत्तेच्या हातावर तुरी देऊ शकतो.

फकिरामध्ये लेखक कादंबरीच्या कथानकातून व्यक्त होणारा काळ, व्यक्तींची मानसिकता व समाजमनातील भाव यांच्यासाठी निसर्गाचा कौशल्याने वापर करीत असलेला दिसतो.

''हळूहळू पावसाळी वारं उठलं आणि भन्नाट सुटलं. आकाशात काळ्या ढगांनी गर्दी केली. पाण्यात मासा पोहावा तशी ढगात वीज सळसळू लागली. विजेच्या प्रखर प्रकाशात कोसळण्याच्या बेतात आल्यासारखं दिसू लागलं. अक्राळविक्राळ आकृत्या करुन ढग गिरक्या घेऊ लागले. वारा त्या ढगांना चेंडूप्रमाणे हेपलू लागला.'' (पृ.१०)

अशा प्रकारे प. महाराष्ट्रातील पावसाळ्याचे वर्णन लेखक सहज करून जातो. अतिवेगाने वाहाणारे वारे, वीजांचा कडकडाट, अंधार, काळे ढग, त्यांच्या अक्राळविक्राळ आकृत्या फक्त पश्चिम महाराष्ट्रातच दिसू शकतात. राणोजीच्या मानसिकतेनुरूप निसर्गचित्र लेखकाने रेखाटले आहे.

''सृष्टीच्या गालावर स्मित तरळलं. वारणेपासून कृष्णेपर्यंत सारा खोरा प्रकाशमय झाला. गावाच्या पश्चिमेला असलेला तो सातदरा पर्वत छाती काढून उभा राहिला. सर्वत्र हालचाल सुरु झाली. निर्भयता अवतीर्ण झाली आणि आज शिगवाची जोगणी आणायचीच असा निर्धार करुन राणोजी उठला.'' (पृ.१९) या वर्णनातून सातदरा पर्वत आणि राणोजीचे साहस यांची तुलना लेखकाने केली आहे.

लोकजीवनावर परिणाम करणारे असे निसर्गवर्णन आहे. वाटेगावमध्ये जोगणीची जत्रा भरणार म्हणून आनंदलेल्या लोकांच्या भावानुरूप निसर्गवर्णन पहा.

पावसानं आखडलेले पाय पसरले. आकाशातून मुसळधार पाऊस वर्षाव करू लागला. विजेचा लखलखाट नि मेघांचा गडगडाट यांन सृष्टी हादली. बियांचे कण मातीत रुजले आणि लहान अंकुर वर आले. हळूहळू काळी वावरं, हिरव्या शालीत झाकून गेली... आकाश निरभ्र झालं. निळ्या अस्मानात चपळ पाखरं भिटणीस लागली. शिवारात सुगीची हातगाई सुरू झाली.''(पृ.३५)

''हिवाळा आला नि गेला. मग उन्हाळा आला. चैत्राचं चावरं उन धगधगू लागलं. ते पोलादाच्या रसाप्रमाणे ओसंडू लागलं. निळ्या तलम वस्त्राचा रंग आकाशाला आला. चैत्र पालवीनं झाडं नटली. नवे मुगारे लुसलुसू लागले. तारुण्यात विदुपताही फिकी पडते, तद्वत झालं. काराट्या बोराट्यांनाही बहर आला. नव्या फण्या येऊन निवडुंगाची मान अधिकच उंचावली. टचटचीत लाल बोंड डोळ्यात भरु लागली.

फण्याचे काटे सणसणू लागले.''(पृ.४४)

सृष्टीतील बदल टिपण्याचे लेखकाचे सामर्थ्यही येथे दिसते. नवी पालवी आलेली झाडी, निवडुंगाची लाल बोंड यातून वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश चित्रित होतो.

'फकिरा' कादंबरीत चित्रित झालेले विश्व स्वातंत्र्यपूर्व काळातील आहे. लोकसमजावर आधारित असा कादंबरीचा विषय आहे. त्यातून समाजवास्तवाचे प्रभावी चित्रण लेखकाने केले आहे. स्वत: लेखकाने कादंबरीच्या कैफियतीमध्ये म्हटले आहे की, ''हा 'फकिरा' ही माझा होता. जे साकार नाही, त्याला आकार देण्याचं सामर्थ्य माझ्या ठायी नाही, जे पाहिलं, अनुभवलं, ऐकलं तेच मी लिहिलं आहे. (प्रस्तावना-प्रथम पृष्ठ), स्वानुभवलेले महार-मांग जमातीचे जीवनदर्शन घडविणे हा या कादंबरीचा विषय आहे.

गावगाड्यात पाटील-कुलकर्णी यांना विशेष महत्त्व होते. त्यांच्या शब्दांना मान दिला जात होता, म्हणून शंकरराव पाटलाच्या शब्दाखातर राणोजी शिगावच्या जोगणी पळवितो, बलिदान करतो. मांग जमात गावात जागल्याचे काम करीत होती. सनदशीर शिपाई असल्यामुळे मांगाची तलवार पूजली जात होती. गाव-पंचायतीच्या शब्दाबाहेर समाज जात नव्हता. एका दिलाने गाव नांदत होते. वरिष्ठ जातीतील लोकांशी मागासवर्गीय विशिष्ट अंतर ठेवून वागत. गावासाठी झटणाऱ्यांचे कौतुक केले जात होते. तसेच धनिक लोक 'इमानी' मागासवर्गीयांना हाताशी धरुन आपला फायदा करुन घेत. गावातील पाटील आणि कुलकर्णी यांना मान होता. पंचाचा निर्णय सर्व गाव मानत होते. पंच नि:स्वार्थी आणि निर्भीड होते. असेच स्वातंत्र्यपूर्वकाळातील समाज-जीवनदर्शन 'फकिरा'तून घडविले आहे.

गावातून जोगणी फिरल्या तर संकट येत नाही. दु:ख दारिद्र्य टळते, अशी समाजची समजूत असल्यामुळे वारणेच्या खोऱ्यात 'जोगणी'च्या जत्रेला विशेष महत्त्व दिले जाते. या लोकसमजातून 'शिगाव'च्या जोगणी राणू मांग पळवितो आणि दोन गावामध्ये संघर्ष होतो. 'जोगणी' खास प्रादेशिक आहे, इतरत्र 'जोगणी' पळविण्याचे प्रकार आढळत नाहीत. हुंड्याची चाल, भजन, ओव्या गाणे, बहिणीला भाऊबीजेची ओवाळणी घालणे, दृष्ट काढणे इत्यादीतून ग्रामीण जीवनात सांस्कृतिक वारसा जतन करुन ठेवण्याची परंपरा दिसते. यापेक्षा 'जोगणी' खास प्रादेशिक आहे. राणू मांगाचे वडील दौलती मांग 'जोगणी'विषयी माहिती देताना म्हणतो,

''दोन बैती नवरानवरी व्हायची नि त्येंची वरात काढायची. नवरीपाशी खोबऱ्याची वाटी असती. ती पिवळ्या फडक्यात असती. जर ती वाटी कुणी पळवली तर गावची जत्रा बंद व्हयाची, आनी ज्या गावात ती वाटी जाईल त्या गावात जोगणीची जत्रा भरायची असा रिवाज हाय. पर वाटी पळवणारा आपल्या हद्दीत घावला तर त्याचं डोस्कं मारायचां बी रिवाज हाय... ती नुसती वाटी न्हवं. ती त्या गावाची अब्रू

असती.'' (पृ.१७)

जोगणी आषाढी अमावस्येला निघतात. 'जोगणी' हा बलुतेदारांचा खेळ आहे. न्हावी झडपीण होऊन सुप फिरवितो. चांभार लाकडी घोड्याला बोराटीची काटे बांधून लोकांना दूर करतो. बोराटीचा काटा लागला तर अशुभ समजले जाते. म्हणून कोणीही पुढं येत नाही. दूर राहतात. कैकाड्याच्या अंगात येते, बाहेरगावचे लोक जोगणी पळविण्यासाठी धडपडतात. जोगणी पळविण्याऱ्याने गावाची शीव ओलांडली तर पुढील वर्षी आषाढीला त्या नवीन गावात जत्रा भरते, पण शीवेच्या आत जोगणी पळविणाऱ्याचे मुंडके उडविले तर जत्रा गावातच भरते. 'जोगणी'च्या निमित्ताने निर्माण झालेला संघर्ष हा या कादंबरीचा एक महत्त्वाचा धागा आहे, यातून सांस्कृतिक जीवनदर्शन लेखकाने घडविले आहे.

इंग्रजांच्या राजवटीत कुलकर्णी, पाटील यांना विशेष मान दिला जात असे. या पारंपरिक गावगाड्यात त्यांच्याच सल्ल्याने गावकारभार चाले. मांग जमात त्या काळात सनदशीर शिपाई किंवा राखणदार म्हणून काम पाहत. सनदशीर शिपाई असलेल्या मांगावर गावच्या राखणीची जबाबदारी होती. गावात चोरी झाल्ययास त्यांना जाब विचारला जात असे याचेही चित्रण येथे आले आहे.

धार्मिक बाबतीत इंग्रज राज्यकर्ते ढवळाढवळ करीत नव्हते. शिगावची जोगणी पळविली गेली. या संघर्षात सहा माणसे कामी आली. कैक जखमी झाली. परंतु सरकारने याची चौकशी देखील केली नाही. धनदांडगे सरकारची लाचारी पत्करुन फंदाफितुरी करुन स्वार्थ साधत होते. बापू खोताचे लष्करी अधिकाऱ्यांशी चांगले जमत होते. तोच सावळा, फकिरा यांच्याबद्दल चहाडी सरकारी अधिकाऱ्यांकडे करीत होता. त्यामुळेच सावळाला हद्दपार केले जाते. इमानी मांग जातीला सरकारने कायद्याने गुन्हेगार ठरविले. त्यांच्यासाठी हजेरी सक्तीची केली. हजेरीचे अधिकार पोलीस पाटलास दिले. हजेरीच्या निमित्ताने मांग जमातीची पराक्रमीवृत्ती नष्ट करण्याचा सरकारचा उद्देश असल्यामुळे मांगावर अन्याय-अत्याचार केले जात होते. विनाचौकशी हद्दपार केले जात होते. सावळाला बेळगावला पाठविण्यातून अन्यायाचे स्वरुप दिसते. त्यांना लाचार बनविण्याचा तो प्रयत्न होता. 'मांग जातीतील झुंझार वृत्ती नमावी, नाहीशी व्हावी, त्यांनी लाचार व्हावं, हाच त्या कायद्याचा हेतू होता.'' (पृ.६८) गुन्हेगारांना पकडण्यासाठी ब्रिटिश अधिकारी 'फोडाझोडा' नीतीचा अवलंब करीत होते. काट्याने काटा काढण्याची इंग्रज नीती असल्यामुळे गुन्हेगारांच्या शिक्षा माफ करुन त्यांना जवळ करुन गुन्हेगारांना पकडण्याची खटपट ते करीत असत. ब्रिटिश सरकार स्वार्थासाठी कार्य करत होते. जनतेची काळजी त्यांना नव्हती. पंतांनी प्रांत अधिकाऱ्यांना दुष्काळी परिस्थिती कळविली असताना त्यांची त्याची दखलही घेतली नाही. यातून इंग्रज सरकारची स्वार्थी राजनीती स्पष्ट होते. गुन्हेगारांना पकडण्यासाठी

त्यांच्या कुटुंबियांना ओलीस ठेवले जात होते. उदा. मांग वस्तीत दारकोंड करुन वाटेगावच्या सर्व मांगांना नेर्ल्याच्या छावणीतून ओलीस ठेवले. त्यानिमित्ताने फकिरा इंग्रजांना शरण गेला. धार्मिक बाबतीत ब्रिटिश सत्ता हस्तक्षेप करीत नसली तरी गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब ही सत्ता करीत होती. मांग जातीतील झुंझारवृत्ती नमावी म्हणून त्यांना गुन्हेगार ठरविणे, विनाचौकशी हद्दपारी, हजेरी, दारकोंड करुन ओलीस ठेवणे, त्यानिमित्ताने गुन्हेगारांना कैद करणे, लाचार बनविणे असे राजकीय जीवनाचे स्वरुप स्पष्ट होते.

"मांग जमातीच्या खडतर-धाडसी व प्रसंगी करुणाजनक जीवनाचे चित्रण वाचकांचे लक्ष व सहानुभूती ओढून घेतल्याशिवाय राहत नाही."४९. असे श्री. मा. कुलकर्णी म्हणतात, ते यथार्थच आहे. कारण गावगाड्यातील सनदशीर शिपाई-मागांच्या करुण जीवनाकडे गावकऱ्यांचे लक्ष जात नाही. राणू मांग 'जोगणी' पळविण्याच्या नादात बलिदान करुन गावावर उपकार करतो, म्हणून शंकरराव पाटील त्याच्या कुटुंबियांना धान्याचे पोते देतो. कुलकर्णी सहानुभूती दाखवितात. परंतु इतर मांगाच्या पोटाचा प्रश्नप सुटत नाही. सुगीच्या दिवसापर्यंत पावसाळ्यात मांगांना चोर बनावे लागते. आर्थिक परिस्थितीमुळे उपजिवीकेसाठी चोर बनणे भाग पडते. कण्या शिजवून खाणे, चोरीची मक्याची कणसं खाणे, रोजगार मिळाला तर रोजाने जाणे याशिवाय त्यांना पर्यायच नाही. उन्हाळ्यात चऱ्हाट वळणारी मांग जमात पावसाळ्यात 'शेंडागोंडा' चोरुन खातात. उन्हाळा पावसाळ्यापेक्षा रोगराई आणि दुष्काळाच्या परिस्थितीत मांग जमातीची वाताहत होते. पंतांकडून मदत होईल अशी अपेक्षा ठेवून 'फकिरा' त्यांच्याकडे जातो. तेव्हा पंतांचीही परिस्थिती फारशी वेगळी नसते. ते मांगांना 'जगण्याचा' सल्ला देतात. त्याचा अर्थ ओळखून ते दरोडा घालतात. दुष्काळाची झळ ग्रामीण भागाला अधिक जाणवते. त्याला कुलकर्णी ही अपवाद नाही. फकिरा आपल्या लोकांना म्हणतो,

"आपुन नी कुलकर्णी एकाच वाटंवर वाटचाल करतोय. मातर फरक एवढाच की आम्ही आधी पोहचणार नि पंत वाईचं मागंनं, त्याच जाग्यावर येणार। म्हंजी मरनार, आले का ध्येनात?" (पृ.१२६) दुष्काळामध्ये गावकुलकर्ण्याची ही परिस्थिती तर मागासलेल्या जमातीला रोगराई आणि दुष्काळात कसे जगावे हाच प्रश्न पडतो. आणि त्यांच्याबरोबर चोरी-दरोड्याशिवाय पर्याय उरत नाही. सरकारदेखील दुष्काळी परिस्थितीत मदत करीत नाही असे भीषण चित्र अण्णाभाऊंनी रेखाटले आहे.

'फकिरा'ची भाषा खास या मातीतील आहे. सांगली-इस्लामपूर-कऱ्हाड-वाटेगाव-शिगाव परिसरातील ग्राम जीवनातील अनेक शब्द कादंबरीची अर्थघनता वाढवितात. "मातीचे संस्कार लाभलेली शब्दकलेची नवाई हा या भाषेचा एक महत्त्वपूर्ण विषय."५०. असे डॉ. अ. रा. तोरो, म्हणतात, ते त्यांचे विधान यथार्थ वाटते कारण या

परिसरातील बोलीमधील असंख्य शब्द कादंबरीत आले आहेत. उदा. निजला, इजंवाऱ्याचं, कथ, न्हाय, दावतो, आयुख, पायजे, संगच्या, प्वारं, लेक, खुळी, तंडू, गामे, दियाचा, इसरलो, हायती, वंगाळ, भाळी, यडवाकडं, व्हनार, इसरुनगा हे शब्द ग्रामीण प्रदेशविशिष्ट बोलीतील आहे. "आरबी-फार्शी, मराठी यांची संयुक्त रचना रसानुकूल वापरल्याने फकिरातील शैली गिर्रेबाज बनलेली आहे."५१. असे डॉ. मधुकर वाकोडे म्हणतात. काही अपवादात्मक शब्द आणि वाक्य 'फकिरा'त आहेत, जसे, "बेलगाम गबऱ्या भन्नाट निघाला", "आमी कवाच सलामत नव्हतो," डॉ. वाकोडे यांचे वरील विधान मान्य करुन देखील फकिराच्या भाषेची मुळे त्या परिसरात रुजलेली आहे, त्या प्रदेशातल्या भाषेमुळे फकिरा प्रादेशिक वाटते, आरबी-फार्शी, मराठीच्या संयुक्त रचनेने नव्हे. कादंबरीचे कथानक प्रदेश विशिष्ट 'जोगणी' भोतवी फिरते, 'जोगणी'च्या कल्पनेशी जवळीक सांगणारे त्यामातीतील पात्र आहेत आणि भाषा प्रदेशाचे रंग घेऊनच आल्यामुळे 'फकिरा' प्रादेशिकच आहे.

### *(११) 'माकडीचा माळ'*

डवरी, डोंबारी, दरवेशी, माकडवाले, सापगारुडी, तुरंवाले, भानामतीवाले, गोसावी, फासे पारधी अशा भटक्या जातीजमातींचे जीवनचित्रण करणारी ही प्रादेशिक कादंबरी आहे. अण्णाभाऊ साठे मागासलेल्या जातीत जन्माला आल्यामुळे भटक्यांच्या सुखदु:खाकडे ते अधिक उत्कटतेने पाहू शकतात. हा अनुभव 'माकडीचा माळ' या कादंबरीच्या निमित्ताने येतो. उपेक्षितांच्या जीवनातील वास्तव अण्णाभाऊंनी या कादंबरीतून शब्दबद्ध केले आहे. त्याला विशिष्ट अशा सांगली-काळगाव राधानगरी-पारगांव या वारणा खोऱ्याची निसर्गपार्श्वभूमी लाभली आहे.

विविध जाती-जमातीचे भटके-भिकारी दरवर्षी काळगावच्या माळावर पालं देऊन मुक्काम करतात. सुखदु:खाच्या गोष्टी करतात. पावसाळा संपला की भीक मागत गावोगाव फिरतात. या माळावर पस्तीसवर्षाचा यंकू माकडवाला आपल्या अकरा वर्षाच्या मुलीला-दुर्गाला घेऊन येतो. काशी ही दुर्गाची आई, गेल्यावर्षीच मेली असे जातभाईंना सांगतो. सर्व हळहळतात. पर्वती डवरी विनाकारण यंकू बरोबर वैर ठेवतो. यंकूशी मारामारी करतो. काळगावचे नाथा पाटील चावडीवर बोलवून सर्वांना दम भरतात. आनंदाने नांदायला सांगतात. खून-मारामाऱ्या न करण्याचा सल्ला देतात. परंतु पर्वती डवरी तोंड बंद करीत नाही. शिव्या देतो. दुर्गाला मुंबईला नेऊन विकण्याची धमकी देतो. बिचारा यंकू मुलीवरील प्रेमाखातर नमते घेण्याचे ठरवितो.

गल्या-बल्या या फराऱ्यांशी मैत्री करुन यंकूचा काटा काढण्याचा पर्वती डवरी प्रयत्न करतो. गलया-बल्याला नाथा पाटील पकडतात, पर्वतीच्या बेईमानीमुळे गल्या-बल्या पकडले गेले असे समजून त्यांचे साथीदार पर्वतीचा पाय तोडतात. बिचारा

धास्तावलेला यंकू दुर्गाला घेऊन सात-आठ वर्ष स्वतंत्रपणे भ्रमंती करीत पोट भरीत फिरतो.

दुर्गा अठरा वर्षांची झाल्यानंतर राधानगरीकडील सुगीच्या दिवसात यंकूची आणि पार्वतीची भेट होते. सुगीमुळे सर्वजण तेथे जमतात. पर्वती डवरी जुना पीळ ठेवून असतो. तरुण दुर्गाला राधानगरीच्या इनामदार विलासराव यांच्या जाळ्यात अडकविण्याचा प्रयत्न करतो. यंकू बिचारा मुलीची अब्रू सांभाळत, जपत तिच्या लग्नाचा विचार करतो. येमू बरोबर दुर्गाचे लग्न ठरते. तेव्हा विलासराव इनामदारांची दुर्गा रखेली आहे अशी अफवा पाऱ्या डवरी पसरवितो. येमूचा बाप सख्या यंकूवर बिघडतो, सत्यासत्यता पडताळल्यानंतर येमू-दुर्गाचे लग्न होते. त्याचवेळी पाऱ्याची शेवटची चाल यशस्वी होते. मुलीच्या लग्नानंतर यंकूला गल्या-बल्या हे दरोडेखोर ठार करतात. पोलीस पंचनामा करुन, तालुक्याहून यंकूचा मृतदेह आणला जातो. काळगावच्या माळावर पुरल्यानंतर त्याचे लाडके माकड-गंग्या जीव देते. यंकू शेजारी गंग्याला पुरले जाते. काळगावच्या भूताच्या माळाला 'माकडीचा माळ' असे नाव पडते. दुर्गा येमू बरोबर नांदायला जाते. तिचे सुख पाहण्यासाठी यंकू जिवंत नसतो असे यंकू-पर्वती संघर्षाचे चित्रण करणारे कथानक आहे.

यंकू माकडवाला आणि पर्वती डवबरी यांच्या संघर्षाची आणि दुर्गा-येमू प्रेमाची ही कथा आहे. उपेक्षित भटक्या जातीतील यंकू माकडवाला, त्याची मुलगी दुर्गा, यंकूचा मित्र बाळा डोंबारी, सख्या माकडवाला, त्याचा मुलगा येमू तसेच खलप्रवृत्तीचा पर्वती डवरी या व्यक्तिरेखा ठसठसीत आहेत. तसेच काळगावचे नाथा पाटील, राधानगरी रंगराव पाटील आणि विलासराव इनामदार हे ग्राम जीवनातील धनिकांचे प्रतिधित्व करतात. याबरोबर भटक्या जमातीतील सैदू दरवेशी, त्याची बायको, बाळा डोंबाऱ्याची मुलगी गुल्ली, पाऱ्याच्या चार मुली आणि दोन बायका, हिकण्या गारोडी तसेच राऊ ढेकणा, बंडू तडाखे, सारजा, गल्या-बल्या हे फरारी दरोडेखोर इ. गौण पात्रही जिवंत झाली आहेत.

यंकू माकडवाला हा पस्तीस चाळीस वर्षाचा, अंगापिंडाने मजबूत, धिप्पाड देहाचा, अंगात रेड्याचं बळ असलेला सज्जन आहे. त्याच्या मजबूत बांध्यामुळे आणि दिलदार वागण्यामुळे पर्वती डवरी त्याच्याशी सुडबुद्धीने वागतो. पत्नीला दिलेले वचन पाळणारा, करारी, स्वाभिमानी, प्रेमळ आणि अब्रूच्या रक्षणार्थ धडपडणारा आहे. मुलगी दुर्गावर त्याचे जिवापाड प्रेम आहे. म्हणून तो हळवा झालेला दिसतो. पर्वती डवरीशी संघर्ष करतो. सूडभावनेने वागतो. भटकंतीचे लाचार जीवन जगतो. वरिष्ठ समाजातील लोकांशी प्रेमाने वागतो. नीतीकल्पना जपतो. दरोडेखेरांकडून त्याची हत्त्या होते. दुर्गा ही त्याची आईविना पोरकी झालेली मुलगी. बापाने लहानाची मोठी केलेली सुंदर-देखणी, साधीभोळी, प्रेमळ, अल्लड दुर्गा येथे रेखाटली आहे.

शीलाच्या रक्षणासाठी ती अखेरपर्यंत प्रयत्न करते. येमूवर उत्कट प्रेम करते आणि शेवटी त्याच्याशीच तिचे लग्न होते.

बाळा डोंबारी हा रंगेल माणूस यंकूचा मित्र आहे. पोट वाढलेले, रंग काळा असलेला बाळा डोंबारी दोन मुलींना बरोबर घेऊन तमाशा करुन रंगेल धनिकांचे खिसे रिकामे करतो. तो परोपकारी आहे. म्हणूनच तो संकटकाळात यंकूला मदत करतो. सख्या माकडवाला हा येमूचा बाप दुर्गा सून व्हावी म्हणून धडपडतो, पाऱ्याने दुर्गाने अनैतिक संबंधाविषयी अफवा पसरविताच ती बाटली असे म्हणतो. गावकाशी बोलवितो. तिला दिव्य करायलो सांगतो. परंतु मुलगा दूर जातो असे दिसताच मिळते जुळते घेऊन येमू-दुर्गाचे लग्न लावतो. येमू हा दुर्गावर उत्कट प्रेम करणारा, जातीचे रीतीरिवाज पाळणारा, करारी तितकाच हळवा तरुण आहे. पर्वती डवरी हा नावाप्रमाणे पर्वतासारखा, पण लोक त्याला पाऱ्या म्हणत, त्याकंगाल वस्तीत तो कुबेर समजला जात होता. तो भलताच रागीट आहे. चार मुली, दोन बायका असा त्याचा प्रपंच असून त्याचा दारुचा धंदा आहे. तो हिकमती, बेरकी, खलप्रवृत्तीचा असल्यामुळे त्याचं नाव घ्यायला लोकं घाबरतात. अण्णाभाऊ साठे म्हणतात,

"अशी ती माणसं त्या माळावर जगत होती. जगण्याविषयी त्यांना अपार प्रेम होतं. जगात त्यांच्या मालकीचं काहीही नव्हतं. पण सृष्टीवर त्यांचं प्रेम होतं. ही सृष्टी पिकावी, फळाफुलांनी डवरावी, शेतकऱ्यानं सुखी व्हावं नि उदार होऊन भीक वाढावी, एवढीच इच्छा उरात घेऊन ती माणसं त्या वैराण माळावर नांदत होती." (पृ.४०) जगण्याविषयी अपार प्रेम असलेल्या या माणसांमध्येही हेवेदावे होते. त्यातून 'माकडीचा माळ' कादंबरी आकार घेते. काळगावचे जुन्यापिढीचे प्रतिनिधी नाथा पाटील सत् प्रवृत्तीचे दानशूर, शांतताप्रिय आणि न्यायप्रिय आहेत. मुलगी सारजाचे दुःख पाहून ते अस्वस्थ होतात. जावयाला समज देतात. प्रसंगी कठोर होणारे पाटील सहृदयच आहेत. तर त्यांचे जावई 'रंगराव पाटील आणि राधानगरीचे विलासराव इनामदार नव्या पिढीचे सत्तांध-कामंध आहेत. परंतु प्रामुख्याने भटक्या-विमुक्तांचे समूहजीवनदर्शन घडविणे हाच लेखकाचा उद्देश आहे.

कादंबरी भटक्या जातीजमातीच्या जीवनावरील असली तरी तिला सांगली जिल्ह्यातील वारणा-कासारी खोऱ्याची पार्श्वभूमी आहे. आठ महिने भीक मागत फिरत हे लोक उदरनिर्वाह करतात. वैशाख महिन्यात काळगावच्या फोंड्या माळावर भिकारी पालं लावतात. जवळच्या घनदाट जंगलात शिकार करतात. काळगाव जवळचा मोकळा माळ तसेच घनदाट जंगलाची पार्श्वभूमी असल्यामुळेच भिकाऱ्यांना माळावर पाल लावणे परवडते. कारण तेथील जंगलातून शिकार मिळते. दरोडेखोरांना त्या जंगलाचा आश्रय घेता येतो. लेखकाने या भूताच्या माळाचे वर्णन केले आहे. ते प्रदेशविशिष्ट आहे. पूर्वेला देश आणि पश्चिमेला सह्याद्रीचा कडा आणि घनदाट जंगल आहे.

भाताचे पीक या प्रदेशात चांगले येते. भरपूर पाऊस पडतो. इतरत्र न आढळणारे प्राणी-पक्षी या 'प्रदेशा'चे वैशिष्ट्य आहेत. कुकुड कोंबडे, मोर, ससे मोरांगी, ससे, वानर, खारुटी इ. ची शिकार हे भिकारी करतात. जनावर मेल्यानंतर गिधाडे, कावळे जमा होतात. गिधाडांची शिकार भिकारी करतात. एकूण काळगाव ते राधानगरी पर्यंतच्या भौगोलिक पट्ट्याचे प्रसंगानुरूप वर्णन लेखकाने केले आहे. भूताच्या माळाचे वर्णन पहा.

''काळगावचा तो माळ भुताचा माळ म्हणून त्या खोऱ्यात प्रख्यात होता. गावदरीपासून डोंगरापर्यंत चार मैल रान त्यानं व्यापलं होतं. त्यापैकी अर्ध्या माळावर कुठं तरी एखादं झाड दिसत असे. अर्ध्या माळावर घनदाट झाडी वसली होती. त्या गर्द झाडीत चोर, खुनी, दरवडेखोर यांचा बारामहिने तळ पडलेला असे. ते चोर रोज रात्री खेडी लुटीत, खून पाडीत, बायका पळवीत नि माळावरच्या जंगलात दडी मारीत...'' (पृ.४) याप्रमाणेच ''राधानगरीच्या सभोवती सह्याद्रीने वेढा दिला आहे. त्या वेढ्यात तो सुंदर प्रदेश चित्रासारखा अंथरला आहे. नाना जातीच्या वृक्षांनी त्यावर सावली धरली आहे आणि कासारी नदी त्या खोऱ्यातून पूर्वेकडे भरधाव धावत गेली आहे.'' (पृ.४७) अशा प्रकारचे सह्याद्रीच्या कुशीतील घनदाट जंगलप्रदेशाचे वर्णन लेखकाने केले आहे. वारणाखोऱ्यातील काळगाव आणि कासारी नदीच्या खोऱ्यातील पारगांव, चांदोलीच्या प्रदेशाची पार्श्वभूमी प्रस्तुत कादंबरीला लाभली असून त्या 'प्रदेशा'त भीक मागून किंवा शिकार करुन उदरनिर्वाह करणाऱ्या उपेक्षित समाजाचे जीवनचित्रण लेखकाने केले आहे.

'फकिरा' कादंबरीपेक्षा या कादंबरीतील निसर्ग अधिक रेखीव, जिवंत, प्रत्ययकारी आणि उपेक्षितांच्या जीवनाचा अविभाज्य भाग किंवा एक पात्र म्हणून आला आहे. त्यांच्या जीवनावर निसर्गाचा परिणाम होतो. पावसाळ्याचे दिवस त्यांच्या दृष्टीने उपासमारीचे असतात, तर इतर दिवसांमध्ये स्वतःच्या कला दाखवून या प्रदेशातील लोकांकडून ते धान्य मिळवितात. माकडवाले माकडाचा, दरवेशी अस्वलांचा आणि गारुडी सापाचा खेळ करतात. डोंबारी तमासे करतात, भानामातीवाले लोकांचे डोळे दिपवितात आणि पैसे, धान्य मिळवितात. अर्थात हे सर्व सुगीवर अवलंबून असते. सुगी चांगली असैल तर त्यांना पैसे, धान्य मिळते. अन्यथा शिकारीवर उपजीविका करावी लागते. म्हणून लेखकाने भिकाऱ्यांच्या मानसितेनुरूप निसर्गवर्णन केले आहे.

''श्रावणात चमत्कार घडला. महीला, नवा रंग आला. हिरवा मुलामा चढला. ती सुखाचे निश्वास टाकू लागली. शिवार बहरला. पिकं डोलू लागली, गिरक्या घेऊ लागली. जागोजागी भाजी पिकली. मुबलक भाजी, भरपूर पाणी , सर्पण यामुळेच माळावरचे भिकारी सुखी झाले. उभी पिकं पाहून देवाला हात जोडू लागले. लोकांची पिकं, लोकांचा शिवार, पण त्यांना आनंद होता, जग सुखी तर आपण सुखी असा

त्यांचा व्यापक जिव्हाळा होता." (पृ.३) यातून त्यांची समाधानी वृत्ती स्पष्ट होते, तर राधानगरीत भाताची सुगी सुरु आहे म्हणून सुखावलेल्या भिकाऱ्यांच्या भावस्थितीनुरूपच (पृ.४४) निसर्गचित्र रेखाटले आहे. प्रणयी येमू-दुर्गाची मन:स्थिती प्रतीक रुपाने ते वर्णन करतात.

"चंद्र डोक्यावर आला होता. त्याचा रुपेरी प्रकाश गर्द वनराजीच्या मस्तकावर वर्षत होता. दवबिंदूच्या सिंचनात मोठमोठे दगड नि झाडांची पानं भिजून चिंब झाली होती."

दवावर चंद्रप्रकाश एकरुप होऊन त्या डोंगराला चंदेरी रंगाचा मुलामा चढल्याचा भास होत होता. अनंत रानवेलींना बहर आला होता. त्यांच्या फुलांचा सुगंध घेऊन डोंगरी वारा अठरा भार वनस्पतीच्या मस्तकावरुन दौड मारीत होता. सर्व शांत, नि:शब्द नि निर्जन वाटत होतं." (पृ.८२-८३) एकमेकांच्या सहवासात असलेल्या येमू-दुर्गाची मानसिकता वरील निसर्ग वर्णनातून व्यक्त होते. त्याचप्रमाणे त्या दोघांना एकमेकाविषयी वाटणारे आकर्षण (पृ.१०६) पावसाची वाट पाहणारी धरणी कुशीत अंकुर रुजविण्यासाठी अधीर झाली होती. त्याचप्रमाणे येमू-दुर्गाचे देखील वैशाखात लग्न होणार होते, म्हणून भावी जीवनातील सुखंस्वप्नं दुर्गा रंगवित होती. असे दुर्गाच्या मानसिकतेस समांतर निसर्गचित्र लेखकाने रेखाटलं आहे.

उपेक्षित भटक्या जमातीचे जीवनचित्रण हा या कादंबरीचा विषय आहे. त्यामुळे त्यांचे समाजातील स्थान, त्यांच्यातील हेवेदावे, संघर्ष यांचे चित्रण लेखकाने येथे केले आहे. तसेच त्या काळातील कृषिजीवन दर्शनही घडविले आहे. चोर-दरोडेखोऱ्याच्या दहशतीचे वर्णन केले आहे. दिवसा जंगलदऱ्याचा आश्रयाने राहणारे दरोडखोर दहशत निर्माण करण्यासाठी बेईमानी करणाऱ्यास कठोर शिक्षा करीत. जसे पाऱ्या उबरी यंकूचा काटा काढण्यासाठी गल्या-बल्या या दरोडेखोरांची मदत घेतो. परंतु नाथा पाटील आणि काळगावचे गावकरी त्यांना पकडतात. म्हणून गल्याबल्याचे सोबती पाऱ्याचा पाय तोडतात, त्याच्या मुलीचे नाक कापून दहशत निर्माण करतात. म्हणून गल्याबल्याचे सोबती पाऱ्याचा पाय तोडतात, त्याच्या मुलीचे नाक कापून दहशत निर्माण करतात. गावकऱ्यांमध्ये एकीची भावना होती. प्रतिष्ठितांनी घेतलेल्या निर्णयाला विरोध नव्हता. सहकार्यच केले जात होते. काळगावच्या तेल्याचा खून करुन गल्या-बल्या फरारी झाले. त्यांना पकडण्यासाठी संधी मिळताच नाथा पाटलाच्या सोबत गावकरी भुताच्या माळावर येतात. आणि संघटित होऊन फराऱ्यांना पकडतात. यातून एकीची भावना स्पष्ट होते. जुन्या पिढीतील नेकीची सत् प्रवृत्त माणसं समाजात होती, तसेच रंगेल आणि कामांध धनिकपुत्रही होते. काळगावचे नाथापाटील हे सत् प्रवृत्तीचे, परोपकारी, भिकाऱ्यांना मदत करणारे, तर राधानगरीचे रंगराव पाटील आणि विलासराव इनामदार रंगढंग करणारे, दुसऱ्याच्या मुली पळविण्यात काहीच गैर

न वाटणारे लेखकाने रेखाटले आहेत. हुंड्याची चाल होती, हुंडा न दिल्याने मुलींचे नांदणे अवघड होत होते. सारजा-रंगराव विवाहप्रसंगी नाथा पाटलांनी हुंडा न दिल्यामुळे दोघांमध्ये विसंवाद निर्माण झाला.

गावातील खटले चावडीवर पंच पाटलासमोर चालत होते. जसे पाऱ्या डवरी आणि यंकू माकडवाला यांची माळावर मारामारी झाली तेव्हा पाटलाने त्यांना चावडीवर बोलवून समज दिली. विवाहविषयक काही संकेत ठरलेले होते. खानदान, जात पाहूनच लग्न लावले जात होते. इतर समाजातील मुलीशी लग्न लावता येत नव्हते, रोटीबेटी व्यवहार मान्य नव्हते. दुर्गा, गुल्ली या भिकाऱ्यांच्या मुलीबरोबर लग्न लावता येत नाही म्हणून रंगराव कष्टी होऊन म्हणतो,

"...आमची इभ्रत मातीतोल झाली. कारण जर ह्या पोरी कुणा मातबरांच्या असत्या तर मागणी घालून लग्न करता आलं असतं. पण तसंही करता येत नाही." (पृ.११४), निपुत्रिक दत्तक घेतं. ग्रामदैवतांच्या जत्रेसाठी मुलींना माहेरी आणणे, मातब्बर माणसाला न दुखविणे, तसेच धनिक घराण्यातील स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते. किंवा आपण स्वातंत्र नाही, नगण्य आहोत याची स्त्रियांनाही खंत वाटत होती. सारजा स्वातंत्र्यपूर्व काळातील धनिक शेतकरी नगण्य स्त्री आहे. ती कळसूत्री बाहुलीप्रमाणे जगते. नवऱ्याचे रंगढंग पाहत सासरमध्ये चारभिंतीच्या आतले जीवन तिला जगावे लागते, किंवा बापाबरोबर माहेरला येते. आपल्यावर अन्याय होती याची सारजाला जाणीव होत नाही.

स्पृश्यांच्या समाजजीवनाप्रमाणेच उपेक्षित अस्पृश्यांच्या लोकजीवनाचे चित्रण लेखकाने केले आहे. देशात स्वत:चे घर-जमीन नसलेले अनेक उपेक्षित लोक उदरनिर्वाह करण्यासाठी एका गावाहून दुसऱ्या गावी जातात. पक्ष्यांप्रमाणे सुगी असेल तिकडे फिरणे त्यांना भाग पडते. प्रस्तुत कादंबरीतील माकडवाले, डवरी, दरवेशी, गोसावी, गारुडी, डोंबारी यांचे जीवन पक्ष्यांप्रमाणेच आहेत. या भटक्या जमातीमध्ये खलप्रवृत्तीची माणसे आहेत. अब्रूचे रक्षण त्यांना महत्त्वाचे वाटत नाही. दारुडे, छंदीफंदी, रागीट लोक जसे आहेत तसे परोपकारी, सज्जन प्रेमळ आणि अब्रूचे रक्षण करणारेही आहेत. जसे पाऱ्या डवरी दारु विकणारा शिवराळ स्वैर तर यंकू शीलाचे रक्षण करणारा, दुर्गाला सांभाळण्यासाठी धडपडणारा, तिचे लग्न व्हावे, ती नांदायला जावी अशी सदिच्छा असलेला आहे. स्त्रियांचा जन्म अगदी कांकणासारखा असतो. कांकण पिचले की त्याचा नाद जातो. मुलीचे लग्न करुन देणे त्याला देवाचा मार्ग वाटतो. तरुण येमूदेखील दुर्गाचे पावित्र्य सांभाळतो. यावरुन अब्रूचे रक्षण करण्याची भटक्या समाजातील लोकांची प्रवृत्ती दिसते. भटक्या लोकांना वार्धक्यात फक्त मुलांचाच आधार असतो. वयात आलेला मुलगा हातून निसटू नये, म्हणून मुलाशी मिळते जुळते घेताना दिसतात. सख्याचा मुलगा येमू दुर्गाच्या नादाने-प्रेमाने दूर जातो असे

दिसताच सख्या माघार घेतो, "पाण्यावर काठी मारली तर पाणी तुटते नुसते." असे म्हणतो. 'करावं तसं भरावं' हे भटक्या समाजाला मान्य आहे. पाऱ्याने गुण उधळले म्हणूनच त्याचा पाय तोडला गेला. मुलीचे नाक कापले गेले. 'बिब्बा आपल्या तेलानं जळतो, त्याला कुणी काय करावं।" असे यंकू म्हणतो.

प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाण्याची भटक्या लोकांची तयारी असते. इनामदार आणि रंगराव पाटलाच्या संकटातून दुर्गा, येमूच्या मदतीने वाचते. तेव्हा यंकू म्हणतो, "आला वकूत गेला, आता मनाला लावून घेऊ नकं. घाव गेला, आता कळ कशाला आठवायची?" (पृ.१०४) उलट अब्रू घेऊ पाहणाऱ्या धनदांडग्या कामांधांना विरोध करण्याचे सामर्थ्य या समाजात नाही. उदा. दुर्गाला इनामदार वाड्यावर बोलवितो. तिला जवळ घेऊन कामवासना तृप्त करु पाहतो, हे समजून देखील व्यंकू इनामदाराला विरोध करु शकत नाही, उलट अश्रू ढाळत बसतो. श्रीमंतांना हव्या असलेल्या मुली मिळाव्यात म्हणून ते दरोडेखोरांना सुपारी देते. रंगराव पाटील दुर्गाला पळवण्यासाठी गल्या-बल्याला सुपारी देतो. पाऱ्या डवरी त्यांना मदत करतो. गुल्ली आणि दुर्गाला राधानगरीत घेऊन आल्यास पाचशे रुपये देण्याचे रंगराव पाटील कबूल करतो. म्हणजे भटके लोक संघर्षमय भटकंतीचे जीवन जगतात. अज्ञानी जीवन आणि सूड भावनेने दर्शन येथे घडते. उपेक्षित व वरिष्ठ समाज यांच्यातील संबंध जसे आपुलकी, जिव्हाळ्याचे आहेत, त्याचप्रमाणे शोषणकर्त्यांचे आहे. वरिष्ठ समाजाकडून त्यांचे शोषण होते. प्रदेश विशिष्ट ग्रामीण धनिक आणि उपेक्षितांच्या श्रद्धा, समजूती, संकेत, विवाहपद्धती सण आणि यात्रा उत्सवाचे चित्रण करुन लेखकाने येथे संस्कृतीदर्शन घडविले आहे. डवरी, डोबारी, दरवेशी, माकडेवाले आणि गोसावी इ. भटक्या उपेक्षितांचे धर्म, कर्म, जगण्याची रीत, दैवतं आणि दैवताच्या पताका वेगवेगळ्या असतात. तमाशा करणे किंवा दारु विकणे त्यांना पाप वाटत नाही, तर प्रतिष्ठितांना हे धंदे करणे पाप वाटते. प्रत्येकाच्या पापपुण्याच्या कल्पना वेगवेगळ्या आहेत. वानर मारणे गोसाव्यांना पाप वाटत नाही. तेच कालगावातील धार्मिकांना महापाप वाटते. मारुतीचा अवतार मारून खाणारे गोसावी, शेतकऱ्यांना राक्षस वाटतात. वानर रामभक्त तसेच गोसावी रामभक्त असून देखील वानराची शिकार ते करतात, तेव्हा नाथा पाटील दु:खी होऊन गोसाव्यांना म्हणतात,

"गोसाव्या, तुझं खरं हाय, पण पंचल ते खावं, नि साजेल ते ल्यावं, असा वडलांचा बोल हाय..." (पृ. १९) पारंपरिक चालीरीती मोडू नये असे वरिष्ठांना वाटते. गावच्या वेताळावर वरिष्ठांची श्रद्धा आहे. "मुलगी लग्न होऊन सासरी जाणं नि संसार करणं हा देवाचा मार्ग आहे. तो बदलणं पाप आहे. चुलीचं लाकड चुलीलाच जळावं, तसंच लेकीनं सासरी नांदावे हा रिवाज आहे." (पृ.३८) यावरुन यंकू माकडवाला पारंपरिक रिवाज जपणारा दिसतो. दिल्या शब्दाशी इमान ठेवण्याची

आणि पंचाचा शब्द पाळण्याची माकडवाल्यांची परंपरा दिसते. अब्रू जपण्याची पाप-पुण्य मानण्याची त्यांची परंपरा आहे. बाटणे-बाटविणे पाप समजले जाते. पापी माणूस नरकात जातो अशी त्यांची समजूत आहे. देवासमोर 'दैवकाशी' बोलविण्याचे म्हणजे 'जातकाशी' जमविण्याची त्यांची परंपरा आहे. जातीतील सर्व वयस्कर मंडळी पंच म्हणून बोलाविले जातात. त्यांना जातकाशी म्हणतात. त्यांच्यासमोर तक्रार करुन न्याय मागितला जातो. सारांश दैवकांशी, जातकाशी किंवा पंच यांना माकडवाले विशेष मान देतात. त्यांनी केलेले न्यानदान सर्वांवर बंधनकारक असते. सर्वजण ते मान्य करतात.

माकडवाल्यांची विवाहपद्धती वैशिष्ट्यपूर्ण आहे. वधू-वरांच्या अगोदर 'वीर' पूजा करणारी परंपरा आहे. इतर समाजात आणि भटक्या जातीमध्ये दिसणार नाही. येमू-दुर्गाच्या विवाहच्या निमित्ताने लेखकाने त्यांच्या स्वतंत्र संस्कृतीचे दर्शन घडविले आहे.

"दुपारी वीरपूजन झालं. बक्या माकडवाला वीर घेऊन मळवट भरुन देवापुढं बसला. मग त्याच्या अंगात आलं नि हातात काठी घेऊन वीर खेळू लागला. दहा गडी हातात काठी घेऊन बक्याचा मारा रोखू लागले. वातावरण धडधडून पेटू लागलं. लग्नातील मंगल क्रिया घडू लागल्या. वीर शांत झाला. मग देवपूजन झालं... नवी नवरी नियमाप्रमाणे पहिल्या रात्री येमूच्या घरी जाऊन देव्हाऱ्यापुढं निजली." (पृ.११७). 'वीर पूजन' जातीविशिष्ट संस्कृतिचे दर्शन घडविते.

भिकारी वाऱ्यासारखे किंवा पक्षाप्रमाणे अस्थिर जीवन जगतात. पावसाळा त्यांच्या दृष्टीने अतिशय वाईट असतो. आपल्या लोककला जनतेला दाखवून त्यांचे मनोरंजन करुन जे मिळेल त्याच्यावर त्यांना उदरनिर्वाह करावा लागतो. स्वत:पेक्षा त्यांचे उपजीविकेस मदत करणाऱ्या पशुपक्षांवर अधिक प्रेम असते. माकड, बैल, साप, अस्वल यांचे खेळ करुनच या जमातीचे पोट भरते. म्हणून हे पशुपक्षी त्यांचे जीव की प्राण असतात. जसे हिकम्या गारुड्याचा साप यंकूने मारल्यावर तो टाहो फोडतो आणि जातभाईंना बोलवितो,

"गारुड्यांनोहो पळा, माझा देवासारखा नाग ह्या माकडवाल्यानं ठार मारला. आता मी काय करु?"(पृ.७) हिकम्या गारुड्याला साप देवासारखा वाटतो, कारण साप त्याच्या उपजीविकेची विद्या किंवा कला आहे. दरवेशाचे अस्वल किंवा माकडवाल्यांचे माकडालाही तितकेच महत्त्व आहे.

जंगलातील सर्व प्राणी-पक्षांची शिकार करुन त्यांना उपजीविका करावी लागते. मूलभूत गरजा देखील त्यांना भागविता येत नाही. अन्न, वस्त्र आणि निवारा यापैकी फक्त 'अन्न' मिळविण्यासाठीच त्यांना सर्वाधिक कष्ट करावे लागतात. बाकी गरजांना त्यांच्या दृष्टीने तितकेसे महत्त्व नाही. जगात स्वत:च्या मालकीचे काहीही नाही. तरीही

जग सुखी तर आपण सुखी असा व्यापक जिव्हाळा असलेला हा समाज आहे. सुगी आली तर लोक आपणास अन्न देतील म्हणून चांगली सुगी यावी असे त्यांना वाटते. सुगी संपल्यानंतर हातात कुदळ घेऊन उंदराचे बिळं खोदतात, उंदराने साठवून ठेवलेले भात वरती काढतात आणि उंदरांना भिकारी करुन स्वत:चे पोट भरतात.

लोकांचे मनोरंजन केल्याशिवाय भिक्षा-दान मिळत नाही. म्हणून त्यांना सातत्याने प्रयत्न करावे लागतात. गप्प बसून पोट भरत नाही, म्हणून इतरांची करमणूक करुन पोट भरायची कला त्यांनी अवगत केलेली असते, म्हणूनच म्हणतात, "अस्वलापेक्षा दरवेशाचा दंगा मोठा." अस्वल खेळवायचे तर गप्प बसून प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेता येत नाही. त्यांचे मनोरंजन होत नाही. म्हणून दरवेशी आरडा-ओरडा, दंगा करतो. सर्वच भटक्या जमातींना नानाविध क्लृप्त्या करुन पोट भरावे लागते. सारांश, आपल्या अंगातील कसब दाखवून, विविध कला करुन, पशू-पक्षांना खेळवून, त्यासाठी विशिष्ट विदूषकी पोषाख घालून लोकांची करमणूक करीत करीत ते लोक उदरनिर्वाळ करतात, ते शक्य नसेल तर शिकार करुन ते जगतात. अल्पसंतुष्ट, आर्थिकदृष्ट्या दारिद्र्यरेषेच्या खालचे जीवन हे लोक जगतात.

अण्णाभाऊंच्या भाषेविषयी डॉ. र. बा. मंचरकर लिहितात, "...भाषा तशी पीळदार आणि अळंग आहे. तिचा ठसका खास गावरान आहे आणि रुबाब न्यारा आहे."५२ प्रस्तुत कादंबरीच्या भाषेचा विचार करता हे विधान सार्थ वाटते. भटक्या विमुक्तांचे जीवन सहानुभूतीने आणि जवळून पाहिल्यामुळेच या कादंबरीतील भाषा रुबाबदार झाली आहे. त्यांचे सुखदु:ख, रागलोभ लेखकाने सहजतेने टिपले आहेत. त्यांच्या बोलीभाषेतील अनेक अर्थघन शब्दांचा वापर लेखकाने केल्यामुळे त्या बोलीचा वेगळा बाज सहज नजरेत भरतो. विविध जातीची ही माणसं आपापसात बोलताना सभ्यतेच्या मर्यादा ओलांडतात. भांडताना तर ताळतंत्र सोडतात, या सर्वांचे सूक्ष्म निरीक्षण करुन अण्णाभाऊंनी संवादातून ते वास्तव नीट उतरविले आहे. जसे रंगराव पाटलांना पाऱ्या म्हणतो की,

"आवं घान जात. तिला तुम्ही तूप म्हणता ते मला पटत न्हाय. मी म्हणतो, त्या दोन्ही पोरी नुसत्या मादरचोद हायती. त्या यंक्याच्या पोरीला त्यो येम्या रंगदार पोरगा पाटलाच आणि ती गुल्ली भकभवानीच हाय. पोरं भुलवून बाळ्याचं घर भरतीया." (पृ.११४)

यातील काही शब्द अश्लील वाटतील, पण ती जातिविशिष्ट असल्यामुळे सभ्यतेचा मर्यादा लेखकाने सांभाळलेल्या दिसतात. उलट नाथा पाटलाच्या तोंडी असे शबद येत नाहीत. ते बोलताना सभ्यतेच्या मर्यादा ओलांडत नाही, तरीही त्यांचा करारीपणा दिसतो. रंगराव खडसावताना ते म्हणतात,

"...वढाळ जनावराचं पोट दावणीला न् गव्हाणीला भरत नसतं. ते लोकांच्या

कवाडीत त्वांड घालून खातं.'' (पृ.१०९) व्यक्तिनुरूप भाषा लेखकाने वापरली आहे. त्याचप्रमाणे ग्रामजीवनातील म्हणी, वाक्प्रचार, उपमा, कल्पनांच्या वापरातून वास्तव समाजजीवन चित्रण केले आहे. 'पाऱ्याचा पारा चढला', 'यंकू पाऱ्याला हुरडा चोपावा तसा चोपीत होता', 'पचल ते खावं, नि साजेल ते ल्यावं', 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे', 'चुलीचं लाकूड चुलीलाच जळावं', 'करावं तसं भराव', 'बिब्बा आपल्या तेलात जळतो', 'अब्रू कांकणावाणी असती, कांकण फुटलं की त्येचा नाद जातो', 'पाण्यावर काठी मारली म्हणून पाणी तुटत नसतं', 'घाव गेला कळ कशाला आठवायची' या सारख्या म्हणीतून भटकयांच्या संस्कृतीचे आणि लोकजीवनाचे दर्शन घडते. भटक्या विमुक्तंच्या वापरातील अनेक शब्दांचा वापर लेखकाने केला आहे. हरकून, महीला, मुलामा, किंजाळात, केक, आकालावर, गोर, मुगार, टकुरी, कवावती, डिरकत, टुंगळी, समरत वाईच, बहुल्यावर, तिरकामठा माठीमिल्या इ. अर्थघन शब्दांच्या वापरातून भटक्या जमातीचे लोकजीवन स्पष्ट होते. माकडवाल्यांचे जीवनचित्रण असूनही 'माकडीचा माळ' केवळ जातीजमातीच्या जीवनावरील प्रादेशिक कादंबरी ठरत नाही. तर प्रादेशिकतेच्या अनेक खुणा या कादंबरीत आढळतात. मात्र या कादंबरीत प्रादेशिकतेचे सगळे घटक बघावयास मिळत नाही. याचे कारण विषयाच्या अंगभूत मर्यादेत आहेत. भटक्या विमुक्त उपेक्षितांचे जीवनचित्रण करणे हा लेखकाचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने 'प्रदेश' चित्रण आले आहे.

### *१२) वारणेचा वाघ*

स्वातंत्र्यपूर्वकाळातील ग्रामजीवनातील समाजवास्तवाचे चित्रण करणारी ही कादंबरी आहे. सत्तू भोसल्याच्या वयाच्या अठरा वर्षापासून मृत्यूपर्यंतच्या वीस-बावीस वर्षांच्या घडामोडींचे चित्र रेखाटले आहे. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे अठरा वर्ष वयाचा सत्तू भोसले लष्करात भरती होतो. अंगच्या गुणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतो. वेलस्ली साहेबांची देखणी मुलगी मेरी त्याच्या सहवासाचे कौतुक करते. हेकट लष्कराधिकारी रॉबर्ट त्याचा तिरस्कार करु लागतो. अपमानित करतो. तेव्हा स्वाभिमानी सत्तू त्याला आव्हान देतो. रॉबर्टची फजिती करतो. सरकारी अधिकारी अपमान करतो. तेव्हा स्वाभिमानी सत्तू त्याला आव्हान देतो. रॉबर्टची फजिती करतो. सरकारी अधिकारी अपमान केला, तो आपणांस सुखाने जगू देणार नाही, त्यालाच मुजरा करावा लागेल. अपमान करण्याची एकही संधी सोडणार नाही, हे जाणून नोकरीचा राजीनामा देऊन कुमजेला येतो.

कुमजेत परतल्यानंतर सत्तू भोवती गावचे तरुण जमतात. मथाजी चौगुला त्याचा तिरस्कार करु लागतो. गंजडी नाना भोसल्यांचा मुलगा गावचा कारभारी होणे मथाजीला रुचत नाही. शेताच्या कुपणाची काटी काढली म्हणून गरोदर सई महारणीला मथाजी

चौगुला बेदम मारतो. ती माफी मागते, तरी सोडत नाही. सत्तू मध्यस्थी करतो, त्याचे ऐकत नाही. संतापून सत्तू त्याचा खून करतो. मथाजीचे नातेवाईक सत्तूचा खून करण्याचा विचार करु लागतात. सत्तू फरार होतो. त्याच्या भोवती अनेक दरोडेखोर, इमानी लोक जमा होतात. वारणेच्या खोऱ्यातील उर्मट माणसांचा काटा काढण्याचास सत्तू सुरवात करतो. इंग्रज सरकार जागे होते. सत्तूला पकडण्यासाठी व्यर्थ प्रयत्न करु लागते. त्याला पकडून देणाऱ्यास इनाम जाहीर करतात. बहादुरवाडीचे दादा पाटील आणि मथाजीचा मुलगा उमाजी बेसावध सत्तूला पकडतात. परंतु वाटेगावचा फकिरा मांग त्याची सुटका करतो. सत्तूला पकडण्यासाठी मदत करणारे बहादुरवाडीचे लोक अपराधीपणाने चारहजार रुपये दंड भरतात. जखमी उमा आणि दादा पाटील नांदगावला तात्याबा पाटलाकडे जातात. फकिराने सत्तू संकटात असताना त्याना सोडविले, त्याच्या उपकाराची परतफेड करण्याची संधी मिळावी असे सत्तूला वाटते. नेल्र्यांच्या छावणीमध्ये फकिराचे नातेवाईक ओलीस ठेवलेले असतात. त्यांना सोडविण्यासाठी फकिराला मदत करण्याची संधी चालून येते. परंतु धूर्त इंग्रज अधिकाऱ्यांच्या कडक पहाऱ्यामुळे सत्तू फकिराला मदत करण्याची संधी चालून येते. परंतु धूर्त इंग्रज अधिकाऱ्यांच्या कडक पहाऱ्यामुळे सत्तू फकिराला मदत करु शकत नाही. फकिरा इंग्रजांना शरण जातो. फकिरा आणि त्याच्या सहकार्यांना कोल्हापूरला घेऊन जाणाऱ्या सरकारी शिपायांवर सत्तू हल्ला करतो. फकिराला सोडविण्याचा अयशस्वी प्रयत्न करतो. सरकारी अधिकारी जागे झाले. बाबरखान सत्तूला पकडण्याचा अयशस्वी प्रयत्न करतो. मिशनऱ्याच्या शाळेत शिकलेला सईचा मुलगा राजाराम ख्रिस्ती धर्म स्वीकारतो. म्हणून त्याला फौजदाराची नोकरी मिळते. सईच्या पोटातील राजारामला वाचविण्यासाठी मथाजीचा खून करुन फरारी झालेल्या सत्तूवर राजाराम उर्फ दनियल फौजदार हल्ला करतो. सत्तूला गोळी लागते. ज्याला जीवदान दिले तोच सत्तूचे प्राण घेतो. जुन्या नव्या पिढीतील विसंवादाची, इमान आणि बेइमानाची पार्श्वभूमी या कादंबरीच्या कथानकास लाभली आहे.

कुमजेचा सत्तू भोसले हा या कादंबरीचा नायक आहे. अंगापिंडाने मजबूत असलेला साहसी, धाडसी, निर्भय सत्तू लष्करात भरती होतो. परंतु, सरकारी अधिकाऱ्यांच्या अन्यायाला कंटाळून स्वाभिमानीवृत्तीचा सत्तू नोकरीचा राजीनामा देतो. मानवतावादी दृष्टीने गोरगरिबांची सेवा करतो. धनदांडग्यांना शासन करतो. त्यामुळे तो गरिबांचा देव आणि अनेक स्त्रियांचा भाऊ होतो. सुखी स्त्रिया त्याच्यासाठी 'आऊख' मागतात. इंग्रज अधिकाऱ्यांच्या दृष्टीने सत्तू म्हणजे, "काळीज नसलेला, पण डोके असलेला प्राणी" आहे. निधड्या छातीचा, बुद्धीमान, दिलेल्या शब्दाशी इमान राखणारा अन्यायाविरूद्ध आवाज उठविणारा, उपकाराची जाणीव ठेवणारा, करारी, स्वाभिमानी, मानवतावादी असा सत्तू येथे भेटतो.

आकाराम, गोंदा, सुगंधा, सुभद्रा, सई, बणाबाई, चिंतू पाटील, तात्याबा पाटील या सज्जन निष्ठावान, इमानी आणि प्रेमळ व्यक्ती त्या मातीत जन्मल्या आहेत. तर उमाजी चौगुला, दादा पाटील, कबिरा, खंडेराव, बाबरखान, दनियल या कावेबाज, धूर्त हिकमती, बेरकी, घाबरट, लाचार व्यक्तिरेखा आहेत. तर खाशाबा तडाखे, बापू गदाळे हे दोघे नांदगावातील फुणग्या टाकणारे गावातील नायटे आहेत. तर मेरी, बेलस्लीसाहब, रॉबर्ट, अल्बर्ट हे इंग्रज राज्याकर्त्यांचे प्रतिनिधी आहेत. अशा विविध वृत्ती प्रवृत्ती माणसांचे चित्रण करुन लेखकाने तत्कालीन समाजवास्तवाचे दर्शन घडविले आहे.

सातारा-सांगली-कोल्हापूर परिसरातील राजकीय शक्तींशी सत्तूने दिलेली झुंज अन्याय-अत्याचाराविरुद्धचा लढा हा या कादंबरीचा विषय आहे. सत्तू सोना प्रेमाची जोड उपकथानकाने मिळाली आहे. सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या कुमज, पाडळी, नांदगाव, कुंडलवाडी, बागणी, बहादूरवाडी, भेडसगाव आणि अजिंक्यतारा किल्ला आणि वाघदरा इ. प्रदेशांचे तसेच वारणेच्या खोऱ्यातील जमीन, पिके आणि जंगलकडे यांच्या वर्णनातून हा प्रदेश जिवंत केला आहे. कुमजेची काळी सुपीक जमीन आणि तेथील वैभवाची पार्श्वभूमी या कादंबरीला लाभली आहे.

ऋतुचक्रानुसार रंग बदलणाऱ्या निसर्गाचे चित्र रेखाटून दोन घटनांतील अंतर निसर्गाच्या बदलत्या साजाने व्यक्त केले आहे. डोंगराळ प्रदेशातील चैत्र महिन्यातील उन्हाळ्याचे वर्णन पहा.

"चैत्र महिना होता. उन्हं धरणीला भाजून काढीत होती. नदीचं पाणी तापून मासे पोळून निघत होते आणि त्या उन्हात नव्या नव्या पालवीत वारणाकाठ सुंदर दिसत होता. हिरव्या रंगाची शाल पांघरुन बसल्यासारखा तापलेली धूळ घेऊन वारा पळत होता. पाखरं गांगरली होती. ती फांदीफांदीवर बसून उन्हं उतरण्याची वाट बघत होती. सर्वत्र नि:शब्दता नांदत होती." (पृ.२१)

वरील निसर्गवर्णनातून दलितांवर अन्याय करणाऱ्या धनिकांची कठोरवृत्तीच दिसते. सईला मारहाण करणारा मथाजी चौगुला चैत्रातल्या उन्हाप्रमाणे तर सई महारीण गांगरलेल्या पक्ष्याप्रमाणे वाटते. मानसिकतेनुरूप रेखाटलेले निसर्गवर्णन पहा.

"...त्याचवेळी पहिला कोंबडा आरवला... क्षितिजावर नवे रंग फुलत होते. अनंत रंगांच्या ढगांच्या पायघड्यावरुन नवा प्रकाश येऊ घातला होता नि म्हणूनच खुराड्यात कोंबडे ललकार ठोकीत होते. पाखरं पंख झटकून सज्ज झाली होती नि जीवनाला हळूच गती मिळत होती." (पृ.३०) येथे सत्तूची उल्हासित वृत्ती आणि निसर्ग एकजीव होऊन अवतरला आहे. नांदगावची सुभद्रा जात्यावर ओव्या म्हणताना सत्तूला 'आयुख' मागत होती, या ओव्यारुपी पायघड्याच आहेत. दऱ्याखोऱ्यात खडतर जीवन जगणाऱ्या सत्तूवरही सुभद्रेसारख्या स्त्रिया उत्कट प्रेम करत होत्या.

म्हणूनच त्याला जगण्याचे बळ मिळत होते. उन्हाळा, हिवाळा त्याचप्रमाणे पावसाळ्याचे वर्णन (पृ.१०५) शेतकऱ्यांच्या आशाआकांक्षानुरुप आणि बाबरखान फौजदाराच्या मानसिकतेनुरूप रेखाटले आहे. तेव्हा डॉ. र. बा. मंचरकर म्हणतात त्याप्रमाणे "त्यांची निसर्गवर्णने रंगसंवेदनांनी लखलखलेली वाटतात. दोन घटनातील अंतर ते निसर्गाच्या बदलत्या साजाने व्यक्तवितात. जीवनाचे पालन-पोषण करणारे रंग धुंद ऋतुचक्र त्यांच्या कादंबरीत गरारा फिरत असते. त्याच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवनाचे रहाट गाडगे ते रेखाटतात."५३. हे डॉ. मंचरकरांचे विधान प्रस्तुत कादंबरीतील निसर्गवर्णाचे रुप स्पष्ट करणारेच आहे.

निसर्गावलंबी जीवन-'शेती'शी निगडीत जीवन येथील लोक जगतात. ते दानशूर आहेत. सत्तूसारखे छत्र जपले पाहिजे, म्हणून गावागावातून त्याला मदत केली जाते. सत्तू आपला आहे याची जाणीव त्यांना आहे. म्हणूनच त्याच्यावर प्रेम करतात. वारणामाई आणि खोऱ्याबद्दल त्यांना अभिमान आहे. म्हणूनच बाबा महार सत्तूला म्हणतो, "काल सायेबास्नी तुम्ही वारणेचं पाणी झकास दावलतं. कोल्हापूर गाजवलंत. दांडगा झपाटा राव तुमचा." (पृ.१४) लाचारी या समाजाच्या रक्तातच जणू नाही. समाज स्वाभिमानी आहे. मरणाची या समाजातील लोकांना भीती वाटत नाही. रॉबर्टने अपमान केल्यावर सत्तूची स्वाभिमानी वृत्तीच प्रकट होते. धनिकांचा गावात दरारा असावा असे स्पष्ट होते. जसे सत्तूचे वडील नाना भोसले यांच्या वैभवाच्या काळात त्यांच्या वाड्याकडे न बघताच लोक रामराम करीत होते. सावकार कुळांना लुबाडत होते. खोटे गहाणखत करीत होते. निरक्षर कुळांना सावकाराने केलेल्या अन्यायाविरूद्ध आवाज उठविणे शक्य नव्हते. या दरिद्री कुळांना सत्तू सावकारांच्या कर्जातून कर्जमुक्त करतो, त्याचप्रमाणे बायका न नांदवणारे नवरे किंवा 'पती'जवळ न नांदणाऱ्या स्त्रियाही त्या समाज व्यवस्थेत होत्या.

"कित्येक दांडगेश्वर त्यानं चिरडून काढले होते. सावकारांच्या वह्या नि गहाणखत जाळून कित्येक कुळाना कर्जमुक्त केलं होतं. त्याच्या अस्तित्वानं वारणेचा काठ हादरत होता. नवऱ्यांनी टाकलेल्या मुलींना पुन्हा नांदवायला सत्तूनं त्या नवऱ्यांना भाग पाडलं होतं. सोडलेली बायकू घरात घेत न्हाई म्हणणाऱ्या नवऱ्यांनी तो वरात काढीत होता. कैकांना एका पायावर उभं राहण्याची शिक्षा देत होता. लेकीच्य लाडक्या बापांना कडक दम भरुन आणि रंगदार जावयांची रग जिरवून अनेक मुलींचे संसार सावरीत होता नि ते सोन्याचे करीत होता. त्याच्या दबदब्यानं मुली दिल्या घरी नांदत होत्या आणि सत्तूला पाठचा भाऊ मानून दुवा देत होत्या. त्याला देव मानीत होत्या." (पु.२६) माणुसकीनं वागणारा, परोपकार करणारा चारित्र्यवान व गरिबांचा वाली असणारा एखादा साधा माणूस ग्रामीण जनतेला देवासारखा वाटतो.

इमानीपण, शब्दाला जागण्याची वृत्ती येथील समाजाच्या नसानसात भिनलेली

होती. उलट काही लाचार लोकही होते. सईला दिलेल्या शब्दाप्रमाणे दनियलवर सत्तू गोळी घालत नाही, तर दनियल मात्र सत्तूवर गोळी झाडतो. "सत्तूच्या भोवतीची माणसं माणसातून उठली होती आणि जगण्याची धडपड करीत होती ती कायदा मानीत नव्हती, पण जिभेला देव समजत होती आणि शब्दासाठी प्राण देण्याची दानत ठेवीत होती. ती जगण्यासाठी जेवढी शिकस्त करीत होती. तेवढीच ती जीवावरही उदार झालेली होती. मरणाला कस्पटसमान लेखीत होती." (पृ.७०)

सत्यवचनी, नेकीचे, इमानी माणसं जशी येथे आढळतात, त्याचप्रमाणे खाशाबा तडाखे आणि बापू गदाळे सारखे आगलावेही गावागावात होते. अफवा पसरविण्याचे काम ते सहज करतात. गावात कलागत लावण्यात ते कधी मागे पडत नाहीत. अशा लोकांना गावकरी नायटे म्हणून ओळखतात. ते कुणाच्याही सुखी संसाराला आग लावतात. विस्तव त्यांच्या हातात नव्हता, तर तो त्यांच्या जिभेवर होता.' अब्रू जपणारे माणसे समाजात होती. सोना-सत्तू संदर्भात नांदगावात अफवा पसरतात, तेव्हा तात्याबा पाटील संतापतात कारण त्यांना अब्रूची किंमत वाटते. चिंतू पाटील देखील तात्याबा पाटलाच्या इभ्रतीला साजेल असेच सत्तू-सोनाचे लग्न लावतो. या समाजात स्त्रियांचे स्थान नगण्य आहे. तिलासुद्धा याची जाणीव झालेली नाही. याची साक्ष सोनाच्या पुढील विधानातून मिळते, ती आपल्या वडिलांना म्हणते,

"मुलीच्या जन्माला दिल्या घरी मर" अशी वाडवडिलांची ताकीद असते आणि या दोनच जागा मुलींसाठी पवित्र मानल्या गेल्या आहेत. तिसरी जागाच तिला नसते आणि जर ती तिसऱ्या जागी गेली तर त्या जागेचं नाव बाजार असं आहे. ती मुलगी बाजारबसवी ठरते." (पृ.७९) यावरुन स्त्री स्वतंत्र नव्हती, तिच्या भावनांची प्रेमाची कदर केली जात नव्हती हे स्पष्ट होते.

येथे स्पृश्यास्पृश्याचा विचार आहे. धनिक मागासवर्गीयांना तुच्छतेने वागवताना दिसतात. पाटील-कुलकर्णी यांच्यासारखे जातिभेद-उच्चनीचता मानीत. मथाची चौगुली किरकोळ कारणावरुनसई महारणीला बेदम मारतो किंवा दनियल फौजदाराने चावडीत कुलकर्ण्यांच्या गादीवर बसणे, पाटलाच्या घरी महार फौजदाराला स्वयंपाक करण्यास सांगणे सहन होत नाही. परंतु बदलत्या परिस्थितीस अनिच्छेने सामोरे जाण्याशिवाय पर्याय उरत नाही. मागासवर्गीयांनाही इंग्रज आमदाणीतील नवे बदल मान्य नाही. सई महारणीला दनियलने चावडीवर जाणे मान्य नाही, उलट दनियलला वाटते की आईवडिलांनी लाचार होऊन जगू नये. काळनुसार त्यांनी बदलावे. एकूण जातीभेद, शिवाशिव, विटाळ,. स्पृश्यास्पृश्य, बाटणे या जुन्या गोष्टी इंग्रज आमदानीत मागे पडलया. मागासवर्गीयांमध्ये शिक्षणामुळे जागृती झाली. त्यांनी विद्रोह पुकारला. त्यांच्या नव्या जुन्या पिढीत विसंवाद होऊ लागला. अन्यायाविरूद्ध आवाज उठविण्याचे सामर्थ्य निर्माण झाले.

या कादंबरीत राजसत्ता आणि धर्मसत्ता, राजसत्ता व न्यायसत्ता, शासन आणि सामान्य माणूस, यांच्यातील नाट्य चित्रित करुन त्याद्वारे स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण जनतेची मानसिकता व्यक्त केली आहे. ब्रिटिश सत्ता ख्रिश्चन धर्मगुरुपुढे लाचार झाली होती. कारण त्यांच्या वाटेतील काटे धर्मगुरू नाहीसे करीत होते. भुके कंगाल लोकांना ख्रिस्ती करुन त्यांच्या पोटाची सोय करत होते. परंतु ग्रामीण समाजजीवनात त्यामुळे संघर्ष निर्माण झाला होता. 'जनरेशन गॅप' निर्माण होते. उपकारकर्त्या सत्तूच्या आईची सेवा सई करु लागते. उलट दनियलला आईचे वर्तन मान्य नसते. तो तिला वेडी ठरवितो. अल्बर्टची धर्मसंस्था राज्यसंस्थेवर राज्य करुल लागते. अल्बर्ट बरोबर राजा सुरुवातीला रहात होता. त्याला तेव्हा काही कटू अनुभव येतात आणि हिंदूधर्माबद्दल त्याच्या मनात घृणा निर्माण होऊ लागते. यातून कादंबरीतील समाजवास्तवाचे चित्र स्पष्ट होते. मागासवर्गीयांना खेड्यापाड्यातील तळ्याचे किंवा विहिरीचे पाणी भरु दिले जात नव्हते. कारण तळं-विहीर बाटते असा समज होता. चोरुन पाणी भरले तर स्त्रियांना पाणी बाटवले म्हणून नग्न करुन मारले जात होते. मंदिर चावडी प्रवेशाला विरोध होत होता. दगडाचा देव मानला जात होता. परंतु राजाला अल्बर्टकडून आकाशातील बाप्पाचे रुप वेगळे असल्याचे कळत होते. 'माणसानं माणसावर प्रेम करावं, देव दगडात नसून तो आकाशात आहे, तोच पाऊस पाडतो. तोच शेतं पिकवतो आणि तोच माणसाला त्याची भाकर देतो. तो दयाळू आहे.'' (पृ.१२०) असे अल्बर्ट राजाला सांगतो. तर हिंदू समाजव्यवस्थेत उलट चित्र दिसते. माणसं माणसावर प्रेम करण्यापेक्षा दुष्टपणाने वागतात, जातिभेद पाळतात, निर्दयपणे अन्याय करतात असे चित्र दनियलला दिसले म्हणून तो ख्रिस्ती होतो.

''...हिंदू धर्मात अर्थनाही. जो धर्म माणसाला माणूस समजत नाही, त्या धर्मात खितपत मरण्यात काय अर्थ आहे? हिंदू धर्मात मानवाला मुक्ती नाही, मान नाही, शांती नाही, सुख नाही...''

आणि आपलं जन्मगाव कुमज, काय आहे त्या कमजेत? उच्चवर्णीयांचा उर्मटपणा, अमानुष जातिभेद, शिवाशिव, घरचं अपार, दारिद्र्य, आईची लाचारी, बापाचा भोळसटपणा आणि गरिबाचं जनावरासारखं जगणं, अशा नरकातून बाहेर पडायचं असेल तर एकच उपाय आहे आणि तो म्हणजे ख्रिस्तीधर्माचा अंगीकार करणे, दुसरा मार्ग नाही.''(पृ.१२१)

आईची देवपूजा, वडलांचे 'हरीहरी' करीत भजन करणे, पंढरपूरला जाऊन माळ घालणे, सूर्यनारायणाला नमस्कार करणे, नव्या पिढीतील शिकलेल्या राजाला मान्य नव्हते. उलट जुनी पिढी बदलायला तयार नव्हती.

''पण तू नाव सोडलं, जात सोडलीस, धरम टाकलास, पारपार बदलून आलास,

तसं आमास्नी करता येनार न्हाय." (पृ.१२६). सारांश, शब्दाला जागणारी, इमानी, उपकाराची जाणीव ठेवणारी, मानवतावादी, तसेच अफवा पसरविणारे, खबरे-दगलबाज लाचार माणसं येथे दिसतात. अब्रू साठी जीव देणारी-घेणारी माणसंही दिसतात. जातीभेद, शिवाशिव, अन्याय, अत्याचारांनाही स्थान होते. परंतु हळूहळू शिक्षणप्रसारामुळे विचार परिवर्तनास सुरुवात झाली. मागासवर्गीय समाजाला आपल्या हक्क-कर्तव्याची जाणीव होऊ लागली. त्यातून नव्या-जुन्या पिढीत संघर्षही निर्माण झाला.

परंपरागत लोकजीवनात अनेक श्रद्धा, समजुती, रीतीरिवाज संकेत यांना स्थान असते. यात्रा-उत्सवालाही महत्त्व होते. जात्यावर दळण दळताना स्त्रिया ओव्या गात होत्या. अनेक लोककथांचा ह्या लोकजीवनावर परिणाम झाला आहे. दृष्ट लागू नये म्हणून काजळ घालणे, दृष्ट काढणे, अंबाबाईला नारळ फोडणे, नवऱ्याच्या नावाने कुंकू लावणे, तिथी पाहून लग्न लावणे, ब्राह्मणास दक्षिणा देणे आणि विवाहातील विविध विधी इ. अनेक श्रद्धा समजूती संकेत या समाजात होते.

शुभद्रेच्या ओव्यातून भावावरील बहिणीची माया जशी प्रगट होते, त्याचप्रमाणे सांस्कृतिक जीवनातील ओव्याचं वेगळेपण नजरेत भरते. एकमेकांवरील विश्वास त्यातून व्यक्त होतो. स्त्रियांची मानसिकता स्पष्ट होते.

'नसलं जरी माहेर, भाऊ असावा पाठीचा ।
गरिबाचा वाली जसा, सत्याबा कुमजेचा ॥
सरीलं माझं दळण, घास घालीला शेवटला ।
आळवीत देवराया, दे आउक सत्याबाला । (पृ.३१)

दिवाळीच्या सणाचे ग्रामीण जीवनात स्थान असलेले दिसते. जसे सुभद्रेला बांगड्या भरणे, साडी देणे यातून बहिणीला भावाने भाऊबीज देण्याची सांस्कृतिक परंपरा दिसते.

लोककथानाही या समाजाच्या सांस्कृतिक जीवनात विशेष स्थान आहे. "रामानं चौदा वरसं वनवास भोगला पण रामपरासबी वंगाळ वनवास तुझ्या नशिबी आलाय, तो कवा संपणार?" (पृ.८९) असे अण्णाभाऊ सहज लिहितात. उमाजीवर भडकलेला तात्याबा पाटील सोनाच्या लग्नासंदर्भात बोलताना म्हणतो, "पुष्कळ झाली आहेत. सीतेचं झालं, सावित्रीचं असंचं झालं. द्रौपदीचं आणि रुक्मिणीचंही असंच लग्न झालं होतं आणि त्यांच्या बापांनी काहीच केलं नाही, मग माझा काय पडीभार? (पृ.१०३) यावरुन असे म्हणता येईल की, राम, सीता, सावित्री, द्रौपदी ही ग्रामीण समाजाची दैवतच आहेत.

वारणेच्या खोऱ्यातील जनतेचे आर्थिक जीवनमान सुखी समृद्ध असे आहे. मागासवर्गीयांच्या दयनीय स्थितीचेही प्रसंगानुरुप वर्णन येते. शेतकऱ्यांच्या सुखी जीवनाचे तर कुळांच्या कर्जबाजारी जीवनाचे चित्रण येथे आहे. गांजापायी नाना

भोसल्याने वैभव घालविल्यानंतर बणाबाई प्रतिकूल आर्थिक परिस्थितीशी झुंज देते. 'बडे घर पोकळ वासा' अशी तिची स्थिती होते. सत्तू नोकरीला लागताच तिचे कोलमडलेले घर स्वतःच्यापायावर सरळ उभे राहिले, पण त्यापूर्वी धीराच्या बणाबाईने सत्तूला वाढविले. 'जी मिळेल ती मजुरी करीत होती. कुणाचं दळण कांडण करुन, कुणाची घरं सारवून तर कुणाची खळी शिंपून ती वक्ताला गाठ घालीत होती.'' (पृ.२०) परिस्थिती सावरणारी खंबीर स्त्री रेखाटली आहे.

मागासवर्गीयांची स्थिती फारच वाईट होती. बाबा महार पोटासाठी कोल्हापूरला वेलस्ली साहेबांकडे बटलरचे काम करतो. त्याला तेथे पोटाला पोटभर खायला मिळते. म्हणून तो म्हणतो, ''कुमजंत उडदाची डाळ खादुन हगवण लागतीया' (पृ.९८) किंवा सईचा राजा मावशीकडे कोल्हापूरला शाळेत जातो. न्याहारी न करताच तो शाळेच उशीरा येतो, ''आज दाणं नव्हतं घरी.'' (पृ.११७) असे तो अल्बर्टला सांगतो. सारांश, शेतजमीन असणाऱ्यांचा प्रश्न नव्हता, खरा प्रश्न मागासवर्गीयांच्या पोटाचा होता. सत्तूसाठी वारणेच्या खोऱ्यात, 'बोकड' मारले जात होते. पण मागासवर्गीयांना उपासमार सोसावी लागत होती.

हिंदूस्थानातील जनतेची ब्रिटिशांचे संबंध शत्रूत्वाचे होते. जेते म्हणून ते मिरवत होते. पराक्रमी-शूर पुरुषांची त्यांना कदर नव्हती. तर खबऱ्यांना ते जवळ करुन सत्ता टिकविण्याचा प्रयत्न करीत होते. बणाबाईचे दुःखाचे दिवस संपावेत म्हणून सत्तू लष्करात नोकरी करु लागतो. त्याचा पराक्रम रॉबर्टसारख्या अधिकाऱ्यांना डोईजड वाटतो आणि म्हणून वेळोवेळी सत्तूचा तो अपमान करतो. स्वाभिमानी सत्तू अल्पकाळात लष्कराची नोकरी सोडतो. त्यापूर्वी रॉबर्टला विरोध करताना तो म्हणतो,

''... सवाल माज्या एकट्याचा आहे. सर्व मराठी माणसांचा नाही. मराठी माणूस लुटारु नसतो, तर तो लुटारुंचा फडशा पाडतो, त्यांना नेस्तनाबूत करतो. या देशात मराठ्यांनी राज्य केलं आहे. त्यांची स्वतंत्र अशी रणनीती होती. तो माझा इतिहास मला ठाऊक आहे. लुटारु कोण ते इतिहास ठरविणार आहे. तोच सांगणार आहे. पण त्यावेळी मी बेशिस्त आणि तुम्ही शिस्तवाले. आपण दोघेही कुठे असू, ते कुणीच सांगू शकणार नाही.'' (पृ.१०) बेशिस्त म्हणून अपमान करताच सत्तू रॉबर्टला समज देतो. रॉबर्टची जेत्याची भावना-सत्तेची गुर्मी यातून दिसते. तर सत्तूचे स्वदेश-इतिहास याबद्दलचे प्रेम यातून स्पष्ट होते.

गुन्हेगार पकडण्यासाठी बाबरखानासारख्या लौकिकाला चढलेल्या फौजदाराला सत्तूवर चालून जाण्याची आज्ञा झाली. ''सर्वशक्ती पणाला लावून सत्तूचा निःपात करा. सातारच्या धरणीवर एकही बंडखोर उभा ठेवू नका, चिरडून काढा । असा हुकूम सुटला.'' (पृ.७३) पण त्याला अपयश आल्यानंतर तो 'डोकं असलेला आणि काळीज नसलेला प्राणी' असे म्हणू लागला. सारांश, 'फोडा झोडा' या इंग्रज नीतीचा

वापर करुन सत्तूला पकडण्याचा प्रयत्न सरकार करु लागले. याचप्रमाणे 'सरकारविरुद्ध बंड पुकारलेल्या लोकांना मदत करणे, बातम्या देणे हा भयंकर गुन्हा समजला जात होता, त्यांना फाशीची शिक्षा दिली जात होती असेच उमा चौगुले आणि सोनाच्या संवादातून (पृ.८३) अण्णाभाऊंनी सूचित केले आहे.

'राज्य संस्थेवर धर्मसंस्था राज्य करीत होती' असे चित्र लेखकाने रेखाटले आहे. "इंग्रज राज्यकर्ते राज्य करीत होते. परंतु अल्बर्टसारखे अनेक धर्मोपदेशक त्या राज्यकर्त्यांचा मार्ग सुलभ करीत होते. ते सर्व गोरगरिबांची दु:ख अडचणी, गाऱ्हाणी ऐकून घेऊन ती राज्यकर्त्यांच्या कानावर घालीत होते. एवढंच नव्हे, तर ती गाऱ्हाणी निवारुन घेत होते. सत्ताधाऱ्यांवर या धर्मोपदेशकांचा भलताच वचक होता." (पृ.१२०) धर्मोपदेशक सर्वाधिकारी होते, त्यांच्यासमोर सरकार मान लववित होते. म्हणूनच अल्बर्टच्या सूचनेनुसार दनियलला फौजदार केले जाते.

'मराठा समाज संघटीत होऊ नये' यासाठी सरकार सावध होते. उमा चौगुला बाबरखानला सल्ला देतो की, "तुम्ही फकिराला जसं पकडलं तसंच सत्तूला पण कैद करावं" तेव्हा बाबरखान म्हणतो, "फकिरा' एक मांग होता आणि सरकारनं केलेला गुन्हेगार जातीचा कायदा होता म्हणून ते चालनू गेलं. सत्तूची बाब अगदी निराळी आहे. तुम्ही म्हणता तसं केलं तर सगळा मराठा समाज भडकून उठेल. नको ते वैरी उद् भवतील..." (पृ.१११) बहुसंख्य समाजात सरकार विरुद्ध असंतोष निर्माण होऊ द्यायचा नाही, असा धूर्त इंग्रजांचा प्रयत्न होता.

भूके कंगाल मागावर्गीय लोकांना दया दाखवून आपलेसे करण्याचा प्रयत्न धर्मोपदेशक आणि सरकार करताना दिसते. त्यांना मोफत शिक्षण देऊन लाचार बनवायचे. सरकारी नोकऱ्या द्यायच्या आणि काट्याने काटा काढायचा असे त्यांचे तंत्र आहे. म्हणूनच सत्तेची गुर्मी चढलेले दनियल सारखे फौजदार धोंडोपंत कुलकर्णी आणि विठूबा पाटील यांना दमदाटी करतात. हुकूम सोडतात. सरकारी फौजेच्या जेवणाची व्यवस्था करण्यास भाग पाडतात. लाचार बनवितात. सत्ता गाजविण्याची संधी सोडत नाही.

'वारणेचा वाघ' कादंबरीतून ब्रिटिश सरकारच्या राजनितीचा आलेखच लेखकाने काढला आहे. इंग्रज सरकार सत्ता टिकविण्यासाठी दहशत निर्माण करते. कावेबाजपणा आणि धूर्तपणा त्यांच्या रक्तातच भिनलेला होता. सर्वशक्तीनिशी शत्रूचा नि:पात करण्यासाठी ते धडपडतात. त्यासाठी गुन्हेगारांना गुन्हे माफ करणे, लालूच दाखविणे, दगलाबाजांना हाताशी धरणे, शत्रूच्या शत्रूला मित्र म्हणून फायद्यासाठी जवळ करणे अशा फोडा-झोडा नीतीचा अवलंब सरकार करीत होते. बंडखोरांना मदत करणाऱ्यांना फाशीची शिक्षा देत होते. मराठा लोकांनी संघटित होऊ नये म्हणून त्यांना दुखवत नव्हते. तसेच गरिबांना जवळ करुन अन्नाला लावत होते. काट्याने काटा काढण्याचे

त्यांचे धोरण होते. इंग्रज राज्यसंस्थेवर धर्मसंस्थेची पकडही मजबूत असेलेली दिसते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात शिक्षणाचे महत्त्व आमजनतेला समजलेले नव्हते. परंतु, मिशनऱ्यांची मोफत शिक्षणाची सोय केली. सत्तू, राजा हे सातवीपर्यंत शिकलेले. धोंडोपंत कुलकर्णी गावकर असल्यामुळे त्यांना अक्षरज्ञान आहे परंतु विठो पाटील मात्र केवळ पंतांनी सांगितलेल्या ठिकाणी अंगठे उठवतांना दिसतात. पारंपरिक 'गावगाडा' पाटील-कुलकर्णी चालवत असल्यामुळे सरकारी काम पाहणारे शिकलेले असत. पाटील निरक्षर, अंगठेबाज असत उलट मागासवर्गीयांची नवी पिढी मिशनऱ्यांच्या शाळामधून शिक्षण घेऊन जुन्या पिढीला-त्याच्या लाचारीला दोष देऊ लागली. समाजात जागृती झाली. शिवाशिव, जातिभेद, अन्याय-अत्याचार, करणाऱ्या समाजाच्या विरुद्ध आवाज उठविण्याचे शक्ती त्यांना शिक्षणामुळेच लाभली. परंतु केवळ शिकलेल्या मुलांना नोकऱ्या दिल्या नाही तर ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्यांनाच त्यांनी नोकऱ्या दिल्या असेच विभावरी शिरुरकरांच्या 'बळी'प्रमाणेच या कादंबरीतून लेखकाने चित्र रेखाटले आहे.

वारणेच्या खोऱ्यातील जनतेची बोली भाषा या कादंबरीत अनुभवाच्या मागणीप्रमाणे अपरिहार्यपणे आली आहे. बोलीच्या वापरामुळे जीवदर्शन अधिक वस्तुनिष्ठ आहे. निवेदन आणि संवादाची भाषा एकजीव होऊन अवतरली आहे. लोकजीवनातील म्हणी, वाक्प्रचार, उपमा, प्रतिमाच्या वापराने आणि बोलीतील अर्थघन शब्दांनी ती ठसकेबाज झाली आहे. तिच्यात एक नाद, लय आहे. वाचकाला खेचून ठेवण्याचे सामर्थ्य त्या बोलीत आहे. उदा. 'शेंडी धरली तर बोकडी आणि हात धरला तर रोडकी', 'शहाण्याचं चाकर व्हावं, पण अडाण्याचं धनी होऊ नये', 'कुंभाराची सून अखेरीला कातवरालाच जाणार', 'घोड्याच्या मागून आणि चावडीच्या पुढून कधीच जाऊ नये', 'हुरळली मेंढी लांडग्याच्या पाठी' इ. तसेच बोलीभाषेतील अनेक अर्थघन शब्द प्रदेशविशिष्ट आहेत, जसे कवतिक, पावटी, बुकणा, आउक, रणभैरी, बेहिमंत, रणगाजी, फुगण्या सबुद, वाराहुरा, माणसंकणसं, भेरगं, टकुरं, काजवारल्यानी, साठमारी, पडीभार इ.

नाट्यावर भर रोमहर्षक प्रसंगाची रेलचेल, कुणाचा तरी कुणाविरुद्ध लढा, त्यामागे गृहित धरलेले एक सनातन न्यायतत्त्व ही अण्णाभाऊंच्या लेखनाची बलसथाने आहेत, त्यामुळे पूर्णांशाने प्रादेशिकता प्रकट होत नाही. तिला अस्पष्ट व साधनाचे स्वरुप प्राप्त होते. धुसर झाल्यासारखी वाटते.

## ९) रणजीत देसाई

'बारी' (१९५९), 'माझागव' (१९६०), 'समिधा' (१९७९) या कादंबरीतून ग्रामीण वास्तवाचा आविष्कार रणजीत देसाई यांनी घडविला आहे. 'बारी' बेरडांच्या

संस्कृती विनाशाची कथा सांगितली आहे. 'माझा गाव' मधून स्वातंत्र्यपूर्व काळातील खेडे चित्रित केले आहे. तर 'समिधा' परंपरांनी जखडलेल्या दलित समाजात परिवर्तनाचे कार्य करणाऱ्या तुकाची शोकांतिका आहे.

### (१३) *'बारी'*

'बारी'मधून बेरड जमातीतील तेग्याचे वैयक्तिक जीवनचित्रण व उपेक्षित बेरड जमातीचे जग उभे केले आहे. आधुनिकीकरणामुळे नष्ट होऊ घातलेल्या संस्कृती विनाशाची कथा तेग्याच्या जीवनदर्शनातून लेखकाने रेखाटली आहे. अवखळ नागीबरोबर तेग्या लग्न करतो. इमानी जीवन जगतो. इनामदाराच्या गाड्या नजरचुकीने 'बेरडांकडून लुटल्या जाताच तो शरमिंदा होतो. इनामदारांच्या शपथेत अडकल्यामुळे सारोळ्याच्या पाटलाचा तो खून करतो. तसेच चंद्रा नावाचा जिवलग मित्राचाही त्याच्या हातून खून होतो. इनामदाराच्या सांगण्यावरुन सारोळ्याच्या पाटलाचा खून केला म्हणेन तेग्याला अकरा वर्षांची सजा होते. पोलीसाचा मार खाऊनही इनामदाराचे नाव तो मध्ये येऊ देत नाही. उलट इनामदार बेईमान होतो. ठरल्या शब्दाप्रमाणे नागी आणि त्येगचा मामा मल्ला यांना पाच हजाराची मदत देत नाही. तेग्याचा मित्र काळू मात्र तेग्याला सोडविण्याची धडपड करतो. तुरुंगातून सुटताच इनामदाराची बेईमानी तेग्याला समजते. तो इनामदाराला जाब विचारण्यासाठी वाड्यावर जातो. त्यांचा खून करण्याची धमकी देतो. पण आईसाहेबांच्या वचनात फसतो. इनामदाराने फेकलेले पाचशे रुपये इनामदारबाईंना चोळी-लुगड्यासाठी भावाची भेट म्हणून देऊन बाहेर पडतो.

स्वत:चा मुलगा ईश्वराला फरशी-भाला चालविण्याचे शिक्षण देतो. आपल्या मागे तोच बेरडवाडीचा नायक व्हावा म्हणून प्रयत्न करतो. शिकार, दरोडे, पशुपालन, शेती, चऱ्हाट वळण्याचे काम करतो. ईश्वराचे लग्न करतो. पण अपधाताने घर पेटते. यावेळी नागी भाजून मरते. तेग्या उध्वस्त होतो. सावकाराकडून कर्ज काढून नवे घर उभे करतो. जंगलाला लागलेला वणवा गावकऱ्याच्या मदतीने विझवतो. हळूहळू ईश्वरा आणि तेग्यामध्ये विसंवाद निर्माण होतो. परंपरा जतन करु पाहणारे त्याचे मन आधुनिकीकरणाला विरोध करु पाहते. पण कालगती त्याच्यासाठी थांबत नाही. इश्वरा नाईक असून नोकरी करु लागतो. जंगलतोडीमुळे गाव ओस पडते. नवनवीन सुधारणा होतात. सुधारणांबरोबर बेरडांच्या जुन्या संस्कृतीचा ऱ्हास होतो, पारंपरिक लोकजीवनात परिवर्तन येते. असे दोन भागात आलेले 'बारी'चे कथानक आहे.

'बारी'तल्या व्यक्तिरेखांवर प्रदेशाचा खास परिणाम झालेला दिसून येतो. बेरड जमातीतील लोक दिलेल्या शब्दाला पक्के आहेत. ते प्राथमिक पातळीवरचे जीवन जगतात. नवे बदल, सुधारणा त्यांना मानवत नाहीत. नीतिमत्ता जपण्याची धडपड जुनी पिढी करते, नवी पिढी 'शामळू'पणाने वागू लागते.

सर्व बेरड जमात असलेल्या 'बेरडवाडीचा' तेग्या नाईक आहे. त्याच्या तारुण्यापासून ते वार्धक्क्यापर्यंतच्या चाळीस-पंचेचाळीस वर्षातील जीवनाचे चित्रण लेखकाने केले आहे. तो सत्प्रवृत्तीचा, दृढनिश्चयी, इमानी, एकवचनी आणि करारी आहे. अपमान करणाऱ्या नागीला तो पळवून आणतो. तिच्याशी विवाह करतो. तसाच तो पारंपरिक जीवन जगणारा, जंगलावर प्रेम करणारा, स्वाभिमानी, प्रेमळ, न्यायप्रिय, विश्वासघात न करणारा, स्पष्टोक्ता, हळवा तितकाच संवेदनाक्षम आहे. बेईमानी त्याच्या रक्तात नाही. परंतु गावचे इनामदार त्याच्याशी बेईमानी करतात तेव्हा तो त्यांनाही खुनाची धमकी देतो असा बेडर बेरड आहे. शीलाचे रक्षण करणारा, हट्टी आणि आक्रमक तेग्या परिवर्तनाने दु:खी होतो. विशिष्ट प्रदेश आणि बेरड जातीच्या संस्कारामुळेच तेग्याची मानसिकता घडलेली आहे, म्हणूनच डॉ. एस.एस.भोसले यांचे विवेचन महत्त्वाचे वाटते, "परंपरेने वाहत जाणाऱ्या जीवनाचा वारसा घेऊन जगणारा तेग्या 'बारी'चा नायक आहे. जे घडले ते असे कधी घडेल असे त्याला वाटले नव्हते, तसे स्वप्नसुद्धा नव्हते. जीवन ढवळून काढणाऱ्या विविध स्वरुपी घडामोडींबद्दल तेग्याची तक्रार नाही. ते सोसून त्याचा प्रतिकार करायचा एवढेच तो जाणतो. कालप्रवाहाच्या झपाट्यात तेग्याला स्वत:ची काही मूल्य गमवावी लागतात."५४. धाडसी, साहसी तेग्या शेवटी सोशीक होत नाही. तो परिवर्तनाला विरोध करतो.

कादंबरीची नायिका 'नागी' ही तेग्याची बायको बेरडाची रगेल, हट्टी, करारी, कष्टाळू, साहसी स्त्री आहे. त्याप्रमाणे स्त्री म्हणून ती कोमल मनोवृत्तीची लाजाळू आहे. ती स्पष्टोक्ती आहे. पहिल्याच भेटीत तेग्याला ती म्हणते, "मोठा आलाय धिंड काडनारा । तुझ मासं? ठेवल्यात तुज्या बान । मक्ता दिलाय काय रं तुला नदीनं? (पृ.२) बेरडाच्या कुळाबद्दल तिला अभिमान आहे. बेरड जातीची असूनही उजळ रंग, चमकदार डोळे, धारदार नाक आणि गुणांनी तिखट असल्यामुळेच तेग्या तिच्याशी लग्न करण्याचा दृढनिश्चय करतो. तेग्याची कुऱ्हाड पळविणारी नागी चित्रित करुन बेरडांची सामाजिकता स्पष्ट केली आहे. बेरडांची कुऱ्हाड पळवून नेणे म्हणजे पराजय करणे, त्यांच्या इभ्रतीचा प्रश्नच त्यातून निर्माण होतो. बेरडाच्या कुळाला साजेशीच जिद्दी नागी आहे. पण अशा अवखळ नागीला चंद्राला मदतीने तेग्या पळवून आणतो. ती देखील संसाराची जबाबदारी स्वीकारते. लाकडाची मोळी आणते. भाकरी करते. नागी आल्यामुळे तेग्याला घर भरल्यासारखे वाटते. 'कामगिरी'वर न जाता तो तिच्याजवळच घुटमळतो. बेडर आणि भांडकुदळ आहे. स्वाभिमानी आणि इमानी असल्यामुळे इनामदाराची लाचते ती टाळते. तेग्याला तुरुंगवास झाला असता अकरा वर्षे कष्ट करुन इश्वराला वाढविते. सुनेला वाचविण्यासाठी पेटत्या घरात प्रवेश करते. स्वत: भाजून मरते.

सारोळ्याच्या पाटलाची चाकरी करणारा चंद्रोजी आणि तेग्याशी एकनिष्ठ असलेला

काळू बेरड इमानी आहेत. मल्ला, कल्लू हे बेरडांची जुनी परंपरा जपणारे इमानी बेरड आहेत. तर इश्वरा, लगमा नव्या पिढीचे प्रतिनिधीत्व करतात. त्यातून जुन्या-नव्या पिढीतील अंतर दिसते.

धनिकांची त्याकाळात पितृत्वाची भूमिका असे. खालच्या जातीतील लोकांना ते वापरुन घेत असत. फसवित, थापा मारत असत. 'बारी'तील इनामदार सावकाराने 'बेईमानी' असेच चित्र रेखाटले आहे. सारोळ्याच्या पाटलाच्या खुनानंतर रोख पाचहजार रुपये देतो म्हणणारा किंवा तुरुंगातून तेग्याला सोडविण्यासाठी मोठा वकील देण्याची भाषा करणारा इनामदार पाटलाच्या खुनानंतर शब्द फिरवितो. केवळ स्वार्थासाठी तेग्याला वापरुन घेतो. तसेच सावकार देखील तेग्याकडून लुटलेला माल फुकटात मिळतो म्हणून त्याला जवळ करतो. माल मिळत नाही असे दिसताच संबंध तोडतो. या सर्व माणसांवर प्रदेशाचे किंवा जातीचे संस्कार झाल्यामुळे ते जिवंत, स्वाभाविक वाटतात.

कोल्हापूर-बेळगाव रस्त्यावरील सुतगट्टी गावात ते काकती गावापर्यंत जंगलाने वेढलेला परिसर सुतगट्टीची बारी म्हणून ओळखला जातो. तेथील बेरडांच्या जीवनातील जंगलाचे महत्त्व लेखकाने चित्रित केले आहे. कोकणच्या सीमेवरील भाग सुतगट्टी, चन्नगट्टी, नडगट्ट, दड्डी, भूतरामहट्टी, जड्डी, अलितग्या, हत्तिरगे, नरसिंगपूर आणि सारोळे इ. पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या कड्यालगतच्या गावांची पार्श्वभूमी 'बारी'तील जीवनाला लाभली आहे. डोंगराळ प्रदेशात, नदीकाठी दाट जंगलात बेरडांची वस्ती आहे. पूर्वेला देश, पश्चिमेला सह्याद्रीच्या डोंगराळ प्रदेशात, नदीकाठी दाट जंगलात बेरडांची वस्ती आहे. घनदाट जंगल असल्यामुळे त्याच्या आश्रयाने बेरड जगतात. स्वसंरक्षण करतात, दरोडे घातल्यानंतर येथेच बेपत्ता होता येते, म्हणून बेरडांची वस्ती अशा घनदाट जंगलात आहे. निसर्गाश्रित जीवन जगणाऱ्या बेरडांना जंगल, नदी यांचे विशेष महत्त्व वाटते. अपत्याप्रमाणे जंगलातील झाडांवर प्रेम करतात याचे कारण जंगल त्याच्या उदरनिर्वाहाचे, आश्रय-संरक्षणाचे साधन आहे. त्यांच्या जीवनात नदीलाही तितकेच महत्त्व असण्याचे कारण मासेमारी करुन उदरनिर्वाह करता येतो. जंगल तोड न करण्याची बेरडांची परंपरा नवी पिढी जपत नाही. जंगल तोडीने गाव ओस पडते. तरुणांना परगावी खाणीवर कामाला जाणे भाग पडते. गाव ओस पडण्याचे कारण काय? गावची जीवनशैली जंगलाच्या आधाराने वाढलेली दिसते. ती बदलायला सुरुवात होते. त्यामुळे नव्या पिढीस पारंपरिक धंदा सोडावा लागतो. ते खाणीवर कामाला जातात. समाज संस्कृतीचा विकास व्हावा, बेरडांनी चोरी करु नये, नोकरी करावी, नवीन धंदे करावे म्हणून सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. जंगलतोड करुन घेतली जाते.

कोकणच्या सीमेवरील भूभागाचे वैशिष्ट्ये तांबडी लाल माती, आंबा, सांगवान,

किंदळ, मोहाची उंच झाडी, घनदाट जंगल, अंगाची काहिली करणारा उन्हाळा, इत्यादीतून स्पष्ट होतात.

ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणाऱ्या निसर्गाचे बेरडांच्या मानसिकतेनुरूप निसर्गचित्र लेखकाने रेखाटली आहेत. निसर्ग एक पात्र म्हणून जिवंत केला आहे. त्यातून निर्माण झालेले समाजजीवन, त्यातून साकारलेले मानवी व्यवहार त्याच्या माणसाच्या व्यक्तिमत्वावर व विचारसरणीवर होणारा परिणाम यांचा एकात्म आविष्कार या कादंबरीत झालेला आहे. महणूनच प्रादेशिक कादंबरी म्हणून 'बारी'सर्वार्थाने उत्तम वाटते.

चंद्रा आणि तेग्या रात्रीच्या वेळी नागीला पळविण्यासाठी निघतात, त्याप्रसंगीच्या निसर्गवर्णनातून बेरडांची मानसिकता स्पष्ट होते.

"चारी बाजूंच्या दाट रानातून रातकिड्यांचा आवाज उठत होता. गावाच्या दिशेने कुत्र्यांचे भुंकणे कानांवर पडत होते. आकाशात लुकलुकणाऱ्या लाख चांदण्या बघत, न बोलता ते गाडीत बसून होते. डास चावल्यामुळे बैल बेचैन होत होते. कुरीचे नक्षत्र वर चढत होते..." (पृ.११) घनदाट जंगलातील वस्ती, कुत्र्यांचे भुंकणे यातून गावापासून दूर चाललेल्या तेग्याची मानसिकता वर्णन केली आहे. बेरड असल्यामुळे चंद्रा-तेग्या चुपचाप बसले होते. कुणाला सुगावा लागू नये अशी खबरदारी घेणारे बेरड निसर्गवर्णनातून सूचित केले आहे. क्रूरकृत्ये करणारी बेरड जमात निसर्ग पार्श्वभूमीने जिवंत केली आहे. तेग्याने चंद्राचा खून केला, तेव्हाचे प्रतीकात्मक वर्णन पहा.

"त्याचवेळी सूर्याने डोंगराआड आपले तोंड लवविले... जंगलावर झरझर अंधार पसरत होता. धुकं उतरत होतं." (पृ.६४)

पावसाळ्याच्या वर्णनातून बेरडांचा जीवनक्रम स्पष्ट होतो. "पावसाळा आला. डोंगरावर पाऊस ओतू लागला. दिवस अन् रात्र पागोळीचे पाणी ऐकू येऊ लागले. नदी दुथडी भरुन वाहू लागली. बेरडवाडी त्या उभ्या पावसात भिजू लागली. पाऊस बायांना जंगलात देखील जायला देत नव्हता. जंगलात ढोरांमागे जायला गावाची पोरे कुरकुरत होती, नाक ओढत होती. नाचण्यांचे तरवे वर आले होते. गावात नाचण्याची छाटणी घालायची एकच धांदल उडाली..." (पृ.७२) नागीच्या मानसिकतेनुरूप केलेले निसर्गवर्णन (पृ.११३) प्रदेशविशिष्ट आहे. तर नागीच्या मृत्यूनंतरच्या तेग्याच्या भावविश्वाशी एकरुप असे निसर्गचित्र लेखकाने काढले आहे. कालप्रवाहात सर्व बदलले पण जुन्या पिढीचा तेग्या बेरड जुन्या वडाप्रमाणे टिकून राहण्याचा प्रयत्न करतो.

"सारे गाव चांदण्याने न्हाऊन निघाले होते. चिंचोळ्या गल्लीचे दगड चांदण्यात उठून दिसत होते. घराच्या लांब सावल्या भयानक भासत होत्या. गाव सोडून तेग्या बाहेर आला. त्याचे लक्ष आपल्या घराकडे गेले. जळालेले त्याचे घर राखेचे ढीग

उराशी कवटाळून वेडेवाकडे उभे होते. त्या अर्ध्या मोडक्या उभ्या असलेल्या भिंती घराची निशाणी दाखवीत होत्या. घराच्या वास्तूजवळ तो काही वेळ थांबला आणि दीर्घ उसासा सोडून चालू लागला.''(पृ.१२३)

भकास 'बारी' आणि उदास तेग्या जंगलाला 'वणवा' लागल्याच्या प्रसंगातून रेखाटला आहे.

''...ती उघडी बोडकी झाडे भकास वाटत होती. क्वचित कुठेतरी बुंध्यापाशी झुडपाचा हिरवटपणा दिसत होता. सगळे जंगल पांढरे फटफटीत पडले होते. तेग्या डोंगरमाथ्यावरील वडापाशी, आला, तेवढ्या जंगलात तेवढेच काय ते हिरवेगार झाड दिसत होते. त्या भकास जंगलात ते झाड अंगाशी हिरवटपणा बाळगून एकाकी उभे होते...'' (पृ.१३१)

तेग्या आणि वडाचा हिरवटपणा बाकी सर्व उद्ध्वस्त होऊ लागलेली 'बारी'च निसर्गवर्णनाने जिवंत केली आहे. आशयनुरूप, कथानकास गती देणारा निसर्ग पात्र म्हणून चित्रित झाला आहे.

भू-प्रदेशाचा लोकजीवनावर परिणाम होतो. 'बारी'तून डोंगराळ प्रदेशात वास्तव्य करुन असलेल्या बेरडांचे लोकजीवन चित्रित केले आहे. बेरड प्राथमिक पातळीवर जीवन जगतात. शेती, पशुपालन, चोरी-लूटमार, शिकार, लाकूडफाटा विक्री करुन ते उपजिविका करतात. त्यांच्या गरजा मर्यादित आहेत. नैसर्गिक पातळीवरचे जीवन ते जगतात. त्यांचे प्रश्न पोटाचे आहे. देशात कुणाची सत्ता आहे याचे त्यांना ज्ञान नाही. ते इमानी आहेत. लुटमार ते स्वत:चा धर्म समजतात, तो त्यांना पाप वाटत नाही. बेरड जमातीचा नाईक त्या सर्वांचा-समाजाचा आधार असतो. येथे तेग्या हा नाईक आहे. संग्याबाळ्याच्या खेळाने तो समाजाची करमणूक करतो. परंपरेच्या धाग्यांनी बेरडाचे समाजजीवन जखडलेले आहे. इनामदाराच्या गाड्या काळूच्या चुकीमुळे अडविल्या गेल्या म्हणून तेग्या काळूला शिक्षा करतो. इनामदाराकडे खाली मान घालून जातो. शपथेत अडकून सारोळ्याच्या पाटलाचा खून करतो. खून, चोरी करुन तुरुंगात जाणे या जमातीला कमीपणाचे वाटत नाही. पण विश्वासघात करणे त्यांना मानवत नाही. विनाकारण दरोडा घालणे किंवा खून करणे ह्या समाजाला मान्य नाही. तेग्याने सारोळ्याच्या पाटलाचा विनाकारण खून केला आणि गावाला संकटात टाकले असे वाटते. उलट बेईमानी करणाऱ्याला, बेरडांची अप्रतिष्ठा करणाऱ्याला ते शासन केल्याशिवाय राहात नाही. म्हणूनच तुरुंगातून सुटून आलेला तेग्या इनामदाराला खून करण्याची धमकी देतो.

बेरड जातीच्या अज्ञानाचा ग्रामीण समाजातील वरच्या वर्गातील लोक फायदा घेतात. त्यांच्या इमानीपणाचा स्वार्थासाठी उपयोग करतात. जसे धूर्त इनामदार सारोळ्याच्या पाटलाचा तेग्याकडून काटा काढतो. आपले नाव खून प्रकरणात येऊ नये म्हणून

प्रयत्न करतो. तेग्याची सुटका न करता नामानिराळा राहातो. सावकार बेरडांकडील लुटीचा माल स्वस्तात घेऊन स्वत: श्रीमंत होतात. परंतु दिवसाढवळ्या त्यांच्याशी संबंध ठेवत नाही. जसे दिवसा ढवळ्या तेग्याने सावकाराकडे जाणे त्याला आवडत नाही, म्हणूनच तो म्हणतो,

"अरे! असल्या कामगिऱ्या रात्री करायच्या, दिवसा येतो? शहाणाच दिसतोस! बरं काढ माल!" माल नाही म्हणतातच सावकर भडकतो, तेव्हा तेग्या त्याला सुनावतो,

"खबरदार, सावकार! जरा बोलायचं काम न्हाई. सांगून ठेवतू. मला तेग्या म्हंत्यात. धा वर्सा माग नळी फुकत बसला व्हतासा. म्या बघितल्या त्ये. डोईन डोईची कमाई तुमच्या हातात वतली आन् दिलासां ते घेतलं आमी. म्हणून ह्यो वाडा बांधलासा. सोनाराचा सावकार झालासा. मनात आनलं तर रातीत जाईल सारं. मंग बसशीला टाळ्या वाजवीत..." (पृ.३३) यावरुन स्पष्ट होते की, बेरड जमात जशी सोशीक आहे, त्याप्रमाणे धनदांडग्यांना वठणीवरसुद्ध आणते. अब्रूला आणि कुळाला जपणारे असे हे बेरड आहेत. म्हणूनच काळू तेग्याचा मार खाऊनदेखील तेग्याला तुरुंगातून सोडविण्यासाठी प्रयत्न करतो. तो सुटून येताच त्याला 'नाईक' म्हणून काम करण्याचा आग्रह करतो. चंद्रोजी जीव द्यायला तयार होतो. तेग्या कर्ज काढून नवीन घर बांधण्याची धडपड करतो. जंगलावर जीवन अवलंबून असल्यामुळे बायकामुलांसह वणवा विझविण्यासाठी सर्व बेरड झटतात.

आधुनिकीकरणामुळे परंपरागत संस्कृतीच्या, जीवनशैलीच्या ऱ्हासाला सुरवात होते. बेरड बेचैन होतात. नव्या सुधारणांमुळे नवीन समस्या निर्माण होतात, नवे रोजगार उपलब्ध होतात. जिवापाड प्रेम केलेले जंगल तुटते तेव्हा ते अस्वस्थ होतात. नोकरी करणे त्यांना मान्य नाही. त्यातून नव्या-जुन्या पिढीमध्ये विसंवाद निर्माण होतो. इश्वराचे वर्तन बेरडांना पटत नाही. गाव सोडून त्यांना खाणीवर कामाला जावे लागते. विद्याधर पुंडलिक म्हणतात, "बारी"मध्ये दोन अनुभव-विश्वे आहेत. पहिले. तेग्याचे वैयक्तिक अन् बेरड जातीच्या परंपरानिष्ठ जीवनाशी नाते असलेले जीवन अन् दुसरे बदलत्या काळाशी समरस होऊ न शकल्यामुळे 'शिंगात' किडे पडलेल्या बैलासारखी अस्वस्थ होऊन दूर फेकल्या गेलेल्या तेग्याचे एकाकीपण. यातले पहिले जग देसायांनी कसदारपणे आणि ठसठशीत आणले आहे. 'इमान' ही तेग्याची आणि बेरड जमातीची प्रेरणा, ती एखाद्या धाग्याप्रमाणे कादंबरीच्या सगळ्या भावविश्वास अतूटपणे, अखंडपणे आणि कुठेही न विसरता आलेली आहे."५५. बेरड प्राथमिक पातळीवरचे जीवन जगतात. 'इमान'प्रमाण मानतात. अब्रूचे रक्षण करताना दिसतात. नैसर्गिक पातळीवरचे जीवन जगणाऱ्या बेरडांचे भावविश्व आधुनिकीकरणामुळे उद्ध्वस्त होते. पोटासाठी तरुणांना गाव सोडावे लागते. बेरडातील समूहभावना, निष्ठा, प्रेम,

माणुसकी, नाहीशी होते. एकूणच संस्कृतीचा ऱ्हासच होतो. बेईमानी करणारे धनदांडगे स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी 'इमानी' बेरडांचा वापर करुन स्वार्थ साधतात.

बेरडांच्या श्रद्धा, समजूती-संकेत परंपरातून त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. बेरडांच्या जीवनात फरशीला सर्वाधिक महत्त्व आहे. बेरडाची फरशी चोरी जाते म्हणजे त्याच्या इभ्रतीचा प्रश्न निर्माण होतो. तेग्याजवळ फरशी नाही असे दिसताच मल्ला म्हणतो, "पोरा, फरशी दिलीस तू? अरं, बेरड जीव दील पन फरशी नाय देनार." (पृ.४) लग्नात मुलीकडच्यांना देज देण्याचा संकेत आहे. शुभकार्यासाठी मुहूर्त पाहण्याची परंपरा बेरडांमध्ये दिसते. शुभ-अशुभाच्या कल्पना ते मानतात. इश्वराच्या जन्मानंतर तेग्यास अटक होते, म्हणून नागीला मुलाचा जन्म अशुभ वाटतो. लगमाच्या गृहप्रवेशानंतर तेग्याची झोपडी जळते तेव्हा तिला 'पांढऱ्या पायाची आवदसा' असे एक स्त्री म्हणते. दुर्गाईवर त्यांची श्रद्धा आहे. 'कामगिरी'वर जाताना बेरड दुर्गाईला नारळ फोडतात. देवावर फुले चिकटवितात. उजवी मिळताच 'चांगभलं' म्हणून कामगिरीवर जाण्याची त्यांची प्रथा आहे. तर शुभकार्याला घराबाहेर पडताना घरातल्यांनी हटकणे त्यांना पसंत नाही.

इनामदारांच्या स्त्रियांनी परपुरुषासमोर न येण्याची परंपरा आहे. इनामदारबाई मात्र तेग्यासमोर येतात. त्याला जेवायला देतात. त्याच्याकडे कुंकवाची भीक मागतात. शपथ घालतात. तेग्या बहिणीला भावाची भेट म्हणून इनामदाराने फेकलेले पाचशे रुपये देतो. मानलेल्या बहिणीला भावाने चोळी-पातळ देण्याची परंपरा असावी.

औषध-उपचाराच्याही त्यांच्या खास परंपरा आहे. म्हणूनच 'घावमारीच्या पाल्याने' जखम बरी होईल असा नागीला विश्वास वाटतो. (पृ.१९) तर ईश्वराच्या जखमेवर मोंगली एरंडाचा चीक लावला जातो. काळूच्या जखमेवर सांडस तापऊन डाग दिला जातो किंवा बाळतलिंबाचा पाला जखमेवर बांधला जातो. दवाखान्यातील औषधांवर बेरडांचा विश्वास नाही. बेरडांच्या लग्नविधीची एक विशिष्ट परंपराच आहे. 'इश्वरा-लगमा'च्या लग्नाच्या निमित्ताने देसायांनी त्याचे दर्शन घडकिवले आहे. मुहूर्त, बस्ता, यल्लमाच्या परड्या भरणे, वाघ्याला जेवण व नैवेद्य देणे, मांडव घालणे, वधूवरांना लिंब नेसवणे, देवाचा कौल घेणे, हळद लावणे, वधुवरांची मीठमिरच्यांनी दृष्ट काढणे, वाजंत्री, दारावर तोरणे बांधले इ. वैशिष्ट्यपूर्ण परंपरांचा उल्लेख येतो. त्यापेक्षा त्याच 'ईर' खास बेरड जातीचे वैशिष्ट्ये सांगणारा आहे. या 'ईराचे' वर्णन पहा. (पृ.११७).

'ईर' केवळ बेरडांच्या लग्नपद्धतीत दिसतो. तसेच रंगीत पाट, नव्या कपड्यातील वधुवर, वराने हातात कट्यार घेणे, मंगलाष्टक म्हणून अक्षदा टाकून लग्न लावले जाते. बकरे शिजवले जाते. दारु पिऊन बैलगाडीतून वरात काढणे इ. रीतीरिवाजांना बेरडांच्या लोकजीवनात महत्त्व दिसते. नाच-तमाशांना बेरडांच्या जीवनात विशेष

स्थान आहे.

'कामगिरी'वरील सोबत्याला एकटे न सोडण्याची परंपरा आहे. अब्रू रक्षण करण्याची बेरडांची संस्कृती आहे. म्हणून 'लगामा' बलात्कार झाल्याचे कळताच ईश्वराला तेग्या म्हणतो, •

"तुला तुझ्या बायकूच्या अब्रूची लाज नसल तरी मला माज्या सुनंच्या आब्रूची लाज हाय! सोड माजी वाट! बगतो, कुनचं काळीज सुपायेवड हाय त्ये!..." (पृ.१४८)

"काय, दमानं घ्ये म्हनतोस? भांड फुटल्यावर काय बगतोस रं? तुमी बसा अशाच पांडऱ्या टोप्या घालून आन् काकनं भसरुन! मला न्हाई जमायचं त्ये. बघतो त्या गार्डाचं. न्हाईतर तेग्याचं नाव सांगणार न्हाई. हो बाजूला न्हाईतर पोराला प्वार म्हननार न्हाई मी." (पृ.१४९) 'बारी' अब्रूचे रक्षण करणाऱ्या इमानी बेरडांच्या संस्कृती विनाशाचीच कथा आहे.

निसर्गाश्रित व स्वावलंबी जीवन जगणाऱ्या स्वातंत्र्यपूर्व काळातील बेरडांचे जीवनानुभव चित्रित केले आहेत, परंतु स्वातंत्र्योत्तर काळामध्ये बेरडांचे परंपरागत व्यवसाय नष्ट झाले. सुधारणांच्या नावाखाली नोकरी-व्यवसायाचे नवे प्रलोभन दाखविले जाते. सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. शाळा सुरु झाल्या, मोफत औषधे दिली जाऊ लागली. मधमाशापालन करण्यास प्रोत्साहन दिले जाऊ लागले. परंतु या बेरडांना स्वातंत्र्य म्हणजे काय हेच माहीत नाही. देशात सत्ता कोणाची आहे याचीही कल्पना नाही. सोजिरांची गाडी कोल्हापूर-बेळगाव रस्त्याने जाते. लढाई नसताना विनाकारण हे लोक फिरतात आणि त्यामुळे 'कामगिरी'वर गेलेल्या बेरडांना अडथळे येतात. काळूला त्यांची गोळी देखील लागते. यातून स्वातंत्र्यपूर्वकाळचे चित्र देसाई रेखाटतात. तेग्याला बेळगावच्या तुरुंगात गांधीचे नाव समजते. तुरुंगात आलेल्या अनुभवाचे तो कथन करतो. (पृ.८२-८३) सत्याग्रह स्वदेशीचा वापर, परदेशी मालावर बहिष्कार इ. म. गांधीचे विचार बेरडांना समजत नाही. यातून म. गांधीच्या चळवळीविषयीचे बेरडांचे अज्ञान दिसते? स्वातंत्र्य म्हणजे काय? हे पण बेरडांना माहीती नाही. सरकार कोणतेही असले तरी बेरडांच्या दैनंदिन जीवनात फारसा फरक पडत नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्याचेही त्यांना माहित नाही. पंधरा ऑगस्ट केंद्रावर साजरा केल्याचे इश्वरा तेग्याला सांगतो. तेव्हा तो म्हणतो, "...अरं शान्यानू, मानूस मेल्यावर दिवस घालत्यात, जलमल्यवर न्हवं? (पृ.१४३) देशाला स्वातंत्र्य मिळाले प्रजासत्ताकाची स्थापना झाली. स्वातंत्र्य मिळून तीन वर्ष होऊन देखील बेरडांना त्याची कल्पना नाही. यातून बेरडांचे राजकीय परिस्थितीविषयीचे अज्ञानच दिसते. पोलीस-फौजदाराची अरेरावी, फॉरेस्ट गार्डचे उद्धट वर्तन, भ्रष्टाचार इ. घटनाप्रसंगातूनही राजकीय जीवन चित्रण येते. 'वणवा' विझविणाऱ्या बेरडांना सरकार बक्षिस देईल असे फॉरेस्ट

अधिकारी सांगातो. बेरडांचे केंद्रावरील गुरूजी कौतुक करतो किंवा सणासारखी बेरडवाडीत पंधरा ऑगस्टची इश्वरा तयारी करतो. इ. प्रसंगातून स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय पार्श्वभूमी स्पष्ट होते. तसेच पुढाऱ्यांनी बेरडवाडीत येणे, न कळणारे भाषण करणे, विहिरीची कुदळ मारणे, रस्ते करण्याचे स्वप्न पाहणे. शाळा सुरु करणे इ. घटनांमधून स्वातंत्र्योत्तर जीवनचित्रण येते.

प्राकृतिक व प्राथमिक स्तरावरील जीवन बेरड जगतात. ते स्वावलंबी आहे. दरोडे घालून, सावकाराचे कर्ज घेऊन, शेती, मच्छीमारी, पशुपालन करुन उदरनिर्वाह करतात. मनोरंजनासाठी बेरडवाडीत संग्याबाळ्याच खेळ व्हावा असे सर्वांना वाटते. पण आर्थिक प्रश्न उभा राहतो.(पृ.२९) या खेळासाठी बेरडवाडीचा नाईक 'शंबर रुपय' खर्च करतो, त्याच्याकडेही पैरन, धोतर घेण्यासाठी पैसे नाहीत. त्यालाही सावकाराचे कर्ज घ्यावे लागते. सावकार 'माल' दिल्याशिवाय पैसे द्यायला तयार नसतो. धमकावल्यावर पैसे देतो. ईश्वराच्या लग्नासाठी तेग्या कर्ज काढतो, घर बांधण्यासाठी त्याला कर्ज घ्यावे लागते. यातून त्यांच्या मागासलेपणाचे आणि प्रतिकूल आर्थिक जीवनाचे चित्र स्पष्ट होते.

बेरडांच्या उलट धनिकांची आर्थिक परिस्थिती आहे. सावकार श्रीमंत आहे. बेरडांचे शोषण करुन ते धनिक झालेले दिसतात. नळी फुंकणारा सोनार वाडा बांधून सावकार झाला, तेगया म्हणतो,

"ते दिस असते तर आज असा आलू नसतो तुमच्या दारात, आन् तुमची बी टाप न्हवती असं मला बोलाया. सरकार बदललं. रानं बोडकी झाली. ते मागंचं दिस असतं तर दुसरीकडं कशाला गेलो असतो? रातीत ह्योच वाडा पायासकट नेला असता उचलून बेरडवाडीस." (पृ.१२७) परिवर्तनकाळामध्ये बेरडांचे पारंपरिक धंदे- चोरी, पशुपालन, मासेमारी, लाकूडफाटा विकणे इ. बंद पडले, त्यामुळे आर्थिक समस्या निर्माण झाल्या. याप्रमाणे इनामदाराच्या वैभवाच्या वर्णनातून आर्थिक विषमतेचे चित्र स्पष्ट होते.

"दरवाज्यातून इनामदार बाहेर येत होते. अंगात मलमली सदरा, पायात इराणी विजार घातलेले उंच आणि सडसडीत अंगयष्टीचे इनामदार बाहेर येत होते." (४५) किंवा इनामदार उन्मत्तपणे तेग्याच्या अंगावर पाचशे रुपये फेकतो, तेव्हा तेग्या इनामदार बाईंना म्हणतो,

"...आईसाब आजपासनं भन मानली तुला. मला बी भन न्हवती म्हणून लई जिवाला लागलं व्हतं, ठेव ह्ये तुज्याजवळ. तुला लुगड्याचोळीसाठी भावाची भेट म्हन. भाऊ गरीब बेरड असला तरी बी ह्ये न्हाई म्हनू नगसं"(पृ.९१)

इनामदाराच्या धनाच्या श्रीमंतीपेक्षा तेग्याची मनाची श्रीमंती मोठी आहे. बेरडांना पैशाचा महत्त्व वाटत नाही. 'इमान'त्यांना महत्त्वाचे वाटते.

तेग्याला जन्मठेप झाल्यावर नागी दोर वळते, लाकडाची मोळी विकते. शेतीची कामं करते. लेखक वर्णन करतो,

"...त्या नागीत आणि समोरच्या नागीत केवढा तरी फरक पडला होता. डोक्यावर मोळ्या घेऊन पदराला पडलेलं भोक, त्यातून डोकावणारे केस, फिकटलेला, पडलेला चेहरा, गालांच्या झालेल्या खोबण्या तेग्या उघड्या डोळ्यांनी पाहात होता. नागी पुरी बदलली होती. तिला पाहून तेग्याचा जीव झरझरला." (पृ.८०) स्त्री पुरुष सर्वांनाच कष्ट करावे लागतात, त्याशिवाय उदरनिर्वाह आणि बालसंगोपन त्यांना केवळ अशक्य होते.

स्वातंत्र्योत्तर काळात भ्रष्टाचार वाढीला लागला. फॉरेस्ट गार्ड बेरडांच्या स्त्रियांची अब्रू घेऊ लागले. जंगलातील लाकूड तोडणाऱ्या स्त्रियांकडून हप्ता वसूल करु लागले. (पृ.१४६) जंगल तोडीमुळे रोजगार संपला. खाणीतील कामासाठी लोक परगावी गेले. तेव्हा काळू म्हणतो, "काय इचारु नगस. गावचंच तीनतेरा झालं. आतं हाईसच तू. दिसलं तुला. गावात एक तरनं प्वार ऱ्हावूस तयार न्हाई. म्या लई खटपट केली. काय खावं म्हंत्यात." (पृ.१८७) सारांश, उदरनिर्वाहाचे परंपरागत मार्ग जंगल तोडीमुळे नाहीसे झाले. बेरडांना गाव सोडावे लागले. जगण्यासाठी धडपड करावी लागली. नव्या रोजगारातून नव्या समस्या निर्माण झाल्या.

परिवर्तन काळातील बेरडांना शिक्षणाचे महत्त्व पटल्याचे चित्रित केले आहे. जुनी पिढी निरक्षरच आहे. सिद्दाची तिसरी पिढी शिकू लागली. मुलांची इच्छा नसताना आईवडील त्यांना शाळेत पाठवू लागले. कारण त्यांना शिक्षणाचे महत्त्व बदलत्या काळानुसार समजू लागले. म्हणूनच 'सिद्दा' शिकून शहाणा व्हावा असे इश्वराला वाटू लागले. त्याने शाळा शिकावी म्हणून पाठीत धपाटा घालून दप्तर हातात देऊन उपाशीपोटी शाळेत पाठवितो. त्यामुळे ईश्वरा-तेग्याचा वादही होतो. (पृ.१९०) दरोडे घालण्यापेक्षा मुलांनी शिक्षण घेऊन नोकरी करावी असे ईश्वराला वाटते. उलट तेग्याला ते मान्य नाही. तो सिद्दाला म्हणतो,

"तू एक खुळा आन् तुझा बाप सात खुळा. लिवनं-वाचनं ही काय बेरडाची काम हाईत? अरं, बामनांची लढाई आनी बेरडाचं लिवनं-वाचनं कंदी पार पडलंय व्हय?" (पृ. १९८) जुन्या पिढीला शिक्षणाचं महत्त्व वाटत नाही. उलट शिक्षण घेणे वेडेपणाचे वाटते, तर नव्या पिढीला शिक्षणाशिवाय विकास नाही असे वाटते.

कोल्हापूर-बेळगाव रस्त्यावरील सुतबुट्टी गाव ते काकती पर्यंतच्या जंगलाने वेढलेल्या परिसरातील बेरडांचे जीवनानुभव त्यांच्याच बोली भाषेत रणजित देसाई यांनी शब्दबद्ध केले आहेत. अर्थात कादंबरीच्या निवेदनाची भाषा ही प्रमाणभाषाच आहे. तर संवाद बोलीतील आहे. डॉ. अ. रा. तोरो यांना बेरडांची भाषा कानडी असावी असे वाटते, म्हणून ते लिहितात, "या बेरड जमातीची मूळ भाषा कन्नड असावी. त्यांच्या

बोलण्याचालण्यातून व्यक्त होणारे कानडी हेल लपत नाहीत. नागी आश्चर्याने उद्गारते तेव्हा 'अव्वा' हा शब्दप्रयोग करते किंवा गाड्यांची शर्यत लागते तेव्हा गाण्यांची चढाओढ खास कानडी आहे. 'संग्या-बाळ्या' हा खेळही खास कन्नड ग्रामीण प्रदेशाचा आहे. या सर्वातून त्या प्रदेशाचा रंग-व्यक्ती-बोली आणि घटना या सर्वांमधूनच कसा व्यक्त झाला आहे ते पाहण्यासारखे आहे.''५६. हे डॉ. तोरो यांचे विवेचन बरोबर वाटत नाही. कारण कोल्हापूरी बोलीतील अनेक शब्द बेरडांच्या बोलीत आहेत. ही बोली समाजातील खालच्या स्तरावरील लोक बोलताना आढळतात. मात्र काही कन्नड शब्द येतात. काही पात्रांची किंवा गावांची नावे कानडी वळणाची आहेत. उच्चारणातील हेल देखील कानडी ढंगाने येतात. कारण हा महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील प्रदेश आहे. काही शब्दांची भाषिक देवाणघेवाण सीमेलगतच्या भागात न कळत होतच असते, म्हणून कानडी शब्द येतात. काही गाणीही कानडी आहेत. त्यातून सांस्कृतिक देवाणघेवाण स्पष्ट होते. परंतु बेरडांची भाषा मात्र कानडी असावी हे डॉ. तोरोंचे विधान पटत नाही. जसे, संषोव, व्हताच, दावतोस, इच्चार, हरकत, परात, नगसा, अरंच्या, इसरलूच, येरवाळीच, आलू, ठापके, टरकली, आरबाट, संजकार, इकली, चकोट, भगाटायला, भहुशा, फिरपेनं, साटनं, बगिटलासा, ठकलासा इ. अनेक शब्द त्या लोकभाषेतील आहेत. बेरडांचे संवाद त्यांच्या बोलीभाषेतीलच आहेत.

ग्रामजीवनातील म्हणी, वाक्प्रचारातूनही मागासलेल्या समाजाच्या बोलीचे वेगळेपण 'प्रादेशिकता' स्पष्ट होते. 'जकडं फुडा थोडा तकडं मुलूख थोडा', यातील 'जकड-तकड' ही लकब प्रदेशविशिष्ट आहे. ''लोहाराच्या भात्यासारखी त्याला धाप लागली होती.' किंवा शिंगात किडे पडलेल्या बैलासारखा तो अस्वस्थ झाला होता'.

'बारी' कादंबरीविषयी डॉ. द. ता. भोसले लिहितात, ''बारी' कादंबरीतील बेळगाव नजिकच्या जंगलात राहणारे बेरड हे वाटमारी करण्यात कोणत्याही प्रकारचे पाप मानत नाहीत, याचे चित्रण आलेले आहे. शिवाय कादंबरीच्या अखेरीला गांधीवादी गुरुजी जेव्हा या बेरडांना शिकण्याचा आणि नोकरी करण्याचा सल्ला देतात तेव्हा जंगलाच्या आश्रयाने मुक्त जीवन जगलेला तेग्या बेरड ही सारी अमिशे झुगारुन देतो असे श्री. देसाई यांनी दाखवले आहे. जंगलाच्या आश्रयाने जगणाऱ्या या बेरडांचे आचारविचार पापपुण्याच्या त्यांच्या कल्पना, दिलेला शब्द पाळण्याचे त्याचे व्रत आणि पारंपारिक जीवनाविषयीचे त्यांचे आकर्षण या सर्वांचे चित्रण आल्यामुळे म्हणजे या सामाजिकतेमुळेच त्या कादंबरीतील प्रादेशिकता ठळक नि प्रभावी स्वरुपात आपणास दिसते. बेरडाचे हे सामाजिक अंगाने आकारणारे जीवन 'बारी' मध्ये व्यक्त झाले नसते तर, तिच्यातील प्रादेशिकता साकार झाली नसती.''५७. तसेच डॉ. श्री. मा. कुलकर्णी म्हणतात, ''कालमानानुसार बदललेल्या या बेरडांच्या जीवनाचे चित्रण

जितके हळुवार तितकेच चटका लावणारे झाले आहे. कथेची गुंफण व तिचा परिपोष, व्यक्तिचित्रण, निसर्गवर्णन, जीवनदर्शन इ. अंगोपांगाकडे लक्ष पुरवून कादंबरी लिहिल्यामुळे तिच्यात आकर्षकता आलेली आहे.''५८. थोडक्यात व्यक्तिचित्रण भू-वैशिष्ट्ये-निसर्ग समाजजीवन, सांस्कृतिक जीवन, आर्थिक जीवन आणि भाषा एकजीव होऊन अवतरल्यामुळे 'बारी' जातीजमातीच्या जीवनावरील वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक कादंबरी आहे. प्रादेशिक कादंबरी म्हणून 'बारी' सर्वार्थाने उत्तम आहे. पात्र म्हणून निसर्गाचे केलेले चित्रण, त्यातून निर्माण झालेले समाजजीवन, त्यातून साकारलेले मानवी व्यवहार, त्याचा माणसाच्या व्यक्तिमत्त्वावर व विचारसरणीवर होणारा परिणाम यांचा एकात्म आविष्कार या कादंबरीत झालेला आहे. तिचा आत्माच प्रादेशिक आहे. कथानक, भौगोलिक परिसर, व्यक्तिदर्शन, समाजदर्शन, सांस्कृतिक जीवन व मानवी व्यवहार या सर्वात प्रादेशिकतेचा अर्क उतरला आहे.

### *(१४) 'माझा गाव'*

'माझा गाव'मधून रणजित देसाई यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील नष्ट होऊ घातलेल्या पारंपरिक खेड्याचे वास्तवचित्र रेखाटले आहे. हे वास्तवचित्र चौपदरी आहे. हे चार पदर पुढीलप्रमाणे दिसतात. १) तात्या-काकींची जीवनकथा, २) अप्पासाहेब इनामदार आणि गावकरी यांचे परस्पर जिव्हाळ्याचे संबंध ३) रावबा-हौशा-उमा आणि गावकरी यांची कथा ४) उमा आणि जयवंत या दीर भावजयीच्या उत्कट प्रेमाची रसाळ कथा. म्हणजेच 'माझा गाव'मध्ये एका खानदानी कुटुंबाचे भिन्नभिन्न अवस्थांतील चित्रण आहे. खानदानी इनामदार घराण्याची कहाणी आहे. 'इमान' हेच ज्यांचे जीवनसूत्र आहे अशा दोन व्यक्तिभोवती म्हणजे अप्पासाहेब इनामदार आणि तात्या ब्राह्मण यांच्या भोवती या कादंबरीची कथावास्तु उभी आहे.

वृद्ध तत्त्वनिष्ठ तात्या वार्धाक्यात 'देवगाव'मध्ये येतात. घराची दुरुस्ती करुन घेतात. बालवयातील स्नेही आप्पासाहेबांची भेट होते. जुने ऋणानुबंधाचे धागे जुळतात. गावकऱ्यांचे आणि इनामदारांचे जिव्हाळ्याचे संबंध असतात. आप्पासाहेबांची रावबा आणि जयवंत ही दोन मुलं तर उमा ही सून आहे. रावबा रंगेल तर जयवंत अल्लड, निष्पाप आहे. खानदानी मराठा घराण्यातील उमा पतीच्या वर्तनावर पाघरुण घालण्याचा प्रयत्न करते. जयवंतवर आईप्रमाणे माया करते. गोविंदा, सिद्दा, बजाबा, गुंडू, सुतार, विठोबा, हौशा याच गावातील सामान्य माणसं आहेत. बजाबाने तर आप्पासाहेबांना अंगाखांद्यावर खेळविलेले असते. त्यामुळे तो इनामदारांचा 'धाकले धनी' असा उल्लेख करतो.

बजाबाचा मुलगा विठोबा हा पैलवान आहे. विठोबाच्या बायकोशी रावबाचे अनैतिक संबंध असल्यामुळे गावकरी आणि इनामदार घराण्यात संघर्ष होतो. विठोबाला

रावबा घोड्याच्या पायाखाली घालून ठार करतो. त्यामुळे गावकरी अधिक बिथरतात, संघर्ष निर्माण होतो. गावात विपरीत घडू नये म्हणून रावबाला बेळगावला पाठविले जाते. कोर्टकचेऱ्या होऊन रावबा निर्दोष सुटतो. पटकीची साथ, ओला दुष्काळ आणि रामोशांचा दरोडा या संकट प्रसंगी इनामदार गावकऱ्यांठी सर्वस्व अर्पण करतात. तात्या-काकीचा मृत्यू होतो. यशवंतराव भोसल्यांबरोबर जयवंत शिक्षणासाठी बाहेरगावी निघून जातो.

'देवगाव'करांच्या श्रद्धा, समजूती आणि एकमेकांशी असलेले संबंध यांचे चित्रण करुन लेखकाने एक पारंपरिक खेडे उभे केले आहे. डॉ. आनंद यादवांच्या 'माझा गाव' ही कादंबरी तुम्ही काय सांगण्यासाठी लिहिली? या प्रश्नाला उत्तर देताना रणजित देसाई म्हणतात, "स्वातंत्र्यपूर्व काळातील एक जुनं गाव उभं करावं असं वाटलं. तेथील माणूस कसा होतो. कसा जगत होता. प्रत्येक माणसाचा छोट्या खेड्यात दुसऱ्याशी कसा संबंध असतो, गाव कसं एकसंध असतं, जुन्या ग्रामरचनेतील माणूस स्वत:ला समाजाशी कसा वाहून घेत असतो, त्यावेळच्या गावाला आजच्यासारखे दळणवळणाचे रस्ते नव्हते, त्यामुळे संकटकाळी, वेळप्रसंगी माणसे एकमेकांना कशी मदत करीत असत, एकजूटीनं कशी वागत असत, एकूण सगळं गाव कसं जगत असे, हे दाखविण्यासाठी मी ही कादंबरी लिहिली आहे."५९ लेखकाच्या वरील मनोगताचा विचार करता, स्वातंत्र्यपूर्व काळातील 'स्वावलंबी' खेड्याचे वास्तवपूर्ण चित्रण करण्याची लेखकाची प्रेरणा दिसते.

या कादंबरीत कथानकाची सलगता महत्त्वाची नाही, तर तात्या, अप्पासाहेब, रावबा, जयवंत, उमा, विठोबा या माणसांची प्रातिनिधिक चित्रे अधिक महत्त्वाची आहेत. ही माणसे उदंड कर्तृत्वाची आणि मोठ्या अंत:करणाची आहेत, तशीच ती सत्त्वशील, उदार कष्टाळू व रंगेल अशा विविध वृत्तीप्रवृत्तीची आहेत. एकेक पात्र हे एकेका गुणा-अवगुणांना साकार करण्यासाठी दाखविले आहेत.

अप्पासाहेब इनामदार हे करारी, पीळदार, नेकीने जगणारे खानदानी मराठा कुळातील, गावकऱ्यांशी पितृत्वाच्या नात्याने वागणारे आहेत. ग्राम दैवतावर श्रद्धा असले ते भूतदयावादी-प्राणी जगतावर प्रेम करणारे आहेत. गरीब शेतकऱ्यांविषयी त्यांच्या मनात कणव आहे. इनामदारांच्या घराण्यातील माणसांविषयी इतरांनी काहीही बोलता कामा नये हा अहंगंडही त्यांच्या मनात आहे. जातीबद्दल, घराण्याबद्दल त्यांना अभिमान वाटतो. ते जसे करारी आणि बेफिकीर आहेत तसेच संवेदनाक्षम, सत्त्वशील आहेत. रावबाच्या गैरवर्तनावर पडदा पाडणारे, अब्रू सांभाळणारे, सुनेवर प्रेम करणारे तसेच ते गावावरही प्रेम करतात. गावकऱ्यांवर त्यांचे प्रेम आणि विश्वास आहे. ते खंबीर वृत्तीचे आहेत. मुलाला गावकऱ्यांनी मान द्यावा म्हणून प्रथम ते रावबाला मान देतात, त्याच्या गैरवर्तनाने व्यथित होतात, तेव्हा तात्यांना म्हणतात,

"नाही, तात्या नाही... ते तुम्हाला समजायचं नाही. मला जगाची किंमत नाही, ते कितीही बोंबलले तरीही मी खचणार नाही. मला भीती वाटते की पूर्वजांची... ही कुळी चालवणारा पोरगा कुळी चालवण्यास अपात्र आहे असं अनेक वेळा त्यांनी माणसांच्या तोंडून वदवलं, तरीही मी त्याकडे दुर्लक्ष केलं..."(पृ.१२१).

डड्डीच्या सावकाराकडून दोन हजार रुपये कर्ज काढणारे, उमाला समजावणारे अप्पासाहेब घराण्याची अब्रू जपण्यासाठी धडपड करतात, दुष्काळात गावाला पोसणारे, दानशूर, शब्दप्रमाण मानून तारणीकरांचे कर्ज परत करणारे इमानी, पटकीच्या साथीत गाव न सोडणारे, परोपकारी, सुनेचे डोहाळे पुरविणारे, प्रेमळ, व्याही यशवंतराव भोसल्यांशी वैर ठेवणारे, कठोर, करारी, खंबीर, रामोशांचा दरोडा परतविण्यासाठी स्वत:च जीव धोक्यात घालणारे, साहसी आणि दरोडेखोरांना मूठमाती देण्याचा हुकूम देणारे, कनवाळू अप्पासाहेब इनामदार आहेत. यावरुन येथे गावासाठी प्राण देणारे, करारी, नीतिनियम मानणारे, धाडसी, त्यागी, दानशूर, दिलदार अप्पासाहेब चित्रित होतात.

अप्पासाहेबाप्रमाणेच त्यांच्या समकालीन जुन्या पिढीतील तत्त्वनिष्ठ, तेजस्वी तात्या लेखकाने उभा केला आहे. स्पृश्यास्पश्यता आणि जातिभेद मानणारे, अंत्यसंस्कारानंतर किंवा मागासवर्गीयांना औषध देऊन आल्यानंतर स्नान करणारे तात्या तत्त्वनिष्ठ आहेत. ब्राह्मणाविषयी त्यांना अभिमान आहे. देवस्थानाचा पोटासाठी धंदा करणे त्यांना मान्य नाही. ते पापपुण्याच्या कल्पना मानतात, म्हणूनच देवस्थान ते धंद्यासाठी नव्हे तर पुण्याईसाठी घेतात. त्या काळातील मानाचे आणि आर्थिक फायद्याचे 'कुलकर्णी' पद ते नाकारतात. यातून त्यांची नि:स्वार्थी वृत्ती दिसते. ते परोपकारी आहेत. औषधपाणी करताना ते जातिभेद पाळत नाहीत. यातून त्यांची मानवजातीबद्दलची निष्ठाच दिसते. ते जसे प्रेमळ आहेत तसेच करारी आहेत. रावबाच्या वर्तनावर पांघरुण न घालता अप्पासाहेबांना वेळीच कुलदैवताची आठवण करुन देतात. ते स्पष्टोक्ते आहेत. "...अप्पासाहेब, लक्ष्मी तुमचं कुलदैवत आहे. विसरलात काय? आपल्या पूर्वजांनी चारी सीमांवर चार देवस्तानं उभी केली ती गावची रक्षणकर्ती म्हणून, इनामदारांच्या पोरांसाठी आडोशाच्या जागा म्हणून नव्हे." (पृ.६५) यातून ते स्पष्टक्ते, श्रद्धाळू, ऋणानुबंध जपणारे, जिव्हाळा टिकविणारे, उदार अंत:करणाचे असल्याचे स्पष्ट होते. ते धूर्त असल्यामुळे गावातील संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी रावबाला ते बेळगावला पाठवितात. तात्या मवाळ, प्रेमळ, तितकेच कडक, रागीट आहेत म्हणूनच ते रावबाच्या तोंडात ठेवून देतात.

'उमा' ही रावबाची पत्नी, कोल्हापूरच्या यशवंतराव भोसल्यांची खानदानी, सोशिक कन्या आहे. सत्त्वशील, घराण्याची प्रतिष्ठा जपणारी, प्रेमळ, आज्ञाधारक, सुसंस्कृत, श्रद्धाळू गृहिणी आहे. घराण्यातील प्रतिष्ठा महत्त्वाची वाटत असल्यामुळे रावबाच्या

अनैतिक संबंधाविषयी तोंड उघडत नाही. रावबा निर्दोष सुटावा म्हणून देवासमोर हात जोडून डोळे मिटून बसते. देवावर अभिषेक करते. यातून ती पतिनिष्ठ रेखाटली आहे.

'काकी' जुन्या ब्राह्मण कुळातील जातिभेद पाळणारी, प्रेमळ स्त्री आहे. पतीच्या अगोदर मरण यावे एवढीच तिची माफक इच्छा आहे. सौभाग्याचे मरण मागणाऱ्या स्त्रियांची ती प्रतिनिधी आहे.

'रावबा' रंगेल इनामदारपूत्र आहे. शिकारीचा नाद असलेला साहसी तरुण आहे. त्याच्या रक्तात बेपर्वाई, बेफिकिरी असलेली दिसते. पत्नीशी एकनिष्ठ नसलेला, विठोबाच्या बायकोशी अनैतिक संबंध ठेवणारा, विठोबाचा खून करणारा रगेल तरुण आहे. यशवंतराव भोसले इनामदार हे पारु ऊर्फ उमाचे वडील, हट्टी, एककल्ली, स्वाभिमानी आहेत. अप्पासाहेबांचा जिवलग मित्र उमाच्या लग्नातील गैरसमजामुळे ते एकमेकांचे तोंड पाहात नाही. नातवाच्या बारशाला येत नाही. अप्पाच्या मृत्यूनंतरच ते देवगावात येतात, इनामदारांचे वैभव, श्रीमंती आणि करारीपणा या सर्वांचा प्रत्यय यशवंतरावांच्या व्यक्तिरेखेतून येतो.

'जयवंत' हा आईविना पोरका मुलगा, त्याच प्रतिपाळ उमा करते. तो अल्लड, निष्पाप आहे. वहिनीवर उत्कट प्रेम करणारा, खानदानी रीतीरिवाज पाळणारा आहे. तर 'बजाबा' हे जुने-जाणते इनामदारांचे कुळ, अप्पासाहेबांना अंगाखांद्यावर खेळविलेला एकवचनी म्हतारा आहे. विठोबा पैलवान हा त्याच मुलगा, मोहनग्याच्या जत्रेत देवगावचं नाव राखणारा, पत्नीकडे दुर्लक्ष करणारा, तिला घराबाहेर काढणारा, रावबाचा जीव घेण्यासाठी निघालेला आणि शेवटी घोड्याच्या पायाखाली मेलेला विठोबा गावातील संघर्षास कारण होतो. खऱ्या अर्थाने त्यची बायको 'हौसा'च या संघर्षाला कारणीभूत ठरलेली दिसते. सिद्दा हा अप्पांचा नोकर, गोविंदराव हा कारभारी, रामू, भोगण आणि समस्त 'देवगावकार' या गौण पात्रांचे चित्रण करुन लेखकाने पारंपरिक खेडे साकार केले आहे. त्यांच्या कृती उक्तीतून आणि सामाजिकतेतून प्रादेशिकता दृगोचर होते.

'बेळगाव' जवळील 'देवगाव' मधील हे लोक आहेत. या मातीचे संस्कार या माणसांवर झालेले आहेत. म्हणूनच कुलदैवत लक्ष्मीवर, गावावर, नदीवर, शेतावर, पिकांवर गावकऱ्यांचे आणि इनामदारांचे प्रेम आहे. सर्वांना एकमेकांबद्दल आणि पूर्वजांबद्दल जिव्हाळा, आदर वाटतो. ताम्रपर्णी नदीच्या काठावर देवगाव बसले आहे. चोहोबाजूंनी डोंगर आहे. घाटमाथा आहे. भाताचे पीक त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. ताम्रपर्णी नदीच्या काठावरील 'देवगाव' हे अप्पसाहेब भोसले इनामदार यांचे साम्राज्य आहे. होसूर, बेरडवाडी, मोहोनगे, काजेवाडीचा डोंगर, आंब्याची झाडं, खडीचा बोडका माळ, खडकाळ गाडीवाट इ. जवळपासची गावं आणि प्रदेशवैशिष्ट्ये कथानकाशी

एकजीव होऊन आले आहेत. पूर्वेला देश, पश्चिमेला कोकण असे हे सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेले स्वावलंबी गाव लेखकाने कथानकाची पार्श्वभूमी म्हणून निवडले आहे. उन्हाळ्याच्या दिवसात कोरडी पडणारी ताम्रपर्णी नदी, पाऊस पडताच थोडं पाणी वाहू लागतं. (पृ.१५९) तांबडी लाल माती त्या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे.

भू-प्रदेशाचा लोकजीवनावर परिणाम होतो. उन्हाळ्याचे लेखकाने केलेले वर्णन

"एप्रिल महिन्याच्या उन्हाच्या तावात सारा शिवार तापत होता. शिवारात औताची झाडे उठलेली ढेकळं फुटत होती. ठिकठिकाणी पात्रात डबक्यासारखा कोंडी तयार झाल्या होत्या. पाणवठा चकचकीत उघडा पडला होता. पाणी आणायलासुद्धा दूरवर नदीला जावं लागत होतं. नदीच्या पात्रात मारलेल्या खड्ड्याच्या झऱ्यातून पाणी काढावं लागत होतं. एक घागर पाणी मिळवायला नदीवर अर्धातास मोडत होता." (पृ.१७१)

शेतकऱ्याचा दिनक्रमच लेखकाचे वर्णन केला आहे. पाण्याचा प्रश्न देवगावकरांना नवीन नव्हता. कारण तेथील भू-वैशिष्ट्य होय. पावसाळ्यातील पाणी वाहून गेल्यानंतर नदी उन्हाळ्यात कोरडी पडते. त्याचप्रमाणे पावसाळ्यात शेतकऱ्याच्या आशा पल्लवित होतात. त्यापूर्वीचा अंधार, मुसळधार कोसळणारा पाऊस इ. भू-वैशिष्ट्यांचे चित्रण प्रसंगानुरुप येते. खापऱ्यांची घरे, नदीचं तांबडं पाणी इ. वर्णनही 'प्रदेश' दृगोचर करते. भात शेती, जिरग्याची शेती, घनदाट जंगल, भेकर, पाणकोंबडी, खाचाखळग्याचा माळ, दगड धोंडे यातून 'बेळगाव'चा प्रदेश दृगोचर होतो.

शेतकऱ्याच्या जीवनातील पिकपाण्याचे महत्त्व अधिक असते, निसर्ग पार्श्वभूमीच्या आधारे लेखकाने रेखाटले आहे.

"वैशाखातलं ऊन तापत होतं. आकाशात काळे एग फिरत होते. पश्चिमेला वारा सुरू झाला असूनही उकाडा वाढत होता. नुकताच पेरलेला पेरा शिवारात कोमरुन वर आला होता." (पृ.१७९) किंवा (पृ.१८०) अप्पासाहेब इनामदारांच्या मानसिकतेतून हे निसर्गचित्र साकार झाले आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात ऋतुचक्रांना महत्त्व असते. निसर्गाला शरण जाण्याची शेतकऱ्याची परंपरा आहे. सुखाच्या आणि दु:खाच्या क्षणी शेतकरी कुलदैवताला विसरत नाही. यात्रा, उत्सव, यांनाही त्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळात जातिभेदाची कीड समाजाला लागली होती. जसे तात्या दलित-उपेक्षित जातीच्या लोकांना औषधपाणी करतात, तेव्हा काकी कुरकूर करते. तात्यांनी स्नान केल्याशिवाय घरात प्रवेश मिळत नाही. कुटुंबातील आणि समाजातील स्त्रीचे स्थान अगदी नगण्यच होते, असेही पारंपरिक गावगाड्यातील स्त्रीचे चित्रण केले आहे. काकीच्या भावनेची तात्या कदर करीत नाहीत. (पृ.३२) वाटेल तिकडे औषधोपचार करीत फिरतात. (पृ.३७) उमा रावबाच्या अनैतिक संबंधाकडे उघड्या डोळ्यानी

पाहते. हौशाला विठोबा घराबाहेर काढतो.

समाजात अप्रतिष्ठेची भीती सर्वांनाच वाटते. जसे नवऱ्याने घराबाहेर काढलेली हौशा रावबाला भेटून आश्रय-संरक्षण मागते.(पृ.७२) परंतु रंगेल रावबाला गाव पेटण्याची, अप्रतिष्ठेची भीती वाटते. नव्या-जुन्या पिढीमध्ये इनामदारावरील श्रद्धेवरुन संघर्ष होऊ लागला. इनामदाराची अब्रू बजाबाला महत्त्वाची वाटते. पायरीने वागण्याचा सल्ला तो विठोबाला देतो. पण विठोबाला इनामदाराचं कौतुक वाटत नाही. जुन्या पिढीतील इनामदार पालनकर्ते म्हणून सभ्यवर्तन ठेवीत. जसे, अप्पासाहेब इनामदारांना रावबा-कुळी चालवणारा पोरगा कुळी चालवण्यास अपात्र असल्याचे दुःख होते. रावबाने विठूला घोड्याच्या पायाखाली घालून ठार मारल्यानंतर गावकरी भडकले, हळहळले आणि वाड्यावर जाब विचारण्यासाठी आले. त्यांना अप्पासाहेब सामोरे जातात. पळ काढत नाहीत. उलट रंगराव पाटलांना योग्य तो पंचनामा करण्यास सांगतात. सरकारी कामात ढवळाढवळ करीत नाही. गुन्हेगार असेल त्याला शिक्षा झालीच पाहिजे. तात्यांना ते सांगतात, ''तात्या मी नुसता पोराचा बाप नाही. वतनदार आहे मी. गावचा मालक आहे. पोरासाठी गाव पोरकं करायचं नाही मला.'' (पृ.१०३) किंवा ''आणि म्हणून बेरड बोलावू? गावचे लोक मारायला? तात्या, विसरता तुम्ही, गावचा इनामदार आहे मी, मारेकरी नाही.'' (पृ.१११) यातून इनामदारांची न्यायप्रिय, सरकारी कामात ढवळाढवळ न करण्याची वृत्ती आणि आपण पालनकर्ते आहोत ही जाणीव स्पष्ट होते.

जुने खेडे नव्या समस्यांनी पोखरले गेले, ग्रामजीवनातील नव्या समस्यांचे चित्रणही केले आहे. गावप्रमुखाच्या आणि पंचाच्या शब्दाबाहेर न जाणारे गाव विठोबाच्या खूनानंतर फौजदारी, कोर्टकचेऱ्या करण्यास सिद्ध होतात. इनामदाराच्या अब्रूची नव्या पिढीला काळजी करण्याची गरज वाटत नाही. साक्षीपुरावे गोळा करण्याचे उद्योग सुरु होतात. गावची अब्रू जाण्याची भीती त्यांना वाटत नाही. गावातील वाद पूर्वी गावातच मिटविले जात होते. समजूतदारपणा होता. परंतु कोर्टकचेरीच्या निमित्ताने नव्या समस्या निर्माण होऊ लागल्या.

गावगाड्यातून बलुतेदारांना विशेष महत्त्वाचे स्थान पारंपरिक गावगाड्याचे होते. पाऊस पडला की गावच्या सुतारांना जेवायची उसंत मिळत नव्हती. सुतार-शाळैत रात्रंदिवस कुरीचा खच पडू लागायचा. कुऱ्यांची मोडतोड दुरुस्त करीपर्यंत सुतारांचा जीव मेटाकुटीला यायचा. यातून तत्कालीन समाजातील सुताराचे महत्त्व स्पष्ट होते.

नैसर्गिक आपत्ती आणि मानवी आपत्तीच्या काळात इनामदार गावकऱ्यांना मदत करीत होते. ओल्या दुष्काळात महापुरामुळे भाताचे पीक जाते. अप्पासाहेब सर्वांना नव्याने पेरणीसाठी भात देतात. दुष्काळ-पटकीच्या साथीत ग्रामस्थांना मदत करतात. तारणीकर सावकारांचे कर्ज काढतात. शब्दाला जागून तारणीकरांचे कर्ज फेडतात.

गावातील दरोडा सर्वांच्या पुढे होऊन अप्पासाहेब परतवितात.

दरोडेखोर देखील पूर्वसूचना दिल्याशिवाय दरोडा घालत नव्हते, किंवा दहशत निर्माण करण्याठी 'आरगल' म्हणजे शेंदूर लावलेली दगड अगोदर गावात काही दिवस टाकले जात. गावात घबराट निर्माण केली जाई, परंतु देवगावकरांना तशाच आरगलच्या पूर्वसूचना मिळत गेल्यावर गावकरी संघटित होऊन संकटावर मात करतात.

'देवगाव'करांच्या जीवनात काही श्रद्धा, समजुती आणि परंपरा यांना विशेष महत्त्व आहे. डॉ. एस. एस. भोसले यांना 'माझा गाव' ही कादंबरी 'बारी'पेक्षा अधिक सफाईदार वाटते. लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचाही अधिक प्रत्यय येतो असे म्हणतात.६०. प्रस्तुत कादंबरीतील सांस्कृतिक जीवन चित्रणाचे त्यांनी विस्ताराने विवेचन केले आहे. ग्राम जीवनातील काही श्रद्धा-परंपरा आहे. जसे, तात्यांनी सूर्यनारायणाला हात जोडणे, गुंडू सुताराने अप्पासाहेबांना मुजरा करणे, उमाने डोक्यावर पदर घेऊन आप्पा किंवा काकांचे दर्शन घेणे, काकींनी तुळशीला पाणी घालणे, ब्राह्मणाला शिधा देणे, अंत्यविधीवरुन आल्यानंतर स्नान करणे. नववधूबरोबर पाठराखण पाठविणे, सौभाग्यवतीस कुंकू देणे, आनंदाच्या वेळी बक्षिस देणे, जसे रावबा निर्दोष सुटला तेव्हा इनामदार सिद्याला गळ्यातील साखळी देतात. यशवंतरावच्या जन्माची बातमी समजताच देवजीला अंगठी भेट देणे. उमाच्या पुण्याईने, देवावरील, अभिषेकाने रावबा निर्दोष सुटला अशी श्रद्धा बाळगणे. पेरणीला सुरवात करण्यापूर्वी कुरीपूजा करणे, संकट प्रसंगी नदीची ओटी भरणे, बारशाचा मुहूर्त पाहणे, बारशाला गावोगावचे पाणी येणे, हेल घालणे, आहेर पाठविणे यासारख्या रीतीरिवाजांचे चित्रण करुन पारंपरिक खेड्यातील लोकांच्या संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. ग्रामदैवत 'लक्ष्मी'वरील श्रद्धा, मोहोनग्याच्या जत्रेत इनामदारांच्या बकऱ्याचा पहिला मान असतो. यात्रेत बकरं मारण्याच्या विशिष्ट पद्धतीचे वर्णन लेखकाने केले आहे. (पृ.५१) यातून प्रदेशातील सांस्कृतिक वैशिष्ट्ये दिसतात. गावचे नाव रोषण करणाऱ्याचे कौतुक करणे, जसे विठोबाने कड्याखालची कुस्ती जिंकली, गावाचे नाव काढले, म्हणून रावबाने त्याच्या डोईला फेटा बांधला. सस्तर टोचणे म्हणजे देवाजवळ मागणे मागण्याची परंपरा वैशिष्ट्यपूर्ण आहे. इतरत्र अशी परंपरा दिसत नाही. दसऱ्याची पालखी प्रत्येकाच्या घरी घेऊन जाणे, या सर्वातून सण-यात्रा उत्सवाचा लोकजीवनावरील प्रभाव स्पष्ट होतो. शकून अपशकूनांना या ग्रामजीवनात विशेष स्थान आहे. जसे भूक लागणे अशुभ समजले जाते. स्वप्नात रक्त दिसणे शुभ तर पाणी दिसणे किंवा हसणे या गोष्टी अशुभ समजल्या जातात.

अप्पासाहेब, कलेक्टरचा दरबार असल्यामुळे रावबाला बेळगाव पाठवितात. (पृ.२०१) किंवा मुंबईचे गव्हर्नर बेळगावला आले होते. साहेबांच्यासाठी दरबार

बोलावला होता. अप्पासाहेबांनाही आमंत्रण होते. पूर्वी अप्पासाहेबांनी आमंत्रण कधी चुकवले नव्हते. उमा गरोदर होती. देवांना गुरुवार, सोमवार अभिषेक चालू होता. म्हणून बेळगावला गव्हर्नरच्या दरबारात ते जात नाहीत. यावरुन तत्कालीन प्रशासकीय पद्धती, इंग्रजांची राजवट होती. कलेक्टरच्या दरबारासाठी इनामदारांनी हजर राहण्याची पद्धत होती. इनामदारांना आमंत्रण पाठविले जात होते. ते न चुकता दरबारात हजर राहात होतेच.

गावात कुणाचा खून झाला तर पाटलांनी रीतसर पंचनामा करण्याची पद्धती होती. त्याचप्रमाणे गावगाड्यावर इनामदारांचे वर्चस्व होते. म्हणूनच रंगराव पाटील दबकत वाड्यावर येतात. काय करावे? पंचनामा करावा की करु नये? असे प्रश्न त्यांना पडतात. धनिकांच्या सोयीप्रमाणे कायद्याची अंमलबजावणी होत असावी.

रयतेचे आर्थिक जीवन दारिद्र्य रेषेखालचे असून कष्ट न करणारे इनामदार संपन्न व विलासी जीवन जगत होते. कष्ट करणारे खंडफाळा भागवू शकत नव्हते, तर इनामदार घराणे बारशाच्या निमित्ताने हजारो रुपये खर्च करीत होते. खंड-फाळ्यासाठी इनामदार रयतेच्या घरावर जप्ती पाठवत आणि रक्कम वसूल करीत. जसे 'भोगण' नावाचे इनामदारांचे जुने कुळ चार वर्षाचा खंडफाळा देऊ न शकल्याने वाड्याची पायरी चढत नाही. त्याच्या घरावर जप्ती गेल्यावर सावकाराकडे बैलजोडी गहाण ठेऊन व्याजासह सर्व रक्कम भरण्याठी तो वाड्यावर येतो. अप्पासाहेब त्याच्यावर भडकतात. घरावर जप्ती येणे सामाजिकदृष्ट्या, कमीपणाचे, अप्रतिष्ठेचे समजले जात होते. म्हणूनच जनावर गहाण ठेवून आपली होणारी अप्रतिष्ठा ते टाळत होते. म्हणून 'भोगण' आपली बैल जोडी गहाण ठेवून इनामदारांचे पैसे भरण्यासाठी येतो. वस्तुस्थिती समजून घेऊन अप्पा स्व:कडील वीस रुपये त्याला देऊन सावकाराकडून बैलजोडी सोडवून आणण्यास सांगतात.

विठोबाच्या खून खटल्यात अडकलेल्या रावबाला निर्दोष सोडविण्यासाठी अप्पासाहेब जमीन गहाण ठेवून दड्डीच्या सावकाराकडून दोन हजार रुपये कर्ज काढतात. (पृ.१२४), दुष्काळमय गावकऱ्यांना वाचविण्यसाठी तारणीकर इनामदारांकडून तोंड मागितल्या भावात भात घेतात. भांडी-कुंडी, देव-देव्हारा गहाणवट म्हणून पाठवितात. तेव्हाही इनामदाराचे स्वत:चे पैसे नसतात. पुढे तारणीकरांचे कर्ज फेडण्यासाठी दड्डीच्या सावकाराला जमीन विकत देण्याचा विचार करतात. (पृ.१९०ते१९९) इनामदारांच्या संपन्न व विलासी जगण्यामुळे, थाटामुळे, उधळ्या स्वभाव प्रवृत्तीमुळे आणि खोट्या प्रतिष्ठेमुळे, पालकर्त्याच्या भूमिकेमुळे त्यांच्याकडेही रोख रक्कम कधीच शिल्लक पडत नव्हती. म्हणूनच ते जमीन गहाण ठेऊन कर्ज काढून प्रतिष्ठेला जपत होते. शब्दाला जागत होते. देशावरील लोकांना अवर्षण किंवा अतिवृष्टीमुळे उपजीविकेला मुंबईला जावे लागत होते. (पृ.१८८) पण सुदैवाने 'देवगाव'चे इनामदार अब्रूसाठी

किंवा गावावरील प्रेमापोटी त्यांना मुबईला जाऊ देत नाहीत. परंतु देशावरील रयतेला उद्योगनगरी मुंबई जवळ करण्याशिवाय पर्याय उरत नाही हे जीवनसत्य होते.

शिक्षणाच्या बाबतीत खेड्यात उदासीनताच दिसते. शिकून काय करायचे हा जनतेचा प्रश्न आहे. गावात शाळा नाही ही गोष्ट तात्यांना खटमते. तसे ते इनामदारांच्या कानावर घालतात, तेव्हा ते म्हणतात,

"तुम्ही आपलं एक घेतलं तर तेच घेऊन बसता। काय कराचं आहे शिकून आम्हास? कुठं नोकरी करायला जायचं आहे का काय? त्यावर तात्या म्हणतात,

"अप्पासाहेब, निदान तुम्ही तरी हे बोलायला नको होतं. शिक्षण घ्यायचं असतं ते काही नोकरी करण्यासाठी नव्हे. पोटं भरत नाही म्हणून शिकणं निराळं अप्पासाहेब! समाजात प्रतिष्ठा म्हणून एक काहीतरी असते. समाजात मानानं जगता यावं म्हणून शिकायचं! गावात एखादं पत्र आले की, सारे कामधंदे सोडून पत्र घेऊन हिंडतात. कोणी मिळत नाही वाचणारा. मग तात्या नाही तर गोविंदराव वाचतात आपले. एक दिवस तेही गेले म्हणजे पळा मग गावगाव!"(पृ.१४७)

ब्राह्मणांना शिक्षणाचे महत्त्व पटलेले होते, धनिकपुत्र शिक्षणाकडे वळले होते. परंतु रयतेची मुलं शाळेत जात नव्हती. ते मुलांना शाळेत पाठवू शकत नाहीत. तात्यांना अप्पासाहेब म्हणतात, "अहो, कोण पाठवणार मुलं? गुरं घेऊन जा. कुळ शेतावर भाकरी घेऊन जा. यातच मुलांचा सारा वेळ जातोय आणि शाळेला केव्हा येणार?"(पृ.१५३) सारांश, मुलांनी शिकणे समाजाला मान्य नव्हते, परवडत नव्हते. शिक्षणाबद्दल उदासीनता होती. अपवादाने मुलं शिकत होती. नोकरीनिमित्ताने दूर गेल्यावर पैसे पाठवत नव्हती. पाठवू शकत नव्हती. गावात आलेले पत्र वाचण्यासाठी कुलकर्ण्यांची मदत घ्यावी लागत होती.

स्वातंत्र्यपूर्व काळातील जुनं खेडं लेखकाने चित्रित केले आहे. त्यामुळे तेथे मागासलेपणा आणि अनेक समस्या आहेत. निरक्षरता, अज्ञान, दारिद्र्य, चालीरीती, आचार विचारांनी लोकजीवन घडलेले आहे. त्यांच्या बोलीभाषेचा प्रसंगानुरूप संवादासाठी लेखकाने वापर केला आहे. उपमा, दृष्टांत, म्हणी आणि वाक्प्रचार आणि वैशिष्ट्यपूर्ण शब्दकलेतून ग्रामजीवनदर्शन घडविले आहे. वरिष्ठांनी हाक मारल्यावर प्रत्युत्तर म्हणून 'जी' म्हणण्याची खानदानी कुटुंबातील पद्धती उमाच्या निमित्ताने लेखकाने व्यक्त केली आहे. तसेच इनामदारांना 'सरकार' म्हणून हाक मारणे, मुजरा करणे या पद्धतीही प्रसंगानुरूप सूचित केल्या आहेत. ग्रामजीवनातील म्हणीतून समाजजीवन चित्रण केले आहे.

"उगाच खादीला कहार आणि धरणीला भार', 'भटला दिली वसरी...!", शहाण्याला शब्दाच आणि ...", 'जिकडे पुढा तिकडे मुलुख थोडा...", 'पिंडीवरच्या विंचवाला मारायला गेलं तर पिंडीला धक्का लागणार...?", 'शिर सलामत तो

पगडी पचास!'' 'राजानं मारलं आणि पावसानं झोडपलं, कुणाला सांगायचं?', 'शहाण्यांचा चाकर व्हावं, पण...' याप्रमाणे ग्रामजीवनातील उपमा, दृष्टांतातूनही समाजजीवन चित्रण केलेले दिसते. उदा. 'म्हसरा सारखं बडवल', 'हवेत लाथा मारुन काय करायचं?', 'अप्पासाहेबांची बोटं पुन्हा एकदा त्याच्या गालावर भिजलेल्या वादीसारखी कडाडली'' इ.

बोलीतील शब्दसंपदेतून 'प्रदेश' टिपता येतो, नित्त, वसाड, बघटली, आवंदा, आग्रव, काकणं, लेवली, घेटलं, व्हतं, सस्तर, येडाचार, गंजान, किरवट, पेंदा, बोनी, तावात, हेंडोरा, ओढोळ्या, चिकार, प्वाट गदमदतंय, शिवार, गावळ्या, जी, भाटी, सासन, पावनेर, आरगळ, ताकीद, टोकोटाक, मुगळ, सपय, वशीद, साटनं, ठेंगरीवर इ.

'माझा गांव' कादंबरीत प्रादेशिकतेच्या प्रभावातून साकारलेले जीवनचित्रण तुलनेने कमी जाणवते. ग्रामीण समाजाच्या वरिष्ठ वर्गाच्या जीवनाचे रीतीभातीचे, विलासाचे, शौर्याचे, औदार्याचे, नीतिमत्तेचे अधिक दर्शन घडते. त्यास प्रादेशिकतेचा स्पर्श फारसा नाही. उमाच्या रुपाने त्या काळातील 'गृहिणी'चे दर्शन घडविले आहे. एक एक पात्र हे एकेका गुण-अवगुणांना साकार करण्यासठी दाखविले असावे असे वाटते.

## १०. शंकर पाटील

### *(१५) ''टारफुला'' १९६४*

शंकर पाटलांची 'टारफुला' ही कादंबरी १९६४ मध्ये प्रकाशित झाली. त्यांनी प्रस्तुत कादंबरीत स्वातंत्र्यपूर्वकाळातील पारंपरिक खेडे त्याच्या व्यक्तिमत्त्वासहित उभे केले आहे. खेड्यातील क्रमाने घडणारे स्थित्यंतराचे चक्र दोन पिढ्यातील सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर चित्रित केले आहे. करारी आणि परोपकारी, गावावर वचक असलेल्या सुभानराव पाटलाचा अचानक मृत्यू होतो. पाटलीणबाईंनी आपल्या मुलाला दत्तक घ्यावे म्हणून गावातील दोन प्रतिस्पर्धी केरुनाना पवार आणि दाजीबा गायकवाड प्रयत्न करु लागतात. जंगलातील फराऱ्यांची मदत घेतात. पापभीरु आबा कुलकर्ण्यांवर गावकारभाराची संपूर्ण जबाबदारी पडते. पापभीरुपणामुळेच ते गावात दारारा निर्माणकरु शकत नाहीत. सुखवस्तू गावामध्ये पाटलाच्या मृत्यूनंतर संघर्ष होतो. पाटलीणबाई कोल्हापूरला भावाकडे निघून जातात. आबा कुलकर्णी एकटे पडतात. बेबंदशाही वाढते. कुणाचे कुणीच ऐकण्याच्या मन:स्थिती नसते. दहशत वाढते, आबा कुलकर्ण्यांचा खून होतो. पाटील आणि कुलकर्णी यांच्या मृत्यूनंतर गावातील लोक ताळतंत्र सोडतात. पाटलाच्या जमिनी बळकावतात. स्वत:ची घरे सारविण्यासाठी पाटलाच्या वाड्याची माती काढू लागतात.

कोल्हापूरच्या करवीर संस्थानाकडून नवीन पाटलाची नेमणूक होते. तिघा भावांना बरोबर घेऊन आलेले दादा पाटील गावात दरारा निर्माण करतात. राऊनानांच्या सल्ल्याने गावकारभार करु लागतात. पवार-गायकवाड आणि इतरांनी बळकविलेल्या जमिनी सोडवितात. पवार-गायकवाड या शत्रूंना दादापाटील तुरुंगाची हवा दाखवितात. तुरुंगातून सुटून आल्यावर ते सरळ वागू लागतात. तरीही वैरभावना नष्ट होत नाही. पाटलांचे सल्लागार राऊनानांचा खून होतो. गावातील तरुणांसाठी पाटील वाड्याजवळ तालीम बांधतात. कळतनकळत हीच तरुणांची शक्ती पाटलाच्या विरोधात बोलू लागते. कायदेभंगाची चळवळ सुरु झाल्यावर पाटलांना सरकार विशेष अधिकार देते. त्यामुळे दादा पाटील जवळ करुन गावकारभार करतात. राऊनानाचा मुलगा हिंदुराव तुरुंगातून सुटल्यानंतर पाटील बेचैन होतात. दरम्यान केरुनाना आणि त्यांच्या मुलाचा खून होतो. आबा कुलकर्ण्याचा सूडाने पेटलेला मुलगा केशव खून करणार असे समजताच गायकवाड फरार होतो. केरुनानांच्या मुल सुडाच्या भावनेने पेटून उठतात. हिंदुरावाने दादा पाटलाच्या घोड्याचा कान कापून त्यांना धमकी दिली. नवी शक्ती सत्तेच्या विरोधात उभी राहिली. एका आडवळणी खेड्यातील दोन पिढ्यांच्या काळातील सत्तासंघर्षाचे चित्रण करणे असा प्रस्तुत कादंबरीचा विषय आहे.

कादंबरीचा एकचएक नायक नाही. तर संपूर्ण गावच नायक आहे. गावातील सत्ता-संघर्ष परिवर्तनास पोषक असे व्यक्ति रेखाटन लेखकाने केले आहे. गाव आणि परिस्थिती बदलत नाही. परंतु सत्ता-संघर्षातील व्यक्ती बदलत जातात. सुभानराव पाटील हे जुनेजाणते, गावावर आणि फराऱ्यांवर वचक असलेले, उदार, दानशूर, परोपकारी आणि करारी धनिक आहेत. फरारी आणि गावकऱ्यांचे ते आश्रयदाते पालनकर्ते आहेत. त्यांच्या दराऱ्यामुळेच जंगलातील फरारी गावकऱ्यांना उपद्रव देत नव्हते. पोटाला मिळाले नाही तर सरळ वाड्यावर येऊन जेवत होते. पाटलांच्या भरवशावर गावकरीही निवांत होते. परंतु पाटलांचा अचानक मृत्यू होतो. गावकरी ताळतंत्र सोडतात. दरोडेखोर गावात मुक्काम करु लागतात.

आबा कुलकर्णी हे पापभीरु, दुबळे. पाटलाच्या मृत्यूनंतर गावकारभाराची जबाबदारी पेलत नाही. त्यामुळे ते चिडचिडे बनतात. पत्नी लक्ष्मीबाई आणि केशव-माधव या मुलांवर ते चिडतात. मनातले मनात ठेवणारे, मेणाहून मऊ-सोशीक आबांना मंडलिक फौजदार दम देतो. अपमान करतो. तरीही ते शांतच असतात. तोंडात बोळा घालून अंगावर कहाकी टाकून त्यांना खून होतो. पाटलीणबाई आणि लक्ष्मीबाई या सामान्य स्त्रिया आहेत. तर केशव हा आबांचा रगेल मुलगा, सूडाने पेटून उठलेला, तर माधव हा आबाप्रमाणे शांत, पापभीरु, मवाळ रेखाटला आहे.

केरुनाना आणि दाजिबा गायकवाड हे दोन स्वार्थी, मतलबी, कारस्थानी खलप्रवृत्तीचे आहेत. दोघांमधून अग्नी जात नाही. पाटलांच्या मृत्यूनंतर बळाच्या जोरावर अनीतीने

ते पाटलांच्या जमिनी बळकावतात. फरारी लोकांची मदत घेऊन गावात दहशत निर्माण करतात. राऊनाना हे पाटलाचे सल्लागार, जुने जाणते सज्जन, नीतिमत्ता जपणारे, सद्‌विवेकी आहेत. हिंदुराव हा त्यांचा रगेल, सूडाने पेटलेला, नवे पाटील आणि गायकवांडांना दम देणारा करारी, केरुनाना आणि त्यांच्या मुलांचा खून करणारा साहसी आहे.

दादा चव्हाण हे करवीर संस्थानातून नेमणूक झालेले नवे पाटील उदार, कणवाळू, करारी, साहसी, विनोदीवृतीचे, मत्सुद्दी आणि उत्तम प्रशासक आहेत. गावाला शिस्तीत वाढविणारे, निर्व्यस्नी, सर्वांशी नीट वागणारे प्रेमळ, माणसांची पारख असणारे पाटील शेवटी सरकारने दिलेल्या विशेष अधिकाराने अनैतिक, क्रूर, निष्ठूर बनतात. वाड्याचे पावित्र्य महारांच्या नादी लागून तमाशामुळे घालवितात. गावात दरारा-दहशत निर्माण करतात. गावातील तरुणांकडून शेवटी अपमानित होतात.

देसाई अण्णा, कृष्णा खोत, लखूभटजी, पिऱ्या दरोडेखोर, उद्धवनाना, शिवा कुंभार, लोणाराची तान्हू, शिवलिंगातेली, बाळू लोहार, म्हाद्या कोळी, पिऱ्या खोत, लक्ष्मण परीट, दुकानदार, सनदी शिपाई या इतर गौण पात्रांचे चित्रण करुन पारंपरिक खेडे उभे केले आहे. स्वातत्र्यपूर्व काळातील सत्ता-संघर्षात होरपळून निघालेले गावच्या गाव लेखकाने जिवंत केले आहे. त्यात बलूतेदार-अलूतेदार, सामान्य शेतकरी, त्यांच्या श्रद्धा, समजुती, हेवेदावे, हाडवैर, रंगेलपणा आणि रगेलपणाचे वास्तवचित्र आहे. इतिहासाची पुनरावृत्ती कशी होते. या पार्श्वभूमीवर डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा अभिप्राय सार्थ वाटतो. ते म्हणतात, "कुठलीही एखादी व्यक्ती केंद्रस्थानी नसली तरी संपूर्ण गावच, गावातील माणसांचा समुहाच्या समूह केंद्रस्थानी आहे."६१.

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील एका खेड्याची आणि जवळपासच्या परिसराची भौगालिक पार्श्वभूमी कथानकास लाभली आहे. सह्याद्रीचा कडा, बाहुबलीचा डोंगर, आळत्याची खिंड, कल्लोबाचं बन, रामलिंग, धुळोबाची जागती दैवतं, जैन मंदिर असे डोंगराच्या कुशीतले हे गाव आहे. डोंगराभोवती वळसे घेत जाणारी वाट, मोठमोठ्या घळीदऱ्या आहेत. त्यामुळे खिंडीमध्ये लुटमार करणाऱ्या दरोडेखोरांना पसार होणे-स्वसंरक्षण करणे सहज शक्य होते. ऊसाचे फड, हळद, पानमळे, भुईमूग, जोंधळा, तूर, मिरची, तंबाखू, खपली, हरभरा, कांदा रागली, गाजरं केळी इ. खरीप-रब्बीची पीके आणि आंबा, पळस, करंजी, खैर, हिरडा, साग, अंजन-कांचन, करवंदी-जांभूळ, निरगुडी, घाणेरी, लिंब, कौठ, पिंपळ इ. हिरवीगर्द झाडी आहे. कल्लोबाच्या बनामध्ये हरणे, डुक्कर, मोर मुक्काम करतात. मुबलक पाणी व काळी कसदार जमीन गावात चांगली सुबत्ता आहे.

निसर्गवर्णन आशयानुरुप आणि गावकऱ्यांच्या मानसिकतेनुरुप झाले आहे. कधी ते प्रतीकात्मक रुप धारण करते. उदा.

"...त्यांची नजर आपसुक मावळती कड गेली... लालभडक गोळा पोटात शिरला होता. निम्मा आत बुडाला होता. निम्मा वर राहिला होता. बरोबर मधन दोन खापी कराव्या तसा वरचा भाग दिसत होत. कुणीतरी कापून ठेवल्यासारखा. एक भकल गिळून टाकलं होतं आणि एक भकल तेवढं शाबूत राहिलं होतं..." (पृ.१७) यातून करारी सुभानराव पाटील यांचा अचानक झालेला मृत्यू आणि आबा कुलकर्णीरुपी एका 'भकल'वर गावची सर्व जबाबदारी येऊन पडली. त्याचप्रमाणे ऋतुचक्राचे जिवंत चित्र सत्तासंघर्षाच्या चक्राला अनुरुप असेच रेखाटले आहे.

"बघता बघता मृग नक्षत्र निघाल, मृग आला आणि दिवसाचं तोंड दिसेना झालं! पाण्यानं भरलेले काळे ढग सारखे डोक्यावरुन पुढं जाऊ लागले. रात्रंदिवस आभाळ पाझरु लागलं. गार वाऱ्यानं चैत्र वैशाखातला उकाडा गेला आणि दिवसाउजेडी म्हातारी-कोतारी माणसं अंगाभोवती घोंगडे धरुन बसू लागली. पाझरणारं आभाळ ठिबकू लागलं. गळू लागलं. ओढे नाले दुथडी भरुन वाहू लागले..." (२२६) सुभानराव पाटलांच्या मृत्यूनंतर गावावर आलेले संकटरुपी काळे ढग दिसतात.

स्वातंत्र्यपूर्व काळातील कृषीकेंद्रित खेड्यातील समाजजीवनाचे चित्रण केले आहे. पाटील आणि कुलकर्णी यांना गावगाड्यामध्ये विशेष महत्त्व होते. तसेच या गावगाड्यात बलुतेदारांनाही महत्त्व होते.६२. हे त्रि. ना. आत्रे यांनी स्पष्ट केले आहे. "स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण अशा गावगाड्याची काम करण्याची पद्धतीही स्वतंत्र अशीच होती. गावकारभार पाटील हा गावची फौजदारी, दिवाणी कामे करी तर कुलकर्णी हिशेबठिशेब ठेवण्याचे काम करी. म्हणूनच अनेक ग्रामीण कादंबऱ्यांमधून पाटील-कुलकर्णी यांची जोडी येताना दिसते. उदा. 'टारफुला' या कादंबरीतून शंकर पाटील यांनी संपूर्ण नसला तरी, काही प्रमाणात गावगाडा साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. तरी संपूर्ण कादंबरी केंद्रित झालेली दिसते ती पाटील-कुलकर्ण्यांवर."६३. या मानसन्मानाच्या पदासाठी गावामध्ये संघर्ष होतो. सुभानराव पाटलाचा अचानक मृत्यू झाल्यानंतर गावाचा पाटील आपला मुलगा व्हावा म्हणून केरुनाना पवार आणि दाजिबा गायकवाड प्रयत्न करतात. पाटीलकी आपल्या घराण्याकडे आल्याने प्रतिष्ठा वाढेल. गावकरी मानासन्मानाने मुजरा करतील. शत्रूचा विरोध मोडून काढता येईल अशी त्या दोघांची धारणा होती. उपरा माणूस गावचा पाटील होणे कुणाही स्वाभिमानी माणसाला मान्य होण्यासारखे नव्हते. करवीर संस्थानकडून आलेल्या नवीन पाटलाला पळवून लावण्याचा किंवा त्याचा फराऱ्यांकडून खून करण्याचा विचार गावकरी करु लागतात. पण तो प्रयत्न फसतो. आबा कुलकर्ण्यांनंतर 'कुलकर्णी' पद मिळावे म्हणून त्यांचे भाऊबंद प्रयत्न करतात. यातूनही 'पाटील' आणि 'कुलकर्णी' या पदांचे महत्त्व स्पष्ट होते.

दरोडेखोर इमानाने वागत होते. आश्रयतात्या गावामध्ये लुटमार करीत नव्हते. सुभानराव पाटील जिवंत असेपर्यंत गाव निवांत होते. कारण दरोडेखोर कोणत्याही

वस्तूस हात लावत नव्हते. पाटलाची सारवट गाडी रस्त्याने चालली तर सर्व फरारी खिंडीत रस्त्याच्या कडेला उभे राहून मुजरा करीत. पोटाला खायला मिळाले नाही तर सरळ पाटलाच्या वाड्यावर येऊन मागून घेत असत. गावातील वाद गावातच चावडीवर मिटविले जात. पोलिसांपर्यंत तक्रारी जात नव्हत्या. पाटीलच सर्व तक्रांरी निवारण करीत.

पाटलाचा गावामध्ये दरारा असेल तर लोक सरळ वागत, परंतु दरारा ठेऊ न शकणारा माणूस गावकारभार पाहत असेल तर तेथे बेबंदशाही निर्माण होते. सामान्य माणसांची धनिकांच्या संघर्षात कुचंबणा होते. सुभानराव पाटलाच्या मृत्यूनंतर पापभीरु आबा कुलकर्ण्याकडे पाटील आणि कुलकर्णी पदाची जबाबदारी येते. गावावर ते अंकुश ठेवू शकले नाही. बेबंदशाही निर्माण झाली. जंगलातील फराऱ्यांनी गावात तळ दिला. कुलकर्ण्यांचा खून झाला. पाटलाच्या जमिनी लुबाडल्या गेल्या. गावकरी भयभीत झाले. दादा पाटील येईपर्यंत सामान्य माणसांची फारच कुचंबणा झाली. चोऱ्या होऊ लागल्या. तरण्याताठ्या मुली पळविल्या जाऊ लागल्या. गावात हेवेदावे वाढले की एकमेकांच्या शेतातील पिकांची चोरी केली जात असे. पीक नष्ट केली जाई. गावात डोंबारणी येत. तमाशा होई. सनदी शिपाई आपले कर्तव्य विसरत. देसाई खोताच्या वादामुळे एकमेकांच्या पिकांची चोरी होऊ लागली. गावातील सनदी शिपाई चावडीवर येईनासे झाले. पाटलाच्या वाड्याचे राखण करण्याचे त्यांनी सोडले.

बदलत्या काळपरिस्थितीमध्ये गावातले वाद चावडीवर मिटविणे अशक्य होऊ लागले. पोलिसांकडे तक्रारी जाऊ लागल्या. अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करण्यासाठी धनिक त्यांना पैसे देऊ लागले. भ्रष्टाचार वाढला. गावात दरारा निर्माण करण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांशी संबंध प्रस्थापित केले जाऊ लागले. दादा पाटलांनी गावकारभार पाहण्यास सुरवात केल्यानंतर पोलिसांशी संबंध प्रस्थापित केले. गायकवाड-पवार यांना अटक केली. हातात बेड्या पडणे म्हणजे इभ्रतीचा प्रश्न निर्माण होऊ लागल्यामुळे गावकरी पाटलांना घाबरु लागले. त्यांचा दरारा निर्माण झाला. सुभानराव पाटलाच्या बळकावलेल्या जमीनी त्यांची कुळाकडे देऊन टाकल्या. परंतु पाटील परिवर्तकाळात आपण गावचे पालनकर्ते आहोत हे विसरले. गावात अन्याय-अत्याचार आणि दहशत निर्माण करु लागले अनीतीने वागू लागले. पोलिसांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी खर्च येतो म्हणून गावकऱ्यांकडून पैसे वसूल करुन भ्रष्टाचार करु लागले. असे लक्ष्मण परटाची बायको विहिरीत पडून मेली, त्याला आधार देण्याऐवजी दमदाटी करुन पाटील त्याच्याकडून पैसे वसूल करतात. वाड्याची प्रतिष्ठा विसरुन वाड्यावर तमाशा करतात आणि अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळतात. तालमीतील तरुणांना पोलीसस्टेशनची हवा दाखवितात.

दरोडेखोरांकडील माल व्यापारी-सावकार घेत असत. भाऊ वाण्याने नागू

पैलवानाकडील माल घेतल्यचा आरोप दादा पाटील करतात. तेव्हा तो पाटलांना हप्ता देतो. खेडी मागासलेली होती. आवश्यक त्या सुविधा नव्हत्या. दवाखाने नव्हते. म्हणूनच आजारी माणसाला शहरात घेऊन जावे लागत होते. सुभानराव पाटील एकाएकी पडल्यानंतर लखू कुलकर्ण्याला नाडी पाहण्यासाठी बोलाविले जाते. त्याचा नाईलाज झाल्यावर पाटलांना कोल्हापूरला घेऊन जाण्याचे ठरते. परंतु पाटलांनी त्याअगोदरच आटोपलेले असते. आबा कुलकर्णी देखील लखूचेच औषध घेतात. जातिभेदाचे प्रस्थ होते. दादा पाटलाच्या कारकिर्दीत वाड्यावर महारांचा तमाशा करणे राऊनानांना आवडले नाही. कारण प्रतिष्ठेच्या कल्पनेच्या विरूद्ध पाटलांनी वर्तन केले असे त्यांना वाटते.

मराठ्यांमध्ये पिढ्यानपिढ्या वैरभावना टिकून राहिलेली दिसते. गायकवाड आणि पवार यांच्यामध्ये पिढीजात हाडवैर होते. दोघांच्याही वडिलांनी एकमेकांच्या वडिलांचे खून केले होते. राऊनाना केरुनानाने खून केला म्हणूनच केरुनाना व त्याच्या मुलाचा खून हिंदराव करतो. पिढीजात भांडणामुळे खून होत असे यावरुन स्पष्ट होते. सत्ता टिकविण्यासाठी पाटील गावगुंडा, कटकारस्थान करीत. एकएका धनिकाला हाताशी धरीत, तर दुसऱ्याला दूर करीत. दरारा कायम ठेवीत. सोयीप्रमाणे दादा पाटील, दाजीबा गायकवाड किंवा केरुनाना पवार यांना जवळ करतात. बलुतेदारांना कृषी जीवनात महत्त्वाचे स्थान होते. मृगनक्षत्र पडून गेल्यानंतर सुतार, लोहाराकडे औत दुरुस्तीसाठी लोक गर्दी करतात. सनदी शिपाई पाटील-कुलकर्णी यांना मदत करण्याची कामे करीत, नम्रतेने, वागत. परंतु, बेबंदशाही निर्माण झाल्यावर ते स्वैर जीवन जगू लागले.

ग्रामजीवनात काही समज, समजूती, श्रद्धा, अंधश्रद्धा, सण-उत्सव, देवदेवतांच्या यात्रा यांनाही महत्त्व असते. कादंबरीमध्ये खेड्यातील लोकांच्या सांस्कृतिक जीवनाचे चित्र रेखाटले आहे. गावकारभार पाटलांना रोज मुजरा करण्याची परंपरा होती. सर्व सनदी शिपाई आणि गुरव संध्याकाळी वाड्यावर येत आणि पाटलांना मुजरा करीत. गुरवाने शिंग फुंगल्यावर सनदीशिपाई भुईला हात लावून मुजरा करीत आणि पाटील त्यांना दिवसभरातील हालहवाल विचारीत. मूठ मारण्याच्या प्रकारावर भूत-पिशाच्यावर लोकांचा विश्वास होता. सनदी शिपाई गोपाळ वाड्यात मुक्कामाला जाण्याचे टाळतो. पाटील वाड्यात फिरत असल्याचा त्याला भास होतो. अचानक मृत्यू झालेल्या माणसांचा अतृप्त आत्मा या जागेच संचार करतो असा लोकसमज होता.

दादापाटलांना राऊनाना वाड्यावरील रीतीरिवाजांची कल्पना देतात. देवपूजा करणाऱ्या गुरवाला जेवायला थांबवणे, महारणीला भाकरी देणे, ताईबाईला अमावास्येला नारळ फोडणे आणि वर्षातून एक बकरु कापणे, धुळोबाची सासणकाठी उभी करणे, सासणकाठीचा मान पाटलाचा असल्याचे सर्वांनी मान्य केलेले असते. परटिणीला,

दिवाळीला चोळी लुगडे देणे. शिराकाई देवीवर, धुळोबावर लोकांची श्रद्धा आहे. खणानारळांनी देवीची ओटी भरण्याची परंपरा आहे. शकून-अपशकून स्थान आहे. देवळाजवळच काळंकुत्रं पंधरा दिवस भुंकत होतं. पाटलाच्या मृत्युपूर्वी कुत्र्याचे भुंकणे-विवळणे लोकांना अशुभाची सूचनाच वाटते. आबा कुलकर्ण्याच्या खुनापूर्वी असे कुत्रे भुंकल्यामुळे सनदीशिपाई ते हुसकतो. गव्हाच्या दामट्या-वरणभात, त्यावर गुलात, टाचण्या टोचलेले लिंबू असा उतारा करणे किंवा बिबा घालणे इ. त्यांच्या अंधश्रद्धा आहेत. गाईला दशमी देणे, घरात चिमणीने घरटे केले तर लाभ होतो, पैसा येतो अशी समजूत दिसते. नव्या लुगड्याची घडी मोडण्यापूर्वी ते गाईच्या अंगावर टाकण्याची परंपरा होती. दिव्याची, अन्नाची शपथ घेणे, नशिबावर हवाला ठेवणे, तिन्ही सांजेला दिवा लावणे, दसऱ्याला वाड्यावर जाऊन सोने देणे, घट बसविणे, नवरात्राचे उपास करणे, हत्यारांची पूजा करणे, तसेच मागासवर्गीय लोकांनी कुलकर्णी-पाटलांना जोहार करणे, सनदी शिपायांनी मुजरा करणे, भविष्य-पत्रिका पाहणे यासारख्या अनेक श्रद्धा परंपरा येथे दिसतात.

सण आणि उत्सव हे संस्कृती विशेष होत. चैत्र पाडव्याला गावातील जोशाने गावकऱ्यांना कडुलिंबाचा पाला खायला देणे, वाटलेल्या हरबऱ्याची डाळ आणि गूळ मिसळलेला तो पाला सर्वांनी खाणे, बंदुकीच्या बाराने झाडावरील नारळ पाडणे, जोशाने पंचांग पाहून नववर्ष कसे जाईल हे सांगणे, बेंदराच्या वेळी कुंभाराने चिखलाचे बैल देणे, मांगाने घरांना पिंपळाच्या पानांची तोरण बांधणे, तेल हुरमुंजान बैलांची शिंगं रंगविणे, बैल झुली घालून सजविणे, विविध रंगाचे ठिपके बैलांच्या अंगावर देणे, गळ्यात गंडा घालणे, शेळ्यांना गोंडे बांधणे, बैलांना खुराक देणे, लेजीम खेळत हलगी-ताशा वाजवून बैलांची मिरवणूक काढणे, श्रावणात घराघरातून पोथीपुराणे लावणे, नागपंचमीला स्त्रियांनी फेर धरुन नाचणे, झोके खेळणे, नटूनथटून गाणी म्हणत नागोबाला दूधलाह्या देणे, गारुड्याने नाग घेऊन पुंगी वाजवत गावात फिरणे, गौरगणपतीत स्त्रियांनी झिम्माफुगड्या खेळणे, हातात सूप घेऊन कोंबडा-घोडा होऊन नाचणे, पोथी पुराणाची समाप्ती. भादव्यातील पितरं आणि अहेवनवमीची जेवणं करणे, वाघ्या-मुरळीचे जागरण घालणे, शिलंगणाच्या दिवशी वाजतगाजत मिरवणूक काढणे, मांगाच्या हलगीच्या आणि कोरव्या भोंग्याच्या तालावर तालमीतील मुलांनी लेजीम खेळणे, दांडपट्टा फिरविणे, धनगरांनी गजी नाचविणे, पाटलाच्या वाड्यावर जाऊन सोने देणे, यासारखे सण उत्सवाच्या वर्णनातून कृषी जीवनातील संस्कृतीचे दर्शन येथे घडते. परंतु प्र. ना. परांजपे यांनी या कादंबरीतील संस्कृतीविशेषासंबंधी आक्षेप घेतला आहे, ''खेडूत जीवनात धर्म, देव, भविष्य, भुते खेते अशा अमानवी शक्तींना फार महत्त्वाचे स्थान आहे. (निदान कादंबरीत वर्णन केलेल्या कालखंडात होते) हे नाकारता येणार नाही, परंतु लेखकाचे याही बाजूकडे दुर्लक्ष झाले आहे.

कादंबरीच्या प्रारंभी रामलिंग, धुळोबा, बाहुबली इत्यादी देवस्थानांचे उल्लेख आले असले तरी त्या उल्लेखांनी निर्माण केलेल्या अपेक्षा लेखक पुऱ्या करीत नाही... स्वप्नात देवी येणे, तिची ओटी भरणे, लिंबू, मांत्रिक, भविष्य यांचे कादंबरीत उल्लेख येत असले तरी त्यांना 'स्थानिक' महत्त्व आहे. कादंबरीच्या आशयाशी त्यांचा संबंध आहे, असे वाटत नाही.''६४. हा आक्षेप तितकासा पटत नाही. कारण खेड्यातील माणसांच्या अंत:करणामध्ये या गोष्टींना स्थान आहे. शिवाय लेखकाला येथे ग्रामस्थित्यंतर दाखवायचे आहे, त्यामुळे अपरिहार्यपणे जनतेचे देवदेवतेकडे दुर्लक्ष झाले. लक्ष्मीबाई किंवा दादा चव्हाण यांच्या भावस्थितीनुरूप हे उल्लेख आलेले आहेत. डॉ. यु. म. पठाण यांनी, 'करवीराच्या परिसरातील मृदगंध 'टारफुला'त दरवळत आहे.''६५. असा या कादंबरीचा गौरव केला आहे, कारण त्या मातीचे संस्कार लोकजीवनावर झालेले आहेत. त्यांच्या मनामध्ये ज्या गोष्टी खोलवर रुजलेल्या असतात, त्याचा गंध आशयानुरुप असाच कादंबरीतून येतो. ''एका छोट्याशा खेडेगावातील जीवन रंगविणे हाच या कादंबरीचा हेतू. पाटील व पाटिलकी हे या जीवनात फार मोठे आकर्षण केंद्र. त्याच्या लाभासाठी मोठ्यांची चाललेली सत्ता स्पर्धा, राजकारण, स्पर्धेत यशस्वी होताना व यशस्वी झाल्यावर आसन स्थिर करताना वापरले जाणारे भलेबुरे मार्ग व त्यामुळेच इतरांच्या मत्सराग्नीने सतत प्रज्वलित राहणारी ही स्पर्धा हे या कादंबरीचे प्रमुख सूत्र आहे.''६६. डॉ. लीला गोवीलकर यांच्या या विवेचनावरुन असे म्हणता येईल की सत्ता टिकविण्यासाठी अमानवी शक्तींचाही वापर होत होता.

स्वातंत्र्यपूर्व काळातील खेड्यातील सत्ता-संघर्षाचे चित्रण या कादंबरीत लेखकाने केले आहे. कोल्हापूर परिसरातील करवीर संस्थानातील एका गावाची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. संस्थानाधिपती शिकारीसाठी बाहेर पडत. जंगलात तळ देऊन राहत. जवळाच्या गावांना त्यांना सर्व सोयी सवलती उपलब्ध करुन द्याव्या लागत. सुभानराव पाटलांच्या मृत्यूनंतर आबा कुलकर्ण्याकडे एक हवालदार येऊन सरकारस्वारी शिकारीसाठी येणार असल्याचे सांगतो व गहू, अंडी, कोंबड्या आणि गाडीभर सरपणाची व्यवस्था करण्यास सांगतो. आबासारख्या पापभीरुला ते अशक्य होते. म्हणून घरातील उपयुक्त लाकडे फोडून ते सरकारस्वारीसाठी पाठवितात.

गांधीजींनी कायदेभंगाची चळवळ सुरू केली. सरंजामशाहीला हादरा बसला. खेडीपाडी जागी झाली. भाषणबंदी, सभाबंदी असलेल्या कोल्हापूर संस्थानातही कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. शेतकऱ्यांनी मोर्चे काढले, सभा घेतल्या, लोक संघटीत झाले. संस्थानिकांकडे न्याय्य मागण्या करु लागले. पार्के उठवा, पार्कातल्या राखीव हरणा-डुकरांना मारण्याची मुभा द्या. शेतसारा कमी करा, राजा आणि प्रजेमध्ये दुफळी निर्माण झाली. प्रजेने न्याय्य हक्काची मागणी करताच सरकारी वरवंटा

संस्थानभर फिरु लागला. धरपकडीने तुरुंग भरले. करवीर इलाख्यात लोकजागृती झाली. राजाविरुद्ध दंड थोपटून प्रजा उभी राहिली. दडपशाहीला सुरुवात झाली. पोलीसखाते सज्ज झाले, गावकारभार पाटलांना विशेष अधिकार दिले गेले. कार्यकर्ते हद्दपार केले. पोलिसी ससेमिरा पाठीमागे लागला. पोलीस नंगानाच घालू लागले. खादीधाऱ्यांना अटक-मारहाण होऊ लागली. पाटलांनी विशेष अधिकाराचा फायदा घ्यायला सुरवात केली. दादा पाटलांनी गांधीवादी विचाराच्या कल्ल्या जंगमाला आणि गावातील तरुणांना अटक केली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तरुण मुलांना सक्तीने सैन्यात भरती केले गेले. पाटलांनी पुढाकार घेऊन सरकारला मदत केली. स्वत:ची मुले सैन्यात पाठवायला लोक तयार नव्हते. अशा वेळी केरुनाना, शंकर देसाई, भाऊवाणी, तुका मांजऱ्यांना लष्करी अधिकाऱ्यासमोर उभे करुन दोन दोन तरुण किंवा रोख रक्कम देण्यास पाटील सांगतात. सैन्यभरतीत भ्रष्टाचार केला जात होता.

पाटील, गायकवाड, पवार यांची आर्थिक परिस्थिती उत्तम होती. प्रचंड मोठा वाडा, सारवट गाडी, दोनशे एकर जमीन, पाटलांची असल्यामुळे त्यांच्या घरात आपला मुलगा दत्तक जावा असे गायकवाड-पवारांना वाटते. परंतु सामान्य शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती साधारणच होती. भूप्रदेशाचा त्या लोकजीवनावर परिणाम जाणवतो. परावलंबी जीवन ते जगतात. पीक आले नाही, तर खंडफाळ कसा वसूल होणार असा प्रश्न आबा कुलकर्ण्याला पडतो. शिवलिंग तेल्याचा बैल मेल्यानंतर तो घाण्याला म्हैस जुंपतो. नवे पाटील त्याबद्दल त्याला शासन करतात. शेवटी त्याच्या परिस्थतीकडे पाहून बैल घेण्यासाठी ते त्याला पन्नास रुपये देतात. सावकार लोक मुद्दलापेक्षा अधिक व्याज वसूल करीत होते. जसे पठाणाचे कर्ज भरण्यासाठी राऊनाना पाटलांकडे दोनशे रुपये मागतात. पठाणाने दारात येणे त्यांच्या दृष्टीने इभ्रत जाण्यासारखे असते. कर्जापायी इभ्रत जाऊ नये म्हणून धडपडणारी माणसं आहेत.

र. बा. मंचरकर म्हणतात, "पाटलांची भाषा ग्रामीण जीवनातून मार्मिकपणे वेचलेल्या चपखल प्रतिमांची भाषा आहे. ग्रामीण बोलीची लय मुरवून नागरी भाषेशी संवाद राखणारी वाहती भाषा त्यांनी वापरली आहे."६७. 'टारफुला' ही एक प्रतिमाच आहे. टारफूला म्हणजे पिकाला मारक ठरणारे काटवण. हे काटवण वेगवेगळ्या वेळी सत्तेला विरोध करते. कोल्हापूर संस्थानातील एका आड खेड्यातील अशा माजोरी मानवी काटवणाची ही कहाणी आहे. म्हणून डॉ. मंचरकराचे वरील विधान यथार्थ वाटते. परंतु संवादाच्या सोसामुळे ही कादंबरी पाल्हाळीक झाली आहे. म्हणून प्र. ना. परांजपे यांचा अभिप्राय, "एकंदर कादंबरीच्या संदर्भात ते निवेदन निव्वळ सूज ठरते. संवादही सहसा घटना-व्यक्ती-आशय यांच्या ताणांनी संपृक्त झालेले नाहीत."६८. हा सार्थ वाटतो. संवादामुळे कादंबरीचा विस्तार झाला.

परिणामकारकतेत मात्र भर पडलेली नाही. ल. ग. जोगांना टारफुलाची भाषा 'हरिभाऊ छापाची'६९. वाटते. याचे कारण अफाट जीवनपटातील बारकावे भरण्याचे काम लेखकाने केले आहे असे त्यांना वाटते ते तितकेसे पटत नाही. कारण समाजजीवनाचे दर्शन घडविणाऱ्या अर्थघन शब्दांचा आणि म्हणीचाही वापर लेखकाने केला आहे. ''बळी तो कान पिळी'', 'वाक पान्यात दडविला, वास मारायचा ऱ्हातोय व्हय?' 'आले देवाजीच्या मना, तिथे कोणाचे चालेना', 'भित्यासाठी ब्रह्मराक्षस' इ. म्हणी, याप्रमाणे कोल्हापूर संस्थानातील खेड्यापाड्यातील लोकांच्या बोलीभाषेतील अनेक शब्दही अपरिहार्यपणे येतात. उदा. अवचित, बडगी, रग्गड, वावगं, झनापन, रिंगी, पागुळ येडगटलं, भवतीनं, तलाद, तगून दक्कल, गैल्तासा, गुमान, कांबारली, सप्पय, दुम, ताव्रयात, डका, दाडवाण, मिळमिळल्यागत, कर्दे, कलागत, इरमल्यागत, रातीइरेच, गावोगाव, कुरी, घातआली, वाफसा, हिटीत, तरास हडबडलेला, हुरुट, ठिसकारतोस, अक्षी, झंनापनी, फुगणी, आडसाटा, सांडगे चवड इ. यातून हातकणंगले आणि कोल्हापूर कडील परिसर, दृश्यमान होत असलेला दिसतो. परंतु, प्रादेशिक कादंबरी म्हणून 'टारफुला' ही अर्धीअधिक यशस्वी म्हणता येईल. कारण पूर्णतः प्रादेशिकतेचा रंग त्यात मिसळलेला जाणवत नाही.

### *(७) दि. बा. मोकाशी*

### *(१३) देव चालले*

'स्थळयात्रा', 'देव चालले', (१९६१), 'पालखी', 'आनंदओवरी' या चार कादंबऱ्यांची समीक्षकांनी उपेक्षा केली आहे. प्रा. व. दि. कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, ''दि. बा. मोकाशी यांची 'देव चालले' ही कादंबरीकृती खरे तर एका कुटुंबातल्या कोण्या एका प्रसंगाची गोष्ट! पण ती ज्याला आदि नाही आणि अंत नाही अशा परमेश्वराची, परमेश्वर आणि माणूस यांच्यातल्या विचित्र नात्याची एक अमरकथा आहे.''७०. म्हणजेच ही ग्रामीण संस्कृतीच्या ऱ्हासाची कथा आहे. देवावरील श्रद्धेने ग्रामस्थांचे एकमेकांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. परंतु प्रतिकूल नैसर्गिक परिस्थिती आणि शासकीय धोरण यामुळे ग्रामीणांना गाव सोडणे भाग पडले. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीशी स्पर्धा करण्यात ते गुंतून पडले. गाव, घर, कुलदैवत याकडे स्वाभाविकच दुर्लक्ष होऊ लागते. स्वातंत्र्योत्तर काळामधील संक्रमणसूचक अशी ही कादंबरी आहे. तीनशेहून अधिक वर्षे नरहरी देवाची मूर्ती उराशी कवटाळून बसलेल्या पळसगावातल्या श्रद्धाळू माणसांची ही कथा आहे. रामूच्या पळसगावामध्ये झालेल्या आगमनाने कादंबरीची सुरुवात होते आणि तो दोन दिवसांनंतर हुंदके दाबीत परतताना कादंबरीची अखेर होते.

चार भाऊ, विधवा चुलती आणि संन्यासी काका अशा एका जोशी कुटुंबाची ही

कथा आहे. शहरात राहणारे रामू-जगू, आबा आणि नरु हे चार भाऊ खेड्यातील देव शहरात घेऊन जाण्यासाठी येतात. प्रत्येकाची देवाविषयी स्वतंत्र मते आहेत. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे गावात राहून देवपूजा करावी असे रामूला वाटते. तर बाकी भावांना देव हलविण्याचे विशेष काही वाटत नाही. पन्नास वर्षे सीताकाकीने नरहरी देवाची सेवा केली. पुतण्यांवर प्रेम केले. ते पोटासाठी शहरात निघून गेले. काकीने देवांची अखंड सेवा केली, परंतु देव हलणार या कल्पनेने ती बेचैन झाली. तिला बालपणाची आठवण होऊन उदास वाटले. पुतण्याबरोबर शहरात जाण्यास ती नकार देते. देव चालल्याबद्दल ग्रामस्थांना वाईट वाटते.

संन्याशी विनुकाका अचानक गावामध्ये येतात. गोदीशी विवाह करुन राहण्याचा निर्णय ते जाहीर करतात. देव हलणार नाही या कल्पनेने सर्वांना आनंद होतो. परंतु घराची वाटणी मागणारे संन्याशी काका गोदीच्या भेटीनंतर घर सोडून निघून जातात. आबाने शुभमुहूर्तावर पूजा-आरती केल्यानंतर सर्वजण देव घेऊन शहरात निघून जातात. गावकरी आणि काकी हळहळत मागे राहतात.

कादंबरीच्या संदर्भातील डॉ. एस. एस. भोसले यांचा अभिप्राय सार्थ वाटतो. ते लिहितात, ''देव चालले' ही कथाहीन कथा आहे. कथानक, स्वभाचित्रण, वातावरण, मनोविश्लेषण व भाषाशैली-स्थूलरुपाने कादंबरीच्या या घटकात ती न बसणारी आहे. 'देवा'ना कथा अशी फारशी नाहीच. फक्त मनाला भावते. कदाचित मनाचे उन्नयन करते-हीच 'देव चालले' मधली एक कथा आहे.''७१. थोडक्यात व्यक्ती आणि परमेश्वर यांच्यातील अतूट नात्याची-श्रद्धेची ही कथा आहे.

रुढ अर्थाने येथे कुणीही नायक किंवा खलनायक नाही. जोशी कुटुंब आणि त्याबरोबर घाटमाथ्यावरील मावळप्रदेशतील पळसगावचे ग्रामस्थ हे येथे नायक म्हणून आलेले दिसतात. म्हणून ही समूहाची कथा आहे. जोशी घराण्यातील चार भावांची श्रद्धा, निष्ठा, प्रेरणा भिन्न असलेली दिसते. प्रत्येकाचे वागणे स्वतंत्र वृत्तीचे आहे. त्यांच्या वागण्यात आपुलकी, जिव्हाळ्याची भावना दिसत नाही. त्यांच्या कृती-उक्तीतून त्यांचे स्वभाव-श्रद्धा कळतात. 'आबा' हा सर्वांमध्ये मोठा म्हणून देव त्याच्याकडे घेऊन जाण्याचे ठरते. तो आर्थिकदृष्ट्या सुखीसमाधानी आहे. कुलइतिहास लिहिण्याचा संकल्प तो करतो. श्रद्धा आणि पैसा यांचा समतोल साधू पाहतो. तो संयमी आहे. सुख दु:खाच्या प्रसंगी तो निश्चल, शांत राहू शकतो. देव हलविण्याच्या विचाराने त्याचाही तोल जातो. तो चक्कर येऊन पडतो. शेवटी कर्तव्य म्हणून देव घेऊन जातो.

'रामू' हा आबाचा कर्जबाजारी भाऊ आहे. देवाच्या ओढीने तो घराकडे येतो. तो श्रद्धाळू आहे. देव घरातून जात असल्याचे सर्वाधिक दु:ख त्याला होते. तो मनाने गाव, घर आणि देवात गुंतलेला दिसतो. गावात राहून देवपूजा करावी असे त्याला

वाटते. तसेच देव स्वत: घेऊन गेल्यास आपली गरिबी जाईल असे त्याला वाटू लागते. देवाचा खर्च आपणास झेपणार नाही म्हणून हा विचार तो झटकून टाकतो. दारिद्र्यामुळे घरातील जुने कपडे त्याला महत्त्वाचे वाटतात. पैसा ही त्याची समस्या आहे. म्हणून कीर्तनकार झाला असतो तर अधिक पैसा मिळाला असता असे विचारही त्याच्या मनात येतात.

'जगू' शिकलेला, नास्तिक, पुरोगामी आहे. नरहरी, देवाविषयी ओढ नसल्यामुळे रेल्वेतून उतरल्यावर घरी जाण्याची घाई करीत नाही. तो. घर, गाव, देवापासून भावनिकदृष्ट्या दूर गेलेला दिसतो. रस्त्यात त्याला देवाची आठवण होत नाही, तर बालवयातील जांभळे, आंबे पाडण्याच्या आणि करवंद खाण्याच्या आठवणी येतात. देवाच्या आरतीऐवजी 'सुंदरा मनामध्ये भरली' ही लावणी आठवते. तर 'नरु' हा अवखळ, स्वतंत्रवृत्तीचा पुरोगामी आहे. विमा कंपनीचा एजंट असल्याने तो धंदेवाईक आहे. पैशाशिवाय जगात सुख मिळत नाही. तो नसल्यानं किंवा अनाठायी घातल्यानं सगळी दु:ख ओढवतात'' असे तो मानतो. (पृ.३१) तो पैशाशिवाय दुसरा कशाचाच विचार करीत नाही. म्हणून नातेवाईक त्याचा तिरस्कार करतात. उलट देवाच्या उत्सवसाठी वडिलांनी कर्ज केले म्हणून उच्चशिक्षण मिळू शकले नाही अशी त्याची खंत आहे.

सीताकाकू ही एक बालविधवा आहे. पुतण्यांवर प्रेम करणारी, समजदार आणि पन्नासवर्ष नरहरीची पूजा करण्यात आयुष्य घालविलेली स्त्री आहे. प्रदेश, गाव, घर, देव यांचे खोल संस्कार झाल्यामुळे पुतण्याबरोबर शहरात जाण्यास ती नकार देते. पुतण्यांची देवावर श्रद्धा नाही याचे तिला दु:ख होते. देव चालल्याने ती वैफल्यग्रस्त होते. वैधव्यामध्येही मायाळू काकूने प्रेमाचा एकएक धागा जोडला. सर्व धागे निसटले. शेवटी 'देवा'चा धागा निसगल्याने ती अस्वस्थ, उदास होते. वृत्तीने कणखर असूनही तिच्या श्रद्धेला तडा गेल्याने ती विफल होते.

संन्यासी विनुकाका, आपट्यांची विधवा नमू, कुळकायद्याने अस्वस्थ झालेला, गाव सोडण्याचा विचार करणारा गोविंदा नरहरी देवावर श्रद्धा असलेला, देव चालले म्हणून अश्रू ढाळणारा, स्वत:चा घरसंसार असताना परस्त्रीशी संबंध ठेवणारा रंगेल आणि श्रद्धाळू हरिकाका फडणीस, जुना जाणता श्रद्धाळू म्हातारा विष्णुभटजी कष्टाळू शिवा, संकटात कुणाकडे पहावे या विचाराने अस्वस्थ झालेली वृद्ध लक्ष्मी, आबाची बायको, मेहुणी आणि त्याची मुले या गौण व्यक्तिरेखाच्या वृत्तीउक्तीतून प्रदेशांचे संस्कार जाणवतात. या सर्वांच्या चित्रणातून समूहमनाचे दर्शन घडते. कादंबरीतून परिवर्तनकाळातील श्रद्धाळू माणसांची असह्यता वर्णन केली आहे. 'नरहरी' देवाची अखंड भक्ती करणाऱ्या काकूची ही व्यथा आहे.

घाटमाथ्यावरील मावळ प्रदेशातील पळसगाव येथील वातावरणात ही कथा आकाराला

आली आहे. नदीतील कातळ, जांभूळ, आंबे, पळस, करवंदी, बकूळी, कमळ इत्यादींचे वर्णन लेखकाने केले आहे. त्याचप्रमाणे "लालचुटुक मंगलोरी कौलांचं घर, तांबडे पत्रे पडलेलं आपलं घर, झाडांच्या गर्दीतून डोकावणारं एखादं नळीच्या कौलाचं घर, ते कुणाकुणाचं आहे..."(पृ.७१) ही घरांची रचनादेखील प्रदेशविशिष्ट आहे. त्याचप्रमाणे "आपले देव कोकणातून वर आले." (पृ.३५) हे आबाचे वाक्य आणि (आबाची बायको) ती स्वत: देशावरची होती."(पृ.७१) या दोन्हीच्या आधारे प्रस्तुत कादंबरीतील प्रदेश कोकण किंवा देशावरचा नाही तर घाटमाथ्यावरील मावळ प्रदेश आहे.

कादंबरीतील निसर्गवर्णन प्रदेशानुरूप ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणारी आणि मानसिकतेनुरूप आली आहेत. "दाट पालवीच्या जागी चांदण्यांनी लखलखणरं, उघडंबोडकं काळं आकाश पाहाताच त्याला चरकल्यासारखं झालं..."(पृ.५) हे वर्णन श्रद्धाळू रामूच्या मानसिकतेनुरूप आले आहे. पळसगावात पहिल्यांदा प्रवेश केलेल्या आबाच्या बायकोच्या मानसिकतेनुरूप आलेले निसर्गवर्णन पहा, "भातं पिवळी होऊन आडवी पडली होती नि त्यामुळे शेतांना आलेला गुबगुबीतपणा गर्भारशा बाईसारखा दिसत होता. ती स्वत: देशावरची होती. तिथं समोरचं एखादं लहानसं घरसुद्धा क्षितिज झाकून टाकी. पण इथं टेकाडावरुन पाहत असता एकाहून एक उंच चढणारी शेतं, झुडपं, घरं, झाड नि त्यावरही एकमेकीवर डोकावणारे डोंगर, ही क्षितिज आणखी आणखी भव्य करीत होती... पण याहीपेक्षा सर्व गावाच्या डोक्यावर हलणारे झाडांचे शेंडे किती मनोरम दिसतात! खाली रस्त्यावर माणसं वावरतात, तसंच पक्ष्यांचं एक गाव वर वावरत असतं. झुलणाऱ्या फांद्यावरुन रंगीबेरंगी पक्षी इकडून तिकडे होत असतात. मधूनच पाव्हणा आलेला पोपटांचा थवा एक हिरवी गिरकी घेतो. मधूनच एखादी कोकिळा अवेळी ओरडते. कावळ्याचा कर्कश कावकाव सूर येतो...

भाताच्या रोपांवरुन संथ समुद्रासारख्या हिरव्यापिवळ्या लाटा धावत होत्या. गवतं पिवळट रंग घेऊन उभी होती, आणि रंगीत पंखांची फुलपाखरं लपक लपक करीत त्यांच्यावरुन उडत होती. हिवाळा, उन्हाळा, पावसाळा सगळ्या ऋतुतील इथली शोभा तिच्या ह्रदयावर सुंदर चित्र कोरुन गेली होती. मावळत्या सूर्याचे आगळे रंग भरभर बदलताना तिनं इथूनच पाहिले होते. पावसाळ्याला जोर आला की येणारे त्याचे सर्व भाव तिनं अनुभवले होते..."(पृ.७१-७२)

या प्रदेश-निसर्गाचा मानवी जीवनावरील प्रभाव लेखकाने अचूक टिपला आहे. खेडे उद्ध्वस्त होण्यास सरकारचा 'कुळकायदा' कसा जबाबदार आहे हे लेखक पुढील शब्दात वर्णन करतो, "...म्हणजे आम्ही सावकार चोर ठरलो. आमच्या वाडवडिलांनी रक्तानं जमिनी घेतल्या, घाम गाळला आणि आता निघाले हे आमच्या

जमिनी घ्यायला.'' (पृ.२६) जगू-गोविंदांच्या संवादातून 'कसेल त्याची जमीन' या सरकारी धोरणाबद्दल नापसंती व्यक्त होते. कुळांची कुटुंब वाढल्याने जमीनदारांना उत्पन्न मिळेनासे झाले. त्यांच्या जमिनी शेतकऱ्यांच्या मालकीच्या झाल्या. मुळातली ऐतखाऊ सवय असल्यामुळे शेतात कष्ट करणे अशक्य झाले. परिणामी जमीनदारांनादेखील उदरनिर्वाहासाठी उद्योगनगरीकडे धाव घ्यावी लागली. येथे निसर्गनिर्मित किंवा मानवनिर्मित आपत्तीमुळे लोक शहरात गेलेले दिसत नाही. तर शासनाच्या धोरणाचा फटका जमीनदारांना बसला. त्यांना शहरात जाऊन नोकऱ्या करण्याशिवाय पर्याय शिल्लक राहिला नाही.

समाजापुढे पैशापुढे माणुसकी-श्रद्धा यांना किंमत उरली नाही. 'पैशाशिवाय जगात सुख मिळत नाही. तो नसल्यानं किंवा अनाठायी घातल्यानं सगळी दुःख ओढवतात.''(पृ.३१) या नरुच्या उद्‌गारातून परिवर्तनकाळातील पैशाचे महत्त्वच सांगितले आहे. पैशाने अप्रतिष्ठा, शिक्षण, सर्वकाही मिळते. सण-उत्सव त्यातून मिळणारा आनंद हा आजच्या माणसाला नकोसा वाटतो. त्यावरील व्यर्थ खर्च त्यांना परवडत नाही. पसंत पडत नाही.

समाजामध्ये स्वार्थी, मतलबी आणि अनीतीमान माणसांची संख्या वाढली. जसे, शांतीचे जगूशी लग्न जमावे या क्षुद्र हेतूने आबाची बायको प्रयत्न करते. श्रद्धाळू हरिकाका फडणीस शहरातील स्त्रियांशी संबंध ठेवतो. समाजात अप्रतिष्ठा होऊ नये असेच त्यांना वाटते. शहरीकरणाचे वाढते आक्रमणही लेखकाने नरुच्या वर्तनातून सूचित केले आहे. सारवलेल्या ओट्यावर बसताना नरु रुमालाने जागा झटकतो. विमा कंपनीचा एजंट असल्यामुळे तो नवीन केसेस मिळविण्यासाठी लोकांच्या श्रद्धेचा फायदा घेतो. त्यासाठी शिर्डीसारख्या ठिकाणी जाऊन आल्याचे सांगतो. यातून धंदेवाईकदृष्टी वाढत असल्याचे दिसते. त्यापूर्वीचे समूह जीवन नष्ट होऊ लागले. नरहरी देवाच्या उत्सवासाठी सर्व गावकरी जमा होत होते. परंतु ते दिवस नाहीसे झाले. देवापेक्षा पैसा श्रेष्ठ वाटू लागल. कामांध, अतृप्त, स्वार्थी संन्याशांची संख्या वाढली, वृत्तीने नास्तिक असणारे विनूकाका थंडपणाने घराची वाटणी मागतात. पूर्वायुष्यात संबंध आलेल्या 'गोदी'ने झिडकारताच घरदार सोडून चालायला लागतात. संन्याशी असूनही देवांचे त्यांना ओझे वाटते. पुतण्यांनी ते खुशाल हलवावे असे वाटते.

रामूच्या प्रतिकूल आर्थिक परिस्थितीचे वर्णन करताना पैशाकडे पैसा जातो, हे परिवर्तनकाळातील सत्य लेखकाने सांगितले आहे. त्याचप्रमाणे कुळकायद्याचा परिणाम शेतकरी आणि जमीनदारांवरही झाला. भूमिहिनांना मोफत जमिनी मिळाल्या. ऐतखाऊ जमीनदारांना उत्पन्नातील हिस्सा देण्याची गरज राहिली नाही, तर उदरनिर्वाहासाठी जमीनदारांना चाकरमाणे व्हावे लागले. प्रतिकूल परिस्थितीशी त्यांना संघर्ष करावा

लागला. त्यामुळे एकमेकांबद्दलची प्रेम-सहानुभूती नष्ट होऊन संशयी वृत्ती वाढीला लागली. नरहरीचा उत्सव करण्यासाठी आबाचे वडील कर्ज काढायचे. आनंदात उत्सव करत होते. त्यानंतर मात्र कर्ज फेडण्यात वर्ष जायचे व परत उत्सव येत होता. साहजिकच जगू-नरुला उच्चशिक्षण ते देऊ शकले नाही. यातून त्यांची नाराजी वाढली. दोन पिढ्यांमध्ये संघर्ष होऊ लागला. लेखकाने जनरेशनगॅपचे प्रभावी चित्रण येथे केले आहे.

परिवर्तन काळातील संस्कृती ऱ्हासाचे चित्रण केले आहे. काळ बदलतो. परिस्थिती बदलते. जगण्याच्या प्रेरणा बदलतात, त्यामुळे श्रद्धांना तडा जातो. नव्या-जुन्यात संघर्ष सुरू होतो. श्रद्धेने आपले जीवन स्थिर झाले. देव आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे अशी नरहरी देवावर जोशी कुटुंबाची आणि पळसगावातील लोकांची श्रद्धा होती. परंतु आठ पिढ्या एकाच ठिकाणी असलेल्या देवांना हलविण्याची वेळ येते. शहरात गेलेली जोशांची मुलं देव घेऊन जाण्यासाठी येतात. तेव्हा गावकऱ्यांना गतकाळातील उत्सवाचे स्मरण होते. जोशांच्या घरातील उत्सवासाठी अन्य ग्रामस्थांप्रमाणे त्यांचे पाहुणेदेखील जमत होते. तो उत्सव बंद पडतो. शुभमुहूर्त पाहून देव हलविण्याचे ठरते. त्यानिमित्ताने सीताकाकू, रामू, आबा आणि जुने जाणते गावकरी यांना दु:ख होते. तर नव्या पिढीला देव हलविण्याचे काही बिघडते असेही वाटत नाही. आरतीच्या वेळी आबांची मुले सोडून सर्वजण गंभीर होतात. या सर्वांतून जुन्या पिढीची देवावरील श्रद्धा तर नव्या पिढीचा नास्तिकपणा, पुरोगामीपणा दिसतो.

रामू, नरहरे! नरहरे म्हणत देवाला साष्टांग नमस्कार घालतो. देव हलणार या कल्पनेने आबाचा संयम संपतो, तर जगूला देवाच्या आरतीऐवजी लावणी आठवते. सीताकाकू सासूबाईंनंतर पन्नासवर्ष अखंडपणे तेलवात लावते. पूर्वीचे उत्सव, कीर्तनपरंपरा तिला आठवते. आबाच्या वडिलांनी उत्साहाने उत्सव केले. आपण देव नेल्यास देवाची कृपा होऊन आपली गरिबी जाईल असे रामूला वाटते. मुहूर्तावर देव हलवण्याचे ठरल्यावर गावकऱ्यांना उत्सवाच्या आठवणी होऊ लागल्या. देव हलणार याचे दु:ख सर्वांना झाले. यातून समूहभावना दिसते. देवाचा निरोप घेण्यासाठी सर्व गावकरी येतात. लेखक वर्णन करतो, ''या घरातच नव्हे, साऱ्या गावात या नरहरी देवाची प्रतिष्ठा मोठी होती यात शंकाच नव्हती. देवालाही त्याचा अभिमान वाटावा. हिरण्यकश्यपूला मारुन शांत झालेला हा नरहरी होता. त्याच्या नखांत रक्त होतं नि तोंडाला रक्त होतं तरी आता तो शांत झाला होता. पुढचे सर्व अवतार पृथ्वीवर होईपर्यंत त्याला असं शांत राहायचं होतं...''(पृ.५३-५४)

स्वप्न, भविष्य यावरील लोकविश्वासाचे चित्रण केले आहे. हरिकाकांच्या स्वप्नामध्ये रामूचे वडील येतात आणि देवांच्या खाली मोहरांचे दोन हंडे पुरलेले आहेत, ते रामून घ्यावे असे सांगतात. म्हणजे गुप्तधनावरील ग्रामीण जनतेचा विश्वास यातून व्यक्त

होतो. जुन्यापिढीला देव श्रेष्ठ वाटतात. तर नव्या पिढीला 'पैसा' हाच देव वाटतो. प्रत्येकाचा देव वेगळा आहे, हे पळणीटकरांच्या आजींच्या उद् गारातून स्पष्ट होते. नरु सारखा तर देव बदलण्याची कल्पना करतो. कादंबरीच्या शेवटच्या प्रकरणामध्ये लेखकाने श्रद्धाळू ग्रामस्थांचे समूहचित्र रेखाटले आहे. करुण स्वरात ग्रामस्थ आरती करुन देवांना निरोप देतात. नव्या जुन्या पिढीतील संघर्ष यातून दिसतो. सर्वांचे डोळे भरुन येतात. चेहरे उतरतात, परंतु आबाच्या मुलांवर त्यांचा काहीच परिणाम होत नाही. त्यांचे देवाशी भावनिक नाते निर्माण न झाल्यामुळे मुले खेळकरपणे वागत होते.

कादंबरीच्या निवेदनाची भाषा प्रमाणभाषा आहे. संवादासाठी प्रमाणभाषा आणि बोली यांची सरमिसळ केलेली आहे. तरीही एकूणच कादंबरी प्रमाणभाषेकडे झुकलेली दिसते. 'पॅराशूट टाकून विमान वेगानं पुढे जावं नि मोठ्या आकाशात एकाकी सैनिक लोंबकळत राहावा तसं रामूला वाटले.' किंवा शेतानं आलेला गुबगुबीतपणा गर्भारशा बाईसारखा दिसत होता' इत्यादी उपमा प्रतीमा अपवादानेच आलेल्या दिसतात.

भाग 'ब'

# स्वातंत्र्योत्तर काळातील पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप

## १. आनंद यादव

आनंद यादवांच्या 'एकलकोंडा' (१९५९), 'गोतावळा' (१९७१), 'नटरंग' (१९८०), 'झोंबी' (१९८७), 'नांगरणी' (१९९०) आणि 'घरभिंती' (१९९२) या ग्रामीण-प्रादेशिक कादंबऱ्यांनी मराठी कादंबरी इतिहासात आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. पुस्तकरुपाने १९८० मध्ये प्रकाशित झालेली 'एकलकोंडा' ही शिक्षणासाठी धडपडणाऱ्या आणि शिक्षण घेऊनही बेकारीच्या खाईत पडलेल्या एका ग्रामीण तरुणाची ससेहोलपट चित्रित करणारी कादंबरी आहे. परंपरागत ग्रामीन जीवन उपयोगितावादी यंत्रसंस्कृतीच्या प्रभावाने हळूहळू उद्ध्वस्त होत आहे, हा 'गोतावळा'चा विषय आहे. तमाशाच्या ध्यासापायी जीवन उद्ध्वस्त झालेल्या गुणा या तमाशा कलावंताची शोकांतिका 'नटरंग'मधून चित्रत होते. तर 'झोंबी', 'नांगरणी' आणि 'घरभिंती' या आनंद यादवांच्या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या आहेत. 'माऊली' ही प्रतीकात्मक कादंबरी आहे.

ग्रामीण जीवनातील परिवर्त आणि यांत्रिकीकरणाचे भविष्य वर्तविणारी आनंद यादवांची 'गोतावळा' १९७१ मध्ये प्रसिद्ध झाली. ट्रॅक्टरच्या आगमनाची सूचना देऊन 'नारबा'सारख्या शेतमजूर सालगड्याचे भावविश्व कसे उद्ध्वस्त होते हा या कादंबरीचा विषय आहे. माणाच्या प्रेमाला पारखा झालेला एकाकी नारबा प्राण्यांवर प्रेम करतो. त्यांच्या नीरस कंटाळवाण्या जीवनाला तोच विरंगुळा असतो. कारण स्त्री-सुखापासून मालकाने त्याला वंचितच ठेवलेले असते. तरीही आज ना उद्या आपले लग्न मालक करुन देईल या आशेवर तो जगतो. कोल्हापूरच्या पाहुण्याने दिलेल्या सल्ल्याने रामू सोनवडा आधुनिक विचारांनी प्रभावित होतो. शेतीचा धंदा करावा असा त्याच्या वृत्तीत बदल होतो. नारबाने वीस वर्षे जतन केलेला 'गोवतावळा' (गाय, बैल, म्हेस, कुत्रे, कोंबडा, घोडा-झाडेझुडपे) नष्ट होऊ लागतो. मालकाला ट्रॅक्टर आल्यानंतर नारबाची गरज वाटत नाही. त्याला ''वाट धरण्यास'' सांगितले जाते. यंत्रयुगाच्या प्रभावाने मानव-निसर्गाच्या संबंधावर आघात होऊन शेतमजूराची कशी वाताहत होते हेच लेखकाने नारबाच्या आत्मनिवेदन, स्वगत पद्धतीने बोली भाषेतून सांगितले आहे.

'नारबा' हा गोतावळाचा नायक आहे. त्याचप्रमाणे रामू, सोनवडे, त्याची बायको मालकीण, गंग्या, सित्या, विकास, हिंदूराव, सावित्री आणि ड्रायव्हर व पाव्हणा या

गौण व्यक्तिरेखा आहेत. सोन्या-चाण्ण्या, ओपाला आलेली पाडी, नाग्या, वाघ्या बैल, राम्या-भिम्या रेडे, म्हालिंगा बैल, चंपी कुत्री, म्हारुत्या घोडा, कोंबडा, कोंबडीची पिल्लं, राजा कुत्रा, कासव, शेळीची बकरं आणि इतर पशूपक्षी, झाडझुडपे ही नारबाचा गोतावळा आहे. नारबाच्या भावविश्वात या सर्वांना महत्त्वाचे स्थान आहे. रामू सोनवडे, ड्रायव्हर, पाव्हणं हे खलनायकासारखे वागतात. त्यांच्यामुळे नारबाचे भावविश्व उद्ध्वस्त होते.

'नारबा' पारंपरिक कृषिसंस्कृतीचा प्रतिनिधी आहे. वयाच्या पाचव्या वर्षी वडील आणि चौदाव्या वर्षी आई गमावलेला, बहिण-भाऊ, काका, मामांच्या मायेची ऊब नसलेला पोरका नारबा वयाच्या पंधराव्या वर्षापासून पुढे वीस वर्ष रामू सोनवड्याच्या शेतावर राबतो. अडाणी, हतबल, अगतिक, नारबा प्रतिकूल परिस्थितीला सामोरा जातो. मायेचा भुकेला असल्यामुळे माणसांकडून न मिळणारे प्रेम तो प्राण्यांकडून मिळवितो. जनावरांच्या सहवासात स्वत:ला विसरण्याचा प्रयत्न करतो. स्त्रीसंगाची उणीव निसर्गसंगाने भरत असताना त्याचे भावविश्व उद्ध्वस्त होते. भाबडा, एकाकी, अज्ञानी, नव्या दृष्टिकोनापासून दूर असलेल्या नारबाला मालक आणि पाव्हणा यांच्यातील चर्चा धड समजत नाही. पण प्राणिमात्राबद्दल त्याला सहानुभूती वाटते, म्हणूनच शेळीचे किंवा नाम्या कुत्र्याचे दु:ख तो समजू शकतो. उन्हाच्या वेळी रेड्याच्या अंगावर पाणी घालतो. ओपावर आलेल्या पाडीवर सोन्या-चाण्ण्याला सोडतो. एकाकी कोंबडा-कासव, घोडे यांचे दु:ख समजू शकतो. स्त्री सहवासात अतृप्तीचे दु:ख त्याला होत असले तरी तो विकृत नाही. ओपाला आलेल्या पाडीकडे बघून बैल नसल्याची खंत तो व्यक्त करतो. व्यवहारी मालकाच्या विरुद्ध तो आवाज उठविताना दिसत नाही. निरागसता हा त्याच्या व्यक्तीमत्वाचा खास पैलू आहे. पावसाळ्यात माळावर गुरे राखताना मुलांबरोबर तो आग्या मोहळाला दगड मारतो, यातून त्याचा खेळकरपणा-खोडकरपणाही दिसतो. तो मनाने सनातनी, अंधश्रद्धाळू, आणि पुराणप्रिय आहे. टिटवीचा आक्रोश, घुबडाचे ओरडणे, म्हासोबाला फोडलेल्या नारळाचे तीन तुकडे होणे हे त्याला अशुभ सूचक वाटते. त्याचे मन हळुवार विलक्षण संवेदनाक्षम आहे. प्राण्यांच्या जगाबद्दल त्याला कुतूहल वाटते. टिक्की म्हैस मालकाला धारा काढू देत नाही. पक्षी माणसाजवळ येत नाही. प्राण्यांजवळ जातात. माणसांपेक्षा जनावरे बरी कारण ती 'येळवखत' पाहतात असा त्याचा अनुभव आहे. साधे गवत त्याला 'रानावर हिरवी साय आल्यागत' वाटते. झाडावर बसलेले कावळे त्याला छत्री फाटल्यासारखे दिसतात. यातून त्याची रसिकता दिसते. चाण्याला मारले म्हणून तो ड्रायव्हरला शिक्षा करतो. त्याबद्दल मालकाचे बोलणे खातो. असा जनावरांवर, पिकांवर आणि पक्ष्यांवर प्रेम करणारा नारबा पारंपरिक कृषी जीवनातील शेतमजूराचा प्रतिनिधी आहे. सित्या-गंग्या हे देखील नारबाप्रमाणे शेतमजूर आहेत.

रामू सोनावडे हा मुळातील सज्जन प्रवृत्तीचा आहे. 'शेतकऱ्याला हिशोब ठेवून कसं हो भागंल? उघड्यावरचं रान हे. काळ्याईत घातलेला पैसा कुठं जाणार हाय व्हो?'' (पृ.३) असे तो पाव्हण्याला म्हणतो. यावरुन तो 'जमिनीला काळीआई समजणाऱ्यांचा प्रतिनिधी आहे. परंतु कोल्हापूरच्या पाव्हण्याने दिलेल्या व्यवहारी सल्ल्यामुळे अधिक उत्पन्न मिळविण्याची त्याला हाव सुटते आणि पुढे काळ्या आईला तो 'दायी' समजू लागतो. मतलबी, हिशोबी, व्यवहारी बनतो. दुष्ट नसलेला मालक क्रूर बनतो. आपल्या वागण्याचे लटके समर्थन करतो. उदा. ओपाला आलेल्या पाडीवर चाण्या बैल सोडण्यास नकार देतो, ''... पर तसं केल्यावर वासरु चांगले निपजणार नाही याकडे त्याचे लक्ष आहे. प्रत्येक गोष्टीचा तो पैशात हिशोब करतो. भावनांना त्याच्याजवळ जागा नाही. उदा. आंधळा म्हारुत्या घोड्याचा मृत्यु, म्हाताऱ्या म्हाळींग्या बैलाची विक्री, कोंबड्याचा डवरा, झाडी-पिंपळ तोडणे, नारबाला वाट धरण्यास सांगणे, गाय पांजळपोळात सोडणे, गंग्या सित्यावरील अविश्वास या साऱ्या घटनाप्रसंगातून व्यवहारी, धूर्त, हिशोबी मालक लेखकाने जिवंत केला आहे. यंत्रसंस्कृतीच्या प्रभावाने झपाटलेला आत्मकेंद्री, निष्प्रेम आणि माणुसकीहीन रामू सोनवडे लेखकाने नारबाच्या विरोधात जिवंत केला आहे.

पाव्हणा हा ट्रॅक्टर विक्रेता आहे. कमिशनवर डोळा ठेऊन रामू सोनवड्याला तो व्यवहार सांगतो. ट्रॅक्टरचे महत्त्व पटवून देतो. झाड आणि जनावरांची निरर्थकता पटवून देतो. शेती धंदा म्हणून करायला सांगतो. गायमाय आणि काळीआई बिळीआई हे विसरण्याचा सल्ला देतो. कृषी संस्कृतीत निसर्ग व शेतीशी निगडित असलेल्या प्राण्याविषयी माणसाला वाटणारी आत्मीयता तो समजू शकत नाही. यांत्रिक संस्कृतीचा दूत असलेल्या पाव्हण्याचे लेखकाने प्रारंभीच चित्र रेखाटले आहे.

''...उच्चच्या उच्च, त्येची सावली माळावर लांबपतोर गेलेली, अजून तसाच नाळ-रोगी, व्हटांवरच्या मिशा काढलेला, भुंडा. पायात पट्ट्यापट्ट्याचं कसलं तरी चप्पल. हातपाय बारक्या पोरागत बिनकामानं मऊमऊ दिसतेलं, चुन्यात बुडविल्यास पांढरीधोट कापडं, ... पांढऱ्या कापडास्नी बघून जनावरं भुजली नि समदी दावणच्या दावण कावरीबावरी होऊन हुबी ऱ्हायली.'' (पृ.१) पावण्याची काळी सावली मळ्यावर पडली आणि जनावर बुजली यातून लेखकाने पारंपरिक कृषी संस्कृतीचा होणारा ऱ्हासच सूचित केला आहे. मिशा काढलेला हा पाव्हणा उपरा आहे. या संसकृतीतील नाही तर स्वार्थी आहे. ड्रायव्हर देखील उपरा आहे. ''डुईला तेल लावलेला नि गळ्यात तांबडा भडक रुमाल बांधलेला काळा मिचकूट'' (१३५) तो ट्रॅक्टर घेऊन आला आणि 'तवर समदी खोप हदराय लागली'(पृ.१३४) या वर्णनातून पारंपरिक कृषी जीवनाला हादरा बसल्याचे सूचित केले आहे. मालकांना कुशल कामगाराच्या कलाप्रमाणे वागणे भाग असल्यामुळे नारबासारख्याला वाट धरायला सांगितले जाते.

शहरी माणसाच्या ठिकाणी जाणवणारी आपमतलबी, स्वकेंद्रित वृत्ती ड्रायव्हरच्या ठिकाणी आहे. नारबाच्या वाट्याची भाकर तो एकटा खाऊन टाकतो. शेतमजूर आणि जनाविरांविषयी त्याला प्रेम वाटत नाही. तो विलक्षण स्वार्थी आहे. डॉ. वासुदेव मुलाटे ड्रायव्हर आणि पाव्हणा यांचयाविषयी म्हणतात, "या शहरी माणसांच्या वृत्ती बदलत्या ग्रामीण जीवनात आपमतलबीपणाचे, स्वार्थीवृत्तीचे विष पेरणाऱ्यांच्या आहेत."७२. हे विधान यथार्थ वाटते. कारण स्वत:च्या फायद्यापलीकडे दोघांनाही वेगळे काही दिसत नाही. पाव्हण्याचा डोळा दलालीवर तर ड्रायव्हरचा डोळा मालकाकडून मिळणाऱ्या पगारावर आहे. दोघेही ग्रामीणसंस्कृतीत उपरेच आहेत. सुशिक्षित पाव्हणा, ड्रायव्हर हे नव्या ग्रामीण संस्कृतीचे प्रतिनिधी आहेत. तर नारबा परंपरागत संस्कृतीतील मजुरांचा प्रतिनिधी आहे.

जनावरे आणि पशूपक्षांनाही लेखकाने जिवंत साकार केले आहे. अरविंद वा. कुलकर्णी म्हणतात, "नारबाचा हा सारा गोतावळा तसा मुका आहे. म्हणजे शब्दांच्या आधारावर तो स्वत:ला व्यक्त करु शकत नाही. यादवांनी लेखकाला मिळू शकणारे स्वतंत्र्य सोडून यां गुराढोरांचा मुकेपणा जसाच्या तसा स्वीकारलेला आहे. पण मोठ्या कौशल्याने त्यांनी प्रत्येक ढोराला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व दिलेले आहे."७३. गाय, बैल, रेडे, कासव, म्हैस इत्यादीना गोतावळ्यात स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहेच. पण यादव 'गिधाडा'चे वर्णन करतात, "गुडघ्यापतोर पांढऱ्या पिसांची चड्डी, अंगावर इनामदारांचा पावसाळी दांगडगा कोट" (पृ.५३) या वर्णनातून गिधाडाचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व चित्रित होते. "राघवाच्या पिल्लाला नुकतीच हिरवी पंख्खं फुटावीत तसं दिसत हुतं." (पृ.५६) या वर्णनाने माळही जिवंत केला आहे. डॉ. एस.एस. भोसले या संदर्भात लिहितात, "गोतावळा"ला तशी कथा नाही. कथावस्तु नाही, ते आहे एक सम्यक समूहचित्र. रामू सोनवडा, नारबा, सित्या, शिवलिंग, महालिंग, सोना नी चाण्ण्या, नाम्या, वाघ्या, चंपी म्हारुत, राजा ही काही माणसे आणि जनावरे. त्यांच्या परस्पर भावसंबंधाचे 'गोतावळा' हे समूहगान आहे. त्यामध्ये नारबा एक पूल आहे. केंद्रस्थानी आहे. पण तो त्या 'नायक' असेच काही नाही."७४. हा अभिप्राय नारबाला केंद्रस्थानी मानणारा आणि समूहगानाला महत्त्व देणारा आहे. याचेच काहीसे अधिक स्पष्टीकरण स्वत: लेखकाने एका मुलाखतीत केले आहे, "'गोतावळा' कादंबरी लिहितानाही मी लक्षावर अशी पकड ठेऊन होतो. शेतमजुरांचे दैनंदिन जीवन चितारणारी ही कादंबरी, तिच्यात मूक प्राणी आले आहेत. त्या प्राण्यांचा केविलवाणा आक्रोश मला त्यांच्या वृत्तीप्रवृत्तीसह बोलका करायचा होता. हे पुष्कळसं अवघड होतं. तथापि 'गोतावळा'त प्राण्यांना बोलकं करण्याच्या बाबतीत मी यशस्वी झालो असं मला वाटतं."७५. हे लेखकाचे मनोगत सर्वांनीच मान्य करण्यासारखे आहे.

कागल-कोल्हापूर जवळील एका खेड्याची भौगोलिक पार्श्वभूमी प्रस्तुत कादंबरीला

लाभली आहे. या प्रदेशातील विविध पिके, झाडी, पशुपक्षी यांचे लेखकाने वर्णन केले आहे, "खळ्याच्या भवतीनं उसाचं वाहलेलं वाडं, नदीची गवतं, कडबा, शेंगांचं याल, तुरीचं कोडं, तुरकाड्या पडल्या हुत्या." (पृ.१) हे पिकांचे वर्णन तसेच लिळिंबीचे झुडप, घाणीरडं, करंजीची हिरवी झाडं, उंबर, चिंच, पिंपळ, वड इ. वृक्ष आणि घुबड, कोल्ही, वांदरे, मुंगस, चित्तूर, मोर, टिटवी इ. पशू-पक्ष्यांचा उल्लेख यातून 'प्रदेश' टिपता येतो. तर "भात काढून थोडं आडसाली माळवं केलं हुतं. ऐन वक्ताला माळवं तालुक्याच्या बाजाराला न्हेऊन पैसं करायचा मालकाला नाद लागलेला. माळव्याच्या आवडात काटं-वाळकं, भेंड्या, दोडकं नि वांगी भराला आली हुती." (११८) हे माळवं खाण्यासाठी डोंगरावरुन उतरणारी वांदर नारबाला दिसतात. माळरान, डोंगर, मळा, आणि तळं, नदी, विशिष्ट पीके यांच्या वर्णनातून प्रदेश जिवंत होतो. या प्रदेशातील निसर्ग एक पात्र म्हूनच आलेला दिसतो. कृषी जीवनात ऋतुचक्राला विशेष महत्त्व असते, त्या रंग बदलणाऱ्या ऋतुचे स्वाभाविक वर्णन लेखकाने केले आहे. ही निसर्गवर्णने नारबाच्या मानसिकतेनुरूप रेखाटलेले आहेत. निसर्ग म्हणजे केवळ गोचर वनस्पतीसृष्टी नव्हे. तर ह्या सृष्टीशी संपूर्णपणे एकरुप झालेली जीवसृष्टी. हा निसर्ग म्हणजे केवळ गोचर वनस्पतीसृष्टी नव्हे. तर ह्या सृष्टीशी संपूर्णपणे एकरुप झालेली जीवसृष्टी. हा निसर्ग सर्व रंगछटांसह व्यक्त झाला आहे. पाऊस आणि कृषिजीवन यांचा अन्योन्य संबंधाचे दर्शन घडविणारे निसर्गवर्णन पहा.

"...आभाळात वांझ ढग आलेलं. अजूनबी वावटुळ न्हाई का वादळ न्हाई... कुठं गेला असल ह्यो पाऊस? आता लागयचा कवा नि पेरण्या हुयाच्या कवा? वैरणीचा तुटवडा पडत चाललाय... पिकाला पाणी तर अजिबात न्हाई. चाळीस चिरं पाणी प्यायचं तिथे आता आठ चिरसुदीक पीना झाल्यात. पाटातनं पाणी उसाला येईस्तवर हिरीतलं पाणी संपतय... आतापतोर जीव जतन केल्यागत ऊस. त्योबी वाळून चाललाय... पड बाबा एकदा. फुड कवातरी वड खा वाटलचं तर. खर असा दुष्काळ नगं पाडू..." (पृ.३३) उन्हाळा-दुष्काळाच्या वर्णनाप्रमाणे पावसाळ्याचे वर्णन (पृ.९२-९३) देखील लोकजीवनावर प्रभाव गाजविणारे असेच आहे.

ट्रॅक्टरच्या नादात असलेला मालक रेड्यांना ओली वैरण घातल्याबद्दल नारबावर रागावतो. यावेळच्या निसर्गाच्या गडद चित्राबरोबरच नारबाची व्यथा स्पष्ट होते, "माळ्यावर काळुख पसरत चाललं हुतं. पांदीपलीकडचा बुरुज मुंडकं तोडलेल्या धुडासारखा दिसत हुता. काळूखं पडल तसा त्यो फुडफुडच सरकल्यागत वाटत हुता. येणारं काळूखं अंगावर घेत ढोरं गपगार डोळं झाकून हुबी हुती. लिंबाऱ्यावर पैलं घुबाड घुमलं नि मी एकटाच दुपारी तुटलेल्या नाड्याचं एटाक चिलबिलत बसतो." (पृ.७-८)

ओपाला आपलेल्या पाडीच्या आणि अतृप्त सोन्या-चाण्यांच्या आकर्षणाप्रमाणे नारबाच्या अतृप्त, उदास भावस्थितीस पोषक निसर्गवर्णन पहा.

"चांदणं टिप्पूर, रात मधासाला आलेली. माळावरच्या पिपळावरची घुबडं वरडत कुणाची वाट बघतेली.". (पृ.१४) नारबाच्या भावविश्वातून आकारास आलेली निसर्गवर्णने पाहण्यासारखी आहेत. उदा. पृ.२६,३४,३९,१००, १३३ हे सर्व निसर्गचित्र सर्व रंगछटांसह ऋतुमानानुसार रंग बदलणारी निसर्गवर्णने नारबाच्या भावस्थितीनुरुपच आलेली आहेत. नारबाचे भावविश्व उद्ध्वस्त होत जाते, त्यानुसारच निसर्गवर्णने आल्यामुळे ती उपरी, कृत्रिम वाटत नाहीत. येथे निसर्गही एक पात्र म्हणून सजीव झाला आहे.

परंपरागत ग्रामीण समाजव्यवसथेमध्ये गावगाड्याला अत्यंतिक महत्त्व होते. या गावगाड्यात शेतकरी प्रमुख घटक असला तरी पाटील, कुलकर्णी, बलुतेदार, अलुतेदार, हे घटकही महत्त्वाचे होते. त्यांनाही शेतीच्या उत्पन्नातील वाटा मिळत होता. त्या मोबदल्यात शेतकऱ्याला बलुतेदार हव्या असणाऱ्या वस्तू तयार करुन देत होते. वस्तूविनिमयाची पद्धती रुढ होती. त्यामुळे शेतकरी आणि इतरांमध्ये आत्मीयतेची, प्रेम व जिव्हाळ्याची भावना नष्ट होऊ लागली. स्वार्थी व हिशोबीपणा वाढला. उपयुक्तवादी दृष्टीकोन आला. यंत्रयुगात शेतमालक आणि शेतमजूर असे दोन वर्ग निर्माण झाले. यंत्राने शेतीची अनेक कामे होऊ लागल्याने शेतमजूर-बलुतेदारांचे रोजगार नष्ट झाले. शोषक शेतमालक श्रमजीवी शेतमजुरांचे शोषण करु लागले. यंत्रयुगाच्या प्रभावाने शोषित शेतमजुरांचे जगणेच कवडीमोल ठरले. शहरी यंत्रसंस्कृतीने ग्रामांचे शोषण करण्यास सुरुवात केली. खेड्यातील पैसा शहरात जाऊ लागला. त्यामुळे परंपरागत समाजव्यवस्था खिळखिळी झाली.

कादंबरीमध्ये लेखकाने ट्रॅक्टरच्या आगमनाची सूचना कादंबरीच्या पहिल्याच प्रकरणात दिली आणि शेवटी ट्रॅक्टर आल्याचे वर्णन केले. रामू सोनवड्याच्या शेतावर राबणाऱ्या नारबा आणि त्याच्या गोतावळयचे म्हणजे जनावरांचे महत्त्व संपले? त्याबरोबर शेतावर पोट अवलंबून असणाऱ्या बलुतेदारांचा रोजगार नष्ट झाला. नारबाचा गोतावळा नष्ट झाला. त्याचे भावजीवन उद्ध्वस्त झाले. मालकाच्या शेतावर बैलागत वीस वर्ष राबणाऱ्या नारबा, गंग्या, सित्या आणि जनावरांच्या अस्तित्वाचाच प्रश्न ट्रॅक्टरच्या आगमनाने निर्माण झाला. डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात त्याचप्रमाणे, "ट्रॅक्टरच्या आगमनाने पूर्वी मशागतीत नसलेली जमीन ही मशागतीत आणता येते. परंतु नांगरणीच्या वेळी शेतातील झाडे-झुडपे, बांध, डगरी, वारुळे इत्यादी नष्ट झाल्याने निसर्गाचा जो समतोल राखला जात होता तो नष्ट होऊन त्याचाही विपरित परिणाम शेतीवर होऊन पुन्हा शेतीचे उत्पन्न घटण्याची शक्यता निर्माण झाली आणि पर्यावरणाचा एक नवाच प्रश्न आपले उग्र रुप धारण करीत

असलेला दिसतो. याशिवाय गुराखी पोरे, शेतातील जनावरे, झाडा-झुडपांवर वस्तीला असणाऱ्या पाखरांच्या विसाव्याची ठिकाणे नष्ट झाली.''७६. शेतमजूर आणि पशू-पक्ष्यांच्या अस्तित्वाचाच प्रश्न तसाच पर्यावरणाचा प्रश्न नव्या यंत्रसंस्कृतीच्या प्रभावाने निर्माण झाल्याचे डॉ. मुलाटे यांचे विवेचन सार्थ वाटते. कारण 'गोतावळा' नारबाची दैनंदिनी आहे. त्यावर आघात होतो तेव्हा तो म्हणतो, ''...मोटा हुत्या तवा मला पाटंपासनं गजबजायचं! चाण्णी अगवाय उठायचं. मी उठलेला बघून ढोरं आईमागनं लेकरं उठल्यागत चटाचट उठायची. त्यास्नी वैरणी टाकायच्या. माझी शेणंघाणं भरायची गडबड नि ढोरांची गपागपा वैरणी खाऊन मोटलां जायाची गडबड. दिसाचा गोंडा म्हवराय मोटांची झुम्मड, चाकाचं नाद, लावण्या, हिकडंतिकडं मारलेल्या हाका... असा मळा रामपाऱ्यातच उठून देवाचं नाव घेत उद्योगाला लागलेला. एखादा चिरा प्याला की मग दिसाचं उगवणं. पाटाच्या पाण्यात किरणाच्या आंधूळी.'' (पृ.१३७) स्वाभाविक कृषिजीवनावरच यंत्रसंस्कृतीने आघात केला.

कादंबरीची सामाजिक पार्श्वभूमी स्पष्ट करताना डॉ. मदन कुलकर्णी लिहितात, ''गोतावळाकरांनी रामू सोनवडा शेतीसाठी ट्रॅक्टर आणतो या घटनेने 'नारबा' सारख्या प्राणिसृष्टीच्या सान्निध्यात वास्तव्य करणाऱ्या सामान्य व्यक्तीचे भावजीवनच उद्ध्वस्त होते हे दाखविले आहे. बैलांच्या सहाय्याने शेती करणारा रामु सोनवडा एवढा यंत्रमुग्ध होतो की, अनेक वर्षे ज्या प्राण्यांच्या व नारबाच्या आधाराने तो शेती करतो त्यांच्याविषयीही त्याला आत्मीयता वाटत नाही. आधुनिकीकरणाच्या विज्ञाननिष्ठ साधनांनी ग्रामीण समाजाचे जीवनच ढवळून निघत आहे.''७७. या अकुशल शेतमजुरांचे जगणेच धोक्यात आले. सित्या, गंग्या आणि नारबाचे आणि बलुतेदारांचे जीवन धोक्यात आले. त्यांच्यावर उपऱ्या ड्रायव्हरचे वर्चस्व वाढले. 'दिल्या दामाचे आणि सांगितल्या कामाचे' असे अपमानित जीवन ते जगू लागले. नारबा आपली व्यथा बोलताना म्हणतो,

''...सित्या, गंग्या यायचं बंद होऊन आजचा पाचवा दीस. परवा दिशी मोटवाणीच्या गळ्यातला नाडा, सोंदूर, काढून तिला न्हवरा मेलेल्या बाईगत केलेलं. नाडा-सोंदूर, चाक-कणा, शिवाळ-नाडा, समदं खोलीत आणून, मुरगळून खोपड्याला रचलेलं. मोटा पार आत आणून, बाजूला अंधारात टांगण्याला टांगलेल्या. आता त्यास्नी कवा तरी उंदरं कुरतडणार. भिंगरीसारख्या फिरलेल्या मोटा आता कायमच्या बंद.

''...आता माझं तोंडबी बंद. नुसतं. ड्रायव्हरच्या हाताबुडी. त्यो सांगंल तेवढंच करायचं... 'नाऱ्या कर'

नाऱ्यानं करायचं. 'नाऱ्या उठ' नाऱ्या उठायचं, 'नाऱ्या बस', नाऱ्यानं बसायचं. समदं ड्रायव्हर म्हणलं तसं... चाण्याचा एकच पाय मोडला, पर माझं आता हात नि पाय दोन्हीबी काढून घेटलं जाणार... नाऱ्या बंद.'' (पृ.१४१) याचा अर्थ असा की

मोट, नाडा आणि नाऱ्या बंद म्हणजे पारंपरिक गावगाडाच उखडला गेला. ग्रामीण समाजजीवन ढवळून निघाले. बलुतेदारांचा रोजगार बंद झाला. शेवटी तर "सोसवत नसलं तर तुझी तू वाट धर." (पृ.१४०) असे मालक सांगतो, आधुनिकीकरणाच्या प्रभावाने ग्रामीण समाज जीवनात झालेला बदल डॉ. र. बा. मंचरकरांनी 'गोतावळा' संदर्भात नोंदविला आहे. "जीवनसृष्टीने गजबजलेली आणि भावनात्मक अंगाने जोपासलेली पारंपरिक शेती मनाला गारवा देणाऱ्या भावनांकडे पाठ करुन यांत्रिकीकरणाने समृद्धीकडे जाणारी आजची शेती यांच्या संक्रमणाच्या पाऊलखुणा या शोकांतावर उमटल्या आहेत. शेतीविषयक जुन्या श्रद्धा आणि नवी दृष्टी यांच्या संघर्षात डळमळणारे ग्रामीण भावविश्व नारबाच्या रुपाने व्यक्त होते."७८. भावनेपेक्षा यंत्रयुगात पैसा श्रेष्ठ ठरला. यंत्रयुगात हरितक्रांतीच्या प्रभावाने सर्वत्र वस्तूचे पैशात रुपांतर करण्याची प्रचंड हाव सुटली. जनावर निरुपयोगी म्हणून विकणे, वृक्ष तोड करणे यातून पारंपारिक कृषिसंस्कृतीच्या भीषण ऱ्हासाची सूचना कादंबरी देते. जीवनमूल्ये बदलली. शेती किफायतशीर कशी होईल याचा विचार होऊ लागला... अधिक समृद्धीचे विचार होऊ लागले. रासायनिक खतांचा आणि सुधारीत बी-बीयाणांचा वापर होऊ लागला. श्रमिक शेतमजुरांच्या भावनेची कदर करण्याची आवश्यकता वाटेनाशी झाली.

भारतीय शेतमजूर अधिक सोशीक, सहिष्णू आणि सौजन्यशील स्वभावाचा आहे. मालकावर तो चिडतो, रागावतो. हे त्याचे वर्तन स्वार्थासाठी नसते, तर मालकाच्या शेतावर आणि जनावर-पिकांवर त्याचे प्रेम असते म्हणून. बेंदूराच्या दिवशी म्हालिंग्या बैलाला अंडे देण्यास मालक विरोध करतो, तेव्हा नारबा त्यांचा विरोध मोडून काढतो. असे असले तरी मालकाविरुद्ध तो विद्रोह कधीच करीत नाही. नारबा संयमी, सहिष्णु आहे. अपवादाने तो ड्रायव्हरवर चिडतो.

समाजव्यवस्थेमध्ये श्रमिक-उत्पादकांचा-कष्टकऱ्यांचा एक वर्ग आहे. त्याचप्रमाणे अनुत्पादक परोपजीवींचा दुसरा वर्गही आहे. नारबा, गंग्या, सित्या इत्यादी कष्टकरी किंवा गायी, म्हशी, बैल, रेडे इत्यादी उपयुक्त प्राणी हे उत्पादक वर्गाचे प्रतिनिधी आहेत. तर रामू सोनवडे, पाव्हणा, कोल्हे, वानर, गाढव आणि पक्षी हा अनुत्पादक परोपजीवींचा दुसरा वर्ग आहे, याची जाणीव प्रस्तुत कादंबरी अभ्यासताना होते. या संदर्भात प्रा. या. वा. वडस्कर म्हणतात, "पाव्हण्याचे हातपाय बारक्या पोरागत बिनकामानं मऊ मऊ दिसतेलं." म्हणजे हा शहरी माणूस श्रमिक वर्गातला नसून बांडगूळ दलाल वर्गातला आहे. मालक, दलाल व श्रमिक असे तीन वर्ग या ठिकाणी एकत्र आलेले आहेत...

कुठल्याही संस्कृतीमधील दलालवर्गाप्रमाणेच हा 'पाव्हणा' सुद्धा शुद्ध उपयुक्ततावादी आहे. विषम समाजव्यवस्थेतील या वर्गाच्या सगळ्या जीवननिष्ठा आपले कमिशन वसूल कसे होईल, या एकाच मुद्याशी येऊन भिडणाऱ्या असतात. ट्रॅक्टर घेण्यास

पुरेसा पैसा नाही, असे मालक सांगतो. तर हा गडी मालकाला 'जनावरे विका, झाडे विका, कर्ज घ्या' असे सुचवितो! धंदानिष्ठ दलाल-तत्त्वज्ञान या पाव्हण्याच्या तोंडून अनेक प्रकारे कादंबरीत अभिव्यक्त होते.''७९. असे या कादंबरीतील वर्गीय-नाट्याचे स्वरुप प्रा. वडस्करांनी स्पष्ट केले आहे, मालकाचे जीवनविषयक तत्त्वज्ञान उपयुक्ततावादी-हिशेबी नफ्याचे आहे. आक्रमक शहरी यांत्रिक संस्कृतीकडून समृद्ध आणि संस्कृतीचा विनाश होतो एवढाच कादंबरीचा विषय नाही, तर धनिक अधिक श्रीमंत होतात. कष्टकऱ्यांवर उपासमारीची वेळ येते. स्वार्थापोटीच मालक नारबाचे लग्न करीत नाही. कारण लेकुरवाळा माणूस कुटुंबात जरा जास्त गुंतून राहतो. कामाकडे त्याचे काहीसे दुर्लक्ष होते. म्हणून त्याला अविवाहितच ठेवले जाते. 'फैना' पोरगी बघण्याच्या आश्वासनावर नारबाला झुलवत ठेवले जाते. तेव्हा नारबाच विचार करतो, सित्याने लग्न केले. नारबा स्वत:चे लग्न करु शकत नाही. तो त्याची व्यथा मांडतो,

''...मला तसं कुठलं कराय येईल? ह्या गावात मला ना घर ना दार. मळ्यातच ऱ्हावं लागणार. पोराबाळांचा माझा संसार मालकाला कुठला आलाय परवडायला. लगीन झाल्यावर माझी बायकू पोरं माझ्याजवळच ऱ्हाणारं. मी एकटा राबणारा नि पाचसा माणसं खाणार. रानात माळवं उरणार न्हाई, जळाण उरणार न्हाई का शेणी उरणार न्हाईत. पिकातलं पीक हळूहळू कमी हुणार. मालकाला हे परवडणार कसं?... शेरडा-म्हसरांची पिल्लावळ इकाय येती. माझी पोरबाळं का मालकाला इकाय येणार हाईत? आता मी एकटाच खातोय नि एकटाच राबतोय तेच त्येला बरं हाय... असा इचार केल्याबिगर मालकाला ट्याक्टर तरी कुठला घ्यायला येईल?... मी कामाचा बैल. मला असाच ठेवला पाहिजे. तर कसाची कामं हुतील. बैलाच्या जल्माचं वाटूळं झालं तरी चालंल.''(पृ० २४)

विषम समाजव्यवस्थेत प्राणी आणि मजूरांची जीवन पातळी समानच असते. जनावरांची व नारबाची आवश्यकता संपताच त्यांची विल्हेवाट लावली जाते. ग्रामीण परिसरातील पिढ्यानपिढ्या चालत आलेली एक जीवनरीत कोलमडून पडते. वड-पिंपळाची देव म्हणून पूजा केली जात होती, परंतु 'ना फळ ना फूल' म्हणून मालक पिंपळ तोडतो. डॉ. प्रभाकर गुमास्ते या संदर्भात लिहितात, ''निरागस, कृतज्ञ, भूतदयेन भारावलेली, समाधानी, प्रामाणिक, मेहनती, विश्वासू आणि सर्व प्राणिमात्रांना आपल्या कवते सामावून घेणारी कृषिवल संस्कृती अस्तंगत होत असल्याचे जाणवते आणि त्याचबरोबर उपयुक्ततेच्या निकषावर प्राणिमात्राचे मूल्यमापन करणारी, कोरडी आणि करडी हिशेबी पण असमाधानी, माणसापेक्षा यंत्रावर प्रेम करणारी, मायावी अशी नवीन संस्कृती आपली पावले टाकू लागल्याची जाणीव प्रत्ययाला येते. या घटनांतून केवळ भावनांचा चुराडा दाखविलेला नाही, तर एका परंपरेचा विनाश

दाखविलेला आहे. हिरव्या शेतातलं तरणंबांड हिरवं मन शुष्क होत चालले आहे. आणि धनलोभाच्या दुर्दम्य इच्छेने पिसाटून धावणाऱ्या आजच्या जगाचं दर्शनही लेखकाने घडविले आहे.''८०.

डॉ. मदन कुलकर्णी 'गोतावळा'चे आर्थिक आयाम स्पष्ट करताना लिहितात, "ट्रॅक्टर आणण्याचे रामू सोनवडा ठरवतो इथपर्यंत ठीक आहे. पण त्यामुळे शेतकऱ्याच्या वृत्तीतच परिवर्तन घडते, त्याला गुराढोरांचे महत्त्व वाटत नाही. 'नारबा'च्या जेवणापेक्षा ड्रायव्हरचे महत्त्व त्याला जास्त वाटते. आर्थिक, सांस्कृतिक स्थित्यंतराचा ट्रॅक्टर प्रतिनिधी असला तरी 'बरेच काही' उद्ध्वस्त करणारा तो शत्रू ठरला आहे. मग ती 'नारबा' सारख्याच्या भाव जीवनाची उध्वस्ती असो किंवा ग्रामीण जीवनाची आर्थिक, सामाजिक जीवनाची उध्वस्ती असो, एका बाजूला शहरीकरणाचे यांत्रिकीकरणाचे फायदे ग्रामांना उपलब्ध होत असतानाच दुसरीकडे ग्रामजीवनाची आर्थिक व सामाजिक घडी विस्कटण्यास ह्या गोष्टी सहाय्यक ठरत आहेत.''८१. परिवर्तन काळामध्ये कमिशनवर डोळा ठेऊन यंत्राचे महत्त्व शहरातील लोक शेतकऱ्यांना सांगू लागले. पाव्हणा रामू सोनवाड्याला ट्रॅक्टरच्या शेतीचे महत्त्व पटवून देतो आणि ट्रॅक्टर खरेदी करण्यास उद्युक्त करतो. यावरून यंत्रयुगात धूर्त, हिशोबी आणि स्वार्थीवृत्ती कशी वाढली. शेतकऱ्यांचा उपयुक्ततावादी दृष्टिकोन लेखकाने मालकाच्या रुपाने टिपला आहे. उदा.

१) टिक्की म्हैस विकण्याचा मालक निर्णय घेतो, तेव्हा म्हणतो,

"ती म्हस काढून टाकावी आता, म्हातारी झालीया. नुसती दुधाची म्हस ठेवायची. रिकामी वैरणीला कार ढोरं नगंत." (पृ.५)

२) "आणि येड्यास्नी कशाला वल्ली वैरण टाकलीया ही?"... चिपाड घालत चला त्यास्नी. बैलास्नी तेवढी वल्ली वैरण एखादी पात काढून घालावी... असल्या उन्हाळ्यात वल्ला पाला समद्यास्नी काढून ऊस वाळवून घालवशीला माझा. रेड्यास्नी जूपन काय वाटं घालायचं हाईत?" (पृ.६-७) निरउपयोगी जनावरांचा हिरवा चारा देणे त्याला मान्य नाही.

३) ओपावर आलेल्या पाडीवर चाण्ण्या सोडायला मालक नकार देताना म्हणतो, "...पर तसं केल्यावर फुडची वासरं चांगली निपजत न्हाईत म्हणं" (पृ.१३)

४) मारुत्या घोडा विहिरीत पडतो. त्याला वाट करुन वरती काढण्याचा विचार नारबा करतो, तेव्हा मालक म्हणतो, "खुळा काय काय? तेवढ्या खर्चात दुसरा घोडा येईल."(पृ.५१)

५) सित्या-गंग्या या मजूरांना मळ्यात ठेवून नारबा गावात येतो. तेव्हा मालक म्हणतो, "...पंर्पच्याच्या वडीची माणसं ती, कुठंबी कायबी न्हेऊन इकायची..." (पृ.८५) किंवा

६) बेंदराच्या दिवशी म्हालिंग्या बैलाला अंडी पाजण्यास मालक नकार देतो, "... आरं, आता काय धन देणार हाय त्यो बैल? हाडं वैकुंठाला गेल्यात की आता त्येची..." (पृ.८५) किंवा

"आरं त्येला कशाला असली वैरण टाकतोस? मरु दे तिकडं, ते का आता मोट वडणार हाय का बाजारात कोण घेणार हाय त्येला/" (पृ.१२७)

७) थोरली बैल जोडी विकण्याचा निर्णय घेताना मालक म्हणतो, "ठेवून का अंडी घालणार हाईत ती बैलं? आता उलट त्येंचा अंगावर मास चढलाय. बसलेली हाईत. अंगात ताव आलाय. कुणीबी बघितलं तर चार पैसं चढ देईल. उगंच सालभर बसवून ठेवण्यात काय फायदा हाय? वैरणीला रिकामाकार." (पृ.११४)

८) माळावरील आणि ओढ्याचे सर्व झाड तोडल्यानंतर पिंपळ तोडू नये असे नारबाला वाटते, तेव्हा मालक म्हणतो, "ठेवून तरी काय फायदा? ना फळ ना फूल." (पृ.१३२)

वरील सर्व घटनाप्रसंगावरुन यंत्रयुगातील उपयुक्ततावादी आणि पैशाच्या अभिलाषेची कल्पना येते. प्रत्येक गोष्ट बदलत्या काळात पैशात मोजली जाऊ लागली. त्यामुळे ग्रामीण जीवनामध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या. जसे नारबा, सित्या, गंग्या, यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला. बलुतेदारांचे रोजगार बुडाले आणि निसर्गाचा तोल ढासळत चालला.

ग्रामीण जीवनात लोकरुढी, लोकभ्रम, समजुती आणि सण-उत्सवादींना विशेष महत्त्व असते. गुऱ्हाळ चालू असताना मालक एकाएकी घेरी येऊन पडतो. तेव्हा त्याच्यावरुन मालकीण कोंबडा ओवाळून टाकते. गंग्याची म्हातारी दमा उफाळून मरते, पण तिच्या मरण्यापूर्वी चारपाच दिवस घुबडे कण्हत होती, म्हातारीच्या मृत्यूनंतर ती कण्हायची थांबली. म्हणजे घुबडांनीच म्हातारी मारली असे समजून गंग्या घुबडांना मारतो, त्यांची अंडी फोडून त्याचा लगदा करतो. टिटवीचा आक्रोश, घुबडाचे ओरडणे, देवाला फोडलेल्या नारळाचे तीन तुकडे होणे, नारबाला अशुभ सूचक वाटते. जनावरातील बहिण-भावाचे नाते मानले जाते. म्हणूनच पाडीवर चाण्ण्यापाडा तिचा भाऊ असल्यामुळे न सोडण्याचा विचार मालक करतो. पाडीवर नात्याने भाऊ असलेला पाडा सोडला तर वासरं चांगली निपजत नाही असा लोकसमज आहे. घरातील व्यक्तीच्या मृत्युनंतरच ओठावरील मिशा काढण्याची लोकपरंपरा आहे. परंपरागत कृषी-संस्कृतीवरील कृष्णछाया वर्णन करण्यासाठी लेखकाने वर्णन केलेला पाव्हणा ओठावरील मिशा काढलेला दिसतो. गायी का इकता येणार हाईत? असे म्हणणारा मालक गाय पांजरपोळात पाठविताना तिच्या पाया पडतो. यावरुन गाईला देवता मानण्याची परंपरा दिसते. मोराचे दर्शन म्हणजे देवदर्शन असे नारबा समजतो. "असा आसपास राजा म्हाऽ राजा आल्यागत साला चार सालातनं फिरत येतोय.

रानाला आशीर्वाद देऊन जातोय.'' (पृ.१०३) शेतात मोर येणे शुभ समजले जाते. मळ्यातील पिंपळ तोडण्यापूर्वी नैवेद्य ठेवला जातो. वडपिंपळ देव मानण्याची परंपरा आहे. म्हणूनच मालक ट्रॅक्टरवरुन भाकरीचा तुकडा ओवाळून टाकतो. बकरा कापतो. कोंबड्याचा डवरा केला जातो. बांधावरील देवाची पूजा केली जाते. जमीन काळीआई मानली जाते. देवाला सोडलेल्या कोंबड्याच्या सहवासात कोंबडी जगत नाही असा लोकसमज दिसतो. ''देव वंगाळ हाय आपल्या शिवंचा. मालकाचं कस झालं हुतं बघिटलास न्हवं गुदास्ता.'' (पृ.२३) यावरुन मालकिणीच देवावरील श्रद्धाच दिसते. बेडक्या मारल्याने माणूस मुके होते अशी समजूत आहे. दसक्रियेस कावळ्याला पिंडदान करण्याची परंपरा आहे. भूता-खेतावरही लोकांचा अंधविश्वास असलेला दिसतो. अतृप्त माणसाच्या पिंडाला कावळा शिवत नाही.

'गोतावळा' कादंबरीचे निवेदन आणि संवाद बोलीतच आहेत. आत्मनिवेदन पद्धतीचा किंवा स्वगत पद्धतीचा वापर लेखकाने केला आहे. ''ग्रामीण जीवनानुभव ग्रामीण भाषेतूनच जेव्हा जन्माला येतो तेव्हा त्याला आविष्कारशील व तोच अनुभव निवेदकाची तटस्थ भूमिका स्वीकारुन सांगितला जातो, तेव्हा त्याला निवेदनशील असे संबोधले जाते.''८२. यातील आविष्कारशील पद्धती लेखकाने स्वीकारली आहे. बोलीच्या वापरामुळे वातावरण निर्मिती स्वाभाविक आणि वास्तव वाटते. कादंबरीच्या निवेदन आणि संवादासाठी वापरलेली बोली जीवनानुभवाच्या सर्व रंगछटांसह अवतरते. अपरिचित शब्द व वाक्प्रचार यांच्या वापराने प्रदेश जिवंत झाला आहे. निवेदन आणि संवाद एकजीवन झाले आहेत. 'आयला, हाल्याच्या, येडझवी यासारख्या शिव्या किंवा पोटात शिंग घुसल्यागत होते, 'मन पिकागत डवरणे', 'तोंड असून जीभ नसणे' इत्यादी वाक्प्रचारातून सामाजिक परिस्थितीचे, मानवी स्वभावाचे आणि त्याच्या सुखदु:खाचे प्रतिबिंब त्यात पडलेले दिसते. तसेच ती बोली ध्वन्यानुकारी आहे. दैनंदिन वापरात ग्राम्य किंवा अश्लील वाटणारे शब्द कादंबरीत ग्राम्य-अश्लील वाटत नाही. उलट नारबाच्या निवेदनातील वाक्य अश्लीलतेपासून फार दूर घेऊन जातात. निवेदनाशी एकजीव झाल्याची जाणीव होते. नारबाचे अतृप्त मन त्यातून चित्रित होते उदा.

'अंगातढोरागत रग हाय. मला काय वाटत असंल? का आम्हीबी अंड बडविलेला खोंडच!...'' (पृ.१५)''... बाई नि बापय एकातच पाहिजे हुतं. किती एकटं ऱ्हायाचं? (पृ.६४) ''...आयला कावळा नि कावळीण एका जागी दिसत न्हाईत. रातच घरट्यात एक हुईत असतील''. (पृ.१११)

कोल्हापूरी बोलीतील नारबाच्या स्वगतावरुन बोलीचे स्वरुप कळते. नारबाच्या भावविश्वातून या कादंबरीची भाषा आकारास आली आहे. त्याची भाषा ही सभोवतीच्या दैनंदिन जीवनातून आलेली आहे. नारबाच्या भावविश्वाचा अपरिहार्य भाग बनून ती

कादंबरीत अवतरली आहे. डॉ. र. बा. मंचरकर म्हणतात, ''कृषिकेंद्रित वास्तव हा ग्रामीण भावविश्वाचा गाभा अस्सल कलात्मकतेने व बोलीच्या लयीने आविष्कृत करणारी ही एक अव्वल दर्जाची कादंबरी आहे.''८३. त्याचप्रमाणे डॉ. रवींद्र ठाकूर लिहितात, ''नारबाचे भावविश्व कोल्हापूर-कागल परिसरातल्या ग्रामीण बोलीच्या माध्यमातून लेखकाने यशस्वीपणे उभे केले आहे. ग्रामीण बोलीभाषेत कलात्मकतेच्या किंबहुना काव्यात्मतेच्या पातळीवर जाण्याचे जेवढे सामर्थ्य असू शकते हे या कादंबरीने दाखवून दिले.''८४. नारबाच्या स्वगतांचा विचार केला तरी वरील विधानातील सार्थकता पटते. 'अतिशय बारकाईने, काटेकोरपणे शब्दकाम करीत करीत यादव कोणत्याही एखाद्या प्रसंगाचे मर्म पकडतात, ते त्यांच्या लयीसहित.''८५. हे डॉ. अ. वा. कुलकर्णी यांचे विधान पुढील प्रसंगाचा विचार करता अधिक स्पष्ट होईल, १) विहिरीतील गाळ काढणे २) रेड्या शेरड्यांची विक्री ३) चंपीनंतर नाम्याचे आत्मसमर्पण ४) सोन्या-चाण्ण्यामधील वैर ५) सरड्याचा अंत इत्यादीतून प्रसंगाचे मर्म पकडलेले दिसते. डॉ. निशिकांत मिरजकर म्हणतात, ''चार दोन वाक्यात एखाद्या व्यक्तीचे, घटनेचे गतिमान रेखाचित्र उमटणे ही एक त्याची नेहमीची लकब.''८६. पाव्हण्याचे रेखाचित्र किंवा कादंबरीतील निसर्गचित्रांचा विचार करता डॉ. मिरकरांच्या विधानातील सार्थकता पटते. ''या कादंबरीच्या यशस्वितेत तिच्या भाषेचा फार मोठा वाटा आहे.''८७. या वि.ज. बोरकर यांच्या विधानाशी दुमत होण्याचे कारणच नाही.

कोल्हापूरी बोलीतील अपरिचित आणि नावीण्यपूर्ण शब्द समाजवास्तवाचे दर्शन घडवितात, उदा. हुतावं, समदी, याल, बारडी, बेजमी, येडबडल्यागत, हुतो, किनीट, कासांडी, अभ्भेस, डापटलाच, इन्नाकारणी, ओप, बिनजुमानता, इल्लंनं, टिप्पिरा, ईळभर, वकोत, गुतफळला, वळवून, राघवाची, बिनबसताच, खोपटानं, सस्कार, वांडरं, हिकडाण, वडाप, भिरमिटलं, वाकुऱ्यांची इत्यादी.

सारांश 'गोतावळा' ही कृषिसंस्कृतीच्या ऱ्हासाचे समूहगान आहे. परिवर्तन काळातील वास्तवाचे कोल्हापूरी बोलीतून जीवनानुभवाचे कलात्मक चित्रण केल्याने मराठी ग्रामीण-प्रादेशिक कादंबरीला नवी दिशा देणारी ही वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी म्हणून तिची योग्यता मोठी आहे. विकासाच्या दिशा या कादंबरीने निश्चित केल्या.

### २. उत्तम बंडू तुपे - ''इजाळं''

उत्तम बंडू तुपे यांनी 'इजाळं' (१९८४), 'झुलवा' (१९८६), 'कळाखी' (१९८८), 'खाई' (१९८८), 'चिपाड' (१९८९), 'खुळी' (१९९१) या सहा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. सर्वच कादंबऱ्यामधून त्यांनी ग्रामीण-प्रादेशिक जीवनचित्रण केले आहे. 'इजाळं' या पहिल्याच कादंबरीतून आधुनिकीकरणामुळे ग्रामीण जीवनात कसा बदल होत गेला, नव्या समस्या निर्माण झाल्या, बलुतेदारांचे धंदे बंद पडले,

त्यांना स्थलांतर करावे लागले. यंत्रधाराने शेती होऊ लागल्याने बैलबारदाना नाहीसा झाला. माणसातली माणुसकी नष्ट झाली. खेड्यातील माणूस यंत्रासारखा भावनाशून्य बनला. सोसायटी, बँका यांच्या कर्जाच्या ओझ्याखाली सामान्य माणूस गुदमरला. खेड्यात वीज आली. वीजपंप रासायनिक खतं, दूध धंदा, कुक्कटपालन यासाठी शेतकऱ्यांनी पीककर्ज किंवा तगाया घेतल्या. जीवनावश्यक धान्योत्पादन किंवा तेलबियांऐवजी रोख पैसे देणारी कांदा, ऊस, कापूस, द्राक्षे यासारखी पिके घेऊ लागला. संकरीत धान्योत्पादन करु लागला. 'किती चाला झराझरा, दोन्ही पाय बरोबर' अशी त्याची ससेहोलपट होऊ लागली. तो कर्जबाजारी झाला. बलुतेदार परागंदा झाले. अशाच परिस्थितीच्या भोवऱ्यात गुरफटलेल्या पिंगळी गावच्या जातीतील शामाची ही कथा आहे. तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील बदलते खेडेच लेखकाने उभे केले आहे.

शामाच्या महत्वाकांक्षी स्वभावामुळे तो कर्जबाजारी होत गेला. त्याने स्वत: शेतात विहिर खोदणे, वीजेचा पंप बसविणे, पाईपलाईन टाकणे, विहिरीत बोरींग घेणे, गायी खरेदी करणे, ऊस, कांदा, कापूस इत्यादी नगदी पिके घेणे, त्यासाठी वेळोवेळी कर्ज काढणे आणि आलेले उत्पन्न कर्जापायी घालणे, शेवटी घरातील दारिद्र्य पहिल्यासारखेच असल्याचे त्याला दिसते. सर्वत्र भ्रष्टाचाराचा अनुभव त्याला येतो. हात ओले केल्याशिवाय कोणतेही सरकारी काम होत नाही. खेड्यातील बलुतेदार आणि तरुण पोटासाठी शहराकडे धावतात. तेथेही त्यांची वाताहात होते. खेडी ओस पडतात आणि शहरांची लोकसंख्या वाढत जाते. ग्रामीण भागात पसरलेले वीजजेचे जाळे आणि त्यात अडकलेला किंवा गुरफटलेला शेतकरी हा या कादंबरीचा विषय आहे.

शामाच्या जीवनचित्रणाबरोबर लेखकाला प्रस्तुत कादंबरीत समग्र खेडे जिवंत करायचे असल्यामुळे शामा किंवा अन्य व्यक्ती या कादंबरीचे 'नायक' नाही. उलट संपूर्ण गाव आणि गावकरी यांच्या जीवनसंघर्षाभोवती कादंबरीचे कथानक गुंफले आहे. महत्त्वाकांक्षी स्वभावाच्या 'शामा'चे चित्र लेखकाने ठसठशीत रेखाटले आहे. तो प्रेमळ-कष्टाळू, कर्तव्यदक्ष, सोशीक, प्रामाणिक आणि सद्वर्तनी-आशावादी आहे. बदलत्या परिस्थितीला सामोरे जाण्याची त्याची सदैव तयारी असते. वाखाचा धंदा करणारा हा मांग जातीचा तरुण आहे. चांभार, लोहार, सुतार, कुंभार या बलुतेदारांप्रमाणे मांग जातीचा धंदा नष्ट होतो. बांधावरील घायपात नाहीसे करुन शेतकऱ्यांनी आपले क्षेत्र वाढविले. शामाचा धंदा बसला. म्हणून तो स्वत:च्या लहानशा शेतात विहिर खोदतो. वीजेचा पंप बसवितो. पाईपलाईन करतो. नगदी पिके घेतो. संकरित बी-बियाणांचा वापर करतो. प्रतिकूल परिस्थितीला सामोरा जातो, असा तो धडपड्या आहे. हे सर्व करताना त्याची होणारी ससेहोलपट रेखाटली आहे.

त्याची आई पुतळा, वडील शिवा, पत्नी जगी, लता-आशा या मुली, नामदेव हा अल्पशिक्षित भाऊ, शांता, सिता, जमनी या बहिणी हे त्याचे कुटुंबीय आहेत. नामदेव काटकर, फुली, सायबूपावना, हरिबा, शंकर, मुगाजी सुतार, काशिनाथ रामोशी, किशा बागवान, हाणमा, पांडूतात्या, पर्वती नाना, बबी थोरात, कारंडे, म्हंकाळ हे अन्य गौण पात्र आहेत, तर गावातील धनिक, पाटील, सरपंच, जिल्हापरिषदचे सभापती, पोलीस, फौजदार, जनावरांचे डॉक्टर, ग्रामसवेक, कांबळे तलाठी, महाराष्ट्र राज्य वीज मंडळांचे कर्मचारी आणि अधिकारी हे सर्व नव्या शोषणकर्त्यांचे प्रतिनिधी आहेत. सोशीक आणि शोषण करणाऱ्यांचे जिवंत चित्र लेखकाने रेखाटले आहे. म्हणून येथे 'शामा' नायक नाही, तर समाजच नायक आहे, हे समूहजीवन चित्र आहे.

सातारा जिल्ह्यातील फलटण, वडूज, दहीवडी, गोंदवले परिसरातील 'पिंगळी गाव'चो पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. 'परळीचं मोठं टेकाड, त्याच्यापुढं मांजखिळ्याचा डोंगर, हिकड डाव्या अंगाला व्हरळाची खोरी, खोरीच्या अंगाला मोठं दोन डोंगार, त्याच्या मधल्या सपाटीला त्याचं पिंगळी गाव. पिंगळीच्या ह्या अंगाला तलाव सदा सर्वकाळ पाण्यानं भरलेला...'' (पृ.३) अशा डोंगराळ प्रदेशातील स्वावलंबी खेड्यातील बलुतेदारांची वाताहत कशी होते आणि आधुनिकीकरणामुळे प्रगती करु पाहणारा शेतकरी कर्जबाजारी कसा होतो याचे प्रदेशविशिष्ट चित्र लेखकाने रेखाटले आहे. या कादंबरीत आलेल्या काही निसर्गवर्णनातून कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या भाव अवस्थेचे दर्शन घडते उदा.

''रात मोहरली होती. आकाशातल्या चांदण्या तुटलेल्या पिकल्या फाळागत गळून पडत होत्या. माथ्यावर आलेल्या चांदाच्या चांदण्यात धरणी झगमगत होती. गारवारं सुटलेलं.'' (पृ.७) शामाच्या भावावस्थेतनुरूप आलेले हे निसर्गवर्णन आहे.

आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे समाजजीवन पूर्णपणे बदलल. त्याचे प्रत्ययकारी चित्र लेखकाने रेखाटले आहे. प्रतिष्ठा जपण्यासाठी शेतकरी कर्जबाजारी होऊ लागले. सावकाराला दिलेला शब्द पाळणे नव्या पिढीला महत्त्वाचे वाटेनासे झाले. अन्यायविरूद्ध आवाज उठविण्याचे सामर्थ्य वाढले. परंतु इतर मार्गांनी शोषणांस प्रारंभ झाला. याचा नव्या पिढीला विसर पडला. शामाने गावकी-भावकीच्या नाकावर टिच्चून विहिरीचे खोदकाम सुरु केले. मध्येच विहिरीचे खोदकाम बंद पडले म्हणजे भावकीमध्ये अप्रतिष्ठा होईल असे वाटल्यावरुन किरळसालच्या नामदेव काटकराकडून वाख घालण्याच्या बोलींवर शामाने तीनशे रुपये कर्ज काढून ठेकेदाराला पैसे दिले. विहीर पूर्ण केली. काटकर ठरल्याप्रमाणे वाख मागायला आला असता बाजारभावाप्रमाणे वाखाचे पैसे शामा मागू लागला. व्यवहार जमत नाही म्हणून रोखीने वाख विकला आणि काटकराचे पैसे दिले. काटकराला वाख घालायला शामा तयार होत नाही म्हणून रोखीने वाख विकला जातो आणि काटकराचे पैसे दिले. काटकराला वाख

घालायला शमा तयार होत नाही तेव्हा, त्याचे वडील म्हणतात, "आरं मंग नगं घालायला? आपली वाचा गेली. शबूद दिलाय नव्हं त्याला?" (पृ.४) शब्दाला न जागणारी नवी पिढी आणि शब्दाप्रमाण मानणारी जुनी पिढी यांच्यात विसंवाद होऊ लागला. बलुतेदारांची शेतकऱ्यांना गरज उरली नाही. शेतकऱ्यांना लागणारे चऱ्हाटे मांग पुरवित असत. शेतकऱ्यांच्या पांदीतील घायपात कापून-सोलून-भिजवून त्याची आंबाडी करुन चऱ्हाट करण्याचा धंदा मांग करीत होते, परंतु यंत्रयुगात मांगाकडील चऱ्हाटांची शेतकऱ्यांना गरज वाटेनाशी झाली. त्यांच्याकडे जनावरे राहिली नाही. नगदी पिकांना पांदीतील घायपात मारक ठरते, म्हणून ट्रॅक्टरने पांदीची नांगरट करुन शेतकऱ्यांनी क्षेत्र वाढविले. परिणामी बलुतेदार मांग जातीचा परंपरागत धंदा बंद पडला. पोटासाठी हे लोक शहर जवळ करु लागले.

भाऊबंदकीचा शाप बलुतेदारांनाही बाधलेला होता. शांताच्या लग्नात जैशा देवाक आणत नाही, कारण शामाने देखील जैशाच्या लग्नात देवाक आणलं नव्हं, म्हणून जैशा ताठून बसल्याचे वर्णन लेखकाने केले आहे. जीव गहाण टाकील पण जमीन गहाण टाकण्याची कल्पना शेतकऱ्याला मानवत नव्हती, म्हणूनच नामदेवच्या नोकरीसाठी जमीन गहाण ठेऊन पैसे भरण्याची कल्पना शामाला पटत नाही. नवले गुरूजींकडून तो हजार रुपये कर्ज घेतो. विठ्ठलला पैसे देतो. परंतु नामदेवला नोकरी मिळत नाही. ओळख, वशिला आणि पैशाशिवाय कोणतेही काम होत नाही हेच लेखकाने यातून सूचित केले आहे. तसेच बायकामुलांना देशावर ठेवून नोकरीच्या निमित्ताने लोक मुंबईला जाऊ लागले. वर्षवर्ष परत येत नसल्यामुळे स्त्रियांचा भावनिक कोंडमारा होऊ लागल्याने त्या परपुरुषाशी अनैतिक संबंध ठेऊ लागल्या. नीतिमत्ता नाहीशी झाली. तसेच नोकरीवाल्यांकडून महिन्याला मनीऑर्डरने पैसे येऊ लागल्याने स्त्रिया रोजगाराला जाईनाशा झाल्या. सरकारी कामावर कमी श्रमात अधिक पैसे मिळू लागल्याने शेतावर मजूरी करण्यास मजूर लोक तयार होईनासे झाले. बलुतेदरांचे धंदे बंद पडल्यामुळे ते उपजीविकेसाठी चोऱ्या करु लागले. साखर कारखान्यावर ऊसतोडीसाठी अनेकांनी गाव सोडले. ऊस तोडणीच्या कामाचे पैसे मिळाल्याने व्यसनधीनता वाढू लागली. ग्रामीण विभागात प्राथमिक आरोग्यकेंद्र उघडले गेले. डॉक्टर-नर्स जनतेची सेवा करु लागले. कुटुंबनियोजनाच्या प्रचाराला सुरुवात झाली. लोकसंख्या वाढ रोखण्याचे प्रयत्न होऊ लागले.

पाटकर, ग्रामसेवक, तलाठी, वीजमंडळाचे अधिकारी यांनी सामान्य माणसांचे शोषण सुरु केले. यंत्राच्या वापरामुळे खळे बंद झाले. मळणी यंत्राने झटपट धान्य केले जाऊ लागले. त्यामुळे बलुतेदारांप्रमाणे दरवेशी, माकडवाले, नंदीवाले, कळवतनी, डोंबारणी यांना धान्य मिळणे बंद झाले. पारंपरिक जीवनशैलीचा ऱ्हास होऊन माणूस भावनाशून्य यंत्रवत बनला. सरकारी कर्ज-तगायांचा उपयोग शेतातील विकास कामाऐवजी

मुलामुलींच्या लग्नासाठी केला गेल्याने उत्पन्न घटले. कर्जफेड होईनाशी झाली. जातीभेद वाढीला लागला. तरुणांनी विविध मंडळांची स्थापना केल्या. त्यांच्यात संघर्ष होऊ लागला. किरकोळ गोष्टीवरुन लोक कोर्टकचेऱ्या, खोटेनाटे आरोप करु लागले. हातभट्टीचा धंदा तेजीत आला. व्यसनाधीनता वाढली. कुक्कटपालन, दूधधंदा भ्रष्टाचाराने खिळखिळा झाल. वीज आली, त्याबरोबर कर्जही वाढले. 'इजाळ्या'त समाज गुरफटला. कर्जबाजारी झाला.

आधुनिकीरणाने शेतकऱ्याच्या जीवनात क्रांतिकारक बदल झाला असला तरी त्याच्या सांस्कृतिक जीवनात फारसा झाला नाही, फारतर ब्राह्मणाशिवाय लग्नविधी पार पाडले गेले. सत्यनारायणाची, पूजा सांगू लागले. तरीही देवादिकावरील त्यांची श्रद्धा, तसेच काही समजुती ते टाकू शकले नाहीत. उदा. विधवेला हळदी कुंकवाचा मान न देण्याची प्रथा, लग्नात वधूवरांना हळदीची कापड घेणे, मंडप घालणे, करंज्याच्या ढाळ्या बांधणे, विवाहीताने देवाक आणण्याची प्रथा संस्कृतीचे वैशिष्ट्ये सांगणारी आहेत. मारुतीच्या मंदिरात गुरवाला इडा देणे. गुरवाने लग्नात शिंग वाजविणे, न्हाव्याने नवरदेवाचा घोडा धरणे, देवाचे नैवद्य उष्टे न करणे इ. समजूती आणि प्रथा आजही खेड्यात आहेत. बांधावरील म्हसोबाची जत्रा करणे किंवा खंडोबाला बकरु मारुन जागरण घालणे, खंडोबा भक्ताच्या अंगात येणे, कुत्रे स्वप्नात येणे, म्हणजे प्रत्यक्ष खंडोबाचा साक्षात्कार होणे इत्यादी अनेक गोष्टी संस्कृतिदर्शन घडविणाऱ्या आहेत.

स्वातंत्र्यानंतर विकासाची कल्पना पुढे आली. सत्तेचे विकेंद्रीकरण केले गेले. ग्रामपंचायत, पंचायतसमिती, जिल्हापरिषदेचा कारभार स्थानिक कार्यकर्त्यांच्या हातात आला. सत्ता टिकविण्यासाठी बोगस मतदान केले जाऊ लागले. पुढाऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्यांशी संबंध प्रस्थापित करुन भ्रष्टाचार करण्यास सुरुवात केली. सहकारी बँकांचे-सोसायट्यांचे कर्ज मिळवून देताना पैसे मिळविणे किंवा वीजमोटार, मीटर, पंप, पाईप यांची चोरी होऊनदेखील पोलिसांनी दखल न घेणे, उलट हप्ता वसूल करणे, जनावरांच्या डॉक्टरने खोटे दाखणे देणे, ग्रामसेवक तलाठ्यांनी, पोलिसांनी पैसे खाणे इत्यादी गोष्टीतून राजकीय जीवनचित्रण आणि भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणेचे स्वरुप स्पष्ट होते. तसेच शेतकरी संघटनेची स्थापना करुन शेतकऱ्यांचीच पिळवणूक करणे इत्यादी उल्लेख येतात. सारांश, आधुनिकीकरण आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणानंतर शेतकऱ्याचे हित जपण्याऐवजी त्यांचे शोषण सहकारी संस्थांचे पदाधिकारी, लोकनेते आणि सरकारी अधिकारी करु लागले. स्वार्थ साधू लागले. सामान्य माणसाचे शोषण होऊ लागले.

आधुनिकीकरणाच्या काळात शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान फारसे सुधारले नाही. ते अधिक कर्जबाजारी झाले. सावकाराच्या हातून निसटलेले लोक सोसायट्या-

बँकांच्या कर्ज-तगायामध्ये अडकले. शेतमजूर आणि बलुतेदारांनी मुंबई जवळ केली. ओळख, वशिला आणि थोडाफार पैसा देऊन लोक मुंबईत नोकरीला लागले आणि झोपडपट्टीत राहू लागले. त्यांची प्रकृती मुंबईतील हवामानामुळे आणि व्यसनाधीनतेमुळे खंगत गेली. उलट, देशावर आधुनिक पद्धतीने शेती करणाऱ्यांना देखील फारसे सुख लाभले नाही. धनिकांना मजूरांची गरज वाटेनाशी झाली. त्यांच्याकडील काम यंत्र करु लागले. परतु मध्यम-लहान शेतकऱ्यांची मात्र कुचंबणा झाली. पावसाळ्यात स्वत:च्या शेतातील गवत काढणे आवश्यक असतानादेखील रोजगार मिळतो, पोटापाण्याचा किंवा तेलमिठाचा प्रश्न सोडविण्याठी मजूरी करण्याशिवाय भांगलणीसाठी शामाच्या घरातील माणसे दुसऱ्याच्या शेतावर जातात. स्वत:च्या शेतातील भांगलणी राहून जाते कारण रोजगार बुडविल्यास पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होतो. पावसाळ्यात रोजगाराची लहान शेतकऱ्यांना अधिक आवश्यकता वाटते. शामा देखील टोळीबरोबर ऊस खोदण्यासाठी जातो. हे वाईट काम तो पोटाच्या आगीमुळे करतो.

भ्रष्टाचार सर्वत्र वाढला. पाटकरी, वीजखात्याचे लोक पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाहीत. शामाच्या घरात लाईट जोडण्यापूर्वी वीजमंडळाचे लोक वीस रुपये घेतात. विहीरीवर पंपासाठी रुपये वसूल करतात. तलाठी-ग्रामसेवक-पुढारी सर्वांनीच सामान्य शेतमजूर-शेतकऱ्यांचे शोषण करण्यास सुरुवात केली. बेरोजगार झालेल्या बलुतेदारांनी दारुच्या भट्ट्या सुरू केल्या. ते पोलीसांना हप्ते देऊ लागले. तसेच पिंगळी गावातील लोकांचे वीजपंप, मोटारी, पाईप, चोरीला गेले असता पोलीसांनी पैसे घेतल्याशिवाय तक्रारीची नोंद घेतली नाही. भ्रष्टाचारामुळे अधिकारी, पुढारी श्रीमंत झाले तर सामान्य जनता रसातळास गेली. लोक दुष्काळात ऊसतोडणीसाठी साखर कारखान्यांवर जाऊ लागले. रोख पैसा हातात मिळाल्यानंतर दारु पिऊ लागले. नगरी पिकांमुळे धनिक अधिक श्रीमंत झाले, परंतु सामान्य शेतकऱ्याला हे साधले नाही.

खेड्यापाड्यातून महाविद्यालये निघाली. शिक्षण प्रसार झाला. मागासवर्गीयांची व सामान्य शेतकऱ्यांची मुले अर्धवट शिक्षण घेऊन मुंबईकडे पळू लागली. शिकलेल्या मुलांना शेतीची कामे झेपत नसल्यामुळे साक्षर-निरक्षरात विसंवाद होऊ लागला. नामदेवला नोकरी मिळावी म्हणून शामाने पैसे खर्च केले, मुंबईवाल्यांच्या नात्यातील मुलीशी त्याचे लग्न केले. परंतु सर्व व्यर्थ - नामदेवाला नोकरी मिळालीच नाही. तरीही ग्रामीण जीवनातील अज्ञान नाहीसे होण्यास शिक्षण उपयुक्त ठरले.

'इंजाळं'ची भाषा ही सातारा जिल्ह्यातील मागासवर्गीय बलुतेदार शेतमजुरांची बोली आहे. संवाद आणि निवेदन बोली भाषेतच आहे. तसेच आधुनिकीकरणाच्या प्रभावातून आणि शिक्षणप्रसारामुळे काही इंग्रजी शब्दही स्थानिक बोलीच्या ढंगाने उच्चारले जाऊ लागले. उदा. इस्टील, गुलोप, बुकना, इंत्या, परमानं, घोन, सपर,

रोस हिर, पळाटी, तकाट, भ्या, चळका, घेया, बाचकं, वाकुरं, पुजाऱ्या, टोपायला, कणाकणा, सणांग, गुमान, गरळ, बैत, व्हंडी, सांगळं, फड्या, व्हराड, तिफण, कुडी, कंजाळ इ. बोलीभाषेतील शब्दांप्रमाणेच वाक्प्रचार म्हणींचाही वापर लेखकाने केला आहे. उदा. 'दमडीची कोंबडी आन रुपया फळणावळ', 'छू कुत्र्या, उभं कान', 'हूलीूल आन् कुत्र्याला झूल', 'काय बया आक्रीत न् कोड्यांस न्हाय भाकरीत', 'धन्याला धत्तुरा न चोराला मलिदा' इत्यादी.

स्वत: लेखकाने जे अनुभवले, जगले तेच त्याच्याच बोलीत सांगितले. त्यात अतिशयोक्ती नाही, रडगाणे नाही, तर स्वाभाविकता आहे. स्वत: लेखकाने म्हटले आहे, ''मी दलित असलो तरी मला माझे दलित्व मान्य नाही. माणूस ही जात माणुसकी हा धर्म मानणाऱ्यांपैकी मी आहे. म्हणून दलितांच्या रडगाण्यात मला सुख किंवा दु:ख वाटत नाही. माझा पिंड ग्रामीण भागात घडला आहे. ग्रामीणांच्या व्यथावेदना मी पाहिल्या आहेत. भोगल्या आहेत आणि आजूनही माझा जास्तीत जास्त संबंध ग्रामासी येतो. महिन्यात एखादी फेरी गावाकडे, म्हणजे माझ्या मूळ गावाकडे साताऱ्याकडे होते. सासुरवाडीलाही जातो, त्यामुळे ग्रामीण मातीत रुतलेली नाळ बहाते आणि माझी लेखणी ग्रामीणांच्या व्यथावेदना अक्षरबद्द करण्यात गुंतून राहते आणि माझ्या लेखनामागील भूमिकाही ग्रामीण साहित्य मराठीत आणण्यासठी आहे हे नक्की होते.''८८. लेखकाचे हे मनोगत बोलके आहे. वास्तवजीवन चित्रणाच्या प्रेरणेतून लेखन होत गेले. तर अनिल बळेल लिहितात, ''ग्रामीण भागात पसरलेले विजेचे जाळे आणि त्या जाळ्यात अडकलेला शेतकरी ही 'इजाळ' कादंबरीची पार्श्वभूमी आहे.'' ८९. ग्रामीण जीवनातील परिवर्तनकाळातील समस्या लेखकाने समर्थपणे आत्मसात करुन लेखन केल्यामुळे ही कादंबरी अधिक वास्तव झाली आहे.

### ३. बा. ग. केसकर - ''कुणाच्या खांद्यावर''

बा. ग. केसकरांची १९८४ साली प्रसिद्ध झालेली 'कुणाच्या खांद्यावर' ही कादंबरी आहे. आधुनिकीकरणाच्या प्रभावातून ग्रामीण भागात सहकारी तत्त्वावर साखर कारखाने उभारले गेले. दुष्काळी भागातील मजूर ऊस तोडणीचे काम करु लागले. त्यांचे विविध मार्गांनी होणाऱ्या शोषणाचे चित्र येथे रेखाटले आहे. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांना लेखकाने हात घातला आहे. मेधा सिधये म्हणतात, ''साखर कारखान्यांच्या परिसरातलं वातावरण, तिथलं राजकारण, पिळवणूक, अत्यचार, बलात्कार आणि या साऱ्याची परिणती गरीबांच्या मरणात होते हा या कादंबरीचा विषय आहे. हा विषय आता नवीन राहिलेला नसला तरी जोपर्यंत ही परिस्थिती सुधारत नाही, तोपर्यंत हा विषय लेखकांना आणि वाचकांना आवाहन करीत राहणं स्वाभाविक आहे.''९०. कादंबरी ऊस तोडणी करणाऱ्या कामगारांच्या शोषणाची

कथा आहे. अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळी जामखेड तालुक्यातील लोक ऊस तोडणीसाठी साखर कारखान्यावर येतात. पिढ्यानपिढ्या हे करतात. आपले शोषण होते याची जाणीव त्यांना नाही.

मल्हारी आणि सुरवंताच्या अगोदरपासून त्याचा मोठा भाऊ आणि वहिणी हे काम करीत होते. मल्हारीच्या लग्नानंतर ऊस तोडणीला तो सुरवंताला घेऊन जातो. मुकादमाकडून दोन हजार रुपये उचल घेऊन कारभारी जामखेडच्या बाजारातून नवीन बैल खरेदी करतो. सुरवंता-मल्हारीचे जोडपे नवी बैलजोडी घेऊन इतर गाडीवानांबरोबर जामखेडच्या बाजार तळावर जमतात. दुसऱ्या दिवशी बैलगाड्यांची माळ साखरकारखान्याच्या रस्त्याला लागते. त्यांना पाऊस झोडपतो. तरुण सुरवंताकडे मुकादमाचे लक्ष जाते. कारखान्यावर आल्यानंतर सर्वजण मुकादमाकडून सामान घेऊन खोपा तयार करतात. कारखान्याचे आणि तेथील नोकर कामगारांचे वैभव पाहून प्रथमच ऊस तोडणीला आलेली सुरवंता आपल्या दारिद्र्याची तुलना त्यांच्याशी करु लागते. मुकादम स्वत:चे किरणा दुकान सुरु करतो. कमिशनच्या हेतूने त्याने जमविलेल्या लोकांचे (उदा. न्हावी, शिंपी, लोहार, सुतार, पत्र्यामारणार) धंदे सुरु होतात.

खोपा तयार झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून ऊस तोडणीस सुरवात होते. पहिल्याच दिवशी सवय नसल्यामुळे सुरवंताची तारांबळ होते. काम जमत नाही. जीव आंबून जातो. कारखान्यातील कामकार-अधिकाऱ्यांच्या बायकांचा तिला हेवा वाटतो. लगबगीने भाकरतुकडा करुन मल्हारीचे जेवण ती काट्यावर पोहच करते. परंतु एकटीने खोपीवर झोपण्याची कल्पना तिला सहन होत नाही. विचारी, महत्त्वाकांक्षी आणि सारासार विवेकबुद्धीच्या सुरवंताला मुकादम, चीटबॉय, आणि त्यांच्या सहकार्यांकडून मजुरांचे शोषण होते हे जाणवते. आपण कर्जाच्या ओझ्याखाली गाडले जातो असे तिला वाटू लागते. याच काळात साखर कारखान्याच्या चेअरमनच्या मुलाच्या मनात सुरवंता भरते. याचा तिला स्वत:च्या रुपामुळे गर्व होतो. परंतु ती खानदानी असल्यामुळे अनैतिक संबंधाचा विचार सुरवातीला ती झटकते. परंतु एकटी पाहून मुकादम तिच्यावर बलात्कार करतो. कुठे वाच्यता न करण्याची धमकी देतो. तिच्या सर्व स्वप्नांचा चक्काचूर होतो. पावसाळ्याच्या दिवसात ऊसाच्या सरीत पाय घसरुन पडल्यामुळे तिच्या पोटातील गर्भ पडतो. त्यानंतर ती बागायतदाराच्या मुलाशी अनैतिक संबंध ठेवते. शरीर सुखापेक्षा ती पुढच्या पिढीचा विचार करते. त्यांची जमीन वाट्याने करण्यास मिळावी, ऊस-तोडीची कटकट नको असे तिला वाटू लागते. अशाच वेळी कारखाना बंद होतो. सर्वांबरोबर ती गावाकडे जाते. पण मनाने ती कारखान्यातील बागायती शेतातच रमलेली असते. पुढच्या सिझनला ती बागायतदाराचे शेत वाट्याने करते. बागयतदार पुत्र तेजरामला शरीरसुख देते. नवऱ्याच्या हे लक्षात आल्यावर तो तिला झोडपतो. तेजरामची अब्रू जाण्याची वेळ आल्याबरोबर मल्हारीचा

खून होतो. सुरवंता वेडी होते. ऊस तोडणी कामगारांना साखरसंघाने दिलेला वाढीव दरातील फरकाची रक्कम मुकादम खाऊन मोकळे होतात. अशी मल्हारी-सुरवांताचीही शोकांतिका आहे. सहा महिने ऊसतोडणीचे काम करणारे कष्ट करुनही कर्जबाजारी तर त्यांच्या श्रमावर मुकादम, चीट बॉय आणि अन्य शोषणकर्ते आपला स्वार्थ साधतात.

सुरवंता, मल्हारी, कारभारी, गंगू, शालन, मुकादम, गोपादादा आणि चेअरमनचा मुलगा तेजराम या व्यक्तिरेखा जिवंत वाटतात. लेखकाने अन्य गौण व्यक्तिरेखांद्वारे ऊस-तोडणी मजूरांचे समूहजीवन चित्रण केले आहे. सुरवंता ही या कादंबरीची नायिका आहे. रुपाने गोंडस, कष्टाळू, आशावादी, महत्त्वाकांक्षी, विचार सारासार विवेकबुद्धी असलेली ही तरुणी आहे. गावाकडील दुष्काळी परिस्थितीपेक्षा कारखान्याजवळील बागायती शेती बघून पुढच्या पिढीसाठी आपण बदलले पाहिजे, मुलांना शिकविले पाहिजे. आपल्याप्रमाणे आपल्या मुलाबाळांना कष्टाचे काम करावे लागू नये म्हणून ती मुकादमाकडून शिलभ्रष्ट झाल्यावर तेजरामलाही शरीरसुख देऊ लागते. जमीन वाट्याने मिळावी म्हणूम अनैतिक संबंध ठेऊनही त्याच्याकडून पैसे घेत नाही. ''गावचा बळी आणि परगावचा डुकर वळी' अशी स्थिती होऊन मल्हारीचा खून होतो, आणि सुरवंता वेडी होते. मेधा सिधये म्हणतात, ''ही सुरवंताची व्यक्तिरेखा लेखकाने जिवंतपणे साकार केली आहे. ती या कादंबरीचा आत्मा आहे. मूळची भोळीभाबडी, नवऱ्यावर जीव लावणारी, आपला मुलुख सोडून कारखान्याच्या गावी ऊस तोडणीला जायाला मिळणार म्हणून हरखलेली, नवी स्वप्न रचणारी, मातृत्व धुळीत गाडलं गेल्यावर उरी फुटणारी, मुकादमाने केलेल्या बलात्कारामुळे आतून धुमसणारी पण काही दिवसांनी मालकाच्या मुलाचा रुबाब आणि वैभव पाहून त्याच्यावर लोभावलेली, त्याला हवं ते देऊन आपल्या नवऱ्याचा संसार फुलवू पहाणारी... अशी सुरवंताची अनेक रुपं या कादंबरीत पहायला मिळतात.''९१. सुरवंता अडाणी आहे, तशीच विचारी आहे. न्याय-अन्याय तिला समजतो. महत्त्वाकांक्षी स्वभावामुळे तिला सुख तर मिळत नाहीच उलट तिची शोकांतिकाच होते.

मल्हारीचे व्यक्तिचित्र सुरवंताइतके जिवंत वाटत नाही. तो साधा-सरळ-कष्टाळू आहे. तो प्राप्त परिस्थितीला शरण जाणारा आहे. बंड करण्याचे सामर्थ्य त्याच्यात नाही. बायकोमागे फरफटत गेलेल्या मल्हारीची शोकांतिकाच होते. तो समाजपरिस्थितीचा बळी ठरतो.

अहमदनगर जिल्ह्यातील मराठवाड्याला जवळ असलेल्या जामखेड तालुक्यातील ऱ्होतवाडी जवळील एका वाडीतील सुरवंता-मल्हारी थोरवे पाटील यांची ही शोकांतिका आहे. बेलापूर कारखान्यावर ऊस तोडणी करणारे हे दुष्काळी भागातील मजूर आहेत. जामखेडच्या दुष्काळी भागाची आणि कारखान्यावर ऊस तोडणी करणारे हे दुष्काळी

भागातील मजूर आहेत. जामखेडच्या दुष्काळी भागाची आणि कारखान्याजवळील सधन परिसराची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. कारखान्याचा परिसर सुजलाम सुफलाम आहे. तेथे कॅनॉल आल्यामुळे आणि विहिरीवर विद्युत पंप बसविल्यामुळे ऊस-कापूस गहू आणि अन्य नगदी पीके चांगली येतात. परंतु जामखेड तालुक्यतील दुष्काळी डोंगराळ भागातील मल्हारी-सुरवंताच्या वाडीजवळ रात्रीच्या वेळी कोल्ह्या-भगरांचे आवाज येतात. पिंगळा बोलता. टिटवी ओरडते. (पृ.१३) पावसाच्या जीवावर बाजरी, मूग, मटकी ही पिके या प्रदेशात येतात. किंवा तीळ, कारळे, मेसूर येथे पिकतात. (पृ.२१) ही वाडी डोंगराच्या पायथ्याला आहे. तिचे वर्णन लेखक करतो, ''वाडीजवळ आली. संध्याकाळचा पाखरांचा कोलाहल, माणसांचे आवजा ऐकू येऊ लागले. डोंगराच्या उताराला घर, मागं डोंगर, पुढं डोंगर, पुढं डोंगर, मध्ये दुबळक्यात त्यांची रानं...'' (पृ.७३) येथील जमीन मुरमाट हलक्याप्रतीची आहे. या परिसरात हरणांचे आणि मोरांचे अभयारण्य आहे. दरीत, झाडझाडोऱ्यात करवंदाच्या जाळीत मोर-हरणी दडून बसतात. येथे पावसाळ्यात नानाविध वृक्ष हिरवेगार होतात, त्यांचे वर्णन लेखकाने केले आहे,

''सगळं जंगल हिरवंकंच दिूस लागलं. सगळ्या प्रकारची झाडं, वेली तरारल्या. सगळ्या प्रकारची झाडं, वेली तरारल्या. वड, लिंब, कार, हेक्कुळ, यहळा असली मोठी हाडं पाणी पिऊन तृप्त झाली तर पांढरफळी, करवंद, चार टेंबरुन, वासनील, काळा मोगला, पिवळवेल, हरणदोडी, कांडीवेल असल्या वेली, लहानखुरी झाडं, उन्हाळ्यानं वाळून गेल्यागत झाली होती. त्यांच्या जीवनात जीव आला. सारं रान आता थोड्याच दिवसात गर्द हिरवं दिसू लागेल. डोंगर पाझरु लागतीलऽ बारीकसारीक वघळी, नाले, खळाखळा वहायला लागलेत.'' (पृ.९५)

पावसाळ्यात झाडी-वेली हिरव्यागार होत असल्या, बाजरी, मटकी, तिळ, येसूर पीकत असले तरी उन्हाळ्यात पोटासाठी कारखाना जवळ करण्याशिवाय या लोकांना पर्याय उरत नाही. म्हणून मल्हारी सुरवंताला म्हणतो, ''आता काय करतीसऽ आपला भाग दुष्काळीऽ आस जर पानी असतव तर आपुन बी कश्याला आलू असतावऽ इचावागत बिऱ्हाड पाठीव घिवून/'' (पृ.७९) भू प्रदेशांचा लोकजीवनावरील परिणाम यातून स्पष्ट होतो.

कादंबरीतील निसर्गवर्णने प्रत्ययकारी आहेत. बदलत्या ऋतुचक्राचे जिवंत चित्र निसर्गपार्श्वभूमीवर रेखाटले आहे. तसेच दुष्काळी परिसरातील जनतेची मानसिकता निसर्गवर्णनातून चित्रित केली आहे. बेलापूर कारखान्याजवळील प्रदेशात पावसाळ्यात होणारा बदल लेखकाने टिपला आहे. ''... पावसाळ्यानं माळावरची गवतं बरीच वर आली होती. व्हले, किडा मुंगी टिपत होते. भोरड्यांचे थवे झपाट्दिशी उठत होते. कुठंकुठं विहिरीवर बाजऱ्या डोलत होत्या. साळीच्या शेतातून सुगंध सुटला होता.

एखादा पानकोंबडा आपली काळीतांबडी शेपटी वर उचलून ह्या झाडावरुन त्या झाडावर जाईल..." (पृ.२१) याप्रमाणेच दुष्काळी जामखेड तालुक्यातील भू-वैशिष्ट्यानुरूप आलेले निसर्गवर्णन पहा.

"थोडं सपाटीचं माळरान होतं. गाडीवाट होती. तिघं भराभरा चालू लागली. सपाटीचं रान संपलं. डोंगर चालू झाले. दऱ्याखोऱ्यात अंधार वर सरकत होता. पिवळी उनं दऱ्याखोऱ्यातून मधूनच एखादा फोकस सोडावा तशी दिसत होती. तेवढाच प्रदेश उठून दिसत होता. झाड, झाडोरा पिवळसर उनात चमकत होता. वाट आता वेडीवाकडी, टेकाडाच्या कडेकडेनं होती. एका बाजूला खोल दरा होता. एका मोठ्या कातळावर ती तिघं विसाव्यासाठी थांबली. दरीतनं समोर त्यांची रान दिसत होती. त्याच्या पुढं खंडोबाचा डोंगर दिसत होता. घाटी सोंड कबऱ्या रंगाची होऊ लागली होती. झाडवान वाळून चाललं होतं... कोवळसर उन सगळीकडं पसरलं हों. एकदाने मोर केकाटत उडाले अन् काटवणात दिसेनासे झाले. रानभैरी पोपटांचा थवा डोक्यावरुन कलकलाट करीत गेला. अन् एकदम तळाला एक हरीण नजरेला पडलं. बावरल्यागत त्यानं अंग थरथरवलं अन् त्याचा रंग उनानं झळाळून उठला..." (पृ.७२) वैशाखातील मराठवाड्याच्या मुलखातील चटका देणारे, भाजून काढणारे उन्हाळ्याच्या वर्णनाबरोबरच पावसाळ्यातील बदलही लेखकाने (पृ.९४) टिपला आहे. दुष्काळी परिसरातील पावसाळा लेखकाने गोचर केला आहे. येथेही विजांचा कटकडाट होऊन मुसळधार पाऊस पडतो. ओहोळ वाहून लागतात. पावसाळ्यात गुराखी झाडाखाली बसतात. मेंढरं सैरभैर होतात. चिमण्या, सप्तरंगी होरल, कोळसा, असली लहान पाखरं भिजतात. नांगरटीतून पाणी निघते. सर्वत्र पाणीच पाणी होते आणि वाहून जाते. उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी मिळणे दुर्लभ होते. म्हणून तेथील लोक ऊस-तोडणीसाठी निघतात.

दुष्काळी भागात ऊस-तोडणी करणाऱ्या मजुरांचा एक विशिष्ट वर्ग आहे. एका विशिष्ट वर्गाची आणि विशिष्ट प्रदेशातील लोकांचे जीवनचित्रण करणारी ही प्रादेशिक कादंबरी आहे. उन्हाळ्यात जनावरे आणि माणसे जगविण्याची समस्या निर्माण होते. म्हणून ते उपजीविकेसाठी सहा महिने घरदार सोडतात. जागा मिळेल त्या ठिकाणी कारखान्याच्या कोपी घालून गावागावातून ऊस तोडणी, मोळ्या बांधणे, गाड्या भरणे, कारखान्याच्या काट्यावर गाड्या घेऊन जाणे, काटा झाल्यावर अपरात्री कोपीवर येऊन पडणे आणि पहाटेच उठून परत कामाला लागणे असा पुरुषांचा दिनक्रम, तर स्त्रियांनाही पुरुषांच्या बरोबरीने काम करावे लागते. दिवसभर ऊसतोडणी आणि संध्याकाळी भाकर-कालवण करुन काट्यावर भाकरी पोहचविणे, शिळेपाके खाऊन पहाटे ऊस तोडणी आणि संध्याकाळी भाकरी-कालवण कामाच्या रगाड्यामुळे त्यांना विचार करायला सवडच मिळत नाही. कष्टाचा मोबदला किती मिळतो,

मुकादाम, चीटबॉय आणि अन्य कोणी आपले शोषण करते याची त्याना जाणीवही होत नाही. त्यामुळे शोषणकर्त्यांचे अधिक फावते. मुकादम कमिशनच्या आशेन न्हावी, शिंपी, सुतार, लोहार, यांनाही सोबत घेऊन येतो. धंद्यापाण्याला लावतो. स्वतः किराणा दुकान सुरू करून बेहिशोबी रक्कम जमवितो. अज्ञानी, निरक्षर मजूर हिशोब न विचारता मुकादम सांगेल तेथे विश्वासाने अंगठे उठवितात. मुकादम देईल ते घेऊन समाधान मानतात. एखाद्याने या शक्तीला विरोध केलाच तर त्याचा काटा काढण्यास हे शोषणकर्ते अनमान करीत नाहीत. सहा महिने राबून मल्हारी-सुरवंताच्या नावावर बाकी राहते. एखादीच न्याय-अन्यायाची जाणीव झालेली सुरवंता विचार करते. "...कष्ट न् कष्ट, दिवसरात्र आपण ढोरासारखं मरायचं. बैलानाही मारायचं अन् मिळवायचं काय... इथल्या कष्टाचा अन् पैशाचा नव्या नवलाईचा फुगा तिच्या मनी फुटला होता..." (पृ.४८) परिस्थितीने लाचार बनविलेले, अन्यायाची चीड नसलेले असे या समाजाचे जीवन आहे.

स्त्रिया कष्टाळू आणि अल्पसंतुष्ट असलेल्या दिसतात. त्या फारसा विचार करीत नाहीत. स्वतःला त्या "सांगितल्या कामाच्या आणि दिलेल्या भाकरी लुकड्याच्या धनी" समजतात. पुरुषांच्या कारभारात लक्ष घालण्याची कल्पना त्या करु शकत नाही. दिवसभर राबायचे. कामास उशीर झाला तर निमूटपणे नवऱ्याचा मार खायचा अशा त्या सोशीक असलेल्या दिसतात. सुरवंता न्याय-अन्यायाचा विचार बरोबरीने कष्टाळू स्त्रियांना सांगते तेव्हा त्यांना तिचे विचार पटत नाहीत. त्यांचा जन्म कष्ट करण्यासाठी झालेला आहे. विचार करण्यासाठी नाही. स्त्रियांच्या प्रकृती-बाळंतपणापेक्षा कारखान्याचा गळीत हंगाम लोकांना महत्त्वाचा वाटतो. काम व्यवस्थित झाले नाही तर कर्ज-उचल कशी फिटेल याची त्यांना काळजी वाटते. उदा. सुरवंता गरोदर असल्याच आनंद मल्हारीला होत नाही. कारण गळीत हंगाम संपण्याच्या अगोदर ती बाळंत झाली तर कसे होईल? याचा तो विचार करु लागतो. हुशार सुरवंता नवऱ्याच्या मनातील विचार ओळखते किंवा सुरवंतावर मुकादम बलात्कार करतो. तिचा पाय ऊसाच्या सरीमध्ये घसरतो. ती पोटावरच पडते. ऊसाच्या कटालाच तिच्या पोटातील गोळा पडतो. तिला दवाखान्यात घेऊन जावे लागते. डॉक्टर विश्रांतीचा सल्ला देतात. तेव्हा ऊस साळणार कोण? मोळ्या बांधणार कोण? कर्ज फिटणार कसे? असे मल्हारीला प्रश्न पडतात.

स्वतःच्या जीवापेक्षा गाडीच्या बैलजोडीवर ऊस-तोडणी मजुरांचे अधिक प्रेम असते. बैलाच्या जीवावर सर्व धंदा अवलंबून असतो. म्हणून ते त्यांचा चारापाणी-पेंड वेळेवर करतात. उदा. पेंड संपल्याचे मल्हारीला बायको सांगते आणि वाईट नजरेच्या मुकादमाच्या दुकानावरुन पेंड घेऊन येण्यासही ती नकार देते. तेव्हा म्हणतो, "नाय जातव? मग ऱ्हाऊंदी ही भाकरी बीऽ सोन्यासारखी जित्राबं उपाशी मारतीसऽ आन

नवऱ्याचचं कायऽ. ज्याच्या जीवाव धंदा कराचा त्याची अशी हेळसांड करुन कसा चालावाऽ.''(पृ.५२)

तरण्याताठ्या स्त्रियांवर मुकादम, बागायतदारांचे तरुण मुलं बलात्कार करतात. इभ्रतीला जपण्याठी हा सर्व अत्याचार स्त्रिया आतल्या आत पचवितात. निमूटपणे सर्व सोसतात. यातून त्यांची सोशीकवृत्तीच दिसते. उदा. सुरवंतावर मुकादम बलात्कार करतो आणि घडलेला प्रकार बाहेर न सांगण्याविषयी धमकी देतो. सुरवंतावर बलात्कार होऊन देखील ती मल्हारीला काही सांगत नाही. पोटातील गर्भ मुकादमाच्या कृत्यामुळेच पडला हे दु:ख ती आतल्या आत गिळते. उलट मुकादम साळसूदपणे जगतो. डॉक्टरांचे बील भरतो. ती आपले हुंदके आतल्याआत ठेवते. अन्यायविरुद्ध आवाज उठविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नाही.

प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे दुष्काळी भागातील लोक लाचार-लाजीरवाणे जीवन जगतात. त्यांना मुकादम मोठा उपकारकर्ता वाटतो. त्याच्यामुळे कारखान्याकडून उचल मिळते. बैल खरेदी करता येतात. संसाराचा गाडा पुढे रेटता येतो असा त्यांचा समज असलेला दिसतो. मल्हारीला मुकादमाने गडी पाहून देणे, बैल खरेदीसाठी दोन हजार रुपये उचल देणे, गोपदाला दवाखान्यात मदत करणे, सुरवंताच्या आजारपणातील दवाखान्याचे बील भरणे, अर्थात ही सर्व रक्कम व्याजासह वसूल करतो याची जाणीव मजूरांना नाही. नवऱ्याने मुकादमाचे मिंधे राहणे सुरवंताला आवडत नाही. पण परिस्थितीशी जुळते घेणारा मल्हारी मुकादमाकडे जातो, त्याची मदत घेतो. कारखाना बंद झाल्यावर मुकादम सर्व गाडीवानांना जेवण देतो. हे जेवण मजुरांच्या घामाच्या पैशातून दिले जाते, याची कल्पना त्यांना नसते. लेखक वर्णन करतो, ''रस आपण शोषून घेऊन आपल्या तोंडाला पानं पुसायची दुसरं काय.''(पृ.८५)

समाजाच्या पारंपरिक जीवनप्रवहाविरुद्ध वर्तन केल्यास समाज विरोधी वर्तन करण्यास आपल्यात सामाऊन घेत नाही. तेव्हा त्या समाजाचे कायदे-नियम पाळण्याचे बंधन प्रत्येकावर असते. दरवर्षी कर्ज-उचल आणि ऊस-तोडणीच्या चक्रातून बाहरे पडण्यचा विचार सुरवंता-मल्हारी करतात. बागायतदाराचे शेत वाट्याने करण्याची कल्पना कारभाऱ्यास सांगतात. कारभाऱ्याला त्यांची कल्पना मानय होण्यासारखी नसते. मुकादमाप्रमाणेच बागायतदार शोषण करतात असे तो समजावतो. यातून कारभाऱ्याचे व्यवहारी शहाणपणच दिसते. तरीही सुरवंता-मल्हारी तेजरामचा मळा वाट्याने करतात. तेजराम-सुरवंताच्या संबंधाबद्दल लोक बोलू लागतात. बरोबरीने वाटेकरी मल्हारीला सरळ शब्दात या अनैतिक संबंधाविषयी सांगतात. संतापलेला मल्हारी सुरवंताला मार देतो. तिच्या अनैतिक संबंधाने भडकतो. तेजरामचे लोक मल्हारीचा खून करतात. गरिबांचे विविध मार्गांनी शोषण कसे होते, त्यांचा जीव घेतला जातो. त्याचप्रमाणे स्त्रियांची फसवणूक झाली किंवा तिच्यावर बलात्कार झाला

तर तिचा अपराध नसताना देखील त्या स्त्रीला शिक्षा केली जाते अशी पुरुषप्रधान संस्कृती आहे. सुरवंतावर मुकादमाने बलात्कार केल्याचे जर तिने नवऱ्याला सांगितले असते, तर तिचे नांदणे अशक्य झाले असते. या भीतीपोटीच ती घडलेला प्रकार मल्हारीला सांगत नाही. आतल्या आत हुंदके देते. काही तरुण मुली चार पैसे घेऊन कामांधपणे शरीरसुखाची देवाणघेवाण करतात.

प्रतिकूल परिस्थितीशी झगडणाऱ्या लोकांच्या काही श्रद्धा, समजुती, विश्वास, प्रथा आहेत. देवीचे भक्त देवीचा देव्हारा घेऊन गावोगाव फिरतात. डोक्यावर पद घेतलेल्या स्त्रिया सुपात दाणे, कुंकवाचा करंडा घेऊन देवीचे दर्शन घेतात. यातून डोक्यावर पदर घेणे, दानधर्म करताना सुपात दाणे घेणे, अंबाबाईला कुंकू लावून तिचे दर्शन घेतात. यातून डोक्यावर पदर घेणे, दानधर्म करताना सुपात दाणे घेणे, अंबाबाईला कुंकू लावून तिचे दर्शन घेण्याची त्यांची संस्कृती आहे. पतीचे नाव घेताना उखाणे घालण्याची संस्कृती आहे. जसे सुरवंता नाव घेताना उखाणा घालते, "कुनाची कशी का असना नदर, मल्हारी राजाचं नाव घेते मी जलमभर" (पृ. १६) याप्रमाणेच मिरची, केरसुणीने दृष्ट काढण्याची प्रथा असलेली दिसते. दिवाबत्तीच्या वेळेला, बोहणी झाल्याशिवाय किंवा लक्ष्मी येण्याच्या वेळेला दुकानदार माल उधार देत नाही. ग्रामदैवतांवर लोकांची श्रद्धा असते. म्हणूनच वाडीतील लिंबाच्या झाडाखाली शेंदराने लालभडक झालेल्या शिळेला सुरवंता पायातले काढून नमस्कार करते. नवेवस्त्र अंगात घालून झोपू नये अशी समजूतही असलेली दिसते. बैलाला देव मानले जाते. बैलाची पूजा करण्याची प्रथा आहे. जसे कारभाऱ्याने जामखेडच्या बाजारातून नवीन बैल खरेदी करुन घरी आणला असता सुरवंता-गंगूबाई बैलाच्या पायावर तांब्याभर पाणी टाकून भाकरीचा तुकडा ओवाळतात. बैलाला हळदकुंकू लावतात. बैलाच्या पायाने घरात लक्ष्मी येते बरकत येते अशी त्यामागे कल्पना आहे. ग्रामजीवनामध्ये परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोकसाहित्य येते. तो त्यांचा सांस्कृतिक वारसाच असतो. कारभारी शालनला पुढील लोकगीत गाऊन दाखवितो, त्यातून संस्कृतिविशेषच स्पष्ट होता,

"मोरी गाय येली गनबाऽ मोरी गाय येलीऽ
गायीला झाला गोऱ्हा, गेनबाऽ गायीला झाला गोऱ्हा" (पृ.९५)

शेतकऱ्याच्या जीवनात बैलजोडीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ऊस-तोडणी करणाऱ्या मजुरांचा धंदा पूर्णपणे बैलांच्या जीवावर अवलंबून असतो. म्हणून तो गायीला गोऱ्हा व्हावा, त्याला वाढवावा, सजवावा असा विचार करतो. स्वत:पेक्षा बैलावर अधिक प्रेम करण्याची त्यांची संस्कृती आहे.

ग्रामीण भागामध्ये सहकारी तत्त्वावर साखर कारखाने सुरू झाले. त्यातून नवे नेतृत्व उदयाला आले. जनतेच्या हितासाठी सुरू झालेल्या साखर कारखनदारीतून

एक संधीसाधू वर्ग निर्माण झाला. सहकाराचा उपयोग स्वाहाकारासाठी होऊ लागला. तालुका, जिल्हा आणि राज्य केंद्राचे नेतृत्व साखरसम्राटांच्या हातामध्ये गेले. सत्तेच्या विकेंद्रीकरणाऐवजी केंद्रीकरणच झाले. साखर कारखान्याचे चेअरमनकडे पैशापाठोपाठ विविध पदे जाऊ लागली. त्यांना सत्तेची हाव सुटली. नशा चढली. गोरगरीब सभासद-मजूर-कामगार यांच्याकडे लक्ष देण्यास त्यांना वेळ मिळेनासा झाला. विविध मार्गांनी शेतकरी सभासद मजूर आणि कामगारांचे शोषण सुरू झाले. त्यापैकी ऊस-तोडणी करणाऱ्या मजुरांचे जीवनचित्रण हा या कादंबरीचा विषय आहे. मजूर आणि कामगारांच्या श्रमावर साखर कारखाने चालतात. परंतु श्रमजीवी ऐवजी मोठेपण अधिकारी, पदाधिकारी आणि पुढाऱ्यांना मिळते. पैशाच्या जोरावर निवडणुका लढविणारे कारखान्यावर मिरवितात. कारखान्याच्या गाड्या वापरतात. गळीत हंगामाच्या उद्घाटनासाठी मंत्र्यांना निमंत्रित करुन कारखान्यातर्फे, कामगार-मजुरांतर्फे लाखो रुपयांच्या थैल्या भेट देतात. ऊस-तोडणी कामगारांच्या वाढीव दरातील फरकाच्या रकमेतून कारखान्यांच्या अध्यक्षांना भेट देण्यासाठी गाड्या खरेदी केल्या जातात. याची कल्पना मजूर कामगारांना नसते. गळीत हंगामाच्या प्रथम दिवशी कारखान्याचा परिसर सुशोभित केला जातो. मंत्र्याच्या हस्ते गव्हाणीत मोळी टाकून गळीत हंगामाला सुरवात होते. फोटो-फेटे-भाषणे होतात. आश्वासने दिली-घेतली जातात. मेजवान्या होतात. खरा कष्ट करणारा, मजूर कामगार या सर्वांपासून वंचित असतो. युनियनचे पदाधिकारी, पुढारी आणि शासनाचे प्रतिनिधी सर्वच एकमेकांचे सोबती-सहकारी असल्यामुळे कष्ट करणाऱ्यांपर्यंत हक्क-कष्टाची रक्कम पोहचत नाही.

मजूरासाठी साखरसंघाकडून वाढीव दरातील फरकाची रक्कम देण्याची घोषणा होते. पण कागदोपत्री फरक दिल्याचे दाखविले जाते. अध्यक्षांसाठी मजूरांकडून गाडी सप्रेम भेट देण्याची कल्पना पुढे येते. मजुरांना याची कल्पना नसते. उरलेली रक्कम मुकादम आपल्या खिशात घालून मोकळा होतो. दिवसरात्र कष्ट करणाऱ्यांना हक्काची रक्कम मिळत नाही. विविध मार्गांनी, विविध लोक ती रक्कम वाटून घेतात. ग्रामविकासाच्या कल्पना प्रत्यक्षात येत नाहीत. राजकीय कार्यकर्ते सोयीस्कर त्याकडे दुर्लक्ष करतात. कारण जामखेड सारख्या दुष्काळी प्रदेशात बंधारे बांधले, वाहून जाणारे पाणी अडविले, जिरविले तर ऊस-तोडणी मजूर मिळणार नाही, म्हणून विकास योजनाच राबविल्या जात नाहीत. परिणामी दुष्काळी भागातील लोक उपजिविकेसाठी कारखान्यावर येतात. मुकादमाविरुद्ध ते आवाज उठविण्यास असमर्थ असतात. आवाज उठविणाऱ्याला चिरडून टाकले जाते. उदा. मुकादम मनमानेल त्याप्रमाणे किराणामालाचे बाजारभाव लावतो, म्हणून गोपादा चिडतो. मुकादमाशी भांडतो. मुकादम त्याला दुसरीकडून सामान घेण्यास सांगतो. तेव्हा गोपादा म्हणतो, ''तिथं त घोडं पेंड खातावऽ आमच्या नाड्या तुमच्या हातातऽ रोख पैका न्हाय म्हनून ऽ पर ही

खरं न्हाव ऽ'' (पृ.६३) गोपादाने विरोध केला म्हणून त्याचा आवाज बंद करण्यासाठी त्याच्या बैलगाडीला ट्रकची धडक दिली जाते. त्याचा धंदा बुडतो. सर्वजण या चक्रामध्ये पिळले-भरडले जातात, तरीही अन्यायाविरुद्ध आवाज उठवित नाही. अगतिक होतात. गावाकडे जाण्यासाठी एस.टी.भाडे देण्याऐवजी तेवढेच पैसे गावाकडे पाठविले तर अधिक चांगले होईल असे मल्हारीला वाटते. मुकादमाकडून उचल घेऊन ते गावाकडील लोकांना पैसे पाठवितात. कारखान्यांची क्लिनिंग मजूरांना परवडत नाही, कारण वाढे विकता येत नाहीत. जनावरांना चारा उपलब्ध होत नाही आणि मुख्य म्हणजे धंदा बुडतो म्हणून त्यांना सुट्टी देखील नको असते.

परिस्थितीशी झगडत केवळ पोटाची खळगी भरीत विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर घेऊन फिरण्यामुळे मुलांना शिक्षण देता येत नाही. पोटासाठी ते फिरतात. शाळा त्यांच्यामागे कशी येईल. शिवाय मुले हाताखाली काम करण्याजोगी झाल्यावर तेवढीच मदत होते. मुले जनावरे राखतात. लहानमुलांना सांभाळतात. वाढे गोळा करतात. ऊस-तोडणीच्या धंद्याचे शिक्षण मिळते. मुले जनावरे राखतात. लहानमुलांना सांभाळतात. वाढे गोळा करतात. ऊस-तोडणीच्या धंद्याचे शिक्षण मिळते. मुले मोठी झाल्यावर त्यांना याधंद्यात काही अडचणी येत नाहीत म्हणून मुलांना शाळेत घालण्याचा विचार लोकांच्या मनात येत नाही. निरक्षर नगरी लोकांचे शिक्षणाअभावी शोषण होते.

कादंबरीच्या निवेदन आणि संवादाची भाषा नगरी बोलीच आहे. नगरी हेल किंवा लकबीही लेखकाने सूक्ष्मपणे टिपल्या आहेत. उदा. 'याऽ बया', 'कश्यालाव?', 'आता ग बयेऽ', 'व्हैकीऽ', 'जाऊं द्या बया ऽ' 'तुम्ही हाव?...'', 'बघती... जमताव का?' इत्यादी. म्हणी वाक्प्रचारांचाही लेखकाने स्वाभाविकपणे वापर केलेला दिसतो. उदा. 'ऊस चांगला लागताव म्हनुन मुळापत्तूर खाऊ नी भौऽऽ', 'हारबारं खाऊन हात कोरडचऽ', 'नाचायचं म्हंजी आंगान तेढ म्हणून जमताव!', 'वाळूत मुतलं, वळ ना कळ', 'तोंड दाबून बुक्क्याचा मार', 'आपलं येरे माझ्या मागल्या अन् ताककण्या चांगल्या', 'बोलणाऱ्याच्या अंबाड्या इकतेत, न बोलणाऱ्याचे गहू पण खपत नाहीत.'

नगरी बोलीतील काही खास आशनघन शब्दातून प्रदेश स्पष्ट टिपता येतो. हावारकी, झकास, काडली, मिळतीव, गुरमळायलाा, सरमाड, मायंदाळ, परुस, इराकत, पायरव, भौऽ, म्हनाचीला, आपशी र वेवस्ता, इरीसरीनं, पंचाती, उडलीवऽ, वेवस्तशीर, व्हलबडायचं, भांडानगिंडान, चुई, सुमडी, बिगीबिगी, म्वॉलमजुरी, हिक्कडलं, कवाशीक कंदी, मपल्या, विलाज, याप्रमाणे टैम, विंजेक्षण, मेम्बर, चीट बॉय, फिलींग इ. शब्द आधुनिकीकरणाच्या प्रभावातून आलेले दिसतात.

अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड या दुष्काळी प्रदेशातील ऊस-तोडणी मजूरांचा जीवनसंघर्ष लेखकाने समर्थपणे रेखाटला आहे. आशयदृष्ट्याही वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक कादंबरी असली तरी कादंबरी म्हणून ती सामान्यच आहे.

### ४. राजन गवस - ''चौडकं''

राजन गवस यांची १९८५ साली प्रसिद्ध झालेली 'चौडकं' ही जोगतीणीच्या जीवनावरील कादंबरी आहे. त्याचप्रमाणे त्यांची 'भंडारभोग' (१९८८) ही जोगत्याच्या जीवनावरील कादंबरी आहे. समाज व्यवस्थेतील जोगतीण-जोगत्याची समाजामध्ये कशी उपेक्षा होते हा दोन्ही कादंबऱ्यांचा विषय आहे. 'चौडकं' ही जोगतीण (देवदासी) या वर्गाच्या जीवनावरील प्रादेशिक कादंबरी आहे. 'देवदासी' हा प्रकार कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमाभागावरील प्रदेशात दिसतो. अन्यत्र दिसत नाही. मुरळी-भावीण या स्त्रीवर्गाप्रमाणेच जोगतीण हा यल्लमाच्या दासीचा प्रकार आहे. मुरळी खंडोबाला सोडली जाते. भावीण मंगेशीची पूजा करते, तर जोगतीणीचे यल्लमाच्या दासीचा प्रकार आहे. तर जोगतीणीचे यल्लमाशी लग्न लावले जाते. मळ्याचे दर्शन बांधून तिला गावामध्ये जोगवा मागत फिरावे लागते. समाजाच्या अज्ञानाची आणि स्त्रियांवरील अन्यायाची 'चौडंकं' ही कथा आहे.

सुबाना-बायजाची एकुलती एक लाडकी मुलगी 'सुली'ला देवीची जट आली. हटणीच्या जोगणीने डोंगरावरच्या यल्लूआईला जोगणी म्हणून तिला सोडण्यास सांगितले. सुलीला जोगणी म्हणून सोडण्याची कल्पना सुबानाला आवडली नाही. त्याने खूप विरोध केला. दोघही हळहळले. अल्लड सुलीला यातले काहीच समजले नाही. संसारात यश नाही. देवाचे केलेच पाहिजे म्हणून जमीन गहाण ठेवून देवीच्या दर्शनाला हजारो भाविकांबरोबर ''उदं गऽऽ आई ऽ उदंऽऽ'' करीत डोंगरावर गेले. लोकांनी नवस फेडले. लिंब नेसले. सुलीला लिंब नेसवला. सुलीच्या गळ्यात विधिपूर्वक 'दर्शन' बांधून तिला जोगतीण बनविले. माघारी आले. बायजाला हिग्लजच्या दवाखान्यात बाळंतपणासाठी नेले. बायजा वाचली पण मुलाचा मृत्यु झाला. देवीचे कारण्यात काहीतरी चूक झाली असे श्रद्धाळू बायजाला वाटू लागले. हटणीच्या आक्कू जोगतीणीने मंगळवार, शुक्रवारी 'सुली'ने जोगवा मागावा असे सांगितले. आजीला अर्धांगवायू झाल्यापासून सुली गावभर जोगवा मागू लागल. सुलीच मागेमागे गावातील तरुण फिरु लागले. तिने कामांध तरुणांना फैलावर घेतल्यावर गावातील आयाबायांनी तोंड सोडले. सुलीची जोगतीण म्हणून हेटाळणी केली. गावातील स्त्रियांच्या आणि तरुणांच्या वर्तनामुळे सुली अस्वस्थ झाली. तिचे वडील, संतापले, पण त्यांचे संतापणे निरर्थक होते. कारण त्यांनी सुलीला जोगतीण सोडण्याची चूक केली होती. संकट काळात बबन्याचे उपकार केल्याने सुलीला त्याबद्दल सहानुभूती वाटू लागली. ते दोघे भावनिकदृष्ट्या एकमेकांच्या अधिक जवळ आले. त्यांचे दोघांचे शरीरसंबंध आल्याने ती गरोदर राहिली. उफाड्याच्या सुलीची बायजाला काळजी वाटू लागली. अब्रूची किंवा घराण्याची ती काळजी करु लागली. सुलीकडे ती संशयाने पाहू लागली. सुलीशी लग्न करण्यास बबन्या नकार देतो. त्यांच्या अनैतिक संबंधांबद्दल

गावभर उलटसुलट चर्चा होऊ लागली. गर्भ पाडण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला. सुबाना बबन्याचा खून करण्याचा हट्ट घेऊन वेडा झाला. बायजाचा मृत्यु झाला. समाजाच्या देवीवरील विश्वास-अज्ञानामुळे मुलींना देवदासी बनविले जाते. तिच्या भावभावनांचा विचार केला जात नाही. गावातील पुरुषांशी तिने शरीरसंबंध ठेवण्यास समाज मूकसम्मती देतो. परंतु, त्यातून जोगतीण गरोदर राहिल्यास तिच्यावर शितोडे उडवितो. तिच्या भावनेशी खेळतो. समाजात देवाची दासी म्हणून तिला मान प्रतिष्ठा असते. परंतु स्त्री म्हणून तिला प्रतिष्ठा-मान नसतो.

कादंबरीतील 'सुली'चे व्यक्तिचित्रण ठसठशीत झाले आहे. बायजा आणि सुबानाचे व्यक्तिरेखाटन स्वाभाविक, जिवंत वाटते. अल्लड, निष्पाप अशा सुलीच्या केसांमध्ये जट येते. आईने आंघोळ घालातना ती मोठमोठ्याने ओरडते. केस विंचरताना बायजाच्या हाताला जट लागते. किंवा त्या हात लावताच तिला कणक भरते. म्हणून ती हटणीच्या अक्कू जोगतीणीला भेटते. यल्लमाला सुलीचे केस आवडले. तिला जोगतीण म्हणून सोडण्याचा सल्ला दिला जातो. अज्ञानामुळे आणि देवीवरील श्रद्धेमुळे निष्पाप सुलीला जोगतीण बनविले जाते. जोगतीणीने लग्न न करण्याची प्रथा असल्यामुळे शरीरधर्माप्रमाणे तारुण्यात तिचे बबन्याशी शरीरसंबंध येतात. ती गरोदर राहते. गावभर अनैतिक संबंधाबद्दल चर्चा होते. संसारातील सुखासाठी निष्पाप सुलाचा बळी घेतला जातो. तिच्या भाव-भावनेची-मानसिकतेची कदर केली जात नाही म्हणून कोंडमारा होऊन तिच्या आईचा मृत्यू होतो. समाजपरिस्थितीची सुली 'बळी' ठरते. माणूस म्हणून तिला जगता येत नाही. अगतिक, सोशीक सुलीची व्यक्तिरेखा जिवंत साकार झाली आहे. त्याचप्रमाणे अक्कू जोगतीण, शेवंता, गंगूबाई, तानु सुतारीन आणि फुली या जोगतीणीमधील संघर्ष चित्रित करुन त्याचे जिवंत चित्र रेखाटले आहे.

हिराबाई, रक्कमा, भैरु मोहित्य, बाळू महार, संभा, यशवंता, तुका, गणपुतात्या, सखा, बबन्या, सुसा, सखु आणि अन्य गावकरी-यात्रेकरु यांचे चित्र सुलीच्या जीवनचित्रणास पोषक असे रेखाटले आहे. त्यामुळे उपेक्षित जोगतीचे जीवनचित्रण वस्तुनिष्ठ झाले आहे.

गळ्यात दर्शन, कपाळाला भंडारा, हातात चौडकं घेऊन यल्लमाची सेवा करणाऱ्या देवदासीच्या अंतरीची व्यथा लेखकाने शब्दबद्ध केली आहे. जोगतीण ही एक समस्या आहे. समाजाला या स्त्रिया भोगण्यासाठी हव्या असतात. शरीर संबंधासाठी त्यांना जवळ केले जाते. त्यांच्याशी लग्न मात्र कोणीही करीत नाही. त्यांच्या व्यथा-वेदनांचे चित्रण लेखकाने 'सुली'च्या भावविश्वाच्या पार्श्वभूमीवर केले आहे. देवदासींचे समाजातील स्थान कसे नगण्य आहे. तिच्या भावनांना अर्थ नाही. देवदासी स्त्रीचे जीवन निरर्थक आहे. खेळकर सुलीच्या डोक्यात जट आली. यल्लमाला सुलीचे केस आवडले.

सुबाना-बायजाच्या देव्हाऱ्यात बसण्याची इच्छा देवीने अक्कू जोगतिणीच्या वाऱ्यातून सांगितली. सुबानाचे देवस्थान जोतिबा, लक्ष्मी, अंबाबाई आहे. यल्लमा त्यांचे कुलदैवत नाही. त्यामुळे यल्लमा देव्हाऱ्यात बसविणे त्याला मान्य नाही. परिस्थितीला तो शरण जातो. डोंगरावरुन यल्लमाचा टाक आणून विधिपूर्वक देव्हाऱ्यामध्ये ठेवला जातो. अनिच्छेने, अज्ञानामुळे मुलींना देवदासी बनविले जाते.

देवदासीचे देवीबरोबर लग्न होते. तिला लग्न करता येत नाही. श्रद्धाळू बायजा घरात टाक आल्यानंतर माहेरला जाते. आई आणि भावंडांना भेटते. बोलता बोलता भाऊ ज्वंलत समस्येला तोंड फोडतो. सुलीच्या लग्नाचे कसे? या प्रश्नाचा बायजानेही विचार केलेला नसतो. ती बेचैन होते. निष्पाप मुलीचे पुढे कसे होईल याचा विचार करु लागते. समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर अज्ञान असल्यामुळे देवदासी ही सामाजिक संस्था आजही नष्ट होऊ शकली नाही. सुलीने जोगवा मागितला नाही म्हणून बायजाचे मूल बाळंतपणात मेले असे लोक समजतात किंवा आजीला अर्धांगवायूचा झटका आल्यापासून सुली गावभर जोगवा मागायला लागली. कारण देवीची सेवा करण्यात कुचराई झाली म्हणूनच घरामध्ये वाईट घटना घडल्या असाही समज असलेला दिसतो. यातून समाजाचे अज्ञानच दिसते.

गावातील तरुण देवदासींची टिंगल टवाळी करतात. तिच्या शरीराचा उपभोग घेऊ पाहतात. त्यांना समज दिल्यास गावातील अन्य स्त्रिया म्हणतात, "जोगतीण ती जोगतिण आणि आव कसा सव्वासिनीचा आणती..." म्हणजेच, स्त्रियांकडनही जोगतिणीची उपेक्षाच होते. त्यांनी गावातील तरुणांशी अनैतिक संबंध ठेवण्यास समाजाची मूकसम्मतीच असते. तिचे शील भ्रष्ट झालेलेच असते असे समाज गृहीत धरतो. म्हणजेच जोगतीण देवीला आणि गावाला सोडलेलीच असते हे समाजाने मान्यच केलेले असते. परंतु अनैतिक शरीरसंबंधातून जोगतिण गरोदर राहिल्यास लोक कुजबुजतात. जन्माला येणाऱ्या मुलाचे पालक होण्यास कुणीही तयार होत नाही. तानु सुतारीन आणि निकमाचा म्हातारा यांचे अनैतिक संबंध असल्यामुळे तुक्याने म्हातारी बडविली. जोगतिणीमध्येही आपापसात वाद असतात. उदा. फुलीबद्दल शेवंताला संशय येतो. उफाड्याची सुली अब्रू घालविल अशी बायजाला भीती वाटते. रंबव्वा जोगतिणीची अनेकाबरोबर अनैतिक संबंध असल्यामुळे इतर जोगतिणीबद्दल लोक त्यादृष्टीने बघतात. एखादीने व्यभिचार केला तर सर्वच देवदासींना समाज व्यभिचारी ठरवतो. उलट त्यांनी एका पुरुषाबरोबर शरीरसंबंध ठेवणे समाजाने मान्यच केले आहे. व्यभिचारामुळे देवदासीचा गर्भ वाढला तर तो नाहीसा करावा असा संकेत आहे. सुलीच्या पोटातील गर्भ पाडून टाकण्याचा सल्ला शेवंता जोगतीण देते. कारण गाव जोगतिणीला सुखाने जगू देत नाही. लाज पुरुषांना नसते, स्त्रियांना असते असे शेवंता सांगते.

समाजातील ढोंगी, स्वार्थी, मतलबी वृत्तीवर लेखकाने प्रकाश टाकला आहे. बायजा-सुबानाला मूल होण्याची चिन्हं नाहीशी होतात. भाऊबंदकी जमिनीच्या आशने त्यांच्याशी गोड बोलतात. भाऊबंदकी संपते. लोक अनीतीने वागतात. मुलाच्या मृत्यूबरोबर मिसाळाच्या म्हातारीने सुनेच्या गळ्यातील डोरले प्रथम तोडले आणि नंतर रडायला सुरवात केली.

अब्रू-प्रतिष्ठेला जपणारी माणसं तोंड काळं होण्याच्या भीतीने भांबावतात. म्हणून 'रांडनं नापत घालीवली' असे बायजा म्हणते, तर बबन्याचा खून करण्याठी सुबाना धडपडतो. काळजीने बायजा मरते. गावातील स्त्री-पुरुष देखील सुलीकडून सभ्यवर्तनाची अपेक्षा करतात. एकूणच समाजातील परस्परविरोधी क्रिया-प्रतिक्रियांच्या पार्श्वभूमीवर लेखकाने समाजवास्तवाचे दर्शन घडविले आहे. एका बाजूने मुलींना जोगतीण बनविणारा, सण-उत्सवाला तिला मान देणारा समाज तिची अब्रू घेतो, तिच्याशी अनैतिक संबंध ठेवणे मान्य करतो. परंतु गर्भधारणा झाल्यास तिच्यासंबंधी वाईट बोलतो, तिची बदनामी करतो, निंदा नालस्ती करतो.

यल्लमावर श्रद्धा असलेल्या आणि स्त्रियांना देवदासी करणाऱ्या समाजामध्ये अनेक समजुती, प्रथा, शुभ-अशुभाच्या कल्पना असल्याचे दिसते. देवीच्या भंडाऱ्याने लगीर नाहीसे होते. जट आलेल्या मुलीला देवीला सोडण्याची प्रथा आहे. देवीच्या दर्शनाला पायी किंवा बैलगाडीने जायचे, इतर साधनांनी नाही. देवीला गाय सोडली जाते. तिचा भंडारा खाल्याने रोग बरा होतो. बाहेरची बाधा नाहीशी होते. ती नवसाला पावते. मूलं होतात. मुलं झालेले लोक प्रत्येकवर्षी देवीला जातात. देवदासीने मंगळवार-शुक्रवारी गावामध्ये जोगवा मागण्याची प्रथा आहे. तसेच देवीची आंबील-घुगऱ्याची जत्रा करण्याची प्रथा आहे. कारतवेळी उंबऱ्यात उभे राहणे अशुभ समजले जाते. बाळंतीण आणि मेलेल्या माणसचा इटाळ (विटाळ) पाळण्याची प्रथा असून विटाळलेल्या घरामध्ये जाताना लिंबाच्या पाल्याने अंगावर पाणी टाकण्याची पद्धती आहे. जत्रेचे वाटेने नको ते उद्योग-असभ्य वर्तन केले तर देवी कोपते अशी समजूत आहे. दृष्ट लागू नये म्हणून भाताचा ढिकळा आणि भाकरीचा तुकडा ओवाळून टाकण्याची प्रथा आहे. जारणमारणावर लोकांचा विश्वास असल्यामुळे अमावास्या-पौर्णिमेला उतारा करण्याची प्रथा असलेली दिसते. उतारा करताना लिंबावर काळं-तांबडं लावून टाचण्या टोचल्या जातात. त्यानंतर उतारा टाकला जातो. या सर्वांच्या चित्रणामुळे कादंबरी अधिक वस्तुनिष्ठ झाली आहे.

देवीवरील अंधश्रद्धेपोटी सुलीला देवदासी बनविले जाते. देव्हाऱ्यात देवीचा टाक बसविणे, यातून त्यांची देवीवरील श्रद्धा असलेली दिसते. नशिबावर हवाला ठेवण्याची वृत्ती दिसते. सुलीच्या लग्नाचे कसे होईल? असे मामाने विचारताच बायजा म्हणते, "तिच्या नशिबात काय आसलं तसं व्हईल." (पृ.२८) डोंगरावरील देवीच्या दर्शनाला

निघालेल्या लोकांना निरोप देण्याची पद्धती प्रदेशाचे वैशिष्ट्य म्हणूनच लक्षात घ्यावे लागते. जोगतीण बनविण्याची पद्धतीही लक्षात घेण्यासारखी आहे. उदा. हलगी वाजविली जाते. जोगतिणी नाचतात. गाव म्हारोडा जमा होतो. कपाळाला भंडारा लावला जातो. पाण्याच्य घागरी घराघरातून बाहेर योत. गाडीसमोर लिंबू कापले जाते. सजवलेल्या बैलाला काळे ठिपके लावले जातात. देवीचा उदोऽऽ उदो ऽ केला जातो. (पृ.३४-३५) मुलीला देवदासी करताना तिच्या गळ्यात 'दर्शन' बांधले जाते. देवीला नैवेद्य दिला जातो. कपाळाला भंडारा लावला जातो. लिंब नेसवला जातो. जटांना भंडारा लावला जातो. नवेवस्त्र, हातात सुपारी, नारळ, पानाचा विडा दिला जातो. पूर्वेकडे तोंड करुन बसविले जाते. हातात परडी देतात. गळ्यात कवड्यांची माळ घालतात. पाचवेळा आईचा उदो ऽ ऽ उदो करुन चौंडक वाजविले जाते. जोगतीणी गाणे म्हणतात. अशाच प्रकारे सुलीचे देवीबरोबर लग्न झाले. "परशराम तान्हा" ऽ ऽ" (पृ. ५३) हे गीत म्हटले जाते. देवीच्या जत्रेच्या निमित्ताने मेळा बोलविला जातो. मेळ्यामध्ये जोगते - जोगतीणी मिळून गाणे म्हणून उदरनिर्वाह करतात. चौडक्याच्या तालावर जोगतीणी पुढीलप्रमाणे गीत म्हणतात. त्यातून त्यांच्या संस्कृती-श्रद्धेचे दर्शनच घडते.

"डोंगरावर गेल्यावर कळ ऽ ऽ
माझ्या यल्लूआईचं बळ ऽ ऽ" किंवा
"आई तुझ्या नादानं नाव गाव सोडलं
कसं बाई नितीनं ताळमेळ मोडल.
डोंगराच्ये आई तुझं महातम मी सोडलं ।
कपाळाच्या रेशांनी वैर कसं मांडलं ऽ ऽ" (पृ. )

आर्थिकदृष्ट्या मागासलेपण आणि शिक्षणाअभावी असलेल्या अज्ञानाने देवदासीची संस्था आधुनिक युगातही टिकून असलेली दिसते. बायजा-सुबाना हे आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या स्तरातील आहेत. नाचारीचा संसार सुखाचा व्हावा म्हणून जमीन गहाण टाकून देवीच्या दर्शनाला जातात. सुलीच्या गळ्यात दर्शन बांधतात. देव्हाऱ्यात टाकाची पूजा होऊ लागते. ते दुसऱ्याच्या विहिरीवर रोजगाराला जातात. पावसाळ्यात जमिनीच्या मशागतीसाठी, भात-नाचणीचे "बी" घेण्यासाठी सुबानाजवळ पैसे नसतात. वाढत्या वयाबरोबर सुली जोगवा मागू लागली किंवा तेला मिठाला हातभार म्हणून दुसऱ्याच्या शेतावर मजूरी करु लागली. उपाशीपोटी भांगलणीला जाऊ लागली. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांची देवादिकांवर अधिक श्रद्धा असते.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमेजवळील हिटणी, इचनाळ, हिग्लज, संकेश्वर, नायकी, व्हलेल, गोकाक, मन्नोला, जोगलभावी गावाची भौगोलिक पार्श्वभूमी कादंबरीला लाभली असून कादंबरीचे निवेदन आणि संवाद तेथील बोलीतील आहेत. अनेक

अर्थघन शब्द प्रदेशविशिष्ट आहेत. उदा. झालतं, उलाटलतं, पसारलीती, जेवणवकोत, ठिसाकली, ववसालतास, बसलोतो, पेंगालती, कावली, भिरंबाटल्यासारखी, साळोता, भावी, अबजूग, काववारुन, धिंदऱ्यागत, भिन्नाटल्यागत, गुणंताळा, गदबाळली, तान्ह्यावलीती, हेडं, वावकाडं, इदोस, किलतानं, फिराटी, सरकदान, देवदासीच्या जीवनाशी निगडीत 'दर्शन', 'चौंडक' हे प्रदेश विशिष्ट शब्द आहेत. स्त्रिया बोलताना जातो, थांबलोय, गेल्तो असे पुरुषांप्रमाणेच बोलतात. ''म्हार सोडूने म्हारोड्यात आणि रेडा सोडू ने...'' (पृ.१२०) यासारख्या म्हणी आहेत. घटना-प्रसंग जिवंत करण्याचे सामर्थ्य लेखकाच्या लेखणीत आहे. त्याचप्रमाणे संवाद स्वाभाविक वाटतात. समाजाच्या एका उपेक्षित स्तरातील स्त्रियांच्या निरर्थक, भोगवस्तू जीवनाविषयी वाचकाला चिंतनप्रवृत्त करण्याचे सामर्थ्य कादंबरी आहे.

## ५. आनंद पाटील - ''कागूद'' आणि ''सावली'' (१९८६)

आनंद पाटलांच्या 'कागूद' आणि 'सावली' या दोन लघुकादंबऱ्या १९८६ मध्ये प्रसिद्ध झाल्या. निमकोकणातल्या दोन खेडेगावामध्ये दोन्ही कादंबऱ्यांचे कथानक घडते.

### ५.१ *'कागूद'*

कागूद म्हणजे जमिनीचे खरेदीखत करणे. त्यात येणाऱ्या अडचणी केंद्रस्थानी ठेवून एक संपूर्ण खेडे त्यानिमित्त साकार केले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शित्तूर गावच्या पांडबा जाधवाकडे पूर्वीपासून किसन बनसोड्यांची 'नागझरी' ही जमीन गहाण पडलेली असते. किसनच्या मृत्युनंतर त्याचे भाऊबंद या जमिनीवर हक्क सांगू लागतात. बाबूच्या चुलत्याला (नानाला) ते दमदाटी करतात. शेतावरील हक्क सोडण्यास सांगतात. ही जमीन किसनच्या मुलीकडून गुपचूप खरेदी करण्याचा निर्णय पांडबा घेतो. तो साताऱ्याला शिकणाऱ्या मुलाला बाबूला मदतीसाठी बोलावतो. बाबूला या कटकटी नको वाटतात. तरीही नकळत त्यामध्ये तो गुरफटला जातो. खरेदीसाठी पैसे जमा करण्याचा प्रश्न निर्माण होतो. घरात पैशमुळे संघर्ष सुरू होतो. नाना-पांडबा एकमेकाचा तिरस्कार करु लागतात. बाबू मध्यस्थी करुन त्यांच्यातील वाद मिटवितो. सेक्रेटरी, बँक अधिकाऱ्याच्या मदतीने कर्ज काढून झळ सोसून जमीनीचे खरेदीखत केले जाते. जमीन खरेदी किंवा 'कागूद करणे' असे कटकटीचे असते याचे जिवंत चित्र रेखाटले आहे.

ग्रामजीवनाशी संवादी आणि विसंवादी असे व्यक्तिचित्रण लेखकाने केले आहे. बाबूची व्यक्तिरेखा विसंवादी आहे. तर अन्य व्यक्तिरेखांवर ग्रामजीवनातील प्रतिष्ठेच्या कल्पनांचे संस्कार झालेले दिसतात. बाबूची व्यक्तिरेखा अधिक महत्त्वाची आहे.

साताऱ्याच्या शिवाजी बोर्डींगमध्ये प्रथमवर्ष, बी. ए. च्या वर्गात शिक्षण घेणरा तो साधा, सरळ, भाबडा आणि आदर्शवादी तरुण आहे. ग्रामीण जीवनातील तिढे-भानगडीमध्ये त्याला फारसा रस नाही. खेडूतांचे विश्व त्याला संकुचित वाटते. परदेशात जाऊन उच्चशिक्षण मिळवावे अशा महत्त्वाकांक्षी वृत्तीचा तो आहे. शिक्षणामुळे व्यवहारी जगाशी पारखा झालेल्या बाबूला खेड्यातील नवे गावगुंड हरघडी फसवितात. आबा आणि बाबूमध्ये विसंवाद निर्माण होतो, त्याची कारणही स्वाभाविकच आहे. दोघांचे दृष्टिकोन भिन्न आहेत. आबाची वृत्ती प्रतिष्ठा जपणाऱ्याची आहे. परिस्थितीमुळे ते चिडखोर झालेले, गावगुंडीचे ज्ञान असलेले, निरक्षर, व्यवहारी शहाणपण असलेले आबा 'कागूद' केल्याशिवाय शांत बसत नाही. नाना, नानी, आजी आई या गौण व्यक्तिरेखा सामान्यांचे प्रतिनिधित्व करतात. जमनीची खरेदी व्हावी असे सर्वांनाच वाटते, तर सेक्रेटरी, बँक अधिकारी, रजिष्ट्रार, कारकून, शिपाई व अन्य गौण व्यक्तिरेखांच्या चित्रणामुळे कादंबरी वस्तुनिष्ठ झाली आहे. 'कागूद' ही केवळ आबा-बाबूच्या कुटुंबाची कथा नाही तर 'शित्तूर' गावातील भाऊबंदकी, गावगुंडीची कथा आहे. ती समूहकथा आहे. त्यामुळे कादंबरीतील समाजजीवन चित्रण अधिक स्वाभाविक वास्तव वाटते.

कोल्हापूर जिल्ह्यातील मलकापूर जवळील शित्तूर या आडवळणी खेडेगावची भौगोलिक पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. निमकोकणचा हा 'प्रदेश' आहे. चांदोली, नावली, बांबवडे, पन्हाळा ही या परिसरातील इतर खेडे आहेत. येथे एस. टी. येत नसली तरी या लोकांचा कोल्हापूर-मलकापूर शहरांशी संबंध आहे. सह्याद्रीच्या कड्याजवळील घनदाट जंगलाचा हा प्रदेश आहे. कादंबरीत या प्रदेशाला महत्त्व आहे. या प्रदेशाची वैशिष्ट्यपूर्ण निसर्गपार्श्वभूमी आहे. लेखक वर्णन करतो, ''पांदीची चिव्याची बेटं रामपाऱ्यानं वाऱ्यात कर.करत होती. ऐनावरच्या साळुंक्या कलकलत होत्या. कोळक ओढ्याच्या झाडीचा पट्टा वस्ताऱ्यानं खरवडून बोटभर पट्टी उरावी तसा उघड्या बोडक्या शिवारात उठून दिसत होता. घर दिसायला लागलं तसा बाबू तडाक्यानं चालू लागला.''(पृ.१०).

भू-वैशिष्ट्ये किंवा निसर्गचित्रण लेखकाच्या दृष्टीने येथे महत्त्वाचे आहे. तसेच जमीन खरेदीखताच्या निमित्ताने बदलत्या खेड्यामध्ये निर्माण झालेल्या समस्येचे चित्रण करणे हा उद्देश असल्यामुळे अवघ्या साठ पानांमध्ये ही समस्या जिवंत केली आहे. आधुनिकीकरणाच्या प्रभावातून ग्रामीण भागामध्ये परिवर्तन आले. मुले शिक्षण घेऊ लागली. स्वार्थ असेल तेथेच परोपकाराची वृत्ती दिसू लागली. शिक्षण घेणाऱ्या मुलांचे शेतीकडे दुर्लक्ष होऊ लागले. त्यामुळे ग्रामीण समाज व्यवसथेलाच हादरा बसला. जमीन गहाण पडणे किंवा विकण्याची वेळ येणे ही गोष्ट लोकांना इभ्रतीला धक्का लावणारी वाटत होती, आबाच्या दृष्टीने 'नागझरी'चा तुकडा खरेदी करणे

प्रतिष्ठेचे होऊन बसते. कुठल्याही परिस्थितीत किसन बनसोड्याच्या भाऊबंदांना जमीन द्यायची नाही. नाना घाबरट आहे. तो बैल विकायला तयार नाही. खरेदीसाठी पैसे कसे जमा करायचे. विरोधकांनी वकीलामार्फत नोटीस दिलेली, अशा परिस्थितीमध्ये आबा बाबूला मदतीसाठी बोलावून घेतो. परंतु आबा इतके जमीन खरेदी करणे बाबूला महत्त्वाचे वाटत नाही. रामाला (बाबूचा मित्र) मात्र आबांसारखेच वाटत असते. कधी एकदाची खरेदी खताची कटकट संपते आणि साताऱ्याला माघारी जातो असे बाबूला वाटते. बँकेचे कर्ज काढण्यास खेडूत घाबरत असत. कर्ज काढल्याने आपला गळा गुंतणार अशी त्यांना भिती वाटते. म्हणूनच आबा बँकेचे कर्ज काढण्यास तयार होत नाही. नातेवाईकांकडून मदत घेणे किंवा बैलबारदाना विकून रक्कम उभी करण्याचा तो विचार करतो. जमीन खरेदीविक्रीचे व्यवहार गुप्तपणे करावे लागतात. अन्यथा गावातील विरोधक नवीन समस्या निर्माण करतात. जसे आबा किसन बनसोड्याच्या मुलीबरोबर गुप्तपणे व्यवहार ठेवतो. सरपंच-सेक्रेटरीच्या मदतीने व्यवहार पूर्ण करुन घेतो.

नाना आणि बाबूने वडगावच्या बाजारात विक्रीसाठी बैल नेल्याबरोबर गावभर चर्चा सुरू होते, कारण 'नागझरी'चा तुकडा खरेदीकरण्यासाठीच बैल विक्रीस काढले हे धूर्त गावगुंड ओळखल्याशिवाय राहात नाहीत. जमीन खरेदी-विक्रीसाठी शिक्षणाचा उपयोग होत नाही. त्यासाठी व्यवहारी अनुभवाचाच उपयोग होतो. कारण रजिष्ट्रार कचेरीतील सर्व व्यवहारच वेगळा असतो. दलाल, साक्षीदार, स्टॅम्पव्हेंडर, शिपाई-कारकूनांचे ते विश्व शिकलेल्या माणसाला समजेलच असे नाही. तेथे लबाडी आणि भ्रष्टाचाराला अधिक महत्त्व आहे. म्हणूनच बाबूसारखा शिकलेला मुलगा सेक्रेटरीची वाट पाहतो. सेक्रेटरी येतातच झटपट-पैसे देऊन खरेदीखत होते. ड्रायव्हर देखील बाबूकडून पैसे वसूल करतो. किसन बनसोड्याच्या आजारी मुलीऐवजी अंगठ्यासाठी दुसरीच स्त्री कचेरीत उभी केली जाते. हे शिकलेल्या मुलांना नवीन असते. आबाला हे समजते, साक्षर बाबूला हे समजत नाही. सेक्रेटरी या खरेदीखतच आपली एक खरेदी उरकून घेतो. शिकलेल्या तरुणांची बँकेत, सरकारी कचेरीत पट्टेवाले देखील फजिती करतात. शिक्षणसंस्थांकडून दिलेले पुस्तकी शिक्षण व्यवहारी जगात अपूर्ण-निरर्थक ठरते. व्यवहारी जगातले आतले डाव शिकलेल्या तरुणांना समजत नाहीत.

आज सत्यवचनी, शब्दप्रमाण मानणारे लोक खेड्यातसुद्धा राहिले नाहीत. पैशाने सर्व खरीखोटी कामे होऊ लागली. 'खऱ्याची दुनिया न्हाय' (पृ.४०) असे सेक्रेटरी बाबूला सांगतो. कायद्याचे आवश्यक तेवढे आणि फायद्यासाठी हवे असणारे ज्ञान खेडूतांनाही झाले आहे. लोक हुशार झाले, प्रामाणिकपणा नष्ट झाला. कायद्याची ओळख झाल्यानंतर त्यातून पळवाटा कशा काढता येतील याचा विचारही लोक करु लागले. स्वार्थासाठी किंवा फायद्यासाठी कायद्याचा वापर होऊ लागला. अर्थात कायद्याचे

ज्ञान ठराविक लोकांना असल्यामुळे ते स्वत:चा फायदा करुन घेऊ लागले. सरपंच, सेक्रेटरींनी सरकारी कर्मचाऱ्यांशी संबंध प्रस्थापित केले. गावांमधील हे नवे कारभारी संधीसाधू बनले. आश्रयदाते-दानशूर आणि सेवाभावी लोक दिसेनासे झाले. नि:स्वार्थी माणूस सापडणे दुर्लभ झाले. एकमेकाला केलेली मदत देखील वर्चस्व प्रस्थापित करण्यासठीच असते. प्रत्येकजण आपल्यापुरताच विचार करताना दिसतो. म्हणूनच सेक्रेटरी बाबूला सल्ला देतो की, ''आपला हाच्चा नेहमी दुसऱ्यावर ठेवलेला असावा.'' जमीनीशी निगडित प्रतिष्ठेच्या कल्पना आणि भावनामुळेच आब राखण्यासाठी किसनच्या भावकीशी वैर घेऊन आबा. नागझरीची खरेदी करतो. स्वत:कडील जमीन दुसऱ्याकडे जाणे किंवा हक्क-ताबा सोडण्याची वेळ येणे अब्रूला धक्का लागल्यासारखे वाटत असल्यामुळेच आबासारखे खेडूत धडपडताना दिसतात.

परिवर्तन काळातील समस्यांचे चित्रण करीत असतानाच लोकजीवनातील नवस, उपास, नैवेद्य आणि रुढी परंपराच्या चित्रणातून सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. येथे देवाला कोकरु कापल्याने काम निर्विघ्न पार पडते अशी समूजत असल्याचे दिसते. म्हणजेच प्राण्यांचे बळी देण्याची परंपरा परिवर्तन काळात नष्ट झालेली नाही. आबा कोकराचा शोध घेतो किंवा सारजा नागझरीची खरेदी झाल्यावर म्हसोबाला घंटा बांधण्याचा नवस करते. बांधावरील देवाला दरवर्षी नैवेद्य देण्याची प्रथा असलेली दिसते. त्यामुळे पीक चांगले येते किंवा देवाचा रोष होत नाही अशी समजूतही असते. नागझरीच्या बांधावरील किसन देवाला सारजा कापूर जाळते. चिलीम, गांज्या, दामटी आणि मासकांडाचा घास तीनदा उतरुन टाकते. देवाचे केले नाही तर 'किसन्या लागंल' अशी त्यांची अंधश्रद्धा आहे. गुलाल लावून पदर पसरुन देवाला नवस करणे, देवाला निशान लावणे इत्यादी संस्कृती विशेषही दिसतात. यामागे मुख्य कारण समाजातील अज्ञान आणि लोकविश्वास आहे. व्यसनी किसन बनसोड्याला चिलीम-गांज्या-मांस दिल्याने त्याचा कोप होणार नाही अशी सारजाची समजूत आहे. किसन देवाचा कोप झाला नाही तर खरेदी निर्विघ्न होईल अशी आशा तिला असते. भविष्य, पंचांग, बुवा-बैरागी आणि अंगाऱ्यावरही ग्रामीण जनतेचा विश्वास आहे. शुभ-अशुभाच्या कल्पना समाजमान्य आहेत. मांजर आडवे जाणे अशुभ तर सौभाग्यवती भरली घागर घेऊन जाणे शुभ समजले जाते. देवाला कोंबडा कापणे, नैवेद्य ठेवणे, मीठ मिरच्यांनी दृष्ट काढणे, चुलीवर मांस शिजत असताना दृष्ट न काढणे, जोतिबाला नारळ फोडणे, उदकाडी लावणे, देवाला दामटी, चिलीम ठेवणे, वाडवडिलांना नैवेद्य ठेवण्याची परंपरा 'प्रदेश' दृगोचर करते.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये देशाचे-राज्यांचे नेतृत्व ग्रामीण भागातील पुढारी करु लागले. स्वार्थाबरोबर त्यांनी ग्रामविकासही केला. सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. ग्रामपंचायत, पंचायतसमित्या, जिल्हा परिषदानी ग्रामविकासाची कामे हाती घेतली. विकासकामाबरोबर

संधीसाधू पुढाऱ्यांची संख्या वाढली. नात्यागोत्याचे राजकारण केले जाऊ लागले. नको असलेल्या अधिकारी-कारकूनांच्या बदल्या पुढाऱ्यांनी केल्या. हिताच्या स्वार्थाच्या आड येणाऱ्याला परमुलखात पाठविले जाऊ लागले. बोलणाऱ्याची काम होऊ लागली. डांबरी रस्ते, धरणांची कामे होऊ लागली. सहकारी साखरकारखानदारी सुरु झाली. शहर आणि खेडी एकमेकांच्या अधिक जवळ आले. विविध कारणांमुळे खेड्यातील जनतेला शहराशी संपर्क ठेवणे अत्यावश्यक झाले. पुढाऱ्यांना विरोध करणे सामान्य माणसाला अशक्य होऊन बसले. पुढाऱ्यांची वृत्ती सामान्य माणूस ओळखून असल्याचे लेखकाने सूचित केले आहे. एक निरक्षर प्रवासी सेक्रेटरीला म्हणतो,

"सेक्रेटरी, तुमही उडत्यांची नोंद ठेवनारी मान्सं, आडाऱ्याचा नाडा गाड्यालाच बरा. पर आमास्नी येवड कळतया बगा. फुडारी कोन बी हूं दे, मत मागाय नमस्कार, पर सारं लेयकाचं कामचुकार." (पृ.३८) स्वातंत्र्योत्तर काळामध्ये सामान्य माणसांची घोर निराशा झाली. आपल्या दारिद्र्याला आपणच सामोरे गेले पाहिजे. पुढारी फक्त निवडणुका आल्यावर मत मागण्याठी जवळ येतात. त्यानंतर दूर जातात. स्वार्थ आणि संधीसाधूपणा, ढोंगीपणा पुढाऱ्यांच्या रोमारोमात भिनला आहे. सरकारी अधिकारी आणि सोसायट्यांचे सेक्रेटरी खेडूताच्या अज्ञानाचा फायदा घेऊन स्वार्थ साधतात. बाबूला जवळचा वाटणारा सेक्रेटरीदेखील त्याला फसविल्याशिवाय राहात नाही. एकूणच पुढारी आणि अधिकारी-कारकुनांनी स्वातंत्र्योत्तर काळामध्ये स्वार्थच साधला. जनहिताचा त्यांना विसर पडला.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये विशेषत: महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर खेड्यातील सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक परिस्थितीमध्ये फारसा फरक झाला नाही, उलट आर्थिकदृष्ट्या तो अधिक मागासलेलाच दिसतो. स्वातंत्र्यपूर्व काळात सावकाराचे कर्ज घेतले जात होते, सावकार तगादा लावत असल्यामुळे कर्जाची परतफेड होत होती, परंतु स्वातंत्र्योत्तर राष्ट्रीयकृत आणि सहकारी बँका आणि शासनाकडून शेतकऱ्याना विविध कारणांसाठी कर्ज तगाया मिळू लागले. बैल, चारातगाई साठी मिळालेल्या कर्जाचा उपयोग योग्य त्या कारणांसाठी न केल्यामुळे आणि सावकाराप्रमाणे तगादा लावणारे कोणी नसल्यामुळे कर्जफेड करण्याची प्रवृत्ती नष्ट झाली. कर्जवसुली अधिकाऱ्यांच्या नेमणुकाही झाल्या परंतु मुळातच कर्ज देतानाच अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांना कर्जफेडीसंबंधी तगादा लावणे अशक्य झाले. यातून मुद्दलापेक्षा व्याजाची रक्कम अधिक झाली. मुद्दलच मुळात कमी हातात पडलेले. या सर्वांतून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अधिकच बिकट झाली. अशाच प्रकारचा अनुभव बाबूलाही बँक अधिकारी, तलाठी, सरकारी कारकून यांचा येतो. ते भ्रष्टाचार करतात. पैसे घेतल्याशिवाय कोणतेही काम ते करीत नाहीत. कर्ज प्रकरणास तारण म्हणून

जमिनीचे उतारे काढण्यासाठी तलाठ्याकडे जावे लागते. पैसे दिल्याशिवाय उतारे मिळत नाहीत. खरेदीखताच्या वेळी रजिष्टार, कारकून, शिपाई पैसे घेतात. बँकेचे कर्ज घेण्यापूर्वी बँक अधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागतात. या सर्व गोष्टींचे ज्ञान बाबूला नसते. तेव्हा सेक्रेटरी बाबूला म्हणतो,

"आसली कामं दिल्याघेतल्याबिगार सुराला लागत न्हाईत बग."(पृ.३१) स्वातंत्र्योत्तर काळात भ्रष्टाचार वाढला. पैसे दिले घेतल्याशिवाय कुठलेही काम होत नाही याची जाणीव सामान्य माणसाला झाली. परिस्थितीनुरुप देण्या-घेण्याची सवय झाली, त्यामुळे धनिकांची-पांढरपेशी आर्थिक परिस्थिती सुधारली, सामान्यांची याउलट स्थिती झाली.

परिस्थितीवर मात करण्यासाठी खेड्यापाड्यातील हुशार मुले शिक्षण घेऊ लागले. परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतलेल्यांचा आदर्श त्यांच्यासमोर असल्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटले. परंतु शिक्षणाचे महत्त्व न समजलेल्या किंवा आर्थिक परिस्थितीमुळे इच्छा असूनदेखील मुलांना शिक्षणासाठी पाठवू न शकणाऱ्यांची संख्या अधिक असलेली दिसते. याच काळामध्ये कर्मवीर भाऊराव पाटलांनी रयतेच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न केले. साताऱ्याला शिवाजी बोर्डींगमध्ये विविध जातीधर्माच्या मुलांना आश्रय दिला. शिक्षणाची द्वारे खुली केली. शिक्षणासाठी घराबाहेर राहिलेल्या मुलांची प्रकृती खालावली. शिक्षणामुळे खेड्यातील मेहनतीची कष्टाची कामे-गावठी डावपेच तरुणांना जमेनासे झाले. त्यामुळे पालक आणि मुलांमध्ये विसंवाद निर्माण होऊ लागला. मलकापूरला वकीलाकडे जाताना आबाबरोबर बाबूला चालणे जमत नाही, तेव्हा आबालजा वाटते, "...शिक्षणाचं खूळ टकुऱ्यात घुसल्यानं पोरगं कामातनं गेलया. त्याच्याबरुबरीची पोरं कमाईला लागलजी. हा मवाळगडी कसला उजेड पाडणार? मागंच मराठी साळत चिकटला असता तर घर सांभाळीत खोतागत मळा पिकवला असता. तलाठी झाला असता तर नागझरीसारख्या या जमिनी वडल्या असल्या..." (पृ.११) शिक्षणामुळे मुलं मवाळ होतात. वाया जातात. खेडूतांना शिक्षण प्रतिष्ठेचे वाटत नाही. तर जमीनी खरेदी करणे त्यांना अप्रतिष्ठेचे वाटते. यामुळे विसंवाद होतो. तरीही 'कमवा शिका' योजनेचा फायदा घेऊन अनेक तरुण पुढे आले. उच्चविद्या विभूषीत झाले, परंतु जुन्या पिढीला त्यांचे हे उच्चशिक्षण घेणे मान्य नव्हते. त्याचे कारण आज्ञान आणि आर्थिक परिस्थिती हेच आहे. मुलाने शाळामास्तर, तलाठी होऊन कुटुंबाची जबाबदारी घ्यावी हीच त्यांची इच्छा असल्यामुळे हा विसंवाद झालेला दिसतो. मुलांची महत्त्वाकांक्षी वृत्ती आणि पालकांची अल्पसंतुष्ट वृत्ती यांचे वास्तव चित्र रेखाटले आहे.

लेखकाने प्रदेश विशिष्ट बोलीचा तसेच प्रसंगानुरुप प्राणभाषेचा वापर निवेदनासाठी केला आहे. शहरी संस्कार झालेल्या बाबूच्या तोंडून कादंबरीचे निवेदन केले आहे.

त्यामुळे प्रामणभाषा आणि बोली यांची सरमिसळ होऊन गेलेली दिसते. बोलीतील अनेक शब्द प्रदेशविशिष्टच आहे. उदा. धूळवापंच्या, पडल्याला, हूंदे, सकायास्न, वळाख, इसारली, जाऊंदे, इस्कोट, हागुलेंडी, जल्माची, दिसायेरवाळी, राकान्या, राकान, मसुबा, नदार, आडनं, वाद्यावैऱ्यांनी, सजवारी, इच्चारल, चिगलाचिगली इत्यादी याप्रमाणेच बोलीभाषेत रुढ असलेल्या अनेक म्हणीतून समाजवास्तवाचे दर्शन घडते. उदा. 'नागड्यावशी उगड गेलं.', 'नडल्याव झरा काडाय बघताय', 'आवसंला येवजल्यालं घडत न्हाय नि शिजल्यालं तोंडात पडत न्हाय', 'बाळंत झाल्याव तुमी बाजलं बगाय आलाय', 'गोल लागलं म्हणून मुळासकट खाया बगत्यात', 'खाली पडून वरच्यांची पाट लावाईचं चालल्या', 'पानात न्हाय कात, गावात न्हाय पत, तशातली गत'. या प्रमाणेच स्त्रियांची बोलण्याची लकबही प्रदेशविशिष्टच आहे. त्या बोलतांना पुल्लिंगी हेल काढतात. उदा. करतो, आल्तो इत्यादी. वसंत आबाजी डहाके म्हणतात, ''कागूद आणि सावली'मध्ये ग्रामीण वास्तव तिथल्या बोलीतून बोलीसह आलेले आहे.९२. हे विधान सार्थ आहेच त्याचप्रमणे वि. शं. चौगुले यांनी म्हटले आहे की, 'कागूद' आणि 'सावली' यात आनंद पाटलांनी बोलीचा यथोचित वापर केला आहे. पात्रांच्या परस्पर संबंधाचे मार्मिक चित्रण केले आहे. आणि ग्रामसंस्कृतीवरील आपली पकडही कायम ठेवली आहे.''९३. तर निलिमा भावे यांना व्यक्तिचित्रण आणि संवाद ही या कादंबऱ्यांचे बलस्थाने वाटतात. त्या लिहितात, ''पाटलांना यातल्या माणसांबद्दल, त्यांच्या आयुष्याबद्दल जे काही सांगायचे आहे ते ते त्यांच्या तोंडच्या संवादातून, संवादातर्फे सांगतात, त्यासाठी त्यांनी निवेदन फारसे खर्ची घातलेले नाही.'' ९४. याचप्रमाणे त्या पुढे असेही म्हणतात की, ''...संवादातून बोलीभाषेचा बाज आणि प्रसंगी डौलही जाणवतो. या जीवनाबद्दलची लेखकाची जाण, त्यावरची पकडही देखील लक्षात येते. या उलट कादंबरीतला निवेदनात्मक, वर्णनात्मक भाग, जो काही थोडासा आहे तो त्या तुलनेत रुक्ष वाटतो. निवेदनाच्या भाषेला ओघ नाही किंवा त्यात शैलीचे वैशिष्ट्यही जाणवत नाही.''९५. म्हणजेच नीलिमा भावे यांना निवेदनाच्या भाषेपेक्षा संवादाची बोलीच वैशिष्ट्यपूर्ण वाटते, हेच या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. बोलीच्या डौलामुळेच ही कादंबरी प्रादेशिक ठरते. समूहजीवन चित्रण किंवा शित्तूर गाव आणि प्रदेशाच्या चित्रणामुळे ती एका कुटुंबाची कथा न राहता संपूर्ण प्रदेशाची कथा होते. म्हणून ती ग्रामीणतेपेक्षा प्रादेशिकतेकडे अधिक झुकते.

### ५.२ *'सावली'*

'कागूद'प्रमाणचे 'सावली'मधील जीवनचित्रण स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या सामाजवास्तवाचे जिवंत दर्शन घडविणारे आहे. मुंबईतील कापडगिरणीच्या संपामुळे

धोंडिबा आणि दामू भोर हे दोन भाऊ एकांडवाडीला आल्यानंतर सामाजिक प्रतिष्ठेच्या भरीस पडून संप मिटेपर्यंत नवीन घर बांधण्याचा निर्णय घेतात. भाऊ दशरथ आणि मेव्हणा दाजी दानोलीकरांना आदंनच होतो. दाजी पदरमोड करुन आर्थिक मदत करतो. घर बांधायचे ठरवल्यापासून घर पूर्ण होईपर्यंतच्या वेगवेगळ्या घटनांमधून या कादंबरीचे कथानक साकार होते. घरबांधणीच्या कामामध्ये असंख्य अडचणी येतात. आईला दसरथाचे लग्न करणे महत्त्वाचे वाटते. तानूला मुलीच्या लग्नाची काळजी वाटते. पैसे खर्च केल्यानंतर सरपंचाकडून घरबांधणीस लेखी परवानगी मिळते. तेव्हा पाया खोदाईला, चुलतभाऊ-गणपा गाडीवानाचा विरोध सुरू होताच, फॉरेस्ट अधिकारी अडथळा निर्माण करुन पैसे घेतो.

सरपंच, तलाठी, फॉरेस्टर या बाहेरच्या माणसांना वाटे लावल्यानंतर मिलिटरीत असलेला भाऊ-नामदेव घरबांधणीला विरोध करतो. आर्थिक मदत देण्याचे नाकारतो. जाबरचे दागिने माणिकशेठकडे गहाण ठेऊन धोंडीबा आर्थिक प्रश्न सोडवितो. शेळ्या विकतो, शेतातील आंबा तोडतो. घराचे काम पूर्ण करण्यासाठी धडपडतो. घराचे काम रेंगाळताच गावकरी उलटसुलट चर्चा करु लागतात. निसर्ग उभा दावा मांडतो. पाऊस थैमान घालतो. काटकसर करुन आणि नातेवाईकांकडून मदत घेऊन धोंडिबा घर पूर्ण करतो. वास्तूशांतीच्या खर्चामुळे कर्जाचा डोंगर मोठा होतो. शेवटी इचलकरंजीच्या गिरणीमध्ये तो काम करु लागतो. कर्जावरील व्याज वाढते. दसरथाचे लग्न राहून जाते, माणिकशेठचे कर्ज फेडायचे असते, त्यामुळे धोंडीबासमोर जमीन विकण्याशिवाय पर्याय उरत नाही. घर बांधून धोंडीबा उन्हातच असतो. खोट्या प्रतिष्ठेपायी सरळ स्वभावाच्या धोंडीला असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. कुटुंबियांना रोजगार हमीच्या कामावर जावे लागते, हे सर्व केवळ एक'घर' बांधण्याच्या हट्टापायी होते असे या कादंबरीचे कथानक आहे.

प्रेम, राग, द्वेषांदींनी सुखावणारी, हेवा करणारी, भांडणारी अशी विविध वृत्तीची माणसे ग्रामीण वास्तवात जगतात. त्यांचे स्वाभाविक चित्र लेखकाने काढले आहे. धोंडिबा हे या कादंबरीतील महत्त्वाचे पात्र, त्याच्या जीवनानुभवाशी कादंबरीचे कथानक गुंफले आहे. सरळ स्वभावाच्या धोंडीबाला गावठी तिढे सोडविताना असंख्य अडचणी येतात. प्रतिष्ठेपायी तो घर बांधण्याचा निर्णय घेतो. हेकेखोरपणामुळे बायकोने दिलेला सल्ला मानत नाही किंवा मुलीच्या लग्नाची काळजी करतानाही दिसत नाही, तसा तो अव्यवहारी आहे. दाजी दानोळीकरांना हातातील अंगठी मोडून तो मदत करतो, यातून त्याच्यातील चांगुलपणा-परोपकारीवृत्ती दिसते. तो सोशीक आहे. तो सर्वांशी मिळतेजुळते घेणारा समंजस आहे. दसरथा हा त्याचा लहान भाऊ सरळ स्वभावाचा, कष्टाळू आणि प्रेमळ आहे. दामू त्याला अपवाद नाही. तानू, आंबू, जना या जावा - स्त्रिया कष्टाळू आहेत, घरातील त्यांचे स्थान नगण्य आहे. त्यांचा भावनिक कोंडमारा

स्पष्ट दिसतो. त्या गावात राहून त्याचे घरधनी परमुलखात चाकरी करतात. त्या सोशीक स्त्रियांच्या प्रतिनिधी आहेत. आई हट्टी आहे, तर दाजी दानेळीकर, हरहुन्नरी, नवे तिथे जाणारा प्रेमळ आहे. जगू जाबर स्वार्थी, मतलबी धनिकांचा प्रतिनिधी आहे. धोंडिबाच्या जमिनीवर डोळा ठेवून पाया खोदण्याचा सल्ला तो देतो, माणिक शेठ हा धूर्त, संधीसाधू सावकार आहे. त्याचप्रमाणे प्रशासन व्यवस्थेतील चौगुले, सेक्रेटरी, फॉरेस्टर, तलाठी, सरपंच ही बेरकी, धूर्त, स्वार्थी, कावेबाज आहेत. गणपा गाडीवान हा चुलतभाऊ असून त्याच्या अंगात भाऊबंदकीचे वारे संचारलेले आहे. या सर्व व्यक्तिरेखातून लेखकाने स्वातंत्र्योत्तर काळातील समाजवास्तवाचे दर्शन घडविले असून समूहजीवनाचे चित्रण केले आहे.

भू-प्रदेश आणि निसर्ग हे प्रादेशिक कादंबरीचे महत्त्वाचे दोन घटक पात्र म्हणून जिवंत केले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील 'एकांडवाडी'ची भौगोलिक पार्श्वभूमी कथानकास लाभली आहे. या गावाचे वर्णन लेखकाने केले आहे, "सह्याद्रीच्या विशाळगड फाट्याच्या पायथ्याला खडकातल्या बेडकीत मुरुन बसलं होतं." (पृ.६५) शिनोली गावच्या एकांडवाडी, खोताची वाडी, बोंगवाडी आणि धनगरवाडी हा विस्तार आहे. एकांडवाडी तशी आधुनिकीकरणापासून दूरच आहे. एस.टी. फाट्यापासून बरेच अंतर चालत किंवा बैलगाडीने जावे लागते. धड रस्ता नाही, मागासलेपण आणि अज्ञान त्या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. नागफणीचा डोंगर, नरसाळीचा सुळका, किऽर्र जंगलाचा-खोल दरीचा पांडव दरा, विशाळ गड, पावनखिंड, उंचउंच सुळके, जांब्याचा झरा, भोकर ओढा, कावंच्या डांगला कावंची खण असा हा डोंगराळ प्रदेश आहे. करवंदी, जांभळ, हिरडा, आंबा, चिकनी फळझाडे, आणि साग, करंज, कळक, चिव्यांचे बेट, आंबा इत्यादी वृक्ष आहेत. भात, नाचणी, भुईमूग, गिडबाक इत्यादी पीके येथे घेतली जातात. परंतु सहा महिन्यापेक्षा अधिक काळ हे धान्य पुरत नाही. म्हणून निमकोकणातील हे लोक उपजिविकेसाठी मुंबईला जातात.

निसर्गवर्णन प्रदेशविशिष्ट आणि व्यक्तींच्या भावस्थितीनुरूप आहेत. 'गाडी सोडपाच्या मुडाप्याला आली. आता दिसाचा गोळा डोंगराच्या टकुरीवर टोपीवरच्या गोंड्यागत फिरत होता. कवळं उन थेट तोंडावर लागत होतं. दसरता बावड्याला पाठ लावून दक्षिणेकडं तोंड करुन मांडी घालून बसला. रिगंला लागल्याली बैलं आपल्या चालीनं जात होती."(पृ.६३) भावांच्या भेटीसाठी आतुर झालेल्या किंवा लग्नाच्या विचाराने सुखवलेला दसरथाची भावस्थिती निसर्गवर्णनातून आकार घेते. कथानकाचाच अपरिहार्य भाग-एक पात्र म्हणून निसर्ग अवतरतो उदा.

"दिवस नरटुंगीवर टकुरं टेकायला निघाला होता. उगवतीला ढगांच्या आट्यापाट्याचा खेळ चालला होत. धोंडीबा अधूनमधून आभाळाकडं बघीत येडताकनं टोकणीच्या रेघा पाडीत होता..."

अचानक पूर्वेकडचा सोसाट्याचा वारा सुटला. काळ्याभिन ढगांची फौज नागफणी चढून वर निघाली. पांडवदरा वाऱ्यानं रोरॅवाय लागला. वीज कडाडली आणि धोंडीबाच्या काळजानं ठाव सोडला. त्यानं येडताक जिथल्या तिथं टाकलं, तो वाऱ्यागत घराकडं बेभान पळत सुटला.

ढगांची फटी नरटुंगी नि नरसाळीच्या बेचक्यात अडकली. नागफणीवर आभाळ फुटलं आणि पाऊस सुमानं वताय लागला. गारांच्या माऱ्यात साऱ्यांचा झेंडू फुआय लागला.'' (पृ१२८) असंख्य अडचणींना सामोर जाऊन घराच्या भिंती उभ्या केल्या त्या वाचविण्यासाठी धडपडणाऱ्या धोंडीबाच्या मानसिकतेनुरूप हे निसर्गचित्र काढले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये सरकारच्या नव्या कायद्यांमुळे खेड्यातील जनतेचा शहरांशी संबंध वाढला. काही वेळेस सरकारी लोकांना अडचणी ठरु लागले. त्यांच्या पारंपरिक जीवनाशी हे कायदे विसंगत असल्याचे जाणवले. म्हणून कायद्यातून पळवाटा काढण्यासाठी खेडून प्रयत्न करु लागले. इमारतीसाठी आणि जळणासाठी पूर्वी लोक राजरोसपणे जंगलातील लाकूडफाटा तोडून आणत होते. परंतु फॉरेस्ट खात्याच्या जाचक नियमांमुळे परंपरागत जीवनशैलीस धक्का लागला. तेव्हा फॉरेस्टरला पैसे देऊन आपला कार्यभाग साधण्याची युक्ती खेडुतांनी शोधून काढली. या बदलत्या खेड्याचे वास्तव चित्र या कादंबरीमध्ये दिसते. दाजी. दानोळीकराना गाडीभर सरपन देणे दसरथाला जमत नाही किंवा घरासाठी लाकडे कशी जमविली, स्वत:ची झाडे सरकारच्या परवानगीशिश्वाय कशी तोडली म्हणून फॉरेस्टर पंचनामा करण्याची धमकी देतो. परंतु रोख रक्कम मिळताच वाट धरतो. त्यानंतर मात्र दसरथा जंगलातील सागवान तोडतो, तरी त्याला कुणीही आडवत नाही. चांगल्या वाईटाचा निर्णय सोयीप्रमाणे किंवा स्वार्थानुरूप ठरतो. 'कायद्यासाठी कायदा नाही, तर फायद्यासाठी कायदा' अशी स्थिती होते.

विनाकारण दुसऱ्याला मदत करणारी माणसं आजच्या बदलत्या समाजपरिस्थितीमध्ये दिसत नाहीत, जसे धोंडिबाला जॉबर मदतीचा हात पुढे करतो. कर्ज उपलब्ध करुन देतो, हेतू असा की तो अधिकाधिक कर्जबाजारी झाल्यावर जमीन विक्रीस काढील आणि ती आपण सहज घेऊ अशी खात्री जॉबरला असते. पुढे तसेच घडते. कर्जाच्या ओझ्याखाली गाडलेला धोंडीबा भावाच्या लग्नासाठी आणि कर्जफेडीसाठी जमीन विकण्याचा निर्णय घेतो. परोपकाराची भावना नि:स्वार्थी नसते, तर ती स्वार्थ समोर ठेऊनच असते.

भाऊबंदारतील वाद, स्पर्धा आणि प्रतिष्ठेच्या कल्पना यामुळे बदलत्या खेड्यातील लोक अधिक कर्जबाजारी झालेले दिसतात. सरपंचासारख्या नव्या शोषितांचा वर्गही निर्माण झालेला दिसतो. वादी-प्रतिवादीकडून ते गोड बोलून पैसे घेतात. सोयीप्रमाणे व उपकार केल्याप्रमाणे न्याय-निवाडा करतात. धोंडिबाला गणपा गाडीवानाने वाट

द्यावी म्हणून अडथळा केला असता सरपंच दोघांकडूनही पैसे उकळतो आणि दीडहात वाट सोडण्यास धोंडिबाला सांगतो. तसेच संपाच्या काळात, आई आणि नामदेव नको म्हणत असताना धोंडिबा घर बांधण्याचा निर्णय घेतो. तोही खोट्या प्रतिष्ठेच्या कल्पनेमुळेच. गावठी तिढे, गावातल्या माणसांचा विघ्नसंतोषी स्वभाव बदलत्या समाजवास्तवातून लेखकाने टिपला आहे.

बदलत्या खेड्यात सुखाने जगायचे असेल तर पैसा आणि व्यवहार यांची सांगड घालता आली पाहिजे. धोंडिबाकडे या गोष्टींचा अभाव असल्यामुळे त्याची फजिती होते. त्यांना असंख्य अडचणी येतात. भाऊबंद आणि गावकरी तसेच प्रशासकीय यंत्रणा त्या कुटुंबाला त्रास देते. प्रतिष्ठेच्या भरीस पडून धोंडीराम घराची सावली करुन उन्हातच असतो.

प्रतिकूल आर्थिक परिस्थिती आणि प्रदेशाचा लोकजीवनावर परिणाम होतो. जसे प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळै निम कोकणातील लोकांना मुंबईमधील गिरण्यांमधून नोकऱ्या करुन स्वत:ची आणि कुटुंबियांची उपजीविका करावी लागते. बकाल वस्ती, अशुद्ध हवा यामुळे ते व्यसनाधीन होतात. गिरण्यामधील संपामुळे खेड्यातील व्यवहारच ठप्प होतात.

शिकलेल्या मुलांमध्ये आणि खेडूतांमध्ये विसंवाद निर्माण होतो. रक्तानात्यातील माणसे एकमेकांकडे संशयाने पाहू लागतात. उदा. नामदेव आणि धोंडिबामध्ये विसंवाद होण्याचे हेच कारण आहे. नामदेव सासऱ्याच्या सल्ल्याने वागतो. त्याला कोल्हापूरमध्ये बंगला बांधायचा असल्यामुळे तो पैसे देत नाही असे धोंडीबाला वाटते. तर संपाच्या काळात खोट्या प्रतिष्ठेला बळी पडून घर बांधून कर्जबाजारी होऊ नये असा सल्ला नामदेव देतो, तो धोंडीबाला पटत नाही. नातेवाईकांकडून पैशाची मदत घेऊन घराचे काम पूर्ण करणे अप्रतिष्ठेचे मानले जाते. धोंडीबाने मेव्हण्याकडून किंवा अन्य नातेवाईकांकडून पैसे मागणे आईला अप्रतिष्ठेचे वाटते. तिला त्याचा राग येतो. तसेच 'जग दुतोंडी सावज आसत.' दोन्ही बाजूने बोलणारे असते, घर नाही म्हणून आणि घराचे काम अर्ध्यावर थांबले म्हणून गावामध्ये उलटसुलट चर्चा होते. तसेच घराचे काम अर्ध्यावर थांबले तर जग नाव ठेवण्याची भीती धोंडिबाला वाटते. म्हणूनच कर्ज काढून तो घराचे काम पूर्ण करतो. घर बांधणीच्या निमित्ताने येणाऱ्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर समाजवास्तवाचे जिवंत चित्र लेखकाने रेखाटले आहे.

दारिद्र्य आणि अज्ञानामुळे ग्रामीण लोकजीवनात काही श्रद्धा, समजूती, रीतीरिवाज, परंपरा, चालीरिती, रुढ झालेल्या असतात. प्रस्तुत कादंबरीतही त्यांचे चित्रण आल्यामुळे 'प्रदेश' जिवंत झाला आहे. 'आवसेच्या येळंला वाईट वंगाळ बोलू नये' किंवा 'शनिवारी प्रवास करु नये' असा लोकसमज आहे. पांडवदऱ्यातल्या भैरीला कोंबडा-कोंबडी कापण्याची परंपरा देवावरील श्रद्धाच स्पष्ट करणारी आहे. देवाला कौल

लावणे, नारळ, उदबत्ती, कापूर-भंडारा देणे, करणीधरणी, भूतबाधा, चेटूक, उतारा या गोष्टीवरील अंधश्रद्धा, तसेच मंगळवारच्या मुहूर्तावर काम सुरु करणे, पाडव्याला नवीन काम सुरु करणे शुभ समजल जाते. मात्र आमावास्येला काम सुरू करू नये म्हणून काळ्या कापडाची बाहूली बांधणे, जुने झाड तोडल्यास खवीस लागतो, नव्या धातूची शांत केली नाही तर मोकळ्या वास्तूत भूत घुसते, घराला भूतबाधा होते असे समज-गैरसमज आहेत. नव्या घरामध्ये वाडवडिलांचा टाक करुन बसविण्याची परंपरा आहे. त्यानिमित्ताने वडिलांची छाया घरावर कायम राहाते अशी समजूत दिसते. विधीप्रसंगी पाव्हण्यांना आहेर देणे, लग्नात चुलबंद आमंत्रण देणे इत्यादी परंपरा दिसतात.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. देशाचे, राज्याचे नेतृत्व ग्रामीण भागातील पुढारी करु लागले. पंचायत समिती, जिल्हा परिषदांवर लोकनियुक्त पुढाऱ्यांनी वर्चस्व प्रस्थापित केले. निवडणुकांवर खर्च होऊ लागला. त्यातून गट-तट निर्माणझाले. गावामध्ये पार्ट्या पडल्या. त्यातून आपआपसातील हेवेदावे वाढले. काँग्रसचे विभाजन झाले. एकपार्टी आय काँग्रेसची तर दुसरी शरद काँग्रेसची (समाजवादी) अशी राजकीय परिस्थिती निर्माण झाली. ग्रामपंचायतीच्या निवडणुका एकाच पक्षाच्या विविध पार्ट्या लढवू लागल्या. अशी एकूण महाराष्ट्राची परिस्थिती असल्यामुळे शिनोलीतील एकांडवाडी त्याला अपवाद कशी असेल? सिदू पवार ग्रामपंचायत सदस्य काँग्रेस आय पक्षाचा, तो गणपा गाडीवानाचा दोस्त, तर सरपंच शरद काँग्रेसचा आणि दाजी दानोलीकराचा मित्र आहे, त्यामुळे सरपंचाकडून आपणास घरबांधणीची परवानगी निश्चित मिळेल अशी धोंडिबाला खात्री असते, परंतु सर्वच पुढारी एकाच माळीचे मणी असा अनुभव त्याला येतो. पुढाऱ्यांचे वाद निवडणुकांच्या काळात असतात. इतर वेळेस नाही. हे सत्य लेखकाने वर्णन केले आहे. याचप्रमाणे शहरातील गिरणी कामगारांचे नेते आणि केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, गिरणीमालक यांच्या संबंधावरही लेखकाने प्रकाशझोत टाकला आहे. संप मिटण्याची आतुरतेने वाट पाहणाऱ्या गिरणी कामगारांना रेडिओवर बातमी ऐकायला मिळते ती अशी,

"...मुंबई गिरणी कामगार संपात तडजोड घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारने नेमलेल्या त्रिपक्ष समितीच्या कामकाजावर गिरणी कामगार संघटनांच्या नेत्यांनी बहिष्कार टाकला असून महाराष्ट्र गिरणी कामगार युनियनचे नेते डॉ. दत्ता सामंत यांनी चौदा एप्रिल रोजी 'महाराष्ट्र बंद' पाळण्याची घोषण शिवाजी पार्कवरील गिरणी कामगारांच्या सभेत बोलताना केली. संपाबाबत सरकारची भूमिका कायम असून बेशिस्त आणि बेकायदेशीर दहशतीचे प्रयत्न सरकार कठोरपणे मोडून काढील असा इशारा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅरिस्टर बाबासाहेब भोसले यांनी आपल्या जाहीर निवेदनात दिला आहे..." (पृ.७५)

या बातमीसंबंधी 'एकांडवाडीत' उलटसुलट चर्चा होते. जगू जाबर म्हणतो, "सरकारच्या शेंड्या गिरणीमालकांच्या मुठीत हाईता झकासराव. आय काँग्रेसवालं सूड उगवत्यात सुड, गिरनीकामगारांवर, जनता पार्टीच्या सिटा दिल्या निवडून मुंबईतनं कामगारांनी, आता लागतया कुतायला." (पृ.७५) यातून राजकीय पार्श्वभूमी अधिक स्पष्ट होते, परंतु 'प्रदेश' गोचर होत नाही. १९८२ च्या गिरणी कामगारांच्या संपासंबंधी मुंख्यमंत्र्याची ठाम भूमिका, कठोर कारवाई करण्याचा निर्धार, कामगार नेत्यांनी ताठर वृत्ती व केंद्र सरकाराची कोणताही प्रश्न सरळ सोडविण्याऐवजी समिती नेमून प्रश्न भिजत ठेवण्याची वृत्ती स्पष्ट होते. प्रसारमाध्यमे सत्ताधारी पक्षांचे गुलाम आहेत. त्याचप्रमाणे सत्ताधारी पक्ष गिरणीमालकांच्या हातचे खेळणे आहे, हे सत्य आहे. मुंबईतील गिरणी कामगारांनी जनता पक्षाला मतदान केले, त्यामुळे सत्ताधारी काँग्रेस संप मिटविण्यासंबंधी ताठर भूमिका घेते. उलट कामगार नेत्यांना रासुकाखाली अटक करण्याची काँग्रेस नीती लेखकाने शब्दबद्ध केली आहे. मुख्यमुत्र्यांच्या बेजबाबदारपणाचे, भ्रष्टाचाराचे तसेच पोरकटपणाचे चित्र (पृ.८५) काढले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक दृष्ट्या खेड्यातील लोकांची सुधारणा तर झाली नाहीच उलट शोषणकर्त्यांचा नवा वर्ग निर्माण झाला. पुढारी आणि प्रशासकीय यंत्रणा शोषण करु लागली. सामान्य माणसाचे हित जपण्याकडे दुर्लक्ष झाले, त्यामुळे राज्यकर्त्यांबद्दल आणि प्रशासन यंत्रणेबद्दल वैफल्याची भावना निर्माण झाली. याचा प्रत्यय या कादंबरीतही येतो. धोंडिबाला कर्ज काढून घर बांधावे लागते. रोजगार हमीवर काम करणाऱ्यांना योग्य मोबदला मिळत नाही. दुष्काळामुळे सावकाराचे कर्ज भरु न शकल्याने जमीन गहाण ठेवावी लागते. विकावी लागते. नव्या कायद्यामुळे, शोषितांमुळे सामान्य माणसाची आर्थिक परिस्थिती अधिकाधिक खालावत गेली.

'कागूद'च्या तुलनेत 'सावली'ची भाषा अधिक डौलदार, सकस वाटते. ती अस्सल बोली आहे. अनेक अर्थघन शब्द, म्हणी, वाक्प्रचाराच्या स्वाभाविक वापरामुळे 'प्रदेश' जिवंत होतो. उदा. नुस्ता, धुंडत्यात, डल्ला, हुलीवं, हारकून, लटांबर, हुंटाकल्या, येंगारली, नामना इत्यादी बोलीभाषेतील शब्द असून काही इंग्रजी शब्दांचाही बोलभाषेच्या ढंगाने वापर केलेला आहे. उदा. जाइंट, बजेट, पाइंट हे शब्द बोलीत मुरुन गेले आहेत, ते आधुनिकीकरणाचा काळा सूचित करतात. 'उठा म्हंतूया न्हवं?' किंवा 'आलोय' यातून स्त्रियांच्या बोलण्यातील प्रदेशविशिष्ट लकबही दिसून येते. तसेच म्हणीतून बदलत्या समाजवास्तवाचे दर्शन घडते. उदा. 'उगड्याबशी नागडं, मागतुया लुगडं!', 'सरकारी खटलं नि टकुरं उटलं', 'कामानं कण्हती शिनोली, आयतं गिळती दानोलजी' इ.

'कागूद करणे' आणि 'घर बांधणे' या दोन घटनांतील असंख्य अडचणीच्या पार्श्वभूमीवर लेखकाने बदलत्या समाजवास्तवाचे ताण-तणावांसह घडविलेले दर्शन

प्रभावी आहे. तरीही 'आलोचने'च्या अभिप्रायाप्रमाणे 'कागूद'ची अर्थपूर्णता 'सावली'मध्ये जाणवत नाही. 'कागूद'मध्ये या ग्रामीण वातावरणाचा जसा एक प्रकारचा दाब व्यक्तींच्या मनावर जाणवतो, तसा 'सावलीत' जाणवत नाही.''९६. हे मान्यच करावे लागते. तरीही निमकोकणच्या पार्श्वभूमीवरील या दोन्ही कादंबऱ्या श्रेष्ठ आहेत हे मान्य करण्यास हरकत नसावी असे वाटते.

## ६. रामचंद्र पठारे - ''पाचर''

'पाचर' ही रामचंद्र पठारे यांची कादंबरी १९८९ मध्ये प्रसिद्ध झाली. समकाजलीन वास्तवाचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत लेखकाने केले आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर ग्रामीण भागाच्या कायापालटास प्रारंभ झाला. शिक्षण प्रसार वाढल्याने मागासवर्गीयांना हक्कांची जाणीव झाली. त्यांना सरकारचे धोरण अनुकूल असल्याने राजकारण आणि नोकऱ्यांमध्ये राखीव जागा ठेवण्यात आल्या. त्यामुळे हिंदुसंस्कृतीचे खोल संस्कार झालेल्या खेड्यातील मराठा समाजाला हादरा बसला. धनिकांच्या हातात राजकारण असल्यामुळे मतांसाठी आणि सरकारी धोरणांच्या अंमलबजावणीसाठी अनिच्छेने मागासवर्गीयांचा कैवार घेण्याची वेळ त्यांच्यावर आली. अर्थात हे सर्व वरवरचे. मतांपुर्ते. अंतरंगातला बदल अद्यापही झाला नाही. ते स्वतःला पुरोगामी समजत असले तरी प्रतिगामीच आहेत. अशा एका 'सावरगाव' खेड्यातील समाजजीवन आणि राजकीय जीवनाचे चित्रण 'पाचर'मध्ये रामचंद्र पठारे यांनी केले आहे.

सावरगावमध्ये कल्याणराव निकमांकडे सभापती आणि अन्य कार्यकर्ते येतात. सरपंच असलेले कल्याणराव महत्त्वाकांक्षी आहेत. म्हणून त्यांनी तालुका जिल्हा आणि राज्य पातळीवरील कार्यकर्त्यांशी चांगले संबंध प्रस्थापित केले आहेत. स्वतःला ते पुरोगामी समजतात. ''एक गाव एक मसणवटा'' या विषयावर भाषण ठोकण्याच्यातयारीत सर्व पुढारी असतानाच, प्रत्यक्ष कृती करुन दाखविण्याची वेळ येते. बैज्या मांगाच्या मृत्यूने चिंताग्रस्त होतात. तरीही ढोंगीपणाने खानदानी मराठ्यांच्या मसणवाट्यात बैज्यावर अंत्यसंस्कार करायचे निश्चित केले जाते. ग्रामस्थांना मात्र याचे दुःखच अधिक होते. कल्याणराव यातून मार्ग काढतात, सध्या बैज्या मांगाचे प्रेत मराठ्याच्या मसणवाट्यात पुरायचे आणि रात्रीच ते उकरुन हडकी-हडवळ्यात नेऊन पुरुन मोकळे व्हायचे असा निर्णय होतो. प्रत्यक्ष 'बैज्याची स्पेशल मौत' होते. पुढारी भाषण आटोपून निघून जातात. मंज्या-राध्या रात्री ते प्रेत उकरतो आणि हडकीत नेऊन पुरतो. हा प्रकार बबुशाकडून झापाळ्या भगताला कळतो. तो कल्याणरावला आडचणीत आणण्याचा प्रयत्न करतो. लगेच गावामध्ये दुसरी भानगड होते. आनंदा मध्यमवर्गीय अंब्रूवर बलात्कार करतो. गावभर आणि तालुकाभर चर्चा होते. परंतु कल्याणरावांच्या पुरोगामी विचारांनुसार त्यांचा आंतरजातीय प्रेमविवाह लावला जातो. मुख्यमंत्री कचरुचा

सत्कार करतात. ग्रामीण महिला विकास संस्था स्थापन करुन कचरुची दारुधंदा करणारी बायको छटकी या संस्थेची चेअरमन होते. भिकाजीराव खुपटे या महाराला पाटील करुन स्वत:चे पुरोगामित्व सिद्ध करण्याची संधी सरपंच सोडत नाही. कचरु छटाकीचा खून करतो. स्वत:ला पेटवून घेतो. बाबुशाला सांभाळण्याचा निर्णय झापाळ्या घेतो. 'बबुशा'च्या अंगात एकाच वेळी 'श्रीसत्यसाईगजमहाराज'चे वारे येते. नव्या वस्तीला 'भीमनगर' नाव देण्याचा निर्णय चिन्या-येडू घेतात. त्याला विरोध होतो. सरपंच साखर कारखाना स्थापण्याच्या उद्योगाला लागतात. पोलीसखात्याला हाताशी धरुन गावाकडील भानगडी मिटवितात. झापाळ्याला पकडून देतात. ग्राम गौरवाची तयारी सुरु होते. परिवर्तन काळामध्ये नव्या समस्या निर्माण झाल्या, त्या समस्यांचे कलात्मक चित्रण लेखकाने केले आहे.

'पाचर'मध्ये कोणीही नायक किंवा खलनायक नाही. सर्वच व्यक्तिरेखा सामान्यच आहेत. म्हणून नगर जिल्ह्यातील 'सावरगाव' आणि बदलता काळच नायक आहे. सरपंच कल्याणराव निकम हिंदुसंस्कृतीचे संस्कार झालेले मुळात प्रतिगामी असले तरी 'राजकारणासाठी ते वरवर पुरोगामीपणाचे अवसान आणतात. लेखक त्यांचे वर्णन करतो, ''मर्दानी अशी वाटणारी खानदानी चाल. उंचापूरा बांधा. शूभ्र झब्बा आणि पायजमा असा साधाच पोषाख. चेहऱ्यावर निबरपणाची रग ओसंडतेय.'' (पृ.११) राजकारणी माणसाजवळ हवे असणारे सर्व गुण त्यांच्याजवळ आहे. महत्त्वाकांक्षी कल्याणरावांचे तालुका-जिल्हा आणि राज्य पातळीवरील नेत्यांशी जसे संबंध आहे तसेच छटाकीशीही त्यांनी घरोबा ठेवला आहे. 'एक गाव एक मसणवाटा', 'आंतरजातीय विवाह', ग्रामीण महिला विकास संस्था' या सर्व बाबती ते सर्वांच्या पुढे असतात. राजकारण्यांचा 'निबरपणा' त्यांच्या रक्तात भिनलेला आहे. प्रा. खराडे हे या भागातील सुधारक विचारवंत आहे. दलितांवर अन्याय झालेला त्यांना सहन होत नाही. भोंदूगिरी विरोधात ते आवाज उठविण्याचा प्रयत्न करतात, मार खातात, अंबू-आनंदा प्रकरण दाबले जाऊ नये म्हणून धडपडतात, तसेच त्यांचा संसार सुखाचा व्हावा ही त्यांची इच्छा असते. झापाळ्या भगत हा एक भोंदूगिरी करुन लोकांकडून पैसे उकळणारा-बायाबापड्यांना जवळ करणारा आजच्या बुआंचा प्रतिनिधी आहे. वेड्या बाबूशाला तो एका रात्रीत 'सत्यश्रीसाईगजभीम' महाराज बनवितो. 'कचरु' हा स्वातंत्र्यपूर्वकाळात लोकजागृती करणारा गोंधळी आहे. त्याची स्वातंत्र्योत्तर उपेक्ष होते, तरी तो ग्रामस्वच्छता करीत राहातो, 'छटाकी' त्याची रुपवान बायको, दारुधंदा करणारी, सरपंचाने ठेवलेली बाई, पुढे ती सहावारी खादीचे पातळ नेसून ''ग्रामीणमहिला विकास संस्थेची'' चेअरमन होते. तिच्या वर्तनाला कंटाळलेला कचरु तिचा खून करतो. बबुशा त्यांचा वेडा मुलगा आहे. बुधा आणि बाहरु हे दलित पँथरचे मुंबईची हवा खाऊन आलेले कार्यकर्ते आहेत. सभापती, एसपी भाई, बीडीओ, तलाठी भौसाहेब, ग्रामसेवक

पोळकाका, अण्णासाहेब पाटील, बैज्या, मांग केसू नाना, संभाजीराव चेअरमन, मंज्या-राध्या हे सरपंचाचे गडी, आनंदा, अम्बू, मक्या, येदू डम्बाळ्या भिकाजीराव खुपटे नवे पोलीसपाटील, चिन्या, येडू, रावशा आणि समस्त गावकरी मौजे सावरगाव आणि झापाळ्या भक्ताचा शिष्यपरिवार आणि अन्य गौण पात्रांच्या समूहजीवनाची ही कथा आहे. परिवर्तन काळातील खेड्यामधील भानगडींचे चित्रण ह्या गौण पात्रांच्या चर्चेआधारे लेखकाने साधले आहे.

परिवर्तनकाळामध्ये जुने बरेच काही नाहीसे झाले. एकदिलाने गावामध्ये राहाणाऱ्यांमध्ये संघर्ष सुरु झाल. सवर्ण आणि दलिताच्या संघर्षाने उग्र रुप धारण केले. पोलिसखात्यातील ओळखीने आणि भ्रष्टाचाराने सवर्ण पुढाऱ्यांनी हा त्यांचा विरोध मोडून काढला. गावातील प्रामाणिकपणा नाहीसा झाला. लोक उदनिर्वाहाचे सुलभ मार्ग शोधू लागले. शेरडं, कोंबड्या, गळ्यातील मंगळसुत्रांच्या चोऱ्या करु लागले. रिकामपणाचे उद्योग वाढले. 'अब्रू'ला जपणे महत्त्वाचे वाटेनासे झाले. स्त्रीपुरुष अनैतिक संबंध, घटस्फोट, पोरधरी, वांझपणावर गावागावातून चर्चा होऊ लागल्या. परंपरागत जीवनाचा अस्त झाला. हडकी-हडवळ्यात मागासवर्गीयांचे प्रेत पुरले जायचे, तर खाणदानी मराठ्यांचे प्रेम स्वतंत्र मसणवट्यात जाळले जात होते. त्याऐवजी 'एक गाव आणि एक मसणवट्या'मुळे गावामध्ये संघर्ष सुरू झाला. एक गाव एक पाणवठ्याने डोके वर काढले. मागासवर्गीयांना मंदिर प्रवेशाची कायद्याने परवानगी मिळाली. ह्या सुधारण चांगल्या उद्देशाने झाल्या असल्या तरी त्यातून काही समस्याच निर्माण झाल्या. आंतरजातीय विवाहाची कल्पना मूळ धूर लागली आणि पारंपरिक लोकजीवनाला धक्का पोहचला. मुळातले प्रतिगामी नेते पुरोगामी विचारांचे बुरखे पांघरुन सरकारच्या योजनांचा प्रचार करु लागले. चळवळी करु लागले. त्यांचा तिरस्कार ग्रामीण विभागातील लोक करु लागले. प्रा. खराडे मागासवर्गीयांध्मये जागृती करु पाहात असातना त्यांच्या पाठीशी लोक उभे राहण्याचे टाळतात. गावातले मुले प्रा. खराडे विषयी चर्चा करतात,

"भाडखावू! तुम्ही मांगही नाय सुदरायचे. मायला, पदराच्या कवड्या खर्चून त्यो मानूस आपल्याकर्ता येतो. शिकवितो. काय घेणं नाय, देणं नाय, तरी जीव तोडून काम करतो, त्याला देवमानूस नायी, मंग काय म्हणानंच रं?... "एऽऽ तुनातुन्या! नको लैगुण गावू. एवढा पुळका हाए तुला तं घे उरावर बसवून आन् नाच." (पृ.४)

मुलांच्या संवादामधूनदेखील सुधारक कार्यकर्त्यांबद्दलची अनास्थाच दिसते. "सर्व जाती धर्मपंथांना देवळं खुली झाल्यापासून सर्वच जुगाऱ्यांचं चांगलंच फावलं होतं." (पृ.५) म्हणजेच कामधंदा करायचे सोडून लोक जुगार खेळू लागले. हप्ते वसूल करण्याचे हक्काचे ठिकाण म्हणून पोलीस खाते जुगार अड्ड्यावर धाड टाकून पैसं कमऊ लागले. गुन्हा नोंदवून केस दाखल करण्यापेक्षा हा स्वार्थी मार्ग पोलीसांना

फायद्याचा वाटू लागला. अनीती वाढली. सर्व पुढारी विचारवंत झाले. आचारवंतांची संख्या घटली. भाषणा-मार्गदर्शन करण्यापर्यंत पुढारी नवविचाराचा पाठपुरावा करतात, प्रत्यक्ष कृतीत मात्र वेगळेच चित्र दिसते. उदा. बैजा मांगाला मराठ्याच्या स्मशानभूमीमध्ये 'एक गाव एक मसणवटा' धोरणानुसार पुरले जाते. पुढारी, अधिकारी भाषण करतात. परंतु रात्रीत हडंकीमध्ये खड्डा घेऊन बैजाला पुरले जाते. सरपंचाचे स्वगत पहा, "कल्याणरावांच्या पोटात गोळा उठल्यासारखं झाले. मनात थेट आतून एक कळ आली. सालं हा काय फालतू प्रकार? वैतागच आहे. एक गाव एक मसणवटा भाषणाविषणापुरता ठीक आहे हो. पण प्रत्यक्ष त्या मांगट्याला आपल्या पवित्र स्मशानाता न्यायचं म्हणजे काय? आपण खानदानी घराण्याचे जहागीरदार. शहाण्णवकुळी. आणि आपल्या स्मशानाची अशी विटंबना? स्वर्गस्थ मायबापांचे आत्मे किती तळतळतील?" (पृ.८) सरपंचासारख्या नेत्याची अशी गत तर बाकी सामान्य माणसाच्या मनात काय आले असेल?" "वी आर टू कन्स्ट्रक्ट अे न्यू हिस्ट्री नाव!" असेच एसपीभाई म्हणतात तेही वरवरचे आहे.

सरकारी मालमत्तेचा दूरउपयोग करणारे मानासन्मानाने जगू लागले जसे. स्वस्त धान्याचे दुकान पचविणारा संभ्या-चेअरमन संभाजीराव होतो. (पृ.१०) जिल्हा-राज्य-केंद्र पातळीवरील नेत्यांना खुष करण्यासाठी मळ्यातील बंगल्यावर पार्ट्या देणे, लाचार होऊन नेत्यांच्या विचारांची री ओढणे. या सर्वातून स्वार्थही साधता येतो. साखरकारखान्याला परवानगी मिळते. मोठेपण, पैसा, प्रतिष्ठा सर्वच मिळविणे शक्य होते. म्हणूनच गाव-तालुका पातळीवरील नेत्यांमध्ये सत्ता-स्पर्धा-संघर्षास सुरुवात झाली. कल्याणराव सरपंच गावामध्ये 'एक गाव एक मसणवटा', 'ग्रामीण महिला विकास मंडळ', 'आंतरजातीय विवाह', 'मुख्यमंत्र्याची सभा' इत्यादीच्या निमित्ताने गाव एकत्र जमविले जाते. मोठमोठ्या नेत्यांना निमंत्रित केले जाते. ग्रामसुधारणेच्या नावाखाली ग्रामीण भागात भ्रष्टाचार कसा वाढतो सत्तेच्या जोरावर अनेक वाद, भानगडी, लफडे कसे दाबले जातात, साक्षीपुरावे कसे नष्ट केले जातात याचे चित्रण लेखकाने केले आहे. जातिभेद समूळ नष्ट होण्याऐवजी ग्रामीण भागात संघर्षाची ठिकणगीच पडली. खेड्यामध्ये बेकारीमुळे, सरकारी कायद्यातील पळवाटांमुळे अनागोंदी कारभारास सुरवात झाली. 'दारुबंदीचे धोरण' असतानाही पुढाऱ्यांच्या सलगीने, पोलिसांना हप्ते देऊन दारुधंदा जोरात चालू लागला. व्यसनाधीनता वाढली. बुआबाजीने मूळ धरले. जवाहर रोजगार योजनेअंतर्गत किंवा इंदिरा आवास योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्यांना घरे बांधून दिली. त्याकामी भ्रष्टाचार झाला.

"कचरु गोधळ्याच्या छाटकीनंही जुनं घर सोडलं. नव्या वस्तीत सरपंचाच्या सलगीनं मोक्याची जागा हेरली. झापाळ्या भगताकडून भरलेलं लिंबू आणून नव्या घराला टांगलं अन् दारुच्या धंद्याचा बार ठोकला."(पृ.१५)

ग्रामविकासाबरोबरच नव्या समस्या निर्माण झाल्या हेच यावरुन दिसते.

अस्पृश्यता उद्धाराच्या कल्पनेमुळे पारंपरिक जीवनाला धक्का बसला. सर्व कायदे मागासवर्गीयांच्या हितासाठी केले जात असल्यामुळे मध्यवर्गीय मराठा लोकांची कुचंबणा होऊ लागली. त्यांचे अस्तित्व धोक्यात येण्याची भीती वाटू लागली. मागासवर्गीयांचे वर्चस्व प्रस्थापित होऊ लागले. प्रतिष्ठित प्रस्थापितांना नवी पिढी विरोध करु लागली. चारसहा पागोट्यावाल्यांची त्यांच्या संवादातून दिसते. छटाकीही त्याच मताची आहे.

"- मायला, ह्या सर्कारचे! त्याला काय चळ भरला का काय म्हनावा?

- तर वो! काय एक्याक फ्यॅड काढत्यात तिच्यायला! अशानी हे म्हारं-मांग-चांभारं डोक्यावर बसतीन तर ऱ्हातीन काय? देवळं काय, पाणोठा काय, मसणवटा काय?...

"आपून रीतीला धरुन बोलको का नाय/ आता पैल्यापासून चालत आल्याची रीत. मसणवटा असा मांगानी बाटवायचा म्हंजी काय हे? (पृ.१८) वृद्धाच्या चर्चेतून पारंपरिक जीवनाची त्यांनी अपेक्षाच केलेली दिसते. तसेच स्वातंत्र्यप्राप्तीसाठी कष्ट करणाऱ्यांच्या वाट्याला स्वातंत्र्योत्तर काळात सत्ता कधी आली नाही. त्यांना सत्तेपासून दूर ठेवले गेले. सेनापती बापटांचा मार्ग तुडविणारा, देशहितपर कार्यक्रम करणाऱ्या कचरुला स्वातंत्र्यानंतर भणंग भिकाऱ्यासारखे जीवन जगावे लागले. त्याची बायको दारुधंदा करु लागली. कल्याणराव सरपंचाच्या सेवेत रुजू झाली.

बुवाबाजी ही आजच्या खेड्यातील नवी समस्या आहे. खेडूतांच्या अज्ञानाचा फायदा घेणारे अनेक बुआ खेड्यात आहेत. त्यांच्यामध्ये लैंगिक विकृती असलेली दिसते. पुढारी, गावकरी आणि स्त्रिया या सर्वांवर ते वर्चस्व प्रस्थापित करतात. देवासाठी आश्रम बांधले जातात. पैसे मिळविण्याचा तो एक धंदा आहे. ती एक कला आहे. लोकांना धाक दाखवून, मर्मावर बोट ठेवून ते लोक स्वार्थ साधतात. जसे गंजडी झापाळ्या भक्त तांत्रिक-मांत्रिक देवरशी आहे. मुक्या बाबूशाला तो 'महाराज' बनवितो. लोकांना झुलवतो.

परिवर्तन काळामध्ये काही सुधारणा झाल्या. पिठाच्या गिरणी खेड्यात आल्या. दळण घेऊन येणाऱ्या तरण्याताठ्या मुलींवर बलात्कार होऊ लागले. आनंदा-अम्बूबर बलात्कार करतो. मागासवर्गीय अम्बूवर बलात्कार करुन तो फरार होतो. वार्ताहर, पोलिसांना बातमी समजते. नव्या पिढीतील तरुण भडकतात. प्रकरण चिघळण्यापूर्वी अम्बू-आनंदाचा प्रेमविवाह लावण्याचे ठरते. एकवर्षाच्या आत तिला ठार मारण्याचा निर्णय होतो. आनंदा अम्बूल घेऊन गाव सोडून मुंबईला जातो. चिडतो. व्यसनाधीन बनतो. पुढे समाधानाने एकत्र राहतात. केसू नानाच्या मृत्युनंतर दसक्रियेसाठी ते सावरगावला येतात. आनंदाने मागासवर्गीय मुलीशी लग्न केल्यामुळे भावकीतील तरुणांच्या सोयरिकी जमत नाही म्हणून तालमीतील रावशा आणि त्याचे सहकारी

आनंदाला दम देतात. अम्बूचा जीव घेण्यास सांगतात. गावकऱ्यांच्या दृष्टीने जातकुळीला, गावाला बट्टा लागतो. केसुनानासारख्या सज्जनाच्या इभ्रतीस धक्का लागल्याने तो वेडा होतो. पूर्वी गावातील भानगडी दाबून टाकल्या जात होत्या. परंतु आता त्यांची चर्चा वर्तमानपत्रातून होते. पोलीसखाते देखील अशा केसेस दाबून टाकण्यास तयार होत नाही. काळ बदलत चालला हेच लेखकाने सूचित केले आहे. कोर्ट कचेऱ्या घोषणा-मोर्चे यांचे प्रस्थ वाढले. अन्यायविरुद्ध आवाज उठविण्याचे नव्या पिढीचे सामर्थ्य वाढले. त्यातून मागासवर्गीयातील नव्याजुन्या पिढीमध्ये संघर्ष होऊ लागला. जसे येदू डम्बाळ्याच्या 'अम्बू'वर आनंदा बलात्कार करतो, तेव्हा येदू परंपरागत सोशीक माणसाप्रमाणे वागतो. तर त्याचा मुलगा 'मक्या' त्याला विरोध करतो. पोलिसांकडे फिर्याद देतो. केवळ मागासवर्गीय आणि सवर्ण यांचा संघर्ष सुरु झाला असे नाही, तर मागासवर्गीयांच्या दोन पिढ्यांमध्येही संघर्ष सुरू झाला असे समाजवास्तवाचे चित्र लेखकाने रेखाटले आहे. जुन्या पिढीतील मागासवर्गीयांनादेखील स्वतःच्या जात धर्माबद्दल अभिमान वाटतो. 'येदू' डम्बाळ्याने मराठ्याला मुलगी कशी दिली.(पृ.४०) असा प्रश्न त्यांना पडतो. मागासवर्गीयाने मराठ्यांना मुलगी देणे कमीपणाचे वाटते.

समाजसेवेला धंद्याचे स्वरुप प्राप्त झाले. म्हणूनच दारुचा धंदा बंद करुन 'छटाकी'ला कल्याणराव समाजसेवेचा धंदा करण्यास सांगतात. (पृ.३७) ग्रामीण महिला विकास मंडळाची स्थापना करुन तिला चेअरमन करुन तिचा सत्कार केला जातो. या समाजसेवेच्या धंद्यामुळेच पोलीस खाते कार्यकर्त्यांशी मिळतेजुळते घेतात. सोयीस्कर पंचानामा करतात. मागासवर्गीयांना विकासासाठी, त्यांच्यावरील अन्याय दूर व्हावा म्हणून कायदे केले असले तरी 'अम्बू' सारख्या मुलीवर बलात्कार झाला तरी देखील फौजदार आरोपीला पकडण्याची धडपड करीत नाही. त्याचप्रमाणे मागासवर्गीयांना भडकविण्याचे काम झापाळ्या भक्त करतो असे दिसताच कल्याणरावांच सूचनेनुसार त्याच्या आश्रमावर धाड टाकून त्याला अटक केली जाते. थोडक्यात परिवर्तनकाळामध्ये अनेक सुधारणा आल्या, त्यातून अनेक समस्या निर्माण झाल्या म्हणून श्री. रवींद्र ठाकूराचे "कादंबरीतील समाजवास्तवाचे आणि व्यक्तिरेखांचे चित्रण ठसठशीत उतरले आहे."९७. हे विधान सार्थ वाटते.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये राजकारणाचे चित्र बदलले. मतदानावर डोळा ठेवून मागासवर्गीयांना सवलती देण्यात आल्या. मुख्य हेतू मागासवर्गीयांचा विकास होता. त्यातून राजकारणचे नवे अड्डे निर्माण झाले. संघर्ष सुरु झाले. विविध सामाजिक-राजकीय संघटनेच्या आणि पक्षांच्या लोकांनी याचे फायदे घेतले. सरकारी कायद्यान्वये 'एक गाव एक पाणवठा', 'मंदीर प्रवेश,', 'एक गाव एक मसणवटा', 'इंदिरा आवास योजना', 'महिला विकास मंडळे' या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे गावगाड्याचे स्वरुपच पालटले. खानदानी मराठा लोकांची केविलवाणी स्थिती झाली.

कायद्याला विरोध केला तर तुरुंगाची हवा खावी लागेल म्हणून सरकारी कायद्याला विरोध न करता त्यातून पळवाटा काढण्यास सुरवात झाली. उदा. पूर्वजांना ज्या स्मशानभूमीत जाळले तेथे मागासवर्गीयांचे प्रेत पुरले तर त्यांना काय वाटेल महणून नाईलाजाने बैजा मांगाचे प्रेत पवित्र स्मशानभूमीत पुरले जाते. रात्रीत उकरुन ते हाडकी हाडवळ्यात पुरण्याचा निर्णय प्रतिष्ठित राजकारणी घेतात. बैजा मांगाची स्पेशल मौत म्हणजे कल्याणरावाचे राजकीय ढोंग होय. सर्व पुढारी आदरांजली अर्पण करतात. आम्बू-आनंदा प्रकरण वाढू नये म्हणून आंतरजातीय विवाह लावून सुधारक पुरोगामी गाव म्हणून टेंभा मिरविला जातो. समाजसेवेच नाटक करणारे पुढारी नेत्यांसमोर 'अस्पृश्यतता नष्ट झाली' हे दाखविण्यासाठी मागासलेल्या जातीतील नोकर ठेवतात. आम्ही जातिभेद, शिवाशिव पाळत नाही हे राज्य-देश पातळीवरील पुढाऱ्यांना दाखवून देण्याचा प्रयत्न करतात. परंतु हा फार्स असतो. हा बदल वरवरचा असतो, आतला नसतो. मागावर्गीयांच्या हितापेक्षा स्वहित, निवडणुकीतील मतदानावर गाव पातळीवरील नेत्यांचे लक्ष असते. कल्याणराव सरपंचाकडे राध्या-मंज्या हे हरिजन गडी आहेत. 'अस्पृश्यता हटाव' थेट घरापासून सुरू केल्याचे कल्याणराव सांगतात.

सरकारी योजनांचे लोण गावाकडे वळू लागले. ग्रामपंचायतींना 'इंदिरा आवा' योजनांतर्गत मागासवर्गीयांना घरे बांधून देण्यासाठी अनुदान देण्यास सुरुवात झाली. भेंड्या-पत्र्याची पिवळा रंग दिलेली घरे गावा-गावामध्ये बांधली गेली. परंतु गावपातळीवरील पुढाऱ्यांनी घर वाटपात, वशीलेबाजी केली. पुढारी-ग्रामसेवकांनी या कामात भ्रष्टाचार केला. त्यातून गरिबांचे शोषण होऊ लागले. नवीन वस्त्या उभ्या होऊ लागल्या. अल्पदरात विद्युतपुरवठा केला गेला. हॉटेल, दारुदुकान, किराणादुकान सुरू झाले. रिकामटेकड्यांची संख्या वाढली. गावपातळीवरील राजकारण सांभाळून तालुका, जिल्हा-राज्य पातळीवरील नेतृत्व करावे किंवा सहकारी साखर कारखान्यास परवानगी मिळवून भागाचा विकास करावा, नव्हे स्वहित साधावे असेच कल्याणराव प्रयत्न करतात. सत्तास्पर्धेत अडथळा करणाऱ्याचा काटा काढला जातो, जसे मुंबईतील गिरणीकामगार तरुण गावामध्ये दारु पिऊन धिंगाणा घालतात, तेव्हा त्यांना बेदम मारहाण होते, किंवा झापाळ्या भगत मागासवर्गीयांना भडकवितो, म्हणून डी. एस. पी. शी संपर्क साधून झापाळ्याच्या आश्रमावर धाड टाकून त्याला अटक करण्यामागे कल्याणरावच असतात. परिवर्तन काळामध्ये राजकीय-सामाजिक जीवनात बदल झाला असला तरी सांस्कृतिक जीवनात मात्र बदल झाला नाही. सुधारणा झाल्या त्या बाह्यांगाच्या, अंतरंगात बदल झालाच नाही. विविध विकास योजना समोर येत असताना श्रद्धा-समजूती-सणवार-अंधश्रद्धा यांचे प्रस्थ आहे. त्याबरोबर बुआबाजीचा धंद्रा जोरात चालू झाला. 'पाचर'मध्येही लेखकाने अशाप्रकारच्या लोकजीवनाचे चित्र

रेखाटले आहे. अमावास्येला रक्ताच्या उलट्या होणे, परसात भारलेली लिंब टाकणे, मसणखाईत हडळ दिसणे, खवीस दिसणे, जितराबाचे दूध उडणे, भुताबरोबर झोंबी खेळणे, भुताचे पाय उलटे असल्याचे सांगणे, मढ्यावर नजर दिल्याने ते स्वप्नात येणे. मसणवट्यात मागासवर्गीयांचे प्रेत पुरल्याने तो बाटतो, विटाळतो म्हणून तो मंत्रून शुद्ध करणे. स्वर्गातील पितरांना काय वाटेल, त्यामुळे दुष्काळ पडेल, मरीआईचा फेरा येईल, अपवित्र जागा मंत्रून शुद्ध करण्यासाठी प्रतिष्ठित ब्राह्मण तयार होत नाहीत. गरीब ब्राह्मणांवर ही जबाबदारी सोपविली जाते. गोमूत्र शिंपडून घेऊन लोक पवित्र होऊ पाहातात. (पृ.९ते१४) भूत खवीस लागणे, नवसचा बोजा असणे, विटाळ चांडाळ-देवधरम सोडल्याने पाप लागते. भक्तांकडून मंत्र मारणे, साडेसाती, शनि मागे लागणे, गृहदशेवरही लोकांचा विश्वास आहे. देवधर्म बुडाले, पापपुण्याचा हिशेब बंद झाल्याने दुष्काळ पडणार असे लोक खात्रीने सांगतात. हडळ-खवीस-भूतांना तीन धान्याचा दामटी, बोंबलाचा तुकडा, अंडे यांचा उतारा केला जातो. नारळ लिंबाचा उतार करण्याची रुढी आहे. गावातील स्मशानभूमीत मागासवर्गीयांचे प्रेत पुरण्याने गावाचे काही बरे-वाईट होण्याची भीती वाटते. तसेच मागासवर्गीय देखील रीतीरिवाज मोडण्यास विरोध करतात. यासारख्या अंधश्रद्धा-समजुतीचे चित्रण लेखकाने 'पाचर'मध्ये केले आहे. तसेच बेडकी मारल्याने मुले मुकी होतात किंवा वैऱ्याने शेंदूर पाजल्यासही मुले मुकी होतात. काहींना मुकेपण गेल्या जन्माचे पाप वाटते. सतरा नखऱ्याच्या आईच्या पापामुळे मुले मुका जन्मला येतात अशी समजूत आहे. लोकांना बबूशाच्या मुकेपणाचे कारण 'छटाकी'च्या वर्तनात दिसते. शरीरावरील जखमा बऱ्या होण्यासाठी हळदीने पिवळे केलेले फडके रस्त्यावर टाकले जाते. त्यामुळे जखमा बऱ्या होतात अशी समजूत आहे. शास्त्रीयदृष्टीने विचार करता हळद जंतूनाशक आहे. जखमेवर हळद लावल्याने जखम बरी होते हा विचार अज्ञानी समाजाला पटत नाही. उलट जखमेवर बांधलेले कापड रस्त्यावर टाकल्याने जखमेतील जंतू इतरांच्या शरीरात प्रवेश करतात हे समजून घेण्यासाही अज्ञानी समाज तयार नाही. पती परमेश्वर मानण्याची परंपरा आहे. 'छटाकी' दारुधंदा करते, तसेच कल्याणरावांची शरीरसेवा करते, तरीही कचरुला वेळेवर भाकरी पाठविते. ती म्हणते, "कसा हा आसंना, माझा नवरा हाऐ त्यो." (पृ.३८) येडोबाच्या जत्रेच्या निमित्ताने प्रदेशविशिष्ट अशा श्रद्धा-समजुतीचे चित्रण लेखकाने केले आहे. मागासवर्गीयांसाठी मंदीर प्रवेशाची परवानगी असूनदेखील ते मंदीराला धडका मारतात, त्यात जखमी होवून मरतात. तसेच सवर्णदेखील बकरा कापतात, भंडारा उधळतात, बैलगाड्यांच्या शर्यती होतात. प्रा. खराडे या कर्मठपणाला विरोध करतात, तरीही लोकं त्यांचे जुमानत नाही, अशी ही प्रदेशविशिष्ट येडोबाची जत्रा (पृ.६९) लेखकाने साकार केली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये सामान्याची आर्थिक परिस्थिती एकदम खालावली. पुढाऱ्यांची

शान वाढली. रिकामटेकडे लोक चोऱ्या करु लागले. दारुड्याच्या खिशातील पैसे नष्ट होऊ लागले. शिक्षण घेतलेल्या तरुणांना नोकऱ्या आरक्षणाचा फायदा झाला. रोजगार मिळून आर्थिक परिस्थिती सुधारली. परंतु गावातच उदरनिर्वाह करणाऱ्यांची कुचंबणा झाली. नव्याने पोलीस पाटील झालेल्या भिकाजीराव खुपटे महारास रेडीओ दुरुस्तीसाठी दुसऱ्याकडून उसने पैसे घ्यावे लागतात. त्याने पोलीसपाटील होण त्याच्या बायेकोला पसंत नाही. तेव्हा ती म्हणते, "घरात नाही दाणा न् पोलीसपाटील म्हणा."(पृ.६६) भिका खुपटे आंबेडकर जयंतीसाठी वर्गणी जमा करुन दारु पितो, एकूणच वर्गण्या जमा करुन स्वार्थ साधण्याची वृत्ती कशी वाढीला लागली. भिकाच्या आर्थिक हालाखीची कल्पना येते. खेड्यापाड्यात शाळाकॉलेज सुरु झाल्याने अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यास मागासवर्गीयांच्या नव्या पिढीने सुरवात केली. हक्क कर्तव्याची जाणीव शिक्षणामुळे झाली. राहणीमान उंचावले. उच्च पदावर काम करणाऱ्यांनी समाजजागृतीसाठी प्रयत्न केला, जसे प्रा. खराडे यांनी मागासवर्गीयांचे अज्ञान नाहीसे करण्यासाठी प्रयत्न केला. बुआबाजीला विरोध केला. लोक संघटित करण्याचा प्रयत्न केला. नव्या पिढीला ते पटले.

'पाचर'च्या भाषेचा विचार करता अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर या मागासलेल्या तालुक्यातील बोलीचा प्रत्यय येतो. अनेक अपरिचित शब्द प्रवेशविशिष्ट बोलीतून आले आहे. जसे, डगळ्यांनी, आवई, पिंगवायचा, पोरंधरी, भो, मपला, व्हता, योक, घुलावलाना, यड्या, बाडा, अस्त्याल, कंच्या त्वॉ, बंडी, तुह्यायला तुहे, मायला, तिच्यायला, चिमकुडे, म्हन्शीन, इस्पीकर, प्वारच, बऱ्हाणी, विलाज, सर्कारी, गल्लास, ढोसून, च्यायसका, बर्काऽऽ, पेशल, कायनू-बायनू, पाऱ्हाट, पायशेन, त्वां, पासली, फुकन्या, तुव्हं, इच्यार्ल, ईलाज, एक्याक, ईख, इनाकारण, इऱ्हाईत इ. तसेच काही म्हणीही समाजवास्तवाचे दर्शन घडवितात. १) 'धरलं तर चावतंय अन् सोडलं तर पळतय' (पृ.८), २) 'तोंड दाबून बुक्क्याचा मार' (पृ.२), ३) 'घरात नाय दाणा न् पोलीसपाटील म्हणा' (पृ.६६), ४) 'ढुंगणाखाली जळतं त्याचं त्यालाच कळतं' (पृ.२).

कादंबरीचे मोठेपण मान्य करुन देखील डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात, "निवेदनात भडकपणा येतो आणि शिष्ट भाषेचा प्रयोग अनाठायी ठरतो."९८. हे विधान मान्यच करावे लागेल, कारण काही ठिकाणी निवेदनात भडकपणा आला आहे, जसे मागासवर्गीय तरुणांनी दारु पिऊन गावात धिंगाना घालणे किंवा एस.पी. भाई, बी.डी.ओ. यांची भाषा अनाठायी वाटते, तरीही बदलत्या काळामध्ये इंग्रजी भाषेचा प्रभाव आहे. शिवाय शहरांशी लोकांचा वरचेवर संबंध येत असल्याने शिष्टांची भाषाही अपरिहार्यपणे येते.

## संदर्भ टीपा


१) देशपांडे अ. ना., 'आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास' खंड-२, पृ.१२५
२) खांडेकर वि. स., 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव' (आनंद यादव) पृ.६८
३) तत्रैव, पृ. ६८
४) कुलकर्णी मदन, 'मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरुप' पृ. ४६
५) दळवी जयवंत, 'साहित्यिक गप्पा', पृ. ७५
६) बोधे व. बा., 'साहित्यसूची', मे १९९३, पृ. २०
७) देशपांडे कुसुमावती, 'मराठी' कादंबरी पहिले शतक' भाग-२, पृ. ३१८
८) बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी वाङमयाचा इतिहास' खंड ६, भाग १ पृ.२५७
९) दिघे र. वा., 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' जुलै, डिसें. १९८०, पृ.१७३
१०) देशपांडे कुसुमावती, तत्रैव
११) बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरीचा इतिहास', पृ.२७८
१२) फडके भालचंद्र, प्रदक्षिणा, पृ. २४१
१३) केळकर न. चिं., 'सह्याद्री' मे १९४४, पृ. २७३
१४) तोरो अ. रा. 'आधुनिक मराठी ललित वाङमयातील प्रादेशिकता : उगम आणि विकास' पृ. १६७
१५) मालशे स. गं., 'आवड निवड', पृ.१६३
१६) हस्तक उषा, 'प्रतिष्ठान', ऑक्टो. १९६१, पृ. १८
१७) ठोकळ ग. ल., (मुलाखत) 'मराठी साहित्य-समाज आणि संस्कृती (आनंद यादव) पृ. १४७
१८) तत्रैव, पृ. १४९
१९) प्रधान ग. रा., 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' पुणे एमेजू १९४७, पृ. ३१
२०) देशपांडे कुसुमावती 'मराठी कादंबरी पहिले शतक', पृ.३३३
२१) बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरीचा इतिहास', पृ.६०
२२) सप्रे अविनाश, 'प्रदक्षिणा', खंड दुसरा, पृ. १०६
२३) फडके भालचंद्र, 'प्रदक्षिणा' खंड एक, पृ.२४२
२४) बोधे व. बा., 'साहित्यसूची', जून १९९२, पृ.३७
२५) यादव आनंद, 'मराठी साहित्य: समाज आणि संस्कृती', पृ.१६३
२६) तत्रैव, पृ.१६७
२७) जोग ल. ग., 'कादंबरी', पृ.१२६
२८) नेमाडे भालचंद्र, 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप', पृ.४३

२९) देशपांडे कुसुमावती, तत्रैव, पृ. ३००
३०) बांदिवडेकर चंद्रकांत 'मराठी वाङ्मयचा इतिहस', खंड सहावा, भाग १, पृ.२४३
३१) दांडेकर गो. नी., 'कादंबरी दांडेकर गो. नी.', पृ.११७
३२) दांडेकर गो. नी., 'ललित दिवाळी', १९७३, पृ.३३
३३) पुंडलीक विद्याधर, 'कादंबरीकार गो. नी. दांडेकर', पृ. १२९
३४) मंगरुळकर व्यंकटेश, 'सत्यकथा', ऑगस्ट १९५९, पृ. ३२
३५) बापट-गोडबोले, 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', पृ. २४६
३६) माडगूळकर व्यंकटेश, 'सत्यकथा', ऑगस्ट १९५९, पृ.३२
३७) कागणे म. ना., 'प्रतिष्ठान', जानेवारी १९८१, पृ.२३
३८) शेजवळकर त्र्यं शं., 'नवभारत' डिसेंबर १९५५, पृ. ३२
३९) मंगरुळकर अरविंद, तत्रैव पृ. ३८
४०) मंचरकर र. बा., 'आलोचना', जुलै १९८२, पृ.३
४१) जोग ल. ग., 'कादंबरी' पृ. ११६
४२) भोसले द. ता., 'ग्रामीण साहित्य: एक चिंतन' पृ. ४७
४३) फडके भालचंद्र, 'दलित साहित्य: वेदना आणि विद्रोह' पृ. २०९
४४) साठे अण्णाभाऊ, 'चंदन' (प्रस्तावना) चंद्रकांत शेटे प्रकाशन, चौथी आवृत्ती, १९७६
४५) डोळस वसंतराव, 'दलित साहित्य : प्रेरणा आणि स्वरुप' पृ. ७५
४६) कोत्तापल्ले नागनाथ, 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध' पृ. ५९
४७) नसिराबादकर ल. रा., 'महाराष्ट्र साहित्यपत्रिका' पुणे० जाने ते जून १९७८, पृ. १००
४८) रामभट, 'ललित' ऑगस्ट १९६९, पृ. ३२
४९) कुलकर्णी श्री. मा., 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' पुणे. जाफेमा १९६०, पृ. २७
५०) तोरो अ. रा., ''आधुनिक मराठी ललित वाङमयातील प्रादेशिकता उद् गम आणि विकास'' पृ. ३३१
५१) वाकोडे मधुकर, 'प्रतिष्ठान', एप्रिल मे १९६३, पृ. १७
५२) मंचरकर र. बा., 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे' जुलै ते डिसें. १९८० पृ.६०
५३) तत्रैव
५४) भोसले एस. एस., 'प्रतिष्ठान', एप्रिल मे १९६३, पृ१७
५५) पुंडलिक विद्याधर, 'सत्यकथा', सप्टेंबर १९६२, पृ. ७५

५६) तोरो अ. रा., तत्रैव पृ. ३२४
५७) भोसले द. ता., तत्रैव
५८) कुलकर्णी श्री. मा. तत्रैव
५९) यादव आनंद, तत्रैव, पृ. १७६
६०) भोसले एस. एस. 'व्रतिष्ठान', डिसेंबर १९६२ जानेवारी १९६३, पृ.२२-२३
६१) कोत्तापल्ले नागनाथ, 'नवकथाकार शंकर पाटील याच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास', पृ. २२७
६२) आत्रे त्रि. ना., 'गावगाडा', पृ.१-२
६३) कोत्तापल्ले नागनाथ, 'ग्रामीण साहित्य: स्वरुप आणि शोध', पृ.९-१०
६४) परांजपे प्र. ना., 'मनोहर मासिक' ऑगस्ट १९६६, पृ.६०
६५) पठाण यू. म., 'प्रतिष्ठान', सप्टें. डिसें. १९७८, पृ. ४६
६६) गोविलकर लीला, 'साहित्यसहकार' नोव्हें.१९६४, पृ.१९
६७) मंचरकर र. बा., तत्रैव ६८
६८) परांजपे प्र. ना., तत्रैव
६९) जोग ल. ग., 'ललित' जुलै-सप्टें. १९६५, पृ. ४५
७०) कुलकर्णी व. दि., 'मराठी कादंबरीची वाटचाल', पृ. ७३
७१) भोसले एस. एस., 'प्रतिष्ठान' एप्रिल मे १९६३, पृ. ३१
७२) मुलाटे वासुदेव, 'गोतवळा' या कादंबरीची समाजशास्त्रीय समीक्षा', पृ.३
७३) कुलकर्णी अ. वा. 'गोतावळा - साद आणि प्रतिसाद' (संपा. कीर्ती यादव), पृ.१९
७४) भोसले एस. एस. 'वैखारी', जाफेमा, १९७३, पृ.२
७५) कुंभोजकर रा. अ., 'साहित्यसूची', १९८२, पृ. ६३
७६) मुलाटे, वासुदेव, तत्रैव
७७) कुलकर्णी मदन, 'मराठी कादंबरी तंत्र आणि स्वरुप', पृ. २१५
७८) मंचरकर र. बा., 'गोतावळा साद आणि प्रतिसाद' पृ. ५५
७९) वडस्कर या. वा., तत्रैव, पृ. ८५
८०) गुमास्ते प्रभाकर, तत्रैव, पृ. ११०
८१) कुलकर्णी मदन, तत्रैव, पृ. १४३
८२) यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', पृ.८३-८४
८३) मंचरकर र. बा., तत्रैव
८४) ठाकूर रवींद्र, 'आनंद यादव : व्यक्ती आणि वाङमय', पृ.३३
८५) कुलकर्णी अ. वा., तत्रैव, पृ. १९

८६) मिरजकर निशिकांत, तत्रैव, पृ. ४६
८७) बोरकर वि. ज., तत्रैव, पृ. १२८
८८) तुपे उत्तम बंडू, 'ललित' मार्च १९८६, पृ. ४४
८९) बळेल अनिल, 'ललित', एप्रिल १९८८, पृ. ७२
९०) सिधये मेधा, 'साप्ताहिक माणूस', १६ फेब्रुवारी १९८५, पृ. २४
९१) तत्रैव
९२) डहाके वसंत आबाजी, 'ललित' मे जून १९८७, पृ. २३ ते ३०
९३) चौगुले वि. शं., 'ललित' मे जून १९८७, पृ. १५
९५) तत्रैव पृ. १६
९६) आलोचना, अंक१० जून १९८८, पृ. २८
९७) ठाकूर रवींद्र, 'मराठी ग्रामीण कादंबरी', पृ. १३४
९८) तत्रैव

□□□

## २. कोकणी (गोव्यासह) जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप

**प्रस्तावना**

कोकणी (गोव्यासह) जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप शोधण्यासाठी आधारभूत म्हणून पुढील कादंबऱ्यांचा विगमणात्मक पद्धतीने अभ्यास करून काही निष्कर्ष नोंदविण्याचा प्रयत्न आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सराई | र. वा. दिघे |
| २) | आई आहे शेतात | र. वा. दिघे |
| ३) | अन्नदाता उपाशी | वि. वा. हडप |
| ४) | मांडवी! तू आटलीस? | लक्ष्मण सरदेसाई |
| ५) | भावीण | बा. भ. बोरकर |
| ६) | हद्दपार | श्री. ना. पेंडसे |
| ७) | गारंबीचा बापू | श्री. ना. पेंडसे |
| ८) | पडघवली | गो. नी. दांडेकर |
| ९) | सारे प्रवासी घडीचे | जयवंत दळवी |
| १०) | इंधन | हमीद दलवाई |
| ११) | भाकरी आणि फूल | मधु मंगेश कर्णिक |

एक गोष्ट अगोदरच स्पष्ट केली पाहिजे की, उपरोल्लित कादंबऱ्या प्रदेश चित्रणाच्या हेतूने लिहिल्या आहेत असेच नाही. यादृष्टीने हा शोध घेत असताना या कादंबऱ्यांमधून प्रकट झालेली प्रादेशिकता ही त्या त्या लेखकांनी जाणीवपूर्वक प्रकट केली आहे किंवा काय? याचाही शोध घेण्याचा प्रयत्न आहे. कारण कादंबरीकार हा एक ललित लेखक असतो आणि तो आपली साहित्यकृती निर्माण करीत असताना त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवांचे स्वरुप त्याच्या अंगी असलेल्या कल्पनासामर्थ्यासह प्रकट करीत असतो. हे करीत असताना काही ठिकाणी वास्तवानुभवापेक्षा कल्पनासामर्थ्य, रंजकता, अतिरंजकता, अद्‌भूतता, चमत्कृतीजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता यांचाही लेखकाच्या लेखन प्रकृतीनुसार, आविष्कार झालेला असू शकतो, त्यामुळे

कादंबरी किती वास्तवदर्शी आहे किंवा नाही हे या ठिकाणी गौण असले तरी त्या अनुषंगाने त्या लेखकाच्या लेखनात प्रकट झालेली कोकणी प्रादेशिक जीवनाचे वैशिष्ट्ये शोधण्याचा प्रयत्न उपरोल्लिखित कादंबऱ्यांच्या आधारे करुन निष्कर्ष नोंदवता येतील.

### १. र. वा. दिघे

#### *(१) ''सराई''*

र. वा. दिघे यांच्या 'पाणकळा'ने निसर्गजीवन आणि मानवीजीवन यांच्यामधील भावपूर्ण एकतानतेची एक परंपरा निर्माण केली. या परंपरेतील त्यांची 'सराई' कादंबरी आहे. निसर्ग, पात्र, घटनाप्रसंग आणि रानसई हे वास्तवातील आहेत.१. असे स्वतः लेखकाने एका मुलाखतीत म्हटले आहे. तसेच कहाणीची कहाणी (सराई) सांगताना 'सराई'तील जीवनचित्रण, व्यक्ती निसर्ग स्वानुभवलेला वास्तव आहे असे त्यांनी म्हटले आहे.२. लेखकाच्या या स्पष्टीकरणाच्या पार्श्वभूमीवर कादंबरीच्या कथानकाचा विचार करता चार पदर स्पष्ट जाणवतात. बाप्पाजी देशपांडे इनामदारांचे लोकजीवन आणि कातोडी ठाकूर-कुणब्याचे त्यांच्यावर अवलंबून असणे. मनोहर-लाडीची असफल प्रीती आणि मनोहर-मनोरमेचे सफल जीवन, भिवरी-अंकुशाचे उत्कट प्रेमजीवन कुणबी-ठाकूर-कातोड्यांचे समना मारवाड्याकडून होणारे शोषण, सरकारी अंमलदाराकडून होणारे शोषण, या विशाल पटातून सह्याद्रीच्या कुशीतील रानसई गावातील लोकजीवनाचे वास्तव चित्र लेखकाने रेखाटले आहे.

बाप्पाजी हे रानसईचे दयाळू, दानशूर, विठ्ठलभक्त आहेत. कुणब्या-कातोड्यांवर ते प्रेम करतात. प्रसंगी रागावतात, पण पोटावर मारत नाहीत. शब्दासाठी आणि मानसन्मान पाहुणचारासाठी समना मारवाड्याचे कर्ज काढतात. तुकाराम फॉरेस्टर जंगलात एकट्यादुकट्या तरण्याताठ्या मुलीशी अंगलट करतो, बलात्कार करतो, बेअब्रू होऊ नये म्हणून घाबरट लोक गप्प बसतात. परंतु स्वातंत्र्यप्रिय कातोडी तुकारामवर बिघडलेले असतात. दीपाजीच्या लाडीशी दारुच्या नशेत तुकाराम अंगलट करतो म्हणून अंकुशा कातोडाची बायको भिवरी त्याचे बोट रक्तबंबाळ करते. मनोहर तुकारामला लोळवतो. म्हणून तो त्याच्याशी कायमचे वैर ठेवतो. मनोहर-लाडी गपा करीत रानसईकडे येतात, हे पाहून केसुतात्या देशपांडे संशयाने पाहतो. बाप्पाजींच्या तो वाईटावर असतो. व्यवहारी तात्या पैशाच्या जोरावर मानसन्मान मिळविण्यासाठी धडपडतो. परंतु गावकरी त्यांना जुमानत नाहीत. सर्व न्यायनिवाडा बाप्पाजींच्या घरी होतो. म्हणून तो कातोड्यांचा बाप्पाच्या विरोधात चिथावतो. ते ऐकत नाहीत. समना मारवाड्याच्या मार्फत बाप्पाजीची राजपाटी हस्तगत करण्याचे स्वप्न पाहतो. समना कर्ज वसुलीसाठी आणि जंगलातील लाकडे तोडली म्हणून तुकाराम त्यांच्यावर

खटला भरतात. लाडी मनोहर संबंधाबद्दल केसूतात्या गावभर अफवा पसरवितो. सयाजीचा मुकुट दुष्टांच्या गटात सामील होतो. प्रतिष्ठित बाप्पाजी मनोहरच्या कृत्यावर पांघरुण घालण्यासाठी गरीब दीपाजीला गाव सोडायला सांगतात. त्याला आर्थिक मदत देऊ करतात. परंतु दीपाजी मदत नाकारतो. गाव सोडतो.

केसूतात्याच्या विनोबासाठी आलेले पाहुणे मनोहरला मुलगी देतात आणि स्वत:च्या मुलाशी सुभद्रचे लग्न त्याच मांडवात होते. या लग्नामुळे केसुतात्या अधिक बिघडतात. दीपाजी जवळच्या जासई गावातील मुलाशी लाडीच लग्न लावून देतो. गावात येतो. सासुरवासाला कंटाळून लाडी रानसराईला पळून येते. तिच्यामागे काठ्या घेऊन पंचवीस लोक येतात. गावपंचायतीच्या निर्णयाप्रमाणे तिला सासरला पाठविले जाते, परंतु तिचा तेथे छळ होतो म्हणून फरारी कातोडी अंकुशा तिला सोडवून आणतो. ती दीपाजीच्या घरात राहू लागते. पंच दीपाजीवर बहिष्कार टाकतात. मनोरमेला लाडीची भेट घेण्याची इच्छा असते. मनोहर-लाडीचे प्रेमप्रकरण तिलाही समजलेले असते. राजपाटीत भातलागवडीच्या वेळी लाडी-मनोरमेची भेट होते. दोघींचे चांगले- जमू लागते. दरम्यान बाप्पाजी मनोहरला पुण्याला पाठवितात. पिठोरी अमावस्येला लाडी गौर आणायला निघते तेव्हा गावातील मुली तिच्यावर बहिष्कार टाकतात. ती एकटीच गात गात कर्वत कडा चढून वर जाते. परत आलेल्या मनोहरची भेट होते. गौर आणायला गेलेली लाडी परत आली नाही म्हणून शोधाशोध सुरू होते. सुभानराव फौजदार, बाप्पाजी आणि ग्रामस्थ तिचा शोध घेण्यासाठी येतात. तेव्हा दोघे एकत्र असल्याचे बाप्पाजीला दिसते. ते लाडीला घेऊन परत जातात. मनोहरशी बोलत नाहीत. सुभानराव मनोहरला समजविण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा प्रयत्न व्यर्थ ठरतो. घडलेला प्रकार लाडी मनोरमेला सांगते, रात्री मनोहरची भेट घेण्यासाठी चिखल तुडवित नदीकाठी येतात. शेवटी माघारी जातात. तेव्हा मनोरमाच्या खोलीत टेबलावर मनोहरच्या हस्ताक्षरातील एक पत्र त्यांना मिळते. तो वऱ्हाडात दूर जातो. शाळामास्तरची नोकरी करतो. बंदूक घेऊन फरार झालेला अंकुशा धनिकांच्या घरावर दरोडे घालतो. सुभानरावाला सापडत नाही. लाडी-तुकारामाच्या मोहतुराचे नाटक केले जाते. केसुतात्या अंकुशाची भेट घेऊन तुकारामच्या विरोधात त्याला भडकवितो. तो रानसईत येतो, तेव्हा कातोडी समजून पोलीस केसुतात्याला गोळी घालतात. अंकुशाला अटक होते. समनाचे अंकुशने नाक कापले होते, त्याचा बदला घेण्यासाठी तो तुकारामकडून भिवरीला छळतो. तो शिताफीने तुरुंगातून सुटतो व तुकारामचा खून करतो. वेळेअभावी समनाचा तो खून करु शकत नाही. तो खून मनोहरने केला असा सुभानरावला संशय असतो. लाडी-भिवरीचे ते जबाब घेतात. त्यांच्यावर पाळत ठेवतात. दरम्यान मनोहर-लाडीचे संबंध आल्यामुळे ती गरोदरही असते. तरीही मनोहरला वाचविण्यासाठी तुकाराशी शरीरसंबंध आल्यामुळे गरोदर असल्याची साक्ष

ती देते, परंतु लाडीची बदनामी टाळण्यासाठी तुकारामच्या खुनाचा कबुलीजबाब अंकुशा देतो. दरम्यान मनोरमा शेताकडे लक्ष देते. समनाचे कर्ज फेडते, इनामदारांचे निरर्थक खर्च, बडेजाव बंद करते. अंकुशाला फाशी होते. लाडी आत्महत्या करते. काळनदीला महापूर आला असता मनोहर अनेकांचे जीव वाचवितो. बाप्पाजी त्याच्याशी बोलू लागतात. समना मारवाडी पुरात वाहून जातो. बाप्पजीवर बहिष्कार टाकणारे गावकरी 'मोठ्या घरात' आश्रय घेतात. सर्व दुष्टांचा मृत्यू होऊन शेवटी मनोहर-मनोरमा एकत्र येतात. असे 'सराई'चे विस्कळीत कथानक आहे. म्हणून 'दिघ्यांच्या या कादंबरीचा पिंड मूलत: स्वप्नरंजनात्मक आहे आणि तरी ह्या कादंबरीचे कथानक ज्या सामाजिक पार्श्वभूमीवर घडते ती वास्तव आहे. जीवनव्यवहाराचे जे नियम आहेत, त्या नियमानुसार रानसराईतले जीवन जगले जाते...''३ हा गंगाधर गाडगीळ यांचा अभिप्राय सार्थ वाटतो.

कादंबरीतील सर्वच व्यक्तिरेखा या वास्तवातील आहेत. कोकणातील माणसांचे राग-लोभ संघर्ष त्यातून व्यक्त होतात. सर्वांच्या चित्रणातून लेखकाला अभिप्रेत असलेले 'रानसई' गावचे चित्र आकाराला येते. 'रानसई' गावच येथे नायक आहे. त्या गावातील सराईशी सर्वांचे जीवन एकरुप झाले आहे. सरकारी अमंलदार, तुकाराम फॉरेस्टर, सुभानराव फौजदार आणि हार्टसाहेबांचेदेखील 'रानसई'शी नाते जडलेले दिसते. मसना मारवाडी, केसुतात्या देशपांडे, तुकाराम फॉरेस्टर आणि तानक्या हे देखील दुष्ट माणसे आहेत. बाकी सर्वच सुष्ट वृत्तीचे आहेत. बाप्पाजीची व्यक्तिरेखा तर लेखकाच्या आजोबांची आहे असे लेखकाने म्हटले आहे. त्यांचे जीवन लोकजीवनाशी एकरुप झाले आहे. ते ठाकूर-कातोडी-कुणब्यांच्या लोकजीवनाचा आधार आहेत. सर्वजण त्याच्यावर अवलंबून आहेत. शीघ्र कोपी आणि क्षणात शांत होणारा त्यांचा भोळा स्वभाव आहे. कातोड्यांना चोप किंवा शिव्या देणारे बाप्पाजी त्यांना भादव्यात मदत करतात. "तो शिव्या देईल पण पोटावर मारणार नाही" अशी कोया कातोड्याला खात्री असते. उदार, परोपकारी, दयाळू, सज्जन आणि वचनाचा सच्चा आणि शब्दाचा धड आहे तो. वेळप्रसंगी कर्ज काढून पाहुणचार करणारे, थोडे अव्यवहारी दानशूर आहेत. जुन्या इनामदारी संस्कृतीच्या आदर्शाप्रमाणे ते जगतात. मुलांच्या लग्नात कर्ज काढून पंक्ती उठवितात. ग्रामस्थांवर पित्याप्रमाणे प्रेम करतात. दीपाजीला गावाबाहेर पाठविताना त्यांना दु:ख होते. मनोहरच्या वर्तनामुळे हे घडले म्हणून त्याच्याशी बोलायचे सोडून देतात. वडिलोपार्जित कर्ज फेडतात, बहिष्कार टाकणाऱ्या गावकऱ्यांना आश्रय देतात. मनोहर मुलगा, सुभद्रा मुलगी आणि राजसबाई धर्मपत्नी तर मनोरमा ही सून असा त्यांचा परिवार आहे. अंध गणू रंगाने काळाकुळकुळीत, भुतासारखा दिसणारा, गालावर देवीचे व्रण, एकडोळा डुचका असलेला राहीशी मोहतूर करण्याचे आणि जत्रेत केसुतात्याचे छकडे हरविण्याचे स्वप्न साकार करतो.

'औंदा सोडणार नाय' म्हणत राहीशी पाट लावतो. इमानेइतबारे बाप्पजीकडे काम करतो. अंधूप्रमाणे इतर सर्व व्यक्तिरेखा सामान्य आहेत. गज्या-बज्या भांडखोर कुणबी, सयाजी खाऊनपिऊन सुखी असलेला पैसेवाला कुणबी आहे. मुकुट त्याचा जवान मुलगा आहे. केसुतात्या देशपांडे हे बप्पाजीचे स्पर्धक आहेत. बाप्पाजीच्या 'राजपाटी'वर डोळा ठेवणारा, सावकारी करणारा, स्वार्थी, कातोड्यांवरील चोरीचे भात घेणारा, कपटी, कंड्या पिकविणारा गावातील चांडाळ चौकडीचा सदस्य आहे. विनोबा हा त्याचा हडकुळा मुलगा आहे. दीपाजी हा अकार्यक्षम, व्यवहारशून्य, स्वाभिमानी, कष्टाळू, अब्रूदार सज्जन आहे. मुलीच्या वर्तनामुळे गाव सोडणारा, भावाने बहिष्कृत केलेली, बाप्पजीला 'राजपाटी' विकणारा 'रडतोंडीचा घाट' आहे, तर त्याची बायको बय सोशीक, कष्टाळू आहे. त्यांची मुलगी लाडी म्हणजे निसर्गकन्याच आहे. मुकुटवर निरागस प्रेम करते. तुकाराम फॉरेस्टरला वश होत नाही, मात्र मनोहरवर उत्कट प्रेम करते. परंतु समाजाच्या नियमामुळे दोघांचे लग्न होऊ शकत नाही. जासईतील सासरच्या जाचाला कंटाळून परत गावात येऊन राहणारी, गौर आणणारी कष्टाळू तरुणी आहे. डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, "लाडीची व्यक्तिरेखा दीर्घकाळ स्मरणात राहील अशी तिची असीम प्रीती, अवखळ साहस, तिचे दु:ख, तिला सोसावा लागणारा अपमान यांचे दिघ्यांनी कुशलतेने चित्र रेखाटले आहे."४. तर अन्य व्यक्तिरेखांसबंधी समाधान व्यक्त करुन कुसुमा देशपांडे लिहितात, "...पोरीचे हे कल्पनाचित्र अद्‌भूतरम्य आहे. तिच्या प्रीतीला सीमा नाही. तिचे साहस अवखळ आहे. तिच्या स्वातंत्र्याला बंध नाही. तिचा विश्वास व समज अगाध आहे. तिचे दु:ख व तिला सोसावा लागलेला अवमान अपार आहे. परंतु तरीही तिची व्यक्तिरेखा अवास्तव वाटू नये इतक्या कुशलपणे चित्रीली आहे. लाडीचे व्यक्तित्व हे या कथेतील सौंदर्याचे व रोमांचकारितेचे केंद्र आहे. ही व्यक्तिरेखा मराठी कादंबरीच्या संपदेतील एक अमोल रत्न आहे."५. इनामदार-कुणब्यांप्रमाणे कातोडी-ठाकूर या वन्यजातीतील माणसांचे जिवंत चित्र लेखकाने रेखाटले आहे. कोया, अंकुशा, भिवरी, तानक्या यांच्या चित्रणातून कातोड्यांची स्वातंत्र्यप्रिय वृत्ती तर धवा, धवीचे चित्र रेखाटून ठाकूरांची प्रामाणिक, कष्टाळूवृत्ती दिग्दर्शित केली आहे.'पाणकळा' कादंबरीतील भू-प्रदेश, माणसं लेखकाने पाहिलेले होते, तर 'सराई'तील भू-प्रदेश माणसं, रानसई गाव, नदी, पर्वतकडे, भाताची शेते लेखकाने केवळ पाहिलेलीच नाहीत तर प्रत्यक्ष अनुभवलेली आहेत. 'सराई'तील कुणब्यांची धावपळ त्यांनी अनुभवली आहे. त्यामुळे 'पाणकळा'च्या तुलनेत वास्तव जीवनदर्शनाच्या दृष्टीने प्रस्तुत कादंबरी सरस वाटते. सह्याद्रीच्या कुशीत 'रानसई' गाव आणि माणसांच्या विश्वाचे दर्शन लेखक घडवितो. या प्रादेशिकतेचा आणि निसर्गाचा मानवीजीवनावर झालेला परिणाम त्यातून दिसतो. निळे आकाश, सह्याद्रीच्या रांगा, पर्वतकडा,

सारंगखिंड, भैरवधबधबा, काळाकडा, दऱ्या-खोऱ्यात पसरलेली भातशेती, घनदाट जंगल, त्यातील सागवान, हेके, कोसम, ऐन, आंबे, हिरडा, बेहडा, शिकेकाई, निवडुंग, अंजन, धवडा ही झाडे करवंदाच्या जाळ्या, तेरडा, सोनटक्की, विचुकान, मोरंग, झेंडू, कूर्डू, काख, सायली या वेली आणि फुलझाडे, मोर, सकोत्री, कट-रावे, हरेल, आर, रानगवे, सांभर, डुक्कर इ. पक्षीप्राणी यांची सृष्टी लेखक जिवंत करतो. भात हे प्रमुख पिक तर नाचणी, वरी ही इतर पीके आहेत. या प्रदेशाच्या प्रभावामुळे कोकणातील स्त्री-पुरुष अधिक काटक आणि कष्टाळू बनलेले दिसतात. वन्य जमाती मासे पकडून, शिकार करुन, प्रसंगी चोरी करुन उदरनिर्वाह करु शकतात. भादव्यात मात्र येथे हिरवा दुष्काळ पडतो. पीक डोलायला लागते, तेव्हा कुणब्यांच्या घरात खायला भात नसतात. सावकाराकडून ते दीढीने भात घेतात. ठाकूर कवळ्याचा पाला खाऊन जगतात, जंगलातील लाकूडफाट्यावर अवलंबून असतात. निसर्ग आणि मानवीजीवन यांच्यातील भावपूर्ण एकतानता ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणाऱ्या निसर्गदृश्यांनी लेखक रेखाटतो. प्रस्तुत कादंबरीतील निसर्गदृश्य चित्रमय, रेखीव, दृक प्रत्यय देणारी आहेत. अ. ना. देशपांडे म्हणतात, "दिघ्यांची निसर्गवर्णने अनेक दृष्टींनी बहारीची आहेत. त्यात विविधता आहे. म्हणजेच त्यांनी निसर्गातल्या सौम्य तशाच रौद्र दृश्याचेही दर्शन घडविले आहे. त्या दृष्टीने 'सराई' मधील 'पावसाळा' नामक प्रकरणातील भाताच्या लागवडीचे वर्णन आणि शेवटच्या 'अपरिहार्य' या प्रकरणातील सतत छत्तीसतास पडत असलेल्या मुसळधार पावसाचे वर्णन, ही उदाहरणादाखल वाचून पाहण्यासारखी आहेत.६. मानवी जीवनाशी सुसंवादी अशीच निसर्गवर्णने प्रत्ययकारी आहेत. अ. ना. देशपांडे यांनाविशेष आवडलेल्या वरील दोन निसर्गवर्णनाप्रमाणेच गंगाधर गाडगीळही कादंबरीच्या सुरुवातीच्या पर्जन्यवृष्टीचे (पृ.२ व ३) उदाहरण घेऊन 'निसर्गाच्या विविध रुपांचा एक चित्रपटच आपल्या डोळ्यासमोरुन सरकतो. विराट कालगतीचे अस्तित्व आपल्याला सतत जाणवत राहते."७. असे म्हणतात. पात्रांच्या मानसिकतेनुरूप येथे लेखकाने निसर्गचित्र रेखाटलेले दिसते. जसे मनोहरच्या बासरीतून निघणाऱ्या आलापांनी वेडी झालेली लाडीची मानसिकता (पृ.६१) निसर्गवर्णनातून रेखाटली आहे. तसेच वादळाचे वर्णन दीपाजीच्या मानसिकतेनुरूप आहे. जासईला लाडीचे लग्न लावून दीपाजी गावात परत येतो. बाप्पाजीचे शेती करु लागतो. परंतु लाडी पळून आल्यामुळे गावपंचायत बसते. तिला सासरला पाठविण्याचा निर्णय होतो. लेखक वर्णन करतो, "...वळीवाची मोठी वावटळ सुटली. आकाशात धूळ उठली व डोंगर दिसेनासे झाले. झाडे मोडून पडली. आंब्या-जांभळीच्या झाडाखाली फुलांचा सडा झाला... रानसईतील पोरेबाळे या कडकडाटाने भेदरुन गेली..." (पृ.१८०) आवकळ्या पाऊस पडल्याने वैभव धबधबा काळ नदीत कोसळू लागला. नदीला पूर आला. तो पाहण्यासाठी रानसईचे

लोक घराबाहेर पडले. कोकणातील लोकांच्या सुखदु:खावर परिणाम करणारा, प्रभाव गाजविणारा असा हा प्रदेशविशिष्ट निसर्ग एक पात्र म्हणूनच आला आहे. या सर्वांतून लेखकाने 'रानसई' गाव जिवंत केले आहे. "वास्तवता व स्वप्नमयता यांचे जे मिश्रण दिघ्यांनी या कादंबरीत केले आहे ते अपूर्व आहे."८. असे गंगाधर गाडगीळ म्हणतात. हे विधान सार्थ वाटते. कारण त्यांनी निर्माण केलेले जग वास्तव आहे. 'रानसई'तील लोक सामाजिक व्यवहार-नियमाप्रमाणे वागतात. धनिकांकडून गरिबांचे शोषण होते. कातोडी चोरीची सवय सोडत नाही. तुकाराम फॉरेस्टकडून अब्रूला धोका असतानादेखील परिस्थितीमुळे तरण्यामुलींना जंगलातून लाकडाची मोळी आणावी लागते. डॉ. यादव या संदर्भात म्हणतात, "स्वातंत्र्यपूर्व काळातील मध्यम दर्जाच्या शेतकऱ्याचं वैभव भोगून ते बसले होते. डोळसपणानं ठाकूर आणि कातोडी यांच्या जीवनपद्धतीचा, रीतीरिवाजाचा, स्वभाविशेषांचा त्यांनी अनुभव घेतला होता. त्या सगळ्यांचा सहानुभूतीने भरपूर तपशिलाने बारकाव्यानिशी व रसिक मनोज्ञ आविष्कार करणारा मराठीतील हा पहिलाच कादंबरीकार."९. म्हणजेच 'सराई' स्वानुभावातून जन्मली हे मान्य करायला हरकत नाही. डॉ.० यादवांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना दिघे म्हण्तात, "बऱ्याच गोष्टी सांगाव्यात असं वाटलं. या कादंबरीचा 'हिरो' आहे. 'रानसई' हे गाव. या गावाचं समग्र जीवन, तेथील माणसांचे सामाजिक स्तरांचे वेगवेगळे जे ग्रामीण पातळीवर संबंध असतात ते रेखाटावेत असं वाटलं. त्या वेळच्या एका मराठी खेड्याची 'व्यक्तिरेखा'च मला रेखाटायची होती. खेड्यातील मध्यमवर्गीय सावकारी-संस्कृती काय असते हे मला दाखवावं होतं.१०. लेखकाच्या वरील विवेचनाप्रमाणे 'रानसई' गावची आणि परिसराची जिवंत व्यक्तिरेखा साकार झाली काय? ठाकूर-कातोडी-कुणबी आणि इनामदारांचे सावकारांचे वास्तव जीवनचित्रण करण्यात लेखकाला कितपत यश आले?

इनामदार-कुणबी यांच्याप्रमाणे ठाकूर-कातोड्याच्या समाजजीवनाचे चित्र रेखाटले आहे. समना सारख्या सावकाराकडून आणि तुकाराम फॉरेस्टरसारख्या अंमलदाराकडून त्यांचे शोषण होते. पिळवणूक आणि अब्रूला धक्का लागत असूनही सोशीक जनता संघर्षाचा पवित्रा घेत नाही. परंतु स्वातंत्र्यप्रिय वृत्तीचे कातोडी मात्र अन्याय सहन करीत नाहीत. बाप्पजी इनामदार खऱ्या अर्थाने लोकजीवन जगतात. वेळप्रसंगी सर्वांना मदत करतात. इनामदार घराण्याचा पोकळ बडेजाव, अव्यवहारीपणा आणि मानसन्मानाच्या, पालकत्वाच्या कल्पनेमुळे मोठ्याप्रमाणावर ते खर्च करतात. 'देणे अधिक वसूल कमी' यामुळे ते कर्जबाजारी झालेले दिसतात. दानशूर, दयाळू, बाप्पजींना 'राजपाटी' गहाण ठेवावी लागते. कर्जवसुलीसाठी त्यांच्यावर समना मारवाडी खटला भरतो. सुदैवाने मनोरमा व्यवहारी असल्यामुळे जमीनीवर कर्ज काढून जमीन सोडविते. इनामदारांचा बडेजाव थांबविते, निरर्थक खर्च कमी करते. भाकड जनावरे

कुळांना अर्धलीने देते, 'बडा घर पोकळ वासा' अशी मोठ्या घराची झालेली परिस्थिती सावरते. उलट केसुतात्या देशपांडे सावकारीचा धंदा करतात. व्यवहारीपणे वागतात. पैशाच्या जोरावर बाप्पाजीशी स्पर्धा करुन शेती विकत घेतात. सगळ्यात मोठे शिष्ट पंच होण्याचा प्रयत्न करतात. परंतु लोक मात्र चुकून देखील तात्यांच्या मागे जात नाहीत. मोठ्या घरीच सर्व खटल्यांचा न्यायनिवाडा होतो. कातोडी खाल्ल्या मिठाला जागतात. तात्याच्या चिथावणीला बळी पडत नाहीत. मुलांच्या लग्नासाठी कर्ज काढून-जमीन गहाण ठेवून पंक्ती उठविण्याचा विचार करतात, तेव्हा राजसबाई त्यांना 'हाथरुण' पाहून पाय पसरण्याचा' सल्ला देतात, पण त्या स्वत:ही दिवाळीला मोठा खर्च करतात. खोट्या प्रतिष्ठेसाठी मानसन्मानासाठी अवाढव्य खर्च करणाऱ्या इनामदारांचे घराणे डबघाईला आले. भाऊबंदकीचा शाप त्यांना भोवला. तरीही त्यांची पालनकर्त्याची भूमिका त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडलेली लेखकाने दाखविली आहे.

इनामदारांप्रमाणेच कुणब्यांच्या जीवनावर लेखकाने प्रकाशझोत टाकला आहे. स्वत:ची किंवा इनामदारांची जमीन आणि जंगलातील लाकूडफाट्यावर त्यांचे पोट अवलंबून असते. अब्रूला जपत ते कष्ट करतात. जसे जंगलातून लाकूडफाटा आणण्याशिवाय यांच्यासमोर पर्याय नसतो. सरकारी अंकलदाराचा उपद्रव वाढलेला असतो. लाडीसारखी तरुण मुलगी वश करण्यासाठी तुकाराम फॉरेस्टर धडपडतो. तिच्या हातातील कोयता जप्त करु पाहतो. अंगलट येतो. भिवरी आणि मनोहर तिला सोडवितात. मनोहरबरोबर ती गावापर्यंत आल्यानंतर त्याला दुसऱ्या मार्गाने जायला लागते. कोणी पाहील, अफवा पसरतील, बेअब्रू होईल याची तिला भीती वाटते. केसूतात्या पुढे दोघासंबंधी अफवा पसरवितात, त्याचप्रमाणे अंमलदाराने बलात्कार करून देखील अब्रूसाठी मुली गप्प बसतात. कोणी तक्रार केली तरी जंगलातील लाकडे तोडली म्हणून पंचनामा करायला गेलेल्या अंमलदाराशी मुलींनीच झटापट केली असा पुरावा समोर येतो. गरिबाचा वाली कोणी नाही, त्यांना न्याय मिळत नाही. म्हणून 'झाकली मूठ सव्वा लाखाची' असे समाजवास्तव आहे. कारण सराईतील भात भादव्यापर्यंत जपून ठेवण्यासाठी लाकूडफाट्यावर त्यांना उदरनिर्वाह करावा लागतो. तुकाराम फॉरेस्टर जसा मुलींवर बलात्कार करतो आणि 'अब्रू'साठी भेकड लोक काही करु शकत नाही याची खात्री झाल्यावर बाप्पजीसारख्या सज्जनावर जंगलातील सागवान तोडल्याचा खोटा खटला भरतो. किंवा वाघाची शिकर केली आणि वणवा लावला म्हणून मनोहर आणि गावकऱ्यांना तो खटला भरण्याची धमकी देतो. यातून सरकारी अंमलदारांची अरेरावी दिसते. तुकाराम प्रमाणे समना मारवडीदेखील त्यांचे शोषण करतो. खोट्यामापाने भात घेतो. भादव्यात दीढीने त्यांना भात घालतो. व्याज-बट्ट्यात फसवितो, खोटे खटले भरतो. अज्ञानाचा फायदा घेतो. म्हणूनच अंकुशा कातोडी त्याचे नाक कापतो. त्याच्या दृष्टीने पैसा सर्वात महत्त्वाचा असतो.

नदीला महापूर आला असतानादेखील तो पैसा-सोने सोडून, जीव वाचविण्यासाठी आलेल्याबरोबर येत नाही. शेवटी महापुरात वाहून जातो. अस्मानीपुढे सुलतानीचे काही चालत नाही.

गावपंचायतीचा निर्णय सर्वांवर बंधनकारक असतो. प्रत्येकजण त्याचे पालन करतो. अन्यथा त्याला वाळीत टाकले जाते. बहिष्कृत केले जाते. लाडी जासईहून पळून आली असता पंचायत लाडीला सासरी पाठविण्याचा निर्णय देत. सायपाटलाला पंचवीस रुपये दंड करते. बापाने दिल्याघरात मुलीने विनातक्रार नांदायचे असा समाज संकेत लाडी मोडते, ती परत गावात येते तेव्हा दीपाजीवर गावपंचायत बहिष्कार टाकते. शेवटी गरोदर लाडीला बाप्पजी आश्रय देतात. मोठ्या घरात तिचे बाळंतपण केले जाते. तेव्हा बाप्पाजीवरही बहिष्कार टाकला जातो. गावात आपल्या मुलामुळेच आपली बेअब्रू झाली म्हणून मनोहरशी ते बोलणे बंद करतात. पिठोरी अमावस्येला गौर आणायला निघालेल्या मुली लाडीवर बहिष्कार टाकतात. आंतरजातीय विवाहाची कल्पना समाजमान्य नसल्याने लाडी-मनोहरचे लग्न होऊ शकत नाही. गरीब दीपाजीला गाव सोडावे लागते. पांढरी सोडून जाणे त्याला कठीण जाते. नीती, जनलज्जा, अब्रूकरीता बाप्पाजी त्याला गाव सोडायला लावतात. जुलूम करतात. धनिकांच्या अब्रूपुढे गरिबाच्या अब्रूला किंमत उरत नाही. कुणब्यांवर चार प्रकारची संकटे येतात. मानवनिर्मित, समाजनिर्मित, निसर्गनिर्मित, शासननिर्मित. या संकटांमुळे त्यांचे शोषण होते. ते सर्व संकटप्रसंगी मूक राहिलेले दिसतात. अन्यायविरुद्ध ते आवाज उठवू शकत नाही. कारण त्यांच्या नाड्या शोषणकर्त्यांनी घट्ट पकडून ठेवलेल्या असतात.

वनचे राजे असलेल्या कातोड्यांचे जीवनचित्रण लेखकाने केले आहे. नृत्याने बेभान होणारे, एकमेकांना अवघड कोडी घालणारे, अब्रू जपणारे, जीवाला जीव देणारे, निष्पाप, जगात कोणाशी बांधील न राहण्याची स्वातंत्र्यप्रिय अशी त्यांची स्वच्छंदी वृत्ती असते. हातातले काम टाकून शिकारीमागे पळणारे, चोरी हा धर्म मानणारे, खोटे बोलण्याची सवय लावून घेणारे मासे पकडण्यासाठी कोरे लुगडे बिनदिक्त ते वापरतात. परंतु शेतात कष्ट करीत नाहीत. बांध फोडून मासे पकडतील, उंदराच्याबिळातील भात व त्यांची पिल्ले आणि जंगलचा मेवा खाऊन उदरनिर्वाह करतात. कातोड्यांची मुले दुधावर आलेल्या ओल्या भाताची लोंबरे चावून खातात, कुणबी त्यांना पकडण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते चपळाईने पसार होतात. बाप्पाजी अंधूला म्हणतात, ''जाऊ दे, त्यांना नुसती दहशत बसली की पुरे. सगळीकडे सराई पिकली आहे. उंदीर, पाखरं, सावकार, कातोडी या सगळ्यांची सराई पिकली आहे. मग याच पोरांनी काय पाप केलं आहे! ह्या सगळ्यांनी नेल्यावर जे उरेल ते आपलं.'' (पृ.७) यावरुन सर्वांचे जीवन 'सराई'वर अवलंबून असते. त्यातील कातोडी अधिक बेफिकीर आहेत. ''उद्याची काळजी उद्याला, कातोड्याला नाही'' (पृ.३६) असे ते

अव्यवहारी, शिकारप्रिय, स्वतंत्र वृत्तीचे आहेत. सुभानराव फौजदार अंकुशाला पोलिसांच्या स्वाधीन होण्यास सांगतो, शिक्षा कमी करण्याचे वचन देतो, तेव्हा अंकुशा म्हणतो, "लायसीन कां काडलं नाही? तुम्ही कुठं काढलं आहे? म्हणे बंदुकीला लायसीन! शिकारीला लायसीन! पानतंबाखूला-ताडीमाडीला-दारुला लायसीन! जगायला लायसन! मरायला लायसन! शहरात मेलं तरी लायसीन लागतं, आमाला नय लागत लायसीन. आमाला नाय तुमची गोष्ट कबूल." (पृ.१६१) चोरी करणे कातोड्यांच्या कुळीचा जातिधर्म आहे. ते पोटाकरता चोऱ्या करतात असे लाडी मनोहरला सांगते. भिवरी अंकुशाची जेलमधील भेट (पृ.२७९) कातोड्यांच्या स्वातंत्रप्रिय वृत्तीचे द्योतक आहे. परंतु खाल्या मिठाला जागण्याची त्यांची परंपरा आहे. जसे डोंगरगावच्या कातोड्याना बाप्पजीने मार दिला तेव्हा केसुतात्या त्यांना फिर्याद देण्याची चिथावणी देतो. फिर्यादीचा खर्च करण्यास तयार होतो. परंतु ते त्याचे ऐकत नाहीत. "त्याचं आन खाल्लंय आम्ही" (पृ.४२) असे ते म्हणतात. कोया-अंकुशा बांध फोडून मासे पकडतात. परंतु दिल्या शब्दाप्रमाणे दुसऱ्या दिवशी परत बांध घालून देतात. सारंग खिंडीत बाप्पाजीची थैली सांभाळणारे कातोडी समना-केवद्याला लुटतात. समनाचे नाक अकुंशा कापतो. तुकारामने बाप्पजीवर खटला भरला असता सयाजीच्या मदतीने पुरावा नष्ट करतो. मनोहरला मदत करतो. लाडीची बदनामी होऊ नये म्हणून तुकारामच्या खुनाच्या कबुलीजबाब देऊन फासावर चढतो. पाचवीला भाताच्या लोंब्या पूजण्याची परंपरा असणाऱ्या कातोड्यांचा चोरी धर्म असूनही मदत करणाऱ्याशी इमानाने वागतात. इतरत्र चोऱ्या करतात.

कातोड्याच्या उलट ठाकूरांचे वर्णन असते. ते मवाळ, गरीब, कष्टाळू, प्रामाणिक, भित्रे, निरुपद्रवी आणि इमानी असतात. शब्दाला पक्के असतात. दिवाळीच्या दिवशी कुणब्यांची जनावरे ओवाळून ते पोस्त मागतात. डोंगरमाथ्यावरील शेतात राबतात. नाचणी-वरी पिकवतात. परांड्यातून भाजीपाला पिकवतात. इनामदारांच्या वाट्याची नाचणी प्रामाणिकपणे पोहच करतात. भादव्यात त्यांची उपासमार होते. लाकूडफाट्यावर कसातरी उदरनिर्वाह करतात. खरे बोलतात. प्राणांती खोटे बोलत नाही. आडमुठेपणामुळे शेती करतात, म्हणून फारसे उत्पन्न मिळत नाही. 'कावळा' खाऊन ते जगतात. धवा ठाकूराची व्यक्तिरेखा रेखाटून "कावळा अन् राजा जेवला" म्हणणाऱ्या ठाकूरांच्या जीवनावर प्रकाशझोत टाकला आहे. डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर 'सराई'चा गौरव करताना म्हणतात, "...सराई मात्र बरीचशी अद्भूतापासून वेगळी राहिली आहे. त्यातील कातोड्यांचे, ठाकरांचे, कुणब्यांचे जीवन वास्तवदर्शी आहेच, पण बाप्पाजी व तात्या खोत यांच्यातील वैमनस्य, तुकाराम फॉरेस्टची दुष्ट कामुकता, मारवाड्याची सावकारी या सर्वच गोष्टी वास्तवाच्या पातळीवर ठेवण्यात दिघ्यांना उत्तम यश मिळालेले आहे..."११. कारण रानसईच्या सामान्य शेतकऱ्याच्या आणि ठाकूर

कातोडी या आदिवाशी वन्य जमातीच्या जीवनव्यवहारांचा समन्वय लेखकाने साधला आहे. त्यामुळे प्रस्तुत कादंबरी सामान्यांचे जीवन आणि उपेक्षितांचे जीवन या दोन्ही दृष्टीने खोपोलीच्या भौगोलिक पार्श्वभूमीवरील वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक कादंबरी आहे .

स्वप्नरंनात्मक कादंबरीमध्ये आर्थिक जीवन चित्रणाला विशेष महत्त्व नसते. परंतु लेखकाला 'मध्यमवर्गीय सावकारी-संस्कृती' रेखाटायची असल्यामुळे काही घटना प्रसंगातून कुणीबी-कातोडी-ठाकूर ते इनामदार आणि इनामदार ते सावकार अशी शोषणकर्त्यांची शृंखला लेखकाने रेखाटली आहे. मारवाडी, कालण (दारुवाले), चिकीवाले, पानवाले आणि बांगड्यावाले देखील त्यांचे शोषण करतात. आर्थिक लुटीबरोबर अब्रूचीदेखील लूट केली जाते. बाप्पाजी सारख्या नेकीच्या माणसाला घराच्या दुरुस्तीसाठी खर्च करता येत नाही. मनोहर घराला मेडीचा आधार देतो. किंवा केवद्याचे कर्ज फेडण्यासाठी समनाकडे मोठ्या आईची नथ गहाण ठेवावी लागते. रावबहादूर सुभद्रेला पाहायला आले असता पाहुणचारासाठी लागणाऱ्या वस्तू समना देत नाही म्हणून अंधूच्या डोक्यावर मागल्यादाराने भात पाठविला जातो. त्यांची पाचहजार रुपये हुंड्याची मागणी झेपत नाही. कर्ज वसुलीसाठी समना खटला भरतो. पिढ्यानपिढ्या इनामदारांवर कर्ज असते. सावकार व्याजात सर्व भात खोट्या मापाने घेतात. अशा प्रकारे इनामदारांच्या डबघाईला आलेल्या आर्थिक परिस्थितीचे चित्रण येथे केले आहे. त्याचप्रमाणे वर्षभर कष्ट करणाऱ्या कुणब्याच्या हातात काहीच शिल्लक राहात नाही. दीपाजी वर्षभर सहकुटुंब राबातो. भात पिकवतो. खळ्यावर समनाला आणि इनामदाराला भात देऊन रिकाम्या हाताने परत जातो. जमीनदार कुणब्यांना भाताच्या मापात फसवितात. ते सराई पिकवितात आणि जमीनदार सावकारांची कोठारे भरवितात. भादव्यात उपाशी राहण्याची वेळ त्यांच्यावर येते तेव्हा व्यापारी किंवा जमीनदारांकडून दिलेले भात घेतात. इनामदाराला व्यापारी फसवितात. कुणबी-जमीनदार-व्यापारी अशी ही चढत्या क्रमाने शोषणकर्त्यांची शृंखला असते. जसे अंधू कुळांना मापात फसवितो. अंधूला समना फसवितो. हे वर्षानुवर्षे चाललेले असते. कुणब्याने कितीही पिकविले तरी मारवाडी, काळण, चिकीवाले त्याचे शोषण करतात. अज्ञान आणि अव्यवहारीपणामुळे त्यांचे शोषण होते. जसे अल्पदराच्या वस्तुसाठी कुणब्याच्या बायका मागल्या दाराने पायली पायली भात घालतात. 'सराई' कुणब्यांच्या मेहनतीवर अवलंबून असते. मेहनत-मशागत चांगली केली, पाऊस झाल्यावर चिखोल चांगला केला तरच भात पिकतो. दीपाजी नेहमी, श्रम करण्यात कमी पडतो. त्यामुळे त्याचा कमी भात पिकतो. बाप्पाजी त्याला त्यामुळेच 'रडतोंडीचा घाट' म्हणतात. सर्व व्यवहार सराईवर अवलंबून असतात. वायदे, लग्न कपडेलत्ते घेणे सर्वांला जामिन सराई असते.

''माजलेल्या गवतावर जनावरे तयार होऊ लागली. गरीब शेतकऱ्यांच्या घरातील

दाणा पार संपला. एक महिन्याकरीता कर्जाऊ भाताची दिढी घालण्याचे कबूल करुन भात नेण्याकरिता कुळांचे जमाव सावकारांच्या ओटीवर बसू लागले. भातशेतीच्या प्रदेशातील भादवा काळ म्हणजे हिरवा दुष्काळ. याच प्रदेशात ज्या वेळी अपरंपार पाऊस पडून सगळीकडे हिरवेगार झालेले असते, त्यावेळी भुकेने शेतकऱ्यांचे चेहरे उदास होतात.ज्यावेळी कणसातील भात दूध घेत असतो त्यावेळी घरातील दाणा खलास होतो. ज्यावेळेस विपुल गवत खाऊन जनावरे तयार होतात त्यावेळी शेतरकी फाट्यांसारखे सुकतात... ठाकूर कवळ्याच्या भाजीवर दिवस काढू लागले. कातोडी मिल्ही व मासळी यांच्यावर भूक शांत करु लागले..." (पृ.२२३) या वर्णनावरुन प्रदेशावलंबी जीवनाची कल्पना येते. नाचणी-वरी पिकविणाऱ्या ठाकूरांना भात पिकणाऱ्या प्रदेशात वास्तव्य करुनही भातापासून वंचित रहावे लागते, जसे धवा ठाकूर मनोहरला सांगतो, "...आम्ही ठाकूर मानकापली तरी खोटं काम करणार नाही. खोटंक बोलणार नाही. सराई कातोडी, मराठे, इनामदार यांची पिकली. कीडमुंगी पाखरं यांची सराई पिकली. आमची नाय पिकली." (पृ.७२) सराईचा फायदा ठाकूरांना होत नाही, ही जनजातीच्या जीवनातील प्रादेशिकता लेखकाने नोंदविली आहे.

शुभाशुभाच्या कल्पना, रीतीरिवाज, परंपरा, समजुती, अंधश्रद्धा, यात्रा-उत्सवांचे वर्णन केले आहे. जसे, कोल्ह्याचं तोंड पाहाणे शुभ समजले जाते. नव्याच्या पुनवेला दारावर लोंबरे बांधली जातात. भूत-देवशावर विश्वास ठेवता जातो. तुऱ्याचा कोंबडा भगताला दिला जातो. आडून ऐकणे पाप समजले जाते. त्यामुळे पुढचा जन्म पालीचा घ्यावा लागतो. मृत्यूनंतर पाणी पाजण्यासाठी वंशाचा दिवा हवा. बैल तयार करण्यासाठी गांजा खाऊ घालणे, कार्तिकी पुनवेला त्रिपुरसुंदरीच्या जत्रेला बैलगाडीने जाणे, कोल्हे हुकीला माप केले की भाताची रास वाढते. त्याच्या आधी शेतातील देवीचीं परडी न् देवाची जत्रा करतात. मांडीच्या कण्याची पूजा केली जाते. मांडीच्या मध्ये नारळ ठेवला जातो. उदबत्या लावल्या जातात व फुले वाहिली जातात. मळणीच्या वेळी सर्व काम खुणांनी चालते कारण त्यावेळी शांतता ठेवण्याचा प्रघात आहे. पूर्वी चारपायाचा प्राणी बळी देण्याची प्रथा होती, अलीकडे दोन पायावर भागते असे दीपाजी मनोहरला सांगतो. दोन पाय म्हणजे कोंबडा, चार पाय म्हणजे बकरं. दोन पायाची मळणीच्या वेळी कंदोरी केली जाते. शेतात धामण असेपर्यंत भात अधिक पिकतो, शेतकरी गब्बर होतो, अशी प्रदेश विशिष्ट समजूत आणि सांस्कृतिक परंपरा आहे. (पृ.९६) परंतु दीपाजीसारखा फाटका व निष्कांचन शेतकरी कधीच गब्बर होत नाही. घरात चितई शिरणे शुभ समजात. चितई अजगरासारखी असते. तिला पुण्यप्राणी समजतात ती कोंबड्या खाते, परंतु घरात चितई शिरुनही दीपाजीच्या घरात अशुभच घडते. घराबाहेर पडताना कोणी शिंकले तर अशुभ घडते. जसे दीपाजीच्या गाडीचा आस आणि चाक शिंकण्यामुळेच मोडतो. मनोहरला आईने बहिरीचा अंगारा लावणे,

मनोहरवरुन नारळ उतरुन टाकणे. ग्रहदशेवर बाप्पाजींचा विश्वास आहे. गुरू वाईट असल्यामुळे मनोहर नापास झाला, परंतु तो बदलल्याबरोबर सुभद्रेचे लग्न जमले. पिंपळाच्या झाडावर खवीस बसलेला असतो. त्याला खारीक, खोबरे, बदाम, नारळ यांचा उतारा लागतो. भाताच्या लागणीचे अवघड काम करण्यापूर्वी वडीलधाऱ्यांचे दर्शन आणि आशीर्वाद घेण्याची परंपरा आहे. स्त्रिया पिठोरी अमावस्येला महादेव व्रत करतात. पुरुष महादेवाची पूजा करतात. गावातील तरण्यामुली आणि नववधू जंगलात गौर आणायला जातात. फेर धरुन नाचतात. गातात. अशा वेळी विधवा, बहिष्कृत लाडीला त्या सामील करुन घेत नाहीत. तेव्हा एकटीच गौरीचे गाणे म्हणते,

"तुझ्या रथाला चांदीच्या खीळा गं ।
तुझ्या कमरेला सोन्याच्या किल्ल्या ॥...
जाईजुई चमेली बेपर्वा गं ।
फुलवि पाण्याचा अरवा सखा ॥" (पृ.२२८)

गौरीकरता ती कचोऱ्यांची व तेरड्याची फुले गोळा करते. शिमग्याला बाप्पाजीच्या होळीचा पहिला मान असतो. गौरीकरता ती कचोऱ्यांची व तेरड्यांची फुले गोळा करते. शिमग्याला बाप्पाजीच्या होळीचा पहिला मान असतो. ते होळी पेटवितात. भाविकपणे होळीपुढे बोंब मारतात. मग गावकऱ्यांच्या होळ्या पेटतात. गावात वाघ्यामुरळीचे सोंग काढतात. गावातील कुलंगडी बाहेर काढतात. वाघ्यामुरळीचा नाच करत प्रत्येकाच्या दारापुढे जातात. वाघ्याच्या अंगात येते. त्याला प्रश्न विचारले जातात. तेव्हा तो गमतीदार उत्तरे देऊन चिमटे काढतो. (पृ.१६३) याप्रमाणे इनामदार कुणब्यांच्या सांस्कृतिक विशेषांचे लेखकाचे दर्शन घडविले आहे. ठाकूर दिवाळीची पोस्त मागत गावभर फिरतात. "वाघ्या रं वाघ्या, वाघ्या राखो तुमची घुर।" अशी आरोळी ठोकतात. जनावरे ओवाळतात, पोस्त-फराळाचे आणि भात घेऊन परत जातात. तर चोरलेल्या भाताची लोबटं मुलाच्या पाचवीला पुजण्याचा कातोड्यांचा धर्म आहे. रामबाणाच्या कणसाचा कापूस जखमेवर लावतात, पिठोरी अमावस्येच्या मुहूर्तावर चोरी साधली नाही तर पूर्णवर्ष फुकट जाते अशी कातोड्यांची समजूत असलेली दिसते. दारु पिऊन नाच करणाऱ्या कातोड्यांची मेलेल्या माणसाला मूठमाती देण्याची परंपरा वैशिष्ट्यपूर्ण-नावीन्यपूर्ण आहे. खड्ड्यात प्रेताशेजारी धनुष्य-बाण, पाठीवर भाता आवळला जातो. शिकारीची हत्यारे खड्ड्यात ठेवतात. विव्हळ स्वरात गाणी म्हणतात, फेर धरुन नाचू लागतात. मेलेल्याला उद्देशून म्हणतात,

"बामणाच्या जन्मा जाशील तर शेंडी झटकून मरशील"
परभाच्या जन्मा जाशील तर लिवून लिवून मरशील"
"कुळंबाच्या जन्मा गेलास तर काबाडाने मरशील"
"कातोड्याच्या जन्मा आलास तर - तर?" "वनचा राजा होशील"

'कातोड्याच्या जन्मा येरं, वनचा राजा होरं' (पृ.१४६)

असे म्हणत चढाओढीने नाचतात आणि मूठमाती देतात. "मग प्रत्येकाने कोयाच्या मानेवर एकएक टांच रेंगसून मूठ-मूठ माती टाकली. प्रत्येक कातोडी कायाला बजावीत होता की, 'कोया, कातोड्याच्या जन्माला ये हो. दुसरीकडं कुठं जाऊ नकोस!" (पृ१४७) कोयाच्या अंत्यविधीच्या निमित्ताने लेखकाने कातोड्यांचा जातीबद्दलचा अभिमान संस्कृतिविशेषाचे दर्शन घडविले आहे. तसेच त्यांची कोडे घालण्याची परंपरा लेखक सांगून जातो. जसे तानक्या अंकुशाला 'सहा तोंडाचा देव कोणता?' असे कोडे घालतो, कोड्याचे उत्तर दे नाहीतर भिवरी दे किंवा मारामारीला तयार हो. तेव्हा अंकुशा 'कार्तिकस्वामी' असे उत्तर देतो आणि तानक्याला पुढीलप्रमाणे कोडे घालून कायमचे निरुत्तर करतो, भिवरी कायमची त्याची होते.

"एक होती चौपाइ ।"

"तिच्यावर बसली दुपाई ॥"

"तिने गिळली निपाई ॥"

'माझ्या कोड्याचं उत्तर देईल, तो शहाणा शिपाई ।"(पृ.५६)

याचप्रमाणे रानात कातोडी आनंदाने गीत म्हणतात. एकमेकाला साथ देतात. लाडी-अंकुशाचे ललकारी गीत (पृ.३८) आहे तसेच गुराखी देखील (पृ.४०) गीत गातात.

'रानसई' आणि परिसरातील लोकांचे जीवन चित्रण करणारी दिघ्यांची भाषा अधिक स्वाभाविक वाटते. निवेदन आणि संवाद प्रमाणभाषेत असूनही त्यामध्ये चपखल बसलेले, बोलीतील शब्द अर्थघन व नावीन्यपूर्ण आहेत. उदा. शिरलिन, गवे, म्हशे, धुळपेरे, खलाटी, लोंबर, गंवड, नाबर, नद्रस, होबासा, उपटी, कारा, गरी, पळंजी, फाणस, डुंगी, ऐनाट, तोहमत, बाशी, रोहटे साये, आवण, बेणणी, डोबण, कुसाड, खांदाड, गवड, गुरुळ, तेरडा, कचोरा, विष्णुकांत, कोंबडबाअुल, आवण, मोरंग, बेचके, निगूत, फरी घबड, पोटखळी. न. चिं. केळकरांनी 'पाणकळा' आणि 'सराई'मधील या शब्दांसंबंधी म्हटले आहे, "हे शब्द ग्रंथकाराने मुद्दाम आपले प्रादेशिकत्व मिरविण्याकरीता काही हुडकून निवडून घेऊन घातलेले नाहीत. खास वर्णनाच्या वाक्यरचनेच्या ओघात स्वाभाविक रीतीने आलेले उघड दिसतात. १२. यावरुन प्रादेशिकता स्पष्ट होते. 'हात तुना मुर्दा पडिस' सारखे कातोड्यांच्या भाषेतील शब्दही काही ठिकाणी दिसतात. उपमा-प्रतिमांमधून ही सृष्टी त्यांनी जिवंत केली आहे. उदा. "ओहोटीचा समुद्र नदीपासून मागे हटतो, तसा तो लाडीपासून दूर झाला," "बाराच्या दुहेरी गवती केल्यांप्रमाणे मनोहर लाडी गवतात लपली", "भाताचे आवण पृथ्वीच्या पोटातून पाचूची किरणे बाहेर पडावीत असे शोभिवंत दिसू लागले," "कमलावर जशी कमलासना श्री शारदा तशी खलाटीतील भातावर सराई शारदीय

प्रसन्नतेने हसत होती'', ''(लाडीचे) तिचे संगीत म्हणजे पावसाळ्यात फोफावत वाढणारी सर्प जशी यमुनाच ।'', ''(कातोड्यांची मुले) त्यांचा पांगलेला जमाव वाऱ्यावर सोडलेल्या कागदाच्या चिठ्ठ्याप्रमाणे पळताना दिसत होता'', ''रानात अजगराने भेकर पकडावी अशी तुकारामाने तिला धरली'', ''ती कोकम पिकल्याप्रमाणे लाल झाली होती', 'लाडीचे डोके भुंग्याच्या जोडीप्रमाणे त्याला दिसले'', ''भिवरी शंकराला भुलवणाऱ्या भिल्लिणीप्रमाणे नाचत होती'', ''(केसूतात्यांच्या) छातीचा सांगाडा व बरगड्या मोडक्या विरल्याप्रमाणे वरखाली होत होत्या.'' - या सर्व उपमा-प्रतिमा ग्रामीण समाजवास्तवाचे दर्शन घडविणाऱ्या आहेत. त्याचप्रमाणे काही म्हणी-वाक्प्रचारही आहेत.

''हांथरुण पाहून पाय पसरावेल'', 'चोराच्या उलट्या बोंबा', 'सराई सुगी न् सबली उगी', 'दगा किसका सगा नाही', 'कुळंब्याबिगर दाता नाही अन् मारल्याबिगर देता नाही', 'गाडीमागं धुरळा', 'बडे घर आणि पोकळ वासा' 'नवलाईची नवलपुरी, कोंबडीच्या गळ्यात सरी', 'उंदराला मांजर साक्षी', 'चोराची नजर बोचक्यावर', 'रानसईचं दांड तर जासईचं बांड', 'बारा म्हशी तेरा गाई, अन्नशुद्धीला तूप नाही'. या सर्व म्हणी वाक्प्रचारांतून लोकसाहित्याचा समाजमनावरील प्रभाव जाणवतो.

आतापर्यंतच्या विवेचनावरुन कुसुमावती देशपांडे यांच्यास पुढील अभिप्रायाची समर्पकता लक्षात येईल. त्या लिहितात, ''सराई'या कथेमध्ये दिघे यांनी आपल्या आपजपर्यंतच्या निर्मितीतील उच्चांक गाठला असे दिसते... दिघे यांच्या लेखनाची मूळ प्रकृती मात्र कल्पनारम्यता व वस्तुनिष्ठा, सौंदर्यविलास व मानवी जीवनाची गाढ सहानुभूती आणि समज यांचा समन्वय झालेला आढळतो. दिघ्यांच्या लेखणीने मराठी गद्याला चढवलेले आणखी एक लेणे म्हणजे निसर्गाविषयीच्या सुजाण भावनेने प्रेरित झालेल्या वर्णनांचे, वन्य जातीच्या जीवनाकडेही त्यांनीच प्रथम लक्ष वेधले. अनेक कारणांमुळे या लोकांच्या जीवनाच्या चित्रणाची प्रथा मराठी कादंबरीच्या गेल्या दहा वर्षात वाढत आहे.''१३.

स्वप्नरंजनात्मक प्रकृतीच्या 'सराई' मधून कोकणातील सामान्य माणसाने जीवन-संकेतपरंपरा आणि कातोडी-ठाकूर या उपेक्षित आदिवासी समाजाचे सुखदुःख आणि लोकाचारांचे दर्शन घडविले आहे. कृषिशी संबंधित जीवन आणि कातोड्यांचे स्वतंत्र जीवन यामुळे प्रस्तुत कादंबरी 'पाणकळा'पेक्षा श्रेष्ठ दर्जाची प्रादेशिक कादंबरी आहे.

### *(२) 'आई आहे शेतात'*

'आई आहे शेतात' (१९५६) ही दिघ्यांची कादंबरी तिच्या पुढचे पाऊल आहे. नव्या कायद्यामुळे आणि समाजरचनेच्या नव्या कल्पनांमुळे कोकणच्या खेडेगावातील जीवनात जो बदल होत आहे, त्याचे चित्रण लेखकाने या कादंबरीत केले आहे.

'पाणकळा' आणि 'सराई'तील सजलपूर आणि रानसई पेक्षा या कादंबरीतील राई हे उत्तर कोकणातील खेडे आणि जीवनचित्रण विश्वसनीय वाटते. प्रदेश आणि व्यक्ती यांचे संमिश्र संबंधातून लेखकाने प्रत्ययक्षम चित्र रेखाटले आहे. दादाजी, तातू आणि नानू या तीन पिढ्यांच्या काळात बदलत गेलेले जीवन चित्रित केले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील एकत्र कुटुंबपद्धतीचे विघटन होण्यास प्रारंभ झाला. गावातील इतरांच्या कुटुंबाचे विघटन होते. एकूणच 'गावगाडा' उद्ध्वस्त होत गेला याचा वास्तव आलेख लेखकाने रेखाटला आहे.

नानू सातपुते बाळपणापासूनच्या आठवणीतून राईमधील जीवनाचे चित्र रेखाटतो. नानू वडिलांबरोबर बडोदा, या शहरांमध्ये वास्तव्य करीत असला तरी त्याला जन्मगावातील शेती, मासं, निसर्ग, यांची ओढ असते. त्याचे आजोबा दादाजी 'राई' चे जमीनदार आहेत. ते स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेसचे कार्यकर्ते आहेत. अनेक कुळांचे ते पालक आहेत. बाबाजी सातपुत्यांचे 'साखरपट्टी' हे शेत नानूच्या आईचे दागिने मोडून आणि तातूंची बारावर्षांची पेन्शन खर्च करुन तसेच कोर्टाची टाच उठविण्यासाठी केरींग मारवाड्याकडून तीनहजार रुपये घेऊन खरेदी करतात. तुकाराम महाडीकांच्या कुटुंबियांनाच त्या शेतावर कुळ ठेवतात. दादाजीच्या शब्दाबाहेर कोणी जात नाही. ते त्या गावाचा आधार आहेत. तातूंना सर्वजण धनीसाहेब म्हणून मान देतात. जमीनदार दादाजी सातपुत्यांच्या घराण्यातील सरंजामशाही बेहिशोबी खर्चामुळे आणि बदलत्या कायद्यामुळे 'राई'तील माणुसकीची भावना हळूहळू नाहीशी होऊ लागते. घराण्याचे वैभव संपते. बंधूजी हा दादाजीचा पुतण्या रंगेल आणि रगेलपणे वागत असला तरी गावकरी त्याच्या वर्तनाकडे सुरवातीला दुर्लक्ष करतात. परंतु कुळकायद्यामुळे लोकांना हक्काची जाणीव होते. झांज्यासारखा कातोडी बंधूजीला विरोध करतो. गावकरी देखील कंटाळतात. त्यांचे घरात आणि गावात वर्चस्व आणि उपद्रव वाढतो. दादाजी त्याच्या बेफिकीर वर्तनापुढे हात टेकतात. त्यांचे घरात काही चालेनासे होते. गावताल स्त्रियांची तो छेड काढतो. तुकारामच्या सुनेशी (सगुणा) तो अतिप्रसंग करतो. त्यामुळे गावपंचायत तिला बहिष्कृत करते. तुकारामची बायको जिजा, सातपुते घराण्याला शिव्या मोजते. परंतु 'साखरपट्टीवर' तिचे मुलांप्रमाणे प्रेम असते. काळपाटील आणि धोंडूमामा या शेतावर डोळा ठेवून असतात.

बडोदा सरकारकडील नोकरी गेल्यामुळे तातू सहकुटुंब राईला येतात. आपल्या उत्पन्नात वाटेकरी निर्माण झाल्याने बंधुजी संतापतो. त्यांना घरात प्रवेश करु देत नाही. गावकरी त्यांना जमीन वाटपाचा सल्ला देतात. बंधुजी वाटणीस तयार नसतो. धोंडूमामा, काळपाटील आणि केरींग मारवाडी तातूंना जमीन विकण्याचा सल्ला देतात. उलट नातू स्वत: करण्याचा निर्णय घेतात. तुकाराम कुटुंबियांची विनंती मान्य करुन साखरपट्टीचा ताबा घेत नाही. बंधुजीचा दारु पिऊन शिवीगाळ करण्याचा

दैनिक कार्यक्रम अखंड चालूच असतो. धोंडूमामा आणि काळपाटील जिजा आणि तिचा मुलगा दगड्याला कोर्टाचा मार्ग दाखवितात. परंतु दगड्याने बैल विकून, खर्च करुनही निकाल तातूंच्य बाजूने लागतो. जमिनीचा ताबा तातूला मिळणार असे समजल्यावर बंधुजी त्यांच्याशी मारामारी करतो. तेव्हा गावकरी आजारी तातूंना भेटायला येतात. साखरपट्टी आपणांस मिळावी अशी स्वार्थी इच्छा त्यांची असते. तुकाराम ताबा देण्यास तयार असतो, परंतु त्याचे कुटुंबीय त्याचे ऐकत नाही. तो वेडा होतो. स्वातंत्र्य चळवळीचा परिणाम 'राई'सारख्या छोट्याखेड्यावरही होतो. इंग्रज सैनिक 'राई'तील लोकांना मारझोड करतात. त्यानंतर दादाजींना भ्रम होतो.

तातू शेती करु लागतात. लोक खोटेपणा करुन त्यांना फसवितात. त्यांचे नुकसान होते. त्यानंतर मात्र घराची आणि शेताची जबाबदारी नानू सांभाळतो. जपानी पद्धतीने शेती करुन अधिक उत्पन्न मिळवितो. लोक त्याला वेडपट ठरवितात. तुकारामचा दुसरा मुलगा झिपऱ्याला कुळकायदा शिकवितात. कोर्टाचा निकाल त्याच्या बाजूने लागतो. तेव्हा नानू त्याला साखरपट्टीचा ताबा देतो. परंतु दारुड्या झिपऱ्या शेतात श्रम करीत नाही. सराई पिकवित नाही. तर नानू बहिरीच्या खोंड्यात बुलडोझर व ट्रॅक्टरने नवीन जमीन तयार करतो. गावातील घर दुरुस्त करण्यासारखे न राहिल्यामुळे तिकडेच नवे घर बांधतो. गावातील घर पडल्यावर बंधुजी, बनूताई काकई नव्या शेतावर राहण्यासाठी आले. नानू-अंजनाच्या सुप्त प्रेमाचे रुपांतर नोंदणी विवाहात होते. नानू-अंजनाच्या प्रेमाचा धागा गुंफलेले परंतु कुळकायद्यामुळे परिवर्तन झालेले उद्‌ध्वस्त खेडे तीन पिढ्यांच्या वास्तव पार्श्वभूमीवर रेखाटले आहे. कातोडी आणि 'राई'तील लोकांच्या संबंधावरही लेखकाने प्रकाश टाकला आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य चळवळीचा आणि स्वातंत्र्याचा परिणाम होऊन माणुसकी नष्ट झाली हा धागाही उपकथानकाद्वारे गुंफला आहे.

कादंबरीतील माणसं तीन पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणारे, प्रदेशाचे संस्कार झालेले आहेत. 'राई' हे गावच नायक आहे. अन्य व्यक्तिरेखा नायक किंवा खलनायक नाही तर सामान्य माणसं आहे. त्यांच्या भावभावना, सुखदुःख, रागलोभ आणि त्याग-स्वार्थाचे वास्तव चित्रण लेखकाने केले आहे. लोकजीवनाला वास्तवाचे अधिष्ठान प्राप्त झाले आहे. कोकणच्या सामुदायिक जीवनाचे चित्र लेखकाने रेखाटले आहे. 'राई'तील साखरपट्टीला एका पात्राइतके महत्त्व प्राप्त झाले आहे. सामाजिक वास्तव आणि माणसं यांच्यातील अन्योन्य संबंधाच्या चित्रणामुळे व्यक्तिरेखाटन प्रत्ययक्षम झाले आहे. दादाजी सातपुते हे जुन्या इनामदारी वैभवाचे अखेरचे वारसदार आहे. चरखा फिरविणारे, काँग्रेसचे जुने सदस्य असलेले दादाजी सज्जन, प्रेमळ आहे. सावकारकीच्या जुन्या चालीरीतीनुसार वागणारे कुळांवर आणि साखरपट्टीवर उत्कट प्रेम करतात. बंधुजी हा त्यांचा रंगेल आणि रगेल, व्यसनी पुतण्या आहे. घराण्याची

तो इभ्रत घालवितो. तसेच तो प्रेमळही आहे. कफल्लक तातूंकडे बनूताईच्या हातून अन्नपदार्थ पाठवितो. बनूताई ही त्याची बहीण आहे. दादाजींच्या वैभवाच्या काळात बेहिशोबी खर्च करुन घराण्याच्या वैभवास झळ पोहचविते. नानूच्या आईशी भांडणारी कजाग स्त्रीची प्रतिनिधी आहे. नातवंडाचे लग्न-मुंज सातपुते घराण्यातील पैशाने उरकून घेते. काकई ही तिची आई आहे. हे सर्वजण शेवटी नानूच्या नव्या घराचा आश्रय घेतात. तातू हे बडोद्याच्या संस्थानात नोकरी करणारे मधल्या पिढीचे वारस आहेत. 'साखरपट्टी' खरेदीसाठी पत्नीचे दागिने मोडणारे आणि स्वत:ची पेन्शन खर्च करणारे, 'राई'तील लोकांचे धनीसाहेब आहेत. नोकरी गेल्यानंतर ते प्रतिकूल परिस्थितीत राईमध्ये दिवस काढतात. शाऊ, आप्पा, नानू ही त्यांची आपत्य तर पुतळाबाई ही पत्नी आहे. जिद्दी, कष्टाळू, मुलांवर उत्कट प्रेम करणरी, हिशोबी, प्रेमळ, खानदानी स्त्री आहे. नानू तर बालपणापासूनच्या आपल्या आठवणी सांगणारा 'राई'तील लोकजीवन संघर्षाची प्रत्यक्ष संबंध असलेला तरुण आहे. ग्रामसुधारणा आणि 'माणुसकी'चे तो लोकांना धडे देतो.

सातपुते घराण्याइतके महाडीक घराणेही महत्त्वाचे आहे. 'साखरपट्टी' सांभाळणारा तुकाराम महाडीक हा दादाजीच्या बरोबरीचा आहे. साधाभोळा, सत्यवचनी, इमानी असल्यामुळेच साखरपट्टीचा व्यवहार 'गहाण' नाही, खरेदी आहे अशी तो कोर्टात साक्ष देतो. गावपंचायतीने सगुणेवर बहिष्कार टाकला असता शेतावर तिला झोपडी बांधून देतो. त्याच्या उलट स्वभावाची जिजा जहांबाज, कारस्थानी "वाटुला वाटुला होईल" म्हणून शिव्या देणारी, सगुणेला नासकी म्हणून घराबाहेर काढणारी, दगड्याला तीन बायका करुन देणारी कजाग कर्कशा आहे. मुलाचा वंश वाढावा ही तिची इच्छा आहे. काळूबाई आणि बापुजीबोआवर तिची श्रद्धा आहे. झिपऱ्याप्रमाणेच अंजनावर तिचे प्रेम आहे. समाजाता अप्रतिष्ठा होण्याचे दु:ख तिला होते. ती कष्टाळू आहे. सगुणा ही सुंदर, निर्व्याज, पतीशी एकनिष्ठ असलेली अंजनाची आई आहे. अंजना ही सगुणेचे रुप आणि जिजाचे गुण घेऊन जन्मलेली मजबूत हाडापेराची आणि फटकट तोंडाची दगड्याची मुलगी आहे. गावकरी आणि झिपऱ्या यांच्या धाकामुळे आपले नानूवरील सुप्त प्रेम व्यक्त करु शकत नाही. शेवटी त्याच्याबरोबर नोंदणी पद्धतीने विवाह करते.

दरोडेखोर परंतु दादाजीच्या घराण्याशी इमानी असणारा झांज्या कातोडी, मऱ्याला दारु पाजणारी झांज्याची बायको मनी या व्यक्तिरेखाही कातोड्यांच्या स्वतंत्रवृत्तीच्या द्योतक आहेत. मऱ्या जातीचे गुण असलेला बेडर आहे.

काळपाटील हा वंशाचा दिवा लावण्यासाठी तीन बायका करणारा दिवाळखोर आहे. तो साखरपट्टी हस्तगत करण्यासाइी वाटेल त्या मार्गाचा अवलंब करणारा स्वार्थी, कपटी, मतलबी आणि खलप्रवृत्तीचा असून धोंडूमामा हा मानभावी व वेळ

पाहून टोपी फिरविणारा, उलाढाल्या, लुच्चा दुकानदार आहे. दादाजींच्या पैशाने दुकानदारी करुन गब्बर झालेला, साखरपट्टी मिळविण्यासाठी महाडिकांच्या कुटुबियांना चिथवणी देणारा, स्वार्थी, लबाडांचा प्रतिनिधी आहे. करींग मारवाडी, पांडोबा, उमा शेलार, चिमा बाबूराव, भाऊसाहेब, आपा, शादु, बायजा, राही-रखमा-आण्या, बहुरुपी, येसूताई, बाबळीबाई, दामा, सावंत, हटकुडा, थरकुडा आणि अन्य गौण पात्रांवर त्या प्रदेशचे संस्कार झालेले आहेत. या सर्वच व्यक्तिरेखांच्या वृत्ती उक्तीतून कादंबरीतील प्रादेशिकता अभिव्यक्त होते. त्यांच्या समूहमनाच्या चित्रणातून लेखकाने 'राई' या उत्तर कोकणातील गावाला आकार दिला आहे. यातील एकही व्यक्ती आरोपीत केलेली नाही. तर 'राई'च्या मातीचे संस्कार प्रत्येकावर झाले आहेत.

'सराई'तील 'रानसई' प्रमाणेच 'आई आहे शेतात' या कादंबरीतील 'राई' हे खेडे देखील उत्तर कोकणातील आहे. सह्याद्री पर्वताचे उंच शिखरे, कडे आणि काळ्या डोंगराने केलेल्या 'राई'गावातील 'साखरपट्टी' हे शेत या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. 'अंजनटाके, भारंगमाथा, वारंगकडा या अवघड भागाशी कातोड्यांचा अधिक जवळचा संबंध आहे. 'राई'तील लोकांच्या चोऱ्या करुन ते जसे येथे वस्ती करुन राहतात. त्याचप्रमाणे कुणबी'जमीनदारांशी आणि खलाटीतील भातशेतीशी त्यांचे नाते आहे. सामान्य माणसांशी केंबळीच्या झोपड्या व कौलारु घरे आहेत. बहिरीनाथ, रामेश्वर, एकवीरादेवी, बापुजीबोआ आणि काळूबाई ही सर्वांची दैवत आहे. वृक्षवल्ली या सराईतील 'रासनसई'मध्ये वर्णन केलेल्याच आहे. त्यामुळे येथे पुनरावृत्ती टाळली आहे. तसेच निसर्गवर्णन 'सराई'च्या तुलनेत अधिक प्रत्ययक्षम असून कादंबरीत एक पात्र म्हणून निसर्ग येतो. लेखकाने शेतीच्या सर्व अवस्थांची अगदी बारकाव्याने वर्णने केली आहे. वेळोअवेळी येणाऱ्या पावसाचा चांगला-वाईट परिणाम लोकजीवनावर कसा होतो, हे नानू शेती करु लागल्यानंतर त्याला आलेल्या अनुभवांद्वारे आणि त्याच्या मानसिकतेनुरुप (पृ.३८४) निसर्गचित्र रेखाटले आहे. तसेच चक्रीवादळाने 'राई'तील घरांची पडझड आणि त्यावेळच्या पावसामुळे बहिरीच्या खोंड्यातील जमीनीत साठलेला गाळ इ. चे चित्रण (पृ.३९९) लेखकाने केले आहे. प्रदेश आणि निसर्ग यांचा लोकजीवनावरील प्रभाव लेखकाने समर्थपणे रेखाटला आहे.

कादंबरीत १९३६ नंतरचे उत्तर कोकणातील खेडे लेखकाने रेखाटले आहे. कुळांना दादाजीसारखे पहिल्या पिढीतील जमीनदार अपत्त्याप्रमाणे सांभाळीत होते. स्वत:ची जमीन समजून कूळ कष्ट करुन वसूल देत होते. कुळकायद्यामुळे त्यांच्या वृत्ती परिवर्तन झाल्याने कुळ आणि जमीनदार यांच्या संघर्ष सुरू झाला. तसेच जमीनदारांच्या घरामध्ये आर्थिक प्रश्नांवरुन वैर आणि संघर्ष सुरु झाल्याने कुटुंबव्यवस्था आणि ग्रामव्यवस्था कोलमडली. हे सर्व १९३६ पासून ते स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत घडत गेले.

नानूसातपुते या सर्व घटनांचा साक्षीदार आहे. तो दादाजीच्या काळातील सरंजामशाही वैभवाचे, तातूंच्या काळातील प्रतिकूल परिस्थिती, संघर्ष, हेवेदावे, कोर्ट-कचेऱ्या संघर्षाचे आणि तारुण्यातील माणुसकीशून्य लोकजीवनाचे स्वरुप स्पष्ट करतो. दादाजीच्याकाळात प्रेम-आपुलकीची भावना होती. दादाजींकडे सर्वजण जमत. रात्रीच्यावेळी साखरपट्टीतील वालाच्या शेंगा तोडून 'पोपटी' म्हणजे शेंगा उकडून खात होते. तापसराईत दादाजींनी सर्वांना मदत केली असे तुकाराम सांगतो. अंबे, दुध विकत नव्हते. सण-उत्सव, लग्नकार्याच्या निमित्ताने बेहिशोबी कर्ज केले जाई. साजूक तुपाचा गडवा कामवाल्या बायजाने पळविला तरी, बनूताई, पुतळाबाईच्या लक्षात येत नव्हते. तातूंना गावकरी धनीसाहेब म्हणून मान देत होते. परंतु बंधूजीसारख्या तरुणाने ताळतंत्र सोडला. तो बेछुट वर्तन करु लागला. दादाजीचे वय झाले, त्यांना भ्रम झाला. घराण्याचा बेअब्रूला सुरुवात झाली. आदरभावना-एकनिष्ठा स्वार्थामुळे लोप पावली. बंधुजीवर काळपाटलाने उगारलेला टिकाव दादाजींना लागला. तेव्हा धोंडूमामा म्हणतात, "...आजपर्यंत सातपुत्यांच्या शेमड्या पोराला कुणी धक्का लवला नव्हता या गावात. आज ते घडलं. मोठी वाईट गोष्ट आहे!" (पृ. ९) नैतिकतेचे मानदंड बदलले. बंधुजी-सगुणा संबंधाच्या संशयामुळे गावपंचायतीने तिला बहिष्कृत केले. स्त्रिया सगुणेबद्दल वाईट बोलू लागल्या. जसे "तोंड नाय पाहू मेलचं". तर दुसऱ्या म्हणतात, "शेत पिकणार की पोट? अन दादाजीला वसूल कसाल? पणतवंडाचा?" (पृ० ११५) ग्रामीण लोकजीवनातील तणाव आणि विघटनात कुळकायदा अधिक प्रभावी ठरला. साखरपट्टीवर ताबा सांगणारी जिजा 'अराज' कोर्टात चालू असलचे सांगते. पुढारी, एजंटांची संख्या वाढली. ते कुळांना चिथावणी देऊ लागले. तातू नव्या पिढीला विरोध करताना म्हणतो, "खोट्टा आहे कुळकायदा, तो कायदा तुम्हाला कृतघ्नता शिकवित आहे. कुळकायद्याच्या आधी अन् कुळकायद्यापेक्षा जास्त तुम्हाला सांभाळलं आम्ही. त्याचे उपकार फेडीत आहात..." (पृ.२४२) तुकाराम सच्चा, एकनिष्ठ आहे तर दगड्याची नवी पिढी कृतघ्न झाली. तातूचा गावाबद्दलचा आणि वडिलोपार्जित जमिनीबद्दलचा अभिमान सार्थ असूनही ग्रामस्थांच्या वर्तनापुढे निरर्थक ठरतो.

'सराई' पिकण्यावरच कोकणातील शेतकऱ्यांचे जीवन अवलंबून आहे. वाढती, महागाई, घटलेले उत्पन्न आणि भाताच्या घसरत्या किंमती यामुळे कूळ वसूल देऊ शकत नाही. तुकाराम वसूल न देण्याचे वरीलप्रमाणे कारण सांगतो. यातून प्रादेशिकतेचा लोकजीवनावरील प्रभाव स्पष्ट होतो.

दुसऱ्याच्या घरामध्ये वाद-संघर्ष झाल्यास तो अधिक कसा वाढेल असा प्रयत्न लोक करु लागले. जसे नोकरी गेलेले तातू 'राई'त आल्यावर बंधुजी त्यांना घरात प्रवेश करु देत नाही. तेव्हा रस्त्याने येणारे-जाणारे तातूंना जमिनीच वाटणी करा.

अर्धा वाटा सोडू नका असे हाताने खुणाऊ लागतात. तातू भातशेती करु लागले तेव्हा त्यांच्या अज्ञानाकडे गमतीने पाहात. काळपाटलाने त्यांना खोटे 'बी' दिले. भातावर रोग पडल्यावर सर्वांना आनंद झाला. यातून दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होण्याची-मदत मार्गदर्शन करण्याची प्रवृत्ती नष्ट झाली. खोडकरपणा वाढला. त्यातूनच प्रादेशिकताही स्पष्ट होते. भातशेती अनुभवाशिवाय अन्य कुणाही शेतकऱ्याला साधत नाही. बंधुजी म्हणतो त्याप्रमाणे,

"अरे दारठे कसे पाडायचे, राब कसा भाजपायचा, पेरा कसा करायचा, आवण कसं खणायचं, चिखल कसा पाडायचा, लावणी कशी करायची हे एक शास्त्र आहे. मोठी विद्या आहे. फार मोठे धोरण व अटकळ लागते त्याला. फुकट नाही भातशेी!" (पृ.२०९) नानू जपानी पद्धतीने शेती करु लागला तेव्हा, 'येड्या बापाचा येडा लेक' म्हणून लोक त्याला हसू लागले. परंतु महाप्रयासाने आणि रासायनिक खतं, किटकनाशकांचा वापर करुन ग्रामस्थांच्या विरोधाला न जुमानता प्रसंगी इरंजीक घालून-कातोड्यांची मदत घेऊन नानू यशस्वी होतो. तेव्हा तो स्वानुभव सांगतो.

"...'कसेल त्याची जमीन' ही घोषणा भातशेतीच्या बाबतीत फुकट आहे. 'कसेल तोपर्यंत जमीन !' ही निसर्गाची घोषणा येथे प्रत्यय देत असते. भातशेतीइतकी नाजूक शेती दुसरी कुठलीही नसेल! हजार तंत्रे सांभाळून फोलकआत दाणा पिकविण्याचे काम शेतकऱ्याला करावे लागते. त्यातले एक तंत्र चुकले की, नुसतेच पीक खलास होत नाही तर संबंध शेत, बांध व बंदिस्ती डोळ्यादेखत नाहीशी होते आणि असल्याचे नसते होऊन बसते. भातशेती म्हणजे परमेश्वराच्या शेतकरी कॉलेजातली शेवटची परीक्षा आहे. परीक्षेचा पेपर निसर्ग काढतो व त्याचे प्रात्यक्षिक समोरासमोर घेतो." (पृ.२२०) वरील उताऱ्यातील ग्रामसुधारणेचा विचार बाजूला ठेवला तरी भातशेती हे शास्त्र आहे आणि ते कष्टाळू कुणब्याशिवाय अन्य कुणाला समजत नाही असे प्रदेशविशिष्ट चित्र लेखकाने समर्थपणे रेखाटले आहे.

ग्रामीण विभागतील लोकांना हक्क-कर्तव्याची जाणवी झाली. त्यामुळे किरकोळ कारणावरुन लोक कोर्ट-कचेऱ्या फौजदाऱ्या करु लागले. जसे नानूला मारले म्हणून झिपऱ्यावर तातू फौजदारी करतात. धोंडूमामा आणि काळपाटलांच्या सांगण्यावरुन दगड्या आणि नंतर झिपऱ्या कोर्टात केस दाखल करतो. एजंट वकील सावकारांपेक्षा गब्बर झाले. ग्रामव्यवस्था आणि कुटुंबव्यवस्था दानत बिघडविणाऱ्या कुळकायद्याने साफ बुडाली. कुळ आणि जमीनदार तसेच जमीनदारांच्या घरामध्येही भांडणे होऊ लागली. वैर वाढले. 'साखरपट्टीचा' निकाल पनवेल कोर्टाने तातूंच्या बाजूने दिल्याबरोबर बंधुजी त्यांच्याशी मारामारी करतो. परंतु तातूंनी साखरपट्टी विकावी म्हणून प्रत्येकजण त्यांच्या समाचाराला येतो. पैस, स्वार्थ महत्त्वाचा मानला जाऊ लागला. माणुसकी नाहीशी झाली. तातूंना झिपऱ्या 'अरे तुरे' करतो. बांधावरील दगड उचलून मारामारीस

तयार होतो. (पृ. ३१५) एकूणच मान सन्मान, प्रतिष्ठेच्या कल्पना बदलल्या. याला कारण वाढती लोकसंख्या आणि कुळकायदा असे लेखन सांगतो.

'सराई' मधील कातोड्यांचे जीवनचित्रण ढोबळपणे केलेले आहे. उलट या कादंबरीतील कातोड्यांचे जीवन 'राई'शी एकजीव झाले आहे. झांज्या कातोडी दादाजीशी इमानाने वागतो. नानूला घरी पोहचवितो. आप्पाचे रक्षण करण्यासाठी बलिदान करतो. इनामदारांचे भात चोरत नाही. त्याची बायको मनी आणि मुलगाही स्वातंत्र्यप्रिय वृत्तीचे, जंगल सर्वस्व मानणारे चोरी, शिकारीवर उदरनिर्वाह करणारे आहे, झांज्या आपल्या बांधवांना मरत्यासमयी उपदेश करतो की, "उद्या मरुला तर आज जगी लेआ. गड्याहो, पहिला समदा रान हत, तवा रामां अपुन रहताव. रानमा आपना शेत हत. तेमा आपुन शिकार करतांव. मासं मारतांव. मागुन हे लोक अनात. त्येही रान पेटवी दिन हत. तेही रान बिसवा आन शेती पाडी. आपुन ए लोकांनी नांदना नांदवा हत. रानातून गावना जवळ येहीन रहना हत. तवापुन अपुन बिगडना हत. वाडंवडील आखत आना हत. ते तुमना आखतो. तुमी रान सोड्सा नको. रान आपना देव हत. ध्यानमा ठेवा माझा मरुला बोल." (पृ.१९५)

याप्रमाणेच दादाजी त्याला शेती करायला सांगतात तेव्हा तो नकार देतो. "दादाजी, शेती काय फुकाची हाय? त्याला नांगर पायजे, औत पायजे, बीबियाणं पायजे, औत नसलं तर कुनाच्या हाद्यात शिरुन गुलामी केली पायजे, तवा वरसानं दाना भेटणार. आमच्या बापदाद्यांनी शेती केली नाय, ती आमाला कशी साधल? आमचं शेत रान!"(पृ.९०) उपेक्षित, डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या कातोड्यांचे निसर्गप्रिय लोकजीवन लेखकाने रेखाटले आहे. यातून विशिष्ट जनजातीच्या जीवनावरील प्रादेशिकता दिसते.

शेतकऱ्यांचे बलुतेदारांशी आणि भटक्या जमातींशी असलेले संबंध नकलापुरच्या जहागीरदाराचे रुप घेऊन आलेल्या बहुरूप्याद्वारे दाखविले आहेत. नानू लोहाराकडून मोठ्या आकाराचा विळा करुन घेतो. त्यातूनही हे संबंध स्पष्ट होतात. हा समाज काही जातीस्तरांनी आणि लोकरुढी-परंपरा संस्कृतीने एकत्र बांधलेला आहे.

जीवनानुभूतीच्या अपरिहार्यतेतून या कादंबरीची निर्मिती झाली आहे. १९३६ साली भारतीय पातळीवर किसानसभेची स्थापना झाली. काँग्रेसच्या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी काही मागण्या केल्या गेल्या. त्यानंतर १९३७ मध्ये भारतात काँग्रेसची प्रांतिक सरकारे स्थापन झाली. त्यांनी काँग्रेसमध्ये पंडित नेहरु यांच्यामुळे निर्माण झालेल्या समाजवादी विचारसरणीस अनुसरुन कमाल जमीनसुधारणा, कुळकायदा, कुळांची कर्जमाफी इ. कायदे मंजूर केले. त्यामुळे जमिनदारी पद्धतीला फार मोठा हादरा बसला. कुळांना आपण स्वत: कसत असलेल्या जमिनीचे मालक होण्याची संधी मिळाली. कुळांमध्ये नवी जागृती निर्माण झाली. तसेच या काळात काँग्रेसपक्ष, समाजवादीपक्ष, मार्क्सवादी, कम्युनिस्टपक्ष व क्रांतिकारकांची दहशतवादी

चळवळ यांचा प्रभाव खेड्यातील जनतेवर पडला. लोकजागृती होऊन पारंपरिक ग्रामजीवनात परिवर्तन होऊ लागले. स्वार्थासाठी पक्ष बदलणाऱ्यांची संख्या वाढली. काही काँग्रेसशी शेवटपर्यंत एकनिष्ठ असलेले दादाजी आहेत. ते राईत काँग्रेसचे अधिवेशन घेतात. अप्पा दहशतवादी चळवळीत सहभागी होऊन बलिदान करतो. भाई कम्युनिस्ट होतो. तातू आणि नानूंना राजकीय पक्षांचे आकर्षण असते परंतु प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना स्वातंत्र्य चळवळीमध्ये झोकून देता येत नाही. राजकीय अस्थिरतेमुळेच तातूची नोकरी जाते. ते राईला येतात. नानू हा गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या आदेशाने प्रभावीत झालेला तरुण आहे. खेडी सुधारली तर देशाचा विकास होईल असे त्याला वाटते. पुतळाबाई नवा ध्येयवाद घेऊनच राईला येतात.

कुळकायद्यामुळे सत्ता आणि संपत्तीची साधने जमीनदारांच्या हातातून जाऊ लागली. त्यामुळे ते अस्वस्थ झाले. कमी उत्पन्नामुळे त्यांच्याही घरात अंतर्गत कलह माजला. त्यामुळे कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त झाली. वैचारिक जागृतीमुळे ग्रामव्यवस्था कोलमडली. गांधी-नेहरुंच्या विचाराने शेतकरी संघटीत झाले. 'कसेल त्याची जमीन' असे रुप घेऊन कुळकायदा आला. परंतु पारंपरिक गावगाड्यातील माणुसकी नाहीशी झाली. देशाचे नाव माहित नसलेले लोक देशाभिमान आणि स्वार्थत्यागाच्या गोष्टी करु लागले. नवे परिवर्तन झाले. 'स्वराज्या'बद्दल ज्या अपेक्षा होत्या, त्या पूर्ण होऊ शकल्या नाही. सरकारी योजना निरर्थक ठरु लागल्या. दादाजी, तातू, धोंडूमामा आणि नानू यांनी वेळोवेळी केलेली तात्त्विक चर्चा (पृ.९५,१३९,१४३, १५०,१७२,१७५,२६५,२७५,३००,३२०,३९२, ते ३९४) आणि भाई-आप्पांच्या बलिदानाचे चित्रण लेखकाने केले आहे.

सरंजामशाही डबघाईला आली. दादाजीसारख्या जमीनदाराचे वैभव नष्ट झाले. ते कर्जबाजारी झाले. सण-उत्सव लग्नकार्यासाठी मणामणाने किराणा आणणारे बंधुजीच्या काळात खिशात किराण्याच्या पुड्या आणू लागले. धोंडूमामाने तातूंना उधार किराणा दिला नाही. दगड्याला बैल विकून कोर्टकचेरी करावी लागली. झपाट्याने बदलत गेलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे कुटुंबव्यवस्था खिळखिळी झाली. दादाजी-तुकाराम प्रमाणेच काळपाटील दामा, पांडोबा, धोंडूमामा इत्यादींच्या कुटुंबाचे विघटन झाले. या सर्वांचे चित्रणातून लेखकाने राई या कोकणातील खेड्याचे सामूहिक ग्रामजीवन दर्शन घडविले आहे. सर्वजण कर्जबाजारी आहे. दादाजींनी साखरपट्टीच्या खरेदीसाठी केटिंग मारवाड्याचे कर्ज घेतलेले आहे. त्याची कर्जफेड करण्यासाठी प्रथमच त्यांना अंबराई विकावी लागते. 'सराई'चा काळ तर शेतकऱ्यांना हिरवा दुष्काळच असतो. परिवर्तन काळात माणसांच्या वृत्तीमध्येही बदल होतो. एकत्र कुटुंबात गुण्यागोविंदाने नांदणारी माणसं जुने वैभव नष्ट होताच स्वार्थामुळे एकमेकांचे शत्रू होतात. अडमुठे बंधुजी तातूंना घरात प्रवेश करु देत नाहीत. प्रसंगी मारामारी करतात. शिव्या देतात.

गावातले लोक झिपऱ्याला कुळकायदा शिकवितात. खाल्यामिठाशी इमान ठेवणारा तुकाराम वेडा होतो. दादाजींची स्थिती याहून वेगळी नसते. कुळकायद्याचा प्रभाव लेखक वर्णन करतो त्याचप्रमाणे भूप्रदेश-निसर्गही शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनावर परिणाम करतो. हातातोंडाशी आलेले पीक, वीट, करप्या, तांबेरा रोगाने नष्ट होते. परंतु अशा वेळीच पाऊस आला तर किड नष्ट होऊन उत्तम पीक साधते. नानूच्या घराला अप्पा - भाईची चिंता असते. तसेच दुष्काळ त्यांना चिंता करायला लावतो. लेखक वर्णन करतो, "...पण मेघराजाने मनात आणले व होत्याचे नव्हते केले. तीन दिवस मुसळधार पाऊस पडला. शेतोड्या भरुन बांधावरुन औट उलटला. रोगराई वाहून गेली. गावातली घाण वाहून गेली. सगळीकडे स्वच्छ झाले. तांबेरा झडणार या आशेने शेतकरी हुशरले, तंची आशा खोटी ठरली.... शेतकऱ्यांच्या काळजीचे निवारण झाले. आमची पणनिम्मी काळजी गेली." (पृ.१८०) निसर्गाचा लोकजीवनावरील अनुकूल-प्रतिकूल परिणाम लेखकाने येथे दिग्दर्शित केला आहे. सराईचा अगदी माणसाच्या जन्ममृत्यूवर देखील परिणाम होतो. जसे लेखक वर्णन करतो, "...सगुना लई पुन्यवान, म्हून सराईची मेली. दिवसाकरता दगड्याला कुनाचा उंबरा झिजवावा नाय लागला !" (पृ.२४६) तोरणदारी की मरणदारी गावोगावचे पाहुणेरावळे जमले. दोनशे रुपये दुखवटा जमला. फक्त सराईच्या दिवसातच कोकणी लोकांकडे पैसा-भात असतो. अन्य वेळेस ते प्रतिकूल परिस्थितीत उदरनिर्वाह करतात. जिजाला केरींग मारवाड्याकडे भांडी घासावी लागतात. दगड्या 'बी'यांसाठी तातूकडे येतो. तातूंची मारवाड्याकडील पत खालावलेली असते. सरकारने बी बीयाणं, खत, पेंड, तगाया वाटप सुरू केले. परंतु लोकांनी सरकारला बुडविले, लबाडी वाढली म्हणून सरकारने जमिन घेण्याची पद्धती सुरु केली. लेखकाने या सर्वांतून कोकणातील लोकांच्या आर्थिक जीवनावर प्रकाश टाकला आहे.

सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनात परिवर्तन आले असले तरी सांस्कृतिक जीवनात मात्र परिवर्तन आलेले दिसत नाही. उलट ते सांस्कृतिक गोष्टींशी अधिक चिकटून असलेले दिसतात. ग्रामीण जीवनात श्रद्धा-समजुती, अंधश्रद्धा, सण-उत्सव परंपराचे या कादंबरीतील चित्रण सुटे व परिचयात्मक न राहता त्या जीवनानुभवाचा अपरिहार्य भाग म्हणूनच आले आहे. लोकजीवनात रुढ असलेल्या बहुरुपी या सामाजिक संस्थेचे यथार्थ दर्शन सुभेदार बहुरूपीच्या संवादातून घडविले आहे. ती परत न केल्यास वंश बुडतो हा लोकसमज काळपाटील-तातू-पुतळाबाईच्या संवादातून स्पष्ट केला आहे. निपुत्रिक काळपाटलाला लोक लग्नमंडपाचे तोरण बांधू देत नाही. त्याच्या बायकांची सावली नववधूवरांवर पडू देत नाही. यातूनही ग्रामीण लोकसमाजाची कल्पना येते. बापूजी बोवा हे राईचे ग्रामदैवत आहे. एकवीरादेवी हे सातपुते घराण्याचे कुळदेवता आहे. रायरेश्वर, बहिरीनाथ, काळूबाई सर्वांची श्रद्धा आहे. दादाजीच्या

घराला रुढी-परंपरेप्रमाणे सर्वजण मान देतात. मूल देवाघरचे देणे मानले जाते. मुल व्हावे म्हणून दुसऱ्याचे तान्हे मूल पाजणे, जादूटोणा व देवदेवस्की, मारोतीला रुईच्या पानांची माळ घालणं, पिंपळाभोवती स्त्रियांनी नागव्यानं प्रदक्षिणा धालणे, नाडा, पुडा, गुलालाचा उतारा टाकणे यासारख्या यातुक्रियांना लोकजीवनात स्थान आहे. सातदेवीच्या आसराचा राखणदार नाग आहे. तसेच साखरपट्टीत भूत असल्यामुळे नानूला तिकडे जाऊ देत नाहीत. एका फटक्यात नागनागणीचे जुळ मारलं तर त्या माणसाला धन मिळते असा लोकसमज आहे. काटा भरल्यावर बिब्याचा कडका देणे, रामबाणाचा कापूस जखमेवर लावणे, किंवा जुना शिवराय आणि चुना बांधणे, दाजीकडील मात्रेने दुखणे पळणे, डोळे आल्यावर गाईच्या दुधाच्या घड्या ठेवणे, रक्तींचदन डोळ्यात घातल्याने डोळे बरे होतात. भात लावणीच्या काळात पाय कुजतात म्हणून 'वारस' नावाच्या वनस्पतीचा रस लावणे इ. औषधोपचार केले जातात. साखरपट्टी, वारंगकडा, भारंगमाथा याबद्दलच्या अनेक आख्यायिका (पृ.३४) प्रदेशविशिष्ट संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या आहे. घारीने कोंबडीचे पिल्लू पळवू नये म्हणून कोंबडीच्या अंगावर सुपात पिल्ले घेऊन पाखडण्याची परंपरा (पृ.७९) प्रदेशविशिष्ट संस्कृतीचे दर्शन घडविते. 'पोपटी' म्हणजे शेतात वालाच्या शेंगा उकलून खाण्यातूनही एकसंध लोकजीवनाचे दर्शन घडविते. भाताच्या लावणीच अवघड काम करण्यापूर्वी वडीलधाऱ्यांना नमस्कार करुन आशीर्वाद घेण्याची कोकणी परंपरा येथे दिसते.

ग्रामजीवनातील लोकसाहित्याचे प्रतिबिंब या कादंबरीत पडलेले आहे. वाक्प्रचार, म्हणी, उखाणे आणि सणविधीच्या वेळी म्हटली जाणारी गाणी, लोककथा, लोकसमज यातूनही 'राई'चे ग्रामजीवन सजीव साकार होताना दिसते. काळपाटलांची तिसरी बायको लग्नात उखाणा घालून नाव घेते,

"राही - रखमा सवती कोपऱ्यात बसल्या रुसुन
चंद्रभागा खाते पेढे काळपाटलांच्या मांडीवर बसून." (पृ.३४)

जिजाचे लोकगीत (पृ.१२२), अंजनेचे नागपंचमी आणि गौरीच्या सणाच्या वेळचे लोकगीत (पृ.२२३, २२६ ते २२८, २३५ ते २३७), अंजनाच्या जात्यावरील ओव्या (पृ.४०२ ते ४०६), अंजना-नानूचे गीत (पृ.३६९), झिपऱ्याने सांगितलेल्या कथा, मऱ्याने सांगितलेल्या लोककथा इत्यादी आख्यायिका-अद् भूत घटनाप्रसंगातून कोकणातील लोकांची संस्कृती घडलेली दिसते. लोकजीवन आणि भोवतालच्या परिसरासह एक विस्तृत जीवनपट कादंबरीत उलगडत गेला आहे. त्यातून समूहमनाचा गजर ऐकू येतो.

कादंबरी पात्रमुखी निवेदन पद्धतीने लिहिलेली आहे. संवाद-गीत मात्र त्या त्या पात्राच्या जातीव्यवसयानुसार आलेले आहेत. सातपुते घराण्यातील व्यक्ती प्रमाणभाषा बोलतात. इतर शेतकरी-कुणबी बोली भाषेतून व्यवहार करतात. कातोडी समाजाची

स्वतंत्र बोली आहे. परंतु शेतकऱ्यांशी बोलताना ते कातोडी बोली वापरत नाही. आपआपसात कातोडी बोली बोलतात. जसे झांज्याचा शेवटचा संदेश (पृ.१९४-१९५) कातोडी बोलीत आहे. कोकणातील कृषिजीवनाशी निगडित अनेक नावीन्यपूर्ण अर्थघन शब्द आशयाशी एकजीव होऊन आले आहेत. कादंबरीच्या शेवटी लेखकाने प्रादेशिक शब्दांचा अर्थ दिला आहे. टहाणंटुहणं, सापड, खप, खांडीत, दाढी, नवाळी, खण, पोपटी, कोहडेकरणी, टहानटोळे, बाढे, आगोठी, कुंकुऱ्या, वळी, आवण, बेंदा, नाडक्या, चोथा, केमाडी आणि 'खलाटी' सारखा एकच शब्द उदाहरणादाखल घेतला तरी त्यातून प्रादेशिकता स्पष्ट होते. देशावर शिवार या अर्थाने वापरला जाणारा शब्द कोकणात 'खलाटी' या अर्थाने वापरला जातो.

म्हणी वाक्प्रचारातून लोकजीवनाचे जसे दर्शन घडते, त्याचप्रमाणे त्यांचा प्रदेशविशिष्ट वापरही लक्षात येतो. तसेच समाजवास्तवाचे दर्शनही घडते. जसे, 'वेल वाळतात, बोल राहतात' (पृ.३३५), 'काप गेले अन् भोकं राहिली' (पृ.३३४) 'घर नाय दार! बायको गर्व्हार' (पृ.१७३) 'सुंभ जळाला तरी पीळ गेलेला नव्हता' (पृ.१३५), 'कावळा बसायला अन् फांदी मोडायला एक गाठ पडली' (पृ.१०५), 'गाव करीत ते राव करनार नाय' (पृ.११५), 'खायला आधी अन् कामाला कधीमंधी'(पृ.४९), 'घरात नाय परात अन् लग्नाआधी वरात'(पृ.४९), 'काळाचे काकडे अन् यमाशी वाकडे' (पृ१४१), 'एक गोरी अन् छत्तीस गुण चोरी, एक काळी अन् शेवंतीची जाळी' (पृ.११७), 'आयाबाया नाडलया तेव्हा बाळ्या बुगड्या घडल्या' (पृ.९), 'संन्याशाला शूळ अन वांझेला कातबोळ' (पृ.४१), 'तुपाच्या आशेने उष्टे खाणे' (पृ.१०५), 'लाथ मारायची आन पाया पडायचं, शेण उडवायचं आन सारवण घालायचं' (पृ.१३६), याप्रमाणे, काही उपमा-प्रतिमा या खास कोकणी लोकजीवन दर्शविणाऱ्या आहेत. उदा. 'वसंत आणि उषा यांची तोंडे कोकमसारखी ला झाली' (पृ.१५१), (नेहरुंची सभा) ...अमृताची बरसात झाली व सारी सभा भाताप्रमाणे डुलली' (पृ.१३८).

उत्तर कोकणातील 'राई' सारख्या निसर्गरम्य खेड्यातील लोकजीवनाचे दर्शन पात्रामुखी निवेदनपद्धतीने लेखकाने घडविले आहे. आशयानुरुप भाषेचा वापर केला आहे. बापट-गोडबोले म्हणतात, "आई आहे शेतात!" या कादंबरीची बैठक मात्र पूर्वीच्या कादंबऱ्यांहून भिन्न आहे. 'पाणकळा' आणि 'सराई' या कादंबऱ्यात थोड्या प्रकट झालेल्या वास्तवतेचा विकास प्रकर्षाने या कादंबरीत झालेला दिसतो. निसर्गाचे मनोरम वर्णन करण्याची जी कला दिघ्यांनी साधली आहे. त्यामुळे या कादंबरीत प्रादेशिक वातावरण उठावदार झाले असून साखरपट्टीला एका पात्राइतके महत्त्व आले आहे... नव्या कायद्यामुळे आणि समाजरचनेच्या नव्या कल्पनांमुळे कोकणच्या खेडेगावातील जीवनात जो बदल होत आहे... त्याचे चित्रण लेखकाने या कादंबरीत केले आहे."१४.

राईमध्ये राहणाऱ्या अनेक व्यक्तींच्या आयुष्याचे प्रवाह दाखविणे, सामाजिक बदलातून कुटुंब-जीवन समाजव्यवस्था कशी उन्मळून पडत आहे हे दिग्दर्शित करणे व परिस्थितीच्या आघातातूनही टिकून राहणाऱ्या माणुसकीच्या अंकुराचे दर्शन घडविणे हे तीन उद्देश श्री. दिघे यांनी कादंबरी लिहिताना डोळ्यासमोर ठेवलेले असावेत.''१५. असे ग. प्र. प्रधानांनी म्हटले आहे. वरील दोन्ही अभिप्रायांचा विचार करता प्रदेशविशिष्ट सामूहिक ग्रामजीवन रेखाटण्यात लेखक यशस्वी झाला. वास्तव जीवन चित्रणाच्या संदर्भात या कादंबरीने 'पाणकळा' आणि 'सराई'च्या पुढचा टप्पा गाठला आहे. 'पड रे पाण्या' संबंधीही असेच म्हणावे लागते. 'पाणकळा'चा पुढचा टप्पा 'सराई' तर 'आई आहे शेतात' ने वास्तवजीवन चित्रणाबाबत अपूर्व यश मिळविले. जीवनानुभव अविकृत स्वरुपात साकार होतो. निसर्गवर्णन स्वाभाविकणे आले आहे.'' ''पाणकळा' आणि 'सराई' या कादंबऱ्यातून डोकावणारी प्रदर्शनात्मकता येथे बऱ्याच प्रमाणात कमी झाली असून रचनेचे संकेतही या कादंबरीने नगण्य ठरविले आहेत. कादंबरी निवेदनात्मकतेऐवजी आत्मविष्कारातून आकार घेत असल्याने तिला अधिक वास्तवदर्शी अधिष्ठान लाभले आहे.''१६. असा सार्थ अभिप्राय डॉ. रविंद ठाकूर यांनी नोंदविला आहे. काही दोषस्थळे जमेस धरुनही उत्तर कोकणातील लोकजीवनाचे अत्यंत वास्तव आणि प्रत्ययक्षम चित्रण करण्यात लेखक यशस्वी झाला आहे. मराठी कादंबरीला नवे वळण लावण्याचे श्रेय र. वा. दिघ्यांकडे जाते. ल. ग. जोग यांनी दिघ्यांच्या 'पाणकळा' व 'सराई' या कादंबऱ्यांचे वर्णन एका नव्या सोन्याच्या खाणीचा शोध'१७. असे केले आहे. स्वत: लेखकाला 'पहिले ग्रामीण कादंबरीकार' म्हटलेले विशेष आवडले नाही. किंवा 'किसान कादंबरीकार' अशी किर्लोस्करनं' दिलेली पदवीही त्यांना मान्य नाही. स्वत:ला ते शेतकी 'कादंबरीकार'१८. म्हणतात. समीक्षकांनी त्यांच्या कादंबऱ्यांना 'प्रादेशिक' म्हणणे देखील त्यांना मान्य नाही. त्याची कारणेही त्यांनी सांगितली आहेत.१९. मराठी भाषेच्या अभिमानामुळे त्यांना हे वाटणे स्वाभाविक आहे. तरीही दिघ्यांनी उत्तरकोकण आणि देशावरील लोकजीवन चित्रित करुन मराठी कादंबरी वाङमयात ग्रामीण-प्रादेशिक कादंबरीचा प्रवाह निर्माण केला हे मान्य करण्यास हरकत नाही.

### *(२) वि. वा. हडप*

(३) 'अन्नदाता उपाशी' (१९४६) आणि 'गोदाराणी' (१९४७) या दोन प्रादेशिक कादंबऱ्या वि. वा. हडपांनी लिहिल्या आहेत. 'गोदाराणी' ही 'वारली' आदिवासींच्या जीवनावर अत्याचार करणाऱ्या जमीनदाराविरुद्ध कम्युनिस्ट नेतृत्वाखाली उभारलेल्या बंडावरील ही कादंबरी आहे. वारली जीवनाची आर्थिक आणि सामाजिक बाजू हडपांनी प्रस्तुत कादंबरीत मांडली आहे. 'अन्नदाता उपाशी' रत्नागिरी जिल्ह्यातील

देवगड तालुक्यातील 'काजरोळी' या कोकणच्या खेड्यातील पार्श्वभूमीवर शेतकरी व खोताच्या संघर्षाची कथा लेखकाने रेखाटली आहे. जुलूम असह्य झाल्यावर गरीब शेतकरी जुलूमी जमीनदाराचा कसा खून करु शकतात हे लेखकाने दाखविले आहे. मार्क्सवादाच्या प्रेरणेतून लिहिलेली ही कादंबरी आहे. १९३६ मध्ये ही कादंबरी 'धरणीकंप' या नावाने आराखड्याच्या स्वरुपात प्रसिद्ध झाली होती. न. चिं. केळकरांनी तिचा गौरव केला होता. प्रस्तुत कादंबरीचे कथानक पुढीलप्रमाणे आहे. 'काजरोळी' गावाचे वतनदार बाबा देसाई यांचे गरीब कुळातील स्त्रियांशी राजरोस संबंध होते. रामराव राणे या कुळाच्या सुनेवर बाबांचा डोळा असतो. रघुनाथची बायको जमना वश होत नाही म्हणून बाबा अनेक विघ्ने आणून त्या कुटुंबाचा निर्वंश करतो. पिढ्यानपिढ्या रामराव राणे घराण्यासाठी मोफत खायला दिलेल्या फणसाच्या झाडाची फांदी तोडून संघर्षाची नांदी होते. त्यानंतर गावचा पोलीसपाटील असलेल्या गंगाराम देवडेला ते झाड विकले जाते. रघुनाथ मजूर घेऊन झाड तोडायला आलेल्या गंगारामच्या तोंडात देतो. राणे कुटुंबियांना वहिमी ठरवून वाड्यावर बोलावतो. रघुनाथ आणि रामराव वाड्यावर जातात. जमनाला सोबत नेत नाहीत. बाबा भडकतात. 'वृंदावन' शेतीची कबुलायत मागू लागतो. आपण कबुलायत दिली तर बाकी सर्वच कुळ फसतील या विचाराने रामराव टाळाटाळ करतो. त्यानंतर गंगाराम रघुनाथच्या कुटुंबावर फिर्याद करतो. झाड तोडायला आलेले मजूर साक्षीदार होते. मामलेदार रघुला तीन महिन्याची शिक्षा ठोठावतात. त्याला रत्नागिरीच्या तुरुंगात ठेवले जाते.

रघुनाथ तुरुंगातून सुटून येण्यापूर्वी वृंदावन शेत बाबा देसाई स्वत:च करु लागतात. चंद्रा भाविणीच्या मुलीला दूध मिळावे म्हणून रघुनाथची गाय बळजबरीने ओढून नेतात. बापटशास्त्री तीस रुपयाला बैल घेतो. आजारी शंकरला दूध मिळत नाही. तो अशक्त होतो. जमनाच्या पोटातील गर्भ कष्टामुळे पडला हे सर्व तुरुंगातून आल्यावर रघुला समजले. बाबादेसाई, कुलकर्णी आणि मिराशीबाबांनी कुळांवर तीन वर्षाच्या खंडासाठी खोट्या फिर्यादी केल्या. कुळ भडकतील म्हणून मामलेदाराच्या मदतीने रघुनाथ आणि अन्य नाठाळ कुळांकडून चांगल्या वर्तणुकीसाठी जामीन घेण्याचा हुकूम काढला. संगमनाथ देवळाच्या चावडीवर खंडोबा जमादाराने सरकारी हुकूम वाचून दाखविला. रघुला शंभर रुपयीला जामीन देण्याचा हुकूम वाचून दाखविला. जामीन देता न आल्यामुळे जमादाराने रघुला अटक केले. दत्तूने कुळांकडून वर्गणी शंभर रुपये जमा केले. जोतीबाचद जामीन देऊन रघुला सोडविले.

रघु आणि इतर कुळांनी मिळून खंड आणि कबुलायती न देण्याचा शपथपूर्वक निर्णय घेतला. त्यावेळी रघुनाथच्या मुलाचा मृत्यु झाला. खोतांनी कबुलायतीचे खोटे दस्तऐवज करुन कोर्टात हजर केले. पुराव्यामुळे निकाल खोतांच्या बाजूने लागला. बाबा देसायांच्या धमकीमुळे आणि प्रलोभनामुळे जोतीबाने रघुला जामीन राहाण्यास

नकार दिला. त्यामुळे पोलिसांनी रघुनाथला तिसऱ्यांदा अटक केले. रामरावचा मृत्यू झाला. बापाला मांडी देण्याची संधी देखील रघुला मिळाली नाही. रघू अटकेत असताना बाबाने जमनाकडे खंडाच्या पैशासाठी तगादा लावला. स्वत: तिच्या झोपडीवर गेला. तिला वश करण्याचा प्रयत्न करु लागला. अतिप्रसंग करु लागला. तेव्हा रघुनाथ तेथे आल्यामुळे जमनावरील संकट टळले. बाबाची संधी हुकली, त्यांनी रघुच्या घरावर जप्ती आणली. त्याला बेघर केले. खोत आणि कुळांमधील असंतोष वाढला. रघुनाथ आणि त्याच्या सहाकऱ्यांनी काजऱ्याच्या राईत बाबाचा खून केला. रघु आणि साक्षीदार पकडले गेले. त्यांच्यावर खटला भरला गेला. फाशीची शिक्षा देऊन राण्यांचा निर्वंश केला. बाबा देसाई आणि रामराव राणे या कूळ-खोत संघर्षाची कथा 'काजरोळी' गावच्या लोकजीवनाशी निगडित आहे. एकमेकांचे वैरी असलेले खोत संघटित होतात. उलट संकटामागून संकटे आलेले गरीब शेतकरी लवकर संघटित होऊ शकत नसले तरी हळूहळू संघटित होऊन शोषणकर्त्या खोतांचा खून करतात. कुळांच्या समूहजीवनाची ही कथा आहे.

कादंबरीतील व्यक्तिरेखा सामान्य माणसंच आहेत. शोषणकर्त्यांचे प्रतिनिधित्व करतात. बाबा देसाई, कुलकर्णी, मिराशीबाबा हे वतनदार आणि प्रशासकीय यंत्रणा, तर त्यांच्याशी दोन हात करायला तयार झालेले, इभ्रतीला जपणारे रामराव, रघुनाथ, जमना, दत्तू आणि अन्य गौण माणसं. कुळकायद्याच्या धाकाने खोतांनी कुळांकडील जमिनी काढून घेण्याच सपाटा लावला. प्रशासकीय अधिकाऱ्यांना पैसे देऊन, खोटे दस्तऐवज तयार केले. कुळ आणि खोतांमध्ये बेबनाव होऊन खोतांचे खून होऊ लागले असे समूहजीवनाचे चित्र प्रसतुत कादंबरीतून व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-कुटुंब, व्यक्ती-समाज आणि खोत संबंधातून रेखाटले आहे.

बाबा देसाई हे काजरोळी गावचे वतनदार आहेत. सत्ता आणि पैशाच्या जोरावर कुळांचे ते शोषण करतात. रघुनाथसारख्या कुळाला वठणीवर आणण्यासठी त्याच्यावर खोटे आरोप ठेवून अटक करतात. गावता दहशत निर्माण करतात. देवस्थानच्या पैशात अफरातफर करतात. चंद्राभाविणीसारखी रखेली राजरोस ठेवतात. तरीही कुळांच्या बायकांवर त्यांचा डोळा असतो. रघुनाथची बायको वश होत नाही म्हणून हा निर्लज्ज, कामांध, कपटी तितकाच भित्रा खोत कृष्णकृत्य करतो. गाववैद्य मिराशीबाबा हा या बोटावरची थुंकी त्या बोटावर उडविणारा युक्तीबाज खोत आहे. त्याच्याप्रमाणे कुलकर्णीही रंगेल आणि रगेल आहे. सत्तेच्या आणि पैशाच्या जोरावर सरकारी अधिकाऱ्यांना मुठीत ठेवून ते स्वार्थ साधतात. गंगाराम देवळी हा काजरोळीचा पोलीसपाटील आहे. तो भाविणीचा मुलगा आहे. ब्राह्मणाचे रक्त त्याच्या शरीरात असल्यामुळे गावातील संघर्षास कारण ठरणारा तो खलनायक आहे. बया भावीण ही त्याची आई आणि चंद्रा भावीण ही त्याची बहीण आहे. तिच्या मुलाला दूध मिळावे

म्हणून रघुनाथची दुभती गाय ती ओढून नेते. परंतु शेतकऱ्यांसाठी विकत दूध देखील ती देत नाही. रामराव राणे हे एक गरीब कुळ आहे. सत्यवचनी आणि प्रामाणिक असल्यामुळेच मालकाचा खंड देण्याचा प्रयत्न करतो. मालक-सेवक नाते आणि मालकांच्या जुलमी कायद्याची त्याला चांगली जाणीव आहे. अनेक संकटे येऊन देखील तो धन्याला कबुलायत लिहून देत नाही. रघुनाथ हा त्याचा मुलगा आहे. मुंबईत गिरणीमध्ये काम केल्यामुळे त्याला भांडवलदार, जमीनदार यांच्याकडून होणाऱ्या शोषणाची चांगली जाणीव झाली असल्यामुळे त्यांना विरोध करण्यासाठी तो कुळांना संघटीत करतो. बाबा देसायाचा खून करुन तो फासावर चढतो. भांडवलशाही समाजव्यवस्था उखडून टाकण्यासाठी शहीद होतो. जमना ही त्याची एकनिष्ठ पत्नी आहे. प्रतिकूल परिस्थितीला ती सामोरी जाते. परंतु बाबा देसायाची कामवासना पूर्ण करीत नाही. पतीप्रमाणेच सासरा आणि मुलगा शंकर यांच्यावरही तिचा अधिक जीव असतो. सोशीक स्त्रीची ती प्रतिनिधी आहे. दत्तू हिर्वेकर, यशोदा पळसंबकरीण, बाबू, मधू दाजीबा, हरिबा, नारायणशेठ, सावित्री, मंगेशराव कारकून, बापू देवळी, आवडी, सोनू चुनेकर, धाकू, सखाराम, नारु, सोनू गावडा, बकूळा नायकीण आणि प्रशासकीय यंत्रणेतील मामलेदार, पोलीस, जज्ज, मोजणीदार, शाळामास्तर तसेच वकील इत्यादी गौण पात्रांचे चित्रण करुन समकालीन वास्तवाचे दर्शन लेखकाने घडविले आहे. यामध्ये भ्रष्टाचार करणारे, स्वार्थ साधणारे, अब्रू जपणारे, दहशतीला बळी पडणारे, सरकारी हुद्दे मिळविण्यासाठी लाचार झालेले असे विविध प्रकारचे लोक आहेत. श्रम करुन उत्पन्न काढणारे खरे अन्नदाते कूळ-शेतकरी उपाशी मरतात. तर त्यांच्या श्रमावर चैन करणारे, खोत-जमीनदार त्यांचे अधिकाधिक शोषण करतात. अत्याचार असह्य होऊन शेवटी कुळांकडून जमिनदारांचे खून होतात.

रत्नागिरी जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील काजरोळी गावची भौगोलिक पार्श्वभूमी कथानकास लाभली आहे. "स्वतःच्या कोटकामते गावातील ही सत्यकथा आहे" असे लेखकाने कादंबरीच्या प्रारंभीच म्हटले आहे. संगमनाथाचे देवस्थान, काजरादेवी, काजरघाटी, काजऱ्याची राई याचप्रमाणे वृंदावन, जांभळीची फाळी, किंजळभोग हे झाडांवरुन शेतांना दिलेली नावे, आंबे-फणस, माड-पोफळी हे फळझाडे, भात वरी, नाचणी, सावा इ. पीके इत्यादींच्या उल्लेखातून कोकणची पार्श्वभूमी साकार केली आहे. तरीही प्रदेश येथे एक पात्र म्हणून आलेला दिसत नाही. तर जुन्या पिढीतील खोत आणि कूळ यांचे मालक-नोकर अशी आपुलकीची भावना कूळकायद्याने नष्ट झाली. त्यांच्यामध्ये बेबनाव निर्माण होऊन कुळांनी भांडवलशाही समाजव्यवस्थेतील खोतांचे खून केले असे समकालीन वास्तवाचे चित्र रेखाटले आहे.

कुळकायद्यापूर्वी पालकर्त्याच्या नात्याने कुळांवर प्रेम करीत होते. परंतु नंतरच्या काळात मात्र त्यांनी कुळांना एक एक वर्षाच्या बोलीने शेती दिली. कारण कुळांनी

मालकी हक्क सांगू नये आणि प्रत्येक वर्षी खंड वाढविता यावा. वाढीव खंड देण्यास कुळाने नकार दिल्यास शेत दुसऱ्या गरजू कुळाला देऊन अधिक स्वार्थ साधावा हा हेतू त्यामागे होता. कामगार-मजूरांचे राज्य स्थापन करु पाहणाऱ्या सरकारने 'कुळकायदा' लोककल्याणासाठी केला हे खरे असले तरी जमीनदारांची सत्तेच्या जोरावर कुळांना जमिनीचे मालक होऊ दिले नाही. कोर्ट कचेऱ्यांसाठी पैसे नसल्यामुळे कुळांना जमिन मालक खेड्यामध्ये दहशत निर्माण केली. कुळांना पोलिसांनी अटक केली. हातात काढणी बांधून गावातून मिरविले. बेअब्रूच्या भयाने कूळ जमीनदारांपासून चार हात लांब राहिले. पाण्यात राह्यचे तर माशांशी वैर करुन कसे चालेल अशी त्यांची वृत्ती होती. शिवाय ते संघटित झालेले नव्हते. उलट वतनावरुन वैरभाव असलेले जमीनदार जुने वैर विसरुन संघटित झाले. सरकार दरबारी सर्व वतनदार अधिकारी होते. कुळांची पिढी शिकू न शकल्याने अधिकारपदापर्यंत पोहचण्याचा प्रश्नच निर्माण झाला नाही. सरकारी अधिकाऱ्यांची वेळोवेळी जमीनदारांना सहानुभूती मिळाली, त्यामुळे जमीनदारांचे चांगलेच फावले. त्यांनी कुळांवर खोट्या फिर्यादी केल्या. कुळांनी संघटित होऊ नये या उद्देशाने सरकारी हुकुम काढून चांगल्या वर्तणुकीसाठी जामीन घेतले. कुळांना अडचणीत आणले. प्रस्तुत कादंबरीमध्ये अशाच प्रकारच्या समाजवास्तवाचे चित्र लेखकाने घडविले आहे. रामराव राण्याची तरुण सून जमना वश न झाल्यामुळे त्या कुळावर अनेक संकटे आणली जातात. वृंदावन शेताचा हक्क सोडावा म्हणून प्रयत्न होते. वाड्यावर बोलवून त्यांना दमदाटी करुन कबुलायत द्यायला सांगितली जाते. टाळाटाळ होताच गंगाराम त्यांच्यावर फिर्याद करतो. झाड तोडायला आलेले मजूर दहशतीमुळे रघुनाथच्या विरोधात साक्ष देतात. मामलेदार जमीनदारच असल्यामुळे रघुनाथच्या दंडाला काढणी बांधून पोलीस त्याला पकडून नेतात. तीन वर्षाच्या खंड वसुलीच्या खटल्याचे निकाल धन्यांच्या बाजूने लागतात. बापटशास्त्री सावकार खोट्या प्रॉमिसरी नोट तयार करतो. तेव्हा रघुनाथ म्हणतो, "खासगी आयतखाऊ श्रीमंतीवर चालणाऱ्या ह्या जगात जिथे सत्य-नीती-धर्म-कायदा सारे श्रीमंताच्या मर्जीनुरूप चालते, तिथे ह्या भांडवलशाही जगात गरिबांची दाद कोण घेणार? त्यांच्यावर विश्वास कोण ठेवणार?" (पृ.१३१)

अप्रतिष्ठेची-अब्रूची भीती गरिबांना वाटते. धनिकांना त्याची भीती नाही. राजरोस सर्वांनी भाविणी, नायकीणी ठेवलेल्या असत. शिवाय कुळांच्या बायकांवरही त्यांचा डोळा असे. जसे तीन महिन्याचा तुरुंगवास होऊन परतलेल्या रघुनाथला दिवसाढवळ्या गावकऱ्यांना तोंड दाखविणे कमीपणाचे वाटते. म्हणून तो अंधार झाल्यावर गावात येतो. उलट जमनाचा हात पकडणारा बाबा देसाई काही घडलेच नाही असे वागू लागतो. या कादंबरीत सामाजिक विषमतेचे वास्तव चित्र लेखकाने रेखाटले आहे. कुळाकडून चांगल्या वर्तणुकीच्या जामीनाचा हुकूम वाचून दाखविण्यासाठी आणि

त्यांना समज देण्यासाठी संगमनाथाच्या चावडीवर लोक जमतात. तेव्हा बाबा देसाई, कुलकर्णी, मिराशीबाबा आणि ब्राह्मण हवालदार वेगळ्या ठिकाणी, त्यांच्यापासून थोडे दूर दाजीबा, हरिबा, नारायणशेठ, गंगाराम हे पैशावाले कूळ-धारेकरी आणि अगदी दूर सर्व कूळ बसतात.

समकालीन परिस्थितीतील राजकीय विचारप्रवाह, चळवळीचा प्रभाव लेखकाच्या कलाकृतीतून जाणवत असतो. मार्क्सवादी विचारसरणीच्या प्रभावामुळे भांडवलदार-कामगार यांच्यात संघर्ष होऊ लागला. त्याचप्रमाणे जमीनदार आणि शेतमजूर यांच्यातही संघर्ष सुरू झाला. जमिनीचे मालक असलेले भांडवलदारांना शेतमजूर उत्पन्नाचा अर्धा हिस्सा देत होता. परंतु त्यांच्या वाढत्या अपेक्षांमुळे शेतमजूर कर्जबाजारी होऊ लागले, अत्याचार असह्य झाल्यावर जीवाची पर्वा न करता त्यांची धनिकांच्या विरोधात संघर्ष सुरू केला. सत्य-अहिंसा तत्त्वांचे पालन करणारे शेतमजूर-शेतकरी संघटित झाले. सत्य-अहिंसेचे विजय होणार नाही याची जाणीवही होऊ लागली. प्रस्तुत कादंबरीत लेखकाने भांडवलशाही समाज व्यवस्थेमध्ये गांधीजींच्या विचाराचा पराभव आणि मार्क्सवादी विचारसरणीचा विजय दाखविण्याच्या प्रेरणेतूनच निर्मिती केली आहे. दारुबंदी धोरण सरकारने याच काळात जाहीर केले, परंतु त्यातील भ्रष्टाचारामुळे खोटे पंचनामे आणि अफरातफर, यामुळे काँग्रेसच्या धोरणाचाही फुसका बार उडाला.

सरकारी अधिकारी हे वरच्या वर्गातील असल्यामुळे त्यांनीही भांडवलदारांना झुकते माप दिले. वर्तमानपत्रे देखील भांडवलदारांचे गुलाम असल्याने कुळांच्या विरोधात त्यांनी पवित्रा घेतला. झाडून सारे भांडवलदार-जमीनदार एक झाले, सरकारी हुद्दे जसे रावसाहेबी, पोलीसपाटील किंवा जिल्हा लोकल बोर्डाची उमेदवारी मिळविण्यासाठी पैसेवाले प्रयत्न करू लागले. जमिनीदारांनी त्यांना पाठिंबा दिला. श्रीमंताचा कायदा व सत्ता गरिबाच्या सत्यापेक्षा प्रभावी ठरला जसे कोर्टामधील खटल्यांचे निकाल जमीनदारांच्या बाजूने लागले. पोलीस यंत्रणेने शेतकऱ्यांशी गैरवर्तन केले. अपमानास्पद वागणूक दिली. रघुनाथला वेळोवेळी अपशब्द वापरुन अपमानित केले. खोटे खटले भरुन स्थावर जंगम मालमत्तेवर जप्ती आणली. एकूणच हक्काची जाणीव झालेला रघुनाथ अत्याचारी देसायाचा खून करतो.

बेचाळीसच्या चळवळीनंतर ग्रामीण-प्रादेशिक जीवनावरील कादंबरी निर्मिती मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. ग्रामीण-प्रादेशिक पार्श्वभूमी असलेल्या पण राजकीय सदरात मोडणाऱ्या कादंबऱ्या ही वेगळ्या वळणावरील कादंबरी आहे. ग्रामीण पार्श्वभूमीचा लेखकाने कुशलतेने उपयोग केला आहे. मध्यमवर्गीय जीवनचित्रणात रमलेल्या कादंबरीचे शेतकरी-कुळांच्या जीवनाकडे त्यांच्या व्यथेकडे आणि एकूणच दयनीय परिस्थितीकडे लेखकाचे लक्ष गेले. वि. वा. हडपांचे लक्ष शेतकरी-शेतमजूर कुळांच्या भुकेकडे

मार्क्सवादी विचारसरणीच्या प्रभावाने गेले. त्यामुळे वास्तवाकडे वळणारे पाऊल म्हणून प्रस्तुत कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. प्रतिकूल परिस्थितीशी झगडा देणारा रामराव राणे हा सामान्य शेतकरी 'वृंदावन' शेत विकत घेता यावे म्हणून बापटशास्त्री सावकाराकडे रोख रक्कम जमा करतो. परंतु खोटी प्रॉमिसरी नोट तयार करुन बापट ते पैसे संकटकाळात रामरावला देत नाही. परंतु धनिक सावकारांच्या किंवा शेतकऱ्यांच्या जमीनी अल्पकिंमतीत घेण्यासाठी त्याच्याजवळ पैसे शिल्लक असतात. खोतांना सरंजामी पद्धतीच्या खर्चामुळे, रंगेलपणामुळे, भाऊबंदकीतील कोर्टकचेऱ्यांच्या खर्चामुळे आर्थिक प्रश्न सताऊ लागतात. म्हणून भ्रष्ट प्रशासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरुन जमिनीची मोजणी करुन कुळांकडील शेत-झाड-बागांकडे पाहून जमीनदार खोतांनी खंड वाढविले. त्यामुळे शेतकरी अधिक संकटात आले. कर्जबाजारी झाले. मालक आणि सेवकांमध्ये बेबनाव निर्माण झाला. याचा फायदा मोजणी अधिकाऱ्यांनी घेतला. कुळ आणि खोत यांचेकडून स्वतंत्रपणे पैसे उकळले, अर्थातच खोतांकडून अधिक पैसे मिळाल्यामुळे त्यांचा मोजणीदारांनी अधिक फायदा करुन दिला. वाढत्या गरजा, रंगेलपणा आणि चैन करण्यासाठी ज्याप्रमाणे खोतांनी वाढविले, त्याचप्रमाणे त्यांनी सावकारांकडून मोठ्या प्रमाणावर कर्जही काढले. कर्जापायी सावकारांनी त्यांच्या जमिनी विकत घेतल्या. बापटशास्त्री सावकाराप्रमाणे दाजीबा, हरिबा, नारायणशेठ यासारख्या कुळांकडून बाबादेसाई, कुळकर्णी यांच्यासारखे खोत हातऊसने पैसे घेतात आणि शेवटी त्यांना जमीन विकतात. जसे रामरावकडील 'वृंदावन' शेत नारायणशेठ विकत घेतो.

दलाली करुन स्वार्थ साधणाऱ्यांची संख्याही या काळात वाढली. 'बळी तो कान पिळी' अशी स्थिती निर्माण झाली. सत्ताधाऱ्यांशी संबंध असलेल्या लोकांनीदेखील चांगल्याप्रकारे धनसंचय केला. एकूणच खोत आणि कूळ दोघेही डबघाईला आले. जसे गंगाराम मोजणीदाराला पैसे देण्यासाठी कुळाकडून वर्गणी जमा करतो. परंतु सर्व रक्कम तो खर्च न करता 'काजरोळी'मध्ये किराणा दुकान सुरू करतो. विविध मार्गांनी कुळाचे शोषण करतो. त्यामुळे हे अन्नदाते कूळ उपाशी मरु लागतात. त्यांना औषधपाणी मिळत नाही. जसे रघुचा मित्र दत्तू प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे मथूशी पाट लाऊ शकत नाही. जमिनीचे तो पैस भरु शकत नाही. एकूण काय तर शेतकऱ्यांनी खोतांच्या पडिक जमिनी श्रमाने बागायत करायच्या आणि ऐतखाऊ खोतांनी विनासायास त्यांच्याकडून खंड वसूल करायचा. 'आयत्या बिहावर नागोबा' अशी त्यांची गत होती. परंतु कुळकायद्यामुळे त्यांचे धाबे दणाणले. तेव्हा आपल्याकडील सत्ता आणि पैशाच्या जोरावर कुळांच्या खोट्या कबुलायती त्यांनी तयार केल्या. कुळांना शेतमालक होण्याची संधी मिळू दिली नाही. परंतु र. वा. दिघ्यांनी मात्र याउलट परिस्थितीचे चित्रण पुढे 'आई आहे शेतात' या कादंबरीत रेखाटले आहे.

जमीनदार घराण्यातील अंतर्गत कलह आणि कुळांच्या स्वार्थी वृत्तीचे चित्रण दिघ्यांनी केले. आहे. या निमित्ताने समकालीन वास्तव परिस्थितीवर दोन्ही अंगाने विचार झालेला दिसतो.

काही श्रद्धा-समजुती लोकसमजांचे चित्रण लेखकाने केले आहे. परंतु कुळांचा देवावरील अविश्वास न पटण्यासारखा आहे. प्रचारकी दृष्टीमुळे रामराव किंवा रघुनाथ यांना संगमनाथ आणि काजरादेवी भांडवलदारांना प्रसन्न आहे. कुळांकडे त्यांचे लक्ष नाही असे वाटणे, स्वाभाविक वाटत नाही. जमनाची मात्र काजरादेवीवर श्रद्धा आहे. गाय चुकली, मागे केलेला नवस फेडायचा राहून गेला असे वाटल्यामुळे ती लगबगीने काजराघाटीत देवीला जाऊन नवस फेडते. संगमनाथाच्या देवळात गोकुळाष्टमीचा सप्ताह, बाबा किंवा मिराशी यांची पूजा आणि प्रदक्षिणा यातून त्यांची देवावरील श्रद्धा दिसते. काही लोकसमजही आहेत. जसे, नागाला धक्का लागला तर तो दावा धरतो. अवेळी घुबड ओरडल्यास एखाद्याचा मृत्यू होतो. त्याचप्रमाणे मृत्युसमयी गंगाजळ तोंडात पडावे देवाचा अंगारा आणि तीर्थप्रसाद मिळावा. या सर्वांतून त्यांच्या लोकजीवनाला आकार येतो. परंतु दुर्दैवाने कुळकायद्याच्या प्रभावाकडे अधिक लक्ष केंद्रित केल्यामुळे संस्कृतिविशेषांकडे दुर्लक्ष झाले आहे. सुष्ट कूळ आणि दुष्ट खोत संघर्ष असे प्रचारकी रुप कादंबरीला लाभले.

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमनाथ इनाम देवस्थान आणि कोटकामते गावातील रोमांचकारी सत्य घटनेंवर आधारित कांदबरी असा लेखक उल्लेख करीत असला तरी येथे प्रदेश जिवंत होत नाही. कादंबरीचे निवेदन आणि संवाद प्रमाणभाषेतच आहे. कोकणी बोलीतील काही नावीन्यपूर्ण शब्दांचा वापर लेखकाने केला आहे. जसे मांगर, साखऱ्या, वाले, वायंगण, कावण, वेठी, काजरा, साकव, कुणगे, मेटेमेटेने, गामा, भुवरण इ. म्हणी-वाक्प्रचार आणि उपमा प्रतिमातून लोकसाहित्याचा लोकजीवनावरील प्रभावही सूचित केला आहे.

'आंधणांतले रडतात आणि सुपातले हसतात', 'बळी तो कान पिळी', 'गरजवुताला अक्कल नाही', 'नाकापेक्षा मोती जड', 'धन्यानं मारलं आणि पावसानं भिजवलं, दाद मागायची कुणाकडे आणि दाद घेणार तरी कोण?' माणसाची चाहूल लागताक्षणी लांडगा बावरुन मागे वळून पाहतो तसे, पाण्यात टाकलेले ढेकूळ विरघळते, तसे जमनाला ती धमकी ऐकनू भाजलेल्या जागी फुरसे डसल्यासारखे वाटले. तो फुटक्या डबक्यासारखा क्षीण आवाज ऐकून त्याच्या छातीत धस् झाले, सापाच्या जबड्यात बेडकी सापडली..., कोळ्याच्या जाळ्यात कोंडून पडलेले मासे मरणाच्या भयाने एकमेकांकडे भेदरट दृष्टीने पाहतात त्याप्रमाणे एकमेकांकडे पाहू लागले. या सर्वांतून वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

'कोकणचा कष्टाळू शेतकरी, कोटकामते' या माझ्या जन्मभूमीतील जमीनदारांनी

गांजलेला शेतकरीवर्ग, माणुसकीकरिता झगडणारा शूर वारली कातकरी, शेतकरी, शेतकरी-क्रांतीचा झेंडा एकजुटीने हाती धरणारा, साऱ्या महाराष्ट्रातील शेतकरी या अन्नदात्यांच्या चरणी लेखकाने ही कादंबरी अर्पण केली आहे. यातून शेतकरी-आदिवासींबद्दलची त्यांना वाटणारी सहानुभूती प्रगट होते. कुसुमावती देशपांडे म्हणतात, "...खेड्यातील जीवनातील वर्णद्वेषाचे, सावकारांच्या पशुतुल्य वर्तनाचे, किसानांच्या सहनशक्तीचे, एकोप्याचे, हालाचे व अखेर निडरपणाचे खुले वर्णन करण्याची त्यांना येथे पूर्ण संधी मिळते व त्यामुळे येथील काही प्रसंगांचे चित्रण व काही व्यक्तिचित्रे उठावदार झाली आहेत. परंतु विषयाला अनुरुप अशी पातळी त्यांच्या वैचारिक बैठकीने किंवा भाषाशैलीने गाठली असे म्हणता येत नाही... आज मराठी कादंबरीला जे वस्तुनिष्ठेचे व सामाजिक विश्लेषणाचे वळण लागत आहे त्या वळणावरील पहिली काही पावले हडपांची आहे."२०. काही दोषांचा उल्लेख करुन वास्तवजीवन चित्रणाचा प्रारंभ कुसुमावती देशपांडे मान्य करतात. त्याचप्रमाणे डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "...वर्गीय संघर्षावर आधारलेली कादंबरी आणि ग्रामीण वास्तवाची स्थूल अशी पण खरीखुरी झलक दाखवतात... त्यांच्या हेतूंच्या प्रामाणिकपणाविषयी शंका घेता येणार नाही इतपत ग्रामीण वास्तवाचे दाहकरुप त्यांनी चित्रित केले आहे. येथील कलात्मकतेची पातळी उंचावत नाही..."२१. प्रा. म. ना. अदवंत म्हणतात, "...पण आजच्या मध्यमवर्गाच्या वैवाहिक जीवनाच्या व तरुणतरुणीच्या प्रेमाच्या त्याच त्या अतिरंजित व क्वचित अवास्तव वर्णणांनी भरलेल्या कादंबरीच्या जमान्यात ह्या कादंबरीसारखी वास्तववादी कादंबऱ्यांची भर, निःसंशय स्वागतार्ह ठरेल."२२. हा प्रा. अदवंताचा अभिप्राय रास्त वाटतो.

कादंबरीच्या रचना प्रक्रियेसंबंधीचे दोष मान्य करुनही वास्तवाकडे वळणारी, नव्या वळणावरची प्रचारी थाटाची ही कादंबरी आहे.

### लक्ष्मणराव सरदेसाई

### *(४) "मांडवी! तू आटलीस*

गोव्यातील लक्ष्मणराव सरदेसाई यांची 'मांडवी! तू आटलीस?' ही १९४७ साली प्रसिद्ध झालेली कादंबरी आहे. ध्येयवादी हिंदू-तरुण अशोक आणि ख्रिस्ती तरुणी लीना यांच्या उत्कट प्रीतीची ही गोव्याच्या पार्श्वभूमीवरील कथा आहे. १९४६ मध्ये गोमंतकात जी अपूर्व क्रांती सुरू झाली, त्या क्रांतीचे सूतोवाच क्रांतिपूर्वकाळातच लेखकाने या कादंबरीतून केले होते. हिंदूवर होणारे अत्याचार, त्यांचे दारिद्र्य, दुर्बलता, निष्क्रियता, व्यसनाधीनता आणि स्वाभिमानशून्यता यावर प्रकाश टाकून त्यांनी संघटित होऊन स्वतंत्र होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

संस्थाचालकांच्या हुकूमशाही कारभाराला कंटाळून स्वाभिमानी तत्त्वनिष्ठ, ध्येयवादी

अशोक नोकरीचा राजीनामा देतो. त्यावेळी त्याच्यासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न असतो. लेखन करुन मिळणाऱ्या पैशातून कौटुंबिक जबाबदारी पेलण्याचा प्रयत्न करतो. सरकारी नोकरीशिवाय प्रगती नाही हे त्याला मान्य नाही. ख्रिस्ती राज्यकर्त्यांकडून गोव्यातील हिंदुवर अन्याय-अत्याचार होतो. हिंदू संघटित होत नाही तो पर्यंत हे असेच चालणार याची जाणीव झाल्यामुळे तो समाजकार्याला लागतो. समकालीन परिस्थितीचे वास्तव चित्रण स्वत:च्या लेखनातून करतो. त्या लेखनाच्या प्रभावाने ख्रिस्ती पेरैरा भाटकरांची मुंबईत शिकलेली मुलगी लीना अशोकच्या कार्यात सहभागी होण्याचा निर्णय घेते. त्याच्या प्रेमात पडते. वडिलांच्या देशद्रोही, स्वार्थी, मतलबी वर्तनाचा धिक्कार करते. वडिलांचा विरोध न जुमानता अशोकच्या लोकसंघटन-जागृतीच्या कार्यात सहभागी होते. मेडिकल कॉलेजमध्ये शिकणाऱ्या आल्बेर्त लॅपिशबरोबर लीनाचे लग्न व्हावे असे परौरांना वाटते. तर समाजवास्तव परिस्थितीत गरिबाच्या ध्येयवादाला अर्थ नाही याची जाणीव अशोकचे वडील त्याला करुन देण्याचा अयशस्वी प्रयत्न करतात.

भ्रमंती करुन गोव्यातील लोकांच्या दैन्याची पाहणी करण्याचा निर्णय लीना अशोक घेतात. दोघांना एकमेकाच्या उत्कट प्रेमाचा साक्षात्कार होतो. अशोक हिंदू आहे. सरकारी नोकर नाही. क्रांतिकारक आहे असे सांगून त्याच्यापासून दूर राहाण्याचा, त्याची भेट न घेण्याचा सल्ला पैरौरा लीनाला देतात. त्यांचे विचार अमान्य करुन प्रसंगी गृहत्यागाची धमकी ती देते.

ख्रिस्ती धर्म सोडून गावगाड्यांनी हिंदुधर्म स्वीकारला म्हणून सरकारने त्यांच्या पुढाकाऱ्यांना अटक केली. धार्मिक बाबतीत दखल न देणाऱ्या सरकारने गावड्यांवर अन्याय केला. गावडे धार्मिकदृष्ट्या स्वतंत्र आहे. अन्यायाविरुद्ध त्यांनी आवाज उठविला. अशोकने त्यावर लेख लिहिला. परंतु तो सरकारच्या धोरणामुळे प्रकाशित होऊ शकला नाही. फिरंग्यांनी गोव्यातील हिंदुना दुबळे आणि निष्क्रिय बनवले. गोव्यात सुधारणा केल्या नाहीत. सक्तीने धर्मांतर केले. नैसर्गिक गोष्टींचा फायदा घेऊन यांत्रिक प्रगती केली नाही. गोवेकरांच्या बुद्धीला फिरंग्यांच्या राज्यात वाव नाही हे लीना-अशोकच्या लक्षात आले.

आल्बेर्त बरोबर सहलीला गेलेल्या लीनाच्या वर्तनाबद्दल अशोकला तिच्या प्रेमाचा संशय आला. परंतु लीनाच्या मनाविरुद्ध आल्बेर्तचे वर्तन होते हे समजल्यावर दोघांची अस्वस्थता नष्ट झाली. दोघांच्या प्रेमाची गावभर चर्चा होऊ लागली. त्याकडे दुर्लक्ष करुन गोमंतकाच्या मुक्तीसाठी कार्य करण्याचा निर्णय दोघांनी घेतला. व्यसनाधीन, स्वाभिमानशून्य, उपाशी, उद्योगधंदे नसलेल्या लोकांना शिक्षण देऊन संघटित करण्याचा प्रयत्न सुरू केला. ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांनी आज्ञा काढल्याने पेरौरांनी हिंदू झालेल्या शुद्धीकृत गावड्यांना स्वत:च्या जमिनीतून बाहेर घालविण्याचा निर्णय घेतला. अशोक-

लीनाने हिंदू भाटकर आणि गावड्यांची बाजू घेण्याचा निर्णय जाहीर केला. हिंदू समाजात नवजीवनाचे वारे खेळू लागले. बापाचे घर सोडलेल्या लीनाला सभेचे अध्यक्ष करण्यात आले. राम गावडा आणि हरीबाबा यांची भाषणे होऊन सभा संपली. परंतु अशोकवर गंभीर आरोप ठेवून त्याला पेरौरांच्या कारस्थानामुळे पोलिसांनी अटक केली. "अशोकची सुटका झाली नाही तर माझे प्रेम तुम्हाला दिसेल" अशी पेरौरांना लीनाने धमकी दिल्याने त्याला हद्दपार न करता त्याची मुक्ती करण्यात आली. राम गावड्यांच्या पत्नीने (सीता) सत्यनाराणाच्या वेळी लीनाला कुंकू लावल्याने तिला हिंदू झाल्याचे समाधान मिळाले. लीना-अशोक कायमचे जवळ आले, असे अशोक-लीनाच्या प्रेमाचे गोव्याच्या समकालीन वास्तव पार्श्वभूमीवरील कादंबरीचे कथानक आहे.

कादंबरीतील सर्व व्यक्तिरेखांना गोव्याच्या मातीत गंध आहे. अशोक-लीना कादंबरीचे नायक-नायिका आहेत. परौरा हे मुळातले हिंदू परंतु ख्रिस्तीधर्म स्वीकारलेले भाटकर जमीनदार आहेत. हिरा, काकी, सोनूबाबा, रामराव, कालुश, आल्बेर्त लॅपिश, सांतू, येसू, सावळ्या सदाशिव, कलिका इ. गौणव्यक्तिरेखांचे जिवंत चित्र रेखाटून समकालीन वास्तवाचे दर्शन घडविले आहे. अशोक हा तत्त्वशील, स्वार्थत्यागी, कणखर, स्वतंत्र आणि स्वाभिमानी आहे. तो जसा तत्त्वनिष्ठ आहे तसाच कलासक्तही आहे. सत्य आणि न्याय यांची गळचेही होते म्हणून तो सरकारी नोकरी करीत नाही. त्यामुळे त्याचे आयुष्य एक झगडा ठरते. साहित्यातून कठोर वास्तवता आणि उज्ज्वल ध्येयवाद यांची तो संगती लावतो. लेखक वर्णन करतो, "तेजस्वी व ध्येयदर्शी नेत्र, मस्तकावर विपुल केशसंभार, उंच व सरळ नाक, जाड पण दबलेले ओठ, आणि या सगळ्या अवयवांतून त्याच्या वृत्तीचा करारीपणा प्रतीत होत असलेला." (पृ.२७) समकालीन राजकीय-सामाजिक परिस्थितीत बदल व्हावा म्हणून तो संघर्ष करतो. प्रतिकूल परिस्थितीत तो सामोरा जातो. रामरावाबद्दल त्याच्या मनामध्ये एकप्रकारची अढी असते. परंतु, वडील प्रेमळ असल्याचा अनुभव शेवटी त्याला येतो. लीना ही अत्यंत संयमी आणि स्वाभिमानी, स्वतंत्र वृत्तीची, अन्यायाचा तिरस्कार करणारी, ध्येयवादी तरुणी आहे. सौंदर्य आणि तारुण्य तसेच बुद्धिवैभव आणि चातुर्य यांचा मिलाप तिच्यात झालेला दिसतो. पोर्तुगीजांच्या इतिहास, संस्कृती आणि धर्माबद्दल अभिमान बाळगणाऱ्या वडीलांचा ती तिरस्कार करते. त्यातून कौटुंबिक संघर्ष निर्माण होतो. पेरौरांच्या विरोधी असे तिचे व्यक्तिमत्त्व आहे. ते ख्रिस्तीधर्म प्रचारक आणि प्रसारक आहेत. सरकारी गोटात प्रतिष्ठा मिळवू पाहणारे ते देशद्रोही आहेत. इतर गौण व्यक्तिरेखा आणि सरकारी अंमलदार यांचे चित्रण करुन लेखकाने समकालीन अन्यायी-अत्याचारी यंत्रणा आणि सोशीक हिंदू समाज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. कथानकाचे बीज प्रादेशिक आहे. त्याप्रमाणे व्यक्तीच्या जीवनवरही

प्रादेशिकतेचे रंग चढलेले आहेत. म्हणूनच सरकार दरबारी प्रतिष्ठा-मानसन्मान मिळावा म्हणून पेरौरा मुळची हिंदू संस्कृती शूद्र समजतो. फिरंग्याच्या चारशे वर्षाच्या सत्तेमुळे सर्व लोक सोशीक स्वाभिमानशून्य दिसतात. ध्येयवादी अशोक-लीना लोकांना संघटित करतात. स्वधर्माबद्दलचा अभिमान बाळगतात. गावडे ख्रिसती झालेले असले तरी अंत:करणपूर्वक हिंदू संस्कृती आणि देव-देवतांची पूजा करतात. शुद्धीकृत हिंदू होऊन सत्तेशी संघर्ष करतात. या सर्वांमधून गोमंतकीय माणसांना हिंदुधर्माबद्दल वाटणारे प्रेमच व्यक्त होते.

गोव्याची भूमी आणि निसर्ग येथे एक पात्र म्हणूनच जिवंत झालेला दिसतो. गोव्यातील विविध वृक्षवेली, फळे, फुले आणि पिकांचे वर्णन प्रदेशविशिष्ट आहे. तांदूळ हे येथील लोकांचे मुख्य अन्न. ते सरकारच्या निष्काळजीपणामुळे त्यांना मिळत नाही. उपासमार टाळण्यासाठी ते बाजरी खतात, ती त्यांच्या प्रकृतीला मानवत नाही हे सांगून लेखक प्रादेशिक रंग गडद करतो. नारळ-पोफळीच्या बागा, आंबा ही फळझाडे येथे आहेत. माडी हे गोव्याचे खास वैशिष्ट्य आहे. पणजी, मडगांव प्रमाणे घाटमाथ्यावरील कॅसल रॉक, लोंढा, सावर्डे, सुपे, हल्याळ या गावांप्रमाणे दूधसागर धबधब्याचा उल्लेख येतो. चंद्रेश्वर पर्वताचा उल्लेखही येतो. गावड्यांच्या घराची रचना प्रदेशविशिष्ट आहे. "...तीतंच शे-सव्वाशे घरें होती ती अगदी लहान व चंद्रमौळी होती. बांबूच्या भिंती, झावळ्यांचे छप्पर, अशी त्यांची रचना होती. चांगले घर क्वचितच दिसत होते." (पृ.१२)

कादंबरीतील निसर्गवर्णन प्रदेशविशिष्ट आणि व्यक्तींच्या मानसिकतेनुरूप केले आहे. जसे अशोकची आनंदीवृत्ती, "...जेथे तेथे नारळीच्या समृद्ध बागा दिसत होत्या. भाताची विस्तृत शेते पिकून तयार झाली होती. ती जणू काय भाताच्याच राशींनी भरली आहेत... शेतांच्या कडाकडांनी पाण्याचे वहाणारे पाट पाहूनत्याच्या मनाची तृप्ती झाली..." (पृ.१७) या निसर्गवर्णनाने रेखाटली आहे. शांतदुर्गेचा परिसर "बाहेर आता चांदणे फुलले होते. रातराणीचा सुगंध हवेत दरवळत होता. क्षितिजाच्या नीलवर्णावर पृथ्वीची काळीभोर भेदरेषा वळणावळणांनी उठून दिसत होती." (पृ.२१) या प्रमाणे जिवंत होतो. लीनाची अस्वस्थता नष्ट करणारा गोव्यातील निसर्ग- "...समोर नारळीचे असंख्य झुपके समुद्रावरील वाऱ्याने एकसारखे खिदळत आणि किनाऱ्यावरील लाटाचा नाच तेथून स्पष्टपणे दृष्टीस पडे. सागराचा वर्तुळाकार पृष्ठभाग क्षितिजाशी जेथे भिडल्यासारखा दिसतो, तेथे गलबतांची धूसर शिडे एखाद्या चित्रातल्याप्रमाण तटस्थ दिसत..." (पृ.२३) आघंनाशिनी भव्योदतत वर्णन, "अघनाशिनीचे जलनिर्भर पात्र विस्तीर्ण शेत खाचरांमधून वळणावळणांनी जात होते आणि मखमली विलासशय्येवर आळस झाडीत व उघड्या अंगाला आळोखेपिळोख देत पहुडलेल्या रुपगर्वितेप्रमाणे ते शोभत होते. खाडीच्या तीरावरील बांधावर पर्णाच्छादित

वृक्षांची डौलदार रांग लागली होती...''(पृ.४३) मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या निसर्गाचे वर्णन पहा, ''सूर्यबिंब आता जलपृष्ठावर टेकले होते. आणि त्याच्या सुवर्णकेसरी गोलातून क्षणाक्षणाल रंगीबेरंगी दिव्य तेजाचा सडा क्षितिजावर पडत होता. वर्तुळाकार तीरावरील शुभ्र रेतीत जागोजाग शंख व शिंपले चकाकत होते. दोनही बाजूला दोन टेकड्या समुद्रात दूरवर गेल्या होत्या. त्याच्या काळ्या भीषण खडकावर पाण्याच्या उन्मत्त लाटा वरपर्यंत चढून फुटत व त्यांच्या शुभ्र फेसात काही वेळपर्यंत त्यांची कृष्णांगे आच्छादली जात...''(पृ.७४) चंद्रेश्वर पर्वत आणि परिसराचे (पृ.१२६-१२७), तसेच मांडवी काठावरील निसर्गप्रदेशाचे वर्णन (पृ.२२५) रेखीव आहे. अशोक लीनाच्या प्रेमभावनेला अधिक महत्त्व दिल्याने प्रदेश आणि निसर्ग वर्णन पार्श्वभागीच राहतात हे मान्य करुनही समकालीन वास्तवाचे जिवंत चित्रण लेखकाने केले आहे.

सरकारी दरबारी मानसन्मान-प्रतिष्ठा मिळावी म्हणून धनिक भाटकर प्रयत्नशील होते. अनेकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता. त्याचे गोडवे गाण्यात ते समाधान मानत होते. फिरंग्याचे ते सर्व न्याय्य अशी त्यांची धारणा होती. ते प्रेमळ, दयाळू, आणि दानशूर असल्याचा प्रचार समकालीन वर्तमानपत्र करीत होते. वर्तमानपत्र चालकांना राजाश्रय मिळालाच होता. सरकारची मर्जी संपादन करण्यासाठी त्यांच्या धोरणांचा पाठपुरावा करीत होते जनहिताकडे दुर्लक्ष केले जात होते. ख्रिस्ती धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्य वर्तमानपत्रं करीत होते. त्याचा परिणाम जनसामान्यांवर झाला होता. समाजाचे मतपरिवर्तन करणे अवघड होऊन बसले. विवेकवादाच्या भूमिकेवरुन विचार करण्याची लोकांना आवश्यकता वाटेनाशी झाली. धर्म, समाज आणि राजकारण या साधनांचा वापर केल्याशिवाय जनजागृती होणार नाही असे चित्र दिसू लागले. जसे, 'स्वदेश'च्या अंकातून परौरांनी गोमंतकस्थ पोर्तुगीज आहे, पोर्तुगाल देश ही आमची मायभूमी आहे. त्या देशाचा इतिहास हा आमचा इतिहास आहे. आमच्या सुधारणेचे सारे श्रेय पोर्तुगिजांच्या सांस्कृतिक कार्याला आहे. आम्ही स्वतंत्र आहो, कारण पोर्तुगाल स्वतंत्र आहे. त्यांचे स्वातंत्र्य हेच आपले स्वातंत्र्य आहे. ख्रिस्ती धर्मानेच गोमंतकाचा उद्धार केला आहे. अशाप्रकारे फिरग्यांची स्तुती केल्यामुळे समान्य जनतेचा यावर विश्वास बसला. ही जनसामान्यांची मनोवृत्ती बदलणे लीनाला अशक्य वाटते. गोमंतकीय समाजाचे भीषण वास्तवचित्र लीनेला दिसते ते असे, ''दरिद्री याचकांचा तांडा तिला दिसू लागला. सगळे सुशिक्षित या वर्गात गोळा हाऊेन नोकरीसाठी गर्दी करीत होते. देशाची बरीचशी संपत्ती निष्क्रिय लष्काराच्या मलिद्यासाठी जात होती. पोपटपंची करणाऱ्या दुबळ्या व निस्तेज विद्यार्थ्यांचे घोळके मागाहून येत. रोग्यांना, निराश्रितांना आश्रय देऊन त्यांना दुःखमुक्त करणाऱ्या संस्था नव्हत्या. श्रीमंत रोग्यांची चैन चालवणारी ऐश्वर्यशाली अशी दोन-तीन इस्पितळे

होती. सरकार हे सरकारी नोकरांसाठी असून लोकांसाठी नव्हे, उलट लोकच त्यांच्यासाठी आहेत अशी भावना सरकारी अंमलदारात जरी होती. समाज दारुडा व्हावा म्हणून दारुच्या उत्पत्तीला शक्य ते प्रोत्साहन सरकारकडून मिळत होते आणि हे अपुरे पडू नये म्हणूनच की काय पोर्तुगालहून उंची मद्याची खास आयात होत होती. हजार दीडहजार पाद्री सरकारी आश्रयावर धार्मिक योगाचा पुरस्कार करण्यात गढून गेले होते.'' (पृ.२४-२५) फिरंग्यांच्या राजवटीत सुशिक्षितांच लाचारी वाढली. व्यसनाधीनता हेतुपुरस्सर वाढीस लावली गेली. धर्मप्रसार आणि प्रचाराचे कार्य जोराने केले गेले. लोकांच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन नोकऱ्या देऊन त्यांना ख्रिस्ती बनविले. पेरौरांसारखे जमीनदार प्रतिगामी होते. सरकारी धोरणांचा पुरस्कार करुन समाजातील दुबळ्या अंधश्रद्धेचे तो पोषण करीत होते. स्वार्थत्यागाचे नाटक करणाऱ्या देशद्रोह्यांची संख्या वाढली. तेच पुढारी म्हणून मिरवू लागले. लोकांच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन धर्ममार्तंड म्हणून मिरवायला मिळत होते. फिरंग्यांच्या एकतंत्री कारभाराची स्तुती करुन सरकार दरबारी प्रतिष्ठा मिळत होती. गोमंतकीयांनी सरकारी नोकऱ्या करुन आपला उत्कर्ष साधला पाहिजे, असा प्रचार करुन लोकांना लाचार, स्वाभिमानशून्य बनविले. त्यामुळे तरुण पिढीला ध्येयाची जाणीव होत नव्हती. त्यागाचे मोल कळत नव्हते. समाजकार्याची चाड नव्हती. स्वातंत्र्याची तळमळ नव्हती. भावनांना बधिरता आली होती. स्वार्थांधतेमुळे भविष्य दिसत नव्हते. सत्याचे तेज दिसत नाही, स्वार्थाला पूजेचे रुप प्राप्त झाले. पाश्चात्यांची पोषाखी सुधारणा तरुणांनी आत्मसात केली. अशी भयाण परिस्थिती निर्माण झाली होती. सरकारी नोकर स्वार्थी, देशद्रोही आणि स्वाभिमानशून्य झाले. त्यांची मनोवृत्ती पुढाऱ्यांनी पोसली होती.

सांपत्तिक स्थिती चांगली नसेल तर दरिद्र्याच्या ध्येयवादाला, त्यागाला समाजात किंमत नसते. अशा आशयाचे विचार रामराव अशोकला सांगतात. पैशाशिवाय पुढारीपण -मोठेपण मिळत नाही. उलट श्रीमंत निर्बुद्धाना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते. फिरंग्यांनी हिंदुमधील विचारशक्ती नष्ट केली. त्यांना दारुडे बनविले. नोकऱ्या देऊन लाचार बनविले. सुशिक्षित माणूस विचार करु शकतो, समाजात जागृती करण्याचा प्रयत्न करतो, त्याला पारतंत्र्याचा तिटकारा वाटतो. तो लोकांना संघटित करुन स्वातंत्र्याची मागणी करण्याची शक्यता अधिक असते. म्हणून सुशिक्षितांना नोकरी देऊन त्यांना विचारापासून प्रवृत्त करण्याचे धोरण सरकारने राबविले. प्रतिष्ठित वर्गाने पारतंत्र्याचे पोवाडे गायले. हिंदुधर्माचा आणि हिंदुसमाजाचा द्वेष केला. फिरंगी लोक आणि त्यांच्या संस्कृतीचा पुरस्कार करुन समाजाचे स्वतंत्र अस्तित्व स्वार्थापोटी मारले. सत्य आणि स्वातंत्र्याचा बळी देऊन पुढाऱ्यांनी वैभव मिळविले. व्यसनाधीनता हा समकालीन समाज जीवनाचा शाप होता. सरकारच्या धोरणामुळे दारु निर्मितीला प्रोत्साहन मिळाले. दारु पिणे सुधारकाचे लक्षण मानले जाऊ लागले. त्यामुळे

आमजनता व्यसनाधीन होऊन खंगत गेली. त्यांची विचार करण्याची शक्ती नष्ट झाली. ख्रिस्ती धर्म आणि पारतंत्र्य या दोन गोष्टी फिरंग्यांनी हिंदुना दान करुन त्यांचे शोषण केले. सक्तीने धर्मांतर घडविले. जातिभेदाचे बीज पोसले. स्वार्थी, मतलबी लोकांची संख्या वाढली. सरकारच्या निष्काळजीपणामुळे उपासमारीची वेळ आली. सरकारी नोकऱ्यामुळे सुशिक्षित लाचार झाले. त्यांची विचारशक्ती नष्ट झाली. व्यसनाधिनता वाढली. मान-सन्मान मिळविण्यसाठी धनिकांनी सरकारची हुजरेगिरी केली. तरीही हळूहळू सरकार विरोधात असंतोष वाढला. लोक संघटित होऊन गोवामुक्ती चळवळीला बाळसे आले. नेभळट, लाचार हिंदू जमीनदार संघटित होऊन सरकारला विरोध करु लागले. सर्वांना हक्काची जाणीव झाली. स्वातंत्र्याचे महत्त्व समजू लागले.

समकालीन राजकीय पार्श्वभूमी आणि चळवळीचा परिणाम समाजाचा एक घटक म्हणेन लेखकावर होत असतो. प्रस्तुत कादंबरीत चित्रित झालेली राजकीय पार्श्वभूमी पाहिली तर याची स्पष्ट कल्पना येते. फिरंग्याची गोव्यावर सत्ता होती. त्या सत्ताप्रभावाने लोकांमध्ये एकप्रकारची निष्क्रियता आणि लाचारी, दुबळेपणा, व्यसनाधीनता वाढली होती. लोकांमधील सारासार विवेकबुद्धी नष्ट झाली होती. त्यांच्यामध्ये स्वदेश-स्वधर्माबद्दलची उदासीनता वाढली होती. या सर्व गोष्टींना विरोध करण्याच्या प्रचारकी भूमिकेतून लेखकाने क्रांतिच्या मार्गाचा पुरस्कार केला आहे. त्यासाठी पारतंत्र्याचे दुष्परिणाम या कादंबरीत रेखाटले आहे. प्रचारकी थाटाची असूनही समकालीन वास्तव परिस्थितीचे दर्शन घडविण्यात कादंबरी कमी पडत नाही, अवास्तव अतिशयोक्ती होत नाही.

हक्काची जाणीव झालेली जनता संघटित झाल्यास जुलमी सरकारचा विरोध निरर्थक ठरतो, हे गावगाड्याच्या संघटित होण्यातून लेखकाने दाखवून दिले आहे. पोर्तुगीज सरकारचे धोरण ख्रिस्ती धर्माचा प्रचार आणि प्रसार हे होते. त्यामुळे त्यांनी चारशे वर्षाच्या राजवटीत हिंदूंना सक्तीने ख्रिस्ती केले. ते चर्चमध्ये जात असले तरी मनाने राम-कृष्णचेच भक्त होते. ते हिंदू संस्कृतीचे संस्कार विसरु शकत नव्हते. देवपूजा सत्यनारायण आणि भजन करीत होते. सरकारच्या जुल्माला कंटाळून शेवटी ते शुद्धकृत हिंदू झाले. तेव्हा सरकारचा जळफळाट होणे स्वाभाविकच होते. बड्या जमीनदारांसाठी रायस काढून त्यांनी गावड्यांना जमिनी सोडण्यास भाग पाडले असे चित्र पेरौरा आणि गावड्यांच्या संघर्षाधारे काढले आहे. पोर्तुगीजांच्या काळात भाषणस्वतंत्र्य आणि लेखन स्वातंत्र्यावर गदा आली. जसे गावड्यांच्या स्थितीवरील अशोकचा लेख छापला गेला नाही किंवा लीनाच्या शाळेत अशोकने केवळ साहित्य विषयावर भाषण केले. तो राजकीय विषयावर बोलू शकला नाही. तरी साहित्यिकांकडून जनजागृती घडू शकते हे त्याने सप्रमाण दाखवून दिले. साहित्यिकांकडून जनजागृती होऊ शकत नाही असे सरकार समजत होते. धार्मिक स्वातंत्र्यावर देखील गदा आली होती.

सत्तेच्या जोरावर विरोधकांवर मोठमोठे आरोप ठेवून त्यांना क्रांतिकारक ठरविले जाऊन त्यांना अटक करणे, हद्दपार करणे, विरोध मोडून काढण्याचे तंत्र त्यांनी अवलंबिले. असे गावड्यांना संघटित करणाऱ्या त्यांना मदत करणाऱ्या अशोकला अटक केली गेली. राक्षसी, जुलमी, क्रूर कृत्य केले. हिंदूंना सरकारी नोकऱ्या देऊन लाचार केले. जनतेची विचारशक्ती मारली. भावना बधीर केल्या. त्यांना दुबळे आणि निष्क्रिय बनविले. पाश्चात्य सुधारणा घडवून आणल्या नाही. केवळ धर्मांतराला महत्त्व दिले. यांत्रिक प्रगती केली नाही. लोकांची कर्तृत्वशक्ती मारली. दारुनिर्मितीचे मुक्त धोरण ठेवले. दारुनिर्मिती करणाऱ्या संपकऱ्यांचा संप पोलिसांच्या मदतीने मोडून काढला. आल्तेर्त लीना आणि अशोक-पेरौरा किंवा रामगावडा-अशोक यांच्या संवादातून समकालीन राजकीय परिस्थितीचे चित्रण केले आहे. बा. भ. बोरकर प्रस्तुत कादंबरीसंबंधी दोन शब्द लिहिताना म्हणतात, "...जवळजवळ तीन वर्षामागे ही लिहिली गेली. १९४६ त गोमंतकात जी अपूर्व क्रांती सुरू झाली आणि अजून चलू आहे, तिच्या अंत:प्रवाहांचे दर्शन त्यांना आधीच कसे होऊन चुकले होते. त्याचे प्रत्यंतर या कादंबरीत दिसून येईल. या क्रांतीचे ते केवळ द्रष्टेच नाहीत तर तिचे एक आघाडीचे वीरही आहेत. तिच्यापायी त्यांना तीनदा कारावास भोगावा लागला असून आज ते आग्वादच्या प्रसिद्ध तुरुंगात विनाचौकशी बद्ध आहेत. अशा या तेजस्वी साहित्यिकाच्या या पहिल्या कादंबरीमुळे नवगोमंतकाचे महाराष्ट्राला योग्य दर्शन घडेल तिचे योग्य स्वागत होईल अशी आम्हास उमेद आहे."२३. बा. भ. बोरकरांच्या अभिप्रायाधारे एक गोष्ट स्पष्ट होते की, १९४६ मधील गोमंतकात जी क्रांती सुरू झाली, त्या क्रांतीचे भविष्य लेखकाने आधीच सांगितले होते. स्वत: लेखकही गोवामुक्ती चळवळीतील कार्यकर्ता असल्याने फिरंग्याच्या जुलमी शासनाची प्रचीती त्यांनाही आली होती. त्यांनाही विनाचौकशी तुरुंगात जावे लागले होते. भाषण, अंदोलन आणि धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आली होती. लोक हळूहळू संघटित होत होते. सरकारविरोधी असंतोष वाढत होता. लीना-अशोकच्या प्रेमाचा धागा कथानकात गुंफला असला तरी हा धागा गौप ठरतो आणि तत्कालीन सामाजिक, राजकीय वास्तवचित्रण करणारी कादंबरी असे तिचे आशयविश्व असल्याचे स्पष्ट होते. देशावर ब्रिटिशांची सत्ता असताना, गोव्यात मात्र पोर्तुगीजांची जुलमी सत्ता होती. गोवामुक्ती क्रांतीत लोक सहभागी झाले होते असे येथील प्रादेशिकतेचे वेगळेपण दिसते.

जनसामान्यांच्या आर्थिक परिस्थितीचे चित्रही लेखकाने रेखाटले आहे. जसे सरकारच्या निष्काळजीपणामुळे तांदूळ महागला किंवा दुर्मिळ झाला. घाटमाथ्यावर जाऊन तांदूळ आणण्याची त्यांच्यावर वेळ आली. पोलीस, रेल्वे अधिकारी यांनी त्यांचे शोषण केले. लोकांवर भीक मागण्याची वेळ आली. भात-मासळी प्रमुख अन्न असलेल्या गोवेकरांना बाजरीसारखे धान्य खावे लागले. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर विपरीत

परिणाम झाला. वेश्यावर्गाचा प्रश्न नैतिकतेपेक्षा आर्थिक आहे हे लेखक चित्रित करतो. पोटासाठी शरीर विकण्याची वेळ आली.

ख्रिस्ती संस्कृतीची लवचिकता सैलपणा आणि हिंदू संस्कृतीतील कर्मठपणा या दोहोंचे दर्शन लेखकाने घडविले आहे. अविवाहित तरुण तरुणींनी मोकळेपणाने एकत्र येऊन नृत्य करणे, दारु पिणे, फिरायला जाणे, चुंबन घेणे, ख्रिस्ती संस्कृतीचे संस्कार झालेले लोक मान्य करतात. उलट हिंदू लोकांचा या सर्वांना विरोध असलेला दिसतो. परंतु रोटी-बेटी व्यवहार हिंदुसंस्कृतीप्रमाणेच ख्रिस्ती संस्कृतीतील लोकांना मान्य नाहीत. जसे पेरौरांना लीनाचे लग्न आल्बेर्त बरोबर व्हावे असे वाटते. अशोकबरोबर तिने लग्न करु नये अशी त्यांची इच्छा असते. तो हिंदू आहे. सरकारी नोकर नाही यासारख्या गोष्टी सांगून तिचे मतपरिवर्तन करण्याचा ते प्रयत्न करतात. अशोकलाही लीनाने आल्बेर्तबरोबर नृत्य करणे किंवा जलक्रिडा करणे आवडत नाही. त्याच्या घरातल्या लोकांना आणि सर्व हिंदूंना अशोक-लीनानचे लग्न होऊ नये असे वाटते. गावभर तशा अफवा पसरतात. दोन संस्कृतीचे वेगळेपण सांगणारी ही कादंबरी आहे. जित-जेते संबंध, गोवामुक्तीचळवळ, गोमंतकातील लोकांची लाचारी, दुबळेपणा, निष्क्रियता या सर्व गोष्टींचा विचार करता समकालीन समूहजीवनावर भाष्य करणारी ही कादंबरी आहे. केवळ अशोक-लीनाच्या प्रेमाची ती कथा नाही. सर्व समाजच कादंबरीचा नायक आहे. म्हणून गोव्याच्या पार्श्वभूमीवरील ही एक प्रादेशिकता कादंबरी आहे हे मान्य करण्यास प्रत्यवाय नाही.

कादंबरीचे निवेदन आणि संवाद प्रमाण मराठी भाषेत असले तरी काही संवाद, शब्द आणि गीतांमधून प्रदेशविशिष्ट कोकणी बोलीचे दर्शनही घडते. जसे, कुळागरे, वल्हे, नावेचा सुकाणू, राया, भाट, भाटकर, खाखी, रेंदेरे, गावडे, वायंगण, गलबत, शिडे, शेतखाचरं, कवळ्या इ. शब्द कोकणी भाषेतील आहेत. उपमा प्रतिमातून कोकणी (गोवा) लोकजीवनाचे दर्शन घडते. जसे, 'नाव डुलत, तरंगत एखाद्या नागिणीप्रमाणे त्या प्रशांत जलपृष्ठावरुन धावू लागली. याचप्रमाणे ख्रिश्चन भंडाऱ्यांचे कोकणी गीत आणि ख्रिश्चन आल्बेर्तचे गीत दोन संस्कृतींचे दर्शन घडविते.

१) खुशालेचा दिस आज वोर्ताता आमचो  
जिंकला देखून आयच्यान मोग एकामेकाचो  
एकपोट जालोच या दोनुय काळजांचो  
कोणाच्यानुय सेपारार कोर नोजो (पृ.८७)

२) सुखा, मुज्या गोपान यो आंज्या  
तुजविण हे काळीज रोडता  
आँतोस्कोन मुजें हे सुंदेता  
गोपान दोरुक वोरनुक तुका (पृ.११२)

हरिबाबा भाटकरांचे भाषण कोकणी बोलीतील आहे.

"हांव मोठो भाटकार न्हय, फफन त्या म्हज्या भावांक रावपाक म्हणज घर देवदयेन व्हेड आस. कितल्या लोकांक जागो जाय?...

शांतादुर्गेच्या कृपेने काय उणे ना. या सगळ्या लोकांनी आमच्या सांतेर भाटात येवचें. तांका हांव लागत ती जमीन दितां आणि घरादारांमधून दितां. जाय जाल्यार ताका रोवक शेतां दितां. कोणेच भियोंचे लागना..." (पृ.२११)

वाचकावर लक्ष केंद्रित केल्यामुळे कादंबरीचे लेखन प्रमाणभाषेत केले असले तरी बोलीतील शब्दांमुळे प्रादेशिकतेच्या रंगछटा त्यातून दिसतात. 'रोमँटिक कलंदर कथाकार' असा सुभाष भेण्डे लक्ष्मणराव सरदेसाईंचा गौरव करताना म्हणतात. मराठीतील पहिल्यावहिल्या प्रादेशिक कथा गोमंतकाच्या पार्श्वभूमीवरील आहेत, 'सह्याद्रीच्या पायथ्यशी' लिहून कै. वि. स. सुखटणकर यांनी प्रादेशिक कथांचं दालन उघडले आणि सातशेवर अधिक कथा लिहिणाऱ्या लक्ष्मणराव सरदेसाई यांनी ते समृद्ध केलं... गोमंतकीय जीवनाचे विविध पैलू जवळून न्याहाळले. ढासळत चालेली जुनी गोमंतकीय जीवनपद्धती गोव्यातील कलावंतिणीचं लाजीरवाणं जिणं पोतुगीज राज्यकर्त्यांशी जवळीक साधणारी, पाश्चात्य जीवनाच्या प्रभावामुळे मुक्त बनलेली किरिस्तॉव संस्कृती यांचे रसपूर्ण चित्रण लक्ष्मणरावांनी केलं. फडके खांडेकर युग ऐन भरात असताना लक्ष्मणरावांच्या कथेनं वाचकांचे लक्ष वेधून घेतलं ते ह्या वैशिष्ट्यामुळे... परंतु त्यांची कथा केवळ उत्तान, रंजक नाही. तिला सखोल रेखाटन त्याचप्रमाणे जीवनातील दुःख दैन्याचा ते प्रत्ययकारी वेध घेते."२४. असे प्रस्तुत कादंबरी संदर्भात म्हणावे लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळातल गोमंतकीय लोकजीवनाचे चित्रण करुन कोकणी जीवन चित्रणाच्या शक्यता 'मांडवी! तू आटीलस?' या लक्ष्मणराव देसायांच्या कादंबरीने निर्माण केल्या. पुढे 'भावीण'सारखी बा. भ. बोरकरांची कादंबरी याच वळणावरची आहे.

### (४) बा. भ. बोरकर

### (५) *"भावीण"*

'मावळता चंद्र' (१९३८), 'अंधारातील वाट' (१९४३) यानंतर बा. भ. बोरकरांची 'भाविणी' ही १९५० मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी आहे. शेवंता भाविणीच्या आत्मबलिदानाची ही कथा आहे. तिला गोमंतकाची भौगोलिक आणि सामाजिक पार्श्वभूमी लाभली आहे. चंद्रकांत काकोडकर आणि लक्ष्मणराव सरदेसाई यांच्यापेक्षा वेगळेपण घेतलेली ही कादंबरी आहे.

सातूबाबा कुडईकर अंताशेठ नावाच्या कारागीराला पत्नीचे स्मरण म्हणून देवीच्या काचोळीची प्रतिमा तयार करण्यास सांगतो. सौंदर्यमूर्तीच्या शोधासाठी अंताशेठ

पायपीट करता करता कवळ्याला येतो. फुलवंती भाविणीची मुलगी, शेवंती पाहून हुबेहुब तिच्यासारखी काचोळी तयार करण्याचा निर्णय घेतो. 'ज्या मुलीवरुन देवीची प्रतिमा केली ती मुलगी अल्पायुषी होते' या लोकसमजामुळे तो अस्वस्थ होतो. देवीला कोल लाऊन प्रतिमा तयार करण्यास सुरवात करतो. मायलेकीमधील संघर्षही त्याला समजतो. फ्रेड नावाच्या जज्जशी आईच्या आग्रहाखातर ती शय्यासोबत करते. परंतु हे सर्व तिच्या मनाविरुद्ध घडले हे समजताच फ्रेड कायमचा दूर निघून जातो. पत्र आणि पैसे नियमितपणे पाठवू लागतो.

पोर्तुगालमधून शिकून परत आलेल्या हृषीला सावर्ड्यात मामाची मुलगी रंजना दिसते. अतिरेकी मनाने तो तिचे चुंबन घेतो. अर्थात रंजनेला ते आवडले नाही. हृषीलाही अपराध्याप्रमाणे वाटते. म्हणून तो दुर्भाटला निघून येतो. गांधीवादी मित्र केशवबरोबर तो काचोळीची मिरवणूक पाहण्यासाठी कवळ्याला जातो. मिरवणुकीत पेणी म्हणताना शेवंती बेशुद्ध होते. रंजनेशी तिचे साम्य असते. तिला पाहून तो अस्वस्थ होतो. मनोरुग्ण होतो. त्याला स्त्रीसुख मिळाले तर तो बरा होईल असे डॉक्टर सांगतात. वेडा झालेल्या हृषीशी रंजनेचे लग्न लावायला विसूमामा समाजभयामुळे तयार होत नाहीत. केशव फुलवंती आणि शेवंतीची भेट घेऊन हृषीला बरा करण्याची विनंती करतो. शेवंतीचे विवाहित केशववर प्रेम असते. त्यामुळे ती होकार देऊन हृषीला स्त्रीसुख देते. केशवचे हरिजन उद्धाराचे कार्यही ती सुरू करते. दरम्यान शेवंतीच्या सहवासात हृषी रमतो. बरा होतो. शेवंतीवर प्रेम करु लागतो आणि तिच्याशी विवाह करण्याचा निर्णय जाहीर करतो. रवळूदादा या हृषीच्या कर्मठ पित्याला ते मान्य नाही. कुळाचाराविरुद्ध वागल्यास समाज बहिष्कार टाकील असे त्यांना वाटते. ते त्याला प्रायश्चित घेण्याचा सल्ला देतात. तो जुमानत नाही. तेव्हा ते घर सोडून पर्तगाळला स्वामींकडे जाऊन राहतात. अन्नपाणी वर्ज्य करुन शाळीग्रामवर अश्रूंचा वर्षाव करतात. बापलेकीतील संघर्ष मिटावा म्हणून देवीला साकडे घालण्यासाठी रमक्का आणि रंजना कवळ्याला येतात. तेथे त्यांना शेवंती भेटते. त्या भेटीत त्यांना एक रहस्य उलगडते. रंजनेच्या वडीलांचे तरुण वयात फुलवंती भावीणीशी संबंध होते. शेवंता ही त्यांचीच मुलगी आहे. रंजना आणि शेवंता बहिणी असल्याचे स्पष्ट होते. 'आया दोन, बाप एकच' हे समजताच रंजनेच्या सुखासाठी शेवंता आत्महत्या करते. आत्मबलिदान करुन भावीण धर्माचे पालन करते.

केशव-कमलीचे हरिजन उद्धराचे कार्य आणि हरिजनांशी रोटीव्यवहार केल्यामुळे त्यांच्यावर समाजाने बहिष्कार घालण्याचा अयशस्वी प्रयत्न करणे हे उपकथानक मूळ कथानकाशी एकजीव झाले आहे. भावीण ही सामाजिक संस्था खास गोमंतकीय आहे. महाराष्ट्रात मुरळी किंवा देवदासी प्रमाणेच त्यांना देवीच्या पुजेचा मान आहे. लग्नाच्या बायकोप्रमाणे या स्त्रीया पुरुषांशी संबंध ठेवतात. भावीण धर्माचे पालन करतात तर

त्यांच्याशी चोरटे संबंध ठेवणारे पुरुष भ्याड, स्वार्थी, दांभिक, निर्दयपणे वागतात. भावीणीची समाज उपेक्षा आणि अवहेलना करतो, ही भावीण जातीच्या जीवनातील प्रादेशिकतेला लेखकाने व्यक्तीचित्रणातून आकार दिला आहे.

कादंबरीची नायिका आहे शेवंती भावीण. ती फुलवंतीची मुलगी आहे. भावीणीला आई असते, बाप नसतो. त्याप्रमाणे प्रारंभी तिला आपल्या पित्याविषयी माहिती नसते. शेवटी विसूबाबा पिता आणि कमली-रंजना बहिणी असल्यचे समजते. तिचे सतीचे वाण फुलवंतीला आवडत नाही. ब्राह्मणाचे रक्त दोघींना छळते अशी तिची रास्त तक्रार आहे. शेवंती हळव्यामनाची आहे. फ्रेडची अनिच्छेने ती शय्यासोबत करते, परंतु तिचे खरे प्रेम विवाहित केशववर असते. हृषीला शरीरसुख देऊनही त्याच्याकडे ती वात्सल्य भावनेने पाहते. हृषीचीही तिच्यावर खरी भक्ती आहे. भाविणीला समाजात मान-प्रतिष्ठा मिळावी, तिची उपेक्षा आणि अवहेलना थांबावी असे तिला वाटते. बलिदान करुन पतिव्रत्याचे पालन ती करते.

पोर्च्युगालमधून शिकून आलेला हिंदू-संस्कृतीतील दोष स्थळांवर बोट ठेवणारा हृषी हा कादंबरीचा नायक आहे. रंजना-शेवंतीच्या रुपसाम्यामुळे तो वेडा होतो. संवेदनाक्षम मनाचा असल्यामुळे शेवंतीच्या उपकाराची परतफेड करण्यासाठी वडिलांच्या विरोधाला आणि कर्मठपणाला तो जुमानत नाही. तिच्याशी विवाह करुन भावीणीला समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्याचा संकल्प तो करतो.

केशव हा हृषीचा मित्र. गांधीवादी विचारांचा प्रचार आणि प्रसार तो करतो. मातृभाषेतून शिक्षणाचा पुरस्कार करतो. गायककलाकारांना पाठिबा देतो. हरिजन उद्धराचे कार्य करणारा, संयमी, समजदार आणि प्रार्थनेचे सामर्थ्य जाणणारा तरुण आहे. कमली ही त्याची पत्नी, ती पतीच्या कार्यात आनंदाने सहभागी होते. रायसाची ती विसूबाबाची मुलगी, रंजनेची बहीण आहे. रंजनेने हृषीला आपले हृदय अर्पण केलेले असते. परंतु पुरुषप्रधान हिंदू संस्कृतीचे नियम मोडू शकत नाही. ती अगतिक आहे. रम्मक्का ही तिची अत्त्या आहे. पुरुषी संस्कृतीच्या प्रभावाने कोंडमारा झालेल्या स्त्रियांचे त्या दोघी प्रतिनिधित्व करतात. रंजनेची आई त्याला अपवाद नाही. रवळूदादा, गेनू महार, फ्रेड, गावडा, सांतूबाबा, अंताशेठ ही गौण पात्रे देखील खास गोमंतकातील आहे. कथानक आणि व्यक्तिरेखा यांचा विचार करता, कथानकाचे मूळ गोमंतकीयच आहे. आणि व्यक्तिरेखाही त्याच संस्कृतीत वाढलेल्या आहेत.

'भावीण' जीवनप्रणालीशी निगडित एवढेच या कादंबरीचे स्वरुप नाही, तर तिला खास गोमंतकाची भौगोलिक पार्श्वभूमी लाभली आहे. प्रदेशही एक पात्र म्हणून जिवंत झालेला दिसतो. जसे सावर्डे, कवळे, दुर्भाट, मडकई, कुडई, पर्तगाळ या गावांची अघनाशिनी नदीची, तांबड्या मातीची , आंबे, पोफळी-माड-नारळ-बांबू, चाफा आणि मंगळुरी कौलांच्या चुनेरी घरांची पार्श्वभूमी प्रदेश वैशिष्ट्यसूचक आहे. बंदरातील

पाणी कापीत चाललेल्या वाफराचे वर्णन, मॅडोलिनवर कोकणी गीत गाणारे स्त्रीपुरुष, 'शांतादुर्गाच्या' मूर्तिचे वर्णन, पालखी मिरवणूक, कीर्तन, सोयरोबा अंबिये यांचे अभंग इत्यादींच्या वर्णनाने गोमंतकाची 'भूमी' साकार झाली आहे. हृषीच्या घराचे लेखकाने केलेले वर्णन खास प्रादेशिक आहे.

"श्रावणातली सस्यशामल सृष्टी नाना वर्णाकृतीच्या पत्री-फुलांनी नटली होती. अघनाशिनीच्या एका काठावर मासळीची प्रसिद्ध असलेले दुर्भाट गाव कोळ्यांच्या लहानमोठ्या घरांचा परिवार मांडून बसले होते. आणि त्यांच्या मध्यभागी रवळू कामतांचा वाडा आपल्या खानदानी दिमाखात अतिथ्याची दारे उघडून पालकासारखा उभा होता. समोरच्या प्रशस्त पटांगणात नारळांच्या राशी पडल्या होत्या, आणि तीक्ष्ण पात्याच्या तीन चपट्या सुळावर तीन कामकरी विद्युतगतीने नारळ सोलण्याचे काम करीत होते. दुसऱ्या बाजूला काही कामकरी बाया नारळ फोडून वाळत टाकण्याचे काम करीत होत्या. दुपारच्या त्या चढत्या कढात कामकऱ्यांच्या अंगावरच्या घामाच्या धारा आणि नुकत्याच फोडलेल्या नारळांची ती ओली पांढरी वळी आपापल्या वर्णाच्या लावण्याने दृष्टी वेधीत होती."(पृ.४५)

प्रदेशवर्णनाप्रमाणेच निसर्गवर्णनही अपरिहार्यपणे आले आहेत. माणसांच्या मानसिकतेनुरुप रेखीव-सुंदर निसर्गचित्र आहे. जसे अंताशेठला हवी असणारी काचोळी प्रतिमारुपात शेवंती ही सुवर्णमूर्ती दिसते. परंतु, "ज्या मुलीवरुन देवीची प्रतिमा तयार केली जाते ती अकाली मरते किंवा तिचा सत्यानाश होतो" या लोकसमजामुळे अंताशेठ बेचैन होतो. तेव्हा लेखक वर्णन करतो, "...शुक्ल पंचमीचे मधुर चांदणे चुनेरी वृंदावन वृंदेचे थडगेच आहे असे अंताशेठीस वाटले." (पृ.२५) याचप्रमाणे अंताशेठच्या मायेने प्रफुल्लीत झालेली शेवंतीची मानसिकता "नुकत्याच येऊन गेलेल्या पावसाच्या सरीमुळे न्हाऊन निघालेली समोरची फणसाची आळ करवलीचे कोवळे लावण्य उधळीत होती." (पृ.३२) लिसेवाचा पहिला भावी हिंदू प्रोफेसर हृषीच्या मानसिकतेनुरूप. 'अघनाशिनीच्या विस्तीर्ण निळ्या पात्रातून घसघस पाणी कापीत वाफर वेगाने जात होता. पावसाच्या जलसमृद्धीमुळे खाडीचे यौवन लहरीलहरीतून फुटत होते. उभय बाजूची हिरवीगर्द झाडी आणि लसलसलेली कोवळी शेती, उघाडीनंतरच्या आळसावलेल्या उन्हात लावण्याने चमचमत होती."(पृ.३७)

रेखीव, रम्य निसर्गचित्राप्रमाणे निसर्गाचे रौद्ररूपही आहे. "केशव शेवंतीच्या घराकडे पोचला तेव्हा सूर्य पुरता मावळला होता. संध्येची मंद तापशी पश्चिमेकडच्या माडांच्या सावळ्या शेंड्यांना उठाव देत होती. दुसरीकडून चंद्राची कांती हळुहळू स्पष्ट होत हाती. या दोन प्रकाशंच्या सरमिसळीत ते अर्धेअधिक जळून गेलेले घर जास्तव भेसूर आणि भकास दिसत होते. परसातल्या कापून टाकलेल्या केळीमुळे आग आवटली गेली होती हे स्पष्ट दिसत होते. छपराचा जळलेला भाग कृतांतमुखसारखा

विद्रूप आणि काळाठिक्कर पडला होता... आगीच्य आचेने त्यानी माना टाकल्या होत्या.'' (पृ.१२७)

विसूमामा केशवला तारुण्यातील फुलवंतीशी असलेल्या संबंधाविषयी सांगतो.

''बाहेर पावसाची जोराची सर सुरू झाली होती. मेघांचा गडगडाट आणि आजूबाजूला मोडणाऱ्या झाडांचा कडकडाट ऐकू येत होता. त्यात बेडकांच्या आवाजाची भर पडत होती. कानठळ्या बसवणारा आवाज कानी आल्यामुळे विसूबाबा बोलता बोलता जरा थांबले...'' (पृ.१७१)

समकालीन समाजवास्तव लेखकाने भाविणीचा धर्म, जनतेची त्यांच्याकडे पाहाण्याची वृत्ती, बहुजन समाजाचे दुर्लक्षित जीवन, विषमता, कर्मठपणा आणि धनिकांची भोगवादी दृष्टी या आधारे रेखाटले आहे. भावीण ही एक गोव्यातील उपेक्षित सामाजिक संस्था आहे. संस्कृती आणि समाज जीवनाची मुळे ज्या मातीत खोलवर रुजलेली असतात त्याची अपरिहार्यता त्या संस्कृतीच्या दर्शनातून व्यक्त होते. 'भावीण' कादंबरी गोमंतकाच्या मातीत मुरलेल्या सामाजिक प्रथेची मुळे, भूप्रदेश आणि लोकजीवन यांचे अतूट नाते सांगतात. कलियुगात भटांच्या बायका भाविणीप्रमाणे रंगढंग करु लागल्या, तर भाविणींच्या मुलींना बामणपणाचे डोहाळे लागले. ते फुलवंताला भिकेचे लक्षण वाटते. कायदेकरुनही भावीण संस्थाबंद होणार नाही. कारण कर्मठ लोक किंवा पुढारी-समाजसुधारक त्यांच्याशी लग्न करायला धजत नाही. ब्राह्मणांचा लबाडपणा आणि दांभिकपणा लेखकाने शब्दबद्ध केला आहे. भाविणीच्या घरी जाणारे ब्राह्मण त्यांच्याशी गोड बोलतात, त्यांना जीव लावतात. परंतु चारचौघात किंवा रस्त्यात भेटले तर त्यांना सामाजिक प्रतिष्ठेच्या कल्पनेमुळे ओळख देत नाहीत. समाजात, भोग घेणाऱ्या ब्राह्मणांना प्रतिष्ठा आहे, पण भाविणींना नाही. अंताशेठ देवीची काचोळी घडविण्यासाठी फुलवंतीच्या घरी मुक्काम करतो. गावभर त्याने तिला 'ठेवली' असे बोलले जाते. खेड्यांमध्ये सत्यासत्य पडताळून न पाहता अफवा, गैरसमज झटपट पसरतात. भाविणीच्या मुलीला बाप नसतो. आई असते. कारण कामवासना तृप्त झालेला पुरुष भाविणीपासून दूर जातो. तिला होणाऱ्या अपत्याकडे समाज संशयाने पाहतो. विसूबाबा-फुलवंती संबंधामुळे शेवंतीचा जन्म होतो. परंतु शेवंतीला बापाचे नाव समजू शकत नाही. रंजनेशी असलेल्या साम्यामुळे पुढे तिला हे समजल्यामुळे ती बहिणीसाठी आत्मबलिदान करते.

भाविणीला कधीकधी इच्छेविरुद्ध शरीर विकावे लागते. जसे युरोपियन जज्ज फ्रेडशी शेवंतीला याप्रकारे संबंध ठेवावे लागतात. तिची आईच तिला तसे वागायला भाग पाडते. शरीरधर्मानुसार सर्व गोष्टी घडतात. परंतु शेवंतीचे अंतःकरण याप्रकारामुळे चुरगळुन जाते. इच्छेविरुद्ध शरीर विकावे लागल्याचे दुःख तिला होते. तिचा संताप पुढील शब्दांतून व्यक्त होतो. ''आम्हाला कुठला आला आहे मान-अपमान? पुरुषाच्या

वासनेनं स्त्री हृदयाचा आजवर कितीसा विचार केला आहे! त्यात आमची तर भाविणीची जात, आमच्या कसोट्याची कुणीही चेष्टा करावी.'' (पृ.३३) फ्रेड संबंधाविषयी अंताशेठला शेवंता स्वत:ची व्यथा सांगते. फ्रेडच्या खोलीत शेवंताला लोटून एका ब्राह्मणाने सरकारी हुद्दा मिळविला. शेवंतीच्या शीलाची विक्री करुन स्वत: अन्नाला लागला. नंतर शेवंतीला वश करण्यासाठी तो खटपट करु लागला. यातून ब्राह्मणांच्या दांभिक स्वार्थीवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. उलट तारुण्याच्या काळात जमेल तितका धनसंचय केला पाहिजे. नाहीतर उतार वयात उष्टी-खरकटी काढण्याची त्यांच्यावर वेळ येते. कारण तरुण भाविणीशी पुरुष संबंध ठेवतात. उतारवयातील भावीण त्यांना नको असते. शेवंता आणि फुलवंती यांचे मनोगत भाविणीची व्यथा सांगणारे आहे. ''भाविणीला कुठली आली आहे निष्ठा? तिनं निष्ठ दिली म्हणून कोण तिच्याशी निष्ठेनं राहणार? आणि निष्ठेचा चाहता लग्नाची बायको सोडून भाविणीचा उंबरठा चढेलच कशाला? म्हातारपणापर्यंत आपल्यातल्या कितीजणींना आजवर कुणी पाळलं आहे... आम्हा भाविणींची जात निर्माण केल्याबद्दल समाज गुन्हेगार असला तर समाजानं उपेक्षिलेली निष्ठा न दिल्याबद्दल आम्ही पतित आहोत तसं तर पतित समाजात आम्ही पवित्र ठरलो असतो. 'भाविणीचा कासोटा' अशी म्हण निर्माण होण्याइतकी आमची अप्रतिष्ठा झाली नसती...'' (पृ.३५) यातून लेखकाने सामाजिक वातावरण निर्माण केले आहे.

कुळधर्मातील आचारविचार रुढीपरंपरा यांचे समकालीन परिस्थितीत फारच प्रस्थ होते. कुळधर्माचे पालन न करणाऱ्यावर बहिष्कार टाकला जात होता. केशव-कमली दलितोद्धाराचे कार्य करतात. हरिजनांसाठी शाळा चालविता. त्यांच हरिजनाशी रोटी व्यवहार असल्याचीही चर्चा समाज करतो. कवळ्याच्या देवीला काचोळीच्या मिरवणूकीपूर्वी रवळूदादांच्याकडे पालखीला जाणाऱ्यांसाठी जेवण असते. केशव-कमलीला पंक्तीला कसे बसू द्यायचे हा प्रश्न त्यांना पडतो. उपासामुळे त्यांचा प्रश्न सुटतो. केशवचा महात्माजीचा मौना उपास असल्यामुळे तोही पंक्तीला बसण्याचा प्रश्न येत नाही. शिवाय शिकलेल्या हृषीकडूनही कुळधर्माचे पालन होत नाही याची खंत रवळूदादांना वाटते किंवा शेवंतीच्या घरी वास्तव्य केलेल्या हृषीने स्वामींची आज्ञा पाळावी. प्रायश्चित घ्यावे असे ते सुचित करतात. तो विरोध करतो आणि शेवंतीशी लग्न करण्याचा निर्णय जाहीर करतो. तेव्हा रवळूदादा अन्नपाणी वर्ज्य करुन 'शाळीग्राम'ची पूजा करीत बसतात. बापलेकांमधील संघर्ष नष्ट व्हावा म्हणून रमाक्का आणि रंजना शांतादुर्गेला साकडे घालतात. अस्पृश्यांशी रोटीव्यवहार करणाऱ्या केशवला देवकृत्य करण्यास विरोध केला जातो. परंतु त्याचे सरकारी अधिकाऱ्यांशी संबंध असल्यामुळे त्याच्यावर बहिष्कार घालण्याचे धाडस समाज करीत नाही. विसूमामांना देखील मुलगी-जावयावर बहिष्कार घातला जाण्याची भीती वाटते. नात्यागोत्यापासून आपण

दुरावत आहोत हे कमलीच्या लक्षात येते. परंतु हरिजनांनाच ती गणगोत मानू लागते. केशवच्या कार्याशी ती एकनिष्ठ असते.

देवीचे देऊळ ज्या जागेवर बांधले आहे, मुळातील ती जागा महारांची असते. देवीनेच ती पसंत केलेली असते. परंतु महारांच्या स्पर्शाने देऊळ विटाळते म्हणून अर्चाशुद्धी करण्याची परंपरा गोव्यात आहे. यातून समाजात कर्मठपणाच दिसतो. देवीची पालखी जुने संकेत मोडून महारवाड्याकडे पालखी नेतात. भक्तिभावाने ते पूजा करुन दर्शन घेतात. अस्पृश्यता-शिवाशिव-श्रेष्ठकनिष्ठभाव समाजात खोलवर रुजला होता. एवढेच नव्हे तर मागासवर्गीय लोक देखील भाविणीला आपल्यापेक्षा कनिष्ठ समजतात. शेवंती हरिजन वस्तीतील मुलांची शाळा सुरू करते. कोकणीभाषतून त्यांना शिकविते, मुले शाळेत येतात परंतु तिच्या हातचे काही खात नाहीत. ती महारवाड्यात आणि देवळात अशी दोन्हीकडे जाते. यासंबंधी गावभर बोलबाला होतो. देवळातील भटजी तिला असे स्पष्ट विचारतो. तेव्हा ती उत्तरते, "येते ती चांगली न्हाऊन धुवून धूतवस्त्रांत येते. बाकी गंगेला आणि भाविणीला कसलाच विटाळ नसतो ना? भाविणीच्या घरुन आलेल्याला देवीच्या गाभाऱ्यात काही मज्जाव नसतो." (पृ.८६) या उत्तरातून तिचा संतापही व्यक्त होतो.

सामाजिक प्रतिष्ठेला धका लागू नये, बेअब्रू होऊ नये म्हणून प्रयत्न करण्याची समाज परंपरा आहे. हृषीचे डोके बिघडले हृषीने शेवंता भाविणीचा ध्यास घेतला ही गोष्ट गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट बाहेर फुटू नये म्हणून सर्वजण काळजी घेत होते. तसेच फुलवंती-विसूबाबा संबंध जगजाहीर होण्यापूर्वी विसूबाबाला रवळूदादा समज देतात. तसे न केल्यास रमाक्का माहेरला कधीही येणार नाही असे सांगतात. पुरुषप्रधान हिंदुसंस्कृतीत स्त्रियांचे स्थान अगदी नगण्य आहे. पोटातली व्यथा आणि घरातली कथा त्यांना कुणाला सांगता येत नाही. हृषीने शेवंताला पहिल्यापासून तिच्या ध्यासाने तो वेडा झाला. रवळूदादा आणि हृषीचे भांडण झाल्यापासून त्याने घरात सर्वांशी बोलणे बंद केले. त्यामुळे रमाक्काला तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्याची वेळ आली. हृषीच्या वेडाची पुसटची कल्पना रंजनेला आली तर ती जिवाचं काही बरेवाईट करुन घेईल, गावभर बेअब्रू करतील असे चारही दिशांनी संकट 'आ' वासून आले आहे, असे ती केशवला सांगते. संकटातून मार्ग कसा काढायचा असे विचारते. स्त्री सहवासाने हृषी सुधारेल असे डॉक्टरांचे मत असल्याचे रंजनेस समजते. तेव्हा ती हृषीला सहवासाचे सुख देण्यास, लग्न करण्यास तयार असते. विवाहानंतर तो वेडा झाला असता तर टाकून देता आले असते का असे ती म्हणते, परंतु विसूबाबा आणि समाजापुढे तिचे काही चालत नाही. तिचा कोंडमारा होतो. ती बंडखोरी करु शकत नाही. समाजाला आणि शास्त्राला संमत नसलेली गोष्ट करायला विसूमामा तयार होत नाही. मुलीचे जाणूनबुजून वेड्याची लग्न लावले तर

समाज काय म्हणेल याची त्यांना भीती वाटते. म्हणून ते रंजना-ऋषीला ठेवायला रवळूदादा तयार होत नाही. त्यांना कुळधर्म, कुळपरंपरा, शाळीग्रामाची पूजा, चारित्र्याच्या कल्पना, शील-निष्ठा यामुळेच ते विरोध करतात. तसेच वेड्याला घरात घेण्याचा, त्याला शरीरसुख देण्याचा निर्णय शेवंतीने बदलावा असे फुलवंती सांगते. कारण युरोपियनांशी संबंध ठेवल्यामुळे जातकुळीतून त्या मायलेकी उठल्या. आता वेड्याशी व्यवहार केला तर सारा गाव कुचेष्टा करीत असे तिला वाटते. सामाजिक प्रतिष्ठा-जननिंदेच्या भीतीपोटी लोक अधिक सावध वागतात. समाजाच्या भ्याड, स्वार्थी, दांभिक आणि निर्दयपणाप्रमाणेच केरसुणीइतकी देखील भाविणीला समाज किंमत देत नाही. तिच्या सेवेची उपेक्षा आणि अवहेलना होते. विवाहिताने भाविणीशी शरीरसंबंध ठेवण समाजमान्य आहे. श्रीमंतांनी बाहेरख्यालीचं व्यसन आपल्या समाजात प्रतिष्ठेचे करुन ठेवले आहे. परंतु भाविणीशी लग्न करण्याचा एखाद्याने विचार केला तर त्याच्याकडे लोक तुच्छतेने-अनादराने पाहतात.

भाटकरांकडून गावडे, रेंदेऱ्यांचे शोषण केले जाते. रेंदऱ्याच्या कोकणी गीतातून सामाजिक विषमतेचे दर्शन घडविले आहे. गावड्यांचे शोषण थांबविण्यासाठी त्यांना साक्षर केले पाहिजे. हक्क-कर्तव्याची जाणीव करुन दिली पाहिजे असे गांधीवादी केशव म्हणतो, रेंदचे कोकणी गीत -

"कुणबी वोर्तोतांव गांवकार आमी गोंयचे...
तोरी असताना भाटकार दिताय फोडके
भाकरा! तांदूव तूर्वे भोरुन दोल्यात कोडे
मागोतां जाय ना जायच्याक ते कीडे" (पृ.१४७)
कुणबी वार्तोतांव उशार आमी आवरा
गिरेस्त जांवक पावले भाटकार आमच्या खुस्तार
भाटकार जेवतात मुठी मारुन पोटार
कुणबी आमी सोदांच उलले नोणार"(पृ. १४८)

गोव्यातील सरंजामशाही पद्धतीचे चित्र वरील कोकणी गीतातून काढले आहे. कुणबी गोव्याचे गावकर असूनही जमीनदार लोक त्यांना फटके मारतात. गावड्यांनी पिकलेल्या अन्नाच्या भाटकर कणग्या भरतात. त्यांचे किडे होऊ नयेत असे ते ईश्वराजवळ मागणे मागतात. कुणबी कामाला हुशार आहेत म्हणूनच त्यांच्या जिवावर भाटकार श्रीमंत होऊ शकले. परंतु ते पोटावर मुठी मारीत पोटभर जेवतात. कुणबी कायमचे अजाण-उपाशी आहेत. गरीब श्रीमंतामधील दरीचे हे वर्णन बोलके आहे. भावीण, ब्राह्मण, भाटकर अणि कुणब्यांचे लोकजीवन लेखकाने गोमंतकीय पार्श्वभूमीवर रेखाटले आहे. म्हणून 'भावीण' कादंबरी केवळ भावीण जातीचे जीवनचित्रण करणारी प्रादेशिक कादंबरी नाही तर गोमंतकीय जीवनचित्रण करणारी प्रादेशिक कादंबरी आहे.

दोन्हीचे बेमालूम रसायन साधले आहे. गोमंतक प्रदेशातील परंपरेने चालत आलेली देवदासी प्रथा व त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक नैतिक प्रश्नांचे दर्शन सामाजिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर रंगविले आहे.

समकालीन राजकीय परिस्थितीचा आणि चळवळींचा समाजजीवनावर कळतनकळत प्रभाव पडत असतो. ख्रिश्चनांचाा धर्मप्रसार, कोकणीला स्वतंत्र भाषेचा दर्जा मिळावा, मातृभाषेतून शिक्षण, म. गांधीचा प्रभाव यासारख्या विचारप्रवाह-चळवळींचा प्रभाव 'भावीण' कादंबरीतही जाणवतो. केशव आणि कमली हे म. गांधीच्या विचाराने प्रभावीत झाल्यामुळेच हरिजन वस्तीत शाळा चालविता. धनी आणि मालक असे हरिजनाने केशवला म्हणणे मान्य नाही. सर्व एका ईश्वराची लेकरं आहेत. समतेचा विचार स्वत:च्या आचरणातून केशव दाखवून देतो. शांतादुर्गेची (काचोळी) मिरवणूक हरिजन वस्तीतून नेऊन त्या भक्तांना पूजा करण्याची संधी द्यावी म्हणून तो प्रयत्न करतो. कर्मठ लोक पालखी महारवाड्यात नेण्यास विरोध करतात. तेव्हा अहिंसेच्या मार्गाने तो उपोषण करणार असे सर्वांना सुनावतो. सांतूबाबांनाही त्याच्याबद्दल आदर वाटतो. विनाकारण केशवचे प्राण जाऊ नये म्हणून पालखी महारवाड्यात नेली जाते. भक्त तिची पूजा करुन दर्शन घेतात, हा सत्य-अहिंसा-समतेचा विजय लेखकाने दाखविला आहे. व्यसनमुक्ती किंवा मद्यपान विरोध हा विषयही लेखकाने समर्थपणे हाताळला आहे. महारांना व्यसनमुक्त केल्यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत आणि घरातील वादसंघर्षात फरक पडला. केशवने प्रवचने करुन लोकांना स्वच्छतेचे आणि व्यसनमुक्तीचे धडे दिले. कट्टर दारूबाजांना शपथ घ्यायला लावली. सरकारच्यामुक्त दारुपरवान्यामुळे जमीनदारांनी माड दारुनिर्मितीसाठी विकून नफा मिळविला. सरकार आणि जमीनदार यांचे संबंध सुधारले. परंतु मद्यपानविरोध चळवळ मोडकळीस आली. प्रार्थना आणि ईश्वरावरील श्रद्धा यांचे महत्त्व केशव सांगतो. हृषीचे वेड घालविण्यासाठी ईश्वराची प्रार्थना करा. श्रद्धा ठेवा असे केशव रमाक्काला सांगतो. मातृभाषेतून शिक्षण दिले तर मुलांना नवीन विषय लवकर आत्मसात करता येतात. कोकणीला स्वतंत्र भाषेचा दर्जा मिळावा. मातृभाषेतून गोव्यातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे. हृषीला मराठीतून पुस्तकलेखन करण्यास सांगतो. संत सोहिरोबा आंबिये यांची अभंगरचना महत्त्वपूर्ण असल्याचा अभिमान बाळगतो. पोर्तुगीजांचे धोरण, गांधीविचार आणि कोकणीला स्वतंत्र भाषा म्हणून मान्यता मिळावी, मद्यनिर्मिती मुक्तपरवाना, मद्यपानविरोधी चळवळ हे समकालीन राजकीय विषय कादंबरीची प्रादेशिकता दाखवून देण्यास पुरेसे आहेत.

गोमंतकातील मिश्रसंस्कृतीचे चित्रण लेखकाने केले आहे. एका बाजूला अतिशय कर्मठ, कुळधर्म विचार करणारे ब्राह्मण आणि दुसऱ्या बाजूला भाविणींची संस्कृती तर तिसऱ्या बाजूस ख्रिश्चन संस्कृती असा त्रिवेणीसंगम 'भावीण'मध्ये झालेला आहे.

गोव्यातील हिंदू समाजाचे शांतादुर्गा आणि शाळीग्राम ही कुलदैवते आहे. भावीण धर्माचे पालन करणारी एक स्वतंत्र सामाजिक संस्था आणि जात आहे. उच्चवर्गीयांची कामवासना तृप्ती करणाऱ्या भाविणींना देवीच्या देवळात मानाचे स्थान आहे. परंतु समाजात त्यांची अवहेलना, उपेक्षा होते. गोवेकरांच्या यात्रा-उत्सवप्रियतेचे आणि लोकसमजाचे वास्तव चित्रण करुन लेखकाने लोकजीवन साकार केले आहे. "टाकळ्यांनी कवाड झाकल्याशिवाय आमची जेवणं कधी होत नाहीत" असे अंताशेठ म्हणतो. (पृ.२१) तो सोवळेओवळे पाळतो. भाविणीच्या हातचे अन्न खात नाही. त्यांच्या घरात स्वत:च्या हाताने स्वयंपाक करुन जेवतो. यातून त्यांचा कर्मठपणा दिसतो. "ज्या मुलीवरुन देवीची प्रतिमा तयार केली जाते ती अकाली मरते किंवा तिचा सत्यानाश होतो." (पृ.२४) या लोकसमजाचा वापर केलेला दिसतो. देवाला कौल लावण्याची वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. सुवर्णालंकार अंगावर घातल्यावर वडीलधाऱ्यांना नमस्कार करण्याची सांस्कृतिक परंपरा आहे. 'वडील माणसांनी लहानाला नमस्कार केला तर त्याचं आयुष्य कमी होतं.' असाही लोकसमज आहे. हिंदुसंस्कृतीची संस्कार झालेली रंजना हृषीने चुंबन घेतल्यावर म्हणते, "पूजा होण्यापूर्वीच ती तुम्ही अशी उधळून लावाल असं वाटलं नव्हतं मला! मी माझ्या देवाची ही कल्पना केली नव्हती."(पृ.४९) यातून विवाहापूर्वी चुंबन-आलिगन अमान्य करणरी रंजनाची हिंदू संस्कृती तर मुक्तपणे चुंबन-आलिंगनास परवानगी देणारी खिश्चन संस्कृती वास्तव लेखक रेखाटतो. उच्चशिक्षण घेतलेल्या हृषीला विवाहापूर्वी चुंबन घेणे गैर वाटत नाही. अर्थात तो बंडखोर आहे.

भाविणीशी रोटी-बेटी व्यवहार करुनही स्वामींची प्रायश्चिताची आज्ञा तो मानत नाही. त्यामुळे रवळूदादा व्यथित होतात. देवघरात नारळ उखळासून ठेवणे, दोनप्रहरी नांदत्या घराला अंगार लावणं, काही बऱ्याचं लक्षण नाही, ब्राह्मणानं आपला प्रमाद काही काळ मोठ्यानं जगाला पुकारुन सांगावा म्हणजे तो पापमुक्त होतो, देवीच्या घुमटावरुन टाकलेला नारळ फुटला तर संकल्प सिद्धीस जातो. 'नवीनवस्त्र परीधान करण्यापूर्वी ते तुळशीला वाहाणे' इ. मधून गोवेकरांच्या श्रद्धा-समजुती आणि अंधश्रद्धांचे दर्शन घडते. देवीच्या पालखीचे स्वागत करण्याची गोमंतकीय लोकजीवन परंपरा प्रदेशविशिष्ट आहे. टाळ-मृदुंगाच्या आणि गाण्या-भजनाच्या स्वरसाथीवर पालखी संथपणे पुढे सरकते. पालखीत दांडीला रेशमी गोंडे बांधतात. मेणवाती लावतात. म्हालदार काठी घेऊन पुढे चालतो. शिष्टसज्जन पालखीत नाणी टाकतात, चवऱ्या ढाळतात, पुढे कलावंतिणीचा मेळ, वाजंत्र्यांचा ताफा, भजनाची दिंडी, भक्तजन पेणी करीत पुढे जातात. अंगणात सडा टाकून तेवत्या समया आणि रहाट दिवे ठेवले जातात. पालखी तेथे थांबते, लोक पूजा-अहेर करुन देवीला ओवाळणी टाकतात.

पेणी होऊन कलावंतीण झुलवा किंवा हिंदुस्तानी चीज गाते. (पृ. ५३) याप्रमाणे देवीच्या देवळाजवळ वाजतगाजत मिरवणूक येते. गावड्यांची संस्कृती खास गोमंतकीय आहे. रेंदेर दारु-माडी विकतात. परंतु दढले-गावडे दारुला दिलेल्या माडाच्या सावलीलादेखील उभे राहत नाहीत, आणि दारुचा थेंब अंगावर उसळला तर सचैल स्नान करतात.'' (पृ.९२) यामुळेच त्यांच्यात धर्म राहिला असे रवळूदादांना वाटते. श्रद्धा-लोकसमज, सण-उत्सव, यातून संस्कृती घडत असते. भावीण आणि अन्य हिंदू गोवेकर यांच्या सांस्कृतिक लोकजीवनाचे प्रदेशविशिष्ट वास्तवचित्र लेखकाने रेखाटले आहे. त्यामुळे कादंबरीत दुहेरी प्रादेशिकतेचे (गोव्याची प्रदेश परंपरा आणि भाविणीची परंपरा) दर्शन घडते.

कादंबरीचे निवेदन आणि संवाद प्रमाणभाषेत आले आहेत. ते बोलीभाषेत नसल्याने प्रादेशिकता शबलित होत नाही. प्रदेशविशिष्ट बोलीभाषेतील काही शब्दांचा वापर करुन लेखकाने वातावरणनिर्मिती केली आहे. जसे, रेंदेर, खोती, गावडा, साकव, पिळगी, रापुर, मॅडोलिन, अटाप, रायस, माचिल, पेणी, कमविसदार, घडावलं, आगवण, शिरण्या, काचोळी, महाजनांची, आज्ञा, बोलेती, घाडी लोलावणे इ. कोकणी लोकगीत (पृ.३९), सोहिरा आंबिये यांचे अभंग (पृ.५८, ११६-२२७), शेवंतीचे गीत (पृ. २०६), हृषीची कविता (पृ.१३१, १३९) इ. मधून गोव्याच्या भाषेचे आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडविले आहे. त्याचप्रमाणे म्हणी वाक्प्रचार आणि उपमा-प्रतिमांतून समाजवास्तवाचे दर्शन घडविले आहे. जसे, ''भाविणीचा कासोटा', 'पाचामुखी परमेश्वर', 'चोराच्या मनात चांदणे', 'येरे माझ्या मागल्या', 'सुंभ जळला तरी पीळ सोडत नसतो', 'दान देणारा विसरुन जातो, घेणाऱ्याला विसरुन कसं चालेल?', 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार', 'पोटातली व्यथा आणि घरातली कथा मुखावाटे काढणं महाकठीण', 'सुंठीवाचून खोकला गेला', 'बाप करतो पाप आणि मुलं देतात जाप' वरील म्हणी-वाक्प्रचाराप्रमाणे लोकजीवनाचे दर्शन घडविणाऱ्या उपमा-प्रतिमा आहे, ''(रमाक्काने) झाडाचे पहिले वहिले फळ कौतुकाने धरावे तसे तिचे मुखमंडल दोन्ही हातात धरले', 'वाळवंटात पडलेल्या जित्या मासळीप्रमाणे त्याच्या मनाची तळमळ चालली होती', 'पावसाने भिजलेल्या पक्व जांभळाप्रमाणे तिचे गाली रसरसू लागले', 'जिव्या सुपारीचा विडा जिव्हारी झोंबावा त्याप्रमाणे त्याची गत झाली होती', 'कानशिलात धोंडा बसल्याप्रमाणे हृषी तेथल्या तेथे स्तंभित झाला', 'वावटळीतल्या पानाप्रमाणे गेनू या प्रश्नांनी कापू लागला, भूकंपामुळे उद्ध्वस्त झालेल्या सुंदर शहराप्रमाणे हृषीच्या मनाची स्थिती झाली', 'खाडीचे यौवन लाटालाटातून फुटत होते' 'माडांच्या झुलत्या झावळामुळे चांदणे पाण्यासारो हेलकावत होतं', 'फुलवती पाण्यानं जखमी झाली' इ. आचार्य

काकासाहेब कालेलकर यांनी 'भावीण' संदर्भात लिहिलेला अभिप्राय (पत्र) अतिशय बोलका आहे. अनेक गुणदोषांसंबंधी त्यांनी विस्तृत विवेचन केले आहे. ते लिहितात, "...तुम्ही एक उच्च कोटीची कादंबरी लिहिली आहे यात शंका नाही. कलेच्या दृष्टीने रचना सुंदर आहे. गोव्यातील भावीण संस्थेविषयी जितकी माहिती आवश्यक आहे, ती सर्व पुस्तकात येऊन जाते. गोव्यातल्या समाजाची मनोवृत्ती याबाबतीत कसा विचार करते हेही तुम्ही चांगले व्यक्त केले आहे. तुमच्या मराठीत प्रादेशिक वातावरण आणण्यासाठी तुम्ही स्थानिक शब्द वापरले आहे, तेही आवश्यकतेहून अधिक नाहीत. मधूनमधून एखाद्या संस्कृत किंवा मराठी शब्दाचा अर्थ बरोबर नसल्यामुळे ठेचाळल्यासारखे होते, पण गोष्टीचा प्रवाह इतका वेगवान आहे की, या शब्दाकडे गेलेले ध्यान चटकन परत येते आणि गोष्टीबरोबर धावू लागते."२५. आचार्य कालेलकरांनी 'भावीण' कादंबरीच्या भाषेबद्दल समाधान व्यक्त केले आहे. 'कहाणीची कहाणी' लिहिताना लेखकाने 'भावीण' स्वानुभवातून जन्मल्याचे सांगितले आहे. ते शेवटी म्हणतात, " 'भावीण' मधल्या ज्वालाविलासाने माझ्या एका खोल मनोव्यथेला कृतार्थता मिळाली एवढे मात्र खरे."२६. अ. ना. देशपांडे यांनी कादंबरीच्या रचनेसंबंधी असमाधान व्यक्त केले असले तरी, "शेवंती भाविणीची ही एक हृदयस्पर्शी आणि करुणोदात्त व भावनांचे उन्नयन यावर स्थिर झालेले आहे."२९. तर डॉ. अ. रा. तोरो 'भावीण'चे कथानक, व्यक्तिचित्रण, निसर्गवर्णन व भाषाशैली या सर्वांमधून एकच प्रादेशिक प्रवाह वाहताना दिसतो हे मान्य करुन "...समाजजागृतीचे साधन म्हणून बोरकर 'भावीणी'च्या प्रश्नाकडे पाहतात. म्हणून ही कादंबरी एका जटिल सामाजिक प्रथेचे दुष्परिणाम दर्शविण्यासाठी सिद्ध झाली आहे... गांधीवादी विचाराने प्रेरीत होऊन कादंबरी लेखनाकडे वळलेल्या लेखकात म्हणूनच बोरकरांचा समावेश करावा लागतो. प्रचाराची व समाज जीवनाची चर्चा गौण मानून ती कथा बोरकर लिहिते तर मराठी कादंबरीने पुढे १९५२-५४ साली जी प्रादेशिक रुपे पेंडश्यांच्यामुळे पाहिली ती 'भावीण'मध्येच पाहावायास मिळाली असती."२९. प्रा. ल. ग. जोग यांना "भाविणीचे जीवन आणि कोकणी ही भाषा आहे या दोन तत्त्वामुळे 'भावीण' प्रादेशिक वाटते."३०. उमाशंकर जोशी यांनी "मानवहृदयाची कथा" असा 'भाविण'चा गौरव केला आहे.३१.

सारांश, अनेक अभ्यासक-समीक्षकांनी 'भावीण'च्या रचनेबद्दल असमाधान व्यक्त केले असले तरी प्रादेशिकत्व नाकारलेले नाही. या कादंबरीतून दुहेरी प्रादेशिकता जाणवते. (१) 'भावीण' या सामाजिक संस्थेशी निगडित प्रादेशिकता, (२) गोव्यातील लोकजीवन वास्तवातील प्रादेशिकता. भावीण आणि समाजजीवन हे धागे एकत्र गुंफून गोव्याच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीवरील लोकजीवन साकार करुन प्रादेशिक कांदबरी निर्मितीच्या शक्यता निर्माण केल्या.

## (५) श्री. ना. पेंडसे

'एल्गार' (१९४९), 'हद्दपार' (१९५०), 'गारंबीचा बापू' (१९५२), 'हत्या' (१९५४), 'यशोदा', 'कलंदर' (१९५९), 'रथचक्र' (१९६२), 'लव्हाळी' (१९६६), 'ऑक्टोपस' (१९७२), 'आकांत', 'तुंबाडचे खोत' (१९८७) भाग एक आणि भाग दोन, आणि 'गारंबीची राधा' असे पेंडशांचे कादंबरीविश्व आहे. उत्तर रत्नागिरी जिल्ह्यातील साखरपेंडी (आजर्ले), दुर्गेश्वर (मुरुड), गारंबी (आसूद), दापोली, मुर्डी, हर्णे, जगबुडी नदी इ. प्रदेश आणि तेथील निसर्गाचा मानवी जीवनावरील प्रभाव लेखकोन कादंबरी विश्वात रेखाटला आहे. पहिल्या तीन कादंबऱ्यांना आत्मानुभवाचा स्पर्श झाला आहे.

'एल्गार' (१९४९) मध्ये उत्तर कोकणच्या पार्श्वभूमीवर हिंदू-मुस्लीम संघर्षाचे चित्र त्यांनी रेखाटले आहे. तर **'हद्दपार'** (१९५०) या दुसऱ्या कादंबरीत कोकणच्या पार्श्वभूमीवर पोकळ व अर्थशून्य प्रतिष्ठांचा बडेजाव झुगारणारा राजेमास्तर जिवंत केला आहे. राजेमास्तरचे जीवनचित्रण करीत असताना समकालीन समाजवास्तवाचे धूसर चित्रणही केले आहे. कादंबरीच्या कथानकातून आणि व्यक्तिचित्रणातून लेखक जीवनदर्शनच घडवित असतो, राजेमास्तरांचा बंडखोरपणा रेखाटताना समकालीन परिस्थितीवर अपरिहार्यपणे प्रकाश पडतो.

हबसाण प्रांतात वास्तव्य करुन असलेले कायस्थ कोरडे घराणे घाटाखाली येऊन दुर्गेश्वरला स्थायिक झाले. बंडो आबाजी कोरड्यांनी पिसाळलेल्या वाघाला कोयतीने ठार मारले. या पराक्रमी कोरड्यांचा 'तुम्ही राजे शोभता' असा पेशव्यांनी गौरव केला. वाघ मारलेल्या ठिकाणी वाडा बांधून दिला. कोरडे राजे म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढच्या पिढ्यांनी 'कोयती'ची अभिमानाने देव्हाऱ्यात ठेवून पूजा केली. तरीही दुर्गेश्वरातील ब्राह्मण या घराचा उल्लेख 'परभाचं घर' म्हणून करीत होते. क्षत्रियवृत्तीचा अभाव असलेल्या विश्वनाथचा या घरात जन्म झाला. त्यांच्या वडिलांनी (भाईंनी) कुंडली पाहून मुलगा नोकरी करणार, इनामदार घराण्याची प्रतिष्ठा घालविणार आणि त्याला पुत्रसंतान होणार नाही, राजे घराणे निर्वंश होणार असे भाकीत केले. विश्वनाथ कुणब्यांच्या मुलांमध्ये खेळू लागला. कोयतीबद्दल पूर्वजांबद्दल भाई अभिमानाने बोलत असताना तो निर्विकारपणे उभा राहू लागला. तेव्हा भविष्य खरे ठारणार असे भाईंना वाटू लागले.

दुर्गेश्वराच्या शाळेत मास्तरची नोकरी धरुन विश्वनाथने इनामदारी परंपरेला पहिली ठोकर मारली. तो मुलांमध्ये रमू लागला. कुणब्यांशी जवळीक वाढली, 'यत्ता' सोडू नको असा सल्ला भाईंनी दिला, त्याचा फारसा उपयोग झाला. मुलाच्या वर्तनामुळे समाजात अप्रतिष्ठा झाली म्हणून भाईंनी कोयती छातीशी धरुन विहिरीत जीव दिला.

पूर्वजांच्या पराक्रमांबद्दल आणि 'कोयती'बद्दल अभिमान बाळगणाऱ्या भाईंवर

कर्जही तेवढेच मोठे होते. सर्वांचे देणे दिल्यानंतर फक्त वाडा शिल्लक राहिला. भाईंच्या श्राद्धासाठी मास्तारांना कर्ज काढावे लागले. काटकसरीने संसार करीत मास्तर शाळेतील मुलांमध्ये रमले. पदरमोड करुन, बायकोची नाराजी पत्करुन मुलांच्या सहली काढू लागले. 'भैरीबोवाची पालखी' असे उपहासाने लोक बोलू लागले. मास्तरने 'स्वाभिमानाचे' नवे धडे मुलांना गिरवायला लावले. मुलांशी अधिक समरस होता यावे आणि पत्नीच्या इच्छेखतर मास्तर कर्ज काढून पुण्याला ट्रेनिंगसाठी गेले. काटकसर करुन कर्ज फेडले.

नानूच्या जन्म झाला. भाईचे भाकीत खोटे ठरले. मास्तरांना भाईंची आठवण होऊ लागली. 'आपली कोयती आता बाहेर काढावी' असा मास्तरच्या पत्नीने हट्ट धरला. सर्व वैभव परत येणार, शाप टळला असे त्यांना वाटू लागले. बुद्धिवादी मास्तरांना कोयती पोकळ बडेजाव प्रतिक वाटत होते. 'कोयती वर काढणं म्हणजे एका दुष्ट परंपरेला वर काढणं होय' असे मास्तरांना वाटत होते. तर कोयतीची विधीपूर्वक प्राणप्रतिष्ठा करणे आईंना अत्यावश्यक वाटत होते. त्यामुळे पतीपत्नीमध्ये ताण निर्माण झाला. मास्तरने नानूच्या मंदबुद्धीवर नाराजी व्यक्त करणे मातृहृदयाला पटेनासे झाले. त्यामुळे संघर्ष अधिक वाढला.

काटकसर करुन नानूची आठव्या दिवशीची मुंज केली. भिक्षावळीचे आठशे रुपये आणि अनेक वस्तू आल्या. मास्तरांनी निर्माण केलेल्या जगाचे दर्शन दुर्गेश्वराला घडले. दुर्दैवाने क्षयरोगाने नानूचा मृत्यू झाला. वाडा निर्वंश होणार हे भाईचे भाकीत खरे ठरले. सर्वांचे भले चिंतणारे मास्तर नानूच्या मृत्यूने बेचैन झाले. कोयतीची प्राणप्रतिष्ठा न केल्यानेच नानूचा मृत्यु झाला असे आईंना वाटू लागले. आई आणि मास्तरचा संघर्ष होऊ लागला. दोघांनाही कोयती दिसू लागली. परंतु मास्तरांनी खोट्या प्रतिष्ठेची पूजा न करण्याचा निर्णय घेतला. गावात ब्राह्मण आणि कुणब्यांमध्ये शेरणे प्रकरणात तटस्थपणे साक्ष दिली. 'मोडेल पण वाकणार नाही' यावृत्तीच्या मास्तरांनी शाळातपासणी करणाऱ्या साहेबांचा उद्धटपणा सहन केला नाही. उलट राजीनामा देऊन स्वाभिमानाचा आदर्श विद्यार्थ्यांना घालून दिला. माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी मास्तरांची एकसष्टी साजरी करुन त्यांना थैली भेट दिली. असे कादंबरीचे विसकळीत कथानक आहे. मास्तरांच्या जीवनातील आठवणी घटनानुक्रमे न सांगता जशा आठवतील तशा सांगितल्या आहेत.

कादंबरीचा नायक राजेमास्तरच आहे. सर्व घटनाप्रसंग आठवणी राजेमास्तरांच्या जीवनाशी निगडित आहेत. राजेमास्तरांची व्यक्तिरेखा प्रत्यक्षातील 'दामले मास्तराहून सुचली आणि अनेक प्रसंग देखील वास्तवातील आहेत असे स्वत: लेखकाने सांगितले आहे.३२. उण्यापुऱ्या पाच फुट उंचीचा हा कृश आदमी सामर्थ्यवान आहे, असे मास्तरचे लेखक कादंबरीत वर्णन करतो. मास्तर बंडखोर आहे. दवणेप्रभूच्या मुलीशी

लग्न करण्यातून त्यांचा हा गुण दिसतो. मुलांवर उत्कट प्रेमकरण्यातून त्यांचा प्रेमळपणा दिसतो. तर 'कोयती' खोट्या प्रतिष्ठेचे प्रतीक आहे असे मानण्यातून, तसेच राजीनामा प्रकरणतून त्यांचा करारी, हट्टी आणि बुद्धिवादी, पिळदार अहंकारपूर्ण ताठा दिसतो. कुणबी, ब्राह्मणामधील शेरणेप्रकरणात प्रलोभनाला बळी न पडता सत्य साक्ष देण्यातून सचोटी, न्यायप्रियता आणि बाणेदारपणा दिसतो, त्यांचा मुखदुर्बळपणा, एककल्ली आणि तत्त्वनिष्ठवृत्ती लेखक अनेक प्रसंगातून रेखाटतो. सामान्य बुद्धिमत्ता असलेला स्वाभिमानी वृत्तीची शिकवण देणारा राजेमास्तर लेखकाने जिवंत केला आहे. बंडो आबाजीबद्दल अभिमान असूनही त्यांच्या वारसांचा नाकर्तेपणाकडे मास्तरांचे दुर्लक्ष होत नाही. पूर्वजांना अभिमान वाटावा असेच ते वर्तन करतात.

'लक्ष्मी' ही दवणेप्रभू घराण्यातील विनयी, कामसू, सुस्वरूप, सुस्वभावी आणि प्रेमळ स्त्री आहे. सासऱ्याच्या रोषास कारण ठरलेली असूनही राजेघराण्याबद्दल तिला अभिमान वाटतो. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचे तिच्यात सामर्थ्य आहे. मास्तरांपेक्षा ती अधिक व्यवहारी आहे. नानू हा तिचा मुलगा, वंशाचा दिवा अल्पकाळात विझल्यामुळे ती बदलते. शाळेतील मुलांचा आणि मास्तरांचा तिरस्कार करते.

भाई हे राजे घराण्यातील कायेतीबद्दलचा अभिमान बाळगणारे रेखाटले आहेत. खोट्या प्रतिष्ठेसाठी आणि इनामदारी वैभवासाठी त्यांना कर्जाचा डोंगर उभा केला. मुलाचे भविष्य वर्तविले. मुलाच्या वर्तनामुळे समाजात अप्रतिष्ठा झाली म्हणून छातीशी 'कोयती' कवटाळून विहिरीत जीव देतात.

नाना शिंत्रे हे मास्तरांचे हितचिंतक मित्र आहे. राजे घराण्याचे ते राजवैद्य आहेत. ऐसपैस श्रीमंती असलेले त्यांचे खानदानी घराणे आहे. त्यांच्यामुळे क्षुद्रपणाला स्थान नाही. निवडक, रसिक माणसांचे त्याचा अजिबात संबंध नव्हता. सहलप्रकरण किंवा साहेब मास्तर संघर्ष, मास्तरांची बदली याप्रसंगी ते न्यायाची बाजू घेतात. त्यांच्या उलट स्वभावाचा स्वार्थी, मतलबी, ढोंगी सोन्याबापू आखवे लेखकाने रेखाटला आहे. कुणब्यांमध्ये मिसळणारा, त्यांच्यासारखे वागणारा, वेळप्रसंगी मदत करणारा खलनायक आहे. लेखक वर्णन करतो, "त्यांचे अंदाज अचूक युत्त्या बिनतोड, धोरण पाताळयंत्री, भाषा मायावी, बघणं काणं, वागणं चकणं, बघतील, वागतील त्यावरुन अंदाज बांधले तर हमखास चुकायचे! लोक त्यांना जसे, 'आपले, आपले' करीत, तसेच मनातून टकटकतही." (पृ.४३) गावातील प्रत्येक भानगडीच्या मागे सोन्याबापू असतो. मास्तरांचे सहलप्रकरण, बदलीप्रकरण, निर्मलला हद्दपार करणे, शेरणेप्रकरण या सर्वांमध्ये हात असूनही सर्वांपासून दूर असणारा लबाड आहे.

निर्मल हा मास्तरांचा विद्यार्थी आहे. बेडर, निधडा, स्वाभिमानी, कुणब्यांना संघटित करणारा, त्यांच्या हक्काची त्यांना जाणीव करुन देणारा बेफिकीर तरुण आहे. सोन्याबापू निर्मळ यांच्यातील संघर्षातून शोषक आणि शोषित यांच्यातला

विरोध पेंडशांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून शब्दबद्ध केला आहे. सोन्याबापूने कारस्थान केले तरी मास्तर सत्य साक्ष देतील यावर त्याचा विश्वास आहे. मास्तर त्याला लग्न करुन संसार करण्याचा उपदेश करतात. तर सोन्याबापूची शेरणे प्रकरणात नामुष्की झाली म्हणून तो सरकारदरबारी वजन खर्च करुन निर्मलला हद्दपार करतो.

म्हांबरी ही अतिशय प्रेमळ, कष्टाळू स्त्री आहे. राजवाड्याचा ती अविच्छिन्न भाग आहे. वाड्याबद्दल तिला अभिमान आहे. लेखक तिचे 'बरोंटी-दुर्गेश्वरातील टपाल' असे वर्णन करतो. म्हांबऱ्या हा माडी पिऊन तर्रर होणारा तिचा लहरी नवरा. तर शाळा सोडून शिंत्र्याकडे कामाला जाणारा सदू हा मुलगा आहे.

बुरोंडी, दुर्गेश्वरातील मास्तरांचे विद्यार्थी, कुणबी, ब्राह्मण तसेच अन्य गौण व्यक्तिरेखांचे चित्रण करुन लेखकाने समूहजीवनाचे दर्शन घडविले आहे.

बुरोंडी-दुर्गेश्वर (मुरुड), दापोली, हर्णेचा दीपस्तंभ, करवंद्याचा कातळ, बुरोंडीची खाडी, भैरीची कोंडी, कासारखले या अरबी समुद्रालगतच्या कोकण प्रदेशातील लोकजीवनदर्शन लेखकाने घडविले आहे. पेंडशांच्या कादंबरीतली निसर्ग सौंदर्याची वर्णने भौगोलिक स्वरुपाची आणि माहितीपर वाटतात.३३. हा समीक्षकांचा आक्षेप स्वत: पेंडशांनी मान्य केला आहे. निसर्ग एक जिवंत पात्र म्हणून अवतरला आहे असेच वाटते. केशवराजाच्या सुपारी बागेचे वर्णन हे असे अपरिहार्यतेतून आले आहे. जसे, (प्र. ३८)

मास्तर आणि निर्मल डॉ. पिकल्यांना घेण्यासाठी तांबडीचा कोंड चढतात. म्हसोबाची घाटी चढताना मास्तरांना धाप लागते, हे कोकणातील चढउतार मानवीजीवनावर परिणाम करतात. किंवा बंदरातील ओंडक्यामुळे काश्या जखमी होते. यातून निघृण, रौद्र निसर्गाचे दर्शन घडते. आगारातील पोफही, माड, रामफळ, सीताफळ, कोकंब, तगरीची झाडं, जास्वंद आणि आनंद प्रदेशविशिष्टता सूचित करतात.

व्यक्तिचित्रण आणि कथानकाच्या द्वारा कादंबरीकार जीवनदर्शन घडवित असतो. मास्तरांचा रुढीबाह्य विवाह भाईप्रमाण ग्रामस्थांनी पसंत पडत. नाही. घाणेकरांचे हॉटेल, दुर्गेश्वराच्या पारावर या विवाहाची चर्चा होते. धर्मबाह्य विवाहाला गोड फळ येणार नाही. राजे घराणे निर्वंश होईल असे भाईंना वाटते. सामाजिक प्रतिष्ठेच्या कल्पनेमुळे ते खाली मान घालून देवदर्शनाला जातात. अप्रतिष्ठा टाळण्यासाठीच कोयती छातीशी धरुन विहिरीत जीव देतात. बुरोंडी-दुर्गेश्वर लक्ष्मीला पांढऱ्या पायाची म्हणतात, तिच्या हळदीकुंकवावर ब्राह्मणस्त्रिया बहिष्कार टाकतात. जातिभेदाचे प्रस्थ, लोकजीवनामध्ये असलेले दिसते. राजे घराण्याचा उल्लेख ब्राह्मण लोक 'परभाचं घर' असा करतात. दवणे प्रभूच्या घरातील मुलीशी मास्तराचे लग्न होणे भाईंना पसंत नसते. मुलाने कुणब्याच्या घरी जाणे त्यांना पसंत नसते. 'यत्ता सोडू नको' असे ते मास्तरला सांगतात. इनामदार घराण्याच्या वैभवाची पडझड लेखक रेखाटतो. नोकरी

करणे कमीपणाचे समजले जात होते...'' आजवरचा राजे म्हणत आला. त्या भव्य वाड्याच्या भिंती खपल्या पडून दिसेंदिवस विद्रूप होत होत्या. दिल्लीदरवाजावरचं नक्षीकाम कालघणानं हळूहळू बुजत होतं. लांब-रुंद गोठा ओस पडत होता. तुफान घेड्यांची राजेवाड्यांची पागा तर आता इतिहासजमा झाली होती. ऐतिहासिक होत चालल्याने वैभवाचे हे फुटकेतुटके अवशेष उराशी घट्ट धरुन आजवरचा राजे जगत आला. कायस्थी बाणा अशाही परिस्थितीत तग धरुन होता.'' (पृ.३) समकालजीन परिस्थितीतील इनामदारांची 'बडा घर पोकळ वासा' अशी स्थिती झाली.

समाजाचा तऱ्हेवाईकपणा लेखक सांगतो. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न मास्तर करु लागले. अधिक उत्पन्न मिळवू लागले. तेव्हा लोक म्हणतात, ''राजेवाड्याची इनामदारी संपली! आता बाजार भरु लागला तिथं.'' (पृ.१७) म्हणजेच राजवाड्याच्या मालकीच्या वस्तू फुकट मिळण्याचे बंद झाल्यामुळे लोक असे बोलतात. मास्तरांच्या लोलिकोत्सवाची टवाळी करतात. मास्तरने मुलांना सहलीला घेऊन जाणे बावळटपणाचे वाटते. मुलांनी चर्चमध्ये जाणे, गॅडनीच्या हातचे दूध पिणे या गोष्टींचा गावभर बभ्रा होतो. मास्तर आणि मुले बरोबर शाळेत जातात, तेव्हा 'भैरीबोवाची पालखी' म्हणून लोक त्यांची थट्टा करतात.

समुद्रातील ओंडका बाहेर काढणे, त्याच्यावर मालकी सांगणे, त्यासाठी भाडण-वाद करणे हे खास कोकणी लोकजीवनाचे प्रादेशिक वैशिष्ट्य आहे. देशावरील लोकजीवनात असले प्रकार घडू शकत नाही. कोकणी, माणसाचा काटकसरी स्वभाव, चिक्कूपणा, घाणेकरांच्या निमित्ताने लेखक स्पष्ट करतो. कोकंबचे पन्हे देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्याची परंपरा प्रदेशविशिष्ट आहे. मास्तरांची एकसष्टी साजरी करण्यातून कोकणी माणसाची उत्सवप्रियता आणि कृतज्ञतावृत्तीचे दर्शन घडते.

कुणब्याच्या भित्र्या आणि गरीब स्वभावाचे दर्शनही लेखकाने घडविले आहे. देशावरील माणूस मारामारी करील, खून करील, लाचारी पत्करणार नाही. पण लेखक वर्णन करतो, ''आमचा कुणबी जितका गरीब तितकाच भित्रा. प्रसंगी आपापसात मारामारी करील, पण सरकार आणि कायदा म्हटलं म्हणजे त्याचा अवतार संपतो. काही बोलायला तयारच होणार नाही. लागेल ती लाचारी पत्करील. अन्याय सहन करील.'' (पृ.११७) पण अशा कुणब्यांमध्ये निर्मल नवचैतन्य निर्माण करतो. संप करायला लावतो. परंतु संप मोडून ते रोजगाराला जाऊ लागतात. अल्पमजुरीवर समाधान मानतात. परंतु भैरीचा मान देवीचे कार्य म्हटल्यावर आणि निर्मलने चिथावणी दिल्यावर रक्त सांडायला कुणबी तयार झाले. देवादिकांसाठी कोर्टकचेऱ्या करण्याची कुणब्यांची वृत्ती. पोटासाठी लाचारी पत्करणारे कुणबी देवकार्यासाठी लाचारी पत्करत नाहीत.

शेरणे प्रकरणात मास्तरने खोटी साक्ष द्यावी म्हणून न्यायप्रिय मास्तरांना विकत

घेण्याचा विचार सोन्याबापू करतो. पैशाने सर्व विकत घेता येते असा त्याचा विश्वास मास्तर खोटा ठरवितात. उलट मास्तरांबद्दल निर्मलला विश्वास असतो म्हणून तो मास्तरांची भेट घेत नाही. मास्तरांच्यासाक्षीमुळे कुणब्याच्या बाजूने शेरणेप्रकरणाचा निकाल लागतो. मास्तरांच्या बदलीची बातमी दोन्ही कोंडीवर समजल्यानंतर सर्व कुणबी हळहळतात. बदली प्रकरणामागे सोन्याबापूचा हात असल्याचे सर्वांना स्पष्ट दिसू लागते. निर्मल स्पष्टपणे सोन्याबापूचे नाव घेतो. विजयादशमीच्या दिवशी नोकरीचा राजीनामा देऊन ग्रामस्थांना मास्तर उपदेश करतात. या घटनाप्रसंगातून समूह मनाचे दर्शन घडते. मास्तरांच्या बदली निमित्ताने सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. 'हद्दपार' मधील सामाजिकतेच्या आविष्कारासंबंधी विवेचन करताना डॉ. द. ता. भोसले यांनी म्हटले आहे.,

"प्रादेशिकतेमध्ये सामूहिकता, प्रतिनिधिकता व सांस्कृतिक जीवन यालाही महत्त्वाचं स्थान असते. या तीन बाबीशिवाय साहित्यातील प्रादेशिकता पूर्ण स्वरुपात अवतीर्ण होत नाही... सांस्कृतिक जीवनाशिवाय आणि सामूहिक मनाच्या समान आचारविचारासाठी सामाजिकतेचा आविष्कार लेखकाला हा करावा लागतोच. पेंडशांच्या 'हद्दपार' कादंबरीत या गोष्टी उत्तम रीतीने व्यक्त झालेल्या आहेत. या कादंबरीत सामूहिक स्वरुपात साजरा केलेला गणेशोत्सव चित्रित झालेला आहे. दसऱ्याच्या सणनिमित्ताने लुटलेले सोने, त्या निमित्ताने राजे मास्तरांनी केलेला उपदेश, त्यांच्या त्यागपत्राने खवळून गेलेल्या दुर्गेश्वराच्या भावना, निर्मलाने सोन्याबापूविरुद्ध केलेली निदर्शने, राजे मास्तरांच्या त्यागपत्रामुळे दु:खीकष्टी झालेली परिसरातील माणसे, सागरकाठावर आलेल्या ओंडक्याखाली सापडलेल्या काशाच्या जखमी स्थितीकडे जमलेल्या लोकांच्या भावना, मास्तरांचा त्यांच्या शिष्यांनी केलेला जाहीर सत्कार इ. घटनांतून लेखकाने सांस्कृतिक जीवनाचा आणि सामूहिकतेचा चित्रमय आविष्कार केलेला असल्याने 'हद्दपार'ला प्रादेशिक कादंबरीचे स्वरुप प्राप्त झाले..."३४. डॉ. द. ता. भोसल्यांचा अभिप्राय सविस्तर घेण्याचे कारण एवढेच की सामाजिकतेच्या आविष्कारामुळे 'हद्दपार'ला प्रादेशिक कादंबरीचे रुप प्राप्त झाले. अन्यथा ती केवळ स्वाभिमानी मास्तरांचे जीवनदर्शन घडविणारी कादंबरी एवढेच स्वरुप तिला लाभले असते हे या अभिप्रायाने स्पष्ट होते.

कोकणी लोकजीवनातील मूलभूत संघर्ष हा आर्थिक आहे. कोकणातील कुणबी लोकांचे अज्ञान, दारिद्र्य, त्यांची लाचार मनोवृत्ती यांचे दर्शन लेखकाने घडविले आहे. निर्मल सारखा तरुण त्यांना हक्कांची जाणीव करुन देतो. संप घडवून आणतो. परंतु पोटाच्या प्रश्नामुळे लोक रोजगाराला जाऊ लागतात. संप बारगळतो. सहलीला जाणाऱ्या मुलांना मिष्टान्न देणे परवडणारे नसते, त्यांच्यापुढे रोजच्या भाकरीचा प्रश्न असतो. म्हणून प्रसंगी मास्तरांचाही त्यांना राग येतो. धनिकांकडून कुणब्यांचे शोषण

होणे, हावलदाराचे शेत म्हांबऱ्याकडून सोन्याबापूच्या पूर्वजांनी विकत घेणे, नाना जंगमाला सहा महिन्यासाठी सवाईने रक्कम देणे, मास्तरांना पस्तीस टक्के व्याजाने तीनशे रुपये कर्जाऊ देणे. यातून शोषिक-शोषित संबंध स्पष्ट होतात. आर्थिक परिस्थितीमुळेच शिक्षणाबद्दची अनास्था वाढलेली दिसते. जसे, म्हांबरी सदूला शाळेत पाठवायला तयार नसते. ती म्हणते, "...सिक्सांन करुन प्वाट कोणी भरायचा?" (पृ.३०)

राजाचे इनामदार घराणे आणि मास्तरांच्या दारिद्र्याचे चित्रणही लेखकाने केले आहे. खोट्या प्रतिष्ठेसाठी ऋण काढून सण, उत्सव करण्याची राजे घराण्याची परंपरा, भाईचे कर्जबाजारीपण लेखक वर्णन करतो. भाईचे सर्व कर्ज भरल्यानंतर मास्तराजवळ फक्त ऐतिहासिक वाडा शिल्लक उरला. भैरीबोवाच्या पालखीचा मान म्हणून पाच रुपये आणि दोन नारळ देताना मास्तरला अडचणीचे होते. स्वत:ला धोतर किंवा पत्नीला लुगडं ते घेऊ शकत नाहीत. मुलांच्या सहलीसाठी पदरमोड करणे त्यांना जड जाते. भाईंच्या श्राद्धासाठी कर्ज काढण्याची वेळ येते. 'बाजार'(मटण मासे आणणे) बंद करतो. पगार वाढावा म्हणून ट्रेंड होणे आवश्यक वाटते. ट्रेनिंगसाठी सोन्याबापूकडून तीनशे रुपये कर्ज काढावे लागते. एकुलत्या एका मुलाच्या मुंजीसाठी खर्च करण्यात अडचण येते. त्याला सकस अन्न देऊ शकत नाही. त्यामुळे त्याला क्षय होतो. तेव्हा हवाफेरीसाठी नानूला दापोलीला ठेवणे मास्तरांना परवडत नाही. या सर्व घटनाप्रसंगातून कोकणी माणसाच्या आर्थिक जीवनमानावर लेखकाने प्रकाश टाकला आहे.

१९०५ च्या सुमारास कोकणी लोकजीवनात शिक्षणामुळे परिवर्तन सुरू झाले. मुंबईहून नव्यानव्या चळवळीचे लोक येऊन लोकांच्या श्रद्धा-भावना बदलू लागल्या. लाचार, भेकड, अज्ञानी, कुणबी ब्राह्मणाशी दोन हात करु लागला. हे मान्य करुनही त्यांच्या सांस्कृतिक जीवनात मात्र परिवर्तन आले नाही. उलट या श्रद्धा-समजूती-समज अंधश्रद्धा आणि सणउत्सवांचे लोकजीवनात महत्त्व अधिक वाढले असे दिसते. कुंडली-गृहयोगावरील भाईच्या श्रद्धेतून पत्रिका-खानदान या गोष्टीचे महत्त्व त्यातून स्पष्ट दिसते. भैरीबोवाची पालखी हे कुणब्यांचे दैवत आहे. एकवीरा देवीच्या देव्हाऱ्यात राजे घराण्यात कोयतीची पूजा होत होती. तिचा अभिमान भाई बाळगतात. राजे घराण्यातील कोयतीची प्राणप्रतिष्ठा करावी असे लक्ष्मीला वाटते. मास्तरांना मात्र कोयती पोकळ बडेजावाचे प्रतीक वाटते.

भैरीबोवाची पालखी फाल्गुन महिन्यातील दुर्गेश्वरात येते. हवालदाराच्या शेतात सोन्याबापूने नारळ पुरायचा आणि नंतर पालखीने तो शोधून काढायचा. पालखी साऱ्या शेताडीत भिंगरीसारखी फिरते. तगडे कुणबी घामाघूम होतात. खुद्द भैरीबोवा जागृत होऊन पालखीला गती देतो. तास दोन तासांनी नारळ पुरल्याजागी पालखीचा

खूर जमिनीत शिरतो आणि शेरणे बाहेर येते. या लोकसमजातून लोकजीवन घडलेले दिसते. देवावरील श्रद्धेमुळेच लोक शेरणेप्रकरणावरुन मानपानासाठी कोर्टकचेऱ्या करतात.

मुंजेच्या वेळची भिक्षावळीची मिरवणूक प्रदेशविशिष्ट आहे. लेखक वर्णन करतो, "...पांढऱ्याशुभ्र घोड्यावर काटकोन, चौकोन नव्हते. त्या पुष्ट देहावर बसलेला मुंज्या मुलगा. त्याच्या कमरेला लटकावलेली समशेर, पुढ किटसन, माग किटसन, बाजूला किटसन, चांदणं रद्द होतं त्या दिवशी! हार, तुरे, फुलं उधळणं, खालू, ताशे, ढोलकी, शिंग, तरसाळी, झांजा, सनई- त्या मिरवणुकीनं दुर्गेश्वराला हलवलं." (पृ.८३) राजे मास्तरांच्या नानूच्या मुंलीच्या मिरवणुकीच्या निमित्ताने धार्मिक विधींवर प्रकाशझोत टाकला आहे.

आजारी माणसाच्या दुखण्याचे निदान करण्यासाठी भैरीबोवाला स्त्रहाण लावण्याची परंपरा लेखकाने शब्दबद्ध करुन लोकजीवनातील श्रद्धेचे दर्शन घडविले आहे. नानूचे दुखणे कोणत्याच औषधाने कमी होण्याचे चिन्ह दिसेना तेव्हा मास्तराचा होकार मिळताच म्हांबरी देवळात जाते. "गुरव तल्लीन होऊन स्त्रहाणेशी बसला. नेहमीच्या पद्धतीनं त्यानं गुंडगोळ्या दगडावर हात ठेवले आणि डोळे मिटून प्रार्थना सुरुवात केली... ह्या इनामदाराच्या मुलाला भायरची उपाधी हाय काय? त्यानं तो दगड झरकन स्त्रहाणेवरुन फिरवला, उचवलला आणि नकारार्थी मान हालवली. या खेपेला दगड उचलताना फुलासारखा हलका आला. अंगरोग! नानूला अंगरोगच होता. बाहेरची उपाधी असती तर नारळ, कोंबडी हे लचांड मागं लागतं..." (पृ. १२२) लोकजीवनात अशा प्रकारच्या चमत्कारिक श्रद्धा आहेत.

एकवीरा देवी आणि भाद्रपदातील गणेशोत्सव यावरुन राजांचे वैभव ठरविले जाते. भैरीबोवाच्या पालखीला राजे वार्षिक पाचरुपये आणि नारळांची जोडी देत असत. तो त्यांचा खास मान होता. हा शेरणे पुरण्याचा मान सोन्याबापूकडे होता. यातनू मान-सन्मान प्रतिष्ठेच्या कल्पनांचा कोकणी जीवनावर पगडा आहे. मास्तरांच्या वाड्यावरील गणेशोत्सवाचे वर्णन करुन कोकणी लोकांच्या संस्कृतीची प्रदेशविशिष्टता वर्णन केली आहे. कोकणप्रांताव्यतिरिक्त विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात गणेशोत्सवाचे इतके प्रस्थ नाही. कोकंब्यातला श्रावण मास्तरांचा गणपती विसर्जनाच्या दिवशी भैरीबोवाच्या आणि तांबडीच्या कोंडातील गडी नाचायला येत. हा दिवस जलशाचा म्हणून प्रसिद्ध होता. बेभान झालेली कुणबी फेर धरुन नाचत गाणे म्हणत,

पहिलं नेमनऽ गनेस द्येवा - पहिलं नमन गनेस द्येवा<br>
दुसरं नमन ऽ बंडो आबाजीला - तीसरं नमन व्हय त्या राजाला<br>
चवथं नमन दुर्गेसराला - चवथं नमन दुर्गेसराला." (पृ.६३)

असे म्हणत तासभर नाच झाल्यावर कीर्तन आणि नकलांचा कार्यक्रम होत होता.

त्यानंतर भारावल्या अंत:करणाने गणेश विसर्जन केले जात होते.

आठवणी आणि दिगंबराच्या आत्मनिवेदनाने कादंबरी आकाराला आली आहे. प्रमाणभाषेत निवेदन करुनही प्रदेश, निसर्गवर्णन, व्यक्तिचित्रण, लोकजीवनातील आचारविचार, श्रद्धा-समजुती बरोबरच कोकणी बोलीतील नावीन्यपूर्ण शब्दांच्या वापराने लेखकाने वातावरण निर्मिती केली आहे. डुऱ्या, स्त्रहाण, पऱ्ह्या, आगर, खोडं, शिंपण, पेंडी, शिपटं, आवट, आघोटी, बेणी सकवला, कोंड, पेळू, चिकोटी, दिपोटी, आंगली, रहाट, पन्हे इ. शब्द 'हॅत्तेच्या', 'अगो', 'गो' या कोकणीतील लकबी, 'रांडेच्या' ही शिवी स्वाभाविकपणे आली आहे. म्हणी-वाक्प्रचारातून लोकजीवनाचे दर्शन घडते. जसे, ''जेनूं काम तेनूं ठावा'', 'पिकत तिथं विकत नाही', 'पाटाचं पाणी पाटालाच जायचं,' 'जित्याची खोड...', 'तेरड्याचा रंग तीन दिवस', 'जनाची नाही तरी मनी बाळगायला हवी', 'अंथरुण पाहूनच पातपाय पसरीन', 'पी हळद अन् हो गोरी', 'दुष्काळात तेरावा महिना', 'नथ गेली, भोकं शिल्लक राहिली' इत्यादी.

म्हांबरीच्या संवादातून कोकणी बोलीतील लकबीचे दर्शन घडते. लक्ष्मीची काळजी घेणारी म्हांबरी म्हणते, ''सूनबाय, उटा पाव तथनं आटवा महिना हाय. अगधीच कसा तुमास्नी काय नाय!''... (पृ.७२)

''काय इसूदादा? तू पनल काय बगत नाय, मांडलाया काय तुमी? सूनबायला सांगता त्येंचा बी आपलां हायं ते हायं. मामंजी नायत म्हून वाटेल ते कराल का काय?'' (पृ.७३)

भू-विशेष आणि निसर्ग यांचा समाजजीवनावरील प्रभाव लेखकाने वास्तव पातळीवर रेखाटला आहे. राजेमास्तरांच्या व्यक्तिचित्रणावर लक्ष केंद्रित करणारी कादंबरी असे स्वरुप असूनही समकालीन वास्तवावर प्रकाशझोत टाकल्यामुळे 'हद्दपार' प्रादेशिक कादंबरी म्हणून लोकप्रिय झाली. 'एल्गार', 'हद्दपार' च्या पार्श्वभूमीवर 'गारंबीच्या बापूने' कलात्मक प्रादेशिक कादंबरीचा आदर्श निर्माण केला. 'गारंबीचा बापू' या कादंबरीत पेंडशांनी यशाचा उच्चांक निर्माण केला.३५. असे नरहर कुरुंदकरांनी म्हटले आहे.

### *(७) ''गारंबीचा बापू''*

अफाट बापू आणि सुंदर राधा यांच्या प्रेमाची ही कथा आहे. स्थितिशील गारंबीच्या पार्श्वभूमीवरील गतिशील बापूचे जीवनचित्रण करणारी ही कादंबरी आहे. सामान्य माणसांच्या भावभावनांचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत लेखक करतो. विठोबाचा मुलगा बापू हा अण्णाखोत आणि यशोदाच्या व्याभिचाराचे फळ आहे. बापूला विठोबाने आईची माया दिली. परंतु यशोदेने त्याचा तिरस्कारच केला. आईविषयी त्याच्या

मनामध्ये घृणा निर्माण झाली. तिच्याबद्दल त्याला संशय येऊ लागला. अण्णाखोताकडे मुंजीच्या वेळी बापूचा अपमान झाला. विषमतेची जाणीव झाली. राजगडच्या सफरीत अण्णाने नोकर म्हटल्यामुळे तो बिथरला. बेडरपणे वागू लागला. आईऐवजी मावशीकडून त्याला प्रेम मिळू लागले. ब्राह्मणवाडा आणि गुरववाड्यात उभा दावा असताना बापू गुरव-कुणब्यांमध्ये मिसळू लागला. ब्राह्मणवाड्यात जे प्रेम मिळाले नाही ते गुरववाड्यात त्याला मिळू लागले.

वयाच्या अठराव्या वर्षापासून वनदेच्या पुलावरील बहुरंगी जीवनाचे त्याला आकर्षण वाटू लागले. धाडव्याच्या यमीशी बापूचे संबंध आल्यामुळे ती गरोदर राहिली, असा गारंबीच्या लोकांनी त्याच्यावर आळ घेतला. त्यामुळे तो अस्वस्थ झाला. या प्रकरणामागे अण्णा आहेत याची बापूला खात्री वाटू लागली. 'आईने आपलचं नाणं खोटं' असे म्हणून त्यावर शिक्कामोर्तब केला. महिनाभर तो घराबाहेर पडला नाही. कोंडातल्या लोकांना अण्णांनी तीनशे रुपये देऊन प्रकरण मिटविले तरी बापूचे समाधान झाले. नाही यमी प्रकरणातील माणसाचा शोध लावण्याचा निर्धार त्याने केला.

वनद्याच्या पुलावर बापू वाढत-घडत होता. सपाट बापू आणि गारंबीने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. सपाट बापूंनी बापूला अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे तो गबाळ्या रावजीच्या धाणेरड्या हॉटेलमध्ये जाऊ लागला. बापूला जातिभेद मान्य नसल्याने तो गुरव, कुणबी, मुस्लिम यांच्यात मिसळू लागला. पडेल ते काम करु लागला. माणसं जोडू लागला. बापूमुळे रावजीचे हॉटेल जोरात चालू लागले. सपाटबापूच्या धंद्यावर परिणाम झाला. जावयाच्या हॉटेलमध्ये अण्णाखोतांनी बापूला नोकरी देऊ केली, तेव्हा 'माझा मुलगा यमी जवळ असतो कोंडात, त्याला देतो पाठवून!'' असे बोलून अण्णाचा बापूने अपमान केला. रावजीने हॉटेलच्या भरभराटीला कारण झालेल्या बापूबद्दल बायकोला (राधा) माहिती दिली. अल्पकाळात राधा-बापूची भेट झाली. दोघांनी एकमेकांना पूर्वायुष्यातील कटू आठवणी सांगितल्या. दोघांच्या मोकळेपणाने बोलण्याचा गारंबीने भलताच अर्थ लावला. सरावलेल्या बापूने त्याकडे दुर्लक्ष केले.

अण्णांकडे पाणी भरणाऱ्या, पंक्तिमध्ये वाढणाऱ्या आणि द्रोणापत्रावळी तयार करणाऱ्या विठोबाने पैसा जमवून बापूसाठी सोन्याची अंगठी तयार केली. अण्णाच्या घरचे पाणी भरण्यासाठी गेला असताना साकव मोडल्यामुळे विठोबाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. बापूला दुःख झाले. त्याची आठवण असलेली अंगठी यशोदेन बापूला दिली नाही. राधेला व्याघ्रेश्वराला घेऊन जातना बापूला 'विठोबा' दिसल्याचा भास झाला. त्याने 'मोठे होण्याचा'सल्ला बापूला दिला. त्यानंतर खूप कष्ट करण्याचा, खूप पैसे मिळविण्याचा आणि गारंबीचा सरपंच होण्याचा संकल्प त्याने केला. सारखरपेंडीला जाऊन तो रात्रंदिवस कष्ट करु लागला. व्यापरातील बारकावे त्याने आत्मसात केले. व्याघ्रेश्वर त्याची श्रद्धा होती. राधेबद्दल त्याला आकर्षण वाटत होते. दरम्यान रावजीचा

मृत्यू झाला. राधेजवळ कायमचे राहण्याचा बापूने निर्णय घेतला. मावशी, आई आणि गारंबीला त्याचे राधेशी संबंध पसंत नव्हते. परंतु त्याकडे त्याने दुर्लक्ष केले. तीनवर्षाच्या काळात त्याने हॉटेल चालविले. सुपारीच्या व्यापारात भरपूर पैसा मिळविला. बंगला वास्तुशांतीला दिनकर भट मावशी आणि आई सोडून सारा गाव झाला. दिनकर भटाने व्याघ्रेश्वराला दिवसभर महारुद्र केले.

गारंबी-दापोली-चिपळूण आणि बाणकोट पट्ट्यातील व्यापाऱ्यांची बापूने संघटना बांधली. या प्रदेशातील हिरडा-सुपारी बाहेर विक्रीसाठी जाणार नाही अशी व्यवस्था करुन ही आनंदाची बातमी राधेला सांगण्यासाठी बंगल्यावर आला तेव्हा राधा गरोदर असल्याचे समजले. गरोदरपण तिला अपशकून वाटू लागले. बापूची अप्रतिष्ठा होईल अशी भीती वाटू लागली. तेव्हा सूर्यनारायणाच्या साक्षीने दोघांनी लग्न लावले. तरीही गर्भपात करण्याचा विचार तिच्या डोक्यातून जात नव्हता. लग्नाच्या सत्यनारायणाला ग्रामस्थ आले. पण टवाळी, हेटाळणी थांबली नाही. राधा-बापूच्या संसारात बाळ आला. व्यापरामध्ये बापू पूर्ण गुरफटला. राधा आणि बाळाकडे लक्ष द्यायला त्याला वेळ मिळत नव्हता. म्हणून राधाने नाराजी व्यक्त केली. 'बाळाची जात कोणती?'' असा अनपेक्षित प्रश्न तिने विचारला. तेव्हा 'माणूस' ही त्याची जात असे बापूने उत्तर दिले. बाळाच्या प्रत्येक वाढदिवशी गारंबीची सुधारणा तो करु लागला. विहीर खोदली, शाळा बांधली. सिमेंटचा पाट बांधला. धर्मशाळा, साकव बांधला, तरीही गारंबी त्याला सरपंच करायला तयार नव्हती. कारण त्याने भ्रष्टाचार केला. गुरवांशी संबंध जोडले. राधेशी लग्न केले. दिनकर देखील बापूने सरपंच होणे वेगळ्या कारणासाठी पसंत नव्हते. जग्या सारख्या गंजडी माणसांना लाचारीने बापू जवळ करु लागला. राजकारणामुळेच शाळेतील मुले बाळाला 'अक्करमाशा' म्हणून चिडवितात, तेव्हा मात्र बापू-राधा अस्वस्थ झाले. पाटाच्या पाण्यावरुन मारामाऱ्या झाल्या. बापूच्या सांगण्यावरुन गुरवांनी पाणी बंद केले असे सर्वजण म्हणू लागले. त्यामुळे रागात सपाट बापूला अफाट बापूचा मार खावा लागला. कोर्टकचेरी होऊन बापूला सोळा आणे दंड भरावा लागला. मावशीचा मृत्यू झाला. तेव्हा गुरवांनी परत ब्राह्मणांशी पाटाचे पाणी अडवून मारामारी केली. बापूला सरपंच करा तरच पाणी सोडतो असे गुरव म्हणू लागले. दंडेली-मारामारी करुन सरपंचकी नको असे बापूने म्हटले. परंतु मुर्डीहून आलेल्या यशोदेकडून बदनामी होण्यापेक्षा बापूला सरपंच केलेले बरे म्हणून 'सरपंच पदासाठी बापूचे नाव अण्णांनी सुचविले.' गावभर फिरुनही आश्रय न मिळालेली यशोदा शेवटी बंगल्यावर आली, असे कथांतर्गत विस्कळीतपणा असलेली ही कादंबरी आहे.

डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात त्याप्रमाणे, ''पेंडशांनी आपल्या माणसांवर कोणतेही आदर्श आरोपित केले नाहीत. जन्माच लाभलेले गुणदोष, परिस्थितीतून

घेतलेले थोडेफार संस्कार यांच्या वळणावर पेंडशांची माणसं जगतात. त्यामुळे ती अधिक जिवंत वाटतात.''३६. यामुळे व्यक्तिचित्रणातून वास्तव दर्शन होते. कादंबरीतील सर्वच पात्र (मावशी आणि दिनकर सोडून) बदनाम, कलंकीत आहेत. पाप पुण्याच्या कल्पना मानणारे, व्याघ्रेश्वरावर श्रद्धा ठेवणारे आहेत. 'बापू'चे जीवन उलगडून दाखविण्यासाठी इतर व्यक्तिरेखा आल्या आहेत. अर्थात बापू कादंबरीचा नायक आहे. आणि तो गारंबीचा आहे. गारंबीने त्याला घडविले-बिघडविले आहे. गारंबीच्या प्रेमाअभावीच तो बंडखोर बनतो. बालपणापासून मानसिक कोंडमारा झाल्यामुळे हळवा आणि उद्दाम बनतो. धार्मिक गोष्टींवर स्वाभिमानी, स्पष्टोक्ता, कष्टाळू, भावनाप्रधान, हिकमती, माणुसकी जपणारा, माणसं जोडणारा आणि ओळखणारा, साहसी, सत्त्वशील, निष्पाप, कलंदर, ताठ, प्रांजळ धसमुसळा जिद्दी या गुणांची सरमिसळ झालेला पैशाने सर्व पाप पचू शकतात म्हणून पैसा मिळवून सरपंच होण्याचे स्वप्न पाहणारा असा रेखाटला आहे.

'राधा' ही मुंबईत वाढलेली. मित्राच्या पत्राने बदनाम झालेली, रावजी गुरवाची सुंदर पत्नी आहे. ती सेवाभावी, धूर्त, व्यवहारी, समंजस, बापूला आई आणि पत्नीचे प्रेम देणारी आहे. गारंबीच्या दृष्ट्या ती बदनाम आहे. परंतु बापूच्या दृष्टीने मावशीप्रमाणे देवमाणूस आहे. तिला मात्र 'माणूस' म्हणावे असे वाटते. नीतीचे विचार ती बापूला सांगते. शरीर आणि मनाची भूक न भागलेली अबला आहे. ती बापूला म्हणते, "...नीतीच्या, माणुसकीच्या गोष्टी भूक लागली नाही तोपर्यंत असतात बापू. भरल्यापोटी नीतीच्या गप्पा मारण्यासारखं सोपं जगात काही नाही. उपाशी माणसानं चोरुन खावं की नाही हा प्रश्नच येत नाही, तो खाणारच!... (पृ.१०२)

भरल्या पोटी माणूस चोरुन खाऊ लागला, तर ते पाप होईल, गुन्हा होईल, जे काही वाईट असतं, ते होईल..."

"आणि उपाशी पोटी..."

'तो निसर्गाचा न टाळता येणारा क्रम असतो. रस्त्यानं भूक भागवता येत नसेल, तर हे होणारच. कोणाच्या बऱ्या वाईट म्हणण्यानं थांबणार नाही!" (पृ.१०२)

अशाप्रकारे संस्कृती आणि विवेक यांचा संगम तिच्या विचारसरणीत झाला आहे. रावजीच्या मृत्यूनंतर बापूला दूर जाण्यास सांगणारी, गरोदर राहिल्यानंतर समाजातील अप्रतिष्ठेला तोंड कसे द्यावे म्हणून बेचैन झालेली, बाळाला 'अक्करमाशा' म्हणताच हताश न होता संयम ठेवणारी, मावशीची सेवासुश्रुषा करुन तिचे मन जिंकणारी, बापूला सर्वस्व अर्पण करणारी आहे. म्हणून 'राधा हे पेंडशांच्या प्रतिभेला पडलेले काव्यमय स्वप्न आहे." ३७. असा तिचा स. रा. गाडगीळांनी गौरव केला. बापूच्या आंतरजातीय विवाहाच्या पार्श्वभूमीवर समकालीन वास्तवाचे लेखकाने असे चित्र रेखाटले आहे.

दिनकर हा बापूचा हितचिंतक परंतु घाबरट, भोळाभाबडा, सत्यवचनी, सर्वांना सांभाळून राहणारा, मर्यादित मनोधैर्य असलेला सज्जन आहे. पाटाच्या पाण्यासाठी हातात सोटा घेऊन तो पळतो. सर्वांशी हसून मोकळेपणाने बोलतो. बापूने केलेल्या सुधारणांचे कौतुक करतो. त्याचप्रमाणे त्याचे काही चुकले की जाब विचारतो. सरपंच होण्याच्या भानगडीत न पडण्याचा सल्ला देतो. त्यामागे बापूबद्दल त्याला वाटणारी सहानुभूती हेच कारण आहे. 'सरपंचाची जागा लाभत नाही' या लोकसमजामुळे बापूला सरपंचकीचा नाद सोडायला सांगतो. मुळातला दरिद्री असला तरी पोरांत पोरासारखा थोरात थोरांसारखा आणि बायकांत बायकांसारखा वागतो. गावच्या उपाध्याला स्वत:ची मत नसतात असे मानतो. बापूशी असलेल्या मैत्रीमुळे अण्णाकडील पूजा बंद होते, त्याची तो तमा बाळगत नाही. व्याघ्रेश्वराच्या गाभाऱ्यात बापूच्या बंगल्याची वास्तुशांती करतो. नवीन विहिरीच्या भूमिपूजनाच्या वेळी राधा बापूला पूजेस बसवून त्यांच्या लग्नाला सम्मती दर्शवितो. गाव आणि बापू असे दोन्हीकडे उत्तम संबंध ठेवणारा तो काहीसा नेभळट आहे.

'यशोदा' ही वासनेच्या चक्रांत रक्तबंबाळ झालेली बदफैली, कामांध, थिल्लर, व्यभिचारी, फटाकडी, गावभवानी, अहंकार आणि नटण्यामुरडण्याची आवड असणारी रेखाटली आहे. अण्णाखोतांशी असलेल्या संबंधामुळे ती गरोदर राहते. पारा खाऊन गर्भ पाडण्याचा ती प्रयत्न करते. तिच्या आकर्षणामुळे नपुसक पाण्याक्याशी विवाह लावून अण्णाखोत आपली कायमची सोय करुन घेतो. अर्थात ती अशी विठोबाशी एकनिष्ठ नाही, तशीच अण्णाशीही नाही. ती गावभवानीच आहे. बहिणीकडेही तिला तिरस्कारच होतो. स्वत: लेखकाने म्हटले आहे, "...यशोदेच्या मानसिक पातळीवर मी गेलेलो नाही. इतकं दीर्घ चिंतन करुन माझ्या हातून हा प्रमाद कसा घडला कसा घडला, याचं आजही आश्चर्य वाटतं."३८. हे मान्य केले, तरी बापूच्या जीवनातील आणि गारंबीतील तिचे स्थान अनन्यसाधारण आहे. व्यभिचार करणारे नामानिराळे राहतात, बापू मात्र तिचा स्वीकार करतो.

अण्णाखोत हे गारंबी गावाचे प्रतीक आहे. स्वैराचारी, धूर्त, चतुर, व्यवहारी, पाताळयंत्री आणि ढोंगी आहे. प्रतिष्ठा जपण्यासाठी सरपंच पदासाठी बापूचे नाव सुचवतो. 'विठोबा'हा नपुसक, नेभळट, कमजोर, भोळाभाबडा, बावरलेला बुजरा आहे. खोताकडे पाणी भरणारा दरिद्री आहे. पत्रावळी द्रोण तयार करुन बापूसाठी सोन्याची अंगठी तयार करतो. मृत्युनंतरही बापूला त्याचा भास होतो. खूप मोठा होण्याचा आणि आईला सांभाळण्याचा तो बापूला सल्ला देतो. सपाट बापू हा 'टैम्सफिंडिया' वाचणारा, भोगमय जीवनाचे गारंबीला दर्शन घडविणारा अण्णाखोतांचा जावई आहे. 'गारंबीची मतं म्हणजे सपाट बापूची मतं' असा तो बोलघेवडा, बापूचा तिरस्कार करणारा, मार खाणारा, उपरा असूनही गारंबीतील लोकजीवनाशी एकरुप

झालेला तरुण आहे. 'रावजी' राधाचा दुर्व्यसनी गांजाकस, बायको भोगवस्तू मानणारा, हॉटेलच्या विक्रीमुळे स्वार्थापोटी बापूवर प्रेम करणारा आणि संशयी, विद्रूप आहे. हरचंद, नानाभाई, मुसाशेठ, गोपाळनाना, बाब्या, मुर्डीची मावशी, गुरववाडा, ब्राह्मणवाडा, ड्रायव्हर, बैलगीडीवाले, बाळ आणि इतर गौण पात्रांचे चित्रण करुन समाजवास्तवाचे ओझरते दर्शन घडविले आहे.

भुतवाडीची मावशी व्यवहारी, कामसू, जिद्दी, प्रेमळ आणि फटकळ अशी रेखाटून कोकणी स्त्रीचे स्वाभाविक चित्र उभे केले आहे. ती विधवा आहे. चिरंजीव दिवटा निघालेला, तरी ती बापूवर प्रेम करते. त्यामुळे त्याला रागावण्याचा अधिकार मिळालेला आहे. मेल्या, झड्या, रांडेच्या अशा शिव्या देणारी मावशी सोट्या घेऊन पाटावर उभी राहते. तेव्हा भुतवाडीचे लोक नरम होतात. जडी-बुटी देऊन लोकांना उपयोगी पडणारी असल्यामुळे लोक तिला मानतात. "मावशी म्हणजे भूतवाडीचा कातळ ! काळाठिक्कर, टणक पण अंतर्यामी अमृततुल्य पाणीच !" (पृ. ११४) अशी बापूचा आधार असलेली श्रद्धाळू समजदार स्त्री आहे.

'हद्दपार' प्रमाणे हर्णे बंदराच्या परिसरात 'गारंबीचा बापू' ही कादंबरी वाढली आहे. स्वतः लेखकाला स्थळवर्णनामुळे कादंबरीच्या मोठेपणात मर्यादित स्वरुपाची भर पडते असे वाटते. टुम म्हणून प्रदेशवर्णन केले नाही. तर "हर्णे, मुरुड, आंजर्ले, मुर्डी ही बंदरपट्ट्याची गाव आणि वरती दापोली या त्रिकोणावर मी हाडामासाच्या माणसारख प्रेम केलं आहे." (बापू-प्रस्तावना) असे पेंडशांनी म्हटले आहे. त्याचप्रमाणे 'माझ्या पहिल्या तीन कादंबऱ्यांतून 'मी'चे पडसाद सहज लक्षात यावे इतके ठसठशीत उमटले आहे." ३९. असेही ते म्हणतात. भूप्रदेश, निसर्गवर्णन आणि व्यक्तिचित्रणाच्या संदर्भात 'मी' डोकावतो हे मान्यच करावे लागेल. परंतु डॉ. गो. मा. पवार म्हणतात. त्याप्रमाणे 'प्रादेशिकता या कादंबरीच्या आशयात काहीही भर घालू शकत नाही. ४०. हा अभिप्राय अधिक सार्थ वाटतो. कारण कादंबरीचे स्वरुप स्वप्नरंजनात्मक आहे. कादंबरीच्या पहिल्या प्रकरणात गारंबीचे वर्णन एका पात्राप्रमाणे जिवंत केले आहे. तेथील माणसांच्या स्वाभावावर प्रदेशाचे संस्कार झाले आहेत. गारंबीची निसर्गसंपन्नता, श्रीमंती, व्यवहारीवृत्ती आणि श्रद्धाळूपणा, कामसूपणा यांचे चित्रण केले आहे. बंदरपट्ट्यातील गाव, लालमाती, तेथील वनस्पती, फळं-फुलं, व्याघ्रेश्वर इ. वर्णन लेखक करतो. जसे,

"गारंबीनं आपला चिमुकला संसार डोंगराच्या एका पाखेवर थाटला आहे. बुरोंडी, बिवळापांजरी, दुर्गेश्वर या गावांचे संसारही याच डोंगराच्या कुशीत आहेत. बुरोंडीशी तो अगदी समूद्राला जाऊन भिडला आहे. ते टोक समुद्रापासून चांगलं सात मैल भरतं........(पृ.१ ते १०) असे संपूर्ण प्रकरणामध्ये गारंबीचे प्रदेश विशेष, निसर्ग यांचे चित्र रेखाटले आहे. गारंबी एक पात्र म्हणून जिवंत केले असले तरी निसर्गवर्णन

मात्र चित्रस्पर्शी वाटतात. पार्श्वभूमी म्हणून निसर्गवर्णन येते. त्यामुळे नरहर कुरुंदकर, स. रा. गाडगीळांचे या संदर्भातील विवेचन एकांगी वाटते. "गारंबीच्या भावजीवनाशी निसर्ग एकरुप झाला आहे." ४१. किंवा "निसर्ग एक पात्र म्हणून आला" ४२. निसर्ग आणि व्यक्ती यांच्यातील अद्वैत येथे दिसत नाही. "पेंडशांच्या ह्या नंदनवनात निसर्गाला स्थान आहे, पण ते स्वतंत्र नाही. माडगुळकरांच्या माणदेशाप्रमाणे माणसाच्या जीवनात तो मिळून मिसळून गेला आहे." ४३. असे गंगाधर गाडगीळ म्हणतात.

वास्तव जीवनाचे चित्रण करणारी ही एक कलात्मक कादंबरी आहे असा जकवा निर्माण करण्यात ती बरीचशी यशस्वी ठरली. तिने वास्तव जीवनाचा फुटकळ तपशील आकर्षकपणे पुरविला. परंतु गाभा मात्र स्वप्नरंजनाचाच ठेवला. रूढ राहाटी धुडकावून लावणारा, बंडखोर नायक निर्माण करण्याचा आभास निर्माण केला. परंतु बंडखोरीच्या व आधुनिकतेच्या मुलाम्याखाली पारंपरीक श्रद्धा, रूढी व मूल्ये जपणारा नायक चित्रित करून त्याद्वारे रंजनाचे कार्य साधले." ४४. स्वप्नरंजनात्मक गाभ्याचा विचार येथे अप्रस्तुत आहे. परंतु वास्तवजीवनाचा फुटकळ तपशीलाचा येथे विचार करावा लागेल. यातून डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या "प्रादेशिक समूहमनाचा गजर ऐकू येत नाही. ४५. या आक्षेपाचे खंडन करणे शक्य होईल. कादंबरीच्या पहिल्या प्रकरणात लेखकाने गारंबीच्या लोकांचा कंजूषपणा, कष्टाळूवृत्ती, सोने साठविण्याची आवड, सरपंचपदाच्या वादामुळे कोर्टकचेऱ्या-साठी पैसे खर्च करण्याची सवय, पाटाच्या पाण्यासाठी मारामाऱ्या करणे, व्याघ्रेश्वरावरील सर्वांची श्रद्धा या सर्वांमधुन समूह-मनाचे चित्र रेखाटले आहे. पैसा साठवायचा, सोने घ्यायचे तर सुपारीच्या बागा जळता कामा नये आणि सुपारी वाचवायची तर गुरवगाड्याने अडविलेले पाणी ब्राह्मणांच्या बागापर्यंत आलेच पाहिजे, म्हणून गुरवांशी मारामारी करण्याशिराय त्यांच्या समोर दुसरा पर्यायच नसतो. कोकणी जीवनातील पाटाच्या पाण्यावरुन मारामारी हा एक अविभाज्य भाग आहे. "पाटाच्या मारामाऱ्यांचा मोसम मे महिन्यात. पाणी कमी होई नी मग धुसफूस सुरु होई. रात्री अपरात्री पाहाऱ्याला सुरवात होई, ती त्याच दिवसात. या पाहाऱ्याला गारंबीत 'रोंद' म्हणत. रोंदाच्यासुद्धा पाळ्या होत्या. एकट्या-दुकट्यानं रात्री जाण्याची सोय नसे. पाण्यावरुन प्रकरण केव्हा चिघळेल आणि धक्काबुक्की होईल, याचा नेम नसे. अशावेळी एकटादुकटा माणूस असेल, तर गुरव त्याला गिल्ल्यावारी पळवून लावीत. एवढंही करुन बधला नाही. तर धक्के मारुन पिटाळून लावीत. तो बिचारा गारंबीला येऊन माणसं नेईतो अर्धा तास सहज निघून जाई. पण अशी वेळ क्वचित येई.

"जायचं झालं म्हणजे गारंबीचे दहाबारा जवान तयारीनं जात आणि वेळ आली की पाणी फिरवून घेत."(पृ. १९७) वरील वर्णन प्रदेशविशिष्ट समाजवास्तवाचे दर्शन घडविणारेच आहे.

ग्रामीण जीवनात पसरणाऱ्या अफवा, प्रतिष्ठेच्या कल्पनांचे चित्रण लेखकाने केले आहे. यमी बापू संबंधाची गावभर चर्चा होते. त्यामुळे तो स्वतःला झोपडीत कोंडून घेतो, ते समाजातील बेअब्रूमुळेच. व्यवसायसंबंधीही प्रतिष्ठेच्या कल्पना रुढ झालेल्या असतात. पारंपरिक शेती, भिक्षुकीबद्दल समाजाला आदर असतो. परंतु कोंबड्या बकऱ्या खरेदीविक्री सारख्या धंद्याला लोक विरोध करतात. जातिभेदाची मुळं खोलवर रुजलेली असतात. जातीधर्माच्या संस्काराचाही पगडा असतो. बापूने गुरवांमध्ये मिसळणे, मांस खाणे, मद्य पिणे, राधाच्या हाताची भाकर खाणे ब्राह्मणांना सहन होत नाही. बापूवर जिवापाड प्रेम करणारी मावशी त्याचे ताट बाजूला ठेवते. सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पनेमुळेच राधा बापू संबंध, पुढे विवाह सत्यनारायण या गोष्टी समाजाला मान्य होण्यासारख्या नाहीत. परंतु पैशापुढे, बापूने केलेल्या सुधारणांमुळे काहीवेळा लोक दुर्लक्षही करतात. अण्णाचा उद्दामपणा गावाला चालतो. परंतु बापूचा उद्दमपणा चालत नाही. प्रतिष्ठितांच्या दुर्वर्तनाकडे दुर्लक्ष करण्याची ही परंपरा आहे. बापूच्या स्पष्टोक्तेपणातून खेड्यातील नीती-अनीतीच्या कल्पनांवर लेखकाने प्रकाशझोत टाकला आहे, "........वीस वर्षाच्या तरण्याताठ्या विधवेशी व्यभिचार करुन तिला पंढरपूरच्या वाटेला लावणारी जनावरं तुम्हाला सरपंच म्हणून खपतात, त्या हलकटांच्या हातचं तीर्थ घेऊन तुम्ही पावन होता - ही नीती कोठल्या परमेश्वराकडून तुम्ही आणलीत ?" (पृ. १३६) या समाजात स्त्रिचे स्थान नगण्या आहे. पुरुषप्रधान संस्कृतीने पुरुषांच्या सोयीचे नियम तयार केले आहे. शाळकरी मित्राने राधेला पत्र पाठविले, तिने त्या पत्राचे उत्तर दिले नाही. परंतु वस्तुस्थितीचा विचार न करता वडिलांनी तिला घरात कोंडून ठेवले. तिचे लग्न जमू शकत नव्हते, शेवटी कुरुप रावजी बरोबर तिचे लग्न होते. राधेवर खूप मोठा उपकार केला असे त्याला वाटते. स्त्रियांचीदेखील सहानुभूती अशाप्रकारे बदनाम झालेल्या स्त्रीला मिळत नाही. राधा-बापू संबंधाबद्दल गारंबी चर्चा करते. बापूची मावशी आणि आई देखील त्यावर विश्वास ठेवतात. तिच्या 'इतिहासा'बद्दल अफवा पसरतात. जसे, मावशी म्हणते, "अरे, एका माणसाबरोबर ती पळून गेली होती. बाप जीव द्यायला निघाला तेव्हा परत आली. तिचा बाप पाहिला आहे मी. किती सालस ! पण या पोरीनं काळोखी पासलनं आणि तेव्हापासून येईनासा झाला गारंबीला." (पृ. ७५) वस्तुस्थिती समजावून न घेता स्त्रियादेखील पुरुषांकडून समजलेल्या गोष्टींचा अतिशयोक्त प्रचार करतात. "गुरवीण घरात येणार असली तर बोलावणं करायला येऊ नको ! मी आपलं भूतवीडीहून कौतुक व्ह तुझं !" (पृ. १३३) असे मावशी म्हणते, तसेच लग्न न करता 'राधा'ला ठेवण्याचा दिनकर बापूला सल्ला देतो. यातून समाजातील नीती-अनीतीच्या कल्पनांवर प्रकाश पडतो. बापू राधाला म्हणतो, "........ आता जुनं विसर. बायकांनी कुंकु पुसून कपाळ भळभळीत करणं म्हणजे शुद्ध मुर्खपणा आहे.

पुरुषांनी बायकोच्या तेराव्यालासुद्धा लग्न लावावं नि बायकांनी मात्र वैराग्य घ्यावं हा न्याय कुठला तेच मला कळत नाही.' (पृ. १०९) यातून लेखक आधुनिकतेचा किंवा स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडतो.

फाटकडी किंवा गावभवानी म्हणून यशोदेकडे गारंबी बघते. त्याचप्रमाणे व्याघ्रेश्वापाशी बापू-राधाने मिठ्या मारल्याशी अफवा पसरते. चांगल्यावाईट कोणत्याही गोष्टीला नाक मुरडण्याची समाजाची सवय असते. बापूच्या बंगल्यावर लोकांची ये-जा वाढल्यानंतर गारंबी म्हणते की, बंगल्याची धर्मशाळा झाली. लोक तसे हिणवू लागले. बंगल्यावर मांस शिजते, बाप्या मांस खातो अशाप्रकारे बभ्रा होतो. वस्तुस्थिती वेगळी असते. मांस डोंगरावर शिजते. विठोबाचे भूत आवशीस मध्यरात्री वणद्याच्या वाकणातल्या डोंगरावर येऊन बसते. त्याची पावलं उलटी झाली आहेत. त्याला लांब मिशी फुटली आहे.

राधा बापूच्या शरीरसंबंधामुळे गरोदर असते. राधाला तो अपशकुन वाटतो. अविवहितांना मूल होण्याची कल्पना समाजाला मान्य नाही. समाज काय म्हणेल ? या चिंतेमुळे ती गर्भापाताचा विचार करु लागते. जन्माला येणारा मुलगा समाजात अपमानित होईल, तेव्हा तो काय म्हणेल ? हा प्रश्न तिला सतावतो. सूर्यनारायणाच्या साक्षीने राधा-बापू लग्न करतात. तेव्हा पांडभट म्हणतो, "आधी नग्न, मग विघ्न आणि निस्तरायला लग्न" ! (पृ. १६५) म्हणजे पांडभट आणि गारंबी या लग्नाला परवानगी देत नाहीत. देवा-ब्राह्मणांच्या साक्षीशिवाय समाजामध्ये लग्नाला मान्यता मिळत नाही. राधा-बापूच्या लग्नानंतर सत्यनारायणाला लोक येतात. दिनकर मात्र येत नाही. गावभर उलटसुलट चर्चा होते तेव्हा बापू दिनकरचे मत विचारतो, त्यावर "पाचामुखी परमेश्वर" असे तो उत्तर देतो. यातून समूहमनाचा गजर ऐकू येतो. बापूचे वैभव, बंगला, पैसा, त्याने गावात केलेल्या सुधारणा यांना महत्त्व नाही. राधेच्या मनमोकळ्या वागण्याचे, बोलण्याचे गारंबीतील बायका कौतुक करतात. "काय वाईट आहे हो बाईत ? पैशाचा मान नाही. वाटेल त्याच्याजवळ बोलते. उगाच काय नावं ठेवायची माणसानं ?" (पृ. १७४) ती गुरवीण असल्यामुळे कानाडोळा केला जातो. परंतु धंद्याच्या गडबडीत बापू गावकऱ्यात मिसळत नाही तेव्हा लोक म्हणतात, "पैशाचा माज आला आहे याला. आपली माणसं ओळखीनाशी झाली. !" (पृ. १७४) अशाप्रकारे बापूचा ते तिरस्कार करतात.

सरंपच पदाभोवती प्रतिष्ठेची वलये तयार झालेली असतात. ते मिळविण्यासाठी बापू प्रयत्नशील असतो. बाळाच्या प्रत्येक वाढदिवसाला बापू गावातील उपयुक्त अशा सुधारणा करतो. विहीर खोदतो, शाळा, सिमेंटपाट, धर्मशाळा, साकव बांधतो, तरीही गावकरी त्याला सरपंच करण्यास तयार होत नाही. सरपंच होणं हे बंगला बांधण्याइतकं सोप आहे का ? किती अवधानं ठेवावी लागतात माणसाला.

एक अण्णाच करु जाणोत. असा समज गारंबीने करुन घेतलेला असतो. शिवाय बापूचे गुरवांशी असलेले संबंध गारंबीला मान्य नव्हते. 'गारंबी लाचखाऊ नाही' म्हणून लोक बापूला विरोध करतात. दिनकर आणि भूतवाडीची मावशी सरपंच पद कुणालाही मानवत नाही म्हणून विरोध करतात. जग्यासारख्या लावालाव्या करणाऱ्याला बापू जवळ करतो. प्रसंगी सरपंचकीसाठी लाचारी पत्करतो. घरात चालणाऱ्या चर्चेमुळेच अण्णाचा हणमंता बाळाला 'अक्करमाशा' म्हणतो. 'बाळाची जात कोणती' हा प्रश्न राधाला सतावतो, तेव्हा 'माणूस' ही त्याची जात असे उत्तर देऊन बापू मोकळा होतो. परंतु समाजाला हे मान्य नसते. गुरववाड्यातील लोक बापूला सरपंच करावे म्हणून ब्राह्मणांचे पाणी अडवितात. दंडेली मारामारी करुन सरपंच होणे बापूला मान्य नसते तर अण्णासारख्या हलकट सरपंच आम्हाला नको असे गुरवांचे म्हणणे असते. यशोदेकडून बदनामी होऊ नये. झाकली मुठ झाकली राहावी म्हणून शेवटी अण्णा सरपंचकीसाठी बापूचे नाव सुचवितात. ग्रामीण जीवनात सरपंच पदामागील प्रतिष्ठेच्या कल्पनांचे असलेल्या महत्त्वाचे वास्तव चित्र लेखक रेखाटतो.

पाटाच्या पाण्यासाठी मारामाऱ्या करणे किंवा सरपंच पदासाठी मारामाऱ्या करणे आणि कोर्टात जाण्याची कोकणी माणसाची वृत्ती लेखकाने वर्णन केली आहे. गुरवांनी बापूच्या सांगण्यावरुनच पाटाचे पाणी अडवले असा समज गारंबीने केला. त्यावरुन अण्णाच्या जावयाशी बापूची मारामारी होते. डॉक्टरकडून खोडे सर्टिफिकेट घेऊन बापूवर फौजदारी केली जाते. कोर्ट बापूला सोळा आणे दंड करते. गुरववाडा आणि ब्राह्मणवाडा भांडण वरच्या कोर्टापर्यंत लढतात. पाटाच्या पाण्यावरुन होणारे वाद आणि सरपंचकीसाठी होणाऱ्या कोर्टकचेऱ्या या गारंबीच्या जीवनातील नव्हे तर कोकणी जीवनातील अविभाज्य घटक आहेत.

काही श्रद्धा-समजुती, अंधश्रद्धा, दंतकथा उत्सवातून गारंबीतील लोकजीवन घडलेले आहे. परिश्रमाशिवाय पैसा मिळत नाही यामुळे "गारंबीचा नवरा सुशीला मिळे, सुशीला मिळे - घामाच्या पैशात गडाबडा लोळे" असा उखाणा मुली घालतात. त्यातून त्यांची कष्टाळूवृत्ती लेखक वर्णन करतो. व्याघ्रेश्वर ते स्वयंभू देवस्थान मानतात. "माती, पाटा, व्याघ्रेश्वरा - स्मरा त्यांना पूजा त्यांना" माती नी पाट यांना गारंबी श्रेय देई ते पटणारं होतं. पण व्याघ्रेश्वर ? व्याघ्रेश्वर काय करीत होता ? उद्धट भाषेत सांगायचं तर गारंबीची पापं पचवीत होता ! कसलेही व्यभिचार करावेत, कोणाच्याही मुंड्या मुरगाळाव्यात, खोट्या मापानं सुपारी द्यावी नी दिनकर भटजीकडून व्याघ्रेश्वरावर एकदष्टी करुन घ्यावी !......" (पृ. ६) व्याघ्रेश्वरावरील श्रद्धेतून गारंबीचे लोकजीवन घडले आहे.

महाशिवरात्रीच्या दिवशी सरपंचाच्या हस्ते शिवलिंगावर महाभिषेक होतो. त्याच्या हस्ते साऱ्यांनी तीर्थ घ्यायचे असते. ब्राह्मणभोजन, कीर्तन, मंदीरप्रवेश सरपंचाच्या

परवानगीने होते. म्हणून 'व्याघ्रेश्वराचा सरपंच' हे गारंबीच्या टापूतील एक संस्थान आहे. म्हणूनच सरपंचाला विशेष मान देण्याची परंपरा आहे. तसेच सरपंचाची जागा कोणाला मानवत नाही. सर्वांना यापूर्वी ठेचा खाव्या लागल्या, असा लोकसमजही आहे. कंजूष कोकणी लोकांचा दंतकथेवरही विश्वास असलेला दिसतो. व्याघ्रेश्वापाच्या स्वयंभू स्थानाला माणसाचे पापी हात लागता कामा नये. त्यामुळे जिर्णोद्धाराची कल्पना त्यांना मान्य नाही. तसेच धर्मशाळेतील भुजंगाच्या अंगावर केस आहेत. तो रात्री देवळात येऊन पिंडीवर फणा उभारतो. बोंडलीचे पाणी शतगुणी आहे, या विहिरीवर मध्यरात्री व्याघ्रेश्वर स्नानाला येतो. पावसासाठी व्याघ्रेश्वराला कोंडले जाते. पापं वाढली म्हणून पाऊस पडत नाही. अतृप्त माणसाच्या पिंडाला कावळा शिवत नाही विठोबाच्या पिंडीला कावळा शिवला नाही असे गारंबीचे लोक म्हणतात. वास्तुशांतीशिवाय गृहप्रवेश आणि ब्राह्मणाच्या मान्यतेशिवाय झालेले लग्न लोकांना मान्य नाही. श्रद्धा आणि विवेक हा विषय पेंडशांनी येथे आणला आहे. विठोबाच्या भूताची दंतकथा आहे. अमावस्येला येतो. त्याची पावलं उलटी झाली असून त्याला मिशी फुटली आहे. यातून कोकणी माणसाचा भूतदिकांवरील अंधविश्वास सांगितला आहे.

टिपण, कुंडली, पत्रिका, होराशास्त्र यावर लोकांचा विश्वास आहे. ब्राह्मणांनी खालच्या जातीतील लोकांकडून कोरडा शिधा घेण्याची परंपरा आहे. यातून जातिभेदाचे लोकजीवनातील वर्चस्वही दिसते. पंजगव्य शिपडून शुद्धी करण्याची परंपरा आहे. आंतरजातीय विवाहाची कल्पना समाजाला मान्य नाही. ब्राह्मणाच्या आशीर्वाद सामर्थ्यावर लोकांचा विश्वास आहे. सोवळे-ओवळ्याची परंपरा येथे वर्णन केली आहे. दशक्रिया विधी करणारा पांडभट केवळ पैशासाठी सत्यनारायणाची पूजा सांगतो. गर्भधान झालेल्या राधेच्या हातचे खाण्यास दिनकर नकार देतो. तसेच गूळ-पाणी देऊन पाहूणचार करण्याची कोकणी माणसांची परंपरा आहे. देशावर गुळ-शेंगा देण्याची परंपरा आहे. यातून प्रदेशविशिष्टता लक्षात येते. चैत्र षष्टीचा दुर्गेश्वरातील बागूलबुआच्या उत्सवाचे वर्णन करुन लेखकाने कोकणी लोकजीवनाचे सांस्कतिक दर्शन घडविले आहे.

कोकणी लोकजीवनाचे दर्शन घडविणारी प्रस्तुत कादंबरी प्रमाणभाषेत लिहिली असून कोकणी बोलीतील काही शब्द अपरिहार्यपणे आले आहेत. उदा. पिटात, शिपटं, सोडे, ठेला, साठं, रोटा, साकव, सुरमाड, सल्ले, कोंड, नांदा, नादारी, धांडुळा, रोंद, ताकतई, चकोटी यासारखे कोकणीतील शब्द किंवा रांडेच्या, झड्या, मेल्या, च्यायला, जहानाचे, गांडू यासारख्या शिव्या स्वाभाविकपणे आल्याने अश्लील वाटत नाही. गो, अगो, या लकबीही मधूनमधून येतात. 'जमिनीतून वर आलेले बोडके काळे फत्तर अस्वलासारखे ठिकठिकाणी बसलेले आहे', 'वाघाच्या जबड्यात

गाईनं आपण होऊन मान द्यावी, त्याचप्रमाणं ती आपला नाजूक देह त्याच्या स्वाधीन करी' यासारख्या उपमा प्रतिमा कादंबरीत आहेत. त्याचप्रमाणे काही म्हणी-वाक्प्रचारातून लोकजीवनाचे दर्शन घडते. उदा. ढुंगण धुवायला सांगितल तर धुवावं, लोंबताय काय विचारु नये', 'उचलली जीभ लावली टाळ्याला', 'कर नाही त्याला डर कसली', 'अति झालं अन् हसूं आलं', 'भट चालला घरटी आणि सदा चिवडी खरकटी', 'आपलेच दात नि आपलेच ओठ','पाचामुखी परमेश्वर','बुंदसे गई ते गईच', तारे तोडणे, 'घोड्याचं गाढव थोडीच होणार', 'घशात फाटं घालून ओरडणे', 'परसाकडला नाही होत पैसे' इ. मधून कोकणी जीवनदर्शन घडते

स्वप्नरंजनात्मक ग्रामीण-प्रादेशिक कोकणी जीवनदर्शन घडविणारे पेंडसे स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाचे कादंबरीकार आहे. याच काळातील गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगुळकर हेही महत्त्वाचे प्रादेशिक कादंबरीकार आहे. मुर्डी-मुरुड-हर्णेच्या दिपस्तंभाजवळील अरबी समुद्राच्या बदरपट्ट्यातील लोकजीवनाचे कलात्मकदर्शन पेंडशांनी घडविले आहे.

## ६) गो. नी. दांडेकर

प्राचीन भारतीय संस्कृती मूल्यांवर गोनीदांची श्रद्धा आहे. प्राचीन भारतीय ग्रामव्यवस्था आणि समाजव्यवस्था उद्ध्वस्त होण्याचे दुःख हीच त्यांच्या लेखनाची प्रेरणा आहे. 'बिंदूची कथा' (१९४७), 'तुडवलेलं घरकुल' (१९४८), आणि सिंधुकन्या या प्रारंभीच्या कादंबऱ्यानंतर 'शितू' (१९५३), 'पडघवली' (१९५५), 'पवनाकाठचा धोंडी' (१९५५), 'पूर्णामायेची लेकरं' (१९५८), 'माचीवरला बुधा' (१९५८), 'जैत रे जैत' (१९६५), 'रानभुली' (१९७८), 'वाघरु' (१९७९) या कादंबऱ्यांमधून त्यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण-प्रादेशिक जीवनचित्रण केले आहे. तसेच ग्रामीण-प्रादेशिक आणि ऐतिहासिक अशा एकूण एकोणतीस कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहे.

*८.* ***'पडघवली'*** ही त्यांची लोकप्रिय कादंबरी आहे. कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र अंबूवहिनी ही कथा सांगते. जिऊवाआत्याने सांगितलेला 'पडघवली'चा इतिहास आणि अंबूला पडघवलीत आल्यानंतर आलेला अनुभव ती जसा सुचेल-स्मरेल तसा सांगते. त्यामुळे कादंबरीच्या कथानकामध्ये विस्कळीतपणा जाणवत असला तरी प्राचीन समाजव्यवस्था कशी कोलमडली हे त्यातून स्पष्ट होत जाते.

शिवाजी महाराजांच्या राजवटीमध्ये 'शिद्दी'च्या चाचांनी धुमाकूळ घातला होता. स्त्रियांना अब्रू वाचविणे अवघड झाले. त्यावेळी शेणवी किल्लेदारांकडून मदत घेऊन केशभटाने चाचांचा बदोबस्त केला. शेणवीने केशवभटाला बक्षीस देऊ केले. तेव्हा त्याने फक्त घोंगडीभर जागा मागितली आणि घोंगडीच्या सुताने मोजलेल्या जागेवर

गाव बसविले. त्याचे नाव 'पडघवली'. केशवभटाच्या नातवाची सुन होऊन 'अंबा' पडघवलीत आली. सासरा राघोभट आणि त्याचा गडी गेंगाण्या यांनी श्रम करुन बागा बसविल्या. जंगल तोडताना गेंगान्याने आवळीच्या झाडावर घाव घातला असता तिच्यातून रक्त बाहेर येऊ लागले. त्याठिकाणी आवळीमातेचा पार बांधला. त्याचप्रमाणे सर्पाच्या गंडमाळा कापल्या. मुसलमानांचा दरोडा आला असता गेंगाण्याने सर्वांना ठार मारले. त्यानंतर आंब्याच्या झाडावरुन खाली पडून त्याचा मृत्यू झाला. शिवरामभट आणि राघोभट यांच्यात सनदेवरुन आणि वाटणीवरुन वाद झाला तेव्हा रामशास्त्री प्रभूण्यांच्या सांगण्यावरुन पुण्यात पेशव्यांच्या दरबारात राघोभटाने दिव्य करुन सनद मिळविली. शेणवी किल्लेदार लोणचांब्यावर राहून पडघवलीचे रक्षण करुन लागला. राघोभटांचा मृत्यू झाला. असा पूर्वेतिहास अंबू सांगते. ब्राह्मणांचे बारा घरे, सड्यांवरील कुळवाडे आणि अन्य लोकांनी 'पडघावली' आनंदाने नांदत होती, परंतु पुढे व्यंकूसारख्याच्या खलवृत्तीमुळे तिच्या ऱ्हासाला प्रारंभ झाला.

व्यंकूने गिऱ्होबाचा आंबा उतरविला. विधवा बावलीच्या बाळंतपणाचा फायदा घेऊन महादेव खोताचे मन जिंकले. अक्कीवर अतिप्रसंग केला. तिने जीव दिला. कुशात्याचा मृत्यू झाला. व्यंकूला वठणीवर आणू शकणाऱ्या गुजाने गुरुदिक्षा घेतली. व्यंकूने मयत कुशात्याच्या कोऱ्या कागदावर अंगठा घेऊन तिच्या इस्टेटीचा मालक झाला. हैदरचित्राच्या नबीनं सिमेंट बंधारा घालून पडघवलीतील बांगेचे पाणी तोडले. पुरुष त्याच्या बंदुकीला घाबरले तेव्हा कुळवाड्याच्या मदतीने अंबूने तो बंधारा फोडला. वेड्या रंग्याला सुधारवण्यासाठी गुजाने त्याच्यावर अनेक प्रयोग केले. तो सुधारला. शाळेत जाऊ लागला. तेव्हा गुजाने व्यंकूकडे रंग्यासाठी कुशात्याची इस्टेट मागितली. शारदा-व्यंकूच्या व्यभिचारामुळे आंधळ्या भिऊ आबाने जीव दिला. व्यंकूने वृक्षतोड करुन कोळसा विक्रीचा धंदा करुन 'पडघवली' उजाड केली. महादेव आणि व्यंकूने पातीमध्ये आंबे खरेदीविक्रीचा व्यवहार सुरु केला. परस्पर सर्व आंबे विकून व्यंकूने जहाज बुडाल्याचे जाहीर केले. तेव्हा महादेवने व्यंकूला जमीन गहाण देऊन कर्ज घेतले आणि आंब्यावाल्याचे पैसे दिले. त्यातच त्याचा मृत्यू झाला. पाटात आणि बांधावर व्यंकूने खेकडे सोडले. पाटाची चाळण झाली. बागांना पाणी मिळेनासे झाले. शारदेचा व्यभिचार वाढला. तिच्याकडे दापोलीहून लोक येऊ लागले. एका तरुणाचा खून झाला. त्यानंतर अंबूच्या सांगण्यावरुन तिने कायमचे गाव सोडले. हनुमानजयंती निमित्ताने गावकरी एकत्र आले. परंतु पार्ट्यापार्ट्यामध्ये वाद होऊन व्यंकूने गुजा आणि अंबूच्या संबंधाबद्दल जाहीरपणे वाच्यता केली. गुरुदक्षिणा बाजूला सारुन गुजाने व्यंकूचा हात मोडला. जोरदार मार दिला. गुजावर खटला भरला गेला. परंतु अंबूला कोर्टात साक्षीला यावे लागू नये म्हणून गुजाने सर्व आरोप मान्य केले. त्याला नऊ महिन्यांची सक्तमजूरी झाली. व्यंकू आणि सुलेमानच्या छातीवर 'गिरोबा' बसू

लागला. शेवटी व्यंकूने जीव दिला. मोठे वादळ झाले. त्यानंतर अंबूने गाव सोडण्याचा निर्णय घेतला. परंतु गिरोबाच्या 'सामक्षा' झाल्याने आणि गावावरील प्रेमापोटी तिने निर्णय बदलला. ती बंदरावरुन माघारी आली. अशा घटना प्रसंगातून कादंबरीचे कथानक आकार घेते.

अंबूवहिनी निवेदन करीत असली तरी तिच्याप्रमाणे 'पडघवली' एक पात्र आहे. या संदर्भात विजया राजाध्यक्ष लिहितात, "..... ती कहाणी जितकी अंबूवहिनीची आहे तितकीच पडघवलीचीही आहे. सांकेतिक पद्धतीने बोलायचे तर अंबूवहिनीप्रमाणेच 'पडघवली' हीही नायिका." ४६. अंबूवहिनी इतकेच पडघवलीला येथे महत्त्व आहे, नव्हे पडघवलीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. ही कहाणी 'पडघवली'ची आहे, तशी अंबूवहिनीचीही आहे. त्या दोघी एकमेकीत गुंतलेल्या आहेत. त्यामुळे स्वतःइतकेच ती पडघवलीबद्दल सांगते. हे गाव कादंबरीत एक पात्र म्हणून जिवंत झाले आहे. 'पडघावली'तील दंतकथा, लोकगीत, सणसमारंभ, उत्सवातून सामूहिक जीवनाचे दर्शन घडते. या सर्वांचा लोकमानसावर परिणाम झाला आहे. अंबू खोतीण म्हणूनच लेखकाने जिवंत केली आहे. लग्न होऊन आठव्या वर्षी ती पडघवलीत येते. गावातील वैभवाने ती बावरते. नंतर मात्र पौढ होते. गावावर निरपेक्ष प्रेम करते. माणसांची सेवा करते यातून तिची सेवाभावी, त्यागीवृत्ती दिसते. ती समंजस, अगतिक, सोशीक आणि झुंजार आहे. अंबूच्या व्यक्तिमत्त्वाचा तेथील समाजजीवनावर परिणाम होतो. जिअुआतेकडून कर्तबगारीचा वारसा घेतल्याने ती शांत, संयमी, परोपकारी आणि उग्ररुप घारण करणारी अशी घडली आहे. नवरा दुबळा असल्याची जाणीव झाल्यामुळे ती अधिक जबाबदारीने वागते. गावच्या शीलरक्षणासाठी शारदेला गाव सोडायला सांगते. आक्कीची बाजू घेते. 'पडघवली'वरील प्रेमामुळे ती गाव सोडण्याचा निर्णय बदलते.

महादेव हा सज्जन, कर्तृत्वहीन, दुबळा खोत आहे. व्यंकूवरील विश्वासाने त्याची विवेकबुद्धी हरवलेली दिसते. आक्की प्रकरण, रंग्याला गुजाने संभाळणे, आंब्याची खरेदीविक्री या प्रसंगी तो व्यंकूवर अधिक विश्वास ठेवतो. बायकोला तो समजू शकत नाही. गुजावर मात्र त्याचे प्रेम आहे. आयुष्यात एकदाच तो बाणेदारपणे वागतो. ते म्हणजे कर्ज काढून आंबावाल्यांचे सर्व हिशोब पूर्ण करतो. त्यातच शक्तिपात होऊन त्याचा मृत्यु होतो.

गुजा हा महादेवचा अफाट-अचाट मित्र आहे. तो साहसी, धाडसी, निर्भीड, भाबडा, सहृद्य, निर्स्वार्थी निरपेक्षपणे सर्वांवर प्रेम करणारा आहे. व्यंकूवर त्याचा राग असतो. कारण तो रंग्याची इस्टेट खोटेपणा करुन मिळवितो. कोर्टात जाऊन ती इस्टेट परत मिळवितो. अंबू-गुजा अनैतिक संबंधवर व्यंकू बोलतो तेव्हा गुरुची दिक्षा विसरुन त्याला चोपतो. कायमचा आजारी पडून व्यंकू आत्महत्या करतो.

व्यंकू हा बुद्धिमान आणि स्त्रीलंपट, लबाड, स्वार्थी, खलनायक आहे. 'स्वभावात दुष्टपणा नसता, तर सगळी पडघवली त्यांनी सोन्यानं मढवून काढली असती, पण......'' (पृ. ३२) असे अंबूवहिनी म्हणते. शारदेशी अनैतिक संबंध, आक्कीला बदनाम करणे, आंबे खरेदीविक्रीत पैसे खाणे, गिऱ्होबाचा आंबा उतरविणे यासारख्या एकामागून एक भानगडी करतो. शेवटी गिऱ्होबा छातीवर बसू लागतो म्हणून आत्महत्या करतो.

केशवभट हा चाच्यांचा बंदोबस्त करणारा, शेणव्याकडून घोंगडीएवढी जागा मागून 'पडघवली' वसवितो. शूर, निश्चयी, चतुर, हुशार, पराक्रमी, सामर्थ्यशाली, कर्तृत्ववान, निस्पृह पडघवली वसविणारा मूळपुरुष होता. त्याचा नातू राघोभट कष्टाळू, श्रद्धाळू, गावच्या रक्षणासाठी झटणारा, दिव्य करुन पेशव्यांकडून सनद मिळविणारा, नागाच्या गंडमाळा कापणारा, गेंगाण्याला धाकटा भाऊ मानतो. त्याच्या मृत्युनंतर त्याचे स्मरण म्हणून मारुतीमंदी बांधतो. 'गेंगाण्या' राघोभटाचे कुळ आहे. तो धसमुसळ्या, मेहनती आणि फटकळ आहे. खोतावर श्रद्धा असलेला, मुसलमानांना ठार मारणारा, श्राद्धासाठी आंबे काढताना झाडावरुन पडून मरतो. चिअुआत्या, आंबूची सासू या जुन्या पिढीच्या प्रतिनिधी आहेत. शिवरामभट, कोंडूभट, आंधळा भिऊआबा, सुलेमान नाखवा, नबी, हैदरचाचा, कुशाआत्या, रंग्या, यादोनाना, यादोनानी, बनूवन्स, भिअुआबा, शारदा, येसदा, हरी, आबा, दुर्गा, कीर्तनकार बुवा, रामशास्त्री, गेंगाण्याच्या बायका आणि अन्य गौण व्यक्तिरेखा चित्रणातून समूहजीवन दर्शन घडते. दैवत कथामधील पात्र उदा. शेणवी किल्लेदार, अश्रू ढाळणारा नाग, गिऱ्होबा यांना लेखकाने जिवंतरुप दिले आहे.

कादंबरीत लोकजीवनावर प्रदेश आणि निसर्गाचे संस्कार झाले आहेत. लोकजीवनाचा अविभाज्य भाग म्हणून प्रदेश आणि निसर्ग पात्ररुप धारण करते. डॉ. दादा गोरे यांचे आकलन या संदर्भात महत्त्वाचे वाटते. ते लिहितात, ''..... निसर्गाची सूक्ष्मतिसूक्ष्म बारकाव्यांनी केलेली वर्णने म्हणजे निसर्गाला वास्तवरुपात उभे करण्याची खास शैली होय. दिघे यांच्या 'सराई' कादंबरीतील निसर्ग प्रणयाला पार्श्वभूमी म्हणून आलेला आहे. तर पेंडसे यांच्या कादंबऱ्यातून आलेला निसर्ग स्वप्नरंजनाला पूरक म्हणून आलेला आहे. दांडेकरांच्या कादंबऱ्यांतून आलेला निसर्ग आशय आणि अभिव्यक्तीचा एक अपरिहार्य भाग म्हणून आलेला आहे......'' ४७. यावरुन प्रदेशनिसर्गवणने अधिक स्वाभाविकपणे आली हे स्पष्ट होते. प्रस्तुत कादंबरीत उत्तर रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळपट्टा लेखकाने जिवंत केला आहे. कुंभ्याची नि केंकळीची झाड, साग, हिरडी, पोफळी इ. झाडे. तगरीची फुले, आमसुलं, साठं, कडवे वाल, गरे, आंब्याची आंबोशी इ. वर्णन प्रदेशविशिष्ट आहे. कोकणी माणसाच्या दैनंदिन जीवनाचे चित्रण केले आहे.

"दुपारची जेवणं झाली की निवडणं टिपणं निघायची, कामं काय ज्या त्या दिवसांत जी ती हजार प्रकारची. वाळांच्या दिवसात गडी वाळांचे भारे आणून टाकायचे, नि मग आम्ही सगळी शेंगा काढायला बसायचो. वाळक्या वेगळ्या, ओल्या वेगळ्या, ओल्या लगेच सोलायच्या नि सगळं झालं की मग फोलपटं, वेल, सगळं म्हशीच्या पुढं जायचं.

पोफळीची पेंड येऊन पडली अंगणात की मग पोफळं काढायची. लगेच विळ्या आणून माणसं सोडे काढायला बसायची. मला काही मेलं जमेना तें....." (पृ. ५८)

ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणारे निसर्गचित्र रेखाटले आहे. निसर्गाला येथे व्यक्तित्व लाभले आहे. मानवी जीवनावर प्रभाव गाजविणारा हा निसर्ग आहे. पाण्यासाठी नबीने बांधलेला बांध अंबू आणि कुळवाड्यातील स्त्रिया फोडतात. त्याचप्रमाणे पडघवलीत आलेल्या, बागा पाहून हुरळलेल्या अंबूच्या मानसिकतेनुरूप आलेले निसर्गचित्र पहा.

"मला फार आनंद झाला. मग मी बागभर हिंडल्ये. पाणी पिऊन उतल्यामातल्या केळी पाहून मन अगदी प्रसन्न झालं. माहेरी सटीसहामाशी कधीमधी केळीचं एखादं पान द्रिष्टीस पडायचं. नि हिंत कुणी ढुंकूनसुद्धा पाह्यचं नाही केळीच्या पानाकडे. गड्यांनासुद्धा जेव्हा सासूबाई केळीच्या कोवळ्या लुसलुशीत आगोतळीवर भात वाढायच्या तेव्हा माझा जीव अगदी थोडा थोडा व्हायचा.

पोफळीच्या झाडाचा देखणेपणा तर मला कित्ती तरी दिवस अपूर्वाईचा वाटायचा. नाजूक, सडसडीत इवल्याशा वाऱ्यानं डुलणारी पोफळ मला अगदी माझी बहीणच वाटे. आमच्या बागेतल्या जुन्या चारसहा पोफळी मामंजींनी तोडली तेव्हा तर मी रडल्ये सुद्धा !" (पृ. ५३)

उजाड झालेल्या 'पडघवली'च्या निसर्गाचे चित्र पहा.

"मेल्यांनो हीच का पडघवली ? का पडघवलीचं भूत हे ? सगळ्या ओसाड बाग नि उदासवाणी घरं ! खरं वाटेना मला..... तो बांध पऱ्ह्याचा, ढोपरभर पाणी उरलयं त्यात. तो बाकीचा पऱ्ह्या. मागं गंगेसारखा वाहायचा. नि आता झाल्यै त्याची सरस्वती. ते केवढाले हत्तीसारखे धोंडे मात्र आहेत जागच्या जागी......" त्याच्या पलीकडे ती आमची बाग ! नको ते पाहणं ! एका पिढीत एवढा फरक ! पडघवलीत आल्ये तेव्हा काय होतं नि आता काय राह्यलय ?" (पृ. २०९)

कादंबरीच्या अखेरी वादळाचे केलेले वर्णन (पृ. २१२ ते २२०) 'पडघवली'च्या लोकजीवनावर परिणाम करणारे असेच आहे. निसर्ग आणि माणूस येथे वेगळा करताच येत नाही.

कादंबरीच्या प्रस्तावनेत लेखकाने म्हटले आहे, 'पडघवली' ही 'कादंबरी" नव्हे; ते एका नष्ट होऊ घातलेल्या खेड्याचे शब्दचित्र आहे."

कारखाने आणि उद्योगधंदे यांचे केंद्रीकरण झाल्यामुळे खेड्यातील नवसर्जनशील

मनुष्यशक्तीचे शहरात जे विलीनीकरण होत आहे, ते भयानक आणि विचारी माणसाला चिंतीत करणारे आहे. 'पडघवली' या सर्व मरगळ आलेल्या खेड्यांची प्रतिनिधी आहे.'' (प्रस्तावना पृ. १) औद्योगिकरणामुळे जे परिवर्तन आले, त्यामुळे खेडी उद्ध्वस्त होऊ लागली. याचे दुःख लेखकाला होते. त्याचे वास्तव चित्र त्यांनी रेखाटले आहे. प्रा. स. शि. भावे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना, ''एका खेड्याचं वास्तवचित्रण मी त्यात केलेलं आहे.'' ४८. असे म्हटले असले तरी माणसांच्या जीवनमूल्यात झालेल्या बदलामध्ये खेड्यांच्या पडझडीचे कारण सापडते. आर्थिक विवंचनामुळे परंपरागत जीवनाशी विसंगत-विसंवादी असे लोक वागू लागले. त्याच्या नीतिकल्पना बदलल्या. माणसातील माणुसकी-समूहभावना नष्ट होऊ लागली. व्यंकूसारखा माणूस गिऱ्होबाचा आंबा उतरवितो, शारदा व्यभिचार करते, यातून वाढत्या आर्थिक गरजा आणि जीवनाकडे भोगवादी दृष्टीने पाहण्याची नवी विचारसरणी दिसते. हे वास्तव जसे दिसते त्याचप्रमाणे पारंपरिक गावगाडा, त्यातील एकजूट आणि पाट्यांचे वाद यातून समूहजीवन दर्शन घडते. अंबू म्हणते, ''माज आलाय सगळ्यांना. चांगलं खांतपिंतं कोकण बघवेना. जसं अंगावर आलं एकेकाच्या. उतले, मातले - माडी प्यालेल्या कुळवड्यासारखे. नव्हती भांडणं, ती उकरुन काढली. जुनी वैरीची भुतं धूप घालून पुन्हा जागती केली. वादले. मारामाऱ्या केल्या. कोर्ट झाली. कचेऱ्या झाल्या. अगदी हायकोडताचे उंबरेसुद्धा झिजवले मेल्यांनी नि आता गावचा मसणवटा करुन पांगलेत चहू दिशांना वाऱ्यावर ! (पृ. ३३) पारंपरिक गावगाडा कसा मोडकळीस आला हेच दांडेकर यातून सांगतात. यापूर्वी मात्र खेड्यातील माणसं एकमेकांना मदत करीत होती. एकमेकांना समजून घेत होते. आदराची प्रेमाची भावना होती, हे लेखक कुशात्याकडील उद्यापनाच्या निमित्ताने सांगतो. ग्रामस्थांमध्ये एकविचार होती. उधार उसणे देण्याची परंपरा होती. ''दत्तूला म्हणावं, तुझ्या मांडवावर पडवळं झाल्यैत मोठीला. माझ्याकडे ब्राह्मण जेवाच्चेत रे ! काढून धाड तेवढी''

''अच्या, जा पळ. ........जिऊ आतेला सांग, उद्या श्राद्ध आहे म्हणावं आमच्या घरी. तुमच्या घरापुरतं दूध ठेवून बाकीचं हिकडे धाडायला सांगितलाय म्हणावं आईनं.'

''बन्ये, जा शेजारी नि सांग, शुक्रवारची सवाशीण सांगितलेयै म्हणाव अंबा वहिनीला तुझ्या. नि हे बघ, भाजी पाठवा म्हणावं काही असली तर. '' (पृ. ६५) अशाप्रकारे पडवळ, दूध, भाजी, गाईचे तूप यासारख्या वस्तू पाठविल्या जात होत्या. कोकणी माणसांची एकजूट आणि श्रद्धाळूवृत्ती यातून दिसते. दुर्गाच्या लग्नाच्या तयारीसाठी पडघवलीतील सर्वजण कामाला लागतात. रुसतात. फटकळपणे बोलतात परंतु कामाला मागे सरत नाहीत. यातून त्यांची कष्टाळू वृत्ती दिसते.

पाटाचे पाणी हा कोकणी माणसांचा खास जिव्हाळ्याचा विषय आहे. बागांना

पाणी मिळेनासे झाले तर सर्व विरोध विसरुन ते एकत्र येतात. भांडतात. नबी पऱ्ह्यात सिमेंट बंधारा घालून पडघवलीचे पाणी बंद करतो, तेव्हा सर्वजण खोताच्या घरी जमतात. नबीला समज देण्याविषयी चर्चा करतात. परंतु त्याच्याजवळ बंदूक असल्यामुळे पुढे होण्यास कोणीही तयार होत नाही. उलट सातमायने आज्ञा केल्याचे अंबू कुळवाड्यातील स्त्रियांना सांगते. तेव्हा सर्व स्त्रिया देवाज्ञा म्हणून सिमेंटचा बांध फोडण्यासाठी जातात, यातून त्यांची सातमायवरील श्रद्धा दिसते.

मारामारी-संघर्षाला घाबरणारा कोकणी माणूस कोर्टकचेऱ्यांसाठी सर्वस्वाची होळी करायला तयार होतो. रंग्याच्या इस्टेटीसाठी गुजा कोर्टात जातो. तो म्हणतो, "...... आता शेंडी तुटो वा पारंबी तुटो - बाग विकावी लागली माझी तरी चालेल. पण कोर्टाच्या खोपा करता करता व्यंक्याच्या ढुंगणाला खटं पाडीन, तर मी नावाचा गुजा!" (पृ. १७४) गुजा-अंबू अनैतिक संबंधाबद्दल व्यंकू बोलतो तेव्हा गुजा त्याला बेदम मारतो. व्यंकू फौजदारी करतो. गुजाला नऊ महिन्यांची शिक्षा होते. यासारख्या घटनांतून लेखकाने कोकणी लोकांच्या कोर्टकचेऱ्या करण्याच्या वृत्तीवर प्रकाश टाकला आहे.

पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीचे शोषण होते. तिला समाजात नगण्य स्थान आहे. विचार कर्तृत्वाला किंमत नाही. त्याचप्रमाणे पुरुषाच्या व्यभिचाराकडे दुर्लक्ष केले जाते, परंतु स्त्रीच्या व्यभिचाराचा गावभर बभ्रा होतो. पुरुषांच्या व्यवहारामध्ये अंबूने बोलू नये असे महादेवला वाटते. व्यंकू आक्कीशी अतिप्रसंग करुन, उलट महादेव तिलाच व्यभिचारी समजतो किंवा व्यंकूने शारदेशी अनैतिक संबंध ठेऊन तिला वेश्याव्यवसाय करायला लावले. सद्या बावल्याच्या विधवा पत्नीच्या मजबुरीचा लोक फायदा घेतात. ती गरोदर असते त्याचा गावभर बभ्रा होतो.

जातीयतेच्या प्रश्नाला दांडेकरांनी ओझरता स्पर्श केला आहे. पारंपरिक गावगाड्यात हिंदू मुस्लिमांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. हैदरचाचा खोतांच्या घराण्याला मानतो. कोनाड्यात ठेवलेल्या वेगळ्या भाड्याने पाणी पितो. परंतु त्याच खोताच्या घराण्यातील सुनेचा जीव घेण्यासाठी नबी बंदूक घेऊन पुढे सरसावतो. यातून हिंदू-मुस्लिम संघर्षाला सुरवात झाली असे दिसते. याप्रमाणे गावामध्ये दोन गट पडले. त्यांच्यात संघर्ष होऊ लागले. हनुमान जयंती उत्सवाच्या निमित्ताने गोनीदांनी गावातील गटबाजीवर प्रकाशझोत टाकला आहे.

औद्योगिकरण आणि बदलती जीवनमूल्ये याचा समाजजीवनावर परिणाम होऊन खेडी उद्ध्वस्त होऊ लागली. औद्योगिकरणामुळे ग्रामीण जीवनात परिवर्तन आले असले तरीही त्यांच्या सांस्कृतिक जीवनात त्याप्रमाणात परिवर्तन झालेले दिसत नाही. लोककथा, दंतकथा, आख्यायिका, दैवतकथा, सणसमारंभ-उत्सव, श्रद्धा-अंधश्रद्धा यांचा लोकमानसावर परिणाम होत असतो. 'पडघवली' मध्ये लेखकाने या सर्व

गोष्टीचे कोकणी माणसाच्या जीवनावरील प्रभावाचे चित्रण करुन प्रादेशिकतेचा संस्कार घडविला आहे. कोकणी माणसाच्या श्रद्धाळू वृत्तीवर प्रकाश टाकला आहे. दुर्गाबाईची आख्यायिका (पृ. ३), पडघवली गावची कथा (पृ. ५-६), सातमायची आख्यायिका (पृ. ७), आवळीमाता (पृ. १४), गंडमाळा झालेला नाग (पृ. १५-१६), शेणवी किल्लेदाराचे भूत (पृ. ३१), बावेतील सोन्याच्या देवाची आख्यायिका (पृ. ४२-४३), प्रल्हादाची कथा (पृ. २१३), या लोककथा, दंतकथा आख्यायिकातून प्रदेश विशिष्ट लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लोकजीवनावर त्यांचा प्रभाव असलेला दिसतो. हिंदुची मुस्लिमांच्या बालेपीरावर श्रद्धा असलेली दिसते. आवळी अष्टमीला कुमारिकांना जेवायला घालणे, गिऱ्होबाला दहीभात ठेवणे, गिऱ्होबाच्या आंब्याचे फळ न तोडणे. रंगनाथ शहाणा व्हावा म्हणून कुशात्याने सोळा सोमवार करणे यातून त्यांचा परंपराप्रिय स्वभाव दिसतो. लोकांच्या अंधश्रद्धाचे चित्रण दांडेकर विविध दृष्टांत सामक्षातून करतात. जसरे, वारुळातल्या नागाने राघोभटाला दृष्टांत देणे, वनदेवता राघोभटाच्या स्वप्नात येते. म्हातारा किल्लेदार लोणच्यांब्यावर बसून गावचे रक्षण करतो. व्यंकूच्या जाघातून रंग्याला सोडविण्यासाठी गिऱ्होबा गुजाला दृष्टांत देतो. अंबूला सातमाय बांध फोडण्याची आज्ञा करतात. व्यंकू-सुलेमानच्या छातीवर गिऱ्होबा बसतो. गिऱ्होबा अंबूला दोनदा सामक्षा देतो. व्यंकूची बायको फीट येऊन लुळीपांगळी होण्यास गिऱ्होबा कारणीभूत होता. या सर्वांचा पगडा कोकणी लोकजीवनावर आहे. त्याचप्रमाणे डोहाळजेवण, लग्नाची पूर्वतयारी, हनुमानजयंती उत्सव यातून कोकणी लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. उदा.

अंबूच्या डोहाळजेवणाच्या वेळी बायका ओव्यागीत म्हणतात. तयारी करतात.

''पांढरं पातळ नेसावा. पांढरी चोळी घाला. दुधाची बासुंदी, या बासुंदीत केशर नाही घालायचं हो ! चांदण्यातलं करायचय ना ? सगळं पांढरं पाहिजे चांगण्यासारखं. झालंच तर करंज्या करा, बोटव्याची खीर करा. मोगरीच्या वेण्या घाला. चार बायका बोलवा.....'' (पृ. ८) डोहाळजेवणाची तयारी प्रदेशाचे संस्कार घेऊन आली आहे. तर पुढील ओव्या प्रदेशविशिष्ट आणि पडघवलीची परंपरा सांगणाऱ्या आहेत.

पडघवली गाव । गेंगाण्या नी राधोभट  
पाठीला दिला पाठ । बंधुराया ॥  
पडघवली गाव । सतीच्या ओट्यावरी  
भर उन्हाच्या पारी । पिंपळ डोले....... (पृ. ६०)

दुर्गाच्या लग्नाच्या तयारीसाठी आलेल्या स्त्रिया ओव्या म्हणतात, त्यातून कोकणी माणसांची कुलदैवतावरील श्रद्धा दिसते. उदा.

''आधी मूळ धाडा । चिपळूण गाव ।  
पर्शराम देव । आमंत्रण ॥

आधी मूळ धाडा । दुरीचिये दुरी ।
बाई जोगेश्वरी । कुलीचिये ।।
आधी मुळ धाडा । कोकणची राखणी ।
देवी दुर्गा राणी । मुरुडासी ।।
आधी मुळ धाडा । भाळी कुंकवाची चिरी ।
दाभोळ बंदरी । अंबाबाई
आधी मुळ धाडा । घुंगराची गाडी
शालजोडीचा वरीडी । गणराज ।।'' (पृ. ८६) किंवा
''भिंती सारवोनी । वर काढील्या जिवत्या ।
तुझ्या लग्नाच्या मालत्या । दुर्गाबाई ।
भिंती सारवोनी । वरि काढियेली फुले ।
तुझ्या लग्नाचे गव्हले । दुर्गाबाई
भिंती सारवोनी । वरी काढीले ताम्हन
तुझ्या लग्नाचे सामान । दुर्गाबाई ।। (पृ. ८७)

या लोकगीतांमधून कोकणी संस्कृतीचे दर्शन घडते. तसेच केळवण, आहेर आणि मंगळागौर तसेच मारुतीरायाच्या उत्सवाच्या निमित्ताने झालेले कीर्तन आणि नाटक यासर्वांमधून कोकणी लोकमानसाचे दर्शन घडते.

निसर्गावर आधारलेले लोकमानस 'पडघवली'त दिसते. या कादंबरीतील प्रादेशिकतेचा ठसा म्हणी, वाक्प्रचार, शिव्या आणि बोलींच्या लकबीतून उमटलेला दिसतो. कादंबरीचे निवेदन आणि संवाद कोकणी बोलीतून आलेले आहेत. अंबू हे निवेदन करते. व्यक्तिपरत्वे ही बोली बदललेली आहे. जसे ब्राह्मण समाज आणि कुळवाडी समाजाच्या पद्धती आणि वागणुकीच्या चालीरीती वेगवेगळ्या असलेल्या दिसतात. गुजा आणि जिऊआत्या संवाद (पृ. ८७) आणि येसदा आणि जिऊआत्याच्या संवादातून (पृ. ८९) हे वेगळेपण जाणवते. संवादातून पात्राच्या स्वभावाचे लेखकाने दर्शन घडविले आहे. जसे, महादेव-गुजा-अंबूचे संवाद (पृ. ११३) यांच्यातून तिघांच्या स्वभावाचे दर्शन घडते. पात्रानुरुप कोकणी बोलीतून संवाद आल्याने ते अधिक वास्तव वाटतात. स्त्री-पुरुषांच्या बोलण्यातील ठसका त्यातून दिसतो. जसे, राघोभट-गंगाप्पा संवाद किंवा कुशात्या-जिऊआत्या संवाद तसेच अंबू आणि कुळवाड्यातील बायकांचे संवाद वैशिष्ट्यपूर्ण आहे. रांडेच्याने, शिंच्या, झंव, साठी ढुंगण यासारख्या शिव्या आशयानुरुप आल्याने अश्लील वाटत नाही. व्हायच्चेय, जाताहेत, हसताय, घालतंय, रागवाच्ची, अगो, गो या कोकणी लकबी वास्तवात भर घालतात.

म्हणी-वाक्प्रचारातून प्रादेशिकता स्पष्ट दिसते. उदा. 'जो दुसऱ्यावरील विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला', 'कोळसा उगळावा तितका तो काळा', 'आपलं घर नि

शेणारी भर', 'सांगितल्या कामाचा नि पाजल्या पेजेचा', 'माकड गेल लुटी आणल्या दोन मुठी', 'ढुंगणाला नाही लंगोटी नि पाव्हण्याला पितांबर नेसविणे', 'आयजीच्या जीवावर बायजी उदार', 'आज धर्मी तर उद्या कर्मी', 'ज्याचा कुणी नाही त्राता, त्याचा सगळा गाव दाता', 'नागव्यांच्या गावी पीतांबरची पेठ', 'आज बाई सारवा, उद्या बाई तारवा', 'करावं तसं भरावं', 'दसकी लकडी नि एकका बोजा', 'आड जिभेनं खाल्ल, तर पडजीभ टुकत बसली', त्याचप्रमाणे काही उपमा-प्रतिमा समाजवास्तवाचे दर्शन घडवितात. उदा 'उनाड वासरासारखा बारा गाव उधळत असायचा', 'ढग गडगडल्यासारखा घोरायचा म्हणे', 'मोठ्यानं गायला लागली की भात भरडल्यासारखं वाटायचं', 'गिधाडाने खाल्लेल्या ढोरासारख', 'एखाद्या बाईचे केस गळावे नि इवलीशी अंबुडी यावी हाताला, तसं झालंय.'

कथानक-प्रदेश-निसर्ग, व्यक्तिचित्रण, समाजजीवन, सांस्कृतिक जीवन आणि भाषाविशेषांचा विचार करता 'पडघवली' ही कोकणच्या पार्श्वभूमीवरील लोकजीवन दर्शन घडविणारी वेगळ्या वळणाची कादंबरी आहे.

### ७. जयवंत दळवी

### *(१) ''सारे प्रवासी घडीचे''*

जयवंत दळवी यांनी 'चक्र', 'स्वगत', 'सारे प्रवासी घडीचे' (१९६४), 'महानंदा' (१९७०), 'धर्मानंद' (१९८०) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या 'सारे प्रवासी घडीचे' या कादंबरीचा अभ्यास येथे प्रादेशिकतेच्या दृष्टीने महत्त्वाचा वाटतो. या कादंबरीचे कथानक १९३० ते १९४० या काळातील आहे. बालपण गावात घालविलेला आपू शिक्षण आणि त्यानंतर नोकरीच्या निमित्ताने गाव सोडतो. कौटुंबिकदृष्ट्या स्थिरस्थावर झाल्यानंतर एकटाच गावी येतो. गावात परिवर्तन झाल्याचे त्याच्या दृष्टीस पडते. त्यामुळे अस्वस्थ होतो. गावातील घर काळाच्या ओघात नष्ट होईल अशी त्याला भीती वाटू लागते. आपटे भटजींच्या घरचा डबा खाण्याची त्याच्यावर वेळ येते. त्यानंतर त्याला गत जीवनातील घटना-प्रसंग-व्यक्तींच्या आठवणी येतात. त्या आठवणीतून कादंबरीचे कथानक आकार घेते. आपूला मुंबईला धुमश्चक्रीतही परकेपणा आणि स्वतःच्या जन्मस्थळीसुद्धा परकेपणा जाणवतो. भोवतालच्या माणसात आपुलकीने मिळून-मिसळून स्थिर राहून, नाती, निष्ठा, ओढ यांचे धागे जुळविण्याचे आनंदी दिवस संपले. ती सारी माणसे, सारे प्रसंग, त्या गमती या सर्वांना आपण मुकलो आहोत असे आपूला वाटत राहते. प्रस्तुत कादंबरीच्या आवरणातील प्रस्तावना यादृष्टीने पाहणे महत्त्वाचे वाटते.

''तऱ्हेवाईक माणसांच्या व्यक्तिचित्रांचा एक प्रदीर्घ पटच 'सारे प्रवासी घडीचे' मध्ये दळवींनी उलगडीत नेला आहे. वेताळासारखा उग्र पावटे मास्तर, आणि

स्थितप्रज्ञ दारु दुकानदार अंतोन प्रेस्ताव, गांधीवादी डॉ. रामदास आणि लोकल बोर्डात निवडूनह आलेला 'बिचारा' केशा चांभार, परस्परांशी तहह्यात स्पर्धा मांडणारे आबा आणि बाबूली, दशावतारवाला चिवशिंगी आणि ढब्बू पैसा खणकन् वाजवून घेणारा दुकानदार नायक....... एक की दोन किती नाव सांगावी ? शिवाय ही माणसे सुटेपणाने येत नाहीत. रवळनाथाचे देऊळ आणि त्याचा उत्सव, प्राथमिक शाळा, दारुचे छप्पर, रविवारचा बाजार, मोटार-सर्व्हीस, होळीचा सण, गंगू भाविणीचे घर यासारखी स्थळे आणि प्रसंग यांची जिवंत चौकट त्यांना लाभली आहे. अगदी स्वाभाविक वातावरणात निःसंकोचपणे, आपापल्या सहजप्रवृत्तीप्रमाणे वागणारी ही माणसे आहेत. त्यामुळे उपरा विदुषीपणा त्यांना चिटकवण्याची लेखकाला गरजच पडत नाही. "अशी एक एक माणसे ! जगावेगळी जगली, जगावेगळी मेली ! भरड्या जमिनीत जन्मली आणि मुरमासारखी खडबडीत राहिली."

या चित्रांना विशेष गहिरेपणा येतो तो आणखी एका कारणामुळे. एका इतिहासजमा समाजरचनेत वावरुन गेलेली ही माणसे यापुढे आपल्याला पाहायला मिळणार नाही ! काळाच्या ओघात गावाची जुनी घडी विस्कटली आणि नवी झाली. पण लेखकाला पिंड वाढलेला आहे त्या जुन्या परंपरेत. त्या मावळत्या परंपरेच्या पडझडीचे उदात्त पडसाद विनोदाच्या खळखळाटूनही दळवींनी वाचकाला ऐकवले आहेत. त्यांनी नेहमीची सफाईदार, सहज शैलीही इथे अंतर्मुख होते.

"म्हटले तर हे आपूचे आत्मचरित्र आहे, म्हटले तर व्यक्तिचित्रे आहेत, म्हटले तर विनोदी गप्पागोष्टी आहेत, म्हटले तर कादंबरी आहे. काहीही असले तरी पुन्हापुन्हा वाचावेसे वाटणारे आणि हसवता हसवता खिन्न करणारे हे एक अविस्मरणीय पुस्तक आहे." हा एवढा विस्तृत अभिप्राय नोंदविण्याचे कारण एवढेच की परिवर्तनकाळामध्ये स्वाभाविक जीवनाचा ऱ्हास झाला. सुसंगत कथानकाऐवजी अनेक व्यक्तिचित्रे रेखाटून लेखकाने ही पडझड दाखविली आहे. ही सगळी जगावेगळी माणसं आहेत. 'दीपावली' जुलै १९६२ च्या अंकातून 'जत्रेतील पात्रे' या नावाने प्रथम प्रसिद्ध झाली. नंतर 'सारे प्रवासी घडीचे' असे नामकरण करण्यात आले. मानवी जीवनातील क्षणभंगुरता लेखक यातून स्पष्ट करतो. नवनिर्मितीचे बीज अशा या भूमीत रुजणे, वाढणे अशक्य आहे. स्वतंत्रबुद्धी, वेगळे कर्तृत्व यांची ओळख बूज या माणसांना नाही. येथे कोणी नायक नाही, खलनायकही नाही, प्रत्येकजण दुसऱ्याहून वेगळा आहे.

'आपू' हा निवेदक असला तरी नायक नाही. आबा खोतांचा तो मुलगा. बालवयात खोतांचे वैभव आणि मानपान त्याने अनूभवले आहेत. परंतु गाव सोडून तो शहराकडे गेल्याने आपण गावाला मुकलो याची खंत त्याला वाटते. शहरातील बंद दरवाज्याच्या संस्कृतीचा त्याला विट येतो. विलक्षण एकाकीपण जाणवते. बायकोमुलांसह गावात

यावे, चूल पेटवावी अन्यथा एक दिवस खोताच्या घराला लोक विसरतील असे त्याला वाटते. शहरात आणि परिवर्तन आलेल्या खेड्यात त्याला एकाकी-परकेपणा जाणवतो.

'आबा खोत' हे निवेदकाचे वडील. गावचे आधारवड. प्रेमळ, सज्जन, दानशूर होते. त्यांच्या स्वभावात ईर्ष्या होती. वैराचा कैफ होता. पुरोगामी असा वर्तमानपत्रांनी छाप मारला असला तरी ते सनातनी, प्रतिगामी, कर्मठ, जातिभेद पाळणारे होते. समंजस, कर्तबगार, तितकेच जिद्दी आणि सूडबुद्धीने वागणारे असल्यामुळे केशा चांभाराला लोकल बोर्डाचा मेंबर करतात. चांभाराला स्पर्श केला म्हणून भ्रष्टाचार धुऊन काढतात. देवदिकांच्या कथा सांगून गावातील वाद गावात मिटवितात. परंतु बाबुलीशी असलेल्या वैरामुळे शक्ती, वेळ आणि पैसा खर्च करुन कोर्टात जातात. वकिलांचे घर भरतात. डॉ. रामदासांनी सहभोजनाचा कार्यक्रम निश्चित करताच कुळवाड्यांना महार-चांभार म्हणून पंक्तीला बसण्यास सांगतात. केस पांढरे झाल्याचे त्यांना दुःख होते.

'हेडमास्तर बागाईतकर' हा एक तऱ्हेवाईक माणूस. शुद्धलेखन आले म्हणजे विद्यार्थी आपोआप पास होतो असे ते समजतात. शिकविण्याच्या फंदात ते सहसा पडत नव्हते. इंग्रज सरकारला ते मायबाप मानतात. अमृतेमास्तर स्वातंत्र्यवीर नाहीत ना याकडे लक्ष देतात. बागाईतकर मास्तर जोपर्यंत शाळेत होते तोपर्यंत आबादी होती. नापास झालेली मुले त्यांच्या घरी जाऊन खूप रडली तर ती पास होत होती असे ते दयाळू प्रेमळ होते.

पावटे मास्तर हे तापट, शिस्तप्रिय, ब्रह्मचारी, कट्टर हिंदू, जातिभेद पाळणारे कर्मठ आहेत. महार, मांग चांभारांच्या मुलांना स्वतंत्र जागी बसवितात. सुपे, रोवळ्या तयार करायचे, गुरेढोरे फाडून खायचे सोडून शाळेत आल्याबद्दल ते त्यांना रागावतात. धाकाने ते शाळा सोडतील याची त्यांना खात्री असते. हिंदू विद्यार्थ्यांनी जाणवे घालणे सक्तीचे करतात. बाबुलीच्या घरात राहत असल्यामुळे आणि आपूस शिक्षा केली म्हणून आबा केशा चांभाराला लोकल बोर्डाच्या निवडणुकीत निवडून आणतो व शाळा तपासणी करुन सहा महिन्यांसाठी डिसमिस करतो. त्यानंतर मात्र पावटे मास्तर केशाला चांगलाच मार देतो.

बाबुली ही आबा खोताचा शत्रू. लहानसहान गोष्टींवरून वाद घालणारा, कोर्टकचेरी करणारा. नव्वदीतही पिळ कायम असलेला म्हातारा खलप्रवृत्तीचा नाही. तरीही संधी सापडेल तेथे आबाला कैचीत पकडतो. 'नरु' ही चौकस, चुणचुणीत स्वतंत्र बुद्धीचा, उपद्व्यापी आहे. पण उपद्रवी नाही. चांगल्याच्या हेतूने किंवा वाईटाची खोड मोडण्यासाठी त्याचे बहुतेक उद्योग निरागसपणे चालतात. तो आपूचा जिवाभावाचा मित्र. कुळवाड्याच्या कुळातील आहे. शिक्षण अर्ध्यावर सोडून देशभक्त होण्याचा तो प्रयत्न करतो. मिठाचा

सत्याग्रह करुन पोलीसांचा मार खातो. गोवामुक्ती आंदोलनात बेशुद्ध पडेपर्यंत मार खातो आणि इतर अनेक उद्योग करुन शेवटी काखेत कुबड्या अडकवून गावभर फिरतो. नरुची विधवा आई, पावट्यांकडे जाणारी तरुण विधवा दुर्गाबाय, आपूला शाळेत पाठऊ नये या मताची आपूची आजी, खिडकीत बसून जपमाळेचे मणी ओढणारी, येणाऱ्या जाणाऱ्यांच्या चौकशा करणारी निवाशिंगाची बायको कुरडी बाया इ. तऱ्हेवाईक स्त्रीव्यक्तीरेखा आहेत. तत्कालीन समाजजीवनामध्ये स्त्रीचे स्थान नगण्य होते. म्हणूनच या स्त्रिया अधिक जिवंत, ठसठशीत रेखाटल्या गेल्या नाहीत असे वाटते.

प्रादेशिक कादंबरी समूहचित्रणात्मक असल्यानये पात्रांची संख्या कादंबरीत अधिक असते. ही गौण पात्रे कथानकाच्या विकासास गती देतात. जसे बंडखोर स्वातंत्र्यवीर अमृतेमास्तर, नरुच्या आईला ठकविणारा, देवाचे नामस्मरण करणारा वामनदाजी, न्हानू कांबळी हा एक आबांचा कुळ, तो शिवराळ आहे. आबाचा तो बर्हिजी आहे. झिलू सोनसूरकर, शंकर रगजी, सोनू दुलाजी, भालू चिपकर हे दारिद्र्यात आबा खोताशी एकनिष्ठ असलेले तर बेरकी, हिकमती, लावालाव्या करणारा बाबुली-आबाचे वैर वाढविणारा शांता न्हावी. डॉ. रामदास हे सुधारणावादी, सामाजिक एकता प्रस्थापित करु पाहणारे सहभोजनाचा कार्यक्रम करुन जातिभेद समूळ नष्ट करण्याचे स्वप्न पाहणारे तऱ्हेवाईक पात्र आहे. ते सत्य अहिंसा हे तत्त्व मानतात. ते पुरोगामी आहेत. जिवा शिंगी हा नाटकासाठी आपला जन्म आहे व आपल्याशिवाय इतरांना नाट्यक्षेत्रातले काही ज्ञान नाही असे समजणारा तऱ्हेवाईक माणसाचा नमुना आहे. दशावतारी नाटकाचा सूत्रधार रंगेल आणि छंदीफंदी आहे. शेवंता भाविणीशी त्याचे संबंध आहेत. गोव्यापर्यंत त्याची कीर्ती पसरलेली आहे. त्याने पैसा मिळविला, खर्च केला त्याची खंत त्याला नाही. फक्त नाटकाला माणसं जमावीत ही त्याची इच्छा. सोनू शिंपी हा दशावतारी नाटकात स्त्री पार्ट करणारा आहे. तर दादू गुरव हा रवळनाथाचा पूजारी द्रौपदीवस्त्रहरण नाटकाचा प्रयोग करुन स्वतःचे वस्त्रहरण करुन घेतो. तात्या रेडकर हा एक निसर्गवेडा आहे. मुक्या प्राण्यांना भावना असतात असे मानतो म्हणून गावाच्या दृष्टीने हाफम्याड ठरतो, डोंबाऱ्यावर रागवणारा, रेड्यावरील पोरावर काठी उगरणारा, तात्याचा रेड्याने शिंगावर घेतल्याने मृत्यू होतो. खोटे कागदपत्र रंगविणारा नायनाय भाऊ, माडांची बोंड चोरुन दारु पिणारा बोंडचोर बाबल्या मडवळ, वस्तुविनिमय पद्धतीने माडी विकणारा पेस्तॅव, अमृतांजन रामजी, भावल्या किलींडर, रमण्या, रावजीनाना, सख्या होडावडेकर, झिलू केदार, केसूकाका, दिनक्या, गुंडू खाटीक, शकुनी नाबर, प्रेमवेडा व्यंकटेश्वर, विश्राम इ. अनेक तऱ्हेवाईक आणि विक्षिप्त माणसांचे चित्र लेखकाने रेखाटले आहे. त्यांच्या स्वभावावर प्रदेशाचे संस्कार झाले आहेत. दळवी वर्णन करतात, "पावसाच्या पुराबरोबर येणाऱ्या पाण्याशिवाय

गावात दुसरे पाणी नाही. तेसुद्धा पावसाळ्याबरोबर बेपत्ता. उन्हाळ्यात तर प्यायच्या पाण्याचीसुद्धा मारामार. त्यामुळे धड शेती नाही. शेतीची भरपाई करण्यासाठी कसला जोडधंदा नाही. त्यामुळे सर्रास दुष्काळी दारिद्र्य. मूळची अभिमानी माणसे गरिबीत खितपत पडलेली. त्यामुळे स्वभावात एक प्रकारच कडवटपणा खोलवर मुरलेला. मन नित्याचे असमाधानी आणि चरफडणारे ! मूळचे डोके कुशाग्र. पण ते कुठे गुंतवायला साधन नाही. त्यामुळे दुसऱ्यांच्या गोष्टीत, विशेषतः भानगडीत लक्ष घालणे, त्याच गोष्टींचा रवंथ करणे हे एरवी फुकट जाणारा वेळ घालवायचे एकमेव साधन ! कुणी नवखा माणूस आला, कुणी काही निराळे केले की आवाज मारुन चर्चा झालीच. तर मागोमाग टिंगल आलीच. चर्चेसाठी कुठे काही मिळाले नाही तर कुत्र्याने पुरलेले हाड उकरुन काढावे तसे काही तरी उकरुन काढले जाई ! (पृ. १३७) कोकणातील दुष्काळाचा परिणाम लोकजीवनावर झाल्याशिवाय राहत नाही. वेळ घालविण्यासाठी ते उचापती करतात.

दक्षिण कोकणातील देवगड बंदराजवळील वेंगुर्ल्याच्या आसपासच्या खेडेगावची पार्श्वभूमी कथानकाला लाभली आहे. येथे व्यक्तिच्या स्वभावैशिष्ट्यांतून लेखकाने प्रदेश जिवंत केला आहे. तसेच भेंडशी, माड, नारळ, खाजकुयली अशा वृक्षवेलींचा उल्लेख येतो. सिंधुदुर्ग किल्ल्याचा उल्लेख येतो. त्याचप्रमाणे गावाच्या "उशीकडे डोंगर पायाकडे समुद्र आणि अंगाखाली लाल मुरमाड माती" (पृ. १४५) असे प्रदेशाचे वर्णन लेखकाने केले आहे.

निसर्गवर्णनदेखील मानसिकतेनुरुप येते. जसे विषण्ण मनाने बोटीत बसलेल्या आपुला दिसलेला निसर्ग -

"आसपास अफाट सागर पसरला होता. दाट काळोखात पाण्याचे कवच कठीण आणि भयाण दिसत होते. जवळून एखादा दुसरा शिडाचा मचवा वेगाने चालला होता. काळोख्या रात्री एखादी चांदणी क्षीणपणे चमकावी तसा मचव्यातला कंदील प्रकाशाचा ठिपका टाकत होता. मचवा बोटीच्या प्रकाशात येताच आतले तांडेल वीत-दोन वीत आकाराचे दिसत होते........ वावभर लांबीचे हे मचवे या काळोख्या रात्री अजस्त्र मृत्युच्या छातीवर खेळत आहेत असे वाटले......." (पृ. १) किंवा

"किनाऱ्यावर शे-पन्नास बक्यांचा थवा पांढरे शुभ्र पंख फडफडवीत बसलेला असे." (पृ. ९४) असे लहान निसर्गवर्णन प्रदेशविशिष्ट आहे.

कादंबरीच्या आशयाचा जीवनांगाशी संबंध असतो. प्रस्तुत कादंबरीत लेखकाने विविध तऱ्हेवाईक व्यक्तिचित्रे रेखाटून समाजवास्तवाचे चित्र काढले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील कोकणी खेड्यात आलेले परिवर्तन पाहून आपुला गतजीवनातील घटना-प्रसंग आणि व्यक्तिंच्या आठवणी येतात. त्यातून तत्कालीन समाजाची कल्पना येते. खेड्यातील माणसांमध्ये जिव्हाळ्याची भावना होती. गरीब प्रामाणिकपणे वागत होते.

स्वामिनिष्ठा होती. त्याचबरोबर जातिभेद आणि विषमतेचेही लोकांना दुःख होत नव्हते. किरकोळ गोष्टीवर काथ्याकूट होत होता. कोर्टकचेऱ्या करण्याचा नाद होता. गावगाड्यात प्रत्येकाचे उद्योग ठरलेले होते. कनिष्ठ वर्गात व्यसनाधीनता होती. कोकणी माणूस शिव्याशाप देतो पण मारामारी करीत नाही. भावीण संस्था तेथे मूळ धरुन असलेली दिसते. देशावर पाटील, गोव्यात भाटकर त्याचप्रमाणे कोकणात खोतांचे प्रस्थ होते. कोकणातील ब्राह्मणदेखील मटण-मासे खातात हे प्रदेशविशिष्टच आहे. देशावरील ब्राह्मण (त्याकाळी) मटण-मासे खात नव्हते.

गरिबाचा प्रामाणिकपणा आणि धनिकांची मर्जी सांभाळण्याची वृत्ती लेखक वर्णन करतो. शिमग्याच्या उत्सवात आबांची अंगठी हरवती. ती परत मिळेल अशी आबांना खात्री होती. रगल्या महाराने अंगठी परत केली आणि त्याबदल्यात पायलीभर तांदूळ घेऊन गेला. जातिभेद-विषमतेचे दर्शन लेखक घडवितो. जसे, दशावतारी नाटक पाहताना ब्राह्मण बाकावर बसत, तर कुळवाडी आणि अन्य मागासवर्गीय प्रेक्षक जमीनीवरच बसत होते. 'केशा चांभार जिल्हा लोकल बोर्डाच्या सभेहून शुभ्र धोतर, खमीस, कोट वर भगवा फेटा आणि खांद्यावर उपरणे अशा थाटात परत येतो. तेव्हा त्याला बघण्यासाठी गावकरी जमतात. तसेच तो शाळा तपासणीसाठी जातो तेव्हा सर्व गावकरी तेथे जमतात. साध्या गोष्टीत अपूर्वाई बघण्याचा कोकणी माणसांचा अडाणीपणा यातून दिसतो. आबा आणि बाबुलीच्या निमित्ताने घराण्या-घराण्यातील वैर लेखकाने दाखविले आहे. वैर त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग, त्यासाठी शक्ती, वेळ आणि पैसा खर्च होत होता. त्यांची त्यांना चिंता नव्हती. तो एक कैप होता. भावल्या-रमण्यादेखील कोर्टात जाण्याची भाषा करतात. यातून त्यांचे कोर्टाचे वेड दिसते.

खोताला कोकणात विशेष महत्त्व होते. आबा गावातील भांडणतंटे सोडवितात. तक्रारीचा न्यायनिवाडा करतात. लोकांच्या ईश्वरावरील श्रद्धेचा उपयोग करुन गोष्टी सांगून वाद मिटवितात. निकोप लोकमानस घडविण्याचा प्रयत्न करतात. खोत रस्त्याने जात असल्यास गावातील लोक पायातील चप्पल काढून रस्त्याच्या बाजूला अदबीने उभे राहून वंदन करतात किंवा रवळनाथांच्या दर्शनानंतर नववधूवर बाशिंगासह खोताच्या दर्शनाला येत. कोकणी माणसांची खोतावरील निष्ठा यातून दिसते. भालू चिपकर, झिलू सोनसूरकर, शंकर रगजी, सोनू दुलाजी हे सर्वजण एका निष्ठेने आबांच्या घराण्याशी बांधलेली होती. दरिद्री असूनही ते विकले गेले नाही. खोतासाठी बाबुलीच्या घराण्याशी वैर जोपासले. आपू म्हणतो, "...... जमीनदार या नात्याने त्यांच्या श्रमांवरच आम्ही जगलो, वाढलो. तर या साऱ्या माणसांनी आमच्यावर प्रेमाची खैरात केली. कशासाठी ? - काही नाही. कसलीही अपेक्षा न धरता त्यांनी फक्त निष्ठा तेवढी उरात ठेवली. असली माणसे आता कुठे सापडणार ?" (पृ. ६७)

पारंपरिक गावगाड्यामध्ये मेलेले ढोर ओढून टाकण्याचे काम महार लोक करीत असत. तर खोतांचे निरोप कुळांना आणि कुळांचे निरोप खोतांना देण्याचे बहिर्जीचे काम हे लोक करीत होते. त्यात कुणालाही कमीपणा वाटत नव्हता. भ्रष्टाचार करण्यास मागासवर्गीय देखील तयार होत नसत. डॉ. रामदासांनी सहभोजनाचा बेत ठरविला असता मागासवर्गीय ब्राह्मणांच्या पंक्तीला बसून जेवण्यास नकार देतात. कुळवडी आणि ब्राह्मणच एका पंक्तीला जेवतात. केशा चांभाराला निवडून आणणारे आबा स्नान करुन सोवळे नेसून पूजा करतात तर पावटे मास्तर केशाला लाथाने मारल्यानंतर स्नानाला निघून जातात.

कनिष्ठ स्तरातील लोकांची व्यसनाधीनता लेखकाने दाखविली आहे. पैसा मिळविणे आणि दारुसाठी खर्च करणे हा कनिष्ठवर्गीय माणसांचा स्वभावच दिसतो. या गावातील पेस्तावॅच्या गुत्त्यावर वस्तुविनिमयाची पद्धती होती. पैशाऐवजी तांदुळ, मिरच्या, आंबे, कवटे, कोंबडी, माड इ. वस्तू घेऊन तो दारुचे ग्लास भरत होता. त्याचप्रमाणे कोकणी माणसांचा तऱ्हेवाईकपणा लेखकाने वर्णन केला आहे. ते तोंडभर शिव्याशाप देतील पण घातक कृत्य करणार नाही. हा त्यांचा गुण आहे. दळवी वर्णन करतात,

"वागण्यात थोडेसे तिरसट असले तरी या लोकांसारखे सनदशीर लोक दुसरीकडे कुठे सापडायचे नाहीत. किरकोळ भांडणे ही नेहमीचीच असत. ती नसतात कुठे ? पण शिव्याशापांनी न थांबलेली भांडणे कोर्टात जातील. त्यासाठी हाणामारी होणार नाही. देशावरचा शेतकरी कुऱ्हाड घेऊन खून पाडील. एका घावात शीर धडावेगळे करील, पण आमचा गावकरी तसे कधी करणार नाही. सर्वांगाने उघडा राहून फक्त वितीची काष्टी कमरेला लावणारा आमचा शेतकरी कुणाच्या समोर कमरेच्या आकड्याला अडकवलेल्या कोयत्याला हात घालणार नाही. क्वचित त्याने हात घातला तरी कुणी घाबरणार नाही. कोयता हातात धरला तरी तो उगारणार नाही. उगारला तरी मारणार नाही आणि तोल सुटून त्याने मारला तरी तो लागणार नाही ! संताप व्यक्त करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आई-बहिणींचा उद्धार करणाऱ्या शिव्या द्यायच्या. देण्यासारखे असे त्यांच्यापाशी एवढेच !" (पृ. १३९).

भावीण ही सामाजिक संस्था तत्कालीन परिस्थितीत होती. महाराष्ट्राच्या अन्य प्रदेशात ती नाही. याचे वर्णन लेखकाने केले आहे. जिवा शिंगीचा भाविणीशी संबंध, गंगू भाविणीचे सौदर्य किंवा व्यंकटेश जोशाने भाविणीशी लग्न केल्याने त्याला बहिष्कृत केले गेले यातून भावीणीशी राजरोस अनैतिक संबंध ठेवले जात होते, त्यांच्याशी विवाह करण्यास कुणीही पुढे येत नव्हते.

कोकणी लोकजीवनात परिवर्तन आले. विटी दांडू, आबा-धुबी, हुतुतू, आट्यापाट्याऐवजी फुटबॉल, क्रिकेट हे खेळ आले. कर्मठपणा नष्ट झाला. जोशीबुवा चप्पला वापरु लागले. सायकली वापरल्या जाऊ लागल्या. रीतिरिवाज मोडून भाविणीबरोबर

संसार थाटले गेले. बाबुलीसारखा पिढीजात वैर विसरु शकला नाही. दशावताराऐवजी सिनेमा आला, नवनवीन चेहरे दिसू लागले. भूतदयावादी पारंपरिक जीवन नष्ट झाले. माणुसकीचा बळी दिला गेला. म्हणून मुंबईत आणि जन्मगावी आपुला एकाकी, परकेपणाची खंत वाटते, तो अस्वस्थ होतो.

कोकणातील दुष्काळामुळे आणि रिकामेपणामुळे हे लोक तऱ्हेवाईक बनलेले दिसतात. इतरांच्या उचापती करुन वेळ घालविणे हाच त्यांचा एकमेव उद्योग आहे. नव्याचे कौतुक करण्याची त्यांची तयारी नसते. जसे केसूकाकाने तयार केलेले उंदिर मारण्याचे औषध प्रात्यक्षिक पाहूनही कोणी घेत नाही. त्याच्या आयुर्वेदिक औषधाचे कुणी कौतुक करीत नाही. हेटाळणी करतात. नरु मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतो, त्याचीही "मेलो सत्याग्रह करतलो ! तोंड बघा मेल्याचा" अशी हेटाळणी करतात. दशावतारी नाटकात काम करताना नाऱ्याला शिंक आली म्हणून त्याच्या हातून गणतीची सोंड निसटली. लोकांना तो अपशकून वाटला. सुधारक डॉ. रामदासांना लोकांनी खुळे ठरविले. नायनाय भाऊने पोटासाठी खोटे दस्तऐवज बनविले. तऱ्हेवाईक माणसांचे चित्र रेखाटून दळवी वर्णन करतात.

"ही माणसे - हे प्रसंग यांना अंत नाही. भोवतालच्या परिस्थितीने जशी घडवली तशी झाली. परिस्थितीमुळे जसे वागावे लागले तशी वागली. आत एक बाहेर एक असा प्रकार नाही. दाखवायचे दात एक आणि खायचे दुसरे अशी रीत नव्हती. उलट दाखवायला दात आहेत, पण खायला काही नाही असा प्रकार होता. बिचारी दुःखात मुरलेली होती. दुःख म्हणजे काय याची निराळी कल्पना नव्हती. दुःखाचा अलग विचार त्यांच्या मनात कधी आला नाही. जसे जसले तशी जगली. वागण्यात सांगड नव्हती. स्वभावावर बेगड नव्हती.

आपटेशास्त्री म्हणत त्याप्रमाणे, "घशात कोरड आणि घरात ओरड" हेच एक नित्याचे जीवन होते." (पृ. १४३) यातून कोकणी माणसाच्या प्रतिकूल आर्थिक परिस्थितीची कल्पना येते.

कोकणी माणसांच्या देशाभिमानावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. गांधीवधानंतर सर्व जाळपोळ झाली. परंतु या गावात 'गांधीना मारले ते वाईट झाले. वैरच होतं तर मरेपर्यंत शिव्या देता आल्या असत्या. ठार कशाला मारायचे' एवढीच प्रतिक्रिया झाली. चरखा फिरवून स्वराज मिळणार असे म्हणताच, "चरखो फिरवून स्वराज्य गावला असता तर नांगर फिरवून शेतात पीक आयला नसता ?" एवढीच कुत्सित टीका या ग्रामस्थांनी केली. नेहरुंनी भेट म्हणून पाठविलेले आंबे इंग्लंडच्या राणीला आवडले हे वाचताच या लोकांना कोकणातील आंब्याबद्दल अभिमान वाटण्याऐवजी "फुकट गावले तर वया कित्याक" एवढेच अर्थशास्त्रीय सत्य या लोकांनी व्यक्त केले. सारे तिरसक नजरेने पाहण्याचे अंगवळणी पडलेले होते. मार्क्सवादी, काँग्रेसवादी

असे अनेक प्रकारचे वादी या गावात आले आणि गेले. परंतु कोणतेच वादी येथे रुजले नाहीत. फक्त वादी आणि प्रतिवादी हे दोनच वादी तेवढे मूळ धरुन राहिले.'' अशी प्रतिक्रिया लेखकाने व्यक्त केली आहे. मिठाचा सत्याग्रह, गोवा मुक्ती सत्याग्रह आणि दारुबंदी यांचा उल्लेखही येतो. .

शिक्षणाबद्दलची लोकांनी उदासीनता लेखकाने दाखविली आहे. ग्रामीण भागातील तत्कालीन शैक्षणिक परिस्थिती सुमार होती. एक किंवा दोन शिक्षकी शाळा होत्या. पहिली ते सातवी पर्यंतचे मुले मेंढ्या कोंडल्याप्रमाणे वर्गात दाटी करुन बसविले जात होते. खादीधारी अमृते मास्तर, पंचमजॉर्जला मानणारे आणि शुद्ध-लेखनावर भर देणारे बागायतकर मास्तर, जातिभेद करणारे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पळवून लावणारे पावटे मास्तर हे विक्षिप्त मास्तरांचे प्रतिनिधी आहे. केशाच्या शाळातपासणीतूंन (पृ. ३०-३३) मागासवर्गीयांची शिक्षणाबद्दलची उदासीनता दिसते. झिलू केदार ''आपू, पुता कसली बुका शिकतंय ? लय झाला ! आता घरचो जमीनजुमली बघ. गावाक आधार दी !'' असे म्हणतो, तर आजी शाळेत जाण्यासच विरोध करते. 'सरस्वती आयली की घरातून लक्ष्मी जातली' असे आर्थिक सत्य ती सांगते, तर 'शिक्षण नुको खरा, पण खंडाच्यो पावत्यो लिन्यापुरता तरी शिक्षण होया ?'' असे बाबा म्हणतात. यातून तत्कालीन परिस्थितीत शिक्षण विशेष महत्त्वाचे वाटत नव्हते. मुंबईला शिकायला गेलेल्या आपूला वामनदाजीची बायको म्हणते,

''आपू, आता तू शिकतय काय ?''

''इंटरची परिक्षा दिली !''

''इंटर ? ह्या रे काय ? उगीच मेल्या न्हायता शिकू नको, आदी मॅट्रिक तरी हो'' (पृ. ५१) मॅट्रिक हा शिक्षणातला शेवटचा टप्पा आणि जकातखाते हे नोकरीचे एकमेव खाते अशी ग्रामीण भागातील निरक्षरांची समजूत होती.

'कुळवाड्याची पोरे शिकून शिकणार काय ? चार बुके शिकतील आणि शाळा सोडून घरी बसतील असेच मास्तर गृहीत धरीत असत.' (पृ. ३५) तळागाळातील मुलांना शिक्षण देऊन जागृत केले पाहिजे असे मास्तरांना वाटत नव्हते. पारंपरिक उद्योग त्यांनी करावे असेच त्यांना वाटत होते.

स्थानिक देवदेवतांवरील श्रद्धा, सण, उत्सव, यात्रा आणि लोककथा, शकूनअपशकुनाच्या कल्पना, अंधश्रद्धा, समजुतीतून लोकजीवन घडत असते. कादंबरीमध्ये रवळनाथ आणि सीमेकरीवर लोकांची श्रद्धा आहे. कोकणी माणसं धार्मिक, श्रद्धाळू आणि भाविक आहेत. आपू मुंबईहून गावाकडे येतो. त्यावेळी घरच्या देवाचा दिवा लागावा म्हणून आपटे भटजी पुजेसाठी येऊन प्रार्थना करतात, ''देवा महाराजा, या गावचा गावकरी आणि या घराचा धनी तुझ्या पायाशी आला आहे. त्याची भरभराट होऊ दे आणि त्याच्याकडून तुझ्या पायाची सेवा करुन घे. त्याचा संसार वाढीला लागू

दे आणि हे घर नांदते राहू दे.'' (पृ. ४) असे देवाला गाऱ्हाणे घातले. आपूला पूर्वजांची आठवण होते. यातून कोकणी माणसांचा आत्म्यावरचा विश्वास दिसतो.

कोकणी लोकजीवनात अंधश्रद्धा, शकून-अपशकून, स्वप्न, भूत-देवाने झपाटणे यावर लोकविश्वास आहे. पाल चुकचुकणे अपशकून वाटतो. पाल मारली की वंश वाढत नाही असा लोकसमज आहे. प्रत्येक गोष्ट मुहूर्त पाहून केली जाते. आपूला शाळेत घालण्यापूर्वी मूहुर्त पाहिला जातो. नरूचे वडील झाडावरुन पडून मरतात. गावातील लोकांच्या दृष्टीने देवधर्माचे झाड तोडले म्हणून तुक्या झपाटून मेला. चिऱ्याचे घर बांधण्याचे राहून गेले म्हणून तो नरुच्या आईच्या स्वप्नात येतो. घर बांधण्यास सांगतो. शिंक आल्यामुळे नाऱ्याच्या हातून गणपतीचा मुखवटा खाली पडतो. तो वेडा होण्याचे कारण गणपतीचा मुखवटा खाली पडला हेच असते.

रवळनाथ या ग्रामदेवतावर सर्वांची श्रद्धा आहे. सर्वजण रोज दर्शन घेतात. कौल लावतात. लग्न, मुंज, घर बांधणी, शेती, आजार, यश-अपयश साऱ्या सुखःदुखाच्या गोष्टी रवळनाथावरील श्रद्धेने चालतात. देवीची मूर्ती फणसाच्या लाकडाची असल्याने फणसाचे लाकूड कोणी तोडत नाही. विवाहानंतर नववधूसाठी रवळनाथाचे आणि खोताचे दर्शन घेण्याची परंपरा असलेली दिसते. व्यवहार घडाळ्याच्या काट्यापेक्षा नगाऱ्याच्या पडणाऱ्या काट्यांनुसार चालतात. देवाच्या भीतीमुळे चोरी होत नाही. जसे ''माझे आंबे कोणी चोरले तर ते कां रवळनाथ सुटो सोडुची नाय'' (पृ. ६१) असे आबा म्हणतात. देवाला नवस केल्याने मूल होते. दादूला मुलगा झाल्यावर तो रोज देवळाचा एक भाग झाडतो. शेतावर कीडं पडकी असता केळीच्या पानावर भात वाढून गुलाल, लिंबू टाकून टाचणी टोचतात. पेटवलेला काकडा भातात रोवतात, नारळ फोडतात. देवाला गाऱ्हाणे घालतात. पक्षी येऊन कीड खाऊन जातात. देवकृपेने संकट दूर होते. आजारपणात औषधाऐवजी देवाचा अंगारा जिभेवर ठेवतात. देवाचा दिवा सातत्याने जळत असतो. दिवा विझताच आबाच्या स्वप्नात देव येतो आणि आपू तिथे जाऊन दिवा लावतो. गावच्या सीमेकऱ्यावरील श्रद्धेपोटी बाजारातून परतणारे लोक त्याला खडीसाखरेचा खडा टाकतात. नमस्कार करतात. सीमेकरी कडक होता. रात्री तो गावाच्या रक्षणासाठी फिरतो असा लोकविश्वास दिसतो. गुंडू खाटिक बकरु कापण्याचे पापकर्म करीत नाही. उलच इब्राहिम मुसलमानाकडून बकरु कापून घेतो. यातून पाप-पुण्याच्या कल्पनांवर प्रकाश पडतो.

आबाची बायको आणि बाबुलीची बायको एकमेकीला मुलगी व्हावी म्हणून नवस करतात. आबाला मुलगा होतो, तर बाबुलीला मुलगी होते. यातून नवसावरील विश्वास स्पष्ट होतो. माडांच्या खटल्याचा आबांच्या बाजूने निकाल लागतो, तेव्हा माड सुखायला लागतो, तेव्हा नव्वदीचा म्हातारा म्हणतो, ''झाडामाडांचा ह्या असाच. न्यायनिवाडा केलो म्हंजी जगाचीच नाय ती !'' (पृ. ७२) यातून सनातनी परंपरा

दिसते. झाड-प्राणी-वस्तूंना नजर लागते असा लोकसमज आहे. जसे भालू चिपकरने एखाद्या गोष्टीचे कौतुक केले की त्याला नजर लागते असे आपू सांगतो.

शिकार आणि शिमगा हे खास प्रदेशविशिष्ट संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. देवाला वर्षातून एकदा हिंस्त्र पशूचा नैवेद्य दाखवावा लागतो. त्यासाठी गावकरी शिकारीला निघतात. सारा खर्च देवस्थानाकडून केला जातो. रानडुकराची शिकार करुन वाजतगाजत तो मिरवणूकीने देवळात आणला जाई. देवाला नैवेद्य दाखऊन गावाला थोडे थोडे मांस वाटले जाई. त्याचप्रमाणे गावातला मोठा सण. बावटे घेऊन गावात रोबटे नाचायची. काठीला टाळे बांधून पंधरा दिवस पोरे 'शबय-शबय' करीत गावभर घरोघरी फिरायची. वाघ, कोल्हा, अस्वल अशी अनेक सोंग काढीत. राधा, कृष्ण, पेंद्याचा नाच केला जात होता. सर्वांत उंच पोफळीचे झाड तोडले जाते. खोत कुळवाड्यांनी दारुसाठी पैसे देत. लोक तर्र होत. होळी पेटविली जाई. महार ढोल बडवीत खुशाल जमावात घुसत. त्या एका दिवशी अस्पृश्यता विसरली जाई. गुरव गुलाल उधळीत. बोंब मारीत, धर्मशाळेत सहभोजन केले जाई. असे सिमग्याचे वर्णन लेखक करतो. यातून समूहमनाचा गजर ऐकू येतो. रवळनाथाच्या देवळात एक चांदीचा दंडुका होता आणि मखमलीने सजवलेले चांगले दीड फूट लांबीचे जुत्याचे जोड होते. ते जुते घालून आणि दंडुका घेऊन गावाच्या रक्षणासाठी रवळनाथ दर रात्री गावभर रपेट करतो असा गावसमज आहे. चांभारवाड्यातील प्रत्येक घराणे दरवर्षी देवाला जुत्याचे जोड देतात. जोडे न दिल्यास चांभारवाड्यावर देवाचा कोप होऊन हगवण लागते असा लोकविश्वास आहे. देवाचा चांदीचा दंडुका चोरीला जातो आणि देवाच्या भीतीने तो परत मिळतो. चोर वेडा होऊन हातवारे करीत, काहीतरी बडबडत, कधी कधी रडत देवळाच्या आसपास बसलेला असे (पृ. ९७) अशी लोककथा सर्वश्रूत आहे. सोवळे ओवळे पाळणाऱ्या कर्मठ आबा सहभोजनाच्या संकटातून वाचले तेव्हा रवळनाथाना वाजत गाजत केळीचा घड अर्पण करतात. नारबा जोशी परटाने धुतलेल्या कपडावर तुळशीचे पाने ठेऊन शुद्ध करुन घ्यायचा. तसेच नाऱ्या गडी आबांना आंघोळ घालतो. पाठीला साबण लावतो, त्यानंतर मात्र ते स्वतःच्या हाताने अंगावर पाणी घेऊन विटाळ धुऊन टाकतात.

भुताखेतावर कोकणी माणसांचा अंधविश्वास आहे. भूत उतरविण्याचा प्रकार देवळात होतो. गावात कावळ्याचे महाभयंकर भूत निपुत्रिक सवाष्णीला धरते. सीताला हे भूत धरते, तेव्हा गंडेदोरे, तीर्थ, अंगारे, बकरु-कोंबड्याचा बळी दिला जातो. भगत बोलावून डाग दिला जातात. तरी भूत निघाले नाही. रवळनाथाच्या देवळात अंगात आलेल्या माणसाने तिला काठीने बडविले तेव्हा तिचे भूत निघाले असे गावकरी समजतात. (पृ. ९८-९९) त्याचप्रमाणे भूताचे पाय उलटे असतात (पृ. १५१) असा समज आहे.

ग्रामीण भागात बाजार आणि यात्रांचे दिवस महत्त्वाचे असतात. प्रस्तुत कादंबरीत 'रविवारचा बाजार' ही गावातील सर्वात मोठी घटना असे. लेखक वर्णन करतो, "आठवड्याची खरेदी-विक्री, देणे-घेणे, वायदे याचदिवशी पूर्ण केले जात. तत्कालीन परिस्थितीत गावात सिनेमा थिएटर नव्हते. दशावतारी नाटक मंडळ्यांना खूप महत्त्व होते. मेळे, रामलीला, दशावतारी मंडळ हे मनोरंजनाचे कार्यक्रम, जत्रा, उत्सव यांचा अविभाज्य भाग असत. जिवा शिंगीच्या 'रवळनाथ प्रासादिक मंडळी' पार्टीची गोव्यापर्यन्त कीर्ती होती.

इच्छा अतृप्त राहिली तर पिंडाला कावळा शिवत नाही असा लोकसमज आहे. सख्याच्या मृत्युनंतर झिलू पिंडाकडे तोंड करुन हात जोडून 'मी जन्मात गंगूकडे जावचच नाय !" म्हणताच कावळा शिवतो. तसेच, 'म्हातारी देवगडाक गेलो" म्हणजे म्हातारा मेला असे म्हणण्यातून संस्कृती वैशिष्ट्य दिसते.

श्रावणातील दहिकाल्याचा उत्सव संस्कृती वैशिष्ट्ये सूचक आहे. 'एका भल्या मोठ्या मडक्यात दोन चमचे दूध आणि बादलीभर पाणी घालून ते देवळासमोर टांगलेले असे. मग वाजतगाजत पालखी निघायची. पानपतावर जमल्यासारखी मडक्याखाली भाऊगर्दी जमायची आणि मग सर्वांसमक्ष आबा काठीने ते मडके फोडायचे. त्या मडक्यातले दुधाळ पाणी अंगावर घेण्यासाठी आणि मडक्याची कवची मिळाली म्हणजे घरच्या गोठ्याला बरकत होते. दूधदुभते वाढते, अशी सर्वत्र समजूत होती." (पृ. ८२) यातून कोकणातील खोतांच्या मानसन्मानाची आणि समजुतीची कल्पना येते.

कादंबरीच्या निवेदनाची भाषा अस्सल मराठी असून सहज, सरळ, ओघवती आहे. तर संवाद कोकणी बोलीत आहे. संवादामध्ये सहजता, स्वाभाविकता आणि कथानकास गती देण्याचे सामर्थ्य आहे. कोकणी बोलीतील मेल्या, रांडेच्या, भोसडीच्या, भडव्या, भाड्या या शिव्या कथानुभवाशी एकजीव झाल्या आहेत. मजवा, जमीनजुलो, मांगर, कुणगा, आवाढ, आवशी, रजेर, इलेत, तरवा, मेर, चुडते, खयचो, ओरडाक, मोडणी, लावणी, पोयीवर, दुदग्यात इ. कोकणी बोलीतील नावीन्यपूर्ण शब्दांचा वापर केला आहे.

म्हणी-वाक्प्रचारातून लोकजीवनाचे दर्शन घडते. जसे, 'कुल्यावर पानी घाल म्हटला तर पानी घाल, लोंबता काय म्हणून विचारु नको', 'पुढच्यास ठेस मागचा शहाणा', 'घशास कोरड आणि घरात ओरड', 'छडी लागे छमछम विद्या येई घमघम', 'लिना लिना नि भिकार चिन्हा', 'ऋषीचे कूळ आणि नदीचे मूळ शोधू नये', 'समोर मासळी दिसली नाय तोवर बगळ्याचा ध्यान', 'सूर्याची पिल्ले चमकणे' इ. उपमाप्रतिमा आशयानुभवाशी एकजीव झाल्या आहेत. "दादुल्याने विसर्जनासाठी गणपती उचलावा तसा मला वर उचलला", "शाळेच्या पायरीवर दादुल्या चिऱ्याचा

दगड बसवल्यासारखा बसून होता'', ''(पावटेमास्तर) वाहणांचा कर्चर्र आवाज करीत तो वेताळासारखा शाळेत आला'' इ.

कादंबरी डॉ. सु. रा. चुनेकरांना दळवीचे १९३०-४० या काळातील आत्मस्मरण वाटते. ते म्हणतात, ''भूतकालीन नाहीशा होऊ घातलेल्या संस्कृतीचे यात दर्शन होते. नानाविध व्यक्ती आणि प्रसंग यातून हे गाव जिवंत होते. आणि या गावाच्या दर्शनातून या संस्कृतीचे दर्शन घडते. गावाचे सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक जीवन, ग्रामस्थांच्या चालीरीती, समजुती, व्यवहार, करमणूक समजतात. दक्षिण कोकणातील पस्तीस-चाळीस वर्षापूर्वीचे हे गाव आहे. देशावरच्या गावापेक्षा ते वेगळे आहे. त्याला स्वतःचे वेगळे व्यक्तिमत्त्व आहे. स्वतःची अशी भाषादेखील त्याला आहे. '' ४९. तर डॉ. भालचंद्र फडके यांना प्रस्तुत कादंबरी ''इतिहासजमा झालेल्या कोकणातील खेड्याचे आत्मनिवेदनात्मक असे चित्रण वाटते.'' ५०. तर आलोचनाकारांना हे प्रादेशिक चित्र ''सयमी, रेखीव व उत्कट निवेदनात व सरळ साध्या भाषेत व्यक्त होणारी ही व्यक्तिचित्रे व प्रसंगचित्रे अनुभवाच्या साक्षात्काराची वाटतात. ही स्फुट चित्रे असली तरी एका गावाच्या जीवनचित्राने त्यांना सुसूत्र व सुसंगत परिणाम लाभले आहे. व हे गाव दक्षिण कोकणातले कोणतेही गाव होऊ शकते.'' ५१. या सर्व अभिप्रायांचा विचार करता व्यक्ती आणि प्रसंगचित्राच्या मालिकेतून आकाराला आलेली एक श्रेष्ठ प्रादेशिक कादंबरी आहे.

## ८. हमीद हलवाई -

### *१० ''इंधन''*

हमीद हलवाई यांची हिंदु-मुस्लिम संघर्षाचे चित्र रेखाटणारी 'इंधन' कादंबरी १९६५ मध्ये प्रकाशित झाली. परंपरागत जीवनसरणी अनुसरणाऱ्या हिंदू-मुस्लिमांमध्ये परिवर्तनकाळात संघर्ष होऊ लागले. खोतीमुळे अरेरावी करणारे मुस्लिम कुळकायद्याने अस्वस्थ झाले. कुळवाडी-हरिजन आणि मराठा समाजामध्ये जागृती झाली. ते संघटित झाले. मुस्लिमांना त्यांनी विरोध केला. अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. त्यामुळे मुस्लिम खोत अस्वस्थ झाले. संघर्षाची ठिणगी पडली. त्यापूर्वी मात्र सर्व जातिधर्मामध्ये एकोपा होता. हरिजनांनी बोद्ध धर्म स्वीकारला. त्यांनी मुस्लिमांच्या ताबुताच्या मिरवणुकीत नाचायचे बंद केले. महालक्ष्मीच्या पालखीला मिरवणुकीच्या वेळी ढोल वाजविण्याचा मान झिडकारला. या निमित्ताने लेखकाने मुस्लिम-कुळवाडी आणि बौद्ध यांच्या संघर्षाचे प्रतीक म्हणून 'इंधन' हे शीर्षक कादंबरीला दिले आहे.

पंधरा वर्षापूवी राष्ट्रीय राजकारणात भाग घेण्यासाठी कादंबरीचा निवेदक 'मी' घराबाहेर पडतो. मुंबईला जातो. तो घरच्या जबाबदाऱ्या टाळतो. घरातल्यांच्या दृष्टीने तिरस्काराचा विषय होतो. त्यानंतर हृदयविकाराची बाधा झाल्याने हवापालटासाठी



DN 2891

खेड्यात येतो. अल्पकाळात त्याच्या प्रकृतीत चांगलाच फरक पडतो. तो ग्रामीण जीवनात आलेले परिवर्तन पाहतो. तो पुरोगामी विचाराचा असल्यामुळे बालवयातील जैतून नावाच्या मैत्रिणीच्या अंत्यविधीला जात नाही. ब्राह्मणाची तरुण मुलगी-सुमतीशी मोठा भाऊ इसाकचे अनैतिक संबंध असल्याचे 'मी'ला समजते. तो सुमतीला भेटून उपदेश करतो. हे इसाकभाईला आवडत नाही. दोघाभावांचा वाद होतो. तेव्हा 'मी' मुंबईला परत जाण्याचा विचार करतो परंतु परिवर्तनाकडे कानाडोळा करुन उदासपणे गावातच राहतो.

जमिनीवरुन मुस्लिम खोत आणि कुळवाडी यांच्यात सतत संघर्ष चालूच असतात. पंधरावर्षापूर्वी 'मी' कुळवाड्यांच्या हक्कासाठी त्यांच्या बाजूने उभा राहिला होता. त्याने खोतांच्या जमिनी कुळांना मिळवून दिल्या होत्या परंतु, तेच कुळवाडी परिवर्तनकाळात 'मी'चे ऐकत नाही. त्याच्यावर विश्वास ठेवत नाही. इसाकच्या शेतातील गवतात गुरे सोडतात. त्याने जाब विचारताच कुळवाडी त्याला मारायला धावतात. म्हणून इसाक कोर्टात जाण्याचा निर्णय घेतो. 'मी' इसाक-कुळवाडी वाद मिटविण्याचा प्रयत्न करतो. कुळवाड्याची भेट घेतो. ते देखील संघर्षाचा पवित्रा घेतात. 'मी' शांत होतो. इसाक डॉक्टराकडून दाखला मिळवितो आणि कुळवाड्यांवर खटला भरतो. कुळवाड्यांनी माफी मागितल्याने हे प्रकरण मिटते. पण इसाक आणि सुमतीच्या अनैतिक संबंधामुळे कुळवाडी संघर्षाचा पवित्रा घेतात.

केपटाऊनवाल्या इसाकच्या बांधकामावर नवऱ्याकडून पळून आलेली बौद्ध 'लक्ष्मी' मजुरी करु लागली. बापाकडे न राहता इसाकच्या जागेत, त्याच्या आश्रयाने राहू लागली. दोघांच्या अनैतिक संबंधांची गावभर चर्चा होऊ लागली. बौद्धांनी लक्ष्मीच्या बापाला (लक्षाला) वाळीत टाकण्याची धमकी दिली. तिने इसाकचे घर सोडावे, हा इभ्रतीचा प्रश्न आहे असे जागृत झालेले बौद्ध म्हणू लागले. लक्ष्मीला इसाकने गुप्त ठिकाणी हलविले. कुळवाडी-महारबौद्धांनी इसाकच्या कामावर बहिष्कार घातला. त्याने बाहेरगावचे मजूर आणून बांधकाम पूर्ण करुन वास्तुशांत केली. त्यावेळी इसाकच्या घरात घुसलेल्या लक्ष्मीला बौद्धांनी खेचून बाहेर काढले. बौद्धांनी संघर्षाचा पवित्रा घेतला. कुळवाड्यांनी त्यांना साथ दिली. इसाकने लक्ष्मीशी अनैतिक संबंध ठेवण्यास मुस्लिमांचा विरोध नव्हता पण तिला घरात ठेवणे त्यांनाही मान्य नव्हते. बौद्ध आणि कुळवाड्यांनी लक्ष्मीला घराबाहेर ओढल्याने इसाक सूडाने पेटला. मुस्लिम जातपंचायतीने 'कुळवाडी आणि बौद्धांनी इसाकची माफी मागावी' असा ठराव केला. बौद्ध आणि कुळवाड्यांना कामावर बोलविणे बंद केले. गावामध्ये वातावरण तंग झाले. चोऱ्यामाऱ्या वाढल्या. समजूतदारपणे तंटा मिटविण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला. शिमग्याच्या दिवशी महालक्ष्मीच्या पालखीची मिरवणूक मशिदीजवळून वाजतगाजत नेण्याचा निर्धार कुळवाड्यांनी केला. पालखीला उल्फे न देण्याचा आणि

मिरवणूकीवर हल्ला करण्याचा निर्धार मुस्लिमांनी केला. कुळवाड्यांनी ठरल्याप्रमाणे महालक्ष्मीच्या पालखीची मिरवणूक काढली. रिवाजप्रमाणे महारांनी मिरवणूकीत ढोल वाजविले नाही. कुळवाड्यांनी गळ्यात ढोल अडकविळे आणि मशिदीजवळून वाजतगाजत मिरवणूक नेली. मुस्लिमांनी पालखीला उल्फे दिले नाही उलट पालखीवर हल्ला केला. स्त्रियांची अब्रू लुटली. अनेकजण जखमी झाले. सुमतीने वणेच्या मुस्लिमांच्या हल्ल्यातून भाबीला वाचविले. बलात्कारीत भाबीला दुःख झाले. गावात पोलीस ठाण मांडून बसले. अनेकांना शिक्षा झाल्या. त्यानंतर 'मी' आणि जनार्दन मुंबईला गेले. यापुढेही असे संघर्ष होतील आणि मिटतील असा 'मी'ला विश्वास वाटतो, हेच जीवनसत्य लेखकाने मांडले आहे.

मानवी जीवनाचे दर्शन घडविणे हा कादंबरीचा प्रधान हेतू असतो. तो प्रस्तुत कादंबरीतून हिंदू-मुस्लिम संघर्ष या सूत्राधारे व्यक्त केला आहे. मानवी मनातील रागद्वेषादि भावना 'इंधन'' या प्रतीकातून व्यक्त होतो. सूडाचे 'इंधन'' व्यक्ती आणि समूह यांच्यातील ताणतणावातून येथे व्यक्त होते. प्रत्येक माणसांचे आणि समाजाचे स्वभावधर्म, वृत्ती-प्रवृत्ती यात भिन्नता असते. प्रस्तुत कादंबरीत सर्वच व्यक्ती आपआपल्या स्वभावधर्माप्रमाणे जगतात. त्यामुळे येथे संघर्षाची ठिणगी पडलेली दिसते.

कादंबरीचा निवेदक 'मी' हा कादंबरीचा नायक नसला तरी सर्व घटना-प्रसंग त्याच्या साक्षीने होतात. प्रत्येक वेळी तो अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतो परंतु मुस्लिमांच्या दृष्टीने तो गांधी टोपी घालणारा, राष्ट्रसेवा दलाचे काम करणारा 'काफीर'' ठरतो. तर हिंदूंचा त्याच्यावर विश्वास नसतो. तो अगतिक होतो. हृदयविकारामुळे तो हवापालटासाठी पंधरा वर्षानंतर गावात येतो. खेड्यात झालेला बदल त्याला जाणवतो. तो सडपातळ देहयष्टीचा, उंचकपाळाचा, साधी राहणी असलेला, संयमी, वडिलांबद्दल आदर असलेला, भाबीवर निरागस प्रेम करणारा तितकाच हतबल आहे. तो पुरोगामी, नास्तिक असल्यामुळे नमाज पढणे त्याला मान्य नाही. सामाजिक बांधीलकी तो मानतो. आत्मपरिक्षण करतो. गावात हिंदू-मुस्लिम संघर्ष हे होत राहणार आणि ते पुन्हा मिटतील असा विश्वास तो बाळगतो. हा मी म्हणजे लेखक हमीद हलवाई नव्हे, तर तो एक तटस्थपणे घडणाऱ्या घटनांकडे पाहणारा असहाय्य, अगतिक सहृद्य तरुण आहे. त्याच्या निरीक्षणातून कोकणी जीवनातील परिवर्तनाचे लेखक दर्शन घडवितो.

'बाबा' फकरु चिच्या, 'मी'चे वय झालेले, अंधत्व आलेले, अगतिक मुस्लिम खोत वडील आहेत. अनुभव आणि मानहानीमुळे ते संयमी, शांत झालेले दिसतात. ते काळाची गती थांबऊ शकत नाही. कथानायकाला त्यांच्याबद्दल आदर वाटतो. त्यांची भिती वाटते. कुळकायद्यामुळे 'खोती' गेल्याने ते जखमी झालेले दिसतात. म्हणूनच कुळवाडी मोठ्या मुलाला (इसाक मास्तर) मारायला धावले म्हणून त्याला

कोर्टात जाण्यास अनुमती देतात. गावात तंटे होऊ नये म्हणून समंजसपणा शिकविणारा हा फकरु चिच्या खोती गेल्याच्या सलामुळेच इसाकला कोर्टात कुणब्यावर खटला भरण्यास परवानगी देतो. इसाक मास्तर हा निवेदकाचा भाऊ आहे. खोताची पद्धती नष्ट झाली तरी रक्तात अरेरावी, अहंकार, तिरस्काराची भावना असलेला, शरीराने थकलेला रेखाटला आहे. ब्राह्मणाच्या सुमतीशी अनैतिक संबंध ठेवणारा, पत्नीची अवहेलना करणारा, भावाबद्दल आकस असलेला आहे. त्याचा व्यभिचारच हिंदू-मुस्लिम संघर्षास कारण झालेला आहे.

निवेदकाची 'भाबी' आणि ब्राह्मणकन्या सुमती या दोन स्त्री व्यक्तीरेखा महत्त्वाच्या आहेत. तर उंच-देखणी मारवाड्याच्या विश्वासास अपात्र ठरलेली त्याची पत्नी, लक्ष्मीच्या पालखीच्या मिरवणुकीत बलात्कार झालेली, सासऱ्याच्या वासनेची शिकार होऊन वेडी झालेली सुदामची सून, व्यभिचार करणारी, बेलगाम वागणारी, धोब्याचा व्यवसाय करुन आणि भावनाशून्य मनाने मुस्लिमांच्या स्वाधीन शरीरकरणारी पस्तीशीची अगतिक परटिण, केपटाऊनवाल्या इसाकशी अनैतिक संबंध ठेवणारी, नवऱ्याचे घर सोडणारी मुस्लिम-नवबौद्धांच्या संघर्षास कारण ठरलेली 'लक्ष्मी' या गौण स्त्री व्यक्तिरेखा समाजवास्तवाचे दर्शन घडवितात. 'भाबी' ही निपुत्रिक, प्रेमळ, श्रद्धाळू, मानसिक छळाने त्रासलेली सोशीक, क्षमाशील नवऱ्याने हेळसांड केलेली, सुमती आणि इसाकचे अनैतिक संबंध असल्याचे माहीत असूनही तिच्याशी प्रेमळपणे वागणारी, समजदार, दिरावर निरागस प्रेम करणारी, शिमग्याच्या पालखीला नारळ आणि तांदळाचा उल्फा घालणारी, मन मारुन अत्याचार, अन्याय सोसणारी सर्वसामान्य श्रद्धाळू मुस्लिम स्त्री आहे. प्रभाकर पाध्ये तिच्याविषयी म्हणतात, "भाबी हे मराठीतले एक अविस्मरणीय व्यक्तिचित्र ठरले आहे. अंतःकरणात नवऱ्याने हेळसांडल्याचे दुःख, आपल्या पतीला लुटणाऱ्या सुमतीबद्दल एकाचवेळी राग आणि अंतर्मुख स्वाभिमान, दीराबद्दल, भावविवशतेचा स्पर्श न झालेले कणखर निरागस प्रेम आणि स्वतःच्याच जमातीकडून नागविले गेल्यामुळे धुमसणारा अपमान हे सारे उभे करण्यात लेखकाच्या लेखणीचा कस पणाला लागतो. " ५२. प्रभाकर पाध्यांच्या हा अभिप्राय अधिक सार्थ वाटतो. कारण ती सोशीक तर आहेच, पण सुंदर सुमतीने इसाकवर प्रेम करावे याबद्दल तिला अभिमान वाटतो. आतल्याआत जळत असताना सुमतीशी ती संयमाने आणि क्षमाशीलपणेच वागते. पालखील उल्फा देण्यासाठी गेले असतानांच तिच्यावर मुस्लिम बलात्कार करतात. तिच्या श्रद्धेला तडा जातो, तरी लेखकाने तिला मूक ठेवले, अबोल ठेवले आहे याचे करण ती आचाराने कर्मठ असलेल्या मुस्लिम घराण्यातील स्त्रीची प्रतिनिधी आहे.

'सुमती' अल्पवयातच इसाकमास्तरच्या वासनेची शिकार झालेली, परिवर्तनाला सामोरी जाणारी, कणखरवृत्तीची, स्वाभिमानी, शांत स्वभावाची, पुरोगामी विचारसरणीमुळे

नागरी रीतिरीवाज पाळणारी, भावांनी दुर्लक्षिलेली, संवेदनशील आहे. तिच्यामुळेच कुळवाडी आणि मुस्लिम यांचा संघर्ष होतो.

दुसरा इसाक हा कर्मठ मुस्लिम आहे. पैशाच्या धुंदीत तो जगतो. मुस्लिम आणि नवबौद्धांना मान्य नसताना 'लक्ष्मी'शी अनैतिक संबंध ठेवतो. बेफिकीर-उद्दाम वर्तन करतो. कुळवाडी-बौद्धांची आर्थिक नाकेबंदी करतो. मुस्लिम स्त्रिया अंगलट येत नाहीत ही त्यची व्यथा आहे. त्याने लक्ष्मीशी अनैतिक संबंध ठेवल्यामुळे नवबौद्ध-मुस्लिम संघर्ष होतो. खेड्यावर प्रेम करणारा, धंद्याची प्रतिष्ठा जपणारा, गावातील जातीयवादी संघर्षामुळे गिऱ्हाईकी संपलेला, वाण्याच्या बायकोबद्दल आकर्षण असलेला जनार्दन न्हावी बडबड्या आहे. गावातील संघर्ष मिटावा हे त्याला मनापासून वाटते. जैतून ही चौथीपर्यंत शिकलेली अबोल आणि मूक अशी मुस्लिम स्त्री आहे. हरबाराव हा गावातील संघर्ष मिटविण्याचा प्रयत्न करणारा सज्जन आहे. अगतिक नवबौद्धांचा प्रतिनिधी, लक्ष्मीचा दरिद्री नवरा काश्या, मुलीच्या वर्तनाने महारवाड्यातील अप्रतिष्ठेला कंटाळलेला लक्ष्या महार हे गौण व्यक्तिचित्रे समाजवास्तवाचे दर्शन घडवितात. त्याबरोबर हिंदू-मुस्लिम आणि नवबौद्धांच्या समूहभावनेचे चित्रणही लेखक करतो, त्यातून प्रदेशविशिष्ट लोकजीवाचे दर्शन होते.

कादंबरीमध्ये रेखाटलेले जीवन चिपळूण परिसरातील स्वातंत्र्योत्तर काळातील खेडेगावातील आहे. वशिष्टी नदीच्या ऋतुमानानुसार बदलण्याचा तेथील लोकजीवनावर चांगलावाईट परिणाम होतो. वशिष्टीमध्ये मासेमारी करण्याप्रमाणे भातशेतीचा व्यवसाय येथील लोक करतात. समुद्राची भरती (पृ. २४-२५), भातशेती (पृ. १) साठमारीचा खेळ, डोंगर उतारणीची, वशिष्टीचे धनुष्याच्या कमानीसारखे बाकदार पात्र (पृ.१-२), लावणी (पृ. ११) मंगलोरी कौल (पृ. १२) हे संदर्भ प्रदेशविशिष्ट आहेत. हे कोकणातील मागासलेले खेडे आहे. येथे वीजेचा अभाव दिसतो. रॉकेलच्या चिमणीच्या मिणमिणत्या प्रकाशात येथील जनजीवन घडते. (पृ. ५) गावातील रस्ते धुळीचे, किराणा दुकाने आणि न्हाव्याचे सलून सुमारच आहे. परिट, न्हावी हा अविकसित बलुतेदार वर्ग येथे आहे. मुस्लिम खोतांकडून कुळवाडी आणि बौद्धांचे शोषण होते. घरांची रचना प्रदेशविशिष्ट आणि आर्थिकस्तर स्पष्ट करणारी आहेत. (पृ. १२) तर कुणब्यांची घरे गवताने शाकारलेली (पृ. ५३), तर महारवाडा गावाबाहेर असून त्यांची घरेही अगदी सामान्य आहेत. (पृ. ५२)

प्रदेश निसर्गरूपाने अधिक ठळकपणे व्यक्त होतो. "वाशिष्ठीचे पात्र तेव्हाच अनेकदा तट्ट फुगले आणि रोडावले. पात्रातील वाळूच्या थरांनी अनेकदा जागा बदलल्या. त्यांचे कधी डोंगर रचले गेले आणि नाहीसे झाले. हे पाहताना मला वाटू लागले की मी एके ठिकाणीच बसून राहिले आणि जगच पुढे चालले आहे." (पृ. ५४) या प्रमाणे मानवी भाववृत्तींशी संवादी मानवाच्या बदलत्या जीवनाशी निगडीत

निसर्ग येथे आला आहे. माणसांच्या कृती-उक्ती आणि मानसिकतेवर त्याचा परिणाम झाला आहे. निसर्गवणनांनी तो प्रदेश जिवंत केला आहे. एक पात्र बनून आला आहे. प्रदेश आणि ग्रामजीवनाशी एकरूप होऊन आला आहे. (पृ. २) त्याप्रदेशातील लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहे. 'म्हावरा' हा विशेष प्रकारचा मासा वैशिष्टीत मिळतो हे प्रदेशविशिष्टच आहे. तर वशिष्ठीचे उधाणाचे दिवस व भरती (पृ. २४) हे लोकजीवनावर परिणाम करणारे आहे.

'मग उन्हाची तिरीप ओसरु लागली. वारा सुसाट वाहू लागला आणि त्याने उडवलेल्या पाल्यापाचोळ्याचा आवाज ढोलांच्या त्या आवाजात मिसळू लागला. झाडांची सळसळ सतत कानात घुमू लागली. आणि रस्ता धुळीने माखला. पुरता अदृश्य झाला. मी उठून बाहेर आलो आणि अंगणात येऊन उभा राहिलो. भाऊ खाली उतरून रस्त्यावर गेला. इतर लोकांत मिसळला आणि बाबा काठी टेकीत माझ्या शेजारी येऊन उभे राहिले........" (पृ. ११८) बाबा, इसाक आणि 'मी'च्या मानसिकतेनुरुप पात्र म्हणून हे निसर्गवर्णन आले आहे.

ऋतुचक्र आणि दिनचक्राप्रमाणे रंगबदलणाऱ्या निसर्गाचे चित्रण लेखकाने केले आहे. मरगळलेल्या सकाळचे वर्णन पहा. "सकाळच्या वेळी आता धुके पडू लागले. सूर्य उगवला की ते नाहीसे होई. वशिष्ठीच्या पात्रावर मात्र ते तरंगत राही." (पृ. १२) तर दुपार ही प्रखर उष्णतेची आहे. ".... हवेतील धुके कापरासारखे उडून गेले. हिरव्या शेतांवर धुळीचे थर दाटू लागले. पावट्याची हिरवीगार पाने करडी बनली. गारवा ओसरला. दुपारच्या वेळी उष्णता जाणवू लागली. वाहत्या वाऱ्याबरोबर धुळीचे लोट आता उडू लागले." (पृ. ६६) याचप्रमाणे पृ. ६९ आणि ७७ वर कोकणातील प्रखर दुपारचे वर्णन लेखक करतो. तर संध्याकाळ, ".... वशिष्ठीच्या पात्राला ओहोटीचा खड्डा पडलेला दिसत होता. रेतीचे भाटण वर आले होते. त्यावर गुरे उधळली होती. मावळतीच्या किरणांची नदीच्या पाण्यावर लकाकी चढली होती." (पृ. १०८) या वर्णनातून साकार होते. तर काळोखी रात्र (पृ ११२) पात्र बनून आली आहे. उन्हाळा प्रखर ऊन आणि धूळ घेऊ येणारा (पृ. ७७, ११७) उधाणांचे दिवस (पृ. २४), तर हिवाळ्यातील वारे, थंडीचे बर्फासारखे धारदार पाते वाहून आणारे (पृ. ४५) आहेत. थोडक्यात मानवीजीवनावर परिणाम करणाऱ्या ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणाऱ्या, माणसाच्या मानसिकतेनुरुप आलेल्या निसर्गाचा लेखकाने वातावरणनिर्मितीसाठी उपयोग केला आहे. भूप्रदेश आणि निसर्गाचा तेथील समाजजीवनावर परिणाम झाला आहे.

एका गावामध्ये पारंपरिक जीवन जगणाऱ्या भिन्न धर्माच्या समूहामध्ये परिवर्तन काळामध्ये आचारविचारातून सूडाचे 'इंधन' पेट घेते, याचे वास्तव चित्रण लेखकाने केले आहे, म्हणून यदुनाथ थत्ते यांना वास्तवनुभवाचे चित्रण करणारे दलवाई 'एक

चिनगारी' वाटते. ५३. त्याचप्रमाणे 'सत्व परिक्षेचा कालखंड' असे वर्णन करुन स्नेहवर्धन म्हणतात, ''याच काळात 'इंधन' ही त्यांची कादंबरी प्रकाशित झाली आणि जणू वणवा पेटला. सनातनी हिंदू आणि धर्मांध मुसलनान हे परस्परांचे साथीदारच असतात ह्याचा प्रत्यय आला. या ललित कृतीचा निषेध करायला ही परस्पर विरोधी वाटणाऱ्या जातीयवाद्यांची आघाडी पुढे सरसावली. हमीद दलवाईच्या वृद्ध पित्याला वाळित टाकण्यात आले. दलवाईचा जीव यामुळे कासावीस होई, पण निर्भयपणे त्यांनी या सर्व गोष्टींना तोंड दिले.'' ५४. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, हिंदू-मुस्लिम संघर्षाची ठिणगी पडली होती. सूडाचे इंधन धगधगत होते. त्यामुळे वाळीत टाकण्यासारखे प्रकारही घडत होते. म्हणजे दलवाईंनी समाजविरोधी पर्वा न करता समकालीन वास्तव जीवन चित्रण केले आहे. डॉ. र. बा. मंचरकरांचा अभिप्राय अधिक बोलका आहे. ते लिहितात, ''सामूहिक पातळीवर हे मुख्यतः चिपळूणच्या परिसरातील एका खेड्याचे जीवनचित्र आहे. खोतीची पद्धत संपल्याने दुखावलेले आणि तरीही मस्तीने वागणारे मुसलमान खोत, त्यांच्याविरोधात बेपर्वा असणारे कुणबी आणि अहंकाराने वागणारे बौद्ध या तिन्ही समाजाच्या परस्परसंबंधाने, त्यामधील ताणाचे नि संघर्षाचे दर्शन बारकाईने घडविले आहे.'' ५५. या अभिप्रायापेक्षा अधिक स्पष्टपणे उषा हस्तकांनी म्हटले आहे, ''......... दलवाईनी आपल्या कादंबरीतील समाजजीवनाचे क्षेत्र 'कोकणातील एका छोट्या खेड्यापुरते मर्यादित केलेले आहे. ह्या खेड्यातील समाजजीवनाचा गुंता त्याच्या सर्व अंगोपांगासह ते चित्रित करू पाहात आहेत. गावातील कुणबी, कुळवाडी, मुसलमान खोत आणि महारवाडी यांचे परस्परावलंबी जीवन आणि तरीही परस्पराविरोधी वाटणारा काहीसा अविश्वास विद्वंश यामुळे आपोआपच गावजीवनावर अस्थिरतेचे सावट पडलेले आहे. या अस्थिरतेला जन्म देणारे वातावरण स्फोटक स्वरूपाचे असल्यामुळे त्याचा भडका उडण्यासाठी ते लहानशा निमित्तालाच टेकल्यासारखे दिसते आहे. स्वातंत्र्योत्तर काळात पाकिस्तानच्या निर्मितीमुळे या गावातील मुसलमानाविषयीचा हिंदूंचा अविश्वास आणि द्वेष थोडा अधिकच वाढीला लागल्यासारखा दिसत आहे. त्याचप्रमाणे पददलितांमधील अस्मिता देखील एखाद्या डिवचलेल्या नागासारखी कशी जागृत होऊ लागलेली आहे याची प्रतीती गावातील महारवाडीच्या बदललेल्या रुपावरुन येते आहे. बौद्ध धर्माच्या झेंड्याखाली त्यांनी आपला एक नवा स्वतंत्र संघच प्रस्थापित करायला सुरवात केलेली आहे. त्यांच्या ह्या संघटित बदलामुळेच त्यांच्या अहंभावाची, ताठरपणाची रेषा अधिकाधिक ठळक होते आहे........'' ५६. कुळकायद्याने जमिनी गेल्या हे खोत मुस्लिमांचे दुःख, धर्मांतर केलेले नवबौद्ध आणि नेसूची लंगूटी मुळचीच असली तरी त्यांच्यात झालेल्या जागृतीमुळे ते सोसायटीची स्थापना करतात. एकमेकांबद्दल अविश्वासाची भावना निर्माण होते हे परिवर्तन काळातील समाजजीवन चित्रण त्यामुळे अधिक

स्वाभाविक वाटते.

मुस्लिम, हिंदू आणि बौद्ध धर्माच्या समाजजीवनात आलेल्या परिवर्तनाचा एकूणच अन्य काही बाबतीत बदल झाल्याचे 'मी'च्या पंधरा वर्षानंतर गावात आल्यानंतर लक्षात येते. गावात डांबरी रस्ते झाले आहे. धर्मांधता जशी दिसते त्याचप्रमाणे जातिभेदाचा कर्मठपणा कमी झाल्याचे दिसते. जसे सुमती 'मी'च्या घरी चहा घेते. ती मासे खाते. ती हिंदू-मुस्लिम असा जातिभेद पाळत नाही. एकमेकांच्या घरी न येणारे हिंदूमुस्लिम एकमेकांच्या घरी येऊजाऊ लागले. पारंपरिक गावगाड्यातील नीतीकल्पना कालबाह्य ठरली. जसे सूनेवरच सुदाम बलात्कार करतो. परटिण मुस्लिमांशी अनैतिक संबंध ठेवते. लक्ष्मी इसाकशी सुमती इसाकमास्तरशी अनैतिक संबंध ठेवून असल्याचे 'मी'च्या लक्षात येते. विचारांनी पुढे गेलेले लोक आचारांनी मात्र जागच्या जागीच असल्याचे दिसतात. महारांनी बौद्ध धर्म स्वीकारला. त्यांच्यात जागृती झाली. हरिजन बौद्ध महालक्ष्मीच्या पालखीच्या मिरवणुकीत ढोल वाजवायचा मान झिडकारतात. मुस्लिमांनी आपल्या स्त्रियांना 'अंगवस्त्र' म्हणून ठेवत होते हे त्यांना मान्य नाही. अन्याय, अत्याचार विरोधात ते आवाज उठवितात. यातून जातीयतेचे दर्शन घडते. केपटाऊन इसाक लक्ष्मीला घरात ठेवतो. तेव्हा बौद्धांची सभा होऊन इसाकच्या बांधकामावर बहिष्कार घातला जातो. कुळवाडी त्यांना साथ देतात. मुस्लिमाने बौद्ध स्त्रीशी संबंध ठेवणे मुस्लिमांप्रमाणे बौद्धांनाही मान्य होण्यासारखे नाही. जातीतल्या स्त्रीशी विवाह करावा. मागासलेल्या जातीतील स्त्री ही केवळ 'अंगवस्त्र' म्हणून वापरावी असा तुच्छ दृष्टीकोन बौद्ध जातीबद्दल मुस्लिमांचा असलेला दिसतो. बौद्ध देखील तो प्रतिष्ठेचा प्रश्न करुन लक्ष्मीला इसाकच्या घरातून पळऊन नेतात. जातीयतेच्या कल्पनेमुळे बौद्ध मुस्लिम इसाकचा द्वेष करतात. इसाकही सूडाने पेटतो. मुस्लिमांची बैठक होऊन 'बौध्द-कुळवाड्यांनी इसाकची माफी मागावी' असा एकमुखी ठराव केला जातो. संघर्षाला कारण असलेली लक्ष्मी लोक विसरतात आणि मुस्लिम आणि बौद्धांमध्ये संघर्ष पेटतो. प्रभाकर पाध्ये म्हणतात, "गावात चाललेला व्यभिचार लोकांना परवडतो. त्याला जात-पात धर्म आड येत नाही. पण नवरा टाकून आलेली नवबौद्ध बाई स्वखुषीने मुसलमानांकडे राहते, त्यामुळे मात्र चूड लागते. कारण त्याला वैयक्तिक अभिमान, अपमान, आर्थिक हितसंबंध असल्या गोष्टी असतात." ५७. म्हणजेच मुस्लिम परटिण संबंध किंवा इसाकमास्तर सुमतीचे चोरटे अनैतिक संबंधाकडे लोक कानाडोळा करतात, परंतु 'लक्ष्मी' ही नवरा टाकून येऊन इसाकशी संबंध ठेवते या गोष्टीने बौद्ध भडकतात. दोघांचे वर्तन त्यांना अपमानस्पद वाटते.

कुळकायद्यामुळे कुणब्यांमध्ये जागृती झाली. उत्पन्नाची साधने त्यांच्या हाती आली. त्यामुळे कुळवाडी आणि मुस्लिम समाजात एकमेकांविषयी अढी असलेली दिसते. द्वेषभावना वाढली. खोताच्या अरेरावीचा काळ संपला. इसाकमास्तरच्या शेतातील

गवतामध्ये सुमतीच्या चुलतभावाच्या सल्ल्यानुसार गुरे घातली जातात. तेव्हा इसाक त्यांना शिव्या देतो. हा अन्याय कुणबी सहन करीत नाही. त्याला मारण्यासाठी ते धाऊन जातात. म्हणून संतापलेला इसाक डॉक्टराकडून खोटा दाखला घेऊन कुणब्यांवर खटला भरतो. त्यांनी माफी मागितल्यावर वाद मिटतो. परंतु येथे जातीयतेचे सूत्र महत्त्वाचे ठरते. रोटीबेटी व्यवहार मान्य नसल्यामुळेच मुस्लिमाने कुळवाड्याच्या मुलीशी अनैतिक संबंध ठेवल्याने तिचा चुलतभाऊ भडकतो. मुस्लिम-हिंदू संघर्षाची ठिणगी पडते. महालक्ष्मी पालखीच्या मिरवणूक प्रसंगी मसिदीजवळ वाद्य वाजविणाऱ्या आणि मुस्लिमांनी विरोध केल्यास लाठ्याकाठ्यांनी प्रतिकार करण्याचा निर्धार केला जातो. तर सवाद्य मिरवणूक मशिदीवरुन गेली तर भाडोत्री मुसलमान आणून पालखीवर हल्ला करण्याचा, पालखीला उल्फा न देण्याचा निर्णय मुस्लिम घेतात. दोन्ही धर्मातील लोक आपल्या निर्णयाशी ठाम राहतात आणि अनर्थ होतो. म्हणजेच परिवर्तनकाळात गावातील प्रेमाची, विश्वासाची, एकोप्याची भावना नष्ट झाली. परस्पर स्नेहाचे संबंध संपले. हिंदू-मुस्लिम आणि नवबौद्ध यांच्यामधील सूडाचे चित्रण करुन समूहजीवन दर्शन घडविले आहे. सुरेश घाटे लिहितात, ''प्रत्यक्ष संघर्षात काही हिंदू स्त्रियांच्या अब्रूबरोबर नायकाच्या वहिनीचीही अब्रू लुटण्याचा प्रकार झाल्याने (तोही हिंदूच्या देवीचा मान राखण्यासाठी ही मुसलमान स्त्री गेली असल्याने) या कादंबरीच्या परिणामात एकदम उंची गाठली जाते, व हमीद हलवाई ही धर्मांधतेची समस्या अधिक गडद, व्याकूळ करणारी अशी सहजच करतात. ''५८. हिंदू-मुस्लिमांचे ऐक्य नष्ट झाले. एकमेकांच्या श्रद्धेला तडा गेला हेच यातून सूचित केले आहे. 'इंधन' ही त्यांच्या स्वतःच्या अनुभवातून तप्त होऊन निघालेल्या ज्वलंत जातीय समस्येला सामोरे जाणारी कादंबरी आहे.'' ५९. असे ज्ञानेश्वर नाडकर्णी म्हणतात, ते सार्थच आहे. कारण स्वतः हमीद हलवाई या सेवादलाच्या कार्यकर्त्याचा हा स्वानुभव आहे.

कोकणी माणसांच्या आर्थिक स्थितीचे चित्र लेखकाने रेखाटले आहे. जसे पोटासाठी ब्राह्मणांनी गाव सोडले. ते शहरात गेले. त्यांच्या घराची पडझड झाली. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळेच माणुसकी, प्रेम, जिव्हाळा, सहानुभूती नष्ट झाली. स्वार्थ वाढीला लागला. सुमतीचे भाऊ लग्नसराईत मुंबईहुन पत्र पाठवितात. त्यात कोरडेपणा दिसतो. लग्न उरकण्याची त्यांची इच्छा असूनही आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना हा विचार दूर ठेवावा लागतो. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था ही शेतीप्रधान आहे. पारंपरिक गावगाड्यात बलुतेदारांचे जीवनदेखील कृषिवालंबी होते. परंतु परिवर्तनकाळात बलुतेदारांचे मार्ग बंद झाले. परस्परावलंबी जीवन उखडले गेले. परिवर्तन काळामध्ये देखील कुणब्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली नाही. लेखकाने वर्णन केले आहे.

"त्या वाडीचे स्वरुप बदलले नव्हते. तीच गवताने शाकारलेली घरे..... भिंतीच्या खुटांना अडकवलेले नांगराचे फाळ...... पडवीला बांधलेली गुरे. कुणब्यांनी पूर्वीसारख्याच लंगोट्या लावल्या होत्या." (पृ. ५२) किंवा 'कुणब्यांची घरे बदललेली नाहीत. नेसूच्या लंगोट्याही त्यांनी सोडल्या नाहीत. पण त्यांनी आपली एक सोसायटी काढली आहे. हजारो रुपये जमविले आहेत....." (पृ. ५३) लोक संघटित झाले. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आले. सहकाराने त्यांचे आर्थिक जीवनमान सुधारले हे लेखकाने दाखवून दिले आहे. तरीही त्यांचे दारिद्रय घटलेले नाही हे वास्तव हमीद दलवाई रेखाटतात.

महारांनी धर्मांतर करुन बौद्ध होण्यामुळे त्यांचे दारिद्र्य हटले नाही. पळून आलेल्या लक्ष्मीला नांदण्यासाठी नेऊ पाहणाऱ्या काश्याला इसाकने मागणी केलेले शंभर रुपये देणे अशक्य होते. दारिद्र्याला कंटाळलेल्यामुळे काश्याच्या धरातून ती पळून येते. हिंदू-मुस्लिम संघर्ष सुरु झाल्यामुळे परटिणीने मुस्लिमांचे कपडे इस्त्री करु नये, त्यांच्याशी संबंध ठेऊ नये, धंदा बंद करावा असे हिंदूंना वाटते. परंतु मुसलमान गिऱ्हाईकांशिवाय दुसरे गिऱ्हाईक नसल्यामुळे ती धंदा बंद करण्यास नकार देते. त्यामागे आर्थिक घटक केंद्रिय स्वरुपाचा आहे. जर्नादन न्हाव्याचे सलून या संघर्षामुळे चालत नाही. त्याच्यापुढे आर्थिक प्रश्न निर्माण होतो. एकमेकांच्या दुकानदारीवर बहिष्कार घालून आर्थिक नाकेबंदीचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे सर्व धर्मांच्या लोकांवर आर्थिक ताण येऊन संघर्ष वाढतो. वेळोवेळी संघर्ष मिटविण्याचा, समझोता करण्याचा प्रयत्न होतो, त्यामागे एकमेकावर अवलंबून असणारे जीवन हेच कारण असते. म्हणजेच स्वातंत्र्यपुर्व काळात जमीनदारांवर सामान्य शेतकरी आणि बलुतेदार अवलंबून होते. प्रस्तुत कादंबरीमध्ये 'खोती' पद्धतीचा उल्लेख येतो. कुळकायद्यामुळे जमीनदारांचे वर्चस्व कमी झाले. 'कसेल त्याची जमीन' कायद्यान्वये स्वातंत्र्योत्तर काळात जमिनी कुळाच्या मालकीच्या झाल्या. जमीनदार आणि मजूर यांच्यात बेबनाव झाला. प्रस्तुत कादंबरीत मुस्लिम खोत जमीनदार आहेत. उत्पन्नाची साधने त्यांच्या हातात असल्यामुळे त्यांच्या वर्तनात अहंकार, गुर्मी असलेली दिसते. परिश्रमपूर्वक शेत पिकविणारे कुळ जमीनदारांना तिरदळ घालीत होते. तिरदळ घेण्यास जमीनदारांनी नकार दिला. तेव्हा निवेदक 'मी' कुळांना जमिनीचा ताबा न सोडण्याचा सल्ला देतो. त्यामुळे खोत संतप्त होतात. (पृ. ५०) कुळकायद्याने कुळांना जमिनी मिळाल्या. आर्थिकदृष्ट्या खोतांनी कुचंबणा होऊ लागली. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे आलेली लाचारी टाळण्यासाठी हरिजनांनी धर्मांतर केले. तिन्ही धर्मातील लोकांमध्ये संघर्ष-बहिष्कार सुरु झाला. इसाकच्या बांधकामावर हिंदू-बौद्ध मजूरांनी बहिष्कार घातला. तेव्हा अधिक मजूरी देऊन इसाकने परगावचे मजून आणून बांधकाम पूर्ण केले. गावातील मजुरांची आर्थिक नाकेबंदी केली. उदरनिर्वाहासाठी त्यांना चोऱ्या कराव्या

लागल्या. (पृ. ९८-९९) पारंपरिक गावगाड्यातील परस्पर सहकार्याची सामंजस्याची भावना नष्ट झाली. कुळकायद्यामुळे सुडाचे इंधन पेट घेते. त्याचा आर्थिक लोकजीवनावर परिणाम झाला. खोतांच्या जमिनी कुळांना मिळाल्यामुळे त्यांची परिस्थिती सुधारली नाही. धर्मांतराचा नवबौद्धांना आर्थिकर्जावनात फायदा झाला नाही. मुस्लिमांना आणि बलुतेदारांना परिवर्तनाचा फटका बसला. शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प होते. एकूण शिक्षणाबद्दल उदासिनता होती असे दिसते. (पृ. २१) त्याचा परिणाम आर्थिक जीवनावर झाला. सुधारणा होऊ शकल्या नाही. शिक्षण घेतलेल्या ब्राह्मणांनी उदरनिर्वाहासाठी गाव सोडले, शहरात गेले, प्रतिकूल परिस्थितीशी झगडू लागले.

समकालीन राजकीय जीवनचित्रण केल्यामुळे ही कादंबरी अधिक वास्तव झाली आहे. कादंबरीचा नायक 'मी' पंधरावर्षापूर्वी राष्ट्रीय राजकारणात पडला होता. (पृ. ९) तो राष्ट्र सेवा दलाचा कार्यकर्ता असून तो गांधीटोपी वापरतो म्हणून त्याला मुस्लिमबांधव 'काफीर' समजतात. पाकिस्तानबद्दल मुस्लिमांना वाटणाऱ्या आदरामुळे हिंदु-मुस्लिमांमध्ये संघर्ष सुरु होतो. कादंबरीचा निवेदक 'मी' जातिभेद मानत नाही. आचारातील कर्मठपणा तो मानत नाही. विचाराने तो पुरोगामी आहे. उलट अफ्रिकेहून आलेला इसाक धर्माभिमानी आहे  तो बौद्ध लक्ष्मीशी अनैतिक संबंध ठेवतो. त्यामुळे तीनही धर्माच्या लोकांमध्ये अविश्वास वाढतो. मनात संर्घषाचे, सूडाचे 'इंधन' भडका घेते हा राजकीय प्रभावच आहे. हिंदू शिमग्याच्या दिवशी पालखीची मिरवणूक सवाद्य मशिदीजवळून घेऊन जाण्याचा निर्धार करतात, तर ती अडविण्याचा निर्धार मुस्लिम करतात. हा संघर्ष टाळण्याचा प्रयत्न जनार्दन करतो. परंतु अगतिक 'मी' असमर्थता दाखवतो. गांधीचे असामान्यत्व आणि स्वतःचे सामान्यत्व तो मान्य करतो. यातून गांधीवादी विचारांचा राजकीय जीवनावरील प्रभाव स्पष्ट होतो. विनोबांचे विचार जर्नादन सांगतो, "विनोबा म्हणतात पुलामुळं शहरं व खेड़ी जवळ येत आहेत. त्यामुळे खेडी भिकेला लागली आहेत. हे पूलच तोडून टाकले पाहिजेत.........विनोबा लाख बोलले ! पण त्यांचे ऐकतो कोण ? नेहरुंचे लक्ष तिकडे जाईन तेव्हा ना !" (पृ. १४-१५) यावरुन विनोबांच्या विचाराचा पराभव आणि नेहरुंच्या विचाराचा प्रभाव स्पष्ट होतो. कादंबरीमधील या राजकीय उल्लेखामुळे कथानक वस्तुनिष्ठ झाले आहे.

ग्रामीण-प्रादेशिक लोक हे पारंपरिक जीवन जगणारे असतात. त्यांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, रीतीरिवाज, समजूती, सण उत्सव, यांचे चित्रण करुन लेखक लोकसंस्कृतीचे दर्शन घडवितो. प्रादेशिक संस्कृती त्या परिस्थितीच्या परिणामातून जन्मते. पारंपरिक गावगाड्यात सर्वधर्माचे ऐक्य होते, तोपर्यंत एकमेकांच्या सण-उत्सवात सर्वजण एकत्र येत होते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात ही ऐक्यभावना नष्ट झाली. एकमेकांच्या सण-उत्सवात सहभागी होण्याचे प्रमाण घटले. कादंबरीमध्ये कोकणातील एका

खेड्यातील हिंदू-मुस्लिम आणि बौद्धांच्या संस्कृती वैशिष्ट्यांचे दर्शन घडविले आहे. जसे मुस्लिम इसाकने घराच्या पायाभरणीच्या वेळी खजूर-खोबरे वाटले, (पृ. ६९) यातून त्यांची अंधश्रद्धा दिसते. मुहूर्त पाहून नव्या घरात प्रवेश करणे. ग्यारवी पाडण्याची प्रथा (पृ. ८६) नियाज देण्याची प्रथा, दिनचा फरज मानण्याची प्रथा आहे. मशिदीजवळ वाद्य न वाजविण्याची परंपरा (पृ. १२१) असलेली दिसते. निवेदकांची भाबी नेमाने मोहरमचा मलिदा दरवर्षी त्याला मुंबईला पाठवते. (पृ. ७) अल्लाची उपासना, नमाज इ. धार्मिक-सांस्कृतिक रिवाज मुस्लिम पाळतात. हिंदूच्या पालखीसमोर ढोलाच्या तालावर न नाचण्याची परंपरा दिसते. उलट हिंदूच्या देवीला 'उल्फा' देण्याची मुस्लिमांची परंपरा दिसते. भाबी म्हणते, "…….मी साधी बाई. सगळ्यावर इमान ठेवणारी. आपल्या घरातून उल्फो जाते ही तुम्हाला म्हायतेच है. इतक्या वर्साच व्हेवट बंद करना वेस नाय. बरां. आपून देऊ काय देतांव ? एक नारळ अनी पसोभर चावल. पन त्यांनी पालखीची ओटी भरली जाते एवढोच ! तुम्हाला सांगू, पालखीची ओटी भरुन घेण्याची मला भारी हौस म्हणून मी कंवा मिरवणुकीत उल्फो देत नाय, न्हावेवारीवर घेवन जातां. आता यांनी बंदी घातल्यावर मी जानाय नाय. पन मला बरां नाय वाटनार." (पृ. ११६) भाबी परंपराप्रिय आहे हे तिचे उद्गारातून स्पष्ट होते. इसाक आणि निवेदक 'मी' गळ्याला गळा लाऊन भेटतात ही देखीलं मुस्लिमांची सांस्कृतिक परंपरा आहे.

हिंदू महालक्ष्मीची पालखी मिरवतात. शिमग्याच्या रात्री ढोल वाजवत नाचतात. (पृ. ११२), देवीला नैवेद्य अर्पण करतात. महालक्ष्मीच्या पालखीला खांदा देतात. (पृ. ११९) यातून हिंदूंच्या सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. हिंदू-मुस्लिम परंपरावादी आहेत तर बौद्ध परंपरा नाकारतात. जसे हिंदूंच्या महालक्ष्मीच्या मिरवणूकीत ढोल वाजविण्यास ते नकार देतात. ढोल वाजविण्याचा मान ते स्वतः होऊन झिडकरतात. धर्मांतरामुळे त्यांचा स्वाभिमान जागा झाला. हिंदू-मुस्लिम परंपरावादी असले तरी सूडभावनेने पेटल्यामुळे तेही परंपरा नाकारताना दिसतात. धार्मिक संघर्षातच घडणाऱ्या अमानुष अत्याचारातून धर्मांधतेची कल्पना येते. जसे मशिदीजवळ वाद्य न वाजविण्याचा रिवाज हिंदूनी मोडल्यामुळे मुस्लिम पालखीला 'उल्फा' देत नाहीत. उलट पालखीवर हल्ला करुन स्त्रियांची बेअब्रू करतात. येथे संघर्षामुळे परंपरा मोडली गेली आहे. परंतु परंपरा नाकारली गेली नाही. असे म्हणावे लागेल. भालचंद्र नेमाडे यांना ही उत्कृष्ट कादंबरी वाटते. "पोटसमूह आणि पोटसंस्कृती ह्यांच्यामधल्या सीमारेषा आपल्या समाजात किती गडद आहेत हे अशा फार थोड्या कादंबऱ्यांनी स्पष्ट केले आहे." ६०. हिंदू-मुस्लिम आणि बौद्ध या तीन धर्मसंस्कृतीच्या लोकसमूहाच्या परिवर्तनकाळातील संघर्षाचे वास्तवपूर्ण चित्रण केल्याने आशयाची चौकट विस्तारली आहे.

प्रादेशिकतेचे रंग पोटात घेणारी दलवाईची भाषा आहे. आशयानुरुप तिचा वापर

केला आहे. व्यक्तिपरत्वे बदलणारी ही भाषा प्रादेशिक वातावरण निर्माण करते. प्रदेशाच्या संस्कारामुळे जीवनानुभवातून बनलेली भाषा पात्र वापरतात. प्रथम पुरुशी, पात्रमुखी निवेदन पद्धतीने प्रमाणभाषेत कादंबरीचे निवेदन केले आहे. संवाद कोकणी-फारशीच्या मिश्रणातून बनलेले दिसतात. ते संवाद संभाषणाच्या पातळीवर गेल्याने त्यांना स्वाभाविकता आणि कलात्मकता प्राप्त झाली आहे. संवाद सूचक अर्थपूर्ण, नाट्यात्मक आहेत. प्रत्येक संवाद अधिक स्वाभाविक वाटतो. सर्व संवादातून विविधता, व्यक्तिविशिष्टता जाणवते.

संवादाप्रमाणे म्हणी-वाक्प्रचार, उपमा प्रतिमा, प्रतीकांमधून प्रादेशिकतेचे रंग स्पष्ट दिसतात. जसे, 'आज तो बीत गई, कल्का कल देखेंगे' (पृ. ७९), 'जो करील तो भरेल' (पृ. ८४), 'उगीच आगीत तेल कशाला ओतायचां ? (पृ. ९३), 'मांस खावा नि हाडूक पेकून द्यावा' (पृ. ८२) या म्हणीतून पात्राच्या स्वाभावाचे आणि सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडते. 'घोशा लावणे', 'वऱ्हाड करणे', 'गुऱ्हाळ चालणे', 'तनाची माती होणे', 'अकड न करणे', 'वांझोटे वेगणे', 'बाका प्रसंग येणे' या वाक्प्रचारातून पात्राच्या भावभावना स्पष्ट होतात.

'दिव्याला लटकणाऱ्या जळमटासारखा ढगांनी सूर्य वेढला गेला होता. (पृ. १), 'फडक्यातले केस झटकून टाकावेत तसा तो विचार त्याने झटकून टाकला' (पृ. १५), 'वशिष्ठीला धनुष्यासारख्या वाकवणाऱ्या डोंगरावर सकाळीच पावसांच्या धारांची शुभ्र चादर पसरली जाईल', 'भाबी चुलीवरील उतू चाललेले दूध फुंकत होती' (पृ. ३८) 'जर्नादनाच्या अडाणी चेहऱ्यावर विचारांची जळमटे पसरली' (पृ. १०६) 'ती अनेक बऱ्यावाईट अनुभवांचे गाठोडे वाहत या घराशी समरस झाली होती' (पृ. ७) या प्रतिमाप्रमाणे 'इंधन' सूड भावनेचे तर 'सूर्य' मानवी विवेकाचे प्रतीक आहे. उपमा समाजवास्तवाचे दर्शन घडविणाऱ्या आहेत. उदा. 'तिचे शब्द वशिष्ठीच्या पावसाळ्यातील फेसाळ प्रवाहासारखे वाटू लागले' (पृ. ५७) 'हवेतील धुके कापरासारखे उडून गेले' (पृ. ६६), 'तिचा चेहरा भेसूर उग्र बनला एखादे प्रेत पोचवून आल्यासारखा' (११८) या उपमाप्रमाणेच शब्दांच्या वैचित्र्यामुळे प्रादेशिक वास्तव जिवंत झाले आहे. तळातील भातशेते, वशिष्ठी नदी, गोडे-खारे पाणी, मचूळ पाणी, मासे मारणारे गोपाळ, घोशे लावणे, म्हावरे, भरोसो, हळदोनी, शिग, मना, इषय, माजुरी, कुळबंटा, ठवानुको, आचलो, दरवाजो, उगरोच, अयलांव, लाणी, तिरदळ, घोवालासं, पाखाडी, झयला, शीदा, वेगुनुच, आयलीस, तिकटे, नुको, मना, अरथ, खलबत्तो, कारलांव, आफोताहैत, मकाण, भाबी, दिल, बेमारी, छापे, हिदायत, आफोसन, ताज्जुब, वालोकुम सलाम, जुम्म:, छुपोरुस्तुम, जिनगानी, दुनिया, नियाज, ग्यारवी, उल्फो, मोहब्बत, घोशा, अदब, असर, गिल्ला इं. हिंदी, अरबी, फार्शी शब्दांचे कोकणीच्या ढंगाने उच्चार केले जाते तसेच कोकणी बोलीतीलही काही शब्द प्रदेशविशिष्ट्ये

दाखवितात. ॲप्रोच, कॉम्प्लीकेशन, इपोटंट इ. इंग्रजी शब्दांच्या वापरामुळेच परिवर्तन सूचित होते. आलोचनाकार लिहितात, "चिपळूणच्या हिंदू-मुसलमान समाजाच्या पारंपरिक जीवनरीतीच्या तपशीलातून व पाकिस्तानची मागणी व खोती पद्धतीचा शेवट या घटनांतून निर्माण झालेल्या भावस्थित्यांतरातून या कादंबरीचा घाट दहवाईंनी बांधला आहे. साहजिकच यात प्रादेशिक मुसलमान बोलीचा बराच अवलंब केला आहे. पण तो भडक वाटावा इतका ढोबळ व अतिरंजित नाही. ६१. थोडक्यात आशयानुरुप अशीच भाषा आहे.

दलवाईंनी परिवर्तन काळातील जीवन कलात्मकतेने चित्रित केले आहे. कृष्णचंद्र ज्ञाते म्हणतात, "लौकिक जीवनाशी प्रामाणिक राहूनच त्याने आपल्या प्रतिभेने एक वेगळे जीवनविश्व निर्माण केलेले आहे. म्हणूनच कादंबरीतील जीवनविश्व लौकिक जीवनाचाच एक भाग वाटतो. ६२. यावरुनच ही कादंबरी प्रादेशिक वास्तववादी आहे हे मान्य करण्यास हरकत नसावी. चिपळूणजवळील कोकणी खेड्यातील तीन धर्मांमधील सूडाच्या 'इंधनाचे' चित्रण करुन वैशिष्ट्य पूर्ण प्रादेशिक कादंबरी जन्माला घातली.

**मधु मंगेश कर्णिक -**
***"भाकरी आणि फूल"***

'देवकी' (१९६२), 'सूर्यफूल' (१९६६), 'माहीमची खाडी' (१९६९), 'भाकरी आणि फूल' (१९८२), 'निरभ्र', 'स्वयंभू', 'जुईली' (१९८५), 'सनद' (१९८५), 'कातळ' (१९८५), 'वारुळ' (१९८९) या दहा कादंबऱ्या मधु मंगेश कर्णिक यांनी लिहिल्या.

देशाला स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे झाली. रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्राचा विकास आराखडा तयार करण्याचा निर्णय महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी जाहीर केला. 'भाकरी' समृद्धीचे आणि 'फूल' संस्कृतीचे प्रतीक ठरविले गेले. परंतु स्वातंत्र्योत्तर पंचवीस वर्षामध्ये दलितांना विकास होऊ शकला नाही. सरकारी योजनांचा फायदा भांवलदारांना मिळाला. कुळकायद्याने कुळांना जमीनी मिळाल्या. डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायांमध्ये सत्तास्पर्धा सुरु होऊन शे. का. फे. ऐवजी रिपब्लीकन पक्ष किंवा दलित पँथर जन्माला आला. स्वार्थी वृत्ती वाढली. काँग्रेसने दलित कार्यकर्त्यांना लहानमोठ्या पदांवर नेमले. नोकरीत आरक्षण जाहीर केले. परंतु खेड्यापाड्यातील दलितांना सुख आणि समृद्धीपासून वंचित रहावे लागले. मूठभर लोकांचा फायदा झाला. त्यांनी आपल्या बांधवांकडे पाठ फिरविली. हाच या कादंबरीचा विषय आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील करुळ-कणकवली या कोंकणी खेड्यातील केवळ शिवनाक कदमाची ही कथा नाही. तर भारतीय स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव साजरा होत असताना

मागासवर्गीयांना स्वातंत्र्याची फुले चाखायला मिळाली नाहीत. तो तृप्त होऊ शकला नाही, अतृप्त-उपाशीच राहिला. त्या मागासवर्गीय समाजाची कोकणच्या पार्श्वभूमीवरील शोकात्मकथा आहे. शिवनाक कदम पहिल्या स्वातंत्र्यदिनी करुळचे ग्रामस्थ प्रभात फेरी काढतात. भाषणे करतात. मुलांना मिठाई वाटतात. यानंतर मुंबईत गिरणी कामगारांचा संप होतो. म्हणून शिवनाक कदमाचा मोठा मुलगा 'गोपाळ' गावी येतो. कुटुंबियांनी मेलेल्या जनावरांची 'पड' खाऊ नये म्हणून त्यांना डॉ. आंबेडकरांची शपथ घ्यायला लावतो. स्वातंत्र्यानंतरही शाळेमध्ये अस्पृश्यता पाळली जाते याचे त्याला दुःख होते. तो मास्तरांवर संतापतो. पांडुरंग नावाच्या भावाला त्याच्या तिसऱ्या क्रमांकाची जागा मिळावी असे मास्तरांना सांगतो. येथे समता प्रस्थापित होणार नाही. हक्क मिळणार नाही, म्हणून पांडुरंगला कणकवलीच्या छात्रालयात दाखल करतो. अस्पृश्यता पाळणाऱ्या गावकऱ्यांसमक्ष रामेश्वराच्या मंदिरात प्रवेश करतो. सर्व दलितांनी मंदिर प्रवेश करावा, 'पड' खाण्याचे बंद करावे, स्वच्छ रहावे, मुलांना शिक्षण द्यावे, हक्कासाठी झगडावे, डॉ. आंबेडकरांच्या शिकवणूकीप्रमाणे वागावे, बदलावे, म्हणून प्रयत्न करतो. गिरणीकामगारांचा संप मिटल्यामुळे मुंबईला निघून जातो. त्याचे लग्न होते.

पांडुरंग कणकवलीच्या शाळेत एस. एस. सी पर्यंतचे शिक्षण घेऊन नोकरीच्या शोधार्थ मुंबईला जातो. परंतु वशिल्याअभावी त्याला वर्षभरात नोकरी मिळत नाही. उच्चपदस्थ दलित जातभाई मदत करीत नाही असा त्याला अनुभव येतो. शाळेतील शाळीग्राभ नावाच्या छात्रालयातील स्नेह्यामुळे त्याला एस. टी. खात्यात नोकरी मिळते. शाळीग्रामची धाकटी बहीण सुनंदा त्याच कार्यालयात काम करीत असते. दोघं एकमेकांच्या प्रेमात पडतात. परंतु हेमंत गुणे बरोबर लग्न करुन सुनंदा मद्रासला निघून जाते. पांडुरंग उदास होतो. गोपाळची बायको नलिनी पांडुरंगचे मालतीशी लग्न लाऊन देते.

दरम्यान गांधीची हत्या, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, डॉ. बाबासाहेबांचे धर्मांतर आणि अल्पावधीत त्यांचा मृत्यू, तसेच शे. का. फे. चे विभाजन या राजकीय घटना घडतात. तर गडमठच्या मोठ्या बहिणीवर बलात्कार होतो. गोपाळ तिच्याकडे जाऊन उदास होऊन परततो. शिवनाक आणि मोन्यामहार मुंबईत येऊन कपडे, मिठाई गोळा करतात. त्याचा गोपाळला राग येतो. धाकटा भाऊ आनंदा बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करतो. नोकरी करण्याऐवजी लेखक कवी म्हणून नाव कमावतो. रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने सचिवालयात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेला उपस्थित राहतो. दलित-नवबौद्धांच्या जीवनात पंचवीस वर्षात स्थित्यंतर आले नाही, समता प्रस्थापित होऊ शकली नाही. भाकरी मिळाली नाही. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत आजही ते लाचारीचे जीवन जगतात. म्हणून रौप्यमहोत्सवी स्वातंत्र्याचा निषेध म्हणून

तो काळे ध्वज घेऊन मंत्रालयावर जातो. त्याला अटक होते. असे या कादंबरीचे कथानक आहे. व्यक्तिचित्रण घटना, प्रसंग आणि उपकथानकातून समकालीन वास्तवाचे दर्शन प्रस्तुत कादंबरीतून लेखकाने घडविले आहे.

शिवनाक कदम, त्याची पत्नी धुर्पता, मुले गोपाळ, पांडुरंग, आनंद, गोद्या, मुली पुतळी, वेणा. मालती व नलिनी या दोन सुना आणि मोन्या महार, जिची म्हारीण, अंबाजीमामा, गणूमामा, प्रा. सहदेव माने, ॲड. सुरेश निलेकर इत्यादी दलितवर्गातील व्यक्ती आणि ताई बामनी, आबू खोत, शिरी, राऊत मास्तर, शाळेतील शाळीग्राम, त्याची बहीण सुनंदा, त्याची आई, आप्पा बामन, इ. सवर्णांचे चित्र रेखाटून वास्तव जीवनदर्शन घडविले आहे. येथे कोणी नायक किंवा खलनायक नाही. प्रत्येकजण आपल्या मार्गाने वाटचाल करतो.

शिवनाक कदम हा जुन्यापिढीतील लाचार, अगतिक, दरिद्री महार आहे. रामेश्वरावर श्रद्धा असलेला, अप्रतिम सनई वाजविणारा सहा मुलांचा बाप आहे. सर्वांना पोटासाठी मिळावे आणि अंग झाकता यावे म्हणून खोतांकडे कपडे-पैशाची भीक मागतो. गोपाळकडून अपमानित होताच सुना-नातवंडाचे स्मरण करीत प्राण सोडतो. परंतु मुंबईला जात नाही. तो गावात - समाजात लाचारपणे वागत असला तरी मायाळू आणि अहंकारी आहे. धुर्पता ही शिवनाकची भोळीभाबडी, व्यवहारी आणि कष्टाळू, काटकसरी - मेहनती बायको आहे. मंदिर प्रवेशापेक्षा तिला गावची चाकरी महत्त्वाची वाटते. 'चाकरी'मुळे तिच्या संसाराला हातभार लागणार (पृ. २७) याची तिला खात्री असते. "बाबा रे, तुमी शिकलेले.........मी अडानी बाई. पण माकां येकच समाजतां....... वाडवडलां-पासून आमी या रामेसराक पूजलंव...... तेची विभूत कपाळाक लावीत दिवस काडलव् . तेनाच आमची रखवाली केल्यान् . तेका तुमी इसरां नुको." (पृ. १०१) असे ती पांडुरंगाला म्हणते, तीची जातकुळी 'इंधन'मधील निवेदकाच्या भाबीशी जुळणारी आहे. हिंदूंच्या पालखील 'उल्फा' देणारी भाबी आणि रामेश्वराची खिरापात वाटणारी धुर्पता दोघीही कोकणातील स्त्रियांच्या प्रतिनिधी आहेत.

'गोपाळ' हा शिवनाकचा मोठा मुलगा आहे. संयमी, शांत, विचारी आणि गंभीर प्रकृतीचा आहे. शिक्षण शे. का. फे. चे कार्य आणि मुंबईतील वास्तव्य आणि बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव यामुळे तो बौद्धधर्म स्वीकारतो. दलितांनी आपल्याप्रमाणे शुद्ध भाषा बोलावी. 'पड' खाऊ नये. शिकावे. अन्यायाविरुद्ध आवाज उठवावा, मंदिरप्रवेश करावा, हक्कांसाठी भांडावे, अस्पृश्यतेचा कलंक धुऊन-पुसून टाकावा. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीवर मात करावी. विषमता नष्ट होऊन समानता प्रस्थापित व्हावी, हिंदू संस्कृतीतील व्रतवैकल्य, पूजा बंद करुन चळवळ करणारा हाडाचा कार्यकर्ता आहे. समाज परिस्थितीने, बांधवाच्या लाचारीने बाबासाहेबांच्या मृत्युनंतर स्वार्थी कार्यकर्त्यांच्या वर्तनाने, बहिणीवरील अत्याचाराने अगतिक, विमनस्क अस्वस्थ

होतो. त्याच्यातील मुळातला भडकपणा हळूहळु नष्ट होतो. नलिनीला दत्त-साईबाबाच्या पूजेला विरोध करणारा हळुहळू तिच्या श्रद्धेला तडा जाणारा नाही असा वागतो. पदवीधर आनंदने नोकरी करावी, स्थिरस्थावर व्हावे असे त्याला वाटते.

पांडुरंग कदम हा पहिल्या स्वातंत्र्यदिनी प्रभातदिनी गोड आवाजात गाणी म्हणणारा, कणकणवलीच्या शाळेत एस. एस. सी.पर्यंत शिक्षण घेतलेला, स्वजातीने अवहेरलेला, अगतिक तरुण आहे. ब्राह्मणाच्या सुनंदाने झुलविण्यामुळे अस्वस्थ होतो. ग्रामस्थांनी बौद्धधर्म स्वीकारावा म्हणून अयशस्वी प्रयत्न करतो. एस. टी. खात्यातील नोकरीवर समाधान मानतो. मालती आणि मुलांवर गावाकडील दलितांची सावली पडू नये म्हणून तटस्थपणे जगतो.

शिक्षिका असलेली नलिनी ही गोपाळची पत्नी देशस्थ आहे. ती स्वास्थ्यप्रिय, सुरक्षितता हवी असणारी व्यवहारी आहे. धर्मांतराने विषमता, दारिद्रय नष्ट होणार नाही, सर्व प्रश्न सुटणार नाही तर शिक्षण, नोकऱ्या, आंतरजातीय विवाह, आणि रक्ताच्या संकराने, सांस्कृतिक देवाण-घेवाणीने दारिद्रयाचा प्रश्न सुटेल, अस्पृश्यता नष्ट होऊन समानता प्रस्थापित होईल असे तिला वाटते. ती स्पष्टोक्ती आहे. धर्मातरानंतरही ती दत्त-साईबाबांची पूजा करणारी श्रद्धाळू स्त्री आहे. ती भ्रष्टाचाराला विरोध करते. इमानाने मिळेल तेवढे खावे असे ती मानते. कोकणी माणसांचा ती तिरस्कार करते. देशस्थ माणूस परिवर्तनप्रिय आहे, तर कोकणस्थ माणूस स्थितिशील आहे. तो परिवर्तनाला सामोरा जात नाही असा तिचा स्वानुभव आहे. व्यवहारी, संसारदक्ष, बाबासाहेबांच्या मृत्यूने अस्वस्थ झालेली असे तिचे चित्र अधिक जिवंत आहे.

आनंद हा पहिल्या स्वातंत्र्यदिनी जन्मलेला, पठाणासारखा आडदांड, अफाट, सवर्ण, स्वाजातीय आणि सरकार विरोधी लढणारा, बंडखोर आहे. हिंदुधर्म विरोधक, कट्टर, बौद्धधर्माभिमानी, नास्तिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लिंकन, ल्यूथर यांना देव मानतो. रौप्यमहोत्सव साजरा होत असताना दलितांना 'भाकर' मिळत नाही. विषमता, भ्रष्टाचार, लाचारी यांनी अस्वस्थ होऊन तो पंचवीसाव्या स्वातंत्र्यदिनी म्हणजेच वाढविसाच्या दिवशी काळेध्वज घेऊन मंत्रालयावर निषेध मोर्चा नेतो म्हणून त्याला अटक होते. अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारा बंडखोर अशी त्याची व्यक्तिरेखा जिवंत वाटते.

बौद्धधर्माचे आणि बाबासाहेबांचे महत्त्व, सांगणारा अंबाजीमामा, स्वार्थी, दरिद्री, लाचार, परंपरागत जीवन जगणारा, धर्मांतराला विरोध करणारा, मोन्या महार, रामेश्वराचे वारे अंगावर घेणारा गोंद्या, भूक भूक करणारी तारुण्यातच दारिद्रयाने खंगलेली पुतळी, आबूखोत आणि गडमठच्या खोताने अत्याचार केलेली वेणू, महार बटलियनचा बिल्ला खांद्यावर लावणारा, सेवानिवृत्तीनंतर लाचार बनलेला गणूमामा. जातभाईंना क्षुद्र समजणारा - तुटकपणे वागणारा मोन्या महाराच्या मावळणीचा मुलगा

प्रा. सहदेव माने, कष्टाळू, उद्योगी, महत्त्वाकांक्षी, गरिबीतून शिक्षण घेतलेला परंतु कॉंग्रेसच्या स्पर्शाने बिघडलेला दलित एस. टी. बोर्ड मेंबर ॲड. सुरेश निलेकर, खिश्चन धर्माशिवाय सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक विकास होऊ शकत नाही म्हणणारा देशस्थ काटे. सुईणीचे काम करणारी म्हातारी जिजी म्हारीण, कणकवलीच्या छात्रालयात शिकून मोठा झालेला शाम शाळीग्राम, त्याची बहीण सुनंदा, त्यांची आई, दानशूर आप्पा बामन आणि त्याची पत्नी, सत्तेची गुर्मी असलेला आडदांड आबू खोत, शिरी आणि अन्य गौण व्यक्तिचित्रण करुन लेखकाने समकालीन वास्तवाचे दर्शन घडविले आहे.

करुळ-कणकवली या देवगडबंदराजवळील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोंकणी प्रदेश परिसराची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. तेरडे, आघाडे, वशाडी, काशा आळव ही झुडपे, करांद्याच्या आणि चिवारांच्या वेली आणि साया, उक्षीचे उंचउंच झाडी, आंबा, फणस हे वृक्ष त्याप्रदेशात असल्याचे वर्णन प्रदेश वैशिष्ट्यसूचक आहे. मळवा (म्हावरा) मासा, भात-नाचणी हे धान्य प्रदेशविशिष्टच (पृ. ४१) आहे. गडमठ हे बहिणीचे गाव, कणकवली, जानवली, मुडेडोंगरी (पृ. ३८), महारांची केंबळीची घरे, घासलेटचे दिवे, पावसाळ्याच्या दिवसात महारवाड्याचे सरपणाचे हाल (पृ. ५) आणि 'कडवे करांदे' हे मिरगीच्या दिवसातले महारांचे अन्न (पृ. ९) यातून प्रदेश दिसतो.

प्रदेशविशिष्ट असेच निसर्गवर्णन लेखकाने केले आहे. मुंडेडोगरीचे वर्णन, "पावसाळा संपत आला होता. छानदार उन्हे पडली होती. भाते पसवली होती आणि पिंगाण्यांचे थवे सर्वत्र बागडत होते...... " (पृ. ३८) हे निसर्गवर्णन पांडुरंगाच्या मानसिकतेनुरुप आले आहे. तर 'कणकवलीचा पाऊस - शहरातला पाऊस पांडुरंग प्रथमच पाहत होता. गावापेक्षा हा पाऊस त्याला अधिक हलका वाटला. गावचा पाऊस येताना काळाकभिन्न काळोख घेऊन यायचा. महारवाड्यातल्या गर्द झाडांवर ताशासारखे त्याचे थेंब वाजायचे आणि घरापाठीमागील वहाळाला घोंगावणारा हौर यायचा'.

कणकवलीच्या सीमेवरील जानोलीच्या नदीला मात्र तसाच दणांतर हौर पहिल्याच पावसाने आणला होता. वर सह्याद्रीत बेसुमार वेगाने पाऊस पडला की खाली समुद्राच्या दिशेने श्रावणाच्या साऱ्या नद्यांना जबरदस्त वेगाने धावणार तांबडेधुंद पुर येत. - जानोलीची नदी छात्रालयाला भिडलेली होती. उन्हाळ्यात मुले तिथेच आंघोळीला जात. कपडे धुवीत. पण एरवी हडकुळ्या गायीसारखी दिसणारी ती नदी मृगाबरोबर हौर आला की मुसंडी मारणाऱ्या बांगर पाड्यासारखी डोळे लाल करून उगारु लागे." (पृ. ५०) हे निसर्गवर्णन प्रदेश जिवंत करते.

स्वतः लेखकाने कादंबरीच्या प्रस्तावनेत लेखनाची निर्मिती प्रक्रिया सांगताना म्हटले आहे, "मला माझा गाव तिथला महारवाडा कृष्णा नि मोन्या महार आठवत

होते. वाटत होते, या गावासाठी या महारवाड्यासाठी कुठे आहे भाकरी आणि कुठे आहे फूल ? पंचवीस वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही माझ्या गावचा महारवाडा तसाच आहे. स्वातंत्र्याच्या पंचवीस वर्षात त्याला जर काहीच मिळाले नसेल, तर देशालाही काहीच मिळालेले नाही......'' (प्रस्तावना पृ. ८) स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचे दैन्य, दारिद्र्य, लाचारी, कायम टिकून असलेली दिसते. धर्मांतरानेही त्यांच्या जीवनात परिवर्तन आले नाही हे कर्णिक येथे चित्रित करतात. या पार्श्वभूमीमुळे डॉ. गंगाधर पानतावणे प्रस्तुत कादंबरीच्या वाचनाने अस्वस्थ झाले. त्यांनी तिचा यथोचित गौरव करताना लिहिले आहे,''...... गेल्या पंचवीस वर्षातील एका अस्पृश्य कुटुंबाच्या स्थित्यंतराचा आलेख आपण समृद्धपणे रेखाटला आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी झपाटलेला, परंतु परिस्थितीने कधीकधी असाहाय होऊन चरफडणारा आणि मग देशाविरुद्ध, धर्माविरुद्ध,धर्मग्रंथाविरुद्ध बंडाची भाषा बोलणारा गोपाळ, आणि विद्रोही मनाचा आविष्कार असलेला आनंद ज्वलंत आहेत. परंपरा न झुगारु शकणारा गोपाळचा बाप नि जीवनाविषयी, काही अपेक्षा बाळगणारा पांडुरंग, गोपाळची पत्नी ही आणखी काही विलक्षण पात्रे, महारांच्या घरातील, त्यांच्या वागण्यातील, समाज प्रकृतीतील आपण अनेक बारकावे टिपलेले आहेत. त्याचा मला विशेष आनंद झाला. 'भाकरी' आणि 'फूल' ही एक समर्थ कादंबरी आहे.......'' (प्रस्तावना पृ. ९-१०)

स्वातंत्र्यपूर्व काळातील गावगाडा मोडकळीस आला. जातिभेद, अस्पृश्यता, विटाळ या गोष्टी पाळणे वाईट असले तरी त्या पाळल्या जात होत्या. परंतु दलित आणि सवर्णांमध्ये विश्वासाचे, प्रेमाचे, जिव्हाळ्याचे संबंध होते. माणुसकीची भावना होती. दलित समाज अज्ञानी होता. देशाला स्वातंत्र्य मिळाले याचीदेखील कल्पना त्यांना नव्हती. (पृ. ७), बाळंतपणात अडलेल्या धुर्पतीची सुटका करण्यासाठी ताई बामनी महारणीची आफड न मानता बाळंतपण करते. तिच्यासाठी कपडे व गरम मसाला, काढ्याचं सामान देऊ करणे यातून माणूसकी होती हे स्पष्ट होते. पहिल्या स्वातंत्र्यदिनी प्रभातफेरीच्या वेळी महार ढोल-ताशे हे आपले वाद्य सोबत घेऊन येत नाहीत. तेव्हा आबू खोत त्यांची अप्रतिष्ठा करतो, शिव्या देतो, यातून खोतांची अरेरावी दिसते. त्या समाजात धनिक खोतांच्या कुत्र्याची जी किंमत होती, ती दलित माणसांना नव्हती. आबुखोताचा कुत्रा रामेश्वराच्या नंदीजवळ बसतो, तेव्हाचे पांडूरंगचे मनोगत विषमतेवर प्रकाशझोत टाकणारे आहे. "...... साला कुत्रा.... एक जनावर त्याला थेट गाभाऱ्याच्या घरातल्या नंदीपर्यंत जायला मिळते नि आम्हा महारांच्या पोरांनी महारथळ्याच्यापुढे जायचे नाही...... वारे वा ऽ ऽ !'' (पृ. ८) स्वातंत्र्योत्तर काळामध्ये जनजागृती होऊ लागली हेच वरील मनोगतांतून स्पष्ट होते. अस्पृश्यता-विटाळ मानला जात असताना कामांध लोकांना दलित स्त्रिया बाटवताना, त्याच्या कासोट्याला हात घालताना

विटाळाची जाणीव होत न्हवती. जसे बांबू विकत घेण्यासाठी गेलेल्या धुपर्तीकडे आबू खोत वाईट नजरेने पाहतो. तिने बांबूसाठी आणलेले चांदीचे दोन रुपये खाली टाकायला लावतो. तिच्या तरण्याबांड लेकीला - वेणूला माळावर हाताला धरुन जवळ ओढतो. पदराला हात घालतो तेव्हा तो शिवशिव पाळीत नाही. गडमठचा खोत विवाहित वेणूला कासोट्याला हात घालून विटंबना करतो. यातून दलित स्त्रियांशी धनिक सत्तीने आणि पैशाच्या जोरावर अनैतिक संबंध ठेवत होते. याप्रसंगी त्यांना विटाळ होत नव्हता. जातिभेद - शिवाशिव पाळणाऱ्या गावामध्ये आनंदाला ठेऊ नये असे पांडुरंगला वाटते. पुढे तो स्वतःच्या कुटुंबियांनाही कुरुळला आणण्याचे टाळतो. त्याचे मनोगत समकालीन वास्तवाचे दर्शन घडविते,

"........इथली शिवाशीव, इथली 'आफड', देवळात बाजूला महारांसाठी ठेवलेले 'म्हारस्थळ', करवंटयातून चहा प्यायला लावणारा येशा बामण नि औषधे बंद करुन देवाची विभूती आयेच्या कपाळावर लावणारा बाबा - या साऱ्यांपासून त्याला वेगळे केले पाहिजे....... कंदिलाच्या शुभ्र प्रकाशात त्याला पुस्तक वाचता आले पाहिजे. सरस्वतीच्या त्या गिचमिड चित्रांऐवजी त्याने तिरंगी राष्ट्रध्वजाचे सोपे, सुंदर चित्र काढायला शिकले पाहिजे......."(पृ. ५४) स्वातंत्र्योत्तर काळामध्येही ग्रामीण लोकजीवनात परिवर्तन आले नव्हेत. तसेच शिक्षण प्रभावामुळे दलितांना हक्कांची जाणीव झाली, होऊ लागली. खेड्यामध्ये स्वातंत्र्योत्तर काळामध्ये परिवर्तन आले नसले आणि शहरात परिवर्तन आले नसले तरी दलितांचे शोषण थांबले नाही. स्वधर्मीयांकडून हे शोषण होऊ लागले. खेड्यातून शहरात गेलेल्या दलितांना हलक्या प्रतीची कामे करावी लागतात. झोपडपट्टीत रहावे लागते. दहावी झालेला पांडुरंग मुंबईत गेल्यावर त्याला नोकरी मिळत नाही. अर्जाची पोहच मिळत नाही. तेव्हा तो म्हणतो, "..... हे ओळखीने गेलेल्या ठिकाणी, बिनओळखीच्या ठिकाणी तर अर्जाची पोचसुद्धा नाही मिळत. आपण अस्पृश्य वर्गातील म्हणून तर साले आपणासं असा नकार देत नसतील ? या स्पृश्यांचे काही सांगता येत नाही. हजारो वर्षे आम्ही दडपले गेलो होतो. अडाणी होतो. गरीब होतो. तुम्ही सांगायचे आणि आम्ही ऐकायचे. तुम्ही हुकूम करायचा आम्ही तो पाळायचा, तुम्ही सदरेला यायचे आम्ही 'जोहार मायबाप' म्हणायचे. आमचा एवढा संत पुरुष 'चोखामेळा' पण त्यालाही 'जोहार मायबाप जोहार' म्हणून देवाला आळवायला लावले. तुम्ही (पृ. ५८) यातून पारंपरिक लोकजीवनातील विषमता आणि स्वातंत्र्योत्तर काळातील तरुणांमध्ये जागृती स्पष्ट दिसते.

मागासवर्गीय प्रा. सहदेव माने यांचे अलिप्त वागणे (पृ. ८७) किंवा एस. टी. बोर्ड मेंबर मागासवर्गीय ॲड. सुरेश निलेकर यांचे ऐटीत वागणे आणि काँग्रेसधार्जिणे वर्तन करणे (पृ. ८७), जी. एस. मोरे या दलित असलेल्या सरकारी अधिकाऱ्याने

पांडुरंगला झाडू मारण्याचे काम सांगणे. सत्तास्थानी पोहचलेल्या दलितांनी आपल्या समाजातील तरुणांची उपेक्षाच केली. त्यामुळे अल्पपगाराची हलकी नोकरी आणि झोपडपट्टीतील वास्तवाला पर्याय उरला नाही. त्यातूनही स्वातंत्र्योत्तर काळातील विषमता दृगोचर होते. "क्रांतिनगरात..... नाव क्रांतिनगर, पण वस्ती एका झोपडपट्टीची. तिथे राहणारे सारे अस्पृश्य, मांग, गारोडी, पाकीटमार, महारोगी. सारे एकजात दरिद्री. या झोपड्यात म्हणजे मुंबईतले महारवाडेच. गावाकडे असतात तसे. नि हा शिवाजीपार्क म्हणजे मुंबईचा बायण आवाढ !" (पृ. ६६)

नोकरीच्या निमित्ताने वशिलेबाजी वाढली. आरक्षणाचा फायदा दलितांना मिळाला नाही. तसेच प्रशासन व्यवस्था भ्रष्ट झाली. भ्रष्टाचार वाढला. वशिल्यामुळे शाम शाळीग्रामला नोकरी मिळाली. सवर्णांचे पुढारी जातीच्या लोकांसाठी आपले वजन - पद वापरु लागले. शाम शाळीग्रामच्या मामाने मंत्र्याकडे शब्द खर्च केल्यामुळेच त्याला नोकरी मिळाली. सुनंदा एस. टी. खात्यात नोकरीला लागली. तसेच शाळीग्रामच्या ओळखीने, वशिल्याने पांडुरंगला नोकरी मिळाली. प्रशासन व्यवस्था भ्रष्ट झाली. जसे गडमठच्या खोताने वेणूशी अतिप्रसंग केला तेव्हा गोपाळ आडमठला गेला असता त्याला हे चित्र दिसते. देवगडचे पोलीस आणि अंमलदारसद्धा धनिकांचे हस्तक झालेले तो पाहतो. सरकारी कायदेसुद्धा कुचकामी असल्याचा त्याला अनुभव येतो. (पृ. ७०) असंघटीत लोक, पैशाचा अभाव आणि कायदे यामुळे दलितांचे शोषण स्वातंत्र्योत्तर काळातही थांबले नाही. सरकारी कचेऱ्यांमध्ये भ्रष्टाचार चालतो हे मागासलेल्या लोकांनासुध्दा समजलेले दिसते. जसे पांडुरंगला एस. टी. खात्यात नोकरी लागल्यानंतर वडील त्याला विचारतात, "वरचा प्राफीट काय असता ?" (पृ. ८०) यातून भ्रष्टाचार वाढीला लागल्याचे स्पष्ट होते.

एकूण स्वातंत्र्यानंतर धर्मांतर करुन देखील दलितांच्या लोकजीवनात परिवर्तन आले नाही. पांडुरंगचे मनोगत स्वातंत्र्योत्तर जीवनभाष्य आहे.

......... पांडुरंगाला स्वतःचीच शरम वाटली. आजूबाजूच्या साऱ्या जगाचीच त्याला लाज वाटू लागली. याचसाठी केला होता का सारा अट्टाहास ? याचसाठी बाबसाहेबांचा जन्म खर्ची पडला ? काय फरक पडला आहे या माझ्या जन्मभूमीमध्ये? - आमच्या या भावाबहिणींचे ? नाहीतर इतर समाजाकडे पाहा. आबू खोताचे घर दुमजली माडीचे झाले. त्याचे तिन्ही मुलगे ग्रॅज्युएट होऊन मोठ्या कंपन्यांतून नोकरीला लागले. त्याने खूप जमीन केली. सरकारी योजनांचा फायदा घेऊन तलाठी, सर्कल इन्सपेक्टरांना वश करुन घेऊन सारा मलीदा स्वतःकडे ओढला. गावातले सारे कुळवाडी पुढारले, सुधारले, कुळकायद्याने मिळालेल्या जमिनीतून ते तीनतीन पिके काढू लागले. त्यांचे चाकरमाने वधारले, सवर्णांचे सगळे जग सुधारले.

फक्त महारवाड्यातले, गावोगावचे मोन्या, गोंद्या, लक्श्या, भिक्या तेवढे अद्याप

उपाशी होते. (पृ. १४२-१४३) दडपशाही करणाऱ्याविरुद्ध, विवस्त्र करणाऱ्याविरुद्ध, विटाळ मानणारांविरुद्ध, भाकरी-फुलापासून दुर ठेवणाऱ्यांविरुद्ध लढण्याचा तरुण पिढी संघर्ष पुकारते. जमीनदार खोतांना सरकारी योजनांचा फायदा मिळाला, कुळांना कुळकायद्यामुळे जमिनी मिळाल्या, त्या दोघांचे लोकजीवनात परिवर्तन आले, परंतु दलितोद्धार धर्मांतरानंतर किंवा स्वातंत्र्यानंतर झाला नाही म्हणून नवी पिढी अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची - विद्रोहाची भाषा बोलू लागली.

देशस्थ आणि कोकंणस्थ महारांमध्ये असलेल्या फरकाचे चित्र गोपाळ - नलिनी वादातून स्पष्ट दिसते. देशस्थ भीक नाकारतो, तर खोतांकडून कोकणस्थ, जुनेकपडे, पैसे, मिठाई घेण्यात कमीपणा मानत नाही. (पृ. ९३) अंबाजीमामा पांडुरंगाच्या प्रश्नाला उत्तर देताना, देशस्थ आणि कोकणस्थ महारांमधील फरक सांगताना, समाजशास्त्रीय उकल करतात,

"देशावरचे लोक चटकन् एखादी गोष्ट स्वीकारतात. आपल्या कोकणात त्यांना विरोध होतो. आता हेच पहा - घाटावरील महारांनी धर्मांतर लगेच स्वीकारलं - कोकणात अद्यापि त्याला चालना मिळाली नाही......."

"पांडुरंगा, त्याचं असं आहे, कोकणातला महार हा 'गावचा मानकरी' असतो. उलट, देशावरचा महार हा गावाचा 'बलुतेदार' असतो. बलुतेदार नेहमी दुसरा देईल ते निमूटपणे घेणार - तर मानकरी मानासाठी हक्कान झुंजणार......."

"कोकणातल्या महारांसाठी गावच्या देवळात खास मानाची जागा असते." (गोपाळ) "बरोबर आहे. कोकणात महार आपला वेगळेपणा सांभाळून आहे - महार पलटणीत कोकणी अधिक आहेत - " (पृ. ८६) किंवा "...... देशस्थ महार कोकणातील महारांना कमी लेखतात आणि विदर्भातील महार तर आपल्याशिवाय इतर सर्वांनाच कमी लेखतात." (पृ. ६४)

कोकणस्थ लोक मुलींना शिक्षण देत नाहीत तर देशस्थ मुलींना शिक्षण देतात. देशस्थ मोठे महत्त्वाकांक्षी, महारपणाचा अभिमान असलेले तर कोकणातील महार खाली मान न घालणारे, लाचार, भ्याड, न्यूनगंडाने पछाडलेले दिसतात. वरील विवेचनातून महार लोकांच्या जीवनातील प्रदेशविशिष्टता स्पष्ट होते. देशस्थ परिवर्तनाला सामोरे जाणारे तर कोकणस्थ महार 'मानकरी' असल्यामुळे परंपराप्रिय असेच असलेले दिसतात.

स्वातंत्र्योत्तर काळातील कोकणी महारांच्या दैन्यावस्थेचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत येते. त्यांची घरे स्वातंत्र्योत्तर काळात केंबळीतची असून घासलेटचे पत्र्याचे डबे (दिवे) तेथे जळतात. बाळांतणीला सकस आहार ते देऊ शकत नाही. (पृ. १०), 'कडवे करांदे' (पृ. ९) हे त्यांचे मिरगातील निकृष्ट अन्न आहे. मासे, खेकडे पकडणे, मेलेल्या जनावरांचे मांस खाणे, जनावरांचे कातडे विकणे, पडीचा वाटा मिळावा

म्हणून सर्वजणांनी मेलेल्या जनावराभोवती जमा होणे (पृ. ११-१२), डवलीडवली पेज नि कुळथाचे पाण्यात भिजवलेले पीठ खाऊन, नाचण्याची आंबील पिऊन भूक भागविणे, बाळंतपण जवळ आलेल्या दलितांच्या झोपडीमध्ये बाळंतेरासाठी लागणारे चार जिन्नस घरात नसणे (पृ. ३) इ. घटना प्रसंगातून कोकणी महाराचे दारिद्र्य दिसते. गौरीगणपतीच्या दिवसात - आयदाण - सुपारोवळ्यांना अधिक किंमत मिळते, त्यावर उदरनिर्वाह अवलंबून असतो. म्हणून विश्रांतीशिवाय बाळंतपणानंतर धुर्पती कामाला लागते. (पृ. १७) भीक घेणे महारांना आवडत नसले तरी त्यांचे पोट त्यांना शांत बसू देत नाही. चाकरमान्यामुलांकडून मिळणारे पैसेही संसारास अपुरेच पडतात. लाज शरम वाटली तरी भीक घेण्याशिवाय पर्याय शिल्लक नाही असे शिवनाकच्या संवादातून (पृ. ९२-९३) स्पष्ट होते. धर्मांतराने पोटाचा प्रश्न सुटणार नाही याची कोकणातल्या महारंना खात्री वाटते. म्हणूनच ते धर्मांतरास विरोध करतात. म्हणजे धर्मांतर अमान्य करण्याचे कारण आर्थिक असल्याचे स्पष्ट होते. (पृ. ९८-९९) सत्ताचा संकर, आंतरजातीय विवाह, शिक्षण याशिवाय दलितोद्धार होणार नाही. स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव साजरा होत असतानाच्या महारवाड्याचे वर्णन केले आहे,

"...... पंचवीस वर्षापूर्वीचा महारवाडा आजही तसाच होता. उदास, मोडकळलेला आणि कळाहीन. एकाही घरावर मंगलोरी कौल नव्हती. एकाही घराला चिरा नव्हता. पंचवीस वर्षात महारवाड्यात एकही नवे घर बांधले गेले नव्हते. मातीच्या त्याच ओबडधोबड भेगा गेलेल्या भिंती, नरामाच्या पानांच्या तटक्या आणि कुडे, तीच गाडगीमडकी, जर्मलची फुटकी भांडी, बाटल्या आणि पत्र्याचे गंजलेले डबे. तीच फाटकी चिरगुटे, तीच अशक्त, केविलवाणी भूक लागलेली मुले. आजही आपले भाईबंद रामेश्वराच्या देवळात पायरी चढून जाऊ शकत नाहीत. अजूनही त्यांची जागा महार थळातच होती. अजूनही महारकीचे वारे गोंद्या महारावर येते. शिमग्यात देवळातून देवाच्या पालखीबरोबर चव्हाटयावर येताना, त्याच्या अंगात देवाचा संचार असूनही त्याच्या पायावर बायका दुरुनच पाणी ओततात. बाकीच्या घाडी गुरवांच्या अंगावरील देवांचे मात्र पाय त्या आपल्या हाताने धुतात. गावातील विहिरीवर अजूनही अस्पृश्यांना प्रवेश मिळत नाही....... धर्मांतर धुळीत मिसळून वाऱ्यावरुन वाहून गेले होते. इथले महार घड हिंदूही नव्हते नि बौद्धही नव्हते !''..... (पृ. १४१) स्वातंत्र्योत्तर पंचवीस वर्षांच्या काळात कोकण प्रदेशातील महारांचे दारिद्र्य वाढले. विषमता नष्ट होऊ शकली नाही.

कोकणस्थ महारांच्या आर्थिक स्थितीचे चित्रण करणे हे प्रयोजन असले तरी त्यानिमित्ताने राजकीय जीवनावरही वेळोवेळी भाष्य केलेले दिसते. स्वातंत्र्य मिळाल्याच्या आनंदामध्ये १५ ऑगस्ट १९४७ रोजी करुळ गावात प्रभात फेरी काढल्याचा,

देशभक्तीपर गीत म्हटल्याचा आणि घोषणा दिल्याचा उल्लेख (पृ. ६) येतो, त्यानंतर प्रभात फेरीत ग्रामस्थ सहभागी होत नाही. तिरंगा फडकवणारी राष्ट्रसेवादलाची शाखा, गांधीवधानंतर बंद पडलेली संघाची शाखा की जिथे तिरंग्याऐवजी भगवा ध्वज लावला जात होता. (पृ. ३६) गांधीहत्तेनंतर जनसामान्यांना अश्रू आवरेनासे झाले. (पृ. ४२) यातून म. गांधीचा तत्कालीन लोकजीवनावरील प्रभाव स्पष्ट दिसतो. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ (पृ. ५५-५६), डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर (पृ. ५५-५६), डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे विभाजन झाले. रिपब्लीकन पक्ष आणि दलित पॅंथरचा जन्म झाला. दलित कार्यकर्त्यांना रान मोकळे मिळाले (पृ. १०८), त्याचप्रमाणे धूर्त कॉंग्रेस नेत्यांनी दलित कार्यकर्त्यांना प्रलोभन दाखवून मिंधे बनविले (पृ.११८-१२०), महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यांनी रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने कार्यक्रम जाहिर करणे, बुद्धिवंतांनी त्यांच्यासमोर लाचार होणे (पृ. १२८-१२९), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराने दलित समाजामध्ये जागृती झाली, परंतु त्यांच्या मृत्यूनंतर दलित कार्यकर्त्यांनी स्वार्थापोटी स्वधर्मीयांकडे पाठ फिरविली. सत्तास्थानासाठी त्यांनी बुद्धी गहाण ठेवली. दलितोद्धाऐवजी स्वतःच्या उद्धाराकडे लक्ष दिले.

स्वांतत्र्योत्तर काळात शिक्षण प्रसाराने जाणीव जागृती घडविली. शाळेमधून समानतेची वागणूक दिली जात नाही. सवर्ण आणि दलितांच्या मुलांना वेगवेगळ्या जागी बसविले जाते. शाळेची सर्व वर्ग एकाच लांबोडक्या इमारतीमध्ये पाटीर्शन न घालता बसवलेले होते. (पृ. २०) यावरुन शिक्षणाबद्दलची उदाशीनता दिसते. त्याचप्रमाणे विषमता-जातिभेदही दिसतो. पांडुरंगाला कुरुळच्या शाळेत त्याच्या तिसऱ्या नंबरवर बसविले जात नाही. त्याचे वेगळे गोणपाट असते. त्याला मास्तर शिवत नाहीत. शाळेतल्या पिंपातील पाणी पिण्यास बंदी असते. कणकवलीच्या छात्रालयातही जातिभेदाचा अनुभव (पृ. ३८) पांडुरंगाला येतो. शिक्षण, रक्तसंकर, आंतरजातीय विवाहशिवाय विषमता नष्ट होणार नाही. शिक्षणप्रसारामुळे लोकजागृती होऊन हिंदुसंस्कृती त्यांच्या देवदेवता नाकारण्याचे सामर्थ्य दलितांमध्ये निर्माण झाले.

कोकणी खेड्यातील देव-देवतांचा, लोकजीवनावरील प्रभाव, श्रद्धा, समजुती, परंपरा यांचे चित्रण केल्याने कादंबरी अधिक वस्तुनिष्ठ झाली आहे. जन्माला येणारा जीव, पिकलेलं फळ आणि पावसाचं पाणी यांना विटाळ नसतो. लहान बालकं देवाघरचा निष्पाप जीव मानण्याची सांस्कृतिक परंपरा येथे दिसते. (पृ. ४) तसेच करुळच्या 'रामेश्वरा'प्रमाणेच धुर्पतीची माहेरच्या 'डागऱ्याची अनुभवानी'वर श्रद्धा असलेली दिसते. 'आफड' (विटाळ) न पाळता ताई बामनीने बाळंतपण केले. तेव्हा देवीचे ती उपकार मानते. (पृ. ४) मूल न होणे परमेश्वराच्या हातात आहे (पृ. १५) अशी समजूत असलेली दिसते.

श्रावणी सोमवारचा 'वारी'चा दिवस देवाला 'गाऱ्हाणी' घालणे, 'अवसर' येणे, 'वारी' बोलू लागणे, दलितांना मंदिर प्रवेशास बंदी, रीत-परंपरा मोडणाऱ्याचा कुलक्षय होतो अशी समजूत महाराने मंदिर प्रवेश करुन रामेश्वरावर कुळे घातली, त्यामुळे लोक अस्वस्थ होतात. देव बाटवला म्हणून रामेश्वराचा कोप होईल, रोगराई येईल, गुरेढोरे मरतील, पिकावर कीड पडेल, पाऊस पडणार नाही, पिके करपतील असे लोकांना वाटू लागते. महाराने रामेश्वर बाटविला म्हणून भटाला बोलऊन होमहवन करुन शांती करणे यातून लोकसमजुतीचे आणि अंधश्रद्धाचे दर्शन घडते. (पृ. २१ ते २६)

कोकणातील महार हा रामेश्वराचा मानकरी असतो. त्याची गावात 'चाकरी' असते. चाकरीचा महार गावापुरती मनसद असतो. चाकरीच्या महाराला देवस्थानच्या जमिनीचे उत्पन्न मिळते. सराईला प्रत्येक घरातून चारचार पायली भात मिळतो. सणासुदीला गावात घरोघरी फिरण्याचा त्याला हक्क आहे. रामेश्वराच्या देवळातील आठवड्याच्या कमाईमध्ये त्याचा हक्क असल्यामुळे नारळ, तांदुळ आणि पैसे त्याला मिळत. त्याला गावाची आणि देवाची सार्वजनिक कामे करावी लागते. "गावात 'ताकीद' करुन महत्त्वाची बातमी करणे, मयताची ताकीद, गावमेळ्याची ताकीद, पारधीची ताकीद, देवाच्या वार्षिकाची ताकीद या ताकीदी असत. शिवाय बाळ-बाळंतिणीचे मयत झाले तर खड्डा खोदणे, ढोर मेले तर ते ओढणे, बाहेरगावच्या देवस्थानांना वाजंत्री नेणे अशी कितीतरी कामे चाकरीच्या महाराला करावी लागत आणि त्यापायी त्या महार कुटुंबाला वर्षभर काही ना काही बिदागी सतत मिळत राही. 'चाकरी'चे वर्ष ज्या महाराच्या वाट्याला येई तो अतिशय सुखी मानला जाई. वर्षभर तरी तो या 'चाकरी'च्या बळावर सुखासमाधानात राही. म्हणूनच चाकरीच्या वर्षावर सारे महार डोळा ठेवून असत." (पृ. २७) 'चाकरी' ही कोकणी खेड्यातील सांस्कृतिक परंपरा आहे. 'तळी फिरणे' ही एक शिमग्याच्या वेळची परंपरा असलेली दिसते. (पृ. ३६) 'वाडी', 'समाराधना' (पृ. ३७) या दिवाळीच्या वेळेच्या सांस्कृतिक परंपरा असलेल्या दिसतात. गणेश उत्सवातील 'न्हेवऱ्या'ची परंपरा कोकणी प्रदेशातील लोकजीवनाचे वैशिष्ट्य आहे. (पृ. १२६) शिमग्याच्या वेळेची होळी, तमाशा, पाचदिवस वाटले जाणारे गुळखोबरे (पृ. ४५), आजारी माणसाला औषध देण्याऐवजी गुरवाला सांगुन रामेश्वराला 'जाबसाल' करणे आणि विभूती घेणे यातून कोकणी माणसाचा अंगाऱ्यावरील भरिभार स्पष्ट होतो. रामेश्वरावरील श्रद्धा दिसते. (पृ. ५२)

जानवलीच्या नदीमध्ये दर तीन वर्षांनी 'भारा'' होतो असा लोकसमज आहे. (पृ. ५१) तसेच मुडेडोंगरीची देवी नवसाला पावते. कोंबड्याचा नवस बोलावा लागतो, श्रद्धा मनासारखे झाले की मुंडेडोंगरीला जिवंत कोंबडा आणून सोडण्याची परंपरा दिसते. कोकणात महार-चांभाराचा भट कुंभार असतो हे प्रदेशविशिष्ट संस्कृतीचे

लक्षण आहे.

प्रस्तुत कादंबरीमध्ये भजनाचा उल्लेख येतो. भजनाच्या वेळी वाजविली जाणारी वाद्य किंवा रामेश्वराचे गुणगान हे देखील कोकणप्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. जसे कोकणात भजनाच्या वेळी नाल, मृदुंग, चकवे ही वाद्ये वाजविली जातात. (पृ. ९४) तर देशावर टाळमृदुंग, तर विदर्भात ढोल-पिलमपोवे वाजविले जातात. ज्ञानेश्वर, तुकाराम आणि रामेश्वराचे गुणगान करणारी भजन परंपरा डॉ. आंबेडकर विचारांच्या प्रभावातून नष्ट होऊन नवी परंपरा आली असे मधु मंगेश कर्णिक कादंबरीत वर्णन करतात.

"चिखलामाजी कमळ फुलावे तसे भीमजी अवतरले
नमन आमुचे असे त्यांना कमळे चिखला उद्धरिले !!
बोला श्री भारत माता की ऽ ऽ ----------
" जै " सारे महार गरजे,
" बोला ऽ ऽ श्री बाबासाहेब की ----- " जै "
बोला श्री सिध्दार्थ भजनमंडळाचा "विजय असो" (पृ. ९५-९६)

हिंदुधर्म संस्कृती नाकारण्याची सांस्कृतिक परंपरा यातून स्पष्ट दिसते.

कादंबरी तृतीयपुरुषी निवेदन पध्दतीने लिहिली आहे. निवेदन प्रमाणे भाषेत केले असूंन 'संवाद' व्यक्तिमुरुप प्रमाण मराठी किंवा मालवणी बोलीत लिहिले आहे. शिवनाक, धुर्पता, मोन्या यांचे संवाद मालवाणी बोलीतील आहे. तर गोपाळ, पांडुरंग, आनंद, नलिनी आणि अन्य व्यक्ती प्रमाणभाषेत बोलत असल्या तरी त्यांच्या संवादातून मालवाणी ढंग जाणवतो. मालवाणी बोलीतील काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द उदाहरणादाखल घेतले आहेत. करवारत, आवशी, इलाहा, माजो, आफड, इलो, मायझयो, झील, चिवे, चेडू, हाडलहस, हाडता, मागारणीक, न्हेवऱ्या, रोवळी या शब्दांतून कोकणी प्रदेश जिवंत होतो. तसे म्हणी-वाक्प्रचारांच्या वापराने प्रदेशविशिष्ट लोकजीवनाचे स्वरुप स्पष्ट होते. 'ये तोंडा जा तोंडा' (पृ. २), 'धोंडो मरुन मासक्यो उठविणे' (पृ. २५), 'पाण्यात राहून माश्यांशी वैर......'' (पृ. ३३)

'गोपाळचा आवाज अद्यापिही ताशावरील काठीसारखा तडतडत होता' (पृ. १६), "....... तो पिकलेल्या चिव्यासारखा दुभंगला' (पृ. १६) 'चोरी करताना पकडल्या गेलेल्या डोळ्यांनी त्याने (गोपाळ) आजूबाजूच्या सर्वांकडे पाहिले' (पृ. २४) 'फोड फुटून पू वाहू लागाव्या, तसे गोपाळला झाले' (पृ. ८९), 'गोपाळ नदी वहावी तसा वहात होता........'' (पृ. ७०), 'गोरीगोरीपान सुनंदा त्या पांढऱ्या फुलाफुलांच्या नितळ साडीमध्ये तळ्यातल्या पांढऱ्या कमळासारखी दिसत होती' ( पृ. ७७), 'उठवणीला आलेल्या म्हाताऱ्या बैलासारखा मोन्या स्वस्थ बसला होता' (पृ. १४१) या उपमा-प्रतिमांमुळे कथानक अधिक वस्तुनिष्ठ झाले आहे.

'भाकरी' हे समृध्दीचे आणि 'फूल' हे संस्कृतीचे प्रतीक समजून स्वातंत्र्याचा

रौप्यमहोत्सव साजरा करताना दलितांना 'भाकरी' मिळाली का ? त्यांचा विकास झाला का ? धर्मांतराने जातीभेद - अस्पृश्यता नष्ट होऊन समता प्रस्थापित झाली का ? या प्रश्नांची उत्तरे नकारात्मकच मिळतात. स्वांतत्र्योत्तर पंचवीस वर्षांत दलितोद्धार झालाच नाही. दलितोद्धारासाठी रक्ताचा संकर, आंतरजातीय विवाह आणि शिक्षण हेच पर्याय आहेत. कोकणातील खेड्यांच्या पार्श्वभूमीवरील ही एक वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक कादंबरी आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांना स्वातंत्र्याची फळे चाखायला मिळालीच नाहीत. ते असंतुष्ट, अतृप्तच राहिले. उच्चशिक्षित स्वजातियांनी त्यांची उपेक्षाच केली, राज्यकर्त्यांनी मतावर डोळा ठेवला, त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष केल.

## संदर्भ - टीपा


१. यादव आनंद, 'मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती', पृ. १३३
२. दिघे र. वा., 'सत्यकथा', ऑगस्ट १९५९, पृ. २२
३. गाडगीळ गंगाधर, 'साहित्याचे मानदंड', पृ. १५३
४. फडके भालचंद्र, 'प्रदक्षिणा', पृ. २४२
५. देशपांडे कुसुमावती, 'मराठी कादंबरी पहिले शतक', पृ. ३१८
६. देशपांडे अ.ना.,'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', भाग २. पृ.१७३-१७४.
७. गाडगीळ गंगाधर, तत्रैव, पृ. १४३
८. तत्रैव, पृ. १४२
९. यादव आनंद, तत्रैव, पृ. १३३
१०. तत्रैव, पृ. १३४
११. बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरीचा इतिहास', पृ. २७९-२८०.
१२. केळकर न. चि., 'सह्याद्री', से १९४४, पृ. २७४
१३. देशपांडे कुसुमावती, तत्रैव, पृ. ३२०
१४. बापट-गोडबोले, 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', पृ. ३६४
१५. प्रधान ग. प्र., 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' जुलै ते सप्टेंबर १९५६, पृ. २७
१६. ठाकूर रवींद्र, 'र. वा. दिघे यांच्या कादंबरी वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास' पृ. १०२
१७. जोग ल. ग., 'कादंबरी', पृ. ८८
१८. दळवी जयवंत, तत्रैव, पृ. ८०
१९. यादव आनंद, तत्रैव, पृ. १३७
२०. देशपांडे कुसुमावती, तत्रैव, पृ. ११४
२१. बंदिवडेकर चंद्रकांत, तत्रैव, पृ. ५९

२२. अदवंत म. ना., 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', डिसें. १९४८, पृ. २७
२३. बोरकर बा. भ., "दोन शब्द" (मांडवी ! तू आटलीस ?) पृ. ७
२४. भेंडे सुभाष, 'ललित' मार्च १९८६, पृ. ४५
२५. कालेलकर काकासाहेब, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' एप्रिल-जून१९५०, पृ.३३
२६. बोरकर बा. भ., 'सत्यकथा' ऑगस्ट १९५९, पृ. २७.
२७. देशपांडे अ. ना., तत्रैव, पृ. १८८
२८. देशपांडे कुसुमावती, तत्रैव, पृ. ३३९
२९. तोरो अ. रा., तत्रैव, पृ. २०५
३०. जोग ल. ग., तत्रैव, पृ. ११२
३१. जोशी उमाशंकर, 'गुलाबी साडी' (प्रस्तावना - भावीण), पृ. ७
३२. पेंडसे श्री. ना., 'लेखक आणि माणूस', पृ. १५९
३३. बांदेकर नारायण, 'ललित' एप्रिल १९८८, पृ. ३२
३४. भोसले द. ता., 'ग्रामीण साहित्य : एक चिंतन', पृ. ४८-४९
३५. नरहर कुरुंदकर, 'धार आणि काढ' पृ. १८६
३६. बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा', पृ. ७४
३७. गाडगीळ स. रा.,'प्रतिष्ठान' फेमाए १९६४, पृ. ५९
३८. बांदेकर नारायण, तत्रैव, पृ. ३०
३९. पेंडसे श्री. ना., 'सत्यकथा', एप्रिल १९६०, पृ. १५
४०. पवार गो. मा., 'प्रतिष्ठान' जाने. १९८१, पृ.९
४१. गाडगीळ स. रा., तत्रैव, पृ. ५५
४२. कुरुंदकर नरहर, तत्रैव, पृ. १८८-१८९
४३. गाडगीळ गंगाधर, 'खडक आणि पाणी', पृ. ३३४
४४. पवार गो. मा., तत्रैव, पृ. २
४५. कुलकर्णी द. भि., 'तिसऱ्यांदा रणांगण', पृ. ९५
४६. राजाध्यक्ष विजया, 'कादंबरीकार गो. नी. दांडेकर', पृ. ६१-६२
४७. गोरे दादा. 'गो. नी. दांडेकरांच्या प्रादेशिक कादंबऱ्या', पृ. ८८
४८. भावे स. शि., 'ललित', १९७२ पृ. ५
४९. चुनेंकर सु. रा., 'ललित' मार्च १९७५, पृ. २३
५०. फडके भालचंद्र, तत्रैव, पृ. ४०२
५१. आलोचना, वर्ष ३ रे, अंक ४, डिसेंबर १९६४, पृ. ४८
५२. पाध्ये प्रभाकर, 'आस्वाद', पृ. ८९-९०
५३. थत्ते यदुनाथ, 'किर्लोस्कर', जानेवारी १९७६
५४. स्नेहवर्धन 'साधना' १६ मे १९७०, पृ. १२

५५. मंचरकर र. बा. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', जुलै-डिसें. १९८०, पृ. ६९
५६. हस्तक उषा. 'प्रतिष्ठान', जुलै १९६६, पृ. ३७-३८ किंवा (कादंबरी आणि मराठी कादंबरी - समीक्षा लेख, पृ. २८४ ते २९०)
५७. पाध्ये प्रभाकर, तत्रैव, पृ. ८९
५८. घाटे सुरेश, 'राष्ट्रतेज', (अलिबाग), मे १९८०, पृ. २९
५९. नाडकर्णी ज्ञानेश्वर, 'ललित' ऑगस्ट १९७५, पृ. ३३
६०. नेमाडे भालचंद्र, 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप', पृ. ४१
६१. आलोचना, मार्च १९६६, पृ. ४७
६२. ज्ञाते कृष्णचंद्र, 'प्रतिष्ठान', जुलै-ऑगस्ट १९८३, पृ. ४

□□□

# ३. मराठवाड्याच्या जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप

## प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्याच्या जीवनातील प्रादेशकतेचे स्वरुप शोधण्यासाठी पुढील कादंबऱ्या आधारभुत मानल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | आडगावचे चौधरी | बी. रघुनाथ |
| २. | पाचोळा | रा. रं. बोराडे |
| ३. | गांधारी | ना. धों. महानोर |
| ४. | गणगोत | गणेश आवटे |
| ५. | विषवृक्षाच्या मुळ्या | वासुदेव मुलाटे |

अर्थात उपरोक्त कादंबऱ्या या कादंबरीकारांनी प्रदेशाचे दर्शन घडविण्यासाठी लिहिल्या आहेत असेच नाही, त्यांना आकलन झालेला जीवनानुभव रेखाटत असताना अनुषंगाने त्यांच्यावर प्रभाव गाजविणारा भूप्रदेश निसर्ग आणि समाजजीवन पार्श्वभुमी म्हणून येत असते. कारण लेखक हा एक व्यक्ती म्हणून समाजघटक असतो. प्रदेशविशिष्ट समाजाचे संस्कार त्याच्या व्यक्तिमत्वावर होत असतात. स्वतःच्या प्रतिभा सामर्थ्याने तो कलाकृतीला आकार देतो. हा आकार देत असताना अनुषंगाने प्रदेश चित्रित होतो, कधी तो जीवनानुभवाच्या केंद्रस्थानी असतो, त्या जीवनानुभवावर प्रभाव गाजवित असतो. उपरोक्त कादंबऱ्यांच्या आधारे मराठवाड्यातील समाजवास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. अर्थात हा शोध घेत असताना स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठवाड्यातील समाजवस्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. अर्थात हा शोध घेत असताना स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठवाड्यातील निजामी राजवटीच्या प्रभावाने घडलेली मानसिकता, त्यांच्या भाषेवरील उर्दूचा प्रभाव, स्वात्तंत्र्यतोत्तर काळातील अपेक्षा भंग, औद्योगीकरण आणि शिक्षणाच्या अभावामुळे आलेले मागासलेपण, संतांच्या भूमीतील या लोकांची शांतताप्रिय समाधानी वृत्ती तसेच धनिकांची सुखवस्तू विलासीवृत्ती, सरंजामदारांचा मुजोरपणा, जनतेची स्थितिप्रिय वृत्ती, त्यांची शेती-संस्कृती, घरांची रचना, जीवनव्यवहार यांचे कादंबऱ्यामधून आलेल्या चित्रणाधारे प्रादेशिकता शोधण्याचा प्रयत्न आहे.

**१) बी. रघुनाथ (भगवान रघुनाथ कुलकर्णी ) - *'आडगावचे चौधरी'***

बी. रघुनाथांनी 'ओ -- -- '(१९३६), 'हिरवे गुलाब' (१९४३), 'बाबू दडके'(१९४४), 'उत्पात'(१९४५), जगाला कळलं पाहिजे (१९४९), 'म्हणे लढाई संपली' (१९४६), आणि 'आडगावचे चौधरी' (१९५४) या सात कादंबऱ्या लिहिल्या आहेत. कथाकार म्हणून नावलौकिक झाल्यानंतर त्यांनी मराठवाड्यातील पार्श्वभूमीवर कादंबरीलेखन केले आहे. 'आडगावचे चौधरी' ही त्यांची चौधरी घराण्याच्या दहा पिढ्यांचा विशाल जीवनपट चित्रित करणारी प्रादेशिक कादंबरी आहे. सरंजामदारांचे रंगेल जीवनचित्रण प्रस्तुत कादंबरी करते. सत्तेच्या उन्मादामुळे सामान्य जनतेचे शोषण करून आपला डामडौल मिरवतात. परंतु रयत संघटित होऊन अन्यायाविरुद्ध आवाज उठविते. भावाभावांतल्या वैरामुळे जहागीर जप्त होते. ती परत मिळवून गावकऱ्यांचा सूड घेण्याचा निर्धार शेवटचा सरंजामदार अंबिकाचरण करतो, तेव्हा दुष्काळाला कंटाळून ग्रामस्थांनी गाव सोडलेले असते. प्रयत्नांती मिळालेली जहागीर निरर्थक ठरते. म्हणून लेखक लिहितो, ''ज्या लोकांच्या डोक्यावर चौधरी पाय देऊन नाचू इच्छीत होते ते लोकच गावातून नाहीसे झाले होते. चौधऱ्यांच्या मुक्त संचारासाठी त्यांनी सगळ गाव रिकामं केलं होतं न् मोकळं सोडलं होतं !''(पृ१०९)

सुजलाम सुफलाम अशा निसर्गकृपा झालेल्या गावातील लोक श्रध्दाळू-धार्मिक असतात. आडगावच्या चौधरी घराण्याविषयी पंचक्रोशीतील श्रीमंत लोकांना आदरयुक्त दरारा असतो. आपली मुलगी त्या घरात द्यावी म्हणून धनिक प्रयत्न करतात, परंतु मराठवाड्यातल्या सुलतानी अमलात घरात मुलगी जन्माला येणे गरिबांना संकट वाटते. कारण सामान्य जनतेवर सरंजामाचे जुलमी-अत्याचारी राज्य होते. दानधर्म करुन चौधरी घराण्यातील लोक दानधर्माचा माल परत लुटीत असत. डामडौलामुळे अनावश्यक खर्च होऊन कधीकधी भांडी गहाण ठेवून पाहुणचार करण्याची वेळ त्यांच्यावर येते. गावकऱ्यांचे ते शोषण करीत असत. सावकारांचे कर्जफेड करण्यास ते टाळाटाळ करीत. रामोशांकडून दरोडे घातले जात होते. नाटकीपणाने वागत, सरकारी रक्कम हस्तगत करून मागच्या दाराने पसार होत. असा चौधरी घराण्यातील पहिला जहागीरदार नाना चौधरी होता. त्यांच्या विरोधात जनतेच्या सरकारदरबारी अनेक तक्रारी होत्या. परंतु विठ्ठल, मारोती, यादवनाना हे शाही पेशकार चौधऱ्यांचे नातेवाईक असल्यामुळे जनतेच्या तक्रारी दाबून टाकल्या जात होत्या. प्रशासकीय राजकीय पार्श्वभूमी बदलली. नवाब शकील जंग शाहीपेशकार झाल्यावर चौधऱ्यांकडील 'थकबाकी' वसुलीसाठी नोटीसा पाठविल्या जाऊ लागल्या. नाना चौधरी बेचैन झाले. आतल्या मार्गाने वसूली थांबविण्याचा प्रयत्न करण्यासाठी ते दौलताबादला गेले. पेशकार शकील जंग यांनी भेट नाकारली. कर्जफेडीच्या चिंतेत असताना उमरग्याच्या विलासी आणि स्त्रीलंपट नवाबाला त्यांनी आडगावला येण्याचे निमंत्रण दिले. त्याला

विश्वासघात करुन लुटले. चौधऱ्यांनी सरकारी कर्ज भरले. असा हा धोकेबाज विश्वासघातकी आहे. डाकूगिरी, द्वेष, अहंता, कामगमन, लुच्चेगिरी हे त्याचे अवगुण आहेत.

राजाजी हा दुसऱ्या पिढीचा प्रतिनिधी अतिशय कठोर, निर्दयी आहे. धारपिंपरीच्या देशमुखाने 'आडगाव' मधील सोनाराची तरुण मुलगी पळविली. तिच्या आईवडिलांनी राजाजीला मुलगी पळविल्याची वेळीच कल्पना न दिल्याने काश्या रामोश्याकडून वृद्ध सोनार पतीपत्नीचा खून केला. धारपिंपरीवर दरोडा नेऊन दहशत निर्माण केली. तेथील समजदार लोक शरण आले आणि त्यांनी सर्व संपत्ती चौधऱ्यांपुढे ठेवली. त्यानंतर देशमुख पुत्र आणि सोनाराची मुलगी यांना राजाजीने जाळून ठार मारले. त्या घराण्याचे वैर पत्कारले.

बाळजी हा तिसऱ्या पिढीतील बेरकी-स्वार्थी सरंजामदार आहे. झाडगावच्या बाजीराव देसायांच्या कांतरावला स्वतःची मुलगी देण्याचा बळजबरीने प्रयत्न केला. देसायाकडून या संदर्भात हुंड्याच्या अपेक्षेने कानाडोळा केला गेला, ते स्वतः झाडगावला देसायांचा पाहुणचार घेण्यासाठी गेले. परंतु हुंड्याची रक्कम देणे आपल्याला झेपणार नाही असे पाहून माघारी आले. रामदेवळीच्या दडके आणि झाडगावच्या देसायांमध्ये हाडवैर होते. बाळाजीने दडक्यांच्या मदतीने देसायाच्या घरावर दरोडा घालण्याचे आणि लुटीचा माल दडक्यांकडे ठेवण्यांचे ठरविले. परंतु देसायांच्या घरावर रामोशांच्या मदतीने अगोदरच दरोडा घालून बाळाजीने सर्व पैसे लुटले. दडक्यांनी ठरल्या वेळेला दरोडा घातला असता काहीच हाती लागले नाही. दडक्यांच्या दरोड्यानंतर बाळाजी चौधरी देसायांचे रक्षक म्हणून मदतीला गेले. त्यापूर्वीच 'शिवरूप', रामोशाने देसायांना कफल्लक केलेले असते. दडक्यांकडील लुटीच्या मालातील अर्ध्या वाट्याची चौधऱ्यांनी मागणी केली. दडक्यांना प्रत्यक्ष लुट मिळालीच नव्हती तर ते देणार कसे ? तरीही हप्ता-हप्त्यांनी चौधऱ्यांच्या भीतीपोटी दडक्यांनी रक्कम दिली. देसाई आणि चौधरी यांच्यात सोयरीक झाली. दडक्यांचे वैर बाळाजीने वाढवून ठेवले.

आबाजी चौधरी हे चौथे प्रतिनिधी लुटारू आणि खोटी प्रतिष्ठा जपणारे आहे. महादेवाच्या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी धार्मिक ग्रामस्थांकडून प्रचंड रक्कम जमवितो. जनतेच्या पैशाने सर्व सोयींनी युक्त असे मंदिर बांधतो. मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करुन सोन्याचा मुखवटा घालून यात्रा भरवितो. श्रद्धाळू लोक दानधर्म करतात. जेवणाच्या पंक्ती उठविल्या जातात. ब्राह्मणांना दक्षिणा वाटल्या जातात. देवाचा सोन्याचा मुखवटा आणि अन्य रक्कम चोरी जाते. (ती रक्कम आणि मुखवटा चौधऱ्यांच्या घरात असतो) देवभान रामोशी सर्व यात्रेकरुंच्या वाटा अडवितो. त्यांना माघारी आणतो. मुखवटा परत करण्याचे आव्हान आबाजी चौधरी सर्वांना करतात. तो परत मळत नाहीस, म्हणून जनतेकडून नव्याने दानधर्म घेऊन नवा सोन्याचा मुखवटा तयार करुन मिरवणुक काढली. ब्राह्मणांना भरपुर दक्षिणा मिळाल्यामुळे ते खूष झाले. परंतु

त्यांचे समाधान फार काळ टिकले नाही. देवभान रामोशाने त्यांना रस्त्यातच लुटले. ते रडत माघारी आले रामोशांबद्दल आबाजीकडे तक्रारी करु लागले. तेव्हा आबाजीने खोट्या प्रतिष्ठेसाठी देवभानला गोळी घातली. त्याच्या पत्नीला अल्पशी रक्कम दिली. बाकी सर्व लूट तिजोरीत बंद केली.

आबाजी चौधरी हा या घराण्यातील पाचवा रंगेल जहागीरदार आहे. 'वाखाड्या' पुढे रोषणाई करून जलसा करणारा, कोल्हाटणींच्या नृत्यात दंग होणारा व ग्रामस्थ स्त्री-पुरुषांना जलसा दाखवून त्यांचे मनोरंजन करतो. दडके आणि देशमुखांनी चौधऱ्याच्या वाड्यावर आणि गावावर दरोडा घातला. घरांना आगी लावल्या. लुटमार केली. वारवाड्याचे मागचे दार फोडले. निर्दय कत्तल केली. कोल्हाटणी घाबरल्या. 'भावधन' रामोशाने बाबाजीला वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु बाबाजी आणि त्याच्या पत्नीस ठार मारुन दडके आणि देशमुखांनी सूड घेतला. चौधऱ्यांचे घराने त्यांना निःसंतान करायचे होते. पण भावधन रामोशी सोनाजीला घेऊन पसार झाला. दोन दिवस दडके आणि देशमुखांनी गाव लुटले. आडगावच्या राखरांगोळीस चौधरी आणि त्यांचे पूर्वजच कारण होते.

सोनाजी चौधरी हा सहावा कष्टाळू-प्रेमळ जहागीरदार आहे. भावधन रामोशाने त्यांना वाढविले. परत आडगावमध्ये आणले. निसर्गकृपेने पीक चांगले आले. आडगाव सुखी झाले. काही काळ समाधानाने ग्रामस्थ जगले. 'वारवाडा' या पहिल्या प्रकरणात लेखकाने सहा पिढ्यांचा इतिहास आणि जहागीरदारांचे दुर्वर्तन चित्रित केले आहे.

'उदयास्त' या कादंबरीच्या दुसऱ्या प्रकरणात जहागीरदारांच्या तीन पिढ्यांची उतरती कळा रेखाटली आहे. सातव्या पिढीचा प्रतिनिधी आहे भाऊसाहेब चौधरी. तो मांत्रिक - पायाळू आणि ज्योतिषावर विश्वास ठेवणारा रेखाटला आहे. बुवाबाजीमुळे घरातील संपत्ती त्यांनी नष्ट केली. वारवाड्यात पूर्वजांचे गुप्तधन आहे असा त्यांचा अंधविश्वास होता. त्यासाठीं संबंध वाडा खोदला गेला. गावकऱ्यांकडे चौधरी संशयाने पाहु लागले. गावकऱ्यांनीच वाड्यातील संपत्ती लुटली असा त्यांचा संशय होता. पिऱ्या रामोशाच्या हातातील कडे पाहून रामोशानेच गुप्तधन लुबाडले असा त्यांना संशय येऊ लागला. ते जमिनीवर काठी आपटत चालू लागले. आठवे जहागीरदार चिं. नानासाहेंबाबद्दल त्यांना तिरस्कार वाटू लागला. त्याने सुंदरानानीला वाड्यातच रखेली म्हणून ठेवले होते. ही सुंदरा नानी धारपिंपरीच्या मयत झालेल्या देशमुखाची विधवा पत्नी, दत्तक विधानावर नाराज असल्याने कोर्ट खटले झाले. तिच्याकडील धनदौलतीसाठी तिची मर्जी ते सांभाळू लागले. वडिलांच्या इच्छेखातर गुप्तधनाच्या शोधासाठी वाड्याच्या भिंती खोदल्या. दरम्यान भाऊसाहेबांचा मृत्यू झाला. त्यांच्या पिंडाला कावळा शिवला नाही. पूर्वजांच्या इच्छेखातर नानासाहेबानी वाड्याच्या जिर्णोद्धाराचे कार्य सुरु केले. सुंद्रा नानीची संपत्ती मिळाल्यानंतर तिला विष घालून मारले.

घराण्यात वैभव आले. देशमुख घराणे संपले. तसेच राजाभाऊ देसायांना जावई केले. आजारात मुलगी स्वर्गवाशी झाली. आजारी जावयाला वाड्यात आणले, त्यांची सेवासुश्रुषा केली, द्वितीयकन्या 'पुतळा' त्यांना देण्याचे ठरविले. परंतु देसायाची पूर्ण संपत्ती लुबाडली. हुंडा दिला नाही. शेतीची उत्पन्न गिळंकृत केले. अपमानित देसायाचे मृत्यु झाला. देशमुख-देसायांची संपत्ती लुटणारा लुटारू-क्रूर आणि कठोर असा तिरळा, स्त्रीलंपट, हिकमती, कृष्णकत्यात तरबेज असलेला नाना चौधरी लेखकाने रेखाटला आहे.

रावसाहेब चौधरी हे नववे जहागीरदार, पूर्वजांचे सर्व अवगुण घेऊन जन्माला आलेले. तिरळ्या नानासाहेबांचे ते जेष्ठ पुत्र. त्यांच्या वर्तनाबद्दल गावकऱ्यांमध्ये असंतोष होता. परंतु त्यांची पत्नी 'वहिनी' ही मात्र गावकऱ्यांचे श्रध्दास्थान होते. राध्या-महादू सारख्या कुळांची त्यानी जमीन लुबाडली. गजरा आणि राध्याच्या बायकोचे शीलभ्रष्ट केले, असा रंगेल आणि बेछूट जहागीरदार. सरकार दरबारी पैशामुळे त्याचे वजन होते. लोक आपला राग बोलून दाखवत नव्हते. दादासाहेब आणि रावसाहेब हे त्यांचे दोन भाऊ, आणि रजनीदेवी आणि प्रमिला या नटव्या, स्वार्थी, कलह वाढविणाऱ्या चतुर, आतल्या गाठीच्या, भाऊबंदकीला खतपाणी घालणाऱ्या भावजया आहेत. वहिनी आणि रावसाहेबाने पिढीजात अलंकार लांबविले असा त्यांना संशय होता. भावामध्ये वैर वाढले. राध्या सुडाने पेटला. गावकऱ्यांशी संघर्ष सुरु झाला. ते वाड्यावर चालून आले. राध्याला रावसाहेबाने गोळी घालून ठार केले. तेव्हा गावकऱ्यांनी रावसाहेबाला ठार केले. आपआपसातल्या भांडणात हे घराणं नामशेष होतं. चौधरी घराण्याकडील जहागीर काढून घेण्यात आली. वंशजांनी गाव सोडले.

'चौधऱ्याचं हाड' या कादंबरीच्या तिसऱ्या प्रकरणात चौधरी घराण्यातील शेवटच्या जहागीरदाराचे चित्र रेखाटले आहे. 'अंबिकाचरण चौधरी' हे दहावे जहागीरदार चौधऱ्यांची जहागिरी सोडविण्यासाठी धडपड करतात. त्यासाठी मराठवाड्यातील सुलतानांच्या राजधानीत 'दौलताबाद'ला राहु लागले. त्यांचे कनिष्ठ बंधु पुरुषोत्तम हे हिवरखेडला कारकूनी करु लागले. पत्नीच्या बाळंतपणासाठी पन्नास रुपये जवळ नसलेले दरिद्री असे त्यांचे चित्र रेखाटले आहे. ''बडा घर पोकळ वासा'' अशी त्यांची स्थिती झाली. वर्तन मात्र जहागीरदाराप्रमाणेच होते. घराण्याची प्रतिष्ठा - परंपरा यांचा अंबिकाचरण यांना अभिमान वाटत असल्याने बोलणे-वागणे रुबाबदारच होते. 'रामप्यारी' सारख्या स्त्रीशी त्यांचे संबंध होतेच. वीसपंचवीस वर्षांच्या प्रयत्नानंतर जहांगीर सुटली. गावकऱ्यांच्या द्वेषातून आणि भावाभावातल्या वैरामुळे जप्त झालेली जहागीर परत मिळविण्यात ते यशस्वी झाले. गावकऱ्यांचा बदला घेण्यासाठी ते गावात आले. परंतु दुष्काळाला कंटाळून गावकऱ्यांनी अगोदरच गाव सोडलेले असल्यामुळे ते उदास झाले. अंबिकाचरण उर्फ ''दासरावांसारखा एखादा चांगला

माणूस या घराण्यात निपजतोही, परंतु चौधऱ्यांचे नामशेष होणे ही काळाचीच गरज होती. १. हे डॉ. रवींद्र ठाकूर यांचे विधान अर्धसत्य आहे असे म्हणावे लागेल. कारण जहागीरदाराचे सर्व अवगुण दासरावांच्या अंगात आहेत. शिवाय 'रामप्यारी'शी त्यांचे संबंध आहेत. मग त्यांना  चांगला कसे म्हणायचे ? अर्थात काळाच्या ओघात अंगच्या अवगुणांमुळे, खोट्याप्रतिष्ठेमुळे हे घराणे नामशेष झाले हे मान्य करावे लागेल.

आडगावच्या जहागीरदारांच्या व्यक्तिरेखाटनाबरोबर त्याचे कुटुंबीय, कुळ, त्यांच्याशी एकनिष्ठ असणारे अंगरक्षक रामोशी, अन्य प्रशासकीय अधिकारी यांच्या चित्रणातून लेखकाने मराठवाड्यातील सुलतानी अमलातील समाजवास्तवाचे जिवंत दर्शन घडविले आहे. कादंबरीतील गौण व्यक्तिरेखा आमजनतेचे प्रतिनिधित्व करतात. त्यांच्या चित्रणातून त्यांचे दुःख, दैन्य, दारिद्र्याचे दर्शन घडविले आहे.

मराठवाड्यातील सुलतानी अमलातील सुजलाम-सुफलाम गावाची भौगोलिक पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. निसर्गाची 'आडगावा'वर नेहमीच कृपादृष्टी झालेली लेखक वर्णन करतो. तर शेवटी दुष्काळाला कंटाळून लोकांनी गाव सोडण्याचा उल्लेखही येतो. येथील जमीन काळीकसदार आहे. या ठिकाणच्या विहिरीचे पाणी 'काळ डोंब' असल्याचा उल्लेख लेखक करतो. ज्वारी आणि हरबऱ्याच्या पिकाचे उल्लेख प्रदेशविशिष्ट असून जामखेड स्टेशनपासून जवळच असलेले 'दौलतबाद' इलाख्यातील हे गाव आहे. घारपिंपरी, रामदेवळी, झाडगांव, हिवरखेड ही जवळपासची गावे आहेत.

निसर्गवर्णन मानसिकतेनुरुप आहे. त्यातून 'अंबिकाचरण' जहागिरदाराची मानसिकताच प्रगट होते. गावकऱ्यांच्या डोक्यावर पाय देऊन नाचण्यासाठी तो आला असता गाव उध्वस्त झालेले दिसते. तेव्हा लेखक वर्णन करतो,

''वसंतातली प्रातःकाळ ! ऋतुराजाची कसलीच चिन्हं सभोवती दिसत नव्हती. आंब्यांना तंवर नव्हता. वृक्षांना पानं नव्हती. मळ्यात पहाटचा गारवा नव्हता. हिरवळीचं चिन्हही कुठं आढळत नव्हतं. वास्तू माणसांवाचून रिकामे उरले होते. रानं उपेक्षून पडली होती !'' (पृ. ११०)

सुलतानी अमदानीत समाजामध्ये जहागीरदारांचे वर्चस्व होते. ते सामान्य जनतेवर, कुळांवर, अन्याय-अत्याचार-जुलूम जबरदस्ती करीत असतं. शिवाय सत्तेच्या उन्मादाने ते उन्मत्त वर्तन करीत. रगेलपणा आणि रंगेलपणा बरोबरच ढोंगीपणा त्यांच्या रक्तात भिनलेला होता. जनता त्यांच्या कृष्णकृत्यामुळे हैराण झाली होती. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नव्हते. त्यामुळे ते मनमानी कारभार करीत. गरिबांच्या जमिनी कर्जापोटी लुबाडीत असत. मुलींचे सौंदर्य गरीबाघरी शाप ठरत असे. कारण अशा तरुणींचे किंवा विवाहितांचे जहागीरदार शील भ्रष्ट करीत. त्यामुळे

तोंड दाबून बुक्क्यांचा मार खाण्याची वेळ गरिबांवर येत असे. प्रतिष्ठांची 'अब्रू' सांभाळण्याची वेळ गरिबांवर येत असे. उदा. रावसाहेब चौधऱ्यांनी राध्याच्या बायकोची 'अब्रू' लुटली. शीलभ्रष्ट केले. वहिनीने तिचे मुके हुंदके ऐकले. दोघी स्वस्थ बसल्या. पैसा आणि स्वार्थाने रावसाहेबांना उच्छृंखल बनविले होते. अविवेक, अविचार, अनाचार आणि अत्याचार ही त्यांच्या श्रीमंतीची लक्षणे होती. प्रतिष्ठेची परंपरा होती. गरीब घरातील गजराला रावसाहेब, दादासाहेब, आबासाहेब शीलभ्रष्ट करतात.

खेड्यामध्ये लहानसहान घटना गुप्त राहात नाहीत. त्यावर उलटसुलट चर्चा होते. अफवा पसरविल्या जातात. उदा. आडगावच्या सोनाराच्या तरुण मुलीचे धारपिंपरीच्या तरुण देशमुख पुत्राशी संबंध वाढले तेव्हा,

"सोनाराची पोरगी धारपिंपरीच्या देशमुखाचा हात धरुन गेली !"......

"देशमुखानं सोनाराची पोरगी पळवली. " (पृ.१२)

गावामध्ये जहागीरदारांचा विशेष दरारा असे. रामोशांना हाताशी धरून ते दहशत निर्माण करीत असत. त्याचप्रमाणे प्रशासकीय अधिकाऱ्यांशी त्यांनी संबंध प्रस्थापित केलेले असल्यामुळे लोक त्यांना घाबरत असत. राजाजी चौधऱ्यांमुले गावावर संकट येणार म्हणून धारपिंपरीचे लोक क्षमायाचना करण्यासाठी आडगावला येतात. सोनार पतीपत्नीचा खून काश्या रामोशाकडून केला जातो. राजाजी धारपिंपरीवर दरोडा घालतात, तेव्हा गावकरी स्वतःच्या घरातील संपत्ती देऊन मोकळे होतात. तरीही प्रेमीयुगलाला जाळून ठार मारले जाते. दहशत निर्माण केली जाते. सरकार दरबारच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळण्यासाठी गावातील व्यापाऱ्यांकडून सक्तीने किराणा सामान आणले जाते. मेजवान्या दिल्या जातात. व्यापारी विद्रोह करीत नाही. राध्याला ते मार देतात. ग्रामस्थ कोर्टात जातात, तेव्हा प्रशासकीय अधिकारी रावसाहेबांच्या मदतीला धाऊन येतात, धन्या रामोशाला तुरूंगात पाठविले जाते. रावसाहेब गावात बंदूक घेऊन फिरु लागतात. तसेच राजधानीचे मुख्य प्रधान सर रामप्रसाद बहादर यांना अंबिकाचरण चौधरी सरकारी दौऱ्यावर आणतात. 'नजराणा' देतात. अर्थात जवळपासच्या लोकांकडूनच ही रक्कम जमा केलेली असते. वतन खालसा झालेले असले तरी लोक अंबिकाचरणला घाबरून असतात म्हणूनच सर्वांनी रक्कमा दिल्या.

धोका देण्यात आणि अस्मितेला आवाहन करण्यात जहागीरदार तरबेज होते. इप्सित साध्य करण्यासाठी वेळप्रसंगी रामोशांकडून दरोडा घालून विरोधकाला कफल्लक केले जाते. जसे उमरग्याच्या नवाबाला नाना चौधऱ्याने धोका दिला. बाजीराव देसायाला कफल्लक केले. देसाई-दडके यांच्यातील हाडवैराचा फायदा घेऊन देसायांच्या घरात मुलगी दिली. दडक्यांकडून हप्त्याहप्ताने पैसे वसूल केले. सुंद्रानानीला जवळ करुन सोने-नाणे लुटल्यावर विष घालून ठार केले. राजाभाऊ देसायांची सर्व संपत्ती लुटली इ. लोकांच्या धार्मिकवृत्तीला आवाहन करुन संपत्ती मिळविण्यात ते तरबेज

होते. खोट्या प्रतिष्ठेपोटी रामोशांचे प्राण घेण्यास किंवा त्यांना तुरूंगात पाठविण्यास मागेपुढे पाहत नव्हते. जसे आबाजी चौधऱ्याने महादेवाच्या जीर्णोद्धारासाठी अमाप रक्कम जमविली. सोन्याचा मुखवटा आणि रोख रक्कम चोरली आणि खोट्या प्रतिष्ठेसाठी देवभानला गोळी घालून ठार केले. ब्राह्मणांना दानधर्म करुन पुण्य मिळविण्याची आणि गावाच्या शिवेवर त्यांना लुटण्याचे प्रकारही होत.

रामोशी जमात प्रामणिक, एकनिष्ठ, नैतिक मूल्यांची कदर करणारी, इमानाने वागणारी असते. आडगाव्या चौधऱ्यांसाठी हिरामण, काश्या, शिवरुप, भावधन, पिऱ्या, धन्या हे विविध पिढ्यांमधील रामोशी मीठाला जागतात. देवभान गोळीचा शिकार होतो. भावधन चौधऱ्यांचा कुलदीपक वाचवितो. मालकांसाठी सर्वजण दरोडे घालताता. धन्या रामोशी मालकांसाठी तुरुंगात जातो. अशी त्यांची एकनिष्ठ राहण्याची, इमानी, नैतिकमूल्यांची कदर करणारी परंपरा दिसते.

जहागीरदार घराण्यातील पुरुष रंगढंग करीत. रंगेलपणाने वागत. परस्त्रीयांशी राजरोस शरीरसंबंध ठेवत. नाच-तमाशे पाहत. वाड्यावर कोल्हाटणींचा जलसा ठेवत. संपत्तीसाठी वाड्यात रखेल्यांना ठेवत. मात्र स्त्रियांना घराबाहेर पडण्यास परवानगी नव्हती. स्त्रियांचे समाज - घरात नगण्य स्थान होते याची खंत स्त्रियांनाही वाटत नाही. त्या विद्रोह करू शकत नाहीत. उघड्या डोळ्यांनी पुरूषांचे रंगढंग पाहण्यापलीकडे त्या काही करू शकत नाहीत. उदा. तिरळ्या नानासाहेबांनी सुंद्रा घरात ठेवली. रावसाहेबांनी राध्याच्या बायकोचे शीलभ्रष्ट केले. मुसलमानीन घरात ठेवली. तरीही वाहिनी सर्व पाहात असूनही काही करु शकली नाही. कुंकवाचे रक्षण करण्यासाठी या स्त्रिया धडपडतात. प्रसंगी प्राण देतात. दडके-देशमुखांनी आडगावावर घातलेल्या दरोड्यावेळी आबाजी चौधऱ्यांना वाचविण्यासाठी त्यांची सौभाग्यवती गौळीची शिकार होते. किंवा राध्याच्या कुऱ्हाडीचा घाव रावसाहेबांवर बसू नये म्हणून वहिनी मध्ये पडते. गावकरी रावसाहेबांना ठार करतात तेव्हा ती प्राण देते. अशा प्रकारे सर्व स्त्रिया सोशीक असलेल्या दिसतात.

निपुत्रिक लोक वंश वाढविण्यासाठी दत्तक घेत. आपल्या घराण्यातील दत्तक घेतला जावा म्हणून लोक प्रयत्न करीत. जसे धारपिंपरीच्या देशमुखांनी दत्तक घेतला. तो सुंद्रानानीला मान्य नव्हता, म्हणून ती सर्व संपत्ती घेऊन नानासाहेब चौधऱ्यांकडे येऊन राहिली. तिला पुढे संपत्ती हस्तगत केल्यावर विष घालून ठार मारले जाते. जहागीरदाराचे प्रेम-भावना सर्व खोटे, नाटकी असतात. त्यांचा डोळा संपत्तीवर असतो. संपत्ती मिळविण्यासाठी कोणतेही कृष्णकृत्य करताना त्यांना गैर वाटत नाही. सुंदरा नानीचा खून, राजाभाऊ देसायांचा हालहाल करून मृत्यू घडवून आणणे, उंबरग्याच्या नवाबाला लुटणे, दडक्यांकडून हप्ते वसूल करणे इ. कादंबरीतील घटना प्रसंग याची साक्ष देतात.

हुंड्याची चाल होती. तसेच हुंडा बुडविण्याची परंपरा होती आणि हुंड्याची रक्कम वसूल करणारे नाठाळ जहागीरदारही होते. बाजीराव देसायांना कांतरावच्या लग्नामध्ये चाळीसहजारापेक्षा जास्त हुंडा हवा होता. त्याचप्रमाणे राजाभाऊ देसायांच्या लग्नप्रसंगी हुंडा दिला नाही. मात्र 'पुतळा'च्या लग्नप्रसंगी रेणाळकर जहागीरदारांनी नानासाहेब चौधऱ्यांकडून हुंडा घेतला. तेव्हाच लग्नासाठी बोहल्यावर चढले.

जहागीरदारांच्या घराण्यातील स्त्रियांबद्दल ग्रामस्थांना आदर वाटत होता. गरिबांनी नीतिमत्ता सोडली नव्हती. त्यांच्या ठिकाणी प्रामाणिकपणाही होता. उदा. राध्या आणि ग्रामस्थांना वाहिनीबद्दल आदर वाटतो. त्यांचे ती श्रद्धास्थान आहे. नातेवाईकाच्या लग्नाहुन परतत असताना राध्या रावसाहेबांचा छकडा अडवितो. परंतु वहिनीबरोबर असल्यामुळे तो निघून जाताना म्हणतो,

"तू बी हायस का वैनी ? धनीसाहेब एकटंच असतं तर बरं झाल असतं ! बर जा ! रामराम धनीसाहेब, वैनीला आता इथं धरुन ठेवलं तर तिला सोडवून न्यायची हाय का हिंमत ? मला माझ्या आयाबहिनींची अजून वळख आहे ! बरं चला ! भेटू पुन्हा !"(पृ. ८१-८२)

राध्याच्या वरील उद्गारातून त्याची नीतिमत्ता जशी दिसते, त्याचप्रमाणे जहागीरदारांच्या बेछुट-अनीतिमान वर्तनाची ओळख पटते. बदलत्या काळामध्ये सामान्य जनताही जहागीरदारांविरुद्ध आवाज उठवू लागली. कोर्ट-कचेऱ्यांपर्यंत लोक जाऊ लागले. जहागीर नष्ट करण्याचे त्यांच्यात सामर्थ्य निर्माण झाले. राध्याने रावसाहेबाला जीवदान दिले, परंतु अपमानाचा बदला घेण्यास ते विसरले नाही. त्याला बेदम मार दिला, तेव्हा गावकरी राध्याच्या पाठीशी उभे राहिले. सरकारदरबारी खटला गेला. रावसाहेब धन्या रामोशाला तुरुंगात पाठवून निर्दोष सुटले. परंतु लवकरच गावकऱ्यांनी रावसाहेबांना वाड्यात घुसून ठार मारले. जहागीरदाराच्या वारसाला गावात मान राहिला नाही. लोक त्यांना वंदन करीत नाहीत. प्रशासकीय विभागात सरकारदरबारी भ्रष्टाचार वाढला. काम न करता पगार घेण्याची प्रवृत्ती वाढीला लागली. जसे अंबिकाचरण चौधरी जहागीर सोडविण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना वेळोवेळी सरकार दरबारी कागदपत्र पूर्ण करण्यासाठी पैसे द्यावे लागतात. किंवा रावसाहेबांनी राध्याला बेदम मारलेले असूनही धन्या रामोशावर खटला भरला जातो, त्याला तुरुंगवास होतो.

ग्रामजीवनामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठांच्या कल्पना होत्या. चातुर्वण्यव्यवस्था होती. जातिभेदाचे प्रस्थ होते. जसे दुष्काळामध्ये आडगावातील विहिरी आटल्या. वरवाड्यातील आडाचे पाणी ग्रामस्थ मंजीकडे मागू लागले. तेव्हा ती म्हणते,

"अरे चल् ! ज्यानं त्यानं आपल्या पायरीपरमानं रहावं ! त्या आडाचं पाणी प्यायला बामनाच्या जातीत जन्माला घालायला सांग देवाला." (पृ.१०९)

सुलतानी अमलात मराठवाड्यातील समाजजीवनावर अनेक चालीरिती, श्रद्धा

समजूती, परंपरा यांचा पगडा होते. जसे, नवस करणे, होराशास्त्र पाहणे, ब्राह्मणांना जेवण घालणे, दक्षिणा देणे, शपथा घेणे, सत्यता पटविण्यासाठी मारोतीचा शेंदुर काढणे, तापाच्या साथीत मरीआईच्या नावाने रुप्याचे कडे घातल्यास रोगाची बाधा होत नाही, कोल्हापूरच्या देवीच्या दर्शनाला जाणे इ. श्रद्धांचे तसेच महादेवाच्या मंदिराचा जीर्णोद्धार करणे, यात्रेच्या निमित्ताने सण-उत्सवांचे वर्णन येते. त्याचप्रमाणे कोल्हाटणीचा जलसा-नाच-तमाशा पाहणे. स्त्रिया घराबाहेर पडू शकत नसल्या तरी त्यांनाही वाड्यात जलसा दाखविण्याची पद्धत होती. हुंडा दिला घेतला जाई. दत्तकविधान केले जात होते. जात्यावर ओव्या गाण्याची परंपरा होती. स्त्रिया हळदीकुंकवाला जात होत्या. त्याचप्रमाणे काही समजूती-अंधश्रद्धाही होत्या. जसे गुप्तधनावर बसलेल्या नागाच्या अंगावर लांब केस असतात. त्याचा उदासारखा वास येतो. पायाळू-मांत्रिक-ज्योतिषी यांना गुप्तधनाची जागा दिसते. एखादी इच्छा अतृप्त राहिली तर मृत्यूनंतर त्याच्या पिंडाला कावळा शिवत नाही. अमावस्येच्या रात्री त्याचे भूत निघते. भूतबाधा होते. कबूतर कापून लखव्यावर इलाज केला जातो. सौभाग्यवतीने शेतात पाय ठेवल्यास आडमाप पीक येते. यासारख्या अनेक गोष्टींचा पगडा सर्वच समाजावर असलेला दिसतो.

सुलतानी अमलातील जहागीरदारांच्या जुलमी प्रशासनाचे अन्याय, अत्याचार, जुलूम, जबरदस्ती, भ्रष्टाचार जहागीरदारांकडून जनतेवर होत होते. त्यांची दहशत होती. परंतु जहागीर जप्त झाल्यावर लोक जहागिरदारांना वंदन करीत नाही. तरीही त्यांची भीती मात्र वाटते. जनतेच्या जहागीरदारांच्या वर्तनाविषयी-कारभाराविषयी तक्रारी असत. परंतु पुढे नवाब शकील जंग शाही पेशकार झाल्यावर नानांकडील सरकारी थकबाकीबद्दल तगादा लावला गेला. तो रोख भरण्याची वेळ नाना चौधऱ्यांवर आली.

सुलतानी अमलात गावोगावच्या धनिकांना जहागिरी दिली जात होती. त्या गावांचा वसूल ते जमा करीत असत. त्यामुळे पंचक्रोशीत त्यांचे वर्चस्व असे. "आडगावची तीन हजारांची जहांगीर बऱ्याच दिवसांपासून चौधऱ्यांच्या नावानं चालू होती. 'पेरेपत्रक', 'तीन निशाण', 'कीर्दी', 'खातं', अशी गावाच्या कारभाराची कागदपत्रं कुलकर्ण्याकडून लिहिली जात होती. त्या प्रत्येक कागदावर काळ्या शाईत उठविलेली मोहर आढळे.....ती जहागीरदाराच्या नावाची ! सरकारी, नीमसरकारी किंवा खाजगी स्वरूपाचा पत्रव्यवहार होत असे तोही त्याच नावानं !"(पृ.३२) असे ग्रामपातळीवरील प्रशासकीय व्यवस्थेचे वर्णन लेखकाने केले आहे. पाटील, कुलकर्णी नाममात्रच असत. वर्चस्व जहागीरदारांचे होते. अंबिकाचरण चौधऱ्यांनी जहागीर सोडविल्यानंतर ते गावाकडे निघाले. तेव्हा त्यांनाही पाटील, कुलकर्णी, तरी स्वागताला येतील असा विश्वास होता, परंतु ते आले नाही यातूनही प्रारंभी जहागीरदारांचे प्रशासनव्यवस्थेतील स्थान, मोठेपण याची

कल्पना येते.

जहागीर टिकविण्यासाठी आणि सरकार दरबारी वजन वाढविण्यासाठी जहागीरदार लोक तहसीलदार, मुनसफ, फौजदार यांच्या स्वागतात आणि आदरातिथ्यात गर्क राहत. त्याच्या सरबराईसाठी स्वतःच्या तिजोरीला हात लावत नव्हते. तर गावातील व्यापाऱ्यांकडून फुकटात किराणा माल आणला जाई. दुकानदार बिनबोभाट वस्तू देत, कारण सरकार दरबारी जहागीरदाराचे वजन आहे, याची त्यांना जाणीव होती. ते संकट कोणत्याही मार्गाने आणतात हे व्यापारी ओळखून होते. लाचार झालेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून ते आपले कृष्णकृत्य करून घेत. गावकऱ्यांची मालमत्ता सहज बळकावून बसत. कोर्ट कचेरी खटला झाला तर निकाल जहागीरदारांना हवा तसाच लागत होता. खोट्या फिर्यादी, पंचनामे अधिकाऱ्यांच्या वरदहस्ताने करणे शक्य होते. जसे राध्याने स्वतंत्रपणे शेती करायला सुरवात केली. वहिनीला हुरड्याचे निमंत्रण तो देतो. रावसाहेब चौधऱ्यांना राध्याचा हा आगाऊपणा आवडत नाही. चोरीचा खोटा आळ त्याच्यावर घेण्यात येतो. पंचनामा करून पुराव्यानिशी रिपोर्ट केला जातो. रावसाहेबांकडील पार्ट्या खाल्ल्याने लाजार झालेले फौजदार पोलिसाला पाठवून राध्याला हातकड्या घालून ठाण्यावर नेतात. रीतसर खटला भरुन सरकारी वकिलाने राध्याचे अपराध साबीत केला. राध्या तुरूंगात गेला. राध्याच्या बायकोचे रावसाहेबांनी शीलभ्रष्ट केले. तुरुंगातून सुटून आलेल्या, सुडाने पेटलेल्या राध्याला रावसाहेबांनी बेदम मारहाण केली. कोर्टात खटला गेला असता धन्या रामोशाची आणि राध्याची मारामारी झाली, आपण राध्याला मारण्याचे कारणच काय ? म्हणून धन्या रामोशाला तुरूंगात पाठविले जाते. जहागीरदार निर्दोष मुक्त झाले ते प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कृपेमुळे - वरदहस्तामुळे - पाहुणचार - देणेघेण्यामुळे असे वर्णन लेखकाने केले आहे.

सुलतानी अमलातील शेवटच्या काळात सरकारी कचेरीत भ्रष्टाचार वाढला. काम न करता पगार घेण्याची प्रवृत्ती वाढली. हे आजच्या लोकशाही समाजव्यवस्थेचे चित्र आहे. जहागीर गारद झाल्यानंतर ती सोडविताना अंबिकाचरण चौधऱ्यांना आलेल्या अनुभवाच्या निमित्ताने भ्रष्ट प्रशासकीय व्यवस्थचे वास्तवचित्र लेखकाने रेखाटले आहे. वीस-पंचवीस वर्ष प्रयत्न केल्यानंतर जागोजागी 'नजराणा' दिल्यावर कागदपत्र पुढे सरकले आणि जहागीर मुक्त झाली. नोकरदारांचे बेजबाबदार-अप्रामाणिक वर्तनामुळे प्रशासकीय कामामध्ये दिरंगाई होऊ लागली.

खोट्या प्रतिष्ठेसाठी जहागीरदार अवाढव्य खर्च करीत, त्यामुळे कर्जबाजारी होत. कर्जफेडीसाठी दरोडे घालत, खून करीत. दगलबाजी करीत. देवाच्या पैशाचा भ्रष्टाचार करताना ब्राह्मण आणि कोल्हाटणींना लुटताना ते पिसाट होत. श्रीमंती, बडेजाव, डामडौल, वरवर दिसत असला तरी हे घराणे आतून पार पोखरले गेले होते. कुळावर

अत्याचार करून त्याच्या जमिनी बळकविण्याचे, दुसऱ्याचे संसार उदध्वस्त करण्याचे कृष्णकृत्य हे लोक करीत होते. शोषिक आणि शोषीत असे दोन वर्ग समाज व्यवस्थेत निर्माण झाले होते. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे सामर्थ्य रयतेत नव्हते.

काही जहागीरदार सावकारी करीत, कुळांनी वेळेवर कर्ज फेड केली नाही तर कुळांना जगणे कठीण होई, तसेच खोटी प्रतिष्ठा, डामडौल, बडेजावासाठी वेळप्रसंगी भांडी गहाण ठेऊन पाहुण्यांचा पाहुणचार करण्याची वेळ त्यांच्यावर येत होती. दरोडे घालून, कर्ज बुडवून, मोठेपणा मिळविण्याची वृत्ती, ब्राह्मणांना दक्षिणा देऊन रामोशाकडून मागच्या दाराने परत आणल्या जात. "साधनतेचा चौथऱ्यांवर जसा वरदहस्त राहिला तसा कंगालपणाही त्यांच्या घरांतून नागडा हिंडून गेला ! ...... वैपुल्य आडगावातल्या नाहीतर आसपास असलेल्या गावांच्या घराघरांतून जबरीनं ओढून आणलेलं असे. गावकऱ्यांचे गळे दाबल्याखेरीज चौधऱ्यांना समाधानाचे श्वास टाकता येत नसत. गावकऱ्यांच्या उपासमारीवर त्यांचे तृप्तीचे ढेकर निघत........"(पृ.४)

कर्ज बुडविण्यासाठी ते नाटकीपणाने वागत. जसे मांत्रिकाला बोलवून घेत. मांत्रिक चौधऱ्यांना छडीने बडवत प्रश्न विचारी, त्यांना ब्रह्मराक्षस लागलेला असे. तो दुसरा सधन सावकार मिळाल्याशिवाय सोडायला तयार नसे. कर्जवसुलीसाठी आलेले सावकार आपणांस ब्रह्मराक्षस पकडील या भीतीने पळून जात. सरकारी रक्कम मिळवितांना कचेरीतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या ऐश्वर्याबद्दल नवल वाटेल असे वागत. परंतु रक्कम मिळताच मागच्या दाराने पसार होत. सरकारी कर्जफेडीचे तगादा सुरु झाल्यावर भ्रष्टाचारी मार्गाने 'भानगड' लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करीत किंवा उंबग्याच्या विलासी नवाबासारख्याला लुटून कर्जाचा भरणा करीत. धोका देऊन, गद्दारी करुन कर्जफेड करण्याची जहागीरदारांची परंपरा होती. संपत्ती होती. संपत्ती मिळविण्यासाठी ते वाममार्गाचा अवलंब करीत होते. आपआपसात संघर्ष लावून देणे. उदा. दडके-देसायांमधील हाडवैराचा फायदा घेणे. सुंद्रानानीला संपत्तीसाठी घरात घेणे, संतुष्ट होताच तिला विषप्रयोग करतो. मुलीचा संसार उद्ध्वस्त करणे. जसे राजाभाऊ देसायांचा हुंडा बुडविणे, शेतीचे उत्पन्न आणि सोनेनाणे हस्तगत करणे. धार्मिक भावनांना आवाहन करुन जनतेचा पैसा आपल्या तिजोरीत गोळा करणे. हे सर्व असले तरीही हळूहळु या घराण्यांना घुस लागली. ते नामशेष झाले. डामडौल, खोट्या प्रतिष्ठेमुळे असे झाले. "वरवाड्याच्या पडलेल्या भागाची आता बांधणी सुरु झाली होती ! वर्षाच्या फेऱ्या घालून काळाचे पाय वरवाड्यावरून सटकले होते. ते प्रत्येक पदाघाताला एकेक थर निखळवीत. वाळलेल्या गवताचे तुरे उभारुन उपेक्षा कित्येक दिवसांपासून त्या भागात संसार मांडून होती. उंदिर घुशी पडक्या भिंताडांना पोखरीत होत्या......"(पृ. ४४)

वहिनीसारखी एखादी खानदानी स्त्री घराण्याला सावरण्याचा प्रयत्न करीत होती.

पण तिला यश येत नव्हते. भाऊबंदकीने घर पोखरले जात होते. अल्पशा कर्जापोटी जहागीरदार कुळांच्या जमिनी लुबाडीत, व्याजाच्या फडीसाठी कुळांना घरकामासाठी राबऊन घेतले जात होते. खोटेनाटे कागदपत्र करून कुळांच्या जमिनी लुबाडल्या जात. अशा गोष्टींचे वहिनीला फार वाईट वाटत होते. जसे, महादूजी जमीन कर्जाच्या वसूलीपोटी बळकावली. व्याजाच्या फेडीसाठी महादू आणि त्याची मुलगी गजरा वाड्यावर कष्ट करतात. राध्याची जमीन 'काळपांढर' करूनच लुबाडली. राध्याला वाड्यावर काम करावे लागले. वहिनी या सर्वांना आधार वाटते.

जहागीरदारांच्या कर्जरकमेच्या आकड्यावरून त्यांची प्रतिष्ठा-प्रत ओळखली जाते. आबासाहेबांनी शिक्षण घेत असताना खर्चासाठी मोठे कर्ज काढले. सावकारांकडून तगादा नोटीसा आल्या, तेव्हा तो म्हणतो. "ही सगळी त्या सावकारांची लुच्चेगिरी आहे ! तरी मी त्यांना आधीच बजावलं होत की, जहागीरदाराचं कर्ज पिढ्यानुपिढ्या चालत असतं. कर्ज हे परंपरागत चालत आलेल्या मोठेपणाचं भूषण असतं. एवढ्यातच वसुलीची गडबड ठीक नाही. पण नाही एकलं त्यांनी ! (पृ. ७१) आबासाहेबांना कर्ज असणे प्रतिष्ठेचे वाटते.

भावाभावामंधील वैर आणि पिढीजात कर्ज तसेच ग्रामस्थ्यांचा विरोध यामुळे जहागीर गारद झाल्यानंतर त्यांची आर्थिदृष्ट्या खूपच कुचंबणा होत होती, असे अंबिकाचरणच्या उतरत्या काळाचे चित्र आहे. 'नॉटपेड' पत्राचे पैसे ते देऊ शकत नाही. दौलतबादमध्ये छोट्याशा खोलीत छिद्र पडलेल्या सतरंजीवर झोपण्याची वेळ येते. बिघाड झालेल्या घड्याळाप्रमाणे त्यांची स्थिती झाली. त्यांचा भाऊ पुरूषोत्तम पत्नीच्या बाळंतपणासाठी पन्नास रुपये मागतो, ते अंबिकाचरण पाठऊ शकत नाही. व्यायामशाळेसाठी जाहीर केलेली देणगी देऊ शकत नाही किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांना 'नजराणा' देण्यासाठी 'रामप्यारी' सारख्या स्त्रीकडून मदत घ्यावी लागते.

सुलतानी अमलातील जहागीरदार आणि रयतेच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना येते. लेखकाने निवेदन आणि संवाद यासाठी प्रमाणभाषा वापरली असली तरीही खालच्या स्तरातील लोकांचे - कुळांचे संवाद ग्रामीण बोली लिहिले आहे. मराठवाड्यातील सुलतानी अमलातील जहागीरदारांच्या जीवनानुभवाचे चित्रण केलेले असल्यामुळे 'अनेक उर्दू-फारसी, आणि मराठी शब्दांचा वापर आशयानुरुप केला आहे. त्या शब्दांच्या वापरामुळे आणि विशिष्ट लकबीमुळे प्रादेशिकता स्पष्ट दिसते. उदा. महकमे, मालगुजारी, जुकाम, नातवानी, मोहरबाज, मोहरबंद, फैमायशी, जातखुद, तकवा, हैराण, अदाबअर्ज, सफेदपोश, कुसूर, बेशकल, दहलानी, जवानी, जानप्यारी, बहोत अच्छा, चीजवस्तू, ताकीद, खादीम, तर्जनी, कुशलाची पुसतपास, फर्द्या, मुकदमा, पैरवई, बाजूहटो, पधारिये, मजबूर, हुजूर, सलाम, नजराणा, मुनीम, बदसुरत, अदबीनं, बटवडा, कवन, नजरअंदाज, देवडी, शानदार, मोहोरदार,

नवाब, सपात्त्या, टटाळ, मोड, डल्ला इ. शब्दांनी प्रादेशिकतेचे रंग गडदं होत जातात. दौलताबादमधील गल्ल्या, पेठ, मोहल्ले यांची नावेही सुलतानी छापाची आहेत. गुलजारबाग, लालबाग, बंदेआली, शाहदबंडा, महाकमे मालगुजारी इ. बोलीतील लकबी उदा. बहोत खूब ! असे मुस्लिमांनी म्हणणे किंवा जहागीरदारांनी स्वतःची ओळख करुन देताना, "या देहाला अंबिकाचरण म्हणतात" असे म्हणणे, हे प्रदेशविशिष्ट आणि कालविशिष्टच आहेत. कादंबरीतील प्रतिमाही ग्रामीण बोलीतील आहेत. उदा.

"राघून चोचं मारलेल्या फळाला येणाऱ्या माधुरीसारखा......." (पृ. १२)

"वैनी ! ए वैनी ! जागी व्हय ! भ्येव वाटलं व्हय ! ........

मंजुळा महारिण म्हणते -

"बरं नाही वाटतं जिवाला वैनी ?"

"दिवस लई वंगाळ आलेत वैनी !" (पृ. ८०)

"तूं बी हायस का वैनी ? धनीसाहेब एकटंच असतं तर बरं झालं असतं ! बरं जा ! रामराम धनीसाहेब वैनीला आतां इथं धरुन ठेवलं तर तिला सोडवून न्यायची हायं का हिंमत ? मला माझ्या आयाबहिर्नींची अजून वळख आहे. बरं चला ! भेटूं पुन्हा !" ( पृ. ८१-८२)

तीनशे वर्षाचा कालपट आणि दहा पिढ्यांचे चित्रण हा या कादंबरीचा विशेष होय. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी म्हटले आहे, "एक अस्सल प्रादेशिक वास्तव प्रकट करणारी कादंबरी म्हणून 'आडगावचे चौधरी' या कादंबरीचा निर्देश करणे आवश्यक ठरते. किंबहुना सरंजामी जीवनाचे इतके प्रत्ययकारी चित्रण मराठी कादंबरीमध्ये प्रथमतःच घडले आहे असे म्हणावे लागते." २. हा डॉ. कोत्तापल्ले यांचा अभिप्राय यथार्थ वाटतो. कारण जीवनाचा एवढा विशाल पट अन्य कादंबरीत दिसत नाही. जहागीरदारांच्या दहा पिढ्यांचे जिवंत, रसरशीत आणि प्रत्ययकारी जीवन प्रस्तुत कादंबरीतून प्रत्ययाला येते. तिने मराठी कादंबरीमध्ये मोलाची भर घातली आहे.

### २). रा. रं. बोराडे - *'पाचोळा' (१९७१)*

कथाकार रा. रं. बोराडे यांनी 'पाचोळा'' (१९७१), 'सावट' (१९८७), 'चारापाणी' (१९८९) आणि 'आमदार सौभाग्यवती' (१९९०) या ग्रामीण - प्रादेशिक जीवनचित्रण करणाऱ्या चार कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'पाचोळा' कादंबरी परिवर्तन काळातील अकुशल कारागीराची ससेहोलपट रेखाटते, तर 'चारापाणी' मराठवाड्यातील १९८५-८६ च्या दुष्काळी पार्श्वभूमीवरील प्रादेशिक कादंबरी आहे. 'सावट' उच्चशिक्षणामुळे ग्रामीण भागात निर्माण झालेले नवीन प्रश्न हाताळले, तर 'आमदार सौभाग्यवती'' ग्रामीण राजकारणाचे दर्शन घडविणारी कादंबरी आहे.

परंपरागत व्यवसाय उखडला जात असल्याचे दुःख होत असतानाच पार्वतीचा नवरा गंगाराम शिंपी गरडाच्या जुन्या धोतराला दंड घालण्यास नाकारतो. पार्वतीला नवऱ्याचे वर्तन पसंत नसते. तिला भविष्याची काळजी वाटते. आतल्या गाठीचा गरड लातूरहून नवी मशीन आणि फॅशनेबल कपडे शिवणारा टेलर आणतो. त्या टेलरशी स्पर्धा करण्यासाठी गंगाराम सातवीत शिकणाऱ्या भानाला शाळेतून काढण्याचा व अद्ययावत फॅशनचे कपडे शिवण्याचे काम शिकण्यासाठी लातूरला पाठविण्याचा एकतर्फी निर्णय घेतो. अनिच्छेने भाना लातूरला जातो. वेठबिगाराप्रमाणे त्याला तेथे वागविले जाते 'आईवरुन' त्याला लातूरचा शिंपी शिवीगाळ करतो - मारतो. त्यामुळे भाना परत खेड्यात येतो. दादा-बाबा करुन भानाला परत लातूरला पाठविले जाते. तेव्हा गरडाच्या मुलांची संगत धरुन तो बार्शीला पळून जातो. मुलगा धंद्याचे अद्ययावत शिक्षण घेत नाही म्हणून गंगाराम प्रशिक्षण घेण्यासाठी लातूरला जातो. अल्पकाळातच हिशोबावरुन लातूरच्या शिंप्याशी मारामारी करतो. त्याला पोलीस पकडून नेतात. आडत्या त्याला सोडवितो. पार्वती गंगारामला घेऊन येते. इकडे दुकानाचे पत्रे काढून मशीनचे डोके चोरीला गेलेले असते. चोरी गरडाच्या सांगण्यामुळे झाली याची खात्री असूनही पोलीसकेस करणे परवडण्यासारखे नसल्याने टाळावे लागते. क्षय झालेला गंगाराम नवीन मशीन खरेदी करण्याचे ठरवून लातूरला जातो. रात्रंदिवस काम करतो. आजार बळावतो. खेड्यात येऊन कायमचे अंथरुण धरतो. भाना किराणा दुकानात काम करु लागतो. पार्वती रोजगाराला जाते. तानी 'भुके'मुळे 'ददे ददे' करीत रडते. गंगाराम अधिक चिडचिडा होतो. जयराम कोळ्याच्या मुलीचा भानाने हात धरल्याचे समजताच भडकतो. त्याला लाथाबुक्क्यांनी मारतो आणि रात्री झोपेतच संपतो. अशी गंगारामच्या हेकेखोर, तापट स्वभावामुळे कुटुंबाची शोकांतिका होते. 'वाळूचा कट्टा फुटल्यावानीच झालं मला. मोप मोप पानी कोंडायला बगायले; पर वाळू काय गवसंना हातात !'' (पृ.९४) अशी पार्वतीला संसाराची 'पाचोळ्या' सारखी स्थिती होते.

गंगारामच्या स्वभावामुळेच कुटुंबाची वाताहात आणि गंगारामचा मृत्यू होत असला तरी त्याची बायको 'पार्वती' ही या कादंबरीची नायिका आहे. ती कादंबरीची निवेदिका आहे. तिच्या भावभावनांशी सर्व घटना प्रसंग एकजीव झाले आहेत. प्राप्त परिस्थितीत सुख मानणारी सर्वसामान्य स्त्री आहे. कुटुंबातील आपले दुय्यमस्थान आहे, नवऱ्यापुढे आपले काही चालत नाही याची तिला जाणीव आहे. संसाराची परवड थांबऊ पाहणारी, दूरदृष्टीची, धीरगंभीर, सोशीक, समंजस आणि दारिद्र्य व मर्यादांची जाणीव असलेली पुत्रप्रेम आणि पतिनिष्ठा यांच्या कात्रीत सापडलेली अगतिक आहे. गरडाच्या स्वभाव आणि ताकदीची तिला कल्पना आहे. सर्वांना सांभाळण्याचा ती प्रयत्न करते. पाचोळातील पारबतीचे व्यक्तित्व अन्य पात्रामुळे प्रभावी बनते. प्रा.

भास्कर चंदनशीव म्हणतात, 'आईचे प्रेम न मिळालेल्या परक्या पोरीची ही जीवघेणी भविष्यकथा अधिक भावनाप्रधान, उत्कट, हळवी आणि हृदयस्पर्शी वाटते. ह्या सगळ्या विविधरंगी भावनाट्यातून, ताणतणावातून पारबती मोठ्या समजुतदार पद्धतीने आकाराला येते. तिचे ते हळुवार आत्मनिवेदनही या सगळ्या भावभावनांना प्रत्ययकारी, अर्थपूर्ण बनविते.'' ३. प्रा. चंदनशीवांनी पार्वतीच्या व्यक्तिरेखेसंबंधी केलेले भाष्य समर्पक वाटते.

गंगाराम हा खेड्यातील सामान्य शिंपी फॅशन माहीत नसलेला. कसलेच माप वगैरे न घेता कपडे हातानेच फाडून शिवणारा अकुशल कारागीर आहे. गरीब असूनही प्रामाणिक आहे. परिवर्तनाला-आधुनिकीकरणाला समोरा जाऊ शकत नाही. उलट गरडांसारख्या प्रचंड शक्तीशी संघर्ष करतो. मुलाचा तिरस्कार करू लागतो. सरळ नाकासमोर चालणारा असल्यामुळे दुरदृष्टी नाही. किरकोळ कारणांमुळे एकेरीवर येणारा, तिरसिंगराव, तऱ्हेवाईक, भडक डोक्याचा, मनस्वी, जिद्दी, भांडखोर, चिडचिड, रागीट, तांबीस, तापट, हेकेखोर, लहरी, कुढा तसाच स्वाभिमानी आहे. परंपरागत व्यवसायाच्या ऱ्हासाचे दुःख पचऊ शकत नाही. मर्यादित कुवतीचा आणि परंपरेने एकचएक धंदा अंगवळणी पडलेला. खेड्याच्या शहरीकरणाने ढासळत जाऊन, त्यातच संपलेला दिसतो. 'तानी' ही निष्पाप मुलगी असून 'खादाड' नियती आहे. 'भाना' सातवीत शिकणारा हुशार, समजदार, आई-बहिणीवर प्रेम करणारा मुलगा आहे. बापाने गरडाशी स्पर्धा केल्यामुळेच आपणास शिकता आले नाही म्हणून बापाच्या विरोधात उभा राहतो. मशिनकाम शिकण्यास, नकार देतो. बापाविषयी अढी ठेवून वागतो. बापापासून दुरावलेला संवेदनक्षम मुलगा किराणा दुकानात काम करतो. कोळ्याच्या मुलीने आव्हान करतोच तिचा हात पकडतो. बाप रागवताच माघारी बोलतो. असा स्पष्टोक्ता आहे. बापाप्रमाणेच स्वाभिमानी आहे. लातूरच्या शिंप्याने शिव्या दिलेल्या त्याला सहन होत नाही.

'गरड' हे कादंबरीतील अप्रगट पात्र आहे. आतल्या गाठीचा, तऱ्हेवाईक, खडूस, दुष्ट आणि ताकदवान सरंजामी शक्तीचा प्रतिनिधी आहे. पार्वती म्हणते, ''गरडबी काय मामुली असामी न्हाई. समद्या गावानं ववाळून टाकलेला, लई खडूस की ! कवा कुनाला तोंड उघडून बोलायचा न्हाई. कुनी आरं म्हनलं तर कारं सुदा न्हाई म्हनायचा. पर त्येचे तीन तेरा केल्याशिवाबी न्हाई ऱ्हायचा. गावातल्या भल्याभल्या लोकांवाना त्येन हात दावलाया. आपून तर काय निव्वळ पाचुळ्यावानी, जरा त्येनं फुकलं तर चाल्ले कुठल्या कुठं उडत.'' (पृ. ३) या वर्णनावरून गरडाच्या स्वभावाची आणि सामर्थ्याची कल्पना येते. गरडाचा मुलगा स्पष्टोक्ता, गर्विष्ट, उर्मट-उद्धट आहे. बाबाच्या श्रीमंतीचा त्याला गर्व आहे. भानाशी संबंध प्रस्थापित करुन त्याला बार्शीला घेऊन जातो. गंगारामच्या संसार परवडीस खऱ्या अर्थाने तोच कारण ठरतो. माळ्याची

सरु, शामराव कदम, यशवंता आणि गया हे प्रेमळ जोडपे, लक्षीमन, भागा आजी, मास्तर, आडत्या, लातूरचा शिंपी, नवा शिंपी, जयरामकोळी आणि त्याची मुलगी, कष्टकरी-रोजगारी आयाबाया आणि अन्य गौणपात्रांच्या चित्रणातून लेखकाने समाजवास्तवाचे दर्शन घडविले आहे.

भू-प्रदेश किंवा निसर्गवर्णन अभावानेच येते. त्यामुळे तिच्या ग्रामीणतेविषयी किंवा प्रादेशिकतेविषयी शंका येणे स्वाभाविक आहे. परंतु येथे एक गोष्ट लक्षात घेतली तर मात्र अशा शंका येण्याचे कारण उरणार नाही. ही मराठवाड्यातील लातूर जवळच्या खेड्यातील अकुशल शिंप्याची शोकांतिका आहे. म्हणजेच ती जनजातीचे जीवनचित्रण करणारी प्रादेशिक कादंबरी आहे. मधू जामकर म्हणतात, "......जेथे मराठवाड्यातील प्रदेशाचे वर्णन येते तेच मुळी आपल्या आशयापासून फटकून असे. सारा परिसर एखाद्या झालरीप्रमाणे कथेच्या अवतीभोवती ठिगळाठिगळांचे कुंपण लावतो." ४. तसेच अ. वा. कुलकर्णी म्हणतात, "या कादंबरीतील एकंदर कथात्मक आराखडा लक्षात घेतला तर तिला 'ग्रामीण' म्हणता येणार नाही असे वाटते."५. त्याचप्रमाणे माधवकृष्ण सावरगावकर म्हणतात, " 'पाचोळा' मध्ये मात्र हा परिसर किंवा हा ग्रामीणतेचा बोधस्वर अनन्यसाधारण रुप धारण करताना आढळत नाही." ६. मधू जामकर, अ. वा. कुलकर्णी आणि माधवकृष्ण या तिघांचे हे विवेचन अर्धसत्य वाटते. अल्पप्रमाणात ग्रामीण भागांचे-परिसराचे उल्लेख आलेले आहेत, हे नाकारता येत नाही. जसे, "ऊन चपचप करायलेलं....... लईच झालं दमल्यावानी. अंग बी वलंचिक झालंत घामानं." (पृ.५२) किंवा "चैत्राचा म्हयना, उनाचा कार झालेला. कासावीस व्हायलं मला." (पृ. ८३) या वर्णनातून पार्वतीची मानसिकता लेखकाने टिपली असून मराठवाड्यातील जीव घेणारा उन्हाळाही दृष्टीगोचर केला आहे. तसेच कादंबरीचे निवेदन आणि संवाद प्रदेशविशिष्ट आहे. लातूर, उस्मानाबादी बोलीतून पार्वती निवेदन करते. त्यातूनही प्रदेश जिवंत होत जातो. त्यापेक्षा ती जनजातीच्या जीवनाशी निगडित आहे. प्रदेशापेक्षा जात महत्त्वाची आहे. डॉ. गो. मा. पवार 'पाचोळा' संबंधी म्हणतात, "मराठी ग्रामीण कादंबरीने आता ग्रामीणतेची कक्षा ओलांडली आहे. चित्रण करण्याच्या दृष्टीने अवघड असलेले अर्थपूर्ण जीवनानुभव कलात्मकपणे प्रकट करण्याचे सामर्थ्य आता तिच्या ठिकाणी आलेले आहे, याचीच साक्ष प्रा. बोराडे यांच्या 'पाचोळा' या कादंबरीतून पटते." ७. प्रा. बोराडे यांनी ग्रामीण जीवनानुभवाला बोलीभाषेच्या माध्यमातून कलात्मक आकार दिला आहे. प्रादेशिकतेच्या मर्यादा ओलांडून मानवी जीवनातील ताण-तणाव वर्णन करण्याचे त्यांच्या लेखणीत सामर्थ्य आहे, हे सर्व मान्य करूनदेखील प्रदेश आणि निसर्ग एक पात्र म्हणून सजीव होऊन अवतरला नाही हे मान्यच करावे लागते.

परिवर्तन काळात ग्रामीण भागाचा आधुनिकीकरणामुळे चेहरा मोहरा बदलण्यास

प्रारंभ झाला. कारागिरांचे रोजगार उखडले गेले. नव्या-जुन्याच्या स्पर्धेमुळे जुने नष्ट होऊ लागले. नव्या गोष्टी आत्मसात करण्याची प्रवृत्ती वाढली. त्यामुळे परंपरागत व्यवसाय करणाऱ्या लोहार-सुतार, कुंभार, चांभार, शिंपी यांच्या व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवनात ताण-तणाव निर्माण झाले. सामान्य कुवतीच्या अर्धकुशल कारागिरांना या बदलाला सामोरे जाता आले नाही. साहजिकच, त्यातून संघर्ष होऊ लागले. गंगाराम सारखा परंपरागत धंदा करणारा आणि समाधानाने-स्वाभिमानाने जगणारा कारागिर देखील बदलत्या परिस्थितीला थांबऊ शकला नाही. त्याच्या स्वभावामुळे आणि आधुनिकीकरणामुळे त्याची शोकांतिका झाली. 'अस्मितेची मागणी करणारी ग्रामीण समाजाची भव्य प्रतिमा' गंगारामच्या संघर्षातून लेखकाने उभी केली आहे. पार्वतीचे कादंबरीच्या प्रारंभीचे निवेदन याची साक्ष देईल.

"बरं चालूं व्हतं. कुनाचं एक न्हवतं का दोन न्हवतं. हे आपलं मिसनीवर बसायचे. आलं-गेलं कापड शिवायचे. गावात एकुलती एक तर मिसन. तरी आता न्हायलं पयल्यावनी ........ जमाना लई बदल्लाया. नव्या नव्या फेसनी गावात यायल्यात. ह्येंचा तर निसता मोठाड मामला. फेसनबिसन काय जमत न्हाई ह्येंनला........."

पार्वतीच्या वरिल निवेदनातून परिवर्तनाची सूचना मिळते. त्याचप्रमाणे गंगारामच्या 'मोठाड' कामाची म्हणजे अर्धकुशलत्वाची ओळख होते. शिवाय गरडासारख्या महाशक्तीची स्पर्धा करायला गंगाराम तयार होतो. त्याचे कारणही व्यवसायामधील पराभव हेच आहे. लेखकाने ग्रामीण संवेदनाशीलतेला अधिक महत्व दिले आहे. परंपरागत गावगाड्यामध्ये बलुतेदार आणि ग्रामस्थ शेतकरी यांचे जिव्हाळ्याचे-प्रेमाचे संबंध होते. ज्यांच्यावर प्रेम केले, विश्वासाने वागले, कापडाची चिंधीदेखील प्रामाणिकपणे परत केली, ते लोक शहरातील शिंप्याकडून फॅशनेबल कपडे शिवतात. जुनेपाने कपडे शिवायला गंगारामकडे येतात, अपमान करतात. पैशाच्या जोरावर काम करुन घेऊ पाहतात. ते त्याला कमीपणाचे वाटते. तो दुखावला जातो. गरडाच्या मुलाचे असभ्य वर्तन त्याला सहन होत नाही. महारमांगासारखे अंगावर धोतर फेकणे त्यांच्या जिव्हारी लागते. तो धोतराला दंड घालण्याचे नाकारतो. म्हणून या. वा. वडस्कर म्हणतात, "त्यांनी (बोराडे) निर्मिलेला गंगाराम शिंपी हा मराठी ग्रामीण कादंबरीतील पहिला बंडखोर नायक होय. त्याचा लढा निश्चयात्मक आहे. आपल्या अस्मितेवर होत असलेल्या आक्रमणाचा तो सर्व शक्तिनिशी प्रतिकार करतो. या संघर्षात त्याचा बळी पडतो म्हणून काय झाले ?"८. प्रा. वडस्करांचे मत स्वीकारुन डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, वि. वा. हडप आणि अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यामधील व्यक्तीशी तुलना करुन पुस्ती जोडतात, "बंडखोर नायकांच्या मालिकेतील गंगाराम हा एक महत्त्वाचा, समर्थ आणि मनस्वी आविष्कार आहे !"९. म्हणजेच ग्रामीण समाजव्यवस्थेमध्ये शोषक आणि शोषीत असे दोन वर्ग आहेत. शोषक शोषण करत असल्याचे पाहून

देखील गप्प बसण्याची परंपरा होती, ती गंगाराम मोडतो. स्वतः मरतो, पण शरण जात नाही. लोकशाही समाजव्यवस्थेमुळे हक्क-कर्तव्यांची जाणीव झाल्याचे गंगारामचा बंडखोरपणा दाखऊन देतो. हे जरी खरे असले तरी व्यवहारात तडजोड ही हवीच असते. गंगाराम तडजोड करीत नाही. धनिकांशी संघर्ष करणे सामान्यांना परवडणारे नसते. सत्ता-पैसा यापुढे सामान्यांचा निभाव लागत नाही. पोटापुरते मिळवणे आणि ते सुखाने खाणे अशक्य होते. जसे, गरड गावामध्ये नवी मशीन आणि मशीनवाला आणून गंगारामची आर्थिक नाकेबंदी करतो. लातूरचा शिंपी गंगारामला हिशोब देण्याचे नाकारतो. उलट पोलिसांच्या स्वाधीन करतो. किंवा गरडाच्या सुचनेनुसारच गंगारामच्या मशीनची चोरी होते. परंतु गंगारामने पोलीस वरदी देऊ नये असे यशवंता त्याला सल्ला देतो.

"माजं आयका तुमी. आगाऊ कन्त्यात जाऊ नका तुमी. उगं झंझट लागंल म्हागं. सरकारीदरबारी वजन हाय त्येचं. झालंच तर चिकन आसामी हाय. पान्यावानी पयसा वतील. दे माय घरनी ठास करुन सोडील तुमाला. तुमचा पायबी निव्वळ कच्चा हाय." (पृ. ६१-६२) यशवंताचा सल्ला समाजवास्तवाची ओळख करुन देणार आहे. गंगारामदेखील पोलिसात वर्दी देण्याच्या भानगडीत पडत नाही. तो नवी मशीन घेण्याच्या इराद्याने लातूरला जाऊन कष्ट करतो. क्षयाने खंगतो. परंतु मशीन खरेदी न करताच मरतो.

माणसाने काळाबरोबर बदलत राहिले तरच त्याचे स्थान टिकून राहण्याची शक्यता आहे. धनिकाशी संघर्ष टाळला पाहिजे तरच बदलत्या काळातं जगणे सुसह्य होईल. परंतु परंपरागत व्यवसाय करणाऱ्यांपुढे वेगळीच समस्या आहे. धंदा बंद पडण्याची भीती गंगारामला वाटते. तेव्हा 'आपन नवीन धंदा करु' असे पार्वती म्हणते, "दुसरा काय लावभर हायीस धंदा मला ? कवा कोंचा धंदा म्या केलाच न्हाई तर यील कसा ?" (पृ. ४६) ही गंगारामसारख्यांची नवी समस्या-व्यथा आहे. एकच व्यवसाय केलेल्यांना नवीन व्यवसाय जमेल की नाही याबद्दलच शंका वाटते. आधुनिकीकरणाच्या प्रभावाने देशाची प्रगती होत असतानाच गरिबांवर मात्र त्याचा विपरीत परिणास होतो. दळणवळणाच्या साधनांमुळे खेडे आणि शहर यांच्यातील अंतर नष्ट झाले. खेड्यातील लोक शहरातील लोकांचे अनुकरण करु लागले. विषम समाज रचनेमुळे सामान्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला. या संदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "आधुनिकीकरणाच्या, यंत्रयुगाच्या आणि भांडवली अर्थव्यवस्थेच्या गिधाडी छाया ग्रामीण भागावर घिरट्या घालू लागल्या म्हणजे तिथले शांत, संथ जीवन तर ढवळून निघतेच पण तिथली आर्थिक दृष्टीने दुर्बल असलेली माणसेही जीवनात पराभूत व्हायला लागतात. मानवतेच्या मूल्यांचा पराभव व्हायला लागतो असा काहीसा जीवनार्थ ही कादंबरी प्रकट करु पाहते." १०. समान नागरी कायदा असूनही

गरिबांचे धनिकांकडून शोषण होते.

परिवर्तनाबरोबर अनीती वाढली. जसे जयराम कोळ्याची मुलगी "भाना भाना मला वढ्यानी ताना" (पृ. ९२) असे म्हणते, तसेच मुलीला शिक्षा न करता, धमकी देण्यासाठी जयराम कोळी गंगारामच्या घरी येतो. भारतीय संस्कृतीचे खोलवर संस्कार झाल्यामुळे घरातील पुरुष हा कुटुंबप्रमुख असतो. त्याच्या इच्छा-लहरीनुसार कुटुंबीयाना वागावे लागते. त्याच्या चांगल्यावाईट निर्णयाचा परिणाम त्यांच्यावर होतो. पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व परिवर्तन काळामध्येही कायम आहे. या व्यवस्थेत स्त्रियांचे कुटुंबातील स्थान दुय्यम, गौण, नगण्य आहे. गंगारामला प्रत्येक वेळी अपयश येऊन देखील तो कुटुंबप्रमुख असल्याने पार्वतीला आणि भानाला आपल्या निर्णयानुसार वागण्यास भाग पाडतो. भानाला लातूरला पाठवितो. निष्पाप तानीला कोंडून ठेवतो. चुलीत पाणी ओततो. रा. रं. बोराडे यांनीही खेड्यातील स्त्रीचे परावलंबित्व, सोशीकपणा, समंजसपणा, दुरदृष्टी, धैर्य, मर्यादाशील वागणूक असे गुणसंपन्न प्रातिनिधिक चित्र 'पार्वती'च्या रूपाने रेखाटले आहे.

यंत्रयुगाच्या आणि आधुनिकतेच्या प्रभावातून माणुसकी, विश्वास, प्रेम-प्रामणिकपणा या भावना नष्ट होऊ लागल्या. पैशाचा कैफ चढला. बापाने पैसे दिल्याच्या जोरावरच गरडाचा मुलगा गंगारामशी असभ्यपणा करतो. त्याने गंगाराम भडकतो. "गावचा मामला असतो. संबाळून वागलेलं बरं आसतं." (पृ.६) अशा प्रकारे नवऱ्याला समजवण्याचा प्रयत्न पार्वती करते तेव्हा, "म्या काय ताबेदार न्हाई कुनाचा. करुन करुन तो काय करील ? मिसन आनील न्हवं का दूसरी. आनू दे. ज्येचं नसीब त्येचा संगं. " (पृ.६) गंगाराम एक स्वतंत्र माणूस आहे. त्याला गुलामगिरी मान्य नाही. विषम समाज व्यवस्थेत अस्मितेवर नाना रूपात आक्रमणे होतात. स्वाभिमानाची जपणूक करणे सामान्याला परवडण्यासारखे नसते. त्याने सामाजिक विद्रोह करुन भागणार नसते. धनिकांची दहशत गावभर असते. गरिबाने श्रीमंताची वेठबिगारी नाकारणे अपराध ठरु लागला. पार्वतीच्या संसाराची परवड होण्यापूर्वीच तिची मैत्रीण सरु म्हणते. "तुज्या दादल्यानं तरी आसं कसं करावं ग ? गरड काय मामुली मानूस हाय व्हयं ?" (पृ.५) गरडाची दहशत सरूच्या संवादातून अनुभवाला येते. म्हणजेच एका समर्थाने दुसऱ्या समर्थावर केलेला हा अत्याचारी, अन्यायी, जीवघेणा खेळ आहे असे चित्र लेखकाने रेखाटले आहे. पारंपरिक व्यवसायाशिवाय दुसरा व्यवसाय जमणार नाही असे गंगारामला वाटते. म्हणून एस. एस. भोसले म्हणतात, "त्या दृष्टीने 'पाचोळा' ही गंगाराम शिंप्याची कथा नाही. खेड्यापाड्यातल्या परंपरागत व्यवसायांच्या दुर्दशेचे, त्यातून उदभवलेल्या कुटुंब जीवनाच्या दुर्दैन्याचे आणि येऊ घातलेल्या कृषि-औद्योगिक संस्कृतीच्या दिशादर्शनाचे ते होकायंत्र आहे." ११. हा अभिप्राय बदलत्या समाजवास्तवाचे भाष्यच आहे.

किरकोळ वाद-भांडण झाले तरी गाव जमा होते किंवा गावात लहानसहान गोष्टी लपून राहत नाहीत. त्यावर उलटसुलट चर्चा होते. मूळ घटना रंगऊन सागिंतली जाते. अतिशयोक्त केली जाते. अफवा पसरतात. नवीन मशीनवाला गंगारामला 'चोळीबाद्दर' म्हणतो. दोघांचा वाद होतो. अनेक लोक-मुले तेथे जमतात. किंवा भानाला गंगाराम घरात येण्यास नकार देतो, तेव्हाही लोक गर्दी करतात. गरडाच्या मुलाशी गंगारामचा किरकोळ वाद होतो, तेव्हा गावात चर्चा होते. सुरू पार्वतीला सांगते.

"पारबती, म्या जरा वेगळेच आयकायले ग."......

"गावात बोलायला लागलेत. तुमचं न् त्या गरडाचं काय तरी झालं म्हनं की.".....

"लईच जोरात भांडन झालं म्हनं. गरडाच्या पोराला मारायला तर गेल्ता म्हनं तुजं दादला."

बगा आता, झालं काय आन् उठलं काय ! .......

"चुकायला न्हाई का काय न्हाई. धोतराला दंड घाला म्हनून म्हनलं म्हनं त्येनं, तर जुनंच कसं शिवायला आनलंस म्हनून मारायला उठला म्हनं तुजा दादला." (पृ. ४) खेड्यातील लोकांची पराचा कावळा करण्याची वृत्ती यातून दिसते. तसेच, परगावच्या माणसाने गावात येऊन रुबाब करने, ग्रामीणांना मानवत नाही. नव्या शिंप्याने गंगारामची खोड काढली. दोघांची मारामारी झाली. पार्वती गंगारामला समजविण्याचा प्रयत्न करते. गरडाच्या कारट्याने कळ लावली असेल असे म्हणते, तेव्हा गंगाराम म्हणतो,

"तो मोप कळ लावील. ह्या उपऱ्यानं कस्याला तसं म्हनावं ?" (पृ. ११) 'गंगाराम' हा गावाची वेळगरज पाहणारा, मदत करणारा, गावात मूळ रुतलेला असल्याने नवा शिंपी त्याला 'उपरा' वाटतो. मुलाने गरडाशी संबंध ठेवणे गंगारामला 'धा लोकात नाक कापल्या' सारखे वाटते.

परिवर्तनकाळात अर्धकुशल कारागिरांची आर्थिदृष्ट्या कुचंबणा होऊ लागली. त्यांचे व्यवसाय मोडीत निघाले. शहरीकरण पचविणे त्यांना कठिण गेले. 'पाचोळा' कादंबरीत गंगारामच्या ढासळत गेलेल्या आर्थिक परिस्थितीचे चित्रण केले आहे. जगण्याची मोठी समस्या निर्माण झाली. या कारागिराच्या एकच व्यवसाय अंगवळणी पडल्याने दुसरा व्यवसाय करणे त्याला अवघड वाटते. म्हणून तो आर्थिक परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न करतो. भानाला लातूरला पाठवितो. त्यानंतर स्वतः लातूरला जातो. घुस घुसल्यावानी त्यांचा संसार खिळखिळा होतो. भानाला किराणा दुकानात कामाला ठेवतो. पार्वती शेतीवर मजुरी करते. तानी 'ददे ददे' करीत रडते. तानीच्या वाटीला चिर पडते, तिच्यातून दुध गळून जाते. तेव्हा पीठ बसऊन दूध गळण्याचे थांबविण्यास गंगाराम सांगतो. या सर्व गोष्टीतून ग्रामीण श्रमजीवी समाजातील दारिद्र्याचे

चित्र लेखक रेखाटतो. परिवर्तन काळातील प्रतिकूल परिस्थितीशी सामना करताना, 'आधुनिकिकरण' आत्मसात करताना सामान्यांच्या भावभावनांचा चोळामोळा होतो. मुलांवर प्रेम असूनही गंगाराम कठोर होऊन भानाला लातूरला पाठविण्याचा निर्णय घेतो. तेव्हा पार्वतीला म्हणतो,

''मंग कसं बोलू तर ? मला काय मया न्हाई का त्येची ? का मी वयरी हाय म्हनावं त्येचा ? त्येनं शिकला तर मला नकु हाय का ? मोप हाऊस हाय मलाबी शिकवायची. पर म्या तरी काय करु ? धंद्याचं आसं व्हायलंय की माज्या.'' (पृ. २१)

प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे सामान्यांना मुलांना शिक्षण देता येत नाही. आज पैशाने सर्व विकत मिळते. पण ज्याच्याजवळ पैसाच नाही, त्याची मात्र कुचंबणा होते. म्हणूनच भानाला लातूरला पाठविताना सर्व वस्तू देण्याचा प्रयत्न आईवडील करतात, त्याप्रसंगीचे पार्वतीचे पुढील स्वगत पहा -

''......... काई लागलंसवरल तर लेकरानं मागावं कुनाला ? त्यो तर पराया मुलूख. कुनी नात्यातलं ना गोत्यातलं. पयसा फेकल्यावरं समदं मिळतं खरं, पर पयसा तरी कुठं कुठं फेकावा ?'' (पृ. २२)

परिवर्तनं काळात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले. प्रामाणिकपणा नष्ट झाला. विश्वासघात करणाऱ्यांची संख्या वाढली. उदा. गंगारामला लातूरचा शिंपी हिशोबात फसवितो. रागीट गंगाराम कातर घेऊन धावतो, तेव्हा त्याला पोलीस पकडून नेतात. आडत्या गंगारामला सोडवितो, परंतु पोलीस शिंप्याकडून चांगलीच वसुली करतात. मशीनच्या चोरीने गंगाराम कोसळतो. त्याची नाकेबंदीच होते. त्याचप्रमाणे पैशाचे मूल्य घटले. महागाई वाढली. आन्या-पैशाचा विचार करणाऱ्यांची दयनीय स्थिती झाली. तानीसाठी 'आन्याभराचं दूध' घ्यावे असे पार्वतीला वाटते. परंतु शहरात 'आण्याभराचं' दूध मिळत नाही, हे ती समजू शकत नाही. दुधासाठी तिला चार आणे मोजावे लागतात. शहरीकरणाच्या प्रभावामुळे खेड्यातील अर्धकुशल कारागिरांचे धंदे मोडीत निघाले. त्यांच्या पोटापाण्याची समस्या निर्माण झाली हेच या 'शोकात्मिके'तून सूचित केले आहे.

प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे नियती, ईश्वर आणि नशिबावर सामान्यांची श्रद्धा असलेली दिसते. संस्कृतीचे खोलवर संस्कार झाल्यामुळे स्त्रियांचे पुरूषप्रधान संस्कृतीत दुय्यम-नगण्य स्थान आहे, याची तिला कल्पनादेखील नाही. पार्वती अशी दुय्यम स्थान असलेली, पती परमेश्वर मानणारी आहे. ती बंड, विद्रोह करीत नाही. सोशीकपणात तिची संस्कृती दिसते. ती मास्तरला बसायला टाकते, यातूनही तिची पाहुण्याचे स्वागत करण्याची परंपरा दिसते. गरडाकडे आलेल्या नवीन मशीनचे नारळ फोडून उद्‌घाटन होते. तसेच ''आपुन मोप म्हनतो माजं आसं व्हावं आन् माजं तसं व्हावं,

पर वरचा करायचं तेच करतो.'' (पृ. २९) यातून पार्वतीची ईश्वरावरील श्रद्धाच दिसते.

'पाचोळा' कथेचे निवेदन पार्वती करते. लेखकाने निवेदनाची पात्रमुखी निवेदनपद्धती किंवा आत्मनिवेदनात्मक लेखनपद्धती स्वीकारल्याने पार्वतीच्या जाणिवेतून, तिच्या दृष्टीतून व तिच्या भाषेतून निवेदन होऊ लागले व त्यामुळे ती केवळ निवेदनाचाच नव्हे तर या जीवननाट्याचा केंद्रबिंदू झाली. संपूर्ण ग्रामीण बोलीमुळे सहजता प्राप्त झाली आहे. निवेदन आणि संवाद एकजीव झाले आहे. पारबतीची मनोगते व्यक्त करण्याच्या काही पद्धती आहेत, निवेदनाच्या ओघात त्या लकबींसह सहज येतात. उदा. ''अस्यानं आसं हाय'', ''फलान्या फलान्या''. तिच्या लातूर-उस्मानाबादी बोलीतील म्हणी-वाक्प्रचारातून समाजवास्तवाचे आणि स्त्रीसुलभ बोलीचे दर्शन घडते.

'आधीच तारं न् त्येत गेलं वारं', 'कुनाला कस्याचं आन् बलुत्याला पस्याचं', 'सवतीच्या सळंसळं, कुनाला की मिळं म्हनत्येत तस्यातली गत', 'जवर फायदा तवर दादा', 'फुडं आग लागंल म्हनून आताच कस्याला बसायचं धोपटीत ?', 'कान टोचायचे तर सोनाराकडून टोचावे म्हनले', 'चोरीचा मामला, हळुहळू बोंबला', 'भिडं भिडं आन् गाबडं पडं', 'दे माय धरणी ठाय करुन सोडील तुमाला', 'अवचिंद उठलंन् कुडाला भेटलं', तऱ्हा करणे, पोटात गाठ ठिवून राहणे, कात व्हायला बसणे, तीन कांड्यावर येणे, अरध्या आडात घान करणे, रानी मागे लागणे, इ. काही अपरिचित नावीन्यपूर्ण शब्दही प्रदेशविशिष्ट आहेत. जसे, श्यामरथ, चितागती, तरमळून, उलासल्यावानी, अज्जात, फेसनवाले, नडीव्हडीला, नवाजायचे जरासक, बानं, हेकाडी, दाटूनच, खऊट, मोप, मिसन, पयलपावनी, फरसत, हमेश्या, त्येतलं, जमाना, मुकाट्या, सबागती, तांबीसपना, रोटी-कोरड्यास, परसोध्यान, चाळवन्या, इव्हडीबार, माय, गैराटावानी, उडग्यावानी, तिराइंताला, यायल्यात, दावायलास, करायले, शिकायलाय, पुसायचे, व्हायलीय, म्हनायलाय, बोलायलो, लईदी, संदक, चितायलेच, सांगायलेत इ. वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

''पारबतीची भाषा चित्रदर्शी आहे'' १२. असे शांता शेळके म्हणतात. प्रतिमासृष्टीने समृद्ध अशीच तिची भाषा आहे. ''आपून काय निव्वळ पाचुळ्यावानी'', 'भाना राखेतल्या इसत्यावानी घुमसत असतो, गंगाराम रातभर घुसळून लोनी काढल्यावानी दिसतो, शेवरीच्या झाडाला धरुन हलवावे तशी पारबती नवऱ्याला धरुन हालवते, 'गठुडं बांधल्यावानी ती बसून राहते, जिवाला कातर लागते, वाळुतला हिरा खांदल्यावानी, घुस घिटल्यावानी, पिकाच्या बुडाला खळाखळा खुरपं फिरवावं तसा संसार झालेला, कवा आडकन नाई का रुसून बसणं नाही. वाळुचा कट्टा फुटल्यावानी, ढेकळाखाली कोंब दबावा तसं मन दबलेलं, पार्वतीच्या भाषेत अशाप्रकारच्या ग्रामीण जीवनाशी नाते सांगणाऱ्या प्रतिमा येतात. प्रदेशाचे रंग गडद करतात. या संदर्भात डॉ. र. बा.

मंचरकर म्हणतात, "....... संपूर्ण कादंबरीच ग्रामीण बोलीतून लिहावयाचे आव्हान बोराड्यांनी यशस्वीपणे पेलले आहे. नादानुकरणात्मक शब्द, पुनरुक्त शब्द, ग्रामीण ढंगाने केलेली शब्दांची मोडतोड, अवग्रहांनी सुचविलेले हेल, वाक्यात उपान्त्यस्थानी येणारी क्रियापदे, लोकजीवनात मुरलेल्या म्हणी-वाक्प्रचारांचा वापर, बोलीचा सूर, वाक्यांची मोडणी, दैनंदिन ग्रामजीवनातील कल्पनांचा वापर यामुळे उस्मानाबादी बोलीचा अस्सल ठसका तिच्यात आला आहे. स्त्री-सहजता व प्रादेशिकता या विशेषांनी 'पाचोळा'च्या आशयोन्मुख भाषेला वैशिष्ट्यपूर्णता दिलेली आहे." १३. या सर्व समावेशक अभिप्रायाप्रमाणे वि. शं. चौघुले यांचा अभिप्राय आहे. "लेखकाने कादंबरीला पूर्णतः मराठवाडी बोलीचे रूप प्राप्त करुन दिले आहे. ही बोली अत्यंत सहजसुलभ सामान्य स्त्रीच्या आत्मनिवेदनाच्या रूपाने साकारली आहे." १४. डॉ. भालचंद्र फडके यांनी "गोतावळा" (आनंद यादव), "पाचोळा" (रा. रं. बोराडे) या कादंबऱ्यांनी "मराठी कादंबरीच्या विकासाच्या दिशा स्पष्ट होऊ लागतात........ मराठी कादंबरीच्या विकासाला गती लाभली आहे. " १५. असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे "निवेदन आणि संवाद या दोन्हींसाठी बोलीचा वापर केला, हे या दृष्टीने मराठी कादंबरीचे एक पुढचे पाऊल आहे. त्याचप्रमाणे "निवेदन आणि संवाद या दोन्हीसाठी बोलीचा वापर केला, हे या दृष्टीने मराठी कादंबरीचे एक पुढचे पाऊल आहे." १६. असे प्रल्हाद वडेर यांनी म्हटले असले तरी सुधाकर जयवंत "कादंबरी प्रभावी असली तरी मनाला डसत नाही" १७. असे असमाधान व्यक्त करतात. त्यांना उद्धव शेळक्यांची 'धग' श्रेष्ठ वाटत असली, दोन्हीमध्ये साम्य दिसत असले तरी या दोन्ही कादंबऱ्यात "मूलभूतपणे वेगळ्या आहेत." १८. त्यामुळे प्रभा गणोरकर, १९. प्रल्हाद वडेर, २०. मधू जामकर, २१. यांनी घेतलेल्या आक्षेपांना ही परस्पर उत्तर मिळते. स्वतः लेखकही डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या प्रश्नाला उत्तर देताना म्हणतात, "या दोन्ही कलाकृतींची प्रकृतीच भिन्न आहे." २२. या विधानावरुनही 'धग' आणि 'पाचोळा'च्या संदर्भातील प्रभा गणोरकर, प्रल्हाद वडेर आणि मधू जामकर यांचे आश्रेप आणि त्यांना दिसणारे साम्य वरवरचे आहे, हे समजण्यास मदत होते. परंतु बोलीसंदर्भात प्रल्हाद वडेर यांत्रिक पुनर्निर्मितीचा प्रश्न उपस्थित करताना लिहितात, "ज्यावेळी कलावंत बोलीभाषेचा संपूर्ण वापर करुन तिच्या निवेदनालाच केंद्र मानतो, त्यावेळी तो तिच्या प्रेमात पडतो व तिची एक यांत्रिक पुनर्निर्मिती तो नकळत करतो. " २३. हे वडेरांचे मत डॉ. कोत्तापल्ले यांना अन्याय करणारे वाटते. डॉ. चंद्रकांत धोंडे, जयंत पारुंडेकर, डॉ. एस. एम. कानडजे, ना. वि. काकतकर आणि बी. एन. जोशी या समीक्षकांच्या मतांचा हवाला देऊन त्यांनी म्हटले आहे, "पाचोळा'ची (व गोतावळा) भाषा यांत्रिक पुनर्निर्मिती करणारी असती तर बोलीचे टवटवीत रूप जाणवले नसते. बोराडे यांनी वापरलेली बोली अतिशय टवटवीत,

स्वाभाविक आणि अस्सल अशी आहे.'' २४. या विधानांची साक्ष कादंबरीच्या प्रारंभापासून ते अखेरीपर्यंतच्या पार्वतीच्या निवेदनात मिळते. निवेदनात कृत्रिमता नाही. उलट वास्तव वातावरण निर्मितीच्या सामर्थ्यामुळे मराठवाड्यातील ग्रामीण वास्तव जिवंत होत जाते. शांता शेळके लिहितात, ''पारबतीच्या निवेदनात सर्वत्र जाणवणारी सौम्यता फार विलोभनीय आहे. तिचे कमी बोलणारे सोशीक दुःखाने भारावलेले व्यक्तित्व या सौम्यतेमुळे मूर्तिमंत आपल्यासमोर उभे राहते. जिथे भडक उद्गार घालण्याचा मोह कुणाला झाला असता तिथे पारबतीची सौम्य प्रतिक्रिया अधिक परिणाम साधून जाते.'' २५. भाना-पार्वतीचे संवाद याची साक्ष देतात. किंवा तिची अनेक स्वगतही सौम्यतेच्या मर्यादा ओलांडत नाहीत. माधव मनोहर ''आशय, अभिव्यक्ती भाषा यांचे हे एकरुप दर्शन क्वचितच घडते.'' २६. असे म्हणतात. ''बोल भाषेचा संपुर्ण कादंबरीत वापर आणि आर्थिक समस्या व तज्जन्य संघर्ष यामुळे ही कादंबरी प्रादेशिक ठरते.'' २७. असे डॉ. मदन कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

काही आक्षेप मान्य करुनही जनजातीच्या जीवनावरील मराठवाड्यांची पार्श्वभूमी लाभलेली लक्षणीय प्रादेशिक कादंबरी म्हणून 'पाचोळा' कडे बोट दाखवावे लागले. मराठी कादंबरीच्या विकासाचा ती एक टप्पा आहे.

### ३) ना. धों. महानोर - *'गांधारी'*

'गांधारी' ही १९७३ मध्ये प्रसिद्ध झालेली प्रादेशिक कादंबरी आहे. तिला बांधेसूद कथानक नसले तरी अंतःसूत्र मात्र आहे हे दुपदरी आहे. पहिला पदर स्वातंत्र्यपूर्वकाळातील रझाकारी राजवटीतील अन्याय, अत्याचार उन्मादाचा आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निजामी अंमलाखाली असलेला मराठवाडा पोलीस अॅक्शन होऊन स्वतंत्र झाला. रझाकारांच्या वर्तनाला विटलेल्या 'गांधारी'तील जनतेला स्वतंत्र झाल्याची जाणीव झाली. गतजीवनातील दुःख विसरून गावकरी कामाला लागले. तर स्वातंत्र्यानंतर राजकीय नेत्यांच्या गैरवर्तनाने गाव पोखरले गेले. त्यामध्ये गटबाजी, लाचारी, वशिलेबाजी आणि कोर्टकचेरीचे प्रस्थ वाढले. एकसंधपणा नाहीसा झाला. राजकीय परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवरील समाजजीवन चित्रण करणारा हा दुसरा पदर आहे. जगदेव आणि राजमल यांच्या चिथावणीमुळे गुण्यागोविंदाने - एकदिलाने वागणाऱ्या लोकांमध्ये संघर्ष होऊ लागले. जमीन, ग्रामपंचायत निवडणुका, सहकारी सोसायट्या, स्वस्त धान्याचे दुकान, बोगस कर्जवाटप, गावठाणीच्या जमीनीवर वहीवाट सांगणे, यामुळे गटबाजी वाढली. भागवत हा सरळप्रवृत्तीचा तरुण त्यांना विरोध करतो. त्याचा मित्र लालजी-गुलाबबाई (सावित्री) बरोबर विवाह करतो. त्यामुळे गावामध्ये उलटसुलट चर्चा होते. कीर्तन करणारे महाराज हौसाशी संबंध ठेवतात. कडोबा सारख्याचा यामुळे खून होतो. गावकरी गावातील भानगडींवर चर्चा करतात.

कष्ट करण्याचे टाळतात. कर्ज-तगाया काढून चैन करतात. धनिकांची थकबाकी वाढली तरीही वसुली सक्तीने गरिबांकडून केली जाते घरदार-पिकांची जप्ती होते. निनावी अर्ज करून भानगडी वाढविण्याचे प्रकार होतात. गावामध्ये झालेल्या सुधारणांकडेदेखील लोक तऱ्हेवाईक नजरेने पाहतात. कुटुंबनियोजन कार्यक्रमाविषयी त्यांच्यात अज्ञान आहे. जगदेव पुढाऱ्यांचे सत्कार करुन पैसे लुबाडतो. त्याला भागवत, तोत्या मांग विरोध करतात, तेव्हा भागवतच्या शेतातील पीक नष्ट केले जाते. असे हे या कादंबरीचे विस्कळीत कथानक आहे. परिवर्तनकाळातील समाजवास्तवाचे दर्शन घडविण्याचे सामर्थ्य त्यामध्ये आहे.

'गांधारी' मधील व्यक्तिरेखांच्या स्वभाव-वृत्तीप्रवृत्तीतून महानोरांनी समूहचित्रण केले केले आहे. गौण पात्रांचे समूह पार्श्वभूमी म्हणून आलेले असले तरी जगदेव, भागवत, लालजी, राजमल, गुलाबबाई या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. तसेच राघोपाटील, गंगा, जयवंता, हौसा, तोत्यामांग, विठ्ठल महाराज, हरीबा कोळी, संभू माळी, जाईबाई, येड्याकाका, सावजी मेघे, कडोबा, सारजा, शेवंता इ. गौण व्यक्तिरेखांबरोबर समस्त ग्रामस्थ गांधारी हे देखील गौणपात्रच आहेत. ते अपवादात्मकच पारावरील चर्चेच्या निमित्ताने, सभेच्या निमित्ताने भेटतात. बॅन्क इन्स्पेक्टर, फौजदार, तहसीलदार, फॉरेस्ट अधिकारी, तलाठी, सेक्रेटरी, ग्रामसेवक हे प्रशासन व्यवस्थेतील भ्रष्ट अधिकारी आहेत. अरुण प्रभुणे यांना ही कादंबरी सर्वसामान्य वाटते. ही पात्रे त्यांना 'टाईप' किंवा 'कळसूत्री' बाहुल्यांप्रमाणे वाटतात. ते म्हणतात, 'प्रधान व्यक्ती या सुष्ट आणि दुष्ट असी ढोबळ वर्गवारीत मोडणाऱ्या आहेत. '' २८. जगदेव दुष्टांचा प्रतिनिधी तर भागवत सृष्टांचा सत्पक्षा प्रतिनिधी आहे. याचप्रमाणे शकुंतला जोग "गांधारीतील व्यक्तित्व डिंकान एकत्र चिटकवल्यासारखी वाटतात. " २९. वरील दोघांचीही विधाने एकांगी वाटतात. उलट या संदर्भातील वसंत आबाजी डहाके यांचे विवेचन सार्थ वाटते. ते म्हणतात, " या कादंबरीतील व्यक्तिरेखा ठोकळेबाज नाहीत. कारण त्या व्यक्तींचे स्वतंत्र आंतरिक जीवनसुद्धा लेखकाने उलगडून दाखवले आहे. " ३०. तसेच कादंबरीच्या यशाचे रहस्य, "व्यक्ती आणि समाज यांच्यातील ताणांचे जिवंत चित्रण" ३१. असे श्री. डहाके म्हणतात. जगदेव उपरा जाफ्राबादकडील खलप्रवृत्तीचा राजकारणी आहे. "डावा डोळा मोठ्या जखमेनं कधीतरी पूर्ण गेलेला. त्याच भिवईवर कपाळात मोठी खोंग. डोळ्यावर नेहमी काळा गॉगल. महाकाय देह आणखी झुलत झुलत चालणं. अगदी शुभ्र राहाणी. बगळ्यापरीस ........" (पृ.११) असा हा मिजाशीत राहणारा "आज काल नोटों के सामने सब दुनिया झुकती है" (पृ.१२) असे तत्त्वज्ञान सांगणारा, लोकांना झुलवत ठेवणारा पुढारी आहे. सत्ता टिकविण्यासाठी वाईट मार्ग स्वीकारणारा आहे. भागवत हा प्रगतीवादी आणि आदर्श असूनही त्याचा तिरस्कार करणाऱ्यांची संख्या गावात अधिक आहे. डॉ. भालचंद्र फडके यांनी

'गांधारीस' सुष्ट दुष्टाचा संघर्ष म्हटले असले तरी ''भागवतच्या मनाचे पदर महानोरांनी कुशलतेने उलगडले आहे'' ३२. हे मान्य केले आहे. राघोपाटलाचा एकुलता एक शिकलेला, शेतात राबणारा, गावगुंडीत भाग न घेणारा, प्रयोगशील, कष्टाळू, अमृताची वाणी असलेला, खानदानी, परोपकारी सुपुत्र आहे. एक आदर्श पती, मित्र आणि शेतकरी आहे. लालजीवर तो प्रेम करतो. गुलाबबाईच्या नृत्याचे कौतुक करणारा रसिक आहे. जयवन्ताची अतृप्तता समजून घेणारा, संभू माळ्याचे कर्ज भरणारा परोपकारी, हौसाची व्यथा समजून घेणारा समजदार, एकांतात रमणारा तरुण आहे.

खानदेश मराठवाड्यातील सीमेवरील खेड्याची पार्श्वभूमी 'गांधारी'ला लाभली आहे. अजिंठा-औरंगाबाद आणि जवळच्या प्रदेश लेखकाने जिवंत केला आहे. ''पत्र उडालेली, धोबे, भिंती, छपरे सगळं पावसानं कोसळून पडलेलं'' (पृ. ६) या वर्णनातून मराठवाड्यातील पत्र्या-धाब्याची घरे किंवा छपरांचा उल्लेख प्रदेशविशिष्ट आहे. भुईमूग, ज्वारी, कपाशी, केळी, मोसंबी, ऊस ही या प्रदेशातील पिकांचेही वर्णन लेखक करतो. हैद्राबाद संस्थानातील हा प्रदेश स्वातंत्र्यानंतरही प्राथमिक गरजांपासून वंचित राहतो. दुष्काळात रोजगार हमीच्या कामावर जाण्यापेक्षा कर्जाची थकबाकी चुकविणारे लोक या प्रदेशात अधिक आहेत.

''निजामी राजवट संपुष्टात आल्यानंतर एका खेड्यात झालेल्या परिवर्तनाची कथा ती प्रत्ययकारी रीतीने सांगते. त्या राजवटीत अनेक उत्पातांना तोंड देऊनही जिवंत राहिलेले, पुन्हा तरारलेले हे खेडे आहे. ते असे राजकीय संदर्भात उभे करीत असतानाच त्याच्या सामाजिक जीवनाकडेही लेखकाने लक्ष दिले आहे. वेगळी माणसे आणि त्यांचे परस्पर संबंध यातून हे सामाजिक जीवन रेखाटले जाते.''३३. हा अभिप्राय अधिक बोलका आहे.

हैद्राबादची निजामी राजवट स्वातंत्र्यानंतर पोलीस ॲक्शन होऊन नष्ट करण्यात आली. खानदेशाच्या हद्दीत गेलेले लोक गावामध्ये येऊन स्थिर झाले. अस्थिर जीवन संपले असा आशावाद वाढीस लागला. स्वतंत्र झाल्याचा आनंद सर्वांना झाला. ''आता दगड मारता भीती न्हाई. जाळ्यातून पार मोकळे झालो आता.स्वतंत्र झालो. आता पिठाला धनधान्याला करोड गिरीनाकं, आडवणूक, पैसा कापणं काही न्हाई. निजाम सरकारचा झेंडा उतरला. आता मुसलमानांचा धाक दडपशां न्हाई की कोन्ही भीती न्हाई. आता आपण सवता राजे.'' (पृ. ७)

'मारोती महाराजकी ऽ जय !' करुन लोक शेतीवाडीच्या कामाला लागले. जात्यावर ओव्या म्हटल्या जाऊ लागल्या. नववर्षाचे गुढ्यातोरण उभारुन स्वागत केले. निसर्गाची कृपा झाली. धनधान्य पीकले. ''जो तो ज्याच्या त्याच्या शेतीवाडीत, संसारात बुडून गेलेला. कुणीकडे हेवादावा नाही. कधी दुष्काळ नाही. काही भानगडी

असल्या तरी खाजगीत एकत्र बसून मिटवून घ्यायच्या. झगडे नको. कोर्टकचेऱ्या नको - चारचौघांचं सगळ्यांनी कबूल करावं ---- गावाची रया वर्षावर्षाला वाढत चालली.'' (पृ. १०-११) स्वातंत्र्य मिळाल्यावर काही काळ लोक एकमेकांशी प्रेमाने वागत होते. गावातले वाद, भानगडी गावात मिटत होत्या. कोर्टकचेऱ्यांनी भानगड नव्हती. परंतु या गावामध्ये स्वार्थी राजकारण्यांची संख्या वाढली आणि गाव पोखरु लागले. सुष्ट-दुष्टांमध्ये संघर्ष होऊ लागला. ऐतखाऊपणा आणि चैन करण्याची वृत्ती बळावली. लोकांची होयबा वृत्ती वाढीला लागली. रिकामटेकड्यांची संख्या वाढली. कष्ट करण्याची प्रवृत्ती नष्ट झाली. दुसऱ्याच्या प्रगतीला लोक डोळे मोडू लागले. स्वार्थीवृत्ती आणि भ्रष्टाचार समाजामध्ये मूळ धरू लागला. जसे, शिकलेल्या भागवतने स्वकष्टाने अधिक पीक घेण्यास सुरूवात केल्याबरोबर लोक त्याची हेटाळणी करु लागले. कर्जाच्या नोटिसा आल्यावर त्याची मदत घेण्याचा प्रयत्न लोकांनी केला, परंतु त्याचे अनुकरण करुन उत्पन्न वाढविण्याच्या भानगडीत गावकरी पडले नाहीत.

'कसेल त्याची जमीन' या कुळकायद्याचे जसे मजूर शेतकऱ्यांना फायदे झाले तसेच काही तोटेही झाले. कष्ट न करता, पैसे खर्च न करता फुकट जमिनी मिळाल्यामुळे त्या जमिनीबद्दल कुळांनां आत्मीयता वाटत नाही त्यामुळे कष्ट न करता कोणतीही गोष्ट फुकट मिळविण्याची प्रवत्ती वाढली. या जमिनीची बॅन्काच्या कर्जामुळे जप्ती होईल अशी भीतीही कुळांना वाटत नाही, उलट जमिनीची जप्ती होण्यापूर्वी त्यावर आणखी एखादे कर्ज काढता येईल काय याचा विचार कुळ करु लागले. कर्जाचा योग्य विनियोग न करता दारुबाजी, रंडीबाजी, झगडे-भानगडी व आळशीपणात रक्कम संपली. समाजात लबाडीची वृत्ती वाढीस लागली. बॅन्केचे पैसे माफ होतील या आशेवर लोक जगू लागले. कर्जाची परतफेड करण्याची भीती नष्ट होऊ झाली. याप्रमाणेच महानोरांनी पांडुकाका-भागवतच्या भाषणातून समाजवास्तवाचे चित्र रेखाटले आहे. भागवत म्हणतो, ''निव्वळ बावळट लोकांशी गाठी आहेत झालं. हा बॅन्केचा पैसा कुणाच्या बापाला चुकणार नाही. घरदार, शेती विकून शेवटी भरावाच लागणार. तुमची सगळी दिशाभूल होत आहे........'' (पृ. ३१) भागवतच्या विचारातून स्वातंत्र्योत्तर काळातील समाजाची वृत्तीच लेखकाने चित्रित केली आहे.

खेड्यांच्या विकास होऊ लागला. तेथे वर्तमानपत्रे येऊ लागली. प्राथमिक आरोग्य केंद्र शासनाने सुरु करून कुटुंबनियोजनाचे महत्त्व समजून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु खेड्यातील जनतेच्या अज्ञानामुळे सरकारला अपयशच आले. प्राथमिक आरोग्य केंद्रात परिचारिका काम करु लागल्या. त्यांच्याविषयी मात्र गावभर चर्चा होऊ लागली. 'गांधारी'तील सारजा आणि शेवंताही 'लाल तिरकोनवाल्या' बाईबद्दल चर्चा करतात. गावातील लोक रात्रीअपरात्री संतती नियमनाच्या गोळ्या मागतात. तिच्या भोवती स्टॅंडवर, ऑफिसमध्ये गर्दी करतात. तिच्यावर संशय घेतला जातो. सरजा म्हणते,

"काय उल्टा धंदा झाला देवा. पोरंबाळं बंद करा सांगणारीचंच गावान पोट वाढविलं. धन्य झाली. पन सरजे, ती बाई वाईट चलनाची नाही. मानूस लपत नाही कधीच. आपलं गाव बारबाक्कोळं. विनाकरणी तिच्या नावाची अफवा उठवली असंल." (पृ. ९१)

खेड्यातील जनतेचे अज्ञानही कमी झालेले दिसत नाही.

"खरी गोष्ट हाये. संसाराच येल मांडवावर चढवायचा का त्याले कुऱ्हाड मारायची? हे न्यारंच शास्तर धुंडून काढलं सरकारनं." (पृ. ९१) देवावर सर्वांची श्रद्धा आहे. म्हणूनच कर्माने सर्व खातील, पितील, वाढतील असा त्यांचा आशावाद आहे. समाज विज्ञानयुगातही बदलायला तयार नाही. संततीनियमनाची शस्त्रक्रिया झालेल्यांना मुलं कशी झाली यावर मात्र गावांमध्ये चर्चा होते. वैद्यकीय अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणाही आहे. शस्त्रक्रिया बिनचूक न झाल्यामुळेही पती-पत्नीमध्ये संघर्ष निर्माण होतो, गावभर चर्चा होऊन अब्रूला धक्का लागतो.

जलसा-संगीतबारी-तमाशा या लोककलांना समाजामध्ये हवी तेवढी प्रतिष्ठा मिळालेली नाही. लालजी जलशात तबला वाजविण्यास तयार होत नाही - "लोक काय म्हणतील ? एवढा मोठा जमीनदार जलशात तबला वाजवितो......" (पृ. ४२) लोकांची त्याला भीती वाटते किंवा अप्रतिष्ठेचे भय वाटते. त्याचप्रमाणे संगीतबारी किंवा तमाशात नाचणाऱ्या स्त्रियांविषयीही अनेक गैरसमज असतात. या स्त्रिया संसार करु शकत नाही. जास्त दिवस एका पुरूषाजवळ राहूच शकत नाही. पळून जातात. गावातल्या रिकामटेकड्या लोकांमध्ये अशा चर्चा अधिक होतात. गुलाबबाई (सावित्री) आणि लालजीने ओंकारेश्वराच्या साक्षीने लग्न केल्याबरोबर लालजीने नीतिमूल्ये पायदळी तुडविली असे गावकऱ्यांना वाटते. तिच्या नृत्याचे आणि लावण्याचे कौतुक करणारे लालजीवर बहिष्कार टाकतात. रिकामटेकड्यांमध्ये चर्चा होऊ लागती. तिला बदचालीची ठरविले गेले. ती लालजीबरोबर जास्त दिवस नांदणार नाही, पळून जाईल असे लोक बोलू लागले. जातीतील स्त्रीबरोबर लग्न करण्याच्या परंपरेला लालजीने हादरा दिला. तेव्हा तिच्या नृत्याचे आणि लालजीच्या तबला वादनाचे कौतुक केले जात असतानाच गावकऱ्यांच्या मनात अढी असते. तिच्या जातीबद्दल चर्चा होते.

"पण नाचणारी बाई घरात घेणं काही ठीक नाही. गावाला वाईट चालचलणूक लागील. गावाला काही इज्जत नीतिनेयम राहिला नाही. "वा ! भल्ते आले नीतिनेमवाले. करुन करुन भागले आन देवपूजाया लागले. गावात पोटं पाडली गेली त्यावेळी सगळ्यात गपचूप तुमच्यासारखे लोक होते. त्यावेळी नीतिनेम धाब्यावर. फक्त आता साळसूदपणा. दुनियेत असतील तेवढ्या वाईट गोष्टींची गावात बजबजपुरी माजली त्यासाठी कधीकाळी तुम्हाला वाटलं नाही आन् आता ब्रह्मज्ञान शिकवता......."

तुका म्हणे मुके राहा, जे जे होईल ते पहा." (पृ. ५१)

एखाद्यावर किटाळ आणण्याचा प्रयत्नही केला जातो. जसे, लालजीच्या सामर्थ्यापुढे जगदेवचे काही चालत नाही. संबंधातून ती गरोदर असते. तेव्हा या भानगडीत लालजीला अडकविण्यासाठी हौसाला पैशाचे आमिष दाखविले जाते. जयवन्ता आणि भागवतचे संबंध असल्याची अफवा पसरविली जाते किंवा त्याला बदनाम करण्यासाठी फॉरेस्ट खात्याकडे निनावी अर्ज पाठविला जातो. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये खेड्यातील समाजाचे विघटन सुरु झाले. गटबाजी वाढली. जातीयवाद, स्वार्थ, वशिलेबाजी, लाचलुचपत, वैमनस्य, अडाणीपणा, गुंडगिरी, शेतीवाडीचे कज्जे, ग्रामपंचायतीच्या निवडणुका, भ्रष्टाचार सहकारी सोसायच्यातील आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील भानगडी यांनी समाजजीवन खिळखिळे झाले.

हैद्राबादच्या निजामाची सत्ता मराठवाड्यात होती. त्यांनी या प्रदेशात समाजावर सत्ता गाजवित असताना अत्याचार केले. लाचार जीवन जगायला लावले. स्त्रियांवर बलात्कार केले. तर स्वातंत्र्यानंतर सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे धोरण काँग्रेस सरकारने ठेवले. ग्रामपंचयती, पंचायत समित्या, पक्षनिष्ठा इ. राजकीय पैलुंचा प्रभाव ग्रामीण-प्रादेशिक सामाजिक जीवनावर पडला. पुढाऱ्यांची ढोंगी-भ्रष्टाचारी वृत्ती वाढीला लागली. गटबाजी बोकाळली. त्याखाली हा समाज भरडून निघाला. अशा दोन्ही राजकीय शक्तीचा अनुभव घेतलेल्या जनतेच्या आशा-निराशांचे चित्र गांधारीत आहे.

निजामाच्या क्रूर, जुलमी सत्तेचे स्वरुप लेखकाने पहिल्याच प्रकरणात सांगितले आहे. हैद्राबादमुक्ती संग्रामात अनेकांचे प्राण गेले. स्वातंत्र्य मिळाले ते १९४८ मध्ये पोलीस ॲक्शन होऊन. परंतु त्यापूर्वीच्या अस्थिरतेचे वर्णन लेखक करतो, "खेड्यात सगळीकडे लोकांचे चेहरे काळे ठिक्कर. चिताग्रस्त. पोटात भीतीचा गोळा. घटकेत काय होणार याचा भरवसा नाही." (पृ.१) अफवांचे पीक आले. खेडी लुटण्याचा, जाळपाळीचा धुमधडाका सुरु झाला. स्त्रियांची अब्रू लुटली गेली. फरदापूरच्या जुम्मा मशिदीसमोर नऊ लोकांचा छळ करुन ठार केले. अजिंठ्याच्या महमद घाऊसनं पैशाची लूट केली. मुक्तिसेनेच्या लोकांनी निजामावर बॉम्ब टाकला. या गोष्टीने चिडून निजाम कत्तल करणार अशी भीती वाटू लागली. अल्पसंख्य मुसलमानांचे गावामध्ये वर्चस्व वाढले. शेतीच्या मशागतीचे दिवस असूनदेखील लोक घरात दडून बसले. एवढी दहशत होती. रात्रीच्या वेळी लोक गस्त घालत. परंतु फरदापूर-अजिंठ्याकडून रझाकार चाल करुन आल्याबरोबर लोक परागंदा झाले. 'गांधारी' गाव लुटले गेले. विरोध करणाऱ्यांनी जयसिंह पहेलवानाचा खून केला. गावचावडीतील दप्तर जाळले. पोलीस ॲक्शन होऊन निजाम पकडले गेले. देश स्वतंत्र झाला. परंतु 'गांधारी'च्या नशिबी दुर्योधनच फार असल्यामुळे स्वातंत्र्याचा आनंद फार काळ टिकला नाही. जगदेव-राजमल सारख्या दुष्ट पुढाऱ्यांचे वर्चस्व वाढले.

'जगदेव' तोत्या मांगाच्या मताच्या जोरावर 'गांधारी'चा सरपंच होतो. विकासाच्या

गप्पा मारुन तो लोकांना झुलवत ठेवतो. वरिष्ठांशी चांगले संबंध असल्याचे भासवितो किंवा त्यांच्यापेक्षा आपण मोठे आहोत असे सांगतो. गावातील विकास कामांसाठी त्यांची मदत लागणार आहे, म्हणून त्यांचे सत्कार करतो. त्यासाठी गावकऱ्यांकडून सक्तीने वर्गणी गोळा करतो. त्यातील निम्मे पैसे स्वतःच्या खिशात घालतो. "....... मी गावचा सार्वभौम राजा. हजार गोष्टींची बकवास. शेख महंमदाहूनही जे डोक्यात आले ते हाती घ्यायचे. शेतकऱ्यांसाठी कुठल्या योजना निघाल्या, सवलती मिळाल्या तर गौप्य लवकर कोणालाच सांगेना. सगळं आपल्या ताब्यात घेऊन त्यांच्यावर उपकार करायचे म्हणून, "मी हे करून आणलं' असं सांगे. माझ्या ताकदीनं. सेंट्रल बॅन्केचे चेअरमन, भूविकास बॅन्केचे चेअरमन, जिल्हा परिषद अध्यक्ष इत्यादी सगळे लुंगेसुंगे पुढारी आहेत. ते योगायोगानं त्या जागेवर गेले. परवा परवा ते आपल्या भोवती फिरत होते. आम्ही बडे लोक घरात बैठका करवायचो, मिटींग घ्यायचो तर ह्या लोकांना बाहेरच किंवा एखाद्या कोपऱ्यात बसवीत होतो. ते आता त्या जागांवर गेले म्हणून बडे झाले काय ? हम उन्होसे बहोत बडे है, उन्हे अपना कौनसा भीं काम करना पडेगा. (पृ. २१-२२) आपण 'किंग मेकर' आहोत असे गरजू लोकांना 'जगदेव' भासवतो. सर्वांचे हात ओले केल्यावर कामे होतात. त्याच्या सर्वत्र ओळखी असल्याचे मान्य करुन गरजू लोक त्याच्या थापांवर विश्वास ठेवतात. ते जगदेवला हवे असते. स्वार्थी ढोंगी राजकारण्यांची संख्या वाढली. लोकांना झुलवत ठेवण्याचे तंत्र त्यांनी अवगत करुन घेतले. आर्थिक विवंचनेत असलेली माणसं अशा लोकांभोवती झटपट जमा झाली.

निवडणुकांच्या निमित्ताने राजकारण केले जाऊ लागले. राष्ट्राच्या विकासासाठी शासनाने त्यांना प्रशासनात समाऊन घेण्याचा निर्णय घेतला. निवडणुका आणि नोकऱ्यांमध्ये राखीव जागा ठेवल्या. मतदानाचा हक्क मिळाला. 'गांधारी' मध्ये निवडणुका होणार असल्याचे तोत्या मांगाच्या दवंडीने (पृ.१४) समजते. राजमल विरुद्ध जगदेव यांच्या गटामध्ये चुरशीची लढत होऊन दोघांचेही चार-चार उमेदवार निवडून आले. तोत्या मांगाच्या मताने जगदेव सरपंच होतो. अस्पृश्यता मानणाऱ्या गावामध्ये सरपंच मागासवर्गीय मेंबरच्या मताने निवडला गेला. सत्तेवर आल्यानंतर जगदेवने भ्रष्टाचार आरंभला. चारदोनवेळा वर्गणी देऊन कंटाळलेला भागवत जगदेवला म्हणतो, "अर्धा पैसा कारणी लागतो, अर्धा खिशात राहतो हे तुमचेच लोक सांगतात. शिवाय बाहेर सर्वत्र हे सगळं मी करीतं असतो. फार खिशाला चाट बसते असा टेंभा मिरवीत असता. मग आता लोकांचे मागता कशाला ? (पृ. १०९) पुढारी गावकऱ्यांकडून वर्गणी गोळा करतात, परंतु स्वतःच्या खिशाला कधीही झळ पोहचू देत नाहीत. भागवत वर्गणी द्यायची नसेल तर देऊ नको परंतु लोकांची दिशाभूल करू नको. स्वतःच्या पैशाने गावातील विकास कामे केल्याचे जगदेव सांगतो. तेव्हा तोत्या मांग

म्हणतो,

" राहु द्या हो ऽ सरपंचसाहेब. सगळं जानतो. थेट निजाम सरकारच्या मुगलाईच्या जमान्याचा मी इठी हाये. जनम गेला. तुम्ही तं ह्या गावात आत्ताआत्ता आले. समाजामध्ये स्वातंत्र्यानंतर हक्क कर्तव्याची जाणीव होऊ लागली. आप्लाय मताची किंमत, जनतेला समजली.

पुढाऱ्यांप्रमाणे प्रशासक वर्ग देखील भ्रष्टाचार करु लागला. पैसे घेऊन गुन्हेगारांना मुक्त केले जाऊ लागले. जामिनावर सुटका होऊ लागल्या खोटे पंचनामे करुन पोलिसांनी पैसे खाण्यास सुरवात केली. लबाडी वाढली. जमीनीबद्दलची आत्मीयता नष्ट झाली. सरकारी पैशाचा दुरुपयोग करण्याची वृत्ती वाढली. बॅन्केकडून-सरकारकडून घेतलेले कर्ज चैनी करण्यात खर्च झाले. मुळात कर्जाची पूर्ण रक्कमच हातात मिळाली नाही. कर्ज देतांनाच अधिकाऱ्यांनी हप्ता वसूल केला. पुढाऱ्यांनी कर्जमंजुरी-पूर्वीच हात मारला. परिस्थितीमुळे लाचार झालेले लोक या गोष्टींना प्रोत्साहनच देतात. कोणत्याही मार्गाने कर्ज मिळविण्यासाठी धडपडतात. कर्जपरतफेड करण्याची प्रवृत्तीच नाहीशी होत चाललेली दिसते. 'गांधारी'तील सरपंच जगदेव "आजकाल नोटो के सामने दुनिया झुकती है"(पृ. १२) असे तत्त्वज्ञान सांगतो. म्हणजेच पैशाने सर्व कामे होऊ लागली. प्रामाणिकपणा नष्ट झाला. खोटेनाटे व्यवहार करुन कर्ज काढण्यासाठी गावामध्ये दोन-दोन सोसायट्यांची स्थापना केली जाते. जमीन गहाण-तारण ठेऊन लोकांनी कर्ज काढले. थकबाकीदारांना बॅन्केकडून नोटिसा येऊ लागल्या तेव्हा 'जमीन जाण्याआधी एक दोन कर्जाच्या नवीन स्कीम निघाल्येल्या आहेत त्याही काढून घ्या. मग जमीन गेली तरी बेहेत्तर.' काहींना सांगतो, एक दिवस हे सगळं कर्ज सरकार माफ करुन देणार आहे. पिकतच नाही. अगदी दुष्काळाचे, चार आणेवारीने पंचनामे तीनचार वर्ष पाठवायचे." दुष्काळी परिस्थितीमुळे बॅन्केचे कर्ज माफ होईल या आशेवर लोक जगू लागले. परंतु उभ्या पिकांवर आणि चीजवस्तू घरादारांवर जप्ती येऊ लागली. लोक तोंड लपवू लागले. कर्जवसुलीसाठी बॅन्क इन्सपेक्टर गावामध्ये येऊ लागले. नियमितपणे कर्ज फेड करणाऱ्या गरिबांच्या एखाद-दुसऱ्या हप्त्यासाठी घरातील सामानाची - धान्याची जप्ती करु लागले. संभू माळ्यासारख्या प्रामाणिक माणसाने पदर पसरला तरी अधिकारी त्याचे ऐकत नाही. भागवतासारखा मध्यस्थी करतो. तेव्हा संभू माळ्याच्या घरावरील जप्ती टळते. सरपंच-चेअरमन यांच्याकडे मात्र सर्वाधिक थकबाकी असूनही त्यांच्या घरावर जप्ती येत नाही. बँकेचे अधिकारी त्यांच्याकडे कोंबडीची पार्टी खाऊन कर्ज वसूल न करताच मागे जातात. मिळणारे कर्ज घेण्याची आणि ते परत न करण्याची भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देण्याची प्रवृत्ती वाढली. शेतीचे उत्पन्न मिळेनासे झाले.

'गांधारी'मध्येही लेखकाने लोकसमाजांचे प्रसंगानुरुप चित्रण केले आहे. झिपरु

सोनाराची वांझोटी आपल्याला अपत्य व्हावे म्हणून तिने अमावश्येच्या दिवशी गावाच्या वेशीला टिळा दिला. लिंबू कापलं गुलालाची चूडं वाहिली. गिरजाबाच्या घरात खिडकीशी बाळतीणीची खाट व कोवळं पोर होतं. त्याच्या अंगावर कोरी चोळी पेटवून फेकून दिली. पोर होण्यासाठी तिनं हजार भानगडी केल्या. कोण्यातरी गावठी साधूनं तिला हा गुरुमंत्र दिला होता.'' (पृ.६७) ग्रामीण भागात बुआबाजीचे प्रस्थ आहे. अपत्य प्राप्तीसाठी जन्मलेल्या बालकाच्या अंगावर कोरी चोळी फेकली जाते. याचप्रमाणे ''नवरा बायकोच्या कह्यात पुरता रहावा म्हणून गावंढळ चतुर बायको विटाळ्यात भिजवून सुपारी त्याला देते.'' (पृ.५६) अशीही प्रदेशविशिष्ट समजूत आहे. मीठ मोहऱ्यांनी नजर काढण्याची परंपरा (पृ.३२) भागवत-गंगाच्या संभाषणातून सूचित केली आहे. नाग-नागिणीचे जुळं पाहणे शुभ समजले जाते. (पृ. ३५) जयवंता भागवताला जुळे नागनागीण दाखविते. तेव्हा भागवतसारख्या सुशिक्षित वरील शुभा-शुभाची कल्पना सांगतो. परिवर्तन काळामध्ये विधवा मुलीचा पुनर्विवाह केला जातो. परंतु जाईबाई मात्र जयवंताचा पुनर्विवाह करण्यास तयार होत नाही. तिच्यावरील संस्कार हे परंपरागत हिंदू संस्कृतीचे आहेत. गावातील मारुती आणि भवानी मातेवर ग्रामस्थांची श्रद्धा आहे. भजन, कीर्तन-सप्ताह त्याठिकाणी चालतो. त्याबरोबर प्रादेशिक मनोरंजनाचे कीर्तन, तमाशा वाघ्या-मुरळीचे नृत्य इ. चे वर्णन लेखक करतो. कार्तिक महिन्यातील अजिंठ्याच्या घाटावरील सिद्धेराच्या यात्रेचे आकर्षण लोकांना वाटते. भजन, पालख्या, नामसंकीर्तन, रथयात्रा यापेक्षा सिनेमा, नाचतमाशे यातच लोकांना मजा वाटते. जवळपासच्या पाच पंचवीस खेड्यातील लोक यात्रेस येतात. परंतु देवदर्शनाऐवजी संगीतबारीकडेच सर्वांचे लक्ष असते. यातून ग्रामीण भागातील लोकांचे तमाशाचे वेड आहे. संगीतबारीत चौली पावलीचे खेळ होऊन दुसऱ्याची लावणी बंद पाडली जाते. इथपासून ते थेट गुलाबबाईच्या लावणीचे देखील लेखक वर्णन करतो.

''किती राखायचं जिवाला राखलं
राया तुम्ही जाळ्यात पाखरू टाकलं'' (पृ.४०)

या लावणीला 'वन्समोअर' मिळतो. लोक अगदी चेकाळतात. बॅटऱ्यांचे झोत आणि शिट्यांचा गोंधळ होतो.

याप्रमाणेच लोकजीवनावर राजकीय सत्तेचा प्रभाव कसा असतो याचे चित्रण निवेदनाच्या ओघात लेखकाने केले आहे.

''झाली संध्याकाळ बिब्या करती अल्ला अल्ला
कत्तलच्या राती, बाई मिटवला डोळा.'' (पृ.१०)

'गांधारी' खानदेश-मराठवाड्याच्या सीमेवरील खेडे आहे. त्यामुळे कादंबरीत अहिराणी आणि मराठवाड्याच्या बोलीतील शब्द येतात. कादंबरीचे निवेदन प्रमाणभाषेत

असून संवाद बोलीत आहेत. पात्रानुगामी बदलती भाषा लेखकाने वापरली आहे. इंग्रजी शब्दांचे विकृत उच्चार लोक कसे करतात ते लेखकाने टिपले आहे. उदा. मिटींग (मिटींग), फारम (फॉर्म), हायबरी (हायब्रीड) इ. परप्रांतातील लोक स्वतःच्या बोलीत बोलत असताना स्थानिक बोलीचाही त्यांच्या भाषेवर प्रभाव पडलेला असतो. जसे जगदेव जाफ्राबादकडील असल्यामुळे उर्दू, हिंदी, इंग्रजी व मराठी शब्दांनी युक्त हिंदी भाषा बोलतो. जसे,

"गांवकरी भाई और बहनों -

मैं आज गाँवके सब लोगोंकी हितसंबंधी बात बोलनेके वास्ते यहाँ खडा हूँ. तुम्हारे लोगोंके कल्याण के वास्ते. गावका दारिद्र्य दूर करनेके वास्ते....... गाँव के विकास के लिये सोसायटी स्थापन करने के ठराव के मसुदे पर सही कर दे. बाकी सबकुछ मैं कर लेने को तय्यार." (पृ. १७)

"ठीक है. आटप लेंगे. क्या हुवा आठ बजेही तालुकेसे लेटर लेकर चपराशी आया. दो तीन मिटींगा है. मुझे अजण्डा दिये. वो हमने पढे...... फिर औरंगबाद के वो इंजिनियर मिले. हम बोले तीन दिन के अन्दर इलेक्ट्रीलाईन गांवमे देना नही तो हम तुमको पूरा उल्टा सीधा बना देंगे...... अपने गाँवमें लाईट आ गये की, सब अंधेरा खतम. गाँव एकदम तन्दुरुस्त बनेगा. क्यो भाई ?" (पृ १०७)

निवेदनाशी एकरुप झालेलें संवाद 'गांधारीत' आहेत. निजामाच्या राजवटीचा अस्त झाल्यानंतर पारावर बसून चर्चा करणारी, स्वतंत्र झाल्याची जाणीव झालेल्या लोकांचे संवाद (पृ ६-७) संवाद निवेदनाशी एकजीव झालेले असून गावकऱ्यांचे मनोगतच त्यातून व्यक्त होते.

निजामाच्या भाषेच्या प्रभावामुळे लोक शिव्याही तशाच देताना दिसतात. जसे, गांडुकी, औल्याद, भडवे, मांकी, इ. प्रदेशविशिष्ट आहे. म्हणी वाक्प्रचारातूनही समाजवास्तवाचे दर्शन घडते. पिकाला जोर कमी आन् गवताला जास्त,' 'वाहाटूळ मधल्या कचऱ्यासारखे होते,' 'मानसाचं मन पांगल्यावर बाला गाव उजाड,' इ. बोलीतील नाविन्यपूर्ण शब्दांचीही वापर लेखकाने केला आहे. झडतीला, गनीमत, स्वतंत्र, कराडेगिरीमाकं, मोगडा, मीठमिरचीले, जवारीले, माय्, सनावाराले, इ.

"महानोरांची शैली साधी सरळ कुठेही काव्यात्म होऊन तिनं निवेदनाचा डौल ढासळू दिला नाहीय." ३४. हा शकुंतला जोग यांचा अभिप्राय सार्थ वाटतो. कारण मुळात कवी असूनही त्यांनी हा डौल सांभाळलेला दिसतो. वरीलप्रमाणे कादंबरीचा मलपृष्ठावरील अभिप्राय आहे. "या ठिकाणी महानोरांना त्यांच्या साध्या, कोठेही अतिरिक्तपणे काव्यात्म न होणाऱ्या गद्याचेही चांगले सहकार्य लाभले आहे. "या

सगळ्यामुळेच 'गांधारी' ही मराठीतील एक वेधक प्रादेशिक कादंबरी ठरेल याबद्दल कोणताही संदेह वाटत नाही.''३५. तर डॉ. र. बा. मंचरकर लिहितात, ''ग्रामीण संवेदनशीलता 'गांधारी'त उत्कटतेने अभिव्यक्त झालेली आहे. समकालीन ग्रामीण वास्तव इतक्या व्यापकतेने व नेमकेपणाने पकडण्याचा 'गांधारी'चा प्रयत्न जवळजवळ एकमेव आहे. ''३६. हे विधान कादंबरीतील समाजवास्तवाचे दर्शन घडविण्यास पुरेसे आहे. परिवर्तनकाळामध्ये पोखरल्या गेलेल्या खेड्याचे प्रदेशविशिष्ट दर्शन लेखकाने प्रभावीपणे घडविले आहे.

### ४) गणेश आवटे - *'गणगोत'*

गणेश आवटे यांनी 'चुकार' (१९८१) आणि 'गणगोत' (१९८४) या दोन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'गणगोत' ही एका खेडेगावातील सासुरवाशिणीच्या जीवनातील घटनाप्रसंगाची आणि त्यातून उद्ध्वस्त होत गेलेल्या तिच्या भावजीवनाची ही शोकांतिका आहे. पात्रमुखी किंवा आत्मनिवेदन पद्धतीने सांगितलेली ही कथा आहे. कादंबरीची नायिका आंजू आडात जीव देण्याचा प्रयत्न करते, त्यातून तिला वाचविले जाते, त्यानंतर गतजीवनातील सुखःदुखांच्या आठवणी ती सांगत जाते, या घटनाप्रसंगातून कादंबरीची कथा उलगडत जाते. घटनांचा विशिष्ट क्रम ती सांभाळत नाही. जसे सुचेलं तसे ती कथन करत राहते. तिच्या जीवनातील ताण-तणावांचे चित्रण करण्यास लेखक यशस्वी झाला आहे हे मात्र सतत जाणवते.

नवऱ्याच्या मारझोडीला कंटाळून ती आडात उडी टाकते. त्यानंतर तिला वरती काढून चाकावर घालून पोटातील पाणी काढून शुद्धीवर आणले जाते. शेजारी-पाजारी आयाबाया चांगल्यावाईट प्रतिक्रिया व्यक्त करतात. सासुबाई अप्रतिष्ठेच्या भीतीमुळे तोंड बडवून रडण्याचे ढोंग करते. माहेरला (पिप्री) घडलेला प्रकार कळतो. तिचे वडील आप्पा तातडीने येतात. त्यांची कुणी दखल घेत नाही. उलट मामंजी आणि आप्पांची थोडी बाचाबाची होते. आप्पा संयम ठेवून बोलतात. मामंजी मुलीचा प्रताप समजला का म्हणून विचारतात. हुंड्यातील रक्कम न दिल्यामुळेच हे सर्व घडले, याची जाणीव आप्पांना होते. मुलीलाही ते समजाऊन सांगून निघून जातात. आप्पांची आर्थिक परिस्थिती, भावांनी वेगळे होणे, आईने आंजूला हेकटपणा सोडण्यास सांगणे यासारख्या गतजीवनातील प्रसंग आठवतात. लग्नानंतरचे सुखाचे दिवसही ती आठवते. धार्मिक घराण्याविषयी तिला भूषण वाटत होते. नवरा, दीर, नणंद, सासू-सासरे सर्वांचे प्रेम तिला मिळाले, परंतु दिवाळीच्या सणासाठी आंजू नवऱ्याला घेऊन माहेरला जाते. दोघांचेही स्वागत-कौतुक होते आणि यापुढे तिच्या जीवनातील संघर्षास सुरवात होते. इच्छेप्रमाणे मानपान-आहेर न मिळाल्यामुळे विठ्ठल सासूरवाडीहून आंजूला न घेता निघून जातो. पुढे आंजूला मारझोड करतो. हुंड्याची रक्कम, रेडियो,

अंगठी मागू लागतो. कापसावर हे सर्व देण्याचे आप्पांनी मान्य केलेले असते. म्हणून हुंड्यासाठी सोसायटीची नोटीस आली असता आंजूला माहेरला पाठविले जाते. ती रिकाम्या हातानीच परत येते. दोन्हीकडे तिची उपेक्षा होऊ लागते. आई-वडिलांच्या हातात सत्ता नाही, भाऊ वेगळे निघालेले, सासरमध्ये रोजचा सासुरवास त्याला ती कंटाळते. भाकरीत 'काचकुरे' जाणे, ननंदेला समजावत असताना 'आळतुफान' प्रकरण घडणे, दुष्काळात आप्पांकडे पाठविलेली जनावरे परत येणे, विष्णू भाऊजींशी प्रेमळपणे वागणे, माहेरहुन चप्पला पाठविल्या जाणे, चुलतनंदाच्या लग्नात आप्पा आहेर आणत नाहीत, या सर्व घटनांप्रसंगांमुळे आंजू घरात प्रेमाला पारखी होते. तिचा संयम संपतो आणि ती आडात उडी घेते, असे विस्कळीत कथानक आहे. अशा सुट्यासुट्या घटनाप्रसंगातून लेखकाने आंजूची शोकांतिका सांगतानाच प्रदेशविशिष्ट समाजजीवनाचे चित्रण केले आहे.

'आंजू' ही कादंबरीची नायिका सोशीक, समंजस, संयमी, सासुरवाशीण आहे. सातहजार रुपये, रेडिओ व अंगठी हुंडा ठरवून तिचे लग्न केले. लग्नानंतरचे काही दिवस सुखासमाधानात गेले. त्याचघरात तिची कुचंबणा होऊ लागली. संसाराची परवड झाली. त्यामुळे तिची तडफड आणि तगमग होते. स्वतःच्या व्यथा वेदना ती स्वतःच सांगते. 'विठ्ठल' हा मुळातला प्रेमळ, परंतु हुंडा न मिळाल्यामुळे, मानापमानाच्या कल्पनेने बिथरलेला तिचा नवरा व्यसनी-बाहेरख्याली, क्रूर निर्दय पती आहे. बायकोस मारझोड करताना, विडीचे चटके देताना, घराबाहेर काढताना मात्र त्याला समाजाची भीती वाटत नाही, त्याची अप्रतिष्ठा होत नाही. हुंडा किंवा मानपानामुळे मात्र त्याची अप्रतिष्ठा होते असा स्वार्थी आहे. 'मामंजी' हे मुळातले सज्जन कर्मठ सदगृहस्थ आहेत. परंतु हुंड्यातील रकमेचा किडा वळवळतो आणि त्यांच्यातील माणूस नष्ट होऊन ते स्वार्थी-दुष्ट बनतात. 'सासूबाई' ही मामंजी- प्रमाणेच आहे. ती स्वार्थी-क्रूर रेखाटली असली तरीही ती तितकीच प्रेमळ आहे. सुनेला अवेळी मारझोड करणे, घराबाहेर काढणे तिलां आवडत नाही, तिला समाजात अप्रतिष्ठा होण्याची भीती वाटते. 'सुशाताई' ही नणंद अल्लड भांडखोर, संशयी वृत्तीची आहे. मुळात ती निष्पाप आहे. परंतु घरातल्यांचे अनुकरण करुन तीही अंजूला त्रास देते. आप्पा सोशीक, प्रेमळ, अगतिक, कर्मठ आहेत. आंजूच्या आईप्रमाणेच पराधीन आहेत. मुलीचे नांदणे सुखाचे व्हावे म्हणून ते अपमान सहन करतात. आंजूला समजून घेण्यासाठी व्याह्यांना विनवितात. आई आंजूला नवऱ्याशी मिळत-जुळते घेण्यास सांगते. उतावीळ, हेकट स्वभाव सोडायला सांगते. जात्यावर ओव्या म्हणणारी सोशिक स्त्रीची प्रतिनिधी आहे. दादा भोळाभाबडा, वहिणी आखूड बुद्धीची तर विलास हेकेखोर आणि इमलवहिणी मनमिळाऊ-प्रेमळ वनवासी स्त्री आहे. हे दोघेही स्वतःच्या संसारात गुरफटलेले असे आहेत. इजुभावजी, मिनी, धोंडू, सरू, जना

आत्या, मथी, सकू आजी, मांगीन, संकूर मांग, सुदाम, सुदी, इष्णूभावजी, भिव्या मांग - त्याची मुलगी मंडी, वच्छी आणि तिचे खंबीर वडील ह्या गौण व्यक्तिरेखा सामान्य माणसांच्या प्रतिनिधी आहेत. या असंख्य गौणपात्रांच्या चित्रणातून समाजवास्तवाचे स्वरुप लेखक स्पष्ट करतो.

मराठवाड्यातील एका खेडेगावची पार्श्वभूमी या कादंबरीला लाभली आहे. कादंबरीत येणाऱ्या पिकापाण्याचा ऋतुचक्राचा संदर्भ प्रदेशविशिष्टच आहे. आडातून वर काढलेल्या आंजूला तुऱ्हाट्याचा जाळ करुन शेकविले जाते. हरबरा, जवस, तूर मराठवाड्यात मोठ्याप्रमाणावर पिकते हे लक्षात घेतले पाहिजे. ज्वारी, कापूस, गहू, करडी, साळ ही पीके मराठवाड्याचे वैशिष्ट्य सांगणाऱ्या आहेत. सर्वाधिक कापूस आणि ज्वारी मराठवाड्यात पिकते. बाभळी-सींदडीचे झाडे येथे आहेत, त्याचबरोबरच काळी कसदार जमीन हे मराठवाड्याचे खास वैशिष्ट्य लेखक आंजूच्या ओवीतून सांगतो.

" शेत पिकलं पिकलं । काळ्या लोण्याची पट्टी
हाती शेंदराची वाटी । उभा मदनाच्या काठी ......
काळ्या वाऊरात । ढवळ्या बयलाचं आवूत
बंधवाच्या घरी । आली लक्ष्मी धावत........"

याच प्रदेशामध्ये दुष्काळामुळे पीक नीट येईनासे झाले. त्यामुळे पुढे बिकट आर्थिक परिस्थिती निर्माण झाल्याने कमी उत्पन्न निघाल्याचे लेखक वर्णन करतो.

ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणाऱ्या निसर्गाचे आंजूच्या मानसिकतेनुरुप चित्रण लेखकाने केले आहे. लग्नानंतरच्या समाधानी-आनंदी असा सुखवस्तू आंजूचे जीवनचित्रण करताना लेखक लिहितो,

"रस्त्यानं पिंढरीइतका चिखुल झाला व्हता. सगळीकडं गारठंडं आंगाला झोंबणारं वलसर वारं वहात व्हतं. आभाळ वर दाटून आल्यलं. नदीला पहाटं पानी येऊ गेलं व्हतं. गढूळ भोर पानी आजूकबी दोन्ही डगरीच्या काठुकाठ भरुन वहात व्हत." (पृ. २१)

सासू-ननंद आंजूवर माया करत होत्या, ती सुखी होती, तिच्या मानसिकतेनुरुपच वरील निसर्गवर्णन आहे. आंजूच्या जीवनातील सुखाचे दिवस संपले. मारझोड, संशयाचा अनुभव येऊ लागला. तेव्हा लेखक वर्णन करतो,

"आभाळात ढग जमायला लागलेत. वारा आडवा-तिडवा पळायला लागलाय. कावधन सुटतयं काय की, त्या दिसचा पाऊस मंजी आवकाळीच बीन कामाचा. निस्ती नासधूस करनारा. गुदास्ता ह्या दिसातच कावधन सुटलं व्हतं. त्या ऽ वरच्या आवडातल्या लिंबाच्या फांद्या मोडल्या व्हत्या वाऱ्यानं."......

".......भणाभणा कावधान सुटलंय. रानभर झाडंझुडं पिसाटल्यावानी झालेत. एकाएक पळहाटी येचून केल्याचे ढिगं डोक्शाइतकाले ऊच उडतेत आन पाडर पांगत

जातेत खालच्या धुऱ्यापस्तोर आवूडभर. काय फायदा झाला आपून पळहाट्या येचून?'' (पृ. १०५)

आंजूच्या आयुष्यातही अशाचप्रकारचे हुंड्यामुळे 'कावधन' सुटले. वाऱ्याने उडालेल्या पल्हाटीप्रमाणे तिचा संसार उद्ध्वस्त झाला. तिचं चांगलं वागणं देखील निरर्थकच ठरले. याबरोबरच मराठवाड्यातील डोंगर विरहीत सपाटप्रदेश, राऱ्याला अडथळा होत नसल्यामुळे तो सुसाट सुटतो, हे प्रदेश वैशिष्ट्य लेखक सांगतो.

''आंब्याच्या फांद्यातून सु ऽ झप्प वारा वाहतुय. भाईर टपाटपा पाऊस पडायला लागलाय, गाराचा पाऊस, मातीचा वास सुटलाय खरपूस खमंग, पांढऱ्याधोट पावसात सगळं रानशिवार गुडूप झाल्यावानी. भणाणून सुटल्याला वारा.....''

''कोपीसमूर पांढऱ्याधोट गाराचा सडा पडतूय. सुपारी एवढ्या, लिंबाएवढ्या गारा. कडाकडा ईज वाजत जातीय आन आपलं आंग मस्तकासमोर थर्कापून जातंय........ कुठंतरी पडली आसनं का ही ईज ?...... केवढ्यानं वाजली ?'' (पृ. १०६)

आंजूच्या आयुष्यामध्येही 'कावधनाचंच बन' झालेलं. तिच्या मानसिकतेनुरुपच लेखकाने वरीलं निसर्गचित्र रेखाटले आहे. दु:खातही आंजू सुख शोधण्याचा प्रयत्न करते, तेव्हा ती जात्यावर ओव्या म्हणत असते, अशावेळी तिला दिसलेला निसर्ग पहा. ''भाईर माथ्यावर आलेल्या आभाळातल्या चंद्राचं चाण्णं टिपूर सांडल्यालं.'' (पृ. ८२) सासरला सुख मिळत नाही, तरी आपले भाऊ चांगले आहेत, असे तिला वाटते. त्यामुळे तिच्या जीवनात काही क्षण तरी चांदणे पडते.

पावसाळ्याप्रमाणेच मराठवाड्यातील उन्हाळ्याचेही चित्रण लेखक करतो. रखरखीत ऊन, जनावर पाण्यासाठी ओढ घेतात, कुठे धड सावली नाही. तिच्या जीवनातील उन्हाळा-पावसाळा देखील अशा ताण-तणावांनी समृद्धच आहे. तिच्या वेदनेला अनुरुप असाच हा निसर्ग आहे.

परिवर्तन काळातील समाजवास्तवाचे जिवंत चित्रण करण्यात लेखक यशस्वी झाला आहे. 'अब्रू' जपणाऱ्या माणसांची ती वाचविण्यासाठी सतत धडपड चाललेली असते. मुलीने माहेरला पळून येणे जसं आई-बापाच्या दृष्टीने अप्रतिष्ठेचे मानले जाते, त्याचप्रमाणे सुनेचा छळ करुन तिला आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त करणे किंवा तिने आत्महत्त्या करणे यामुळे अप्रतिष्ठा होते, अब्रू जाते असे लोक समजतात. नवऱ्याच्या मारझोडीला कंटाळलेल्या आंजूचा संयम संपतो आणि ती वाड्यातल्या आडात जीव देण्याचा प्रयत्न करते. ती त्यातून वाचते, सर्व भाऊबंद तेथे जमा होतात. तेव्हा स्वतः तोंड बडवत सासूबाई म्हणते, ''आता कसं तोंड दावाव गावाला आमी ? (पृ. ८) सासूबाईने असे का म्हटले ? तर सुनेचे असे वागणे तिला अप्रतिष्ठेचे वाटते. परिवर्तन काळामध्ये स्त्रियांची संस्कृती बदलत गेली. पूर्वीच्या स्त्रिया अधिक सोशीक होत्या. नवऱ्याने बायकोला मारण्याला तिची मुकसम्मतीच

असे. परंतु नंतर ही सोशीक वृत्ती नष्ट होऊ लागली. एक वयस्क भडक स्त्री म्हणते, "काही नाही. हे उगं आगाव ढंगडे हेत. नवरे का बायकोला मारीत नसतेत ! आजकालच्या बायकायला धाक ऱ्हायले नाहीत. आमाला मनासारकं वागू द्या - नाहीतर आमी आडात उड्या टाकु-न्हाय तर घासलेट अंगावर वतून घेऊ. आसं याह्यचं कोंगाडमत !" (पृ. ८) घरातील पती-पत्नीचे हेवेदावे-वाद चार भिंतीच्या आत राहत होते. चव्हाट्यावर येऊ दिले जात नव्हते, हेच सुशाताई-मथीच्या संवादातून सूचित केले आहे. पोरसवदा मथीला आंजूची किव येते. आंजू माणूस आहे असे ती म्हणते, तेव्हा सुशाताई तिच्यावर भडकते, घरातले बघायला सांगते, तेव्हा मथी म्हणते,

"मप्ल्या घरी शाऽन हाये का नाही ते आमची आम्हालाच माहीत. पन तुप्ल्या आंगनातलं शाऽन सगळं जगजाहीर झालय." (पृ. ८) घराघरामध्ये वाद आहेत, परंतु ते 'जगजाहीर' होत नाहीत. आंजूने आडात उडी टाकल्यामुळे ते जगजाहीर झाले तेव्हा तिचे वडीलदेखील तिला म्हणतात, "नवऱ्यानं मारलं मुन काय मेलीं नस्तीस" (पृ. १०) तसेच आप्पाना मामंजी मुलीचा 'पर्ताप' सागतात, "गावात आमाला भाईर तोंड दाखवायतची सोय ठुली नाही पोरीन तुमच्या !" यावर आप्पा म्हणतात, "आमची पोर्गी असली मुन काय झालं ? आम्हाला बी हे बर हेका ?" (पृ. ११) समाजामध्ये अप्रतिष्ठा होणे दोघांनाही नको असते.

स्त्रीची परतंत्र स्थिती, तिची बंधनग्रस्तावस्था, बाप ज्या दावणीला बांधीन ती तिची जन्माची दावण, त्यातून तिची सुटका नाही. आपण स्वतंत्र नाही याची तिलाही खंत नाही, ती विद्रोह करीत नाही, उलट प्राप्त परिस्थितीला सामोरे जाण्याचा विचार करते. आप्पा मामंजीची समजूत घालताना "ती तुमच्या दावनीला बांधली" असे म्हणतात, तसेच आंजूचे स्वगत पहा, "आन् पुन्हा नवऱ्याला सोडून माहेरात ऱ्हानं आपल्या मायबापाला बरं वाटन का ? आन माहेरचे लोक बी काय मन्तेन ? तोंड दाखवायला जागा ऱ्हानार नाही आपल्याला. टाकून घेल्याली मुन कुचकुच सुरु व्हईन जिकडं-तिकडं बायकाईत. मंग त्येच्यापेक्शा इथंच ऱ्हायल्यालं काय वाईट ? जीव गेला तरी बेहत्तर ! फलान्याची बायकू मुन नाव तरी व्हईन." (पृ. ८८) अशी विद्रोह न करणारी आंजू आहे. किंवा आंजूच्या आईने तिला केलेल्या मार्गदर्शनातूनही हाच सूर दिसतो. ती आंजूनला हेकटपणा, उतावीळपणा सोडायला सांगते. नवऱ्याने मारले तरी राग धरायचे नाही. नवऱ्याशी नेहमी "लवतीनं - गोडगुलाबीनं" वागण्याचा सल्ला आई देते. स्त्री सोशीकच असली पाहिजे. अन्यायदेखील तिने सहन केला पाहिजे असे स्त्रियांनेच मान्य केलेले दिसते. खेड्यात मुलीच्या सम्मतीशिवाय लग्न ठरविली जातात. आईबापाने दिल्याघरात तिने असेल त्या परिस्थितीत राह्यचे असा सामाजिक संकेतच आहे. त्यामुळे मुलगा कसा दिसत असेल, त्याचा स्वभाव कसा

असेल, रंगरुप कसे असेल याची जिज्ञासा मुलीला लागून राहत होती. असाच अनुभव आंजूला येतो. ती म्हणते, "...... आपून त्येह्यला लग्नाच्या आधी बिलकूल पाह्यलं नव्हतं. आप्पा बाईला सांगायचे, "पोर्ग बरं हे ! मॅट्रीकपस्तोर शिकल्यालं हे! रंगानं जरा सावळंच हे. पन हाडापेरानं आपल्या इलाससारखंच येईन ! (पृ. ४६) आईबापाने दिलेल्या घरात आयुष्यभर संसार करायचा, कुरबुर करायची नाही असाच सामाजिक संकेत वरील स्वगतातून व्यक्त होतो.

हुंडा घेणे आणि देणे सामजिकदृष्ट्या प्रतिष्ठेचे झाले. त्यावरुन माणसांची पत ठरु लागली. प्रतिकूल परिस्थितीमध्ये आप्पा सातहजार रुपये, रेडीओ आणि अंगठी देण्याचे कबूल करुन आंजूचे लग्न ठरवितात, परंतु दिडहजार रुपये रेडिओ, आंगठी देऊ शकत नाही. त्यामुळे पैसे वसुलीसाठी तिचा छळ होतो. तिला वारंवार माहेरी पाठविले जाते. मध्यरात्री आंजूला मारझोड करून घराबाहेर काढले जाते, तेव्हा सासुबाई मुलावर रागावतात आणि म्हणतात, "कावून आसं करायलास रे ? निम्म्या रातचं बायकुला भाईर काढायलास ! शेजारी पाजारी काय मन्तेन त्येह्यला कळालं तर!" त्यावर आंजूचा नवरा म्हणतो,

"आतापस्तोर काय बाकी ठुलंय शेजाऱ्यापाजाऱ्यानी मनायचं ? इंच्यापायी आब चाललीय सगळी आपल्या घराची !" (पृ. ४२)

दोघांनाही समाजात अप्रतिष्ठा झाल्याचे दुःख आहे. त्याचप्रमाणे आप्पांना देखील वाटते. ते मुलांना म्हणतात, "गावातले लोक काय मन्तेन हे बगून ? सगळे कुचकुचत आस्तेन पैशामुळे पोरीला नांदता येत नाही !" (पृ. ३३)

रिकाम्या हातानं सासरला जाणे सासुरवासनीला अप्रतिष्ठेचे वाटते. आंजूचा कोंडमारा तिच्या स्वगतातून पहा "आपल्याला पेच पडला. कसं जाचं आसं रिकाम्या हातानी ? निदान काही झेंपर तरी. सासूबाई ऱ्हायल्या बाजूला, पन शजारनी-पाजारनी काय मन्त्यान ? थुकत्याल. कसे आस्तेल इच्या माहेरचे मुन ! (पृ. ३५)

माणुसकी, प्रेमळपणा, वेळगरज पाहण्याची वृत्ती नष्ट होऊन स्वार्थी-हिशोबवृत्ती हुंड्यामुळे समाजात वाढली. स्त्रियांवर अत्याचार होऊ लागले. हुंडा मानपानाचा प्रतिष्ठेचा विषय झाला. तसेच दिवाळी किंवा घरातील लग्नप्रसंगी जावयाला आहेर देण्याची पद्धती आहे. आहेर न देणे जावई अपमानकारक समजतो. जावई रुसतो. पत्नीचा छळ करतो. आंजूच्या बाबतीत हेच घडले. नवऱ्याला हवा तसा आहेर न मिळाल्यामुळे सासुरवाडीतून आंजूला न घेता निघून जातो. स्वतःच्या आईशी वाद घालतो. कारण त्यालाही गावातले समाजातले लोक हसतात, टोमणे मारतात असे तो सांगतो. एकूणच काय तर दुसऱ्याच्या घरात आग लावण्याची प्रवृत्ती समाजामध्ये बळावत चालली. कुचाळक्या करणाऱ्यांची संख्या वाढली असे समाजवास्तवाचे आहे. आंजूचा नवरा म्हणतो, "गावात भाईर मला तोंड दाखवायला जागा ठुली नाही

इच्या बापानं ! जगात बी लगनं व्हत आस्तेन, पन आसा सासरा नसंन कुठं ! हुंड्यातले पैसे ठुनारा. गावातले लोक माघारी हासतेत. दोस्त टोमणे देतेत. काही खरं नाही तुव्हं ! जावई मनून काही तरी पोज पाह्यजी मान्साला. मप्ल्यासारखा आस्ता तर रिकाम्या हातानं आलाच नस्ता !'' (पृ. ३०-३१) आहेर प्रतिष्ठेचा विषय झाला. तसेच दुसऱ्याचे भले होत असेल तर समाजाला पाहवत नाही, आंजूची मैत्रीण सरीचे हळदीच्या दिवशी लग्न मोडते, कारण गावातल्या कुटाळक्या लोकांनी कांडी केली. काडीखोर मानसाने नवरदेवाला सांगितले की, नवरीच्या डोळ्यात टिक आहे. कपाळाचा मळवट धुऊन नवरदेव पसार झाला.

वेळगरज पाहण्याची प्रवृत्ती नष्ट झाली. सोय जाणतो तो सोयरा. परंतु दुष्काळामध्ये आंजूच्या घरची जनावर पिप्रीला पाठविली तेव्हा 'घरचं झालं थोडं, व्याह्यानं धाडलं घोड'तशी आप्पाची गत झाली. कारण दुध देणारी गाय सांभाळण्यावरुन मुलांनी भांडण सुरु केले. परंतु बाकी जनावर सांभाळायला नकार देऊ लागले. चारापाण्याशिवाय जनावरे तडफडू लागली. दुष्काळामध्ये जनावरे पाहुण्यांकडे पाठवायची आणि त्यांनी ती सांभाळायची असा सामाजिक संकेतच होता, गणगोताला मदत करण्याची वृत्ती होती, ती नष्ट झाली. गाय पांगळी झाली. वासरु होत नाही, दुध देत नाही अशा परिस्थितीत चारापाण्यावाचून तिचे हाल झाले. कावळे तिच्या खांद्याचे लचके तोडतात. यावरुन जनावरांच्या बाबतीतही निर्दयपणा वाढला. स्वार्थी-हिशोबी वृत्ती वाढली.

परिवर्तन काळामध्ये तरुणांमध्ये व्यसनाधीनता वाढली. मानपान प्रतिष्ठेच्या कल्पनेमुळे रुसून बाहेरच्या स्त्रियांशी संबंध ठेवले जाऊ लागले. आंजूचा नवरा (विठ्ठल) भिक्या मांगाच्या मंडीशी शरीरसंबंध ठेवतो, तिला साडी-झंपर देतो. या काळामध्ये काही सुधारणा झाल्या, विहिरीवर विद्युत पंप बसले. आधुनिक पद्धतीने शेती केली जाऊ लागली. त्याबरोबर अनीती वाढली. सुधारलेल्या लोकांनी आपली मुले शहरातील कॉलेजला पाठविले. तेच तरुण खेड्यातील तरुणींचे शील भ्रष्ट करू लागले. आश्रुबाचा कॉलेजात शिकणारा तरुण मुलगा सुदाम सुदीला फसवितो. शीलभ्रष्ट करतो. खानदानीवृत्ती नष्ट होऊन उतावीळपणा वाढला. मात्र खंबीर लोकांनी कोर्टकचेऱ्याची पायरी चढण्यास सुरवात केली. अन्याय-अत्याचाराविरोधी आवाज उठविण्यास प्रारंभ झाला, कारण वच्छीच्या नवऱ्याची अर्धी जमीन पोटगीदाखल कोर्टाने तिला दिली. स्त्रियांसाठी कायदे झाले. स्त्रियांना हक्काची जाणीव होऊ लागली. तरीही स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार कमी झाल्याचे दिसत नाही. 'गणगोत' ही हुंडाबळी या विषयावरील समाजवास्तवाचे जिवंत चित्रण करणारी कादंबरी आहे.

परिवर्तन काळामध्ये भाऊबंदकीचे प्रस्थ वाढले. एकमेकांच्याबद्दल वाईट विचार करु लागले. स्वार्थी-हिशोबी द्रव्यलोभी वृत्तीने मूळ धरले. हुंड्याची अनिष्ट प्रथा सुरु

झाली. गणगोत-सोयराधायरा हे नातेसंबंध नष्ट झाले. सामान्यांच्या मुलीचे लग्न होणे महाकठीण झाले. मानवी आपत्तीप्रमाणे निसर्गाची आपत्ती आली. पाऊस नाही. दुष्काळामागे दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे उत्पन्न घटले. आर्थिक समस्या निर्माण होऊ लागल्या. त्यामुळे नशिबावर हवाला ठेवण्याची वृत्ती वाढली. उदा. आंजूसाठी अनेक स्थळं पाहून देखील लग्न जमत नाही. हुंडा देणे आप्पांना झेपत नाही. घरात संघर्ष होतो. आपल्या परिस्थितीप्रमाणे स्थळ शोधावे असे भावांना वाटू लागले. आई आंजूला भग्रा कपाळाची, फुटक्या नशिबाची असे म्हणू लागली. आप्पांनी रान ठोक्यानं लावले आणि आंजूचे लग्न केले याचा विलासला राग आला. गरिबाघरी दिले असते तर बरे झाले असते, "खुरपनं-ढुरपनं-रोजंदारी करुन सुखानं, आनंदानं संवसार केला आस्ता....." (पृ. १७) असे तिला वाटू लागते. हुंड्याची पूर्ण रक्कम आप्पा देऊ न शकल्यानेच तिच्या संसाराची घडी विस्कटली.

बिकट आर्थिक परिस्थिती आणि दुष्काळाला कंटाळून लोकांनी सोसायटीचे कर्ज काढले. उत्पन्न घटल्यामुळे कर्जाची परतफेड करणे अशक्य झाले. घरावर जप्ती येण्याची - अप्रतिष्ठा होण्याची वेळ आली. आंजूच्या सासऱ्याला या समस्येला तोंड द्यावे लागले. सोसायटी भरण्यासाठी सेक्रेटरीने बोलविले. त्याने दोनहजार भरायला सांगितले, अन्यथा जप्ती होईल असेही सांगितले. अप्रतिष्ठा होण्याची वेळ आली. म्हणून व्याज भरुन सोसायटी नवीजुनी करायला हवी म्हणून ते धडपडू लागले. आप्पांनी कापसावर पैसे देण्याचे कबूल केले. त्यांच्याकडून पैसे आणण्यासाठी तिला माहेरी पाठविले जाते. भाऊ वेगळे निघालेले - आप्पांच्या हातात सत्ता नाही. दोघही आपल्यापुर्तेच बघायचे. एकदीड क्विंटल कापूस निघालेला, त्याला सतरा वाटा, पैसे कसे द्यायचे ही त्यांची समस्या आहे. दादांचे धोतर फाटले ते घ्यायलासुद्धा पैसे नाहीत, अशा परिस्थितीत तिला जुनी साडी देऊन पैसे न देताच सासरला पाठविले जाते. यावरुन शेतकरी आर्थिकदृष्ट्या कंगाल होत गेला. दुष्काळामुळे दिवसेंदिवस उत्पन्न घटत चालले. उपासमारीची वेळ सर्वांवर आली. दुसऱ्याकडे पदर पसरला तर त्यांचीही परिस्थिती तशीच त्यामुळे उदासीनता येत गेली. अशाच प्रकारच्या दारिद्र्याचे कारण आंजूच्या स्वगतातूनही दिसते -

"मागून मागून घरात भलतीच तंगाई आली. रानात माल व्हत नव्हता. पाऊसच टेम्बावर पडत नव्हता तर व्हईन कुठून ? घरखर्चा वाढल्याला. कोरडवाहू सुगी फसायची. मंग वरीसभर चंदी पुरायची नाही. मधीच उडून जाची. खान्यापिन्याची पंच्याईत व्हाची. आप्पाच्या जिवाला घोर लागायचा. कुठून तरी आप्पा जेवारी उसनी न्हाय तर दिढी-दुपटीनं आनायचे." (पृ. ५३)

मामाकडून दोन चुंगडे बाजरी मिळाली. अन्ना माळकऱ्याकडून सुगीवर दुपटीनं

देण्याच्या बोलीवर पाच पोते ज्वारी आणली. मामाकडून बाजरीच मिळाली.

निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकरी हवालदील होऊ लागले. ते काळजी करु लागले. असेच आंजूच्या वरील स्वगताधारे म्हणता येईल. पेरणीच्या दिवसात 'बी' खरेदी करणे अशक्य होते. त्यामुळे किडकं बी पेरण्याची वेळ भावांवर येते. किंवा किडकेच बी आंजूकडे पाठविले जाते. तिचा संसार सुरळीत व्हावा असे भावांनादेखील वाटते. परंतु काळच बदलला, त्यापुढे त्यांचा नाईलाज होतो. तुरी विकण्यास भाऊ तयार होत नाहीत. तो म्हणतो, "अडीच तीन हजार रुपये एका दमात उभे करायचे मंजी तोंडची गोष्ट नाही. इथं मीठ मिर्च्याला कारुन-कोरुन पैसा जमवावा लागतू. पुन्हा आम्हाला वायदे भरायचे आस्तेत. सोसायटीच्या थकबाकीचे भोकाडं बुजोव लागतेत. तुचमा एक काळ येगळा व्हेता. आता नुस्ता नाव ऱ्हायलय घराचं. बाकी सगळा पोकळ वासा ! दोन बाचके तुरी झाल्या तर त्याला सत्रा वाटा आस्त्यात." (पृ. ८६) परिवर्तनकाळामध्ये ग्रामीण आर्थिक जनजीवनामध्ये असंख्य समस्या निर्माण झाल्या. सोसायटीच्या कर्जाचे हप्ते भरणे अवघड झाले. गतजीवनातील परिस्थिती पालटून "बडा घर पोकळ वसा" अशी परिस्थिती निर्माण झाली. ग्रामीण भाग आर्थिकदृष्ट्या पोखरला गेला. जसे बहिणीचा हुंडा देण्यासाठी तीन चुंगडे तुरी विकण्यास लहानभाऊ विलास तयार होत नाही. तो म्हणतो, "इनमीन तीन चुंगडे तुरी झाल्यात मला. त्याच्याच पैशानं सोसायटीचा हप्ता भरायचाय - कपड्यावाल्याची उधारी द्याचीय." (पृ. ८४) ग्रामीण जनतेची आर्थिदृष्ट्या कुचंबणा झाली.

आर्थिकदृष्ट्या पोखरला गेलेल्या समाजाच्या अंतःकरणात खोलवर काही रुढी-परंपरा-समजुती-सणउत्सव व्रत व लोककथांचा पगडा आहे, तो मात्र नष्ट झालेला नाही. पाव्हण्याला पाण्याचा तांब्या भरुन देणे, बसायला टाकणे, लेकजावयाला दिवाळीच्या सणासाठी निमंत्रित करुन मानपानाने ब्राम्हणांच्या शुभहस्ते आहेर देणे. भावबंधनाच्या घरात लग्न असताना आहेर देणे. पतीने पत्नीला नावाने हाक न मारणे, मीठ-मीरच्या ओवाळून चुलीत टाकून दृष्ट काढणे. भावबीजेला बहिणीने भावाला ओवाळणे, मुलगी सासरी जाताना सवाष्णीने तिची ओटी भरणे. हळदकुंकू लावणे, मुलीने देवाचे आणि घरातल्याचे दर्शन घेणे, तसेच सून सासरला आल्यावर तिच्यावरुन चतकोर भाकर ओवाळणे. तिने आणलेली 'शिदुरी' शेजारी वाटणे. माहेरहून सासुसाठी चोळीचा खण आणणे. पतीपरमेश्वर मानणे, मानपान जगजाहीररीत्या करणे. त्याचप्रमाणे त्यांच्या काही समजूती आहेत. उदा. "वांझ बायांनी दुसऱ्याच्या लेक्राला पाजलं की, त्येह्यला लेक्रं व्हतेत मनं." (पृ. ९२) किंवा मूलं होणे परमेश्वराची लीला आहे असे मानणे. पायाळू माणसांवर वीज पडते. सुनेला लक्ष्मी मानली जाते. तिच्या पायगूणाने घराजी भरभराट होते. टिटवीचे ओरडणे अशुभ असते. विवाहविधी-प्रसंगी मारुतीचे आणि प्रौढांचे दर्शन घेण्याची तसेच नवरा-नवरीला गडंगनीर खाऊ घालण्याची

पद्धती आहे. कार्तिक महिन्यातमध्ये सडासारवन करुन रांगोळी घालून व्रत करण्याची, सायंकाळी तुळशीजवळ दिवा लावण्याची परंपरा आहे. पतीचे नाव घेताना स्त्रिया उखाने घालतात. उदा. ''झुल झुंबराचं - फुल उंबराच - कळी चाफ्याची - लेक बापाची - सून सासऱ्याची - वैनी देडर नणंदाची. उखाण्याचं नाव घेते मी राणी इठ्ठलरावाची.'' (पृ. २६) पतीबद्दलची आदरभावनाच यातून व्यक्त होते. विविध प्रसंगी ओव्या गीत गाण्याची पद्धत ग्रामीण भागात रूढ आहे. आंजूची आई जात्यावर ओवी म्हणते, त्यातून मुलींवर संस्कार करण्याचा प्रकारही दिसतो.

भर्ताराचा राग जसा इस्त्याचा इंगूळ
बाई नेनंते गं माझे त्याची मरजी सांभाळ.
भर्ताराचा राग दुधावरली उकळी
नेनंते ग बाई माझे नको होऊ उतावीळ. '' (पृ. १५)

नवऱ्याची मर्जी सांभाळण्याची भारतीय स्त्रीची परंपरा लेखक त्यातून वर्णन करतो. तसेच शेतामध्ये मुबलक प्रमाणावर धन-धान्य पीकत होते. त्याचे चित्रण वैनी आणि आंजूच्या ओवीमधून (पृ. १८) लेखक सांगतो. स्त्रियांना माहेरविषयी अधिक आर्कषण असते. आंजूला देखील भुलुबाच्या दिवशीचे गाणे आठवते. भुलूबा चावडीच्या पटांगणात मांडण्याची परंपरा होती.

''काय सांगू बाई ऽ माहेराचे सुख
इसरले व्हते ऽ पर्पंचाचे दु ऽ ख'' (पृ. ९९)
''जवर माय-बाप, तंवर माहेरची गोडी
कोणाचे भाऊ-भाचे दोन्ही आधारत्या मेंडी'' (पृ. ४३) किंवा
दळण गं ऽ दळीते ऽ मी उल्हासानं ऽ
नंदी गेला ऽ ऽ मह्या इलासानं ऽ ......'' (पृ. ८३)

यातून माहेबद्दलचे स्त्रियांचे प्रेम-आकर्षणच चित्रित होते. जुन्या पिढीतील स्त्री-पुरुष धार्मिक होते. त्यांना पोथी पुराणाचा, भजन-कीर्तनाचा नाद हाता. अशा घराविषयी सुनेला 'भुशान' वाटते.

''सासू सासरे महे देवाऱ्याचे देव, पडते मी पाया मनी नाही दुजा भाव.''
.......लग्नाचा जोडा, गळ्यातली गळपेटी, सोडले गणगोत एक जीवासाठी.'' (पृ. ९९)

अशा प्रकारच्या सांस्कृतिक जीवनाचा शैक्षणिक प्रगतीबरोबर ऱ्हास होण्यासही सुरवात झाली. मॅट्रिक शिकलेला विठ्ठल व्यसनाधीन झाला. काही तरुण अनीतीने वागू लागले. जसे, शहरातले रंगढंग पाहिलेला सुदाम सुदीचे शील भ्रष्ट करतो. तिलाही ते हवेच असते. ही नवी समस्या निर्माण झाली. शीलाचे रक्षण करण्याची परंपरा कालबाह्य होऊ लागली. उलट शिक्षणप्रसारामुळे हक्क-कर्तव्याची जाणीवही

झाल्याने कोर्टात खटला दाखल केल्यास स्त्रीला पोटगी मिळते. घटस्फोट घेता येतो याची जाणीव झाली. त्याबरोबर काही तरुण शिक्षणासाठी कमवा शिका योजनेत काम करु लागले. शिक्षणाचे महत्त्व समजले. शिक्षणाने सर्वांगीण विकास होऊ शकतो याची जाणीव झाली. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा उद्देश त्यामागे दिसतो. रीतीरिवाजामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या त्या नाहीशा केल्या पाहिजेत असे तरुणांना वाटू लागले. स्त्रीपुरुष समानतेची जाणीव होऊ लागली.

समाजवास्तवाची कलात्मकतेने चित्रण करणारी ही कादंबरी आहे. तिच्या यशाचे श्रेय तिच्या निवेदन पद्धतीकडे आणि लेखकाच्या कलात्मक सच्चेपणाकडे जाते. एका सासुरवासणीने अगदी प्रांजळपणे व पोटतिडकीने निवेदन केल्याने कथानुभवाला सहजता प्राप्त झाली आहे. सासरमाहेरच्या सुखदुःखाचे अनुभव आणि स्वतःची मनोव्यथा स्वाभाविकपणे आत्मनिवेदन पध्दतीने सांगितली आहे. "गणगोत : एक दृष्टिक्षेप" टाकताना डॉ. एस. एम. कानडजे म्हणतात, "आत्मनिवेदनात्मक पद्धतीचा स्वीकार केल्यामुळे तिच्या जीवननाट्याचा केंद्रबिंदू लेखकाला तिच्या सहजसुंदर निवेदनातून सजीव करता आला. ह्या दृष्टीने पाहता आवट्यांची ही 'आंजू' 'पाचोळा'कार बोराड्यांच्या 'पारबत्ती'शी नाते जोडणारी वाटते." ३७. हा अभिप्राय समर्पक आहे. कारण 'पाचोळा'च्या निवेदन आणि संवादाप्रमाणेच याही कादंबरीचे निवेदन आणि संवाद बोलीभाषेतील असून ते एकजीव झाले आहेत. निवेदनातील प्रतिमादेखील स्वाभाविक आहे. ओव्यागीतांतून स्त्रीसुलभ बोलीचा प्रत्यय येतो. अल्पाक्षरात व्यक्तिचित्रण करण्याचे आणि आंजूच्या मनातील ताण-तणाव प्रत्ययकारकपणे अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य गणेश आवट्यांच्या लेखणीत आहे.

अपरिचित, नावीन्यपूर्ण शब्दांच्या वापराने प्रादेशिकतेचे रंग अधिक गडद झालेले दिसतात. उदा. खळूळ, इस्कटला, भेव, ठावं, कावून, खाल्लाकून, आस्त्यात, आपल्याइसीच, राकीसनीवानी, डोक्स, खंदलाच्या, जमल्याली, उघल्डे, ठून, फोल्डा, तुटलं, कोगोंडमत, दापलं, कलूल्हेव, वसरल्या, वसनस, आस्तेन, पर्तापं, बंडाळी, ठॉ. मनली, आपुरसेच, पोऱ्हायला, इनविल, म्हामूर, देवडांगर, भुशान, नाटी, परेशान, फुटू, सावित्यात, कोल्ड्यास, पव्हाडा, ठल्ला, जाबीद, नादर, वपतू, त्येह्यला, पेकबंद, भगुन, उसरमा, आळतुफान, मोकाटपणा, कलुल्हेव, गिर्मिट, वकट्या, हाखादपना इ. तसेच एक विशिष्ट लकबही प्रदेशविशिष्ट आहे. उदा. करायलास, काढायलास, बगयलो, दुखायलं अशी अल्पाक्षरही दिसते. म्हणी-वाक्प्रचारातून समाजवास्तवाचे स्वरुप स्पष्ट दिसते. "माशाला पान्याशी वाईट करता येत नसतं !" (पृ. १२) "व्हयना काही आन बडविली गुरवीन बाई" (पृ. १०४), ".....बाकी सगळा पोकळ वसा" (पृ. ८३).

गणेश आवटे यांची भाषा जिवंत प्रवाही आहे. डॉ. एस. एम. कानडजे म्हणतात,

''एकूण 'गणगोत' ही हुंड्याच्या ज्वलंत व तापदायक समस्येवर आधारलेली करुण भयंकर व हृदयद्रावक अशी भावकथा आहे. समकालीन सामाजिक वास्तवाचा विशेषतः ग्रामीण वास्तवाचा एक भाग सजीव साकार .करण्याचा हा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रयत्न आहे. माहेराकडून होणारी उपेक्षा, सासरी हुंड्यासाठी व मानपानासाठी तथाकथित जनरीतीसाठी होणारा जाळभाज, नवऱ्याकडून होणारी अकारण व अक्षम्य अवहेनला आणि मातृत्वाची उत्कट आस ही आजची नियती आहे. तिच्या वाट्याला आलेले हे अटळ प्राक्तन आहे. ह्या प्राक्तनाचा कलात्मक रूपबंध म्हणजे 'गणगोत', ३८.

प्रा. कानडजे यांचा वरील अभिप्राय समर्पक आहे. परिवर्तन काळातील हुंड्याच्या समस्यमुळे होणारे मानसिक आणि आर्थिक शोषणाचे जिवंत चित्रणाचे लेखकाने केले आहे. ती एक यशस्वी प्रादेशिक कादंबरी आहे असे म्हणावे लागेल. 'पाचोळा'ची उंची गाठता आली नसली तरी एक वैशिष्टययपूर्ण प्रयोग आहे.

### ५) वासुदेव मुलाटे - *'विषवृक्षाच्या मुळ्या'*

'विषवृक्षाच्या मुळ्या' ही वासुदेव मुलाटे यांची १९८९ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी आहे. सहकाराला ''स्वाहाकाराचे'' रूप प्राप्त झाले. सहकाराचे क्षेत्र भ्रष्टाचाराचे बीजक्षेत्र झाले, या विषयावरील ही कादंबरी आहे. संवेदनशील मानसाचा सहकार क्षेत्रात कोंडमारा होतो हे विश्वनाथ तरटयांच्या जीवनानुभवातून सांगितले आहे. लेखकाच्या स्वानुभवाची ही कथा आहे. प्राथमिक शाळेत मास्तरची नोकरी करणारा विश्वनाथ परभणी जिल्हा सहकारी बँकेत नोकरी करु लागतो. कार्यतत्परतेमुळे 'सेलू' सारख्या खेडेगावात त्याची बदली होते. माधुरी जोगळेकर प्रकरणामुळे चेअरमनच्या आदेशानुसार त्याची तडकाफडकी कळमनुरीला बदली होते. प्रमोशन मिळते. आई आणि भावाच्या इच्छेखातर विवाह होतो. पत्नीला शिक्षण देता यावे म्हणून तो सहकारी बॅन्केचा राजीनामा देऊन जालन्याच्या भू-विकास बँकेत नोकरी करु लागतो. दरम्यानच्या काळात सहकार खात्याकडून मुलाखतीसाठी बोलविले जाते. जालन्यातील नोकरी सोडून बीड जिल्ह्यातील सहकार खात्यात तो रुजू होतो. नगर-बीड रस्त्यावरील खेडर्याला प्रशासक म्हणून त्याची नेमणूक होते. सहकारात तो सचोटीने काम करतो. संसाराचा विस्तार होतो. बदलीसाठी प्रयत्न करुनही त्याला यश येत नाही. तेव्हा सहकार मंत्र्याकडे विनंती अर्ज पाठवितो. प्रत्येक ठिकाणी त्याला भ्रष्ट प्रशासनाचेच अनुभव येतात. वसुली अधिकारी म्हणून काम पाहताना तर खूपच उदासीनता येते. मनाविरुद्धच्या क्षेत्रात आपण काम करतो अशी खंत त्याला वाटू लागते. दरम्यानच्या काळात त्याने एम. ए. मराठी उत्तीर्ण केलेले असते. अशी स्वतः लेखकाची आत्मकहाणी आहे.

विश्वनात तरटे हा या कादंबरीचा नायक आहे. येथील खलनायक कोण असा

प्रश्न पडतो. खलनायक समाजपरिस्थिती सहकारातील अधिकारी की राजकीय पुढारी हे निश्चित सांगता येणार नाही. सहकाराचे क्षेत्र आतून पार पोखरले गेले याची जाणीव मात्र असंख्य गौण व्यक्तिरेखांच्या चित्रणातून लेखकाने संयमाने वर्णन केले आहे. विश्वनाथ तरटे हा मास्तरकीची नोकरी सोडून सहकारी बॅन्क-भूविकास बँक किंवा त्यानंतर सहकार खात्यामध्ये रुजू झालेला लाजाळू, संकोची, संवेदनशील, स्वाभिमानी, विवेकी, ज्ञानलालसा असलेला तरुण आहे. 'हातात हात घेण्याचे सहकारी ब्रीदवाक्य त्याला मानवत नाही. भ्रष्टाचाराल विरोध न करु शकणारा, तत्त्वपालन करणारा, कर्तव्यदक्ष असूनही त्याची प्रत्येक ठिकाणी उपेक्षाच होते. त्याच्यावर अन्याय होतो. सहकारात त्याचा कोंडमारा होतो म्हणून मन रमविण्यासाठी तो शिक्षण घेत जातो. संसारात रमण्याचा प्रयत्न करतो. स्मिता ही त्याची पत्नी आहे. प्रेमळ, मनमिळाऊ, त्याच्या सुखदुःखाच्या प्रसंगी साथ देणारी, थोडीशी सोशीक, विवाहानंतर चिकाटीने मॅट्रिकपर्यंत शिक्षण पूर्ण करणारी, मुलींना सांभाळणारी कष्टाळू. विश्वनाथची आई ही देखील सोशीक, प्रेमळ आणि थोडीशी कर्मठ अशी रेखाटली आहे. बीजवर पुरुषाबरोबर बालवयात लग्न झालेली, दीर्घकाळ वैधव्याला सामोरी जाणारी, परंतु विश्वनाथची हितचिंतक आहे. दोन निरागस कन्या हा विश्वनाथचा परिवार आहे. मन रमविण्याचे ठिकाण म्हणजे पुस्तक, कन्या आणि संसार.

माधुरी जोगळेकर ही सेलूतील वास्तव्यात आयुष्यात आलेली आणि बरीच खळखळ उडवून देणारी सुंदर तरुणी आहे. तिचं बोलणं, बघणं, हसणं सर्वच कोड्यात टाकणारं असल्यामुळे नकळत विश्वनाथचे मन तिच्यात गुंतत जाते. छोट्या गावात 'विश्वनाथ-माधुरी' प्रकरणावर चर्चा होते. तिच्यामुळेच विश्वनाथची तडकाफडकी बदली होते. सुधीर जोगळेकर, आबा कदम, भोसले बँक इन्स्पेक्टर, पाखे, कुलकर्णी, धामणे, देशपांडे, कवठेकर, आंबेकर, मनसुखलाल जैन, गायकवाड, धर्माधिकारी, नाईक, चाफके, राजे, विरप्पा, के. एस. पाटील, काकडे, लोखंडे, खेडकर, कासम, निसार, अहमदभाई, बोर्डे, लोखंडे या सारखे विविध ठिकाणचे सहकारी, अधिकारी, शिपाई तसेच म्हस्के-हॉटेलवाला, भाऊसाहेब थोरात चेअरमन, पोलीस, सहकारी बँक, भू-विकास बँक आणि सहकार खात्यातील अधिकारी, पदाधिकारी, चेअरमन, व्हा. चेअरमन, लिंगाप्पा सारखे सावकार, भागूजी देवकाते, पिराजी बाबा देवचके, गवळगावची म्हातारी, मनुरवाडीचा आसाबाई यांच्यासारखे थकबाकीदार आणि अन्य व्यक्तिरेखांचे चित्रण करुन लेखकाने बदलत्या समाजवास्तवाचे जिवंत चित्र रेखाटले आहे. येथे कोणी सुष्ट नाही - दुष्ट नाही. प्रत्येकजण परिस्थितीनुरुप स्वार्थावर डोळा ठेवून आहे. गरिबांच्या शोषणांत कुणालाही लाज-शरम वाटत नाही.

कादंबरीतील प्रदेश आणि निसर्ग कादंबरीच्या आशयाशी एकजीव होऊन अवतरला आहे. बीड-परभणी या मराठवाड्यातील जिल्हातील खेडेगावांची पार्श्वभूमी कादंबरीला

लाभली आहे. नोकरीच्या निमित्ताने विश्वनाथ तरटयांची या प्रदेशात सातत्याने भ्रमंती चालू होती. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील परतूर, टाकळी, मानवत, सेलू, कलमनुरी, किंवा बीड जिल्ह्यातील माजलगाव, खानापूर, खेर्डा, गेवराई, पांढरवाडी आणि अन्य खेड्यांचा उल्लेख येतो. सपाट-उजाड माळरान, दाहक जीवघेणारा उन्हाळा, ज्वारी, मिरची, कांदे, लसूण इ. पिके डोंगरदऱ्या, छोटीछोटी पत्र्याची, धाब्याची घरं, मातीच्या कच्च्या विटांच्या, दगडधोंडे नुसतेच रचून उभ्या केलेल्या भिंती. पानझड झालेली अस्थिपंजर माणसागत झाडं.'' (पृ.९८) इ. वर्णन प्रदेशानुरुप आहे. निसर्गचित्र आशयाशी एकजीव झाले आहे. विश्वनाथ तरटयांची मानसिकता त्यातून पकडलेली दिसते. त्यांच्या मनातील काहूर पुढील निसर्गदृश्याने लेखकाने वर्णन केले आहे.

''.......पावसाळ्यातील दिवस. बाहेर ढगांचा गडगडाच होत होता. विजा चमकत होत्या. हळुहळू पाऊस कोसळायला लागला होता.......

सकाळी आभाळ चांगलंच निवळलं होतं. फिक्कट उनही पडलं होतं....''(पृ. ७)

मास्तरची नोकरी सोडून जर आपण बँकेत नोकरीला लागलो, आपल्या ओळखीचे, नात्यातले कोणी संचालक मंडळात नाही. काम जमले नाही, काही भानगड झाली तर कसे होईल असे त्याचे विचारचक्र संपले, फिक्कट ऊन पडले यातून त्याचा आत्मविश्वास वर्णन केलेला दिसतो.

''उन्हाळा, दुपारचं उन्ह अजूनही चमकत होतं. तापलेल्या उन्हाच्या झळा खिडकीतून आत येत होत्या.'' (प. ५६) सहकार खात्यात प्रशासक म्हणून नेमणूक झाली, तरी समस्या होत्याच. त्यामुळे अस्वस्थ मनःस्थिती आणि उन्हाळा यांचे एकजीव निसर्गचित्र लेखकाने रेखाटले आहे.

इकडे आठ दिवसांपासून नुसतंच आभाळ भरुन येतंय. आज नक्कीच पाऊस येईल असं वाटतं. पण पावसाचा एक थेंबही नाही. नुसतंच मनहूस, उदास वातावरण.........

अजून पाऊस येत नाही. कोरडे वांझ ढग. आकाशात नुसतेच दाटून राहिलेले.....'' (पृ. ११५)

वरील निसर्गदृश्यातून संवेदनशील विश्वनाथची अस्वस्थता चित्रित होते. तर पुढील निसर्ग वर्णनातून त्यांच्या आशावाद दिसतो. आंदवृत्ती चित्रित होते,

''बाहेर पाऊस जोरजोराने कोसळतोय. उघड्या खिडकीतून गार वाऱ्याबरोबर पावसाचं पाणी आत येतंय.......'' (पृ. ११९)

मराठी विषय घेऊन एम. ए. केल्यानंतर सहकार क्षेत्र सोडून आपल्या आवडत्या साहित्य-कला क्षेत्रात नोकरी करण्याची लेखकाची महत्त्वकांक्षाच वरील निसर्गवर्णनातून नजरेसमोर येते. विश्वनाथऐवजी संवेदनशील वृत्तीचा आशावादी लेखक दिसू लागतो.

" या कादंबरीतील घटनांचा कालावधी इ. स. १९५६ ते १९७५ असा कल्पिलेला आहे. अर्थात यातील सर्व व्यक्तिरेखा आणि प्रसंग काल्पनिक असून त्यांचे कुणाही व्यक्तीशी साधर्म्य आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा. असे स्वतः लेखकाने कादंबरीच्या प्रारंभीच म्हटले आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट होते की समाजवास्तवाचे काल्पनिक चित्रण करणारी ही कादंबरी आहे. १९६५ ते १९७५ या दहा वर्षांच्या काळामध्ये समाजजीवनात परिवर्तन झाले. समाजाच्या विकासासाठी विद्वानांनी 'सहकारा'चा सामान्य मानसाच्या आणि लोकशाहीच्या विकासाचा मंत्र दिला. काही काळ विकास होत असल्याची लक्षणे दिसली. परंतु अल्पकाळातच त्यामध्ये विघातक शक्तींनी डोके वर काढले. भ्रष्टाचार, वशीलेबाजी, मतदानावर डोळा ठेवण्याचे प्रकार वाढीला लागले. संधीसाधू राजकारणी, पुढारी, प्रशासकीय यंत्रणा आणि ऐतखाऊ लोकांनी हे क्षेत्र भ्रष्ट केले. सामान्यांचे कळतनकळत शोषण होऊ लागले. या "विषवृक्षाच्या मुळ्या" तोडणे-छाटणे अशक्य झाले. प्रत्येकजण त्या मुळ्यांमध्ये कळतनकळत गुरफटला गेला. असे बाह्यजगात परिवर्तन होत असताना मानवी मन आणि त्याची संस्कृती यामध्ये बदल झाला नाही. जातिभेद, स्पृश्यास्पृश्य विचार, श्रेष्ठकनिष्ठ भाव नाहीसा होऊ शकला नाही. शिकलेल्या नवविचाराच्या मुलामुलींनी एकमेकासोबत हिंडणे-फिरणे-बोलणे-बसणे लगट करणे समाजाला पाहवत नाही. आंतरजातीय विवाहाची कल्पना अद्याप खेड्यात रुजलेली नाही. त्यामुळे असे तरुण-तरुणी समाजाच्या पुढाऱ्यांच्या रोषात निमित्त होतात. जसे 'सेलू' सारख्या खेड्यामध्ये जोगळेकरांच्या माधुरीने विश्वनाथशी संबंध ठेवणे ग्रामस्थांना मानवत नाही. चेअरमनपर्यंत तक्रारी जातात. माधुरीचे वडील चेअरमनला भेटतात. तो ब्राह्मण आहे किंवा काय याविषयी चौकशी केली जाते. तो मराठा असल्याचे समजताच त्याची तडकाफडकी कळमनुरीला बदली केली जाते. विश्वनाथच्या आईलादेखील माधुरीची लक्षणे चांगली वाटत नव्हती. बदली झाल्याने त्याला अन्याय होतो आहे याची जाणीव होते. तर आईला आनंद होतो. याचे कारण समाजामधील जातिभेद अद्याप समूळ नष्ट झालेला नाही असे दिसते.

खेड्यातील मुलामुलींचे अल्पवयात लग्न केली जातात. त्यांच्या भावभावनांचा विचार होत नाही. त्यामागे 'अब्रू' प्रतिष्ठा ही कारणे आहेत. कारण मुलाने किंवा मुलीने अन्यत्र प्रेमसंबंध वाढविले तर बदनामी होईल. समाजात अप्रतिष्ठा होईल अशी भीती वाटते. 'माधुरी' प्रकरणामुळे विश्वनाथची आई त्याच्या लग्नाच्या तयारीला लागते. परस्पर मुलगी पाहते. दोघांच्या भावनांचा वयाचा विचार केला जात नाही. मुलगी पाहण्याचे स्वातंत्र्य त्याला दिले जाते, तेव्हा, "ती लहान आहे. शाळेत जाते" असे तो म्हणतो. त्यावर आई म्हणते,

"आपल्यात आसंच आस्तंय, ल्हान न्हायी न कायी न्हायी. दिसायला, रंगाला

पोरगी नादर हाये, आनिक कसी लाग्ती रं बायकू तुला ?" भाऊ म्हणाला, "आता आणखीन आमचा जीव टांगणी लावू नकोस. तू एकटाच असतोच. इकडे आम्हाला उगीच काळजी वाटते. आता नोकरी लागली सगळं झालं. उशीर पाहीजे कशाला ? पुन्हा अशी माणसं भेटतील कशावरुन ?" (पृ. ४०-४१) लग्न म्हणजे काय ? हे कळण्यापूर्वीच स्मिताचे लग्न होते. अल्पवयातच दोन मुली होतात. संसाराची जबाबदारी पेलण्याची वेळ तिच्यावर येते.

समाजात या काळामध्ये ऐतखाऊ वृत्ती वाढली. कष्ट करण्याची प्रवृत्ती नष्ट झाली. सरकारी कर्ज घेण्याची प्रवृत्ती बळावली. परंतु या कर्जाचा सदुपयोग विकासकामांसाठी न करता अन्य कामांसाठी केल्याने समाज विकासाला खीळ बसल्याचे स्पष्ट दिसते. लेखकाने कर्जाचा सद्उपयोग करणाऱ्या सावंतचा अनुभव (पृ. ५१) सांगितला आहे. त्याने सहकारी कर्ज घेऊन विहीर खोदली. विद्युत पंप बसविल्याने शेतात नगदी पीक घेणे शक्य झाले. उत्पन्न वाढले. कर्ज वेळेत फिटले. आर्थिक परिस्थिती सुधारली. वेळच्या वेळी सर्व गोष्टी केल्यास सहकाराने प्रगतीच होते. लेखक आशावादी असल्यामुळे लिहितो, "तसं व्यर्थ चाललेलं नाही. आज ना उद्या लोक हुशार होतील. परिस्थिती बदलेल......" (पृ. ५१) अहमदनगर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात सहकारामुळेच प्रगती झाल्याचे लेखक वर्णन करतो. कै. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटलांनी सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. दुष्काळी अहमदनगर जिल्ह्याचा कायापालट झाला. कोल्हापूरच्या शेतकी संघाने शेतकऱ्यांचा विकास साधला. "कर्जाचा योग्य विनियोग करणारा शेतकरी असेल तर कर्मचाऱ्यांनी लुबाडण्याचा प्रश्नच येत नाही." (पृ. ५२) शेतकऱ्यांच्या शोषणास शेतकरी स्वतःच जबाबदार आहे, असे समाजवास्तव परिस्थितीचे जिवंत चित्र लेखकाने रेखाटले आहे.

एखादा अधिकाही नियमबाह्य काम करीत नाही, नियमांवर बोट ठेवतो, अशावेळी लोक स्वार्थासाठी त्याच्याविरोधात वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार अर्ज करतात. त्याची बदली झाल्यानंतर नियमबाह्य काम करणारा भ्रष्ट अधिकारी आला तर आपली काम झटपट होतील अशीच लोकांची अपेक्षा असते. खेड्याला दीडवर्षात विश्वनाथ कंटाळतो. बदलीचा विचार करतो. कारण लोकांनी त्याच्या विरोधात तक्रार अर्ज केलेला असतो. "प्रशासक इथं राहत नाहीत ते दुसरीकडे राहतात. म्हणून बऱ्याचदा कामाचा खोळंबा होतो. त्यांनी इथं घर करायला पाहिजे." (पृ. ८२) सचोटीने काम करणाऱ्या भावनाप्रधान प्रशासनाविरुद्ध याप्रमाणे अर्ज केला जातो. विविध स्वभावाच्या माणसांची संबंध येतो. 'गर्दीत घुसल्यावर धक्काबुक्की होणारच' हा विचार संवेदनशीन विश्वनाथला मात्र पटत नाही. बदलीसाठी जिल्हा पातळीवरील कार्यालयातील क्लार्क-वरिष्ठ अधिकारी यांची मर्जी सांभाळून देखील काम होत नाही. परस्पर सहकार मंत्र्याकडे तक्रार अर्ज पाठविल्यास मात्र काम होऊ शकते. 'लाच घेणे आणि देणं' गुन्हा

असूनदेखील काम होण्यासाठी या मार्गांनी जावे लागते. अधिकारी हाताखालच्या कर्मचाऱ्याशी उद्धट वर्तन करतात. त्यांच्या लहरी सांभाळल्याशिवाय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसमोर पर्याय नसतो. खाजगी काम या कर्मचाऱ्यांना करावे लागते. सहकारी सोसायटीच्या सेक्रेटरीची संघटना होऊ शकत नाही. वेतनश्रेणी, सेवानियम, पेन्शन, ग्रॅच्युऐटी, प्रोव्हिडंट फंड इ. प्रश्न संघटनेअभावी सुटत नाहीत. नोकरीत स्थैर्य नाही. पगार अपुरा, तो वेळेवर होत नाही. महागाईच्या काळात अल्पशा पगारावर संसार करणे अशक्य झाल्याने भ्रष्टाचार करण्यास हे लोक प्रवृत्त होतात. संघटनेचे काम करण्याचा एखाद्याने प्रयत्न केला तर कुठल्यातरी व्यवहारात त्याला अडकविलें जाते. पोलीस केस करून नाउमेद केले जाते. संघटना करण्यापेक्षा भ्रष्टाचार करून सुरळीत संसार केला तर कुठे बिघडते ? असा विचार सेक्रेटरी करतात असे समकालीन वास्तवाचे चित्र लेखकाने रेखाटले आहे.

सहकारी संस्थाचे पदाधिकारी वाममार्गाने संपत्ती मिळवीत असल्याकारणाने त्यांच्याकडे सुबत्ता असते. उदा. सेलूचे सहकारी बँकेचे चेअरमन, जालन्यातील भूविकास बँकेचे चेअरमन तसेच काळेगावच्या सोसायटीचे चेअरमन आणि बँकेचे डायरेक्टर श्री. हुर्जूळे यांच्याकडे कष्ट न करता सुबत्ता आहे. परंतु कष्ट करणाऱ्यांचे 'शोषण' होत असल्यामुळे दयनीय परिस्थिती निर्माण झाली आहे. राजकारणाला धंद्याचे स्वरुप आले. त्याग-सेवा ही मूल्ये कालबाह्य ठरली. स्वार्थीवृत्ती बळवली. कापूस केंद्र, दुध संघातील भ्रष्टाचार हा पुढाऱ्यांच्या वरदहस्तानेच चालतो. सामान्य शेतकऱ्यांचे यातून शोषण होते. यातील एखादे प्रकरणे उघडकीस आले तर सेवक कर्मचाऱ्यांचा बळी दिला जातो. कारण पुढाऱ्यांचे सहकार मंत्र्यापर्यंत हात पोहोचलेले असतात. त्यामुळे ते निर्दोष सुटतात. त्यामुळे 'मढे सोडून खांदेकऱ्याला' सरणावर घालण्याची प्रवृत्ती समाज व्यवस्थेमध्ये वाढलेली दिसते.

"एकमेकां साह्य करू, अवघा धरू सुपंथ" या ब्रीदवाक्याची विटंबना होऊ लागली. 'हातमें हात' अशी पुढाऱ्यांची साखळी तयार झाली. प्रस्तुत कादंबरीवरील डॉ. आनंद यादव यांचा अभिप्राय असाच बोलका आहे. "या कादंबरीत सहकाराचे क्षेत्र आतून कसे पोखरून आणि नासून गेले आहे, आत्मनाशाकडे कशी वाटचाल करीत आहे, या गतिमान वाटचालीला आता कसे थांबणे अशक्यप्राय आहे, याचे प्रत्ययकाही चित्रण पहायला मिळते." ३९. डॉ. यादवांचा वरील अभिप्राय संपूर्ण सहकार क्षेत्राचे मूल्यमापन करणारा आहे. सहकारी संस्थांमधील नोकरभरती ही शैक्षणिक पात्रता, अनुभव, सहकाराचा डिप्लोमा पाहून होत नाही, तर वशिलेबाजी, चिठ्ठ्या-चपाट्या सगेसोयरेसंबंध, ओळखीपाळखी, मतदान या मार्गांनी होतात. वर्तमानपत्रात नोकरभरतीच्या जाहिराती दिल्या जातात. मुलाखतीचा फार्स केला जातो. परंतु यापूर्वीच

उमेदवारांची निवड केली जाते. अपवादात्मक परिस्थितीत बाहेरील उमेदवार घेतला जातो. परतु सेवेत टिकू दिला जाईल याची खात्री देता येत नाही. एकमेकांचे हितसंबंध जपण्यासाठी ते कुणालाही केव्हाही बळी देतील.'' (पृ. ३) असे श्री. भोसले इन्स्पेक्टर विश्वनाथला सांगतो. यावरुन वरील विवेचनाचा अर्थ लक्षात येईल. बीड जिल्हातील माजलगाव तालुक्यातील खानापूर सारख्या खेड्यातील विश्वनाथला सहकारी बॅन्केत नोकरी-प्रमोशन मिळते. तेथेच त्याची मानसिक कुचंबणा होते. त्याला नोकरी सोडावी लागते. भू-विकास बँक, सहकार खात्यातही असाच अनुभव त्याला येतो. सहकारी बँका-सोसायट्यांमधील भ्रष्टाचारामुळे सहकार खात्यातील अधिकारी प्रशासक म्हणून पाठविले जातात, त्यांनाही या संस्थेच्या विकासात फारसा रस नसतो. ते कामकाजाकडे दुर्लक्ष करतात. संस्थांचे पदाधिकारी, चेअरमन, व्हाईस चेअरमन, गेस्ट हाऊसवर मुक्काम करतात. दैनंदिन कारभारात ढवळाढवळ करतात. सर्वांच्या नेमणुका वशिला-भ्रष्टाचाराने झालेल्या असल्यामुळे सेवकवर्ग देखील काम करण्यापेक्षा या पुढाऱ्यांची हुजरेगिरी करतात. आपली नोकरी टिकविण्याचा हा एक मार्गच सेवकांनी शोधून काढला आहे. काम न करता फुकट पगार घेण्याची प्रवृत्ती वाढील लागली. पैशाचे गैरव्यवहार केले जाऊ लागले. तसेच सोसायट्या बँकाकडून रोख स्वरूपात कर्ज न देता, शेतकऱ्याला उपयुक्त अशा वस्तू दिल्या जाऊ लागल्या. या वस्तूंच्या विक्री करण्याचे उद्योग पुढाऱ्यांनी सुरु केले. स्वतःच्या दुकानातील मालाची खरेदी केली तर कर्जप्रकरण त्वरीत मंजूर केले जाऊ लागले. तसेच वस्तू नको असतील तर बँकेतील सुपरवायझर्सच्या सल्ल्याने विशिष्ट कमिशन घेऊन खोटी बीले देखील सादर करून कर्जाच्या रकमा उचलण्याची पळवाट शोधली गेली. कर्जाच्या रकमेचा अन्य कारणांसाठी वापर केल्याने, विकासासाठी घेतलेले कर्ज विकासाअभावी भरले गेले नाही. थकबाकीदारांची संख्या वाढली. अशा प्रकारचे गैरव्यवहार भू-विकास बँकेचे चेअरमन दौलतराव खारकर करीत असत, असे प्रातिनिधिक चित्रण लेखकाने केले आहे. (पृ. ४५-४६) सहकारी संस्थामध्ये नोकरीसाठी प्राधान्य दिले गेले ते मराठा समाजाला. कारण या संस्था प्रामुख्याने मराठा समाजाच्या हातात आहेत. साहजिकच ब्राह्मणवर्ग आणि मागासवर्गीय यामुळे नाराज होऊ लागले. नोकऱ्या फक्त ब्राह्मणांनी कराव्यात, मराठ्यांचे ते काम नाही असा समज नष्ट झाला. चतुर्थश्रेणी कर्मचारी - शिपाई, ड्रायव्हर, खानसामा इ. जागांवर मागासवर्गीय किंवा मुस्लिमांच्या नेमणूका झाल्या. पुढील संवादावरुन वरील विवेचनाची स्पष्ट कल्पना येईल - ''हाय ! घोडके, लेका तूही आलास का ? बिनडोक, बँकेत काम करणं तुझं काम नाही. अकल का काम है बेटा यहां.......''

''जा बे बामण्या, अक्कल काय फक्त तुम्हालाच देवानं दिलीय ?.......इतके

दिवस हेच केलं ना तुमच्या लोकांनी, हा माझा, हा तुझा म्हणत खाल्ली ना सगळी बँक लुटून ?........ झाला होता का कधी बँकेत इंटरव्ह्यू नोकरभरतीसाठी या आधी?''........(पृ. ९)

सेवकांच्या दृष्टीने संस्थेच्या मुख्य कचेरीत काम करणे सोयीचे असते. त्याची अनेक कारणं आहेत. हे कार्यालय जिल्ह्याच्या ठिकाणी असते. प्रमोशनच्या दृष्टीने माणूस वरीष्ठ अधिकाऱ्यांसमोर असतो. शिवाय पुढाऱ्यांशीदेखील संपर्क ठेवता येतो. ते वरचेवर मुख्य कचेरीमध्ये काम घेऊन येतात. त्यांच्या ओळखीचा फायदा पुढे-मागे झाल्याशिवाय राहत नाही. सहकारामध्ये नोकरी देताना, बदली करताना किंवा काढून टाकतांना राजकीय पुढारी सर्व नियम धाब्यावर बसवितात. जसे प्रशासकीय कारण न देता, जॉइनिंग टाईम न देता माधुरी प्रकरणामुळे चेअरमनसाहेबांच्या सूचनेनुसार विश्वनाथची तडकाफडकी कळमनुरीला बदली होते. बर्वेसाहेब देखील 'कारणे दाखवा' नोटीस देण्याची धमकी देतात. सेवकांनी विनातक्रार, अपमान सहन करून आणि खाली मान घालून नोकरी करायची. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याच्या भानगडीमध्ये पडायचे नाही. असे हे जीवन पोखरुन निघाले आहे. भावना-संवेदना यांना येथे अर्थ नाही.

भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणेला स्वार्थासाठी शेतकरी-पुढाऱ्यांनी अधिक भ्रष्ट केले. कमी वेतन, अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळणे, दौऱ्यावर आलेल्या अधिकाऱ्यांच्या खाण्यापिण्याचा-प्रवासाचा बंदोबस्त ठेवणे, हे गावपातळीवरील सेक्रेटरींना करावे लागते. भ्रष्टाचार करण्यापलीकडे त्यांच्यासमोर अन्य मार्ग नसतो. शेतकरीही फायद्यासाठी या लोकांना पैसे देतात. सहकारामध्ये नोकरी करायची तर प्रामाणिक राहून चालत नाही. परिस्थितीनुरुप बदलले पाहिजे असे विश्वनाथचा मित्र लोखंडे सल्ला देतो. ''माणसानं कसं पाण्यासारखं असावं. 'पानी तेरा रंग कैसा ? जिसमें मिलाया वैसा.'' अरे आपण एकटं असून चालत नाही. सगळेच जर चोर जसा झाले असतील तर आपण काय करणार ? ......आधी ज्यांच्यासाठी शासन योजना राबवतेय त्यांनी तरी सावध वागायला नको ? स्वतःशी प्रामाणिक राहायला नको ? पण ते असं करीत नाहीत. तात्कालिक फायद्यासाठी त्यांना ते नको असतं.'' (पृ. ४९) निवडून आलेले शेतकऱ्यांचे प्रतिनिधीही आपल्याच शेतकऱ्यांचे शोषण करतात

हे थांबावण्याचं सामर्थ्य कुणाजवळही नाही. कारण निवडणुकांसाठी खर्च केला जातो, तो वसूल करायचा, पुढची निवडणूक लढवायची, राज्य-देश पातळीवर राजकारण करायचा विचार पैशांशिवाय आणि सहकारातील सत्तेशिवाय अशक्य असल्याने हे शेतकऱ्यांचे प्रतिनिधिच भ्रष्टाचार करतात. अधिकाऱ्यांना भ्रष्टाचारास प्रोत्साहन देतात. प्रामाणिकपणा सहकारात स्वतःपुरता ठीक असतो. परंतु दुसऱ्याला विरोध करुन चालत नाही. भ्रष्टाचाराला विरोध करणाराच संपून जातो. बदनाम होतो.

तत्वज्ञानाला सहकारात अजिबात किंमत नाही. सहकारी संस्थामधून नात्यातील माणसांसाठी नवीन अधिकाराच्या जागा निर्माण केल्या जातात. त्यांच्याकडून मनमानी कारभार करुन घेणे पुढाऱ्यांना शक्य होते. लेखक वर्णन करतो, "फेब्रुवारीच्या मध्यात अचानक मॅनेजर घोरपड्यांची बदली झाली. त्याच्या जागेवर ॲपेक्स बँकेने दुसरा माणूस पाठवला नाही, म्हणून एक्झिक्युटिव्ह ऑफिसर काळे यांनाच प्रमोशन देण्यात आले. ते चेअरमन खारकरांचे भाचे. ते बँकेत येण्याआधी इ. ओ. ची पोष्टच नव्हती. पण त्यांच्यासाठी मुद्दाम काढण्यात आली होती. आता त्यांना एकदम मॅनेजर करण्यात आले......." (पृ. ५३)

खेड्यातील लोकही हुशार होऊ लागले. सत्ताधाऱ्यांच्या मागे सत्ता असेपर्यंतच लोक फिरतात. त्यांना विचारतात. सत्ता जाताच लोक त्यांना विचारत नाही. सत्ताधाऱ्यांमागे राह्यचे, कर्ज मिळवायचे, फायदा करुन घ्यायचा अशी लोकांची वृत्ती दिसते. तत्व-पक्षनिष्ठा स्वार्थापोटी कालबाह्य ठरली. उदा. खेडर्याच्या सोसायटीचे भाऊसाहेब थोरात चेअरमन असताना सर्व लोक त्यांच्याबरोबर होते. परंतु सत्ता जाताच सर्व दूर गेले. प्रशासकाची नेमणूक झाल्यावर गावकरी आणि सहकार खात्यातील अधिकारी श्री. थोरांतबद्दल तक्रारी करू लागले. सरकार खात्यातील अधिकारी किंवा सहकार मंत्री सुद्धा त्याचा पाहुणचार घेतल्याशिवाय गेले नाही असे ते विश्वनाथ तरटे यांना सांगतात. (पृ. ७३)

जिल्हा सहकारी बँन्केच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने कार्यकर्त्यांचे मेळावे घेतले जातात. सार्वत्रिक निवडणूकांचा प्रचार केला जातो. यासाठी खर्च बँकेने करण्याचा संकेतच आहे. विरोधी पक्षाचे लोक यांच्या विरोधात आवाज उठवितात. वर्तमानपत्रातून सर्व छापून येते. परंतु प्रोसिडींगवर कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचा विषयच नसतो. एवढी हुशारी सत्ताधारी कायकर्ते करतात. सहकार खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बदनामी होते. सहकारी संस्थांच्या शिडीवरुनच राजकारणात पुढारी वर चढतात. तालुक्यातील सेवा सहकारी संस्था, जिल्हा बँका, कुक्कुटपालन, दुग्धपालनसंस्था आणि सहकारी साखर कारखाना या सर्व संस्था हातात ठेवण्यासाठी धडपडतात. कारण ग्रामीण जनतेचे आर्थिक प्रश्न या संस्थांशी निगडित असतात. ग्रामीण भागातील अर्थपुरवठ्याची ही केंद्र आहेत. ग्रामीण जनतेची नाडी पुढाऱ्यांच्या हातातून सुटू दिली नाही. सहकारात न्याय, कायदा, नियमाने काम ही करता येत नाही. सहकार मंत्र्यापर्यंत पुढाऱ्याचे हात - हप्ते पोहचलेले असतात. म्हणून पुढाऱ्यांची नियमबाह्य कामं सेवकांना करावी लागतात. "चोर सोडून संन्याशाला फाशी" देण्याची सहकार खात्याची परंपरा आहे. (पृ. ९७)

सत्तास्पर्धामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळे सहकार खात्यामध्ये लबाड्या अधिक वाढल्या. प्रामाणिकपणा नष्ट झाला. शेतकऱ्याच्या अज्ञानाचा फायदा घेतला

जाऊ लागले. विश्वनाथ बीड-नगर गाडीने खेड्याला जात असताना झेड. पी. त काम करणारा सहप्रवासी स्वतःचा अनुभव सांगतो. अंगठेबहाद्दर वडिलांनी सोसायटीचे ५०० पीककर्ज काढले. दुष्काळात उत्पन्नाअभावी रक्कम भरणे जमले नाही. चेअरमनच्या सांगण्यावरुन व्याज भरुन, कर्ज नवंजुनं केले, परंतु नवीन कागदपत्रांवर रु. ५०० ऐवजी ५००० कर्ज वडिलांच्या नावावर टाकण्यात आले. कर्जाची परतफेड न केल्यास जप्तीची धमकी दिली. निरक्षर शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतला जातो. अनेकांच्या वसुलीच्या पावत्या 'फाडल्या' जातात. रकमा वसूल केल्या जातात. परंतु कर्जखात्यावर जसा केल्या जात नाहीत. शेती उपयुक्त अवजारे-खते-बी-बीयाणे, औषधे यामध्ये भ्रष्टाचार करुन चैन केली जाते. चेअरमनचा भ्रष्टाचार उघड झाल्यास रोख रक्कम जमा करणे अशक्य होते. म्हणून ते आत्महत्त्या करतात. (पृ. ५७) असे आर्थिक परिस्थितीचे चित्रण लेखकाने केले आहे.

स्वस्त धान्य दुकानदारांचे शोषण - सहकारी पुरवठा अधिकाऱ्यांकडून होते. कोठा वाढवून देण्यासाठी ते पैसे मागतात. स्वस्तधान्य दुकानवाले मिळालेला कोठा दुकानापर्यंत आणतच नाहीत. परस्पर शहरात व्यापाऱ्यांना विकून मोकळे होतात, पैसे मिळवितात, अशीही शोषणकर्त्यांची साखळीच तयार झालेली दिसते. खेड्याच्या सोसायटीतून साखर मिळविण्यासाठी हॉटेलवाला म्हस्के धडपडतो. काळाबाजार करण्याचा विश्वनाथ तरटेला सल्ला देतो. "त्येची नगा काळजी करु. ते तुमी चंदू मारवाड्यावर सोपवा. कसं की आमच्या गावाला गरिबी लयी बगा.

हितं जेवारी आनायलाच पैसे न्हायीत म्हन्ल्यावर साखर कोन घितो ? भाऊसाहेब काय आन् तुमी काय ? आमाला दोघं बी सारखेच. जे त्यायला, ते तुमाला....." (पृ. ६८) भ्रष्टाचारी एरंडेदेखील असाच सल्ला देतो. ".......सगळीकडे हेच चालतं. आपले सेक्रेटरी काय करतात ? उगीच पार्ट्या देतात ? पोटाला चिमटा घेऊन कुणी कोंबड्या खाऊ घालतं ? अहो नुसती साखरच नाही, गहु, तांदुळ, सणासुदीला तेल, डालडा यांचे सुद्धा ब्लॅक चालतं. हा सहकार आहे. ऊसाच्या मळ्यात राहून ऊस खायचा नाही म्हणजे काय ? अहो तळे राखील तो पाणी पेईल. म्हणच आहे. एवढंचंय, जरा हिशेबानं करायचं, एकदम डोळ्यावरही यायला नको." (पृ. ६९) सहकार खात्यातील अधिकाही दौऱ्यावर असताना स्वस्तधान्य दुकानातील वस्तू मागतात. मोठ्या अधिकाऱ्यांकडे बदली संदर्भात जाताना माल वस्तू न्याव्या लागतात. थोडक्यात सर्वचजण काळाबाजार करतात. सामान्यांपर्यंत जीवनावश्यक वस्तू पोहचतच नाही. वाढती महागाई, प्रतिकूल नैसर्गिक परिस्थिती यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या हतबल झाला. बँका-सोसायट्यांचे कर्ज घेऊ लागला. शेतीतील उत्पन्न घटल्यामुळे किंवा विकास कामासाठी घेतलेले कर्ज अन्य कारणांसाठी वापरल्यामुळे कर्जाची

परतफेड होऊ शकली नाही. थकबाकी वाढली. कर्ज प्रकरणाच्या नव्या-जुन्याच्या भानगडी वाढल्या. बँकेचा वसूल दाखविणे भाग असल्यामुळे अधिकारी प्रयत्न करु लागले. पुढाऱ्यांनी सावकारांकडून कर्ज घेऊन थकबाकी भरण्याची पर्यायी व्यवस्था केली आणि कर्ज प्रकरण नवजुनं करुन स्वार्थ साधला. शेतकऱ्यांचे कर्ज वाढत गेले. परतफेड करण्याची प्रवृत्तीही नष्ट झाली. घरावर जप्ती आली तरीदेखील कर्जफेड करण्याची आर्थिक कुवत नसल्याने 'अब्रू' जाण्याची वेळ आली. या प्रतिकूल परिस्थितीला लोक निर्ढावले. सामोरे जाऊ लागले. गोरगरिबांच्या जप्त्या होऊ लागल्या. चेअरमन-सरपंच-पाटील यांच्याकडील पार्ट्या खाऊन लाचार झालेले कर्जवसूली अधिकारी त्यांच्याकडील थकबाकी वसूल करु शकले नाही. यातून गरिबांचे शोषण होऊ लागले असेच चित्र लेखकाने रेखाटले आहे. पूर्वी सावकार ऋणकोकडे तगादा लाऊन कर्जवसूली करीत होते. तगाद्यामुळे कर्जफेड नियमित होत होती. परंतु बँका-सोसायट्यांकडून अशाप्रकारे तगादे न लागल्यामुळे किंवा पुढाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे कर्जफेडीसाठी सोयीस्कर दुर्लक्ष होऊ लागले. उदा. कवडगावचा यादा भागुजी देवकाते, लिंगप्पा सावकाराचे कर्ज फेडतो. बँकेचे कर्जफेड टाळतो. तेव्हा सोसायटीचा चेअरमन म्हणतो, "..... सावकार आपल्या अगदीच खळ्यावर येऊन बसल्यावर त्येचा जीव अडकित्त्यात सापडल्यावानी झाला आसन नव्हं ? समूर बसलेला ह्यो बाबा खळ्यातला इकडचा दाना तिकड व्हऊ देत न्हायी. लिंगप्पा सावकाराचं म्हाईत न्हायी व्हय ? पैसं फायजी तेवढं देतू. पर खळ्याच्या टायमाला भूत व्हऊनच मागं लागतोय बगा." (पृ. ३२-३३) यानंतर विश्वनाथ आणि सहकारी देवकातेच्या खळ्यावर जातात. कायद्याची भाषा करु लागतात. तेव्हा लिंगप्पा अधिक तगादा करायला सांगतो. कारण देवकाते, लिंगाप्पाचे अधिक कर्ज घेऊन बँकेची थकबाकी भरेल. आपणांस व्याज मिळेल, बँकेच्या फायद्याबरोबर आपलाही फायदा लिंगप्पा विसरत नाही. शेतकरी या दुहेरी कर्जामुळे अधिक कर्जबाजारी झाला. त्याचे शोषण होत गेले.

प्रतिकूल आर्थिक परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे दुष्काळी भागातील लोकांना उदरनिर्वाहासाठी (पृ. ९७-९८) सहकारी साखर कारखाऱ्यावर ऊस-तोडणी मजूर म्हणून जावे लागते. थकबाकी न भरण्याची कारणे देखील प्रतिकूल परिस्थितीच असल्याचे दिसते. पिराजी बाबा देवचके (पृ. ३२-३३) आनंदा देवजी गोल्हार, गळगावचे मुलाने टाकलेले म्हातारा-म्हातारी, मनुरवाडीची आसाबाई या सारख्या गरिबांच्या जप्त्या केल्या जातात. अधिकाऱ्यांना खुश केले जाते. परंतु दुसऱ्याच्या संसारात माती कालविण्याचाच 'वसुली' हा प्रकार आहे असे लेखक सुचवितो. धनिकांच्याकडील कर्जवसुली जप्तीच्या मार्गाने केली जात नाही, तर सौम्य शब्दात थकबाकीची जाणीव करून दिली जाते. तगादा लावत नाही. हे परिवर्तन काळातील

समाजवास्तव आहे. म्हणून डॉ. र. बा. मंचरकर यांचा अभिप्राय अधिक अर्थपूर्ण वाटतो. ते लिहितात, "सहकार क्षेत्रात ग्रामीण भागात रुजत चाललेल्या 'विषवृक्षाच्या मुळ्या' (१९८९) वासुदेव मुलाटे यांनी अभिजात संयमाने उकलून दाखविल्या आहेत." ४०. संवाद-निवेदन-घटना-प्रसंगांची मांडणीमध्ये कुठेही आक्रास्ताळेपणा नाही, अतिशयोक्ती नाही. जे घडले - जसे आहे ते संयमाने मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे ही वस्तुस्थिती आहे.

ग्रामीण भागातील तरुणांना शिक्षणाचे महत्त्व पटले. शासनाच्या धोरणामुळे शिक्षणप्रसार झाला. शिक्षण घेणे, नोकरी करणे ही ब्राह्मणांची मक्तेदारी होती, ती नष्ट झाली. बहुजन समाजातील तरुण नोकऱ्या - व्यवसाय आणि राजकारण करु लागले. तरीही श्रद्धा-समजुती-रुढी-परंपरा समूळ नष्ट होऊ शकले नाही. लग्नविधीवर मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो. मुलीला जन्म देणे स्त्रियांनादेखील आवडत नाही. मुलगा व्हावा असे त्यांना वाटते. शिकलेल्या तरुणांना देखील 'मुलगा झाला तर माणूस लकी' असे पुरुषप्रधान संस्कृतीमुळे वाटते. लोककथांचा खोलवर संस्कार झालेला दिसतो.

परिवर्तनकाळामधील 'सहकार' क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे चित्रण करताना लेखकाने निवेदनासाठी प्रमाणभाषा तर 'संवादा'साठी कधी बोली तर कधी प्रमाणभाषा वापरली आहे. पात्रानुगामी असे नागर-ग्रामीण स्वरुप ठेवले आहे. उदा. व्हाईस चेअरमन गणपतराव पाटील म्हणतात, "येऊ द्या आंबेकरसायबाला. आयला, असलाट मानूस पाहिजे. लयी डिसीप्लीन बिघडलीय आपल्या बँकेची - बँक सुदरायची आसन् तं असाच खमक्या मानस फायजे. आपून हितं समदी वशिल्याची तट्टं भरल्यात. मायला! कामाला तरी लागत्यान. आन् जेला काम करायचं न्हायी ते घरी जातेन." (पृ. ४) सहकारातील सत्तेच्या गुर्मीत बोलणारा निरक्षर पुढारी लेखकाने जिवंत केला आहे. सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व आबाचे वडील करतात. ते साडूला म्हणतात,

"मग तुमी कह्याला हैत निस्तेच डायरेक्टर का फायरेक्टर ? योक पोरग चिटकायचं तं चेरमनला इचारावं लागतं मन्तात ? त्येंची आडर चालती. आन् तुमची चालंना व्हय ? म्या मन्तू तुमची का न्हायी चालत ? आं ऽ तुमचीबी चालली फायजी. नसन जालत तं उपेग काय तुमचा ? द्या न मायला राजीनामा त्या बँकीचा" (पृ. ५)

निरक्षर खेडूताचा स्पष्टोक्तेपणा वरील संवादातून दिसतो, याप्रमाणेच विश्वनाथच्या आईचे संवाद (पृ.१९-२०), पोलीसाचे संवाद (पृ. ३८), पिराजी बाबा देवचके (पृ. ११३), गवळगावच्या म्हातारीचे संवाद (पृ. ११७) मानुरवाडीच्या आसाबाईचे संवाद (पृ. ११८), तसेच रझाकारांच्या सत्तेच्या प्रभारामुळे काही लोक हिंदीमिश्रित मराठी बोलतात. काही इंग्रजी शब्दांचे भ्रष्ट उच्चार करतात. त्या सर्वांतून प्रदेशविशिष्ट

बोलीभाषा लेखकाने समर्थपणे पेलल्याचे जाणवते. घटना प्रसंग जिवंत रेखाटण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे. म्हणी-वाक्प्रचारातून समाजवास्तराचे दर्शन ते घडवितात.

''मग फाशी चोर सोडून संन्याशालाच मिळणार'' (पृ. ९७), 'गर्दीत घुसल्यावर धक्काबुक्की होणारच' (पृ. ८३),'मधू असला की माशा जमतात' (पृ. ७३), 'तळं राखील तो पाणी पेईल' (पृ. ६९), 'जो करील तो भरील' (पृ. ६) 'मांजर दूध डोळे मिटून पीत असलं तरी जग आंधळं नसतं.'' (पृ. २५), 'चलती का नाम गाडी' (पृ. ५२) 'एकमेका साह्य करू, अवघा धरु सुपंथ' (पृ. ६६), '..... जिसमें मिलाया वैसा' (पृ. ६५).

जीव अडकीत्यात सापडणे, जीव भांड्यात पडणे इ. मधून समाजवास्तवाचे दर्शन जसे घडते त्याचप्रमाणे 'खमक्या', हैत, प्रेस्टीज, नवकरी, लग्गा, बघतुयास यीन, पुन्ना, कवातरी, उंद्याबिंद्या, निछीत, तुपल्या, आनीशाच, सुसायटी, गुदस्ता, त्यायनी, इच्यामायला, सैपाक, एसपिरयिन्स, कुस्करुन, जिवून, निमास्तीन या अपरिचित नाविन्यपूर्ण ग्रामीण बोलीतील शब्दांच्या वापरामुळे प्रादेशिकतेचे रंग अधिक गडद झाले आहे.

''ग्रामीण भागाचा कायापालट घडविण्यासाठी सहकार चळवळ सुरु झाली. परंतु प्रत्यक्षात खरोखरच तसे घडत नाही.'' आज हा सहकाराचा वृक्ष अमृतवृक्ष राहिला नसून तो विषवृक्ष बनला आहे आणि त्याच्या मुळ्या उत्तरोत्तर समाजजीवनाला पोखरत आहेत. याचा प्रत्यय ही कादंबरी घडविते. बदलत्या ग्रामीण वास्तवाचे एक वेगळे रूप या कादंबरीने टिपले आहे.'' ४१. असे डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात, त्यांचे हे विधान सार्थ वाटते. सहकारामुळे ग्रामीण भागांचा तोंडावळा बदलत गेला. त्याबरोबर शोषणाचे नवे प्रकार सुरु झाले. त्यांचा उपद्रव सामान्य माणसाला होऊ लागला. त्यांचे चित्रण या कादंबरीत येते. ''सहकारामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तींच्या, विकृतीच्या अनुषंगाने जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीमधून केला आहे. एकंदरीत सहकार क्षेत्र हे या कादंबरीचे चित्रण क्षेत्र आहे. मराठीतील सहकार क्षेत्राचे चित्रण करणारी ही पहिली वहिला आणि कदाचित एकमेव कादंबरी असेल.'' ४२. असा या कादंबरीच्या उचित गौरव डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी केला आहे. बीड -परभणी जिल्ह्यातील तरटेच्या भावजीवनाबरोबर सहकगारात वावरणाऱ्या माणसांचे भावजीवन लेखक प्रकट करतो. त्यामुळे कादंबरी प्रादेशिक ठरते. अन्यथा ती परिवर्तन काळातील भ्रष्टाचाराचे चित्र रेखाटणारी कादंबरी आहे.

## संदर्भ आणि टीपा


१) ठाकूर रवींद्र - 'मराठी ग्रामीण कादंबरी', पृ. ६०
२) नागनाथ कोत्तापल्ले, 'निवडक बी. रघुनाथ' (प्रस्तावना) पृ. ३८
३) चंदनशीव भास्कर, 'पाचोळा आणि दहा समीक्षक' (संपा. नागनाथ कोत्तापल्ले), पृ. ६४
४) जामकर मधू, तत्रैव पृ. ५५
५.) कुलकर्णी अ. वा., तत्रैव, पृ. ४७
६) माधवकृष्ण, तत्रैव, पृ. ६७
७) पवार गो. मा., तत्रैव, पृ. ४६
८) वडस्कर या. वा., तत्रैव, पृ. ८७
९) कोत्तापल्ले नागनाथ, तत्रैव, पृ. ३२
१०) तत्रैव, पृ. ३१
११) भोसले एस. एस., तत्रैव, पृ. ९५
१२) शेळके शांता, तत्रैव, पृ. ५२
१३) मंचरकर र. बा., 'अनुष्टुभ' जाने. फेब्रु. १९९४, पृ. ३५
१४) चौधुले वि. शं., 'ललित', एप्रिल १९८८, पृ. १२५
१५) फडके भालचंद्र, ललित, ऑक्टो. १९७५, पृ. २५ ते ३३
१६) वडेर प्रल्हाद, 'अनुभव आणि आकार', पृ. ३९
१७) जयवंत सुधाकर, 'युगवाणी', मे-जून १९७१, पृ. ४४
१८) तत्रैव
१९) गणोरकर प्रभा, प्रतिष्ठान, फेब्रुवारी १९७३, २१ ते २४
२०) वडेर प्रल्हाद, तत्रैव
२१) जामकर मधू, तत्रैव
२२) कोत्तापल्ले नागनाथ, 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध' पृ. १२
२३) वडेर प्रल्हाद, तत्रैव, पृ. ४१
२४) कोत्तापल्ले नागनाथ, 'पाचोळा आणि दहा समीक्षक', पृ. ३१
२५) शेळके शांता, तत्रैव, पृ. ५३
२६) मनोहर माधव, तत्रैव, पृ. ४०
२७) कुलकर्णी मदन, 'मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरुप', पृ. ६८
२८) प्रभुणे अरुण, 'प्रतिष्ठान', सप्टें. ऑक्टो. १९७६, पृ. ५२
२९) जोग शकुंतला, 'युगवाणी', ऑगस्ट-सप्टेंबर, १९७३, पृ.३१६
३०) डहाके वसंत आबाजी, 'सत्यकथा' मे १९७४, पृ. ५५
३१) तत्रैव, पृ. ५६

३२) फडके भालचंद्र, 'ललित', मे १९७४, पृ. २०
३३) महानोर ना. धों. 'गांधारी', मलपृष्ठावरील अभिप्राय.
३४) जोग शकुंतला, तत्रैव, पृ. ३१७
३५) महानोर ना. धों., तत्रैव
३६) मंचरकर र. बा., तत्रैव, पृ. ३४
३७) कानडजे एस. एम्. - दैनिक तरुण भारत - नागपूर ६/७/१९८६
३८) तत्रैव
३९) यादव आनंद ('विषवृक्षाच्या मुळ्या' डॉ. मुलाटे) मलपृष्ठावरील अभिप्राय.
४०) मंचरकर र. बा., तत्रैव, पृ. ३०
४१) ठाकूर रवींद्र, 'मराठी ग्रामीण कादंबरी', पृ. १३३-१३४
४२) कोत्तापल्ले नागनाथ, 'विषवृक्षाच्या मुळ्या' समीक्षण - पृ.२, (हस्तलिखिते)
४३) जाधव रायभान, 'साधना', १ मे १९८५, पृ. ९३

□□□

## ४. वैदर्भीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप :

### प्रस्तावना

वैदर्भीय जीवनातील प्रादेशिकतेच्या स्वरुपाचा शोध घेण्यासाठी पुढील कादंबऱ्या आधारभूत मानल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्णामायची लेकरं | गो. नी. दांडेकर |
| २. | धन | उद्धव शेळके |
| ३. | हाल्या हाल्या दुधू दे | बाबाराव मुसळे |
| ४. | मेड इन इंडिया | पुरुषोत्तन बोरकर |
| ५. | झेलझपाट | मधुकर वाकोडे |

कादंबरी या साहित्याप्रकाराचा अनुभवपट इतर कोणत्याही प्रकारापेक्षा अधिक व्यापक आणि प्रदीर्घ असू शकतो. या प्रकारातून उमटणारे प्रादेशिक जीवन हे तुलनेने आधिक अंगोपांगानिशी येण्याची शक्यता जास्त असते. या दृष्टीने प्रादेशिक कादंबरीच्या घटकाधारे उपरोल्लेखित कादंबऱ्यांचे चिकित्सक विश्लेषण करून निष्कर्षापर्यंत जाण्याचा प्रयत्न आहे. यासाठी विदर्भाची प्राकृतिक रचना, निसर्ग, औद्योगीकरण आणि शिक्षणाच्या अभावामुळे आलेले मागासलेपण, दारीद्र्य, सरंजामदारांचे वर्चस्व, आदिवासींच्या जीवनशैलीचा शासनाच्या कायद्यांमुळे होणारा ऱ्हास यांचे कादंबरीतून चित्रण झाले आहे. प्रादेशिकता अनुषंगाने आली की अंगभूत आहे याचे शोध घेण्याचा प्रयत्न आहे. परंतु प्रदेश चित्रण हा लेखकांचा लेखनहेतू असेलच असे नाही. कादंबरीकार हा एक ललित लेखक असतो आणि तो आपली कलाकृती निर्माण करीत असताना त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप स्वप्रतिभेच्या सामर्थ्याने तो प्रकट करीत असतो. त्या जीवनानुभवातील सुट्यासुट्या घटना प्रसंगातून आणि माणसांच्या कृतीउक्तीतून प्रदेश वैशिष्ट्यांचा शोध घ्यावा लागतो, त्यानुसार उपरोल्लेखित कादंबऱ्यांच्या आधारे वैदर्भीय जीवनातील प्रादेशिकता आणि समाज वास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे.

### १) गो. नी. दांडेकर : *' पूर्णामायेची लेकरं '*

वैदर्भीय जीवनचित्रण करणारी ही कादंबरी १९५८ मध्ये प्रसिध्द झाली. त्यापूर्वी त्यानी कोकणी आणि मावळ प्रदेशीतीन लोकजीवनाचे दर्शन अनुक्रमे 'पडघावली' आणि 'पवनकाठचा धोंडी', 'माचीवरचा बुधा' या कादंबऱ्यामधून घडविले आहे. पूर्णामाई आणि तिच्या लेकरांची आंतरिक एकात्मता कादंबरीतून प्रकट होते. कादंबरीच्या प्रारंभिकामध्येच लेखकाने म्हटले आहे की, ''वऱ्हाडच्या खेड्यातील मंथर गतीने, ठेचकाळत चालणाऱ्या जीवनाची ही कथा.'' म्हणजेच साध्याभोळ्या माणसांची ऐसपैस गप्पा मारण्याच्या सवयीतून लेखकाने समूहजीवनचित्रण केले आहे. ती केवळ बयिराम ढोमण्याची कर्मकहाणी नाही तर पूर्णा खोऱ्यातील कर्जबाजारी जीवनाची प्रातिनिधिक कथा आहे. कादंबरीचे कथानक काहीसे विस्कळीत आहे.

आई आलोकाबुढी, पत्नी मनकर्ना आणि रूपराव - मोकिंदा मुले अशा बयिराम ढोमण्याचा परिवार आहे. दुल्लभचंद मारवाड्याचे कर्ज आणि घरातल्यांचे तऱ्हेवाईक वागणे यामुळे तो विरक्त होऊ लागतो. ऐपत नसताना नंगेबांबा आले असता त्याला गावजेवण घालावे लागते. कापसाच्या पैशातून सावकाराचे कर्ज फेडण्याचा आणि चांगले बैल आणि गाडी घेण्याचा विचार करत असताना दुल्लेखाँचा नातेवाईक पैशाच्या व्यवहारात त्याला फसवितो. गावात चर्चा नको म्हणून ही गोष्ट तो आईला देखील सांगत नाही. तरीही गावभर चर्चा होते. घरातल्यांना आपली कदर नाही असे त्याला वाटू लागते. आपले मन तो मोकिंदाजवळ मोकळे करतो. परंतु शेतातून परतत असताना त्याला भूत दिसते. ते मोकिंदाला घोसळते. तो आजारी पडतो. म्हातारी संतापते, रागावते तिच्या रागावण्याने गाव जमा होतो. भूतबाधा नष्ट करण्यासाठी सादिलबोवाला जावे किंवा बहिरामबोवाला जावे किंवा त्याला गाणगापूरला न्यावे असे गावकरी पर्याय सुचवितात. चर्चेंती बहिरामबोवाला जाऊन बोकडाची कंदुरी करण्याचा निर्णय सर्वानुमते होतो. दुल्लभचंदाकडून शंभर रुपये उसणे आणून बहिरामबोवाला पांडेबुआ, गोमाजीबुआ आणि कुटुंबीय जातात. रूपराव आणि बयिराम जात नाहीत.

कर्जबाजारी बयिरामला दुल्लभचंदाने आपल्या 'ठोकापिटी' शेतावर कब्जा घेतल्याची स्वप्ने पडतच असतात. रुपराव तालमीत दंग असतो. बयिराम देउळवाड्यास जातो. संन्याशाच्या सोबतीने परतवाड्यास निघून जातो. यात्रेवरुन आलेल्यांना रूपरावचा पाय मोडल्याचे समजते. तसेच दुल्लभचंदाने कोर्टाकडून 'ठोकापिटी'चा कब्जा मिळविल्याचे समजते. बयिराम विरक्त होऊन गाव सोडून गेल्याचे समजताच रुपराव कौटुंबिक जबाबदारी घेतो. वडिलांचा शोध घेऊ लागतो.

दुल्लभचंदाचे वखर 'ठोकापिटी'त येणार असे समजताच अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचा निर्णय रुपराव घेतो. स्वतः शेतावर वखर घेऊन जातो. मारवाडी दोन वखरवाले आणि भैय्ये घेऊन अला असता त्यांना पिटाळून लावतो. गावकऱ्यांना

आनंद होतो. तसेच दुल्लभचंद चांदूरहून पोलीसपार्टी आणणार अशी चर्चाही सुरु होते. परंतु नागोजी मास्तर रूपरावाच्या पाठीशी उभे राहतात. रूपराव सर्वांच्या कौतुकाचा विषय होतो. त्याने मारवाड्याचा खून केला असे आलोकाबुढीला ऐकायला मिळते. ते खोटे असते. उलट मारवाडी ठोकापिटी रूपरावला दान करतो आणि दोनशे रुपये सालाने नोकरीला ठेवण्याचे जाहीर करतो. तर दान मिळालेल्या जमीनीतील धान्याची भाकरी खाण्यास धर्माचारण करणारी आलोकबुढी नकार देते. घर सोडून पार्वतीकडे जाऊन राहते. रूपराव बयिरामला परतवाड्याहून परत घेऊन येतो. वर्गणीकरून गावकरी रूपरावच्या गौरवप्रित्यर्थ सत्यनारायण पूजा करतात. आलोकबुढी घरी परतण्यास नकार देते. परंतु मोकिंदाच्या धमकीमुळे निर्णय बदलविते आणि घरी परत येते.

कादंबरीतील सर्वमाणसं साधीभोळी आहेत त्यांची संख्याही अधिक आहे. प्रधान पात्रांबरोबर असंख्य गौणपात्राधारे लेखकाने समूहचित्र रेखाटले. वऱ्हाडी माणसांचा स्वभाव मुळातच सुस्त, शांत, श्रध्दाशील आहे. कुठल्याही गोष्टीची घाई नसलेले, पान खात गप्पा मारीत बसणारे, आळशी, फायद्यातोट्या विचार न करणारे असे वऱ्हाडातील लोक गोनीदांच्या स्पर्शाने जिवंत झाले आहेत ; प्रादेशिक जीवन सामूहिक जीवन असते, त्यामुळे प्रादेशिकतेत सामूहिकतेला प्राधान्य असते. कादंबरीत हे भान लेखकाने ठेवले आहे.

बयिराम ढोमणे हा गावच्या दृष्टीने साधुबोवा आहे. तो धार्मिक, श्रद्धाळू, दुबळ्या मनाचा, सरळमार्गी आणि विरक्तीकडे झुकलेला रेखाटला आहे. समाजात अप्रतिष्ठा होण्याच्या भीतीपोटी तो गाव सोडतो. घरातल्यांना आपली कदर नाही ही त्याची व्यथा तो मोकिंदाजवळ बोलून दाखवितो. भरल्या कुटुंबात त्याला एकाकी वाटते. तरीही ठोकापिटीतून चांगले पीक काढण्याचे स्वप्न पाहणारा तो आशावादी आणि स्वप्नाळू आहे. ऐपत व इच्छा नसताना तो गावजेवण घालतो. मोकिंदासाठी शंभर रुपये कर्ज काढून बहिराबोवाची यात्रा करुन आईची मर्जी सांभाळतो. गाव सोडतो. मुलगा शोधायला आला असता तोंड लपवितो असा पापभिरु आहे.

आलोकबुढी ही पंच्याहत्तरीची जहांबाज, हेकट, तर्कटी, बडबडी, तऱ्हेवाईक, स्पष्टोक्ती, आंधळी आणि लंगडी म्हातारी आहे. मुळात ती कर्तबगार आहे. शिवराळ तितकीच धर्माचारण करणारी, अंधश्रद्धाळू आहे. काळीआई आणि वाडवडिलांबद्दल ती रास्त अभिमान बाळगणारी असल्यामुळे शेताचे नाव बदलण्यास ती विरोध करते. आईचे नाव बदल असा बयिरामला टोला मारते. कापसाच्या पैशाचा हिशोब विचारते. बयिरामने गावजेवण घातले म्हणून सुखावते. तर रात्रीच्या वेळी मोकिंदाला शेतावर घेऊन गेला म्हणूंन संतापते. सावकारी धर्माप्रमाणे 'ठोकापिटी' मारवाड्याने घेणे तिला स्वाभाविकच वाटते. परंतु रूपरावने शक्तीप्रदर्शन करून शेत परत मिळविणे तिला आवडत नाही. म्हणून ती घर सोडते. सुनेशी खूप भांडावे असे वाटत असले तरी

मोकिंदा आणि रुपराव यांच्यावर तिचे प्रेमही असते.

मनकर्ना ही आळशी, झोपाळू अशी आहे. तिचे चित्र काहीसे भडक वाटत असले तरी कऱ्हाडी स्त्रीची प्रतिनिधी आहे. नऊ वर्षाचा मोकिंदा निष्पाप, निरागस, खेळकर, बापासारखा सामान्य आणि समजूतदार आहे. शाळा बुडविणारा, फुलपाखरे धरणारा, वानरांमागे धावणारा, माकोडे मारणारा नादी आहे. आईसाठी तो भांडतो. बापाबरोबर शेतावर जाताना साहस दाखवितो. बयिराम घर सोडून गेल्यावर रूपरावबरोबर घराची जबाबदारी घेण्यास सिद्ध होतो. रूपराव हा अठरा वर्षाचा आईसारखा रुपवान आणि आजीसारखा बाणेदार आहे. फटकाळ, निर्भीड, स्वाभिमानी आणि अन्यायाविरुध्द आवाज उठविणारा आहे. बदलत्या पिढीचा तो प्रतिनिधी शोभतो.

दुल्लभचंद हा घाबरट आणि कावेबाज आहे. तो भोळ्याभाबड्या वऱ्हाडी माणसांचे शोषण करणाऱ्या सावकारांचा प्रतिनिधी आहे. पांडेबुवा धूर्त, बेरकी, चतुर आहे. तीन बायका मेल्या तरी गाणगापूरला जाऊन अनुष्ठान करून चौथे लग्न करण्याचे स्वप्न पाहतो. शनिमहात्म्य वाचणारा 'वासरात लंगडी गाय शहाणी' असा आहे. गावकरी त्याला मानतात. नंगेमहाराजांनी पाय हलविताच, त्यांना बक्याच्या ओट्यावर ठेवण्यास सांगणारा, मांडीवर चापट मारताच भजनी जमा करणारा, 'भाकर' म्हणताच बयिरामला गावजेवण घालायला लावणारा, बयिरामची ठोकापिटी मारवाड्याला मिळावी म्हणून अंधश्रद्धाळू आलोकाबुढिला धर्मवाट दाखविणारा, गावजेवणाच्या वेळी गहू पळविणारा, रूपरावच्या वर्तनावर आक्षेप घेणारा आणि सार्वजनिक सत्यानारायणाला उभा राहणारा असा कावेबाज, रंग बदलणारा कारस्थानी आहे. बैलाची पारख असलेला गुलाबराव, गोष्टीवेल्हाळ, बेरकी फकिरा ठाकरे, मुंबईला जाऊन आलेला गोमाजीबुआ हे विदर्भातील खेड्यापाड्यातून भेटणाऱ्या चांडाळ-चौकडीचे प्रतिनिधी असले तरी सामान्यच आहेत.

गरीब दुल्लेखाँ, दुसऱ्याच्या चंचीतील सुपारी खाणारा, लबाड रंगनाथ, गोष्टीवेल्हाळ नथूसा, राधाकिसन पाटील, महिपत वाकोडे, पंजाब तिडके, शिंगनाजी आलमोडे, अमरता, अलबत्या सोकारी, मारोतराव लोहार, नागोजी चंदरभागी, येसोदी, गंगी आणि समस्त ग्रामस्थ मौजे बेलोरे तसेच नंगेबाबा, साधुबुआ आणि त्यांचे शिष्य याचे चित्रण करुन विविध जीवनांगाचे दर्शन घडविले आहे.

विदर्भाच्या अचलपूर व दर्यापूर या तालुक्यांचा प्रदेश येथे चित्रित केला आहे. निसर्गप्रदेशाचे संस्कार लोकजीवनावर झाले आहेत. येथे वऱ्हाडी जीवन वास्तव आणि प्रत्ययकारी उतरले आहे. मोठ्या महादेवाची ठेंगणी, ठुसकी, डोंगररांग, लहानुली पूर्णामाय, बावनगाय, वऱ्हाडी माणसांची तिच्यावरील श्रध्दा, नदीकाठची काळी सपाट जमीन तिच्यातून कमीकष्टात पिकणारी भुईमुग, तुर, ज्वारी, कापूस, गहू, हरभरा, इ. पीके, ती फस्त करणारी वानरे, डोंगर, टरबुजांच्या वाड्या, बाभळी, महारुख, निंब, सिंधी, गोंधनी, हिंवर, धावडा, आंबे इ. वृक्ष, इत्यादीचे लेखकाने

केलेले प्रदेशविशिष्ट चित्रण वैशिष्ट्यपूर्ण आहे. कादंबरीच्या पहिल्या प्रकरणात वऱ्हाडी ग्रामजीवनाचे एक प्रातिनिधिक शब्दचित्र रेखाटले आहे. परंतु हे प्रदेश-निसर्गवर्णन कादंबरीच्या पार्श्वभागीच राहते. लोकजीवनावर त्याचा प्रभाव किती हा प्रश्न अनुत्तरीत राहातो.

''पांढऱ्या मातीचे घरे अन् भिंती अधिकच पांढऱ्या झाल्या होत्या. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभे असलेले निंब 'हळूहळू ढाळत होते. घरांच्या समोर बांधलेल्या बकऱ्या पाय मुडपून बसल्या होत्या.....'' ( पृ. ७५ ) अशी वैदर्भीय घरांची रचना प्रदेशविशिष्ट आणि त्यांच्या दारिद्र्याचे दर्शन घडविणारी आहे. देशमुख किंवा पाटलाचे वाडे, बाकी खपरेली घरे, काही पत्र्यांनी झाकलेली. काही पराठ्यातुराट्यांनी. काही पडत पडत चालेली. काही तुनुमुनु जीव धरून काळाचे चेपटे सोशीत असलेली.'' (पृ. ५) वऱ्हाडी माणसांच्या दारिद्र्याचे दर्शन या घरांच्या रचनेतून घडते.

ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणाऱ्या निसर्गाचे वर्णनही कादंबरीच्या पार्श्वभागी राहिलेले दिसते. तो निसर्ग मानवी जीवनाशी एकजीव होऊन अवतरलेला दिसत नाही. जसे, उन्हाळ्याचे वर्णन लेखकाने केले आहे.

''उन्हाळ्यात हे बावन गाव वऱ्हाड भारी तापते. उन्हाचे वाफारे, लहालहा करीत धावतात चहू बाजूनां सगळे शूष्का उन्हाच्या झळ्या डोळ्यांनाही झोंबतात. या चित्राकडे त्या दिवसात दुपारी पाहवत नाही. सगळे धगधगत असते. गुरेढोरे कुण्या झाडोऱ्याच्या आडोशाला तोंडे लपवून बसलेली असतात. त्यांनाही उन्हाचा धुपकारा सहन होत नाही. कशी तरी मोठमोठाले सुस्कारे टाकीत काळ काढीत असतात.....

हे सगळे चालते खरे. पण उन्हाच्या धगीमुळे सगळे भाजत असलेले. आळसावलेले. सगळी रग उन्हाने करपलेली.''(पृ.७)

पावसाळ्याचे लेखकाने केलेले वर्णन पहा.

''मग हळूहळू आभाळांत जमतात ढग. मिरगाच्या पहिल्या धारा कोसळतात. तयार करुन ठेवलेल्या जमिनी पाऊस पिऊन फुगतात. खरपूस चविष्ट वास सुटतात. वापसा झाला की, सरत्या अन तिफनीच्या नळकांडातून सरकी अन् जवारी वावरांत खोलवर उतरते. आठ दहा दिवसात काळीचे काळेपण हारपणे. चहूकडे हिरवी मलई जमिनीतून उगवते. हिरवी, पोपटी, मुलायम मलई.....(पृ.८)

कापसाची वेचणी, मुग, उडीद, चवळी तुरीच्या शेंगा खाणे, गहू हरभऱ्याचा हुळा खाणे हे खास हिवाळ्यातील कार्यक्रम लेखक वर्णन करतो.

निसर्ग-प्रदेश वर्णन पार्श्वभागी राहत असले तरी समाजजीवन गोनीदांनी वास्तव रेखाटले आहे. वऱ्हाडी माणसांच्या स्वभावातील मोकळेपणामुळे विविध गावातील व्यक्तिमध्ये जिव्हाळ्याचे संबंध असतात. एखाद्या गावात मुलगी दिली की तो त्या सर्वांचा जावई होतो. ते गाव सोयऱ्याचे होते. कुटुंबापुरते ते संबंध मर्यादित राहत

नाही तर पूर्ण गावच सोयरे होते. याप्रमाणे विविध प्रसंगातून सामुदायिकतेचे दर्शन घडविले आहे. ''येक पायाला का समदे पयाले !' अशा वृत्तीचे लोक विदर्भात आहेत. वेशीकडे काही तरी घडले असे समजून हातातील काम किंवा गप्पा सोडून सर्वजण तिकडे पळतात. नंगेबाबाचे आगमन झाले असे समजताच त्यांच्या दर्शनासाठी गर्दी करतात. देशमुख वतनदारही याला अपवाद नाही. पांडेबुआच्या सूचनेप्रमाणे महाराजांच्या कृतीउक्तीचा अर्थ लावला जातो. पाय हलविताच अवधूत नंगे महाराजांना बक्याच्या ओट्यावर हलविले जाते. मांडीवर हात मारतातच भजनाचा बंदोबस्त केला जातो. भाकर मागताच गावजेवणाचा बेत केला जातो. सर्वजण तयारीला लागतात आणि गावजेवण होते. मोकिंदाला भुताने घोसळले असे समजताच सर्वजण बयिरामच्या घरी जमतात. सादिलबुआ, बहिरामबोआ किंवा गाणगापूरला घेऊन जाण्याचा सल्ला देतात. बयिरामवर सर्वजण रागावतात. शेवटी सर्वानुमते मोकिंदाला बहिरामबोवाच्या यात्रेला जाउन कंदुरी करण्याचा निर्णय घेऊन अमलात आणला जातो. रुपरावचा पाय मोडल्याची घटना विकृत स्वरुपात चर्चिली जाते. किंवा 'ठोकापिटी' शेताचा कब्जा घेण्यासाठी दुल्लमचंद तेथे येण्यापूर्वी गावकरी जमतात. रूपरावने त्याला पळवून लावले असता सर्वांना आनंद होतो. त्यानंतर उलटसुलट अफवा पसरविल्या जातात. रूपरावने दुल्लथचंदाचा खून केला अशी बातमी पसरते. दुल्लथचंद पोलीसकेस करणार असेही बोलले जाते. परंतु शेवटी नागो मास्तराचा पवित्रा लक्षात घेऊन रुपरावचा गौरव करण्यासाठी सामुदायिक सत्यनारायण केला जातो. या सर्वामधून वऱ्हाडी माणसांच्या वास्तव जीवनाचे दर्शन घडते.

समाजामध्ये जातिभेद मूळ धरुन असल्याचेही दिसते. ब्रुकबॉण्ड कंपनीचे विक्रेते फुकट चहा वाटतात. हे विक्रेते कोणत्या जाती-धर्माचे असतील याची शंका ग्रामस्थांना येते. ख्रिस्त-मुस्लिमांच्या हाताचा चहा पिणे अधर्माचे वाटते. समाजात अप्रतिष्ठा होण्याची भीती त्यांना वाटते. दुल्लमचंदाचे कर्जफेड होऊ न शकल्यामुळे बयिरामला त्याच्या घरासमोरुन जाणे अवघड जाते. एखाद्या दिवशी त्याने रस्त्यात हटकविले, पैसे मागितले तर अब्रू जाईल. मग जगायचे कशाला असा प्रश्न बयिरामला पडतो. त्यामुळेच तो विरक्त होऊन घर सोडतो. त्याचप्रमाणे पैशापेक्षा जनावरांवर अधिक प्रेम करणारे लोक ग्रामीण भागात आहेत. बहिरामबोआच्या यात्रेला बैलगाडी घेऊन गेलेले शेतकरी यात्रेकरूंना पायदळी चालण्यास सांगतात. अधिक पैसे देऊ केले ते त्यांना नको असतात. त्याचप्रमाणेह विदर्भातील मागासलेपण लेखक वर्णन करतो. बेलोरे ते बहिरम हा कच्चा रस्ता आहे. रस्त्याच्या धुळीने यात्रेकरू त्रासतात. या मागसलेपणाकडे लेखकाने वाचकांचे लक्ष वेधले आहे. कादंबरीच्या आशयाचा जीवनांगाशी अशा प्रकारे असलेल्या संबंधातून वास्तव दर्शन घडविले आहे.

वऱ्हाडातील जमीन काळी कसदार आहे. पूर्णा नदीचे मुबलक पाणी आहे. परंतु

वऱ्हाडी माणसांच्या आळशीपणामुळे फारसे उत्पन्न येत नाही. शिवाय पिकांचे ते रक्षणही करीत नाही. वानरांनी आणि पक्ष्यांनी पीक खाल्ले तर तेही पूर्णामाईची लेकरं आहेत म्हणून दुर्लक्ष केले जाते. बेरकी लोक आणि धूर्त व्यापारी त्यांचे शोषण करतात. जसे दुल्लभचंदसारखा मारवाडी शेतकऱ्यांच्या कर्जाचा आणि घेतलेल्या मालाचा कधीच हिशोब करीत नाही. वाढत्या कर्जाच्या बोजामुळे लोक शेत त्याच्या स्वाधीन करतात. सावकारी हा धर्म आहे असे मानणारे भोळे लोक आहेत. त्याचा फायदा ते घेतात. जसे बयिराम दुल्लभचंदाला शेतातील सर्व उत्पन्न देतो. त्याबदल्यात 'ठोकापिटी'वर मारवाडी कब्जा घेतो. रुपराव त्याला विरोध करतो. आलोकाबुढीला रुपरावचे वर्तन अधर्माचे वाटते. ती घर सोडते. जनतेच्या अज्ञानाचा आणि घाबरटपणाचा सावकार फायदा घेतात. परंतु नवी पिढी परिवर्तनकाळामध्ये विरोध करु लागली हे वास्तव लेखक रूपरावच्या वर्तनातून स्पष्ट करतो. शेतावर कब्जा घेण्यास आलेला दुल्लभचंद घाबरुन पळतो. पोलीसकेस न करता 'ठोकापिटी' त्याला देऊन मोकळा होतो. गावात विरोध नको म्हणून रुपरावकडे सत्यनारायणाला येतो. नव्हे दोनशे रुपये पगारावर रूपरावला नोकरी देण्यास तयार होतो. त्यामागे त्याचा स्वार्थ असतो. असा मर्दगडी सोबत असेल तर गावची सर्व जमीन हस्तगत करता येईल हे तो गृहीत धरतो. तर स्वाभिमानी रूपराव त्याचा प्रस्तावच नाकारतो. ग्रामीण जीवनात परिवर्तन आले यावर लेखक प्रकाश टाकतो. दुल्लेखाँचा नातेवाईक बयिरामचा कापूस घेतो आणि पैसे बुडवितो, अशा प्रकारे विश्वासघात करणाऱ्या मुस्लिमांचे वास्तव चित्र रेखाटले आहे.

धूर्त, बेरकी ग्रामस्थांकडूनही सामान्य माणसांचे शोषण होते. जसे नंगेबाबाने मागितली असता पांडेबुआ गावजेवणाचा प्रस्ताव पुढे करतो आणि बयिरामला कर्जबाजारी करतो. तर मोकिंदाला भुताने घोसळले असता बहिरामच्या यात्रेला जाऊन बकऱ्याची कंदुरी करणे या प्रकारातूनही बयिराम अधिक कर्जबाजारी होतो. पांडेबुआ, फकिरबोवा यांच्यासारखा खादाडांना बकरु खायला मिळते. भोळ्याभाबड्या माणसांना ठकविणारे लोक खेड्यात आहेत.

स्वार्थी राजकीय कार्यकर्त्यांच्या वर्तनावरही लेखकाने भाष्य केले आहे. "…….कुठे एखादी निवडणूक असेल, तर कृष्णा पार्टीचा भिडू बैलाला मते द्या असे व्याख्यान द्यायला आला असेल. पहा तर खरी ! निवडणूक उभी राहीपर्यंत यांना खेड्यापाड्याची जाम कधी आठवण व्हायची नाही. अन निवडणुकीचा फड उभा राहिला की मग हे धूळ उधळीत खेडोपाडी चौखूर धावतात !" (पृ.४०) राजकीय पुढारी निवडणूक जिंकल्यानंतर मतदार संघाकडे मागे वळून पहात नाहीत. त्याना मतदारांकडे लक्ष द्यायला वेळ नसतो.

स्थानिक देवदेवतावरील श्रद्धा, त्याचप्रमाणे बुवाबाजीवरील अंधश्रद्धा-समजूती

याचा लोकजीवनावर परिणाम होत असतो. भोळ्याभाबड्या वऱ्हाडी माणसांची नंगेबाबावर अंधश्रद्धा असल्यामुळे हातातील काम सोडून सर्वजण दर्शनासाठी जमतात. गावजेवणाचा प्रसाद घेतात. नंगेबाबाची थट्टा केली म्हणून रूपरावचा पाय मोडला असे त्यांना वाटते. तर नंगेबाबानी म्हाताऱ्या अलोकबुढीकडे भाकर मागितली म्हणून वट्टीबुढी आणि बुढीला ती भाग्यवान वाटते. त्या गीत म्हणू लावतात,

"कशी म्होवोनी घातली गुरुनं
मशि येडंच ग्येलं भरुन !
"माय माही भाग्याची -----"
"लाखा कौतुकाची -----"
"गगनी वाळवल्लाहिची दाटी -----"
"त्याहिच्या डोळ्यामंदी पानी -----" (पृ.५०-५१)

भूतपिशाच आणि मंत्रतंत्रावरील वऱ्हाडी माणसाचा अंधविश्वास दिसतो. मोकिंदाला भूताने घोसळले म्हणून बहिरामच्या दर्शनाला जाऊन बोकडाची कंदुरी केली जाते. त्यापूर्वी मंत्रतंत्र लिंबू अन् मिरच्या उतरणे, फाटकी खेटरें अंगावरुन ओवाळणे यातून वऱ्हाडी माणसांचा लोकविश्वास दिसतो. ताईत जवळ बाळगल्यास भूतबाधा होत नाही. विंचू-साप उतरविण्याचे मंत्र म्हणणाऱ्यांनी काही पथ्ये पाळावयाची असतात. जसे, बयिराम मांत्रिक असल्यामुळे पडवळाची भाजी खात नाही. कुकडकुंबा उजव्या बाजूला जाणे बयिरामला शुभशकून वाटतो. यातून शकुन-अपशकुनाच्या कल्पनांनी लोकजीवन घडलेले दिसते. हिंदू-मुस्लिमांची एकमेकांच्या देवांवर श्रद्धा असलेली दिसते. जसे, मुस्लिमांच्या सादिलबुवावर हिंदुंचा विश्वास असल्याने ते मोकिंदाला दर्ग्यावर घेऊन जाण्याचा विचार करतात. ब्राह्मणवाड्याची जत्रा आणि साधुसंतावर लोकांचा विश्वास आहे. वारकऱ्यांची विठ्ठलभक्ती ही खास प्रदेशविशिष्ट आहे. कोकणातील माणसांची जशी गणपतीवर श्रद्धा आहे. त्याचप्रमाणे विर्दभातील लोकांची विठ्ठलावर श्रद्धा आहे. आळंदी-पंढरीची वारी करावी असे प्रत्येकाला वाटते. टाळमृदुंग, ढोल, पिलमपोव्याच्या तालावर हे लोक भजन करतात. मारुतीवरही त्यांची श्रद्धा आहे. बहिरामला जाण्यापेक्षा मारुतीला नारळ फोडला तरी मोकिंदाचा ताप उतरेल असे रुपरावला वाटते. देऊळवाड्याचे साडेअकरा लिंग असलेल्या शंकरावर त्यांची श्रद्धा आहे. तो नवसाला पावतो असा लोकविश्वास आहे. नव्याने खरेदी केलेल्या बैलांना भाकरीचा तुकडा, मिरच्या आणि पाण्याच्या तांब्याने ओवाळण्याची परंपरा आहे. परंपराप्रियता हे त्यांचे खास वैशिष्ट्य आहे. म्हणूनच 'ठोकापिटी' हे वाडवडिलांनी शेताला दिलेले नाव बदलण्यास आलोकबुढी तयार होत नाही. 'ठोकापिटी' नावाशी निगडित एक दंतकथा आहे. "भोसल्यांच्या स्वाऱ्या वऱ्हाडात शिरल्या, त्यांच्या बरोबर ढोमने कुटुंब आकोला जिल्ह्यातून इकडे आले. बेलोऱ्याला कुणी पैकाजी

असोले होता. त्याने आपली लेक ढोमन्याला दिली अन् त्याचबरोबरच ठोकापिटीचे वावरही दिले. मागे म्हणे कुणा रोहिल्याशी ठोकापिटी झाली होती, ती याच वावरात. तेव्हापासून त्याचे नाव ठोकापिटी पडले होते.''(पृ.२६) त्याचप्रमाणे बेलोऱ्याच्या गढीची पांढरी माती औषधी आहे. अर्धशिशी उठली अन् त्या मातीचा कपाळावर लेप लावला तर अर्धशिशी नाहीशी होते अशा लोकसमजाचे चित्रण लेखकाने केले आहे.

सावकारी धर्माप्रमाणे दुल्लभचंदाला शेत दिले पाहिजे असे आलोकबुढीला वाटते. रुपरावने शक्तीप्रदर्शन करून शेताचा ताबा न सोडणे अधर्माचे वाटते. त्या सावकाराने दान केलेल्या शेतातील धान्याची भाकरी खाल्ली तर नरकात जाण्याची भीती बुढीला वाटते. ती नरकात जाऊ इच्छित नाही. यातून स्वर्ग-नरकाच्या कल्पनांचा पगडा ग्रामीण लोकजीवनावर असलेला दिसतो.

संपूर्ण वऱ्हाडी भाषेतील ही कादंबरी आहे. वऱ्हाडी बोली कथानुभवाशी एकजीव झाली आहे. पाल्हाळिक वाटणारे संवाद देखील वऱ्हाडी माणसांच्या स्वभावानुरूपच आले आहेत. वऱ्हाडी बोलीचा गोडवा, माणसांची प्रवृत्ती, श्रध्दाळू अंतःकरण यावर चांगलाच प्रकाश लेखकाने टाकला आहे. तसेच बोलीतील स्वाभाविकता व त्यामुळे या संवादातून जाणवणारा जिवंतपणा समूहजीवन आणि लोकमानसाचे दर्शन घडविणारा आहे. हिंदी भाषिक प्रांताला जवळ असलेला विदर्भ आणि हैद्राबाद संस्थानाचा प्रभाव यातून वऱ्हाडी माणसांच्या बोलीत धेडगुजरी हिंदी शब्दांचा वापर झालेला दिसतो. दुलेखाँ रोहिल्याशी अशा शब्दात लोक बोलतात. 'पण बुढीचा प्रश्न व्यर्थ होई, पाण्यावर ओढलेल्या रेघेसारखा' याप्रमाणे उपमा-प्रतिमा आणि पुढीलप्रमाणे काही म्हणी वाक्प्रचारांनी ती समृध्द आहे.

''पावशेरं दुधात सवाशेर पाणी घालणे, बुड्ढी घोडी लाल लगाम, राजाला दिवायी ठाऊकच नाही, चुलीत ऽ सांडल किस्नार्पन ! 'वऱ्हाड अन् सोन्याची कुऱ्हाड ! फिसल पडे तो हर गंगे ! अभाग्याचे घरी कामधेनू आली, उधारीच्या तेलातुपावर धर्माची वात जाळणे, सावरीचा कापूस पिंजित बसणे, खाण तशी माती ! माय तसा लेक !, लंगडी गाय झाली का ते भटालें दान, अन बुढा बैल खाटकाच्या दारी इ.

टांगाटोळी, तुमाले, मालूम, कुकड, डंडार, अधिसा वावर, डवरे, कसा, धमण्याबंडी, परान्या, गामागुंगा, आडदाडा, साकोरी, घायाझाकोळ, उडानखुटले, तुत्या हे खास वऱ्हाडी बोलीतील शब्द आणि बोहारी, हड्ये, रंडकी, भिंगऱ्ये, चुडेल, लेकरबाई, खापरतोंड्ये, कायतोंडी, डोंबड्या, वान्नेरमाऱ्या, येलपांड्या, इ. शिव्या कथानुभवाशी एकजीव झाल्या आहेत. डॉ. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे यांचे या संदर्भात आकलन महत्त्वाचे वाटते. ''जिवंत वऱ्हाडी बोलभाषेचा वापर हे 'पूर्णामायेची लेकरं' या कादंबरीचा एक अत्यंत लक्षणीय विशेष आहे. या कथेतील वऱ्हाडी बोली ही सामान्यपणे अचलपूर व दर्यापूर या तालुक्यातली लोकभाषा आहे. आणि ही लोकभाषा

तिच्यातील अंगभूत लयकारीसह, नाट्यासह, दांडेकरांनी या कादंबरीतून प्रयुक्त केली आहे. उध्दव शेळके यांची 'धग' व बाजीराव पाटील यांची 'भंडारवाडी' या कादंबऱ्यातून वऱ्हाडीच्या या सजीव नाट्यमयतेचे दर्शन घडत असले तरी वऱ्हाडीचे 'पूर्णामाय'मधील हे अविष्करण त्याहीपूर्वीचे आहे ! बोली ही नाट्यपूर्ण असते आणि गतिमानता हा तिचा स्वभाव असतो. दांडेकरांच्या कादंबरीतून ही दोन्ही वैशिष्ट्ये प्रगट होतात.'' १. डॉ. वऱ्हाडपांडे यांचे हे आकलन सार्थच आहे. कारण'धग', 'भांडारवाडी' पूर्वी गो. नी. दांडेकरांनी संपूर्ण वऱ्हाडी भाषेत लेखन केले. उध्दव शेळके, बाजीराव पाटील, हे मुळातले विदर्भातील आहेत, विदर्भाबाहेरच्या लेखकाने केलेला प्रयत्न म्हणून गोनींदाचे योगदान महत्त्वाचे वाटते. डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांनी म्हटले आहे, ''गो. नीं. ना साधीसुधी, भोळीभाळी माणसं फार मोहवितात...... एखादा पांडेबाबा सोडला तर सर्वच माणसं अतिशय साधी, एकमार्गी. बोलणं ऐसपैस, त्यांच्या भाषेची बोलण्याच्या लकबांची विलक्षण जिवंत प्रतीती गो. नी. आणून देतात. या लेकरांच्या सामूहिक व्यक्तित्वाचं सुंदर चित्र रेखाटलं गेलं आहे. त्यांच्या भोळ्या भाबड्या समजूती, परंपरांचं महत्त्व, स्वभावाच्या भाबडेपणातून, निर्माण होणाऱ्या अडचणी समाजजीवनाचं व्यक्तीवर आलेलं दडपण यांचं भावपूर्ण चित्र आहे. २. वरवर पाहता बयिरामची ही कथा वाटत असली तरी ती वऱ्हाडी माणसांची समूहजीवन चित्रण करणारी, त्यांच्याच बोलीतील कथा आहे. भाषाप्रभु गो. नी. दांडेकरांची ही कलाकृती त्यांच्या इतर कलाकृतीशी तुलना करून पाहता फसलेलीच वाटते. तरीही वेगळ्या प्रदेशाचे जीवनदर्शन हेच तिचे वेगळेपण आहे. वऱ्हाडी भाषेत त्यानंतर 'धग', 'माणूस' यासारख्या श्रेष्ठ कादंबऱ्या जन्मल्या हे मान्यच करावे लागेल.

### २. उध्दव ज. शेळके - *'धग'*

'धग' ही उध्दव शेळके यांची १९६० साली प्रसिध्द झालेली पहिली कादंबरी आहे. 'बाईविना बुवा'(१९६३) 'डाळिंबाचे दाणे' (१९७७) आणि विविध विषयांवरील अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. 'धग' म्हणजे येड्याबागड्या कौतिकच्या संसारातील धडपड-परवडीची कथा आहे. कादंबरीचे कथानक लेखकाने चार भागात सांगितले आहे. पहिल्या भागात आई भावाच्या घरात सुखात असलेली कौतिक चित्रित केली आहे. मेव्हणा गोविंदराव आणि महादेव यांचे पटत नाही तेव्हा सासू गोदुबाई जावयासाठी नवीकोरी सिंगर मशीन घेऊन देते. ते स्वतंत्र राहु लागतात. परंतु मशीनचे हप्ते भरण्याचा महादेवला कंटाळा येतो. म्हणून हिंगणघाट सोडून कौतिक-महादेव मुलांना घेऊन तळेगाव ठाकूरला येतात. तेव्हा महादेवचे वडील रघुनाथशिंपी मोझरीच्या बाजारला गेलेले असल्यामुळे कुलूप तोडून गृहप्रवेश होतो. .

दुसऱ्या भागामध्ये कौतिकच्या संसाराची परवड कशी होत गेली याचे चित्रण

लेखकाने केले आहे. कौतिक स्वतः दुसऱ्याच्या शेतावर राबते आणि नवऱ्याला कामाला लावते. सासऱ्याशी मिळतेजुळते घेण्याचा प्रयत्न करते. मुलांना शाळेत घालते. नवऱ्याला शेतीकाम जमत नाही म्हणून तयार कपडे विकण्याचा धंदा काढून देते. मुलगा भीमाला वळणावर आणण्याचा प्रयत्न करते. नवऱ्याला आठवडे बाजाराचा कंटाळा येतो म्हणून मोझरीला मुक्काम हलविते. महादेवचा माल आणि पैसे लुटले गेल्याने तो उमरावतीला जातो. त्याला ती परत आणते. भीमा कासम-सकीनाच्या बानोवर अतिप्रसंग करतो. नामाचे शिक्षण थांबते. रघुनाथ शिंप्याचा मृत्यू होतो. तेव्हा कर्ज काढून क्रियाकर्म करून कौतिक माघारी येते. त्यावेळी महादेव सालबर्डीच्या यात्रेला निघून गेलेला असतो. अशा प्रकारे संकटामागून संकटे येतात, तेव्हा मात्र कौतिक भ्रमिष्ट होते.

तिसऱ्या भागामध्ये मोठ्या महादेवच्या यात्रेला गेलेला महादेव महारोग झाल्यामुळे मिशनऱ्यांबरोबरच निघून जातो. तो माघारी येण्याची शक्यता दिसत नाही. नामाची शाळा कायमची सुटते. दहा रुपये जमा करून ती तळेगावला जाते. गणपत कलालाकडून मशीन घेऊन येते. बारखड्यांच्या घरजावयाने घर लुबाडलेले असते. शेषराव शिंप्याकडे नामा शिलाईकाम करू लागतो. नवऱ्यामध्ये तिचा सर्व जीव अडकलेला असतो. त्याच्यावरील प्रेम हाच तिच्या जीवनातील विरंगुळा असतो. तो नाहीसा झाल्याने ती पूर्ण वेडी होते. गोविंदराव, सुखदेव, जाखड्याला शिव्या घालत ती रस्त्याने फिरू लागते. तिला काम मिळत नाही.

चौथ्या भागामध्ये कुटुंबाची सर्व जबाबदारी नामावर पडलेली दिसते. नागोरावच्या हॉटेलमध्ये काम करून तो आईला सांभाळतो. बानोचे लग्न झालेले असते. म्हणून यसोदी सकीना-कासमच्या हाताखाली लहानसहान कामे करते. त्यांच्याकडे जेवते. या परिस्थितीत कौतिकला एकच समाधान वाटते की नामा शेषरावकडे शिंपीकाम शिकतो. परंतु त्याचे हे शिक्षणही थांबलेले असते. नामा मामाच्या पत्राची वाट पाहात आईची सेवा करत दिवस ढकलत असतो. अशी ही सहज घडणाऱ्या सामान्य माणसाच्या आयुष्याची शोकात्मिका आहे. डॉ. र. बा. मंचरकर म्हणतात त्याप्रमाणे,"ही एक कुटुंबाची दुःखकथा असली तरी तिच्यामागे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा, जातिव्यवस्थेचा आणि समाजजीवनाचा एक व्यापक पण सूचक संदर्भ सतत जागता ठेवला आहे.'''३. हे विधान समर्पक वाटते. कारण कालामानाने बदलणाऱ्या ग्राम जीवनातील परिवर्तन 'धग' मधून वास्तव स्वरुपात रंगविलेले आढळते.

'धग'मधीन सर्व व्यक्तिरेखा सर्वसामान्य आहेत. त्या सर्व विलक्षण जिवंत आहेत. पतीवर आणि मुलांवर विलक्षण प्रेम करणारी कौतिक ही या कादंबरीची नायिका आहे. पतीवरील प्रेम हाच तिचा विरंगुळा आहे. प्रतिकूल परिस्थितीत नवऱ्यावरील प्रेमामुळेच जगण्याची धडपड ती करते. या संदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात,

"वस्तुतः कोणताही प्रदेश असो, तो प्रदेश आणि त्या मातीशी आतुट नाते असलेली माणसे तुमची आमची व्हायला हवीत. त्या त्या प्रदेशाची कवचे फोडून ती माणसे जिवंत भासणे आवश्यक आहे. एखाद्या कादंबरीकाराला एखादेवेळी हे सहज शक्य होते. उध्दव शेळक्यांची 'धग' ही कादंबरी याच जातीची ! येथे जगण्यासाठी धडपडणाऱ्या स्त्रीची - कौतिकची कहाणी विलक्षण सामर्थ्याने शेळके सांगतात. एका दरिद्री स्त्रीच्या मनाचे पदर न् पदर ते हळुवारपणे उलगडतात. तिची कहाणी वाचता वाचता आपण भारावून जातो. अस्वस्थ होतो. आणि क्रूर नियती या दरिद्री स्त्रीच सुख पार विस्कटून टाकते हे आपल्या लक्षात येते."४. प्रदेशाची कवचे फोडून बाहेर पडते. कौतिकच्या जीवनातील ताण-तणाव मोठ्या ताकदीने लेखकाने वर्णन केले आहेत. म्हणून वरील विधान सार्थ वाटते. रंगाने काळी असलेली कौतिक प्रेमळ, चिवट, जिद्दी, सोशीक, उत्साही, आशावादी, भाबडी, सरळमार्गी, कष्टाळू, श्रद्धाळू, खंबीर, स्वाभिमानी, खानदानी, शेजारधर्म पाळणारी आणि जीवनातील संकटाला सामोरी जाणारी आहे. दांडगा आत्मविश्वास असलेली कौतिक नियतीपुढे पराभूत होते. उद्ध्वस्त होते. महादेव तिचे सर्वस्व आहे. तो नाहीसा होताच ती सैरभैर होते. वस्कन ओरडते, नामाला मारते, तिची स्मरणशक्ती नष्ट होते. ती असंबद्ध बोलू लागते. तिची जीवनप्रेरणाच नाहीशी होते. जीवनासक्ती संपते. स्वतःला नामा-यसोदीकडे पाहून सावरु शकत नाही. भ्रमिष्ट होते. "धग" मधील प्रथमतः नवऱ्याबरोबर आपले घर सोडणारी कौतिक आणि शेवटी भ्रमिष्ट होणारी कौतिक यांमध्ये व्यक्तिरेखेचा काही एक चढता विकास होत गेला आहे, असे प्रत्ययाला येत नाही. तिची व्यक्तिरेखा जीवनाच्या झगड्यांशी फार चिकटली गेली आहे. अशी रुखरुख वाटत राहते.५. हे विद्याधर पुंडलिकांचे विधान एकांगी वाटते. कारण "कौतिक इथे विविध स्त्रीरूपात वावरते. ती एक परिपूर्ण संपूर्ण स्त्री आहे."६. असे प्रा. कमल आहेर म्हणतात. कौतिकचे व्यक्तित्व इतर पात्रांमुळेच प्रभावी बनते. येथे 'कौतिक'च्या व्यक्तिदर्शनाला महत्त्व दिले असले तरी प्रादेशिक संस्कार कमी होत नाहीत. कारण कथानकांच्या मागणी प्रमाणे व्यक्तिदर्शनाला महत्त्व प्राप्त झाले आहे, ती वऱ्हाडी जनजीवनाचे दर्शन घडविते.

'महादेव' हा कौतिकचा पती आहे. साधा सरळ, भोळसर, आळशी, निराशावादी, निरुत्साही, निष्क्रीय, दैववादी, श्रद्धाळू, नेभळट, कर्तृत्वशून्य, जबाबदारी टाळणारा, उदासीन, प्रेमळ, पापणीरु, वैफल्यग्रस्त, सरळमार्गी, निरुपद्रवी, दुबळा तसाच गरम माथ्याचा आहे. तसाच निष्काळजी आणि स्वाभिमानी आहे. "आपल्याले काई कोनाची हूं मून भावत नाही - मग यो सग्गा बाप का असेना."(पृ.३) असे तो म्हणतो. तरीही त्याला परिपूर्ण पुरूष बनविण्याची धडपड कौतिक करते. फकिरीवृत्तीने तो नेहमी संसारापासून दूर पळतो, तेव्हा त्याला मागे खेचून आणण्याचे सामर्थ्य कौतिकमध्ये

आहे. शेवटी महारोग झाल्यावर मात्र तो कायमचा निघून जातो. त्याच्या परागंदा होण्याने कौतिकच्या संसाराची घडी कायमची विस्कटली जाते. भीमा, नामी आणि यसोदी ही त्यांची निरागस मुले आहेत. भीमा निगरगट्ट, लफंगा, उच्छृंखल, उर्मट, उनाड, स्वच्छंदी, धीट, खोडकर, उध्दट, रागीट, बेफिकीर, रगेल, उनाकड्या करणारा, नादान 'इच्चकपणा' करणारा, जुगार खेळणारा, चोरी करणारा मोठा मुलगा शिक्षणाची आवड नसलेला रेखाटला आहे. कौतिकचे मात्र नामापेक्षा त्याच्यावर अधिक प्रेम आहे. त्याला योग्य वळण लावण्याचा खटाटोप कौतिक करते. परंतु तो बहकतो. हजामती करतो. मोहरमचे वाघ होऊन नाचतो, शेषराव शिंप्याच्या दुकानातील कापड विकतो, बानोशी अतिप्रसंग म्हणून "आता थो आपल्याला मेला आणि आपून मेलो त्याने" असे म्हणून त्याचे तोंडदेखील पाहत नाही. नामा कुशाग्र, हुशार, भित्रा, पापभीरु, प्रामाणिक, समंजस आणि सालस मुलगा आहे." 'धग' कादंबरी म्हणजे माझे बारा वर्षापर्यंतचे आत्मचरित्र आहे. ती जिथे संपते तिथून उध्दव ज. शेळके सुरु होतो. 'धग' मधला नामा म्हणजे मी स्वतःच आहे."७. असे एका मुलाखतीत लेखक म्हणतो. यावरुन स्वानुभवाच्या परीसस्पर्शाने नामाची व्यक्तिरेखा जिवंत झाली आहे असे म्हणावे लागेल. "मा, आता माझ्या सायेचं कसओ ?" असे शाळेतून गुरुजींनी हाकलल्यानंतर नामा म्हणतो, तेव्हा कौतिक म्हणते, "कसं कायचं, चालत जा माह्यासंग वावरात, लेका, तुह्या तकदीरालेत चारीखून भोकं आये, त्याले तू तरी काय करसीन आन् मी तरी काय करु." शाळा शिकण्याची इच्छा असूनही तकदिराला भोक पडल्यामुळे तो हॉटेलमध्ये काम करुन आईला सांभाळतो. नियती त्याचा पराभव करते. यसोदा ही अजाण मुलगी आहे. एक संकट म्हणूनच ती जन्माला येते आणि कौतिकची ओढाताण, व्याकुळता वाढविते.

रघुनाथ शिंपी हेक्कोड्या तोंडाचा, मोठ्ठा टेकबाज, संतापी, रागीट असा महादेवचा बाप आहे. बापलेकाच्या वैरामुळे महादेव त्याच्या अंत्यदर्शनाला जात नाही. क्रियाक्रर्म करीत नाही. कौतिकला हे सर्व करावे लागले. बानो, सकीना, कासम हे मोझरीचे प्रेमळ समजुतदार कुटुंब आहे. गोदूबाई, गोविंदराव, गंगा, शेषराव, धोडिंबा, सुखदेव-सिता, किस्ना माळी, बाखड्याचा घरजावई गणपत कलाल, सदाशिव आणि अन्य गौण पात्रांचे चित्रण करताना लेखक वास्तवाशी अविचल निष्ठा बाळगून राहतो. या व्यक्तिरेखाटनातून लेखक समाजवास्तवाचे दर्शन घडवितो.

शेळक्यांनी रेखाटलेली सर्व पात्रे विदर्भातील आहेत. त्या भू-प्रदेशाशी त्यांची नाळ जोडलेली आहे. वर्धा आणि अमरावती जिल्ह्यातील मातीचे संस्कार त्यांच्यावर झालेले आहेत. कौतिकचे माहेर हिंगणघाट हे वर्धा जिल्ह्यातील आहे. मुळात लेखकाचे ते आजोळच आहे. अमरावती जिल्ह्यातील तळेगाव ठाकूर उध्दव शेळके यांचे गाव आहे. तेच कौतिकचे सासर आहे. तळणी, सैदुर्जने, मोझरी, तिवसे, शेंदोळे,

कौडिण्यपुर ही या प्रदेशातील गावे असून महादेव आठवडे बाजाराला किंवा यात्रेला या ठिकाणी जातो. तळेगावप्रमाणे मोझरीतही काही दिवस या कुटुंबाचे वास्तव्य असते. या प्रदेशातील पीक-पाण्याचे उल्लेख, उन्हाळा, घरांची रचना "....... अशी काही कुडाची, काही मातीची घरे......" आहेत. कौतिकचे तळेगावमधील घर गावनदीच्या काठाशी आहे. नदीच्या पुराची सोंड घरात मुसंडू नये म्हणून तिथली सारीच घरं जमिनीपासून पुरुषभर उंचीच्या जोत्यावर, दुकान मांडावी तशी हारीनं मांडली आहेत असे लेखक वर्णन करतो. वऱ्हाडातल्या रणरणत्या उन्हाळ्यामुळे यसोदीला कौतिक केळीच्या पानात लपेटून ठेवते. पानपुड्याची पाने त्या मासाच्या गोळ्याभोवती लपेटत असे, यातून विदर्भातील उन्हाळ्याची दाहकता लक्षात येते. तरीही भू-प्रदेश एक पात्र म्हणून जिवंत होत नाही.

विदर्भात भू-प्रदेश-पीकं, घरांची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचप्रमाणे कादंबरीतील निसर्गचित्र देखील प्रदेश विशिष्ट आणि व्यक्तीच्या जीवनातील ताण-तणाव चित्रण करणारी-मानसिकतेनूरूपच आली आहेत. जिद्दी, कष्टाळू कौतिकच्या मानसिकतेनुरुप रेखाटलेले हे निसर्गचित्र पहा,

"आता उन्हं चांगली कडकडू लागली होती. तूर शेंग धरु लागली होती. फुलोर झडू लागला होता. त्याचा वास वावरभर घमघमत होता. कडकडत्या उन्हानं पऱ्हाडीची बोंडं वाळत होती. तडकत होती. कापूस जमिनीवर झुकला होता. लोमकळत होता. पडत होता. काही आपली जागा सोडून दुसऱ्या खालच्या फांदीवर येऊन लोमकळत होता. हे पाहून आपल्या घराशी खेळणाऱ्या दिवसभर हुंदडणाऱ्या लेकराचं हुंदडणं कौतिकच्या डोळ्यात भरलं होते......"(पृ.२८-२९)

सुगीच्या दिवसातील कामाची गडबड आणि शेतकऱ्यांची मानसिकता पुढील निसर्गवर्णनातून रेखाटली आहे,

"नागदिवाळी होऊन गेली होती. हंगाम ज्वानीत होता. तूर सोंगायला आली होती. जोंधळा खुडायला झाला होता. गावात रिकामा मजूर सापडत नव्हता. तशात आकाशात ढगांची टेहळणी सुरु झाली होती. माजलेला वारा उभ्या पिकांशी जीवघेणी मस्करी करीत होता. वावरधन्यांना भिववत होता. ते मजुरीच्या दराची दोरी सैल सोडीत होते. ती मजूर अधिक ताणीत होते. कारण आता त्यांच्याही अंगणा-ओसरीत कणसे वाळत होती. तुरीच्या पेट्या अन् तिळाच्या झोपड्या ताठरपणे उभ्या होत्या. मुगामोटेचे शेंगूट सोकत होते."(पृ.४७)

वरील निसर्गचित्र प्रदेश विशिष्ट आहे. सपाट भूप्रदेश असल्यामुळे वारा विनाविघ्न धावतो. शेतकऱ्यांना त्याची भीती वाटते.

"डॉ. नागनाथ कोत्तापल्ले प्रस्तुत कादंबरी 'ग्रामीण' आहे हे मान्य करताना म्हणतात,"........या कादंबरीत कृषिवलांचे जीवन येत नाही. परंतु गावगाड्यात

वावरणारी ही मनं आहेत किंवा गावगाड्याच्या रचनेतून तयार झालेली ही मने आहेत, याची जाणीव सतत ही कादंबरी वाचताना होते. एका शिंपी कुटुंबातील ताणतणाव येथे चित्रित होत जातात. परंतु या कुटुंबाभोवती असणारा गाव, गावातील छोटेमोठे व्यवसाय, त्यात निर्माण होणारे तणाव ग्रामीण जीवनातील नातेसंबंध या बाबीवरच हा लेखक भर देताना दिसतो.''८. म्हणजेच 'ग्रामीण लोकमानसा' प्रमाणेच 'प्रादेशिक लोकमानस' स्वतंत्रपणे नजरेत भरत नाही. समूहकेंद्रितता दिसत नाही. व्यक्तिकेंद्रितता दिसते. याउलट डॉ. रवींद्र शोभणे यांना 'धग' प्रादेशिक आणि प्रातिनिधिक कादंबरी वाटते. ९. या पार्श्वभूमीवर 'धग' मधील समाजजीवन चित्रणाचे स्वरुप विचारात घेता येण्यासारखे आहे.

कादंबरीत परंपरागत ग्रामीण व्यावसायिकांची होणारी कुचंबणा आणि नव्या सामाजिक प्रवृत्ती कादंबरीकाराने चित्रित केल्या आहेत. कौतिकच्या निवेदनातून शिंप्याचे पारंपरिक जीवन सुखसमाधानाचे होते. गावगाड्यात त्यांना प्रतिष्ठा होती असे सांगितले आहे. त्याबरोबर हिंदुमुस्लिम ऐक्याची भावना होती. संघर्ष नव्हता. कौतिक हिंदू आहे. मोझरीला ती कासमभाईसारख्या मुस्लिमाच्या आश्रयाने राहते. मुलांनी मुस्लिमांच्या घरातील पाणी पिण्यास तिची हरकत नाही. पुढेपुढे एकमेकांच्या घरातील अन्न ते खाऊ लागतात. वेळप्रसंगी ते एकमेकाला मदत करताना दिसतात. कासम वारकऱ्यांप्रमाणे महाशिवरात्रीला सालवर्डीच्या जत्रेला न चुकता जातो. गावात भजनाला देखील जातो. कौतिकची सादुलबुआवर श्रध्दा आहे. त्याला ती नवस करते. तारणारा-मारणारा सादुलबुआ आहे असे तिला वाटते. देवदेवतांबद्दल ग्रामीणांच्या जीवनामध्ये भेदभाव नसल्याचे यावरुन दिसते. तरीही जातिभेद समूळ नष्ट झालेला दिसत नाही. दिवाळीच्या वेळी भीमा आंब्याच्या पानाची तोरणे बांधत असताना......''त्याईचा अन् आपला देव अल्लग आहे. '' (पृ.३८) असे महादेव म्हणतो. शिंप्याच्या भीमाने हजामती करणे घरातल्यांना मानवत नाही. त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का लागतो. यावरून बलुतेदार आलुतेदारांच्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठेतच्या कल्पनाना स्थान आहे असे दिसते. किंवा बाखड्याच्या घरजावयाने भीमाला खेटराने मारले, तेव्हा भीमा म्हणतो,

''......खेट्टानं नोको मारु, मले इटाय होते. मी नामदेव सिंपी आये......'' (पृ.४६) बाखड्याच्या जावयाचे वर्तन कौतिकला पसंत नाही. त्याचप्रमाणे 'इटाळ' श्रेष्ठकनिष्ठांची कल्पना समाजात आहे.

वैदर्भीय माणसांचा दिलदारपणाही काही घटनाप्रसंगातून लेखकाने सांगितला आहे. धोंडिबाने महादेवच्या कुटुंबियाना पाहुणचार केला. कौतिकने सीताचे बाळंतपण केले. कासम-सकीना वेळप्रसंगी कौतिकच्या मदतीला येतात. सदाशिव कौतिकला मशीन देतो. उलट समाजजीवनातील विषमतेचे दर्शनही काही ठिकाणी घडते. गणपत कलाल सावकार, जाखड्याचा घरजावई, नथूशेठ यासारखे लोक कौतिकचे

संधी मिळेल तसे शोषण करतात.

गावगाड्यामध्ये स्त्रीला स्वतंत्र स्थान नाही. तिच्या नगण्यस्थानाची तिला जाणीवही होत नाही. पतीला ती सर्वस्व मानते. त्यामुळे पतीपासून वेगळे राहणे तिला मान्य नाही. कौतिकला भावाजवळ राहण्यास महादेव सांगतो, तेव्हा ती म्हणते.

"बाप्पा, भावापासी राहाले लगन केलं काय?"(पृ.७) किंवा

"तुमी तिथं मी - तुमी गवत कापान त मले पेंडी बाधाची कायची सरम आये?"(पृ.८)

प्राप्त परिस्थितीला सामोरे जाण्याची, पती परमेश्वर मानण्याची, त्याच्याबरोबर वाटेल ते कष्ट करण्याची स्त्रीची परंपरा आहे. म्हणूनच तकदीराला सर्व बाजूने भोकं पडले असतानाही "माहा का नाई त सगया जीव घ्या बुवात आये"(पृ.१७८) असे ती म्हणते.

पारंपरिक व्यवसाय करण्याची सवय झालेल्या गावगाड्यातील कारागिरांना (कारू-नारु) अन्य रोजगार करणे जमत नाही. त्यामुळे त्यांची कुचंबना होते. पारंपरिक व्यवसायाबद्दल प्रतिष्ठेच्याही काही कल्पना असतात. नवीन रोजगार करताना तिला धक्का लागतो. शेतात मजुरी करायची सवय असलेल्या कौतिकची कामाबद्दल काही तक्रार नसली, तरी महादेवची मात्र आहे. त्याला शेतातील काम जमत नाही. डंबरा हाकलता येत नाही. निंदायची शरम वाटते. रघुनाथ शिंप्याची मशीन मिळण्याची आशा संपल्यावर तयार कपडे विकण्याचा धंदा तो करू लागतो. त्या पायपिटीचा त्याला कंटाळा आल्यावर नथूशेठकडे मोझरीला मशीनच्या आशेने जातो. वावर घेण्याचे स्वप्न पाहतो.

धनिकांकडून गरिबांचे शोषण होत असते. धनिकांना पैसा महत्त्वाचा वाटतो, तर गरिबांना पत, अब्रू महत्त्वाची वाटते. शेंदुर्जन्याच्या बाजारात गव्हाच्या पैशावरुन व्यापारी आणि महादेव यांच्यात मारामारी होते. परंतु गरीब कौतिक गव्हाच्या गंजीवर गहू फेकून मोकळी होते. मुलांसाठी खरेदी केलेले कपडे शेषरावला कमी भावात विकून बाजार करते. मुलांवरही चांगले संस्कार करण्यासाठी धडपडते. चोरी, सिंदळकी करु नये, पोटासाठी कोणतेही कष्टाचे काम करताना कसली लाज आली असे ती म्हणते. भीमाने किस्ना माळ्याची गुरे राखायला जाणे तिला कमीपणाचे वाटत नाही. महादेवला मात्र वाटते. तो किस्ना माळ्याला म्हणतो,

"ढोराईमांग ? ......" भलतंच ! काई आवईचारनं त बोलाव् मान्सानं ! आमच्या जातीपातीले ते काई पायसीन ? का आमी गरीब झालो मून पोटासाठी कोन्तई काम करु ?" (पृ.४०) तेव्हा कौतिक म्हणते,

"....... मान्साच्या जातीनं दोन गोठींसी सरम ठिवाव् - एक त चोरी आन् दुसरी छिनाली. पोटाच्या धंद्याची कायची सरम आये ? हो न त काय......"

"चांगला आये तुहा पोटाचा धंदा----" तो वैतागानं पुटपुटला, "अशानं तुह्या माहेरचे लोक चांगले सेन घालतीना माह्या तोंडात........"(पृ.४२)

भीमाने चोरी करणे, सर्कस-तमाशात मजुरी करणे, जुगार खेळणे, मोहरमच्या मिरवणूकीत वाघ होऊन नाचणे, न्हाव्याचा धंदा करणे तिला अप्रतिष्ठेचे वाटते. "गरिबाच्या लेक्रानं आपल्या आबीत राहाव् लागते. अशानं तुले कोनी आपल्या दाङ्ग्यात नाई उभं करनार लेका !"(पृ.८९) मुलांनी चोरी करणे किंवा अन्य उद्योग करण्याने समाजाचा विश्वास उडतो, ते वाऱ्यालाही जवळ करीत नाही अशी तिला भीती वाटते.

शब्द प्रमाण मानण्याची सामान्य माणसांची परंपरा असते. जसे कौंडण्यपूरच्या जत्रेत महादेव दुकान लावतो. परंतु आजरपणामुळे तो चांगली विक्री करू शकत नाही. उदास होऊन तो रडू लागतो. उमरावतीच्या व्यापाऱ्याचे वायद्याला पैसे देता येणार नाहीत याचे त्याला दुःख होते. तो कौतिकला म्हणतो, "तुमचे मालाचे-लोकाईच्या पैशाचे"(पृ.१०९) कसे होईल. यावरून दिल्या शब्दाला जागण्याची गरिबांची परंपराच लेखक चित्रित करतो. त्याचप्रमाणे बाजाराहून परतत असताना त्याच्या जवळील दोनशे दहा रुपये आणि माल चोर लुटतात. तेव्हा तर तो अप्रतिष्ठेच्या भीतीमुळे महादेवाच्या मंदिरात जाऊन बसतो. कौतिक त्याला माघारी आणण्यासाठी जाते तेव्हा तो माघारी येण्यास तयार नसतो. तो म्हणतो, "माल गेला पैसे गेले, धंद्यातली इज्जत गेली......" (पृ.१८४) बायकोबरोबर मोझरीला आल्यावरही काम न करता बसून खाणे त्याला मानवत नाही. आपली अप्रतिष्ठा होते असे त्याला वाटते, तेव्हा तो म्हणतो,

"कौतिकचा नवरा बड्या झाला मंते. "हे त्याला कमीपणाचे वाटते. गावाबाहेर अप्रतिष्ठा झाल्याचे गावात समजू नये, गावात समजले तर लोक हसतील याचे दुःख होते. जसे महादेवच्या इच्छेखातर गाडग्यामडक्याचा संसार 'मोझरी'ला हलविला जातो. परंतु तेथे नथुशेठ भेटत नाही. राहण्याची व्यावस्था होत नाही. मुसलमानाच्या घरात जागा मिळविण्याची वेळ येते. तेव्हा गाडी घेऊन आलेल्या सुखदेवला कौतिक म्हणते, "बाप्पुजी, गावात कोनापासी सांगू नोका आमचं असं काई-----" (पृ.१३१)

विवाहित पुरुषाने बायको-मुलांसह गाव सोडून सासुरवाडीत राहणे सामाजिकदृष्ट्या अप्रतिष्ठेचे, नामर्दपणाचे समजले जाते. महादेवने हिंगणेघाटला गोदूबाईच्या घरी राहणे रघुनाथ शिंप्याला अप्रतिष्ठेचे वाटते. म्हणूनच मुलाशी तो नीट वागत-बोलत नाही. मुलाच्या घरातले पाणीदेखील पीत नाही. सून आणि मुलांवरील राग अनावर झाल्यावर तो कौतिकला म्हणतो, "हॅ - हॅ - हॅ ! काय सती आयेना......एवढी होती त मंग नवऱ्याले घेऊन का बा आली इथिसा सती पडाले. घेऊन त गेली होती ना ध्या बैलाले आपल्या मायच्या घरी ! तिथं त्याच्या डोयावर झापड बांधून धान्याले काबा

नाई जुतलं, आ ?'' (पृ.१२३) त्याचप्रमाणे खाल्ल्यामिठाला जागण्याची इमानाने वागण्याची सामान्यांची परंपरा असते. उपकारकर्त्या कासमच्या मुलीवर भीमा अतिप्रसंग करतो. कौतिकला झाल्या प्रकारची हळहळ वाटते. ती अवेळी कासमचे घर खाली करण्याचा निर्णय घेते. ''खाईन त्याच्या घराचे फाटे मोजणारी मी बायको नोय -'' (पृ. १७५) असे ती सकीनाला म्हणते.

गावातील धनिकांची सामान्यांना दहशत वाटते. गावात त्यांचे वर्चस्व असते. त्यांच्या विरोधात आवाज उठविणे, साक्षीपुरावे देणे त्यांना सामाजिक आणि आर्थिकदृष्टया परवडणारे नसते. विरोध केला तर धनिकं त्यांना सुखाने गावात राहु देणार नाही याची भीती वाटते. बाखड्याला घरजावयाने रघुनाथ शिंप्याचे घर गहाण ठेवल्याच्या कागदावर साक्षीदार म्हणून सुखदेवने अंगठा केलेला असतो. परंतु तो खोटा दस्ताऐवज असतो. घरावर मालकीहक्क तो प्रस्थापित करतो. साक्षीपुराव्यासाठी कौतिक सुखदेवला आग्रह करते तेव्हा तो म्हणतो. ''.....पन मी पायला लेक्राबायचा गरीब मानूस, त्यानं माह्या डास धरलात मले या गावात रायनं मुस्कील होईल.''(पृ.२२६)

धनिकांच्या दडपशतीमुळेच सुखदेव साक्षीला बाखड्याच्या वाड्यावर जात नाही. एकटी कौतिक जाते, तेव्हा तिच्या चारित्र्यावर तो संशय घेतो. ती अधिक भडकते. कारण गरिबाला पैशापेक्षा अब्रू-शीलाची किंमत अधिक वाटते. भीमा उनाड, लफंगा, बेफिकीर होण्यास आजूबाजूची परिस्थिती, समाजातील विषमता, दारिद्र्य याच गोष्टी कारणीभूत आहेत. पैशाचा मोह, चांगलचुंगलं खाण्याचा मोह, कुसंगती त्याला पापं करायला प्रवृत्त करते. यावरुन भीमा समाजपरिस्थितीचा बळी आहे असेच म्हणावे लागेल.

परिवर्तन काळामध्ये समाजमनावर काही चांगले-वाईट संस्कार झाले असले तरी ते वरवरचे आहेत. त्यांचे अंतरंगावर मात्र अनेक श्रध्दा-समजुती-परंपरा आणि यात्रां-उत्सव यांचा पगडा असल्याचे जाणवते. 'धग' मध्येही कौतिकच्या जीवनातील ताण-तणाव व्यक्त करताना या गोष्टीचे चित्रण केले आहे. स्थानिक देवता-पीरावर कौतिकची श्रध्दा आहे. त्यांच्या पूजेमुळे प्रतिकूल परिस्थितीत तिचे सामर्थ्य वाढते. धर्माच्या बाहेरील देवदेवतांचे पूजा केली जाते. कौतिक शादुलबुआची पूजा करते. नवस करते. त्याचे सामर्थ्य पाठीशी असावे असे तिला वाटते. हिंदू असूनही ती मुस्लिमांच्या पीराची पूजा करते. उलट कासम मुस्लिम असूनही सालबर्डीच्या महादेवाच्या जत्रेला वारकऱ्याप्रमाणे जातो किंवा मोझरीत भजनाला जातो. महादेवची परमेश्वरावर श्रद्धा असलेली दिसते. ''खानेवाल्याईच नाव दान्यादान्याईवर लेह्यलं असतं. फिकर करनेवाला थोऽवरचा आये. '' असे तो म्हणतो. गावातील मंदिरामधून नगाऱ्याचा, घंटेचा आवाज येतो. मुले होणे परमेश्वराच्या हातात असल्याचे मानले जाते. यसोदी आजारातून उठावी म्हणून पाच बस्तरवार करण्याचा नवस ती शादुलबुवाला करते त्याच्या कृपेने

मुलगी वाचली असे समजते. मोहरमचा सण म्हणजे कुलदैवताचे वार्षिक देणे उरकून टाकण्यासाठी कौतिक आटापिटा करते. नामाच्या गळ्यात नव्या कपड्याची झोळी अडकविली जाते. तांबडा-पिवळा नाडा गळ्यात घातला जातो. हातात वाटी दिली. पाच घरं मागायला सांगितली. "हासेन हुसेन धुल्ला" म्हणत पाच घर मागताना, कोणी काही दिले तर ते हातात न घेता वाटीत घेऊन झोळीत टाकायला सांगते. गहू, तांदूळ, जोंधळे आणि पैसे घेऊन घरी येतो. मागितलेले सर्व धान्य एकत्र दळून खिचडा करुन रोडगे केले. महादेवने ते गुळादुधात कुस्करले, त्याचे लाडू बांधले. शादलबुवाला त्या लाडवांचा नैवेद्य दाखवला. ऊद जाळला. अबीर वाहिला. सर्वांनी दर्शन घेतले. शादलबुवापुढच्या नैवेद्यात सर्वजण एकाच ताटात बसून खिचडामलिदा खाऊ लागली. हा सर्व प्रकार प्रदेशविशिष्ट आहे. यातून त्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडते. निजामाच्या राजवटीचा प्रभावही स्पष्ट होतो. पतीपरमेश्वर मानण्याची आणि पतीच्या सोबत आयुष्य घालविण्याची परंपरा आहे. पाहुणचार करण्याची, तढव अंथरण्याची, वाढलेल्या ताटाचा अपमान न करण्याची, प्रामाणिकपणा सिद्ध करण्यासाठी देव, मूले, गाईच्या शेपटाची शपथ घेण्याची, दृष्ट काढण्याची, मुलांच्या अंगावरून आईचे दुध उतरविण्याची, पायरोमायरो काढण्याची, डोक्यावर पदर घेण्याची, मुलाच्या तोंडावरुन हात ओवाळून स्वतःच्या कानांच्या पाळ्यावर बोट मोडण्याची इत्यादी परंपरा संस्कृतीनुरुपच आहेत. लहानबाळाचे रुपगुणवर्णन केल्याने दृष्ट लागते अशी समजूत असलेली दिसते. जखमेवर तंबाखूचा चोथा लावणे इत्यादी औषधोपचार करण्याच्या पद्धती आहे.

सण-उत्सव आनंदाने साजरे करण्याची परंपरा प्रदेशाविशिष्ट आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. पंचमीच्या सणाला गोडधोड करणे, दिवाळीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करणे यापेक्षा पोळ्याचा सण वैशिष्ट्यपूर्ण वाटतो. जसे धनिकांच्या बैलाला पहिला मान असतो. पोळा फुटल्यावर दारोदार बैल जातात. तेथे स्त्रिया बैलांची पूजा करतात. बैलाचे कासरे धरणाऱ्याला पैसे दिले जातात. कौतिक हे सर्व भक्तिभावाने करते. सकीना मात्र बैलपूजा करीत नाही. हा प्रकार सर्वत्रच आढळतो. परंतु, "माशा मुरकुंट घेऊन जा -- यओ मारबत ......." खासी, खोकला - रोगराई घेऊन जाय -- रे बडूग्या !", "वैरी दुस्मलाने घेऊन जा -- यओ मारबत...." (पृ. १५३) पोळ्याच्या दिवशी पहाटे अशाप्रकारे सर्व लोक म्हणतात. हे वैदर्भीय जीवनातील सांस्कृतिक वैशिष्ट्य आहे. बालकाच्या अंत्याविधीचा प्रकार क्रियाकर्म करण्याची पद्धती वैशिष्ट्यपूर्ण आहे. कौतिकच्या मुलाच्या मृत्युनंतर तिसऱ्या दिवशी दोन वाट्यामध्ये गोमूत्र आणि दूध घालून स्मशानात जाऊन माती सावडली जाते. झाडाची पानं खुडून तिसऱ्या दिवशी दोन वाट्यामध्ये गोमूत्र आणि दूध घालून स्मशानात जाऊन माती सावडली जाते. झाडीजी पानं खुडून त्यांचा बाभळीचे काटे टोचून द्रोण केला जातो. द्रोणात

दूध अन् गोमूत्र टाकले. उदबत्ती लावली. नमस्कार केला जातो.

शुभ-अशुभाच्या काही कल्पनाही येथे दिसतात. डोळा लवणे, लहान मुलाने पाहुणे येतील असे म्हटले तर ते खरे ठरते असे मानणे, कावळ्याने कावकाव केल्यास पावना येतो किंवा कावकाव करणाऱ्या कावळ्याला हुसकायचे नाही,

महादेवचे गीत गुणगुणने संस्कृतिविशेष सांगणारे आहे.

"इस तन-धन की कौन बढाई - देखत नैनों मे मिट्टी मिलाई

अपने खातीर महल बनाया, आपहि जाकर जंगल मे सोया ......"

आस की मा, निरास का बाप,

होती की बहेन, निदान का दोस " (पृ.१९०)

त्याचप्रमाणे कौतिकचे अंगाईगीत वैशिट्यापूर्ण आहे -

"खेडुनि माडुनि आला गोपीजंद

पायना करा रुंद - त्याले पायन्याचा छंद." (पृ.६०)

डॉ. सुधाकर भोसले लिहितात, "गावातील हिंदू मुस्लिमांच्या परस्परांबद्दलच्या सौहार्दाच्या भावना, कौतिक सगीना यांचे भावबंध, एकमेकांचे सणसाजरे करण्यामधून व्यक्त होत असलेला गावातील लोकांचा एकोपा किंवा त्या पलीकडचेही जिव्हाळ्याचे रक्तापेक्षा घनदाट असलेले निबिड नाते, यसोदेचा ताप निघावा म्हणून केलेले ग्रामीण उपाय, प्रसुतीच्या वेळी मांगीण सुईण म्हणून येते. त्यांना लागणारे साहित्य, मृतमुलांचे अंत्याविधिपूर्वक संस्कार, जखमेवरची घरगुती औषधे अशा बारीकसारीक तपशीलांनी त्या प्रदेशाची खास वैशिट्ये उभी राहतात. " १०.

सांस्कृतिक जीवनचित्रणाच्या संदर्भात वरील विवेचन महत्त्वाचे वाटते.

लेखकाने एका सामान्य स्त्रीची परवड चित्रित करताना समकालीन आर्थिक परिस्थितीवरही प्रकाश टाकला आहे. विषमतेधिष्ठित अशी समाजरचना असलेली दिसते. धनिक अधिक गब्बर होत गेले, त्याचे कारण त्यांनी इतरांचे शोषण केले. त्यामुळे सामान्यांना साध्यासाध्या सुखापासून वंचित व्हावे लागले. अगदी प्राथमिक गरजा भागविणे दुर्लभ झाले. कौतिक महादेवसाठी एक मशीन घ्यायचे स्वप्न पाहते. ते पूर्ण होऊ शकत नाही. ती मुलांना शिक्षण देऊ शकत नाही. पोटासाठी गावोगाव गाडग्यामडक्याचा संसार हलविते. आर्थिकदृष्ट्या तिची कशी परवड होते. 'जेवणे' नव्हे तर पोटाची खळगी भरण्यासाठी चुनभाकरी, मुगाचा कळणा, मसराचं वरण, मुगावड्या खाणे. अपूर्वाईचे पदार्थ करंज्या, पापड्या, शंकरपाळे, गुळाचा शिरा, पुरणच्या पोळ्या तिला सणासुदीला सहजासहजी मिळत नाहीत. तिचे लक्ष्मीपूजन देखील आर्थिकदृष्ट्या होणाऱ्या परवडीचे घोतक आहे. "रात्री कौतिकनं जमिनीवर रांगोळी काढली. महादेवनं पाट मांडला. पाटावर तांबड्या तुसाचा तुकडा अंथरला. नंतर कौतिकच्या कानातल्या बिऱ्या, भीमा व नाम्याच्या कमरेचे कडेदोले आणि

पायातल्या चांदीच्या बेड्या ठेवल्या, सोबतीला सव्वारुपया होता.....'' (पृ.३९) कौतिकच्या लक्ष्मीपूजनाला 'लक्ष्मी'च नव्हती.

परिवर्तनकाळामध्ये पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या बलुतेदार-अलुतेदारांचे (कारु-नारु) उदरनिर्वाहाचे प्रश्न निर्माण झाले. आधुनिकीकरण आणि यांत्रिकीकरणाचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या व्यवसाय-रोजगारांवर झाला. नवीन व्यवसाय करणे पारंपरिक प्रतिष्ठेच्या कल्पनामुळे आणि सवयीमुळे जमेनासे झाले. त्यामुळे आर्थिक समस्या निर्माण झाल्या. 'धग' मध्ये शिंपी घराण्याच्या परवडीचे चित्रण होते. महादेवला फॅशन-बिशन माहीत नव्हती. स्वस्ताईच्या काळात पुरूष मशीनवर कपडे शिवायचे. स्त्रिया घरकाम करीत. अशा प्रकारे घरबैठा धंदा करण्याची सवय सर्वांना अंगवळणी पडलेली असले. परंतु दिवसेंदिवस महागाई वाढत जाते. त्यामुळे एकत्र कुटुंबात संघर्ष होतात. यामुळेच कौतिकच्या संसाराची परवड होते. गोदूबाई जावयाला नवीन सिंगर मशीन घेऊन देते. ते वेगळे राहू लागतात. नव्याने धंद्याला लागलेल्या महादेवजवळ साधा टेपसुध्दा नसतो. तेव्हा ती कपड्याच्या नाडीचा टेप करतो. मशीन कंपनीला दरमहा पाच रुपये हप्ता भरणे त्याला परवडत नाही. म्हणून हिंगणघाट सोडण्याचा तो निर्णय घेतो.

प्राथमिक गरजांसाठी धडपडणाऱ्यांचे विविध ठिकाणी शोषण होते. त्यांना अपमानित केले जाते. त्यामुळे त्यांच्या जीवनात ताण-तणाव वाढत जातात. जसे हिंगणघाट ते वर्धाच्या प्रवासामध्ये नामाचे तिकीट न काढल्यामुळे तिकीटचेकर त्यांना अपमानीत करतो. ''तो फिर गाडीमे कायकू बैठा, क्या तेरे बापकी गाडी है ?'' (पृ. ११) असे म्हणतो. आर्थिक विवंचनेमुळेच वर्धा ते चांदूर असा रेल्वेने प्रवास करू शकत नाहीत. मध्येच तळणी स्टेशनवर उतरतात. आणि पायदळी चांदूर-सैंदुर्जने मार्ग तळेगाव ठाकूरला येतात. तेथे आल्यावर सर्व मिळून कष्ट करतात. तेव्हा पोटाची खळगी भरता येते. सुगीच्या दिवसात कष्ट केले तर पुढे खायला मिळेल याची जाणीव तिला आहे. महादेवला ती आजारी पडण्याची भीती वाटते. तेव्हा ती म्हणते,

''अस्सं बरं काड्र होईन - काय मेनाबेगडाची व्होय कात काई होईन'' (पृ. ५१) मुलीला अफू देऊन ती घरात झोपून ठेवते व कामाला जाते. उदास, आळशी नवऱ्याला ती विश्रांती घेऊ देत नाही. वेळप्रसंगी रागावते, आणि कामाला लावते. बलुतेदारांना परंपरागत बैठा व्यवसाय करण्याची सवय लागल्याने शेतातील कष्टाची कामं होत नाहीत किंवा काही कामाची लाज वाटते. अशावेळी कौतिक नवऱ्याला तयार कपडे विक्रीचा धंदा करायला लावते. पुढे पायपीट करण्याचे त्याच्या जीवावर येते, तेव्हा नथुशेठ मशीन वापरायला देणार म्हणून मोझरीला मुक्काम हलविते. आर्थिक विवंचनेमुळेच मुलांच्या लहानसहान गरजा पूर्ण करता येत नाहीत. अशा सुखांपासून ते वंचित राहतात. जसे नामा-भीमा-जास्वंदीला नवे कपडे मिळत नाहीत.

अपूर्वाईचे पदार्थ खायला मिळत नाहीत. शाळेसाठी वह्यापुस्तके मिळत नाहीत. उलट आईवडिलांच्या तऱ्हेवाईकपणाचा अनुभव येतो. जसे, कौंडण्यपुरच्या जत्रेत सर्कस पाहण्याची इच्छा नामाला होते. तेव्हा वैतागलेली कौतिक म्हणते.

"नेऊन ठिवन मले थ्या सरकसवाल्यापासी. मंग रोच्ची तुले सरकस पाहाले भेटन." (पृ. १०४) किंवा वह्यापुस्तकांअभावी शाळामास्तर नामाला घरी पाठवितो, तेव्हा तो आईला म्हणतो,"मा, आता माह्या सायेचं कसं ओ ?", कसं कायचं !" ती सहजगत्या म्हणली होती, "चालत जा माह्यासंगं वावरात. लेका, तुह्या तकदीराले त चारीखून भोक आये, त्याले तू तरी काय करसीन आन मी तरी काय करु !" (पृ.२१९)

इच्छा असूनही मुलांना शिक्षण देणे आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांना जमत नाही. कारण, अन्न, वस्त्र आणि निवारा या प्राथमिक गरजा त्यांना पूर्ण करणे शक्य होत नाही. मृत्युनंतरच्या क्रियाकर्मासाठी देखील सावकारांचे पाय धरावे लागतात. अशाप्रसंगी देखील सावकार आपला स्वार्थ विसरत नाहीत. उदा. रघुनाथ शिंप्याची मशीन गहाण ठेवल्याशिवाय गणपत कलाल कौतिकला दहा रुपये देत नाही. मशीन सोडविताना व्याजाचे पैसे मागतो. मशीन मोझरीपर्यंत पोहच करण्याचे दोन रुपये गाडीभाडे मागतो. शेवटी तिला पाठीवर मशीन न्यावी लागते. खोटा दस्तऐवज करून बाखड्याचा घरजावई रघुनाथशिंप्याचे घर घेतो. धनिक, सावकार, भांडवलदारांकडून गरिबांची पिळवणूक होते. ते गरिबांचे शोषण करतात.

पैशापेक्षा सामान्यांना अब्रू किंमत अधिक वाटते. जसे कासम सकीनाच्या आर्थिक परिस्थितीचे चित्रण लेखकाने केले आहे. मुलीच्या लग्नासाठी दोनशे रुपये ते जमा करू शकत नाहीत. ते जवान मुलीचे लग्न करू शकत नाहीत. म्हणून बानोला ते सतत कामात अडकवितात. सकीना कौतिकला म्हणते, "आन् मून हे जवान खून घन मारन्यान आटवाले लावतो आमी ........ रिकामं रायलं त सयसय कराले पायते. त्याच्च्यात आफून पड्ल्लो गरीब मान्स. उद्या कायच्यानं काई झालं त कुठई जाता तोंड लपवाले ?" (पृ. १५०) बानोचे तारुण्य घन मारण्यात अटविणे, शेवटी दुसऱ्याचा टांगा हाकणाऱ्याशी बानोचे लग्न लावणे, यातून बलुतेदारांचा आर्थिक कोंडमारा स्पष्ट होतो.

कादंबरीत चित्रित झालेला काळ स्वातंत्र्यपूर्व काळातील आहे. ख्रिश्चन मिशनऱ्यांचा उल्लेख, त्याचबरोबरच ग्रामीण भागामध्ये शाळा सुरु झाल्याचाही उल्लेख येतो. शैक्षणिक जीवन चित्रण हा येथे महत्त्वाचा घटक नाही, तर कौतिकच्या जीवनातील ताण-तणावांच्या पार्श्वभूमीसाठी शैक्षणिक जीवन चित्रण येते.

कादंबरीच्या निवेदनाची भाषा ही प्रमाणभाषा आहे आणि संवाद वऱ्हाडी बोलीत आहेत. पात्रपरत्वे बदलणारी अशी बोली लेखकाने वापरली आहे. निवेदनातून व्यक्ति

आणि निसर्ग साकार होतो. त्याचप्रमाणे संवादातूनही व्यक्ती जिवंत होतात. कादंबरीचे निवेदन आणि संवाद काव्यात्म असल्याची साक्ष पानोपानी पटते. उदा. रघुनाथ शिंप्याच्या मृत्युप्रसंगी कौतिकचा आक्रोश काव्यात्मच आहे. म्हणी, वाक्प्रचार, नावीन्यपूर्ण शब्द, शिव्या, प्रतिमादीतून सामाजिक परिस्थितीचे, मानवी स्वभावाचे व त्यांच्या हर्ष-दुःखाचे प्रतिबिंब त्यात पडलेले आढळते. वऱ्हाडी माणसांच्या बोलण्यातील लकबी लेखकाने सहज शब्दबद्ध केल्या आहेत. उदा. राजे हो. आओ राजेहो, चालतेच आये, होतेच आये किंवा जलताई है, होताई है ! इत्यादी, किसना माळी-महादेव, सीता-कौतिक, सकाना-कौतिक, गोविंदराव-महादेवाचे संवाद अर्थघन, भाववाही, व्यक्तिदर्शन घडविणारे वऱ्हाडी बोलीचा नमुना आहेत. म्हणी आणि वाक्प्रचारांच्या स्वाभाविक वापरामुळे संवादांना जिवंतपणा प्राप्त झाला आहे. उदा. 'कुडाचं देड आन् झाडाचं घर करता यीन मूनं', 'कावळ्याला सरापानं गाई मरत त काय नोय', 'करसीन रांडे त खासीन, नाई त उपासी रायसीन', 'मांगं ना पुढं आन् कैकाड्याचं घोडं', 'येरे उंबरा आन् पड तोडांत,' 'खानेवाल्याईचं नाव दान्यादान्याईवर लेह्यलं असतं', 'ताहान लागल्यावर खांदजा अड.......', 'घरात आये गूर आन् दुखते तुमचा ऊर', 'मनी नाई नांदन आन् नांदोक्यावर बंदी आननं', 'जवय नाई कवड्या आन् बैंगन केवढ्या', 'होट खाईन आन् पोट वाट पाहीन', 'गाव करनं ते त राव नाई करतं', 'कुत्र्याचं सेपून नईत घातल्यानं कुठिसा सरकं व्हाले बसलं'.......मान्सानं मान सांगाव् जना आन् अपमान नाई सांगाय, कोना', 'मन चितेते थे वैरीई नसते चितत', 'माह्य होऊ राय आन् मी देईन ते खाय !', 'राजा मेला त राज नसते आन् नवरा मेला तर घरं नसते पडत......'', 'ज्याचं नाई कोनी आन् थो पडला वनी.....', 'एका जागडी भांडी न वाजता राहणे', घराचे फाटे मोजणे, आट कहाडत बसणे, फुकणी पडणे, आगीतून निघून फुफाट्यात पडणे, सारा सापा आन् देवा बाप्पा, खाता क्यहां तो होटमले अन् सोता क्यहां तो मोटारमे' इत्यादी म्हणीवाक्प्रचारातून समाजवास्तवाचे दर्शन घडते. तसेच प्रतिमाही ग्रामसंस्कृतीचे दर्शन घडवितात. उदा 'कौतिकचं शरीर पालेला पाहून विंचवाचं पडाव तस सैल पडलं, 'त्याचे विचार आग लागून विझलेल्या घरासारखे मुरदाड झाले होते', गळती लागलेल्या छप्परासारखे, भीमाचा उत्साह वाळून सांडलेल्या पाण्यासारखा जागच्या जागी आटला. ऊसाच्या पोटी कापूस जल्मून त्याईचा फायदा काय ? इ. तसेच अपरिचित व नाविन्यपूर्ण शब्दांच्या औचित्यपूर्ण वापरामुळे वातावरण निर्मिती होते. उदा. तुह्यासंग, कायले, पोट्टाले, मस्तकगिस्तक, उगामुगा, गुबडं, मेंदधुनी, नोका, होतकाडीत, इच्चकपना, लक्षिम्बाईले, खंदाड्या, मिठ्ठू, खासर-रेंग्या, कुठिसा, निंदाले, लेटला, सापता, गंजिफा, आर्बागेला इत्यादी वऱ्हाडी बोलीतील शब्दांप्रमाणेच शिव्याही अपरिहार्यपणे आलेल्या दिसतात. उदा. राक्केसीन, सुडक्या, कमिनावानाच्या, ईदुरा, मुरबक्या, भांचोत, खिसडा,

शाहाजोग, औल्यादीचा, मसन्यावान्याच्या, मरोमुरदा, मुरदांड्या इत्यादी शिव्यांचा आशयानुरुप वापर होत असल्यामुळे अश्लील वाटत नाहीत. 'वऱ्हाडी बोलीच्या सच्चेपणाचं मराठी साहित्यातील हे पहिलेच प्रभावी दर्शन होय........ महायुद्धोत्तर मराठी कादंबरीच्या इतिहासात ज्या मोजक्या कादंबऱ्यांनी प्रादेशिकतेचा प्रवाह कलात्मक बनविण्यात मोठे यश मिळविले आहे, त्यात 'धग'चा वाटा निःसंशय महत्त्वाचा आहे.''११. असे अ. रा. तोरो म्हणतात, तर 'साठ सालातली मराठी कादंबरी अब्रू घेणारी असली तरी उध्दव शेळक्यांची 'धग' ही एक अपवादात्मक कादंबरी आहे.''१२ असे शंकर पाटील यांनी म्हटले आहे. डॉ. म. सु. पाटलांना 'धग' ही एक वळणावरची कादंबरी वाटते.''१३.'' ही कादंबरी 'ग्रामीण' म्हणून नव्हे तर तिच्यातील कलात्मकतेमुळे, जीवनानुभवांचे अस्सल, अकृत्रिम, प्रभावी आणि हृद्य चित्रणामुळे श्रेष्ठ ठरली आहे.''१४. असा अभिप्राय डॉ. सुधाकर भोसले लिहितात. तर डॉ. भालचंद्र नेमाडे यांना 'धग' प्रादेशिक पोटभाषेतून देशी भावनाशीलतेचा अपूर्व आविष्कार वाटतो.''१५. प्रा. सं. त्र्य. फुल्ली यांनी म्हटले आहे, ''शेळक्यांचे मोठेपण हे की कौतिकच्या कुटुंबाच्या रूपाने संपूर्ण भारतीय ग्रामीण ( व शहरीसुद्धा) सामान्य माणसांचे किमान गरजेतून निर्माण होणारे हे पशूंच्या पातळीवरील दुःख त्याच्या सर्व कडांसह, प्रातिनिधिकपणे का होईना पण त्यांनी अत्यंत इमानाने मांडले.''१६. वरील सर्वच अभिप्राय 'धग''मुळे मराठी कादंबरी समृद्ध झाल्याचा निर्वाळा देणारे, तिचे माठेपण मान्य करणारे आहेत. डॉ. एस. एस. भोसले यांनी 'विदर्भाचे माडगुळकर' म्हणून उध्दव शेळक्यांचा गौरव केला, १७. तर प्रा. पुष्पा त्रिलोककर यांनी जागतिक कीर्तीची बंगाली कादंबरी 'पथेर पांचाली'शी 'धग'ची तुलना केली आहे. 'धग'च्या वाचनाने मराठी गद्याच्या भरारीचा एक नवा अधिक उंचावता, झेपावता टप्पा मनाला स्तिमित करून गेल्याचे सांगितले आहे.''१८. सारांश, मराठी कादंबरीला समृद्ध करणारी प्रादेशिकतेचा प्रवाह कलात्मक बनविणारी वळणावरची कादंबरी म्हणून 'धग'चा उल्लेख करावा लागेल.

### ३. बाबाराव मुसळे - *'हाल्या हाल्या दुधू दे !'*

बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुधू दे' ही १९८५ मध्ये प्रसिद्ध झालेली, तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी म्हणून प्रथम पुरस्कार मिळालेली कादंबरी आहे. 'धग', 'पाचोळा', 'गोतावळा', या कादंबऱ्याप्रमाणे हीदेखील वळणावरची कादंबरी आहे. डॉ. मधुकर वाकोडे यांनी कादंबरीचा नायक न्यानबाची तुलना डॉन क्विझोटशी केली आहे. न्यानबा पराभूत सरंजामी मनोवृत्तीचे एक ज्वलंत प्रतीक आहे, १९. असे म्हटले आहे, तर ''वात्सल्याचे उमाळे जपणारी प्रतिकूल परिस्थितीशी आपल्या सीमित सामर्थ्यानिशी झुंजणारी आनसा 'धग' मधल्या कौतिकची आठवण करुन देते

२०. अशाप्रकारे आनसा आणि कौतिकमधील साम्य प्रा. मृणाल चिंचाळकर यांनी सांगितलेली आहे. ही कादंबरी ग्यानबा-आनसाच्या संसाराची शोकांतिका आहे.

कादंबरीत प्रसंगाची सहेतुक मांडणी आणि त्यातून साकार होणारे बंदिस्त कथानक नाही, तर तुटक घटनाप्रसंगातून परिवर्तनकाळातील वास्तव चित्रित केले आहे. नऊदहा एकर जमीनीचा मालक न्यानबा, त्याची बायको आनसा, मुलगी सोबा आणि मुलगा पर्कास - असे हे छोटे सुखी कुटुंब आहे. परंतु अंथरुण पाहुन पाय न पसरल्यामुळे त्याच्या आयुष्यातं संकटाची मालिकाच सुरु होते. मेव्हण्याने भरीस घातल्याने न्यानबा सोबाच्या सुखासाठी ऐपत नसताना सावकाराचे कर्ज काढतो. तिचे लग्न करतो. सोडखरेदीने दिलेली जमीन सोडविण्यासाठी लहान तोंडी मोठा घास घेऊन स्वतःकडील जमिनीत कापसाची सुधारीत 'एच फोर' ही जात लावतो. कर्जाची सोय व्हावी म्हणून न्यानबा सोसायटीच्या कारकुनावर विश्वास ठेवून बॅन्केच्या कर्जाचे पाचशे रुपये पावती न घेता देतो. कारकुनाने बँकेत पैसे न भरल्यामुळे दुसऱ्यांदा भरतो. सावकाराकडून कर्जाऊ घेतलेली रक्कम मेव्हण्याची असल्याचे आणि त्याने विश्वासघात केल्याचे न्यानबाला समजते. न्यानबा नकळत गावातील गटबाजीच्या राजकारणाच्या विळख्यात सापडतो. गावातील संतोबा सावकार आणि शंकर पाटील यांचे पटत नाही. शंकर पाटलाच्या मदतीशिवाय न्यानबाचे पान हालत नाही. न्यानबाने शंकर पाटलाचे बैल शेताच्या मशागतीला आणले म्हणून सावकाराचा मुलगा रंगा पाटलाच्या बैलांना मारहाण करतो, तसेच न्यानबालाही बेशुद्ध पडेपर्यंत मारतो. कारकून, तलाठी आणि ग्रामसेवक त्याचे कर्जप्रकरण अडवितात. आनसा सावकाराच्या घरी गेल्याने न्यानबा-आनसामध्ये अबोला निर्माण होतो. दुष्काळ हे निसर्गनिर्मित संकट येते. सुखात असलेली सोबा बापाला कर्जबाजारी करून नांदायला जाते. माहेरला आली असता आजारी पडते. तिला तिचा सासरा सासरला घेऊन जात नाही. अगतिक न्यानबाला व्याह्याचा गैरसमज घालविण्यासाठी आणि सोबाला सासरी सोडविण्यासाठी जावे लागते. आनसाची भाची रखमा पाटलाच्या शेतावरील पडळीतून किटकनाशक चोरुन आणते. तिची चोरी न्यानबामुळे पकडली जाते. न्यानबाकडील सोबाचा म्हातारा बैल पुरात वाहून मरतो. सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करायचा प्रयत्न करीत असतानाच सोबाच्या सासऱ्याने तिच्यावर अतिप्रसंग केला, तिच्यावर आळतुफान घेतल्याने ती माहेरी येते. तिच्या काळजीत असतानाच न्यानबाला कॅन्सर होतो. शेतात लावलेला 'एच.फोर' भरपूर वाढतो. पण नर असल्याने त्याला कापूस येत नाही. सोबाचा नवरा विरहाने मनोरुग्ण होतो. कॅन्सरवरील औषधपचारासाठी न्यानबा झोपडीची जागा विकतो. परंतु बँकेच्या वसूली अधिकाऱ्यानी थकबाकीमुळे जप्ती आणल्याने अब्रू वाचविण्यासाठी कर्जफेड करतो. आकोल्याला दवाखान्यात जायचे राहून जाते. नवऱ्याला भेटायला सोबा नणंदेच्या गावी निघाली असता रखमा

वैरडाव साधते. सोबा सरकारी कामावरील साहेबाबरोबर पळून चालल्याची अफवा पसरते. तेव्हा ती आसराच्या बारवात जीव देते. आत्महत्येच्या प्रकारामुळे पंचनामा, पोस्टमोर्टेम आणि एकूणच गावभर बदनामी होते. सोबाबद्दलचा गैरसमज यादवनानांच्या सांगण्याने नाहीसा होतो परंतु आता वेळ गेलेली असते. शाळेत खेळताना पर्कासच्या अंगावर सावकाराचा नातू डिग्या पडतो. पर्कास बेशुद्ध होतो. त्याला आकोल्याच्या दवाखान्यात घेऊन जाण्यास न्यानबाकडे पैसे नसतात. संबा हा न्यानबाचा प्रेमळ पुतण्या पकार्सच्या मदतीला धावतो. पर्कासला औषधपाणी करुन घरी घेऊन येतो. तेव्हा कॅन्सरच्या आजाराने न्यानबाचा मृत्यू झालेला असतो. असा हा न्यानबाच्या जीवनातील नियतीचा खेळ आहे. कादंबरीचे शीर्षकच एका लोकगीतावरुन लेखकाला सुचलेले आहे. हाल्या दुध देत नाही हे माहीत असूनही न्यानबा त्याची धार काढण्याचा प्रयत्न करतो, ही नियती आर्थिकस्वरूपात अविष्कृत होते. जिच्या सुखासाठी सर्व केले ती सोबा जाते आणि आनसा-पर्कासला सोडून न्यानबाही स्वर्गवाशी होतो. अवघ्या नऊ-दहा महिन्याच्या काळात सामान्य माणसाची परवड होते. डॉ. एस. एम. कानडजे यांनी म्हटले आहे की, "समकालीन कृषिनिष्ठ अस्सल ग्रामीण वास्तव्याचा समर्थपणे वेध घेणारी, चिंतनप्रवृत्त व विचाराभिमुख करणारी गंभीर प्रकृतीची ही एक हृदयस्पर्शी शोकांत कुटुंबकथा आहे."२१. हा अभिप्राय कथानकाचे स्वरूप पाहिले तरी समर्पक वाटल्याशिवाय राहत नाही.

कादंबरीच्या आभारामध्ये लेखकाने म्हटले आहे की, "एक ग्रामीण म्हणून, मी माझ्या अवताल-भवताल वावरणाऱ्या माझ्या फाटक्यातुटक्या अडाणी माणसांची सुख-दुःखे, रागद्वेष, मोह-मत्सर, कण्हणे-कुंथणे इत्यादी सारे चढउतार माझ्या लेखनातून अत्यंत प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न केला.२२ लेखकाने वरील मनोगत सार्थ वाटते. कारण सुष्ट आणि दुष्ट व्यक्तींच्या संघर्षातून न्यानबाची शोकांतिका आकार घेते. न्यानबा, आनसा, पर्कास, सोबा, शंकपाटील, संबा-वछला हे सुष्ट आहेत तर संतोबा सावकार, सोबाचा सासरा, तिचा मामा रावसाहेब आणि रखमा हे दुष्ट आहेत. ग्रामीण लोकांचे प्रतिनिधित्व करणारे रंग्या, यादया, देव्या, बळीराम, तुका माळी, गोईंदा, गोईंदाची म्हातारी, रघु तिरमख, सोना काळ्या, वसंता, सोबाच्या गावचा पाटील, तिचा भाया, तिचा गडी, जान्या मांग, सोबाचा नवरा, शाळा मास्तर, डिग्या, शामा डॉक्टर, यादव, गुंफा या गौण व्यक्तिरेखा आणि पांडेबुवा तलाठी, ग्रामसेवक, सोसायटीचा कारकुन, बेनॉरचे हिरवेसाहेब, बँकेचे वसूली आधिकारी, पोलीस हे भ्रष्ट प्रशासन व्यवस्थेतील सेवक लेखकाने रेखाटून परिवर्तनकाळातील समाजवास्तवाचे दर्शन घडविले आहे.

न्यानबा काळे हा भोळा-भाबडा, गरीब-निरपराधी, साधा-सरळ, भिडस्त, पापभीरू, स्वच्छ चरित्र्याचा, प्रयत्नवादी आपण भलं आणि आपल काम भलं म्हणणारा सामान्य

शेतकरी आहे. सामान्य आर्थिक परिस्थितीमुळे त्याला सोबाच्या लग्नाची काळजी वाटते. मेव्हण्याच्या सांगण्यावरून धनिकाच्या घरात तो मुलगी देतो. कर्जबाजारी होऊन मरतो.

आनसा ही न्यानबाची व्यवहारी, सोशीक, समजदार, शहाणी, खानदानी, निष्ठावान, कष्टाळू, सरळमार्गी, प्रेमळ पत्नी आहे. मुलगा, मुलगी आणि नवऱ्यावर तिचे खरेखुरे प्रेम आहे. सोबा ही नैतिकता जपणारी निष्कपट, इज्जत-इभ्रत जपणारी, शालीन-सुशील निष्पाप, अबोल तरुणी आहे. सासऱ्याने अतिप्रसंग केल्याने खचलेली, आईवडिलांच्या गैरमर्जीस कारण ठरलेली सरळमार्गी नवऱ्याच्या विरहाने झुरणारी आणि रखमाने बदनाम करण्याचा प्रयत्न केल्यामुळे आसराच्या बारवात जीव देते. पर्कास हा निरगस, अल्लड, निष्पाप, खेळकर मुलगा आहे. तर शंकर पाटील सरळमार्गी, निःस्वार्थी, निर्मळ, प्रेमळ, निरपेक्ष, न्यानबाचा हितचिंतक मित्र आहे.

रावसाहेब हा सोबाचा मामा, आनसा चाभाऊ लबाड, स्वार्थी, ढोंगी, लोभी, पैशाची हाव सुटलेला, नातगोत विसरलेला, विश्वासघातकी, समूहसंस्कृतीत आचार-विचारांना झुगारणारा, कुटील, कपटी, निदर्य, समानुभूतिशून्य निष्ठूर असा आहे. तर संतोबा सावकार खऊट, ढोंगी, कुऱ्हाट, आठमुठा, उपटसुंब, कुटील, कपटी, राशीला लागल्यावर सत्यानाश करणारा खलप्रवृत्तीचा आहे. तर 'रखमी' ही आनसची भाची लावालावी करणारी, चोरटी, खुनशी, चहाटळ आहे. सोबाचा सासरा हा वासनासक्त, उलटयाकाळजाचा, दोन सुनांचे बळी घेणारा, सोबावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्यावर आळतुफान घेणारा कामांध आहे. ही चारही दुष्ट प्रवृत्तीची माणसं आहेत.

विदर्भातील वाशिम-अकोला परिसरातील खेड्यांची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. विदर्भात कापसाचे पीक महत्त्वाचे आहे. विदर्भाइतका अन्यप्रदेशात कापूस पिकत नाही. म्हणून कापसाच्या पळहाटी, कंबोडी या जातींऐवजी सुधारीत एच. फोर, एच.सिक्स, ए. के. एच. फोर, चारशे अडुसष्ट डी. एच. वाय., महालक्ष्मी इ. कापसांच्या जातीचे बी लोक वापरतात. कापूस फेडरेशन, शेतकरी संघटना यांचेही उल्लेख कापसासंबंधीच येतात. याबरोबरच ज्वारी, करडाई, उडीद, मूग, तूर इ. पिकेही प्रदेशविशिष्ट्य आहेत. पळस, चिल्होरी, हिवर हे प्रदेशविशिष्ट वृक्ष आहेत. विदर्भातील काळ्या मातीचा उल्लेख (पृ. ९९) तसेच आसराच्या बारवाजवळील डोंगराळ जंगलाच्या प्रदेशाचे (पृ. ७१) वर्णन लेखक करतो.

ऋतुचक्राप्रमाणे रंगबदलणाऱ्या निसर्गाचे पात्रांच्या मानसिकतेनुरुप चित्रण लेखकाने केले आहे. जसे, कृषिजीवनात आषाढ महिना गडबडीचा असतो. "आखाडतोंडचा एक रट्टावून पाणी पडला. उन्हाळाभर उडालेला, अन घराघरावर, झाडाहयाच्या फांद्या-पानावर साचलेला धुरळा पार धुवून निघाला. तात्पुरती उन्हाची काहीली

काहीशी कमी झाली. पण एक दोन दिवसच पुनः उन्हं इंखासारकं तपू लागलं. पहिल्यापरीस गरमी अदिकीची व्हऊ लागली. धडधाकट मानसाह्यले जीव गरमीनं गुदमरु लागले. मथाऱ्या कोताऱ्याह्यचं त मरणच आलं. त्याह्यले दिवस डोंगराएवढा वाटू लागला.''(पृ.२०) हे मानवाच्या जीवनावर परिणाम करणारे विदर्भातील उन्हाळ्यातले चित्र प्रदेशविशिष्ट आहे. ''....तिनं आभाळाकडे पाह्यलं. ढग गच भरले व्हते. त्याच्यानं एकबी चांदणी उघडी दिसत नव्हती.''(पृ.५५) जीवनात एकही आशेचा किरण न दिसणाऱ्या आनसाच्या मानसिकतेनुरुपच वरील निसर्गचित्र आहे. तर विदर्भातील पावसाळ्याचे वर्णन पहा.

''दिवस सरत आला तरी, पाऊस थांबला नाही. वावरात फट्याह्यनं पोटऱ्याइतकालं पाणी वाहू लागलं. पाऊस सुरु झाला तव्हाच कसं अंधारुन आल्यावाणी झालं व्हतं. धांदलभर अंतरावरचे झाडंझुडुपं दिसेना. पावसाचे थेंब झाड्याच्या पानाह्यवर पडल्यानं जिकडंतिकडं निसता टपटप टपटप आवाज भरला व्हता. त्यात कव्हाबव्हा गरजात बी व्हतं. कडकड इजा बी जमकत व्हत्या........ काळ्या मातीत तिचे पाय पोटऱ्यालोकं चिखलात रुतत व्हते.'' (पृ. ९८-९९) नवऱ्याचा आजार, एच. फोरची भानगड, सोबाच्या नांदण्याचा वांदा असा आनसाच्या मनातील अंधार आणि निसर्ग एकरूप झाला आहे. अस्वस्थ मनःस्थितीमुळे पावसाच्या आगमनाबरोबर घराकडे पळण्याची बुद्धी तिला झाली नाही, उलट ती संकटात सापडली. सोबाचा बैल वाहून मेला. ती रात्रभर ओढ्याखाली गारठत बसली.

परिवर्तन काळातील शोषणमुलक समाजवास्तवाचे चित्रण गरीब शेतकरी न्यानबाच्या जीवनाधारे रेखाटले आहे. भ. पुं. कालपे या कादंबरीविषयी म्हणतात, ''या कादंबरीतील समाजजीवन ग्रामीणतेच्या नाळेपासून कुठेही परके दिसून येत नाही. ते नैसर्गिक व स्वाभाविक वाटते. ते रेखाटताना लेखकाने कुठेही मूल्यमापनात्मक सांकेतिकतेच्या मर्यादा येऊ दिल्या नाहीत किंवा लेखक कुठेही व्याजतंत्राच्या आहारी गेलेला दिसत नाही. ''२३. या अभिप्रायावरुन प्रस्तुत कादंबरीतील ग्रामीण वास्तवाचे स्वरुप लक्षात येते. त्याचप्रमाणे लेखकाने ग्रामीण जीवनातील सुष्ट-दुष्ट प्रवृत्तीचे चित्रण प्रामाणिकपणे केले आहे. इंदुमती लहाने म्हणतात, ''ग्रामीण जीवनातील समान मनाची माणसे, त्यांचे बारीक-सारीक, धागेदोरे, त्यांची भांडणे, प्रेम, राग, लोभ, त्यांच्या भाबड्या कल्पना इ. चे सूक्ष्म निरीक्षण करण्यात लेखक अतिशय यशस्वी झालेला आहे. जे सांगायचे ते निर्भीडपणे, प्रसंगी ग्राम्य शब्दांचा सहजपणे उपयोग करुनही सांगितलेले आहे. नवीन सुधारणांचा, राजकारणाचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणास हे बदलत्या खेड्यांच्या जीवनाचे वास्तव दर्शन घडविणारी ही कादंबरी अतिशय समर्थ ठरली आहे. २४. या त्यांच्या विवेचनावरुन कादंबरीतील समाजजीवनाची कल्पना येते. मुलामुलींच्या सोयरिकीच्यावेळी भाऊबंदांना बोलविण्याची, त्यांचा सल्ला घेण्याची

पध्दत ग्रामीणसमाजामध्ये असते. त्यामुळे नवीन सोयऱ्याची ओळखपाळख होते, त्याच्या खानदानाविषयी, कुळगोत्राविषयी चौकशी करता येते. लग्नातील मानपान हुंडा सर्वासमोर ठरविला जातो. परस्पर सोयरिक केली तर लोक लग्नाला येत नाहीत लग्नामध्ये विश्वासघात होऊ नये म्हणूनही भाऊबंद निमंत्रित केले जातात. 'सोबा'साठी 'धकंड' घराण्यातील सोयरिक तिचा मामा आणतो, पसंतीनंतर बोलाचाली होण्यापूर्वी चारदोन लोकांना, कमीतकमी शंकर पाटलाला बोलवावे असे न्यानबाला वाटते. परस्पर लग्न जमविणे त्याला मान्य नाही. अशा वेळी तो आर्थिक कारण सांगून बैठक पुढे ढकलण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या भिडस्त स्वभावाचा मेव्हणा फायदा घेतो. लग्न जमते. सावकाराचे कर्ज काढून लग्न केले जाते. परंतु मेव्हणानी विश्वासघात करताना नीतीअनीतीचा विचार करीत नाही. नवीन सोयऱ्याने दोन सुना मारल्याचे माहीत असूनही दलालीसाठी किंवा गावातील विधवा बाईच्या संपत्तीवर डोळा ठेवून भाचीचा तो बळी घेतो. (पृ.१२३) बहिण-मेव्हण्याचा विश्वासघात करतो. बहिणीकडून व्याज मिळणार नाही म्हणून स्वतःचे पैसे सावकाराच्या हाताने जमीन गहाण ठेवल्यानंतर देतो. व्याजासाठी सावकाराशी भांडतो. सावकाराची मुलगी त्याच्या घरात दिलेली असते तिला वेठीस धरतो. सोबाचा सासरा न्यानबाला एच. फोरचे खोटे 'बी' देऊन फसवितो. सोबावर अतिप्रसंग करतो. सोबाच्या भायाने खोट्या 'बी'याण्यांची विक्री केल्यामुळे लोक त्याला स्टँडवर मारतात. (पृ. १४७)

धनिकांची सामान्य माणसांवर दहशत आहे. त्यांच्या विरोधात कोर्ट-कचेरी करायला लोक घाबरतात. संतोब सावकार आडमुठेपणाने न्यानबाच्या जमिनीचा ताबा घेताना जास्त जमीन घेतो. रंग्या-यादया त्याला बेशुद्ध पडेपर्यंत मारतात. बांधावरील बाभळ तोडतात. तरीही 'भांडणाचं तोंड काळं असते' हे ओळखून आनसा सावकाराकडे जाऊन वाद मिटविण्याचा प्रयत्न करते. याप्रमाणे सोबाच्या सासऱ्याच्या वर्तनाविषयी माहिती देतांना गडी घाबरतो, लहान तोंडी मोठा घास घ्यायचे तो टाळतो, "...अन् समजा सांगतलं बी, अन् त्या बुवाले समजलं त त्यो गावात सुकानं राहू तरी देईल का?"...(पृ.१२०) असे महणतो. यावरुन धनिकांच्या आडमुठेपणाची-दहशतीची कल्पना येते. आर्थिक समस्या असणाराने धनिकांच्या भानगडीत पडू नये हे प्रत्येकजण ओळखून असलेला दिसतो. लोकांमधील प्रामाणिकपणा-माणुसकी नष्ट झाली, व्यवहार-स्वार्थ महत्त्वाचा ठरला. लैंगिक पिसाटपणा, अनैतिकता वाढली. जसे बाजारात न्यानबाने खरेदी केलेली मणभर ज्वारी संपतचा गडी अर्धीच घरी आणतो. बळीराम नावाचा शेतकरी न्यानबाला शेजारी हायब्रीड पेरु नका म्हणून विनंती करतो. त्याबदल्यात ज्वारी देण्याचे कबूल करतो. परंतु न्यानबा ज्वारी मागायला गेल्यावर शब्द फिरवतो. दिलेल्या शब्दाला आज किंमत राहिली नाही. शब्द फिरवणाऱ्यांची संख्या वाढली. कामापूर्ते लोक जवळ येतात, उदा. सोसायटीतून खत मिळावे म्हणून सोन्याकाळ्या

न्यानबाला चहापाणी करतो. कारण वाशीमच्या सोसायटीत सोबाचा भाया कामाला असतो. न्यानबाचा तो वशिला लावण्यासाठी उपयोग करतो. वसुली अधिकऱ्यांबरोबर असलेले तरुण कारकून सोबाच्या उघड्या देहाकडे टक लावून पाहतात.

आपापसातील वाद-भांडणावर गावभर चर्चा होते. अफवा पसरविल्या जातात. वाद मिटविण्याऐवजी आग लावतात. दुतोंडेपणा करतात. गरीबांचे संसार उधळतात. गरीब मात्र अब्रूला जपतो. रंग्याने पाटलाचे बैल आणि न्यानबाला मारले. त्याच्या मदतीसाठी कोणीही पुढे आले नाही. नंतर मात्र गावात अफवा पसरतात. शंकर पाटलाने न्यानबाच्याविरोधी फिर्याद दिली. किंवा सावकाराच्या विरोधात न्यानबाने फिर्याद दिली म्हणून रंग्याने स्वत:च्या हाताने डोकं फोडून न्यानबाच्या विरोधात फिर्याद दिली. हे सर्व असत्य असते. न्यानबाला भेटायला आलेले लोक सावकाराला शिव्या देतात, त्यांनीच न्यानबाला मार खाताना सोडविण्याची माणुसकी दाखविलेली नसते. सर्वजण गंमत पाहत उभे होते. तेच सल्ले देतात. आनसा सावकाराच्या घरी गेल्याचे समजल्यावर न्यानबा संतापतो. तिला गावातून राघोबाच्या घरापर्यंत ओएत नेतो. तेव्हा गावकरी जमा होतात. गंमत पाहतात. समाजात बेअब्रू झाल्यामुळे रागावलेली आनसा नवऱ्याबरोबर बोलणे सोडून देते. घराबाहेर पडत नाही, लोक काय म्हणतील? याची तिला भीती वाटते. (पृ.३९) सोबाचे टापस हरवले असता न्यानबाने ते मोडून खाल्ले असे रंग्या तिच्या सासऱ्याला सांगतो. तो सोबाला न घेताच माघारी गेल्याचे गावभर होते. सोबाच्या सासऱ्याने तिच्यावर अतिप्रसंग केल्याने तिच्या नांदण्यात वांधा येतो. गावकरी-भाऊबंदामध्ये अप्रतिष्ठा झाली म्हणून ते घराबाहेर पडत नाहीत. लोक मात्र पोटगी मागण्याचा-घटस्फोट घेण्याचा सल्ला देतात. बँकेचे कर्जवसुली अधिकारी न्यानबाच्या घरावर जप्ती आणतात. तेव्हाही गाव जमा होते, झोपडीच्या जागेचे पैसे न्यानबा त्यांना देऊन बेअब्रू टाळतो. औषधोपचाराचा पैसा तो बँकेचे कर्ज भरण्यासाठी देतो. स्वत:च्या जीवापेक्षा न्यानबासारख्या गरीबांना समाजातील प्रतिष्ठा महत्त्वाची वाटते. सडकाच्यासायबाबबरोबर सोबा पळून चालली होती अशी दसऱ्याच्या दिवशी रखमी अफवा पसरविते. बदनामीमुळे सोबा आसराच्या बारवात जीव देते. लोक खरेखोटे न पाहता आपले मत नोंदवतात. सोबाचे प्रेत बारवेतून काढून त्वरीत सरणावर चढविण्याचा निर्णय शंकर पाटील घेतात. ऐनवेळी दोन पोलीस हजर होतात. निनावी अर्ज केल्यामुळे ते आलेले असतात. 'पंचनामा, जबानी, चिरफाड या सर्व गोष्टींमुळे जी अप्रतिष्ठा होते त्यामुळे सोबासाठी रचलेल्या सरणवर जितेपणीच बसावे असे अनसाला वाटते. सोबाच्या वर्तनाबद्दल सत्यपरिस्थती सांगण्यासाठी यादवनाना येतात. तेव्हा आनसा म्हणते, "काय तिनं नाक ठेवलं आमचं? समद कापून काहाडलं, मरुन त गेली रांड, पण आमची थकत्या पराईत आब गमावली. त्याच्या परता त बाळात्यातच मेली सती त बरं झालं असतं!" (पृ. १६७) सामान्य

माणसाला इभ्रतीची अधिक काळजी वाटत असते.

समकालीन वास्तवाचे चित्रण करताना जातिभेद समूळ नष्ट झालेला नाही. आनसाच्या माहेरचा जान्या मांग खुशाली चौकशीसाठी येतो तेव्हा दाराजवळच बसतो. टकऱ्या तांब्यात त्याला आनसा पाणी देते. तो तांब्याला तोंड न लावता पाणी पितो. तांब्या पालथा घालतो. (पृ.१३३) यातून असे दिसते की उंबऱ्याच्या आत येऊ न शकणारे मागासवर्गीय दारात येऊन बसू लागले. परंतु त्यापुढे बैठकीवर ते बसू शकत नाहीत. तसेच तांब्याला तोंड न लावता पाणी पितो यातून विटाळ, बाटणे किंवा स्पर्शबंदी या गोष्टींचीही कल्पना येते. तो ज्या तांब्याने पाणी पितो, तो पालथा घालतो, बाहेरच ठेवतो. थोडक्यात, जातिभेदाच्या कल्पनांमध्ये बदल झाला, परंतु तो समूळ नष्ट झालेला नाही.

जयंतकुमार बंड यांना प्रस्तुत कादंबरी प्रातिनिधिक वाटते. ते लिहितात, "ही शोकांतिका केवळ एका न्यानबाची नाही तर मोहाच्या पाठीमागे लागून नको ते करु पाहणाऱ्या अर्थनियतीचे बळी ठरलेल्या, नोकरशाहीने ग्रासलेल्या, परिस्थितीने पीडलेल्या, गरीबीने गांजलेल्य, नातेवाईकडून नाडल्या गेलेल्या पापभीरु, अतिचांगूल, भिडस्त शेतकऱ्याची शोकांतिका ठरते."२५. याचप्रमाणे पुढे ते लिहितात, "बाबाराव मुसळ्यांच्या ह्या कादंबरीला वास्तवाचे प्रभावी परिणाम लाभलेले आहे आणि हे वास्तव आहे ग्रामीण. ग्रामीण जनजीवनाचे ग्रामीण मानसिकतेतून केलेले हे चित्रण असल्याने ते वास्तव उतरले आहे. न्यानबाची शोकांतिका म्हणून केवळ न्यानबावर लेखकने आपले संपूर्ण लक्ष केंद्रित केलेले नाही. तर न्यानबा ज्या ग्रामीण परिसरात जगत आहे, त्या ग्रामीण परिसराला त्यांनी जिवंत केले आहे. खेड्यातील माणूस आज ज्या संक्रमणातून वाटचाल करीत आहे, त्याचे यथातथ्य चित्रण या कादंबरीत झालेले आहे. शेतीसुधारणा, रासायनिक खतं, सुधारित बी-बियाणे, पंप या सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून सरकारने आखलेल्या योजना व त्यातील भ्रष्टाचार आणि त्यामुळे नाडला गेलेला शेतकरी तर या कादंबरीत उभा राहतो पण त्याचबरोबर तो परिसरही जिवंत होतो. लोकमानसाचा वेध घेण्याचे मुसळ्यांचे सामर्थ्य लक्षणीय आहे..."२६. हा जयंतकुमार बंड यांचा अभिप्राय कादंबरीचे सार्थ मूल्यमापन करणारा आहे. जी गोष्ट अप्राप्य आहे ती मिळविण्यासाठी माणूस धडपडतो. ती मिळत नाही तरी उरी फुटून मरेपर्यंत प्रयत्न करतो. कादंबरीतील न्यानबा अशाच प्रकारे हाल्याचं दूध काढण्याचा प्रयत्न करतो. परिस्थिती अधिक खालावली. त्यांचे विविध मार्गांनी शोषण होऊ लागले. आर्थिक विषमता निर्माण झाली. धनिक अधिक धनवान झाले. गरीबांची गरीबी वाढली. अगदी प्राथमिक पातळीवरील जीवन ते जगू लागले. साध्यासुध्या सुखांपासून त्यांना वंचित रहावे लागले. शेतकरी कर्जबाजारी झाला. त्याला महागाईच्या काळात त्या चक्रातून बाहरे पडणे अवघड झाले. कारण उत्पन्न काही प्रमाणात वाढले

त्याच्याचारपट खत-बी-बियाणे, किटकनाशके यांचे दर वाढले. मजूरीचे दर वाढले. परंतु शेतमालाच्या किंमती ठरविण्याचा अधिकार फेडरेशन, मार्केट कमिट्या आणि खरेदीविक्री संघातील कर्मचाऱ्यांना आहे. स्वत:च्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार स्वत:ला नाही. सर्वच कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या भ्रष्टाचारामुळे त्याच्या आर्थिक जीवनमानावर प्रतिकूल परिणाम झाल. भाडवलशाहीकडे तोल गेलेल्या किडक्या मुक्त अर्थव्यवस्थेने सामान्य शेतकऱ्याला दुबळा बनविले. माणूस स्वार्थ, पैसाआणि अर्थनियतीचा दास बनला आहे. त्यामुळेच. न्यानबाची शोकांतिका झाली. घरातील कापूस आणि बैल विकून सावकाराचे कर्ज घेऊन सोबाचे लग्न केल्यावर न्यानबाची प्रयत्न करुनही आर्थिक परिस्थिती सुधारत नाही, विविध ठिकाणी त्याला अडचणी येतात.

आधुनिक पद्धतीची शेती सामान्य शेतकऱ्याला झेपत नाही. मनुष्यबळ आणि भांडवलाअभावी अधिक उत्पन्न मिळविणे अशक्य होते. खर्च अधिक उत्पन्न कमी अशी परवड होते. कर्जबाजारी न्यानबा एच् . फोरवर वेळेवर फवारणी करु शकत नाही. अंगापरीस बेंगा मोठा झाला. (पृ. ९८) असे त्याला वाटते. स्वत:च्या आजारावर आर्थिक परिस्थितीमुळेच इलाज करु शकत नाही. आजार अंगावर काढल्याने अवेळीच त्याचा मृत्यू होतो.

सरकारी योजनांमधील गैरव्यवहार-भ्रष्टाचारामुळे सामान्य माणसाची निराशा झाली. दुष्काळामध्ये ग्रामीण जनता उपाशी मरु नये म्हणून सरकारने दुष्काळी कामे सुरु केली. तेथे अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार करुन गरीबांचे शोषण केले. शेतकऱ्यांसाठी खत, बी-बियाणांसाठी शासनाने अनुदान जाहीर केले. तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी शेतीउपयुक्त अवजारे पुरविण्याची योजना राबविली. त्याचा फायदा धनिकांनी घेतला. सामान्य शेतकऱ्यांपर्यंत ती अवजारे आलीच नाहीत. उदा. शंकर पाटलाने न्यानबाच्या नावाने किटकनाशक फवारणी पंपासाठी अर्ज दिला. तो मंजूर होऊन आल्यावर पाटलाने पंप घेऊन टाकला. अल्पउत्पन्न गटातील शेतकरी-शेतमजुरांसाठी सरकारने विहीर, बांदबंदिस्ती, गोबरगॅस, जनावर-पंपासाठी कर्ज दिले. मोठ्याप्रमाणावर सूट दिली. अशावेळी धनिक शेतकरी अल्पउत्पन्न गटात नावे नोंदवून फायदा घेतात. ज्यांच्यासाठी योजना आहे त्यांना लाभ मिळत नाही. लेखक निवेदन करतो, "सरकारच्या समद्या योजना शेतकऱ्याले आतल्या खांदी आणायच्या. काहून त योजना सुदी असली तरी ती शेतकऱ्याच्या हाती पडस्तोर चवभवतालजून तिचे लचके तोडून खाणारे लयझंण, त्याह्यनं खाऊन खाऊन शिल्लक राह्यलेली योजना, शेतकऱ्यांच्या गळ्यात पडते. पैसा घेतानी त शेतकऱ्याले काही वाटत नाही, पण मंग भरतानी त्याले न भेटलेले मध्यांत्र्यह्यनं खाल्लेले पैसे बी त्याले भराचं काम पडते, तव्हा तयाचे डोळे पठाडाले जातात." (पृ.११६) शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी

शासनाने बेनॉर योजना सुरु केली. त्या योजनेतील हिरवेसाहेब न्यानबाला मार्गदर्शन करतो, पैसे खाणार नाही म्हणून सांगतो. त्यावर न्यानबाचा पूर्वानुभवामुळे विश्वास बसत नाही. तेव्हा तो म्हणतो, "सायब अन् असं सरकार सपनातच दिसंल, एऱ्ही..." (पृ. ७९). यातून सरकारी योजनाबद्दलची निराशाच दिसते. समकालीन पिढीतील शेती संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचार आणि त्यामुळे गरीब माणसाला येणारा संताप लेखक सरळसरळ निवेदनातून प्रकट करतो. उदा. "एऱ्ही हे नोकरशाहीवाले लयच माजल्यावाणी करायले. मंग त्या पांडेबुवा असो का सोसायटीचा कारकून असो. ग्रामपंचायतचा ग्रामसेवक असो वा कोण्णा हापीसचा बाबू असो. समद्याह्यलेच कामाआंधी गड्ड्या खायाले पाह्यजे. काम व्हतो का न व्हवो, पयले माल लाव! अश त्याह्यच्या मायची भाडच इथिसा जमा करुन ठेवली."(पृ. २१)

सरकारच्या शिक्षणप्रसाराच्या धोरणामुळे ग्रामीण भागातील तरुण साक्षर झाले. कारकून-तलाठी आणि ग्रामसेवकाच्या नोकऱ्या मिळाल्या. त्यांनी आपल्याच बांधवांकडून पैसे खायला सुरुवात केली. कर्जप्रकरणात पंधरा रुपये शेकडा ते बक्षीस मागू लागले. बँकेचे पैसे न भरता चैन करु लागले. यांची साक्ष न्यानबाचे स्वगत देते. उदा. "...समदे भोसडीचे खाऊजीच; कणगाळीवर मुता मनलं त, त्याचे पण हे लोक पैसे द्या मनतील. कुठीसाबी पैसा खाल्याबिगर कोणी उभं राहू देत नाही... तरी बरं झालं. भटबामणाच्या पोटचे नाहीत. पह्यला जमान्यात ते बक्षिसी मांघत, पण अशी उटसूट कहाची बी द्या मनत नसत. हे त खेड्यापाड्याचे. शेतकऱ्याच्या रक्तोचेच असून बी, शेतकऱ्याह्याचे कामं पैसा खाल्याबिगर करत नाहीत." (पृ.७) किंवा "...कोणत्याबी नवकरीवर समदे खेडेपाड्याचेच भरले ना! आदुगर असं वाटे की, हे समदे आपलेच मानसं, आता आपले काम पटपट व्हतील. पण काहाचे हो? पह्यल्यापरीस हे बहाद्दर भरले. पह्यले तर पैसाच खात, आपले मनता हे त मानसालेबी खायाले जोर करतात. काय जमाना आला ह्यो? अशानं कसं व्हवावं या दुनयेचं? (पृ.२१-२२)

सावकाराच्या रंग्याने न्यानबाला बेशुद्ध पडेपर्यंत मारले. तरी त्याने पोलिसात गुन्हा नोंदवू नये असे पाटील सुचवतात. "उलटे पोलीस चवकशीले आल्याचं नाटक करतील अन् तुझ्याकडून शंभर दोनशे उपटतील अन... (पृ.२९) असे आनसाला पाटील सांगतात. त्याचप्रमाणे पांडेबुवा तलाठी खाते उतारा देताना, अर्ज लिहून देताना पैसे घेतो. जमिनीची मोजणी करताना ज्याच्याकडून जास्त पैसे मिळतील त्याचा फायदा करुन देतो. गरीब श्रीमंतामध्ये असलेली तफावत आणि ठिकठिकाणी नाडला जाणारा गरीब माणूस याचे प्रत्ययकारी चित्र लेखकाने रेखाटले आहे. फेडरेशन देखील भ्रष्टाचाराने पोखले गेले. धनिकांचे कुठेही काही आडत नाही. पैशाने सर्व कामे होतात. परंतु सामान्य शेतकऱ्याचा उत्कृष्ट दर्जाचा माल निकृष्ट ठरवून कमी किंमत दिली जाते. तर धनिकांच्या निकृष्ट मालाला उत्कृष्ट ठरविले जाते.

"खरं त गरीबाचाच कोणी वाली नाही. जे मोठमोठ्या खटल्यावाले शेतकरी हायतं, त्याह्यचं कशानं काही अडत नाही. त्याह्यचा बुरीचा कापूस एच. फोर. मनून पह्यल्या ग्रेडात मुकाट्याने जाते अन गरिबाचा एच.फोर ग्रेडर लोकाह्यले बुरीसारखा वाटते. ते बुरीचा भाव देतात. असंच कुठीसा बी, कोणत्या बँकेत, आफिसात, कोर्ट कचेरीत या मोठ्याहयजवडे दामाजी असतात. दामाजी मव्हरं ते कोणालेबी इकत घेतात, त्याह्यचे कामं आडू देत नाहीत..."(पृ.१५२)

अशाप्रकारे बँका, सोसायट्या, ग्रामपंचायती, तहसील खाते, पोलीस खाते, कापूस फेडरेशन भ्रष्टाचाराने पोखले गेले आहे. भांडवलशाहीकडे अर्थव्यवस्थेचा तोल गेला आहे. त्यामुळे शासकीय योजनेबद्दल सामान्य शेतकऱ्यांमध्ये निराशा वाढीला लागलेली दिसते. त्यामुळे त्यांच्या विकासाला खीळ बसलेली दिसते.

राजकारण्याच्या दुटप्पी वर्तनाचे चित्रण लेखकाने केले आहे. सत्ता मिळविण्यासाठी -मतांसाठी त्यांना शेतकऱ्यांचा पाठिंबा हवा असतो. परंतु ते खुर्चीत बसल्यावर त्यांना शेतकऱ्यांचे हित दिसत नाही. जनहिताचा त्यांना विसर पडतो. सत्ता मिळविण्यासाठी शेतकऱ्याला वापरुन घेणारे मंत्री शेतकऱ्यांच्या मोर्चावर पोलिसांकडून लाठीमार करतात, गोळ्या घालतात. लोक जखमी होतात, मरतात. संपकरी-मोर्चे काढणाऱ्याचे प्रतिनधी शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढतात. न्याय्य मागण्या अमान्य करतात किंवा शेतीमालाच्या किंमतीमध्ये थोडीशी वाढ करतात. "...आपला माल... मंग त्यो कोणताबी का असेना, इकतानी पाडून इका लागते. अन् बाजारात जाऊन काही घेयाचं मनलं की, महाग घ्या लागते. या जगात फकत एकला शेतकरीच असा गधा राह्यला. याले याचा माल, घेणारानं मनली ती किंमत घेऊन इका लागते. अन् दुसऱ्याह्यचा घेतानी मातर, त्याह्यनं मनली ती किंमत द्या लागते. खरं त शेतकऱ्याचं कोणी वालीच नाही." (पृ.१५१) या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेकडून लेखक काही अपेक्षा करतो.

गावातील गटतटांच्या-पार्टीच्या राजकारणाने खेडी पोखरली गेली. खेड्यातील संघटितपणा नष्ट झाला. सत्तास्पर्धा सुरु झाली. उदा. सोबाच्या सासऱ्याने आणि गावच्या पाटलाचे जमत नाही. सोबाशी तिच्या सासऱ्याने अतिप्रसंग केला तेव्हा तिला पाटील माहेरला पोहचवितो आण राजकारणातील भाऊबंदकीतील डाव साधतो. तसेच शंकर पाटीत आणि संतोबा सावकाराचे पटत नाही. त्यामुळे ग्यानबा किंवा नारायण सारख्याची कुचंबणा होते. त्यांच्यावर संकट येते. जसे नारायणाची तुरीची सुडी सावकार पेटवून देतो. न्यानबाला व्याजाचा फटका बसण्याचे कारण पाटील खरेदीच्या वेळी वाशीमला आले, तसेच जमीन मोजणीच्या वेळी संतोबा जास्त जमिनीचा ताबा घेतो, न्यानबाने पाटलाचे बैल मशागतीला आणले म्हणून मार खावा लागतो. सत्तास्पर्धेमुळेच गावात राजकीय गट पडले. सामान्यांची कुचंबणा झाली.

एकोपा-प्रेम नष्ट झाले.

ग्रामीण भागाती शिक्षणाची होत असेली हेळसांड एकाच प्रसंगातून लेखकाने प्रकट केली आहे. काम न करता पगार घेण्याची प्रवृत्ती वाढली. जसे पर्कास, न्यानबाकडे पैसे मागतो तेव्हा शिक्षकाविषयी संताप व्यक्त करताना म्हणतो, "एऱ्ही मास्तर मनला की, गावातल्या समद्या लोकायचं मन्न असंच असते. ते बी खरंच हाये मना. चौथ्या वर्गातल्या पोराले अक्षर फुटत नाही, नाव काढता येत नाही. परीक्षा येवंस्तोर मास्तर शाळंत टेबलावर पाय ठेवून, खुर्सीले मान देऊन, ढाराढूर झोपतात. अन् पोऱ्हं त्याह्यचा उरावर धिंगाणा करतात. मंधातच मास्तरले चेव आला त टेबलावर छडी आपटून समद्या पोऱ्हायले गप बसवतात. मंग दुम्हार झोप सुरु. शाळा सुटली तशी कव्हायबी तिसरा पहाराच सुटते - की धसला मास्तर गोपाळ वाड्यात दारु पेयाले. तिथून रस्त्यानं निघाला की, बोलणं सुसत नाही अन् चालां बी सुसत नाही. रस्त्यानं कुठीसा नाही पडला त घरी जाते."(पृ.५८)

शिक्षणव्यवस्थेची हेळसांड वरील वर्णनातून लेखकाने रेखाटली आहे. ज्यांनी मुलांना शिकवायचे, आदर्श आचरणाचे धडे गिरवायला लावायचे तेच दारु पितात, मग मुलांवरील संस्काराचे काय? अशा प्रकारे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक जीवनातील वास्तवाचे दर्शन लेखकाने घडविले आहे.

आधुनिकीकरणाचा प्रभाव ग्रामीण जनजीवनावर पडला. काही सुधारणा झाल्या. अंतरंग मात्र पूर्णपणे बदलले नाही. सण-उत्सव-यात्रा-याप्रमाणे श्रद्धा-समजुती-परंपरा यांनाही महत्त्व आहे. अज्ञान देखील आहे. बाबाराव मुसळे यांनी विदर्भातील प्रदेशविशिष्ट संस्कृतिवैशिष्ट्याचे प्रसंगानुरुप चित्रण केले आहे. मुळात कादंबरीचे शीर्षकाच एका लोकगीतातून आले आहे.

चिमणी चिमणी खोपा दे

हाल्या हाल्या दूधू दे

'हाल्या' हे एक प्रतीक आहे. नियती पुढे कुणाचे काही चालत नाही. पण येथील नियती 'पैसा' आहे; त्याच्यासाठी आयुष्यभर माणूस धडपडतो. तो मिळविण्यासाठी कष्ट करतो, पण हा हाल्या-पैसा मिळत नाही.

आखाडीची जत्रा जे खास विदर्भाचे सांस्कृतिक वैशिष्ट्य आहे. आसरांच्या संदर्भातील लोककथाच लेखक अनुभवाला वेगळा रंग देण्यासाठी सांगतो. सोबाच्या पाठीमागे आसरा लागल्या, तिच्या आयुष्याचा खेळ झाला, शेवटी तिने आसराच्या बारवात जीव दिला निवेदन करण्यापूर्वी लेखक प्रदेशविशिष्ट लोककथा सांगतो. आखाडीच्या दिवशी स्त्रिया भाताचे बोने आणि नारळ आसरांना देतात. ग्रामदेवतांची पूजा करतात. (१) पूर्वी गावोगावचे लोक आसरांचा नवस फेडण्यासाठी शिदा घेऊन येत. 'बारवं माय भांडे दे' असे म्हटल्यावर पाण्यावर भांडी तरंगत, हवे तेवढे भांडे लोक घेत व

काम झाल्यावर परत बारवेत सोडून देत. परंतु विटाळ झालेल्या बाईने भांडी मागितले तेव्हा तिचा नवरा बुडून मेला. ती वेडी झाली. ती लोकांना जत्रेत भेटते इ. त्याप्रमाणे दुसरी एक लोककथा आहे. (२) पाटलाची सून बारवेमध्ये पडून गेल्यामुळे गावकऱ्यांनी आसरांना बोनं-नैवेद्य द्यायचे बंद केले, तेव्हा पटकीची साथ आली. पटापट माणसं मेली. मरीचा कोप झाला. पाटलाच्या स्वप्नात ती आल्यानंतर गावकऱ्यांनी तिचा मान तिला देण्यास सुरुवात केली. या भीतीमुळे पावसाळ्यात स्त्रिया बोणं देतात. नवीन लग्न झालेल्यांचा ती बळी घेते. सोबा आसराला बोनं द्यायला जात असताना 'जळळ्या माय या आसरा, माहा शालू बी फाटला' तेवढ्याने ती घाबरली. बारवेमध्ये तिचा पाय घसरला. तरुणांनी तिला वाचविले. तेव्हा आसरा मागे लागल्या, म्हणून त्यांच्या कचाट्यातून सोडविण्यासाठी खणानारळाने ओटी भरण्यचा नवस आनसा करते. (पृ. ७२ ते ७५)

नागपंचमीचा सण देखील विदर्भातील संस्कृतीचे वेगळेपण सांगणारा आहे. पुरुष पंचमीला आखाडी बाऱ्या परात वाजऊन चंदनशेक महाराजांचा जयजयकार म्हणतात,

"आखाड्याच्या गळा घालो आखाड्या गळा...

नागोबाच्या गळा घालो, नागबाच्या गळा" (पृ.८०)

साप उतरविणारे लोक पंचमीच्या दिवशी मंत्र उजळतात. त्यांचे काही पथ्ये असतात. जसे भाजलेली भाकर चुल्हीवर उभी ठेवली तर खायची नाही. नागोबाची विशिष्ट पालखी-आखाडे आणि उतारे तयार करतात. मिरवणूक काढतात. स्त्रिया पालखीची पूजा करतात. स्त्रियांच्या अंगात पान येते. त्या सापासारखे झुलतात. स्त्रिया पंचमीच्या दिवशी पहाटे घर सारवतात. भिंतीवर आडवेतिडवे नागोबा काढतात. तेथे हळदीकुंकू लावतात. पांढरे दोरे हळदीने पिवळे करतात. ते कुंकवाने-लाह्यांनी नागोबाला चिकटवितात. दुसऱ्या दिवशी ते दोरे पुरुष-मुले 'पवते' म्हणून हातात बांधतात. सर्व घरभर लाह्या फुटाणे फेकतात. वारुळांची पूजा करुन स्त्रिया झोके खेळतात. (पृ.८०-८१)

शिरवाळची मिरवणूक पंचमीला दुसऱ्या दिवशी निघते. निपुत्रिक स्त्रिया शिरवाळराजाला नवस करतात. मुलगा व्हावा म्हणूनही नवस केला जातो. मुलगा झाला तर पाच वर्ष मिरवणूक काढली जाते. शिरवाळ काळ्या मातीचे करतात. त्याला शिखरावर मोठमोठ्या खिडक्या असतात. शिखरावर नागोबाची फडी काढतात. गाभाऱ्या पाच फडी नागोबा करतात. नदीकाठच्या कसाड्या आणि गुंजा चिकटवतात. हळदंकुंवाने पुजा करतात. सवाष्ण स्त्रिया शिरवाळीचे नाचू गाणे म्हणतात,

"खडे मनून खडे, परात परात खडे

याच वाटंनं गेले व माय, शिरवाळाचे घोडे...

गुंजा मनून गुंजा, परात परात गुंजा

याच वाटंनं गेला व माय, शिरवाळाचा राजा.'' (पृ.८२)

रात्री शिरवाळ पाण्यात बुडवितात. या संदर्भात लोकवाङमयाचे गाढे अभ्यासक डॉ. मधुकर वाकोडे यांनी आक्षेप घेतला आहे. ते म्हणतात, ''या घाटमाथ्यावर नागपंचमीला सुक्रुबुवाचा एक उत्सव असतो... चूक अशी झाली. लेखक म्हणतो बाया शिरवाळशेटला नवस करतात, लेकरु होण्यासाठी, पण तो शिरवाळशेटला केलेला नवस नाही, तो शिरवाळसेटी नाही. तो श्रीयाळ आहे. ज्याच्या कथागाथा बाया गातात तो लोकोत्सव आहे. सक्रुबुवाचा सुक्रुबुवा हे एक प्रतीक आहे. शंकराचं, याच सुक्रुबुवाला बाया लेकरु व्हावं म्हणून नवस करतात.२७. लोकजीवनाचा वेध घेताना तपशीलातील बारकाव्याकडे लक्ष दिले पाहिजे असे डॉ. वाकोडे सुचवितात.

विदर्भातील पोळा हा सणदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. जसे बैलाचा खांद मळण्यासठी पळसाच्या पाच पानाच्या देठांचा मान असतो. म्हणून लोक असे देठ शोधून ठेवतात. पोळ्याच्या दिवशी तोडून आणतात. अन्यप्रकार सर्वत्र सारखाच असतो. दसऱ्याच्या दिवशी भवानी मातेच्या देवळासमोर स्त्रिया रात्रभर लहाडी खेळतात, गाडे ओढतात, लोंढागण घेतात.

जात्यातील ओव्यातून पतीच्या विरहाने व्याकूळ आणि मनाचा कोंडमारा झालेल्या सोबाच्या भावना आविष्कृत होतात. उदा.

जात्यावर बसली, हात जोडते सुर्व्याले
कपाळीचं कुखू देवा, जाऊ दे सेल्याले. (पृ.१३१)
माळ्यानं केला मळा, टाकून गेला कोण्या देसा?
त्याच्या दिसामासा, लिंबोणी आली रसा. (पृ.१३२)
बारा वरसं झाले, माळी बोलंना माळणीले
असून दांडावर तुळस, पाणी चाललं केळीले... (पृ.१३३)

लेखकाने ओवीगीतातून सोबाच्या भावनांचा मुक्त आविष्कार घडविला असला तरी यंत्रयुगातील ही स्त्री पीठाच्या गिरण्या आल्या तरी दळण का दळते हे समजत नाही. परिवर्तन काळातील समाज वास्तव चित्रण त्यामुळे उणावते.

यात्रा-सण-उत्सवाप्रमाणेच विदर्भातील काही समजुतींचे चित्रण लेखकाने केले आहे. अमावस्येच्या दिवशी बाहेर पडले तर काम होत नाही. दुष्काळात देवळामध्ये पोथी पुराण वाचल्याने, उपासतापास, पारायण केल्याने किंवा स्त्रियांनी ओल्या वस्त्राने महादेव-मरोतीला पाणी घातल्याने पाऊस पडतो. मुलं बेडूक पकडून मुसळाला लिंबाचा पाला बांधतात, स्वत:च्या कमरेला लिंबाचा पाला बांधताता आणि गावभर ''धोडिचं दिवसं, पाणी मोठं हिवसं, धोंडी, धोंडी पाणी दे'' म्हणत फिरतात. त्याच्या अंगार स्त्रिया पाणी टाकतात. त्यांना कुंकू लावतात. ज्वारीच्या घुगऱ्या वाढतात. असे केल्याने पाऊस येतो अशी समजूत आहे. (पृ.६१) किंवा

'दुनव्यात पाप लय झालं. पोऱ्हं अन् पोऱ्ही वळखू येयेनात. माय-बह्यनीची वळख राह्यली नाही'' म्हणून पाऊस येत नाही अशीही समजूत आहे. (पृ. ६०) पहाटेची स्वप्न खरी होतात. उदा. आनसाला पहाटे स्वप्न पडते. न्यानबा पर्कासला घेऊन सोबाच्या भेटला चालला. त्याचप्रमाणे आषाढ महिन्यामध्ये मुलीने नवऱ्याचे तोंड पाहू नये, म्हणून तिला माहेरी आणले जाते. किंवा पतीपत्नीचे एकमेकावरील प्रेम तपासून पाहण्यासाठी हातावर बांगडी फोडून पाहिली जाते. हातावर काचेचे जेवढे अधिक बारीबारीक तुकडे पडतील तितके प्रेम अधिक, पण काचेचे तुकडे पडले नाही तर प्रेमच नाही असे समजले जाते. बायको गरोदर असेल तर साप मारु नये,डोक्यावर टिटवी ओरडणे अशुभ समजले जाते. आपण सत्य सांगत असल्याचे प्रमाण म्हणून दिवा किंवा मुलाची शपथ घेतात. जनावराला पोटभर खाऊ घातले तर आशीर्वाद मिळतो. याचप्रमाणे काही रीतीरिवाजही आहे. जसे पाहुण्याला पाय धुण्यासाठी-पिण्यासाठी पाणी देणे. मांगाजवळ अशुभ निरोप पाठविणे, देवाधर्माच 'सकोण' पाहणे. नवस फेडणे, शनिची शांती करणे. सत्यनारायण किंवा मारोतीला अभिषेक करणे. गंडेदोरे, भारलेले पाणी देणे, जखमेवर मुतणे किंवा रानमिरचीचा कंद गोमुत्रात उगाळून लेप देणे. यासारख्या गोष्टींतून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. दे. शि. दुधलकरांनी या संदर्भात म्हटले आहे की, ''प्रस्तुत कादंबरी हृदयाचा ठाव घेते ती लेखकाच्या सच्चया अनुभवामुळे, ग्रामीण व्यवस्था, तिथली माणसं, चालीरिती, स्वभाव सण, उत्सव वागणे, बोलणे, ह्या सर्व गोष्टी बाबारावांनी इतक्या जिवंत उभ्या केल्या आहेत की त्या वाचताना वाचक क्षणभर स्वत:ला विसरुन ग्रामीण वास्तवाच्या तळाशी रममाण होतो.''२८. या अभिप्रायाची सत्यता वरील विवेचनावरुन पटते.

कादंबरीच्या प्रस्तावनेत निवेदनसंभाषणाविषयी डॉ. द. दि. पुंडे यांनी गौरवोद्गार काढले आहेत. (प्रस्तावना पृ.१६) प्रस्तुत कादंबरीचे निवेदन आणि संवाद वऱ्हाडी बोलीतील आहेत. डॉ. कानडजे म्हणतात, ''ती अतिशय सहज-स्वाभाविक आणि आशयाशी एकजीव होणारी आहे. ती स्वतंत्रपणे नजरेत भरत नाही. आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवित नाही. इतकी ती आशयाशी एकरुप, एकात्म झाली आहे.२९. त्याचप्रमाणे डॉ. वि. भि. कोलते यांनी ''आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी कादंबरी अप्रतिम उतरली आहे.'' ३०. असे म्हटले आहे. तर भ.पु. कालपे यांनी, ''सदर कादंबरीतील मुसळेंनी निवेदन व संवाद या तिन्हीतही ग्रामीण वऱ्हाडी बोलीतील वापर केला असून तो अनौपचारीक व आशयाशी एकजीव झाला आहे.''३१. असे म्हटले आहे. कादंबरीतील निवेदन संवादासंबंधी वरील सर्वच अभिप्राय सार्थ वाटतात. वऱ्हाडी बोलीतील नाविन्यपूर्ण अपरिचित शब्द आणि शिव्या ग्रामीण वास्तवाचा जिवंतपणा वाढवितात. काही इंग्रजी शब्दांच्या वापरातून आधुनिकतेचा प्रभाव जाणवतो. उदा. इस्टान, थिमीट, बेनॉर, ग्रेडर, मॅड, एच.फोर, हायब्रीड,

एन्होसल्फानइ. धकंड, सुदं, मव्हर, पाह्यटं, दिमाख, बेसला, कुर्हाट, वाढोळा, मांघायली, कावळ्यावाणी, भोंबरा, निकट्ट, बापूले, भकासल्यावाणी, गिटकारा, व्हर्क्या, वाक, केकती, हारली टाटूमुटूच, नीट, एऱ्हीच, कुचिदवाणी, गुंड, कल्हमा, हाडोच, खउट, हुब्बक, हिंडगेपणा, हिंदयान, भोंडा, आमाक्शान, झोलाड, इचकावाचका, तिंबे, हिकत्या, वक्टंसक्टं, एव्हडुक्स, घुटघुसणी, व्हनेर, ठोंगळामांडं, बेस्तरवार, आईतवार, ठेल्यात, हेम्बाडपुत्रे, कास्तकार, बुरी, नवकर्की इ. शब्द खास वऱ्हाडी बोलीतील आहे. त्याचप्रमाणे गांडमनी, भोसडीचे, मायचं मी रांडरु, गांडं, मुत्तामारी, झवन्या, चोदवाया, बायकोची भांडं, खाटकाच्या पोटचा, ढुंगण इ. शब्द आशयानुरूप आल्याने अश्लील वाटत नाहीत. "वऱ्हाडीभाषा अतिशय प्रेमळ वाटते. त्यातली ग्रामीणता तिला शोभून दिसते आणि वऱ्हाडी बोली मनाला भावून जाते..."३२. असे मनोरमा बापट म्हणतात. तर, "...भाषाशैली अस्सल ग्रामीण व देशी आहे. ती जिवंत आहे..."३३. असे श्रीराम गुंदेकर म्हणतात. याची साक्ष कादंबरीतील म्हणी आणि वाक्प्रचारातून येते. उदा. 'वडाची साल पिंपळाले', 'बय बी गेली अन् बयची वाकळ बी गेली', 'ऊर दडपला', 'हेल्पाडायले', 'ये घोरा अन् बस खंदाडी', 'सत्यनव-अठ्यानव होणे', 'भांडणाचं तोंड काळं', ६ मेस काईले मनलं नवरा करनं त ती मनते तूच व्हय', 'गरजवंताले अक्कल नसते', 'मव्हरं जावावं त आड्, माघं फिरावं त इहीर', 'आपलं बासन लेकाले द्या अन् गांडमनी मनून घ्या', 'आंधळ उरावर घेऊन भवताल पाह्याचं काम झालं हे', 'नकटीच्या लग्नात सतराशे इघ्न', 'लहान तोंडी मोठा घास', 'कण्हते ती जनते, अन् शजारीन मनते... दे कळा', 'लोक नांदायली तिले पळवतात, पळायली तिले नांद मनतात'. उदाहरणादाखल घेतलेल्या म्हणी वाक्यप्रचाराप्रमाणच उपमा-प्रतिमा आशयसंबंधाने वेदनेची तीव्रता जाणून घेणाऱ्या लेखकाच्या संवेदनशीलतेचा भाग आहे. उदा. उपमा - १) काखतल्या घागरीवाणीच तिचं मन बी उच्मळ डचमळ करत व्हतं." २) "आभाळ वऱ्हून निसतंच वहात व्हतं. मायच्या थानातल दूध आटल्यावाणी". ३) "कापायसाटी खाटकामाघं चालवलेल्या बोकड्यासारकी तिची गत झाली." ४) "...दोघे नवराबायको आखाड लागलेल्या ढोरासारके डगमग झाले." ५) "आनसा व न्यानबा हे संमदा ऐकता ऐकता बर्फावाणी थंडगार झाले." प्रतिमा : १) "मग दोन्ही लवनाच्या पूराइतकाच पुर तिच्या दोन्ही डोळ्यातून सुरु झाला." २) "माणसाची आटकली मनजे माणूस कसा सुईच्या भोकातून जाते." या सर्व उपमा-प्रतिमा-म्हणी ग्रामीण समाजवास्तवाचे दर्शन घडवितात.

प्रा. कमलाकर दीक्षित लिहितात, "कादंबरीने वास्तवतेला कलात्मकता व महात्मता या पातळ्यावर नेले आहे."३४ तर पु. ल. देशपांडे लिहितात, "आर्थिक दारिद्र्यातून निर्माण होणाऱ्या दु:खाची आणि यातनांची ही कथा (तुम्ही) अतिशय परिणामकारक

रितीने सांगिली आहे.''३६. या दोन मान्यवरांच्या अभिप्रायापेक्षा प्रा. श्री. य. पाटील यांचा अभिप्राय बोलका आहे. ''त्या ग्रामीण जीवनातील अनुभवाला येथे साहित्य रुप आहे. वऱ्हाडी बोलीच्या सर्वत्र वापरामुळे परिणामकारकता साधलेली आहे. ग्रामीण जीवनातील अनुभवाला येथे साहित्य रुप आहे. वऱ्हाडी बोलीच्या सर्वत्र वापरामुळे परिणामकारकता साधलेली आहे. ग्रामीण जीवनाचे राग-लोभ, सुख-दु:खे, रुसवे-फुगवे मानापमान व्यक्त करण्यास वऱ्हाडी बोलीच समर्थ आहे.''३६. बोलीभाषेच्या वापरामुळे वाशीम परिसरातील कादंबरीचे अस्तित्व अधिक प्रकर्षाने लक्षात येते. प्रशांत मानकर यांना नयानबा ''निरक्षर आणि म्हणूनच वेळोवेळी फसून चिखलात रुतून बसलेल्या आजच्या शेतकऱ्याचे प्रतिनिधत्व करणारा वाटतो.''३७. तर ''या कादंबरीतून मुसळे यांनी न्यानबाच्या घरासोबतच एक अख्ख गाव त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यानिशी उभे केलेले आहे.''३८. असे सोपान हाळमकर म्हणतात.

वरील विवेचन व मान्यवर समीक्षकांच्या अभिप्रायाधारे असा निष्कर्ष काढता येईल की, प्रस्तुत कादंबरी ही केवळ न्यानबाची शोकांतिकाच नाही, तर विदर्भातील एका खेड्याचे ती समूहजीवन चित्रण आहे. त्याचप्रमाणे परिवर्तनकाळातील समाजावास्तवाचे कलात्मक चित्रण करण्याचे सामर्थ्यही तिच्यात आहे. म्हणून 'धग', 'पाचोळा', 'गोतावळा' यांच्यानंतरची ती एक वळणावरची वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक कादंबरी आहे.

### ४. पुरुषोत्तम बोरकर - *'मेड इन इंडिया'*

'मेड इन इंडिया' ही १९८७ साली प्रसिद्ध झालेली पुरुषोत्तम बोरकर यांची पहिलीच कादंबरी आहे. समकालीन समाजपरिस्थितीचे आणि ग्रामीण-प्रादेशिकतेचे धावते समालोचन (कॉमेंट्र) असे काहीसे तिचे किस्सेबाज स्वरुप आहे. कथानकात वरवर विस्कळीतपणा जाणवत असला तरित्यामागे अंतर्गत सुसंगती आहे. एका पदवीधर तरुणाचे ते सूक्ष्म निरीक्षण आहे की जो भारतीय समाजव्यवस्थेचे अपत्य आहे. याच समाजव्यवस्थेत तो घडलेला आहे. हा आजच्या तरुण पिढीचा प्रतिनिधी पंजाबराव गरसोळीकर, सरपंच, ग्रामपंचायत, गरसोळी खुर्द घरातील, गावातील, परिसरातील, लोकशाही शासन व्यवस्थेतील कटु अनुभव आणि दिसलेली माणसे, प्राणी यांच्याविषयी तिरसटपणे निवेदन करतो.

कलाशाखेचा पदवीधर असलेल्या पंजाबला वशिलेबाजी-भ्रष्टाचाराच्या काळात नोकरी मिळत नाही. शिक्षणामुळे त्याचा आत्मविश्वासही वाढलेला नाही. स्वत:च्या सुमार गुणवत्तेची त्याला चांगली कल्पना आहे. त्याच्या घराण्यात पिढीजात सरपंचपद असते. परंतु त्याला बोगसबाजीच्या राजकारणात अजिबात रस नसताना बापाच्या इच्छेखातर राजकारणता येणे भाग पडते. या गलिच्छ प्रवाहात आल्यानंतर तो समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. गावच्या रस्त्यावरील सांडपाण्याच्या डबक्यांचे

तो शोषखड्डे करु पाहतो. त्यात त्याला अपयश येते. दारुबंदी योजना राबविण्याचा अयशस्वी प्रयत्न करतो. जुगार मटका, ब्लूफिल्म-व्हिडीओ बंद व्हावा म्हणून पायतान झिजवतो. परंतु मंत्री-आमदार-खासदारांची दोन नंबरच्या अवैद्य धंद्यावाल्यांवर कृपादृष्टी असल्याने त्याला ते अशक्य होते. वृक्षारोपण, कुटुंबनियोजन याबाबतीतही त्याला कटू अनुभव येतात. बापाने विष खाऊन आत्महत्या केल्यावर तो सरपंच पदाचा राजीनामा देतो.

पिढीजात शेतीव्यवसाय करायला लागल्याने, त्याची आर्थिक परिस्थिती उत्तम असूनही त्याची सोयरीक जमत नाही, कारण आजच्या तरुणींना नोकरीवाला नवरा हवा. तर हुंड्यासाठी बाप काळ्या आणि तिरळ्या मुलीशी त्याला लग्न करायला सांगतो. गावातील लोक त्याला घनचक्कर म्हणून लागतात. कारण शेतीधंद्यात तो जम बसवू शकत नाही. तो समकालीन परिस्थितीचे निरीक्षण करतो. तेव्हा त्याच्या लक्षात येते की 'दाम करी काम' अशी स्थिती निर्माण झाली आहे. सर्वत्र भेसळ-भ्रष्टाचार वाढला आहे. लोक व्यसनाधीन, जुगारी, आळशी, छंदीफंदी, कर्जबजारी बनले आहेत. लोकशाही समाजव्यवस्थेतील विषमता आणि लोकाच्या वैफल्यग्रस्त स्थितीवर तो भाष्य करतो. स्वत:च्या मृत्यूबरोबर लोकशाही समाजव्यवस्थेचा अंत त्याला दिसू लागतो. जयंतकुमार बंड यांनी कादंबरीसंबंधी असमाधान व्यक्त केले आहे. 'मेड इन इंडिया' ही कादंबरी नाही.'३९. असे त्यांनी म्हटले आहे. तर अन्य समीक्षकांनी कादंबरी म्हणून तिचे स्वागतच केले आहे. '६ आजच्या नव्या संकरित, धेडगुजरी ग्रामीण संस्कृतीचे चित्रण आले आहे. भारत आणि इंडिया यांचे अस्सल, जातिवंत मिश्रण म्हणजे ही कादंबरी! शिक्षणाचा प्रसार, रेडिओ, टी. व्ही. यासारख्या प्रसारमाध्यमामुळे शहरी संस्कृतीचे झालेले आक्रमण यामुळे खेड्यातले जीवन समृद्ध होण्याऐवजी ते अधिक पोकळ होत चालले आहे ही सांस्कृतिक दिवाळखोरी बोरकरांनी वऱ्हाडी बोलीमध्ये, विनोदी शैलीत प्रभावीपणे मांडली आहे. ४०. असा प्रस्तुत कादंबरी संदर्भात समर्पक अभिप्राय दीपक घारे यांनी "१९८७ मधील कादंबरी"चा आढावा घेताना लिहिला आहे. त्याचप्रमाणे सखोल जीवन जाणीव फारशी आढळत नाही असे असमाधान व्यक्त केले आहे. तर 'मेड इन इंडिया' या इंग्रजी नावाच्या मराठी नव्हे जातिवंत वऱ्हाडी कादंबरीची ही आहे सुरुवात."४१. असे वसंत वाहोकार म्हणतात त्यांना प्रस्तुत कादंबरी वेगळ्या टप्प्यावरची वाटते. याचप्रमाणे "आव आणून 'संस्कृती'च्या गप्पा मारणाऱ्यांची झोप उडावी असे हे रोखठोक पुस्तक आहे. त्याला आत्मकथनाचा फॉर्म वापरला असला तरी ती प्रातिनिधिक स्वरुपाची कादंबरी आहे"४२. असा अभिप्राय आशा मुंडले यांनी नोंदवला आहे. वरील विवेचनावरुन जयंतकुमार बंड यांचा आक्षेप कसा निराधार आहे हेलक्षात येते. त्याचप्रमाणे विस्कळीत कथानक असलेली समकालीन समाजवास्तवाचे धावते समालोचन

करणारी ही नव्या वळणाची कादंबरी आहे हे मान्य करण्यास हरकत नाही.

समकालीन सांस्कृतिक दिवाळखोरीचे चित्रण लेखकाने विविध वृत्ती-प्रवृत्तीच्या माणसांच्या मानसिकतेतून दाखविले आहे. निवेदकाने तटस्थपणे जे घडले, जे दिसले, जसे अनुभव येत गेले, ते तसे सांगितले. त्यात सुसंगती दिसत नसली तरी अनेक व्यक्तिरेखांना आकार मिळतो. पंजाबराव साहेबराव गरसोळीकर पाटील हा पदवीधर तरुण आहे. शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही म्हणून तो शेती करण्याचा निर्णय घेतो. वडील त्याला बोगसबाजीच्या राजकारणात भाग घ्यायला लावतात. त्याच्या आदर्शांची समाजात किंमत होत नाही. लोकांच्या दृष्टीने तो घनचक्कर ठरतो. शिकलेल्या मुली आणि त्यांचे पालक शेती करणाऱ्या पंजाबला पसंत करीत नाही. बाप हुंड्यासाठी तिरळ्या-काळ्या मुलीशी लग्न करण्याचा सल्ला देतो. आधुनिकीकरणाच्या लाटेत ओढला गेलेला तरुण आहे. राजकारणात भाग घेऊन तो वैफल्यग्रस्त होतो. वडिलांनी विषप्राशन करुन आत्महत्या केल्यानंतर स्वत:चा मृत्यू त्याला समोर दिसू लागतो. आईचा शोक आणि पत्नीचे क्षणिक दु:ख दिसू लागते. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे त्याला लोक हसू लागतात.

साहेबराव पाटील हे खानदानी महत्त्वाकांक्षी, आशावादी, मानपान-प्रतिष्ठा जपणारे, व्यसनी, कठोर, स्वार्थासाठी समाजसेवेचे ढोंग करणारे आहे. मुळात चांगुलपण त्यांच्या रक्तातील गुण आहे. ते दानशूर-उदार, अव्यवहारी, मोठ्या काळजाचे, सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होणारे आणि पाहुणचार करणारे आहेत. पंजाब म्हणतो, "... वयला त अळमाप देईन अन् सरकला तर घरदार खनून काढीन. जेव्हळा दिलदार तेव्हळाच खप्ती." (पृ.१५) ते नोकरी गुलामगिरी मानतात. नोकरी करणे ब्राह्मणांचे काम आहे असे म्हणतात. बापू-नेहरु शेजारी समाधीचे स्वप्न जागेवर ठेवून सोनेनाणे, जमीनजुमला जुगारात गेल्याने एड्रीन पिऊन ते आत्महत्या करतात.

मांगलाल शेठ हुशार, चत्रा, ऑलराऊंडर, हिशोबी, निर्व्यसनी, जनतेला व्यसनी, जुगारी-आळशी बनविणारा आडमाप खाऊन तब्येत वाढलेला स्वार्थी माणूस आहे. जनतेची अचूक नाडी ओळखून राजकारण्यांची मदत घेऊन त्याचे अमाप माया मिळविली आहे. पैशाच्या जोरावर गावपातळीवरील राजकारणात भाग घेण्याचा प्रयत्न तो करतो, परंतु त्याला ते शक्य होत नाही. कारण पिढीजात पाटील घराण्यात असलेले सरपंच पद काढणे त्याच्या आवाक्याबाहेरचे असते. प्रस्थापितांविरोधी तो अयशस्वी होत असला तरी त्याने अवैध धंद्यामध्ये प्रस्थ निर्माण केले आहे.

नथ्थू हा एक पोरका बालवयापासून गावात लहानसहान काम करणारा बायल्या आहे. तमाशात झिलकाऱ्याचे काम करुन परत गावात आलेला. पान आणि सिनेमासाठी लावणी म्हणून पैसे कमावतो. शेवटी पाटलाच्या घरात घरगडी म्हणून काम करतो. तर आप्पामास्तर वंशाचा दिवा लावण्यासाठी अकरा मुलींना जन्म देणारा शिक्षक

आहे. तर पंजाबची आई, साधीभोळी, प्रेमळ आणि श्रद्धाळू स्त्री आहे. तर येवद्याची पाहुणीबाई गोष्टीवेल्हाळ आहे. सूर्यभान थोरात गंपलास बुढा आहे. डुम्बी कुत्री, लभान्या आणि ईसनख्या कुत्रे हे माणसातील प्रामाणिक, नेभळट, आळशी वृत्तीचे द्योतक रेखाटले आहे. समस्त, ग्रामस्त, राजकारणी, सुशिक्षित बेकार तरुण, भोंदुबुआ, जुगारी, दारुडे शिवसेना, दलित पँथरचे कार्यकर्ते यांच्या उल्लेखातून समूहजीवनाचे दर्शन घडविले आहे.

विदर्भातील अकोला जिल्ह्यातील भूली नदीच्या काठावरील गरसोई या खेड्याची आणि परिसराची भौगोलिक पार्श्वभूमी कादंबरीच्या कथानकाला लाभली आहे. विदर्भाच्या काळ्या मातीत कापसाच्या विविध जातीबरोबर ऊस, मिर्च्या, कांदे, ज्वारी, मूग, उडीद, मठ, जव, लाख, तूर, भगर, जवस इत्यादी प्रदेशविशिष्ट पिकांचा उल्लेख येतो. पूर्वेला अकोला, पश्चिमेला पारसचा वीज कारखाना, नागपूर-भुसावळ रेल्वेलाईनवरील गरसोई गाव आहे. पूर्णा नदी, दर्यापूर तालुक्यातील गाडगेमहाराजांचे शेडगाव, सातपुड्याच्या निळ्या रांगा, अंजनगाव-सुर्जी आणि विदर्भातील विविध धार्मिक-सांस्कृतिक स्थळांचा उल्लेख येतो. या प्रदेशात त्यांची घडण झालेली असते. प्रादेशिकतेचा सामाजिकतेवर परिणाम होतो. त्याप्रमाणे त्यांची मानसिकता घडते. सपाट-विस्तीर्ण दुष्काळी प्रदेशातील लोकांमध्ये आळशी-निष्काळजीवृत्ती असते. रिकामपणामुळे त्यांची व्यसनाधीनता वाढते, मटका-जुगारासारख्या वाईट गोष्टींचा स्वीकार मागासलेल्या भागातील लोक लवकर  करतात. प्रस्तुत कादंबरीमधील व्यक्तिरेखांवर विदर्भातील मागासलेपणाचा-अज्ञानाचा प्रभाव असलेला दिसतो.

ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणारे कृषि जीवनाशी निगडित निसर्गचित्र लेखकाने रेखाटले आहे. या ऋतुचक्रामधील चढउतारांचाही मानसिकतेवर परिणाम होतो. विदर्भातील उन्हाळ्याचे चित्र लेखक रेखाटतो,

"...या वऱ्हाळातला विश्वख्यातकीर्त उन्हाया चालू झाला की गरसोई भवताल फफुळ्ळ्याचे असे लोटच्या लोट गगनी झेपावतात... जनू गरसोई हे ज्युनियर पोखरनच!... असा धुळ्ला हेच या गावाचं सर्वसत्य प्रालब्ध." (पृ.३६)

विदर्भातील या उन्हाळ्यामुळे आणि धुळीमुळेच शेतात न जाण्याची प्रवृत्ती आहे. तर पावसाळ्याचे चित्र पहा.

"...आणि काळ्या मातीत, मृद्धानं धुंद होऊन... घननिळा बरसता... पाऊस धारा झेलित झेलित... कष्ट करताना स्वेदबिंदूंचा... वर्षाव कसा अलवार मातीवर... मग पीकं घेणं सोनियाची... वर नभात इंद्रधूचा गोफ दुहेरी विणलेला आणि खाली... भोवताली च्युतियासारखे अजिंठा शैलीतलं हिरवेगार रान पसरलेलं... त्यात फासपारध्यांच्या अन एंड्रीनच्या तडाख्यातून बचावलेले लिरिकल राघू, चवचाल मैना..." (पृ. ३८) "गाडी भाड्याची आणि बैल तगाईचे" अशी सवय लागलेल्या लोकांना कष्ट नको

वाटतात. पाऊस होऊनही तो उपयोगाचा वाटत नाही. पंजाबच्या मानसिकतेनुरूप रेखाटलेले पावसाळ्यातील निसर्गचित्र पहा.

"...रोहिणी, मिरुग, आरदळा बरसल्या सगळीकडे गाटाच गाटा झाली. खाली जमिनीवर, कुपाईनं हिर्व्यागार गवताचे थोंबच्या थोंब निघाले. पेरन्या लगोलग झाल्या अन बियानं टरार वदर आलं कायामातीतून..." (पृ.४२)

सृष्टीत आनंद भरला परंतु एक वर्ष गेले तरी पंजाबचे लग्न जमले नाही. यावरील ते भाष्य आहे. त्याचप्रमाणे पुढील वर्णन पहा,

"...अन पुढ्यात हिरव्या हायब्रीडवर उचंबळत असलेला लख्ख चांदण्यांचा शुभ्र चुरा! माह्या पायाखालून थेट क्षितिजापर्यंत त्रिदिशांना कार्तिकपिकांचा महासागर सळसत असायचा. दाहीदिशेतून उफाळून माह्यापर्यंत पोचनारा रानगंध माह्या प्रानामानाला सुकून द्यायचा. पिकाईच्या दिर्व्या देवदत्त गालिच्यावरुन थंडगार वाऱ्याची झुळूक यायची अन पानांतून येनारा यौवनोन्मादी सळसळता आवाज अधिकच धुंद व्हायचा."(पृ.८२)

"...दिवसभर उन म्हने मी आहो तर कोनीच नाही. लाहा लाहा तप्तबंबाय णावा लहमरत ईभर वऱ्हाळभर, उनीच्या कत्लेआम माऱ्यानं मान्सं, जनावरं, पाखरं अन झाळझुळपंही निरा चिमून जात. रया गेल्यासारखी दिसत. जो तो सावलीचा गॉगल लावून थंड पानी पितो म्हने. घामानं कपडे निरा चिक-चिक होऊन जात. तल्खली इतकी आसमंतात राहे की, वस्त्रे ही बाब अनैसर्गिक असल्याची प्रकर्षाने खात्री पटे. असा हा उन्हाचा झपाटा भलता जबर. मायले लेकरु भारी..." (पृ. ४५)

मुळातील लोकांची आळशी वृत्ती, भ्रष्ट राजकारण, प्रसारमाध्यमांच्या प्रभवाने मूळप्रवृत्तीपासून दूर गेलेले लोक आणि प्रतिकूल निसर्ग यांचे प्रसंगोचित चित्रण लेखकाने केले आहे. ते कादंबरीच्या आशयाशी एकजीव होऊन आले आहे. परिवर्तन काळामध्ये आधुनिकीकरणाचा आणि यंत्रसंस्कृतीचा प्रभाव खेड्यांवर पडला. त्यांचा चेहरामोहरा बदलू लागला. त्याबरोबर शील, माणुसकी, प्रेम या भावना नष्ट झाल्या. शब्दाला जागण्याची इमानीवृत्ती कालबाह्य ठरली. कष्ट करुन काळी पिकविण्याऐवजी जुगार, मटका, आकडा यांचे प्रस्थ वाढले. सिनेमाने लोकांना वेडे केले. एकूणच समाज दुबळा आणि आळशी झाला. 'दाम करी काम' अशी स्थिती निर्माण झाली. यामुळे संघटित, एकवचनी खेड्यांमध्ये विविध गट पडले. सत्तास्पर्धा वाढली. या सर्व गोष्टींचे सूचक धावते समालोचन तिरसरटपणाने प्रस्तुत कादंबरीमध्ये लेखकाने केले आहे. पुढाऱ्यांच्या स्वार्थी-मतलबी राजकारणाने ग्रामीण भागात परिवर्तन होऊन परंपरागत जीवन नष्ट झाले. सुधारणांबरोबर नव्या समस्या, नवे प्रश्न निर्माण होऊ लागले. गावात एस.टी. आली. बार, पानपट्ट्या आल्या. लोक काम करण्यापेक्षा अशा हॉटेलमध्ये बसून दिवसभर गप्पा मारु लागले. सर्व जातिधर्मांचे लोक निरर्थक

खर्च करु लागले. उलट व्यापारी श्रीमंत होत गेले. दारु पिऊन मटका-जुगार खेळणारे रसातळाला गेले, उलट त्याला प्रोत्साहन देणाऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. दिवस मावळताना जेऊन झोपणारे खेडूत भजन, ठावे, पांडवप्रताप, हरिविजयाकडे दुर्लक्ष करु लागले. ओपन-क्लो ऐकल्याशिवाय लोकाना झोप येईनाशी झाली. राज्यकर्त्यांच्या आशीर्वादाने अवैध धंदे जोरात चालू लागले. 'दारुबंदीचे धोरण' असूनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होऊ लागले. दारुबंदी कलापथकातील लोकांना दारुपिण्याशिवाय लोकजागृतीचे दारुचे दुष्परिणाम सांगणारे कार्यक्रम सादर करणे शक्य होत नाही. शेतीत कष्ट करण्यापेक्षा जुगाराच्या तक्त्यांचा अभ्यास होऊ लागला. चैन वाढली. जुगारासाठी अनेकांनी जमीन आणि घर विकले. धंदेवाईक वृत्तीमुळे मैत्रीचे-प्रेमाचे संबंध नष्ट होऊन 'सबसे बडा रुपैय्या' हे तत्त्व लोकप्रिय झाले. पुरुषोत्तम बोरकर यांनी प्रस्तुत कादंबरीत विदर्भातील गरसोई गावातील मांगलाल शेठच्या पुण्याईने समाजजीवनात परिवर्तन कसे होत गेले आणि पारंपरिक ग्रामीण जीवनाचा कसा ऱ्हास झाला याचे चित्रण केले आहे. अवैध धंद्यावर नियंत्रण ठेवण्यापेक्षा पोलीस यंत्रणेने हप्ते वसूल करुन त्यांना राजमान्यता दिली. पुढाऱ्यांनी अशा धंद्यांना प्रोत्साहन दिले. नव्हे त्यांनी ते सुरु केले. चित्रपटाने नवी पिढी झपाटल्याने गीत आणि संवाद ते तोंडपाठ म्हणू लागले. खोट्या प्रतिष्ठेच्या कल्पनांमुळे शेतकरी रसातळाला गेले. जसे, मांगीलाल शेठने कृष्णधवल दूरदर्शन संच आणल्याबरोबर पाटलांनी रंगीत दूरदर्शनचा संच आणला. यात त्यांचा अव्यवहारीपणा दिसतो.

वशिला आणि भ्रष्टाचाराने समाजजीवन पोखरले गेल्यामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या मिळू शकल्या नाही. त्यामुळे त्यांच्या लग्नाची समस्या निर्माण झाली. हे वरवरचे परिवर्तन समाजामध्ये होत असले तरी धनिक शेतकऱ्यांना नोकरी करणे लाचारीचे, कमीपणाचे वाटते. आंतरजातीय विवाहाची कल्पना त्यांना मान्य नाही. खानदान-प्रतिष्ठेचा विचार समकालीन परिसिथतीत विवाह संबंधात केला जातो. उदा. पंजाब-चंद्रलेखा प्रेमसंबंधांमुळे 'हमारी नाक काट दी' असे तिच्या वडिलांना वाटते. पंजाबच्या वडिलांनाही आंतरजातीय विवाह कल्पना मान्य नाही. थोडक्यात लग्नविधी आजही परंपरागत पद्धतीने केले जातात. नवविचारांचा प्रभाव याबाबतीत समाजावर पडलेला दिसत नाही. खानदान-मानपान-कुळगोत्र पाहूनच लग्न जमविले जाते. खानदानी घराण्यातील मुलामुलींना एकमेकांना भेटणे, बोलणे सामाजिक गुन्हा ठरतो. त्यामुळे 'श्यान्नवकुयाले बट्टा' लागतो. त्यामुळे मामाच्या मुलीशी लग्न लावण्याची प्रथा असलेली दिसते. उलट शेतकऱ्यांच्या शिकलेल्या मुलींना शेतकरी पती नको वाटतो. नोकरी-धंदा करणारा हवा असतो. शेतात काम करण्यापेक्षा घरात बसून डाळभात खाण्याचे मुली स्वप्न पाहतात. जसे पदवीधर पंजाब शेती करु लागल्यावर त्याचे लग्न जमत नाही. काळी, तिरळी, कुरूप मुलगी

पंजाबचे वडील पसंत करतात. कारण चाळीसतोळे सोने आणि राजदूत मोटारसायकल तसेच पन्नास एकर जमीन, मोठा वाडा मिळण्याची खात्री असते. यावरुन 'पैसा' सर्वश्रेष्ठ ठरला असला तरी काही जुन्या रुढी टिकून असलेल्या दिसतात.

शेतकऱ्याला निसर्गनिर्मित आणि शासननिर्मित संकटांना सामोरे जावे लागते. महागाई-भेसळ आणि भ्रष्टाचारामुळे आर्थिक प्रश्न निर्माण होतात. प्रत्येक बजेटमध्ये रासायनिक खते, किटकनाशके आणि बी-बियाणांचे भाव वाढतात. त्यामध्ये व्यापारी भेसळ करतात. उलट शेतमालाच्या किंमती मात्र वाढत नाहीत. त्यामुळे पैसे मिळविण्यासाठी धनिक शेतकरी नोकरदारांना हाताशी धरुन त्यांना पैसे देऊन शेतमालाला चांगली किंमत मिळवितात, सामान्य शेतकऱ्याला हे साध्य करता येत नाही. जसे पंजाबचा आठ एकर कापूस 'नर' बियाणे असल्यामुळे निरर्थक ठरतो. तेव्हा त्याचे वडील बाकी जमिनीतील कापासासंबंधी गेडरशी आटसाट जमविण्याचा निर्णय घेतात. अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार करायला प्रवृत्त करण्यास काही प्रमाणात धनिक शेतकरी जबाबदार असतात. त्यामुळे सामान्य शेतकऱ्यांचे शोषण होते. त्यांचा उत्कृष्ट माल निकृष्ट ठरविला जातो. कष्ट करण्योपक्षा दुसऱ्याच्या उठाठेवी करण्यात लोक रमू लागले. एकमेकांचे दोष पाहून 'खीज' पाडू लागले. (पृ.७९) तसेच लग्नविधी आणि इतर कार्यक्रमप्रसंगी लोक दारु पिऊन धिंगाणा घालू लागले. समाजात आपली अप्रतिष्ठा होते याकडे दुर्लक्ष होऊ लागले. उधार उसणवारी करुन चैन करण्याची प्रवृत्ती समाजात वाढली. दुसऱ्याला मदत करण्याची भावना नाहीशी झाली. सहकारी आणि सरकारी कार्यालयात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले. जसे, ग्रामविकासाच्या योजना अर्धवट ठेऊन पैसे मिळविणे, पोलिसांनी हप्ते घेणे, सहकारी सोसायट्या, बँका, कापूस फेडरेशन यामध्ये भ्रष्टाचार होऊ लागला. सामान्य माणसाला या समाव्यवस्थेत किंमत नाही.

"म्या म्हटलं भाउ पंजाब! आपन उपलानीच घड्याळ बांधतो हातात. खरं त इंडियात राहाचं म्हन्जे कॅलेंडरच ठेवाले पाह्यजे आपन संग. आता आपन तब्बल च्यार तास बसलो आकोल्याच्या यस्टीस्टँडवर. पन येकही गायगावले थांबीन अशी आर्डिनरी गाळी नाही सुटे. सुटत त्या सगळ!या सुपर यक्स्प्रेस शेगाव्यानावांन. म्हन्जे अशी चिल्लर गोष्टीले, चिल्लर मानसाले किंमत नाहीच. किंमत आहे सुपरपास्टले... त्यातही काही गाळ्या अशा लागत की काहीवर पाट्या नाहीत. अन काहीवर चुन्यानं लिहेल काचावर. अन तेही दोन दोन तीन नावं येकीवरच..." (११८)

वरील उताऱ्यावरुन प्रशासनव्यवस्था कशी खिळखिळी झाली आहे याची कल्पना येते. त्याचप्रमाणे वेळेचे महत्त्व आजही लोकांना समजलेले नाही. शिवाय सरकारी योजना अनुदान मिळत असूनही स्वीकारायला लोक फारसे उत्सुक नसतात. जसे हजार दोन हजार लोकसंख्या असलेल्या गरसोई गावात दहा अकराच सूर्यचुली

झाल्या. धनिक धनवान झाले, गरीबाला प्राथमिक गरजा पूर्ण करणे अशक्य झाले. येंड्रान संस्कृतीमुळे पशुपक्षांचे पारंपरिक नैसर्गिक जीवन नष्ट झाले. अनीती-अनाचार-व्यभिचाराचे प्रमाण वाढले. बुआबाजी हा बिनभांडवली धंदा जोरात चालू लागला. मातृभाषेपेक्षा इंग्रजीचे महत्त्व वाढले. अधिकारी आणि शेतकरी यांना एकमेकांबद्दल जिव्हाळा, प्रेम, आत्मीयता वाटत नाही. मोठाली स्वप्न नाहीत, मन मुरदाड झालेले दिसतात. डॉक्टरांची वृती समाजसेवकाऐवजी धंदेवाईक बनली. कामचुकारपणा, आळशीवृत्ती विदर्भातील मानसामध्येच मुरलेली दिसते. शेतीव्यतिरिक्त अन्य नवीन कोणताही धंदा करण्याची उत्पन्न वाढविण्याची त्यंची वृत्तीच दिसत नाही.

पूर्वीच्या गावगाड्यातील श्रीमंत पाटील आणि अन्य धनिकांकडे स्वातंत्र्योत्तर काळात गावातील प्रशासन व्यवस्था आहे. पिढ्यानपिढ्या पैशाच्या जोरावर ते सत्तेवर आहेत. सत्तेच्या विकेंद्रीकरणाची कल्पना पुढे आली, असता सरपंच, सोसायटीचा चेअरमन आणि अन्यसत्तास्थानांवर गावगाड्यातील पाटील व त्यांची नवी पिढी काम करताना दिसते. घराणेशाही स्वातंत्र्योत्तर काळात नाहीशी होऊ शकली नाही. सत्तेमुळे प्रतिष्ठा मिळविली जाते. ते सत्तेच्या जोरावर बेफिकिरीने वागतात. स्वार्थ साधतात. राज्य-देश पातळीवरील राजकारणात प्रवेश मिळावा म्हणून लोकसेवा करण्याऐवजी, पैशाने वरच्या राजकारणात लवकर प्रवेश मिळावा म्हणून अधिकाधिक भ्रष्टाचार करुन तसेच स्वत:च्या प्रांताचा स्वतंत्र प्रश्न उपस्थित करुन प्रसिद्धी मिळवितात. राज्य-केंद्र पातळीवरील पुढाऱ्यांना अडचणीत आणतात. मंत्रीपद, महामंडळाचे अध्यक्षपद मिळवितात. शोकसभा, श्रद्धांजली, उद्‌घाटन आणि भूमिपूजनाचे कार्यक्रम घेऊन वर्तमानपत्रातून खोटी प्रसिद्धी मिळवितात. राजकारण जनसेवा नाही तर उदरनिर्वाहाचा-प्रसिद्धी आणि मानसन्माचा धंदा झाला आहे. जनहितापेक्षा स्वार्थाला-सत्तेला येथे महत्त्व आहे. प्रत्येक पक्षामध्ये या ध्येयामुळेच गट-तट पडलेले दिसतात. गावामध्ये अशाप्रकारे गटबाजी असलेली दिसते.

कादंबरीत लेखकाने विदर्भातील एका खेड्याची राजकीय पार्श्वभूमी चित्रित करतानाच राज्य-देश पातळीवरील पार्श्वभूमीकडे वाचकाचे लक्ष वेधले. गरसोली खूर्दचे सरपंच पंजाबराव साहेबराव गरसोलीकर पाटील हा एक एम. ए. (मराठी) भाग एक पर्यंतचे शिक्षण घेतलेला तरुण अनिच्छेने राजकारणात कसा येतो, त्यांच्या वडिलांचे स्वप्न काय असते याचे चित्रण लेखक करतो. पंजाबरावला लेखकाचे निवेदन करायला लावले आहे. गावची सत्ता आमच्या घराण्याला पिढीजात आहे आणि यापुढेही अनेक पिढ्यांकडे राहील, यात नवीन काहीच नाही. ही पद्धतच आहे असे तो सांगतो. आपण गावचा सरपंच कसे झालो हे तो निवेदन करतो. निवडणुकांच्या बोगसबाजीत त्याला रस नसतो. तेव्हा समाजातील प्रतिष्ठेसाठी वडील त्याला निवडणुकीला उभा राहण्याचा सल्ला देतात. निवडणूक बिनविरोध होऊन पंजाब सरपंच होतो. "...पितृकृपेनं

सरपंच्य होईन त मीच. अन तोही कसा त अनपोच. काऊन त गेल्या कईक सालापासून आमचे तीर्थरुप सरपंच्य होतेच अन त्याही आंधी तीर्थरुपांचे तीर्थरुप... म्हन्जे माहे आबा. त्याआंधी आबांचे तीर्थरुप. त सांगाचा मतलब इतलाच की गावाच्या गढीवर आमचीच वडिलोपार्जित पताका फळफळ फळफळ फळफळत राह्येल... त्याईची पाटिलकी इंग्रजाईबरोबर गेली अन लाल गुलाबाच्या हातात हात घालून हे सरपंच्यकी आली... इंग्रज गेल्याचा ना फायदा ना तोटा... गेले त गेले... आले त आले. कसंबी फेक्सान तरी चित आमचीच!...''(पृ.४)

भारतीय खेड्यातील घराणेशाहीच्या सत्तेचे हे प्रातिनिधिक चित्र आहे. भाषणबाजीमध्ये मात्र लोकशाहीची थोरवी सांगितली जाते. लोकशाहीमुळे तळागाळातल्या सर्वसामान्य माणसांचा विकास होईल, त्याबरोबरच भारतात आमूलाग्र कायापालट होईल. विषमता नष्ट होईल. लोकशाहीने सरंजामशाही आणि मग्रूर घराणेशाही नष्ट होईल असा आशावाद भाषणातून नेते व्यक्त करतात. परंतु प्रत्यक्षात तळागाळातील जनतेच्या हिताकडे, विषमतेकडे कुणाचे लक्ष जात नाही.

सत्ताधारी राजकारण्यांची महत्त्वाकांक्षा प्रातिनिधिक स्वरुपात साहेबराव पाटलाच्या मनोदयातून व्यक्त होते. मुलगा मनासारखा वागला तर स्वत:ची  समाधी गांधी-नेहरुंना खेटून राजघाटावर बांधण्याचे आणि गरसोईपून ते दिल्लीपर्यंत शंभरांच्या नोटांची थप्पी लावून त्यावरुन दिल्लीपर्यंत चालत जाण्याचे ते स्वप्न पाहतात. गावचा सरपंच झाल्यावर जिल्हा परिषद, राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री, मुख्यमंत्री या शिड्या चढतचढत गेले पाहिजे. त्यासाठी स्वतंत्र विदर्भाची मागणी, स्वतंत्र विकासमंडळ, बॅकलॉग, सापत्नभावाची वागणूक, साखरसम्राट आणि शेतकरी संघटनेला विरोध केला की मुख्यमंत्रीपद मिळेल आणि शेवटी ''चालला रे चालला सातपुळा हिमालयाच्या मदतीले'' (पृ.६) विदर्भातील तरुण पंजाबला पंतप्रधानपद मिळाले की वडिलांची समाधी यमुनातिरी-राजघाटावर नेहरु-बापूंना खेटून बांधली जाईल असा आशावाद साहेबराव पाटलांना वाटतो.

पुढाऱ्यांवरील शस्त्रक्रियेसाठी लाखो रुपये खर्च केले जातात. त्यांच्या मृत्यूनंतर भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतात. राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला जातो. अंत्ययात्रा दूरदर्शनवरुन दाखविली जाते. पुढाऱ्यांच्या नावाने कोट्यावधी रुपयांची नवीन योजना जाहीर केली जाते. याचा अर्थ असा की देशपातळीवरील नेत्यांवर शासन मोठ्या प्रमाणावर खर्च करते. परंतु या देशातील सामान्य माणसाला प्राथमिक गरजा पूर्ण करता येत नाही. या विषमतेवरील हे भाष्यच आहे. पुढाऱ्यांची व्यसनाधीनता आणि मानपानाच्या कल्पनेवरही लेखकाने  प्रकाश टाकला आहे. गावास लस टोण्यासाठी आलेल्या डॉक्टरने परिचयाअभावी साहेबराव पाटलाला नमस्कार न केल्यामुळे दारुच्या धुंदीत त्यांनी डॉक्टरचा हात मोडला. तेव्हा पाटलाचा कुणी हात धरला नाही.

म्हणजेच सत्ताधारी आठमुठ्या राजकारणाला विरोध करण्याचा कुणीही प्रयत्न करीत नाही. गावपातळीवरील पुढारी, पंचायतसमिती आणि जिल्हा परिषदांचे अध्यक्ष तसेच अधिकारी यांच्या दिलजमाईमुळे सरकारी योजनांचा 'बभ्रा अधिक काम कमी' असे चित्र दिसते. प्रत्यक्षात या योजना जनतेपर्यंत येऊ दिल्या जात नाही. कागदोपत्री रंगविल्या जातात आणि सरकारी तिजोरी रिकामी केली जाते. ग्रामविकासासाठी असलेल्या सरकारी योजना उद्घाटन-भूमिपूजनासाठी गावात राबविल्या जातात. कोणतीच योजना पूर्ण होत नाही. परंतु आपल्या कार्याची पावती म्हणून पुढारी सर्व बातम्या वर्तमानपत्रातून छापून आणतात. प्रसिद्धी मिळवितात. राज्य-देश पातळीवरील पुढारी आणि अधिकारी यांना ओली पार्टी दिली की सर्व भानगडी दाबल्या जातात. याबाबतीत पुढारी आणि उच्च अधिकारी यांच्यात एकात्मता असते. पार्टी-पैसा मिळवून देणाऱ्या गावपातळीवरील पुढाऱ्यांना उच्च अधिकारी त्वरीत भेटी देतात. राजकारण, समाजसेवा हे केवळ मानपानासाठी केलेले नाटक असते. राजकारण हा उदरनिर्वाहाचा धंदा झाला आहे.

गावपातळीवरील नेत्यांप्रमाणे आज सामान्य माणूस देखील राजकारणामध्ये भाग घेऊ लागला आहे. दोन पुढाऱ्यांमधील सत्तास्पर्धा या लोकांना काही काळ आर्थिक फायदा करुन देते. चैन करता येते. सत्ताधारी आणि विरोधक यांना निवडणुकांच्या रिंगणात उतरविल्यानंतर ते अफाट खर्च करतात. मतदारांना खायला-प्याला देतात. नेहमीप्रमाणे विरोधकाला निवडणूक रिंगणात उतरविण्यासाठी प्रोत्साहन देणारे, तो पराभूत होताच त्याला टाळू लागतात. मागासवर्गीय आणि मुस्लिमांचे पुढारी विरोधकांना कसे प्रोत्साहन देतात हे मांगीला शेठच्या निवडणुकीच्या निमित्ताने वर्णन केले आहे. (पृ.२९)

परदेशातील नेते सामान्य माणसासारखे जीवन जगतात. परंतु भारतात मात्र नेहमीच सत्ताधारी विमानाने तर पराभूत झालेले चारचाकीतून फिरतात. गरीब राजकारणी या देशात शोधून सापडत नाही. शिवसेना, दलितपँथर आणि मुस्लिमलीग असे जातीयवादी संघटना-पक्ष कार्यरत असलेले दिसतात. अशा संघटनांच्या मतदानावर लक्ष ठेवून सत्ताधारी पक्ष त्यांना हाताशी धरतात. राजकारण्यांचा ढोंगीपणा, 'उक्ती एक-कृती भलतीच' असे चित्र लेखक रेखाटतो. दारुबंदी योजना सरकार जाहीर करते, परंतु पुढाऱ्यांचे किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांना दारुविक्रीचे आणि साखरसम्राटांना दारुनिर्मितीचे सरकारी परवाने दिले जातात. समाजाचा कायापालट होऊ शकत नाही ही लोकशाहीची शोकांतिका आहे. प्रसारमाध्यमे, रोजगार हमी योजना, बी-बियाणे, कापूस फेडरेशन, वृक्षारोपण, कुटुंबनियोजन, एस.टी. महामंडळ, आणि अन्य सर्वच मंडळ, योजना, संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालतो. कुटुंबनियोजनाचे धोरण असून मतांवर डोळा ठेवून लोकसंख्या वाढीकडे दुर्लक्ष केले जाते. पैशाच्या

जोरावर विविध कमिट्यांवर वर्णी लावली जाते.

परिवर्तनकाळामध्ये सरंजामशाही, घराणेशाही नष्ट होईल, विषमता समूळ नष्ट होईल असा आशावाद सामान्य जनतेला वाटत होता. परंतु याउलट परिस्थिती झाली. सामान्य माणूस आर्थिकदृष्ट्या मागासला. त्यामुळे तो व्यसनाधीन, जुगारी झाला, तर धनिक धनवान झाले. आर्थिक विषमता वाढली. शेतीला पूरक दुग्ध-व्यवसाय शेतकरी करु लागले. परंतु केवळ पैशावर लक्ष केंद्रित केल्यामुळे सर्वच्या सर्व दूध डेअरीला घातले जाऊ लागले. माणसा-मुलांना ते खायला-प्यायला न मिळाल्याने शेतीचे जड काम त्याला झेपेनासे झाले. परिणामी शेती उत्पन्न घटले. लोक जुगार-मटका, दारु-सिनेमांच्या नादी लागल्याने शेतीकडे दुर्लक्ष झाले. उत्पन्न घटले. निष्काळजीपणा, व्यसनाधीनता आणि निसर्गनिर्मित संकटामुळे लोकांची आर्थिक परिस्थिती खालावली. लेखक वर्णन करतो, "...सायाचे खातात को-ऑपरेटीव्ह बँकेच्या भरोशावर, फपळे घालतात भूविकास बँकेच्या अन् कार्यप्रसंग साजरे करतात जागतिक बँकेच्या भरोशावर!" (पृ.३७) किंवा "गाळी भाळ्याची अन बैल तगाईचे" (पृ.३८) असे शेतकऱ्याचे कर्जबाजारी जीवन दिसते.

जनसामान्यांना वेळेवर औषधोपचार मिळावा म्हणून सरकारी दवाखाने सुरु केले गेले. परंतु तेथील कारभारावर जनतेचा अजिबात विश्वास नाही. रोग्याचे प्रेत फक्त परत मिळते असा सर्वांना अनुभव येतो आणि खाजगी दवाखान्यातील औषध-डॉक्टरची फी परवडत नाही. कारण तीन रुपये रोजाने धंदा केल्यावर हे सर्व कसे परवडायचे हा प्रश्न आहे. सर्वत्र महागाई वाढल्याने सामान्यमाणसाच्या जीवनावर त्याचा विपरीत परिणाम झाला. शिवाय कष्ट न करण्याची आळशीवृत्ती लोकांमध्ये वाढीला लागली. गप्पाटप्पा करीत बसण्याची सवयच लागली. त्यामुळे अगदी प्राथमिक पातळीवरचे जीवन ते जगतात. तर धनिकांकडे बेहिशोबी संपत्ती जमा होते. रोजगार हमी बाबतीत लेखक लिहितो, "काम करनाराले करमकाट्या अन बसानाराले तुपरोट्या अशी मेथळ आहे रोह्योची." (पृ.११७) सरकारी योजनांतील भ्रष्टाचारामुळे सामान्य माणसांचे शोषण होते. विषमता वाढीला लागलेली दिसते. अशी भांडवलशाहीकडे तोल गेलेली भारतीय समाजव्यवस्था आहे. ज्याच्याजवळ पैसा आहे त्याला सर्व सुखसोयी तर सामान्याला नेहमीच गैरसोयीला सामोरे जावे लागते. शिवाय कोरडवाहू शेती धंदा पावसावर अवलंबून असल्याने बेभरवशाचा झाला आहे. उत्पन्नात दिवसेंदिवस घट येत चालल्याने लोक कर्जबाजारी झाले. व्यापाऱ्यांनी मालाच्या जाहिरातीवर मोठ्या प्रमाणात खर्च केल्याने त्याचा फटका लोकांना बसला. "नोट करे गोठ अन चिल्लर करे इच्चार" अशी परिस्थिती निर्माण झाली. समकालीन परिस्थितीत माणसाला किंमत नाही, तर कपडे, डाग-दागिने आणि पैशाला किंमत आली. विचारसरणी आणि चांगली वागणूक याला महत्त्व नाही.

सरकारच्या शिक्षणप्रसाराच्या धोरणामुळे खेड्यापाड्यातून शाळा, महाविद्यालये उघडली गेली. खेड्यातील तरुण पदवीधर होऊ लागले. परंतु त्यांचा आत्मविश्वास वाढला नाही. उलट रोजगाराअभावी उदासीनता वाढली. नोकरभरतीत भ्रष्टाचार होऊ लागल्याने पैसे देऊन नोकरी मिळविणे अशक्य झाले. शिकलेल्यांना शेतीची कामे करण्याची लाज वाटू लागली. तसेच वैफल्यामुळे ते व्यसनाधीन होत गेले. खेड्यातून उच्चशिक्षणासाठी शहरात गेलेले तरुण अभ्यासापेक्षा सिनेमा आणि तरूणींच्या नादी लागले. अभ्यास करुन परीक्षा देण्याऐवजी परीक्षकाला पैसे देऊन पास होण्याकडे तरुणांचा कल असलेला दिसतो. शिक्षणक्षेत्रातील हा भ्रष्टाचार समाजाला रसातळाला घेऊन जाणारा आहे.

ग्रामीण भागातील, अल्पसे शिक्षण घेतलेल्या तरुींना नोकरी करणारा पती हवा, शिक्षण घेऊन सुधारीत शेती करणारा-पत्नीला शेतीच्या कामाला लावणरा पती नको आहे. म्हणूनच शेती करणाऱ्या पंजाबचे लवकर लग्न जमत नाही. कला वाणिज्य शाखेच्या पदव्यादेखील निरर्थक आहेत. निरक्षर समाजाच्या दृष्टीने शिकलेले तरुण 'घनचक्कर' ठरतात. त्यांनाही नीट दिशा दिसत नाही. सोयरेधायरे नावं ठेवतात. तसेच नोकऱ्या न मिळाल्याने या तरुणांना गावात टिवल्याबावल्या करण्याची सवय लागते. शहरात आणि गावात किंमत होत नाही. या नकारात्मक परिस्थितीमुळे त्यांच्यामुळे त्यांच्यामध्ये व्यसनाधीनता वाढलेली दिसते. या तरूणांकडे पाहून लोक नव्या पिढीला शिकविण्याच्या फंदात पडत नाही. विदर्भ मुळात मागासलेला भाग आहे. सहकारी तत्त्वांवरील संस्था नाहीत. त्यामुळे पदवीधरांना नोकऱ्या मिळत नाहीत. याउलट पश्चिममहाराष्ट्राची स्थिती आहे. सहकारी साखरकारखानदारी आणि तद्नुषंगिक इतर प्रकल्पांमुळे पदवीधरांना नोकऱ्या उपलब्ध होतात. त्यामुळे तितक्या प्रमाणात बेकारी, व्यसनाधीनता दिसत नाही म्हणजेच प्रादेशिकतेचा समाजवास्तवावर कसा परिणाम होतो.

परिवर्तन काळामध्ये खेड्यांचा चेहरामोहरा बदलला असे दृश्य दिसत असले तरीही लोकांच्या अंतरंगात बदल झालेला दिसत नाही. वरवरचा बदल दिसतो. अनेक श्रद्धा-समजुती, रीतीरिवाज, परंपरा आणि सणउत्सवांना समकालीनांच्या जीवनात महत्त्व असलेले दिसते. विदर्भातील खेड्यापाड्यांमधून रिकामपणामुळे सर्व यात्रा-उत्सव साजरे केले जातात. प. महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या प्रमाणावर रिकामपण नसल्याने सण उत्सवांना फाटा दिलेला दिसतो. देवदेवतांचा भंडारा विदर्भाचे सांस्कृतिक वैशिष्ट्य आहे. प्रत्येक महिन्यात कोणत्या ना कोणत्या देवाचा भंडारा हा असतोच.

महादेवी जातो गा ऽऽ भोले रे नाथा! मुंगगाच्या वळयाची भाजी ऽऽ शिदोरीत ताजी ताजी ऽ ऽ

आकळीत जाऊ खिळकीत जाऊ, खिळकीत होता नंदीऽ ऽ

भूलोजीला लेक ना होने, त्यानं केली नसबंदी ऽ ऽ (पृ.१३२)
मुलगा वंशाचा दिवा माणणाऱ्या पंजाबच्या आईच्या ओव्या पहा.
माह्या लेकीचं लेकंर ऽ ऽ, जसा पंढरीचा पोवा ऽ ऽ
माह्या लेकाचं लेकरु ऽ ऽ, कुळीत लाईन दिवा ऽऽऽ

रीतीरिवाज आणि समजुती आजही नष्ट झालेल्या नाहीत हेच वरील ओव्या-गीतातून दिसते. जिथं अनपानी लिहेल अस्ते पोरीचं, त्याचं घरी ते पळते... आता वाळवळिलाईनच सांगून ठुल ना इचिबहीन की'' (पृ.४१) याप्रमाणे ''मामाची पोर्गी म्हणजे अधिकृत बायको'' (पृ.३५), संध्याकाळी झोपू नये, यावेळी लक्ष्मी येते. (पृ.१४९), प्रेतयात्रा गाव वेशीजवळ आल्यावर थांबवून प्रेत जमिनीवर ठेवून मसुरीची डाळ आणि पीठाने गावाशिवेची पूजा, रात्रभर कुत्रे इवळल्यास अशुभ घटना घडते.. गावातील कोणीतरी मरते, देवाला गाय सोडणे, लहानमुलांने जात्यावर बसू नये, पान्यचा धरत असतं, अशी पुण्याची कल्पना, देव-मुलगा-गाय यांची शपथ घेणे, जेवल्यानंतर आळस दिला की अन्न गाढवाच्या पोटात जाते. राजराजेश्वरावर अभिषेक करण्यासाठी कावडीने पूर्नेचे पाणी आणणे. सापाला धक्का लावला तर तो गावाचा डुख धरतो, चेटूक-माटूक-भूत-पिशाच आणि बुआबाजीच्या बिनभांडवली धंद्यावर अंधविश्वास, पायाळू माणसाचा पाय लावल्यानेकनक उतरते, जखमेवर गुळ-चुन्याचा लेप लावतात. तसेच तुळशीवृंदावनाला ओटा बांधला जातो. त्याचा उपयोग हिवाळ्याच्या दिवसात उन्हपाहाळ्या घेण्यासाठी, उन्हाळ्यात रात्री बाहेर जेवणासाठी केला जातो. यासारखे समजूती-परंपरा आणि अंधश्रद्ध आहेत. त्याचप्रमाणे पहाटे काकड आरती करण्याची परंपरा प्रदेश विशिष्टच आहे.

''तुळशी लावोनिया कुकू, तेथे उभी होती सखू।।
तुळशी वंदावी माऊली... तुळशी वंदावी माऊली''(पृ. ८२)

याप्रमाणे दुष्काळात पाऊस पडावा म्हणून 'धोंडी धोंडी पानी दे, अदली अदली जवारी दे, धोंडीचं भिवसं, पानी मोठं हिवसं, दाय शिजू दे, माय, शिजू दे. धोंडीमाता पानी येऊ दे. निंबाचा पाला, खोबऱ्याची वाटी, बेडकी बांधली पान्याचसाठी, धोंडी गेली गगनात अन पानी आलं आंगणात!...'' (पृ. १४७) याप्रमाणे ओव्या-लोकगीतातून श्रद्धासमजूतीतून प्रदेशविशिष्ट वैदर्भीय संस्कृतीचे दर्शन घडते.

वैदर्भीय जीवनदर्शन घडविणारी पात्रमुखी निवेदनपद्धतीने सांगितलेली ही कादंबरी कॉमेंट्री (धावते समालोचन) आहे. वऱ्हाडी बोलीतून तिचे निवेदून व संवाद एकजीव होऊन अवतरले आहेत. केवळ वऱ्हाडीच नव्हे तर प्रमाण मराठी, हिंदी, इंग्रजी शब्दाचा मुक्तहस्ताने लेखकाने केलेला वापर स्वाभाविकच वाटतो. कारण कादंबरीचा नायक शिक्षण-दूरदर्शन-आकाशवाणीचे खेडगुजरी संस्कार झालेला पदवीधर आहे. घटना, प्रसंग या शब्दांच्या मिश्रणातून जिवंत करण्याचा प्रयत्न केला आहे. संवाद

सहजस्वाभाविक वाटतात. वऱ्हाडी बोलीतील नावीन्यपूर्ण, अर्थघन वाचकाला कादंबरीचे वाचन करतानाच कळलेल्या असतात. हेंबाळे, इंचिमायबहिन, भतानीले, ससरीच्या, मायचा कानकोंडा, इच्यामायले इ. शिव्यादेखील आशयानुरुप आल्याने अश्लील-ग्राम्य वाटत नाही.

वऱ्हाडी लोकजीवन जीवनात रुळलेल्या म्हणी, वाक्प्रचारांचा उपमा-प्रतिमांचा वैशिष्ट्यपूर्ण उपयोग करुन वास्तवाचे सुसंगत दर्शन घडविले. "धंदे के सामने दोस्ताना गया भाळमे, अन् सबसे बळा रुपैय्या", "म्हैस डोबीत अन वदर मोल", "घरी नाही शेरपसा अन इतरते भकलसा", "गाळी भाळ्याची अन् बैल तगाईचे", "उचलली जीभ की लावली टाऊले", "धांडधुन्डा खाये अन् हल्या संड राह्ये", "...मोठ ना माठ अन् धस माह्या कानात", "रान जयतेत जन पाह्यते, मन जयते ते कोन पाह्यते", "यांच्या त्याच्यावर भागे, त मंग नवरा काहाले लागे?", "चोट्टे चोट्टे घनेदोस्त फुग्गा फुटल्यावर जसा तितरबितर होते लक्तरासारखा तसा", "चालसान त निरा थंडीगार, मरेल ढोरासारखी लागे तय पायाले."

याप्रमाणे अनेक म्हणी, वाक्प्रचार आणि उपमा-प्रतिमांचा वापर लेखकाने केला. जयंतकुमार बंड यांनी कादंबरीच्या निवेदनासंबंधी असमाधान व्यक्त करताना म्हटले आहे की, "पुरुषोत्तम बोरकरांनी निवेदनासाठी जी वऱ्हाडी भाषा वापरली आहे, तिचा बाज अस्सल वऱ्हाडी नाही. अर्धवट नागरी आणि अर्धवट ग्रामीण असं त्या भाषेचं अर्धवट स्वरुप आहे... 'धग' आणि 'माणूस' सारख्या कादबऱ्यातील वऱ्हाडी भाषेला जो गोडवा आहे आणि जो वऱ्हाडी भाषेचा जो सुगंध आहे, तो 'मेड इन इंडिया'तील वऱ्हाडी भाषेला नाही. सारंच काही हास्योत्पादक करण्याच्या प्रवृत्तीमुळे मुलभूत वऱ्हाडीचा गोडवा हरवला गेला आहे. त्यामुळेच 'मेड इन इंडिया'च्या निवेदनाचा तोल ढासळला आहे."४३. वरील अभिप्रायच प्रस्तुत कादंबरीच्या निवेदनाचे वेगळेपण देखील मान्य करण्यास भाग पाडतो. शिक्षणप्रसारामुळे तरुणांची हिंदी-इंग्रजी मिश्र मराठी बोलण्याची अलीकडची पद्धत लेखकाने स्वीकारलेली दिसते. ती अधिक स्वाभाविक वाटते. निवेदनाचा तोल ढासळण्याचे कारण नाही. 'धग', 'माणूस'च्या निवेदनाशी तुलना केल्याने तसे वाटणे स्वाभाविक आहे. तिच्यासंग भाक्रीकांदाऽऽऽ गळावर आला वांधा ऽऽ मले आठवे गा भोलेऽऽ महाबीजचे हे होलेऽऽ जुने बहमरमबुवाचे ऽ हे नवीन याईचे ऽऽ बोला ऽऽऽ हरबोला माहादेवऽऽ (पृ.४२-४३). श्रावणमहिन्यात बंबोल महादेवाचा आणि नागपंचमीचा भंडारा चंदनशेष महाराजांचा जयघोष करीत तांब्याची परात हातातील कुंड्याने वाजवितात. गीत-ओव्या म्हणतात. सालबर्डीच्या महादेवाचा-भंडारा हे वैदर्भीय जीवनाचेच वैशिष्ट्य आहे. त्याचप्रमाणे भाद्रपद-गणपती, आश्विन-नवरात्र भंडारा, कार्तिक-एकादशीला भंडाऱ्यासारखे मावंद, मागशीर्ष दत्तजयंती, पोष-मरीमाय जत्रा, माघ-परिबाबाची जत्रा, दसऱ्याच्या दरम्यान

कपाशीच्या शेतातील सीतादई, फाल्गुन रावनवी, चैत्र-वैशाख हनुमानजयंती, आषाढ-एकादशी हे वर्षभरातील भंडारे आजही सर्व गावकरी एकत्र येऊन करतात. (पृ.१४)

दसरा-भोंडल्याच्या वेळी स्त्रिया फुगड्या खेळत गीत गातात. लोकांची थट्टा करण्याची परंपरा विदर्भाचे सांस्कृतिक वैशिष्ट्य आहे. जसे,

"...फुगली खेऊ खेऊ जागा झाली कायी अन हत्याच्या सोंडीवर मोत्याची जाई... माह्या पिंगा, गेली येशी, वयते म्हशी, माह्या पिंगा, गेला बोरी, वयते पोरी... माह्या पिंग्याले झाली दीठ... उतरा मीठ" (पृ.११५)

गावातील माणसातील थट्टामस्करी, विडंबन एका स्त्रीने करायचे आणि बाकीच्यांनी तिला साथ द्यायची अशी परंपरा आहे. त्याचप्रमाणे नातेवाईकांचे विडंबन केले जाते. उदा. "...अककनमाती, चिक्कनमाती, माह्या पाय घसरला वो माय ऽऽऽ वयनीचा भाऊ, तोंडावर शला, जसा काही हेला पसरला वो मायऽऽऽऽ..."(पृ.११५)

"अरबट बरबट बोरीचं जातं... पायना हाले दोई दोई हात...
उठरे उठरे ताम्हनं बाळा, मी तर जाते सोनाआळा...
सोनारआळ्याचं काही नाही आलं, जिऱ्यामिऱ्याचं आलं...
नदीच्या आल्याळ, नदीच्या पल्याळ, दामाजी सोनार, त्यान घडविला
खच्चापराचा देव... म्या म्हटलं, हे भुलाबाई!" (पृ.१२०)

याप्रमाणे भुलाबाईचे गाणे म्हटले जाते तसेच भूलोजीचे गाणेही पहा.

अकळीत जाऊ खिळकीत जाऊ, खिळकीत होता टी व्हीऽऽ
भूलोजीले लेक झाला, नाव ठेवा रवी ऽऽ

प्रस्तुत कादंबरीत लेखकाला समकालीन परिस्थितीचे विदारक चित्र रेखाटावयाचे आहे. लोकशाहीसमाज व्यवस्थेतील ऱ्हासपर्व लेखकाने विनोदी शैलीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. घराणेशाही किंवा सरंजामशाही लोकशाही शासन पद्धतीने नष्ट होण्याऐवजी त्यांचे प्रस्थ वाढले, भ्रष्टाचार-भेसळ-वशिलेबाजीने समाज-देश पोखरला गेला हे किस्सेवजा पात्रमुखी निवेदनपद्धतीने लेखकाने चित्रित केले आहे. वसंत वाहोकार यांना ती वेगळ्या टप्पयावरील४४. कादंबरी वाटते. तर 'एका माणसपेक्षा समूहाचे दर्शन होते"४५. असे आशा मुंडले म्हणतात. तसेच शंकर सारडा यांनी 'कोसला'चा पुढचा टप्पा म्हणून 'मेड इन इंडिया'चा नायक पंजाबराव आपल्या वाङ्मयीन संस्कृतीचा एक वैशिष्ट्यपूर्ण घटक म्हणून गाजत राहील"४६. असा आशावाद व्यक्त करतात.

सारांश, वैदर्भीय जीवनचित्रण करता करता एका नव्या वेगळ्या पद्धतीने लेखकाने प्रादेशिकतेचा समाजवास्तवावरील परिणाम दाखवून दिला आहे. प्रादेशिकतेच्या मर्यादा ओलांडून तिने पुढचे पाऊल टाकले आहे. समूहजीवन चित्रण करणारी काहीशी प्रातिनिधिक कादंबरी आहे.

## ५) मधुकर वाकोडे - *'झेलझपाट'*

मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट' ही १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेली पहिलीच कादंबरी आहे. अमरावती, परतवाड-मेळघाट, परिसरातील कोरकू आदिवासींच्या जीवनाची परवड रेखाटणारी जनजातिविषयक वैदर्भीय कादंबरी आहे. कादंबरीचे कथानक दुपदरी आहे. केरु-फुलयची प्रेमकथा रेखाटताना लेखक कोरकूंच्या समाजजीवनाचे आणि जीवनपद्धतीचे दर्शन घडवितो. जनजातींच्या मूल्यकल्पनांना विरोध करण्याचे सामर्थ्य केरु-फुलय मध्ये नसल्यामुळे ते एकमेकांच्या जवळ असूनही त्यांचे मिलन होऊ शकत नाही. आईच्या मृत्यूनंतर तरण्या फुलयवर घराची जबाबदारी पडते. लग्नाचे वय झालेले असतानादेखील तिचा बाप मोपा दारु पिऊन घरात बसतो. मोपाला सांभाळण्याची जबाबदारी पार पाडणारी फुलय आदिवासींच्या स्वभावातील मोकळेपणाने वागते. मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या केरुवर उत्कट प्रेम करते. कासम मण्यारी प्रेमाच्या आड येतो, तेव्हा वाघाच्या मिशा मटनात घालून फुलय त्याचा कायमचा काटा काढते. केरुबरोबर ती मोकळेपणाने वागते. नृत्य करते. गीत गाते. मासे पकडते. लाकडाच्या मोळ्या आणते. मोहफुले गोळा करते. प्रत्येकवेळी केरुची साथ तिला मिळते. त्याच्या उत्कट प्रेमाचा साक्षात्कार होताच लग्न करण्याचे स्वप्न पाहते. परंतु व्यसनी मोपा, तुमला पटेलकडे जाऊन सोयरिक जमविण्याच्या भानगडीत पडत नाही. कासम-फुलय संबंधांच्या संशयाने झपाटल्याने केरु तिच्याशी बोलणे-भेटणे टाळतो. जातीमधील हुंड्याच्या कल्पनेमुळे ती केरुच्या घरात घुसू शकत नाही, तर केरुला लांबजान्या (घरजावई) होऊन मोपाकडे येऊन राहणे पटत नाही. शेवटी देवीच्या कुंडावर मासे पकडण्यासाठी गेलेला केरु कपारीत अडकून मरतो, तेव्हा मोहाची दारु पिऊन फुलय देवीच्या कुंडात आत्मसमर्पण करते. मृत्यूनंतर कुंडात दोघं एकत्र येतात(?) अशी ही फुलय - केरुची शोकांतिका आहे.

परिवर्तन काळामध्ये आदिवासींच्या जीवनशैलीवर झालेला परिणाम हा कादंबरीच्या कथानकाचा दुसरा महत्त्वाचा पदर आहे. मोहफुले आणि लाकूडफाटा जमा करुन उदरनिर्वाह आणि सणउत्सव साजरे करणाऱ्या कोरकूंच्या पारंपरिक जीवनावर टायगर प्रोजेक्ट, सहकारी संस्थातील भ्रष्टाचार, सरकारी अधिकऱ्यांची आणि राजकारणी लोकांची अरेरावी, उपऱ्या स्वार्थी, लबाड आणि कामांध दलाला-व्यापाऱ्यांची 'लुबाडण्याची वृत्ती या सर्व गोष्टींमुळे त्यांचे भावविश्व उद्ध्वस्त झाले. सरकारने वाघ-अस्वल-डुकरांसाठी अभयअरण्य केल्यामुळे जंगली जनावरांना अभय आणि माणसांना भय अशी परिस्थिती निर्माण झाली. जंगलावर पोट अवलंबून असणाऱ्या आदिवासींना हे जंगली प्राणी ठार करु लागले. परंतु जंगली प्राण्यांना लोकांनी ठार मारणे सरकारला मान्य नाही. त्यामुळे जनजीवनात अनेक समस्या निर्माण झाल्या. सरकारी योजनेनुसार आदिवासी स्त्रियांसाठी स्वस्तदरात लुगडे वाटपाचे धोरण असताना रहिमशेठने परस्पर

लुगडे विकणे, कमी किंमतीत माल खरेदी करणे, दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देणाऱ्या शासनानेच आदिवासींच्या पुनर्वसनाचा निर्णय घेऊन नवीन समस्या उभी करणे, अधिकारी पुढाऱ्यांच्या लैंगिक सोयीसाठी नेमणूक झाल्याने अंगणवाडीतील बाईने सोयीनुसार वर्ग चालविणे. सुकडी वाटणे, इच्छेविरुद्ध वर्तन करताच तिची गैरसोयीच्या ठिकाणी बदली करणे, या संदर्भामधून लेखकाने आदिवासींचे शोषण कसे होते हेच सूचित केले आहे.

'झेलझपाट' केरु-फुलयची प्रेमकथा असल्याने अर्थात कादंबरीचे नायक-नायिका स्वाभाविकपणे ते दोघे आहेत. परंतु तारुबांधातील रहिवासी लेखकाने नेमकेपणाने जिवंत केले आहेत. प्रेमकथेइतकेच समूहजीवन चित्रणाला येथे महत्त्व आहे. मोहफूल आणि लाकूडफाटा जमा करणारे, मच्छीमार करणारे, मोहाची दारु पिऊन नृत्य करणारे, कुटुंबनियोजनाला घाबरणारे, जातीच्या परंपराचे पालन करणारे कोरकू आणि त्यांचे लांबजाणे तसेच गवळी ढाण्यातील शेतकरी आणि उपरे व्यापारी, सरकारी अधिकारी यांचे वास्तव चित्र लेखकाने रेखाटले आहे.

केरु हा मॅट्रिकपर्यंत शिकलेला धाडसी जवान आहे. शोषणाची जाणीव असूनही तो एकटा समाजासाठी आणि स्वत:साठी काही करु शकत नाही. लेखक वर्णन करतो, "केरु तसा समजदार, वर्तमानपत्राची ओळख असलेला ढाण्यातील पहिला मुलगा. धोतर न नेसता पायजमा शर्ट घालणारा. डोक्यावरील केसांचा भांग पाडणारा. कपाळावर भुवयांच्या मध्यभागी मस. जणू कायमचा टिळा. डोळे बोलके. रंगानं काळाशा. पण तुकतुकणारा तजेलदार काळेपणा. चेहरा पसरट... नाक बसके. नुकतीच ओठावर मिसरुड हरळसारखी वर डोकावरणारी. हनुवटीवर फक्त चार-पाच केसांचा एक पुंजगा उगवलेला. वडिलांपासून अनेक हुन्नर शिकलेला. गुल्लरचा अचूक मारा करणारा. बासाच्य कमच्यापासून कितीतरी वस्तू करण्यात धडपडणारा." (पृ.१५) प्रेमकथेचा नायक असूनही लेखकाने त्याला सामान्यच ठेवले आहे. असामान्यत्व बहाल केले नाही त्यामुळे केरुची व्यक्तिरेखा अधिक स्वाभाविक वाटते.

'फुलय' ही मोपा पटेलची, आईच्या प्रेमाला पारखी झालेली उफाड्याची मुलगी कादंबरीची नायिका आहे. लेखक वर्णन करतो, "थोडासा उजळ पण काळसर पाणीदार चेहरा, पिळदार पोटऱ्या... उभट स्तन... किंचित बसके नाक. कपाळावर... हनुवटीवर गोंदणाचा निळसर ठिपका. काळसरपणात हरपलेला. डोळ्यात वणव्याच्या ज्वाळा... गळ्यात हिर्व्यालाल मण्यांची माळ, केसाचा बुचडा बांधलेला. डाव्या बाजूला कानालगत केसात पीन खोचलेली. अवजड इंधनाच्या मोळ्या डोक्यावर वाहिल्यानं मानेत आलेला ताठा... " (पृ.३४). "बाभूळ वनात जांभूळ उठून दिसावी तशी फुलय गर्दीत उठून दिसत होती." (पृ.१६) अशी ही फुलय घरची जबाबदारी सांभाळते. दारुत धुंद असणाऱ्या बैठ्या बैलासारख्या बापाला सांभाळते. मोहफुले-

लाकडे विकून उदरनिर्वाह करते. केरुच्या घरात घुसण्याची इच्छा बाळगून असते. केरुच्या सहवासात स्वत:ला विसरते. नाचते, गाते. मासळी पकडायला जाते. लगट करु पाहणाऱ्या कासमचा मटनात वाघाच्या मिशा घालून जीव घेते. संशयामुळे अबोला धरलेल्या केरुबद्दलही तिच्या स्वाभिमानी मनाला राग आल्याशिवाय राहत नाही. परंतु केरुच्या मृत्यूनंतर मात्र ती आत्मसमर्पण करते. तिच्या उत्कट प्रेमाचा शेवट होतो.

कादंबरीतील अन्य गौण पात्र समकालीन समाजवास्तवाचे दर्शन घडविणारे आहेत. मोपा लाचार, व्यसनी, किळस आणि आळस यांचा मुर्तिमंत अवतार आहे. लेखक वर्णन करतो, "मोपा पटेल खुज्या शिंदीच्या झाडासारखा, त्याच्या उघड्या पोटऱ्यावर फांजऱ्याचे ओरखडे उमटले होते. काळ्या पाटीवरील रेघांसारखे, डोळे खोल. नदीच्या काठावर वाढलेल्या अणकुचीदार बाबूंच्या बेटासारखी ओठावर मिसर. गालावर केसांची पांढरी धसकटं कडबा सोंगलेल्या वावरातील फनकटासारखी..." (पृ.५), तुमला पटेल केरुचा बाप, तर चैतू अस्वलाने ओरबडून मारलेली फुलयची आई, रामोती सोमा पटेलची मध्यमवयाची, खट्याळ पत्नी, मालाय ही हिराजी म्हाताऱ्याची, नवऱ्यासोबत गाहेरात नांदणारी मुलगी. भिमला आणि सुंदर हे केरुचे बहिणभाऊ, वुईके हा कोरकू समाजातील सोसायटीचा सेक्रेटरी, कासम मण्यारीवाला, खंडेलवाल मारवाडी, रहिमशेठ, तलाठी उत्तम, चौकीदार संपत, उत्तमचा भाऊ विठू, डॉ. टिकेकर, अंगणवाडीच्या बाई, बी.डी.ओ. आणि सभापती, पोलीस तसेच अन्य कोरकू आणि गवळी ठाण्यातील लोक या सर्वांच्या चित्रणामुळे समकालीन विसंवादी आणि भ्रष्टाचारी जीवनपद्धतीचे वास्तव दर्शन घडविण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

विदर्भातील मेळघाट-अमरावती-परतवाडा परिसरातील आदिवासी कोरकूंचे समाजजीवन चित्रत करणारी 'झेलझपाट' ही जनजातीविषयक वैदर्भीय कादंबरी आहे. एकझिरा ते सलोन्याला जाणाऱ्या रस्त्यांवरील तारुबांदा हे एक मागासलेले गाव आहे. जवळपास घनदाट जंगल, डोंगररांगा, सीपना नदी आणि लहानलहान शेतजमीनीचे तुकडे आहेत. या लाल मातीत कोरकू कोदो, सावा, कुटकी हे गवती धान्य पिकवितात. गवळी रताळी-ज्वारी पिकणून उदरनिर्वाह करतात. "कोरकू ढाणा म्हणजे एक बेट होतं. दुनियेशी संबंध येत नसे त्यांचा... जुजबी कामाशिवाय." (पृ.८९) या वर्णनावरुन त्यांच्या मागासलेपणाची कल्पना येते. मोह, पळस, संकेसर, शिंदी, बास, साग, मकई, चारोळी या प्रदेशातील झाडे आहेत. मोह फुलं गोळा करुन कोरकू उदरनिर्वाह करतात. त्यांच्या घरांची बांधणी प्रदेशविशिष्ट अशीच आहे. "माथ्यावरचा कोरकू ढाणा म्हणजे तीसचाळीस गवती झोपड्यांच्या अमोरासमोर दोन रांगा, मधोमध खूप रुंद रस्ता, सागाची पानं... गवत यांनी शाकारलेल्या झोपड्यांना मागे पुढे अशी दोन

दोनप दारं होती. झापांनी बंद करता येण्यासारखी. कडीकोयंडा... कुलूपकिल्ली यांचा विटाळ झोपड्यांना असल्यानं माणसावरील भरोसा कायम होता. प्रत्येक झोपडीसमोरील आंगणवजा ओटा शेणाचा गिलावा केल्यानं सुबक दिसत होता. चोपडा करगरीत ओटा आणि समोरच्या दोन्ही बाजूंना उभ्या खुंटावर आडवे सांगाचे गोल टाकून त्याचे बोकडे केलेले होते. अंगणात एखादी बासाच्या तट्ट्याची बाज आणि समोर सोडलेल्या शिंगाड्या गोल टाकून त्याचे बाकडे केलेले होते. अंगणात एखादी बासाच्या तट्ट्याची बाज आणि समोर सोडलेल्या शिंगाड्या ... फटाड्या बंड्या.'' (पृ.५) दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी कोरकूंची वस्ती प्रदेशविशिष्ट आहे.

''...माघाच्या प्रारंभी झालेल्या गारपीटीनं पानांच्या फर्दळ्या झाल्या होत्या. चिंध्यात लपेटलेल्या फाटक्या माणसासारखी झाडं होती पण आता अस्थिपंजर... उदासवाणी उभी होती. नागवल्या गेलेल्या माणसावानी... काळपट पांढरवट चट्टेपट्टे असलेल्या काही झाडांच्या उघड्या मुळ्या वेटोळे घातलेल्या अजगरासारख्या दिसत होत्या...

पुढे सलोन्याला जाणारा रस्ता तारुबांद्याचे दोन भाग करतो. भांगानं जसं केसांचं जंगल दुभागलं जावं तसं तारुबांदा दोन ढाण्यात विभागलं. दोन्ही टेकड्यावरील झाडांची बेसुमार कत्तल झालेली. टेकड्यांच्या घसरगुंडीवर कोरकूंची जीवघेणी मशागत, टेकड्यांवरील ही चौकोनी कापासासारखी वावरं बर्फीकापाच्या चळतीसारखी दिसतात...''(पृ.१-२)

वरील वर्णन भू-प्रदेश विशिष्ट आणि कोरकूंच्या जीवनक्रमावर परिणाम करणारे आहे. शंकर सारडा लिहितात, ''निसर्ग हा कोरकूंच्या जीवनचा आद्य अविभाज्य घटक. सर्वव्यापी, सर्वसाक्षी. या निसर्गाची विवधि रुपे मधुकर वाकोडे यांनी अत्यंत तरलपणे टिपली आहेत. प्रतिमा-प्रतीके आणि नेमकी वास्तवदर्शी शब्दचित्रे याद्वारे ही निसर्गशिल्पे डोळ्यापुढे यथार्थपणे उभी राहतात.''४७. निसर्ग आणि ऋतुचक्रांच्या बदलत्या रंगाचा कोरकूंच्या जीवनक्रमावर परिणाम होतो. माघ ते चैत्र-वैशाखापर्यंत आनंदी असणारे कोरकू वैशाखानंतर अबोल बनतात. होळी पौर्णिमेची ओढ त्यांना बोलती करते. व्यक्तीच्या मानसिकतेनुरूप लहानलहान निसर्गचित्र लेखक रेखाटतो आणि योग्य तो परिणाम साधतो. जसे मोपाला दारु मिळाल्यानंतर तो खुशीत येतो. ''ढाण्यापलीकडील टेकडीवर चंद्र वर आल्यानं आता फिक्कट चांदणं सांडलं होतं. रान फुलांचा मंद गंध वाऱ्यावर तरंगत होता.'' (पृ.८) यातून कोरकूंची व्यसनाधीनता चित्रित होते. त्याप्रमाणे समूहाची मानसिकता-होळी प्रसंगीच्या आनंदीवृत्तीशी अनुरूप निसर्गचित्र पहा.

''रात्रभर वारा शिडूच्या वासानं भिरभिरत होता. डोंगर थरारला होता... चंद्रही थबकत चालत होता? पूर्वेकडच्या टेकड्यावर आभा पसरली. तांबड्या किरणांची, उशिरा आलेल्या सूर्याला होळीच्या ज्वाळा चाटता आल्या.'' (पृ. ५१) किंवा गवळी

ठाण्यातील लोकांची आनंदी मानसिकता टिपणारे निसर्गदृश्य, "...चैत्राच्या चैतन्याची कळा आता रानभर पसरली होती. मोहाच्या पानांना लालचुटूक पानांचा साज चढत होता. ती कोवळी लुसलुशीत पानं वाऱ्यावर हलताना उघडझाप करणाऱ्या बाळमुठीसारखी दिसत होती. जांभूळाच्या झाडांना हिरवट तोरम दिसू लागले होते. सीपनाकाठच्या झाडाच्या गर्दीत भटकणाऱ्या शिंदीला खजुरासारखे शेंदरी घोस टुमकत होते."(पृ.७३) अधिक फायद्याचा दुग्धव्यवसाय करायला मिळणार म्हणून आनंदात असलेल्या गवळीठाण्यावरील लोकांच्या मानसिकतेनुरूपच वरील निसर्गचित्र रेखाटले आहे.

"चढत्या रात्री आभाळ भरुन आल्यानं आणखी उकाडा वाढला. वाऱ्याचं हुतूतू सुरु झालं. झोपड्यांच्या पाख्यातून कुजलेल्या गवताचे... सागाच्या पानांचे गुचके पडू लागले... उडू लागले. विजा चमकल्या की डांबरी रस्त्यावर घरंगळत जाणाऱ्या पिपरचा व्हावा तसा आवाज होत होता. वाऱ्यावदळानं केरकचऱ्यासोबत रात्रही सावटून गेली." (पृ. ३७) समाजपरिस्थितीमुळे उदास झालेल्या केरुच्या मानसिकतेनुरूप हे निसर्गचित्र रेखाटलेले दिसते. त्यातून समाजवास्तवाची कल्पना येते.

अंगणवाडीच्या बाईंना सभापती आणि बी.डी.ओ. बदलीची धमकी देऊन अरेरावी करतात. तेव्हा "आभाळात ढग जमा झाल्यानं नुकतच बिळाबाहेर पडलेलं चांदणं भित्र्या सशासारख पळालं होतं... वणवा चुकवून धावणाऱ्या हरिणीला गारवा लागल्यावर बरं वाटावं तसं."(पृ.६१) असे वर्णन येते.

लाकूडफाटा-मोहफुले गोळा करुन आणि सीपनानदीच्या डोहात मच्छीमार करुन उदरनिर्वाह करणाऱ्या पारंपरिक निसर्गाश्रित जीवन जगणाऱ्या आदिवासी कोरकूंच्या जीवनातील झेलझपाट लेखकाने टिपला आहे. शासनाने आदिवासीचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि त्यांना समाजविकासाच्या प्रवाहात सामील करण्यासाठी नवनवीन योजना जाहीर केल्या. त्या योजनांचा फायदा आदिवासींना मिळण्याऐवजी केवळ सरकारी अधिकारी आणि व्यापारी यांनीच संधी साधण्यास प्रारंभ केला. अन्यायविरूद्ध लढणाऱ्याच्या पदरी निराशा येते हे पाहून आदिवासी लोक नागर जीवनाच्या संपर्कामुळे दुबळे झाले. परिवर्तनकाळात त्यांच्या जीवनात नवीन समस्या निर्माण झाल्या. शोषणाची जाणीव नसलेल्या पारंपरिक जीवन जगणारे आनंदाने नाचणाऱ्या कोरकूच्या स्वाभाविक जीवनात परिवर्तन आले. तारुबांद्याच्या टेकड्यावरील जमिनीच्या लहान तुकड्यांमध्ये कोरकू कष्ट करुन कोदो, कुटकी ज्वारी पिकवितात. जंगलावर त्यांचे पोट अवलंबून आहे. परंतु "प्रोजेक्ट टायगर" म्हणजे अस्वल, डुक्कर, वाघ यांना अभय आणि माणसाला भय, माणसांना मारणे, वाघांना तारणे अशा वनखात्याच्या कायद्यामुळे कोरकूंचे जीवन धोक्यात आले. जंगली प्राणी त्यांचे प्राण घेऊ लागले. परंतु त्यांना या जीवघेणाऱ्या जंगली प्राण्यांना मारण्याचा अधिकार नाही. माणूस मेला तरी चालेल एवढाच त्यांना 'प्रोजेक्ट टायगर' कायद्याचा अर्थ कळतो. वनविभागाच्या कायद्याने

आदिवासी कोरकूचे बळी जाऊ लागले. दहशत बसल्याने ते एकटेदुकटे जंगलात जायला घाबरु लागले. अस्वलमाद्या पुरुषांना नको ते करण्यास भाग पाडू लागल्या. अफवा पसरुन जनजीवन विस्कळित झाले.

आदिवासींच्या मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी म्हणून गावागावामध्ये अंगणवाडी केंद्र सुरू करण्यात आले. परंतु या केंद्रावरील शिक्षक मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. पंचायत समितीचे अधिकारी आणि सभापती यांची मर्जी सांभाळण्यात दंग असतात. त्यामुळे ही मुले शिक्षणापासून वंचित राहतात. शिवाय मातृभाषेतून शिक्षण दिले जात नाही. म्हणूनही त्यांना शाळेबद्दल, शिक्षणाबद्दल आस्था वाटत नाही. भ्रष्टाचार करणाऱ्याविरुद्ध एखाद्या साक्षराने आवाज उठविला तर जातपंचायत दारिद्र्य आणि अज्ञानामुळे त्याच्या पाठीशी उभी राहत नाही. ताल नसलेले बेताल जीवन ते जगतात. दुसऱ्यांच्या भानगडीवर उलटसुलट चर्चा करतात जसे अंगणवाडीची बाई आणि व्हेटर्नरी डॉक्टर किंवा पंचायत समितीचे अधिकारी यांच्या संबंधाबद्दल गवळी ठाणा आणि कोरकू ढाण्यात चर्चा होते. मूल नसलेल्या विठूबद्दल चर्चा होऊन औषधोपचार-मंत्रतंत्रावर चर्चा होते. विविध गोष्टीसंबंधी अफवा पसरतात.

आदिवासी स्त्रियांसाठी अल्पदरात लुगडे वाटपाची सरकारी योजना कागदोपत्री राहते. विधानसभेच्या निवडणुकीसाठी खर्च करणारे व्यापारी हे लुगडे परस्पर खरेदी करुन जास्त दराने त्यांनाच विकतात. त्यांना विरोध करण्याचा प्रयत्न केला तर विरोध करणाऱ्याला आयुष्यातून उठविले जाते. जसे, व्यसनी संपत, वुईके आणि रहिमशेठला विरोध करतो. 'गरीबी हटाव' म्हणणाऱ्या सरकारच्या धोरणाला शिव्या देतो. परिणामी त्याचा खून केला जातो. दारु पिऊन मृत्यु अशी केस निकाली काढली जाते. वुईके कोरकू जातीचा असूनही स्वार्थापोटी आपल्याच जातीच्या लोकांवर अन्याय करतो. खोटे कागदपत्र बनविण्यास रहिमशेठला मदत करतो. लहानतोंडी मोठा घास घेणे कोरकूंना झेपत नाही. शिकलेल्या केरुलाही या प्रकरणी माघारच घ्यावी लागते. टेमरेला भेटून हताशपणे तो माघारी फिरतो.

"...आपला समाज म्हणजे पालापाचोळा, कुणीबी पायाखाली तुडवावं. पण तक्रार नाही. वाऱ्यावर पालापाचोळा उडतो तसे आपण फक्त ढोलाच्या तालावर उडतो. ढोलाला ताल तरी आहे पण आपणांस ताल नाही. बेताल... आपली जातपंचायत नि ही चिमणीपंचायत सारखीच तर. आपलीही जातपंचायत एखाद्याला असंच एकटं पाडते. हैराण करते. आपण वुईकेला जाब विचारला तर लोक पाठीशी येतील का?" (पृ.२९) कोरकू लोक संघटित नसल्यामुळे त्यांचे शोषण होते. स्थानिक नेत्यांच्या आशीर्वादाने व्यापारी कोरकूंचे शोषण करतात.

आदिवासींना अधिकाधिक व्यसनी बनविले जाते. केरुला खंडेलवाल म्हणतो, "...कोरकू जात दवा को भी नही मिलेगी" (पृ.३६) कारण मुस्लिम व्यापाऱ्यांकडून

होणारी लुबाडणूक, ख्रिश्चनांचा धर्मप्रसार, दारु, लालपरी, सरकारी मोसंबी-नारिंगी दारु, टायगर प्रोजेक्ट, या सर्व गोष्टी त्यांच्या जीवावर उठल्या आहेत. अडाणी, दरिद्री कोरकूंचे शोषण करतात. कान असून बहिरे, डोळे असून फुटके आणि कष्ट करुन फाटके राहण्याची त्यांची परंपरा आहे. जसे रहिमशेठ म्हणतो, "शिवी शिवाय ही जात वळत नाही आणि दमदाटीशिवाय त्यांना काही कळत नाही." (पृ.४४) त्यामुळे दमदाटी करुन कोरकूंकडील मोहफूल आणि अन्य माल व्यापारी अल्पदरात आणि वजनात घोळ करुन जबरदस्तीने खरेदी करतात. स्वत:कडील माल कोरकूंना चढ्या भावाने विकतात.

वनखात्यातील लोक भ्रष्टाचार करतात. आदिवासींचे शोषण करतात. जंगलातील लाकूडफाट्याची चोरी केल्यावर पैसे वसूल करतात. पिळवणूक करतात. पोलीस अज्ञानी कोरकूंना दमदाटी करतात. लेखक वर्णन करतो, "...त्या बाजारातील पोलीस चौकी म्हणजे ग्रामपंचायतच्या व्हरांड्यात एका मोडक्या खुर्चीवर बसणारा तो पोलीस. बिड्या ओढता पाचपन्नास रुपयांची कमाई खिशात घातली की पोलीस चौकी संध्याकाळी उडली." (पृ.६६) पोलीसखात्याकडून होणाऱ्या शोषणाची यावरुन कल्पना येते. सरकारी योजना कधीच पूर्णपणे राबविल्या जात नाहीत. अर्धवट सोडल्या जातात. त्यामुळेही आदिवासींमध्ये सरकारी योजनांबद्दल उदासीनता आढळते. ग्रामीण भागाचे विद्युतीकरण, बोअरवेल, रस्तेबांधणी व दुरुस्तीमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेचा कोरकूंनी धसका घेतलेला दिसतो. कारण सरकारी अधिकाऱ्यांना ठरवून दिलेला कोटा पूर्ण करण्यासाठी ते अज्ञानी-व्यसनी कोरकूंना फसवितात. त्यामुळे बाहेचा अनोळखी माणूस दिसला की स्त्री-पुरुष जंगलात पसार होतात. जसे व्हेटर्नरी डॉ. टिकेकर गावात सभा घेण्याचे ठरवितो. तेव्हा फक्त गवळीच सभेला येतात, कोरकूठाण्यावर कोणीही हजर नसते. रपट्याच्या कामावर मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. कोरकूंना अल्पमजूरीत दिवसभर राबविले जाते. सरकारला माणसापेक्षा जंगली प्राणी वाचविण्याची काळजी वाटू लागल्याने एक नवी समस्या निर्माण झाली. माणसांप्रमाणेच जनावरांवर जंगलीप्राणी हल्ला करुन ठार मारतात. त्यामुळे वैतागलेले लोक वाघ मारतात. परिणामी सरकार गवळ्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेते. एक दिलाने, एका ठिकाणी राहिलेले लोक जुनी जागा सोडून नव्या जागी जाण्याच्या टांगत्या तलवारीमुळे उदास होतात. तारुबांदा सोडून परसापूरजवळच्या भुलेश्वरी तलावाजवळ नवीन गावठाण वस्तीवर जाण्याच्या कल्पनेने गवळी बेचैन होतात. स्वत:कडे-जनावरांचे त्यांचे दुर्लक्ष होते. असे समाजवास्तवाचे चित्र लेखकाने रेखाटले आहे.

"जांगडीच्या दुनियेत आपण म्हणजे जंगली जनावरं आहोत... हतबल आहोत" याची जाणिव कोरकूंना झाली आहे. हेच केरु फुलयची प्रेमकथा रेखाटताना लेखकाने

सांगिते आहे. आधुनिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे आदिवासी तरुणींनी आधुनिक फॅशनचा स्वीकार केला, लुगडे आणि गाठीच्या चोळीऐवजी साडी आणि बटणांचा झंपर वापरु लागल्या. या परिवर्तनाबरोबर व्यापाऱ्यांनी फायदा उठविण्याची संधी सोडली नाही.

'गरिबी हटाव' म्हणणाऱ्या सरकारचा भांडवलशाहीकडे तोल गेला. दळणवळण आणि नागर संस्कृतीचा वाढता संपर्क यामुळे शोषकांचे नवेनवे वर्ग उदयास आले. "आजच्या व्यावहारिक जगात सरकारी उपक्रमातून चालवलेल्या सोसायट्यांमधून वाकड्या मार्गाने आपल्या तुमड्या भरुन घेणारे शेठ लोक आणि निरक्षर आदिवासींना आर्थिक व्यवहारात फसवून व्याजबट्टा करणारे, त्यांच्या मालावर झडप घालणारे व्यापारी ही इथे दिसतात." असा अभिप्राय कादंबरीच्या प्रथमपृष्ठावर नोंदविला आहे. त्याची साक्ष कादंबरीत मिळते. स्वस्त दरात लुकडे वाटप, गाईगुरांसाठी वैद्यकीय सोयी, मुलांसाठी अंगणवाडी इत्यादीतून जसे शोणच होते, त्याचप्रमाणे व्यापारी आदिवासींच्या मालाच्या वजनात आणि दरात घोळ करतात. जीवनावश्यक गोष्टी महाग विकतात. शोषण, भ्रष्टाचार, विषमता यांचे जिवंत चित्र प्रस्तुत कादंबरीत लेखकाने काढले आहे. बायको अस्वलाने ठार मारलेल्या मोपाचे लेखक वर्णन करतो,

"पन्नाशी उलटलेल्या मोपान डोक्यावरील टोपीचं शिपतर काढून गुडघ्यावर ठेवलं. त्या फाटक्या टोपीचा वास त्याच्या नाकाला झोंबल्यानं त्यानं ते शिपतर पुन्हा डोक्यावर ठेवलं. अंगात फाटलेला ढगळ खमीस. पोटात फाळ घुसलेल्या रानडुकराची जशी आतडी लोंबकळतात तशी त्याच्या धोतराची चिरगुटं झाली होती." (पृ.५) शिपतरासारखी टोपी, ढगळा खमीस, धोतराची चिरगुटं यातून मोपा पटेलच्या दारिद्र्याची स्पष्ट कल्पना येते. त्याला उफाड्याची फुलय कष्ट करुन सांभाळते. एकूण सर्वच आदिवासी प्राथमिक पातळीवरचे जीवन जगतात.

देशाचा विकास होत असतानाच आदिवासी समाजामध्ये आजही वस्तुविनिमयाची पद्धत आहे. जसे, कोरकूठाण्यात कासम हलक्या प्रतीचे सौंदर्यप्रसाधन आणि लालपरी किंवा खाऊ विकतो, "पैशाच्या बदली मोह, धान चारोळी तो सावटत होता. रुपयाचा माल दोन रुपयात विकून दोन रुपयाचा माल रुपयात लाटत होता."(पृ.१७) किंवा "भर उन्हात भाजीपाल्याचे बेपारी कांदे, लसून, आळू, भाजी यांचे वाटे विकत होते. तराजू आणि वजनाचा संबंध नव्हता."(पृ.२१) व्यापारी सोसायटीच्या नोकरदारांना हाताशी धरुन भ्रष्टाचार करतात. त्याप्रमाणे व्याजबट्ट्याच्या व्यवहारात आणि मालाच्या वजन-दरातही घोळ करतात. स्वार्थ साधतात. त्यामुळे प्रचंड आर्थिक विषमता निर्माण झालेली दिसते. "ठेंगणासा... काळासावळा रहिमशेठ फार धूर्त होता. मलमलचा नेहरु शर्ट... टेरिकॉटचा पोटाच्या अर्धऐरीवर चढविलेला पायजमा, उजव्या हातातील

दोन बोटात दोन सोन्याच्या अंगठ्या... डाव्या हाताच्या मनगटावर सोन्याची चैन असलेलं रिस्टवॉच... (पृ.३०) असे रहिमशेठचे वैभव आहे. यातून विषमतेची कल्पना येते. किंवा खंडेलवाल वल्लभचा वल्लभदास झाला. त्याच्या व्यवहारी दृष्टीचे लेखक वर्णन करतो, "...एकदा का होळी झाली की दिवाळीपर्यंत या कोरकूंच्या जवळ दमडीही शिल्लक नसते याचा त्याला पुरेपूर अनुभव होता. होळी ह्यांचा सगळ्यात मोठा सण. पण यांची होळी करणारा. होळीत लाकडं एकच दिवस जळतात... फार झालं तर दोन दिवस. पण यांची घर तब्बल सात आठ महिने जळत राहतात..."(पृ.३४) वरील वर्णनावरुन असे म्हणता येईल की, प्रादेशिकतेचा समाजवास्तवावर परिणाम होत असतो. जसे, डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या कोरकूंच्यापुढे हंगामात फारसे आर्थिक प्रश्न नसतात. लाकूडफाटा, मोहफुलं आणि शेतमाल यामुळे ते आनंदात असतात, परंतु होळीपौर्णिमेच्या बाजारात व्यापाऱ्यांनी सर्व माल लुटल्यावर त्यांना अन्यठिकाणी रोजगारासाठी भटकावे लागते. जंगलात कंदमुळे, फळे मिळत नाही. नदी आटल्यामुळै मासे मिळत नाहीत. म्हणून घरातील भांडी, चांदीचे दागिने गहाण ठेऊन किंवा मजुरी करु उदरनिर्वाह करावा लागतो. "...वाघापेक्षा माणूस नावाचं जनावर त्यांना अधिक तापदायक वाटत होतं. रपट्यावर... बाजारात... ढाण्यात हेच जनावर त्यांना नागवीत होतं... त्यांच्या जीवनाचं रहाटगाडगं जांगड्याच्या हौदात मोलाचं पाणी रिचवत होतं." (पृ.५९) याचप्रमाणे लेखक वर्णन करतो, "दह्यादुधाच्या वासानं वेधलेली अवदसा कोरकू ढाण्यात कायमची विसावली."(पृ.६२) अशाप्रकारे प्रदेशविशिष्ट विषमतेचे चित्रण लेखक करतो. म्हणून शंकर सारडा यांचा पुढील अभिप्राय सार्थ वाटतो, "...ही कादंबरी म्हणजे कोरकूंच्या समाजजीवनाचे आणि जीवनपद्धतीचे एक अत्यंत प्रामाणिक व विश्वासार्ह दर्शन आहे. पारंपरिक आदिवासी जीवनशैलीला टायगर प्रोजेक्ट, सहकारी संस्थातील भ्रष्टाचार, शासकीय अधिकाऱ्यांची अरेरावी आणि बाहेरुन आलेल्या स्वार्थी व लबाड दलाल-व्यापाऱ्यांची लुबाडण्याची वृत्ती. या सर्वांमुळे निर्माण झालेला धोका, आजमितीचे काळाचे परिणाम कसे उद्ध्वस्त करीत आहे याचे एक सर्वंकष चित्र 'झेलझपाट'मधून वाचकांच्या मन:पटलासमोर उभे राहते."४८.

समकालीन परिस्थितीत लोकनेते भांडवलदारांच्या पुण्याईने निवडून येतात. निवडणुकीसाठी भांडवलदार-व्यापारी मोठ्या प्रमाणवर खर्च करतात. आपला नेता निवडणूक जिंकला की सरकारी योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करुन निवडणुकीसाठी केलेला खर्च वसूल करतात. भ्रष्टाचाराला राजकीय नेतेच प्रोत्साहन देतात. कारण त्यांचे लक्ष पुढील निवडणुकांवर असते, समाजहितावर नसते. रहिमशेठ लुगडेवाटपासंबंधी खोटे कागपत्र तयार करतो, तेव्हा करु वुईके साहेबाकडे त्यासंबंधी चौकरी करतो. तेव्हाचे वुईकेचे उद्‌गार बोलके आहेत. तो म्हणतो,

''तू कशाला पंचायती करतो. आपल्या एमएलए सायबाच्या इलेक्शनचा या टापूतील सारा खर्च रहिमशेठ करतात. तू कितीही कांड्या केल्या तरी काही बिघडणार नाही कोणाचं, समजला? उलट तुझ्याच गांडीत त्या सेठनं काडी खोचली तर मरेपर्यंत कथशील, जाऽ!''(पृ.३०) व्यापाऱ्यांप्रमाणे कामांध सरकारी अधिकारी आणि पुढारी सत्तेच्या गुर्मीत वागतात. सामान्य माणसांबरोबरच हाताखालच्या नोकरदारांचे शोषण करतात. स्त्रियांचे शील भ्रष्ट करतात. कामवासनेच्या तृप्तीसाठी त्यांना आपल्या मर्जीनुसार वागण्यास भाग पाडतात. त्यांना विरोध केला तर गैरसोयीच्या ठिकाणी बदली केली जाते. जसे, उत्तम तलाठी सरकारी हद्दीत, सरकारी जंगलातील लाकडाचे घर बांधतो. त्याच्या उत्पन्नाला तोटा नसतो. रेव्हेन्यूच्या साहेब लोकांसाठी तो खर्च करतो, त्याची बदली होत नाही. उलट अंगणवाडीच्या बाई कोलखासला कॅंफो आले असता त्याची कामवासना तृप्त करण्यासाठी बीडीओची बायको पाठविण्यास सांगते, स्वत: जात नाही. तेव्हा बी.डी.ओ. आणि सभापती तिचा अपमान करतात. बाजारबसवी ठरवितात आणि दुर्गम गंगाझरीला तिची बदली करतात.

शैक्षणिक क्षेत्रात अपप्रवृत्ती बळावलेल्या दिसतात. त्याप्रमाणे कोरकूंमध्ये शिक्षणाबद्दल उदासीनताच आहे कारण मातृभाषेतून शिक्षणाच्या प्रसाराची कल्पना आपल्या देशात मूळ धरु न शकल्यामुळे अन्य भाषेतून शिक्षण घेणे कोरकूंच्या मुलांना झेपत नाही. जसे केरु मॅट्रिकपर्यंत शिकला परंतु त्याचे अभ्यासात लक्ष लागत नाही. ''कित्येकदा पुस्तकं पुढ्यात घेऊन तो बसला की त्याला प्रश्न पडे भाषेचा. वस्तीत लोक, आपआपसात बोलतात ते कोरकू भाषेत आणि इतर जांगड्यांशी बोलतात ते रांगड्या हिंदीत पण पुस्तक उघडली की पाला पडतो तो मराठीशी. सारंच अपरिचित. असं कसं? आपल्या कोरकू भाषेत पुस्तकं नसल्याने कुणाला शिकाव असं वाटतच नाही.'' (पृ.१४) मातृभाषेतून शिक्षण प्रसाराचा अभाव, लोकाची उदासिनता आणि शिक्षक-अधिकाऱ्यांचे गैरवर्तन या सर्व गोष्टीमुळे आदिवासी शिक्षणापासून वंचित राहिलेले दिसतात.

परिवर्तन काळामध्ये शासनाच्या विकास योजना आणि शिक्षणप्रसाराच्या धोरणामुळे समाजजीवनात बदल होत असताना काही समस्या निर्माण झाल्या. परंतु सांस्कृतिक जीवनामध्ये अजिबात बदल झालेला दिसत नाही. कोरकूंच्या श्रद्ध-समजुती, परंपरा आणि सण उत्सवांचा प्रभाव समकालीन परिस्थितीत कायम असलेला दिसतो. या सर्वांतून लेखकाने लोकमानसाचे प्रभावी जिवंत चित्र रेखाटले आहे.

गवळी ढाण्यातील लोक आणि कोरकू यांच्यात सांस्कृतिकदृष्ट्या वेगळेपण असलेले दिसते. जसे महाशिवरात्रीला इतर जमातीचे लोक सालबर्डीच्या महादेवाच्या दर्शनाला जातात परंतु कोरकूना माघ अमावस्येच्या होळीचे वेध लागल्याने ते महादेवाला जात नाही. यातून कोरकूंची स्वतंत्र संस्कृती दिसते. होळीउत्सव साजरा करण्यासाठी ते

अधिकाधिक धडपडतात. मोहफूल विकून उत्सव साजरा करतात. इतर वेळी अबोल असणारे कोरकू होळीच्या वेळी बोलके बनतात. ढोल-पिलमपोवे दुरुस्त करतात. रस्त्यावर तरुणांनी ढोल बडविण्यास आणि सूर काढल्याबरोबर मुली टिकल्या लावलेले रुमाल... टपल्या घेऊन धावतात. फेर धरुन सिरिंगऽऽ, पिरिंगऽऽ, निरिंगच्या लयीवर नृत्य करतात. पुरुष दारु पिऊन झिंगलेले असतात. मुली गीत गातात. शेवटी स्त्री-पुरुषांचे मिश्र समूहनृत्य होते.

झुझुरे झुरे लाडीन चलो अपना देस मेऽ
माय ना बापू आसा तोळे चला अपना देस मेऽ

यातून कोरकूंचे सांस्कृतिक ऐक्य आणि निष्पाप खेळकरपण दिसतो.

होळीपौर्णिमेच्या दिवशी गवळी मारोतीसमोर होळी पेटवितात. उलट कोरकू दुसऱ्या दिवशी पहाटे होळी पेटवितात. त्याचे कारण एक लोककथा सांगितली जाते. "जांगडीप्रमाणे होळी पेटविली जात होती. परंतु कोरकूंचे पूर्वज रानात लाकडं आणण्यासाठी होळीच्या दुपारवेळीच गेले होते. पुष्कळ लाकडं आणावयाची... थकवा येईल म्हणून दारु पिल्याने माघारी येण्याचे भानच राहिले नाही. बायका वाट पाहून कंटाळल्या. शेवटी दारु उतरल्यावर पहाटे लोक लाकडं घेऊन आले. होळी पेटविली. तेव्हापासून असा प्रघात चालू आहे."(पृ.४८-४९) संक्षेप होळी पेटवून दारु पिऊन नृत्य करणारे कोरकू गावात फगव्याचा इनाम मागतात. लोकांकडून बक्षिसी घेतात. या बक्षिसीतून सामुदायिक फागव्याची पंगत बसते. फागव्याची पंगत जनजातीची संस्कृती वैशिष्ट्ये सांगणारी प्रादेशिक आहे. फागव्याचा इनाम देण्याचे टाळून पळणाऱ्यांना ते म्हणतात,

"मुर्गा होय तो ठैरा, मुर्गी होय तो भागो।
जांब की जडीयॉवाले, ठैरे मरे साले। (पृ.५१)

गवळी ठाण्यातील लोकांना पाडव्याचा आनंद होतो. उलट कोरकूंना चैत्रातील देवीदर्शनाच्या संधीचा आनंद होतो. कर्ज काढून ते देवीला जातात. नारळ फोडतात. बोकडाचा बळी देतात. त्यांच्या देवदेवताही वेगळ्या आहेत. लेखक वर्णन करतो, "गाव शीवेलगत एका चिंचेच्या मोठ्या झाडाखाली मुडाचं ठाणं. अवतीभोवती नाग प्रतिमा. हे नाग... मूंछ कोरकूंचे पितर. माथ्यावर सूर्य प्रतीक... मागच्या बाजूस चंद्रकोर, लाकडाच्या गाभ्यात घोड्यावर स्वार झालेला पितर आणि मुठवाभर नृत्य करणाऱ्या मानवी आकृती कोरलेल्या." (पृ.२) अन्य लोकांच्या देवदेवतांची ते पूजा करीत नाहीत. यातूनही कोरकू जन-जातींचे सांस्कृतिक वेगळेपण दिसते. गवळ्यांच्या स्त्रियांना बेडकाची किळस येते, तर कोरकू बेडकाला माता मानतात, त्याचे गीत गातात,

"डेडरा माटा मानी दे ऽऽ

पाणी का आयोमऽ शेराम् ऽ शेराम ऽऽ
डेडरा माटा पानी देऽऽ (पृ.७६)

बेडूक माताच पावसाळ्यात मुबलक पाणी देतात अशी कोरकूंची श्रद्धा आहे.

विवाहकल्पनाही कोरकूंचे स्वतंत्र सांस्कृतिक वेगळेपण सांगणाऱ्या आहेत. जातपंचायतीच्या निर्णयानुसार मुलीला हुंडा देऊन आणि ग्रामस्थांना शिडू दिल्यानंतरच मुला-मुलींचे लग्न होते. दहेज (हुंडा) द्यायची ऐपत नसेल तर मुलीच्या घरी मुलाने लांबजाना होऊन राहण्याची पद्धत आहे. किंवा मुलीने मुलाच्या घरात घुसण्याची पद्धतही आहे. लांबजाना म्हणजे नवरीचा हुंडा फिटेपर्यंत सासऱ्याच्या घरी कष्ट करुन राबणारा घरजावई, केरु-फुलय जाती-रिवाजाच्या विरुद्ध धाडस करीत नाही म्हणून जवळ असूनही ते दूर राहतात. केरुला लांबजाना होणे मान्य नाही, तर फुलय त्याच्या घरात घुसत नाही. गौलखेडचा होळीचा बाजार म्हणजे सोयरिक बाजार, कत्येकांचे शरीरसंबंध पक्के होतात. कित्येक तरुणतरुणी पळून जाण्याचे-घर घुसण्याचे बेत नक्की करतात.

कोरकूंच्या काही समजूती आहे. जसे मंत्राने वाघाची दाढ बांधता येते, त्यानंतर त्याचा लोकांना उपद्रव होत नाही. (पृ.१३) भूताखेतांवर त्यांचा अंधविश्वास आहे. जसे, दारु पिऊन बेशुद्ध झालेल्या मालायला "इजी केन भूत घाईकेन, हिला भूतान झपाटले." (पृ. २२) असे समजून मांत्रिकास बोलावून तांदळाच्या मुठी मारुन मंत्र टाकून भूत उतरविले जाते, नव्हे दारु उतरल्यावर ती शुद्धीवर येते, तापी नदीतील सावळा माशाच्या डोक्यातील गारेचा खडा उगाळून चाटला की लघवी मोकळी होते, मुतखड्याचा विकार नाहीसा होतो.(४७) वाघाच्या मिशा मटनात खाऊ घातल्याने माणूस खंगतखंगत मरतो. (पृ.५८) अस्वलीच्या नाजूक भागाचा मंतरलेला तुकडा तोंडात घेऊन स्त्री समागम केल्यास अचाट ताकद येते आणि त्यामुळे मुले होतात अशा विविध समजुती कोरकूंमध्ये असलेल्या दिसतात.

कोरकूंच्या समाज जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या प्रस्तुत कादंबरीचे निवेदन लेखकाने प्रमाणभाषेत केले असून संवाद मात्र कोरकूंच्या बोलीत, आणि अन्यलोकांशी बोलताना ते रांगड्या हिंदी भाषेत लिहून अधिक वास्तव चित्रण केले आहे. कोरकूंच्या बोलीतील संवादाचा वाचकांच्या सोयीसाठी संवादापुढेच प्रमाणमराठीत अर्थही लिहिला आहे. परंतु गीते मात्र पूर्णपणे कोरकूंच्या बोलीत आहेत. त्यांचा संदर्भाने अर्थ लावावा लागतो. उदा.

"लाहोरी फसी गई रामऽऽ, शिकारीने फूंदा डलेऽऽ (पृ.७८) किंवा
सीटे बाई होऽ, गांगो लगा,
डंडा नवा खेले! डंडा नवा खेले!!
आज को डंडा, तारुबांदा गेलीन डोऽऽ

डंडा नवा खेले!

सीटे बाई डोऽऽ, डंडा नवा खेले!! (पृ. ४९)

अशा प्रकारे केरुनं छेडलेल्या पहाडी ढोलावर फुलयनं शिमगा सिरिंज मळटली. समाजवास्तवाचे आणि कोरकूंच्या आवडीनिवडींचे दर्शन घडविणारे पुढील संवाद पहा.

१) फुलय-मोपाचे संवाद : "आम शिडू नुयेन? तू ऽऽ पितोस?
दाऽ ओऽ! इंज नुयेन शिडू आया साधो।"होऽ दारु पितोऽ" (पृ.६)

२) विठू-मोपा संवाद :
"आम शिड् नुनू बाकी च्यूज? पितोस कायऽ? आमच्याबरोबर"
"हाऽऽ अरं ऽऽ जांगडी। इंज आमा साथी शिंडू नुनू बां ।..." (पृ.७)

३) केरु-फुलय संवाद :
"हालाऽऽ जा, आमा इंज जापाय? लुबू बा की खिकडी?... फुलय इयान ऽ लांबजाना, बान् ऽ हो नाऽ"... केरु
"डोगे, इंग आम रवे ढेगाटे ढेचाकीऽ मी बाऽऽ!" (पृ.४०)

४) कासम-फुलय संवाद : "ए सानी ऽ लेऽ लिज्जा ऽऽ!
किटना पैश्या रेऽ !" फुलय

"आरेऽ लि ज्या ऽ पैसा बादमे लेंगा, तू मोपामामाकी लडकी हैसना ऽ!" (पृ.१६)

वरील संवाद हे कोरकूंच्या बोलीतील आणि जांगडीच्या हिंदीत आल्याने अधिक स्वाभाविक वाटतात. उपमा प्रतिमा देखील अधिक स्वाभाविक आहेत. जसे, "चिंध्यात लपेटलेल्या फाटक्या माणसासारखी झाडं होती", "झाडांच्या उघड्या मुळ्या वेटोळे घातलेल्या अजगरासारख्या दिसत होत्या", "मोपाच्या मिशा अणकुचीदार बांबूच्या बेटासारख्या, गालावर केसांची पांढरी धसकटं कडबा सोगलेल्या वावरातील फनकटासारखी", "नदीच्या पात्रातील लव्हाळीचं बेट वाऱ्यावर जसं डोलतं तसं बायापोरीचं बेट डोलू लागलं", "काळीशार दाढी आग्यामोहोळाच्या पोळ्यासारखी दिसत होती," "...काही पोरं त्याच्याकडं धावली, कडब्याच्या गंजीकडे ढोर धावावीत तशी", "पांढऱ्याफेक कोंबडीभोवती काळ्या कोळशीची पिल्लं तुरतुरवित तशी ती पोरं दिसत होती." याप्रमाणचे काही म्हणी, वाक्प्रचार पहा.

"गेला मायऽ मागं ना पुळे... त्याच्यासाठी कोन रळे?", "सटवाईले नाई नवरा अन् म्हसोबाले नाई बायकोऽऽ ", "शेंडीत धूळ अन् पोटात शूळऽ..." कोरकूंच्या बोलीतील नावीन्यपूर्ण शब्द

शिडू, नुयेन, इंज, डेनारे, नुनू, जांगडी, सिरिंज, सानी, बाणा, लोचयत, ससना, इंजीकेन, घाईकेन, परिहार, झिलू, झिलटो, होन्दोरे, रपटा, डोंगोर, जुलू,

लाकेन, आम, ब्याव, डाडा, बा, च्यूज, डोगे, डोबरा, डा. लाख्वोड, लांबकान्, सेने, माटा, मेरान, होयेंगा, चोंज, बो, बा, टेन, टाका, झट्टो, गाडान, चिपोळ, टाखा, लाहोरी, फूंदा इ. शब्दांबरोबर आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे काही इंग्रजी शब्दही येत. उदा. स्टॉक, टायगर प्रोजेक्ट, एमएलए, रेकॉर्ड, टेम, व्हेटर्नरी डॉक्टर, जर्सी, होलस्टीन फ्रेणियम, हिट, इलेक्ट्री, बोअरवेल, ड्रिलिंग, हाबशी, क्वार्टर इ.

डॉ. श्रीकांत तिडके यांनी सुरेश द्वादशीवार यांच्या 'हाकुमी' आणि मधुकर वाकोडे यांच्या 'झेलझपाट' या कादंबऱ्यांचा तुलनात्मक परामर्श घेऊन 'झेलझपाट'चे भान अधिक उजवे आहे असे म्हटले आहे. ते लिहितात, "दोन्ही कादंबऱ्यांमधील आदिम संस्कृतीचे दर्शन कौतुकास्पद आहे. केवळ सांस्कृतिक तपशीलच ह्या कादंबऱ्यात आहेत असे नाही तर अशा तपशीलामागे आदिवासींचे सण, त्यांच्या नृत्यादि क्रीडा, लग्नपद्धती, त्यांच्या मधल्या अंधश्रद्धा यांचे अभ्यासपूर्ण आकलन लेखकद्वयांना आहे. हेच ह्या कादंबऱ्यांचे मोठे बलसथान आहे."४९. हा अभिप्रायच बोलका आहे. त्याचप्रमाणे डॉ. रवींद्र शोभणे लिहितात, "झेलझपाट' ही मधुकर वाकोडे यांची समर्थ कादंबरी. मेळधाट परिस्थितीतील कोरकू आदिवासींच्या जीवनावरील ही कादंबरी तिथल्या जीवन दर्शनाबरोबर त्या जीवनातील अंतर्बाह्य बदल अधिक सूक्ष्मपणे आणि मन:पूर्वकतेने टिपते."५०.

सारांश, आतापर्यंतच्या विवेचनावरुन आणि समीक्षकांच्या अभिप्रायाधारे 'झेलझपाट' ही कोरकूंच्या समाजजीवनाचे आणि जीवनपद्धतीचे वास्तव चित्रण करणारी जनजातीच्या जीवनावरील वैशिष्ट्यपूर्ण वैदर्भीय कादंबरी आहे असे म्हणावे लागेल.

## संदर्भ आणि टीपा


१) वऱ्हाडपांडे वसंत कृष्ण - "कादंबरीकार गो. नी. दांडेकर" संपा. वीण देव, पृ. १११
२) बांदिवडेकर चंद्रकांत - तत्रैव पृ. १२०
३) मचंरकर र. बा., 'अनुष्टुभ' जाने-फेब्रु. १९९४, पृ. ३१
४) फडके भालचंद्र, 'मराठी कादंबरीची वाटचाल, पृ. ६५
५) पुंडलीक विद्याधर, सत्यकथा, सप्टेंबर १९६२, पृ. ७८
६) आहेर कमल, साहित्यसूची, एप्रिल १९८९, पृ. ३९
७) भास्कर नंदनवार - सोबत, ११ एप्रिल १९७६
८) कोत्तापल्ले नागनाथ, "ग्रामीण साहित्य - स्वरुप आणि शोध", पृ.२१
९) शोभणे रविंद्र, "महाराष्ट्र साहित्य पत्रिका", मे १९९१, पृ.३८-३९

१०) सुधाकर भोसले, म. सा. प., जुलै तेडिसे. १९७४, पृ. ५१
११) तोरो अ. रा., "पीएच.डी. प्रबंध", पृ. २५९
१२) पाटील शंकर, "महाराष्ट्र साहित्य पत्रिका, एमेज १९६१, पृ. ५१
१३) पाटील म. सु. 'प्रतिष्ठान' जानेवारी १९८१, पृ. ४४
१४) भोसले सुधाकर, तत्रैव.
१५) नेमाडे भालचंद्र, "मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरुप", पृ. ४९
१६) कुल्ली स. त्र्यं., "अक्षरवैदर्भी", ऑगस्ट १९९०, पृ.४६
१७) भोसले एस.एस. 'रहस्यरंजन", जून १९६२, पृ. २९
१८) त्रिलोकेकर पुष्पा - "नवयुग", ६ ऑगस्ट १९६१
१९) वाकोडे मधुकर, रजधूळ', अकोल, ऑगस्ट १९८६, पृ.१
२०) चिंचाळकर मृणाल, 'आकाशवाणी नागपूर' (हस्तलिखित पृ.३)
२१) कानडजे एस. एम. 'विशाखा' जाने० १९८७, पृ. २६
२२) मुसळे बाबाराव - 'आभार', (लेखक मनोगत), पृ.७
२३) कालपे भ. पूं. "आदर्श" १९९०-९१, पृ. १
२४) लहाने इंदूमती, युगवाणी जा. फे. मा., १९८६, पृ. ६१
२५) बड जयंतकुमार, अक्षरवैदर्भी, जानेवारी १९८६, पृ. ४७
२६) तत्रैव
२७) वाकोडे मधुकर, तत्रैव पृ. ९
२८) दुधलकर दे. शि. अस्मितादर्श एमेजू १९८६, पृ. ३०
२९) कानडजे एस. एम. तत्रैव, पृ. २७
३०) कोलते वि. भि. दै. राष्ट्रतेज पुणे ३ डिसें १९८६
३१) कालपे भ. पू., तत्रैव, पृ.२
३२) बापट मनोरमा लोकप्रभा - मुंबई दि. ११ मे १९८६, पृ. ४९
३३) गुंदेकर श्रीराम, ग्यानबा मुंबई पृ. १४
३४) दीक्षित कमलाकर, दै. राष्ट्रातेज, पुणे ३ डिसें. १९८६
३५) देशपांडे पु. ल., तत्रैव
३६) पाटील श्री. य., दै. तरुणभारत दि. २२/१२/१९८५, पृ. ७
३७) मानकर प्रशांत, दै. शिवशक्ती, दि. १०/७/१९८६
३८) हाळमकर सोपान अंकुर पृ. ७
३९) बड जयंतकुमार अक्षरवैदर्भी एप्रिल मे १९८९ पृ. ४८
४०) घारे दीपक ललित एप्रिल १९८८ पृ. २०
४१) वाहोकार वसंत युगवाणी जाफेमा १९८९, पृ. ११२
४२) मुडले आशा महाराष्ट्र साहित्य पत्रिका जाफेमा १९८९, पृ.१७

४३) बंड जयंतकुमार, तत्रैव पृ.५०,५१
४४) वाहोकार वसंत, तत्रैव, पृ.११५
४५) मुंडले आशा - तत्रैव, पृ.१८
४६) सारडा शंकर, 'ग्रथविशेष', पृ. ३८
४७) तत्रैव पृ. २६
४८) तत्रैव, पृ. २४
४९) तिडके श्रीकांत, 'वसंत' फेब्रुवारी १९९३, पृ. ३०
५०) शोभणे रवींद्र, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै-सप्टें, १९९०, पृ. ५३

□□□



**प्रा. डॉ. भास्कर शेळके**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि. पुणे
मोबा. ९८९०६८६५२१, ९८२२४४८१८१
निवास - २३, श्रीदुर्गा, बारव, जुन्नर, जि. पुणे

**ग्रंथसंपदा**

१) मराठी कादंबरीतील प्रादेशिकता, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
२) समीक्षा, संकल्पना आणि स्वरूप, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर
३) ग्रामीण साहित्य, स्वरूप आणि चिकित्सा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
४) प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
५) चळवळ आणि साहित्य, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
६) मराठी प्रादेशिक कांदबरी: स्वरूप आणि विश्लेषण, शब्दालय प्रकाशन

**संपादन**

७) ग्रंथवेध, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
८) कथा गौरव
९) काव्यकस्तुरी
१०) अधिष्ठान अभ्यासक्रम
११) वाङ्मय प्रकार कविता
१२) विज्ञान वेध

शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर